Dhananjayarao Gadgil Library
GIPE-PUNE-252309

252309

ENTERED IN DATABASE

xM501
E7.2
252309

# तारा नाटक.

एकेन स्मितपाटलाधररुचो जल्पन्त्यनल्पं परं
वीक्षन्तेऽन्यमितः स्फुटत्कुमुदिनीफुल्लोल्लसल्लोचनाः ।
दूरोदारचरित्रचित्रविभवं ध्यायन्ति चान्यं धिया
केनेत्थं परमार्थतोऽर्थवदिव प्रेमास्ति वामभ्रुवाम् ॥[1]

अंक ६०—( १ ) प्रस्तुत अंकास स्वतंत्र विषय घेण्याचीं कारणें. ( २ ) 'तारा नाटक.' ( ३ ) त्याचें संविधानक. ( ४ ) संविधानकांतील दोष. ( ५ ) मूळ नाटकांत केलेले फेरफार. ( ६ ) इकडील रीतिरिवाजास न जमणारे भाग. ( ७ ) प्रस्तुत ग्रंथापासून एतद्देशीयांस उपयोग. ( ८ ) मराठा पुस्तक या दृष्टीनें पाहतां प्रकृत नाटकांतील दोष. ( ९ ) मासल्याकरतां उतारे.

१. प्रस्तुत अंकाचा वरील विषय पाहून आमच्या वाचकांस बराच आचंबा वाटेल असें वाटतें. का कीं, पूर्वींच्या क्रमास अनुसरून झटलें झणजे हा अंक उपसंहाररूप असायाचा. यांत एकंदर वर्षाचा आढावा दाखवून आमची आमच्या प्रतिपक्ष्यांकडे किती बाकी फिरते व त्यांची आमच्याकडे किती निघते हें वाचकांस समजावून द्यावयाचें. पण यंदां तसें करण्यास फारशी सवड नाहीं. गेल्या सालची जबरदस्त वेसण* सार्‍यांच्या नाकांतून सारखीच ओंवली गेल्यामुळें झणा, अगर गेल्या अकरा अंकांतील विषय अंमळ निराळ्याच पद्धतीचे पडल्यामुळें झणा, आमच्या लेखांवर दूषणें मुळींच कोठेंही आलीं नाहींत.[2] गतवर्षींच्या

---

१. "स्मिताच्या योगानें अधरोष्ठाची लाली मोडून त्यावर आरक्तता आली आहे अशा होत्सात्या एका पुरुषाशीं पुष्कळपणीं बोलतात,—पूर्ण विकास पावलेल्या कमलांसारख्या सुप्रसन्न नेत्रांनीं दुसऱ्याकडे पाहतात,—आणि अत्यंत कीर्तिमान् व भाग्यवान् असणाऱ्या तिसऱ्यावर मन ठेवतात,—तेव्हां स्त्रियांचें वास्तविक प्रेम असतें तरी कोणावर म्हणावें ?"

* व्हर्नैक्युलर् प्रेस् अॅक्ट् लिटन्शाहींतील देशभाषांतील वृत्तपत्रांची मुस्कटदाबी करणाऱ्या १८७८ सालच्या कायद्याचा हा उल्लेख आहे. याच कायद्यामुळें कलकत्त्याचें वृत्तपत्र अमृतबझार पत्रिका केवळ इंग्रेजी भाषेंत निघूं लागलें. १८७७ च्या रूसो-तुर्की युद्धांत रशियास जय मिळूं लागतांच हिंदुस्तानांतील देशभाषांतील पत्रें बेफाम होऊन रशियाची स्तुति व इंग्लंडची निंदा यांनीं भरलेले राजद्रोही लेख लिहूं लागलीं व ब्रिटिश सत्ता उलथून पाडण्याकरितां परस्परांत ऐक्य घडवून आणण्यास प्रोत्साहनपर आणि ब्रिटिश अधिकाऱ्यांचे खून करण्याची प्रवृत्ति होण्यास सूचक असें धोरण त्यांनीं आंखलें आहे अशा समजुतीनें इंग्रेजी भाषेखेरीज इतर देशभाषांतील निरर्गल वृत्तपत्रांस लगाम घालण्याकरितां हा कायदा त्या वेळच्या लेजिस्लेटिव्ह कौन्सिलनें एकमतानें पाठिंबा दिल्यावर पास झाला. या कायद्याचा हेतु गुन्हा झाल्यावर त्याला शिक्षा देण्यापेक्षां गुन्ह्याला प्रतिबंध करणें हाच असल्यानें मुख्यतः जामीन मागण्यांत यावा अशी योजना होती. चार वर्षांत एकच वेळ अंमल होऊन १८८२ सालीं रिपन्शाहींत हा कायदा रद्द झाला. व राजद्रोहास प्रतिबंधक म्हणून पिनल् कोडांतच १२४ अ, हें कलम घालण्यांत आलें. 'सम्पादक'

२. गेल्या बारा अंकांतील मुख्य विषय जो मोरोपंतांचें काव्य त्याच्या संबंधानें वरील उल्लेख

[पुढें चालू]

आक्टाचा प्रभाव चोहोंकडे दृष्टीस पडूं लागल्यापासून आमच्या देशास पुराणांतरी वर्णिलेल्या ऋषींच्या आश्रमांची किंवा पवित्र शास्त्रांत वर्णिलेल्या भावी सहस्रवार्षिक युगाची[१] बरोबरी येत चालली आहे. ह्मणजे वाघ आणि गाय यांनीं एकाच ओहोळावर पाणी प्यावें, लांडग्यानें कोंकराच्या गळ्याला मिठी मारावी, कोंकरानें लांडग्याच्या मारावी, इत्यादि प्रकार जसे वसिष्ठादिकांच्या आश्रमांभोंवतीं दृष्टीस पडत, व पुढें कधीं कधीं ख्रिस्त राज्यांत पडणार आहेत, त्याप्रमाणेंच हल्लीं या देशांतही सार्‍या तंट्याबखेड्यांचें मूळ एकदम मोडून चोहोंकडे मध्यरात्रीप्रमाणें अगदीं सामसूम होऊन गेलें आहे. काळोखांत ज्याप्रमाणें उंच सखल, सुरेख विद्रूप, रंगी बेरंगी हे सर्व भेद अस्तास जातात, त्याप्रमाणेंच मेकॉलेप्रभृति उदार बुद्धीच्या पुरुषांनीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वीं जें स्वातंत्र्य या आर्यभूमीस अर्पण केलें होतें त्यास गेल्या सालीं एकाएकीं अकाल राहूनें ग्रासून टाकल्यामुळें सद्धर्म अधर्म, राजनिष्ठा राजद्रोह, सत्य असत्य, इत्यादि भेद चट सारे एका क्षणांत लोपून गेले, परवां या पुण्यजननगरीवर लंकेसारखा आक्रांत * गुदरून अग्निनारायणानें कृपा केली असतां ज्याप्रमाणें हजारों ब्याद कोटींचे हातून होतेंना असें काम प्रहरा दीड प्रहरांत चोख होऊन गेलें, व सावकार, कूळ आणि

---

केला आहे. बाकी आमच्या पुस्तकाविरुद्ध लेख झटका तर 'विविधज्ञानविस्तारा'त नुकतें आलेलें 'अपभ्रष्टशब्दचंद्रिका' पुस्तकाचें मंडन हें होय. याविषयीं पुढील अंकांत विवेचन करण्याचा आमचा संकल्प आहे.

१. यास इंग्रेजींत Millenium असें नांव आहे. ख्रिस्ती लोकांच्या पैगंबराच्या शेवटचा इतिहास सर्वांस माहीतच आहे, कीं त्यास रोमी सरकारनें यहुदी लोकांच्या फिर्यादीवरून सुळावर चढवलें. हें कृत्य झाल्यानंतर तिसर्‍या दिवशीं येशूचें पुनरुत्थान झालें. नंतर तीन आठवड्यांपर्यंत आपल्या शिष्यवर्गासमवेत कालक्रमणा करून त्यानें स्वर्गारोहण केलें. तेथांपासून तो भूलोकावर अद्याप प्रगट झाला नाहीं. तथापि 'नव्या करारां'तील शेवटच्या भागांत सांगितल्याप्रमाणें येशू ख्रिस्ताचा पुनः एकवार अवतार होणार आहे. त्या वेळेस तो सैतानास बांधून नरकांत टाकून देईल व सार्‍या पृथ्वीवर हजार वर्षें त्याचें राज्य चालेल. या भविष्यकालीन सहोत्सवाचें पोपनें येणेंप्रमाणें वर्णन केलें आहे—

"The lambs with wolves shall graze the verdant mead,
And boys in flowery bands the tiger lead;
The steer and lion at one crib shall meet,
And harmless serpents lick the pilgrim's feet.
The smiling infant in his hand shall take,
The crested basilisk and speckled snake,
Pleased the green lustre of the scales survey,
And with their forky tongue shall innocently play!"

*Messiah.*

* सन १८२७ (फाल्गुन शुद्ध षष्ठी शके १७४९) च्या 'शनवार'वाड्यास लागलेल्या आगीनंतर पुण्यावर अग्निराजांचा कोप १८७९ मध्यें झाला. ता. १३ मे रोजीं विश्रामबाग व बुधवारवाडा हीं दोन्ही ठिकाणें अग्निनारायणाच्या भक्ष्यस्थानीं पडलीं. 'सम्पादक'

वकील या त्रिपुटीचा एकदम लय झाला, त्याप्रमाणेंच बादशाही दरबारांतून सुटलेल्या वरील वटहुकुमाअन्वयें आमची आमच्या प्रतिपक्षांच्या खात्यावरील बाकी व आमच्या खात्यावरील त्यांची बाकी या दोन्ही एकदम पूज्य होऊन गेल्या आहेत. हा प्रकार कोठपर्यंत कायम राहील किंवा एकदां झाला तो झालाच, याविषयीं कांहीं सांगवत नाहीं; पण हा जोंपर्यंत राहील तोंपर्यंत बहुधा या खेपेप्रमाणेंच आह्मांस शेवटच्या अंकाला कांहीं निराळा विषय शोधावा लागेल, व यापूर्वी आमच्या फाल्गुन महिन्याप्रमाणें किंवा ख्रिस्ती नाताळाप्रमाणें जसा एकंदर वर्षाचा हुडपणा पुरवून घेण्यास सरतेशेवटीं अवकाश सांपडे तसा फारकरून सांपडणार नाहीं असा सुमार दिसतो!

तरी एके तन्हेनें पाहतां आमच्या प्रतिपक्षिवर्गानें या वर्षी जो अत्यंत मूकभाव धारण केला तो कांहीं अंशीं आश्चर्यास्पदच होय. कां कीं, या सालचा मुख्य विषय ह्मटला ह्मणजे 'जॉन्सनपुराण' नव्हतें किंवा 'इंग्रेजी भाषा' नव्हती; तर एका पत्रकारानें सुचवल्याप्रमाणें* सर्वांस समजणारा, सर्वांच्या माहितींतला व सर्वांनीं ज्यावर अनुकूल किंवा प्रतिकूल अभिप्राय अनेक वेळां प्रगट केलेले अशा प्रकारचा तो होता. तेव्हां असा विषय निघाला असतां ग्रीक् भाषेंतील आदिकाव्यांत उपनायकभूत जो आकिलीसचा जिवलग मित्र प्याट्रॉक्लस तो रणांत पडला असतां त्याच्या प्रेताभोंवतीं जसें रणमंडळ माजलें, किंवा येशूची येरुशलेम शहरीं जी कबर आहे तिच्या प्रीत्यर्थ जसें दोनशें वर्षे ख्रिस्तभक्तांचें व महंमदभक्तांचें युद्ध¶ चालू होतें, तसा प्रकार खरोखरी पाहतां गेल्या सालीं नजरेस यावयाचा होता. त्यांतून प्रस्तुत महाराष्ट्र-कवीच्या व त्याच्या टीकाकर्त्यांच्या तर्फेनें विरुद्ध पक्षांतील रथी महारथी मंडळीवरही आह्मीं बिलकुल कसर न करतां यथास्थित प्रहार केले होते. पण इतकें असून अद्याप दुसऱ्या बाजूस अगदीं सामसूम आहे, याचें काय कारण असेल तें असो. आमच्या ख्रिस्ती बंधूंसही या वर्षी गुपचुप राहण्यास बिलकुल सवड नव्हती. 'पाद्री खात्याकडील अशुद्ध पत्र आपल्या सोवळ्या घरांत येऊं देणें त्यांस बरें वाटत असलें तर त्यांनीं मोबदला करण्यास

---

* ता. ५ डिसेंबर रोजी प्रसिद्ध झालेल्या जुलै ते सप्टेंबरच्या त्रैमासिक अंकांत 'जिज्ञासु व शाळेचा हितेच्छु' या सहीनें आलेल्या पत्राचा उल्लेख येथें आहे. त्यांत जॉन्सनच्या निबंधास 'कर्मकथा' ह्मटलें असून हें पुराण केव्हां संपेलसें आपणास झालें होतें असें त्यांनीं ह्मटलें होतें; कोकप्रिय, आपल्या देशाच्या संबंधी व ग्रंथकारांच्या रसिकतेस व बहुश्रुततास योग्य असा, शाकुंतल काव्यावर सविस्तर निबंध लिहिण्याची विनंति करून मासिकांत येणाऱ्या उताऱ्यांतील व टिपांतील इंग्रेजी मजकुराचें यथावत् मराठी भाषांतर यावें अगर अजीबात इंग्रजी उतारेच घेऊं नयेत अशी सूचना केली होती. 'सम्पादक'

¶ क्रूसेड्स् (Crusades) नामक धर्मयुद्धाचा येथें उल्लेख आहे. मुसलमानांच्या ताब्यांतून जेरुसलेम (Jerusalem) काढून घेण्याकरितां पीटर् (Peter the Hermit) नें इ. स. १०९५ मध्यें हें युद्ध सुरू केलें. त्याच्या आठ मोहिमा वेगवेगळ्या काळीं होऊन, लाखों जीव व कोट्यवधि द्रव्य खर्ची पडल्यावर इ. स. १२७१ मध्यें तें संपलें; पण जेरुसलेम अखेर मुसलमानांच्याच कबजांत राहिलें. 'सम्पादक'

आरंभ करावा ' या आमच्या वडील बंधूंच्या वचनास मान देऊन या सालच्या आरंभापासून आमची सद्धर्मद्रोही माला 'ज्ञानोदय' कचेरीच्या टेबलावर जाऊन पडत आहे, व आमचे शुभवर्तमानी बंधुही दर आठवड्यास नियमानें आमची भेट घेत असतात. पण मौज काय झाली आहे पाहा ! जोंपर्यंत आमची व आमच्या पवित्रधर्मी बंधूंची गांठ घालून देण्यास मध्यस्थ मित्राची गरज लागत असे, तोंपर्यंत आह्मांस कडकडून भेटण्याची आमच्या बंधूंस भारी हौस असे व असा भेटीचा योग थोडाबहुत तरी आल्याखेरीज फार करून उभें वर्ष सुनें जात नसे. पण आतां मध्यस्थाची गरज न राहतां परस्पर दळणवळण चांगलें पडलें असतां पूर्वीचा आदर शिथिल झाला. याचें कारण आह्मांस कांहींच उमगत नाहीं. गेल्या सालच्या भयंकर आक्टाच्या तडाक्यानें आमच्या बंधूंची ' चपळ लेखणी बोथटून गेली ' असेल ह्मणावें तर तें मुळींच शोभणार नाहीं. का कीं, एक तर त्यांच्या अंगीं सद्धर्माचे योगानें संचरलेलें अढळ धैर्य वास करीत आहे, व शिवाय आकाशांतील प्रभूचें त्यांस बळकट पाठबळ आहे कीं, ' जगाच्या समाप्तीपर्यंत मी तुह्मांबरोबर सर्वकाळ आहें. ' मग ' खऱ्या व जिवंत देवाची ' येवढी जबरदस्त सनद त्यांजपाशीं असतां नवव्या आक्टासारखे छप्पन्न आक्ट ते बगलेंत मारणार नाहींत काय ! बरोबर आहे ! शिवाय हेंही लक्षांत ठेवलें पाहिजे कीं, जरी यदाकदाचित् असें झालेंच,—कीं पवित्रशास्त्रीय शांति व सभ्यता विसरून आमच्या बंधूंनीं हिंदूंस टोंचण्यासारखा मजकूर आपल्या पत्रांत प्रसिद्ध केलाच, व सुप्रीम कौन्सिलांत त्याविषयीं विचार झालाच, तरी आक्टाचें अतिक्रमण केल्याबद्दल आमच्या बंधूंस जी अद्दल घडेल तिचा प्रकार एका महाराष्ट्र-कवीनें वर्णिल्याप्रमाणें——

पैं मोहाचिये सांगडें लासी पिली धरी तोंडें ।
तेथ दांताचे आगरडें लागती जैसे ॥

अशासारखाच बहुधां होणार ! तेव्हां या सर्व गोष्टींचा विचार करतां आमच्या बंधूंच्या मौनाची वरील उपपत्ति मुळींच संभवत नाहीं. बरें, असें जर ह्मणावें कीं गेल्या अकरा अंकांत आमच्या बंधूंनीं मधें पडावें असा मुळीं प्रसंगच आला नाहीं, तर तसेंही नाहीं. का कीं, ५२ व्या व ५६ व्या अंकांत त्यांचे सन्मान्य गुरु रे॰ डॉक्टर् विल्सन् साहेब यांच्या लेखांवर आमच्या अल्पबुद्धीस जे विचार सुचले ते दाखल केले होते. ते डॉक्टर मजकुराच्या शिष्यवर्गास मोठेसे आवडण्यासारखे नव्हते हें आमच्या वाचकांस सांगायास नकोच. तरी असें असतां आमचे वृद्ध बंधु उगाच राहिले. साहेबांचा बचाव करण्याची त्यांस जरूर दिसली नाहीं किंवा त्यांजविषयींची गुरुभक्ति त्यांनी इतक्यांतच कमी झाली, हें कांहीं कळत नाहीं !

असो; तर या खेपेची अशी हालहवाल आहे. यास्तव आतां वरील ग्रंथाच्या परीक्षणास लागूं.

१. " तारा नाटक ' हें शेक्सपीयरच्या ' सिंबेलैन ' नामक नाटकाचें भाषांतर आहे. या इंग्रजी कवीचीं एकंदर सदतीस नाटकें प्रसिद्ध आहेत; त्यांपैकीं यापूर्वी ' अथेल्लो, '

'टेंपेस्ट्,' 'जुलियस् सीजर्' (विजयसिंग), 'कॉमेडी ऑफ् एरर्स्' (भ्रांतिकृत चमत्कार-भुरळ), 'मर्चंट् ऑफ् व्हेनिस' (व्हेनिस शहरचा व्यापारी), आणि 'रोमिओ अँन्ड् जुलियेट्' (रामकेतुविजया) इतकीं मराठींत झाली आहेत. प्रस्तुत नाटक कांहीं अंशीं वरील सर्वांपेक्षां निराळ्या तऱ्हेचें आहे. हें रा॰ रा॰ विष्णु मोरेश्वर महाजनि, एम.ए., उमरावती हायस्कूलचे हेड्मास्तर, यांनीं तयार केलें असून मराठी ग्रंथोत्तेजक मंडळीच्या विद्यमानें प्रसिद्ध झालें आहे.[1]

१. आतां प्रथमतः सदरील नाटकाचें संविधानक येथें देतों. त्यावरून मूळ ग्रंथाची व भाषांतराचीही वाचकांस बरीच कल्पना होऊन पुढील गुणदोषविवेचन लक्षांत येण्यास मार्ग होईल.

सुवर्णपुर नामक नगराचा संभाजी नामेंकरून एक वृद्ध राजा होता. याची पहिली बायको मरण पावली असून त्यानें द्वितीय संबंध केला होता. पहिल्या बायकोपासून त्यास तीन अपत्यें झालीं होतीं; दोन मुलगे व एक मुलगी. हे दोन मुलगे लहानपणींच कोणीं चोरून नेले होते, व त्यांचा मुळीं पत्ताच नव्हता. राहिलेली मुलगी तारा; ही प्रस्तुत नाटकांतील नायिका होय.

तारेला तिची सावत्र आई नित्य पाण्यांत पाहत असे. संभाजी राजा हा स्वभावानें भोळसर असल्यामुळें त्याजवर तिनें असा पगडा बसवून टाकला होता कीं, राजकीय प्रकरणांतही तिच्या सल्लेवांचून कांहीं चालत नसे. मुरारराव म्हणून तिच्या बहिणीचा मुलगा होता, त्याजवर तिचा अतिशय लोभ होता. याचें तारेशीं लग्न व्हावें व संभाजीच्या पश्चात् दोघांनीं राज्य करावें असा तिचा मानस होता.

मुरारराव हा मूर्खशिरोमणि होता. त्याच्या अंगीं कर्तृत्व मुळींच नसून तो केवळ मावशीच्या जोरावर अरेराव होऊन बसला होता. त्यानें तारेचें मन आपणाकडे लागावें एतदर्थ पुष्कळ खटपट केली. व त्याच्या मावशीनेंही आपला स्वार्थ साधावा येवढ्यास्तव त्यास अनेक प्रकारें साह्य केलें. पण दोहोंचाही कांहींएक उपयोग झाला नाहीं. इंबीरराव म्हणून एक सरदाराचा मुलगा होता, त्याचीं आईबापें लहानपणींच वारलीं असल्यामुळें

---

१. वरील उल्लेख केवळ प्रकृत पुस्तकाच्या मुखपत्रावरूनच केला आहे. खरोखरी पाहतां तें ग्रंथोत्तेजक मंडळीनें छापलें नाहीं व प्रसिद्धही केलें नाहीं. ग्रंथकार आमचे परिचित असल्यामुळें आह्मांस खाजगी रीतीनें असें कळलें आहे कीं, सदरील पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीचा हक्क त्यांनीं 'नेटिव ओपिनिअन्'च्या मालकांस देऊन टाकून त्यांजकडून तें छापवलें. छापल्यानंतर कांहीं प्रती सदरील मंडळीनें आपल्या वर्गणीदारांस देण्याकरतां घेतल्या असें समजतें. मंडळीच्या नांवावर प्रसिद्ध झालेलें पहिलें ओतकीवरील पुस्तक याचीही अशीच हकीकत आहे म्हणून ऐकतों. एकंदरींत बिचाऱ्या महाराष्ट्रीय लोकांच्या हितार्थ हा जो दोघां रावबहादुरांनीं नवा उद्योग आरंभिला तोही कुऱ्यांच्याच मेढीला जाऊं पाहत आहे याचें आह्मांस फार वाईट वाटतें. पुढें समयानुसार प्रकृत मंडळीची जी हकीकत आह्मांस माहीत आहे व तिच्या उद्योगाविषयीं आमच्या व पुष्कळ मंडळीच्या मनांत जे विचार आले आहेत ते वाचकांस सादर करण्याचा आमचा मानस आहे.

संभाजी महाराजांनीं त्याचें पुत्राप्रमाणें पालन केलें होतें. हा तारेचा बालमित्र होता. वास्तव ल्हानपणापासूनच दोघांचा स्नेह अत्यंत दृढ झाला असल्यामुळें तारुण्यदशेंत त्याच स्नेहास त्या दशेस अनुरूप असें अंमळ निराळें स्वरूप प्राप्त झालें. तरी हें परस्परविषयक प्रेम त्यांनीं कोणास कळूं न देतां गुप्त प्रीतिविवाह केला.[१] ही गोष्ट पुढें जेव्हां प्रगट झाली तेव्हां राजास पराकाष्ठेचा राग आला. त्यानें हंबीररावास आपल्या मुलुखांतून घालवून दिलें व तारेस तिच्या महालांत कोंडून ठेवलें. इतकें झालें तरी ज्याप्रमाणें जलप्रवाहास रोध केला असतां फार झालें तर त्याची गति कुंठित होईल, पण ती उलटी कधींही व्हावयाची नाहीं, त्याप्रमाणें तारेची आणि हंबीररावाची ताटातूट मात्र झाली; राणीचा येवढें कंवटाळ रचण्यांतला जो उद्देश—कीं हंबीररावावरून तिचें मन निघून आपल्या भाच्याकडे लागावें तें मात्र बिलकुल झालें नाहीं. येवढें मात्र उलटें झालें कीं, हंबीररावाची विशेष प्रसिद्ध होऊन लोक त्याच्या गुणांची विशेष तारीफ करूं लागले, व तारा आपल्या बापासही जुमानीनाशी होऊन मुराररावाचा उघडपणें तिटकारा करूं लागली.

हंबीरराव आपल्या प्रियेची गुप्तपणें गांठ घेऊन देशोधडीस गेला. ही गांठ राणीमेंच पाहून दिली होती; तिचा मतलब काय कीं, आपल्या मनांत दोघांविषयीं कांहीं विषम नाहीं असें त्यांस व सर्वांस कळावें. हा कृत्रिम स्नेह ती सर्वांस दाखवी; पण सर्व तिला पक्केपणीं ओळखून होते. हंबीरराव सुवर्णपुराहून निघाला तो विजयपुरास जाऊन राहिला. तेथें त्याच्या बापाच्या वेळचा एक सरदार होता; त्यानें आपल्या जुन्या स्नेहास स्मरून हंबीररावास आपल्या घरीं राहून घेतलें. एके दिवशीं चार मंडळी बसली असतां स्त्रियांविषयीं बोलणें निघून हंबीररावाचा व खंडूजी नांवाचा एक विजयपूरचा गृहस्थ होता त्याचा वाद पडला. हंबीररावास आपली प्रीतिविवाहानें वरलेली स्त्री तारा हिच्या अढळ सत्त्वाविषयीं पक्का विश्वास होता, आणि खंडूजी हा मूळपासून लफंगा असल्यामुळें 'स्त्रियश्चरित्रं पुरुषस्य भाग्यं देवो न जानाति कुतो मनुष्यः' या मतास अनुसरणारा होता. दोघे बोलण्याच्या भरांत आवेशांत आले आणि शेवटीं दोघांनीं असें ठरवलें कीं, हंबीररावाच्या हातचें पत्र घेऊन खंडूजीनें सुवर्णपुरास जावें आणि तारेशीं ओळख करून घ्यावी. नंतर जेवढी आपली लफंगबाजी असेल तेवढी लढवून तीस वश करण्याचा प्रयत्न करावा. या कार्यांत जर त्याची सिद्धि झाली तर हंबीररावानें आपल्या हातांतील आंगठी त्यास द्यावी व त्यावर तारेचें नांव घेऊं नये; पण जर करतां मसलत अंगावर आली तर खंडूजीनें दहा हजार रुपये हरावे व प्रतिष्ठित स्त्रीची अब्रू घेतल्याबद्दल समरांगणांत हंबीररावास जबाब देण्यास

१. विलायतेंतील लग्नाची चाल आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच कीं वधूवरांचा संबंध देवळांत पाद्रीच्या विद्यमानें होतो. दोघांचे हस्त एकत्र करून पाद्री त्यांस आशीर्वचन देतो; आणि त्यांचीं नांवें पटावर दाखल करतो. जेव्हां स्त्रीपुरुषांचा चोरून विवाह कर्तव्य असतो, म्हणजे आईबापांच्या वगैरे हरकतीमुळें उघडपणें देवळांत जाऊन लग्न करतां येत नाहीं, तेव्हां पाद्रीस घरीं बोलावून आणून वरील विधि गुप्तपणें करतात.

तयार व्हावें. हा विलक्षण व भयंकर पण ठरल्यावर खंडूजी हंबीररावाच्या हातचें पत्र घेऊन सुवर्णपुरास यावयास निघाला.

घेऊन पोंचल्यावर त्यानें तारेस तिच्या नवऱ्याचें पत्र दाखवलें. तें पाहतांच तिला मोठा आनंद होऊन हा आपल्या नवऱ्याचा परम मित्र आहे असें ती समजली व तिनें त्याचा मोठा सत्कार केला. मग हंबीररावाविषयीं ती हालहवाल विचारणार तों खंडूजी भलतेंच कांहीं असंबद्ध भाषण आपणाशींच बोलूं लागला. तारेस त्याचा कांहींच उमज पडेना. मग जें काय बोलत आहां तें मला कळेसें स्पष्ट बोला असें तारेनें सांगितलें असतां त्यानें तीस कळवलें कीं, तुमचा नवरा मोठा बदफैली निघाला आहे व सुवर्णपुरची तर त्यास कधींच आठवणही हेत नसून तो तिकडेच नाच वेश्यांशीं रममाण होऊन बसला आहे. याप्रमाणें हंबीररावाविषयीं भलताच मजकूर तारेच्या कानावर घालून खंडूजीनें तिच्या चित्तास भ्रंश पाडण्याचा उद्योग केला, आणि नंतर तीस तो सांगूं लागला कीं, "आपण तरी असल्या बेइमानाशीं कशाला इमान ठेवतां ! मी आपला दास आहें; माझ्या जिवांत जीव आहे तोंवर मी आपणावर प्रेम ठेवीन." हें त्याचें पाजीपणाचें व धट्टाईचें बोलणें ऐकून तारा संतापली; व तिनें त्याची खूप निर्भर्त्सना केली. ती ऐकतांच या विजयपुरी फकडाची धुंदी उतरून त्यानें तारेची क्षमा मागितली व आपलें प्रेम हंबीररावावर कितपत दृढ आहे हें पाहण्याच्या उद्देशानें मीं हा उपक्रम केला होता असें त्यानें प्रांजळपणें कबूल केलें. इतकें झाल्यावर खंडूजी निघून गेला. पण जाण्यापूर्वीं त्यानें तारेपाशीं एका गोष्टी-विषयीं विनंति केली कीं, "विजयपुरच्या महाराजांकरतां कांहीं जडावाचे दागिने व नकशीचीं चांदीचीं भांडीं मीं तयार करविलीं आहेत, येवढ्या किंमतीचा माल बिऱ्हाडीं सुरक्षित राहायाचा नाहीं, तर तो पेटींत घालून मीं आपणाकडे पाठवून देईन. पेटी रातो-रात आपल्यापाशीं असूं द्यावी. उद्यां मीं जाईन तेव्हां घेऊन जाईन."

त्या रात्रीं तारा नित्याच्या क्रमाप्रमाणें पोथीचा पाठ आटपून व ईश्वरस्मरण करून निजली. तिला पहांटेस उठायाचें होतें, यास्तव दासीस दिवा तसाच जवळ ठेवण्यास तिनें सांगितलें. मध्यरात्रीच्या सुमारास जिकडे तिकडे सामसूम झाल्यावर तिच्या महालांत आणून ठेवलेल्या पेटीचें दार आपलें हळूच उघडलें—आणि खंडूजींची स्वारी आंतून मुका-ट्यानें बाहेर पडली ! त्याचा बेत उघडपणें जेव्हां साधेना तेव्हां त्यानें ही पेटीची युक्ति लढ-वली. मग खोलींतील सामानाच्या, पलंगाच्या वगैरे झटापट सर्व खाणाखुणा टिपून घेऊन या कपटपटूनें तारेच्या हातांतील एक कंकण हळूच काढून घेतलें; व इतका कारभार आट-पून पुन: स्वारी पेटींत जाऊन बसली. हंबीररावाच्या स्त्रीचें सत्त्व हरण करण्याची प्रतिज्ञा जरी शेवटास गेली नाहीं, तरी आपला पण जिंकण्यास आतां कांहीं हरकत नाहीं असें समजून खंडूजी आपल्या ठिकाणीं मोठा कृतार्थ झाला. त्यांतून वरील कृतार्थताबुद्धीचें पूर्णत्व होण्यास दुसरी एक मोठी गोष्ट दैवयोगानें अशी घडली कीं, तारेच्या हातांतील कंकणाचा फांसा काढीत असतां तिचें दिव्य स्वरूप जेव्हां त्यानें समक्ष न्याहाळलें तेव्हां

तिचा पदर झोंपेंत अस्ताव्यस्त पडला असतां तिच्या स्तनमध्यभागीं असणारा तीळ त्याच्या दृष्टीस पडला ! या मुद्द्याचा उपयोग किती झाला हें पुढें कळेलच.

वर सांगितल्याप्रमाणें खंडूजी आपला हेतु कपटानें साधून विजयपुरास परत आला. हंबीरराव व ज्यांच्या समक्ष वरील पण ठरला होता ते सर्व जण त्याची वाट पाहतच होते. तो इतक्या लवकर आलासा पाहून हंबीररावास वाटलें कीं याची पहिल्या सपाट्यास फटफजिती उडाली असेल तेव्हां निराश होत्साता हा चटदिशीं माघारा आला, त्याप्रमाणें त्यानें त्यास विनोदपूर्वक बोलूनही दाखवलें. पण क्रमाक्रमानें ही त्याची वृत्ति पालटत गेली. खंडूजी महालाच्या, पलंगाच्या वगैरे एकएक खुणा जसजशा सांगत गेला तसतसा संशयाचा विषार त्याच्या शुद्ध व ऋजु अंतःकरणांत भिनायाला लागला. त्यानें तारेच्या हातांतील कंकण पुढें टाकलें तेव्हां तर हंबीरराव मनांत फारच चरकला; का कीं, तें त्यानें प्रस्थानसमयींच आपल्या प्रियेच्या हातांत स्वतः घातलें होतें, व तिनें त्या समयींच वर सांगितलेली पणास लावलेली अंगठीही त्यास दिली होती. पण सरतेशेवटीं तिळाची खूण जेव्हां खंडूजीनें दिली तेव्हां तर बिचाऱ्या हंबीररावाची जी दशा झाली ती कांहीं पुसूं नये ! तो रागानें वेडा होऊन गेला, व अवघ्या स्त्रीजातीवर त्यानें जो शिव्यांचा भडिमार केला तो कांहीं विलक्षण ! मग त्यानें सदोबा या नांवाचा एक आपला विश्वासू चाकर तारेपाशीं ठेवला होता त्याजकडे पत्र पाठवून त्यास कळवलें कीं, तुझ्या धनिणीच्या जारकर्माची माझी खात्री होऊन चुकली आहे, तर या सोबतचें माझें पत्र तिला दाखवून तीस तूं जामगांवीं घेऊन ये, आणि तेथें आल्यावर खरा मजकूर सांगून तिचा वध कर; आणि याबद्दलची निशाणीही मजकडे पाठवून दे.

सदोबास वरील पत्र पाहून मोठें आश्चर्य वाटलें व खेदही झाला. पण करतो काय ? धन्याची आज्ञा प्रमाण ! तेव्हां तिजप्रमाणें त्यानें तारेपाशीं बहाणा करून व तीस हंबीररावाचें पत्र दाखवून तीस जामगांवीं नेलें, व तेथें पोंचल्यावर तिला हंबीररावाचें पत्र दाखवलें. तें पाहिल्यावर तिची काय अवस्था झाली असेल हें सांगायास नकोच ! ज्याची मूर्ति तो गेला तेव्हांपासून तिच्या डोळ्यांपासून कधीं ढळलीच नाहीं, व ज्याच्या समागमाविषयीं तिची इतकी आतुरता कीं ऊन्ह न म्हणतां तान्ह न म्हणतां ती त्या पावलींच रानावनांतून जावळी महालाकडे जावयास निघाली, त्यानेंच ऐन भेटीच्या सोहळ्याच्या वेळीं तिजवर जारकर्माचा आरोप करून तिची पत्रद्वारें अत्यंत निर्भर्त्सना करावी, हा प्रसंग केवढा दुर्धर होय ! तारा वरील मजकूर वाचतांच मूर्छित होऊन पडली. मग सावध झाल्यावर व सदोबाच्या सांत्वनानें अंमळ शांत झाल्यावर तिनें असा निश्चय केला कीं, आतां परत सुवर्णपुराकडे म्हणून जावयाचेंच नाहीं. तर पुरुषवेषानें विजयपुरास जाऊन तेथेंच हंबीररावाची गांठ घेऊन त्याच्या मनावरील संशयपटल दूर करावें असा तिचा बेत ठरला. हा सल्ला तीस सदोबानेंच दिला, व तिचा निरोप घेते समयीं त्यानें तिच्या हवालीं एक डबी केली. या डबींत औषधाच्या गोळ्या होत्या. वाटेच्या शीणभागानें प्रकृति बिघडली असतां या तुम्हांस उपयोगीं पडतील असें सदोबानें जातांना तीस सांगून ठेवलें.

आतां इकडे संभाजी महाराजांच्या दरबारीं काय हालहवाल चालली आहे ती पाहूं. संभाजी हा विजयपुरच्या बादशाहाचा[१] मांडलिक होता. त्याजकडून दरसाल दोन कोट रुपये खंडणी विजयपुरास जात असे. ही वहिवाट संभाजीच्या बापापासून चालत असतां ती आलीकडे त्यानें राणीच्या मसलतीवरून बंद केली होती. या गैरशिस्त वागणुकीबद्दल कानउघाडी करण्याकरतां विजयसिंग नावाचा वकील विजयपुरच्या बादशाहाकडून संभाजीकडे या वेळेस आला होता. त्यानें आपल्या धन्याचा निरोप कळवून संभाजीस पुष्कळ सांगून पाहिलें, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. निकरावर गोष्ट येऊन लढाईचा बेत ठरला. सैन्याचें आधिपत्य राणीच्या शिफारशीवरून मुरारराव यास द्यावयाचें होतें. पण इतक्यांत काय झालें कीं, तारा वाड्यांतून निघून गेल्याचा बोभाटा झाला. तो ऐकून व ती कोठें गेली याचा तपास सदोबाकडून काढून मुराररावांची स्वारी तारेच्या शोधार्थ व हंबीररावाच्या शासनार्थ बाहेर पडली. सदोबा हिकमती होता; त्याचें अंतःकरण जरी हंबीरराव व ताराबाई यांच्याकडेच सर्वथा होतें, तरी बाहेरून राजा, राणी व मुरारराव यांशींही त्यास सलोखा ठेवावा लागत असे. तेव्हां या प्रसंगींही त्यानें वरील कावा योजून हंबीररावाकडून आलेलें पत्र मुराररावास दाखवलें व त्यावरून त्यास भासवून दिलें कीं, आतां आपण जर जामगांवीं गेलों तर हंबीरराव व ताराबाई या दोघांचाही समाचार घ्यावयास सांपडेल. मुरारराव दुष्टशिरोमणिच ! त्यानें सदोबाकडून हंबीररावाचे कपडे मागून घेतले आणि असा बेत केला कीं हंबीररावास मारून नंतर त्याचे कपडे वापरून ताराबाईकडे जावयाचें व त्या कपड्यांनीं तिला फसवून तिजशीं संभोग करायाचा. हा त्याचा संकल्प कितपत सिद्धीस गेला हें पुढें कळेलच.

तारा मागें सांगितल्याप्रमाणें आपल्या नवऱ्याकडे जावयास जी निघाली ती सदोबानें पुरून दाखवून दिलेला मार्ग विसरली आणि भलतीकडेच आडरानांत शिरली. जातां जातां ती एका गुहेपाशीं आली. या गुहेंत तिचे दोघे भाऊ राहत होते. कोणते म्हणाल तर जे लहानपणीं कोणीं चोरून नेले होते ते. चोरून नेणार संभाजीच्या पदरचा सरदार होता. यानें त्याची चाकरी इमानें इतबारें केली असतां त्यावर फितुरीचा आरोप ठेवून संभाजीनें त्यास हद्दपार केलें होतें. या अन्यायाचा सूड वरील सरदारानें असा घेतला कीं, जातांना राजाचे दोन मुलगेच चोरून नेले ! असो; तर या प्रसंगीं निर्जन अरण्यांत ज्या तिघां माणसांची तारेची गांठ पडली ती तिघे जणें वरील दोन राजपुत्र व त्यांचें पालन पोषण ज्यानें केलें तो वरील हद्दपार केलेला सरदार अशीं होत. तारेनें वेषांतर केलेलें असल्यामुळें व विश्वासराव हें नांव धारण केल्यामुळें अर्थातच तिचें स्त्रीत्व वरील तिघांस कळून आलें नाहीं. मग तीं तिघें भावंडाप्रमाणें त्या गुहेंत राहत असतां एकदां असें झालें कीं, तारा आजारा-

---

१. विजयपुर व सुवर्णपुर हीं नांवें यथानुक्रम रोम व लंडन या शहरांचीं भाषांतरकारानें ठेवलीं आहेत. नाटकांतील काळ ख्रिस्ती शकाच्या आरंभाच्या सुमाराचा आहे. सीजर् नामक प्रख्यात रोमन् सरदारानें ब्रिटन् देश जिंकून रोमच्या अंमलाखालीं आणला होता ही गोष्ट इतिहासप्रसिद्धच आहे. पुढें ऑगस्टसच्या बादशाही अंमलांत ब्रिटन्‌चा राजा अर्थातच रोमचा मांडलिक होता.

मुळें तेथेंच पडून राहिली व तिचे दोघे भाऊ शिकारीस गेले. तरिच्या आजाराचें कारण अर्थातच शरीराला झालेली दगदग व चित्ताची अस्वस्थता ही होत. आम्ही सांगितलेंच आहे कीं, सदोबानें जातांना एक औषधाची डबी तिच्या हवालीं केली होती. या डबींतलीच एक गोळी या वेळेस तारेनें घेतली. या गोळ्यांची हकीकत अशी होती कीं त्या राणीकरतां राजवैद्यानें विषारी म्हणून तयार करून दिल्या होत्या. खरोखरी त्या विषारी नव्हत्या; वैद्यानें राणीचा मतलब जाणून त्यांत येवढी मात्र युक्ती करून ठेवली होती कीं, त्या पोटांत गेल्या असतां कांहीं वेळ मनुष्यानें मृतवत् पडावें; पण प्रहरामरानें पुनः चांगलें सावध व्हावें. राणीस ही वैद्याची हिकमत कळून आली नाहीं. तिनें वरील गोळ्या विषारीच समजून एके प्रसंगीं गोष्टींत आल्याप्रमाणें दाखवून डबीची डबी सदोबास बहाल दिली, व त्यास सांगितलें कीं या गोळ्या मोठ्या गुणकारी आहेत, कसलेंही दुखणें असलें तरी तें यांनीं हटतें. तर त्यांच्यापैकींच एक गोळी तारेनें या वेळेस जेव्हां घेतली तेव्हां तिचा परिणाम काय झाला तें सांगायालाच नकोच; तिचे भाऊ शिकार करून घरीं जों येतात तों ही मरून पडली आहे! अशोदरम्यान शिकारींत एक भयंकर गोष्ट घडून आली होती. ती ही कीं, वरील राजपुत्रांपैकीं एकाची व हंबीररावाचा पोषाख करून आलेल्या मुराररावाची रानांत गांठ पडून दोघांची बोलाचाली झाली, व हातघाईवर गोष्ट येऊन राजपुत्रानें मुराररावाचें डोकें उडविलें. तें घेऊन तो घराकडे येत असतां त्याच्या भावानें व त्यांच्या कोणत्या एका सरदारानें तें कृत्य जेव्हां पाहिलें तेव्हां या सरदारास मुराररावाची ओळख पटून मोठी पंचाईत पडली. त्यास वाटलें कीं आपली गुप्त बाब संबंधीची राजास बहुधा कळली असावी, व या कृत्याचा बोध लागला असतां आपली धडगत राहणार नाहीं. तेव्हां वरील प्रसंग डोळ्यांपुढें असतां तारेचें निश्चेष्ट शरीर पाहून तर त्याच्या हृदयास केवढा धक्का बसला असेल हें सांगावयासच नको! दोघे तरुण राजपुत्र हे लोकव्यवहारानभिज्ञ, पण त्यांसही या पुरुषवेषधारी स्त्रीच्या भगिनीनें थोडक्याशा काळांत इतकें आपलेसें करून टाकलें होतें कीं, तिच्या आसमान प्रेतावर ते दुःखाच्या लहरींत मूर्च्छागत होऊन पडले. असो; शेवटीं शोक आवरून त्यांनीं तारेस प्रेतसंस्कार करून झाडींत नेऊन ठेवलें.

गोळीचा अंमल उतरल्यावर तारा जागी होऊन पाहते तों आपण कोठें आडरानांत आहों असें तीस आढळलें. येथें आपणास कोणीं आणून टाकलें, व दिसतें आहे हें सारें खरें आहे कीं स्वप्न आहे, अशा प्रकारचे अनेक विचार तिच्या मनांत येऊं लागले, व ती अगदीं गोंधळून गेली. अंमल पुढें जाऊन इकडे तिकडे पाहूं लागली तों तिच्या दृष्टीस हंबीररावाचें पागोटें पडलें. तें पाहून तर तिला अतिशयित दुःख झालें. तिला असें वाटलें कीं सदोबानें मुरारराव शीं मधून हा मला घात केला! पण अंमवशानें तिनें आपल्या जिवाला असा धीर दिला कीं नुसतें पागोटें पाहिल्यावरून भलभलत्या कल्पना मनांत आणणें हें बरोबर नाहीं; या गोष्टीचा पक्का शोध लावला पाहिजे. असा निश्चय करून ती मार्गक्रमण करूं लागली. ती पुढें लवकरच विजयपुरचा वकील विजयसिंग याच्या स्वाजन्याशीं व तिची गांठ पडून ती त्याच्यापाशीं चाकरीस राहिली. ही चाकरी पतकरण्यांत तिचा मत-

रव असा होता कीं, विजयपुरच्या लष्करांत आपला नवरा इकडे येईलच, तर या योगानें त्याची व आपली गांठ पडेल.

पुढें सुवर्णपुर व विजयपुर या दोन्ही संस्थानांचीं दळें समरांगणांत उभीं ठाकून मोठें निकराचें युद्ध झालें. संभाजीकडे कोणी मोठा सरदार नसल्यामुळें त्याचा मोड होण्याचा रंग आला होता; पण त्याच्या तर्फेनें त्याचे दोन पुत्र व त्याजबरोबर असणारा सुवर्णपुरचा जुना सरदार हे लढल्यामुळें, व या तिघांनीं त्या दिवशीं खूप तरवार गाजवल्यामुळें, विजयपुरच्या सैन्याचा केवळ पराभव झाला. विजयपुरचा सरदार विजयसिंग, त्याचा हुजऱ्या विश्वासराव ( ह्मणजे वेषांतर केलेली तारा ), आणि हंबीरराव या तिघांस पकडून राजदरबारीं नेलें. हंबीरराव हा रणभूमीवर वेषांतर केलेला होता ता संभाजीच्या तर्फेनें लढला; तारेच्या वधाचा वृत्तांत सदोबानें त्यास खोटाच कळवला. तेव्हांपासून त्यास आपल्या कृत्याचा परम अनुताप होऊन तो जिवास सुद्धां कंटाळला होता. यास्तव वरील समरप्रसंगीं कसा तरी मृत्यु येवो अशी तो वाट पाहत होता. पण रणभूमीवर जेव्हां त्याचा हेतु साध्य झाला नाहीं, तेव्हां तो बळेंच शत्रूच्या पक्षांतला ह्मणून सुवर्णपुरच्या शिलेदाराच्या स्वाधीन झाला. त्यांनीं त्यास कैद करून सुवर्णपुरास नेल्यावर तेथें कांहीं वेळ त्यास कारागृहांत ठेवून नंतर चौकशीकरतां दरबारीं नेलें. तेथें सुवर्णपुरचा जुना सरदार व त्याजबरोबरचे दोघे राजपुत्र यांसही राजानें मोठ्या आदरानें सत्कारार्थ बोलावलें होतें. तसाच हंबीररावाचा प्रतिपक्षी खंडूजी व इमानी चाकर सदोबा हे दोघेही त्या प्रसंगाला दरबारीं हजर होते.

याप्रमाणें सर्व मंडळी एके ठिकाणीं जुळल्यावर पुढल्या प्रकारें सर्वांची आपआपसांत ओळख पडली. संभाजीनें विजयसिंगास निक्षून सांगितलें कीं, तुम्ही आतां आमचे हातांत सांपडलां आहां, तर तुह्मांस व विजयपुरवाल्या सर्व बंदिवानांस आह्मी देहान्त शासन देणार. विजयसिंगानें उत्तर केलें कीं, ज्याअर्थीं आह्मी आपल्या कबजांतच आहों, त्या अर्थीं आमचें आपणास जें वाटेल तें करण्यास आपण मुकत्यारच आहां, पण एक मात्र गोष्ट मी मागून घेतों कीं, हा जो मजबरोबर हुजऱ्या आहे हा आपल्याच मुलखांतला आहे व अत्यंत सुशील आहे, तर याला मात्र जीवदान द्यावें. हें भाषण ऐकून संभाजीनें ती गोष्ट मान्य केली, व हुजऱ्यास आपणाजवळ बोलावलें. त्यास पहातांच राजाच्या हृदयांत स्वाभाविक उमाळा आला, आणि तो त्यास ह्मणाला, "मुला, तुजवर माझें प्रेम ओढवतें, आजपासून तूं माझाच झालास; तुला जीवदान तर दिलेंच आहे, याखेरीज आणखी तुला कांहीं मागावयाचें असेल तर बोल." मुलगा आपल्या नेणत्या बापाजवळ जाऊन त्यानें ही गोष्ट मागून घेतली कीं, त्या खंडूजीच्या हातांत अंगठी आहे ती तुला कोठून मिळाली येवढें आपण त्यास विचारावें ह्मणजे झालें. नंतर संभाजीनें वरील प्रश्न केला असतां एकंदर गोष्टीचा उलगडा झाला. खंडूजीनें अंगठीची व कंकणाची सारी हकीकत सर्वांसमक्ष बोलून दाखवली; ती ऐकून हंबीररावाचा हृदयक्षोभ अनावर होऊन तो तारेच्या नांवानें शोक करूं लागला व आपली निर्भर्त्सना करून घेऊं लागला. पुरुषवेषी तारा त्यास आंवरण्याचा यत्न

करूं लागली, तों त्यानें रागावून फाडकन् तिच्या तोंडांत भडकावली. त्यासरशीं ती खालींच पडली. तो अनर्थ पाहून सदोबा पुढें झाला, आणि त्यानें तो मुलगा कोण याचा पुकारा केला. याप्रमाणेंच क्रमाक्रमानें संभाजीच्या पक्षानें रचलेले तिचे थोडे कोण याचाही निकाल लागला. शेवटीं राजवैद्य येऊन त्यानें राणींची अखेरची बातमी येऊन दरबारांत सांगितली. या वेळेस त्यानें जो वृत्तांत सांगितला त्यावरून राजास आपल्या बायकोच्या दुष्टपणाचें स्वरूप पुरतेपणीं समजून आलें. मुराररावाचा कसा अंत झाला ती हकीकतहि राजपुत्राच्या तोंडून राजास अगोदरच कळलीच होती. तेव्हां याप्रमाणें दुष्टांस विपात प्राप्त होऊन चिर-वियुक्त सज्जनांचा सरतेशेवटीं समागम झाला, व सर्व तेव्हांपासून आनंदानें कालक्रमणा करूं लागलीं.

याप्रमाणें प्रस्तुत नाटकाचें कथासूत्र आहे. हें मूळ इंग्रेजी नाटकाच्या अगदीं बरहुकूम जरी नाहीं तरी बहुतेक अंशीं मूळच्यासारखेंच आहे. देशकालानुरोधास्तव कांहीं थोड्या ठिकाणीं मात्र भाषांतरकारास फेरफार करावा लागला आहे. हा प्रकार कोणकोणत्या ठिकाणीं केला आहे हें पुढें सांगण्यांत येईलच. सध्यां वरील संविधानकाच्याच गुणदोषांचें विवेचन करूं.

संविधानकचातुर्य हा नाटककाराच्या करामतीचा एक मोठाच भाग आहे. इमारतीस जसा नकाशा, तसें नाटकास किंवा कादंबरीस संविधानक होय. ज्याप्रमाणें उत्कृष्ट कारागीर झटला म्हणजे त्यास इमारतीचा प्रत्येक भाग जितका सुंदर व भव्य करतां येईल तितका करूनच बसतां उपयोगी नाहीं, तर एकंदर थाट डौलदार साधण्याविषयींही त्यानें पहिल्यापासून धोरण ठेवलें पाहिजे, त्याप्रमाणेंच नाटककारानें व कादंबरीकारानेंही आपल्या कृतीचें केवळ अवयवशः मनोरमत्व साधणें पुरें नव्हे, तर सामग्र्येंकरून पाहतांही तींत उणेपणा कोठें दिसूं नये, याविषयीं सुद्धां त्यानें खबरदारी ठेवणें जरूर आहे. शेक्सपीयरच्या नाटकांत पाहतां प्रस्तुत गुण प्रायः पूर्णपणें आढळत नाहीं. कथासूत्रांत ठिकठिकाणीं गुंतागुंत झालेली दृष्टीस पडते, व कोठें कोठें असंबद्धत्वही नजरेस येतें.[1] प्रकृत नाटकांतील संविधानक बरेंच मौजेचें आहे, तरी त्यांत पुष्कळ ठिकाणीं अनेक प्रकारचे दोष आहेत. ते कोणते ते अनुक्रमानें पुढें सांगतों.

---

१. जॉन्सनचा अभिप्राय असाच आहे—

"The plots are often so loosely formed, that a very slight consideration may improve them, and so carelessly pursued, that he seems not always fully to comprehend his own design. He omits opportunities of instructing or delighting, which the train of his story seems to force upon him, and apparently rejects those exhibitions which would be more affecting for the sake of those which are more easy.

It may be observed, that in many of his plays the latter part is evidently neglected. When he found himself near the end of his

( पुढें चालू. )

प्रथमतः उपोद्घातांतच पहिल्या प्रवेशाचें स्थल राजवाड्याच्या पिछाडीचा बाग योजला आहे. या बागेंत दोघां गृहस्थांचें परस्पर जें भाषण झालें आहे त्यांत पुढील नाटकांतील मुख्य पात्रांविषयींची माहिती श्रोत्यांस किंवा वाचकांस होण्याची कवीनें तजवीज केली आहे. या तजविजीच्या संबंधानें पाहतां वरील संवाद ठीक आहे. पण त्याच्या संबंधानें पहिल्यानें ही शंका येते कीं, वरील दोघे संवादक राजाच्या बागेंत कसे शिरले? त्यांच्या भाषणावरून तर ते राजपुरुष असावेत असें दिसत नाहीं; कां कीं, त्यांतील एक तर जसा काय नुकताच सुवर्णपुरांत येऊन ठेपलासा दिसतो. त्यास राजाच्या अपत्यांविषयीं देखील माहिती नाहीं. बरें, हे दोघे राजसेवक नव्हेत ह्मणावें तर राजवाड्याच्या पिछाडीच्या बागेंत यांचा रिघाव झाला कसा? याप्रमाणें वरील प्रवेशावर दोहोंकडून अडचण येते. पहिल्या व दुसऱ्या अंकांत खंडूजीची व हंबीररावाची पैज, तारेचें विलोभन, खंडूजीचा कपटोपक्रम, आणि त्याची पूर्ण सिद्धि, इतक्या गोष्टी मुख्य आहेत. आतां सर्वांत मुख्य गोष्ट जी पैजेची,—कीं जी साऱ्या नाटकाचें जणों काय कळसूत्रच आहे—तिजविषयीं येथें कांहीं लिहीत नाहीं; तिच्या संबंधानें पुढें विचार करायाचा आहे. बाकी खंडूजीचा व तारेचा जो प्रसंग झाला तो नीट मनांत आणला असतां त्यावर कित्येक आक्षेप निघण्यासारखे आहेत. एक तर खंडूजी आपणास अट्टल सोदा म्हणवीत असतां त्यानें प्रथमदर्शनींच तारेशीं लघ-ळपणा आरंभला, व आपली शोभा करून घेतली; तसेंच एक प्रयत्न निर्फ(ष्फ? सं०)ळ होतांच त्यानें येवढी जिवावरील पैज मारली असतां तिचा नाद तेव्हांच अगदीं सोडून दिला, या दोन्ही गोष्टी नीटशा जमत नाहींत. शिवाय साऱ्या जन्मभर ज्यानें लफंगबाजी केली त्याची वृत्ति केवळ एका निर्भर्त्सनेनें अगदीं पालटून जावी, व पतिव्रतेचें तेज त्यास केवळ दुःसह व्हावें, हेंही प्रायः असंभाव्यच! त्यांतून खंडूजीनें तारेच्या महालांत येण्यास पेटीची जी योजना केली ती तर फारच विलक्षण दिसते. जडावाचे दागिने व नकशीचीं रुप्याचीं भांडीं ठेवायाची पेटी कितीशी मोठी असणार! मग खंडूजीसारख्या बाप्यांस ज्यांत आंत गुपचुप बसतां येई असा सपाटा जड पेटारा जेव्हां तारेच्या महालांत आणून चाकरांनीं ठेवला असेल तेव्हां तीस मुळींच संशय कसा बरें आला नाहीं? शिवाय तारेनें पेटी आपल्या हवालीं घेतांना आंत काय आहे हें पाहिलें नाहीं काय? निदान यजमानांनीं राजाकडे पाठवण्यास येवढ्या जिनसा तरी कोणत्या तऱ्हेच्या करवल्या आहेत हीही स्वाभाविक उत्कंठा तीस कशी झाली नाहीं कोण जाणे! पेटीस मोहोर केलेली असेल ह्मणावें तर तीस मुसता कोईडाही नव्हता; कां कीं, झांकण वर करून खंडूजीची स्वारी बाहेर पडली आहे व पुनः तें लावून घेऊन आंत जाऊन बसली आहे असें आढळतें. एकंदरींत हें सर्व प्रकरण

---

work, and in view of his reward, he shortened the labour to snatch the profit. He therefore remits his efforts where he should most vigorously exert them, and his catastrophe is improbably produced or imperfectly represented."

*Preface to Shakspeare.*

गोंधळाचरें आहे. बरें, आतां एकंदर राजवाड्यांतील व्यवस्था पाहा. एक तर खुद्द राजाचेच मुलगे चोरून नेले असतां त्यांचा बिलकुल पत्ता नाहीं. ही ढिलाई जरी संभाजी महाराजांच्या माथीं मारतां आली, तरी पुढें राणी बायजाबाई हिच्या हातीं सारें राज्यसूत्र आलें असतां व ती येवढी दक्ष असतांही राजवाड्यांतील अव्यवस्था मोडली असें आढळत नाहीं. तारेला कोंडून ठेवली असतां खंडूजी खुशाल तिच्याकडे येतो जातो, त्याची कोणी फारशी विचारपूसही करीत नाहीं. तारेस हंबीररावाचें कपटाचें पत्र आल्यावरून ती सदोबाबरोबर निघून जाते, आणि हें वर्तमान पुढें कांहीं दिवसांनीं राजास कळतें! तेव्हां हाही या नाटकांत घोंटाळ्याचाच प्रकार आहे. याप्रमाणेंच सदोबा येवढा वस्ताद असता,—कीं इकडे आपल्या धनिणीची व धन्याची एकनिष्ठपणें सेवा करायाची व त्यांस संकटांतून सोडवायाचें व इकडे राणी व मुरारराव यांचें ही मर्जी जाऊं द्यावयाची नाहीं—असें असतां राणीच्या गोळ्या त्यानें मुकाट्यानें घेऊन त्या बिनदिक्कत तारेच्या हवालीं बाटेच्या आजाराला उपयोगी म्हणून कराव्या, त्या गोळ्यांची अगोदर परीक्षा करण्याचें त्यास मुळींच सुचूं नये, हें मोठें आश्चर्य नव्हे काय! त्यास राणीच्या स्वभावाची माहिती असून येवढा गाफिलपणा त्याचे हातून कसा झाला! शेवटल्या अंकांत तारा आपल्या बापासमोर उभी राहिली असतां तिची त्यास ओळख पटत नाहीं आणि मुराररावाची सोळा वर्षांमागची ओळख जुना सरदार मल्हारराव यास मात्र तत्क्षणींच पटते! याप्रमाणें एकंदरींत बऱ्याच ठिकाणीं प्रस्तुत नाटकांत विरोध व असंभाव्यता हीं दृष्टीस पडतात.

वरच्याप्रमाणेंच इतर कांहीं ठिकाणींही बरेच आक्षेप निघण्यासारखे आहेत. प्रकृत नाटकांतील मुरारराव हें पात्र बहुतेक अंशीं 'मृच्छकटिका'तील प्रतिनायक शकार याच्यासारखें आहे. दोघेही मूर्खशिरोमणि, दोघेही दुष्ट, दोघांचेंही नाटकांतील नायिकेविषयीं प्रेम व त्या प्रेमाचें दोघांसही बक्षीस म्हटलें म्हणजे तिरस्कार, एक राणीचा भाऊ व एक राणीचा पूर्वसंबंधाचा पुत्र, दोघांचेंही वरील संबंधाच्या जोरावर उद्धताचरण व क्रूर वर्तन, याप्रमाणें अनेक गोष्टींमध्यें दोघांचें इतकें साम्य आहे कीं एक मूर्ति डोळ्यांपुढें उभी राहिल्याबरोबर दुसरी राहते! पण एका ठिकाणीं मात्र या इंग्रेजी शकारानें अप्रयोजकपणाची अगदीं कमाल करून सोडली आहे. दुसऱ्या अंकांत तारेच्या वशीकरणार्थ त्यानें एक मोठा गंमतीचा उपाय योजला आहे. गवयांस बोलावून आणून त्यांजकडून प्रभातगीत म्हणवलें आहे, कीं त्या गाण्यास भुलून तारेनें मुराररावाच्या गळीं येऊन पडावें! ही छाछी मसलत 'राव मुरारी'स कोणीं दिली असेल ती असो! एकंदरींत तारा खोलींत कडी लावून बसली आहे, व मुरारराव, गवई, राजा, राणी सर्व मंडळी बाहेर दाराशीं अर्जदाराप्रमाणें किंवा रिणकऱ्यांसारखी उभी आहे, हा प्रवेश फारच मजेचा दिसत असेल! आंतून शिवाय मुरारजींनीं जी अक्कल खर्चली आहे तीस तर तोडच नाहीं;—तेथल्या तेथेंच आपल्या हृदयंगमेच्या दासीशीं संधान करून आपलें वकीलपत्र चालवण्याविषयीं ते विनवणी करताहेत! जी तारा आंतून प्रभातगीत ऐकून दाराशीं उभ्या राहिलेल्या मंडीवर प्रसन्न होणार तीच आपला व दासीचा संवादही ऐकेल येवढें सुद्धां त्यास कळून येऊं नये काय!

आहे; पांचव्या अंकांत दुष्टिपथास आलेला परम अनुताप व त्या वैतागांत जीवितत्यागा-विषयीं केलेला पूर्ण निश्चय या त्याच्या वृत्ति दाखवल्या आहेत, पण या दोन्ही त्या ठिकाणी विशेष [illegible] नाहींत असें आम्हांस वाटतें. सदरील अंकाच्या शेवटीं कंकुजीनें आपल्या अधमपणाचा उच्चार केला त्या समयीं त्यास पश्चात्ताप झाला आहे व शोकानें तो उच्छृंखल झाली आहे तें ठीक आहे, पण जोंपर्यंत तिच्या जारकर्माविषयीं त्याची पूर्ण खात्री होऊन चुकलेली होती तोंपर्यंत त्यानें आपला धिक्कार करून घ्यावा व जिवास कंटाळून जावें हें स्वाभाविक दिसत नाहीं. 'उत्तररामचरितां'त रामास उद्वेग व शोक झाला आहे तो यथार्थ आहे, कां कीं सीतेचा परित्याग त्यानें केवळ अपवादनिरसनार्थ व लोकाराधनार्थ केला होता, तिच्या शुद्धतेविषयीं तो स्वतः निःसंदेह होता. त्याप्रमाणेंच 'ऑथेल्लो'नें शेवटीं आपणास मारून घेतलें व खोट्या दोषारोपावरून ज्या आपल्या आवडत्या पत्नीचा त्यानें केवळ अविचारानें वध केला तिच्या प्रेतावर पडून त्यानें प्राण सोडला, हेंही मनुष्यस्वभावास अनुसरूनच आहे. पण प्रस्तुत नाटकांतील नायकाच्या हृदयांत उद्वेगादि वृत्ति येवढ्या प्रबळ होण्यास तसें कांहीं कारण दिसत नाहीं. सदरील पांचव्या अंकांत दोघां तरुण राजपुत्रांचा अलौकिक पराक्रम वर्णन केला आहे तोही केवळ अत्युक्तिरूप असल्यामुळें असंभाव्य होय. सुवर्णपुरच्या लोकांचा बहुतेक मोड होऊन ते पळूं लागले असतां एका म्हाताऱ्यानें व दोघां कुमारांनीं शत्रुसैन्याचा लोटच्या लोट मागें फिरवावा हें कृत्य केवळ अमानुष दिसतें. 'उत्तर-रामचरितां'त एकटा लव सार्‍या रामसैन्याशीं लढला आहे, 'इलियड्' मध्यें ट्रोजन् लोक ग्रीक् लोकांच्या जहाजांपर्यंत येऊन ठेपून त्यांस आग लावण्याच्या बेतांत आलेले असतां आकिलिसनें त्यांस माघारें फिरून लावलें व त्यांच्या सेनानायकास मारून त्यांचा अगदीं मोड केला आहे, 'जुन्या करारां'तला †सॅमसन् यानें मेलेल्या गाढवाच्या दाढेनें हजारों अविंधांस

† देवदूताच्या आशीर्वादानें मॅनोआ ( Manoah ) च्या [illegible] पत्नीस झालेला मुलगा. याच्या गर्भसंभवकाळीं देवदूतानें अशी आज्ञा केली होती कीं 'याच्या ( Samson ) डोक्याला वस्तरा लागतां कामा नये; कारण याचें [illegible] तेंच आहे.' पुढें हा मोठा झाल्यावर फिलिस्टाइन् (Philistines) लोकांपैकीं टिम्नाइट् ( Timnite ) ची मुलगी [illegible] पसंत पडली. यानें तिच्यावर प्रेम बसलें व तिच्याशीं [illegible] लग्नही झालें. पण पुढील [illegible] हंगामाच्या वेळीं हा बायकोला भेटण्यास गेला असतां सासऱ्यानें [illegible] [illegible] [illegible] व ती मुलगी दुसऱ्यास दिली [illegible] तिच्या धाकट्या बहिणीचा स्वीकार करण्यास सांगितलें. तेव्हां रागावून यानें टिम्नाथ् ( Timnath ) मधील फिलिस्टाइन्सचें सारें पीक जाळून टाकलें. याचा सूड म्हणून फिलि[illegible]नीं त्याची बायको व सासरा यांस जाळून टाकलें. सॅमसन्नें पुनः सूड घेतला. तेव्हां फिलिस्टाइन् लोक जुडा ( Judah ) च्या [illegible] [illegible] देऊं लागले व त्यांनीं सॅमसन्ची मागणी केली. जुडाच्या तीन हजार लोकांनीं सॅमसन्ला बांधून फिलिस्टाइन्सच्या स्वाधीन केलें. पण यानें ईश्वराची करुणा भाकतांच दोऱ्या तुटल्या. व हात मोकळे होतांच एका गाढवाच्या दाढेनें त्यानें एक हजार फिलि-स्टाइन् लोकांस ठार मारलें. पुढें सॅमसन्नें डेलिला (Deliah) नामक सुंदरीवर प्रेम [illegible], [illegible] [illegible] [illegible] व तिच्या द्वारें मर्म समजून घेऊन सॅमसन् डेलिलाच्या मांडीवर झोंपीं गेला असतां

( पुढें चालू )

झोडून काढलें आहे, हें सर्व खरें, पण वरच्यासारखीं वर्णनें प्रस्तुतसारख्या नाटकांत शोभत नाहींत. जसा विषय असेल तशी त्याच्यावर रचना करायास पाहिजे. महाभारतांतील विषय घेऊन त्यावर रचलेल्या नाटकांत जशीं काडतुसें, बंगनेटें, हडेल हंप् वगैरे प्रकार शोभणार नाहींत, त्याप्रमाणेंच सत्तावन सालच्या बंडावरील नाटकांतही नानासाहेबानें§ पर्वताला सोडलें असतां त्यावर हॅवलॉक्* साहेबानें वज्राला सोडलें, तात्या† टोप्याचें व सर् ह्यू‡ रोजचें गदायुद्ध झालें, इत्यादि वर्णनही अप्रयोजक होईल. तर या रीतीनें पाहतां प्रस्तुत नाटकाचा काळ ऑगस्टस् सीजर्‌ची कारकीर्द असतां तीन वीरांनीं साऱ्या सैन्याचा पराभव केल्याचा प्रकार कवीनें यांत जो घालून दिला आहे तो असमंजस होय. याप्रमाणेंच तारेस पातिव्रत्यापासून भ्रष्ट करण्याचा जो खंडूजीनें प्रयत्न केला आहे तोही नीट साधला नाहीं. 'अथेल्लो' नाटकांत यागोनें अथेल्लोस जसा मोठ्या शिताफीनें व युक्तिप्रयुक्तीनें गोत्यांत आणला आहे त्याप्रमाणेंच कांहीं खंडूजीनें करायास पाहिजे होतें. पण तसें कांहींच नाहीं. खंडूजी प्रतिज्ञा करून निघतो कोणत्या आवेशानें, आणि पुढें त्याच्या अजागळपणानें सारा विभ्रम एका क्षणांत ढांसळून काय जातो! एकंदरींत 'फटाटोपो भयंकरः' या वचनाची प्रतीति येते!

---

त्याच्या डोक्यावरचे केस वस्तऱ्यानें काढले व मग तो असहाय झाल्यावर त्याचे डोळे फोडून टाकले. पण मरतां मरतां ज्या घरांत फिलिस्टाइन्स् व तो होते त्याचे खांब हातांनीं वर उचलून छप्पर व भिंती कोसळवून त्याखालीं सर्वांचाच नाश त्यानें केला. Judges अध्याय १३-१६ पाहा. 'सम्पादक'

§ दुसऱ्या बाजीरावाचा दत्तक मुलगा धोंडोपंत ऊर्फ नानासाहेब (१८२१-१८५९) हा कानपुरजवळच बिठूर ऊर्फ ब्रह्मावर्त येथें राजवाड्यांत राहत असे. व्यापाराच्या मिषानें हिंदुस्तानांत येऊन येथील राजकीय तंट्यांत एकदां एका बाजूनें तर दुसऱ्या वेळीं विरुद्ध बाजूनें कटांत भाग घेऊन हिंदुस्तानचें राज्य गिळंकृत करणाऱ्या इंग्रेजांविरुद्ध १८५७ सालीं झालेल्या स्वातंत्र्य-युद्धांत यानें इंग्रेज बायकापोरांची अमानुष कत्तल कानपूर येथें केली. व आपल्या नांवानें पेशवे म्हणून द्वाही फिरविली. पण पुढें त्याचें कांहीं चाललें नाहीं व अखेर तो बेपत्ता झाला. 'सम्पादक'

* Sir Henry Havelock (1795-1857) कानपूर व लखनौ येथें वेढा पडलेल्या इंग्रजी पलटणींच्या मदतीस धांवून जाणारा शूर सेनापति. हा एका पलटणीचा मुख्य होता. 'स०'

† तात्या टोपे, नानासाहेबाचा सेनापति, झांशीच्या राणीसमवेत ग्वाल्हेरवर यानें हल्ला केला. राणी लक्ष्मीबाई पुरुषवेषांत लढत असतां गोळी लागून पडली व तात्या टोपे पळून गेला. पण अखेर १८५९ च्या एप्रिलमध्यें त्यास पकडून कानपूरच्या कत्तलीबद्दल फांशीं देण्यांत आलें. 'सम्पादक'

‡ Sir Hugh Rose ऊर्फ Lord Strathnairn १८०१-१८८५. हा १८६० पासून पांच वर्षें हिंदुस्तानांत व पुढें पांच वर्षें आयर्लंडांत कमांडर् इन् चीफ् होता. 'सम्पादक'

१. जॉन्सनचा 'सिंबेलिन' नाटकाविषयीं येणेंप्रमाणें अभिप्राय आहे—

"The play has many just sentiments, some natural dialogues, and some pleasing scenes, but they are obtained at the expense of much incongruity. To remark the folly of the fiction, the absurdity of the conduct, the confusion of the names, and manners of different times, and the impossibility of the events in any system of life, were to

(पुढें चालू)

५. याप्रमाणें मूळ इंग्रेजी नाटकांतील संविधानकांत जे दोष आढळले ते दाखवले. याबद्दल अर्थातच भाषांतरकाराकडे कांहीं जबाबदारी नाहीं. भाषांतरकर्त्याचें काम मूळ ग्रंथांत चांगला किंवा वाईट कोणत्याही तऱ्हेचा फेरफार करण्याचें नाहीं. जसें मुळांत असेल त्या-सारखें त्यानें अन्य भाषेंत उतरून दिलें ह्मणजे झालें. आतां प्रस्तुत भाषांतरकारानें सदरील ग्रंथ मराठींत उतरतांना पुष्कळ ठिकाणीं बदल केला आहे हें खरें; पण हा बदल फार करून मूळचा इंग्रेजी पेहेराव काढून त्याच्या जागीं मराठी घालण्यापुरताच आहे. हें वेषांतर कोणत्या तऱ्हेनें केलें आहे व तें कितपत साधलें आहे याविषयीं आतां विचार करूं.

मूळ नाटकांत राणी पुनरूढा आहे; ह्मणजे बायजाबाई ही संभाजी राजाची दुसरी बायको, व संभाजी हा तिचा दुसरा नवरा. राणीस पहिल्या नवऱ्यापासून झालेला मुलगा मुरारराव होय. मराठ्यांत पाटाचा प्रकार जरी सुरू आहे तरी तो प्रतिष्ठित धरलेला नाहीं, व उंच प्रतीच्या लोकांत तो चालही नाहीं; यास्तव वरील ठिकाणीं दोन फेरफार केले आहेत. ते हे कीं राणीचा प्रथम संबंधच ठेवून मुराररावास तिचा भाचा केला आहे. पात्रांच्या परस्परसंबंधांत केलेला बदल काय तो येवढाच आहे. इकडील देशांत स्त्रियांचा व्यवहार तिकडच्यापेक्षां फार मर्यादेचा व आड पडद्यांतला असतो; यास्तव मूळ नाटकांत राणी जशी भर दरबारांत विजयपुरच्या वकिलाशीं बोलते आहे तसें येथें दाखवलें नाहीं. तिचें आणि राजाचें भाषण होण्याकरतां निराळ्या प्रवेशाची योजना केली आहे. शेवटल्या अंकां-तील शेवटल्या प्रवेशांत तारेचें व तिच्या नवऱ्याचें जें पुनराभिज्ञानानंतर भाषण झालें आहे त्यांतही वरील देशाचारास अनुसरूनच फेरफार केला आहे. जावळी महालांतील रानांत मुराररावानें घातलेलें हंबीररावाचें पागोटेंच तेवढें तारेस दाखवलेलें आहे; मूळ नाटकांत मुराररावाचें धड पडलेलें जसें तिच्या दृष्टीस पाडलें आहे तसा प्रकार भाषांतरांत केलेला नाहीं. याचें कारण उघडच आहे कीं इकडील देशाचाराप्रमाणें नवऱ्याच्या प्रेताबरोबर तीस सहगमन करणें प्राप्त होतें. तारेच्या भासमान मरणाच्या प्रसंगींही भाषांतरकारास मुळापेक्षां निराळा मजकूर घालून द्यावा लागला आहे. नाटकांतील काळ रोमन् लोकांच्या वेळचा असल्यामुळें त्या वेळेस ब्रिटन् बेटांत मूर्तिपूजेचा धर्म चालू होता; यास्तव त्या धर्माप्रमाणें प्रेतसंस्काराच्या वेळचा गायनाचा वगैरे प्रकार मूळ ग्रंथांत आढळतो. तारेस मेलेली पाहून एका राजपुत्रानें प्रेतवाद्य वाजवण्यास आरंभ केला आहे, व तो स्वर ऐकून त्याचा भाऊ व त्यांनीं मानलेला बाप असे दोघे गुहेकडे आले आहेत. पुढें प्रेत जमिनीवर ठेवल्या-वरही दोघांनीं त्या वेळच्या रिवाजाप्रमाणें गाणें ह्मटलें आहे, व प्रेतावर पुष्पें टाकलीं आहेत. हें सर्व भाषांतरकारास बदलावें लागलें आहे, व इकडील आचारास जुळेसा कांहीं नवा मजकूरही घालावा लागला आहे. याप्रमाणेंच हंबीररावास तुरुंगांत पडलेलें स्वप्न मूळ नाट-कांत हंबीररावाच्या स्वप्नसृष्टींत त्याची आई, बाप, व बंधु इतके आले आहेत, व यांशिवाय

---

waste criticism upon unresisting imbecility, upon faults too evident for detection, and too gross for aggravation."

जुपिटरानें (विष्णूनें) दर्शन दिलें आहे. भाषांतरांत केवळ विष्णुदर्शनाचा प्रसंग मात्र घातला आहे. हे येथवर प्रकृत भाषांतरांत केलेले मोठमोठे फेरफार झाले. यांखेरीज बारीक-सारीक अदलाबदल जी मधें मधें अनेक ठिकाणीं करावी लागली आहे ती तारेच्या महा-लाचें वर्णन, भूपाळी, वगैरे स्थलाकडे अंमळ लक्ष पुरवलें असतां सहज लक्षांत येणारी आहे. शेक्सपियरच्या वेळच्या लोकांची अभिरुचि दांडग्या तऱ्हेची असल्यामुळें येथील फाल्गुन मासास शोभतशीं भाषणें त्याच्या नाटकांतून व काव्यांतून रगड आहेत[1], तसाच प्रकार कांहीं थोड्या ठिकाणीं प्रस्तुत नाटकांतही आहे[2]. हा प्रकार अर्थातच भाषांतरांत मुळींच गाळून टाकला आहे. त्याप्रमाणेंच मिल्फर्ड बंदर, रोमन लोकांचीं जहाजें, वगैरे समुद्राच्या खाणाखुणाही भाषांतरांत अगदीं बुजवून टाकल्या आहेत. तिसऱ्या अंकांतील शेवटला प्रवेश बहुतेक नवा करून घातल्यासारखाच आहे.

याप्रमाणें प्रस्तुत भाषांतरांत ग्रंथकारानें इकडील रीतरिवाजाशीं जम बसण्याकरतां मूळ नाटकांत कोणकोणते फेरफार केले आहेत ते सांगितलें. आतां या रूपांतराच्या योगानें इष्ट हेतूची सिद्धि कितपत झाली आहे ती पाहूं.

६. रा० महाजनि यांनीं प्रस्तावनेंत आरंभीं असें लिहिलें आहे कीं, "जे परदेशीय आचार विचार आपल्या रीतीस जुळत नाहींत त्यांचा या पुस्तकांत अव्हेर केला आहे. मूळ ग्रंथांत जेवढा भाग आपल्या देशस्थितीस अनुसरून आहे तेवढा मात्र ठेविला आहे. बाकीचा भाग बदलला आहे." ही प्रतिज्ञा जर सामान्यत: घेतली तर ती प्रस्तुत पुस्तकांत बऱ्याच रीतीनें शेवटास गेली आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं; म्हणजे हें आपण इंग्रेजी नाटक वाचीत आहों येवढी गोष्ट ध्यानांत धरून चाललें असतां वाचणारास प्रस्तुत ग्रंथ वाचीत असतां विशेष अडखळायाला नको. का कीं, इंबीररावास आपल्या प्रियेच्या हातांत कांकण घालतांना पाहून व तिची अंगठी आपल्या बोटांत घालतांना पाहून वरील तत्त्व लक्षांत ठेव-णाऱ्या वाचकांस किंवा प्रेक्षकांस मुळींच आचंबा वाटणार नाहीं. इंग्रेज लोकांचा वरील रिवाज आहे, हें तो वरील प्रसंगीं तेव्हांच ध्यानांत आणील; व अंगठीचा आणि कांकणाचा एकंदर संविधानकाशीं अत्यंत निकट संबंध जडून राहिला असल्यामुळें हा इंग्रेजी रिवाज भाषांतर-कारास बदलतां येईना ही सबबही तो लक्षांत आणून तिचा फायदा प्रस्तुत पुस्तककारास देईल. पण वरील प्रतिज्ञेचा अक्षरश: अर्थ करून हें मराठीच नाटक आहे, अशा बुद्धीनें जर कोणी 'तारा' वाचण्यास आरंभ करील तर तो जागोजाग भांबावून जाईल. 'साठे' 'गोखले' वगैरे आडनांवें ऐकून जर कोणीं नवख्यानें गोमांतकस्थ ब्राह्मणांस आपल्या घरीं बोलावलें, तर त्यांच्या विजारी व कॅस पाहून तो जसा वेडावून जाईल, त्याप्रमाणेंच तारेचा व इंबीररावाचा गुप्त विवाह, तिचें आपल्या गूढ वल्लभाच्या तर्फेनें बापाशीं भांडण व तोंडास तोंड देणें, वगैरे

१. याचा मासला पाहणें असल्यास 'अथेलो' नाटकाचा पहिला प्रवेश पाहावा. तशीच प्रस्तुत कवीचीं दोन तीन लहान काव्यें आहेत तींही पाहावीं.

२. मूळ 'सिंबेलैन' नाटकाच्या दुसऱ्या अंकांतील इंबीरराव व खंडूजी यांचें भाषण, व शेवटची इंबीररावाची स्पष्टोक्ति हीं दोन स्थलें पाहा.

विलक्षण प्रकार पाहूनही वरील भावाच्या वाचकास असें होऊन जाईल कीं हे इंग्रेज मराठे कोण्या मुलखाचे कोण जाणे! ! त्यांतून साऱ्या संविधानकाचें मुख्य बीज जी पहिल्या अंकांतील पैज तिजविषयीं तर तो जितका आचंबा करीत राहील तितका थोडा ! ज्या देशांतील राज-

---

१. ही पैज एतद्देशीयांच्या दृष्टीनें जरी केवळ असंभाव्य व अत्यंत अप्रतिष्ठित वाटेल तरी युरोपांतील आचारास ती म्हणण्यासारखी विलक्षण वाटणारी नव्हे. एक तर बोकेशीयो* नामक विख्यात इटालियन् ग्रंथकाराच्या एका कथानकावरूनच शेक्सपीयरनें ती आपल्या नाटकांत घेतली आहे; व शिवाय 'डॉन् क्विग्झोट'† नामक जगद्विख्यात स्पॅनिश् कादंबरींतही एक अशाच प्रकारचें उपकथानक§ आहे. याचें 'The curious impertinent' असें नांव इंग्रेजी भाषांतरांत आहे.

* Giovanni Boccaccio. ( इ. स. १३१३–१३७५ ) कादंबरी-लेखनाचा जनक अशी याची ख्याति असून याची भाषासरणी डौलदार व कल्पलता फारच मोठी होती. याचा डेकॅमेरॉन् ( Decameron ) नामक विख्यात ग्रंथच ( यद्यपि दोन पोप व ट्रेंट्चें कौन्सिल यांनीं या ग्रंथावर खूप हल्ले चढविले तरीहि ) शेक्स्पियरपासून कीट्सपर्यंतच्या सर्व कवींना व कादंबरीकारांना स्फूर्ति-दायक झाला. 'सम्पादक'

† Cervantes सर्व्हॅंटिस् ( इ. स. १५४७–१६१६ ) नामक जगद्विख्यात ग्रंथकाराची कादंबरी Don Quixote. या ग्रंथकारानें पुष्कळ दिवस लष्करी खात्यांत आयुष्य घालवल्यावर उतार वयांत वाङ्मयसेवा सुरू केली. ही कादंबरी इतकी जगभर गाजली तरी तिच्या कर्त्याला मात्र सारें आयुष्य दारिद्र्यांतच कंठावें लागलें. लेखन-कौशल्यांत याला मागें सारणारा एक शेक्स्पियरच आणि मोठा मौजेचा योगायोग असा कीं शेक्स्पियर व सरव्हॅंटिस् दोघेहि भिन्न देशांत पण एकाच दिवशीं म्हणजे २३ एप्रिल १६१६ रोजीं वारले. डॉन् क्विग्झोटचें इंग्रेजी भाषांतर ( Shelton ) शेल्टन्नें १६१२ सालीं केलें. 'सम्पादक'

§ क्यूरिअस् इंपर्टिनंट् ऊर्फ फक्कड रीतीनें फशीं पडलेला फाजील चोकसखोर ( Most Agreeably Deceived Man ): इटली देशामध्यें टस्कनी प्रांतीं फ्लॉरेन्स शहरांत ॲन्सेल्मो ( Anselmo ) व लोथॅरिओ ( Lothario ) असे दोघे जीवश्च कंठश्च स्नेही होते. लोथॅरिओ-च्याच खटपटीनें ॲन्सेल्मोच्या मनांत भरलेली कॅमिला ( Camilla ) नामक त्रिभुवनसुंदरी त्याची पत्नी झाली. लग्नानंतर ॲन्सेल्मोच्या मनांत पत्नीचें चारित्र्य कसाला लावून पाहण्याचें आलें. कारण, बिघडण्याची संधिच न आल्यामुळें तिचें चारित्र्य आजवर शुद्ध राहिलें असेल तर त्यांत गौरव करण्यासारखें कांहींच नाहीं असें त्यास वाटलें. संधि मिळूनहि जर ती च्युत होणार नाहीं तर मात्र लावण्यखाने आणि सद्गुणशालिनी पत्नीचा पति या नात्यानें आपण भाग्यशाली ठरूं अशा विचारानें द्रव्य, मान, दागिने, देणग्या वगैरेंचा मोह घालून आपल्या पत्नीच्या पातिव्रत्याचा किल्ला सर कर-ण्याच्या कामावर आपला स्नेही लोथॅरिओ याची योजना करण्याचें त्यानें ठरविलें. तिचें चारित्र्य ढिसूळ असून ती पापमार्गास दुर्दैवानें प्रवृत्त झालीच तर तिच्या कमकुवत चारित्र्याची दोरी वाजवीहून फाजील म्हणजे तुटेपर्यंत न ताणतां आपला मित्र आपणास इशारत देईल या खात्रीनें त्यानें लोथॅरिओजवळ ही गोष्ट काढली. प्रेमाच्या आगीशीं चेष्टेनेंहि खेळणें धोक्याचें असतें. कारण थट्टेनें सुद्धां स्पर्श करणारास पोळल्याशिवाय ती राहत नाहीं हें माहीत असल्यानें लोथॅरिओनें प्रथम हें काम नाकारलें, पण आपल्या मित्राचा हट्ट भलत्याच थरास गेला असून त्यानें दुसऱ्या कोणा माणसाकडे हें काम दिलें तर भलताच अनर्थ होईल या भीतीनें अखेर त्यानें तें पत्करलें. यानंतर ॲन्सेल्मो कांहीं निमित्तानें घरांतून निघून जाऊन आपल्या पत्नीला व मित्राला एकांताची संधि देऊं लागला.

[ पुढें चालू ]

स्त्रियांस जुनीं संस्कृत नांवें झटलीं झणजे 'अवरोध' 'असूर्यपश्या:' अशा तन्हेचीं, व आलीकडील काळ घेतला तरी जेथील स्त्रियांस पराकाष्ठेची अटक, आणि त्यांतून मराठमोळ्याचा

---

पण सुविनीत लोथॅरिओनें तिशीं एकहि शब्द बोलूं नये व अॅन्सेल्मो परत आल्यावर आपण प्रयत्न केला पण कॅमिला त्या पंथाची दिसत नाहीं अशा गप्पा माराव्या. तथापि त्याची ही लबाडी उघडकीस आली तेव्हां अॅन्सेल्मोनें फार निर्भर्त्सना केल्यावरून फिरून प्रामाणिकपणें प्रयत्न करण्याची लोथॅरिओनें शपथ घेतली. अॅन्सेल्मो बऱ्याच दिवसांच्या मुदतीनें गांवीं गेला व जातांना आपल्या स्नेह्याची नीट बरदास्त ठेवण्यास त्यानें पत्नीस सांगितलें. इतके दिवस कॅमिलाशीं लोथॅरिओ शब्दहि बोलत नसे पण त्यानें वाणीला लगाम घातला तरी कॅमिलाचें अप्रतिम सौंदर्य पूर्ण एकांत व उभयतांचेंहि ऐन तारुण्य अशा त्रिवेणी-संगमामुळें कामदेवानें त्याच्या उघड्या राहत असलेल्या डोळ्यांच्या द्वारें मनाला फितूर करून अंतःकरणाचा व बुद्धीचा कबजा घेण्यास सुरुवात केलीच होती. आतां तर त्यानें शपथच घेतली असल्यानें जिभेवरील नियंत्रणहि निघालें व लोथॅरिओनें एके दिवशीं अत्यंत परिणामकारक रीतीनें कॅमिलाजवळ प्रेम-याचना केली. पण तिच्या सतीत्वाचा पाया अद्याप स्थिर असल्यानें संतापून तिनें पतीकडे तक्रारवजा पत्र लिहून माहेरीं जाण्याचा आपला निश्चय कळविला. पत्र वाचतांच अॅन्सेल्मोला आनंद झाला व आपल्या स्नेह्यानें गोळीबार करण्यास सुरुवात केल्याची खात्री पटली. पण एकदां परीक्षा होऊन जाऊं द्या म्हणजे आपल्या भाग्याचा काय तो निकाल कळेल या विचारानें आपण लवकरच येणार असल्यामुळें घर सोडून जाऊं नये असें उलट पत्र त्यानें कॅमिलास पाठविलें. पातिव्रत्यभंग करूं पाहणाऱ्याच्या संगतींतून न जाण्याचा प्रत्यक्ष पतीचा हुकूम! तेव्हां त्याला तुटक बोललें तर भलताच अनर्थ होईल या भीतीनें व नोकरचाकरांसहि संशय येऊं नये म्हणून तिनें झालेला प्रकार घडलाच नाहीं असें दाखवून लोथॅरिओशीं मोकळेपणानें वागण्यास सुरुवात केली. कॅमिलाची नुसती तारांबळ उडाली. गरीब बिचारी! तिला काय माहीत कीं कामविकारास तोंड देऊन बचाव होत नाहीं तर त्याच्यापासून दूरच पळालें पाहिजे? सेनापतीशिवाय सेना अगर किल्लेदाराशिवाय किल्ला शत्रूंशीं एकवेळ झुंजूं शकेल; पण पतिविरहित नवयौवन-सौंदर्यशालिनी स्त्री एकांतीं इच्छा चढविणाऱ्या गुणरूपशाली शत्रूशीं (तो पतीच्या मित्रत्वाचें कातडें पांघरीत असेल तर बोलावयाची सोयच नाहीं) यशस्वी रीतीनें कधींहि झगडूं शकणार नाहीं. कॅमिलाचें असेंच झालें व हळूहळू तिच्या मनावर लोथॅरिओच्या वक्तृत्वपूर्ण प्रेमयाचनेच्या पुनरावृत्त्यांनीं, अश्रुमोचनानें, विनवण्यांनीं, त्यानें केलेल्या तिच्या सौंदर्याच्या प्रशंसेनें वगैरे परिणाम झाला व एक दिवस तिचा पाय घसरला; हा गोंधळ कॅमिलाच्या दासीच्या नजरेंतून सुटला नाहीं. तिला हें धनिणीचें गौप्य समजल्यामुळें ती धनिणीवर कुरघोडी करून आपल्या प्रियकरालाहि रात्रीं चोरून वाड्यांत घेई व सकाळीं बाहेर सोडी. पुढें त्यांचा निर्लज्जपणा इतका वाढला कीं कॅमिलाला त्यांची तरफदारी करणें प्रसंगीं भाग पडूं लागलें. अॅन्सेल्मो परत आल्यावर लोथॅरिओनें त्याची कॅमिलाच्या पावित्र्याबद्दल खात्री केल्यामुळें तो आपल्या अद्वितीय भाग्यशालित्वाचा कैफांत सांपडला व विश्वासघातकी मित्र आणि भ्रष्ट पत्नी यांचा स्वैर विहार निर्बंध चालू राहिला. पण पुढें एके दिवशीं सकाळीं फार उशिरां कॅमिलाच्या दासीचा यार चोरून वाड्याबाहेर जातांना दिसतांच विशेष माहितीच्या अभावीं नवऱ्याला सोडून आपणास भाळली तशी कॅमिला आपणास सोडून त्या गृहस्थाशीं प्रेमाचे खेळ खेळत असावी अशा शंकेनें लोथॅरिओच्या मनांत असूया उत्पन्न होऊन अॅन्सेल्मोला त्यानें सदर बातमी दिली; व दुसरे दिवशीं सकाळीं पुरावा पाहण्यासाठीं गुप्तपणें दडून राहण्यास सांगितलें. पण असूयेचा तो भर ओसरतांच वाईट वाटून त्यानें कॅमिलाजवळ आपली चूक कबूल केली. कॅमिलानेंहि दुसरे दिवशीं आपल्या 'स्त्रीणां सहज'

[पुढें चालू]

गोशा म्हटला म्हणजे तर पुसूंच नये–तेथेंच परक्या पुरुषानें नवऱ्याची चिठ्ठी आणून बायकोवर लावावी व नवऱ्यानें आपल्या स्त्रीच्या पातिव्रत्याचा पण आपणच लावावा, या गोष्टी केवळ्या विलक्षण तऱ्हेच्या भासणाऱ्या आहेत !! संभाजी महाराजांच्या दरबारीं 'बॉल्' होऊन खंडूजीच्या बायकोच्या कंबरेला हात घालून हंबीरराव नाचतो आहे, व तारेच्या तोंडचें मद्यपात्र खंडूजी झोकतो आहे, इत्यादि प्रकार प्रस्तुत नाटकांत आले असते तर ते जितके इकडील रिवाजाला गोड दिसले असते तितकाच वरील पैजेचा प्रसंगही दिसत आहे.

७. असो; येथवर प्रस्तुत नाटकाचा अवांतर गोष्टींच्या संबंधानें विचार झाला; म्हणजे मूळ नाटक कोणत्या तऱ्हेचें आहे, त्यांत भाषांतरकारानें कोणकोणते फेरफार केले आहेत वगैरेविषयीं विवेचन झालें. आतां सांप्रत पुस्तकापासून लोकांस कोणत्या तऱ्हेचा व कितपत उपयोग होण्यासारखा आहे तो पाहूं.

प्रथमतः विद्यार्थ्यांस व जिज्ञासु जनांस.—विद्यार्थी म्हणजे जे लोक प्रकृत ग्रंथ 'सिंबलैन' चें भाषांतर म्हणून टीकेदाखल हातीं घेतील ते, व जिज्ञासु म्हणजे ज्या लोकांचा इंग्रेजींत प्रवेश नसल्यामुळें या भाषांतरावरून शेक्सपीयरच्या कवित्वगुणांची जे परीक्षा करूं जातील तें. या दोघांस प्रकृत पुस्तकापासून चांगलासा उपयोग होणार नाहीं. याचें कारण उघड आहे कीं, एक तर हें शब्दशः भाषांतर केलेलें नाहीं, व शिवाय पुष्कळ ठिकाणीं मुळांत व भाषांतरांत अतिशयित अंतर आहे. यास्तव 'अथेल्लो' व 'टेंपेस्ट्' यांचा वरील दोन संबंधांनीं जितपत उपयोग होण्यासारखा आहे तितका प्रस्तुत नाटकाचा नाहीं हें सिद्धच आहे. दुसरा उपयोग सामान्य वाचकांस,—म्हणजे जे केवळ कर्मणुकीखातर इतर नाटकांप्रमाणें व कादंबऱ्यांप्रमाणें प्रस्तुत ग्रंथ वाचायास घेतील त्यांस. या वाचकांकरतां प्रस्तुत ग्रंथकारानें मुख्यतः परिश्रम केले आहेत. त्यानें प्रस्तावनेच्या आरंभीं सांगितलेंच आहे कीं आजपर्यंत जेवढीं शेक्सपीयरचीं नाटकें मराठींत झालीं आहेत तेवढीं सर्व निव्वळ भाषांतरादाखलच असल्यामुळें एतद्देशीय वाचकांस प्रायः दुर्बोध झालीं आहेत. यास्तव त्यांस समजेल व गोड लागेल अशा पद्धतीचें भाषांतर महाराष्ट्रभाषेंत करण्याचा हा प्रथमच यत्न होय. इंग्रेजींत ज्यास adaptation( ॲडाप्टेशन् ) म्हणतात,—म्हणजे मूळ ग्रंथाच्या आधारावर दुसऱ्या भाषेंत स्वतंत्र रचना करायाची,—तशा तऱ्हेचा हा ग्रंथ होय. हें रूपांतर सिद्ध होण्यास किती खटपट करावी लागली आहे व ती कितपत सिद्धीस गेली आहे हें मागें सांगण्यांत आलेंच

---

अशा ' अशिक्षित–पटुत्वा'च्या जोरावर नवऱ्याला असें नाटक दाखविलें कीं लोथेरिओ प्रेमयाचना करण्यास आला असतां संतापून ती त्याच्या छातींत सुरा खुपसणार तोंच त्यानें हात धरल्यामुळें अखेर तिनें स्वतःच्याच छातींत ( मात्र एका बाजूला दंडाजवळ अगदीं थोडी जखम होईल अशा बेतानें ) खुपसून घेतला व बेशुद्ध पडली. लोथेरिओनेंहि पतिव्रतेचा छळ केल्याबद्दल खूप आकांत करून अश्रु ढाळले. नवऱ्याची खात्री पटली. व पुनः पापाचा नंगा नाच निष्कंटकपणें चालू झाला. पण पाप फार वेळ दडून राहत नाहीं या न्यायानें पत्नीच्या पातिव्रत्याची फुटकी कांच पायांत मोडून अखेर पत्नीच्या पातिव्रत्याशीं खेळ खेळूं पाहणाऱ्या या उद्दाम नवऱ्याच्या सुखाची होळी झाली ! डॉन् किग्झोट भाग आठवा पाहा. 'सम्पादक'

आहे. तेथें दर्शविल्याप्रमाणें 'प्रस्तुत' नाटकाच्या कथानकांत कित्येक मोठमोठाले दोष राहिले आहेत व त्यामुळें एतद्देशीय वाचकांचा मनोभंग होणारा आहे हें खरें; पण या गोष्टीस उपाय नाहीं. व्हीनस्‡ देवीच्या कृपेनें तत्क्षणीं तरुणी बनलेली 'इसापनीतीं' तील माटी* जशी स्वजातिर्दुरतिक्रमा ' किंवा ' मूळ स्वभाव जाईना ' या न्यायास अनुसरून मूषकशब्द ऐकतांच गडबडून गेली, व प्रथम–समागमाच्या सोहळ्याचा भंग करून व तिरस्करिणीचा तिरस्कार करून तिनें जशी उंदरावर झांप घातली; त्याप्रमाणेंच आमच्या विदर्भदेशीय नाट्याचार्यांनें आपल्याकडून जरी पुष्कळ मेहेनत घेऊन तारेस अगदीं मराठी ' लेडी ' बनवून दिली आहे, तरी तिच्या भाषणांत व आचरणांत मूळ इंग्रेजी झांक थोडीबहुत तरी मारायाचीच ! मूळच्या महानाट्याचार्यांच्या शिक्षेचा संस्कार नाक कान टोंचल्यानें व झग्याच्या जागीं साडी नेसवल्यानें कोठून समूळ नाहींसा होणार ? असो; तर निवळ मराठी तऱ्हेचें नाटक या दृष्टीनें पाहतां भाषांतरकाराचा मुख्य जो उद्देश, कीं एतद्देशीय वाचकांचें मनोरंजन व्हावें तो सदरील ग्रंथावरून चांगल्या प्रकारें सिद्धीस जाईल असें आह्मांस वाटतें. एक तर एकंदर संविधानक बरेंच मौजेचें आहे, व शेवटला उपसंहार तर फारच बहारीचा आहे; शिवाय शेक्सपीयरची मुख्य खुबी जी स्वभाववैचित्र्य व यथार्थवर्णन तेंही प्रकृत नाटकांत उत्कृष्ट तऱ्हेचें आढळतें. नायकाचें व नायिकेचें गभीरोदात्तत्व; प्रतिनायकाचें शकारसदृश मूर्खत्व, क्रूरत्व, नीचत्व; सदोबाची स्वामिभक्ति; राजाचें स्त्रीजितत्व; राणीचें आनंदीबाईच्या सवाई निष्ठुराचरण व कौटिल्य; खंडूजीचा मत्सरी स्वभाव; तरुण राजाबेठ्यांचें कुशलवांसारखें स्वाभाविक उन्नतत्व व वीर्यस्फुरण;—हीं सर्व प्रस्तुत नाटकाच्या मनोरमत्वास साधनीभूत असून या महाराष्ट्रीय प्रतिकृतींतही वरील सर्व भाग यथास्थित उतरले आहेत. कांहीं ठिकाणीं वर्णनेंही शानदार आलीं आहेत; शिवाय प्रस्तुत ग्रंथकाराचा संस्कृत नाटकांशीं व काव्यांशीं चांगला परिचय असल्यामुळें जेथें जेथें शेक्सपीयरच्या वाणीचा व भवभूत्यादिकांच्या सरस्वतीचा परम हृद्य संगम झाला आहे तेथें तेथें इकडचा आयताच ओघ भाषांतरकारानें आपल्या कृतींत ओतून दिल्यामुळेंही ' तारा नाटका ' स मधें मधें फार रमणीयत्व आलें आहे.

प्रस्तुत नाटकाचा तिसरा उपयोग नाटककार मंडळीस.—यांची सुधारणा करण्याकडे आपल्या नवीन मंडळीनें अद्याप ह्मणण्यासारखें कांहींच लक्ष पुरवलें नसल्यामुळें त्यांच्याच अकलेनें जेथपर्यंत मजल पोंचवेल तेथपर्यंत त्यांनीं पोंचवली आहे. या मंडळ्यांस मुख्य उणीव ह्मटली ह्मणजे नाटकांचीच होय. आजपर्यंत एकंदर लोकांचें सज्ञानदशेंत विशेष पुढें

‡ शुक्र–रोमन् लोकांतील प्रेमाची अधिष्ठात्री देवता. 'सम्पादक'

* Æsop's Fables मधील ' Venus and the Cat.' ही गोष्ट पाहा.

या माटीचें एका पुरुषावर प्रेम बसल्यानें व्हीनसूची प्रार्थना करून तिनें मानवीरूप मिळविलें. पण तिची परीक्षा पाहण्याकरतां व्हीनसूनें ती एकांतीं पतीजवळ बसली असतां तेथें उंदीर सोडतांच तिनें उंदरावर झडप घातल्यामुळें तिच्या छिचोरपणामुळें रागावून व्हीनसूनें तिला फिरून माटी बनविलें.

'सम्पादक'

पाऊल नसल्यामुळें, व इंग्रेजी सुधारणुकेचीं जीं नाट्यप्रभृति अंगें त्यांचीं परिचयही चांगलासा झाला नसल्यामुळें, 'रावणराज्य महाराज' 'अल—ल—ल' वगैरे प्रकार शोभून गेले. पण यापुढें वरील धांगडधिंगा खपला जाणार नाहीं. आलीकडील अभिरुचीस वरच्यापेक्षां कांहीं खुबीचा प्रकार पाहिजे. तेव्हां अशा संधीस प्रस्तुतसारखीं परभाषेंतील नाटकें किंवा देशभाषेंतच नवीं नाटकें झालीं असतां फार उपयोग होणारा आहे. जुन्या संस्कृत नाटकांची भाषांतरें-ही या कामीं चांगलीं पडणार आहेत[1]. असो; प्रस्तुत नाटक तरी एका नाटककार मंडळीच्या सांगण्यावरूनच केलें असे भाषांतरकर्त्यानें प्रस्तावनेंत सांगितलें आहे; व सदरील नाटकाचा रंगभूमीवर प्रयोग होऊन तो लोकप्रिय झाला असेंही वरील ठिकाणींच लिहिलें आहे.[2] तर प्रयोगद्वारां लोकरंजन करण्यास प्रकृत ग्रंथ साधनीभूत आहे हाही त्यापासून होणारा एक मोठा उपयोग आहे.

---

१. दक्षिणा प्रैज कमिटीच्या विद्यमानें बहुतेक संस्कृत नाटकांचीं महाराष्ट्रभाषेंत भाषांतरें आज बरींच वर्षे झालीं असतां तीं होऊन न झाल्यासारखींच झालीं आहेत हें पाहून अत्यंत खेद होतो. या नाटकांपैकीं फारच थोडीं हल्लीं कोणापाशीं शिल्लक असतील; बाकी त्यांचा बहुतेक अस्त झाल्या-सारखाच आहे. विद्याखात्याकडे दरवर्षी येवढी रकम खर्च होत असतां व Native literature encouragement fund (एतद्देशीय भाषांतून ग्रंथसमृद्धि व्हावी एतदर्थ झालेला खर्च) असें निराळें सदर, विद्याखात्याच्या वार्षिक रपोर्टांत घातलें असतां, वरील कमिटीच्या द्वारें आयता तयार होऊन पडलेला मालही आमच्या बिचाऱ्या बुभुक्षित ज्ञानेच्छु जनांस मिळत नाहीं ही गोष्ट मोठ्या चमत्काराची होय! कमिटीरूप यंत्रांतून सिद्ध झालेलें अन्न जसेंचें तसेंच वर्षानवर्षे पडूं द्यावयाचें, तर मग येवढा भटारखाना आज पंचवीस तीस वर्षे सतत चालू ठेवण्यापासून तरी उपयोग काय! गरीब बिचाऱ्या भटांच्याच प्रीत्यर्थ जर सदरील पैशाचा पूर्वीप्रमाणें* विनियोग होता तर काय वाईट होतें! तसेंच हल्लीं भूगर्भशास्त्र, प्राणिरचनाशास्त्र, वनस्पतिशास्त्र, वगैरे गहन विषयांवर पुस्तकें बनवून तीं लोकांस समर्पण करण्याचा जो उद्योग चालू आहे, त्यापेक्षां वरच्या नाटकांसारखीं मनोरंजक पुस्तकें जर थोड्या किंमतानें सर्वांस घेतां येण्याची सोय झाली तर ती हल्लींच्या स्थितीस विशेष श्रेयस्कर होण्यासारखी आहे असें आमच्या बुद्धीस वाटतें.

* पुण्यास पेशवे दरसाल ब्राह्मणांस दक्षिणा वांटीत. माधवराव पेशव्यांपासून सरसकट साऱ्या ब्राह्मणांस दक्षिणा देण्याऐवजीं विद्वान् ब्राह्मणांसच तेवढी देण्यांत येऊं लागली. इंग्रज सरकारनेंहि हा प्रघात पाळला. पण पुढें या खर्चांतून बचत करून विद्याभिवृध्द्यर्थ विश्रामबागेंत संस्कृत पाठशाळा सन १८२१त सुरू करण्यांत आली. पुढें रा.ब. गोपाळ हरि देशमूख प्रभृति गृहस्थांनीं मराठी व इंग्रेजी वृत्तपत्रांत लेख लिहून खूप चळवळ केल्यामुळें पूर्वी चालू असलेल्या विद्वानांची दक्षिणा चालू ठेवावी पण नवीन मनुष्यास मात्र दक्षिणा देऊं नये व ही वांचलेली रकम व जुने दक्षिणा घेणारे पंडित मेल्यावरें त्यांची उरणारी रकम ग्रंथोत्पादनार्थ खर्च करावी असें ठरून तदनुसार १८५१ सालीं दक्षिणा प्राइझ कमिटीची स्थापना झाली. या कमिटीकडून अनेक पुस्तकें प्रकाशित झालीं असून कित्येकांस उत्तेजनार्थ बाक्षिसेंहि मिळाला आहेत.

'सम्पादक'

२. वरील नाटककार इचलकरंजीकर मंडळी होय. हिनें वऱ्हाडांतील कांहीं मंडळीकडून "सिंबेलैन' व 'कॉमेडी ऑफ् एरर्स्' या दोन इंग्रेजी नाटकांचीं भाषांतरें करून घेतलीं असून त्यांचा प्रयोग ती रंगभूमीवर दाखवीत असते. वरील नाटकें रंगभूमीवर फार चांगलीं वठतात. 'तारा'

[पुढें चालू]

८. याप्रमाणें प्रस्तुत नाटकाच्या संबंधानें जे विचार वाचकांस कळवण्यासारखे होते ते कळवले. आतां केवळ मराठी ग्रंथ या रीतीनें पाहतां 'तारा नाटका'वर कांहीं आक्षेप येण्यासारखे आहेत खरे; पण त्यांच्या योगानें 'किरणेष्विवांकः' (जसा चंद्राच्या प्रकाशांत कलंक लोपून जातो) या न्यायानें त्याच्या सौंदर्यास विशेष बाध येतो असें नाहीं. सामान्यतः पाहतां परभाषेंतील विचार आपल्या भाषेंत उतरून देणें हें काम कठिणच; त्यांतून, कवितेचें भाषांतर तर विशेषतः दुर्घट; आणि त्यांतही शेक्स्पीयर बोवाशीं गांठ झाली म्हणजे तर भाषांतरकारानें ठिकठिकाणीं हातच टेकायाला पाहिजेत. या गोष्टीचा

नाटकाचा प्रयोग आमच्या एका मित्रानें नुकताच मुंबईस पाहिला; तो लोकांस चांगला पसंत पडतो हें त्याच्या सांगण्यावरून व सदरील प्रयोगाच्या वरील शहरीं झालेल्या पुनरावृत्तींवरून दिसून येतें. 'कॉमेडी ऑफ् एरर्स्' (भ्रांतिकृत चमत्कार) याचा प्रयोग रत्नागिरीस असतांना या वर्षाच्या आरंभीं आह्मीं पाहिला होता. तो आह्मांस फार मनोरम वाटून शेक्स्पीयरच्या नाटकांचा एतद्देशीय वाचकांस व प्रेक्षकांसही किती उपयोग करून देतां येईल ही गोष्ट आमच्या मनावर वरील अभिनया-वरून चांगल्या प्रकारें ठसली.

१. जॉन्सन्नें शेक्स्पीयरच्या नाटकांची एक आवृत्ति तयार केली हें आमच्या वाचकांच्या ध्यानांत असेलच. ही आवृत्ति निघण्यापूर्वी वरील पंडितानें एक प्रसिद्धिपत्रक काढलें होतें. त्यांत पुढील मजकूर आढळतो—

"But of the works of Shakespeare the condition has been far different: he sold them, not to be printed, but to be played. They were immediately copied for the actors, and multiplied by transcript; vitiated by the blunders of the penman, or changed by the affectation of the player; perhaps enlarged to introduce a jest, or mutilated to shorten the representation; and printed at last without the concurrence of the author, without the consent of the proprietor, from compilations made by chance or by stealth out of the separate parts written for the theatre; and thus thrust into the world surreptitiously and hastily, they suffered another deprivation from the ignorance and negligence of the printers, as every man who knows the state of the press in that age will readily conceive.

It is not easy for invention to bring together so many causes concurring to vitiate the text. No other author ever gave up his works to fortune and time with so little care; no books could be left in hands so likely to injure them, as plays frequently acted, yet continued in manuscript; no other transcribers were likely to be so little qualified for their task as those who copied for the stage, at a time when the lower ranks of the people were universally illiterate; no other editions were made from fragments so minutely broken, and so fortuitously re-united; and in no other age was the art of printing in such unskil-ful hands."

अनुभव ज्यांनीं प्रस्तुत कवीचा एकादा ग्रंथ परीक्षेकरतां वगैरे चांगला लक्षपूर्वक वाचला असेल त्यांस विचारावा ! तर अशा ग्रंथकाराच्या कृतीचें मराठीसारख्या अत्यंत विसदृश भाषेत प्रतिबिंब उठवून द्यावयाचें म्हणजे मोठ्या प्रयासाचें काम आहे यांत संशय नाहीं. तें प्रस्तुत ग्रंथकारानें इतपत उठवून दिलें आहे यावरून त्याचे परिश्रम व त्याचें चातुर्य हीं व्यक्त होतात. छापण्यास पाठवण्यापूर्वी कित्येक मित्रांकडे सदरील पुस्तक पाठवलें होतें असें प्रस्तावनेच्या शेवटीं लिहिलें आहे; या गोष्टीचें मर्महो तज्ज्ञ वाचकांच्या लक्षांत येईलच. असो; पण या कृतीवर मूळ भाषांतरकर्त्याचे व इतरांचे इतके परिश्रम झाले असतां कांहीं ठिकाणीं तींत इंग्रेजीची झांक अद्याप राहिली आहे, व कोठें कोठें वाक्यरचनेचाही घोंटाळा राहिला आहे. तसेंच कांहीं ठिकाणीं प्रवेशादि निर्देशांतही नजरचूक झालेली आढळते[१].

९. याप्रमाणें अभिप्राय देण्यास हातीं घेतलेल्या पुस्तकाचें सर्व प्रकारें गुणदोषविवेचन झालें. आतां सरतेशेवटीं प्रकृत नाटकांतील कांहीं स्थलांचें येथें अवतरण करून हा लेख आटपतों. या अवतरणांचें प्रयोजन येवढेंच आहे कीं, त्यांवरून सदरील भाषांतर कोणत्या शैलीनें केलें आहे, व मराठींत तें कसें उतरलें आहे, याची आमच्या सर्व वाचकांस परीक्षा करतां यावी.

---

१. वरील दोषांचीं उदाहरणें येणेंप्रमाणें—

( पृष्ठ ९ )—" हें ( कंकण ) मजकरतां तूं हातांत घाल."

( पृष्ठ ३५ )—" ते जेव्हां त्या रामपूरकराची थट्टा करतात, तेव्हां ती ऐकणें म्हणजे एक मोठी गंमत आहे."

( पृष्ठ ३८ )—" मी ही हकीकत बाबांच्या कानांवर घालतें, आणि त्यांना परक्या पुरुषानें येऊन असें अभद्र भाषण आपल्या मुलीशीं करावें हें आवडतें कां बघतें !"

( पृष्ठ १०५ )—" तो इंबीरराव, बेवकूब, कीं ज्यापाशीं चांगुलपणाचा एक लेशही सांपडावयाचा नाहीं."

( पृष्ठ ८ )—" नको गे प्रिये ! डोळ्यांला पुनः पाणी आणूं ! नाहीं तर तुला वाटेल हें हृदय बायकांपेक्षांही कोंवळें आहे."

( पृष्ठ १७ )—" अहो बाळासाहेब ! मीं इंबीररावास सुवर्णपुरास पाहिलें नाहीं असें नाहीं. त्या वेळीं तो होतकरू दिसत असे; आणि जसा त्याजविषयीं लोकांचा आज समज आहे, तशा प्रकारचा तो निघेल असें त्या वेळींही लोक म्हणत; परंतु मला मात्र कांहीं तसें वाटलें नाहीं. मला त्याचे गुण कळले नव्हते असें नाहीं. त्या वेळींच मला वाटे कीं, लोकांचा तर्क खोटा ठरेल."

( पृष्ठ २४ )—" असें बोलण्याचीही तुमची चाल असेल, परंतु मागें येणार नाहीं असें वाटतें."

( पृष्ठ ४५ )—यांत 'गजाऊ जवळच उभी आहे' असें प्रवेशारंभीं असून तारा तिला दूर असल्याप्रमाणें हाक मारते आहे.

( पृष्ठ ५३ )—यांत तारेच्या प्रवेशाच्या अगोदरच 'या पाहा बाईसाहेब आल्या,' असें दासी बोलते आहे.

( पृष्ठ ८८ )—यांत प्रवेशस्थल जामगांव असून तारा सदोबाला पुसते, 'अजूनही जामगांव किती दूर आहे ?'

( पृष्ठ ९० )—यांत तारेच्या भाषणाच्या अगोदर 'सावध होऊन' असे शब्द असणें जरूर होतें.

"(अंक २ प्रवेश ३.)

( खंडूजी पेटीच्या बाहेर येतो. )

**खंडूजी**—काय शांत वेळ ही! जिकडे तिकडे आतां सामसूम झालें आहे! दिवसाचा कामधंदा करून थकले भागले लोकांना गाढ झोंप लागली आहे! रातीचा किर्र शब्द ऐकूं येत आहे!—अशा मध्यरात्रीच्या सुमारास माझ्या मनांत दुष्ट विचार कसे घोळत आहेत!—ही पहा चंद्रानना पलंगावर निजली आहे.त्या पलंगाला तिजमुळें किती शोभा आली आहे! वा:! किती सुंदर ही कमलिनी! या कनकलतिकेला पाहून दिव्याची ज्योतिही मान डोलवीत आहे! तिचे नेत्र या वेळीं लागले आहेत, आणि म्हणूनच या दिव्याचा प्रकाश पडला आहे! तिच्या या गौरवर्ण शरीरावर ही हिरवी वेलबुटी कशी शोभत आहे! पण माझा उद्देश काय आणि मी हें काय बघत बसलों. मला महालांतील खाणाखुणा टिपून घ्यायाच्या आहेत. या या अमुक अमुक तसबिरी अमक्या ठिकाणीं टांगल्या आहेत. ही खिडकी या इकडल्या भिंतीला आहे. तिचा पलंग हा असा आहे. या भिंतीवर हीं चित्रें काढलीं आहेत; पण या असल्या दहा हजार गोष्टी लिहून घेण्यापेक्षां तिच्या शरीरावरची एखादी खूण लिहून घेतली तर माझ्या बोलण्यावर विश्वास पटेल. अहा निद्रे! या वेळीं तूं माझें किती सहाय्य करीत आहेस! असेंच आणखी थोडा वेळ कर! चल नीच कसें [ तिच्या हातांतील कंकण काढून घेतो. ] वा:! किती लवकर याचा फांसा निघाला तरी! या कंकणावरून इंबीररावाची खातरीच होईल. तिचा हा पदर अस्ताव्यस्त झाला आहे, म्हणून हा पहा तिच्या दोन स्तनांमध्यें असणारा तीळ चोळीच्या गांठीच्या वर दिसत आहे. माझ्या बोलण्याला याहून ज्यास्त प्रमाण कशाला पाहिजे? या तिळावरून त्याची खातरी होईल कीं, मीं कुलूप तोडून तिच्या पातिव्रत्याचें भांडार लुटलें! बस पुरें आहे. आतां अधिक टिपून घेण्याची काय जरूर? तीळ लिहून घेण्याची तर मुळींच जरूर नाहीं. तो कां मी आतां विसरेन? ती पांडवप्रताप वाचीत होती असें दिसतें. ही पहा येथें खूण घालून ठेवली आहे. दुर्योधनदु:शासनादि कौरवांनीं तिचा छळ आरंभिला आहे आणि सती द्रौपदी द्वारकाधीश कृष्णाचा धांवा करीत आहे, येथपर्यंत हिनें वाचलें आहे!—हे सति तारे! तुझाही मी असाच छळ करणार ना! मी मोठा पातकी! पण काय करूं? असो. माझें काम झालें. चला, आपण पेटींत जाऊन बसावें आणि झांकण लावून घ्यावें."

"(अंक २, प्रवेश ४.)

**खंडूजी**—तिचा महाल! वा:! काय त्याची शोभा! मी तेथें निजलों नाहीं, कबूल! पण असला सुंदर महाल पाहिल्यावर झोंप येते कसची? सर्व रात्रभर मी त्याची शोभा पहात बसलों होतों. भिंतींवरून चित्रें काढलीं होतीं, आणि त्यांवर मळ पडूं नये म्हणून किनखापाचे पडदे सोडले होते. एका भिंतीवर दधिसमुद्रांत शेषशायी नारायणाची मूर्ति काढली आहे. त्याच्या नाभिस्थळापासून कमलाचा देंठ निघून त्यावर चतुर्मुख ब्रह्मदेव चारी वेद हातांत घेऊन बसला आहे. पायच्याशीं कमलालया लक्ष्मी नारायणाचे पाय चुरीत आहे. उजव्या अंगाला गरुड हस्त जोडून उभा आहे, त्याला पाहून नागाची तारांबळ

उडाली आहे. पलीकडे सनकसनंदन नारायणाची लीला गात आहेत. काय त्या चित्रकाराचें कसब ! मूर्ति प्रत्यक्ष डोळ्यांसमोर उभी आहे असें वाटतें !"

"( कित्ता ) खंडूजी—महालाला दक्षिणेकडे दोन खिडक्या आहेत, त्यांच्या वरच्या अंगाला तसबिरी लटकावल्या आहेत. रावणानें अशोक वनांत सीतेला नेऊन ठेवलें आहे, आणि ती रामचंद्राच्या विरहानें एका अशोकवृक्षाखालीं सचिंत बसली आहे, आणि जवळच्या एका वृक्षावर हनूमान् बसला आहे, आणि रामनामांकित मुद्रा तिजजवळ टाकीत आहे, असें एका तसबिरींत दाखविलें आहे. या तरी चितान्याची खुबी मोठीच ! तसबीर पाहिली कीं त्या मूर्ति आपल्या समोर उभ्या आहेत, असा भास होतो !"

"( अंक २, प्रवेश ५. )

( हंबीरराव आपणाशीं बोलतो. )

हरहर !—पुरुष आणि स्त्री मिळून माझा देह झाला. तेव्हां यांतील कोणचा भाग बरें स्त्रीच्या अंशानें झाला आहे ? तो समजता तर मी या वेळेस छेदून टाकला असता ! कोणताही जरी दुर्गुण पुरुषांत आढळला तरी तो स्त्रीच्या अंशापासूनच आहे यांत संशय नाहीं ! अनृत, अविनय, साहस, माया, मूर्खत्व, अतिलोभ, कपट, चांचल्य, परनिंदाप्रीति, हे सर्व दोष जात्याच स्त्रियांत असतात, आणि त्यांच्यापासूनच पुरुषांस प्राप्त होतात. स्त्रिया जगांतून नाहींशा होत्या तर बरें झालें असतें ! काय स्त्रियांचें धाडस ! समुद्राच्या लहरींप्रमाणें यांचा स्वभाव चंचल ! यांची प्रीति तर संध्याकाळच्या ढगांवरील तांबड्या छट्यांप्रमाणें क्षणिक ! आज हा, उद्यां तो, परवां तिसरा, असा यांचा क्रम ! एकावर कधीं यांचें प्रेम असणार आहे काय ? बघतील एकाकडे, बोलतील एकाशीं, आणि प्रेम असेल कदाचित् तिसऱ्यावरच ! धिक्कार असो यांच्या जातीला ! ब्रह्मदेवानें स्त्रीजाति निर्माण केली नसती तर खचितच नरकपुरी ओस पडली असती !—हे षडानना कार्तिकेया ! तूं मोठा शहाणा ! तुला मात्र यांचें कपट कळलें. बाकीचे सर्व देव स्त्रीपाशांत गुंतले ! बरें आहे. स्त्रियांचें तोंड पहावयाचें नाहीं हा कृतनिश्चय ! सांपडतील तेथें त्यांचा वध करावा ! आं—पण नाहीं करूं ! आपआपल्या हातानींच त्या करून घेत आहेत, तेव्हां आपण तरी उगी कशास दोषी व्हावें ? [जातो.]"

# इंग्रेजी भाषा.

गीर्वाणवाणीषु विशिष्टबुद्धिस्तथापि भाषान्तरलोलुपोऽहम् ।
यथा सुराणां सुधयां च सत्यां स्वर्गाङ्गनानामधरासवे रुचिः ॥[1]

अंक २८—(१) विषयोपक्षेप. (२) प्रस्तुत विषयाचा उपयोग. (३) इंग्रेजी भाषेची उत्पत्ति. (४) तिचे घटकावयव. (५) इंग्रेजी भाषेंतील ग्रंथसंग्रह. (६) गद्यात्मक ग्रंथांची प्रवृत्ति. (७) तिची सुधारणा. (८) गद्याचे प्रकार. (९) निबंध. (१०) त्रैमासिकें. (११) मेकॉले.

१. वरील विषयाचें नांव वाचून आमच्या वाचकांस बहुधा मोठा संदेह उत्पन्न होणारा आहे. 'इंग्रेजी भाषा' ह्मणजे काय ?—यांत ती भाषा उत्पन्न कशी झाली, तिची उत्तरोत्तर अभिवृद्धि होत जाऊन ती सांप्रतच्या स्थितीला कशी पोंचली, तींत गुणदोष कोणते आहेत, याविषयीं विवेचन करायाचें; कीं तींत ग्रंथसंग्रह कसा आहे, त्याची सांप्रतची स्थिति त्यास प्राप्त होण्यास काय कारणें झालीं, याविषयीं लिहायाचें; कीं आपल्या देशांत वरील भाषेचा पुष्कळ फैलावा झाल्यानें कोणते फेरफार झाले,व पुढें कोणतें स्थित्यंतर होण्याचा संभव आहे, याविषयीं विचार करायाचा ? याप्रमाणें वरील शब्द वाचतांच निरनिराळ्या कल्पना वाचकांच्या मनांत उभ्या राहिल्यावांचून राहणार नाहींत. आणि खरोखरी पाहतां प्रस्तुत विषय विस्तीर्ण असल्यामुळें त्याचें विवेचन अनेक प्रकारांनीं व्हावें असाच तो आहे. प्रस्तुत निबंधांत वरील सर्व गोष्टींचा विस्तारेंकरून विचार करायाचा नाहीं. इंग्रेजी भाषेची उत्पत्ति व रचना यांविषयीं प्रथमतः सांगून मुख्यत्वेंकरून तिच्या ग्रंथसंग्रहाविषयीं वाचकांस थोडी-बहुत माहिती करून देण्याचा आमचा विचार आहे. सवड राहिल्यास शेवटल्या गोष्टीच्या संबंधानें म्हणजे इंग्रेजी भाषा इकडे फैलावल्यापासून कोणते फेरफार झाले आहेत याविषयींही कांहीं विचार प्रकट करूं.

२. इंग्रेजी भाषा उत्तरोत्तर कशी उत्कर्ष पावत गेली, तींत ग्रंथसंग्रह कोणत्या प्रकारचा आहे व तो कसकसा वाढत गेला, वगैरे गोष्टींचें ज्ञान एतद्देशीय लोकांस चांगलें होणें अवश्य आहे. तें असें कीं त्याच्या योगानें देशभाषा सुधारण्याचा हल्लीं जो थोडाबहुत यत्न चोहोंकडे सुरू आहे तो सफल होण्यास काय केलें पाहिजे, भाषा सुधारत जाते ती कोणत्या क्रमानें जाते, वगैरे गोष्टींचें ज्ञान वरील निरूपणानें त्यांस होईल. शिवाय हा माहितीचा व मनोरंजनाचाही विषय असल्यामुळें सामान्यतः सर्वांस इष्ट वाटण्यासारखा आहे.

३. आतां प्रथमतः इंग्रेजी भाषेची उत्पत्ति. अर्वाचीन भाषाभिज्ञांनीं साऱ्या भाषांच्या दोन शाखा कल्पिल्या आहेत. त्यांतील पहिली जी आर्यशाखा तिजपासून इंग्रेजी भाषेची

---

१. गीर्वाण भाषेला जरी मी विशेष मान देतों; तरी इतर भाषांविषयीं मला उत्कंठा वाटते. कशी ? तर ज्याप्रमाणें देवांस प्राशन करण्यास अमृत असतांही स्वर्गांगनांच्या अधरमधूविषयीं ते लालस असतात !

परंपरया उत्पत्ति झाली आहे.[१] ती अशी कीं, वरील शाखेंत येणारी जी जर्मन् भाषा तिचा पोटभेद सॅक्सन् भाषा; आणि तिचा भेद जी अँग्लोसॅक्सन् म्हणजे इंग्लंडांतील सॅक्सन् भाषा ती इंग्रेजीची मूळ भाषा होय. इंग्लिश् भाषेंतील अगदीं मूळचे साधे शब्द व तिची रचना हीं सारी वरील भाषेंतील होत. मराठीस मूळ जशी संस्कृतापासून उत्पन्न झालेली बालभाषा तशीच प्रस्तुत भाषेस वरील भाषा होय. इंग्लंडाचे मूळचे राहणारे जे ब्रिटन् लोक त्यांची भाषा सेल्टिक् ही होती. तिचा आतां त्या देशांत फारसा मागमूसही राहिला नाहीं. रोमन् लोक निघून गेल्यावर सहाव्या शतकांत सॅक्सन् लोक इंग्लंडांत येऊन त्यांनीं हळू हळू सगळा देश काबीज केला; आणि आपली भाषा व कायदेकानू हीं चोहोंकडे चालू केलीं. या दोहोंची स्थापना त्या देशांत इतकी दृढ होऊन गेली कीं, त्याच्या मूळच्या स्थितीचा पुढें मागमूसही उरला नाहीं. सॅक्सन् लोकांच्या पुढें नॉर्मन् लोक आले. हे फ्रान्स देशांतील उत्तरप्रांत नॉर्मंडी म्हणून होता तेथें वसाहत करून राहिले होते. यांचा राजा विलियम् जो 'विजयी' या उपपदानें प्रसिद्ध आहे, त्यानें सन १०६६ त इंग्लंडावर स्वारी केली; आणि सॅक्सन् लोकांचा मोड करून चोहोंकडे आपला अंमल बसवला. पुढें सुमारें दोनशें वर्षेपर्यंत राज्यकर्ते जे नॉर्मन् लोक त्यांचा आणि प्रजा झालेले सॅक्सन् लोक यांचा परस्पर दुजाभावच वागत असल्यामुळें दोन्ही राष्ट्रांच्या भाषा भिन्न भिन्नच होत्या[२]. पण सुमारें तिसऱ्या हेन्‌री राजाच्या कारकिर्दीच्या अखेरीपासून वरील दोन्ही भाषा एकवट होऊन हल्लीं जीस इंग्रेजी म्हणतात ती बनत चालली. तर याप्रमाणें प्रस्तुत भाषा ही वरील दोहोंची भेसळ होऊन उत्पन्न झाली आहे.

४. गेल्या सहाशें वर्षांत इंग्रेजींत आणखी पुष्कळच फेरफार झाले. त्यांत मोठा

---

१ वरील दोन शाखा एरियन् म्हणजे आर्य, व सेमेटिक् या होत. पहिल्या शाखेचे आठ मोठमोठे भेद आहेत. ते संस्कृत, इराणी, ग्रीक्, इटालियन्, जर्मन् इत्यादि होत. या शेवटल्या उपशाखेपासून इंग्लिश् भाषेची उत्पत्ति आहे हें वर सांगितलेंच आहे. दुसऱ्या शाखेंत अरबी, चिनी, जपानी, या भाषांचा अंतर्भाव होतो. हें भाषाशास्त्र या शतकांत पुष्कळ पूर्ण दशेस आलें आहे. असें होण्यास संस्कृत भाषेचा शोध लागला हेंच मुख्य कारण होय. असो; या शास्त्राच्या योगानें मनुष्य-जातीच्या अत्यंत प्राचीन इतिहासाची एक मोठी गोष्ट अगदीं निर्विवाद सिद्ध होते. ती ही कीं, युरोपांतील बहुतेक राष्ट्रें व इकडचे हिंदु, इराणी वगैरे लोक हे पूर्वी एकत्र असून एकच भाषा बोलत होते. पण पुढें सर्वांची फूट केव्हां व कशी झाली असेल याचा आज कांहींच पत्ता लागत नाहीं! 'पवित्र शास्त्र' जर खरें असेल, तर बेबलच्या बुरुजाची* जी चमत्कारिक हकीकत झाली ती वरील गोष्टीचें कारण मानणें भाग पडेल.

* मागें पृष्ठ ४२१ वर* Tower of Babel ही टीप पाहा. 'सम्पादक'

२. नॉर्मन् लोकांच्या मनांत सॅक्सन् लोकांविषयीं अत्यंत तिरस्कार वागत असे, व सॅक्सन् लोकही जरी हतवीर्य झाले होते तरी आपल्या पूर्वीच्या वैभवाच्या स्मरणामुळें त्यांशीं वांकूनच राहत असत हें वरील भिन्नभावाचें मुख्य कारण होतें. या वेळची स्थिति स्कॉटच्या 'ऐव्हॅनो' नामक कादं-बरींत अगदीं हुबेहुब दाखवली आहे. हा ग्रंथ वाचीत असतां हिंदुस्थानच्या सध्यांच्या स्थितीचें सादृश्य जेथें तेथें पूर्णपणें मनांत येतें.

ह्मटला ह्मणजे ग्रीक् व लॅटिन् या भाषांनीं तिजवर झालेला संस्कार होय. इंग्लंडांत नवव्या शतकांत ख्रिस्ती धर्म प्रवृत्त होऊन रोमच्या पाद्री लोकांचें माहात्म्य चोहोंकडे जसजसें वाढत चाललें, तसतसे वरील अभियुक्त भाषांतले शब्द लोकभाषेंत थोडथोडे मिसळत चालले होतेच; पण त्यांच्या योगानें भाषेंत ह्मणण्यासारखा फेरफार कांहींच झाला नाहीं. तो सोळाव्या शतकांत पूर्णपणें झाला. रूमशामचें * राज्य तुर्क लोकांच्या हातीं लागल्यामुळें लॅटिन् व ग्रीक् विद्येच्या गुरूंनीं देशत्याग करून युरोपांत ठिकाठिकाणीं जेव्हां वसाहत केली, व त्या विद्येचा स्वोपजीवनार्थ प्रसार मांडला, तेव्हां चोहोंकडे वरील दोन भाषांचें पुनरुज्जीवन झाल्यासारखें झालें. त्याच्या योगानें साऱ्या युरोपियन् भाषा सुधारणेच्या पंथास लागून लोकस्थितींतही अनेक फेरफार झाले.[1] तोच प्रकार इंग्लंडांत घडून आला. सर्व लोक लॅटिन् व ग्रीक् या भाषांचा मोठ्या आस्थेनें अभ्यास करायास लागून कित्येकांनी तर त्यांत अत्यंत निपुणता संपादन केली. वरील भाषांचा अभ्यास अद्यपही साऱ्या युरोपाप्रमाणें इंग्लंडांत चालू आहेच; तरी तो आतां पहिल्यासारखा नाहीं; असो; तर वरील भाषांची जेव्हां इंग्लंडांत प्रवृत्ति पडली, तेव्हां त्या भाषांतील हजारों शब्द इंग्रेजी भाषेंत आले, व त्यांची ढबही पुष्कळ अंशीं या भाषेस लागली. अलीकडे दहा वीस वर्षांत संस्कृताचा अभ्यास वाढल्यानें महाराष्ट्रभाषेंत जसा फेरफार होत चालला आहे व त्या भाषेचा या दुसऱ्या भाषेस जसा उपयोग होत आहे; तसेंच इंग्रेजी भाषेसही झालें. तीस प्रौढता व सरसता आणण्यास वरील दोन प्राचीन भाषा कारण झाल्या; आणि शिवाय शास्त्रीय परिभाषा पूर्वींची आयती घेण्यास व नवी बनवतां येण्यास त्यांचा फारच उपयोग झाला.

---

* Jerusalem. महंमदी धर्म प्रसार पावूं लागल्यावर, इ. स. ६३७ सालीं उमर (Omar) नामक खलिफानें जरुसलेम्‌वर हल्ला करून तें काबीज केलें. तथापि उमरनें आपल्या सैन्यास अत्याचार, लूट वगैरे करूं न देतां सौम्य वर्तन केलें. त्यानें तेथील देवालयाजवळ एक लांकडी मशीद उभारली. तेथेंच अमीर अबदलमलेख यानें आक्सा (Aksa) ची मशीद व शिवाय ६८८ सालीं उमरचीहि मशीद बांधली. जेरुसलेम् मुसलमानांच्या ताब्यांत इ. स. १०९९ पर्यंत राहिलें. ११८७ पर्यंत तें फिरून क्रूसेडर्सच्या ताब्यांत होतें. त्या सालीं सलादिनानें तें फिरून जिंकलें आणि तेव्हांपासून १२२९–३९ व १२४३–४४ या दहा पंधरा वर्षांपुरता अपवाद सोडून दिल्यास जेरुसलेम् मुसलमानांच्याच ताब्यांत आहे. 'सम्पादक'

१. या फेरफारांपैकीं सर्वांत मोठा महत्त्वाचा ह्मटला ह्मणजे जर्मनी देशांत उत्पन्न होऊन साऱ्या खंडभर पसरलेली धर्मक्रांति† होय. वरील विद्याप्रसारानें धर्मांतराचा प्रकार कसा उद्भवला हें अंमळ विचार केला असतां सहज समजणार आहे. विद्येच्या योगानें मनुष्यास खऱ्या खोट्याचें ज्ञान होऊं लागतें; तें झालें असतां खोट्या धर्मांचें बंड बाहेर फुटून लोकांची श्रद्धा उडते हें सहजच आहे.

† Reformation रेफॉर्मेशन् नामक सोळाव्या शतकांतील मोठी धार्मिक चळवळ. पंधराव्या शतकांत वुइक्लिफ् (Wycliffe) प्रभृति लोकांनीं 'सूत उवाच' करून ठेवलेंच होतें. पुढें जर्मनींत ल्यूथर् (Luther) व स्वित्झर्लंडांत झ्विंग्ली (Zwingli) यांनीं पुढाकार घेतल्यावर या क्रांतिकारक पंथाची वाढ झपाट्यानें सुरू झाली. ल्यूथर्‌ला फार हालअपेष्टा सोसाव्या लागल्या. पण अखेर प्रॉटेस्टँटिझम् (Protestantism) चा विजय झाला. 'सम्पादक'

वरील दोहोंशिवाय आलीकडे आणखी दोन भाषांचाही इंग्रेजीशीं संयोग झाला आहे. तो फ्रेंच् व जर्मन् भाषांचा होय. या भाषा इंग्रेजीच्या बरोबरच प्राचीन भाषांच्या संसर्गानें वाढत जाऊन कालेंकरून त्यांत मोठमोठे ग्रंथ होत गेले. वास्तव इंग्रेजी विद्येचा जसा युरोपभर प्रसार झाला तसा युरोपांतील विद्येचाही इंग्लंडांत प्रवेश होऊन वरील भाषांचा संसर्ग इंग्रेजीस घडला. तो दिवसांदिवस अधिकाधिक दृढही होत चालला आहे.

याखेरीज नुसत्या शब्दांच्याच संबंधानें पाहिलें तर व्यापाराच्या वगैरे संबंधानें ज्या भाषेचे शब्द इंग्रेजींत आले नाहींत अशी भाषा साऱ्या पृथ्वीवर थोडीच असेल.

५. याप्रमाणें प्रस्तुत भाषेच्या उत्पत्तीविषयीं व तिच्या घटकावयवांविषयीं निरूपण झालें. आतां तींत जो ग्रंथसंग्रह आहे त्याविषयीं लिहूं.

कोणत्याही राष्ट्राची अज्ञानावस्था संपत येऊन त्याच्या सज्ञान दशेस जेव्हां आरंभ होतो, तेव्हां त्याच्या बुद्धीचा प्रथम विकास पाहिला असतां नेहेमी कवितारूप दृष्टीस पडतो. या सामान्य नियमाप्रमाणें इंग्लंडांतही सर्वसाधारण भाषा चालू होऊन तीस स्थैर्य येतांच कवितेचा प्रादुर्भाव झाला. हा पहिला कवि चॉसर्* होय. हा तिसऱ्या एड्वर्ड् राजाच्या वेळेस ह्मणजे चवदाव्या शतकाच्या उत्तरार्धांत झाला. याच्या काव्यांत जी भाषा आढळते ती आपल्या 'ज्ञानेश्वरी' ग्रंथाच्या सारखी अगदीं जुनाट व अप्रसिद्ध आहे; व यामुळेंच या कवीची प्रसिद्धि जरी आजपर्यंत अबाधित चालत आली आहे, तरी त्याच्या ग्रंथांचा प्रचार ह्मणण्यासारखा नाहीं. हीच गोष्ट त्याच्या पुढें झालेला जो स्पेन्सर्‡ त्यासही प्रायः लागते. या दोघां कवींचें अध्ययन भाषाभिज्ञ लोक जितकें करतात तितकें रसिक करीत नाहींत. असो; या दोघांपुढला अत्यंत विख्यात कवि ह्मटला ह्मणजे शेक्सपीयर$ होय. हा स्पेन्सर्च्या वेळींच, ह्मणजे एलिझाबेथ् राणीच्या कारकिर्दींतच, उदयास आला. पण याची भाषा

---

* Geoffrey Chaucer (इ. स. १३४०–१४००) इंग्रेजी पद्यवाङ्मयाचा जनक. याच्या 'Canterbury Tales' कँटरबरी टेल्समुळें याची कीर्ति अजरामर झाली. या गोष्टींमध्यें तत्कालीन आयुष्यक्रम व व्यक्ति यांचें आत्यंतिक हृदयंगम व हुबेहुब वर्णन केलेलें आहे. मृत्यूनंतर याला 'Westminster Abbey' मध्यें पुरण्यांत आलें. 'सम्पादक'

‡ Edmund Spencer (१५५३–१५९९). 'Shepherd's Calender' आणि 'Faerie Queen' चा कर्ता. 'सम्पादक'

$ William Shakespeare. (१५६४–१६१६) अप्रतिम इंग्रेजी नाटककार व कवि. यानें अठराव्या वर्षी आपल्याहून आठ वर्षांनीं मोठया Anne Hathaway नामक बाईशीं लग्न केलें. १५९३ सालीं याच्या काव्याला प्रारंभ झाला. पुढें लवकरच हा (Globe Theatre) 'ग्लोब' नाटकगृहाचा मालक झाला. व नंतर जगाला आश्चर्यानें तोंडांत बोट घालावयास लावणारीं नाटकें यानें लिहिलीं. या नाटकांवर त्यानें इतकी कमाई केली कीं आपल्या जन्मगांवीं (Stratford येथें) त्यानें इस्टेट खरेदी केली व १६१०–१२ च्या सुमारास व्यवसाय सोडून परत आला तो आपल्या मालकीच्या घरांत राहण्यास! याचीं एकंदर पसतीस नाटकें आहेत. शिवाय (Sonnets) 'सॉनेट्स' नामक प्रकारच्या कवितांचा एक खंड यानें लिहिला असून तोहि त्याच्या कीर्तीस साजेसाच आहे. 'सम्पादक'

वरील दोघां कवींच्या सारखी जुनाट नसल्यामुळें त्यांच्या ग्रंथांचा प्रचार अद्याप सार्वलौकिक आहे. शिवाय वरील ग्रंथांचा विषय मनोरंजनावह असून त्यांच्या रचनेंत वरील कवीनें आपली आश्चर्यकारक बुद्धि खर्चली आहे हेंही वरील गोष्टीचें एक मोठें कारण आहे हें सर्वांस माहीत आहेच. असो; तर इंग्रेजी कवींत सर्वमान्यतेस चढलेले जे कित्येक कवि आहेत त्या सर्वांत योग्यतेनें व कालानें पहिला असा शेक्सपीयर होय. याच्या वेळेपासून आज सुमारें तीनशें वर्षे इंग्लंडांत कवितेचा सारखा उत्कर्षच चालला आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं. या शतकांतच जे मोठमोठे कवि निपजले त्यांपैकीं कित्येक नुकते नुकतेच निवर्तले असून अद्यापही कवित्वाच्या ओघास अगदीं खळच पडला आहे असें नाहीं. आतां हा सारा विस्तीर्ण विषय प्रस्तुत विवेचनांतच येण्यासारखा आहे; तथापि तूर्त त्याचा बऱ्याइतकाच येथें निर्देश करून ठेवतों. तो अत्यंत महत्त्वाचा आहे, यास्तव पुढें एकादे खेपेस त्याचें पृथक्त्वेंकरून विवरण करूं. याच अंकांत त्याचें व प्रस्तुत विषयाच्या इतर भागांचें यथास्थित निरूपण होणें अशक्य आहे. यास्तव कवितेचा ह्मणजे पद्यात्मक ग्रंथसंग्रहाचा भाग सध्यां निराळा ठेवून गद्यात्मक ग्रंथांविषयींच विवरण करतों.

६. भाषेंत गद्य ग्रंथांचा प्रचार सुरू होणें हें लोकसुधारणुकेचें एक मोठें चिन्ह आहे. कारण पद्यरचना सोडून देऊन गद्याकडे जेव्हां लोकांचा कल होतो, तेव्हां केवळ मनोरंजन करणाऱ्या विषयांहून अधिक योग्यतेच्या विषयांकडे त्यांचीं मनें प्रवृत्त झालीं असें दिसून येतें. गद्यांत जो विषय लिहायाचा तो अर्थातच शास्त्रीय वगैरे असायाचा. तो छंदांत रचणें केवळ अप्रयोजक असून सर्वांस सरळ रीतीनें समजण्याकरतां अर्थातच व्यावहारिक भाषेनें लिहावा लागतो. तेव्हां ही दुसरी रीत पडणें हें राष्ट्राच्या सज्ञान अवस्थेचें विशेष सूचक होय हें उघड आहे. इंग्रेजी भाषेंत हा गद्याचा प्रघात विशेष ह्मणण्यासारखा झटला ह्मणजे सुमारें एलिझाबेथ्च्या कारकिर्दीपासून सुरू झाला आहे. मागें सांगितलें आहे कीं, पंधराव्या शतकाच्या उत्तरार्धांत प्राचीन ग्रीक् व रोमन् लोकांच्या ग्रंथांचें अध्ययन सार्वत्रिक झाल्यामुळें सगळें युरोपखंड अज्ञाननिद्रेंतून जागें होऊं लागलें. तर तोच प्रकार इंग्लंडांतही घडून येऊन बेकन्, हूकर् * अशांसारखे मोठमोठे ग्रंथकार निपजले, व त्यांनीं गद्याची प्रवृत्ति पाडून स्वभाषेच्या अभिवृद्धीस आरंभ केला. हाच क्रम वरील राणीच्या राज्यानंतरही चालून अनेक नामांकित ग्रंथकारांनीं इंग्रेजींत गद्यरचना केली; व नाना प्रकारच्या विषयांवर मोठमोठे ग्रंथ लिहिले, तरी सांप्रत प्रकारास खरी शोभा आणून तो सर्वजनांस मान्य होईसा करणें व भाषेस व्यवस्थितपणा व नियमितपणा आणणें हें काम पुढील काळींच झालें. तें कसें तें पुढें सांगतों.

७. इंग्रेजी भाषेचें सध्यां जें प्रौढ व मनोवेधक रूप दृष्टीस पडत आहे त्यास आरंभ

---

* **Richard Hooker (1554–1600).** याची शब्दांची निवड इतकी अप्रतिम असे कीं, हा ज्युडिशिअस् (**Judicious**) ऊर्फ विवेकशाली हूकर् ह्मणून प्रसिद्ध झाला. **Ecclesiastical Polity** हा याचा प्रमुख ग्रंथ होय. 'सम्पादक'

पाहिला असतां गेल्या शतकापासून झाला असें दिसून येईल. ड्रायडन्, टेंपल्, आडिसन् याच्या पूर्वी इंग्रजींत गद्य लिहिणारे मोठमोठे नामांकित ग्रंथकार होऊन गेले नाहींत असें नाहीं; पण वरील ग्रंथकारांनीं व त्यांच्या पुढें जे झाले त्यांनीं तींत मोठी सुधारणा केली हें निर्विवाद आहे. सोळाव्या शतकांत मोठमोठे कवि व महान् महान् ग्रंथकार होऊन गेले हें खरें; पण त्यांच्या भाषेंत मार्दवादि गुण तादृश नसून व्याकरणाची वगैरेही चांगलीशी व्यवस्था नसे. उदाहरणार्थ कवितेंत शेक्स्पीयर व मिल्टन् हे घ्या; व गद्यांत बेकन्चे ग्रंथ पाहा. वरील दोघां कवींच्या कृति इंग्लंडांत, किंबहुना साऱ्या जगांत सर्वमान्यतेस पात्र झाल्या आहेत; पण कोणी सामान्य मनुष्य घेतला तर पोपची किंवा गोल्ड्स्मिथ्ची कविता त्यास जितकी पसंत पडेल, तितकें 'मॅक्बेथ्' नाटक किंवा 'पॅराडैज लॉस्ट्' हें पडणार नाहीं. त्याप्रमाणेंच बेकन्च्या ग्रंथांची गोष्ट. त्यांची प्रशंसा ज्याच्या त्याच्या तोंडून ऐकूं येईल; पण त्यांचें प्रेमपूर्वक अध्ययन करणारा थोडाच मनुष्य सांपडेल.[1] तर याचें कारण काय बरें? अर्थातच हें कीं, वाचकांस ज्या गुणांच्या योगानें चटका लागतो ते गुण वरील ग्रंथकारांत कमी. त्यांनीं आपल्या ग्रंथांतून आपल्या विशाल बुद्धीचा परिपाक ओतून दिला आहे यास्तव त्यांस आजपर्यंत जसा मान मिळाला,

---

१. शेक्स्पीयर कवीच्या अद्भुत कवित्वाविषयीं जरी कोणी संशय घेणार नाहीं, तरी त्याचें माहात्म्य त्याच्या देशबांधवांनीं अतिशय वाढविलें आहे असें वाटल्यावांचून राहवत नाहीं. नुकत्या निवर्तलेल्या मिल्च्या 'स्वरचित चरित्रां'त त्यानें आपल्या बापाविषयीं लिहिलेला हा मजकूर आढळतो—

"My father never was a great admirer of Shakespeare, the English idolatry of whom he used to attack with some severity."

याप्रमाणेंच जॉन्सन्, बायरन् वगैरे कित्येक ग्रंथकारांचेंही मत होतें. खुद्द ड्रायडन्* यास सुद्धां असें कबूल करावें लागलें—

"I cannot say he is everywhere alike. Were he so, I should do him injury to compare him to the greatest of mankind. He is many times flat and insipid, his comic wit degenerating into clinches, his serious swelling into bombast."

[* ड्रायडन् (John Dryden) १६३१-१७००. गद्य, पद्य व नाट्य या तिन्ही प्रांतांत व विशेषतः उपहासपर लेखनांत (Satire) याचा हातखंडा असे. गद्यलेखनांत याचा प्रमुख उद्योग म्हणजे ग्रंथपरीक्षण. कांहीं समकालीन मुत्सद्यांचीं अप्रतिम शब्दचित्रें यानें काढलीं असून पोपच्या 'इलियड्'च्या भाषांतराप्रमाणें याचें 'व्हर्जिल्'चें भाषांतरहि अप्रतिम साधलें आहे. 'सम्पादक']

मेकॉले साहेबांनीं एके प्रसंगीं इंग्लंड्चा राजा तिसरा जॉर्ज याचा प्रस्तुत कवीविषयीं एक उद्गार दाखल केला आहे—

"But was there ever," he cried, "such stuff as great part of Shakespeare? *Only one must not say so.* But what think you? What? Is there not sad stuff? What? What?"

*Madame D' Arblay.*

(पुढें चालू)

येवेबहुना ते सर्वांस पूज्य होऊन बसले; तसाच क्रम पुढें सारखा चालेल यांत संदेह नाहीं; पण वरील पूज्यतेच्या मानानेंच लोकप्रियतेचें मान त्यांचें कमी समजलें पाहिजे. या दोन्ही गुणांचें सामानाधिकरण्य होण्याची योग्यता इंग्रजी भाषेंत जी आली ती वर सांगितल्याप्रमाणें अठराव्या शतकांत आली. या शतकाच्या आरंभींच आडिसनचें 'स्पेक्टेटर्'† पत्र आठवड्यांतून तीनदां निघूं लागून सामान्य लोकांस विद्यानंदाची अनुभव घेण्याचें उत्कृष्ट साधन तयार झालें; व त्याबरोबरच इंग्लिश् भाषेचा पूर्वींचा जो कर्कशपणा व अनियमितपणा होता तो हळू हळू मोडूं लागून तिचे ठायीं जनमनोवेधकत्व हा गुण अधिकाधिक येऊं लागला. वरील पत्र दोन तीन वर्षें चालून पुढें बंद झालें; तरी तितक्या काळांत त्याच्या योगानें भाषेस व लोकांस पुष्कळ उपयोग झाला; त्याचा प्रचार तिन्ही देशांत होऊन लोकांस विद्येची अभिरुचि लागली.[1] 'स्पेक्टेटर्' च्या पुढें त्याच्या सारखीं पत्रें दुसरीं पुष्कळ चालू झालीं; व त्यांच्या योगेंकरून लोकांचें व भाषेचें हित थोडेंबहुत झालेंच. पण त्यांत विशेष गुण नसल्यामुळें त्यांची प्रसिद्धि स्वल्पच राहिली होऊन आतां त्यांचीं नांवेंही कोणास माहीत नाहींशीं झालीं आहेत. आडिसनच्या पुढें त्यासारखा नामांकित निबंधकार म्हटला म्हणजे जॉन्सन् हा झाला. या महापंडिताचे इंग्रजी भाषेवर पुष्कळ उपकार आहेत. त्यांत सर्वांत मोठा म्हटला म्हणजे हा कीं, त्यानें कोशरचना करून तीस आळ्यांत आणण्याचा प्रचंड उद्योग आरंभून तो एकट्यानें शेवटास नेला. याच्या पूर्वी इंग्रजींत किती प्रकारचा गोंधळ होता, याचें त्यानेंच आपल्या कोशाच्या

---

वरील राजोक्ति निबंधकारानें केवळ उपहासार्थ दाखल केली आहे. म्हणजे तिसरा जॉर्ज राजा म्हणजे मोठा पंडित होता असा अर्थ नाहीं; तरी त्याचें वरील मत सर्वथा अयथार्थच आहे असें म्हणवत नाहीं.

मिल्टन्च्या काव्याविषयींही कोणा ग्रंथकारानें असें म्हटलें आहे कीं, त्याच्या आवृत्तीवर आवृत्ति मोठ्या झपाट्यानें निघत आहेत, व पुस्तकालयें भूषित करताहेत हें खरें; पण त्याच्या वाचण्याचा प्रघात तितकाच आढळतो.

बेकन्‌विषयीं तसेंच मेकॉलेनें लिहिलें आहे—

"It is by the *Essays* that Bacon is best known to the multitude. The *Novum Organum* and *De Augmentis* are much talked of, but little read......"

*Lord Bacon.*

† Spectator—सम्पादक ॲडिसन् (Addison). प्रारंभ १ मार्च १७११, शेवट २० डिसेंबर १७१४. स्टील् (Steele) हा दुय्यम सम्पादक होता. याच नांवाचें आणखी एक समाचारपत्र (Review) लंडन् येथें १८२८ सालीं सुरू झालें, तें फार उत्तम दर्जाचें होतें.

'सम्पादक'

१. वरील पत्र घरोघर सकाळच्या न्याहारीच्या वेळेस सर्वांस वाचायास मिळत असे. त्याचा खप लवकरच दोन तीन हजारांवर गेला. या वेळची एकंदर लोकांची स्थिति पुष्कळ अंशीं येथल्यासारखीच होती. 'स्पेक्टेटर् पत्रानें इंग्लिश लोकांस वाचायास शिकवलें' असें सुद्धां कित्येकांनीं म्हटलें आहे.

प्रस्तावनेंत सुरस वर्णन केलें आहे. ही अव्यवस्था जॉन्सन्नें दोन प्रकारांनीं मोडली, अशी कीं, आपल्या कोशांत त्यानें होण्यासारखी होती तेवढी व्यवस्था करून ते नियम आपल्या स्वतःच्या ग्रंथांच्या द्वारें पुनः चांगले स्थापित केले. असो; जॉन्सन्च्या निबंधांचें नांव 'रँब्लर्'‡ व 'ऐड्लर्'. या निबंधांची पद्धति वरच्या 'स्पेक्टेटरा'हून सर्व प्रकारें निराळी होती. 'स्पेक्टेटरां'त नाटकें, तमाशे,[१] बायकांचे पेहराव, नवराबायकांचीं भांडणें, भावी वधुवरांच्या गांधर्व प्रकार, लंडन् शहरांतल्या मेवामिठाई विकणाऱ्या फिरस्त्या लोकांचे निरानिराळे शब्द, अशा प्रकारच्या विषयांवरच बहुतकरून मजकूर असे; व त्या वेळच्या चैनी व रिकाम्या लोकांस आवडण्यासारखा तोच होता. मधून मधून काव्य-नाटकादिकांविषयीं विवेचन किंवा शास्त्रीय विषयांवर गहन विवरण, हे प्रकार वरील पत्रांत असत; व दर शनिवारीं पुढील दिवशीं वाचण्याकरतां धर्माच्या किंवा अध्यात्म-विद्येच्या विषयावर एक उत्कृष्ट निबंध असे. पण एरवींचा सामान्य प्रकार म्हटला म्हणजे वरीलच होय. तशीच 'स्पेक्टेटरां'तली भाषापद्धतिही वरील विषयांस अनुसरूनच असे. म्हणजे नेहेमीची व्यावहारिक भाषाच योजिली असून प्रौढ व कठिण शब्द फारकरून मुळींच नसत. पण जॉन्सन्च्या वरील निबंधांत हे दोन्ही प्रकार अगदीं भिन्न आहेत. 'स्पेक्टेटरांत' जे विषय कधींमधीं यावयाचे तेच त्यांत नेहेमी असून बायकांविषयीं व नटण्यामुरडण्याविषयीं तर त्यांत अक्षरही नाहीं. एक तर मध्यंतरीं गेलेलीं जीं चाळीस वर्षें त्यांत लोकांचें ज्ञान बरेंच वाढल्यामुळें पूर्वीप्रमाणें केवळ ख्यालीखुशालीच्या व मौजेच्या

---

‡ The Rambler हें द्वि-साप्ताहिक होतें. 'सम्पादक'

१. वरील नांव इंग्लंडांत 'ऑपरा' नांवाचे जे खेळ होतात त्यांस आम्हीं दिलें आहे. वरील 'ऑपरा' हा सभ्य रीतीचा तमाशाच म्हटला असतां चालणार आहे. यांतील गुणदोषांचें विवेचन 'स्पेक्टेटरां'त जागोजाग आढळतें. विलायतेंत हीं जीं अनेक प्रकारचीं सुधारलेलीं ढंगें आहेत तीं पहिल्या प्रथम पाहिलीं असतां अर्ध्या मुर्ध्या रानटी लोकांच्या मनावर काय व्यापार वहतो तो पुढील उताऱ्यावरून कांहीं लक्षांत येईल—

एक मुनशी विलायतेस गेला होता तो 'ऑपरा'विषयीं लिहितो—

"At half-past eight the curtain was pulled up, and two very handsome ladies, very *indecently* dressed, and an old man, representing their father, appeared on the stage. They sang, I fancy, some historical ballad in conjunction with instrumental music, and danced very expertly. Whilst the females whirled round in their dancing, their short gowns flew up to the forbidden height! Tantalizing the assembly, it appears, was their principal aim, by such a violation of decorum. We enjoyed the music well, but could not understand a word of what was said."

कर्सनदास मुळजींच्या 'इंग्लंडांतील प्रवासां'तही वरील प्रकाराचें व 'बॉल्' नाचाचें वगैरे वर्णन आहे तेंही वाचण्याविषयीं वाचकांस शिफारस करतों.

गोष्टी आतां नको होत्या; आणि शिवाय जॉन्सन् हा लहानपणापासून हलक्या प्रतीच्या लोकांत वागलेला, जाञा उदासीन व गंभीर, यामुळेंही त्यानें आपल्या ' रँब्लरांत ' ' स्पेक्टेटरा ' प्रमाणें रंगेलपणा बिलकुल न आणतां आपल्या वृत्तीचे जे लोक असतील त्यांच्याच उपयोगार्थ आपला सदुद्योग चालवला होता. भाषापद्धतींतही तसाच फेर. ती 'स्पेक्टेटरां'-तल्याप्रमाणें साधी व सोपी नसून प्रौढ व कांहींशी दुर्बोधही आहे. ती त्या वेळेस नवीनच सुरू झाल्यामुळें सध्यांप्रमाणें दूषणाई न वाटतां लोकांस बरीच प्रियही झाली होती; व तिचें अनुकरण करणारही पुष्कळ झाले. असो; तर याप्रमाणें इंग्रजींतील गद्यरचनेची सुधारणा करून तीस लोकरंजनाचें साधन करण्याचा यत्न अठराव्या शतकांतील ग्रंथकारांनीं केला; यास्तव या वेळेपासूनच त्याची हकीकत देणें योग्य आहे.

८. इंग्रेजी भाषेंत वर सांगितल्याप्रमाणें गद्याचा प्रचार जसजसा वाढत गेला, तसतसा उत्तरोत्तर तो सर्वमान्य होत जाऊन नानाप्रकारच्या विषयांच्या रूपानें प्रगट होऊं लागला. हे विषय निबंध, इतिहास, शास्त्रीय ग्रंथ, कादंबऱ्या, वगैरे होत. आतां या निरनिराळ्या प्रकारांविषयीं अनुक्रमेंकरून लिहितों.

९. पहिल्यानें निबंध. या प्रकाराचें पहिलें व सध्यांचें रूप यांत मनस्वी अंतर आहे. पहिलें रूप बेकनूच्या निबंधांत दृष्टीस पडतें. हे ' निबंध ' अगदीं लहान असून त्यांत त्या त्या विषयाचें समग्र निरूपण केलेलें नाहीं. तर प्रत्येक विषयावर त्या ग्रंथकारास जे जे विचार सुचले ते ते त्यानें थोड्या शब्दांत खुबीदार रीतीनें वेगळे वेगळे लिहिलेले आहेत. यास्तव सामान्य वाचणारास त्यांपासून फारसा बोध होणार नाहीं हें तर काय, पण ते चांगलेसे अगोदर समजणारही नाहींत. बेकनूच्या वरील निबंधांतलें एकेक वाक्य असें आहे कीं, त्यांतील प्रत्येकाचें पूर्ण उद्घाटन करूं गेल्यास एकेक स्वतंत्र निबंधच होईल.[१] तर प्रस्तुत प्रकाराचें पहिलें रूप हें होय. असला मासला इंग्रेजींत दुसरा नाहीं. मागें सांगितल्याप्रमाणें अठराव्या शतकाच्या आरंभीं जी तऱ्हा सुरू झाली ती निराळीच. ती फ्रेंच् लोकांच्या ग्रंथकारांची मूळची असून इंग्रेजी ग्रंथकारांनीं उचलली. हिचे दोन प्रकार वर सांगण्यांत आलेच आहेत; व त्यांच्या योगानें इंग्रेजी भाषेवर व त्या लोकांवर काय कार्ये झालीं याचाही उल्लेख केला आहे. त्याहून ज्यास्त या ठिकाणीं कांहीं लिहिणें नको. यास्तव इतकेंच सांगतों कीं, ' स्पेक्टेटर् ' व ' रँब्लर् ' यांचा कित्ता आणखी कित्येक नामांकित ग्रंथकारांनीं उचलून गेल्या शतकाच्या शेवटपर्यंत तो प्रकार चालूच होता. शेवटीं या शतकाच्या आरंभीं बदलून निबंधाचें स्वरूप पुनः पालटलें. हा नवा फेरफार मोठ्या महत्त्वाचा आहे. यास्तव त्याचा अंमळ सविस्तर वृत्तांत देणें अवश्य आहे.

---

१. वरील 'निबंधां'ची आर्चबिशप् व्हेट्लीं* यानें काढलेली एक आवृत्ति प्रसिद्ध आहे. तींत बेकनूच्या लहान लहान वाक्यांवर लांब लांब निबंध मूळ अर्थाच्या स्पष्टीकरणार्थ लिहिलेले आहेत.

* Archbishop Whately (1787-1863) वेदांत व तत्त्वज्ञान या विषयांवरील विख्यात लेखक. याचे अलंकारशास्त्र (Rhetoric) व तर्कशास्त्र (Logic) यांवरील ग्रंथ नमुनेदार आहेत. हा तीस वर्षांवर डब्लिनूचा आर्चबिशप् होता. 'सम्पादक'

१०. मागें जीं 'स्पेक्टेटर' वगैरे पत्रें सांगितलीं त्यांचा लोकांस अतिशयित इव्यास लागून वाचण्याची व ज्ञानसंपादनाची गोडी जशी त्यांस अधिकाधिक लागत चालली, तसतसा इंग्लंडांत विद्येचा उत्कर्ष होऊं लागून राजकीय प्रकरणांचाही सामान्य लोकांत सुद्धां विचार होऊं लागला. शिवाय नाना प्रकारच्या विषयांवर हजारों ग्रंथ होऊन ते सर्वांस समजूं लागल्यानेंही एकंदर राष्ट्राचे ठायीं अभिज्ञता व ज्ञानाविषयीं उत्कंठाही अधिकच प्रबळ झाली. वास्तव अठराव्या शतकाच्या आरंभीं एकंदर लोकांची ज्ञानाच्या संबंधानें जी बाल्यावस्था होती ती आतां नाहींशी झाल्यानें त्यांच्या प्रौढ दशेस अनुरूप अशी नवीच पद्धत या शतकाच्या आरंभीं विलायतेंत सुरू झाली. हा नवा प्रकार त्रैमासिकें होत. त्रैमासिक ह्मणजे तीन महिन्यांनीं एकदां निघणारें पुस्तक. या पुस्तकांत विषयसंग्रह पाहिल्यापेक्षां फारच मोठा असून शिवाय त्यांत विविधत्वही अधिक. मागील पत्रांतील विषय ह्मटले ह्मणजे नीतिज्ञान, काव्यविवेचन, सुरस व चमत्कारिक कल्पित कथा, रूपकें, वगैरे असे; व राजकीय प्रकरणांच्या संबंधानें जीं कांहीं चालू असत त्यांत परराज्याची स्थिति, पार्लमेंटांतील उलाढाली, वगैरेविषयीं लिहिलेलें असे. पण वर सांगितलेलीं नवीं जीं पुढें सुरू झालीं त्यांत बहुधा साऱ्या गोष्टींचा समावेश होऊं लागला. नव्या ग्रंथांवर टीका, राज्यप्रकरणीं वाद, नवे शोध, शास्त्रीय विषयांचें सविस्तर विवेचन, इत्यादिकांवर यांत येवढे मोठाले लेख येऊं लागले कीं, प्रत्येक निबंध ह्मणजे एक लहानसा ग्रंथच होऊं लागला. तसाच प्रत्येक अंकही चांगल्या मोठ्या पुस्तकायेवढा असून तो लक्षपूर्वक वाचणें ह्मणजे खरोखरच महिना दोन महिन्यांचें काम. असो; हा नवा प्रकार पहिल्यानें स्कॉटलंडची राजधानी एडिनबरो येथें सुरू झाला. सन १८०२ सालीं त्या शहरांतल्या आठ नऊ उमेदवार तरुण विद्वानांनीं मनांत आणलें कीं, ग्रंथपरीक्षणाचें काम सध्यां अगदीं मंदाईनें चालत असल्यामुळें भाषेचें अहित होऊन एकंदर वाचकांस मनोरंजन व ज्ञान प्राप्त होण्याचें कोणतेंच चांगलेसें साधन नाहीं. तर आपण सर्वांनीं मिळून एक त्रैमासिक पुस्तक काढावें. असा बेत होतांच त्या वर्षाच्या नोवेंबर महिन्यापासून 'एडिनबरो रिव्ह्यू'§ नांवाचें सध्यां जें जगत्प्रसिद्ध त्रैमासिक आहे तें सुरू झालें. पहिल्या पहिल्यानें त्याची चोहोंकडे थट्टाच झाली; कां कीं, वरील मंडळींची वयें, कोणाचें पंचवीस, कोणाचें तीस, इतक्याच बेताचीं असल्यामुळें येवढें काम या पोरांच्या हातून कसचें निभतें आहे असें सर्व ह्मणूं लागले. शिवाय तो प्रकारही त्यांनीं नवाच काढल्यामुळें त्यांच्या धाडसाचें लोक नवल करून हसूं लागले. पण देशहितार्थ कंबर बांधलेल्या वरील उमेदवार गड्यांनीं वरील उपहासक मंडळींच्या प्रत्ययास लवकरच आणून दिलें कीं,

गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिङ्गं न च वयः।

"गुणिजन लोकमान्यतेस जे चढतात ते केवळ आपल्या गुणांनीं चढतात; त्यांचे ठायीं

---

§ एडिंबरो रिव्ह्यू—त्रैमासिक, जेफ्रे (Jeffrey) च्या सम्पादकत्वाखालीं १८०२ मध्यें सुरू झालें. यांत Lord Brougham, Sydney Smith, व पुढें पुढें मेकॉले (Mecaulay) वगैरे विख्यात लेखक लिहीत असत. 'सम्पादक'

जातिविशेषाची किंवा वयाची बाड नसते." असो; वरील त्रैमासिकाचा फैलावा लवकरच चोहोंकडे झाला. पहिला अंक काढला त्याच्या प्रती भीत भीतच ७५० काढल्या होत्या, पण लागलीच दुसऱ्या तितक्याच काढणें जरूर पडलें. पुढील अंकाच्याही त्याप्रमाणेंच कित्येक आवृत्ति पुनः काढाव्या लागल्या. असें होतां होतां तीन चार वर्षांत वरील 'रिव्ह्यू' चा खप ९००० प्रती व्हावयाला लागला; आणि त्याच्याही पुढें तितक्याच वर्षांनीं १२०००, १३००० इतक्यावर येऊन मान बसलें. विलायतेच्या तीन भागांत तर काय, पण युरोपांतील दूरदूरच्या देशींही सदरील त्रैमासिकास मान मिळून त्यांतील विद्याविषयक व राज्यतंत्राविषयक मतांचे अनुयायी चोहोंकडे झाले. याप्रमाणें निबंधांची ही नवी तऱ्हा निघून ती लवकरच इतक्या स्वरूपास येऊन पोंचली. तें पाहून बरच्या साऱख्या दुसऱ्या मंडळ्याही जमल्या, व त्यांनीं आपआपल्या मतांच्या पुष्ट्यर्थ दुसरीं त्रैमासिकें सुरू केलीं. दोंही अद्याप चालत आहेत. यांचीं नांवें 'क्वार्टर्ली'* व 'वेस्ट् मिनूस्टर् रिव्ह्यू' अशीं आहेत. पहिलें सन १८०९ त सुरु झालें. हें आरंभण्याचें कारण मुख्य असें झालें कीं, मागील 'एडिन्बरो रिव्ह्यू' त सरकारच्या विरुद्ध मजकूर येऊं लागून त्या पुस्तकाचें वजन जसजसें वाढत चाललें, तसतसा लोकांचा पक्ष अधिकाधिक बळावत जाईल असें राजकीय पक्षाच्या लोकांस भय पडलें. यास्तव त्यांनीं आपली बाजू संभाळण्याकरतां व विरुद्ध पक्षाचें खंडन करण्याकरतां स्वतंत्रच पुस्तक काढलें. या पुस्तकालाही वॉल्टर् स्कॉटूसारख्या बड्या बड्या मंडळीचा हात होता; व तें सरकारच्या तर्फेनें भांडत असल्यामुळें प्रधानमंडळीचा वगैरे त्यास बळकट आश्रयही होता. तरी त्याचें वजन मागील त्रैमासिकाप्रमाणें पडलें नाहीं,

---

१. इंग्लंडांत राज्यप्रकरणीं लोकांचे दोन मोठे तट§ आहेत. ते येथें आमच्या मराठी वाचकांस सांगितले पाहिजेत. एक लोकपक्षी(रैतपक्षी) लोक, ज्यांस 'व्हिग्' म्हणतात; आणि दुसरे राजपक्षीय, ज्यांस 'टोरी' म्हणतात. वरील त्रैमासिक 'व्हिग्' पक्षाचें होतें; यास्तव पुढें त्यांच्या प्रतिपक्ष्यांनीं 'टोरी' मताचें दुसरें त्रैमासिक 'क्वार्टर्ली' हें काढलें. याप्रमाणें हे दोन तट जरी अद्याप चालू आहेत; तरी एकंदर राष्ट्राचा कल राजसत्ता कमी करण्याकडे व लोकांचें प्रभुत्व वाढवण्याकडे आहे हें आमच्या लोकांसही आलीकडे माहीत होत चाललेंच आहे.

§ Whigs and Tories. Whig हें नांव दुसऱ्या चार्लस् राजाच्या कारकिर्दीत प्रथम उपयोगांत आलें तें १८३२ चा सुधारणांचा कायदा (Reform Bill) पास होईपर्यंत राजकीय प्रागतिक पक्षाला देण्यांत येत असे. १८३२ नंतर व्हिग् पक्ष लिबरल् (Liberal) या नवीन नांवानें ओळखण्यांत येऊं लागला. (Tories) टोरी हें नांव सन १६७८ च्या सुमारास प्रचारांत आलें. राजा परमेश्वराचा प्रतिनिधि आहे हें ('Divine Right of Kings') परंपरागत मत मान्य करणारे, डिसेंटर्सचे (प्रॉटेस्टंट्, पेपिस्ट् वगैरे प्रस्थापित चर्च न मानणारे Nonconformists) विरोधक, सरदारपक्षीय-मुख्यतः दरबारपक्षीय असे लोक या पक्षाचे होत. रिफॉर्म् बिलाला यांनीं विरोध केला. धर्मगुरु व राजा यांची सत्ता अबाधित राहावी म्हणून यांनीं खूप खटपट केली. हाच पक्ष पुढें कॉन्झर्वेटिव्ह (Conservative) या नांवानें प्रसिद्ध झाला. 'सम्पादक'

* क्वार्टर्ली रिव्ह्यू (Quarterly Review) टोरी पक्षाचें १८०९ सालीं सुरू झालेलें त्रैमासिक. Gifford हा याचा आद्य सम्पादक असून एडिन्बरो रिव्ह्यूशीं स्पर्धा करण्यासाठीं विरुद्ध पक्षानें हें सुरू केलें होतें. 'सम्पादक'

व अद्यापही नाहीं. याचें कारण अर्थात् हेंच आहे कीं, दिवसांदिवस इंग्लंड्च्या लोकांचा रोख राजसत्तेवर अधिकाधिक होत जाऊन लोकपक्षाकडे विशेष ओढा होत चालला आहे. असो; तिसरें जें 'वेस्टमिनूस्टर' तें १८२४ त निघालें. त्याचे प्रवर्तक मिल्, बेंथॅम्, ग्रोट वगैरे लोक होते. यांचा वरील त्रैमासिक उपस्थित करण्याचा उद्देश निराळाच होता. तो तादृश राज्यप्रकरणासंबंधी नसून धर्म, लोकव्यवहार, इत्यादि विषयांवर त्यांनीं जीं नवीं मतें प्रसिद्ध केलीं होतीं त्यांचें प्रकाशन करण्याचा होता. हीं मतें बहुतेक लोकांस आवडत नसून पाद्री मंडळीचा तर त्यांचें नांव काढतांच तिळपापड होऊन जातो. जेम्स् मिल् व जॉन् स्टुअर्ट् मिल् यांच्या धर्मविषयक मतांचा उल्लेख पंधराव्या अंकांत एके ठिकाणीं‡ केला आहे त्यावरून वरील पुस्तकाचें स्वरूप आमच्या वाचकांच्या लक्षांत थोडेंसें येईलच. त्याहून ज्यास्त येथें इतकेंच सांगितलें पाहिजे कीं, वरील पक्षाचा एकंदर रोख जुन्या मतांविरुद्ध आहे. यांच्या मतें मानवी बुद्धीस जें यथार्थ दिसेल ह्मणजे जें प्रमाणसिद्ध असेल तेवढें मात्र खरें मानायाचें, व तेवढ्यासच धरून चालायाचें. देवानें आपणांस दहा आज्ञा दिल्या आहेत, 'पवित्र शास्त्र' अमुक गोष्ट विहित व अमुक निषिद्ध ह्मणून सांगतें, रोम शहरचे पोपमहाराज जे ख्रिस्ताचे प्रतिनिधि त्यांनीं अमुक आज्ञापत्र काढलें आहे, हें सर्व एकीकडे गुंडाळून ठेवून वरील लोक मनुष्यमात्रांचे ठायीं जी सदसद्विवेचनशक्ति आहे तिचेंच केवळ प्राधान्य मानतात. तसेंच जें मनुष्यमात्रास सुखावह तें कर्म चांगलें, व दुःखावह किंवा अनर्थकारक तें वाईट, येवढीच ते नीति व धर्म समजतात. या तिसऱ्या त्रैमासिकाचाही वरच्या दोहोंप्रमाणें पुष्कळ प्रचार आहे. व एकंदर लोकांचा कल त्याच्यासारखा दिवसांदिवस पुष्कळ होत चालला आहे. विलायतेंत बहुतेक लोकांचीं मनें ख्रिस्ती धर्मापासून निवृत्त होत चाललीं आहेत, व पाद्री लोकांचें माहात्म्य उत्तरोत्तर कमी कमी होत जाऊन त्यांची मुदत बहुतेक भरत चालली आहे, हें वरील मतांच्या प्रसाराचेंच फळ होय.[1] असो; तर याप्रमाणें या शतकाच्या आरंभीं ही नवी तऱ्हा निघून तिचा दिवसांदिवस फैलावा होत चालला आहे.

---

‡ पृष्ठ ३७१ ओळी १–६ पाहा. 'सम्पादक'

१. वरील उल्लेख ख्रिस्ती धर्माच्या द्वेषबुद्धीनें आह्मीं केला असून तो केवळ अत्युक्तिरूप आहे असें आमच्या कित्येक वाचकांस व आमच्या पाद्री बंधूंस कदाचित् वाटेल. पण विलायत पाहून आलेल्या एकाद्या गृहस्थास, किंवा ग्रंथादिकांवरून तिकडची माहिती ज्यानें थोडीबहुत मिळवली आहे अशा कोणाही मनुष्यास जर विचारलें, तर वरील लेखांत सत्यता कितपत आहे ती दिसून आल्याविना राहणार नाहीं. फार काय, पण आमच्या मिशनरींनीं व एतद्देशीय विद्वान् ख्रिस्त्यांनीं आपल्या मनाची खरी गोष्ट सांगणें जर पत्करलें, तर वरील अप्रिय सत्यच त्यांस मोठ्या खेदानें प्रगट करणें येईल यांत संशय नाहीं. खालच्या पार्लमेंटांतून तर पाद्रींस अजीबात काढून टाकून वरच्यांतूनही तसेंच करण्याचा पुष्कळांचा मनोदय आहे, व प्रधान मंडळीची धर्मखात्यावर केवढी करडी नजर आहे, हें सर्व इतिहासज्ञांस विश्रुत आहेच. असो; एकंदरींत पाहतां रोमी सरकारानें इंग्लंडांतल्या वगैरे फौजा जशा पांचव्या शतकांत राजधानीच्या संरक्षणार्थ माघाऱ्या आणल्या

( पुढें चालू )

११. आतां प्रस्तुत विषयाचा वरील भाग संपवून हा अंक आटपण्यापूर्वी वरील त्रैमासिकांत कालाच्या व योग्यतेच्या मानानें जें अग्रगण्य आहे त्यांतील अत्युत्कृष्ट निबंधकाराचा थोडासा वृत्तांत येथें देतों. तो अशाकरतां कीं त्याच्या योगानें वरील पुस्तकाचें स्वरूप वाचकांस विशेष स्पष्ट रीतीनें कळेल. वरील त्रैमासिक अर्थात् 'एडिनूबरो रिव्ह्यू' होय व वरील निबंधकार मेकॉले होय. या ग्रंथकाराविषयीं सांप्रत पुस्तकांत पुष्कळ ठिकाणीं निंदास्तुतिपर मजकूर आला आहे; यास्तव प्रस्तुत प्रसंगीं त्याविषयीं विशेष विस्तारानें लिहून त्याच्या ग्रंथकर्तृत्वाचें एकंदर स्वरूप वाचकांस कळवलें असतां बरें पडेल असें वाटतें. मेकॉले हा चालू शतकाच्या आरंभीं जन्मला. तो जन्मल्यावर लवकरच त्याच्या नांवाशीं खिळलेलें जें वरील पहिलें त्रैमासिक त्याचा प्रादुर्भाव झाला. मेकॉलेनें पहिल्या पहिल्यानें लहान लहान मासिक पुस्तकांतून निबंध लिहिण्याचा उपक्रम आरंभला; आणि त्यांत बरेंबसें यश आलें तशी ज्यास्त उमेद येऊन आपल्या वयाच्या पंचविसावे वर्षी त्यानें 'एडिनूबरो रिव्ह्यू' चालवणाऱ्या मंडळींत प्रवेश केला. त्याचा पहिला लेख मिल्टन् कवीवर लिहिलेला निबंध हा होय. यांत त्याच्या पुढें विस्तार पावलेल्या गुणांचा व दोषांचा अंकुर स्पष्ट दिसत आहे. ते कोणते ते पुढें सांगण्यांत येतील. असो; वर सांगितल्याप्रमाणें वरील त्रैमासिकांत एकदां प्रवेश झाल्यावर मेकॉलेनें शेवटपर्यंत आपले निबंध त्यांतच लिहिले. हे एकंदर बावीस आहेत. यांतील विषय मुख्यत्वेंकरून ऐतिहासिक वृत्तांत व निरनिराळ्या ग्रंथकारांचें गुणदोषविवेचन हे होत. मेकॉले मोठा जबरा वाचणारा होता; त्यास युरोपांतील मोठमोठ्या भाषा स्वतः अवगत असून इतर भाषांतील ग्रंथांविषयींची माहितीही भाषांतरादि द्वारें चांगली झाली होती.[१] शिवाय बहुतेक सर्व विषयांचें त्याचें थोडेंबहुत तरी ज्ञान संपादन केलें होतें. यास्तव वरील निबंधांत, शिवाय त्याच्या इतिहासांत, कवितेंत, पार्लमेंटांत केलेल्या भाषणांत, वगैरे जेथें तेथें मोठे समर्पक दृष्टांत, उपमा, इत्यादि देऊन आपली विलक्षण माहिती त्यानें दाखवली आहे. इंग्लिश् कवींपैकीं मिल्टन् व बायरन् या दोघांवरच त्यानें निराळे निबंध लिहिले आहेत; तरी वर्ड्स्वर्थ्, शेले, शेक्स्पीयर, ड्रायडन्, पोप, वगैरेंच्या विषयीं पुष्कळ मजकूर जागोजाग त्याच्या निबंधांत आला आहे. त्याप्रमाणेंच जॉन्सन्, बेकन्, आडिसन्, आणि दुसरे दोन चार ग्रंथकार यांवरच स्वतंत्र निबंध लिहिले असून इंग्रेजी भाषेंतील बहुतेक मोठमोठ्या ग्रंथकारांविषयीं पुष्कळ ठिकाणीं उल्लेख आहेत. सारांश, वरील निबंध इंग्रेजी

---

त्याप्रमाणेंच खिस्तशत्रूनें विलायतेंत जो दंगा मांडला आहे तो मोडण्यास्तव देशोदेशच्या मिशनरींनीं आपापलें गबाळें गुंडाळून आपल्या चेल्यांसहवर्तमान आपल्या जळत्या घराची सत्वर वाट धरावी हें बरें नव्हे काय ?

१. वरील विविध ज्ञानाविषयीं मेकॉलेची विद्यालयांत असतांनाही प्रसिद्धि असे. त्याचें नांव 'सर्वज्ञ' असें पडलें होतें. इकडील ग्रंथांविषयींही त्यास थोडीबहुत माहिती असे याविषयीं मागें आठव्या* अंकांत थोडेसें लिहिलेंच आहे. तसेंच एका निबंधाच्या आरंभीं 'हितोपदेशां'तील 'तीन धूर्तां'ची गोष्ट त्यानें दृष्टांताकरतां घातली आहे हें पुष्कळांस माहीत असेलच.

* पृष्ठ ८० पाहा. 'सम्पादक'

विद्येचें केवळ भांडारं असून त्यांत तींतील ग्रंथसंग्रहाविषयीं वगैरे थोडक्यांत पुष्कळ जशी माहिती मिळणारी आहे तशी इतर थोड्याच ठिकाणीं सांपडेल.

आतां वर सांगितल्याप्रमाणें वरील निबंधांत व मेकॉलेच्या एकंदर ग्रंथांत आढळणारे गुणदोष सांगतों. या ग्रंथकाराच्या विद्वत्तेविषयीं, व एकंदर माहितीविषयीं, वर सांगितलेंच आहे. हा गुण पुष्कळ ग्रंथकर्त्यांत आढळतो; पण तो मेकॉलेनें ज्या रीतीनें प्रगट केला आहे ती तऱ्हा थोड्यांसच साधेल. या माहितीमुळें नवे नवे व चमत्कारिक दृष्टांत वगैरे देऊन त्यानें आपल्या ग्रंथरचनेस इतकी शोभा आणली आहे कीं, तीमुळें वाचण्याचे श्रमही वाचणारांस न भासतां तो तो विषय त्यांचे मनावर ठसून जातो; व सहजरीत्या अनेक चमत्कारिक गोष्टींची माहिती होऊन जाते. मेकॉलेची भाषापद्धतीही मोठी प्रशंसनीय आहे. कित्येकांच्या मतें तर त्याच्यासारखा सफाईदार लिहिणारा आजपर्यंत इंग्लिश् भाषेंत झालाच नाहीं. वाक्यें ल्हान व खुबीदार, शब्द सोपे आणि निवडक, विषयनिरूपणाची शैली अत्यंत सुबोध व सरळ,—हाच प्रकार जेथें तेथें आढळतो. ही शेवटली गोष्ट तर फारच मोठी आहे. ती उत्तम शिक्षकास जशी अवश्य आहे तशीच ग्रंथकारासही होय. सामान्य वाचकासही मोठमोठ्या विषयांची माहिती करून देणें ह्मणजे मोठ्या चतुराईचें काम आहे; व ही रीत ज्यास चांगली शिकावयाची असेल त्यास ती प्रस्तुत ग्रंथकारापासून जशी मिळेल तशी बहुधा कोठेंही मिळावयाची नाहीं. वरील भाषापद्धतीचा दुसरा एक विशेष गुण तिची विनोदात्मकता होय. हा गुण आलीकडील इंग्रेजी ग्रंथकारांत सामान्यतः नेहेमी आढळतो; व वाचनाचे श्रम हलके करण्यास याचा उपयोग किती आहे हें ती तऱ्हा आपल्या भाषेंतही थोडथोडी सुरू होत चालली आहे यावरून सर्वांच्या ध्यानांत येईलच.

सरतेशेवटीं वरील ग्रंथकाराचे दोष दाखल करून प्रस्तुत लेख पुरा करतों.[1] हे दोष

---

१. 'निबंधमाले'सारख्या छोटयाशा पुस्तकाच्या कर्त्यानें मेकॉलेच्या दोषांचें विवरण करूं जाणें हें आमच्या प्रतिपक्ष्यांस अपूर्वी विलक्षण धाडसाचें कृत्य वाटलेंच आहे; तसेंच तें या वेळेसही वाटल्यावांचून राहणार नाहीं. वास्तव वरील ग्रंथकाराची योग्यता किती मानलेली आहे याविषयीं एक दोन दाखले येथें देतों. तें नीट ध्यानांत वागवले असतां वरील ग्रंथकाराचा व मिरतभक्तादि मंडळीचा पूज्यपूजकभाव बराच कमी होईल असें वाटतें.—

"Macaulay's sense of beauty is keen, but not deep; his enthusiasm has no central fire; his convictions want depth, and as a consequence, his eloquence with all its apparent earnestness, wants force. The surface of his mind is large and active; but its regions below remain untroubled. The consequence is, that he has no influence on his age. He has delighted thousands. This is no slight thing, and we should be the last to undervalue it. But he has materially bettered no one. He has deepened no man's convictions, he has given fresh strength to no human soul. His influence on his generation has been null. It is

( पुढें चालू. )

वरील गुणांचेच कांहीं अंशीं अनुषंगी होत. जो ग्रंथकार वाचकांस नेहेमी रंजवूं पाहील व त्यांस नेहेमी थक्क करून टाकण्याचा यत्न करील त्यास निवळ सत्यासच अनुसरून चालणें उपयोगी पडणार नाहीं. मीठमिरचीचा सांठा त्यास आपणापाशीं नेहेमी भरपूर ठेवावा लागेल. हा प्रकार मेकॉलेनें आपल्या पक्षाच्या लोकांच्या संबंधानें व आपल्या आवडत्या ग्रंथकारांविषयीं जितकें गोड गोड लिहावयास सांपडेल तितकें लिहिण्यानें व आपल्या विरुद्ध पक्षाच्या लोकांचें दोष तिखटमीठ लावून सांगण्यानें उघड दाखवला आहे. त्याच्या निबंधांतच पाहिलें तर जॉन्सनचें चरित्र लिहिणारा बॉस्वेल, प्रख्यात कवि पोप, इंग्लंडचा राजा पहिला चार्लस् इत्यादिकांविषयीं, व दुसऱ्या पक्षीं क्रॉम्वेल्, हेस्टिंग्स्, क्लैव, वगैरेंच्याविषयीं जें जें लिहिलें आहे त्यावरून वरील पक्षपाताचा व अत्युक्तीचा प्रकार सर्वांच्या नजरेस सहज येणारा आहे. मेकॉलेच्या ग्रंथांत असणाऱ्या या महादोषास्तव त्याचें वजन आजलाही पुष्कळ कमी झालें आहे. केवळ त्याच्याच लिहिण्यावरून कोणास चांगलें किंवा वाईट ह्मणण्याचें कोणी पतकरीत नाहीं. असो; हें एक झालें. दुसरा मीठा दोष असा आहे कीं, त्याच्या छानछुकीचाही आलीकडे लोकांस कंटाळा येत चालला आहे. सगळ्या अंगभर दागिने घातले असतां व नेहेमी तशाच थाटांत मिरवलें असतां त्या मनुष्याचा पाहुणारास जसा

---

impossible, we think, to say that any human being would have been otherwise, had Macaulay never written. Some few might have written less picturesquely and less elegantly, but no human soul would have been poorer."

*British Quarterly.*

"His imagination often snatches the reins from his reason; his ardour dims his equanimity; his learning overpowers his taste. He was so enamoured of strong expressions and extreme views, that even when he tried to be impartial, it was only by setting off one exaggeration against another that he attempted to effect his object. His views, always ingenious, generally eloquently supported, are not uniformly just; his powers as a rhetorician sometimes make him forget his duties as a judge; he is too often splendid rather than impartial, one-sided than just. The reader will never fail to be interested by his narrative; but he is not equally certain to be instructed; the impression left, however brilliant, is often fallacious; and the fascinating volume is often closed with regret that the first pleader at the bar of posterity has not yet been raised to the bench."

*Alison's* History of Europe.*

* Sir Archibald Alison (1792–1867) सर् आर्चिबाल्ड् ॲलिसन् यानें १७८९ ते १८१५ पर्यंतच्या काळाचा युरोपचा प्रचंड इतिहास लिहिला. तिसऱ्या नेपोलियनच्या राज्याभिषेकापर्यंतच्या महत्त्वाच्या सर्व हकिकती या ग्रंथांत काळजीपूर्वक देण्यांत आल्या आहेत. 'सम्पादक'

कांहीं वेळानें त्रास येऊं लागतो; त्याप्रमाणेंच अलंकारांचा सदोदित थाटमाट राखला असतां ग्रंथाचीही शोभा नष्ट होते. तर याप्रमाणेंच मेकॉलेचे निबंध वगैरे पहिल्या प्रथम जरी वाचकास थक्क करून सोडतात, तरी ग्रंथरचनेची खरी सरसता त्यास जशी अधिकाधिक कळूं लागते, व न्यायान्यायबुद्धि त्याचे ठायीं वाढते, तसतसें वरील ग्रंथकाराचें तेज त्यास फिकें वाटायाला लागतें.

याप्रमाणें इंग्रेजी भाषेंतील गद्यरचनेची एक तऱ्हा जो निबंध त्याविषयीं लिहिणें झालें. पुढील भागांचें यापुढें क्रमवार विवेचन करूं.

---

अहह महतां निःसीमानश्चरित्रविभूतयः ॥ १

नीतिशतक—भर्तृहरि.

अंक २९—( १ ) अवतरण. ( २ ) इंग्रेजी भाषेंतील इतिहाससंग्रह. ( ३ ) त्याचे विभाग. ( ४ ) इंग्लंडचा इतिहास. ( ५ ) नामांकित इतिहासकार. ( ६ ) अर्वाचीन युरोपियन् राष्ट्रांचा इतिहास. ( ७ ) ग्रीक् व रोमन् लोकांचा इतिहास. ( ८ ) विख्यात इतिहासकार.

१. गेल्या अंकांत इंग्लिश् भाषेची उत्पत्ति वगैरे सांगून गद्यग्रंथांपैकीं एका भागाचें निरूपण केलें. आतां पुढील भाग जे इतिहास, शास्त्रीय ग्रंथ इत्यादि त्यांविषयीं निरूपण करूं.

२. इंग्लिश् भाषेंत इतर सगळे विषय जसे परिपूर्णतेस पावले आहेत त्याप्रमाणेंच इतिहासही पावला आहे. प्राचीन ग्रीक् व रोमन् विद्येचें युरोपांत पुनरुज्जीवन होऊन इतिहासरचनेची सर्व राष्ट्रांत जशी माहिती झाली, तशीच ती इंग्लंडांतील विद्वानांसही होऊन जुन्या इतिहासकारांचें ते लवकरच अनुकरण करूं लागले. पुढें जसजशी इंग्रेजी भाषा सुधारत चालली, व इंग्लिश् लोकांचें ज्ञान वाढत चाललें, तसेंच त्यांच्या देशांत मोठमोठ्या गोष्टी घडूं लागून पृथ्वीच्या दूरदूरच्या देशांत त्यांचा संचार होऊं लागला, तसतशी इतिहासाची प्रवृत्ति विशेषच पडत चालली. वरील प्रकार अद्यापही चालूच आहे. यामुळें प्रस्तुत विषयावर इंग्रेजी भाषेंत जितके व जितक्या प्रकारचे ग्रंथ आहेत तितके व तसे ग्रंथ युरोपांतील इतर भाषांतही थोडेच असतील असें वाटतें. आमच्या राज्यकर्त्यांची जिज्ञासा व शोधकबुद्धि या दोन्ही विलक्षण असल्यामुळें व ते साहसप्रिय असल्यामुळें भूमंडळाच्या प्रत्येक भागावर त्यांची गडबड सतत चालू आहे. व यास्तवच त्यांच्या भाषेंत इतिहासाचें भांडार भरपूर असून त्यांत अतिशयित विचित्रता आहे.

३. वर इंग्रेजी भाषेंतील इतिहासाविषयीं सामान्यतः सांगितलें. आतां त्याच्या निरनिराळ्या शाखांविषयीं विशेषतः निरूपण करतों. या शाखा चार पांच निरनिराळ्या

---

१. "अहाहा, थोर जे असतात त्यांचा चरित्रमहिमा केवळ अगाध असतो!"

घेतल्या असतां चालणार आहे. एक खुद्द इंग्लंड्चा इतिहास, दुसरा अर्वाचीन युरोपियन् राष्ट्रांचा, तिसरा जुन्या ग्रीक् व रोमन् राष्ट्रांचा, चवथा हिंदु, चीन, पारसीक इत्यादि पूर्वेकडील राष्ट्रांचा आणि पांचवा सरसकट पृथ्वीवरील सर्व देशांचा. आतां प्रत्येकाविषयीं क्रमशः निरूपण करूं.

४. पहिल्यानें खुद्द इंग्लंड्चा इतिहास. या देशाच्या इतिहासाची माहिती सुमारें दोन हजार वर्षांपर्यंत मात्र लागते. युरोपच्या पलीकडे अट्लांटिक महासागरांत दोन मोठालीं बेटें आहेत इतकी वार्ता मात्र फिनिशियन् लोकांच्या जलपर्यटनांवरून वगैरे लोकांत प्रसिद्ध होती. तिचा साक्षात् प्रत्यय पहिल्यानें जुलियस् सीजर यास आला. यानें इसवी सनाच्या पूर्वी ५६ व्या वर्षी ब्रिटन् देशावर स्वारी करून तेथें रोमन् लोकांचें ठाणें घातलें. या महाविख्यात सेनापतीनें व ग्रंथकारानें आपल्या इतिहासांत वरील बेटाविषयीं जें लिहिलें आहे त्याच्या अगोदरची माहिती कोणास कांहीं नाहीं. असो; सीजराच्या पुढेंही कित्येक शतकेंपर्यंत इंग्लंड् देशाची माहिती फारच थोडी सांपडते. याचें कारण हेंच कीं तेथील लोक त्या वेळेस केवळ रानटीच असून विद्येचा लोकांचे ठायीं केवळ अभाव होता. ही स्थिति नॉर्मन् लोकांच्या वेळेपासून बरीच बदलत चालली. इंग्लंडाचा तद्देशीयांनीं लिहिलेला इतिहास या वेळेपासून कांहीं मिळतो. त्या काळीं विद्येचें वास्तव्य म्हटलें म्हणजे पाद्री लोकांच्या ठायींच काय तें होतें.[1] यास्तव वरील विषयावर त्यांनींच लिहिलेले लेख आजपर्यंत कांहीं चालत आले आहेत. यांस इंग्रेजींत 'क्रॉनिकल्स्' म्हणजे बखरी म्हणतात. या बखरी अँग्लो-सॅक्सन् भाषेंत लिहिलेल्या असल्यामुळें ती भाषा जाणणारांस मात्र त्या समजतात. याप्रमाणेंच पुढील काळचे इतिहासही कांहीं पाद्री लोकांनीं लिहिलेले व कांहीं सरदार लोकांनी पदरी ठेवलेल्या लेखकांनीं लिहिलेले असे आहेत. असो; पण ही केवळ इतिहासरचनेची बाल्यावस्था झाली; हा प्रकार चांगला म्हटला म्हणजे सोळाव्या शतकापासून आढळतो. या वेळेपासून विद्येचा फैलावा होऊं लागून प्राचीन ग्रीक् व रोमन् ग्रंथकारांचे इतिहास सर्वांस माहीत झाल्यामुळें त्यांचें सहजच अनुकरण होऊं लागलें. बेकन् यानें ट्यूडर् घराण्याचा पहिला राजा सातवा हेन्री याचा इतिहास लिहिला. तसाच मिल्टन् यानेंही एक इतिहास लिहिला आहे. हा कवि तरुण वयांत युरोपावर मुशाफरी करायास गेला होता, तेव्हां परत येतांना वाटेनें त्यानें दोन मोठाले संकल्प मनांत करून ठेवले होते. ते हे कीं, आपल्या देशाचा एक इतिहास लिहायाचा, आणि आपल्या भाषेंत एक वीररसप्रधान महाकाव्य रचायाचें. यांपैकीं दुसरा बेत त्यानें शेवटीं उतार वयांत व अंधळेपणांत शेवटास नेला हें सर्वांस माहीत आहेच.[2] पहिला बेत जो इतिहासाचा तो मात्र चांगलासा सिद्धीस

---

१. हा प्रकार सर्व देशांतून आरंभीं आढळतो. धर्माचे अधिकार जे चालवतात त्यांसच थोडेंबहुत अगत्य पडल्यामुळें ती त्यांचेच ठायीं कांहीं आढळते. इंग्रेजींत 'क्लार्क्' शब्दाचे अर्थ 'पाद्री', 'विद्वान्', 'लिहिणारा' असे जे क्रमाक्रमानें झाले त्यांत वरील स्थिति सूचित होते.

२. मिल्टन्नें 'पॅराडैज लॉस्ट्' रचलें तो प्रकार मोठा चित्तास लागण्यासारखा आहे. त्यास

[पुढें चालू]

गेला नाहीं. विषयाचें विवेचन फार सविस्तर झाल्यामुळें नॉर्मन् लोकांच्या स्वारीपर्यंतच वरील इतिहासाचे सहा भाग झाले; आणि पुढील भाग राहिले ते शेवटीं तसेच राहिले.

५. वर सांगितल्याप्रमाणें सोळाव्या व सतराव्या शतकांत इंग्लंड्चा इतिहास तद्देशीय विद्वान् लिहूं लागले. तरी अद्याप त्या देशाचा संपूर्ण इतिहास लिहिण्याचें कोणाच्या हातून झालें नाहीं. हा उद्योग पुढील; म्हणजे अठराव्या शतकांत सिद्धीस गेला. असा संपूर्ण इतिहास पहिल्यानें एका फ्रेंच् ग्रंथकारानें लिहिला. हा विलक्षण प्रकार घडण्याचें कारण असें झालें कीं, चवदाव्या लुई राजाच्या जुलमामुळें पुष्कळ फ्रेंच् प्रॉटेस्टंट् इंग्लंडांत येऊन राहिले होते. अशांपैकीं वरील इतिहासकार रेपिन् * हा होता. हा आपल्या धर्माच्या रक्षणार्थ इंग्लंडास आला असून तिसरा विल्यम् राजा यानें त्यास थोडीशी नेमणूक करून दिली होती. यानें सन १७२५ त आपला इतिहास संपवला. पुढें लवकरच त्याचें इंग्रेजींत भाषांतर झालें. रेपिन्च्या पुढें त्याच विषयावर आणखी कित्येक ग्रंथ झाले; पण त्या सर्वांत विशेष नामांकित असा एकच ठरला. हा इतिहास ह्यूम ‖ नामक प्रख्यात ग्रंथकाराचा होय. या विख्यात तत्त्वज्ञाचा उल्लेख यापूर्वीं कित्येक वेळां आह्मी केला आहे; त्यावरून त्याचें नांव आमच्या वाचकांस बहुधा अपरिचितासारखें वाटणार नाहीं. यानें १७५४त स्टुअर्ट् घराण्यातले पहिले दोन राजे जेम्स् व चार्लस् यांच्या कारकिर्दीचा इतिहास प्रसिद्ध केला. या कृत्याबद्दल ह्यूम यास काय बक्षिशी मिळाली ती त्यानें आपल्या चरित्रांत स्पष्ट लिहून ठेवली आहे. त्याचीं धर्मसंबंधीं मतें अगोदरच चोहोंकडे पसरून हजारों लोक, त्यांतून विशेषतः पाद्री, त्याचा अतिशय द्वेष करीतच होते; आणि त्यांत वरील ग्रंथांत आपलीं राज्यप्रकरणीं मतें जेव्हां त्यानें प्रसिद्ध केलीं, तेव्हां तर त्याच्यावर जो गहजब झाला तो कांहीं पुसूं नये. जो तो त्याला शिव्या देऊन त्याची निर्भर्त्सना करूं लागला. हा लोकद्वेष लवकरच येथपर्यंत जाऊन पोंचला कीं, वरील ग्रंथकारास स्वदेश नकोसा होऊन

---

त्याच्या मुली सकाळीं आणून खुर्चीवर बसवीत आणि नंतर केवळ स्फूर्तीनें पद्यरचना करून ती त्यांस तो सांगत असे. असें असे तरी आपली कविता पुनः पुनः वाचवून तींत सुधारणा करण्याचा यत्न त्याचा नेहेमी चालूच असे. याप्रमाणें होतां होतां सात वर्षांनीं वरील महाकाव्य संपूर्ण झालें.

* Rapin de Thoyras, Paul de (1661-1725). इ. स. १५९८ मध्यें फ्रान्सच्या चवथ्या हेन्रीनें (Ediot of Nantes) आज्ञापत्र काढून प्रॉटेस्टंट् लोकांस दिलेल्या सवलती इ. स. १६८५ मध्यें चवदाव्या लुईनें हें आज्ञापत्र रद्द केल्यामुळें नाहींशा झाल्या इतकेंच नव्हे तर त्यांचा अत्यंत छळ होऊं लागल्यामुळें लक्षावधि फ्रेंच् प्रॉटेस्टंट् (Huguenots) लोकांनीं देशत्याग केला. अशा रीतीनें इंग्लंड्ला आश्रयार्थ आलेल्या लोकांपैकीं रेपिन् हा एक असून तो पुढें इंग्लंड्मधून हॉलंड्मध्यें गेला व तेथें त्यानें इंग्लंड्चा इतिहास लिहिला. हा ग्रंथ १७२४ सालीं प्रसिद्ध झाल्यावर तो फार लोकप्रिय झाला. 'सम्पादक'

‖ David Hume (1711-1776) डेव्हिड् ह्यूम, विख्यात इतिहासकार व तत्त्वज्ञ. त्याचा इंग्लंड्चा इतिहास त्याच्या सर्वव्यापक अध्ययनामुळें चित्ताकर्षक झाला असून कित्येक वर्षें त्याच्या ग्रंथाला ऐतिहासिक वाङ्मयांत प्रमुख स्थान मिळालें होतें. 'सम्पादक'

कोठें परागंदा व्हावें असें वाटूं लागलें.[१] पण पुढें कांहीं काळानें वरील स्थितींत फेरफार पडला. त्याच्या गुणांकडे वाचकांचें विशेष लक्ष लागून वरील इतिहास अधिक खपूं लागला. तेव्हां ह्यूमनें टडचूर् घराण्याची कारकीर्द लिहिली; आणि सरतेशेवटीं जुलियस् सीजरच्या स्वारीपासून तों वरील घराण्याचा पहिला राजा सातवा हेन्‌री याच्या पर्यंतचा आधींचा इतिहास लिहून ग्रंथ पूर्ण केला. तर याप्रमाणें इंग्लंड्च्या समग्र इतिहासांत पहिल्यानें जो लोकमान्य झाला त्याची अशी हकीकत झाली.

ह्यूमच्या पुढें जे इंग्लंड्चे इतिहासकार झाले त्यांत अग्रगण्य म्हटले म्हणजे हॅलम् * व मेकॉले§ हे होत. हॅलम् यानें इंग्लंड्च्या राज्यरीतीचा इतिहास लिहिला आहे; म्हणजे सगळें जग जिच्या योगानें विस्मय पावत आहे अशी जी अधिकारत्रयात्मक अपूर्व राज्यसत्ता इंग्लंडास प्राप्त झाली आहे ती उत्पन्न कशी झाली, तींत कोणकोणते फेरफार कसकसे होत गेले, व सांप्रतचें स्वरूप तिला कसें आलें, हा सर्व वृत्तांत वरील इतिहासांत सांगितला आहे. मेकॉलेचा इतिहास वरच्या दोहोंहूनही व्यापक आहे. त्यांत राज्यप्रकरणाची हकीकत, राज्यरीतींत झालेले फेरफार, या गोष्टी तर मुख्य असून शिवाय विद्या, लोकसुधारणा, वगैरे हरएक विषयाची माहिती पूर्ण दिलेली आहे. इतिहास कसा असावा याविषयीं त्यानें पुष्कळ विचार केला होता, व आपल्या देशाच्या संबंधाची हरएक प्रकारची माहिती पहिल्यापासून मोठ्या आस्थेनें पुष्कळ मिळवून ठेवली होती. या सर्वांचें फळ सरतेशेवटीं वरील इतिहासाच्या रूपानें प्रगट झालें. मेकॉले हौस ऑफ् कॉमन्स् सभेमध्यें एडिन्बरो शहराच्या तर्फेनें मुकत्यार झाला होता; पण पुढें कांहीं कारणास्तव त्याच्या लोकांचें व त्याचें न पटून त्यानें वरील जागा सोडून दिली. यामुळें सरतेशेवटीं

---

१. त्यांचा स्वचरित्रांतील लेख येणेंप्रमाणें आहे—

"I was, I confess, discouraged; and had not the war at that time been breaking out between France and England, I had certainly retired to some provincial town of the former kingdom, have changed my name, and never more have returned to my native country."

* Henry Hallam (1779–1859). या विद्वान् इतिहासकाराची बिनचूक निष्पक्षपातीपणाबद्दल आणि साध्या स्पष्ट भाषासरणीबद्दल प्रसिद्धि आहे. Constitutional History of England शिवाय State of Europe during the Middle Ages, व Introduction to the Literature of Europe असे याचे आणखीहि प्रसिद्ध ग्रंथ आहेत. 'संपादक'

§ Macaulay, Thomas Babington, Lord. (1800–1859) व्हिक्टोरियन् युगांतील अत्यंत विख्यात इतिहासकार. याच्या बापानें गुलामगिरीविरुद्ध खूप चळवळ केली. हा कॅल्ने (Calne) तर्फे कांहीं वर्षें पार्लमेंटांत होता; व कलकत्त्याच्या Supreme Council चा पांच वर्षें सभासद होता. हिंदुस्तानांतून परत गेल्यावर एडिंबरोतर्फे हा पार्लमेंटांत गेला व आपल्या वक्तृत्वाच्या जोरावर नांव मिळवून १८५७ सालीं सरदार झाला. वारला व बापाच्या 'वेस्ट्मिन्स्टर् ॲबे'मध्यें पुरण्यांत आलें. 'Essays' व 'Lays of Ancient Rome' या ग्रंथांमुळें याची कीर्ति झालीच होती ती 'History of England' या ग्रंथानें ज्यास्तच पसरली. 'संपादक'

ह्या बारा वर्षें त्याचा बाकीचा सर्व व्याप सुटून तो इतिहासरचनेंत त्यास निर्वेध घालवतां आलीं. आपल्या इतिहासाचे त्यानें एकंदर पांच भाग काढले. त्यांपैकीं शेवटला त्याच्या मरणानंतर प्रसिद्ध झाला. हे पांच भाग मिळून सगळी पंधरा वर्षांची हकीकत आहे. ग्रंथकर्त्याचा मूळ संकल्प म्हटला म्हणजे सन १६८५ मधील दुसऱ्या जेम्सच्या कारकीर्दीचा आरंभ येथपासून तों त्या वेळच्या लोकांच्या आठवणीपर्यंत म्हणजे सुमारें १८५० सालापर्यंत घडलेला सर्व वृत्तांत लिहावयाचा असा होता. पण तो सिद्धीस जाणें अशक्यच होतें हें उघड आहे.[1] असो; वरील इतिहासास आरंभ होण्याच्या पूर्वीच मेकॉलेची कीर्ति चोहोंकडे पसरली होती व इंग्लंडचा इतिहास त्यानें लिहिला असतां तो किती चित्तवेधक होईल यासंबंधींही सर्वांची खात्री अगोदरच होऊन गेली होती. वास्तव तो प्रसिद्ध झाला असतां किती लोकप्रिय होऊन गेला असेल यांचें सहज अनुमान करतां येईल. पहिला भाग बाहेर निघाल्यापासूनच साऱ्या वाचकांच्या वरील इतिहासावर उड्या पडल्या; त्या अशा कीं, दुसरा भाग छापायाला जाण्याच्या अगोदरच पहिल्याच्या अकरा मोठमोठाल्या आवृत्ति निघून पार खपून गेल्या. यावरून पुढील भागांच्या खपाचेंही अनुमान करतां येईल. एकंदरींत वरील ग्रंथाचें उत्पन्न इतिहासकारास व छापणारांस जितकें झालें तितकें त्यापूर्वी कधींही कोणास झालें नसेल. लाँगमन्स् आणि कंपनी यांनीं एके प्रसंगीं प्रस्तुत ग्रंथकारास एक चैक् (हुंडी) दिला तो दोन लाख रुपयांचा! असो; तर याप्रमाणें मेकॉलेची इतिहासकार या संबंधानें सरतेशेवटीं मोठी कीर्ति होऊन अद्यापही ती कमी झाली आहे असें नाहीं.

आतां वरील तिघां इतिहासकर्त्यांची योग्यता व लोकमान्यता किती आहे, याविषयी जर विचार केला, तर तिघांचे तीन प्रकार आहेत असें आढळून येईल. ह्यूमचा जो इतिहास आहे त्यास आतां फारसें वजन नाहीं. त्यांत पुढील इतिहासवेत्त्यांनीं शेकडों चुका काढल्या आहेत, व आपल्या इष्ट मतांच्या पुष्ट्यर्थ वरील इतिहासकारानें प्रमाणग्रंथांचे आधार देतांना कसा लबाडीचा प्रकार केला आहे तोही सर्वांस विदित झालेला आहे; वास्तव इतिहासदृष्ट्या ह्यूमच्या ग्रंथाची आतां विशेष मातब्बरी राहिली नाहीं. तो मोठा बुद्धिमान् व चतुर होता, यास्तव त्यानें जागोजाग जे गहन विचार प्रदर्शित केले आहेत व कथानकाची मोठी मनोरम रचना केली आहे, त्याकडेच विशेषतः लक्ष देऊन त्याचा इतिहास सध्यां लोक वाचतात, तरी वरील गुणांत व विशेषतः भाषापद्धतींत वरील इतिहास इतका उत्कृष्ट आहे कीं, त्याची सर थोड्याच ग्रंथांस येईल. ह्यूम हा स्कॉट्लंडांत

---

१. मेकॉलेच्या इतिहासाच्या आरंभींचें वाक्य हें आहे—

"I purpose to write the history of England from the accession of King James II down to a time which is within the memory of living men."

या मूळ संकल्पाप्रमाणें म्हटलें म्हणजे वरील इतिहास आटपण्यास निदान शंभर सव्वाशें वर्षें व शंभर दीडशें भाग हवे होते!!

जन्मला असून त्यास इंग्लिश् भाषा इतकी उत्तम साधली हें त्याच्या बुद्धिविशेषाचें दर्शक आहे. येवढा इतिहासकार गिबन्, व त्यांतून खुद्द इंग्लंडांत जन्मलेला, तरी त्यानेंही वरील रचनागुणांत ह्यूमच्या पुढें हात टेकले! असो; हॅलमची जी कीर्ति आहे ती त्याच्या इतिहासाच्या बाह्यस्वरूपावर मुळींच नाहीं. त्याची भाषापद्धति प्रौढ, सभ्य, गंभीर अशा तऱ्हेची आहे. तींत इतर दोघां इतिहासकारांच्या सारखा चटकदारपणा ह्मणण्यासारखा मुळींच नाहीं. पण सर्व ग्रंथकारांस, व त्यांतून इतिहासकारांस, अत्यंत आवश्यक जो निःपक्षपाततारूप गुण तो हॅलमच्या ग्रंथांत पूर्ण आढळतो.[1] या विरल व अमोलिक गुणास्तव, आणि त्याच्या प्रचंड विद्वत्तेस्तव, वरील ग्रंथकाराची मान्यता मोठी आहे. त्यानें तीनच ग्रंथ केले आहेत;[2] पण ते सर्वानुमतें त्या त्या विषयांत प्रमाणभूत होऊन राहिले आहेत. आतां राहिलेला इतिहास जो मेकॉलेचा त्याविषयीं येथें कांहीं विशेष लिहिण्याची गरज नाहीं. गेल्या अंकाच्या शेवटीं* वरील ग्रंथकाराचे जे सामान्यतः गुणदोष सांगितले आहेत तेच वरील इतिहासासही लागतात. मेकॉलेची कल्पनाशक्ति त्याच्या विवेचनशक्तीहून प्रबळ होती; व त्याच्या ज्ञानाचा विस्तार जेवढा होता त्याच्या मानानें त्याची गहनता नव्हती. यास्तव वरील इतिहासांत भाषालालित्याचे वगैरे गुण जरी

---

१. हॅलमचा इंग्लंडचा इतिहास वर सांगितलाच आहे. त्याविषयीं वरील गुणाच्या संबंधानें मेकॉलेनें पुढील तारीफ केलेली आहे—

" His work is eminently judicial. Its whole spirit is that of the bench, not that of the bar. He sums up with a calm, steady impartiality, turning neither to the right nor to the left, glossing over nothing, exaggerating nothing, while the advocates on both sides are alternately biting their lips to hear their conflicting misstatements and sophisms exposed. On a general survey we do not scruple to pronounce the ' Constitutional History ' the most *impartial* book that we ever read.........For cold rigid justice, the one weight and the one measure, we know not where else we can look."

*Essays* Vol. I.

असलें रागद्वेषशून्यत्वाचें कडकडीत व्रत धारण करण्याची शक्ति किती थोड्यांत असते, आणि इच्छा तर त्याहूनही किती थोड्या मनुष्यांस असते!

२. यांपैकीं एकाविषयीं तर वर लिहिलेंच. बाकीचे दोन 'मध्यम कालाचा इतिहास' ह्मणजे प्राचीन ग्रीक् व रोमन् लोकांच्या वेळची सुधारणा बुडून ती अर्वाचीन काळीं पुनः उदयास येण्याच्या मध्यंतरीं जो काळ गेला त्याचा इतिहास; आणि 'युरोपीय भाषांतील ग्रंथसंग्रहाचें निरूपण' हे होत. हे दोन्ही विषय, आणि त्यांतून दुसरा, यांचें विवेचन करणें ह्मणजे केवढ्या श्रमाचें व केवढ्या बुद्धीचें काम आहे याचा सर्वांस सहज अजमास होईल. तरी असल्या विषयांवरही हॅलम् यानें अशी ग्रंथरचना केली आहे कीं, ती सर्वांस तत्क्षणींच मान्य होऊन अद्यापही तसले ग्रंथ झाले नाहींत. वरील प्रत्येक तयार होण्यास सुमारें दहा दहा वर्षे लागलीं!

'सम्पादक'

* पृष्ठें ५६९–५७१ पाहा.

त्यानें सर्वोत्कृष्ट प्रगट केले आहेत, व आपली तन्हेतन्हेची सर्व माहिती जरी भरपूर ओतून दिली आहे, तरी उत्कृष्ट इतिहासाचीं जीं प्रधान लक्षणें आहेत त्यांपैकीं कांहीं मुख्य मुख्य त्यांत सांपडत नाहींत. एक तर मागें सांगितलेली निःपक्षपातता. या गुणाचा अभाव प्रस्तुत इतिहास अगदीं लहान आहे तरी तेवढ्यांतही अगदीं स्पष्ट दिसत आहे. दुसरा गुण गहनार्थता. हाही वरील इतिहासांत ह्मणण्यासारखा आढळत नाहीं. प्रस्तुत विषय मेकॉलेच्या प्रीतीचें व अभिमानाचें येवढें स्थान असतां, व त्यावर त्यानें साऱ्या जन्मभर शोधपूर्वक अतिशय विचार केला असतां, पूर्वीच्या इतिहासांतून न आढळणारे असे नवे व गहन विचार त्यानें कोठेंही प्रगट केलेले दृष्टोत्पत्तीस येत नाहींत. फार तर काय, पण सांप्रत इतिहासाचें एकंदर धोरण पाहिलें तर हॅलमूचेच विचार व मतें मेकॉलेनें उचलली आहेत असें दिसून येईल. असो; तरी एकंदरींत पाहतां या शेवटल्या ग्रंथांत जे कित्येक उत्कृष्ट गुण आहेत त्यांत तो केवळ अप्रातिम आहे यांत संशय नाहीं.

६. याप्रमाणें प्रस्तुत विषयाचें एक सदर झालें. दुसरें सदर अर्वाचीन युरोपियन् राष्ट्रांचा इतिहास. आलीकडे दोन तीन शतकें युरोपांतील साऱ्या राष्ट्रांचें व्यापाराच्या योगानें व राजकारणामुळें परस्पर दळणवळण अधिकाधिक वाढत जाऊन यापुढें तर इकडील देशही त्या भ्रमणांत जणार असा सुमार दिसत आहे. असें झाल्यामुळें दूरदूरच्या राष्ट्रांसही परस्परांचें ज्ञान विशेष होत चाललें आहे; व तें होण्याविषयीं उत्कंठा वाढत चालली आहे, हें उघड आहे. यास्तव युरोपांतील सर्व भाषांत इतर देशांचे इतिहास जसे रचलेले आहेत त्याप्रमाणेंच इंग्रेजी भाषेंतही ते आहेत. या ग्रंथांपैकीं कित्येक मोठ्या मान्यतेस चढलेले आहेत; पण मराठी वाचकांस त्यांचा निर्देश विशेष उपयोगाचा नसल्यामुळें तो येथें करीत नाहीं. तसेंच हें सदरही एकंदरींत एतद्देशीयांस विशेष महत्त्वाचें नसल्यामुळें त्याविषयीं आणखी कांहीं लिहीत नाहीं.

७. यापुढील भाग प्राचीन ग्रीक् व रोमन् लोकांचा इतिहास. इकडे एशिया खंडांत ज्याप्रमाणें आर्य शाखेच्या लोकांनीं सुधारणा पसरली त्याप्रमाणें तिकडे युरोपांतही त्याच शाखेचीं वरील दोन राष्ट्रें ज्ञानोत्कर्षाच्या स्थितीस पावून इतरांस अज्ञानदशेंतून वर काढण्यास कारण झालीं. त्यांत विशेष मान झटला ह्मणजे पहिल्या राष्ट्रासच देणें योग्य आहे. कारण रोमन् लोकांची विद्या मूळची ह्मणण्यासारखी विशेष नसून सारी ग्रीक् लोकांपासूनच ग्रहण केलेली होती. इतकें मात्र त्यांनीं केलें कीं, त्यांनीं तिचें रक्षण करून ती थोडबहुत वाढवली. आणि त्यांचें राज्य चोहोंकडे अवाढव्य पसरून तें फार दीर्घकाळ टिकल्यामुळें वरील विद्येचा फैलावा होऊन दूरदूरच्या देशांतही तिचा उत्कर्ष झाला. पुढें कांहीं काळानें रानटी लोकांनीं वरील बादशाही मोडून टाकून जिकडे तिकडे अज्ञानाचें व दुराचाराचें प्राबल्य पुनः करून दिलें. पण सोळाव्या शतकांत प्राचीन विद्येचें जें पुनः सर्वत्र संजीवन झालें त्याच्या योगानें सर्व युरोपभर वरील दोन राष्ट्रांस पुनः मान मिळूं लागला. सध्यां युरोपखंडांत सुधारणेचा अतिशय फैलावा होऊन तिचें पाऊल दिवसांदिवस पुढेंच जें पडत

चाललें आहे त्यास आरंभ झटला ह्मणजे वरील काळापासूनच आहे.[१] त्याच्यापूर्वी चोहों-कडचा प्रकार झटला ह्मणजे मारामारी व बेबंद पाच्छाही हाच होता. असो; तर याप्रमाणें ग्रीक् व रोमन् लोक हे अर्वाचीन युरोपियन् राष्ट्रांस सर्व प्रकारें सन्मानार्ह होत; व वास्तवच त्यांचे इतिहास सर्वत्र प्रसिद्ध असून सर्वांच्या पूज्यतेस व प्रीतीस पात्र झाले आहेत. इंग्लंडांतही तसाच प्रकार आहे. तेथील विद्यालयांतून ग्रीक् व रोमन् ग्रंथकारांचें अध्ययन अद्यापही प्राधान्येंकरून चालत आहे; व इंग्लिश् भाषेंत मोठमोठ्या नामांकित ग्रंथकारांनीं प्रस्तुत विषयावर सर्वमान्य रचना केलेली आहे. आतां या ग्रंथांपैकीं जे अत्यंत प्रसिद्ध आहेत त्यांचें कांहीं निरूपण करतों.

८. रोमन् लोकांच्या इतिहासावर अत्यंत विख्यात ग्रंथकार झटले ह्मणजे आर्नोल्ड्* व गिबन्¶ हे होत. आर्नोल्ड् यानें प्रस्तुत इतिहासाच्या पूर्वभागावर ग्रंथरचना केली आहे. त्याचा मूळ संकल्प इ० स० ४७५ ह्मणजे रोमच्या[२] बादशाहीचा शेवट, येथपर्यंत इतिहास लिहिण्याचा होता; पण तो अकस्मात् मृत्यूच्या तडाक्यांत सांपडल्यामुळें त्याचा तो ग्रंथ अर्धामुर्धाच राहिला. तीन भागांत कार्थेजची दुसरी लढाई काय ती सरासरी संपली. पुढील पांच सहा शतकांचा इतिहास तसाच राहिला. तो दुसऱ्या एका इतिहासकारानें बराच पुढें नेला आहे. असो; आर्नोल्ड्चा इतिहास मोठा मनोवेधक लिहिला आहे. भाषा-पद्धति प्रौढ व झोंकदार असून आंतील अर्थही तसाच चित्तास लागण्यासारखा आहे; शिवाय ग्रंथकाराची वृत्ति मोठी गंभीर व धर्मपरायण होती, यास्तव तिची छाया ही प्रस्तुत इति-

---

१. ही गोष्ट इतकी स्पष्ट असतांही पाश्चात्य पंडितांस विशेष मान्य नाहींशी दिसते. कित्येकांच्या ठायीं तर इतका दुराग्रह किंवा असमंजसपणा दृष्टीस पडतो कीं, ख्रिस्ती धर्मामुळेंच सगळें युरोप सुधारलें असें सुद्धां मत ते प्रदर्शित करतात, आणि प्राचीन ग्रीक् व रोमन् यांकांचें गुरुत्व झुगारून देऊन त्यांहून आपलें वर्चस्व मिरवतात. पण ख्रिस्ती धर्माचें सर्व प्रकारें गौरव करणारांनीं व अर्वाचीन युरोपियन् राष्ट्रांचें वैभव गाणारांनीं त्या खंडाची पंधराव्या शतकापर्यंतची स्थिति जर मनांत आणली, तर खरी गोष्ट तेव्हांच लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. युरोपाच्या जड संपत्तींतून एशिया-खंडानें व अमेरिकेनें आपापला भाग जर माघारा काढून घेतला, व बुद्धिरूप संपत्तींतला ग्रीक्, रोम, हिंदुस्थान, अरबस्थान यांनीं आपापला अंश हरण केला, तर बिचाऱ्या युरोपाचें अर्थभांडार व ज्ञानभांडार एकदम किती उघडें दिसूं लागेल ! !

*Thomas Arnold, D. D. (1795–1842) रग्बी येथील शाळेचा हेड् मास्तर. हा धार्मिक प्रवृत्तीचा, प्रेमळ आणि विद्वान् असून याच्यावर विद्यार्थ्यांचें फारच प्रेम असे. ऑक्स्फोर्ड्ला त्यानें आधुनिक इतिहासावर दिलेलीं व्याख्यानें फारच चांगलीं वठल्यामुळें तीं पुढें पुस्तकरूपानें प्रसिद्ध करण्यांत आलीं. यानें रोमच्या इतिहासावरहि एक ग्रंथ लिहिला आहे. 'सम्पादक'

¶ Edward Gibbon (1737–1794) हा पार्लमेंटांत Liskeard तर्फे प्रतिनिधि म्हणून आठ वर्षे होता. 'Decline and Fall of the Roman Empire' हा याचा इतिहासग्रंथ फार प्रसिद्ध आहे. 'सम्पादक'

२. रोमच्या अवाढव्य राज्याचे चवथ्या शतकांत दोन भाग झाले; एक पूर्वेकडील बादशाही, व एक पश्चिमेकडील. पहिलीची राजधानी कॉन्स्टांटिनोपल्, ज्यास पुढें मुसल्मान लोक कुस्तुनतुनिया ह्मणूं लागले; आणि दुसरीचें मुख्य शहर रोम. हीं दोन्ही राज्यें इ० स० ४७५ आणि १४५३ या सालीं लयास गेलीं. याप्रमाणें रोमची सत्ता एकंदर चांगली २००० वर्षे टिकली ! !

हासांत प्रगट झाली आहे तीही सर्व वाचकांस, व विशेषत: तरुण असतील त्यांस, मोठी हितावह होय. या सर्व गुणांनीं, व इतिहासकाराचें इतर कित्येक गोष्टींच्या संबंधानें जें चोहोंकडे अतिशय वजन होतें त्यामुळें, वरील ग्रंथ तेव्हांच लोकांस प्रिय झाला; व त्या विषयावर तसा ग्रंथ अद्याप न झाल्यामुळें पुढेंही दीर्घ काळ त्याची ख्याति चालत राहील असा सुमार दिसतो. असो; पण वरील इतिहासकाराहून पुढें सांगायाचा जो गिबन् त्याची योग्यता तर फारच मोठी आहे. त्याच्या तोडीचे इतिहासकर्ते आजपर्यंत या जगांत एकंदरींत पाहतां थोडेच झाले आहेत; व इंग्लंडांत तर कोणीच झाला नाहीं ह्मटलें असतां चालेल. यानें मागें सांगतलेल्या ह्यूमप्रमाणें आपल्याच हातानें आपलें चारित्र लिहून ठेवलें आहे; व त्यावरून त्याच्या अभ्यासाचा प्रकार, त्याचीं धर्मसंबंधीं वगैरे मतें, त्याच्या सर्वप्रसिद्ध इतिहासाची कल्पना त्याच्या मनांत पहिल्यानें कोठें व कशी उद्भवली, तो शेवटास कोठें गेला, वगैरे अनेक चमत्कारिक गोष्टींविषयीं त्यानें मजकूर लिहून ठेवला आहे. गिबन् हा, 'जॉन्सन्चा क्लब्' ह्मणून एक मंडळी जी मागें एके अंकांत (अं.२३ पृ.३१५ टीप पाहा. सं०) सांगितली आहे तिचा सभासद होता. यावरून त्याची इतिहास लिहिण्यापूर्वींही विद्वन्मंडळांत केवढी गणना होती ती स्पष्ट दिसते. गिबन् पहिल्यानें प्रॉटेस्टंट् धर्मांतला होता; पण पुढें त्याच्या वाचण्यांत क्याथलिक् मताचे कित्येक नामांकित ग्रंथ आल्यामुळें त्याची वृत्ति बदलून तो क्याथलिक् झाला. पुढें कांहीं काळानें त्याच्या बापानें प्रॉटेस्टंट् धर्माच्या अध्यक्षांच्या स्वाधीन त्यास केल्यानें त्याची बुद्धि पुन: फिरून तो आपल्या मूळच्या पंथास अनुसरला.[2] याप्रमाणें पूर्ववयांतच प्रस्तुत ग्रंथकाराची धर्मविषयक मतांत चलबिचल झाली होती. पण पुढें लवकरच व्हॉल्टेरप्रभृति§ पाखंडवादी ग्रंथकारांची त्यास आवड लागून ' सब् झूट है ' ह्मणून दोन्ही पंथ

---

१. आर्नोल्ड् याचें विद्वत्तेच्या संबंधानें जें वजन होतें तें त्याच्या वर्तनानें तर फारच वाढलें होतें. हा एका शाळेचा शिक्षक असून ती त्यानें मोठ्या उत्कृष्ट दशेला आणून सोडली. त्याच्या शिष्यांची त्यावर अतिशयित भक्ति होती: व तेही पुढें त्याच्यासारखे सदाचरणी व भक्तिमान् होऊन मोठ्या योग्यतेस चढले. प्रस्तुत इतिहासकाराचे शालानियमनाविषयीं कित्येक उत्कृष्ट लेख आहेत.

२. वरील धर्मांतराचे प्रकार युरोपांत पुष्कळ मोठमोठ्या विख्यात मनुष्यांचे घडले आहेत. त्यांत एक मोठा मौजेचा आहे ह्मणून सांगतों. रेनॉल्ड्स् या नांवाचे दोघे भाऊ इंग्लंडांत होते. त्यापैकीं एक पक्का क्याथलिक् व दुसरा पक्का प्रॉटेस्टंट् होता. यांचा एके प्रसंगीं मोठा कडाकडीचा वाद होऊन मौज काय झाली, कीं क्याथलिक् होता तो प्रॉटेस्टंट् झाला, व प्रॉटेस्टंट् होता तो क्याथलिक् झाला.

§ Voltaire, Frangois Marie Arouet de (1694–1778) विख्यात फ्रेंच् तत्त्वज्ञानी व ग्रंथकार. पहिल्या निबंधामुळें अधिकारी चिडले म्हणून हा दोन वर्षें इंग्लंडांत पळून गेला. परत फ्रान्सला आल्यावर यानें लिहिलेलें पुस्तक 'Philosphical Letters' हें इतकें कडक होतें कीं तें धर्मोपाध्यायांनीं (Priests) सार्वजनिकरीत्या जाळलें. इ. स. १७५० ते १७५३ पर्यंत तो बर्लिन् येथें फ्रेड्रिक् दि ग्रेट् याच्या निमंत्रणावरून राहिला. Discourses on Man, Essays on the Morals and Spirit of Nations, Age of Louis XIV हे याचे सर्वोत्तम ग्रंथ होत. 'सम्पादक'

त्यानें झुगारून दिले; आणि वरील फ्रेंच् पंडिताची धर्मविडंबनरूप दीक्षा ग्रहण केली. ही त्याच्या इतिहासांत त्यानें चोहोंकडे पूर्णपणें चालवली आहे. असो; वरील नामांकित इतिहासाचा पहिला भाग १७७६ त प्रसिद्ध झाला. या ग्रंथाचा संकल्प गिबन् यानें बारा वर्षे अगोदर करून ठेवला होता. तो प्रसंग त्यानें आपल्या चरित्रांत येणेंप्रमाणें सांगितला आहे. "सन १७६४ च्या आक्टोबर महिन्याच्या १५ तारखेस रोम येथें कॅपिटॉल्च्या जुन्या मोडकळीस आलेल्या इमारतीपाशीं मी संध्याकाळचा हवा घेत मजेनें बसलों होतों. त्या वेळेस जुपिटर्च्या देवालयांत मठवासी लोक सायंकाळचीं गीतें म्हणत होते. अशा समयीं त्या शहराच्या सत्तेचा ऱ्हास व्हावयाला लागून तिचा लय कसा झाला याविषयींचा इतिहास लिहिण्याची कल्पना माझे मनांत उद्भवली." या कल्पनेचें बर सांगितल्याप्रमाणें कालांतरानें फळ दृष्टीस पडलें. हा पहिला भाग गिबन् इंग्लंडांत असतां छापला गेला. तो निघतांच सर्व वाचकांची उत्कंठा इतकी प्रबळ झाली कीं पहिल्या आवृत्तीचा तेव्हांच फडशा पडून दुसरी व तिसरी काढली तरी ती पुरेशी होईना. ऐर्लंडांत तर दोन आवृत्ति चोरून छापून विकल्या. याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथ तेव्हांच लोकांस अत्यंत मान्य होऊन मोठमोठ्यांनींही त्याविषयीं अनुकूल अभिप्राय प्रगट केला. एके ठिकाणीं मात्र तो अतिशयित अप्रिय होऊन द्वेषास व मत्सरास कारण झाला. हें स्थान पाद्रीमंडळ होय. या मंडळाची कृति जेथें तेथें एक दृष्टीस पडते. ती ही कीं, तोंडानें मात्र सत्याच्या प्रीतीविषयीं व अभिमानाविषयीं मोठाल्या वल्गना करायाच्या, आणि हातून होईल तितका त्यास अवरोध करायाचा; तसेंच बाहेरून ख्रिस्त-प्रभूच्या शांतीचें व दयाशीलतेचें पांघरूण दाखवून आंतून अत्यंत दुष्ट मनुष्याच्या हातून व्हावयाचीं नाहींत असलीं कृत्यें करायाचीं. असो; तर वरील धार्मिक वाचकांस मात्र वरील ग्रंथ अगदीं दुःसह होऊन गेला. त्यांतून त्यांतील पंधरावा व सोळावा भाग तर त्यांस भारी वाईट लागला. या भागांत इतिहासकारानें ख्रिस्ती धर्माच्या प्रसाराचीं कारणें लिहिलीं आहेत. हीं कारणें पाद्री साहेबांच्या मतें अशीं असायाचीं होतीं कीं, सदरील धर्म देवाच्या पुत्रानें मुद्दाम अवतार धारण करून स्थापला, मोठमोठे चमत्कार प्रत्यक्ष करून दाखवले, व 'आकाशांतील बापा'ची इच्छा फार दिवस तशी असून तसें त्यास करणें होतें, म्हणूनच ख्रिस्ती धर्माचा उत्कर्ष झाला. पण वरील वेड्या इतिहासकारास हीं रहस्यें न कळून त्यानें केवळ ऐहिक व व्यावहारिक कारणांनींच वरील गोष्टींची उपपत्ति करण्याचा यत्न केला. यास्तव वरील धार्मिक लोकांपैकीं कित्येकांनीं त्याचा भ्रम दवडण्याकरतां हातांत लेखणी धरली. पण मानवी जातीच्या दुर्दैवामुळें वरील सर्व मोलवान् ग्रंथ काळानें त्यांच्या कर्त्यांबरोबरच गिळून टाकले. नांव घेण्यास त्यांपैकीं, एक मात्र अंमळसा तगून राहिला आहे; तो बिशप् वॉट्सन् यानें केलेला होय. असो; तर याप्रमाणें सदरील इतिहासास प्रथमारंभींच लोकमान्यता प्राप्त होऊन दूषकांनींही आपल्याकडून त्यावर पुष्कळ भडिमार केला; पण सूर्याचें तेज अंमळ प्रखर होत चालल्याबरोबर ज्याप्रमाणें धुकें विरून जातें, त्याप्रमाणें वरील प्रतिपक्षिसमूह लवकरच हतवीर्य होऊन त्याच्यानें गिबन्च्या कीर्तीच्या वेगास प्रतिबंध करवेनासा झाला. पुढें तीन तीन चार चार वर्षांच्या अंतरानें त्याच्या इतिहासाचा दुसरा,

तिसरा व चवथा असे भाग छापून प्रसिद्ध झाले. यांचा प्रसार तर पहिल्याहूनही अधिक व त्वरित झाला; व गिबन्ची साऱ्या युरोपभर अप्रतिम इतिहासकार म्हणून ख्याति झाली. याप्रमाणें ज्या प्रचंड उद्योगाची उगीच कल्पना सन १७६४ त उद्भवली होती तो त्यानंतर तेवीस वर्षांनीं समग्र सिद्धीस गेला ! या समाप्तीच्या समयींचाही लेख मूळ आरंभाप्रमाणेंच मोठा चमत्कारिक आहे. गिबन् हा शेवटीं शेवटीं इंग्लंड् सोडून स्वित्सर्लंड् देशांत लॅसेन या गांवीं जाऊन सुखवस्तु राहिला होता. तेथील बंगल्यांत त्याचा ग्रंथ संपूर्ण झाला. तो येणेंप्रमाणें—"या ग्रंथाच्या सरतेशेवटच्या पृष्ठांतील सरतेशेवटल्या ओळी ज्या मीं लिहिल्या त्या १७८७ सालच्या जून महिन्याच्या २७ वे तारखेस मध्यरात्रीं अकरा बाराच्या दरम्यान आपल्या बागेंतील बंगल्यांत लिहिल्या. त्यानंतर पेन खालीं ठेवून मी बागेंतील मंडपांत अंमळ इकडे तिकडे फिरलों. त्या वेळेस हवा मजेदार होती, आकाश निरभ्र होतें, चंद्र चांगला प्रकाशला असून त्याचें प्रतिबिंब पाण्यांत पडलें होतें, आणि भोंवतालचा सर्व प्रदेश, पर्वत आणि सरोवर हीं अगदीं स्तब्धशीं दिसत असून चोहोंकडे शांत होतें ! या वेळेस इतक्या दिवसांचें ओझें उतरून मी मोकळा झालों याबद्दल व माझी कीर्तिही कदाचित् चिरकाळ स्थापित झाली हें मनांत येऊन मला पहिल्यानें कांहीं वेळ मोठा आनंद वाटला खरा; पण लवकरच ती आनंदाची व उत्साहाची वृत्ति जाऊन माझें मन किंचित् उदास झालें. मला असें वाटलें कीं, आज वीस वर्षें ज्या मित्राच्या संगतीनें मीं मोठ्या मौजेनें काळ काढला तो मला आतां चिरकाळ अंतरला; आणि माझ्या इतिहासाची पुढें कितीही मर्यादा असली, तरी माझी स्वतःची मुदत यापुढें थोडीच उरलेली असावी."—गिबन् पुढें सात वर्षांनीं मरण पावला.

प्रस्तुत इतिहासाची गणना केवढी मोठी आहे याविषयीं वर सांगितलेंच आहे. आतां प्रसंगवशात् त्याच्या स्वरूपाचें येथें अंमळ विशेष कथन करतों; तेणेंकरून त्याची येवढी प्रसिद्धि असण्याचें कारण काय तें आमच्या वाचकांच्या विशेष लक्षांत येईल. प्रस्तुत ग्रंथांत सुमारें दीड हजार वर्षांची हकीकत आहे; व येवढ्या प्रचंड काळांत ज्या जबरदस्त उलाढाली झाल्या त्या सर्वांचें यांत यथासांग रेखल्यासारखें वर्णन आहे. पहिल्यानें एक तर रोमच्या राज्याचा इतिहास. रोमन् लोकांच्या मोठमोठ्या सरदारांनीं व मुत्सद्द्यांनीं सगळ्या पृथ्वीवर जी राज्यरूप अवाढव्य इमारत कित्येक शतकें सतत प्रयत्न करून उभारली होती ती सरतेशेवटीं मोडकळीस येऊन गॉथ्, हन्, गॉल् वगैरे* राष्ट्रांनीं व नवे

* Goths गॉथ्स् हे लोक मूळचे ट्यूटॉनिक् (Teutonic)—जर्मन् वंशाचे असून बाल्टिक् प्रांतांतून मध्य युरोपांत उतरले. व युरोप खंडाचा भाग काबीज केल्यामुळें चवथ्या पांचव्या शतकांत यांस फार महत्त्व आलें होतें. अॅलेरिक्च्या (Alaric) पुढारीपणाखालीं त्यांनीं इ. स. ४१० मध्यें ग्रीस व रोम पादाक्रांत केलीं. त्या वेळीं हे लोक Visigoths व्हिसिगॉथ्स् या नांवानें प्रसिद्ध होते. पुढें आठव्या शतकांत हे स्पॅनिश् जातींत लुप्त झाले. Huns हन्स्–आशियाटिक् लोक; यांनीं चवथ्या शतकांत पूर्व युरोपवर स्वारी करून व्होल्गा (Volga) व डॉन् (Don) या नद्यांमधील सर्व प्रांत काबीज केला. त्यांचा पुढारी Attila हा होता. त्यांनीं गॉथ्सचा पराजय करून रोमन् लोकांकडून खंडणीहि वसूल केली. पण इ. स. ४५४ मध्यें त्यांचा पुढारी नष्ट झाल्यावर त्यांचा पूर्ण

उत्पन्न झालेले जे अरब, तुर्क, मोगल यांनीं होतों होतो अगदीं जमिनीस मिळवून टाकली,—या सर्व प्रकारांचें वर्णन हें प्रकृत इतिहासाचें मुख्य संविधानक होय. नंतर याच्या पोटांत पृथ्वीवर नवे उत्पन्न झालेले जे दोन मोठे धर्म—एक ख्रिस्ताचा व दुसरा महंमदाचा—त्यांच्या उत्पत्तीचा व प्रसाराचा वगैरे वृत्तांत; वर सांगितलेल्या अज्ञान व रानटी राष्ट्रांचें भ्रमण, युद्धप्रसंग इत्यादिकांचें कथन; 'धर्मयुद्धें'§ म्हणून जें एक वेड युरोपांत कित्येक शतकें इतकें पिकलें होतें त्याची हकीकत; शिवाय निरनिराळ्या देशांचें वर्णन, तेथील लोक, रीतभात, विद्याकला वगैरेविषयीं माहिती—या सर्व गोष्टी वरील मुख्य इतिहासास अंगभूत होत. या सर्वांचें निरूपणही मुख्य कथानकाप्रमाणेंच इतिहासकारानें शेंकडों ग्रंथांतील माहिती एकत्र करून यथास्थितपणें केलें आहे; व यांतही असा रस आणला आहे कीं, मुख्य इतिहासाप्रमाणेंच यांच्या वाचनाचाही वाचकांस बिलकुल कंटाळा येत नाहीं. सारांश, प्रस्तुत इतिहासकारानें आपल्या महानाटकाचें लांबच लांब कथासूत्र येवढें दीर्घकाळ सतत हातांत वागवून त्यांत यत्किंचितही गुंतागुंत होऊं न देतां तें क्रमाक्रमानें सगळें साफ उलगडलें, आणि आपल्या असंख्य पात्रांचे असंख्य खेळ भूमंडलरूप महारंगाच्या अनेकांविध स्थलीं—म्हणजे आतां रोम शहरांत, तर अंमळशानें मक्केंत, आणि तिसऱ्यांदा इंग्लंडांत—याप्रमाणें दाखवले आहेत, यावरून त्याचें आटोकाट ज्ञान व अपूर्व रचनाचातुर्य हीं लक्षांत येऊन मन अगदीं थक्क होऊन जातें[१] !

आतां ग्रीसच्या इतिहासाविषयींही थोडेंसें लिहून सदरील अंक आटपतों. इतिहास लिहिण्याची खरी तऱ्हा या देशांत पहिल्यानें पूर्णत्वास पावून येथून ती युरोपभर पसरली याविषयीं, व या देशांत झालेल्या नामांकित इतिहासकारांविषयीं, मागें सहाव्या अंकांत* कांहीं माहिती दिलीच आहे. तीवरून वाचकांस कळेल कीं, बाकी सर्व देशांच्या इतिहासांपेक्षां वरील देशाचा इतिहास लिहिण्यास मोठ्या उत्कृष्ट सोयी आहेत. त्या अर्थातच या कीं, एरवीं जशी इतिहासाची सामग्री मिळवावी लागते, आणि मग त्यांतून तथ्य काढावें लागतें तसें तेथें मुळींच करणें न पडून सगळें आयतें तयार आहे; व शिवाय कित्येक इतिहास त्या त्या वेळचे लिहिलेले असल्यामुळें व लिहिणारे मोठे बुद्धिमान् व प्रामाणिक असल्यामुळें तर त्यांस विशेषच योग्यता आली आहे. असो; तर प्रस्तुत इतिहासावर पंच

---

पराभव झाला व त्यांस पळून जावें लागलें. आतां त्यांचे वंशज कोण याचा पत्ताहि लागत नाहीं. Gauls गॉल्स्. आधुनिक फ्रान्स, जर्मनी, बेल्जम्, स्विट्झर्लंड्, व नेदर्लंड्चा कांहीं भाग इतक्या सर्व प्रदेशाला पूर्वीं गॉल् म्हणत असत. तेथील रहिवाशी ते गॉल्स्. 'सम्पादक'

§ Crusades. मागें पृष्ठ ५३१ टीप ¶ पाहा. 'सम्पादक'

१. गिबन्च्या इतिहासांतही आलीकडील कित्येक फ्रेंच् व जर्मन् पंडितांनीं कांहीं कांहीं चुका काढल्या आहेत. पण त्या अगदीं थोड्या असून त्यांच्या योगानें इतिहासाची योग्यता मुळींच कमी होत नाहीं. रोमच्या इतिहासाच्या उत्तरार्धावर अशा प्रकारचा ग्रंथ पूर्वीं युरोपांत कोणताच नसून गिबन्च्या ग्रंथास पहिल्यापासून जें अढळ स्थान मिळालें आहे तें अद्याप असून पुढेंही चिरकाल तसेंच राहील यांत कोणासही संशय वाटत नाहीं !

* हिरॉडोटस्, थुसिडिडीज् व झिनोफोन. पृष्ठें ५७–५८ पाहा. 'सम्पादक'

करणें हें वरील कारणांमुळें सोपें होऊन युरोपांतील सर्व भाषांत तो झाला आहे. इंग्लंडांतही चालू शतकांत या विषयाकडे लोकांचें विशेष लक्ष लागून त्यावर कांहीं मोठाले ग्रंथ होऊन ते लोकमान्य झाले आहेत. त्या सर्वांच्या शेवटला जो ग्रोटचा* सर्वप्रसिद्ध इतिहास तो उत्कृष्ट मानतात. हा ग्रंथकार नुकता कांहीं वर्षांपूर्वी मृत्यु पावला. हा घरचा मोठा संपन्न होता; याचा बाप नामांकित सावकार असून तें काम यानेंही कांहीं दिवस स्वतः केलें¹. पुढें कांहीं वर्षें ग्रोट हा लंडन् शहरच्या तर्फेचा मुकत्यार म्हणून पार्लमेंटांत सभासद होता. पण पुढें तीही जागा सोडून देऊन वर सांगितलेल्या इतिहासाचेंच काम त्यानें हातांत घेतलें. तें तडीस नेण्यास त्यास गिबन्प्रमाणेंच चांगलीं वीस वर्षें लागलीं. हा इतिहास अगदीं पहिल्यापासून तों शिकंदर बादशहाच्या मृत्यूपर्यंत आहे. याचे एकंदर बारा भाग आहेत. ग्रोट हा मिल् वगैरेंच्या मंडळींत होता, व 'वेस्ट्मिन्स्टर् रिव्यु'मध्यें त्याचे निबंध असत याविषयीं मागील अंकांत$ लिहिलेंच आहे, त्यावरून त्याच्या मतांचा एकंदर झोंक लक्षांत येईलच. तो प्रस्तुत इतिहासांतही आढळतो. तरी एकंदरींत सर्वांनुमतें हा इतिहास सप्रमाण व निःपक्षपातपणानें लिहिलेला असा धरला आहे. मागील कांहीं इतिहासांप्रमाणें सत्याचा अपलाप, अत्युक्तिरूप वर्णन, किंवा अप्रमाण उल्लेख इत्यादि केल्याचा आरोप त्यावर अद्याप बिलकुल आलेला नाहीं. तशीच त्याची रचना मनोवेधक असल्यामुळें व ग्रीक् लोकांची त्या त्या वेळची स्थिति यांत मोठी उत्कृष्ट दाखवल्यामुळेंही तो पंडितमान्य व सर्वजनप्रिय असा झाला आहे. ही त्याची प्रसिद्धि अशीच पुढेंही दीर्घकाळ राहील यांत संशय नाहीं.

श्लाघ्यः स एव गुणवान् रागद्वेषबहिष्कृतः ।
भूतार्थकथने यस्य स्थेयस्येव सरस्वती ॥²

राजतरंगिणी—कल्हण.§

अंक ३०—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) इकडील राष्ट्रांचा इतिहास. (३) तो यथार्थ लिहितां येण्यास अवश्य पाहिजे असणारे गुण. (४) इकडील लोकांविषयीं माहिती. (५) यथार्थ बुद्धि. (६) या गुणांच्या अभावाचीं फलें.

---

* George Grote (1794–187) लंडन् येथील (Banker) सावकार—हा कांहीं काळ पार्लमेंटमध्यें होता. यानें 'प्लेटो व साक्रेटिसचे दुसरे स्नेही' हा ग्रंथ लिहिला असून याची बायको (Harriet Lewin) हॅरिएट् लेविन् हिनें याचें चरित्र लिहिलें आहे. याचा सर्वांत प्रसिद्ध ग्रंथ म्हणजे (History of Greece) ग्रीसचा इतिहास होय. 'सम्पादक'

१. तो आपल्या बापाच्या पेढीवर पहिल्यानें कारकुन होता असें लिहिलें आहे. ही गोष्ट आपल्या इकडच्या स्थितीस मोठी विलक्षण वाटणार आहे. पण इंग्लंडांतला व साऱ्या युरोपांतला प्रकार असाच आढळण्यांत येतो. मोठ्या श्रीमंतांच्या मुलांची शिक्षणाची रीत व गरीबांची रीत बहुत सारखीच असते; व दोघांस काम करायाला सारखेंच शिकवतात. जर्मनीच्या बादशहाचा ज्येष्ठ पुत्र व आपल्या महाराणी साहेबांचा जांवई, हा ठसे जुळायाला शिकत आहे असें वर्तमान कांहीं दिवसांपूर्वी चोहोंकडे वर्तमानपत्रांतून जाहीर झालेलें आमच्या वाचकांस बहुधा माहीत असेलच !

$ पृष्ठ ५६७ पाहा. 'सम्पादक'

२. "तोच गुणवान् पुरुष श्लाघ्य होय, कीं जो रागद्वेषांस वश न होत्साता केवळ उदासीनपणें न्यायाधीशाप्रमाणें वास्तविक गोष्ट असेल ती सांगत असतो."

§ हा कवि काश्मीरचा राजा जयसिंह (इ. स. ११२९–११५०) याचा समकालीन असून राज-तरंगिणी ['The chronicle of kings'] या सुप्रसिद्ध ग्रंथाचा कर्ता होय. 'सम्पादक'

१. मागील अंकांत इतिहास या सदराच्या पहिल्या तीन भागांचें निरूपण केलें. आतां यांत त्या सदरापैकीं राहिलेल्या भागांचा विचार करूं.

२. यापुढें एशियाखंडांत जीं हिंदु, चीन, पारसीक, इत्यादि जुनी राष्ट्रें होतीं व सध्यां जीं आहेत त्यांचा इतिहास इंग्लिश् भाषेंत कसा आहे तो पाहायाचा. आतां वरील राष्ट्रांच्या इतिहासांविषयीं पहिल्यानें पृथक्त्वानें न लिहितां एकंदरींत सामान्यत: प्रस्तुत विषयाकडे पाश्चात्यांचा कल कोणत्या प्रकारचा आहे तो वाचकांस कळवणें जरूर आहे. तो लक्षांत आला असतां वरील सर्व इतिहासांचें मुख्य स्वरूप त्यांच्या तेव्हांच ध्यानांत येईल; व तेणेंकरून त्यांच्या योग्यतेविषयींही त्यांस एकंदरींत बरीच कल्पना होईल.

३. प्राच्यांचा ह्मणजे पूर्वभागच्या राष्ट्रांचा इतिहास पाश्चात्यांनीं ह्मणजे युरोपखंडच्या रहिवाशांनीं लिहायाचा हें मनांत आणल्याबरोबर अगोदर कोणाही समंजस व सुज्ञ मनुष्याच्या मनांत एक मोठी कल्पना आल्यावांचून राहायाची नाहीं. ती ही कीं, सर्व प्रकारें दूर व अपरिचित असणाऱ्या अशा या राष्ट्रांचें ज्ञान युरोपियन् लोकांस अगोदर पुरतेपणीं व्हावें कसें, व तसेंही झालें तरी तें यथार्थ झालें ह्मणून कशावरून ? इकडील सर्व देशांचे रीतरिवाज, स्थितिरीति, धर्म, आचारविचार वगैरे दरोबस्त बरच्या लोकांच्याहून अगदीं निराळे आहेत, व कित्येक तर अगदीं विपरीतही आहेत. या मोठ्या भेदामुळें व विरोधामुळें समजुतींत, विचारांत व मतांत दोहों खंडांचा परस्पर अतिशयित भिन्नभाव आहे. या भिन्नत्वामुळें परक्या लोकांस इकडील गोष्टींचें ज्ञान होण्यास दोन मोठाले अंतराय येतात. पहिला मोठा अगोदर हा कीं, अज्ञानास्तव इकडील सर्व गोष्टींविषयीं अन्यथा ग्रह जे त्यांच्या मनास जडलेले असतात ते दूर झाले पाहिजेत. हे जर न होतील, तर इकडचें ज्ञान त्यांस कितीही झालें तरी त्यापासून त्यांस सत्याचा लाभ मुळींच न होतां त्यांचे पूर्वीचे ग्रह बळकट मात्र होतील, व आधींचें अज्ञान दृढतर होईल. तर इकडील लोकांविषयीं खरें ज्ञान पाश्चात्यांस होण्यास पहिली अवश्य गोष्ट ही, कीं अज्ञानास्तव, गर्वास्तव किंवा दुराग्रहास्तव त्यांच्या मनानें ज्या वेड्या निराधार समजुती घेतल्या असतात त्या काढून टाकून त्यांनीं आपला चित्तरूप पट पहिल्यानें स्वच्छ धुऊन काढला पाहिजे. असें केलें तरच 'रंग: शुक्लपटे यथा' या न्यायानें इकडच्या कल्पना त्यांच्या मनावर यथार्थपणें ठसतील. तर याप्रमाणें पहिल्यानें तयारी झाली पाहिजे. मग यापुढें इकडच्या लोकांविषयीं ज्ञान संपादन करण्याचा उद्योग. हा तरी परराष्ट्रीय लोकांस मोठा जड जातो, व त्यामुळें एकंदरींत पाहतां थोड्यांसच साध्य होतो.

४. आतां इकडील देशांचे इतिहास लिहिण्याचें काम युरोपांतील लोक जें बिनधोक आपणांवर घेतात त्यांचे ठायीं तें जसें पाहिजे तशा रीतीनें तडीस नेण्यास वरील गुणांचें साहित्य कितपत असतें याविषयीं जर उगीच क्षणमात्र विचार केला, तर सर्वांच्या सहज ध्यानांत येईल कीं, वरील दोन्ही गुणांत यांतील बहुतेकांचा कमतरपणाच असतो. कोणत्याही देशाचें ज्ञान होण्यास दोन मोठालीं साधनें असतात; एक भाषाज्ञान किंवा त्याहूनही उत्तम मार्ग झटला ह्मणजे लोकपरिचय. आतां पहिल्या भाषाज्ञानाविषयीं जर पाहिलें तर सगळ्या युरोपभर

व अमेरिकेंतही पूर्वेकडील भाषांचे विद्यागुरु जरी चोहोंकडे आहेत, तशाच 'एशियाटिक् सोसायटी' नांवाच्या मंडळ्याही जागोजाग आहेत, व आमच्या देशांत युनिव्हर्सिटींतले परीक्षक, 'दाक्षिणाप्रैज कमिटी'चे सभासद वगैरे मंडळी पाश्चात्यांपैकीं असल्याशिवाय जरी कधीं चालतच नाहीं, तरी वरील साऱ्या पंडितांस इकडील भाषांची माहिती वस्तुतः कितपत असते ही गोष्ट आलीकडे लहान पोरांपर्यंत सुद्धां ठाऊक होत चालली आहे. तीविषयीं येथें कांहीं विशेष लिहिण्याची जरूर नाहीं. दुसरी गोष्ट लोकपरिचय. या साधनाचाही युरोपियन् लोक किती उपयोग करून घेतात हें फार विस्तारानें सांगायाला नको. पाहा, आमचा देश सगळा आज त्यांच्या पादाक्रांत झालेला आहे; आतां पूर्वीप्रमाणें हात बांधून बूट काढून त्यांस कोणत्याही एतद्देशीय राजेरजवाड्यांच्या पदीं लीन व्हावें लागत नाहीं. किंवा एकाद्या देवळांत पाद्रीसाहेब शिरले तर त्यांस मार मिळण्याचीही आतां विशेष भीति राहिली नाहीं;—फार तर काय, पण अर्वाचीन विद्येनें सुप्रकाशितांतःकरण झालेले आमचे कित्येक लोक तर आपल्या गौरवर्णबंधूस सैपाकघरच्या चुलीपर्यंत, देव्हाऱ्याच्या चौरंगापर्यंत किंवा शय्यास्थानापर्यंत मोठ्या हौसेनें नेण्यासही तयार आहेत. पण काय मौज झाली पाहा! जोंपर्यंत आह्मी आपली जुनी विद्या अगदीं लपवून ठेवून त्यांस थांग लागूं देत नव्हतों, आमचे रीतरिवाज, धर्माचार वगैरे अगदीं गुप्त रीतीनें होत होते, तोंवर ते सर्व समजण्याविषयीं आमच्या राज्यकर्त्यांची अतोनात उत्कंठा होती. पण आतां आह्मी आपल्या अत्यंत हृद्गत गोष्टी त्यांस खुशाल सांगण्यास तयार झालों, शास्त्राध्ययन तर काय पण यजनादि कर्मेंही त्यांकडून करवण्यास सध्यां प्रत्यवाय उरला नाहीं, तों बेटी त्यांचीच हौस कोणीकडे नाहींशी झाली! असें होण्याचीं कारणें उघड आहेत; पण त्यांचें या स्थलीं विवरण अप्रस्तुत होय. बरें पण हेंही एक असो; आमच्या लोकांविषयींची माहिती आपण होऊन करून घेण्याचा उद्योग इंग्रेजांनीं जरी न केला, तरी निदान नेहेमीच्या परस्परांच्या समागमानें तरी वरील ज्ञान त्यांस कांहीं अंशीं होण्यासारखें होतें. पण तसेंही नाहीं. एतद्देशीय लोकांचा व त्यांच्या वरिष्ठांचा जो संबंध असतो तो नेहेमी कामापुरता मात्र असतो. परस्परांचा स्नेहसंबंध तर कशाला, पण नुसतें आपआपल्या पायरीनें असणें हेंही दोघांकडून घडत नाहीं. साहेब चार हजार कोसांवरून इकडे येऊन एकदम उच्चपदारूढ झालेले असतात, व इंग्रेज ग्रंथकारांनीं आणि पवित्रशास्त्रवाल्या मिशनरींनीं त्यांच्या डोक्यांत एतद्देशीय लोकांविषयीं मोठ्या मोलवान् व पवित्र कल्पना घालून दिलेल्या असतात, यास्तव त्यांचें वर्तन सदा सर्वकाळ घोड्यावर असल्यासारखें असतें. 'ओ यू गद्धा' या गोऱ्या शिवीचा प्रयोग पट्टेवाल्यापासून तों शिरस्तेदार, मामलेदार अशासारख्या कामदारापर्यंतही होतो हें सर्वांस विदित आहेच. तसाच साहेबांचा कोरा करकरीत बूटही शुभ वर्तमानाच्या दयेनें नेहेमी फुरफुरत असतो हेंही सर्वप्रसिद्ध आहे. हें एका पक्षाचें वर्तन झालें; दुसऱ्याचें याच्या सर्वतोपरी विरुद्ध असतें. वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या अशा उद्दाम आचरणाचा त्यांच्या हाताखालचे एतद्देशीय लोक कांहीं प्रतिकार तर बिलकुल करीत नाहींतच; पण कांहीं अंशीं निरुपायास्तव, व पुष्कळ अंशीं अंगांत पाणी नसल्यामुळें सदासर्वदा क्षमावृत्तीचेंच अव-

लंबन करून राहिलेले असतात. एकूण खरें ख्रिस्तभक्तत्व बातिस्मा न घेतांना आमच्या लोकांत येत चाललें आहे,—कोणतें? तर एका गालांत मारली असतां दुसरा मोठ्या संतोषानें पुढें करायाचा! तर याप्रमाणें राजा व प्रजा या दोहोंचा संबंध सध्यां आमच्या देशांत वर सांगितल्याप्रमाणें झाल्यामुळें व तो दिवसेंदिवस दृढतर होत चालल्यानें पाश्चात्यांची आमच्याविषयीं अतिशयित तिरस्कारबुद्धि झाली आहे. युरोपांतलि लोक नुकते नुकतेच इकडील राष्ट्रांच्या कित्येक आचारांस हसत होते, व चिनी लोकांचा परराष्ट्रांविषयीं तिरस्कार व मत्सरबुद्धि, हिंदु लोकांचें सोंवळें, मुसलमानांचा गोषा, या सर्वांचा त्यांस भारी चमत्कार वाटे; पण तिकडील राष्ट्रांसच आज चार दिवसांचें वैभव येतांच स्वर्ग दोन बोटें उरलासा जो वाटत आहे त्याचा क्षणभर विचार केला असतां वरील राष्ट्रांचें मोठेंसें नवल कोणासही वाटणार नाहीं. गेल्या सालां हिंदुस्थानांतील एका मोठ्या अधिपतीची * एकाद्या उचल्याप्रमाणें जी आटोकाट तयारीनें चौकशी झाली व त्याच्या पदोपदीं मानखंडना झाल्या, त्याप्रमाणेंच युवराजांच्या सन्मानरूप अग्नींत आमच्या शेंकडों सरदारमंडळींच्या मानाची जी पूर्णाहुति पडली, तसेंच आज काय कोणा डेप्युटी कलेक्टरास¶ रेल्वेवरील गार्डानें हात धरून गाडींतून बाहेर ओढून काढलें, उद्यां काय कोणा ख्रिस्तपुत्रानें‡ आकाशांतील बापाची भेट घेण्यापूर्वी त्याकडे आपल्या घोरेवाल्यास मुष्टिमोदकांची चांगली भरपूर पयारी बरोबर देऊन तावडतोब रवाना केलें,—अशा प्रकारचे वृत्तांत जे वरचेवर घडत आहेत त्यांवरून आमच्या राजकर्त्यांच्या ठायीं आमच्याविषयीं किती गौरवाची बुद्धि वागत आहे व मनुष्यमात्राचे हक्क ते किती ओळखतात तें अगदीं स्पष्ट दिसत आहे. तसेंच ज्या त्या राष्ट्रांच्या धर्मकृत्यांत डोकावण्याची मोठी इच्छा, व निव्वळ मूर्खपणानें त्यांची टवाळी करण्याचीही मोठी मनापासून आवड; पण ख्रिस्त्यांच्या देवालयांत कोणा परक्यास जाणें झालें तर त्यानें मुकाट्यानें एकीकडे चोरट्यासारखें बसलें पाहिजे, व देवाच्या लाडक्या मंडळींबरोबर त्यास डोळेझांकही करावी लागते; डोळेझांक तर खरीच, कारण डोळे उघडून ज्यानें पवित्र शास्त्र वाचलें आहे त्यास त्यांतील पोरकटपणा, अप्रयोजकपणा, अज्ञान व दुष्टत्व हें ढळढळीत दिसल्यावांचून कधींही राहायाचें नाहीं! तसेंच रस्तोरस्तीं निर्लज्ज व कोडग्या बाळ्ये मंडळीनें एतद्देशीय धर्मांविषयीं हवा तसा व हवा तितका चारगटपणा केला तरी कांहीं हरकत नाहीं, त्यांस पाठराखी पोलीस लोकही मिळतात; पण त्यांच्याच समोर एकाद्यानें त्यांचें खंडन चालवलें तर भाविक ख्रिस्त्यांचा शुभ वर्तमानावरील भाव डळमळविल्याबद्दल त्या मनुष्यास सरकारांतून शिक्षा होते! फार तर काय पण वरील धर्मास एकंदरींत लवमात्रही विरोध केलेला आमच्या राज्यकर्त्यांस खपत नाहीं; तसें करणाऱ्या दुष्ट मनुष्यास तावडतोब शासन होतें.[१] असो; याप्रमाणेंच इंग्रेजी बुटांचें सुद्धां माहात्म्य जें आमचे

* १८७५ सालच्या बडोद्याच्या विषप्रकरणाचा येथें उल्लेख आहे. पृष्ठ ३३६ टीप पाहा.
¶ रा. ब. शंकर पांडुरंग पंडित. ‡ मेलविल साहेब ,सम्पादक'
१. दोन तीन वर्षांपूर्वी मेल्विल् नांवाच्या साहेबानें मुसलमानी धर्म स्वीकारल्याबद्दल त्याजवर

[ पुढें चालू ]

राज्यकर्ते आपल्या मुलुखांत चोहोंकडे वावरीत आहेत, आमच्या जुन्या बेढगळ जोख्यास सरकारी कचेरींत बिलकुल प्रवेश होऊं न देतां खुद्द कायदेकौन्सिलांत असणाऱ्या एतद्देशीय सरदारांसही त्याबद्दल सक्त ताकीद मिळते; व तसेंच मडमसाहेबांच्या तोंडाकडे नेटिवानें डोळे उचलूनही वर पाहतां उपयोगीं पडत नाहीं. त्यांच्या एकाद्या शृंगारचेष्टिताबद्दल चौकशी व्हावयाची असल्यास दरोबस्त काळ्या लोकांस बाहेर जावें लागतें, व त्यांच्या सन्मानार्थ बऱ्या नेटिव कामगारांसही गचांडी मिळते;—इत्यादि सर्व गोष्टींचा यथार्थ विचार केला असतां कोणाही समंजस व निःपक्षपात मनुष्यास कबूल करावें लागेल कीं, मनुष्यमात्रांत जे दोष सांपडतात त्यांपासून युरोपियन् लोक झाले ह्मणून ते तरी तिळमात्रही मुक्त झाले आहेत असें नाहीं. उलटी त्यांत त्यांची साऱ्या राष्ट्रांवर कडीच आहे असें मुद्दां ह्मणणें भाग आहे.

वर सांगितलेल्या सर्व गोष्टी लक्षांत आणल्या असतां पाश्चात्य लोकांचे ठायीं इकडील राष्ट्रांविषयीं कोणत्या वृत्ति मनांत वागत आहेत त्या बऱ्याच ध्यानांत येतील; व त्यांवरून इकडील देशाचें ज्ञान त्यांस होण्यास त्या केवढ्या प्रतिबंधक आहेत हेंही सहज समजेल.[1]

५. आतां दुसरा गुण जी यथार्थबुद्धि ती वरील लोकांचे ठायीं कितपत आढळते

---

केवढा गहजब गुदरला होता हें आमच्या वाचकांस स्मरत असेलच. या उदाहरणावरून मनाच्या स्वातंत्र्याबद्दल आमचे राज्यकर्ते जो येवढा दिमाख मिरवतात त्यांत तथ्य कितपत आहे हें सहज लक्षांत येतें. त्याप्रमाणेंच येथेंही धर्माच्या बाबतींत प्रजेवर बिलकुल सक्ति नाहीं असें जरी वरकांतीं पाहतां खरें वाटण्यासारखें आहे, तरी वास्तविक स्थिति फार निराळ्या तऱ्हेची आहे असें कोणाही विचारी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. आमच्या मालेच्याच द्वेषबुद्धीनें ख्रिस्त-माउलीच्या औरस व दत्तक लेंकरांनीं धाग्यास धागा काढून कोळ्यासारखें लांबवर जें जाळें रचलें होतें त्याची हकीकत आमच्या वाचकांस कळवली असतां त्यांस मौज व आचंबा वाटल्यावांचून राहणार नाहीं. आमच्या शुभवर्तमानवाल्या प्रिय बंधूंच्या हातीं प्रस्तुत माला सुकवून टाकण्याचें किंवा तीस करपवण्याचें जर साधन असतें तर हरएक प्रयत्न करून त्यांनीं आपलें अब्रूरक्षण होण्याचा उपाय अवश्य केला असता; पण विचारे करतात काय, त्यांचा कोठेंच कांहीं लाग लागेना ! आमच्या मालेस जेथपासून ओलावा मिळतो व तिची टवटवी राहते तो जीवनरूप झरा तर त्यांस सर्वथा अगम्य पडला. यास्तव त्यांस निमूटपणें खालीं मान करून मार सोशीत राहणें भाग पडलें.

१. पाश्चात्यांच्या मनांत इकडील लोकांविषयीं ज्या वृत्ति वागत असतात त्यांचें दूषण निकडीलच एका नामांकित ग्रंथकारानें किती तीव्रतेनें केलें आहे पाहा !—

**"If Providence hath removed us to a greater distance from the influence of those genial rays which ripen the wits of the eastern nations, it hath made us abundant amends, by indulging us in this conceit, that we are wiser than all the rest of the world besides.**

**There are some sorts of pleasing madness of which it would be cruelty to cure a man. By bringing him to his senses you make him miserable.**

( पुढें चालू )

याविषयीं जर विचार केला, तर हिंची अनुकूलता तर त्यांस वरील गुणांहूनही कमी असतें हें सहज दिसून येणारें आहे. यथार्थबुद्धि ह्मणजे निःपक्षपातता अथवा मनाची समवृत्तिता होय; ह्मणजे दुसऱ्याचे दोष काढायाला जसे आपण उत्कंठेनें धांवतो त्याप्रमाणेंच आपले दोषही प्रांजलपणें कबूल करणें, व देशांतरींचे आचार आपल्याहून भिन्न होत येवढ्यास्तवच केवळ त्यांस दोषरूप न ठरवणें. या गुणांत सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलेले व खऱ्या धर्माचीं तत्त्वें स्वीकारल्यानें परम पावन झालेले आमचे पाश्चात्य बंधु इकडील कोणत्याही लोकांपेक्षां सामान्यतः पाहतां लवमात्रही वरचढ आहेत असें नाहीं. आमच्या देशांत सुमारें शंभर वर्षांपूर्वीं भर पेशवाईंत टोपीवाल्या इंग्रजांविषयीं जीं मतें होतीं, किंवा एकाद्या अत्यंत भाविक मुसलमानाच्या मनांत सुवर खाणाऱ्या फिरंगी काफराविषयीं जो द्वेष मनांत

---

You will ask me, perhaps, what is the meaning of all this? Why, in good truth, the meaning of it is, a just indignation against the impertinence of those who imagine that they know everything, when in reality they know nothing.

And, to be more particular, the folly of the westerners in despising the wisdom of the eastern nations and looking upon them as brutes and barbarians; whilst we arrogate to ourselves everything that is wise and polite; and if we chance to light upon a just thought we applaud ouerselves upon the discovery, though it was better understood three thousand years ago!

This happens to us through want of good reading and a true way of thinking; for the case is this, that little smattering of knowledge which we have, is entirely derived from the east. They first communicated it to the Greeks (a vain, conceited people, who never penetrated the depths of oriental wisdom); from whom the Romans had theirs. And after barbarity had spread itself over the western world, the Arabians, by their conquests, restored it again in Europe. And it is the wildest conceit that can be imagined, for us to suppose that we have greater geniuses, or greater application, than is to be found in those countries."

*Ockley's History of the Saracens.*

वरील विचार, ज्ञानाच्या व बळाच्या गर्वानें उन्मादस्थितीस पावून साऱ्या परदेशीयांस किंबहुना झाडून साऱ्या प्राच्य राष्ट्रांस, करपटाप्रमाणें मानणारे आमचे श्वेतवर्ण बंधु, तसेंच त्यांच्या जिवावर उड्या मारून इसापनीतींतील करड्याप्रमाणें जिव्हाचापल्य दाखवणारे असे येथूच्या कळपांत शिरलेले आमचे लोक, आणि सध्यां आमच्या देशांत चोहोंकडे सहस्रशः दृष्टीस पडणारे चढ हिंदु ना खिस्ती असे फांकडे पंडित, या सर्वांनीं नीट ध्यानांत ठेवण्याजोगे आहेत. तसें केलें असतां त्यांच्या सहस्रशः दुर्मतांचें मूळच खुंटल्याप्रमाणें होईल.

किंवा कुस्तुंतुनिया शहरांत आज वागत असेल तितकाच द्वेष किंवा तिटकारा आमच्या अत्यंत परिपक्व बुद्धीच्या युरोपियनांतही आढळतो. फार तर काय, पण तांडावर चढणाऱ्या मनुष्यावर मौजेनें गोळी घालणें व तो वानर होता येवढेंच झटल्यावरून खून माफ होणें, किंवा घोरेवाल्याच्या झिंज्या धरून त्यास बुकलून ठार मारणें व शेवटीं त्याच्या प्राणाची बिचाऱ्याची अवघी तीस रुपये किंमत होणें, असले प्रकार अंमळ ध्यानांत आणले असतां आमचे महासोवळे भट किंवा मोठे करडे इमामही बरे असें वाटूं लागते! असो; प्रस्तुत विषयावर या पुस्तकाच्या आठव्या अंकांत बरेंच विवेचन केलें आहे, त्यावरून व सामान्यतः इकडील विषयावर लिहिलेला कोणताही इंग्रेजी ग्रंथ पाहिला असतां त्यावरूनही वरील गुण पाश्चात्यांस अद्याप किती शिकायाचा आहे याविषयीं कोणाचीही खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं.[1]

---

१. एशिया व युरोप या दोन्ही खंडांचा परस्परसंबंध वाढत चालला आहे; यास्तव कालें- करून सध्यां असणारे ग्रह व मूर्ख समजुती या नष्ट होत जातीलच हें उघड आहे. या भावी स्थितीचें सध्यांही क्वचित् चिन्ह दृष्टीस पडतें, हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल. बॉसेट्* नांवाच्या फ्रेंच् ग्रंथकारानें 'जगाचा इतिहास' कसा लिहिला आहे याविषयीं एक नामांकित इंग्लिश् इतिहासकार† लिहितो—

"In the same way, because Bossuet had been taught that the Jews are the chosen people of God, he under the title of Universal History, almost confines his attention to them, and treats this obstinate and ignorant race as if they formed the pivot upon which the affairs of the universe had been made to turn! His idea of an universal history excludes those nations who were the first to reach civilization, and to some of whom the Hebrews owed the scanty knowledge which they subsequently acquired. He says little of the Persians, and less of the Egyptians; nor does he even mention that far greater people between the Indus and the Ganges, whose philosophy formed one of the elements of the school of Alexandria, whose subtle speculations anticipated all the efforts of European Metaphysics, and whose sublime enquiries, conducted in their own exquisite language, date from a period when the Jews, stained with every variety of crime, were a plundering and vagabond tribe, wandering on the face of the earth, raising their hand against every man and every man raising his hand against them."

[* Bossuet J. B. (1627-1704) हा विख्यात फ्रेंच् बिशप् (धर्माधिकारी) होता. याचीं व्याख्यानें कमालीचीं वक्तृत्वपूर्ण असत. हा मोठा तत्त्वज्ञ असून याचे ऐतिहासिक ग्रंथ वाङ्मय-दृष्ट्या उच्च दर्जाचे आहेत. † बकल् (Buckle). 'सम्पादक']

(पुढें चालू)

६. वरील दोन कलमांत युरोपियन् इतिहासकारांच्या अंगीं कोणत्या दोन गुणांचा अभाव सामान्यतः दृष्टीस पडतो तो सांगितला. आतां त्या अभावाचीं फळें आज काय दृष्टीस पडताहेत तीं सांगतों. त्यावरून वरील दोन्ही गुणांचें, व त्यांतून दुसऱ्याचें, महत्त्व किती आहे तें चांगलें नजरेस आल्याविना राहणार नाहीं.

---

पुढें अर्वाचीन इतिहासावर येऊन मुसलमानांविषयीं वरील भाविक इतिहासकारानें कसा काय मजकूर लिहिला आहे याविषयीं प्रस्तुत ग्रंथकार ह्मणतो—

—" To descend a little later : everyone acquainted with the progress of civilization will allow, that no small share of it is due to those gleams of light, which, in the midst of surrounding darkness, shot from the great centres of Cordova† and Bagdad. Those, however, were the work of Mohammedanism; and as Bossuet had been taught that Mohammedanism is a pestilential heresy, he could not bring himself to believe that Christian nations had derived anything from so corrupt a source. The consequence is, that he says nothing of that great religion, the noise of which has filled the world; and having occasion to mention its founder, he treats him with scorn, as an impudent impostor, whose pretensions it is hardly fitting to notice. The great apostle, who diffused among millions of idolators the sublime verity of one God, is spoken of by Bossuet with supreme contempt; because Bossuet, with the true spirit of his profession, could see nothing to admire in those whose opinions differed from his own. But when he has occasion to mention some obscure member of that class to which he himself belonged. then it is that he scatters his praises with boundless profusion. In his scheme of universal history, Mohammed is not worthy to play a part. He is passed by; but the truly great man, the man to whom the human race is really indebted, is—Martin,§ bishop of Tours.* He it is, says Bossuet, whose unrivalled actions filled the universe with his fame, both during his lifetime and after death. It is true that not one educated man in fifty

[ पुढें चालू. ]

† Cordova is the capital of a province of the same name in South Spain; cathedral, formerly one of the most sacred Mahomedan mosques. *'Editor'*

§ St. Martin (316-400), French monk, founder of the convent of Poictiers. He was later made the bishop of Tours. *'Editor'*

* Tours—a town on the Cher and Loire (the greatest river in the country) in France. It has a splendid Gothic cathedral. *'Editor'*

७. हीं फळें म्हटलीं म्हणजे खोटे समज व अर्धोकच्चीं मतें हीं होत; म्हणजे कांहीं समजुती तर केवळ निराधार व कांहीं अंशतः मात्र खऱ्या अशा वरील गुणांच्या अभावीं उत्पन्न होतात. आतां यांपैकीं कित्येक ज्या फारच ढळढळीत दिसणाऱ्या आहेत त्या सांगतों. युरोपियन् इतिहासकारांचे कित्येक जे महासिद्धांत सर्वसंमत होऊन बसले आहेत त्यांत एक मोठें प्रमेय असें आहे कीं, एशियाकडील राष्ट्रें ऐषआरामांत मग्न, भपकीदार, व नामर्द अशीं आहेत. हें महावाक्य बहुधां प्रत्येक युरोपियन् इतिहासकाराच्या ग्रंथांत सांपडेल; याच्या सत्यतेविषयीं कोणासही तिळमात्र सुद्धां संदेह नाहींसा दिसतो. फार तर काय, पण हें खोडण्यास आह्मी सरसावतों याचें आमच्या वाचकांसही बहुधां आश्चर्य वाटल्यांवाचून राहणार नाहीं. पण आतां याच वाक्याची स्थिति काय होते ती पाहा !

पहिला आरोप ऐषआरामाचा व भपकीचा. या आरोपाचा क्षणमात्र विचार केला असतां कोणासही कळून येईल कीं, यांत कांहींच अर्थ नाहीं. एकाद्या कंगाल मनुष्यानें एकाद्या लक्षाधीशावर जर असे आरोप केले कीं, तूं उत्तम पक्वान्नें खातोस, उंची सरबतें पितोस, टोलेजंग वाड्यांत राहतोस, अंगावर दागदागिने मिरवतोस, तुझ्यासारखा अधम कोण आहे !—तर त्या श्रीमान् मनुष्यास काय वाटेल बरें ? हीं मोठीं जबरदस्त दूषणें समजून तीं उडवण्याचा तो यत्किंचित् तरी यत्न करील काय ! एशिया खंडांत देवाच्या कृपेनें सृष्टीचें अपार वैभव प्रगट झालें असून मनुष्यमात्रास सुखावह होणाऱ्या लक्षावधि पदार्थांची अत्यंत विपुलता आहे; मग तिचा उपयोग केल्यानें किंवा ती मिरवल्यानें मनुष्य दोषास पात्र होतो काय ! ज्या खंडांतील लोकांस एशियाची माहिती होईतोंपर्यंत अगदीं सामान्य उपभोगाचें पदार्थही दुर्लभ होते, जेथील भुतांस उंसाचे मळे पहिल्यानें दृष्टीस

has ever heard the name of Martin, bishop of Tours. But Martin performed miracles, and the church had made him as saint; his claims, therefore, to the attention of historians must be far superior to the claims of one who, like Mohammed, was without these advantages. Thus it is that, in the opinion of the only eminent writer on history during the power of Louis‡ XIV., the greatest man Asia has ever produced, and one of the greatest the world has ever seen, is considerd in every way inferior to a mean and ignorant monk, whose most important achievement was the erection of a monastery, and who spent the best part of his life in useless solitude, trembling before the superstitious fancies of his weak and ignoble nature."

*Buckle, Vol, II.—pp. 285–8.*

‡ Louis XIV (1638–1715) French king from 1643 to his death; he was responsible for corrupting charles II, persecuting the Huguenots, repealing the edict of Nantes and for the War of Spanish Succession. He was sensual and luxurious but a lover of art and literature. *'Editor'*

पडतांच अत्यंत हर्ष होऊन वनचरांप्रमाणें ज्यांनी त्यांत चंगळ मांडली,[१] इसी कसा तो मुळींच माहीत नसून जे त्यास भिऊन पहिल्यानें पळूं लागले,[२] जिकडील अत्यंत सुपीक देश सरासरी इकडच्या उखीर जमिनीबरोबर, जेथें बारा महिने अठरा काळ पाऊस, धुकें, बर्फ यांनी पिच्छा पुरवून सूर्यदर्शनही कधीं चांगलेसें होऊं देऊं नये, अशा लोकांस इकडच्या समृद्ध व सुखकर देशांचे वैभव सहन न होऊन त्याकडे नाक मुरडण्याचा त्यांनी आव घालावा ही केवढी मौज आहे ! आणि त्यांतून ज्या वीतभर लांब व वीतभर रुंद देशांत सृष्टीची रचना इतकी ठेंगणी व तोकडी आहे कीं, तिकडचे मोठे गगनचुंबित पर्वत म्हणजे इकडची टेंपाडें, व टेम्स्सारख्या महाप्रचंड नद्या म्हणजे इकडच्या एकाद्या ओहोळाबरोबर, जेथील खाणींतली मोठी अमूल्य संपत्ति म्हटली म्हणजे शिसें व कयील, मोठीं स्वादिष्ट फळें म्हणजे इकडील रानफळांसारखीं, व दारिद्र्याधिदेवतेची ज्या देशावर इतकी पूर्ण कृपा कीं, इकडील संपत्तीचा येवढा पूर आज शेंकडों वर्षे तिकडे चालत असतां लक्षावधि लोकांस नुसते बटाटे फांकावे लागतात, त्याच देशच्या लोकांनी खुद्द हिंदुस्थानाशीं संपत्तीत टक्कर मारूं पाहावी म्हणजे केवढें अचाट साहस आहे[३] ? बरें, पण आमच्या पाश्चात्य बंधूंनी हा

---

१. युरोपच्या निरनिराळ्या देशांतून कूसवाले थोडे जेव्हां जमून तुर्कस्थानावर येऊन धडकले, तेव्हां त्या देशांत त्यांस पहिल्यानें ऊंस दृष्टीस पडला. तोंपर्यंत त्यांस साखर मात्र माहीत असून ती कशी होते तें कांहीं माहीत नव्हतें. यास्तव हा गोड वेत पाहतांच त्यांस भारी आनंद झाला. 'Sugar-cane' हें नांव वरील अज्ञानमूलक हर्षाचेंच दर्शक होय.

२. ही गोष्ट रोमच्या इतिहासांत प्रसिद्ध आहे. ग्रीसचा राजा † पिऱ्हस् याची रोमन् लोकांशीं जी लढाई झाली तींत पहिल्यानें वरील अद्भुत पशु त्यांस माहीत झाला. त्याचें तें विचित्र रूप व अचाट शक्ति पाहून रोमच्या शूर शिपायांचीही दाणादाण होई; व त्या योगेंकरून वरील राजास पहिल्यानें कांहीं जय मिळाले.

† Pyrrhus (अंदाजें खि. पू. ३१८-खि. पू. ३७२), King of Epirus शूर योद्धा व उत्कृष्ट राजा; सत्राव्या वर्षी राज्यावरून पदच्युत झाल्यामुळें (Demetrius) डिमेट्रिअस्बरोबर आशियाला गेला. खि. पू. ३०१ मध्यें यानें इप्सस् (Ipsus) च्या लढाईत पराक्रम गाजविला व पुढें (Ptolemy) टॉलेमीच्या मदतीनें खि. पू. २९५ साली गेलेलें राज्य परत मिळविलें. पुढें त्यानें मॅसिडोनिया जिंकला, हत्तींच्या जोरावर इटालींत रोमन् लोकांचा अनेक वेळां पराजय केला. पण शेवटीं त्यास रोमन् लोकांनीं पिटाळून लावलें. पुढें त्यानें स्पार्टावर चढाई केली पण एका बाईनें घराच्या छपरावरून कौलें फेंकून याला ठार मारलें. यानें तेवीस वर्षे राज्य केलें. 'सम्पादक'

३. मागें आठव्या अंकांत* मेकॉलेचा हिंदुस्थानच्या संपत्तीवर जो उल्लेख आहे तो सांगितला होता. तो येथें मुळांतून उतरून घेतों—

"The most absurd notions were then entertained in England respecting the wealth of India. Palaces of porphyry hung with the richest brocade, heaps of pearls and diamonds, vaults from which pagodas and gold mohurs were measured out by the bushel, filled the

( पुढें चालू )

* पृष्ठ ८० ओळी २६-३० पाहा. 'सम्पादक'

संपत्तीचा तिरस्कार व हें कडकडीत वैराग्य आपल्या कृतींत तरी दाखवायाचें होतें! 'रानटी सोन्या मोत्यांची येवढी कींव येऊं न देतां तीं रानटी लोकांची रानटी लोकांपाशींच असूं द्यावयाचीं होतीं'! देशोदेशीं फिरून शेवटीं मोडकीं तोडकीं जहाजें मोठ्या आर्जवानें मिळवून कोठें पश्चिमेकडे हजारों कोस वेड्यासारखे समुद्रावर फीर, नाहीं तर आफ्रिकेला वळसा घालून अनमानधबक्यानें कोठें तरी लाग, येवढी जबरदस्त यातायात आकाशाच्या राज्याच्या वांटेदारास कोणीं करायाला सांगितली होती कोण जाणे! इसेंच शेंकडों वर्षें ध्यानीं मनीं स्वप्नीं घोळलेला हिंदुस्थान एकदांचा गावला असतां त्यावर ख्रिस्तदासांच्या येवढ्या झुंडींच्या झुंडी कशा धांवल्या हा तरी चमत्कार आहे! त्याप्रमाणेंच पुढें खोट्या सह्या कर, राजद्रोहाच्या मसलतींत शिर, याची मुंडी मुरगाळ, त्याला चिथा-

---

Imagination even of men of business. Nobody seemed aware of what was nevertheless most undoubtedly the truth, that India was a poorer country than countries which in Europe are reckoned poor, than Ireland for example or than Portugal." —*Warren Hastings.*

पुढें क्षणभरानें हीच वृत्ति पालटून प्रस्तुत इतिहासकार प्रसंगांतरावर दृष्टि देऊन पुनः आपणच लिहितात—

"The people of India, when we subdued them, were ten times as numerous as the Americans whom the Spaniards vanquished, and were at the same time quite as highly civilized as the victorious Spaniards. They had cities larger and fairer than Saragossa or Toledo,* and buildings more beautiful and costly than the Cathedral of Seville. They could show bankers richer than the richest firms of Barcelona§ or Cadiz † viceroys whose splendour far surpassed that of Ferdinand the Catholic, myriads of cavalry and trains of artillery which could have astonished the Great Captain." —*Lord Clive.*

*Two towns in Spain. § A town in Italy. † A town in Spain. *Editor*

मेकॉलेसारख्या विद्वान् व चाणाक्ष म्हणवणाऱ्या ग्रंथकारानें स्वतः जगाहून त्या कोटावरची शुंडी या कोटावर असा पोरखेळ करावा हा केवढा चमत्कार आहे!—अथवा चमत्कार तरी कसला! क्लैव साहेबास खोटी सही करतांना केव्हां शरम वाटली? अथवा हेस्टिंग्स् यास तरी सत्यभ्रष्ट व नीतिभ्रष्ट होतांना कधीं मनोदेवता आड येत होती? मग तोच प्रकार त्यांच्या अनुयायांनीं कां आदरूं नये?

१. मिल्टनानें आपल्या महाकाव्याच्या दुसऱ्या सर्गाच्या आरंभीं म्हटलें आहे—

"High on a throne of royal state, which far
Outshone the wealth of Ormus‡ or of Ind,
Or where the gorgeous East with richest hand,
Showers on her kings barbaric pearl and gold,
Satan exalted sat."

प्राच्यदेशीय संपत्तीच्या वर जो इंग्रेजी कवीनें अधिक्षेप केला आहे तो वाचून 'हसायनीतीं तोंड आंबट द्राक्षांची कोणास आठवण होणार नाहीं?

‡ Ruined mediaeval city near the Persian gulf. *Editor*

धून दे, येवढ्या उलाढाली • तरी; गेलीं शंभर वर्षें आमच्या परम विरक्त व प्राच्य देशांस तुच्छ करणाऱ्या युरोपस्थ बांधवांनीं कशाकरतां केल्या बरें ? पण हेंही असो; येशूच्या प्रेषितांच्या सांगण्याप्रमाणें येवढाही अचाट उद्योग आमच्या दयाळू भाऱ्यांनीं आह्मांस शहाणे करण्याकरतां किंवा आकाशचें राज्य मिळवून देण्याकरतां कदाचित् केला असेल; पण हें कसें बरें, कीं जो ऐषआराम दूर असतां केवळ निंदेस पात्र होता तोच आमच्या बंधूंस सुलभ होण्याबरोबर त्याचें निंद्यत्व कोठें तें पार निघून गेलें ? जीं रत्नें येथील राजेरजवाड्यांच्या अंगावर असतां 'रानटी' झालीं होतीं त्यांस युरोपचें वारें लागतांच बेटीं एकदम कशीं सुधारलीं हो ! !

यापुढचा दुसरा विचार नामर्दपणाचा. हें दूषणही वरच्यासारखेंच केवळ शुष्क असून अंमळ सूक्ष्मदृष्टया त्याचा विचार केला असतां त्याचा पोकळपणा आरपार दिसल्यावांचून राहणार नाहीं. एक तर हें आलीकडे अर्थशास्त्रावरून सर्वसंमत झालेंच आहे कीं, संपत्तीनें राष्ट्र दुर्बल होतें ही समजूत खोटी आहे; तिच्या योगानें त्यास उलटी बळकटी येते असेंही पण पुष्कळांचें मत आहे. तेव्हां यावरून पाहतां प्राच्य राष्ट्रें समृद्ध असल्यामुळें निःशक्त होऊन गेलीं आहेत हा मुद्दा तर अगोदर मुळींच उडाला. पण एशिया खंडांतील जमिनीचा व हवापाण्याचाच असा कांहीं गुण असला तर, कीं तेथील लोक आपले भागुबाईच निपजावे ? असें असेल तर याचा प्रत्यय पाहणें सोपें आहे. इकडील देशांत युरोपातल्यासारखे जरी मोठमोठे इतिहासकार निपजले नाहींत, तरी इकडील राष्ट्रांनीं आपापलें वृत्त बरेंच लिहून ठेवलें आहे. शिवाय त्यांचा इतिहास चिरकाल राहण्यासारखा ठिकठिकाणीं स्थापित झाला असून त्यांच्या शत्रूंच्या ग्रंथांतही त्यास स्थान मिळालें आहे. या सर्वांवरून पाहतां असें स्पष्ट दिसून येईल कीं, *जापेट्च्या पोरांपेक्षां *शेमूची पोरें कमी बळकट आहेत असें नाहीं. पाहा बरें रोमन् लोक साऱ्या जगास येवढे दुर्जय झाले असतां अरब लोकांनीं त्यांस किती लवकर जेर करून टाकलें, व सारें युरोपखंड त्यांच्यापुढें कित्येक शतकें कसें थरथरां कांपत होतें ! जितका मुलूख काबीज करण्यास रोमन् लोकांस आठशें वर्षें लागलीं तितका आमच्या प्राच्य वीरांनीं ऐंशीं वर्षांत काबीज केला ![१] सिरिया, इराण, मिसरदेश,

---

१. " With the Koran in one hand, and the scimitar in the other, the impetuous and indomitable Arab achieved a series of splendid victories unparalleled in the history of nations: for in the short space of eighty years that mighty range of Saracenic conquest embraced a wider extent of territory than Rome had mastered in the course of eight hundred !" *Ockley's History.*

* Japheth व Shem हीं (Noah) नोआचीं मुलें. जापेट्चे वंशज, रोमन्, ग्रीक् वगैरे लोक; व शेमूचे वंशज ज्यू, व अरब, असिरियन् हेब्र्यू, ॲरॅमिअन् (Aramaean) हे होत. शेमूच्या पांच मुलांनीं व्यापलेल्या पूर्वेकडील पांच प्रांतांतील भाषांस—असिरियन्, ॲरॅमिअन्, हेब्र्यू, फाएनिशियन् (Phœnician); व अरबी आणि एथिओपिअन् (Ethiopian)—सेमाटिक् (Semetic or Shemetic) म्हणतात. 'सम्पादक'

स्पेन, फ्रान्स येवढाले देश त्यांनीं एकेका मोहिमेंत सर करून टाकले.[१] पुढें कांहीं काळानें त्यांचे अनुयायी जे तुर्क लोक त्यांनीं तर एशियामैनर जिंकून सन १४५३ सालीं कुस्तुंतुनिया शहरांतील ख्रिस्ती देवळांवरचे क्रूस उपटून काढून त्या जागीं आपले अर्धचंद्र रोंवले! हे अर्धचंद्र आज चारशें वर्षें सारखे लकाकताहेत. युरोपांत हजारों धामधुमी होऊन राज्येंचीं राज्यें पालथीं झालीं व नवीं उदयास आलीं; पण हे कायमचे कायम! अकराव्या, बाराव्या व तेराव्या शतकांत तर ख्रिस्ती प्रभूच्या जन्मभूमीच्या उद्धारार्थ लक्षावधि, कोट्यवधि, युरोपियन् वीर आपल्या पैगंबराची निशाणी दंडाला बांधून तुर्कस्थानांत येऊन धडकले; पण इतक्यांचाही समाचार खोट्या पैगंबरास भजणारे जे तुर्क लोक त्यांनीं एकट्यांनीं घेतला; असो; या तर मागल्या गोष्टी झाल्या; कीं ज्या वेळीं युरोपांतील राष्ट्रें अज्ञानांत मग्न असून रानटी अवस्थेंत होतीं. पण हल्लीं त्यावर सुधारणुकेची पूर्ण कळा येऊन बाकी सगळ्या जगास तीं तुच्छ करीत असतां एशियाकडील राष्ट्रें त्यांस सहज चिरडून टाकतां येण्याजोगीं आहेत कीं काय हें पाहूं. याचाही क्षणभर विचार केला असतां कोणाही निःपक्षपात व समंजस मनुष्यास सहज कळून येईल कीं आज एकोणिसाव्या शतकांतही जगाची स्थिति अकराव्या शतकापेक्षां फारशी बदलली आहे असें नाहीं. पाहा बरें, आमच्या पाश्चात्य राज्यकर्त्यांनीं टिपू सुलतान, बाजीराव, दौलतराव, यशवंतराव या सर्वांस एकामागून एक जिंकून आपलें निशाण उत्तरेस हिमालयापर्यंत, पूर्वेस ब्रह्मदेशापर्यंत, व पश्चिमेस अटक नदीपर्यंत जयघोषानें नाचवीत नेलें, व साऱ्या भरतखंडाचें प्रभुत्व फारां दिवसांनीं एका छत्राखालीं आणलें. पण इतकें असतांही आपल्या सामर्थ्याच्या जोरावर एकेचाळीस सालीं त्यांनीं अफगाणस्थानावर जेव्हां चाल केली, तेव्हां तद्देशीय इतिहासकारांनीं मोठ्या प्रेमानें गाइलेलें जें पाश्चात्यांचें शरीरबल व बुद्धिबल त्याची प्रचीति कशी खाशी आली! इंग्रेजी कवाईत व इंग्रेजी शहाणपण हीं दोन्ही त्या कडवे लोकांच्या तडाक्यापुढें चुराडा होऊन गेलीं; आणि इंग्रेजांच्या 'सवाई तुऱ्या'स पुरतेपणीं धुळींत लोळवून त्यांनीं साऱ्या जगास जाहीर करून दिलें कीं, मराठ्यांचाही ज्या राष्ट्रानें मोड केला तें कांहीं सामान्य नव्हे.[२]

---

१. अरबस्थानांतून एकाएकीं निघालेली ही वावटळ वर सांगितल्याप्रमाणें दूरदूरच्या देशांपर्यंत जाऊन थडकून सर्वथा दुर्धर झाली असतां हिंदुस्थानावर मात्र तिचें कांहीं चाललें नाहीं. ही गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. एक इंग्लिश् इतिहासकार म्हणतो—

"It cannot but appear a very notable circumstance, that while the followers of the Prophet completely subjugated Persia and Spain in two or three compaigns, the resistance which they met in their early encounters with the Hindus was so compact and resolute, that nearly three centuries elapsed after the first invasion, before they could make any permanent impression on India.

—*Marshman, Vol. I.*

२. अफगाणस्थानांतील मोहिमेचा जो शेवट झाला तशासारखें अपेश इंग्लिशांस कधींच आलें

[ पुढें चालू ]

हें सर्व एशिया खंडांतील एका राष्ट्राविषयीं झालें. पण येवढ्याचवरून आमच्या वाचकांपैकीं कित्येक कदाचित् ह्मणतील की, बरें मुसल्मानांच्या अंगी शौर्य आहे हें आह्मी पाहिजे तर करूं कबूल; पण आह्मी हिंदु तर इंग्रेजी इतिहासकारांच्या ह्मणण्याप्रमाणें भित्रे व नामर्द खरे कीं नाहीं? या प्रश्नाचेंही वरच्या एकंदर दूषणाप्रमाणेंच निराकरण करून आमच्या लोकांचें स्वत:विषयीं अद्याप किती अज्ञान आहे तें पुरतेपणी दाखवणें मोटेंसें कठिण आहे असें नाहीं. पण प्रस्तुतसारख्या विषयावर जसें हवें तसें लिहिण्याची मोठी पंचाईत असते. इंग्रेजी ग्रंथकारांनीं व मनानें इंग्रज बनलेल्या अशा एतद्देशीयांनीं आमच्या देशाविषयीं हवा तितका चारगटपणाचा व निव्वळ अज्ञानाचा मजकूर लिहिला तरी त्यास पूर्ण मुभा असते; पण आमच्यांपैकीं कोणीं अंमळ त्यांस वेडावांकडा शब्द लिहिला किंवा बोलला, कीं त्याच्यावर मात्र चोहोंकडून गहजब होतो. मिशनरी व बाट्ये लोक तर त्यास खाऊं का गिळूं याप्रमाणें पाण्यांत पाहूं लागतात; सरकारी अधिकाऱ्यांचीही मर्जी खप्पा होऊन त्यास चाकरीच्या संबंधानें नडी देऊं लागतात; शिवाय त्याच्या देशबंधूंही पुष्कळ

---

नसेल. ज्या सैन्यानें मोठ्या थाटानें सिंधुनद उल्लंघून शत्रूच्या मुलखांत चाल केली त्यापैकीं हरतेशेवटीं एकजण मात्र परत आला, मग तो गोरा होता कीं काळा नव्हे! या भयंकर नि:पाताचें वर्तमान ऐकून थेट जे पाश्चात्य लोक त्यांचीही कशी अवस्था झाली हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल—

"There was not in that great palaced city (Calcutta), or in any one of the smaller stations or cantonments in India, an Englishman whose heart did not beat, and whose hand did not tremble, for the fate of the Cabul force, when he opened the letters and papers which brought him intelligence from beyond the frontier. No one who dwelt in any part of India during the early months of 1842 will ever forget the anxious faces and thick voices with which tidings were sought, questions and opinions asked and interchanged, hopes and fears expressed, rumours sifted, probabilities weighed, and how, as the tragedy deepened in solemn interest, even the most timid and desponding felt that the ascertained reality far exceeded in misery and horror all that their excited imaginations had darkly foretold. There was a weight in the social atmosphere as of dense superincumbent thunder-clouds. The festivites of the cold season were arrested—gaiety, and hospitality were not. There were few families in this country which did not look on with apprehension for the fate of some beloved relation or friend; while unconnected men, in whom the national overlaid the personal feeling in this conjuncture, sighed over the tarnished reputation of their country, and burned to avenge the insults that had been heaped upon it."

*Kaye's War in Afghanistan.*

असे असतात कीं त्यांस आपणांवर केलेल्या व्यर्थ आरोपांचेंही खंडन केलेलें पाहवत नाहीं; त्यांस 'तुह्मी पशु आहां, मूर्ख आहां, नीच आहां' हीच पुष्पवृष्टि अधिकाधिक तोषप्रद होते. तेव्हां या पंचायतीमुळें असल्या विषयावर आपले विचार पूर्णपणें प्रगट करण्यास आपल्या लोकांस सवड नाहीं. तथापि आज दोन अडीच वर्षें प्रकृत विषयाच्या संबंधानें या पुस्तकांत जागोजाग बरेच उल्लेख केले आहेत; त्यांहून येथें आणखी कांहीं सविस्तर लिहिण्याची गरज राहिली नाहीं. यास्तव विषयानुरोधास्तव एक मात्र मोठें प्रमाण येथें दाखल करतों ह्मणजे पुरें. हें प्रमाण इतकें ढळढळीत असतां आमच्या स्वीय व परकीय प्रतिपक्ष्यांस दिसत नाहीं हें त्यांच्या मदांधत्वाचें किंवा अज्ञानांधत्वाचें दर्शक झालें पाहिजे. हिंदुस्थानच्या इतिहासाची ज्यांस ज्यास थोडीबहुत तरी माहिती आहे त्या सर्वांस ही गोष्ट महशूर आहे कीं, फ्रेंचांचा प्रख्यात मुत्सद्दी डुप्ली यानें हा देश काबीज करण्याची एक मोठी उत्कृष्ट कल्पना काढली. ती ही कीं, एतद्देशीय लोकांस चाकरीस ठेवून त्यांच्या युरोपच्या कवाइतीक हुकूम पलटणी तयार करायाच्या. ही कल्पना पुढें इंग्रेजांसही पसंत पडून त्यांनीं आपलें सैन्य हळूं हळूं याच रीतीनें वाढविलें. या काळ्या लोकांस इंग्रेज लोक 'शिपाई' ह्मणतात. या शिपायांनीं अदम्या शंभर वर्षांत इंग्रेजांचें राज्य साऱ्या हिंदुस्थानभर कोणत्या प्रकारें करून दिलें, आणि प्राच्यदेशीय असतां व मूर्तिपूजक असतां किती शौर्यानें व किती इमानानें आपल्या परस्थ धन्याची त्यांनीं चाकरी बजावली हें साऱ्या जगास विश्रुत आहे. इंग्रेजी राज्याची टोलेजंग इमारत केवळ त्यांनींच सांवरली असून तिचें आधारस्तंभत्व त्यांकडे किती पूर्ण आहे याचा प्रत्यय सुमारें वीस वर्षांपूर्वीं उत्कृष्ट आला आहे, तो कोणासही सांगायाला पाहिजे असें नाहीं. असो; तर यावरून आमच्या निंदकांस आह्मी असें विचारणार कीं, हे हिंदुस्थानच्या इतिहासांत गाजलेले शिपाई कोण? येथीलच हिंदु किंवा विलायतेहून आलेले कोणी आहेत?

याप्रमाणें प्राच्य राष्ट्रांवर केलेल्या पहिल्या दूषणाचा विचार झाला. यावरून आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल कीं, वृथाभिमानाचा व अंधपरंपरेचा या जगांत किती

---

१. येथील काळ्या पलटणांनीं गोऱ्या लोकांच्या बरोबरीनें लढून केवळ हिंदुस्थानांतच लढाया मारल्या आहेत असें नाहीं; तर परमुलखांतही दूरदूर युद्धप्रसंग केले आहेत. अफगाणस्थान, सयाम, चीन, हबशांचा मुलूख, हे तर राहोतच; पण एकदां मिसर देशांत नेपोलियनच्या सैन्याशीं व दुसऱ्या प्रसंगीं रूमशामच्या राज्यांत रशियन् लोकांशींही त्यांचा सामना झाला आहे. कित्येक प्रसंगीं तर गोऱ्या पलटणी मागें हटल्या असतां यांनीं पुढें सरसावून फत्ते केली आहे. असो; या ठिकाणीं मागें नवव्या अंकांत दिलेला एक चुटका मूळ इंग्रेजींतून उतरून घेतों—

"Their conduct during the war with Hyder excited the admiration of all who knew it. Frederick the Great of Prussia was known to have said, after reading 'Orme's Account of the War in India,' that had he the command of troops who acted like the sepoys on that occasion, he could conquer all Europe."

*Briggs's Letters, VIII.*

प्रचार आहे. जो उल्लेख पूर्वीच्या ग्रंथकारांनीं एकदां करून ठेवला तो आपल्या पोकळ गर्वास अनुकूल पडल्यामुळें पुढील मोठमोठ्या इतिहासकर्त्यांनीही अधिक शोध बिलकुल न करतां खुशाल करायाचा; मग तो केवळ एकदेशीय किंबहुना अगदीं अप्रयोजकपणाचा असला तरी कांहीं चिंता नाहीं. तसेंच वरील विवेचनावरून सर्वांच्या हेंही लक्षांत येऊन चुकेल कीं, सामान्यतः वरवर पाहतां जी गोष्ट खरी व प्रमाणसिद्ध अशी वाटते तिचा पूर्ण व सूक्ष्म विचार केला असतां तिचें स्वरूप एकदम किती पालटतें !

वरच्याप्रमाणेंच इतर दोषारोप जे युरोपियन् ग्रंथकारांनीं इकडील लोकांवर केले आहेत, त्यांचाही अंमळ बारकाईनें विचार केला असतां कोणाही समंजस व निःपक्षपात मनुष्यास स्पष्ट दिसल्यावांचून राहणार नाहीं, कीं तेही मोठ्या शोधक बुद्धीनें व प्रांजलपणानें केले आहेत असें नाहीं. सर्वांचें मूळ पाहिलें असतां अज्ञान व तज्जन्य वृथागर्व हेंच आहे. या दोषारोपांचें थोडेंबहुत खंडन या पुस्तकांत येथवर जागोजाग केलेंच आहे. तें सविस्तर व यथास्थित होण्यास झटलें म्हणजे ग्रंथांचे ग्रंथ लागतील. वरील एकाचें निराकरण करण्यासच वर इतकी जागा लागली. यास्तव बाकीच्यांचा सामान्यतः निर्देश मात्र करून प्रस्तुत अंक आटपतों.

युरोपांतील सर्व राष्ट्रें आज सुमारें हजार दीड हजार वर्षें ख्रिस्ती धर्मास अनुसरून (अनुसरत असून ? सं०) तो धर्म त्यांचे ठायीं आज कित्येक शतकें पूर्ण भिंबून गेला आहे. सध्यांही त्या खंडांत कोट्यवधि लोक मोठे भाविक ख्रिस्ती असून बैबल हेंच ईश्वरप्रणीत शास्त्र व प्रभु येशू हाच एक जगाचा तारक असें मानणारे आहेत. ज्यांच्या ठायीं अर्वाचीन विद्येच्या योगानें जिज्ञासा व सत्यप्राप्ति वाढून ती शुभवर्तमानाच्या महत्त्वास बाधक झाली आहे असेही लोक जरी त्या खंडांत लक्षावधि आहेत, तरी यांतील बहुतेकांचा व वरील भाविक लोकांचा एका गोष्टींत उत्कृष्ट मेळ पडतो. ही गोष्ट परधर्माविषयीं तिरस्कार व द्वेष ही होय. त्यांची अशी बळकट समजूत दिसते कीं, जर पृथ्वीवर एखादा खरा धर्म असेल, तर तो कदाचित् आमचाच असेल; निदान सदाचरणाच्या प्रवृत्तीस तरी ख्रिस्ती धर्म जसा अत्यंत अनुकूल आहे तसा दुसरा नाहीं. हें एकदां ब्रह्मवाक्य म्हणून गृहीत धरून चाललें, कीं बाकीचीं राष्ट्रें दुराचारी, पापमग्न वगैरे समजुती झाल्याच. मुसलमानी धर्माविषयीं, बौद्ध धर्माविषयीं, व विशेषतः हिंदु धर्माविषयीं इंग्रेज ग्रंथकारांपैकीं सामान्यतः कोणाचेही लेख पाहिले, तरी वरील प्रकार त्यांत पूर्णपणें आढळल्यावांचून राहणार नाहीं. मुसलमानांचा पैगंबर महंमद या विषयींचा उल्लेख 'ढोंगी' 'भोंदू' या उपपदांशिवाय कधीं व्हावयाचाच नाहीं; तसेंच बौद्धधर्माविषयींही आमच्या बहादर पाश्चात्य लोकांचा असा समज आहे कीं, तो धर्म कसचा, त्याचा पायाच मुळीं नास्तिकपणाचा आहे ! . आमच्या धर्माविषयीं तर कांहीं बोलायासच नको. तेहतीस कोटि देव ज्यांनीं कल्पिले व दगडाच्या, लांकडाच्या, किंवा धातूच्या मूर्तींच्या जे पायां पडतात असल्या महामूर्ख लोकांचे धर्मसंबंधीं विचार किती अप्रयोजक असले पाहिजेत बरें ! असो; तर याप्रमाणें आपला धर्म काय तो परम पवित्र असें मानल्यामुळें इतरांविषयीं पाश्चात्यांचे वरच्यासारखे कोते समज सहजच होतात. हीच गोष्ट

लोकनीति व लोकाचार यांसही लागू. प्राच्य राष्ट्रांच्या नीतीची कीर्ति युरोपांत पहिल्यापासून आहे. ती ही की, इकडच्यासारखे लबाड लोक कोठेंच नाहींत; ते खऱ्या खोट्याचा कधींच विधिनिषेध बाळगीत नसतात; इमानानें वागणें म्हणजे त्यांस स्वप्नींही ठाऊक नाहीं. नंद-कुमारासारखीं रत्नें निपजविणें हा अधिकार इकडील भूमीचाच. वरील महारत्नाची प्रभा वर्णीत असतां मेकॉले साहेबांनीं दोन्ही हात अगदीं भुईवर टेकले आहेत. ते आपल्या विलायतवासी बंधूंस सांगतात कीं, "बांधव हो! मी येवढा कलमबहादर खरा; पाहा येवढा क्लैव साहेबांचा चरित्रमहिमा, पण तोही मी गाइला; पण या वेळ्याचें बुद्धिलाघव व हातचलाखी कांहीं अघटित! येथें माझें वर्णनसामर्थ्य अगदीं कुंटित होतें. तरी पुढील कोष्टकावरून वरील अद्भुत सोन्याची तुम्हांस कांहीं कल्पना झाली तर बघा,—ऐका नीट लक्ष द्या! तुमच्या आमच्याहून इटालियन् लोक जितके नीतींत कमी, इटालियन् लोकांहून जितके हिंदु लोक, हिंदु लोकांहून जितके बंगाली बाबू, तितका आपल्या देशबंधूंहून वरील निमकहरामी नंदकुमार!!"[१] वा! लॉर्ड् साहेबांनीं काय अगदीं बिनचूक कांट्यानें नीतीचें माप जोखलें बोवा! येवढें हें अष्टराशिक प्रमाण तंतोतंत जुळविण्यास त्यांस केवढें सूक्ष्म गणित करावें लागलें असेल बरें!

आतां सरतेशेवटचा मासला दिव्यविषयींचा पाहा. मागें दोघां नामांकित इतिहासकारांचे जे उतारे दिले आहेत त्यांवरून आमच्या वाचकांच्या लक्षांत कांहींसें आलें असेल की, युरो-पियन् लोक हल्लीं ज्या ज्ञानाची येवढी बढाई मारतात त्याचा उगम मूळचा अन्य देशांतून आहे. तरी ज्याप्रमाणें पोरें अंमळ जाणती होऊं लागून त्यांस आपल्या सामर्थ्याचा अनुभव जरा येऊं लागला, कीं लागलीच आपलें मूळ विसरून जाऊन तीं आईबापांस गोष्टी सांगूं लागतात, किंबहुना तारुण्याच्या ताठ्यांत तीं त्यांस आपणांस शोभेनाशींही वाटूं लागतात, त्याप्रमाणेंच

---

१. "Of his moral character it is difficult to give a notion to those who are acquainted with human nature only as it appears in our own Island. What the Italian is to the Englishman, what the Hindu is to the Italian, what the Bengalee is to the Hindu, that was Nuncomar to the other Bengalees."

—*Warren Hastings.*

वरील वाक्यांत मेकॉले साहेबांनीं आपल्या देशबंधूंस नीतियुक्त आचरणाच्या संबंधानें केवळ शिखरावर नेऊन खुशाल बिनदिक्कत बसवलें आहे; पण इंग्लंडचा इतिहास ज्यास म्हणून माहीत असेल, अथवा हिंदुस्थानाचें प्रभुत्व कोणत्या रीतीनें त्यांस कसें प्राप्त झालें याचा जो क्षणमात्र विचार करील, तो वरील महासिद्धांतास केवळ मानच डोलवील असें वाटत नाहीं. फार कशाला, प्रस्तुत ग्रंथकाराचे दोन निबंधच वरील महावाक्य पुरतेपणीं खोडून टाकण्यास बस आहेत. दुसऱ्याची बायको पिळवणें, दुसऱ्याचें द्रव्य तें आपलेंच मानून खुशाल दिवसा ढवळ्या दरवडे घालणें, निरपराध मनुष्यास फांशीवर चढवणें, कार्य पडल्यास बिनदिक्कत दुसऱ्याची सही ठोकून देणें,—हीं जर इंग्रेजी नीति असेल, तर असला अपूर्व मेवा मेकॉले साहेबांचा व त्यांच्या देशबांधवांना त्यांचा त्यांजपाशींच राहो! त्याजबद्दल इकडील प्राच्य राष्ट्रें त्यांचा कधींही हेवा करणार नाहींत!

पाश्चात्यांची आज अवस्था आहे. त्यांस असें वाटूं लागलें आहे कीं, आपण आकाशांतून पडलों आणि भुईवर सांवरलों ! आजपर्यंत सगळें जग अज्ञानांत व पापांत बुडून राहिलें होतें त्यावर ज्ञानाचा व सत्याचा प्रकाश ओतण्यास आपणांस आकाशांतल्या बापानें बरोबर दिवटी देऊन खालीं पाठवलें आहे ! या उन्मादस्थितीच्या प्रत्ययार्थ वरील नामांकित ग्रंथकाराचेच लेख बघा. जेथें जेथें हिंदूंच्या प्राचीन विद्येचा उल्लेख करण्याचा यत्किंचितही संबंध आला आहे तेथें तेथें त्यानें वरील वृत्ति प्रगट केली आहे. एके प्रसंगीं तर तिचें स्वरूप अगदीं पूर्ण दृष्टीस पडलें. मेकॉले साहेब १८३४ सालीं हिंदुस्थानांत येऊन त्यांनीं या देशाच्या दोन मोठ्या कामगिऱ्या बजावल्या. एक ही कीं, आमच्या देशाकरतां कायद्याचें एक नवें कोड तयार केलें; आणि दुसरी ही कीं, सध्यां चोहोंकडे चालू असणारी शिक्षणपद्धति सुरू करण्याविषयीं त्यांनीं शिफारस केली. ती अशी कीं, त्या वेळेस एतद्देशीय लोकांच्या शिक्षणाच्या संबंधानें एक मोठी वाटाघाट बंगाल्यांत सुरू होती. कित्येकांचा अभिप्राय असा होता कीं, इकडील प्राचीन भाषांचें अध्ययन आजपर्यंत जसें चाललें आहे तसेंच चालवावें,[1] इंग्रेजी सुरू करण्याचें विशेष कारण नाहीं. दुसऱ्यांचें ह्मणणें असें होतें कीं, हें जुनें भारूड आतां शिकून काय फायदा आहे ! नुसतें इंग्रेजीच जिकडे तिकडे चालू करावें. दोन्ही पक्षांकडे मोठमोठे नामांकित विद्वान् होते व दोघांचाही आपापल्या मताविषयीं मोठा आग्रह होता. शेवटीं या वादावर एकंदरीत निवाडेपणें अभिप्राय देण्याला सरकारानें मेकाले यास सांगतलें. तो त्यानें एका सविस्तर लेखांत दाखल करून सर्वांस जाहीर केला. तेव्हांपासून सर्वांच्या मतें वरील वादांतील दुसराच पक्ष खरा ठरून आज चाळीस वर्षें सगळ्या देशभर तोच क्रम चालू आहे. तर या प्रसंगीं प्रस्तुत ग्रंथकाराचें प्राच्यदेशीय राष्ट्रांविषयीं मनोगत पूर्ण प्रगट झालें आहे. वरील लेखाचें एकंदर स्वरूप त्याच्या उपसंहारावरून स्पष्ट दिसतें. तो असा आहे—"आपण ज्ञानप्रसार करणारी मंडळी असा मोठा किताब धारण केला आहे; पण वस्तुतः पाहतां तो घेण्यास आपणांस बिलकुल अधिकार नाहीं. कारण आपली कृति पाहिली तर खऱ्या ज्ञानाचा प्रसार आपण मुळींच करीत नसून खोटें नाहींसें होत चाललें आहे त्यास मात्र आडवें येत आहों. ज्या पुस्तकांतील मजकुराची किंमत त्यांतील कागदांच्या इतकीही व्हावयाची नाहीं. असलीं अप्रयोजक इतिहास, अप्रयोजक पदार्थविज्ञान, अप्रयोजक अध्यात्मज्ञान, अप्रयोजक ईश्वरज्ञान, वगैरे विषयांवरील पुस्तकें आपण छापून प्रसिद्ध करीत आहों !"[2] त्यावेळच्या पंडितांत अग्रगण्य ह्मणून ज्यां-

१. वरील वाद सुरू होण्यापूर्वीं पुष्कळ वर्षें बंगाल्यांत फारसी, अरबी व संस्कृत या भाषा शिकण्याच्या व त्यांतील विद्यांचें अध्ययन करण्याच्या पाठशाळा होत्या. तोच प्रकार पेशव्यांचें राज्य घेताच दोन तीन वर्षांनीं या शहरांतही सुरू केला होता हें सर्वांस माहीत आहेच.

२. "I believe that the present system tends, not to accelerate the progress of truth, but to delay the natural death of expiring errors. I conceive that at present we have no right to the respectable name of a

(पुढें चालू.)

कडे वाद तोडण्याचें सरकारानें सोंपवून दिलें त्यांचें निःपक्षपातपणाचें व समंजसतेचें मत सरतेशेवटीं वरच्यासारखें पडलें. एकूण वरील साहेबांच्या मतें अरबी, फारसी, संस्कृत वगैरे भाषांतील ग्रंथांची योग्यता इतकी झाली, कीं त्यांच्या कागदांचीही किंमत आंतील मजकुरास नाहीं. केवढी झोटिंगपाच्छाही ही! वरील महाविद्वान् पंडितानें जर यत्किंचित् विचार केला असता तर आह्मांस खास वाटतें कीं, त्याची अशी खात्री होऊन जाती कीं, इकडील भाषांत शेंकडों असे ग्रंथ आहेत कीं, त्यांस पुढ्यां घालण्यास त्यांच्या अत्यंत मोलवान् ग्रंथाच्या अत्यंत मंलवान् आवृत्तीचीं पानें फाडलीं तर तीही योग्यता त्यांस पुरतेपणीं साजणार नाहीं; आणि ज्या वेळीं मेकॉले हें नांव केव्हांच लोपून गेलें असेल, हिंदुस्थानाचें अधिपतित्व अमेरिकेंतील लोकांकडे किंवा आफ्रिकेंतील एकाद्या राष्ट्राकडे कदाचित् गेलें असेल, आणि "कोणी न्यूझिलंडचा मुशाफर 'लंडन् ब्रिज'च्या एकाद्या मोडक्या कमानीवर उभा राहून भोंवतालच्या ओसाड प्रदेशावर नजर देईल, आणि 'सेंटपॉल्'च्या मोडकळीस येऊन पडलेल्या देवळाचा नकाशा काढील" त्या काळीही त्यांची कीर्ति आकाशांतील सूर्यचंद्राप्रमाणेंच कालगतीनें अबाधित होत्साती आजच्या सारखीच उज्वल राहील!

येथवर जो बऱ्याच विस्ताराचा मजकूर लिहिला त्यावरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल कीं, पाश्चात्य राष्ट्रांस इकडील लोकांचें यथार्थ ज्ञान अद्याप कांहींच झालें नाहीं. अज्ञानापासून उद्भवणारा व दृढतर होणारा जो दुराग्रह त्याचें प्राबल्य आजही त्यांचे ठायीं अगदीं पूर्वीप्रमाणेंच आढळतें. हें समूळ नाहींसें होण्याचे मार्ग कोणते तेही वर सांगितलेच आहेत. त्यांचें अनुसरण आमचे परस्थ बंधु केव्हां करतील हें सांगवत नाहीं; पण तें जेव्हां होईल तेव्हां त्यांस पूर्णपणें कळून येईल कीं, शारीरगुण किंवा मानसिकगुण कोणत्या एकाच राष्ट्राचे ठायीं परमेश्वरानें ठेवले आहेत असें नाहीं. जगाचा खरा नियंता जो आहे त्याच्या अंगीं पवित्र शास्त्रांत सांगितलेल्या आकाशांतील बापाप्रमाणें पक्षपातबुद्धि मुळींच वास करीत नाहीं. त्याचीं सर्वांवर समदृष्टि असून साऱ्या राष्ट्रांस त्यानें प्रायः सारख्याच गुणांनीं संपन्न करून ठेवलें आहे; इतकेंच मात्र कीं, ते ते गुण प्रगट होण्यास कांहीं विशेष काळ व प्रसंग यावा लागतो. ही अनुकूल संधि कांहीं राष्ट्रांची यापूर्वी येऊन गेली, कांहींची सध्यां आलेली आहे, व कांहींची नुकती यावयास लागली आहे. तेव्हां यावरून पाहतां अमुक अमुक राष्ट्रसच आपली शेखी मिरवण्यास फारसें कारण आहे असें नाहीं. कालचक्र हें सतत फिरत आहे; जो देश आतां वैभवाच्या शिखरास चढलासा दिसतो तोच घटकाभरानें अगदीं रसातळास जाऊन मिळतो. गेल्या शंभर वर्षांतच सगळ्या

---

Board of Public Instruction. We are a board for wasting public money; for printing books which are of less value than the paper on which they are printed while it was blank; for giving artificial encouragement to absurd history, absurd metaphysics, absurd physics, absurd theology.—"

*Minute on Education.*

जगभर किती फेरफार होऊन गेले आहेत व आणखी शंभर वर्षांनीं काय काय उलथापालथी होतील त्या कोणाच्यानें सांगवणार आहेत ? तर यावर नजर देऊन, व आपली स्थिति पांच-सहाशें वर्षांमागें काय होती हें लक्षांत आणून, तसेंच इकडील देशांचें हरएक तऱ्हेचें ऋण त्यांच्या डोक्यावर आहे त्याचीही मेहेरबानीनें समयविशेषीं आठवण करून, पाश्चात्य ग्रंथकार प्राच्यांविषयीं काय लिहिणें तें जर लिहीत जातील, तर फार बरें होईल. एक तर इकडील देशांविषयीं अत्यंत अप्रयोजक व कुत्सित मतें प्रसिद्ध केल्यानें इकडील लोकांच्या मनांत पाश्चात्यांविषयीं विनाकारण जो द्वेषभाव माजतो तो बंद होईल; व पाश्चात्यांसही इकडील राष्ट्रांविषयीं यथार्थ ज्ञान होऊन त्यांच्या अज्ञानाचें व गर्वाचें खंडन खंडाळ्याच्या घाटांत किंवा काबूलकंदाहारच्या पहाडांत वेळोवेळीं होण्याचा जो अनिष्ट प्रसंग येतो तोही बहुधा टळेल. पण सर्वांहून मोठा फायदा झटला झणजे हा कीं, इतिहासापासून होणारा मुख्य लाभ जो मानव जातीच्या-मनोधर्माचें ज्ञान तें सर्वांस यथावत् होऊन सध्यां चोहोंकडे चालू असणारे जे वेडगळ भ्रम, कीं युरल् पर्वताच्या एका पायथ्यापर्यंत व युरल् नदीच्या एका तीरापर्यंत ज्ञान, शौर्य, व नीति यांचें राज्य; व दुसऱ्या पायथ्यापासून व दुसऱ्या तीरापासून लागलाच अज्ञानाचा, भेकडपणाचा, व दुष्टपणाचा अंमल लागला, हे सर्व दूर होतील.

---

अयं निजः परो वेति गणना लघुचेतसाम् ।
उदारचरितानां तु वसुधैव कुटुम्बकम् ॥[1]

अंक ३२--(१) विषयोपन्यास. (२) प्राच्य इतिहासाचे दोन भाग. (३) पुढील लेखाचा विषय. (४) अरब लोकांचा इतिहास. (५) इराण देशाचा इतिहास. (६) हिंदुस्थानचा इतिहास.

१. गेल्याच्या मागील अंकांत प्राच्य राष्ट्रांविषयीं यथार्थ इतिहासरचना करण्याची योग्यता पाश्चात्य ग्रंथकारांचे ठायीं कितपत आढळते याविषयीं बरेंच सविस्तर विवरण केलें. आतां हे इतिहास त्यांनीं कोणकोणते रचले आहेत तें सांगून त्यांचें एकंदर स्वरूप आमच्या वाचकांच्या लक्षांत कांहीं येईलसें करतों.

२. प्राच्य राष्ट्रांच्या इतिहासाचे दोन भाग करणें अवश्य आहे; एक प्राचीन व दुसरा अर्वाचीन. हें अर्वाचीनत्व व प्राचीनत्व पुनः दोन प्रकारचें आहे. तें असें कीं, हिंदु, चीन, इत्यादि कांहीं राष्ट्रें अत्यंत प्राचीन काळीं प्रसिद्ध असून पुनः अर्वाचीन काळींही विद्यमान आहेत; यास्तव त्यांचा प्राचीन इतिहास आहे व अर्वाचीनही आहे कांहीं राष्ट्रें---फिनीशियन्,खाल्डियन्,मिसरी वगैरे---हीं प्राचीन काळीं मात्र विख्यात असून ग्रीक्, रोमन् कार्थेजिनियन् यांच्याप्रमाणें आतां त्यांचा मागमूसही उरला नाहीं. त्यांच्या

---

१. "हा माझा, हा परका, ही कुत्सित बुद्धि संकुचित मनाच्या मनुष्यांची; परंतु जे उदार मनाचे आहेत त्यांचे आप्तजन झणजे अवघ्या भूमंडळावरील लोक होत।"

बास्तव्याच्या ज्या खुणा मागें राहिल्या आहेत त्यांवरूनच काय, तें त्यांच्या अस्तित्वाचें अनुमान करायाचें. दुसरीं अरब, इराणी, मोगल, तुर्क, शीख वगैरे अर्वाचीन काळींच उदयास आलेलीं आहेत; यांचें प्राचीन इतिहासांत नांवही नाहीं. असो; तर वरील विषयावर लिहायाचें ह्मणजे हे सर्व भाग त्यांत आले पाहिजेत.

३. आतां वरील सर्व राष्ट्रांच्या इतिहासांवर इंग्रेजी भाषेंत लहान मोठे ग्रंथ जरी लिहिलेले आहेतच, तरी ते सर्व सारख्या महत्त्वाचे नसल्यामुळें, व एकंदर लोकांसही त्यांविषयीं विशेष जिज्ञासा वाटत नसल्यामुळें, येथें सर्वांविषयीं उल्लेख करीत नाहीं. प्राच्य राष्ट्रांत विद्यमान कालापर्यंत विशेष प्रसिद्ध असणारीं चार राष्ट्रें जीं अरब, इराणी, हिंदु व चीन त्यांविषयीं मात्र लिहितों.

४. पहिल्यानें अरब लोक. या राष्ट्राविषयीं प्राचीन काळची माहिती ह्मणण्यासारखी विशेष नाहीं. यांचा देश बहुतेक वालुकामय असल्यामुळें त्यांत फार थोड्या जिनसांचें उत्पन्न होतें. यामुळें तेथील लोक अद्याप लमाणाप्रमाणें भटकणारे आहेत. आपले कळप बरोबर घेऊन ते त्या देशांत ठिकाठिकाणीं फिरत असतात. यामुळेंच अरबस्थानाचा आंवतालच्या देशांशीं फार दिवस संबंध घडला नाहीं. कारण परदेशांशीं व्यापार करण्याचें त्यांजपाशीं साधन नव्हतें. व देशाच्या कंगालपणामुळें व वालुकामय मैदानांमुळें कोणी शत्रुही आंत चालून येण्यास धजत नसे. याप्रमाणें हे लोक दीर्घ काळपर्यंत साऱ्या जगाहून विलग राहिले होते. त्यांविषयींची माहिती ग्रीक् व रोमन् लोकांच्या ग्रंथांत मात्र कांहीं असून टॉलेमीसारख्या प्राचीन भूगोलवेत्त्यांनीही वरील देशाचें कांहीं वर्णन केलें होतें. हा सर्व प्रकार इसवी सनाच्या सहाव्या शतकापर्यंत चालू होता. पण या शतकाच्या शेवटापासून प्रस्तुत राष्ट्राचा जो अभ्युदय होऊं लागला तो अद्यापही चालूच आहे असें ह्मटलें पाहिजे. इ. स. ५७० या वर्षी मुसलमानांच्या राज्याचें व धर्माचें स्थापन करणारा जो त्यांचा पैगंबर महंमद त्याचा जन्म झाला; व पुढील शतकाच्या आरंभापासून वरील दोहोंचा क्रम सुरू झाला. त्या देशाच्या लोकांचे स्वाभाविक जें शौर्य त्याचें धर्माच्या आवेशानें अतिशयित उत्तेजन होऊन ते जिकडे जिकडे गेले तिकडे तिकडे थोडक्याच काळांत त्यांची सत्ता पूर्णपणें स्थापित झाली; आणि ईब्रो§ नदीपासून तों सिंधुनदीपर्यंत‡ महंमदी धर्माचा प्रसार एक शतकाच्या आंत होऊन गेला. पण राज्याचा विस्तार अतिशयित अवाढव्य जसजसा होत जातो तसतसें त्याच्या नाशाचें बीज त्यांत उत्पन्न होत जातें असा सामान्य नियम आहे. त्याप्रमाणेंच महंमदाचे वंशज जे कालिफ* त्यांच्याही राज्याची अवस्था झाली. ती

§ The Ebro-भूमध्य समुद्रास मिळणारी स्पेनमधील नदी इबो ‡ ह्मणजे पश्चिमेस स्पेनपासून पूर्वेस हिंदुस्तानपर्यंत. 'सम्पादक'

* कालिफ (Caliph) मुसलमानी धर्माच्या प्रमुखाचें नांव; याचा अर्थ वारस, वंशज

(पुढें चालू)

अशी कीं, त्यांचे सरदार दूरदूरचे मुलूख काबीज करून तेथल्या तेथें जसे स्थाईक होत चालले तसतसे मूळच्या गादीस ते ओळखीतनासे होऊन हळू हळू आपला अधिकार स्वतंत्र चालविण्याची इच्छा करूं लागले; व या त्यांच्या इच्छेस त्यांचा दूरपणा अनुकूल पडला हें उघड आहे. याशिवाय दुसरा पुढें असाही प्रकार झाला कीं, मोगल, तुर्क वगैरे लोक जे महंमदी धर्मास अनुसरून कालिफांच्या सैन्यांत सामील झाले होते त्यांस कालेंकरून आपल्या सामर्थ्याचा अनुभव जसजसा येऊं लागला तसतसे ते आपल्या धन्यांस्च वरचढ होऊं लागले; आणि त्यांनीं लवकरच कालिफांच्या फौजांस हटवून बगदाद वगैरे शहरें आपल्या हस्तगस्त करून घेतलीं. पुढें त्यांपैकीं एका राष्ट्रानें एशिया खंडांत मोंग्या सार्वभौमत्वास चढून दुसऱ्यानें युरोपचें नाकें धरलें, व अद्यापही त्यांचें ऐश्वर्य तेथें अखंड चाललें आहे हें साऱ्या जगास विदित आहेच.

असो; आतां वरील लोकांचा इतिहास इंग्रेजी भाषेत कोणी रचला आहे तो सांगतों. गेल्या अंकांत ज्याच्या ग्रंथांतून एक दोन उतारे दिले आहेत तो ऑक्ले नामक इतिहासकारवरच्यांपैकीं एक होय हें आमच्या वाचकांस कळलेंच असेल. वरील इतिहास त्यानें इ० स० १७०८ या वर्षी रचला. आधुनिक प्राच्य राष्ट्रांच्या इतिहासावर युगांपात झालेला हा बहुधां पहिलाच ग्रंथ असेल. हा छापून प्रसिद्ध झाला असतां त्याचा लोकांकडून किरपत आदर झाला असावा याचें अनुमान वरील इतिहासकाराची जी सदोदित विपन्न स्थिति होती त्यावरून चांगलें करतां येईल. ऑक्ले हा येवढा विद्वान् असतां व त्यांतून त्यावेळेस ज्या भाषेची एकंदर लोकांस मुळींच माहिती नव्हती त्या अरबी भाषेचा व्यासंग करून तींत तो निष्णात झाला असतां त्याच्या पदरीं इतकी गरिबी होती कीं, सावकारी देण्याबद्दल त्यास कित्येक वेळां बिनभाड्याच्या घरांत जाण्याचा प्रसंग आला. त्याच्या सर्वप्रसिद्ध इतिहासाचा कांहीं भाग वरील ठिकाणीच लिहिलेला आहे. मागें ‡एके अंकांत मराठ्यांच्या

(अथ तुत्र महंमदाचा) असा आहे. प्रत्यक्ष महंमदाच्या वंशांत चारच पिढ्यांपर्यंत कालिफाचा मान राहिला. पुढें त्याच्या ज्ञातींतील लोक कालिफपदावर येऊं लागले. इ. स. ६६१ ते ७५० पर्यंत दमास्कस येथें तेरा कालिफ झाले व तेव्हांपासून १२५८ पर्यंत बगदाद येथें सदतीस झाले. अखेर १२५८ सालीं तुर्कांनीं जुन्या घराण्याला बाजूस सारून खलिफत (Caliphate) गिळंकृत केली व सुलतानच मुख्य कालिफ बनला. 'सम्पादक'

१. नुकती दोन तीन महिन्यांपूर्वी तुर्कस्थानची, सर्विया, बल्गेरिया वगैरे प्रांतांशीं निकराची लढाई होऊन तिचा काय परिणाम झाला तो आमच्या वाचकांस विदित आहेच. या लढाईच्या आरंभीं सर्वांस असें वाटून गेलें होतें कीं, रूमशामच्या राज्याची शमर वर्षे खास येऊन ठेपलीं! वरील बंडखोर प्रांतांस साऱ्या युरोपाची अनुकूलता असून रशियन् लोकांचें तर त्यास आतून पुष्कळ साहाय्यही होतें, तरी काय चमत्कार झाला कीं, वरील चारी प्रांतांत तुर्क लोकांच्याच सैन्यांस यश येऊन खिस्ती बंडवाल्याचा अगदीं मोड झाला. तशीच याहून ही दुसरी अतिशय विस्मय करण्याजोगी गोष्ट नुकतीच काय घडून आली कीं, एशिया खंडांत वगैरे कोठें कधींही न ऐकलेली जी गोष्ट कीं राजास प्रधानादि लोकांनीं पदच्युत करावें, ती बिलकुल दंगाधोपा न होतां सुलतानाच्या अमीरउमरावांनीं एका चार घटकेंत कुस्तुंतुनिया शहरांत करून टाकली!!

‡ अंक ८ वा, पृष्ठ ९० पाहा. 'सम्पादक'

इतिहासकाराची इंग्रेजी वाचकांवरून जी संभावना झालेली वाचकांस कळवली आहे ती ध्यानांत आणली असतां, व आजच्या घटकेस इंग्लंडांतील मोठमोठ्या विद्वान् पुरुषांस खुद्द हिंदुस्थानाविषयींही किती चोख माहिती आहे तिचा अंमळ विचार केला असतां, अरब लोकांचा इतिहास सुमारें दोनशें वर्षांपूर्वी कितीसा खपण्याचा संभव आहे हें सहज लक्षांत येईल. असो; तरी या अडचणी न जुमानतां वरील इतिहासकारानें आपला उद्योग शेवटास नेला. अरब लोकांचा उदय कसा झाला व त्यांनी कोणकोणते अद्भुत पराक्रम केले हें समजण्याची त्याच्या देशबांधवांस बिलकुल इच्छा नव्हती, तरी पुढील काळावर नजर देऊन महंमदाचे चरित्र व खलिफांची कारकीर्द हीं त्यानें वर्णिलीं. प्रस्तुत इतिहासाची भाषासरणीही मनोवेधक आहे; तिजमुळें मागें सांगितलेल्या वितंडक नामांकित ग्रंथांप्रमाणें याच्या वाचनाचे श्रमही वाचकांस विशेष भासत नाहींत. तरी पाश्चात्यांच्या उपेक्षाबुद्धीस्तव गिबन्च्या वेळेपर्यंत प्रस्तुत इतिहासाकडे कोणाचें फारसें लक्ष लागलें नव्हतें. गेल्या शतकाच्या शेवटीं शेवटीं वरील महाविख्यात इतिहासकारानें रोमच्या बादशाहीच्या वर्णनांत तिचा विध्वंस करणारे जे मुसलमान लोक त्यांचा वृत्तांत जेव्हां लिहिला, तेव्हां सहजच त्या राष्ट्रांचा आद्य इतिहास लिहिणारा जो ऑक्ली त्याच्या ग्रंथासही लोकमान्यता येऊं लागली. ती तेव्हांपासून वाढून यापुढेंही काळगत्या अधिक होत जाईल यांत संशय नाहीं; कां कीं, दिवसेंदिवस पाश्चात्यांचा व प्राच्यांचा संबंध दृढतर होत चालल्यानें दोघांसही परस्परांविषयीं जिज्ञासा होणें हें सहजच आहे. असो; तर अरब लोकांचा इतिहास इंग्रजी भाषेंत प्रथम जो लिहिला गेला त्याचा प्रकार वरच्यासारखा झाला. त्यापुढील ग्रंथ वर सांगितलेला गिबन्चा प्रचंड इतिहास होय. याविषयींची माहिती मागें‡ प्रसंगानुरोधानें जी दिली आहे तिजवरून वाचकांस कळलेंच आहे कीं, त्यांत प्रस्तुत राष्ट्राचा व तद्धर्मी इतर लोकांचाही इतिहास अंतर्भूत झाला आहे. अरबस्थानांत नवीन धर्माची व नवीन राज्याची स्थापना होऊन दोहोंचा प्रसार भराभर होत जाऊन त्यापुढें रोमची बादशाही व तिनें नवा अंगीकारलेला ख्रिस्ती धर्म हीं दोन्हीं कशीं निस्तेज पडत चाललीं, 'धर्मयुद्धें' म्हणून दोन शतकें जी मारामारी व तोडातोडी चालली होती तिचा एकंदर वृत्तांत काय झाला, व शेवटीं सन १४५३ सालीं रूमशामचें तक्त तुर्क लोकांच्या हातीं लागून सगळें युरोपखंड कसें थरारून

१. निजाम सरकारचे प्रख्यात दिवाण सर् सालरजंग नुकतेच विलायतेस गेले होते त्या वेळेस बरीच गोष्टींचें एक थक्क होऊन राहण्यासारखें उदाहरण घडून आलें. वरील नबाबसाहेबांना इंग्लंडांत जेथ तेथें केवढा मानमरातब झाला, व एके प्रसंगीं तर तेथील अधिराज्ञीनें त्यांना केवढा सत्कार केला हें सर्वांस विदित आहेच. हा प्रकार चालला असतां मार्क्विस् ऑफ् हार्टिंग्टन्. जे हौस ऑफ कामन्सचे ग्लॅडस्टन्च्या मागें मुख्य सभासद झाले आहेत. त्यांनीं कोणास असा प्रश्न केला कीं, "हा सालरजंग, सालरजंग म्हणतात, हा आहे तरी कोण?"—कोणीं उत्तर केलें, "निजामाचा दिवाण."—"बरें, पण हा निजाम तरी कोण आहे?" इंग्रेजी पत्रकर्त्यांनीं जर ही बातमी लिहिली नसती तर कोणास क्षणभर तरी खरी वाटती काय!!

'सम्पादक'

‡ अंक २९ वा, पृष्ठें ५७९-५८२ पाहा.

गेलें, ही सर्व हकीकत वरील इतिहासकर्त्यांनें सविस्तर वर्णिली आहे. असो; वरील दोघां इतिहासकर्त्यांखेरीज तिसराही आलीकडे प्रसिद्ध झाला आहे;—तो वाशिंग्टन् इर्विंग्* हा होय. या अमेरिकन् ग्रंथकारानें मोठ्या सुरस भाषेंत महंमदाचें चारित्र, त्याच्या पुढें जे राज्यकर्ते झाले त्यांचा वृत्तांत, स्पेन देशांतील मुसलमानी राज्याचा इतिहास, वगैरे कित्येक ग्रंथ केले आहेत. सामान्य वाचकांच्या आमंरुचीस म्हटलें म्हणजे मागील दोहोंच्या पेक्षां वरील चित्तवेधक व संक्षिप्त वृत्तांतच अधिक अनुरूप होत हें उघड आहे.

५. दुसरें राष्ट्र इराण देशांतील लोक. या राष्ट्राचा इतिहास मोठा चमत्कारिक आहे. इराणचे मूळचे रहिवाशी प्राचीन पारसीक$ होत.[1] यांचें वास्तव्य हल्लीं आमच्या देशांत मात्र अंशतः आहे. येथें ते आल्यास बाराशेंहून अधिक वर्षें होऊन गेलीं. यांच्या प्राचीन इतिहासाची माहिती अतःपर फारशी मिळण्याचा बिलकुल संभव दिसत नाहीं. तरी जी थोडीशी आज मिळालेली आहे तिजवरून व एरवीं अनेक प्रमाणांवरून एक मोठी गोष्ट अगदीं स्पष्ट होते कीं, हे लोक प्राचीन आर्यशाखेचे होत. भाषासाम्यावरून व पुष्कळ आचारांच्या सादृश्यावरून प्राचीन हिंदु व प्राचीन पारसीक यांचा पूर्वी फार निकट संबंध

---

* Washington Irving (1783-1859)—मनोरंजक गोष्टी लिहिणारा. याच्या गोष्टी इतक्या लोकप्रिय झाल्या कीं अट्लांटिक् महासागराच्या दोन्ही बाजूंस याची कीर्ति झाली. गोल्डस्मिथ्, कोलंबस्, महंमद, आणि जॉर्ज वाशिंग्टन् यांचीं चरित्रेंहि यानें लिहिलीं आहेत. तथापि 'प्रवाश्याच्या गोष्टी' (Tales of a Traveller), रिप् व्हॅन् विंकल् (Rip Van Winkle) हीं याचीं नमुनेदार पुस्तकें होत. 'सम्पादक'

$ पारसीक हें 'इराण' (Persia) देशाचें व तेथील लोकांचें नांव होय. हा देश अफगाणस्तानच्या पश्चिमेस असून याची राजधानी तेहरान होती. 'सम्पादक'

१. वरील शब्द प्रस्तुत पुस्तकांत आम्हीं जागोजाग जो घातला आहे त्याचें कारण मागें † एके ठिकाणीं सुचवलेंच आहे. 'इराणी' या शब्दानें सांप्रतचे रहिवाशी मुसल्मान, व 'पारशी' या शब्दानें येथें येऊन राहिलेले लोक बोधित होतात; यास्तव आमच्या जुन्या संस्कृत ग्रंथांतून वरील लोक ज्या नांवानें प्रसिद्ध आहेत तेंच योजणें प्रस्तुतसारख्या प्रसंगीं प्रशस्त दिसलें. वरील स्थळें हीं होत—

पारसीकांस्ततो जेतुं प्रतस्थे स्थलवर्त्मना ।

रघुवंश ४–६०

कौलूतश्चित्रवर्मा मलयनरपतिः सिंहनादो नृसिंहः
काश्मीरः पुष्कराक्षः क्षतरिपुमहिमा सैन्धवः सिन्धुषेणः ।
मेघाख्यः पञ्चमोऽस्मिन् पृथुतुरगबलः पारसीकाधिराजो
नामान्येषां लिखामि ध्रुवमहमधुना चित्रगुप्तः प्रमार्ष्टु ॥

मुद्राराक्षस १–२०

याप्रमाणेंच 'कादंबरी'तील नायक जो चंद्रापीड त्याचा इंद्रायुध नांवाचा घोडा त्याच्या बापास पारसीकांच्या राजाकडून नजर आला होता असें त्या ग्रंथांत लिहिलेलें सांपडतें.

† पृष्ठ ५७ टीप २ पाहा. 'सम्पादक'

असावा हें उघड दिसतें. असो; या राष्ट्राची आज जगास जी कांहीं थोडीबहुत माहिती आहे ती केवळ त्यांचे चिरकालीन शत्रु जे ग्रीक् लोक त्यांच्या ग्रंथांवरूनच होय; यास्तव ती सर्वथा खरी असण्याचा संभव नाहीं हें सांगणें नकोच. तरी ज्या अर्थी वरील ग्रंथांखेरीज दुसरी गतिच नाहीं, त्या अर्थी तीच काय आहे ती मान्य करणें अवश्य होय. यास्तव तिजवरूनच ती पुढें संक्षेपतः देतों.

कोणतेंही राष्ट्र उदयास येण्यास त्यांत कोणी मोठा बुद्धिमान् पुरुष उत्पन्न व्हावा लागतो, कीं ज्याचें वजन साऱ्या लोकांवर बसून त्यांच्या वर्तनास त्यास नवेंच वळण लावून देतां येतें. असा पुरुष इराण देशांत सायरस्‡नामेंकरून एक विख्यात

---

१. संस्कृत भाषेचें व इराणांतील प्राचीन झेंद् भाषेचें साम्य तर किती निकट आहे हें भाषाभिज्ञांस विदितच आहे; उदाहरणार्थ असुर (अहुर), मित्र (मित्र); पारशी धर्माचा गुरु जो झोरास्टर् * त्याचें मूळचें नांव 'जरदुष्ट्र' अशासारखें कांहीं आहे; व त्याचा अर्थ 'सोन्याचा उंट' असा आहे असें समजतें. पारश्यांच्या धर्मग्रंथाचें नांव 'झेंदावेस्ता' असें आहे. याची दशा आमच्या वेदांहूनही वाईट आहे. ती अशी कीं, तो समजण्यास कोशाचें साधन नाहीं व व्याकरणाचेंही नाहीं. तेव्हां नुसत्या अटकळीनें काय अर्थ बसेल तो त्यांतून काढायाचा! पारशी हे प्राचीन आर्यांसारखे अग्नीचे उपासक असून ब्राह्मणांच्या यज्ञोपवीताप्रमाणें बाहत्तर पदरांचें एक ऊर्णासूत्र त्यांच्या अंगावर असतं हेंही सर्वत्र प्रसिद्धच आहे.

* Zoroaster झोरॉस्टर् खि. पू. पांचव्या शतकांत होऊन गेला. याच्याविषयीं विश्वसनीय हकीकत उपलब्ध नाहीं. पारशांचे धर्म-ग्रंथ आवेस्त (Avesta) व गाथा (Gathas) किंवा स्तोत्रें हे होत. त्यांच्या तत्त्वज्ञानाचें सार म्हणजे ऑर्मझ् (Ormuzd) ही उत्पादक व कल्याणकारक सत्ता असून आऱ्हिमन् (Ahriman) ही विध्वंसक सत्ता आहे व या दोहोंवरच मानवजातीचें भवितव्य अवलंबून आहे. या लोकांची सुमारें अर्धी संख्या सध्यां हिंदुस्तानांतच आहे. हे हिंदुस्तानांत सुमारें आठ हजार व इराणांत सुमारें दहा हजार आहेत. 'सम्पादक'

‡ Cyrus the Great किंवा Cyrus the Elder, खि. पू. पांचव्या शतकांतील इराणी राज्याचा संस्थापक. मृत्यु खि. पू. ५२९. Herodotus व Xenophon यांच्या सायरस् बद्दल भिन्न हकिकती आहेत पण झीनोफॉन्पेक्षां हिरोडोटस्चीच ज्यास्त विश्वसनीय आहे. मीडिआ (Media) च्या राजाची मुलगी मँडेन (Mandane) आणि कँबिसीज् (Cambyses) नावाचा कुलीन इराणी गृहस्थ हे सायरस्चे आईबाप. आपला नातू आशियाचा राजा होणार असें स्वप्न पडल्यामुळें मीडिआचा राजा ॲस्टिएजिस् (Astyages) यानें त्या बाल्काला हर्पेगस् (Harpagus) च्या स्वाधीन करून त्याचा खून करण्याचा हुकूम केला. पण हर्पेगस्नें खून न करतां तें मूल एका शेतकऱ्यास दिलें. तेथें दहा वर्षें तें वाढलें. तेथें चालचलणुकीनें त्याच्या उच्च कुलाची शंका आल्यामुळें ॲस्टिएजिस् राजाकडे तें मूल पाठविण्यांत आलें. त्यानें तो आपला नातू असें ओळखलें, पण सायरस् खेळांत राजा झाला असल्यानें स्वप्नाची पूर्तता झाली व आतां भीतीचें कारण नाहीं असें मॅजिअन्स् (Magians) कडून आश्वासन मिळाल्यावर सायरस्ला त्याच्या आईबापांकडे इराणांत पाठविण्यांत आलें. खि. पू. ५५९ मध्यें सायरस्नें तेथील डोंगराळ भागांतील काटक लोकांच्या साह्यानें आपल्या आजावर स्वारी करून त्यास कैद केलें. मीडस् लोकांनीं त्याची सत्ता मान्य केली. पुढें खि. पू. ५४६ मध्यें लिडियावर स्वारी करून क्रीसस् (Croesus)

[ पुढें चालू. ]

राज्यकर्ता झाला. यानें त्याचे देशवासी जे पूर्वी रानटी व भटकणारे होते त्यास आपलेसें करून घेऊन त्यांचें एक मोठें बलाढ्य राष्ट्र बनवलें. पुढें लवकरच या लोकांनीं आपल्या देशाचें पूर्ण आधिपत्य पावून शेजारचीं कित्येक राज्येंही काबीज केलीं.[1] याप्रमाणें वाढतां वाढतां पारसीकांचा अंमल हल्लीं ज्यास एशिया मायनर् ह्मणतात तो देश, सिरिया, पॅलेस्टाइन, मिसर देश, भूमध्य समुद्राच्या पूर्वभागचीं बेटें, ग्रीस देशाच्या उत्तरेचा मुलूख, व येथील पंजाबाजवळचा कांहीं प्रांत येथपर्यंत वाढला. पण राज्यतृष्णा मोठी दुर्धर आहे; तीस जों जों तृप्त करूं जावें तों तों ती उलटी अनावरच होत जाते, याप्रमाणेंच पार्सदेशीय ¶ राजासही वरील अवाढव्य राज्यानें संतोष न होतां त्यांचा युरोपांत प्रवेश होतांच तेथीलही देश पादाक्रांत

---

राजाला कैद केलें व ५३८ सालीं युफ्रेटीज नदीचा ओघ बाबिलोन शहरांतून वाहत जात होता तो बदलून नदीच्या कोरड्या झालेल्या पात्रांतून सैन्य नेऊन त्यानें बाबिलोन ( Babylon ) सर केलें. पुढें त्यानें मॅसॅजेट ( Massagetae ) लोकांवर स्वारी केली पण त्यांची राणी टॉमिरिस् (Tomyris) इनें लढाईंत त्याचा शिरच्छेद केला ( खि. पू. ५२९ ). त्याचे पश्चात् त्याचा पुत्र Cambyses राजा झाला. 'सम्पादक'

१. सायरस् यानें मीडिया+ व लिडिया‡‡ हीं दोन राज्यें पहिल्या प्रथम घेतलीं. लिडियाचा राजा अपार संपत्तीविषयीं प्रख्यात जो क्रीसस्§ तो होता. याची इतिहासांत प्रस्तुत प्रसंगाच्या संबंधाची एक मोठी चमत्कारिक गोष्ट प्रसिद्ध आहे. ती पुढें 'विनोद, महदाख्यायिका' या सदरांत सांगण्यांत येईल.

+ मीडिया ( Media ) प्राचीन पर्शियन् साम्राज्यांतील एक महत्वाचा प्रांत. हा पर्शिस ( Persis ) उर्फ 'पर्शिया' च्यावर आधुनिक कुर्दिस्तान पर्वताच्या पूर्वेस होता. 'सम्पादक'

‡‡ लिडिया ( Lydia ) एशिया मायनरमधील एक प्रांत. होमरच्या काळीं हा प्रांत Maeonia या नांवानें प्रसिद्ध होता. एशियाटिक् सुधारणेचें मार्गेरवर कशा या प्रांताचें ग्रीक् लोकांवर फार वजन असे. 'सम्पादक'

§ क्रीसस् ( Croesus ) खि. पू. ५६०–५४६. लिडियाचा शेवटचा राजा. यानें एजन् ( Aegaean ) व हॅलिस् ( Halys ) नदी यांच्या दरम्यानचीं सर्व राष्ट्रें जिंकून एशिया मायनर्-मधील ग्रीक् लोकांचाहि पाडाव केला. त्याची संपत्ति व सत्ता यांची कीर्ति इतकी पसरली कीं ग्रीस-मधील सर्व पंडित व त्यांतच सोलन् [ Solon ]—सार्डिस् ( Sardis ) येथें त्याच्या दरबारीं जमा झाले. सोलन्ला ' जगीं सर्वसुखी असा कोण आहे ?' असा प्रश्न क्रीससनें विचारतांच त्या पंडितानें राजास 'सुखानें जीवितयात्रा संपवितां येईल तोच खरा सुखी !' असें उत्तर दिलें. पुढें इराणचा राजा सायरस् याशीं झालेल्या युद्धांत क्रीससचा पराजय झाला, सार्डिस् राजधानी शत्रूच्या ताब्यांत गेली व क्रीससला जाळून मारण्याची शिक्षा सायरसनें फर्मावली. चितेपुढें उभा असतां क्रीससला सोलन्च्या सूचक उत्तराची आठवण झाली व त्यानें तीन वेळ सोलन्च्या नांवाचा उच्चार केला. तेव्हां सोलन् कोण असें सायरसनें विचारल्यावरून त्यानें त्याला सर्व हकीकत सांगितली. ती ऐकतांच सायरसला आपल्या कृत्याचा पश्चात्ताप होऊन त्यानें क्रीससची शिक्षा रद्द केली येवढेंच नव्हे तर त्याच्याशीं मैत्री केली. 'सम्पादक'

¶ इराणच्या ( Persian ). 'सम्पादक'

करण्याचा त्यांनीं उद्योग आरंभला. डेरायस्† राजानें मोठें सैन्य मिळवून ग्रीस देशावर चाल केली; पण मारेथन्$ येथें त्याचा मोठा पराभव होऊन त्यास माघारें जावें लागलें. डेरायस्च्या पुढें झर्सीज्‡ हा गादीवर बसला. याच्या अंगीं बापाचें शौर्य मुळींच नसून नुसती भपकी मिरवावी येवढीच त्यास मोठी आवड होती. या हौशीप्रमाणें त्यानें एक मोठी अफाट फौज तयार करून आपल्या बापाचा मनोरथ सिद्धीस नेण्याचा आव घातला. वीस लक्ष¶ लोक व बाराशें जहाजांचें आरमार, शिवाय लक्षावधि सेवक व बाजारबुणगे, अशा थाटानें त्यानें हेलेस्पांट्चा समुद्र ओलांडून ग्रीस देशावर धाड घातली. ही वार्ता ऐकून सगळे ग्रीक् लोक अगदीं भयभीत होऊन गेले; दोन संस्थानांनीं मात्र धैर्य धरून शत्रूशीं सामना घालण्याची तयारी केली; हीं संस्थानें अथेन्स् व स्पार्टा हीं होत. या दोहोंचेंही शौर्य सारखेंच होतें; तरी पहिल्याचें प्राबल्य विशेषतः समुद्रावर व दुसऱ्याचें जमिनीवर असें होतें. त्याप्रमाणें स्पार्टन् लोकांनीं थर्मोपिलीचें नाकें* रोखलें, व अथीनियन् लोक आर्टीमिसियम् येथें शत्रूच्या जहाजांचा रस्ता अडवून बसले. या दोहों ठिकाणीं ग्रीक् लोकांनीं पारसीकांस आपल्या शौर्याचा चांगला मासला दाखवला; पण शेवटीं त्यांच्या

---

† Darius या नांवाचे तीन पारशी राजे होऊन गेले. पैकीं पहिल्याचा येथें उल्लेख आहे. यानें खि. पू. ५२१–४८५ पर्यंत राज्य केलें. दुसरा Artaxerxes Longimanus चा पुत्र असून आपल्या भावाचा खून करून यानें खि. पू. ४२४–४०५ पर्यंत राज्य केलें. तिसऱ्यानें खि. पू. ३३६–३३१ पर्यंत राज्य केलें. त्याच्यावर शिकंदरानें ( Alexander the Great ) स्वारी करून त्याचा दोन वेळां पराजय केला. पुढें लवकरच त्याचा खून झाला. तो पारशांचा शेवटचा राजा होय. 'सम्पादक'

$ मॅरेथन् ( Marathon ) चें युद्ध खि. पू. ४९०. बाबिलोनियन् लोकांनीं बंड केल्यामुळें वीस महिने वेढा घालून डेरायस्नें बाबिलोन् सर केलें; पुढें सिथिआ ( Scythia ) वर स्वारी करून तो रशियाच्या अंतर्भागांत फार दूरवर शिरला पण दुष्काळामुळें त्यास परत फिरावें लागलें. परत आल्यावर त्यानें थ्रेस व मॅसिडोनिया काबीज केले. खि. पू. ५०१ सालीं अयोनियन् ग्रीक् लोकांनीं ( Ionian Greeks ) बंड केलें; त्यांस अथीनिअन् ( Athenian ) लोकांनीं मदत करून ( Sardis ) सार्डिस् ( एशिया मायनर्मधील फार प्राचीन व विख्यात शहर आणि लिडियाची राजधानी ) जाळल्यामुळें डेरायस्ला फार राग येऊन त्यानें ग्रीक् लोकांशीं लढण्यास प्रथम मॅर्डोनियस् ( Mardonius ) व मागून डॅटिस् ( Datis ) व ॲर्टॅफर्नस् ( Artaphernes ) हे सरदार पाठविले. पण त्यांचा अथीनिअन् लोकांनीं मॅरेथन् येथें पराभव केला. ग्रीसचा नक्षा उतरविण्याकरतां सारें सैन्य जमविण्याचा डेरायस्नें प्रयत्न केला पण मध्यंतरीं ईजिप्तनें बंड केल्यामुळें त्याचें लक्ष तिकडे वेधलें. तो खि. पू. ४८५ सालीं मेला. त्याच्या प्रचंड योजनेची अंमलबजावणी पुढें त्याचा मुलगा झर्सीज् यानें केली. 'सम्पादक'

‡ Xerxes ( Circa 519–465 B. C. ) पहिल्या 'डेरायस्'चा पुत्र. यानें खि. पू. ४८५–४६५ पर्यंत राज्य केलें. आर्टाबेनस् ( Artabenus ) यानें झर्सीज्चा खून केला. 'स०'

¶ Herodotus म्हणतो, त्याचें सैन्य सर्व्वीस लक्ष एकेचाळीस हजार सहाशें दहा इतकें होतें. अर्थातच हें विश्वसनीय दिसत नाहीं. फार प्रचंड सैन्य असावें इतकेंच. 'सम्पादक'

* मागें पृष्ठ २६९ टीप‡ पाहा. 'सम्पादक'

अफाट सैन्यापुढें व आरमारापुढें त्यांचा टिकाव न निघून त्यांस माघारी हटावें लागलें. या थोड्याशा जयानेंही मोठा उत्साह पावून झर्सीज् राजानें पुढें चाल केली, व अथेन्स् शहर जाळून टाकलें. याप्रमाणें एका शत्रूचा पाडाव होऊन लवकरच सगळ्या ग्रीस देशास पारसीकाधिराजाच्या पायाशीं शरण जावें लागतें असा सुमार दिसूं लागला. पण इतक्यांत ग्रीक लोकांच्या देवतांस दया येऊन त्या आपल्या भक्तांच्या रक्षणार्थ पारसीकांवर अत्यंत कोपायमान झाल्या. समुद्रावर मोठें भयंकर तुफान तीन दिवस सारखें सुरू त्यांचीं जहाजें एकमेकांवर हापटून व तुटून फुटून पार झालीं. येणेंकरून त्यांच्या आरमाराची भारी नासाडी झाली असतां व आरमारावरील राहिलेले लोक अगदीं हवालदील होऊन गेले असतां ग्रीक् लोक त्यांच्यावर चालून गेले. ही मोठी लढाई सालामिस् नांवाच्या खाडींत झाली. ती खाडी अगोदर अरुंद, त्यांतून ते खलाशी लोक नाउमेद होऊन गेलेले, तेव्हां अर्थांतच ग्रीक् लोकांस लढण्याची चांगली सोय सांपडून त्यांनीं झर्सीज् राजाच्या आरमाराचा अगदीं मोड करून टाकला. हें झाल्यानंतर लागलीच जमिनीवरही ग्रीक् लोकांनीं शत्रूवर हल्ला केला. प्लेटिया येथें मोठी लढाई होऊन तीनंतर त्यांच्या हातीं पुष्कळच मोठमोठी उंची लूट सांपडली. याप्रमाणें ज्या अगणित सैन्यासहवर्तमान झर्सीज् राजा ग्रीस देशावर मोठ्या समारंभानें चालून आला होता त्याची वर सांगितल्याप्रमाणें कांहीं मनुष्यप्रयत्नानें व कांहीं अमानुष प्रभावानें अशी दोहोंच्या योगानें अगदीं वाताहत होऊन गेली, व बाराशें जहाजें सजवून ज्यानें पहिल्यानें प्रयाण केलें त्यास सरतेशेवटीं एका कोळ्याच्या होडींत बसून आपल्या देशास परत जावें लागलें! असो; तर याप्रमाणें पार्स देशच्या राजांनीं आपल्या ऐश्वर्याच्या घमेंडीवर जाऊन त्यांच्या पुढें क्षुद्र दिसणारा जो ग्रीस देश त्याच्या शासनार्थ वर सांगितल्याप्रमाणें दोन मोठे अवडंबराचे प्रयत्न केले. पण दोन्ही अगदीं निष्फळ होऊन सरतेशेवटीं त्यांचेंच दुर्बलत्व मात्र साऱ्या जगास विदित झालें.[1] यापुढेंही पुष्कळ काळपर्यंत

---

१. एशियाखंडांतील राष्ट्रें दुर्बळ, हजारों हजार लोक असले तर युरोपांतले दहा पट्टे त्यांचा समाचार घेण्यास बस आहेत, या पोकळ समजुती वरील दोन युद्धांपासून बहुधा पडत गेल्या असाव्या. पण या ठिकाणीं आमच्या पाश्चात्यांनीं अंमळ विचार केला असतां कळणार आहे कीं, युरोपांतल्या युरोपांतही वरच्यासारखे प्रकार घडले नाहींत असें नाहीं. नेपोलियनाची १८१२ सालीं काय दुर्दशा झाली! इंग्लंडावर 'अजिंक्य'* म्हणून विडा उचलून जें प्रचंड आरमार आलें होतें त्याची काय वाताहत झाली! व खुद्द इंग्लिश् लोकांचीच फ्रान्स देशांतल्या एका गांवढळ$ मुलीनें दोन तीन वर्षांत काय मौज करून दिली!! मग या सर्व गोष्टींवरही वरच्यासारखे तर्क कां बसवूं नये?

* The Invincible Spanish Armada 1588. स्पेनचा राजा दुसरा फिलिप् यानें इंग्लंडवर केलेल्या प्रचंड स्वारीचा उल्लेख येथें आहे. Duke of Medina Sidonia च्या आधिपत्याखालीं एकोणीस हजार शिपायांना आणणारें एकशें एकोणीस जहाजांचें दोन हजार खलाशांनीं चालविलेलें प्रचंड आरमार एका बाजूस तर ऐंशीं जहाजांचें फक्त नऊ हजार शिपायांचें Lord Howard of Effinghamच्या आधिपत्याखालचें एलिझाबेथूचें छोटें आरमार विरुद्ध बाजूस असा हा सामना होता. स्पॅनिश् आरमारांत पासष्ट जहाजें तर प्रत्येकीं सातशें टनांपेक्षां मोठीं असून

( पुढें चालू $ ही टीप पुढील पानावर पाहा )

वरील राष्ट्रांचा परस्पर बराच संबंध होता. पारसीकांचा देश मोठा समृद्ध असल्यामुळें त्यांजपाशीं द्रव्याचें मोठें जबरदस्त साधन असे. त्याच्या योगानें साक्षात् युद्ध करून जें कार्य झालें नाहीं तें त्यास सहज साध्य होत गेलें. तें असें कीं, ग्रीसच्या संस्थानांची वरील साधनानें परस्पर कलागत लावून देऊन त्यांस आपलें वर्चस्व राखतां आलें, व त्यांजपासून एरवीं जो त्यांच्या राज्याला धोका येता तो त्यांस टाळतां आला. पण हीही थावराथावर फार वेळ करतां येईना. पहिल्यानें स्पार्टाच्या राजांनीं व पुढें मासिडन् संस्थानचें आधिपत्य सगळ्या ग्रीस देशावर झालें असतां फिलिप्‌चा पुत्र शिकंदर यानें पारसीकांच्या मुलुखावर स्वाऱ्या केल्या. शिकंदर बादशहाचें चरित्र साऱ्या जगभर गाजलेंच आहे. त्यानें थोड्या फौजेनिशीं हेलेस्पांट् उतरून शत्रूचा जो पिच्छा पुरवला तो शेवटीं त्यांचें राज्य उलथून टाकून त्याखालीं असणारे दूरदूरचे मुलुख जे मिसर देश, पंजाब वगैरे तेथपर्यंतही आपले झेंडे मिरवीत नेले. असो; तर याप्रमाणें जें संस्थान ग्रीसच्या स्वातंत्र्यास बाधक झालें त्यानेंच सरतेशेवटीं पारसीकांचें राज्य धुळीस मिळवलें. यानंतरचा प्रस्तुत राष्ट्राचा इतिहास वरच्या इतका प्रसिद्ध नाहीं. तरी शिकंदराच्या नंतर जीं अनेक संस्थानें स्थापित झालीं तीं रोमन् लोकांनीं कालेंकरून उध्वस्त करून टाकलीं असतां त्यांची कुस्तुंतुनिया येथें जी एक बादशाही स्थापली गेली तिच्या पार्स देशाच्या राजांशीं पुष्कळ लढाया झालेल्या इतिहासांत प्रसिद्ध आहेत. या लढाया अगदीं शेवटपर्यंत ह्मणजे दोन्ही राज्यांच्या पाळ्यामुळ्या खणून काढणारें एक शेजारचें तिसरेंच राज्य एकाएकीं उपस्थित होई तोंपर्यंत चालत्या होत्या. यावरून असें दिसतें कीं, शिकंदरानें प्रस्तुत राष्ट्रास राजपदभ्रष्ट करून टाकल्यावरही कांहीं काळानें त्याची स्थिति त्यास पुनः प्राप्त झाली होती. याच सुमारास खुसरू* ह्मणून एक

---

त्यांच्याजवळ दोन हजार तोफा आणि चाळीस हजार माणसांस सहा महिने पुरेसें अन्न अशी सामग्री होती. इंग्रेजांची कुशलतेची व्यवस्था आणि गोलंदाजी यांना अनुकूल वाऱ्याची मदत मिळून अखेर त्यांचाच जय झाला व या स्पॅनिश् आर्माडाच्या प्रचंड डोलाऱ्याची धूळधाण उडून फारच थोडीं जहाजें स्पेनला परत गेलीं. एलिझाबेथनें एका सुवर्णपदकावर या प्रसंगाच्या स्मरणार्थ खालील अर्थाचीं अक्षरें लॅटिन् भाषेंत कोरविलीं: '*God blew, and they were scattered.*' 'सम्पादक'

$ Joan of Arc. (1412–1431) ह्या सेंडवळ मुलीनें आपल्या शौर्याच्या व निष्ठेच्या प्रचंड बळावर फ्रेंच् सैनिकांत अशा अद्वितीय उत्साहाचें वारें उत्पन्न केलें कीं त्यांनीं इंग्रेजांना (Orleans) ऑर्लीन्समधून पिटाळून लावलें व दोन महिन्यांच्या अल्पावधींत र्‍हीम्स् (Rheims) येथें चार्लस्‌च्या नांवानें राजा म्हणून द्वाही फिरविली तिचा येथें उल्लेख आहे. तथापि ही अद्भुत पराक्रमशालिनी मुलगी पुढल्या वर्षी इंग्लिशांच्या हातीं सांपडतांच रोएन् (Rouen) येथें त्यांनीं तिजवर पाखंडी मताचा आरोप ठेवून तिला जाळून मारलें!!! तिला सन्तमालिकेंत गोंवण्याचा उपक्रम १९०९ सालीं झाला. तिच्या उज्ज्वल देशभक्तीचें चीज हृदयशून्य परकी सत्तेच्या हातीं ती सांपडल्यानें तिच्या जिवंतपणीं जरी झालें नाहीं तरी तिच्या पश्चात् अनेक कवींनीं स्फूर्तिजनक व अंतःकरणें भरारून सोडणारीं कवनें या प्रसंगावर लिहिलीं आहेत. 'सम्पादक'

* नाशिरवान ऊर्फ खुसरू (Chosroes Nushirvan) यानें इ. स. ५३१ सप्टेंबर ते

[पुढें चालू]

विख्यात राज्यकर्ता जो या लोकांत होऊन गेला तो झाला. याचें दुसरें नांव नशिरवान असेंही प्रसिद्ध आहे.' याचेंच राज्य चाललें असतां मक्केंत महंमदाचा जन्म झाला. असो; या-

---

५७९ मार्चपर्यंत राज्य केलें. पौर्वात्य राष्ट्रांत खुसरू हा अत्यंत न्यायप्रिय म्हणून विख्यात आहे. हा आपला बाप, इराणचा राजा कोबाद ( Kobad or Cabades ) याचा तिसरा मुलगा. सदर कोबादची कारकीर्द धार्मिक व सामाजिक तंट्यांनीं भरली होती. याच्या कारकिर्दीत मझ्दैक् ( Maz lak ) नामक साधूचीं स्त्रिया व इस्टेट यांवर सर्व राष्ट्राची समाईक मालकी आहे अशा तऱ्हेचीं क्रांतिकारक मतें पसरलीं होतीं. हा साधु आपणांस झोरोॲस्ट्रिअन् धर्माची सुधारणा करणारा असें म्हणवीत असे. समाईक मालकीची अंमलबजावणी करतांना मात्र कमालीच्या सुंदर स्त्रिया व अत्यंत सुपीक जमीन आपल्या पंथांतील लोकांसच तो देई. या साधूच्या जाळ्यांत नशिरवानचा बाप सांपडला व त्यानें त्याच्याकडे आपली पत्नी व भगिनी यांस पाठविलें. पण नशिरवानच्या प्रार्थनेमुळें त्याच्या आईचा बचाव झाला. खुसरू वडील मुलगा नसूनहि त्यास वारस करावें असा कोबादचा मानस होता. इतकें त्याचें खुसरूवर प्रेम होतें. आपला मुलगा ज्यास्त विख्यात व्हावा म्हणून बायूझंटाइन् बादशहा जस्टिन् (Justin) यानें खुसरूला दत्तक घ्यावें अशी कोबादनें फार खटपट केली. व शांततेच्या आशेनें जस्टिन्नें त्याचें म्हणणें कबूलहि केलें होतें; कारण पारशी लोक आळीपाळीनें तुर्क व रोमन् यांवर स्वाऱ्या करून त्यांचा पराजय करीत असत. पण प्रोक्लस् ( Proclus ) च्या सल्ल्यानें आयत्या वेळीं हा बेत रद्द झाला. खुसरू तर कॉन्स्टॅन्टिनोपलच्या वाटेवर टैग्रीस् नदीपर्यंत गेला होता. त्याला ही बातमी कळतांच फार संताप आला. आशा विफल झाल्यानें खुसरूच्या बापाच्या अंतःकरणास धक्का बसला व तो लवकरच मेला. खुसरू त्याच्या मागून गादीवर आला. तो फार विद्वान् व शूरहि होता. त्याच्या कारकिर्दीत प्रजेच्या शक्तीवरच राजाची शक्ति अवलंबून असते हें दाखविण्यासाठीं हिंदूंनीं शोधून काढलेला बुद्धिबळांचा खेळ इराणांत प्रचलित झाला.

'सम्पादक'

१. 'खुसरूचें चरित्र' म्हणून एक ग्रंथ दहा वीस वर्षांपूर्वी प्रसिद्ध होता तो आतां बहुधां कोणाच्या ऐकण्यांतही नसेल. आमच्या भाषेंत अगोदर ग्रंथ थोडे; आणि त्यांतून जे मोठ्या पंचाइतीनें प्रसिद्ध होतात त्यांचें रक्षणही होण्याची म्हणण्यासारखी अद्याप सोय नाहीं ही मोठ्या खेदाची गोष्ट आहे. पुष्कळ चांगले चांगले ग्रंथ आजही अप्रसिद्ध झाल्यासारखे असून कांहीं काळानें बहुधां नाहींसेही होतील. असो; वरील पारसीक राजानें 'हितोपदेशा'चें भाषांतर आपल्या देशभाषेंत करून घेण्यासाठीं केवढी खटपट* केली, व या लहानशा गोष्टीवरून संस्कृत कर्त्यांचा काळ बसविण्याचें चांगलें साधन कसें मिळतें याविषयीं मागें एके ठिकाणीं‡ लिहिलेंच आहे. वरील वृत्तांताचें प्रमाण पाहिजे असल्यास गिबनचा इतिहास भाग ४२ पाहावा. त्यावरून वरील लहान ग्रंथाचा प्रसार कोठपर्यंत होत गेला हें कळून येईल.

‡ अंक ७ पृष्ठ ६८ ओळी १७–२० पाहा. 'सम्पादक'

* नशिरवान ( संस्कृतांत अनुशीर्वन् या नांवानें हा प्रसिद्ध आहे. ) याला जेव्हां कळलें कीं विष्णुशर्मा नामक एका प्राचीन ब्राह्मणानें रचलेल्या नैतिक व राजकारणविषयक उपदेशपर कथा अत्यंत आदरानें हिंदु राजांनीं जपून ठेविल्या आहेत तेव्हां त्यानें गुप्तपणें आपल्या दरबारचा मुख्य वैद्य ( जो मागून वजीर झाला ) पेरोझेस ( Perozes ऊर्फ Busorobumihr or Bright as the sun ) याला गंगातीरीं पाठविलें. कांहींहि करून तो ग्रंथ पैदा करण्याचा अनुशीर्व्यानें त्याला हुकुम दिला होता. त्याप्रमाणें पेरोझेसच्या चातुर्यानें ग्रंथ मिळाला व मोठ्या खटपटीनें त्यानें त्याचें

( पुढें चालू )

पुढील वृत्तांत वर सांगण्यांत आलाच आहे; कीं, अरब लोक आपल्या देशांतून निघून सिरिया, पॅलेस्टैन वगैरे प्रांत त्यांनीं सपाट्यासरसे जिंकून इराणही एका मोहिमेंत सर करून टाकला. ही गोष्ट इ० स० ६३५ या वर्षी घडली.[1]

यानंतरचा इराण देशाचा इतिहास वस्तुतः अरबस्थानच्या इतिहासाचाच एक भाग होय. कां कीं, महंमदाचे अनुयायी हे मूर्तिपूजेचे द्वेष्टे असल्यामुळें त्यांनीं तेथील धर्म बुडवून पारसीकांच्या शेंकडों वर्षें जळत राहिलेल्या अगेऱ्या पार विझवून टाकल्या; व आपला अंमल तेथें असा पक्का बसवून टाकला कीं, सगळ्या राष्ट्राचें स्वरूपच कालेंकरून पालटून गेलें. ह्मणजे अमेरिकेची युरोपियन् लोकांनीं जी दशा करून टाकली आहे, व येथें गोंव्याची जी आज कित्येक शतकें स्थिति झाली आहे, तीच प्रस्तुत देशाची आज सुमारें बाराशें वर्षें होऊन राहिली आहे. मूळचे धर्मभ्रष्ट झालेले रहिवासी व नवे आलेले मुसल्मान लोक यांत मुळींच तफावत नसून सगळ्या एकंदर लोकांचे आचारविचार वगैरे केवळ महंमदी होऊन गेले आहेत. तेथील धर्म शिया हा आहे. या पंथाचें व सुन्नी ह्मणून त्याच्या विरुद्ध जो दुसरा मोठा पंथ आहे त्याचें परस्पर अतिशयित वांकडें असल्यामुळें हिंदुस्थानचा बादशहा व तुर्कस्थानचा सुलतान हे दोघेही इराणच्या शहाचे वैरी असत, व सध्यां त्यांपैकीं एक आहे. यामुळें इराणचे वरील दोहोंशीं अनेक वेळां युद्धप्रसंग झाले आहेत.[2] असो;

---

भाषांतरहि तयार केलें. पील्पे ( Pilpay, Peelpai किंवा Bidpai असें पाश्चात्य लोक विष्णुशर्मा ब्राह्मणास चेष्टेनें संबोधतात.) ह्या गोष्टी अशा रीतीनें अनुशीर्व्यांच्या दरबारांत आणि सरदारांत प्रसृत झाल्या. पण मूळची हिंदी प्रत व पर्शियन् भाषांतर दोन्ही फार प्राचीन काळीं नष्ट झालीं आहेत. नीतिकथांची जन्मभूमि हिंदुस्तान असून नीतीचा–उपदेशाचा कठोरपणा गोष्टीरूपानें नाहींसा करावयाचें कौशल्यहि मूळचें हिंदूंचेंच. आठव्या शतकांत पर्शियन् भाषांतरावरून अरबी भाषांतर अबदुल्ला इब्न मोकाफा यानें केलें. १८५९ सालीं थिओडर् बेन्फेनें संस्कृतवरून जर्मन् भाषांतर केलें. व अशा रीतीनें या ग्रंथाचीं वीस पंचवीस भाषांत भाषांतरें झालीं. लॅटिन्‌मध्यें गोष्टी सांगणारा फीड्रस् गुलाम ( Phaedrus ) किंवा फ्रेंच् गृहस्थ 'ला फॉंटेन्' ( La Fontaine Jean de ) १६२१–१६९५ हे कोणाला अभिमानातिरेकाच्या भावनेंत श्रेष्ठ वाटतील तर वाटोत; पण विष्णुशर्म्याचें या विषयाचें जनकत्व तरी कोणासहि हिरावून घेतां येणार नाहीं. 'सम्पादक'

१. या वर्षींच हिंदुस्थानांतील पारशांचे पूर्वज जहाजांत बसून गुजराथेच्या कडेस येऊन लागले. तेथील हिंदु राजानें त्यांकडून कांहीं धर्मसंबंधीं अटी कबूल करून घेऊन त्यांस आश्रय दिला. तेव्हांपासून या लोकांचा पूर्वींचा क्रम सर्व पालटून त्यांनीं गुजराथी भाषा व त्या लोकांचें वाणिज्यकर्म हीं दोन्ही पतकरलीं; तीं अद्याप तशींच निर्बाध चाललीं आहेत. अनाथ होऊन शरण आलेल्या राष्ट्रास आश्रय देणें, व त्या आश्रय दिलेल्या लोकांनीं शेंकडों वर्षेंचीं वर्षें बिलकुल दगाधोपा न करतां आपल्या द्वितीय जन्मभूमींत सुजनतेनें कालक्रमण करणें, या दोन्ही गोष्टींचें इतिहासांत दुसरें उदाहरण बहुधा नाहींच!

२. ख्रिस्ती धर्मांत क्याथलिक् व प्रॉटेस्टंट् हे जसे दोन मोठाले तट आहेत त्याप्रमाणें मुसलमानांत वर सांगितलेले दोन ह्मणजे–सुन्नी व शिया–हे आहेत. ही दुफळी चवथा कालिफ अली याच्या वेळेपासून झाली. सुन्नी पंथाच्या लोकांचें मत असें आहे कीं, महंमदाच्या पुढें अबू बेकर,

( पुढें चालू. )

इराणच्या इतिहासाच्या या उत्तर भागांत पहिल्याप्रमाणें विशेष सांगण्यासारख्या मोठमोठ्या गोष्टी कोणत्याही घडलेल्या नाहींत, यास्तव त्याविषयीं कांहीं लिहिणें नको.

आतां प्रस्तुत राष्ट्राचा इतिहास इंग्रेजी भाषेंत कोणत्या प्रकारचा आहे हें मागील मजकुरावरून कोणाच्याही लक्षांत तेव्हांच येईल. इंग्रेजी भाषेंत जुन्या ग्रीक् व रोमन् ग्रंथकारांचीं भाषांतरें अनेक वेळां झालीं आहेत; तेव्हां त्यांत हिरॉडटस् †, जिनोफन्¶ यांनीं पारसीकांशीं

---

ओमर, ओथमान व अली हे चार जे कालिफ झाले त्यांचा तख्तावर हक्क होता व त्यांस राज्य मिळालें तें बरोबर मिळालें. शियांच्या मतें हे सबंध जण जबरदस्तीनें कालिफ झाले, त्यांचा हक्क मुळींच नव्हता. याशिवाय वरील पंथांचे धर्मकर्मांतही अल्पस्वल्प भेद आहेत. असो; हिंदुस्थानचा बादशाहा हुमायून हा पदभ्रष्ट होऊन इराणच्या राजापाशीं आश्रय धरून राहिला असतां त्यानें आपल्या मतांतरें करून त्यास अनुकूल करून घेतलें ही गोष्ट आमच्या वाचकांस माहीत असेलच. त्याप्रमाणेंच पुढें नादिरशहानें दिल्लीवर स्वारी केली तीही इतिहासप्रसिद्ध आहे.

† Herodotus ( अंदाजें खि. पू. ४८४ ते खि. पू. ४२५ ) ग्रीक् इतिहासकार. इतिहासाचा जनक ( Father of History ) अर्थात आद्य इतिहासकार म्हणून विख्यात आहे. जन्म एशिया मायनर्मध्यें. एशिया मायनर् पर्शियन् अंमलाखालीं असल्यानें तो वयाच्या ३५-३६ वर्षांपर्यंत पर्शियन् प्रजाजन होता. बाप लिक्सिस ( Lyxes ), आई ड्रायो ( Dryo, or Rhaeo ), व भाऊ थिओडोर ( Theodore ). चुलता पॅनिआसिस् ( Panyasis ) हा कवि होता. त्याला जुलमी राजा लायगाड्मिस् ( Lygadmis ) यानें ठार मारल्यामुळें हिरॉडॉटस् खि. पू. ४५७ मध्यें इराण सोडून देशांतरीं गेला. ग्रीक् कल्पनांप्रमाणें त्याचें शिक्षण झालें होतें. अठरा वर्षांच्या वयांत व्याकरण, तालिम, गायन या विषयांचें त्यानें अध्ययन केलें. Illiad, Odyssey, Cypria, Epigoni वगैरे ग्रंथ आणि Solon, Aesop, Aeschylus, Pindar, Hesiod, Hecataeus वगैरे ग्रंथकार त्यानें वाचून टाकले होते. त्याला प्रवासाची फार आवड असे. खि. पू. ४६४-४४७ पर्यंत सुसा, बाबिलोन्, एशिया मायनर्, ग्रीस वगैरे देशांत त्यानें प्रवास केला. खि. पू. ४५० च्या सुमारास लायगाड्मिसला पदच्युत करून हद्दपार करण्यांत आल्यावर हिरॉडॉटस् परत जन्मभूमीस गेला. पण देशबांधवांकडून त्याच्या गुणांचें कांहींच चीज न झाल्यामुळें खि. पू. ४४७ सालीं ग्रीसमध्यें जाऊन अथेन्स् येथें त्यानें इतकी लोकप्रीति संपादिली कीं खि. पू. ४४५ मध्यें दहा टॅलेंट्स् ( Talents ) म्हणजे चोवीसशें पौंड ( चोवीस हजार रुपये ) त्याला जनतेकडून अर्पण करण्यांत आले. तो थुरी ( Thurii ) येथें मरण पावला. 'सम्पादक'

¶ Xenophon—अथीनिअन् प्रजाजन. जन्म खि. पू. सुमारें ४४४. आयुष्य नव्वद वर्षांवर. बाप ग्रिलस् ( Gryllus ), गुरु सॉक्रेटिस्. याच्या आयुष्यांतील सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे खि. पू. ४०१ सालीं सायरस् ( Cyrus ) च्या प्रमुखत्वाखालीं असलेल्या ग्रीक् सैन्याशीं याचा संबंध. कुनाक्सा ( Cunaxa ) च्या लढाईंत सायरस् पडला, तेव्हां ग्रीक् सैन्य एकाकी पडलें. पर्शियन् राजानें अनेक ग्रीक् सेनापतींची कत्तल केल्यामुळें झीनोफोन्‌ला सेनापति निवडण्यांत आलें. ग्रीक् सैन्य टायग्रिस् नदीच्या कांठानें परत फिरलें. त्याचे अत्यंत हाल झाले. अखेर झीनोफोन्‌सह कांहीं लोकांनीं थ्रेसचा राजा स्यूथस् ( Seuthes ) याच्या पदरीं नोकरी धरली. सॉक्रेटिस्‌ला खि. पू. ३९९ सालीं ठार करण्यांत आलें. याच सुमारास झीनोफोन्‌लाहि अथेन्स्मधून हद्दपार

( पुढें चालू )

झालेल्या लढायांचा वृत्तांत जो दिला आहे तो आलाच आहे. शिवाय मागें सांगितलेल्या ग्रोट वगैरे इंग्रेजी इतिहासकारांनीं वरील इतिहासांचा आधार घेऊन स्वतंत्र ग्रंथ केले आहेत, त्यांतही प्रस्तुत राष्ट्राची हकीकत आहेच. तसाच पुढील काळाचा ह्मणजे शिकंदर बादशहानें पारसीकांच्या राज्याची समाप्ति केल्यानंतरचा इतिहास पाहणें असल्यास तो गिबन्च्या ग्रंथांत आहे; व अगदीं आलीकडील बादशहांची कारकीर्द सर् जॉन् माल्कम् यानें 'इराणचा इतिहास' या ग्रंथांत वर्णिली आहे. हा ग्रंथ वरील साहेबानें फारसी ग्रंथांवरून रचला आहे.

येथवर अरबस्थान व इराण यांच्या इतिहासांविषयीं निरूपण केलें. आतां तिसरें राष्ट्र जे एतद्देशीय हिंदु लोक त्यांच्या इतिहासाविषयीं लिहायाचें.

६. या राष्ट्राची उत्पत्ति मनुष्यजातीच्या साऱ्या शाखांत मुख्यत्वेंकरून गणलेली जी आर्यशाखा तिजपासून होय; किंबहुना त्या शाखेची उपशाखा मुख्य हीच असावी असाही पुष्कळ संभव आहे. या आर्य लोकांचें मूळ ठिकाण युरोप व एशिया यांच्या मध्यंतरीं कोठें तरी असावें असा अर्वाचीन भाषाशास्त्रज्ञांचा सुमार आहे, व तेथून दोहोंकडे या लोकांच्या निरनिराळ्या टोळ्या दूरदूरपर्यंत वसाहत करण्यास गेल्या असाव्या असें आलीकडे सर्वांचें मत झालें आहे. यांपैकीं एक टोळी पूर्वेकडे येऊन इराण देशांत स्थाईक झाली: व दुसरी पुढें पंचनद देशांत जाऊन तो सुपीक देश तिनें वसविला असावा. ही प्राचीन हिंदु लोकांची मूळ जागा होय.[1] तेथून ते क्रमाक्रमानें सगळ्या देशभर पसरले. आतां या वेळची आमच्या

---

करण्यांत आलें. पर्शियन् लोकांशीं लढणाऱ्या ॲगेसिलॉस् (Agesilaus) नामक स्पार्टन् राजाला झीनोफोन् ख्रि पू. ३९६ मध्यें मिळाला. त्याचें कोरोनिया (Coronea) येथें खि. पू. ३९४ मध्यें अथीनिअन् लोकांशीं युद्ध झालें. पुढें झीनोफोन् स्पार्टाला जाऊन ऑलिंपिया (Olimpia) जवळ सिलस् (Scillus) येथें जाऊन राहिला. तेथें त्याच्याजवळ त्याची बायको फायलेशिया (Philesia) मुलांसह येऊन राहिली. पण त्याला या विश्रांतिस्थानांतूनाहि वीस वर्षांनीं पिटाळून लावण्यांत आलें. यूबलस् (Eubulus) च्या सूचनेवरून अथेन्समधून हद्दपार करण्याचा पूर्वीचा हुकूम पुढें रद्द करण्यांत आला. पण झीनोफोन् परत अथेन्सला गेल्याचा पुरावा उपलब्ध नाहीं. सिलस् येथून तो कॉरिंथ् (Corinth) ला गेला व तेथेंच वारला असावा. त्याचे दोन प्रमुख ग्रंथ म्हणजे The Anabesis आणि The Cyrophaedia हे होत. पहिल्या ग्रंथांत सायूरस्ची स्वारी व ग्रीक् सैन्याची पीछेहाट यांचें वर्णन असून दुसरें पर्शियन् राज्यसंस्थापक सायूरस् याच्या हकिकतीवर आधारलेलें राजकीय कथानक आहे. थुसिडाइडस्च्या इतिहासाची पूर्तता करण्यास्तव यानें लिहिलेलें (Hellenica) हेलेनिका नामक पुस्तक रूक्ष गोष्टींनीं भरलेलें आहे. आपल्या गुरूचें स्मारक म्हणून त्यानें सॉक्रेटिस्चा चतुःखंडात्मक ग्रंथ Hellenica त्यानें लिहून काढून प्रसिद्ध केला. या ग्रंथांत अथेन्सचे तरुण बिघडविण्याचा व धर्मभ्रष्टतेचा असे जे दोन आरोप सॉक्रेटिसवर करण्यांत आले होते त्यांचें निराकरण केलें असून सॉक्रेटिस् व त्याचें व्यावहारिक तत्त्वज्ञान यांचें यथातथ्य वर्णन आलें आहे. झीनोफोन्चे आणखींहि कित्येक किरकोळ ग्रंथ आहेत. 'सम्पादक'

१. प्राचीन आर्यांचें मूळ पीठ पंजाबाकडचा प्रदेश असावा यास पुष्कळ प्रमाणें आहेत. पाहा

(पुढें चालू)

पूर्वजांविषयींची माहिती सध्यां लोकांत कितपत आहे व ती कशावरून आहे याविषयीं कांहीं लिहितों.

प्राचीन आर्यांच्या आचारांविचारांविषयीं ज्ञान होण्याचा मुख्य ग्रंथ कोणता तो साऱ्या जगास विदित आहे. हा ग्रंथ ऋग्वेद होय. याच्याविषयीं गेल्या अंकांत§ आमच्या वाचकांस बरीच माहिती दिली आहे; यास्तव त्या संबंधानें येथें कांहीं अधिक लिहीत नाहीं. वेदांच्या खालोखाल स्मृति, व स्मृतींच्या पुढें पुराणें. या तिहींवरून एतद्देशीय लोकांच्या प्राचीन स्थितिरीतींविषयीं जी काय माहिती होणें ती व्हावयाची. आतां वरील तिन्ही ग्रंथसमुदायांचीं नांवें तेव्हांच घेतां आलीं, पण त्यांतील विषय केवढा विस्तीर्ण आहे व त्याचें नुसतें पर्यालोचन होणेंही केवढें श्रमाचें काम आहे, याची कोणाही समंजस मनुष्यास कल्पना केल्याशिवाय राहावयाची नाहीं. मग त्यांचें समग्र अध्ययन तर केवढें दुर्घट किंबहुना अशक्य होय हें उघडच आहे. तें अनेक पंडितांनीं जेव्हां आपआपणावर वांटून घ्यावें तेव्हां मात्र दीर्घ काळाअंतीं साध्य होणार. या उद्योगाकडे आज कित्येक वर्षें पाश्चात्य पंडितांचें लक्ष लागून तो सिद्धीस नेण्याविषयीं त्यांचे प्रयत्न सतत चालू आहेत. यांत त्यांच्या परिश्रमाप्रमाणें बरेंच यशही येत चाललें आहे; पण तें पूर्ण येण्यास एका मोठ्या गोष्टीची अद्याप उणीव आहे. ही उणीव एतद्देशीय लोकांचा उद्योग होय. आमच्याच देशांतील लोक आपल्या पूर्वजांविषयीं जेव्हां उत्साहानें ज्ञान संपादन करूं लागतील व प्राचीन ग्रंथांचें शोधपूर्वक समग्र अध्ययन करतील तेव्हां मात्र वरील उद्योगास विशेष निश्चितता येऊन तो अधिक झपाट्यानेंही चालेल. आजपर्यंत चालत आलेली स्थिति अशी आहे कीं, आमच्या प्राचीन इतिहासाविषयीं वगैरे जे अनेक शोध करावयाचे ते ज्यांनीं हा देश नकाशावरून मात्र पाहिलेला, येथील लोकाचार वगैरे ज्यांनीं पुस्तकांत मात्र वाचलेले, व संस्कृत भाषा ज्यांनीं इंग्रजी लिपीनें मात्र वाचलेली, ती बोललेली ज्यांनीं स्वप्नींही ऐकलेली नाहीं,[1]—अशा लोकांनीं करावयाचे.

---

कीं, सूर्यवंशी व चंद्रवंशी राजांच्या राजधान्या ज्या अयोध्या व हस्तिनापुर त्या हिंदुस्थानच्या उत्तर भागासच आहेत. त्याप्रमाणेंच मोठमोठीं क्षेत्रें व तीर्थें सारीं तिकडेच आहेत. शिवाय पाणिन्यादि प्राचीन मुनि पंजाबाकडीलच राहणारे होते. पाणिनीस 'शालातूरीय' म्हणजे 'शालातूर (लाहोर?)—चा राहणारा' अशी संज्ञा दिलेली महाभाष्यादि ग्रंथांतून आढळते.

'सम्पादक'

§ अंक २१ वा, पृष्ठें ३८२–३८५ पाहा.

१. सुमारें एका वर्षापूर्वी इंग्लंडांतील प्रसिद्ध प्रोफेसर् मॉनियर् विल्यम्स येथें आले असतां त्यांच्या निमित्त येथें जी सभा झाली होती तींत वरील गोष्ट प्रोफेसर् महाशयांनीं स्पष्ट सांगितली. त्यांचें पहिल्यानें इंग्रजींत भाषण होऊन त्यावर येथील एका पंडितानें त्यास उद्देशून संस्कृतांत भाषण केलें; पण त्यास त्याच भाषेंत उत्तर देण्याची साहेबांस मोठी पंचाईत पडली. तेव्हां इंग्रजींतच प्रत्युत्तर देऊन विलियम्स् साहेब म्हणाले कीं, "मी आज वीस वर्षें ऑक्सफर्ड् येथें संस्कृताचा प्रोफेसर् आहें व व्याकरण, कोश व इतर कित्येक ग्रंथ मीं रचले आहेत, असें असतांही मला संस्कृतांत बोलतां येऊं नये याचें तुम्हां सर्वांस मोठें नवल वाटेल; पण आमची शिकण्याची तऱ्हा तुम्हांस माहीत नाहीं. आमचें संस्कृताचें ज्ञान केवळ पुस्तकावरून असतें; ती भाषा बोलण्याचा आम्हांस कधींच प्रसंग येत नाहीं. संस्कृत शब्द बोललेले ऐकण्याचा हाच माझा पहिला प्रसंग आहे."

अशांस आमचे पुरातन ऋषि मिसर देशांतील मसाल्यांत जतन करून ठेवलेल्या प्रेतांप्रमाणें किंवा भूगर्भशास्त्रसंबंधीं संग्रहालयांत ठेवलेल्या अस्थिमय प्रचंड प्राण्यांप्रमाणेंच केवळ असून त्यांविषयीं त्यांस यथार्थ समजुती होणें व त्यांच्याविषयीं हुबेहुब कल्पना मनांत उठणें हें दुरापास्तच होय. याच कारणामुळें संस्कृताच्या अभ्यासास तिकडे असावें तसें उत्तेजन नाहीं व एकंदर लोक तर त्याविषयीं केवळ उदासीन आहेत. पण तेंच आह्मीं स्वतः जर वरील उद्योग करण्याचें आरंभलें तर आह्मांस किती गोष्टींची अनुकूलता आहे! आमचा नित्यक्रम व साहजिक विचार हे आमच्या पूर्वजांच्या ग्रंथावर सदोदित जवळ असणाऱ्या जणूं काय टीकाच होत; कोणताही शोध करायाचा असला किंवा एकादा ग्रंथ मिळवायाचा असला, तर तें आह्मांस किती अल्प आयासानें साध्य होणार आहे! तशीच गुरुशिष्यपरंपरेनें पूर्वापासून चालत आलेली जी व्याख्यानाची रीति व ग्रंथांतरीं न आढळणारी अशी अनेक प्रकारची माहिती ती आह्मांशिवाय दुसऱ्या कोणास प्राप्त होणार आहे ? याशिवाय एतद्देशीय लोकांस संस्कृताचें अध्ययन इतरांपेक्षां अत्यंत सुलभ असून जुन्या ग्रंथांचें मर्मज्ञान व त्यांतील रसाचें ग्रहणही अनायासें करून होणार आहे हेंही उघड आहे. आतां हें खरें कीं, या सर्व सोयी असूनही सध्यां आढळणाराच प्रकार जर पुढें चालत गेला, तर त्या आह्मांस असून नसून सारख्याच. सध्यांचा प्रकार सर्वांस माहीत आहेच, कीं आमच्या जुन्या विद्येविषयीं कोणासही म्हणण्यासारखा अभिमान वाटत नसून तिच्या प्रीत्यर्थ परिश्रम करण्याची तर बहुधा कोणासही उत्सुकता नाहीं. विद्यालयांतून जे संस्कृतज्ञ बाहेर पडतात त्यांचें ज्ञान केवळ परीक्षेकरतांच संपादन केलें असल्यामुळें बहुधा लवकरच ऱ्हास पावायाला लागतें; तें पुढें वाढवण्याची इच्छा तर फार करून कोठेंच दृष्टीस पडत नाहीं. त्यांखेरीज इतर जे कोणी बाह्यात्कारी प्राचीन आर्यविद्येचें मोठें गौरव करतात व तिच्या संपादनार्थ मोठा परिश्रम करताहेतसे दिसतात त्यांची भक्ति तरी निरपेक्षतेची किंवा विशेष प्रेमाची असते असें नाहीं. त्यांचे गुप्त हेतु पाहिले तर बढतीची इच्छा किंवा निदान ढोल मारण्याची हौस याच्यापेक्षां फारसे निराळे नसतात. कोणत्याही शास्त्रांत चंचुमात्र प्रवेश होऊन उगीच टफ करण्याचें सामर्थ्य आलें न आलें पुरे, कीं लगेच त्या शास्त्रावर भरसभेंत व्याख्यानें, मासिक पुस्तकांतून निबंध वगैरे सुरू झालेच; एकाद्या सामान्य ग्रंथाच्या दोन पंक्ति लावण्याची सुद्धां मारामार कां असेना, वेदशास्त्रोत्तेजक सभेंत परीक्षकाचें स्थान आपलें पटकावायाचें; तसेंच कोणताही प्रसंग असो,–दुष्काळनिमित्त सभा असो, कोणाबद्दल दुःखप्रदर्शन असो, सार्वजनिक कामाची वाटाघाट असो—कणाद, पाणिनि वगैरे मंडळी समाजनांपुढें आपली आणून उभी करायाचीच ! असो; तर हा प्रकार जोंवर चालेल तोंवर प्रस्तुत विषयाचें ज्ञान प्राप्त होण्याचीं आमच्यापाशीं कशींही साधनें असलीं तरी त्यांपासून फलनिष्पत्ति विशेष होण्याचा मुळींच संभव नाहीं. हीं वरील साधनें व युरोपियन् लोकांचा उत्साह, उद्योग व तात्त्विक जिज्ञासा हीं दोन्हीं जेव्हां एकत्र होतील तेव्हांच आमच्या प्राचीन विद्येचें पुनरुज्जीवन होऊन आमच्या प्राचीन स्थितीविषयीं विशेष ह्मणण्यासारखी माहिती सर्वांस होईल. नाहीं तर आजवर

चालत आलेला जो संदिग्धपणाचा व अपूर्णतेचा प्रकार तोच पुढेंही असाच चालत राहील यांत संशय नाहीं.

हें आमच्या देशाच्या इतिहासाच्या एका भागाविषयीं झालें. यापुढला भाग परराष्ट्रांचें वर्चस्व हिंदुस्थानावर जेव्हांपासून माजूं लागलें व हिंदु राज्यांचा ऱ्हास होऊं लागला तेव्हांपासून तों वरच्याविरुद्ध प्रकार होऊं लागेपर्यंत; म्हणजे सुमारें अकराव्या शतकाच्या आरंभापासून तों सतराव्याच्या मध्यापर्यंत. या काळांत हिंदुस्थानच्या निरनिराळ्या प्रांतांवर मुसलमानांचा अंमल बसूं लागून तो कांहीं काळपर्यंत सार्वभौमत्वाच्याही शिखरास जाऊन पोंचला होता. या काळचा इतिहास मुख्यत्वेंकरून मुसलमान इतिहासकारांनीं फारसी भाषेंत लिहून ठेवला आहे. गिझनीच्या महंमदाच्या स्वाऱ्यांपासून तों मोगलांच्या घराण्याचें ऐश्वर्य नष्ट होईपर्यंतचा मजकूर फेरिस्ता,‡ फैजल* वगैरेंच्या ग्रंथांतून आहे, व फारसी कवितेंतही इतर भाषांतल्याप्रमाणें ऐतिहासिक वृत्तांत सांपडतो. इंग्रजी इतिहासांत या काळच्या वृत्तांताचा जो उल्लेख सांपडतो तो वरील ग्रंथांच्या आधारानें होय हें उघड आहे.

---

‡ महंमद कासिम फेरिस्ता (अंदाजें १५७०–१६११) पर्शियन् इतिहासकार. कॅस्पियन् समुद्राच्या किनाऱ्याजवळ अस्ट्राबाद (Astrabad) येथें जन्मला. याच्या लहानपणींच याच्या बापास हिंदुस्थानांत यावें लागलें, व दक्षिण हिंदुस्थानांत त्यास मोठी जागा मिळाली. बापाच्या मरणानें पुढें फेरिस्ता यासही दरबारांत चांगली नोकरी मिळाली. १५८९ सालीं फेरिस्ता विजापुरास गेला. व दुसरा इब्राहिम अदिलशहा याच्या आश्रयानें शेष आयुष्य त्यानें घालविलें. इहानें सांगितल्यावरून त्यानें हिंदुस्थानचा इतिहास लिहिला. सदर इतिहासाच्या प्रस्तावनेंत मुसलमानांच्या व अरबांच्या स्वाऱ्यांपर्यंतची हकीकत संक्षेपानें दिली असून पहिल्या दहा भागांत एकेका प्रांताच्या राजांचा इतिहास व अकराव्या भागांत मलबारच्या मुसलमानांचा इतिहास आला आहे. बाराव्या भागांत हिंदुस्थानांतील मुसलमानी साधूंचा वृत्तान्त असून अखेर हिंदुस्थानची भौगोलिक व हवामानासंबंधीं माहिती दिली आहे. फेरिस्ता यानें विश्वसनीय इतिहासकार म्हणून नांव कमाविलें असून त्याचा ग्रंथ प्रमाण मानण्यांत येतो.—General J. Briggs यानें The History of the Rise of the Mahometan Power in India (London 1829) या नांवानें फेरिस्ताच्या इतिहासाचें भाषांतर इंग्रजींत केलें असून त्याचे चार खंड आहेत. त्यानें मुळांतील मजकुरांत कोठें कोठें कमजास्त केलें असून बारावा भाग अजीबात गाळला आहे. 'सम्पादक'

* अबुल फैजल (१५५१–१६०२) अकबराच्या दरबारांतील वजीर व इतिहासकार. अकबरनामा नांवाचा याचा इतिहास-ग्रंथ पर्शियन् भाषेंत लिहिला असून त्याचे दोन भाग आहेत. पहिल्यांत अकबरच्या कारकिर्दीचें संपूर्ण वर्णन असून दुसऱ्यांत अकबराच्या धार्मिक व राजकीय संस्थांचा व राज्यव्यवस्था आणि राज्यघटना यांचा इतिहास आहे. या दुसऱ्या भागाचें नांव 'ऐन-इ-अकबरी' असें आहे. भाषा फार मनोरंजक, प्रौढ आणि चटकदार आहे. फ्रॅन्सिस् ग्लॅड्विन् (Francis Gladwin) यानें या इतिहासाचें इंग्रजी भाषांतर (१७८३–१७८६) करून कलकत्त्यास प्रसिद्ध केलें व १८४८ सालीं प्रो. ब्लॉकमन् (Blockmann) यानें भाषांतर केलें. १६०२ त फैजल याच्या दिवाणगिरीच्या वजनामुळें मत्सर वाटून सलीम (उर्फ पुढें जहांगीर) यानें मारेकरी घालून त्यास ठार केलें. 'सम्पादक'

तिसरा भाग अगदीं आलीकडचा इतिहास. या भागांत मागील दोहोंहूनही पुष्कळ विलक्षण उलाढाली झाल्या आहेत. आणि अर्वाचीनत्वास्तव व दुसऱ्या कित्येक कारणांस्तव याची माहिती सर्वांस पहिल्या दोहोंपेक्षां अधिक आहे. यांत गेल्या दोन अडीचशें वर्षांची हकीकत, ह्मणजे हिंदूंच्या राज्याचा पुनरुदय व यवनांच्या सार्वभौमत्वाचा ऱ्हास व अस्त, आणि सातां समुद्रांपलीकडच्या अत्यंत दूर ( असलेल्या ? सं० ) राष्ट्रास या भूमीचा शोध लागून त्यांचा या मुलुखांत संचार व उलाढाली; व त्यांपैकीं एकाचें कांहीं अंगच्या अलौकिक गुणांनीं व कांहीं सद्दीच्या जोरावर साऱ्या देशभर झालेलें वर्चस्व;—या सर्व गोष्टी अंतर्भूत होतात. या शेवटल्या भागाची सर्वांस थोडीबहुत माहिती आहेच आहे; यास्तव ती येथें मुळींच न देतां इंग्रेजी भाषेंतल्या इतिहासांतून ती कशी दिली आहे येवढ्याचविषयीं येथें लिहिलें ह्मणजे बस आहे.

प्रस्तुत पुस्तकाच्या आठव्या अंकांत* प्रकृत विषयावर कांहीं मजकूर लिहिलेला आहे. व नुकत्या (निघालेल्या? सं०) तिसाव्यांतही‖ एकंदर विषयाच्या संबंधानें त्यांतील एक देश जो प्रस्तुत विषय त्याविषयीं मधून मधून कांहीं उल्लेख केले आहेत. पण तें सर्व निरूपण एकंदर विषयावर व्यापकपणें केलें होतें. प्रस्तुत स्थलीं तेंच विशेषत: करायाचें आहे; ह्मणजे इंग्रेजींत या देशाच्या इतिहासावर जे मोठमोठे प्रसिद्ध ग्रंथ आहेत त्यांविषयीं वाचकांस कांहीं माहिती द्यावयाची आहे.

वरील इतिहासग्रंथ दोन तीन प्रकारचे आहेत. कांहीं एका राष्ट्रविशेषाचे किंवा देशविभागाचे आहेत; जसे डफ्चा 'मराठ्यांचा इतिहास', टॉड्ची 'राजस्थानची बखर', एलियट्चा 'मुसलमानांचा इतिहास', माल्कम्चा 'मध्य हिंदुस्थानचा इतिहास', ऑर्मचा 'इंग्लिशांचा इतिहास' इत्यादि. कांहीं एकंदर देशाचे आहेत; जसे मिल्ल्, एल्फिन्स्टन्, मरे, टेलर् वगैरेंचे. कांहींत एकाद्या लढाईची किंवा एकाद्या इतिहासप्रसिद्ध पुरुषाचीच हकीकत आहे: जशी—केची 'अफगाणस्थानांतील मोहीम', 'शिपायांच्या लढाईची हकीकत', मेकॉलेचे 'लॉर्ड् क्लैव' व 'वॉरन् हेस्टिंग्स्' हे सर्वप्रसिद्ध निबंध, इत्यादि. यांशिवाय इतरही नानाप्रकारचे लहान मोठे ग्रंथ व निबंध आहेतच. आतां या सर्वांविषयीं यथास्थित विवेचन करणें ह्मणजे वरील सर्व ग्रंथ अगोदर शोधपूर्वक समग्र वाचलेले पाहिजेत, व वाचकांसही तें सर्व विवेचन चित्तवेधक होण्यास वरील सर्व ग्रंथांचें बरेंच ज्ञान असलें पाहिजे. शिवाय तें विवरण प्रस्तुतसारख्या लहान पुस्तकास मुळींच शोभणार नाहीं; तें समग्र होण्यास मोठमोठे ग्रंथ लागतील. यास्तव येथें वरील ग्रंथांचें आमच्या वाचकाकरतां अनुक्रमेंकरून केवळ दिग्दर्शन मात्र करतों—

ग्रँट् डफ्§ हा साताऱ्यास पोलिटिकल् रेसिडंट् होता. यानें मुंबईचे पहिले गव्हर्नर् एलफिन्स्टन् साहेब व० जनरल् सर् टॉमस् मनरो यांच्या प्रोत्साहनावरून मराठे लोकांचा इतिहास लिहिला. या इतिहासकर्त्यास कितीका ठिकाणांहून इतिहासाची सामग्री मिळाली ती

---

* पृष्ठें ८८-८९ पाहा. ‖ पृष्ठें ५८५-५९३ पाहा. § मुंबईच्या पलटणीचा कॅप्टन् जेम्स् ग्रँट् डफ् सं०

त्यानें आपल्या इतिहासाच्या प्रस्तावनेंत सांगितली आहे; व ती एकत्र करून तींतून ग्रंथरचना करतांना व विशेषेंकरून ग्रंथ पूर्ण झाल्यावर तो छापून काढतांना त्यास केवढा अटाट पडला व किती पंचाइती कराव्या लागल्या त्यांची हकीकत नुकत्या छापून प्रसिद्ध झालेल्या नव्या आवृत्तीच्या आरंभीं दिली आहे.[1] हा इतिहास एकंदरींत पाहतां अत्यंत प्रशंसनीय होय. जो जो मजकूर इतिहासकर्त्यास खरा वाटला तो तो त्यानें दाखल करून इंग्रेजांविषयीं पक्षपात किंवा मराठ्यांविषयीं द्वेषभाव किंवा मत्सर अशा वृत्ति कोठेंही प्रगट केल्या नाहींत. त्याप्रमाणेंच पुष्कळ इंग्रेजी ग्रंथकारांस एतद्देशीय लोकांच्या संबंधानें लिहितांना पोकळ पांडित्य करण्याची जी हौस असते, आणि ज्ञान व नीति यांत आपल्या राष्ट्राचें वर्चस्व वरचेवर दाखवल्याखेरीज कधीं चैन पडत नसतें, तोही प्रकार यांत नाहीं.[2] सारांश, प्रस्तुत इतिहास आमच्या लोकांस सुद्धां निःपक्षपातपणें लिहिलेला असा वाटण्यासारखा आहे, व धर्म, नीति वगैरेंच्या संबंधानेंही एतद्देशीयांस राग येण्यासारखा यांत बिलकुल मजकूर नसल्यामुळें तो त्यांस सर्वथा प्रिय व्हावा असा आहे.[3]

कर्नेल् टॉड्§ हा राजपुतान्यांत पोलिटिकल् एजंट् होता. हा त्या प्रांतांत असतां तेथील

---

१. ही नवी आवृत्ति 'टाइम्स् ऑफ् इंडिया'च्या छापखान्यांत छापून प्रसिद्ध झाली आहे. मूळच्या तिन्ही भागांचें एक पुस्तक करून या आवृत्तीची किंमतही पहिलीच्या मानानें थोडी ठेवली आहे.

२, डफ्नें प्रस्तावनेंतच लिहिलें आहे—

"There being differences of opinion as to whether the writer of history should always draw his own conclusions or leave the reader to reflect for himself, I may expect censure or approbation according to the taste of parties. I have never spared my sentiments when it became my duty to offer them; but I have certainly rather endeavoured to supply facts than to obtrude my own commentaries; and though I am well aware that, to gain confidence with the one-half of the world, one has only to assume it, I trust that I shall not have the less credit with the other for frankly acknowledging a distrust in myself."

३, वरील इतिहासावर आमच्या एका मित्राची व विद्यालयबंधूची‡ चांगली वाचण्यासारखी टीका आहे हें मागें* एक दोन वेळां सांगितलेंच आहे. या टीकेंत प्रस्तुत इतिहासाच्या गुणदोषविवेचनाखेरीज आणखीही पुष्कळ चमत्कारिक माहिती आहे.

‡ नीळकण्ठ जनार्दन कीर्तने. 'सम्पादक'

* पृष्ठ ९२ टीप १ व पृष्ठ ३७३ पॅरिग्राफ् २ रा. पाहा. 'सम्पादक'

§ James Todd. (1782–1835) ब्रिटिश् अधिकारी व पौर्वात्य भाषापंडित. बंगालच्या सैन्यांत उमेदवारी मिळाल्यामुळें १७९९ सालीं हिंदुस्तानांत आला. १८१८ सालीं त्याला पश्चिम राजपुतान्यांतील संस्थानांचा पोलिटिकल् एजंट् नेमण्यांत आलें. तो १८२३ सालीं इंग्लंडला परत

(पुढें चालू)

लोकांस इकडील अल्पिष्टन्, रॉबिसन्, केनेडी, मनरो यांच्या सारखा अत्यंत प्रिय होऊन गेला होता.[1] त्यामुळें रजपूत, जाट वगैरे लोकांचा व त्याचा अतिशय परिचय होऊन त्यास त्यांची अतिशय माहिती होऊन गेली होती. ती सर्व त्यानें आपल्या बखरींत दाखल केली आहे. ही बखर अगदीं आरंभापासून, ह्मणजे सूर्यवंशी व चंद्रवंशी क्षत्रियांपासून, तों अगदीं प्रस्तुतच्या काळापर्यंत आणून वरील ग्रंथकारानें पोंचवली आहे. हींतील विषय सर्वांस माहीत आहेच,—कीं ज्यास हिंदुस्थानांतील स्पार्टन् लोक ह्मटलें असतां चालेल असे जे रामासिंग, बखतासिंग, राणा संग, वगैरेंचे देशबंधु त्यांचे मनास थक्क करून टाकणारे पराक्रम तींत वर्णिले आहेत. प्रस्तुत इतिहास फारसा प्रसिद्ध नाहीं. पहिली जी एक आवृत्ति निघाली आहे तिच्यावर अद्याप दुसरी निघालेली माहीत नाहीं.

एलियट्च्या इतिहासाचे पांच सहा मोठाले भाग आहेत. हा ग्रंथ त्यानें मुसलमानांनीं रचलेल्या इतिहासांवरून तयार केला आहे. अगदीं आरंभापासून ह्मणजे महंमदाच्या स्वाऱ्यांपासून तों मोगलाईच्या अखेरपर्यंत यांत हकीकत आहे.

सर् जॉन् माल्कम्† कोण हें कोणासही सांगायास नको. एल्फिन्स्टन्च्या खालोखाल याचेंच नांव प्रसिद्ध आहे. यास शेवटला पेशवा शरण गेला, व आठ लाखांची मोठ्या पंचाइतीनें नेमणूक करून देऊन यानेंच बाजीरावास ब्रह्मावर्तास पाठवलें. हा मुंबईचा दुसरा गव्हर्नर् झाला. याचा मुख्य ग्रंथ 'मध्य हिंदुस्थानचा इतिहास' हा होय. यांतच यानें इंदूरच्या राजवंशाची हकीकत व विशेषकरून अहल्याबाईचें वर्णन लिहिलें आहे. हाही ग्रंथ

---

गेल्यावर १८२६ सालीं त्याला लेफ्टेनंट् कर्नलची जागा मिळाली. १८२९-३२ पर्यंत यानें '**Annals and Antiquities of Rajasthan**' हा ग्रंथ लिहिला. याचे दोन खंड आहेत. शिवाय याच्या मृत्यूनंतर '**Travels in Western India**' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. 'सम्पा॰'

१. वरील साहेबाविषयीं अशी एक गोष्ट लिहिली आहे कीं, राजपुतान्यांतील एक शहर लढाईंत उध्वस्त होऊन गेलें असतां तें त्यानें पुनः बांधलें. त्या वेळेस एकजण ह्मणाला, "या शहरास टॉड्गंज असें नांव द्यावें; पण हें तरी कशाला पाहिजे? टॉड् साहेबाचें नांव या मुलखांतील लोक कधींही विसरणार नाहींत!"

† **Sir John Malcolm** (1769-1833) हा अँग्लो इंडियन् शिपाई, मुत्सद्दी, व ग्रंथकार होता. बाराव्या वर्षी त्याला हिंदी सैन्यांत उमेदवारी मिळाल्यामुळें तो १७८३ च्या एप्रिल मध्यें मद्रासला येऊन दाखल झाला व लवकरच वेलोर येथें सैन्यांत दाखल झाला. पुढें पर्शियन् भाषेचें अध्ययन त्यानें केल्यामुळें लॉर्ड् कॉर्नवॉलिस्च्या कचेरींत पर्शियन् दुभाष्या (Interpreter)-ची नोकरी त्यास मिळाली. आजारी पडल्यानें तो १७९४ सालीं इंग्लंडला गेला तो १७९६ सालीं परत आला. १८०० सालीं त्यास इराणच्या दरबारांत वकील (Envoy) म्हणून पाठविलें होतें अखेर १८२७ सालीं तो मुंबईचा गव्हर्नर् झाला. फुरसतीच्या वेळीं तो वाङ्मयसेवा करीत असे. याचा, इराणचा इतिहास दोन खंडांत १८१५ सालीं प्रसिद्ध झाला. आणि १८११ सालीं '**Sketch of the Political History of India since......1784**' हा ग्रंथ सुरू होऊन १८२६ सालीं संपला. 'सम्पादक'

अप्रसिद्ध झाल्यासारखाच आहे. याचें नुकतें एक मराठी भाषांतर होळकर सरकारच्या आश्रयावरून प्रसिद्ध झालें आहे.[१]

रॉबर्ट् ऑर्म* हा पहिल्यानें ईस्ट् इंडिया कंपनीच्या पदरीं कारकुनांची एक लहानशी असामी पतकरून क्लैव व हेस्टिंग्स् यांच्याप्रमाणें हिंदुस्थानांत आला. पुढें वाढतां वाढतां तो मद्रास येथें कौंसलदार झाला. याच्या इतिहासाचा पहिला भाग सन १७६३ साली प्रसिद्ध झाला, व पुढील दोन पुढें कांहीं वर्षांनीं तयार झाले. या इतिहासांत ऑर्म यानें प्रथमतः एकंदर देशाची वगैरे थोडीशी माहिती देऊन इंग्लिश् व फ्रेंच् यांची सन १७४४ सालीं जी लढाई सुरू झाली तेथपासून आरंभ केला आहे. वरील लढाईंत प्रसिद्धीस आलेला जो रॉबर्ट् क्लैव त्याचा व या इतिहासकाराचा चांगला स्नेह होता. या कारणामुळें व शिवाय ती लढाई त्याच्या वेळेसच झाली यामुळें ती त्यास अगदीं हुबेहुब वर्णितां आली. हींत अगदीं बारीक बारीक गोष्टी सुद्धां वगळल्या नाहींत. या तपशीलवारपणामुळें सामान्य वाचकास प्रस्तुत इतिहास कंटाळवाणा वाटण्यासारखा आहे खरा; परंतु जो खरा जिज्ञासु आहे त्यास तो वरील गुणास्तवच विशेष प्रिय होणार आहे. सन १७७५ साली कोर्ट् ऑफ् डायरेक्टर्स् यांनीं ऑर्म यास ३००० रुपये सालीना नेमणूक करून देऊन कंपनीचा बखरनवीस नेमलें. हा हुद्दा त्याच्या हयातीपर्यंत ह्मणजे सन १८०० पर्यंत त्याजकडे होता. या इतिहासकर्त्यांच्या अंगीं त्या कामास अवश्य जितके गुण तितके सर्व परिपूर्ण होते. एक तर मनोवेधक ग्रंथरचना; हें कसब त्याच्या अंगीं कितपत होतें याबद्दल खुद्द मेकॉलेनें काय ह्मटलें आहें तें आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच. मेकॉलेच्या मतें ऑर्म

---

१. हें भाषांतर रा० विनायक जनार्दन कीर्तने यांच्या नांवावर प्रसिद्ध झालें आहे. 'थोरले माधवराव' व 'जयपाळ' हे ग्रंथ ज्यानें वाचले असतील त्याची वरील इतिहासाविषयीं बहुधां अशी कल्पना होईल कीं, तें मोठें उत्कृष्ट भाषांतर झालें असेल. पण काय असेल तें असो; त्यांतील भाषासरणी थेट रा० रा० मंडलीक यांच्या इतिहासासारखी आहे. 'माळव्याचा प्राचीन इतिहास अंधःकारांत बुडाला आहे,' 'मल्हारराव होळकर पानपतच्या लढाईंत हजर होता' असला प्रकार साऱ्या ग्रंथभर आहे. एल्फिन्स्टन् व माल्कम् या दोघां इतिहासकर्त्यांची सारखीच दुर्दशा झाली हा काय चमत्कारिक योग!

* Orme Robert. (१७२८–१८०१) मलबारच्या किनाऱ्यावर अंजनगांव (Anjengo) येथें जन्मला. याचा बाप ईस्ट् इंडिया कंपनींत शस्त्रवैद्य होता. याचें शिक्षण हॅरो (Harrow) येथें झालें, व १७४३ सालीं यास बंगाल्यांत लेखकाचें काम मिळालें. १७५३ सालीं तो व क्लाइव्ह एकाच बोटींतून विलायतेस गेल्यावेळीं उभयतांची दाट मैत्री झाली. तो १७५४–५८ पर्यंत मद्रास कौन्सिलचा सभासद होता. कलकत्त्याच्या ब्लॅक्होलचा सूड घेण्यास क्लाइव्हला पाठविण्यास याचेंच वजन कारण झालें. 'A History of the Military Transactions of the British Nation in Indostan' हा याचा प्रमुख ग्रंथ १७६३–७८ पर्यंत तीन खंडांत प्रसिद्ध झाला. १७८१ मध्यें 'Historical Fragments' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. थॅकरे (Thackeray) च्या 'The Newcomes' मध्यें याचें ग्रंथ-लेखन-कौशल्य वर्णिलें असून क्लाइव्हवरील निबंधांत मेकॉलेनें घेतलेले कित्ती तरी उत्तमोत्तम उतारे याच्याच ग्रंथांतील आहेत. 'सम्पादक'

हा इंग्लंडांत झालेल्या कोणत्याही इतिहासकर्त्याहून वरील गुणांत कमी नाहीं.[१] येवढी प्रशंसा, आणि त्यांतून इतिहासरचनेच्या कामांत, वरील ग्रंथकाराकडून प्रस्तुत इतिहासकारास मिळाली, यावरून त्याच्या योग्यतेचें अनुमान वाचकांस सहज होईल. दुसरा गुण वृत्तांताचें पूर्णत्व, याविषयीं वर नुकतें लिहिलेंच आहे. पण तिसरा गुण तर वरील दोहोंहूनही मोठा आहे, तो प्रामाणिकत्व होय. हा गुण सामान्यतः सर्व मनुष्यांत व त्या मानानें बहुतेक इतिहासकारांतही किती थोडा आढळतो, किंवा निदान अपुरता तरी असतो, याविषयीं मागील अंकांवरून वाचकांची बरीच खात्री झाली असेल. त्यांतून सुधारणुकेचें आगर जें युरोपखंड तिकडील मनुष्यानें सुधारणेच्या दुसऱ्या टोंकास असणारें जें एशियाखंड इकडील राष्ट्रांविषयीं यथार्थ लिहिणें ह्मणजे तर केवढी पंचाईत ती सांगायाला नकोच ! पण असें असतांही ऑर्म यानें वरील इतिहासांत अगदीं निःपक्षपातपणा व समवृत्ति हीं प्रगट केलीं आहेत. क्लैवप्रभृति आपल्या देशबंधूंच्या शौर्याचें जसें वर्णन केलें आहे, त्याप्रमाणेंच इकडील लोकांचेंही अगदीं निर्मत्सरतेनें केलें आहे.प्रस्तुत इतिहासांतील शिपायांचें वर्तन वाचून प्रशियाचा राजा फ्रेडरिक् काय ह्मणाला तें यापूर्वीं§ वाचकांस कळवलेंच आहे. याशिवाय फ्रेंचांचा सेनापति बुसी, त्या वेळचा पेशवा बाळाजी बाजीराव, व प्रख्यात मराठा सरदार मुरारराव घोरपडा,[२] यांच्याविषयीं सुद्धां असें वर्णन केलें आहे कीं तें वाचून प्रस्तुत

---

१. "Orme, inferior to no English historian in style and power of painting, is minute even to tediousness. In one volume he allots, on an average, a closely-printed quarto page to the events of every forty-eight hours. The consequence is, that his narrative, though one of the most authentic and one of the most finely written in our language, has never been very popular, and is now scarcely ever read." *Lord Clive.*

§ पृष्ठ ५९७ टीप १ पाहा. 'सम्पादक'

२. क्लैव आरकाटच्या किल्ल्यांत असतां त्याच्या मदतीस जो मुरारराव आला तोच वरील होय. या घराण्याचें उपनांव त्यास कशावरून पडलें असावें हें उघडच आहे. या कुळांतील एका सरदारानें‡ शहाजीस दग्यानें धरून विजापूरच्या बादशहाच्या स्वाधीन केलें होतें; व या कुळाचा सूड पुढें शिवाजीनें कसा उगवला हें इतिहासप्रसिद्ध आहे. पुढें राजारामाच्या वेळेस याच कुळाच्या राहिलेल्या अंकुरापासून उत्पन्न झालेला जो संताजी घोरपडा तो मोठा प्रख्यात झाला. (अंक ६* पाहा.) असो; तर मुराररावाचा कुलवृत्तांत हा होय. याच्या राज्यरीतींचें व शिपाईगिरीचें वर्णन वरील इतिहासाच्या पहिल्या भागांत उत्कृष्ट केलें आहे.

‡ बाजी घोरपडे, मुधोळचा देशमूख, शहाजीच्या हाताखालचा सरदार. हा नीच स्वभावाचा असल्यानें विजापुरचा सुलतान महंमद अदिलशहा यास खुष करण्यासाठीं यानें आपला धनी शहाजी यास जेवावयास बोलवून विश्वासघातानें पकडलें.

* संभाजीला तुळापुरीं मारल्यावर व राजाराम सिंहगडावर वारल्यानंतर मराठ्यांना कोणीच पुरस्कर्ता नव्हता तेव्हां संताजी घोरपडे व धनाजी जाधव यांनीं भगव्या झेंड्याचा अभिमान धरून अवरंगजेबाच्या सैन्यास इतकें 'त्राहि भगवन्' करून सोडलें कीं एकाद्या मोगल स्वाराचा घोडा पाणी पिईनासा झाल्यास 'तुला पाण्यांत धनाजी दिसतो कीं काय?' असें स्वार आपल्या घोड्यास थट्टेनें म्हणे, अशा अर्थाचा मजकूर 'भाषापरिज्ञान' या सदराखालीं 'पाण्यांत पाहणें' या म्हणीच्या

इतिहासकाराच्या उदारतेची अतिशय तारीफ केल्यावांचून राहवत नाहीं. एकंदरीत वरील तिन्ही गुणांपैकीं कोणत्याही गुणाच्या संबंधानें पाहिलें, तरी या इतिहासाहून वरचढ असा अद्याप कोणताही झाला नाहीं असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं. तरी आमच्या पाश्चात्य बंधूंची आमच्या देशाविषयीं पहिल्यापासून केवढी आदराची बुद्धि आहे पाहा की असल्या इतिहासाचें सुद्धां दुसरी आवृत्ति निघण्यापुरतें नशीब अद्याप उघडलें नाहीं!

याप्रमाणें हिंदुस्थानच्या इतिहासकारांचा एक वर्ग आटपला. आतां एकंदर सगळ्या देशाचा पहिल्यापासून तों आतांपर्यंत ज्यांनीं वृत्तांत लिहिला आहे त्यांच्या ग्रंथांचें थोडेसें निरूपण करतों.

या कोटींत जेम्स् मिल् * हा अग्रगण्य होय. हा प्रस्तुत काळचा मोठा तत्त्वज्ञ जो नुकता निवर्तलेला जॉन् स्टुअर्ट् मिल् ‖ त्याचा बाप हें यापूर्वीं दोन तीन वेळां सांगण्यांत आलेंच आहे. हा अगदीं गरीब व अप्रसिद्ध कुळांत जन्मला असून त्याचा विद्याभ्यासही विपत्तींतच झाला. तरी त्याच्या अंगच्या हिंमतीनें व बुद्धीच्या जोरानें तो लवकरच प्रसिद्धीस आला. पुष्कळ वर्षेपर्यंत त्याचा चरितार्थ शिकवणीवर व वर्तमानपत्रें, मासिक पुस्तकें

---

उपपत्तीचे प्रसंगीं आला होता त्याला अनुसरून हा उल्लेख करण्यांत आला आहे. सदर मजकूर निबंधमालेच्या या आवृत्तींत समाविष्ट केलेला नाहीं. 'सम्पादक'

* Mill James ( १७७३–१८३६ ) तत्त्वज्ञानी व इतिहासकार. ग्रीक्, लॅटिन्, इतिहास व तत्त्वज्ञान यांची त्यास विशेष अभिरुची होती. १८०३-१८०६ पर्यंत तो 'Literary Journal' व 'St. James' Chronicle' यांचा सम्पादक होता. १८०६ सालीं त्यानें ( History of India ) हिंदुस्तानचा इतिहास लिहिण्यास प्रारंभ करून बारा वर्षांत तो लिहून संपविला. १८०८ सालीं त्याची ( Bentham ) बेंथॅन्शीं ओळख झाली. १८०८–१३ पर्यंत एडिंबरो रिव्यूंत तो लिहीत असे. १८१४ सालीं ' एन्सायक्लोपीडिआ ब्रिटानिका'च्या पुनर्मुद्रणाचे वेळीं Utilitarianism वर कांहीं टिपणें त्यानें लिहिलीं. हिंदुस्तानच्या इतिहासानें त्याला आर्थिक लाभ खूप झाला इंडिया ऑफिसांत नोकरी मिळाली; व बढती होतां होतां १८३० सालीं तो १९०० पौंड पगारावर India Office चा मुख्य झाला. १८२४–२६ पर्यंत तो 'वेस्ट् मिन्स्टर् रिव्ह्यू'त लिहीत असे. लंडन् रिव्ह्यूकरतां 'Church and its Reform' हा लेख यानें लिहिला. 'Elements of Political Economy' हा याचा प्रमुख ग्रंथ होय. 'सम्पादक'

‖ Mill John Stuart ( १८०६–७३ ) तत्त्वज्ञानी व अर्थशास्त्रज्ञ. बापाच्या देखरेखीखालीं याचें शिक्षण झालें. हा तीन वर्षांचा असतां ग्रीक् मुळाक्षरें, शब्द व त्यांचा इंग्रजी अर्थ त्याला येत असे. आठव्या वर्षी Aesop's Fables, Xenophon's Anabasis व सर्व Herodotus आणि तेराव्या वर्षांपर्यंत बहुतेक सर्व महत्त्वाचे ग्रंथ यानें वाचून टाकले. सतराव्या वर्षी यास इंडिया ऑफिसांत नोकरी मिळाली. बापाच्या मागें त्याच्या जागीं याची दोन हजार पौंडांवर नेमणूक झाली. १८२४ पासून हा 'वेस्टमिन्स्टर्‌रिव्ह्यू'त लिहीत असे. १८५८ सालीं ईस्ट् इंडिया कंपनी मोडल्यावर याला पंधराशें पौंडांचें पेन्शन मिळालें. १८४८ सालीं ( Political Economy ) अर्थशास्त्रावरील याचा ग्रंथ प्रसिद्ध झाला. System of Logic (1843), Representative Government (1860), Utilitarianism (1861). Subjection of Women (1869), Autobiography (1873), Three Essays on Religion (1874), हे याचे महत्त्वाचे ग्रंथ होत. 'सम्पादक'

पांत मजकूर लिहिण्यावर चालला होता. शेवटीं सन १८०८ सालीं त्याच्या जन्मांतला मोठा उद्योग जो हिंदुस्थानचा इतिहास तो त्यानें हातीं धरला. हा ग्रंथ संपूर्ण तयार होण्यास दहा वर्षें लागलीं. या प्रचंड उद्योगाचें बीज कितपतसें झालें हें माहीत नाहीं; पण त्यापासून त्यास मोठी किफायत झाली. ती ही कीं, वरील इतिहास प्रसिद्ध झाल्यावर लवकरच कोर्ट ऑफ् डायरेक्टर्स् यांनीं त्यास इंडिया हौस येथें एक हुद्दा दिला. हा हुद्दा. 'कॅरेस्पॉडन्स एक्झॅमिनर्' ह्मणजे कंपनी सरकारचा एतद्देशीय राजेरजवाड्यांशीं जो पत्रव्यवहार चालत असे त्याची तपासणी करायाची, हा होता. हा पुढें त्याचा मुलगा जो दुसरा मि. त्याच्याकडेही कांहीं वर्षें चालत होता. असो; आतां वरील इतिहासाविषयीं जर विचार केला तर तो या शतकाच्या आरंभीं—कीं ज्या वेळेस इकडची माहिती युरोपियन् लोकांस अगदीं थोडी होती—त्या वेळेस सरकारची वगैरे बिलकुल मदत नसतां केवळ स्वतःच्या श्रमानें एकट्या मनुष्यानें तयार केला. ही लहानसान गोष्ट नाहीं खरी; तसेंच जें काम इकडे येऊन पुष्कळ वर्षें राहिलेल्या इंग्रेजांसही जड जातें तें इतक्या दूर असलेल्या मनुष्यानें,—भाषेचें ज्ञान नाहीं, लोकपरिचय नाहीं, पूर्वींच्या ग्रंथांचा आधार नाही, सरकारची मदत नाहीं, अशा पंचाइतींत व दुसऱ्या अनेक व्यवधानांत दहा वर्षांच्या आंत तडीस नेलें ही खरोखर आश्चर्याची गोष्ट होय! सदरील ग्रंथावर जो टीका करूं जाईल त्यानें वरील गोष्टींकडे अवश्य लक्ष पुरवलें पाहिजे. तर तसेंच करून वरील इतिहासांत जे शतशः प्रमाद अपरिहार्यतेनें आले आहेत त्यांविषयीं केवळ न्यायबुद्धीनें येथें उल्लेख करतों. हे प्रमाद पहिल्या तीन भागांत, कीं ज्यांत प्राचीन हिंदु लोकांची विद्या, कला, रीतभात वगैरेविषयीं लिहिलें आहे, त्यांत अतिशयित आहेत. पुढील भाग, व विशेषतः युरोपियन् लोकांचा इकडे संचार होऊं लागला तेव्हांपासूनची हकीकत, यांत फारशा चुका नाहींत; कारण त्यांविषयींचे लेख मिल् यास स्वतः वाचायाला सांपडून शिवाय ती माहिती चांगली मिळण्याचाही पुष्कळ संभव होता. पण पहिल्या भागाविषयींचीं साधनें त्या वेळेस फारच अपुरतीं होतीं. आलीकडे विल्सन्, मुल्लर्, हौग् यांच्या सारख्यांनीं या देशाची प्राचीन काळाविषयीं माहिती होण्याचा जसा मार्ग करून ठेवला व तो जसा अजून पुढेंही चालला आहे, तसें पूर्वीं कांहीं नव्हतें. या कारणास्तव व शिवाय प्रस्तुत इतिहासकाराच्या मनांत या देशाविषयीं पहिल्यानेंच वाईट ग्रह होऊन बसल्यामुळें व कांहीं त्याच्या साहजिक हट्टी स्वभावास्तव, एतद्देशीयांच्या पूर्वजांविषयीं पुष्कळच हेकटपणाचा व तर्कटपणाचा मजकूर सांप्रत इतिहासांत आला आहे. यापासून पुष्कळ अनर्थ होण्याचा संभव होता; पण आमच्या सुदैवानें एक मोठी चांगली गोष्ट झाली. ती ही कीं, वर सांगितलेले हॉरेस हेमन् विल्सन् यांनीं मिल्च्या इतिहासाची दुसरी आवृत्ति काढतांना वरील सर्व चुका व अप्रयोजक तर्क खोडून टाकले. वरील साहेब मूळ सर्जन् ह्मणून हिंदुस्थानांत आला होता, पण लवकरच संस्कृत विद्येकडे त्याच्या मनानें ओढ घेऊन तो सर्व संस्कृतज्ञांत प्रमुख होऊन गेला. तो येथें सुमारें वीस वर्षें एका कॉलेजाचा मुख्य गुरु होता. असो; तर अशा मनुष्यानें वरील विलायतवासी इतिहासकाराचे गैरसमज खोडून टाकले हें फार योग्य काम झालें. ही खोडाखोड विल्सन्नें

मूळ ग्रंथाच्या खालीं टिपा देऊन केली आहे. शिवाय हा इतिहास मूळचा जो १८०८ पर्यंत होता तो १८३५ पर्यंत म्हणजे लॉर्ड् विल्यम् बेंटिक् यांच्या कारकिर्दीच्या अखेरी-पावेतों नेऊन पोंचवला आहे.

ऑनरेबल् मौंट् स्टुअर्ट् एल्फिन्स्टन्* यांच्याविषयीं निदान इकडच्या लोकांस तरी विशेष माहिती देण्याची अगदीं जरूर नाहीं. ते येथें रेसिडेंट् होते व पेशवाई बुडाल्यावर इकडची व्यवस्था पहिल्यानें त्यांनींच मोठ्या शहाणपणानें केली, व मुंबई इलाख्याचे पहिले गव्हर्नर् हेच झाले, हें सर्वांस माहीत आहेच. ज्या चतुर व सुज्ञ पुरुषानें इकडील लोकांचा लोभ व पूज्यबुद्धि हीं इतकीं संपादन केलीं होतीं व या देशाचें ज्ञान ज्यास उत्कृष्ट होण्याची येवढी संधि होती त्यानें कर्नल् टॉड्प्रमाणें महाराष्ट्र देशाचा इतिहास स्वत: लिहिण्याचें मना-वर घेतलें नाहीं ही मोठी खेद करण्यासारखी गोष्ट होय. असो; याच्या इतिहासांत फक्त दोन काळांविषयींच निरूपण केलें आहे; एक प्राचीन हिंदु लोकांचा व दुसरा मुसलमानांचा. याप्रमाणें हा इतिहास आरंभापासून दिल्लीच्या बादशाहीच्या अखेरपर्यंत आहे. हा एल्फिन्स्टन्-नें विलायतेस गेल्यावर तेथें लिहिला. याविषयीं विशेष लिहिण्यासारखें कांहीं नाहीं. इतिहासकर्त्याच्या स्वभावावरून प्रस्तुत ग्रंथाचें स्वरूप कसें असेल याची सहज कल्पना होईल.

आतां शेवटीं दोहोंविषयीं बोलायाचें राहिलें; एक मरेचा इतिहास व दुसरा कॅप्टन् मेडोज् टेलर्§ यांचा. पहिल्याविषयीं कांहीं विशेष माहिती मिळत नाहीं; दुसरा ग्रंथकार

---

* Mount Stuart Elphinstone. (1779–1859) मुत्सद्दी व इतिहासकार. १७९६ सालीं सिव्हिल् सर्व्हंट् म्हणून कलकत्त्यास आला; १८०१ सालीं पुण्याचा असिस्टंट् रेसिडेंट् झाला. असईच्या लढाईत यानें युद्धाचें ज्ञान व पराक्रम अद्भुत प्रकारानें दाखविल्यावेळीं 'तूं आयुष्याचा धंदा निश्चित करतांना चुकलास. खरोखर तूं शिपाई व्हावयास पाहिजे होतें' असे उद्गार वेलस्लेनें काढले. हा १८०४ सालीं नागपूरचा रेसिडेंट् झाला. फुरसतीच्या वेळीं तो सर्वोत्कृष्ट प्राचीन वाङ्मय वाचीत असे. १८११ सालीं त्याला पुण्याचा रेसिडेंट् नेमलें. पेशव्यांशीं झालेल्या खडकीच्या लढाईत त्यानें आपलें निसर्गदत्त युद्धकौशल्य प्रकट केलें. १८१८ सालीं पेशव्यांचें राज्य खालसा केल्यावर त्याला कमिशनर् नेमण्यांत आलें. व अखेर १८१९ पासून १८२७ पर्यंत तो मुंबईचा गव्हर्नर्हि होता. हिंदी लोकांच्या शिक्षणासाठीं यानें खूप खटपट केली. १८२९ सालीं विलायतला परत गेल्यावर दोन वेळां गव्हर्नर् जनरल्ची देऊं केलेली जागा यानें नाकारली. मुंबईच्या हिंदु लोकांनीं त्याचें स्मारक म्हणून एल्फिन्स्टन् कॉलेज स्थापलें व युरोपियनांनीं त्याचा संगमरवरी पुतळा उभारला. १८०८ सालीं याला काबूल दरबारांत ब्रिटिश् वकील म्हणून पाठविलें होतें; पण तेथील राजा शहा सुजा यास त्याच्या भावानें पदच्युत केल्यामुळें अफगाणिस्तानशीं मैत्रीचा तह होऊं शकला नाहीं. तथापि तिकडील अनुभवावरून 'Account of the Kingdom of Kabul and its Dependancies in Persia and India' हा ग्रंथ यानें लिहिला. शिवाय 'History of India' हा याचा ग्रंथ १८४१ सालीं प्रसिद्ध झाला. त्यांत हिंदु व मुसलमान साम्राज्यांच्या घडामोडींचा इतिहास आला आहे. 'सम्पादक'

§ Phillip Meadows Taylor (1808–1876) अँग्लो इंडियन् कादंबरीकार. हा पंधराव्या वर्षी मुंबईच्या एका व्यापाऱ्याचा कारकून म्हणून हिंदुस्तानांत आला. १८२४ सालीं

[ पुढें चालू ]

तर चोहोंकडे प्रसिद्धच आहे. हा नुकता कांहीं महिन्यांपूर्वी वारला. हा निजामच्या दरबारीं रेसिडेंट् असून कांहीं दिवस ठगीवर नेमलेला होता. यानें केलेल्या 'तारा', 'सीता', व 'राल्फ् डार्नेल्' या कादंबऱ्या व ठग लोकांविषयीं एक ग्रंथ, हे सर्व प्रसिद्धच आहेत. काळ्या लोकांचा धिक्कार व द्वेष न करतां त्यांशीं मोठ्या सलोखीनें वागणारे जे साहेब कांहीं दिवसांपूर्वी असत त्या वर्गांतले हे कदाचित् शेवटलेच असतील. यांचें येथें तीस वर्षें वास्तव्य असून एतद्देशियांचा व यांचा इतका परिचय जडला असे कीं, हिंदु मुसलमान वगैरे सर्व जातींचे अगदीं घरगुती रीतरिवाज सुद्धां त्यांस माहीत झाले होते. हें ज्ञान वरील कादंबऱ्यांत व प्रस्तुत इतिहासांतही टेलर् साहेबांनीं दाखवलें आहे. असो; या दोन्ही इतिहासांत, आणि त्यांतून विशेषेंकरून दुसऱ्यांत, प्रस्तुत विषयाचा संपूर्ण संग्रह केला आहे. त्याचें दिग्दर्शन ज्यांस करून घेणें असेल त्यांस ते वाचण्यास फार उपयोगी आहेत. टेलर् साहेबांचा वर जो वृत्तांत सांगितला आहे त्यावरून त्यांचा इतिहास एतद्देशीय वाचकांस विशेष प्रिय होण्यासारखा आहे हें वाचकांच्या ध्यानांत येईलच.

येथवर पहिले दोन प्रकार झाले. आतां शेवटीं राहिलेले दोन ग्रंथ ह्मणजे 'अफगाणस्थानांतील मोहीम' व 'शिपायांची लढाई' यांविषयीं, व मेकॉलेचे दोन प्रसिद्ध निबंध 'लॉर्ड क्लैव' व 'वॉरन् हेस्टिंग्स्' यांविषयीं कांहीं विशेष लिहिण्याची गरज नाहीं. पहिले दोन्ही ग्रंथ फार मोठाले असून त्यांतला दुसरा तर अद्याप पुराही झाला नाहीं; सर् विल्यम् के* हे नुकते दोन तीन महिन्यापूर्वी मरण पावल्यामुळें वरील इतिहास कदाचित्

---

यानें निजाम सरकारची एक जागा पत्करली व तेथेंच कायम राहिला. लवकरच त्याची बदली मुल्की खात्यांत झाली. व त्यामुळें त्यास दक्षिण हिंदुस्तानांतील भाषा, कायदे व भूगर्भशास्त्र आणि प्राचीन संस्था वगैरेंचें अध्ययन करतां आलें. त्यानें ग्रंथलेखन, कला, स्थापत्य यांत नैपुण्य प्रकट केलें व न्यायाधीशाचेंहि काम केलें. हिंदी परंपरा, प्राचीन संस्था व स्वभाव यांबद्दल त्याला अत्यंत आदर वाटत असे. १८४० सालीं हक्काची रजा घेऊन इंग्लंड्ला गेल्यावर 'Confessions of a Thug' व 'Tippoo Sultan' हें ग्रंथ यानें प्रसिद्ध केले. पुढें 'Tara' १८६३ सालीं, 'Ralph Darnell' १८६५ सालीं, 'Seeta' १८७२ सालीं व 'A Noble Queen' १८७८ सालीं अशीं याचीं अनेक पुस्तकें प्रसिद्ध झालीं. हीं सारीं हिंदी इतिहास व समाज यांचीं चित्रें आहेत. १८४०–१८५३ पर्यंत यानें 'Times'च्या बातमीदाराचें काम केलें. १८७० सालीं याचा 'A Student's Manual of the History of India' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. व त्याच्या पश्चात् १८७७ सालीं त्याचा 'Story of My Life' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. 'सम्पादक'

* Sir John William Kaye (1814–1876). इंग्रेज सैनिक व इतिहासकार. १८३२ ते १८४१ पर्यंत बंगालच्या तोफखान्यावरचा एक प्रमुख अधिकारी होता. पुढें कांहीं वर्षें हिंदुस्तानांत व इंग्लंडांत त्यानें वाङ्मयाच्या अध्ययनांत घालविलीं. १८५६ सालीं तो ईस्ट् इंडिया कंपनीच्या सिव्हिल् सर्व्हिसमध्यें शिरला. राणीकडे १८५८ सालीं हिंदुस्तानचा कारभार गेल्यावर जॉन् स्टुअर्ट मिल्ल्च्या जागीं इंडिया ऑफिसांत राजकीय व गुप्त खात्यांचा चिटणीस म्हणून त्याची नेमणूक झाली. १८७१ सालीं त्याला के. सी. एस्. आय्. ही पदवी मिळाली. हा मासिक पुस्तकांत वगैरे लेख लिहीत असे. याचे प्रमुख ग्रंथ 'History of the Sepoy War in India'

[ पुढें चालू ]

अपुरताच राहील. मेकॉलेच्या निबंधांविषयीं यापूर्वी कित्येक वेळां लिहिलें आहे, व त्याच्या एकंदर लेखांविषयीं त्याच्या देशबंधूंचाही काय अभिप्राय आहे तो मागें ( २८ व्या अंकांत )‖ आमच्या वाचकांस कळवलाच आहे. तेव्हां वरील दोन चरित्रांविषयीं विशेषतः येथें कांहीं ज्यास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं. इतकेंच सुचवणें बस आहे कीं, ज्या अर्थी मेकॉले साहेब या देशास खुद्द येऊन गेले होते, व आमच्याः वेच्याबागच्या लोकांची चालचलणूक दोन तीन वर्षें त्यांनीं मेहेरबानीनें नजरेखालीं घातली होती, त्या अर्थी मिल साहेबांच्या अज्ञानास व गैरसमजास जी सबब लागू होती तीही पण तीस वर्षांनीं पुढें त्यांस उपयोगीं पडण्याजोगी नव्हती. यास्तव देशप्रीतीच्या अनिवार्य भरांत किंवा लेखणीच्या सफाईच्या तडाक्यांत त्यांनीं सत्याचा जो निःशंक उपमर्द केला आहे, आणि आपल्या दोघां कथानायकांचा महिमा वाढवण्याकरतां इतिहास फिरवण्यास, व राष्ट्रांचें किंवा व्यक्तिभूत मनुष्यांचें अन्यथा वर्णन करण्यासही मागें पुढें पाहिलें नाहीं, या दोन्ही गोष्टींबद्दल त्यांच्याविषयीं कितीही कडकपणाचा मजकूर लिहिला असतां निदान एतद्देशीय तरी खचीत दोषास पात्र होणार नाहीं.

येथवर प्राच्य राष्ट्रांपैकीं तिहींच्या इतिहासांविषयीं लिहिलें. आतां चवथें राष्ट्र जे चीन देशचे लोक यांविषयीं कांहीं मजकूर लिहितां येईल; पण ज्या पक्षीं त्या राष्ट्राविषयीं अद्याप ह्मणण्यासारखी माहिती प्रसिद्ध झालेली नाहीं, आणि शोधक व साहसी जे युरोपियन् लोक त्यांचाही त्या अवाढव्य देशांत नुकता कोठें प्रवेश होऊं लागला आहे त्या पक्षीं प्रकृत विषय येथेंच थांबवणें इष्ट दिसतें.

[ मूळ आरंभलेल्या विषयाचे दोन भाग—निबंध व इतिहास—हे येथपर्यंत झाले. राहिलेल्या भागांचें निरूपण करूं लागल्यास हा एकच विषय फार लांबून वाचकांस कंटाळा येईल; यास्तव सध्यां तें करीत नाहीं. प्रसंगानुरोधानें त्याचेंही विवेचन एकादे वेळेस$ करणें येईल. ]

---

(1864–76), 'History of the War in Afghanistan' (1851), 'Life of Sir John Malcolm' (1856) हे होत. 'सम्पादक'

‖ पृष्ठें ५६९–५७० पाहा. 'सम्पादक'

$ ही वेळ पुढें शास्त्रीबुवांच्या बत्तीस वर्षांच्या अल्पस्व आयुष्यांत कांहीं आली नाहीं हें उघडच आहे. 'सम्पादक'

# निबंधमाला-वर्ष ३ रें.

प्रहर नमतु (नमय? सं०) चापं प्राक्प्रहारप्रियोऽहं
मयि तु कृतनिघाते किं विदध्याः परेण ॥[1]
महावीरचरित २-४९—भवभूति.

**अंक ३६ प्रतिखंडन-निबंधमाला.**

हा अंक चालू वर्षाचा शेवटला होय. यांत आजवर चालत आलेल्या क्रमाप्रमाणें निबंधरचना असायाची; पण आमच्या प्रतिपक्ष्यांनीं या वर्षी आह्मांवर बरीच मेहेरबानी केली असल्यामुळें तसें करतां येत नाहीं. त्यांच्या शिव्यांचा, आक्षेपांचा, व दूषणांचा आदर करणें अवश्य आहे. हें करणें आमच्या मित्रांपैकीं कित्येकांस कदाचित् पसंत वाटणार नाहीं; ते ह्मणतील कीं, वृथा निंदकाच्या तोंडीं लागण्यांत काय फळ आहे? जो दुराग्रहाच्या स्वाधीन झाला त्याशीं कितीही वाद केला, व कशींही उत्कृष्ट प्रमाणें त्याच्या पुढें उभीं केलीं, तरी तो आपला हेका सोडणार नाहीं; व ज्यास यथार्थ ज्ञान आहे व समबुद्धि आहे त्याची पुन: खात्री करूं जाणें ह्मणजे सोन्यावर परीस घासण्याप्रमाणें व्यर्थ श्रम मात्र होत. हें ह्मणणें वस्तुत: खरें आहे. पण त्याप्रमाणें चालण्याजोगी सांप्रत पुस्तकाची व विशेषतः आमच्या देशाची अद्याप स्थिति आली नाहीं. आमच्या पाद्री बंधूंच्या धड हिंदु ना ख्रिस्ती अशा भाषेनें व विचारांनीं आमच्या मालेस यत्किंचितही अपाय होण्याचा जरी संभव नाहीं, तरी इतर दूषकांचे आक्षेप तितके अप्रयोजक नसल्यामुळें पुष्कळांस ते स्थलविशेषीं संदेहांत पाडण्यासारखे असतात. यास्तव असली संशयात्मकता दूर करण्याकरतां वर्षाच्या अखेरीस एकदां सगळी झडती करावी हें बरें दिसतें. तसें केलें असतां निंदकास आपली कृतार्थता वाटत असेल तर ती मानण्याचें फारसें कारण उरणार नाहीं; व कोणाचा जर खरा आक्षेप असेल तर तोही प्रांजलपणें कबूल करण्यास सांपडेल.

याप्रमाणें प्रस्तावना करून आतां अनुक्रमानें आमच्या प्रतिपक्षिवर्गाच्या कोटिक्रमांचा विचार करतों. हा कोटिक्रम सर्वांच्या पाहण्यांत आला नसेल, यास्तव तोही स्थलविशेषीं वाचकांच्या सोयीकरतां सादर करण्यांत येईल.

**दयानंद सरस्वती**—या महाविख्यात जगद्गुरूचें नांव प्रथमतः घालण्याचें कारण आमच्या वाचकांच्या सहज ध्यानांत येईलच. गेल्या वर्षाच्या शेवटल्या दोन अंकांत§ स्वामींचा जो आह्मीं गुणानुवाद केला होता तो त्यांच्या परम धार्मिक शिष्यवर्गास अर्थातच बिलकुल रुचला नाहीं. तेव्हां बहुतेकांनीं नुसता तोंडानें व एकादोघांनीं वर्तमानपत्रांतून आपल्या गुरूच्या कैवारानें आह्मांवर भडिमार केला. यांत ह्मणण्यासारखे मुद्दे काय

---

१. "धनुष्य ओढ व शरप्रहार कर. शत्रूनेंच प्रथम प्रहार केलेला मला प्रिय आहे. मीं घाव मारल्यावर मग तुझ्यानें काय होणार!"

§ अंक २३ व २४, पृष्ठें ३१३–३२० व ३४४–३४६, आणि ३५१ पाहा. 'सम्पादक'

ते दोन तीनच होते. एक हा कीं, स्वामींची विद्वत्ता आटोकाट, षड्दर्शनाच्या चिंतनिकेंत त्यांनीं अपरिमित दिवस घालवलेले, तेव्हां नुसत्या काव्यसुभाषितांच्या जोरावर परमहंसां-बरोबर उड्डाण करूं जाणें आह्मांसारख्यास शोभत नाहीं. दुसरा हा कीं, स्वामी हे पुरे लोककल्याणेच्छु असून ते मूर्तिपूजेचें बंड मोडून स्वर्गास जाण्याचा सोपा मार्ग सर्वांस सांगत होते, तेव्हां अशा सत्कार्यास आडकाठी घालणें हा सज्जनपणा नव्हे; व स्वामींचा पंथ सध्यां जरी निर्बळ दिसला तरी कालांतरानें त्याची भरभर होऊन तो पुढें प्रबळ होत जावयाचा. तिसरा हा कीं, दयानंदजींच्या 'जुक्ती'शीं टक्कर मारण्याच्या भरीस न पडतां आह्मीं नुसत्या वाग्डंबरानेंच त्यांस जिंकण्यास पुढें सरसावलों.

आतां पहिल्यानें स्वामींच्या प्रचंड पांडित्याविषयीं जर पाहिलें तर त्याविषयीं निश्चयानें सांगण्यापुरतें शास्त्रज्ञान आह्मांस नाहीं हें खरें; तरी आह्मांस येवढें पक्कें माहीत आहे कीं, ज्यांनीं त्यांस पंडिततेच्या शिखरावर व गजेंद्रमस्तकावर आपमतलबास्तव बसवलें त्यांसही यथार्थज्ञान होण्याचें साधन आमच्याहून ज्यास्ती होतें असें नाहीं. शिवाय क्वचित् प्रसंगीं परमहंस जी तुटक तुटक गीर्वाण भाषा बोलत तीवरून आह्मांस तर त्यांच्या शास्त्र-पारंगततेची: फारशी कल्पना झाली नाहीं, व काशीस्थ पंडितांच्या संबंधानें स्वमुखानें भर सभेंत ज्या वल्गना चालल्या होत्या त्यांचा खरेपणाही आह्मांस विशेष भासला नाहीं. तसेंच एकंदरींत त्यांच्या अंगलोटावरून पाहतां व 'सुखार्थिनः कुतो विद्या कुतो विद्यार्थिनः सुखम्' या अनुभविक वचनाकडे किंचित् लक्ष दिलें असतां, स्वामींचे दिवस शास्त्राध्ययनांत कितीसे गेले असतील याची कोणासही सहज कल्पना होणार आहे !

दुसरी गोष्ट दयानंदजींची देशहिताविषयीं कळकळ, निःस्पृह लोकोपकारबुद्धि, व सद्धर्मप्रसारणार्थ निर्भयपणानें व निर्भीडपणानें सतत चालवलेले परिश्रम. ज्यांस आमच्या परमहंसांच्या दर्शनाचा व त्यांच्या वक्तृत्वाच्या श्रवणाचा साक्षात् लाभ घडला नाहीं, व त्यांची कीर्ति त्यांच्या सद्धर्मी शिष्यांच्या सांगोपांगीवरून वगैरे ज्यांनीं दुरून मात्र ऐकली आहे, त्यांस ' दूरतः पर्वता रम्याः ' या न्यायानें वरील सर्व गोष्टी खऱ्या वाटल्यास फारसें आश्चर्य नाहीं. कां कीं, युनिव्हर्सिटीचा उत्कृष्ट संस्कार घडलेले व चोहोंकडे सर्वमान्य ह्मणून गाजलेले लोक सुद्धां आपमतलब साधण्याकरतां निःशंकपणें कशा हिकमती करीत असतात, व वर्तमानपत्रांतील मजकुरावर पूर्ण भरंवसा ठेवला असतां वाचणारा पुष्कळ प्रसंगीं कसा निखालस फसून जातो, तसेंच, लोककल्याणाकरतां झटणारे ह्मणून जितके लोक पुढें पुढें करीत असतात त्यांपैकीं निवळ सोंग आणलेले किती असतात,व प्रसंग पडला असतां आपला मुखवटा खालीं टाकून देण्यास किती तयार असतात, वगैरे गोष्टी नुकत्या कोठें एकंदर लोकांस समजत चालल्या आहेत. तेव्हां लांबलांबच्या लोकांचे ठायीं वरील भ्रम आढळता तर फारसें नवल नव्हतें. पण विद्वत्तेचा व मार्मिकपणाचा बाणा मिरवणारे लोक सुद्धां वरील अडाण्यांसारखे फसून जावे हें केवढें आश्चर्य आहे ! स्वामींच्या निमित्त येथील लोकांवर पट्टी बसली असून त्यांची पुडी चार पांच महिने कशी भरपूर चालली होती, व येथील गजेंद्रो-त्सव व कर्दमोत्सव अनुभवून श्रीमंतांची स्वारी स्थानांतरास गेली असतां तेथूनही आपल्या

चेल्यांनीं भक्तीच्या भरांत कबूल केलेल्या खंडणीचा तगादा त्यांनीं कसा लावला होता, हें ज्यास माहीत असेल त्यास त्यांच्या निःस्पृहत्वकीर्तीचें हंसूं आल्याशिवाय राहणार नाहीं. त्याप्रमाणेंच ज्यांच्या रखवालीस सरकारचे मोठमोठे हुद्देदार व त्यांचा परिवार, त्यांनीं भटा-भिक्षुकांची वगैरे निर्भर्त्सना आरंभली असतां व शास्त्री लोकांचीं तोंडें आपल्या पांडित्यानें बंद करून टाकलीं असतां त्यांचा निर्भयपणा व निर्भीडपणा जर स्तुत्य होय; तर धन्याच्या जोरावर परक्यावर भुंकणाऱ्या ग्रामसिंहासही शूर व वावदूक कां म्हणूं नये ? श्रीमत्परमहंस जर खरेच धर्मसुधारणेच्छु असते, व वरील दोन गुण जर खरोखरच त्यांच्या अंगीं वसत असते तर ते आपल्या वचनाप्रमाणें मूर्तिपूजाधर्माचें मुख्य ठिकाण जें पुण्यपत्तन त्यास वर्षा सहा महिन्यांनीं तरी आपलें दर्शन देतेच; व येशूच्या कळपांत सामील झालेल्या मंडळी-प्रमाणें मारहाण सुद्धां सोसून सद्धर्माचा उपदेश करते. पण तें कसचें ? स्वामींची नजर आपल्या खायसमृद्धीवर; त्यांच्या पुरस्कर्त्यांची लोकस्फीतीवर; व इतर जनांची केवळ मौजेवर. मग इतकी अनुकूलता असल्यावर ल्यूथरानें जशी ख्रिस्ती धर्मांत सुधारणा केली त्याप्रमाणें इकडे करण्याचा प्रार्थनासमाजाच्या धुरंधरांनीं जो घाट घातला होता तो आज एक वर्ष लोटतें आहे तोंच सगळ्या देशभर इतक्या यशालाभास येऊन ठेपला आहे यांत नवल काय ! स्वामींचा 'आर्यसमाज' तर केव्हां लोपून गेला तो कोणाच्या कळण्यांतही आला नाहीं; व त्याचे स्थापकही पुनः पहिल्यासारखे कोणीकडे गुप्त होऊन बसले आहेत कोण जाणे ! पण सर्वांत स्वामींच्या परम शिष्यांच्या आचरणाची तर जितकी तारीफ करावी तितकी थोडी. स्वामींवर गुजरलेल्या महाप्रसंगाच्या समयीं त्यांनीं आपली धर्मनिष्ठा कशी दाखवली याविषयीं गेल्या वर्षाच्या अंकांत‡ लिहिलेंच आहे, त्याप्रमाणें पुढचाही त्यांचा क्रम दृष्टीस पडला. स्वामींच्या निमित्त त्यांच्यावर तेव्हांपासून जीं किटाळावर किटाळें येऊं लागलीं त्यांतून पार पडतां पडतां ते बेजार झाले, व या पंचाइतींत पडण्याची आम्हांस कोठून बुद्धि आठवली असें त्यांस होऊन गेलें. मग अशा वैतागांत स्वामींचा तनख्या-विषयीं जेव्हां तगादा आला तेव्हां त्यांची काय वाट झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी ! शेवटीं मूर्तींचा छळ केल्याबद्दल झालेल्या पापाचें क्षालन करण्याकरतांच जणूं काय, वरील आर्यसमाजाच्या पुरस्कर्त्यांनीं दुसऱ्या एका परमहंसांचा आश्रय धरला. हे अद्याप येथें असणारे सत्यपराक्रमस्वामी श्रीमध्वाचार्य हे होत. यांच्याही भजनीं आमच्या शहरांतील लोककल्याणकर्ती मंडळी कांहीं दिवस लागली होती. हा शेवटचा प्रकार मूर्ति-पूजेचे हाडवैरी जे आमचे वरील जगद्गुरु ते जर पाहते तर त्यांस केवढा सवतीमत्सर वाटता, व आपल्या वक्तृत्वमय व्याख्यानांचें त्यांस केवढें चीज झालेसें वाटलें असतें ! !

असो; आतां तिसरा मुद्दा कीं, आह्मीं स्वामींच्या प्रमाणांचें प्रमाणांनीं खंडन न करतां त्यांचा व त्यांच्या शिष्यवर्गाचा केवळ उपहासच कां केला, याचेंही उत्तर दिलें पाहिजे. वरील गोष्टींचीं कारणें तीन चार आहेत. एक तर हें कीं, उपहासाचें खंडन प्रत्यु-

‡ अंक २३, पृष्ठ ३१८ टीप १ पाहा. 'सम्पादक'

पहासानें केल्यास त्यांत कांहीं गैर नाहीं; दुसरें असें कीं, दयानंदजींची विद्वत्ता जरी आटोकाट होती, तरी त्यांचीं प्रमाणें इतकीं लुटपुटीत ( लटपटीत ? सं० ) असत, व एकंदर व्याख्यानांत रिकामी बडबड व चावटपणा हीं इतकीं असत, कीं, प्रत्येक गोष्टीचें खंडन करण्यांत कांहीं हंशील नाहीं, या आमच्या ह्मणण्याचा प्रत्यय पंडित मजकुरांचीं छापलि व्याख्यानें जीं त्यांच्या सच्छिष्यांनीं काळाचा अपव्यय करून ऐकलीं व अर्थाचा अपव्यय करून छापलीं त्यावरून कोणाही निःपक्षपात वाचकास खासा येणार आहे. तिसरें कारण असें आहे कीं, शत्रूचा पराभव धुराच्या नुसत्या भपकाऱ्यानें जेथें होणारा, तेथें गोळाही नासण्यांत कोणतें शहाणपण ? पण या सर्वांहून चवथें मोठें कारण प्रकृत निबंधाचें नुसतें नांव पाहिलें असतांही ध्यानांत येणारें आहे. तें हें कीं, त्यांतील विषय 'वक्तृत्व' हा होता. तो जर 'मूर्तिपूजा', 'धर्म' अशा प्रकारचा कांहीं असता तर आमच्या प्रतिपक्षांचा आक्षेप लागू पडता.

याप्रमाणें दयानंद सरस्वतींच्या संबंधानें आमच्या पुस्तकावर जीं दूषणें आमच्या पाहण्यांत व ऐकण्यांत आलीं त्यांचें निराकरण केलें. आतां विषयांतरास जाण्यापूर्वी या अपूर्व पंडिताविषयीं सरतेशेवटचे कांहीं शब्द लिहितों. यांस सरतेशेवटचे ह्मणण्याचें तात्पर्य असें कीं, पंडितजींविषयीं इतःपर लिहिण्याचा प्रसंग कधींही येईलसें वाटत नाहीं. यांचे भाषणसमारंभ व शेवटचा महोत्सव झाल्यास नुकतें कोठें वर्ष लोटून गेलें आहे तोंच सर्वांस यांचें विस्मरण पडत जाऊन त्यांची आतां कोणी पुस्तापास्तही करीत नाहीं. त्यांच्या 'आर्यसमाजा' चें ते येथून चालते होतांच त्यांच्या शिष्यांनीं रूपांतर करून टाकलें;[१] पण तेंही लवकरच गळाटून लयास पावलें. त्यांच्या 'व्याख्यानां'चा सरासरी छपाईचा खर्च निघाला असेल, पण यापूर्वी केव्हांच त्यांपैकीं कित्येक वाण्यांच्या दुकानीं साखरेच्या पुड्यांस उपयोगीं पडलीं असतील ! या भावि स्थितीचें गेल्या वर्षींच आह्मीं भविष्य केलें होतें; व स्वामींच्या विशाल कीर्तीचीं कारणें सांगितलीं होतीं. आतां सरतेशेवटीं त्यांच्या एकंदर गुणांचें थोडक्यांत परिगणन करून हें सदर आटपतों.

दयानंदजींच्या अंगीं सांगण्यासारखा कोणताही गुण नाहीं. विद्वत्तेच्या संबंधानें पाहिलें, तर जुन्या विद्येंत त्यांची गति सरासरी त्यांच्या शिष्यांच्या इतकीच आहे; ह्मणजे ऐवज थोडा पण आडंबर ( अवडंबर ? सं० ) फार, अशी स्थिति आहे. नव्या विद्वत्तेच्या संबंधानें पाहिलें, तर बंगाल्यांतील सुधारलेल्या ब्राह्मांच्या वगैरे परिचयानें त्यांनीं कांहीं सटरफटर

---

१. 'आर्यसमाजा'च्या रूपांतराचा प्रकार वर्तमानपत्रद्वारें प्रसिद्ध झालाच होता. स्वामींचें येथून प्रयाण होतांच त्यांच्या पुरस्कर्त्यांनीं विचार केला कीं, त्यांनीं उपदेशिलेलीं मतें सर्वांस मान्य होणार नाहींत, व त्यामुळें आपला मुख्य हेतु, कीं त्यांच्या पंथाचा, प्रसार व्हावा तो फसेल. शिवाय वेदादिकांस आपण एकदां झुगारून दिलें असून त्यांची पूज्यता पुनः कशी स्वीकारावी ! यास्तव त्यांनीं अशी युक्ति काढली कीं, आपल्या गुरूनें स्थापलेला 'समाज' पुनः उसकटावा, व त्याची पुनः एकवार स्थापना करून त्यास निराळेंच रूप द्यावें. हें रूप 'आर्यधर्मविवेचनाची ही सभा आहे असें ठरवून त्यास दिलें.

गोळा केलें आहे, पण तें बाहेर काढलें असतां त्यांची फजिती होण्यास मात्र तें खासें उपयोगीं पडतें.[1] वक्तृत्वाच्या संबंधानें पाहिलें तर विदूषकाच्या सारख्या घोटींव कोट्या, अप्रयोजकपणाची बडबड, व 'सहस्रभगदर्शनान्मुक्तिः'[2] असला मोठ्या गंभीर घोषानें केलेला चावटपणा, यापेक्षां श्रोतृरंजन करण्याचें साधन त्यांच्या अंगीं आह्मांस दुसरें कोणतेंही दृष्टीस पडलें नाहीं. धार्मिकतेच्या संबंधानें पाहिलें, तर येवढे थोर थोर विद्वान् व बडे बडे मुमुक्षु ज्यांच्या पदरजीं लोळत होते, त्यांच्या विषयीं संशय घेणें हा दांडगेपणा दिसेल; पण खरी स्थिति जगास जाहीर करणें हें जर पुस्तककर्त्यांचें काम असेल, तर प्रस्तुत जगद्गुरुंच्या ठायीं वरील गुणांचें फारसें अस्तित्व दृष्टीस पडलें नाहीं असें स्पष्टपणें सांगणें जरूर आहे. ब्राह्मणधर्माचे ल्यूथर् होऊं पाहणारांनीं आजपर्यंत अध्यात्मविचारांत व जुन्या धर्मग्रंथांच्या अवलोकनांत व मननांत किती वेळ घालवला असेल कोण जाणे! त्याप्रमाणेंच जगद्गुरु येवढी जबरदस्त पदवी पटकावणारांनीं षड्रिपुदमनार्थ तरी किती प्रयत्न केला असेल तोही सांगतां येणें कठिणच आहे! त्यांच्या भाषणांत व आचरणांत तर वरील दोहोंची प्रचीति मुळींच दिसून आली नाहीं. जो खरा मुमुक्षु व खरा धर्मोपदेशक आहे त्याचे ठायीं पराकाष्ठेची सौम्यवृत्ति असावी, कोणीं कसेही प्रश्न केले तरी त्यानें निदान शांतपणानें तरी त्यांचीं उत्तरें द्यावीं, व सर्व ऐहिक गोष्टी त्यास तुच्छ वाटत असून जगाचें पारमार्थिक हित साधण्याविषयीं त्याचे ठायीं औत्सुक्यपूर्वक खरा कळवळा दिसत असावा; अशी आजपर्यंत साऱ्या जगाची समजूत होती.[3] पण येथील प्रार्थनासमाजाच्या विद्वान् व धर्मशील अग्रे-

---

१. प्रस्तुत महापंडित अर्वाचीन पदार्थविज्ञानाचें, इतिहासाचें वगैरे ज्ञान आपल्या व्याख्यानांत जें प्रगट करीत तें कांहीं अप्रतिम असे. त्याचा मासला छापलेल्या व्याख्यानांवरून वाचकांस दिसून येईल, उदाहरणार्थ एकच गोष्ट येथें सांगतों. स्वामींचा हवेच्या शुद्धीकरणावर मोठा कटाक्ष असे; सकाळीं उठल्याबरोबर होम कशाला करावा? तर प्राभातिक विधींच्या योगानें हवा जी खराब होते ती साफ करण्याकरतां!—देवानें पुष्पें कशाकरतां निर्माण केलीं? हवेच्या शुद्धीकरतां! यावरून मूर्तिपूजेपासून किती तोटा आहे तो पाहा!—यज्ञयाग कशाकरतां सांगितले? वातावरणाच्या स्वच्छीकरणार्थ! आतां यावर कोणी कदाचित् आक्षेप घेतील कीं एका हिंदुस्थानांतल्या धुराच्या लोटानें सगळ्या पृथ्वीच्या हवेवर कसें कार्य घडेल? तर यावर स्वामींचें समाधान—पृथ्वी फिरते आहे कीं नाहीं; तर त्या फिरण्यानें तो शोधन करणारा धूर इंग्लंडापर्यंत व अमेरिकेपर्यंत पसरला जातो!! या शहरावर चारपांचशें रुपयांचा खंड बसवून आमच्यांतले प्रमुख विद्वान् जीं मतें भक्तिपूर्वक श्रवण करीत होते व इतर लोकांच्या हितार्थ जीं त्यांनीं मुद्दाम छापवून काढलीं, त्यांची योग्यता या मासल्यावरून सहज ध्यानांत येईल.

२. वरील अश्लील वाक्याबद्दल आमचे वाचक आह्मांस नांव ठेवतील; पण तें आमच्या सोंवळ्या परिव्राजकाचार्यांच्या वाणीनें पवित्र झालेल्या अनेक वाक्यसमुदायांतलें एक आहे, हें त्यांनीं ध्यानांत आणावें. शिवाय असल्या रूपानें स्वामींची वाग्देवता प्रगट झाली असतां त्यांचे बडे बडे शिष्य हास्यरसांत एकमेकावर प्रेमानें अगदीं कोसळून जात हेंही पुष्कळांस आठवत असेल!

३. खऱ्या धर्मोपदेशकाचे ठायीं कोणकोणते गुण अपेक्षित असतात त्याचें शानदार वर्णन

(पुढें चालू)

सरांनीं साऱ्या आर्यभूमीस जे नवे धर्मगुरु ह्मणून पसंत करून दिले त्यांच्या ठायीं तर वरील

---

गोल्ड्स्मिथ्च्या 'डेझर्टेड् व्हिलेज' काव्यांत* व त्याहीपेक्षां कौपर्च्या 'टाइमपीस'मध्यें† आहे. हीं दोन्ही वाचलीं असतां दयानंदजींचें पुण्यास कांहीं महिने जें आडंबर ( अवडंबर ? सं० ) माजलें होतें त्याचा चमत्कार थोड्यांसच वाटल्याविना राहील !

* खालील उतारा पाहा—

"Unpractised he to fawn, or seek for power,
By doctrine fashioned to the varying hour;
Far other aims his heart had learnt to prize,
More skilled to raise the wretched than to rise.
.........His pity gave ere charity began.
.........Truth from his face prevailed with double sway,
And fools who came to scoff, remained to pray.
.........His ready smile a parent's warmth expressed;
Their welfare pleased him, and their cares distressed:
To them his heart, his love, his griefs were given,
But all his serious thoughts had rest in heaven.
As some tall cliff that lifts its awful form,
Swells from the vale, and midway leaves the storm,
Though round its breast the rolling clouds are spread,
Eternal sunshine settles on its head."

Oliver Goldsmith ( 1728–1774 )—एका गरीब आयरिश् पाद्याचा मुलगा. पुष्कळ खटपटी करून व संकटें भोगून लंडन्ला आल्यावर यानें वाङ्मयसेवेला पूर्णपणें वाहून घेतलें. पुढें जॉन्सन्ची व याची खूप मैत्री जमली; रेनॉल्ड्स्, बर्क वगैरे तत्कालीन विख्यात गृहस्थांनीं याची मोठी प्रशंसा केली. तथापि हा जन्मदरिद्री व सदा ऋणकरीच राहिला.—'Vicar of Wakefield', 'The Traveller', 'The Deserted Village' व 'She Stoops to Conquer' हे याचे प्रसिद्ध ग्रंथ होत. 'सम्पादक'

† 'The Task' नामक काव्याच्या दुसऱ्या भागाला ( Book II ) 'टाइमपीस' असें नांव आहे. पुढील उतारा ( ओळी ३९९–४०७ ) पाहा:—

"I would express him simple, grave, sincere;
In doctrine uncorrupt; in language plain;
And plain in manner; decent, solemn, chaste,
And natural in gesture; much impressed
Himself, as conscious of his awful charge,
And anxious mainly that the flock he feeds
May feel it too; affectionate in look,
And tender in address, as well becomes
A messanger of grace to guilty men."

William Cowper ( 1731–1800 ) याची 'टास्क्' (Task) ही अठराव्या शतकांतील उत्तमपैकीं एक कविता आहे. 'रेस्टोरेशन्'नंतर तिसऱ्या जॉर्जपासून तीनशें पौंडांचें पेन्शन् यास मिळालें. 'सम्पादक'

लक्षणांचा लेशही वसत नव्हता. उलटा त्या सर्वांचा विरोध मात्र सर्वांस त्यांचे ठिकाणीं स्पष्ट दिसून येत असे. त्यांचा वादविवाद ह्मणजे निवळ दांडगाई, धर्मव्याख्यान ह्मणजे फाल्गुन मासचें वक्तृत्व, शंकासमाधान ह्मणजे 'शेषं कोपेन पूरयेत्', आणि धर्माचें परम तत्त्व ह्मणजे निरंतर आकंठ अपूपसेवन व आर्यधर्मतत्त्वाप्रमाणें परम स्वच्छ व मधुर अशा गोरसाचें सांजसकाळ यथेष्टमनेंकरून प्राशन![1]

**इंदुप्रकाश**—या पत्राच्या २६ जूनच्या अंकांत आमच्या पुस्तकाच्या २७ व्या अंकावर टीका आली आहे. ही सदरील पत्रकर्त्यांची नसून रा॰ विनायक कोंडदेव ओक यांच्या लेखांपैकीं कोणीं लिहिली आहे. ही गोष्ट जरी सदहू पत्रांत प्रगट केलेली नाहीं, व आपल्या मुख्य मुद्द्यावरच विशेष भर न दाखवतां आमच्या पुस्तकावर एकंदरीनें चर्चा करण्याचा जरी लिहिणारानें आव घातला आहे, तरी प्रस्तुत लेखाची प्रवृत्ति कशामुळें झाली हें कोणाच्याही सहज लक्षांत येणारें आहे. वरील २७ व्या अंकांत* इंग्रेजी भाषेच्या संसर्गानें मराठींत नवे सुरू झालेले प्रकार जे कादंबरी, इतिहास वगैरे त्यांविषयीं विवेचन करीत असतां माजी बाळ गंगाधर शास्त्री जांभेकर व रा॰ विनायक कोंडदेव ओक यांनीं मराठींत रचलेल्या इतिहासांवर कांहीं विचार प्रदर्शित केले आहेत. या प्रसंगीं रा॰ ओक यांच्या 'हिंदुस्थानकथारसा' वर व 'शिपायांच्या बंडाचा इतिहास' या नुकत्या प्रसिद्ध झालेल्या पुस्तकावर जी आह्मीं विषयानुसार टिपेंत थोडीशी टीका केली आहे ती सदहू लिहिणारास न आवडून त्यानें आपल्या मतें आमच्या पुस्तकावर यथेच्छ सूड उगवून

---

१. वर जें पंडित दयानंद सरस्वतींचें वर्णन केलें आहे व त्यांच्या गुणांचें मान काढलें आहे, तें पाहून कित्येकांस कदाचित् संशय येइल कीं, त्यांचीं धर्मसंबंधीं मतें आह्मांस ग्राह्य नसल्यामुळें आह्मीं केवळ द्वेषबुद्धीनें त्यांचा गुण बिलकुल न घेतां त्यांवर वृथादूषणांचा वर्षाव केला आहे, असें कोणास वाटल्यास त्यानें येथील इतर लोकांचा अभिप्राय घ्यावा, किंवा मुंबईच्या प्रार्थनासमाजीय वगैरे लोकांचें सदहू पंडितांविषयीं काय मत आहे तें पाहावें. फार तर काय, पण स्वामींच्या मुख्य पुरस्कर्त्यांचेंही हृद्गत कोणीं काढल्यास, किंवा तें ज्यांस नेहेमीच्या सहवासानें माहीत आहे त्यांस विचारल्यास, आमच्या वर्णनाची यथार्थता त्यास भासल्यावांचून राहणार नाहीं. सारांश, आमच्या वाचकांनीं हें पक्कें ध्यानांत ठेवावें कीं, जसें नाटकाच्या पडद्याच्या आंत पात्रांचें एक रूप असतें व बाहेरच्या प्रेक्षकांस दिसायाचें एक असतें, तसाच प्रकार सामान्यतः जगांत आढळतो. यास्तव रंगभूमीवरील सौन्दर्यावरून व बोलण्याचालण्याच्या थाटावरुन कोणाच्या वास्तव स्वरूपाची परीक्षा करूं जाऊं नये, दोहोंत कधीं कधीं अतिशयित अंतर दृष्टीस पडतें! तसेंच कोणास वरील जगद्गुरूंविषयींचा मजकूर जर निरर्थक वाटेल तर त्यानें असें समजावें कीं लोकभ्रमाचें निरसन करणें हें लहान उपयोगाचें काम नव्हे. फार तर काय, पण सत्यासत्यतेची परीक्षा न करतां लोकांनीं केवळ अंधपरंपरान्यायानें आपला विश्वास कोणावर टाकला असतां केवढा अनर्थ होण्याचा संभव असतो, याची प्रचीति नुकतीच एका प्रसिद्ध लोककल्याणेच्छूच्या व वक्त्याच्या आचरणावरून आमच्या लोकांस आलीच आहे. तेव्हां मेंढ्यांच्या कळपांतून वेषधारी लांडग्यास निवडून काढून अनर्थांचें मूळ बंद करणें ही क्षुल्लक गोष्ट समजतां उपयोगीं नाहीं!

'सम्पादक'

* पृष्ठें १४१–१४२ पाहा.

घेतला आहे. आपल्या मित्राचा बचाव करण्याचा मूळ उद्देश असतां तेवढ्यातच हात आटपून न घेऊन, आमचे शत्रु ते आपले मित्र व आमचे मित्र ते आपले शत्रु अशी दृढ भावना करून त्यानें पहिल्यांवर आवरण घालण्याचा व दुसऱ्यांवर रगडून प्रहार करण्याचा यत्न केला आहे. ज्याची मित्रनिष्ठा येवढी अनावर व क्रोधावेश येवढा उच्छृंखल त्यास वरील वृत्तींबद्दल दुसऱ्यास नांव ठेवण्यास मोठासा अधिकार आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

प्रस्तुत लिहिणारानें सदरील पत्रांत आपल्या ठायीं जरी अतोनात विद्वत्ता कल्पिली आहे व मोठ्या धार्मिकपणाचा आव घातला आहे, तसेंच त्यास हल्लीं चालू असणारी मासिक पुस्तकें सरसकट भिकार वाटून त्यांतील 'अग्रेसर' ही केवळ भाषेच्या संबंधानेंच त्यास बरें वाटतें, बाकी त्यांतील मजकूर त्यास अप्रयोजक वाटतो,—तरी सदरील लेखावरून पाहतां त्यास ग्रंथपरीक्षणाचें स्वरूप अद्याप चांगलें कळत नाहीं, व जें लिहिणें तें विचारपूर्वक लिहिण्यास तो अद्याप शिकला नाहीं, असें ह्मणणें प्राप्त आहे. हें आमचें प्रतिदूषण आमच्या महाविद्वान् आक्षेपकांस बहुधा 'पोकळ व कोतें वाटून त्यास पोट दुखेपर्यंत हसूं मात्र येईल.' पण तसें करण्यापूर्वीं त्यानें पुढील मजकूर वाचावा अशी त्यास आमची विनंति आहे. तो वाचल्याच्या उपरांतही त्याची वरील रंगेल वृत्ति जर तशीच कायम राहिली, तर या गोष्टीबद्दल त्याची मोठी तारीफ करणें रास्त होईल.

आमच्या प्रतिपक्ष्याचा आह्मांवर पहिला मोठा आरोप हा आहे कीं, निःपक्षपातपणाचा जरी आह्मीं पहिल्यापासून मोठा बाणा बाळगीत आहों, तरी तो गुण आमच्या पुस्तकांत बिलकुल दृष्टीस पडतें नसून त्याच्या विरुद्ध प्रकार मात्र चोहोंकडे दिसण्यांत येतो. तो असा कीं, आमचे मित्र असतील त्यांच्याविषयीं मात्र चांगला अनुकूल अभिप्राय देऊन इतर कोणीही असला तरी त्यावर आमची हटकून करडी नजर असावयाची. या सामान्य सिद्धांताच्या समर्थनार्थ त्यानें दोन उदाहरणें वाचकांस सादर केलीं आहेत. पहिला प्रकार 'टेंपेस्ट्' नाटकाचा व 'गंगावर्णना' काव्याचा; व दुसरा त्यांचे मित्र मल्हारनिल्हे ओक यांनीं रचलेल्या पूर्वोक्त दोन ग्रंथांचा. पहिल्या दोहोंवर 'गुळमुळीत टीका' येण्याचें कारण 'आमचे मित्र प्रस्तुत भाषांतरकर्ते' व 'आमचे विद्यालयबंधु' हें होय; व दुसऱ्या दोहोंवर लेखणीचा कडाका झडण्याचें कारण रा० ओक यांचें आमच्याशीं अपरिचितत्व हें होय. आतां मासिक पुस्तकाच्या मुख्य गुणास व उपयुक्ततेस विघातक असें जें हें पहिलें मोठें दूषण तें आह्मांवर कितपत लागू होतें याचा विचार करूं

रा० ओक यांचे पक्षकार आरंभींच्या व्याख्यानाच्या शेवटीं आह्मांस पुढील उपदेश करतात—

"कोणत्याही गोष्टीचें खरें स्वरूप काय आहे हें समजण्यास पूर्वगतविकारविरहित मनाची स्थिति असली पाहिजे. नाहीं तर न्यायाधीशाचे हातून प्रमाद होण्याचा संभव आहे. हे 'आमचे विद्यालयबंधु', ते 'आमचे मित्र प्रस्तुत भाषांतरकर्ते' इत्यादि भ्रांतिकारक विकारांचा संसर्ग ज्याचे मनांत झाला त्याचे हातून प्रांजल बुद्धीनें न्यायाधीशाचें काम चोख होण्याची मुष्कील आहे."

या एका उताऱ्यावरून प्रस्तुत लिहिणाराचीं मतें किती यथार्थ आहेत हें सहज दिसणार आहे; व ज्यास आमच्या पुस्तकाच्या सत्तावीस अंकांत भाषाशैलीखेरीज विशेष म्हणण्यासारखें कांहीं दिसलें नाहीं, येवढ्या थोर विद्वानाचे विचार किती खोल आहेत तेंही व्यक्त होणार आहे. एकूण आमच्या पत्रकर्त्यांच्या मताप्रमाणें टीका करणारानें आपल्या मित्रत्वाचें वगैरे नातें प्रगट करणें हें अत्यंत दोषरूप होय; व तें करतांक्षणींच त्याच्या मनापासून सत्यता व निःपक्षपातबुद्धि या एकदम भ्रंश पावल्याच असें त्यानें समजावें ! 'मित्र' व 'बंधु' या अक्षरद्वयांच्या अंगीं येवढा भ्रांतिकारक धर्म आहे काय ? हें जाणूनच बहुधां आमच्या चतुर आक्षेपकानें प्रस्तुत लेखाचें बीज जी मित्रभक्ति तिचा कोठें मागमूसही दृष्टीस पडूं दिला नाहीं. पण ती वृत्ति तोंडावाटे प्रगट न केली तरी कृतींत अगदीं पूर्णपणें प्रगट झाली आहे हें त्यास कसें कळून आलें नाहीं कोण जाणे ! आमची तर याविषयीं अशी समजूत आहे कीं, जो न्यायाधीश आपला मित्रत्वादि संबंध तोंडानें स्पष्टपणें बोलून दाखवतो, पण न्यायाचे तराजू उचलतांना जी समबुद्धिरूप कांट्यास आपल्याकडून लवमात्रही इकडचा इकडे ढळवीत नाहीं तो खरा; पण जो न्यायासनावर चढला कीं दुष्यंत राजाप्रमाणें जसा कांहीं त्या गांवचाच नाहीं असें बळानें ढोंग मात्र करतो, आणि एकंदर खटला चालवण्यांत व शेवटला फैसला देण्यांत आपली मित्रता गुप्तरूपें प्रगट करीत असतो, तो प्रामाणिक नव्हे व प्रांजळ बुद्धीचाही नव्हे !

आतां आमच्या 'मित्रां' चें 'टेंपेस्ट्' नाटक व 'विद्यालयबंधूं' चें 'गंगावर्णना' काव्य यांविषयीं जर पाहिलें तर त्यांची तारीफ करतांना आह्मीं पक्षपात केला आहे असें आह्मांस अद्याप वाटत नाहीं. वरील दोन्ही ग्रंथ कोणींही तिऱ्हाइतपणानें वाचले तरी त्यांची योग्यता त्यास भासल्यावांचून खास राहावयाची नाहीं असें आह्मांस वाटतें; व याविषयीं प्रमाण पाहिजे असल्यास आमचे बंधु 'विविधज्ञानविस्तार' व 'दंभहारक' यांत चांगलें आढळणार आहे. पहिल्याचा गेला मे महिन्याचा अंक पाहिला असतां आमची 'टेंपेस्ट्' नाटकांवरील टीका किती यथार्थ आहे हें कळून येईल; त्याप्रमाणें सदहू पुस्तकाचा गेल्या जुलै महिन्याचा अंक व 'दंभहारका'चा सप्तंबर महिन्याचा अंक हे दोन्ही पाहिले असतां 'गंगावर्णने' वरचा आमचा अभिप्राय चांगला असण्याचें कारणही सहज समजेल. आतां क्वचित् स्थलीं वरील पुस्तककर्त्यांचें व आमचें मत भिन्न भिन्न आढळेल, व विवेचनाचा विस्तारही कमी ज्यास्त असेल; पण निदानपक्षीं येवढी खात्री कोणाचीही झाल्यावांचून राहणार नाहीं, कीं वरील नाटकाच्या व काव्याच्या उत्कृष्टत्वाचें कारण 'आमचे मित्र प्रस्तुत भाषांतरकर्ते' व 'आमचे विद्यालयबंधु' याहून पुष्कळ 'सबळ', रास्त व सयुक्तिक आहे !

आतां दुसऱ्या पक्षीं रा० ओक यांचे वरील दोन इतिहासग्रंथ घ्या. त्यांच्या संबंधानें आह्मीं जें लिहिलें आहे तें आमच्या प्रतिपक्ष्यासही '"अगदीं अमान्य आहे असें नाहीं.' तरी तोच पुढें वरील आपली संमति विसरल्यासारखें करून पुनः आपण लिहितो कीं, 'वरील आरोप जो आणला आहे तो सिद्ध करण्यास त्यांस (आह्मांस) जड जाईल.'

या दोन अभिप्रायांचा मेळ सदर्हू पत्रकार कसा घालील तो घालो ! आतां आमच्या वरील मतावर त्यांनें दोन दोष आणले आहेत ते असे आहेत कीं, 'मनोरमा' नाटकाविषयीं टीप देतांना त्याच्या भाषापद्धतीविषयींच केवळ आह्मीं विचार केला आहे, व वरील इतिहासाविषयीं मात्र तसें न करतां त्यांतील विचारांकडे लक्ष दिलें आहे. तसेंच ह्या प्रकारच्या उल्लेखाबद्दल रा० ओक यांस आह्मीं टोंचून लिहिलें आहे तसाच रा० चिंतामणि पेटकर यांच्या 'गंगावर्णनें' त आढळतो. पण असें असूनही त्यांस मात्र आह्मीं बिलकुल दोष दिला नाहीं. आतां हा जो आमच्या प्रतिपक्ष्यास येवढा पक्षपाताचा प्रकार दिसत आहे त्याची खरी स्थिति अशी आहे कीं, वरील 'मनोरमा' नाटकाच्या भाषापद्धतीविषयीं आह्मीं कांहींच लिहिलें नाहीं. त्याच्या ग्रंथरचनेच्या संबंधानें ह्मणजे संविधानक, पात्रांचीं भाषणें वगैरेविषयींच काय तें लिहिलें आहे. आणि या रचनेवरही जो ठळठळीत दोष सर्वांच्या नजरेस येणारा आहे, कीं जो 'विविधज्ञानविस्तारा' तील सदर्हू टिपेंत सांगितलेल्या अंकांत मुख्यत्वेंकरून निर्दिष्ट केला आहे, तोही आह्मीं स्पष्टपणें दाखवलाच* आहे. तेव्हां एका ठिकाणीं एक केलें आहे व दुसऱ्या ठिकाणीं दुसरें केलें आहे हा दोष निर्मूल होय. दुसरा आक्षेप 'गंगावर्णनें' तील उताऱ्यावरून जो केला आहे तोही वरील पक्षपात-दोषास फारशी बळकटी आणीत नाहीं. कारण एक तर सदरील काव्यावर 'टेंपेस्ट्' नाटकाच्या प्रमाणें आह्मीं आपला अभिप्राय पूर्णपणें दिला आहे असें नाहीं; सदर्हू टिपेंत‡ इतर तीन आधुनिक काव्यांप्रमाणें आमच्या वाचकांच्या माहितीकरतां मुख्यतः त्याचा निर्देश केला आहे; व एकंदरीनें तीं कशीं आहेत हें थोडक्यांत सुचवलें आहे. शिवाय इतिहासाचा उत्तमपणा त्यांतील मजकुराच्या खरेपणावर जितका असतो तितका काव्याचा असत नाहीं व कवित्वाची पारख वरील कारागिरीवरूनच मुख्यतः करायाची असून मूळ द्रव्याची मातब्बरी रसज्ञ तादृश धरीत नसतात, हेंही 'विस्तीर्ण विद्याधना' नें संपन्न असणाऱ्या अशा वरील पत्रकारांनीं ध्यानांत कसें आणलें नाहीं कोण जाणे !

याप्रमाणें सदर्हू पत्रांतील मुख्य दूषणावर आह्मीं आपले विचार वाचकांस कळवले. आतां याशिवाय दुसरीं जीं कांहीं आहेत त्यांच्या यथार्थत्वाचें परीक्षण करूं.

रा० ओक यांच्या 'कथारसा' वर व 'बंडाच्या इतिहासा' वर जी टीका आह्मीं केली आहे, तिजवर आमच्या आक्षेपकाचे दोन दोष असे आहेत कीं, "मोघम रीतीनें न लिहितां अमुक अमुक स्थळीं सत्याचा अपलाप करून ग्रंथकारानें आपली राजनिष्ठा दर्शविली आहे,असे आह्मीं दाखवायाचें होतें;व" शिवाय दुसऱ्यास टोंचण्यासारखे व निंदाव्यंजक असे लेख लिहिणें हें एकंदरीनें अश्लाघ्यच होय." आतां मोघम रीतींची टीका केल्याचा पहिला जो दोष आमच्या पत्रकारास वाटतो, याचें कारण कोणासही क्षणमात्र विचार करतांच कळणारें आहे कीं प्रत्येक गोष्टीचें विधान केल्याबरोबर लगेच त्याबद्दलची

---

* पृष्ठ १४३ व टीप पाहा. 'सम्पादक'

‡ पृष्ठ १४० टीप २. 'सम्पादक'

कारणें देणें केवळ अशक्य होय. तसें करण्याचें कोणीं मनांत आणल्यास एक वाक्यही त्यास पुरतें लिहितां येणार नाहीं. यास्तव लिहिणारांची व बोलणारांचीही चाल पुष्कळ गोष्टी वाचकांस व श्रोत्यांस माहीत आहेत असें घेऊन चालायाची असते. तसेंच केव्हां केव्हां सांगितलेल्या गोष्टींचें प्रमाण अल्पायासानें सांपडणार आहे असें समजूनही तें ते देत नसतात. फार लांब कशाला, आमच्या सुज्ञ पत्रकर्त्यांसही आमच्या पुस्तकावर आणलेल्या प्रत्येक दूषणाचें समर्थन जर कोणीं विचारलें, तर तो काय उत्तर देईल ? त्यास आमच्या पुस्तकावरच पुनः हवाला द्यावा लागेल कीं नाहीं ? तर याप्रमाणें सदहू टिपेंतल्या दूषणांचा खरेखोटेपणा पाहण्याची ज्यास इच्छा होईल त्यानें तींत निर्दिष्ट केलेला 'हिंदुस्थानकथारसां' तील भाग व तेथें सांगितलेला 'बंडाचा इतिहास' पाहिला असतां तेव्हांच खात्री होणार आहे.

दुसरा दोष असा आहे कीं, सदरील पत्रकर्त्यांच्या मित्रास टोंचण्यासारखा मजकूर आह्मीं लिहिला. असें करणें हें त्याच्या मतें हलकटपणाचें काम होय. या ह्मणण्याचा अर्थ जर येवढाच असेल कीं ग्रंथकाराच्या चित्तास विषाद वाटेल असा मजकूर मासिक पुस्तकांत येऊं नये, कारण कोणासही दुःख देणें हें सज्जनपणाचें काम नव्हे; तर आमच्या प्रतिपक्ष्यास मासिक पुस्तकांचा उपयोग मुळींच समजत नाहीं व ग्रंथपरीक्षणाचें तत्त्वही त्यास कळत नाहीं असें ह्मणणें प्राप्त आहे. टीकाकर्त्याचें काम मागें पंधराव्या अंकांत सांगितल्याप्रमाणें* न्यायाधीशाच्या सारखें होय. यास्तव न्यायाधीशाच्या आसनामागें फटके देण्याचा चाबूक, खोडा, लोहशृंखला, किंबहुना वधस्तंभ, हें सर्व साहित्य जसें सदैव सिद्ध असतें; त्याप्रमाणेंच टीकाकारास दुर्मतांच्या निरसनार्थ कोठें उपहास, कोठें युक्तिपूर्वक खंडन वगैरे प्रकार योजावे लागतात. आतां टीकाकर्त्याच्या व न्यायाधीशाच्या कामांत एके रीतीनें मात्र मोठें अंतर आहे खरें; तें असें कीं, न्यायाधीशाचें कर्तव्य ह्मटलें ह्मणजे दुष्टांचें शासन येवढेंच होय. सज्जनांची व थोरांची संभावना करण्याचें व त्यांची योग्यता वाढवण्याचें श्रेय त्यास घेतां येत नाहीं. पण तेंही सिंहासनस्थ राजाप्रमाणें टीकाकारास घेतां येतें. सारांश, एका संस्कृत श्लोकांत राजास बागवानाची जी उपमा दिली आहे तीच भाषेचें हित करूं इच्छिणाऱ्या पुस्तककर्त्यांसही लावली असतां चालणार आहे.[1] ह्मणजे चांगल्या झाडांच्या रक्षणाची नीट तजवीज करून कांटेरी वगैरे झाडें किंवा रानगवत हीं दूर करणें, किंबहुना प्रसंगविशेषीं

* पृष्ठें ३६०—३६१ पाहा. 'सम्पादक'

१. वरील श्लोक हा होय—

उत्खातान् प्रतिरोपयन् कुसुमितांश्चिन्वन् शिशून्† वर्धयन् ।
प्रोत्तुंगान्§ नमयन् नतान् समुदयन् विश्लेषयन् संहतान् ॥
तीव्रान्$ कंटकिनो बहिर्नियमयन्‡ ग्लानान् मुहुः सेचयन् ।
मालाकार इव प्रयोगनिपुणो राजा चिरं नन्दतु¶ ॥

† लघून् § अत्युच्चान् $ क्षुद्रान् ‡ बहिर्निरसयन् म्लानान् ¶ नन्दति असेहि पाठभेद आहेत. 'सम्पादक'

चांगल्या झाडांसही खची करणें, हें जसें उद्याननियुक्त पुरुषाचें कर्तव्य होय; त्याप्रमाणेंच लोकाश्रयाच्या बळावर भाषोत्कर्षास साहाय्य करण्याचें काम ज्यांनीं पत्करलें त्यांसही ग्रंथांच्या गुणावगुणांविषयीं विवेचन करणें अगदीं जरूर आहे.

पण रा. ओक यांच्या पक्षकाराचा आक्षेप वरच्याप्रमाणें केवळ सामान्यतः नसून त्यास जर असें वाटत असेल, कीं वरील ग्रंथकाराची ख्याति आह्मांस सहन न होऊन त्यास बळेंच कांहीं तरी दूषण लावावें अशा बुद्धीनें आह्मी सदरील दोन इतिहासग्रंथांवर टीका केली, तर या आरोपाचा शुष्कपणा वादविषयक अंकावरूनच कोणासही सहज दिसणार आहे. ज्या ग्रंथकाराची उत्तम भाषापद्धतीच्या संबंधानें आरंभीं प्रधानत्वेंकरून गणना केली आहे, व इतर अनेक ठिकाणींही ज्याच्या ग्रंथांविषयीं उल्लेख करून सदरील टिपेच्या पृष्ठांतही ज्याची प्रशंसा केलेली आढळते, त्याच्याविषयीं एके ठिकाणींच मात्र द्वेषबुद्धि किंवा मत्सर ही वृत्ति प्रगट झाली आहे असें ह्मणण्यांत काय जीव आहे ? जो मजकूर ग्रंथकर्त्याच्या मित्रासही 'अगदीं अमान्य आहे असें नाहीं' असें त्यास उघडपणें कबूल करणें भाग पडतें, त्याविषयीं तिन्हाइतानें मोठासा अनुकूल अभिप्राय प्रगट न केल्यास नवल कसचें ! आह्मांस खचीत वाटतें कीं, सदरील दोन लेख कोणापुढेंही जरी ठेवले तरी ते वाचून त्यां- विषयीं आमची जी बुद्धि झाली ती हल्लींच्या काळीं बहुतेकांची होईल. त्याप्रमाणेंच के, रसैल यांसारख्या सर्वमान्य इतिहासकारांचे विचार जर आमच्या मराठी इतिहासकर्त्यानें आपल्या देशबंधूंस प्रांजलपणें सादर केले असते, आणि ज्यांस 'इतिहासाची गोडी लावण्या- करतां व ज्यांचें भ्रांतिमूलक मत घालवून बंडाचा खरा खरा वृत्तांत' कळवण्याकरतां त्यानें हातांत लेखणी धरली त्यांच्या आश्रयावरच आपल्या श्रमांची कृतार्थता मानण्याचा जर तो संकल्प करता तर प्रस्तुत पुस्तक आहे त्यापेक्षां फार निराळ्या तऱ्हेचें निपजलें असतें याविषयीं आह्मांस अगदीं संदेह वाटत नाहीं !

याप्रमाणें 'इंदुप्रकाशा' तील पत्रकारानें आमच्या लेखावर जीं जीं दूषणें दिलीं त्यांचा निरास झाला. आतां वरच्याखेरीज इतर जें पांडित्य त्यानें केलें आहे त्याविषयीं विशेष चर्चा करण्याची तादृश अवश्यकता नाहीं. आमची लेखणी वेळोवेळीं घसरतांना पाहून व विचारसरणींत विसंगतता पाहून त्यास जर वाईट वाटत असेल, तर त्यास आमचा काय उपाय आहे ? आमच्या अल्पबुद्धीनें आह्मांस जें सयुक्तिक व संगतवार दिसतें तें आह्मी लिहितों; तें आमच्या प्रतिपक्ष्यासारख्या जाडी विद्वानांस व केंसभरही इकडे तिकडे न होतां ज्याची लेखणी विचारसरणीवरून आगगाडीप्रमाणें नीट धांव घेण्यास शिकली असेल अशांस अन्यथा वाटत असेल हें उघडच आहे. आमच्या प्रस्तुतच्या पत्रकर्त्याप्रमाणें जे अगोदरच विद्याधनमंडित होऊन बसले असतील त्यांच्याकरतां आमचें पुस्तक चाललें आहे असें नाहीं; तर त्यांच्याहून ज्ञानसंपन्नतेंत ज्यांची पायरी फारच कमी अशा अज्ञान व साध्याभोळ्या लोकांस कांहीं उपयोग व्हावा येवढाच त्याचा हेतु आहे. तो कांहीं अंशीं सफळ झाला असतां तेवढेंही आह्मांस बस आहे. अशा लोकांस आमच्या लेखणीचें भरकटणें केवळ अनिष्ट वाटत असेल असें आह्मी समजत नाहीं. तर मुख्य विषयाच्या अनुरोधानें

अवांतर माहिती टिपांतून देण्याचा जो आमचा पूर्वागत पाठ आहे तो त्यांस बराच पसंत असेल असें समजतों. याप्रमाणेंच आमच्या आक्षेपकांनीं आह्मांस जें मेहेरबानीनें कळवलें आहे, कीं “ विशेषतः वर्तमानकाळच्या प्रसिद्ध व्यक्तींस, ग्रंथकारांस आणि सभादिकांस अनुलक्षून लिहिलेले (आमचे) लेख अविचार, साहस, चटोरपणा, दर्पोक्ति, आणि अहंमन्यता या दोषांस पात्र असतात ”—त्यावरही आमचें उत्तर वरीलच होय. विधवांच्या दुःखपरिहारार्थ जो आमच्या देशहितेच्छूंचा उद्योग सुरू झाला होता तो अजूनही जारी चालला असून हजारों गतभर्तृका पुनः संसारसुखाचा अनुभव घेऊं लागल्या आहेत, आमच्या देशी मागांतून खंडोगणती कापड दरवर्षी तयार होऊं लागून आमचीं स्वदेशी दुकानें विलायतच्या व्यापाऱ्यांस केवळ हृदयशल्यें होऊन बसलीं आहेत, आमच्या प्रार्थनासमाजाचा अत्यंत उत्कर्ष होऊन त्यांतील प्रत्येक जण केवळ धर्ममूर्ति बनून राहिला आहे, व आर्यसमाजाचा तर जिकडे तिकडे प्रसार होऊं लागून परमहंसांच्यो शुभ्र यशानें शुद्ध खिस्तादि मंडळीही लोपून गेली, (आहे ? सं०) इत्यादि प्रकार आज चोहोंकडे कोणाच्या दिव्य दृष्टीस दिसत असल्यास न जाणो; आमच्या कोत्या नजरेच्या आटोक्यांत तर बरच्यापैकीं कांहींही येत नाहीं याचें कारण काय असेल तें असो! तरी निदान आह्मीं येवढें केलें आहे कीं, आमच्या बुद्धीस जें जें वाटलें तें तें आह्मीं आमच्या वाचकांस स्पष्टपणें कळवलें आहे. दिसतें एक आणि सांगितलें एक असा द्विधा भाव केल्याचा तरी दोष आह्मीं आपल्या माथीं घेतला नाहीं. आतां अशा स्पष्टोक्तीमुळें आमच्यांतल्या कित्येक महाजनांस आपला बुद्ध्या मानभंग केलासा वाटेल, व त्यांच्या भाविक भक्तवर्गास आमचें वर्तन अविचाराचें, साहसाचें वगैरे वाटेल यांत संशय नाहीं. पण ज्याप्रमाणें आपले अंतस्थ रोग झांकून ठेवण्यांत कांहीं अर्थ नाहीं इतकेंच नाहीं, तर तसें करणें हें उलटें अत्यंत अनर्थावह होय; त्याप्रमाणेंच आमच्या लोकांत जे कित्येक महादोष आहेत त्यांवर पांघरूण न घालतां त्यांचें ज्ञान कोणीं सर्वांस करून दिलें असतां तो पिशुनत्वाच्या दोषास पात्र होतो, असें आह्मांस मुळींच वाटत नाहीं. बाह्य स्वरूपास भुलून जाणें टाकून देऊन लोक जसजसे मार्मिक व तत्त्वशोधक होतील, व त्यांच्या ठायीं सत्यप्रीति जसजशी बलवत्तर होत जाईल, तसतशी वरील दोषाविष्करणाची योग्यता व उपयोग हीं त्यांस विशेष कळूं लागतील असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे.

एलिफास्—या सहीचें [1]पत्र ‘पॉवे गॅझिट्’नामक इंग्रेजी वर्तमानपत्राच्या ३ आक्टोबरच्या अंकांत आलें होतें. या पत्राच्या मोहोऱ्यावर ‘ एतद्देशीय वर्तमानपत्रें व कारस्थानी ब्राह्मण लोक ’[2] अशीं अमोलिक अक्षरें झळकत होतीं. यावरून आंतील मजकुराची आमच्या मराठी वाचकांस सहज कल्पना होईल. मराठी भाषेंतील पुस्तकावर ‘ गॅझिट् ’ सारख्या पत्रांत चर्चा हें मोठें अपूर्व असल्यामुळें सदरील लेखाचा

१. ता. २९ सप्टेंबर १८७६, या तारखेचें. ‘सम्पादक’
२. ‘ The Native Press and Brahmin Intriguers. ‘सम्पादक’

गवगवा कांहीं वेळ चोहोंकडे फार झाला. दोन वर्षांपूर्वी आमचे खिस्ती बंधु वृद्ध 'ज्ञानोदय' यांनीं आमच्या पुस्तकावर आपलें गंजलेलें हत्यार उचलून जशी चोहोंकडे गडबड करून दिली होती,[१] त्याहीपेक्षां वरील 'एलिफास्' साहेबांची गंभीर गर्जना सर्वांस विशेष भयप्रद झाली. पहिल्या खेपेस आमच्या मित्रांस धाक पडून खिस्तभक्तांस जसा आनंद झाला होता, कीं आठव्या अंकाशींच आमच्या पुस्तकाची अखेर होते; त्याप्रमाणेंच पुनः तिसावा हाच त्याचा शेवटचा अंक असें वाटूं लागल्याचा समय आला.पण दैवयोगेंकरून तें सर्व काहूर निघून जाऊन आमच्या मालेस त्यापासून यत्किंचितही अपाय झाला नाहीं. एतद्देशीय वर्तमानपत्रांपैकीं कित्येकांनीं आमचा पक्ष उचलून सार्‍या इंग्रेजी पत्रांतही अग्रगण्य जें 'टाइम्स् ऑफ् इंडिया' त्याचीही आह्मांस अनुकूलता दृष्टीस पडली. 'ब्राह्मण' या सहीच्या एका पत्रांत तर 'एलिफास्' नें एतद्देशीयांवर व विशेषतः ब्राह्मणांवर जीं अज्ञानमूलक व दुराग्रहपूर्वक दूषणें दिलीं होतीं त्यांचें सर्वथा निरसन केलें होतें. तसेंच येथील 'ज्ञानप्रकाशां' त[२] वरील पत्रकाराच्या मुद्द्यांचा शुष्कपणा दाखवून प्रस्तुत पुस्तकावर केलेल्या टीकेचें खंडन आह्मीं स्वतः केलें होतें तेंही पुष्कळांस बहुधां माहीत असेलच.

आतां ज्या पत्रावरून येवढा ग्रंथ माजला व सर्वांस येवढी धास्ती पडली त्यांत येवढें लिहिलें तरी काय होतें हें समजण्याची आमच्या वाचकांस उत्सुकता उत्पन्न होईल; यास्तव त्यांतील सारांश येथें देतों. प्रथमतः आमचें पुस्तक दोन तीन महिने मागें पडलें आहे हें लिहून नंतर तिसाव्या अंकांतील विषय काय आहे, हें 'एलिफास्' साहेबांनीं आपल्या वाचकांस कळवलें आहे. याप्रमाणें उपोद्घात करून नंतर सदरील अंकांतील पांच सहा ठिकाणचे वेंचे भाषांतररूपानें आपल्या गौरवर्ण व ज्ञानसंपन्न देशबंधूंस सादर केले आहेत. यांपैकीं चार 'रत्नें'[३] तर खुद्द नेक नामदार गव्हर्नर् साहेब यांसच आमच्या प्रिय पाश्चात्य बंधूनें नजर केलीं आहेत. नंतर आह्मी पुण्याच्या एका कोपऱ्यांत लपून जे आहों तें नीट न वाटून, एतद्देशीयांस परम दुर्लभ जो पाश्चात्य परिचय तो सदहू साहेबांनीं आमची जात, हुद्दा वगैरेविषयीं टिमकी वाजवून आह्मांस अनायासें घडवून दिला आहे. आणि सरतेशेवटीं ब्राह्मण

१. पृष्ठ १८२ व टीप पाहा. २. सोमवार ता. ९ आक्टोबर १८७६ च्या अंकांत. 'सम्पादक'

३. प्रास्ताविकः—युरोपियनांचें इकडील भाषांविषयीं अज्ञान, पृष्ठ ५८४ ओळ शेवटची व पृष्ठ ५८५ पहिल्या पांच ओळी;

(१) बडोदें पंडित फुल्लर्—प्रकरणें व गोऱ्यांची हिंदूंविषयीं भावना, पृष्ठ ५८६ ओळी १०–१८;

(२) परधर्मांत लुडबूड, त्याची टवाळी व सरकारचा खिस्ती धर्माबद्दल पक्षपात, पृष्ठ ५८६ ओळी १८–२८;

[पुढें चालू]

हे जन्मतःच मोठे लावालावी करणारे व लुच्चे असून एकंदर देशांत सरकाराविषयीं कुरकुर व द्रोहबुद्धि जी आढळते ती सारी या दुष्ट लोकांच्या चिथावणीनें उत्पन्न झालेली आहे हें परम तत्त्व प्रस्तुत पत्रकारानें स्थापित केलें आहे; व सरकार अजून किती दिवस निजून राहणार झणून त्यास टोला [१] दिला आहे!

याप्रमाणें सदहू इंग्रेजी पत्राचा एकंदर मतलब आहे. आतां वस्तुतः पाहतां त्यांत आमच्या लेखाचें खंडन एका अक्षरानेंही केलें नसून 'ज्ञानोदय,' 'सत्य-दीपिका' अशा प्रतीच्या पुस्तकांत शोभण्यासारखाच मजकूर सगळा भरला आहे, यास्तव त्यास उत्तर न देतां त्याकडे मुळीं दुर्लक्ष करणें हेंच वाजवी होतें. पण लिहि-णारे साहेब आहेत, व इंग्रेजी पत्रांत मोठ्यांपैकीं मोडणाऱ्या 'गॅझिटां' त त्यांनीं प्रवेश करून तेथून आह्मांवर प्रहार केला आहे. यास्तव या दोहीं संबंधांनीं होणारा भ्रम दवडण्याकरतां त्यांच्या लेखणीस कांहीं मान देणें अवश्य आहे.

'एलिफास्' साहेबांच्या पत्रांतील मुद्द्यांविषयीं विचार करण्याच्या अगोदर त्यांनीं आमच्या मालेस आपल्या शुंडाग्रेंकरून परम उन्नति देऊन आपल्या बंधुवर्गाच्या ज्ञानदृष्टीस विला विषय केली व तींतील शेलकीं शेलकीं चार फुलें या इलाख्याच्या अधिपतींच्या सिंहासनावर वाहिलीं, याबद्दल त्यांचे आभार मानल्यावांचून राहवत नाहीं. त्याप्रमाणेंच आपल्या विशाल मस्तकावर आह्मांस आरूढ करून आपल्या

---

(३) मेलव्हिल् प्रकरण, पृष्ठ ५८६ टीप १ (पृष्ठ ५८७ वर चालू) ओळी १-६; (४) बुटांचें माहात्म्य, पृष्ठ ५८६ ओळ शेवटची व पृष्ठ ५८७ ओळी १-५; यांशिवाय, (५) इंग्लंडची समृद्धता, पृष्ठ ५९१ ओळी शेवटच्या दोन ते पृष्ठ ५९२ अखेर; (६) अरब व तुर्क यांचा पराक्रम. पृ. ५९४ शेवटच्या ४ व पृ. ५९५ पहिल्या आठ ओळी; (७) अफगाणांनीं इंग्रेजांची उडविलेली धूळधाण, पृ. ५९५ ओळी १४-२१; (८) काळ्या शिपायांनींच इंग्रेजी राज्य हिंदुस्थानांत स्थापलें व १८५७ सालीं टिकविलें, पृ. ५९७ ओळी १७-२०, या उताऱ्यांचें भाषांतर एलिफासनें आपल्या पत्रांत दिलें आहे. 'सम्पादक'

१. "When will the Government be awake to the fact that a Brahman is a born intriguer, that men of that caste already hold nearly every subordinate post in this presidency, that they are knit together by bonds far closer and stronger than those which hold together any of the secret societies of Europe, and that they are at the bottom of all the discontent and disloyalty in the country?" असे अकलेचे तारे एलिफासनें तोडले आहेत. 'सम्पादक'

गंभीर गव्हर्नरनें आमचें इतिवृत्त[1] त्यांनीं सर्वांस विश्रुत केलें या उपकाराचेंही ओझें त्यांचें आमच्या डोक्यावर आहे. तर या दोहोंबद्दल आमची कृतज्ञता येथें प्रदर्शित करून आतां त्यांच्या पांडित्यप्रकारांतील तथ्यांश पाहूं.

आमच्या आक्षेपकांनीं वादविषय ( क ! सं० ) अंकांत जीं पाश्चात्यांवर आम्हीं दूषणें दिलीं आहेत तीं उडवण्याचा जरी आव घातला आहे तरी त्यांच्या पत्रानें तीं विशेष दृढ मात्र होतात हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. एक भाषाज्ञानाचें दूषण मात्र विशेष लागू पडत नाहीं. आपल्या स्वतःच्या ज्ञानानें ह्मणा, अगर खाजगी पंडितांच्या किंवा एतद्देशीय स्नेह्यांच्या साहाय्यानें ( ह्मणा ! सं० ), त्यांनीं आमच्या पुस्तकांतील उताऱ्यांचें भाषांतर एक दोन शब्दांशिवाय बिनचूक केलें आहे. पण याशिवाय बाकी सर्व गोष्टींत ' हत्ती ' महाराज स्वतःच्या आवेशानेंच निवळ खड्ड्यांत जाऊन कोसळले आहेत !· ही मौज कसकशी झाली आहे ती पुढील मजकुरावरून वाचकांस कळेल.

आम्हीं तिसाऱ्या अंकांत इंग्रेज लोकांविषयीं जें लिहिलें होतें कीं, त्यांस इकडील लोकांविषयीं फार थोडी माहिती असते, व अशी स्थिति असण्याचीं जीं कांहीं कारणें दाखवलीं होतीं, तें सर्व आमच्या प्रतिपक्ष्यास बिलकुल कबूल नसून त्यानें बिचाऱ्या ब्राह्मणांच्या माथींच सारा दोषारोप केला आहे. तो ह्मणतो[2] युरोपियन् लोक हिंदूंपासून विलग राहतात हें खोटें आहे; कां तर ब्राह्मण जर युरोपियनाबरोबर जेवला तर तो भ्रष्ट होतो हें जातिधर्माचें वेड अगोदर ब्राह्मणांतून कोठें निघतें आहे ! तेच जर आमच्या लोकांस इतके नीच मानतात तर दोघांचा समागम व्हावा

---

१. ' It is unnecssary to say that he is one of the herd of demi-semi-educated Brahmans, annually let loose on the country from the Government schools and colleges. It is as needless to say that he is a Government servant, a master in an English High School... ( He has ) a special talent as a caterer to the intellectual and moral wants of .the native public. " अशी एलिफास् शास्त्रीबोवांची ओळख करून देतो. ' सम्पादक '

२. मुळांत असें आहे:—It is the Brahman who has held aloof from the Europeans, not the latter from the former. This side of the question is, I have noticed, invariably ignored by those, who profess to lament the existing state of separation between the two races. In their anxiety to fasten the blame on the Englishman, they conveniently consign to oblivion the hateful caste system, which teaches that the lowest Brahman would be defiled by eating with the highest European ! ' सम्पादक

कसा ! या त्याच्या ह्मणण्यावर वर सांगितलेल्या 'ब्राह्मण' नामक पत्रांत नामी उत्तर दिलें आहे. आमच्या 'एलिफास्' बोवांस समागम व स्नेह होण्याचा मार्ग एका मेजावर बसून खाना खाल्ल्याखेरीज दिसतच नाहीं. तसेंच् सान्या मनुष्य-जातींतील खट जे ब्राह्मण त्यांशिवाय हिंदुस्थानांत दुसरे कोणी लोक आहेत कीं नाहींत याचाही त्यानें क्षणभर सुद्धां विचार केला नाहीं. सहभोजनाचा वाट घडून येण्यास ब्राह्मणांस जरी धर्माची आडकाठी असली, तरी मुसलमान, पारशी या बाह्य लोकांस तर ती नाहीं ना ? मग आमच्या पाश्चात्य बंधूंनीं त्यांशीं तरी निरर्गल स्नेह जोडण्याची कधीं इच्छा प्रदर्शित केली आहे ? हिंदूहिंदूंमध्येंही सहभोजन फारच नियमित होतें; मग या प्रतिबंधामुळें निरनिराळ्या जातींच्या लोकांचा परस्परांशीं समागम किंबहुना अत्यंत मैत्रीही घडत नाहीं काय ? पण इतकें लांब कशाला ? ज्या लोकांस येशूचे प्रेषित हिंदुधर्मरूप पातकमार्गांतून काढून खिस्ताच्या चरणीं लीन करवतात, व त्यांच्या गोड शब्दांस भुलून जे विचारे आपल्या इष्टमित्रांस व गणगोतासही जन्माचे अंतरतात त्यांचा तरी आदर प्रभुत्व भोगणाऱ्या लोकांपासून कितपत होतो ? 'एलिफास्' साहेबांचे कितीक बंधु नव्या बनलेल्या खिस्ती लोकांबरोबर आजपर्यंत जेवले असतील, व त्यांच्यांत विद्वत्तादि गुणांनीं युक्त असणाऱ्यांशींही दृढ परिचय करण्याविषयीं कितीकांची मनोदेवता वाहत असेल ? पण या सर्व गोष्टींनींही जर खात्री होत नसेल, तर पुढील जगजाहीर वर्तमानावरून तरी आमच्या राजनिष्ठ बंधूंस आपल्या पांडित्याचा पोकळपणा आरपार दिसून येईल असें वाटतें. हें वर्तमान खुद्द आमच्या परम दयावंत चक्रवर्तिनीकडून आमच्या हल्लींच्या व्हाइसरॉय् साहेबांस आलेलें पत्र होय. याचें कारणही तसेंच जगजाहीर आहे कीं, गेल्या वर्षी हिंदुस्थानाच्या असंख्य प्रजेपासून राजनिष्ठापूर्वक राजसत्कार अनुभवून युवराजांची स्वारी आपल्या देशास जेव्हां परत गेली, तेव्हां त्यांनीं स्वदृष्टीनें पाहिलेले चमत्कार आपल्या मातोश्रीस जे निवेदन केले त्यांत 'एलिफास्' च्या परम ज्ञानसंपन्न व सुशील बांधवांविषयींचें गाऱ्हाणेंही प्रमुखत्वेंकरून सांगितलें.

दुसरी गोष्ट जी इकडील लोकांविषयींची साहेब लोकांस माहिती तिच्या दृढीकरणार्थ पाहिजे असल्यास शेंकडों प्रमाणें दाखवण्यास आह्मी तयार आहों. शिवाय वरील कलमांत सांगितलेली स्थिति लक्षांत आणली असतां तिजपासून काय निष्पन्न व्हावें हेंही कोणासही सहज अनुमानानें कळणार आहे. यास्तव आमच्या वर सांगितलेल्या कैवाऱ्यानें दिलेलें एक सर्वप्रसिद्ध उदाहरण मात्र येथें दाखल करतों. तें नुकते निवर्तलेले प्रसिद्ध कादंबरीकार व इतिहासकार मेडोज टेलर् यांचें होय. हे साहेब गेलीं चाळीस वर्षे या देशांत होते, व पूर्वीच्या कंपनीच्या नोकरांप्रमाणें हे एतद्देशीयांस कस्पटासमान मानण्यास शिकलेले नसल्यामुळें त्यांच्यांत नेहमीं बसणें उठणें हें त्यांस लज्जास्पद वाटत नसे. तरी अशा रीतीचा परिचय त्यांचा इतका दीर्घकाळ असतांही त्यांच्या 'तारा' नामक कादंबरींत पुष्कळ विलक्षण गोष्टी आढळतात. त्यांची

नायिका ही व्यासशास्त्री ( हें नांवही चमत्कारिकच आहे ! ) याची मुलगी असतां तिला मुरळी केली आहे; मुरळी करून जेजुरीच्या खंडोबास न वाहतां तुळजापूरच्या देवीस वाहिली आहे ( तुळजापुरास मुरळ्या मुळींच नाहींत ), आणि पुनः दिलेलें दान परत घेतल्यासारखें करून तारेस मुरळीची पुनः गरत केली आहे ! बरें, ती गरत होण्यास तिचें पाणिग्रहण तरी कोणीं केलें आहे, तर विजापुरच्या एका उमरावानें ! !

याप्रमाणें वादविषयक निबंधांतील दोन मुद्द्यांच्या गोष्टीविषयीं विचार झाला. आतां यापुढें पांच सहा उतारे जे दिले आहेत त्यांविषयीं पाहायाचें. हे उतारे तिसाव्या अंकांत आहेत. पहिला युरोपिअन् लोकांस इकडील माणसांची माहिती कितपत असते याविषयींचा आहे; दुसरा रावबहादुर शंकर पांडुरंग पंडित [1] व

---

१. रा. ब. शंकर पांडुरंग पंडित ( १८४०–१८९४ ). जन्मस्थळ बांबुडी, सं. सावंतवाडी. वडील कुळकर्णी होते. पोलिटिकल् सुपरिंटेंडंट् कुडाळला आल्या वेळीं त्यांचे कारकून वगैरे पाहून लहानपणीं यांसहि कारकून होण्याची इच्छा झाली. पण इंग्रेजीशिवाय तें होणें नाहीं हें पाहून अठराव्या वर्षी घरांतून पळून जाऊन यांनीं बेळगांव गांठलें. तीनच वर्षांत मॅट्रिक होऊन १८६५ सालीं रानडे, भांडारकर वगैरे मंडळीबरोबर हे बी. ए. झाले आणि १८६८ सालीं इंग्लिश व लॅटिन् घेऊन एम्. ए. झाले. १८६५ सालीं डेक्कन् कॉलेजांत हे फेलो होते, व १८७२ पर्यंत इतिहास व संस्कृत या विषयांचे प्रोफेसर होते. पुढें मुलकी खात्यांत हे डेप्युटी कलेक्टर् झाले. कडक, निःस्पृह व न्यायप्रिय मॅजिस्ट्रेट म्हणून यांची ख्याति होती. १८७९-८५ पर्यंत हे मुं. सरकारचे ओरिएंटल् ट्रान्स्लेटर् असून पुढें नगरचे हुजूर डेप्युटी कलेक्टर् झाले व अखेर पोरबंदरच्या अॅड्मिनिस्ट्रेटरचेंहि काम यांनीं केलें. पण तिकडे प्रकृति बिघडल्यामुळें हे मुंबईस आले व तेथेंच यांचा १८ मार्च १८९४ रोजीं अंत झाला. यांस संस्कृत, गुजराथी, कानडी, जर्मन्, फ्रेंच्, लॅटिन् वगैरे भाषांचें चांगलें ज्ञान होतें. यांनीं अनेक संस्कृत नाटकें व काव्यें सटीप प्रसिद्ध केलीं आहेत. वेदार्थयत्न मासिक यांनींच चालविलें होतें व त्याचा खप हिंदुस्तानपेक्षां जर्मनींत अधिक असे. जर्मनींत यांची फार ख्याति झाली. हे सवडीप्रमाणें ( Indian Antiquary ) इंडिअन् अँटिक्वरी मासिकास लेख लिहून पाठवीत. शृंगेरीमठांतून समाष्य अथर्ववेद मिळवून यांनीं प्रसिद्ध केला. यांचीं नगर येथें वेदांवर व्याख्यानें होत. कुमारपालचरित व तुकारामाची गाथा हे यांचे महत्त्वाचे ग्रंथ होत. हिंदुस्तान सरकारचे प्रतिनिधि म्हणून लंडनच्या ओरिएंटल् इंटर्नॅशनल् काँग्रेसला १८७४ सालीं गेल्या वेळीं 'कालिदासाचा काळ' या विषयावर यांनीं भाषण केलें. मुंबईस जसे मुलींची पहिली शाळा स्थापणारे दादाभाई नौरोजी तद्वत् पुण्यास पंडित. येथील फीमेल् हायस्कूल् पंडितांच्याच परिश्रमाचें फळ होय. हे

[ पुढें चालू ]

जगत्प्रसिद्ध फुलर्साहेबांचा खटला [1] याविषयींचा आहे; तिसरा मेल्‌विल् [2] साहेबांच्या संबंधाचा; चवथा बूट्, स्टॉकिंग् यांच्या आधुनिक माहात्म्याचा; पांचवा युरोपच्या व इंग्लंड्च्या समृद्धतेविषयींचा; आणि सहावा मुसलमान लोकांच्या व एतद्देशीय शिपाई लोकांच्या लष्कराच्या पराक्रमाविषयींचा होय. आतां

---

अस्पृश्योद्धार, पुनर्विवाह वगैरेंचे पुरस्कर्ते असून 'पुनर्विवाहास तयार' अशी जाहिरात एका इंग्रेजी पत्रांत सहा महिने यांनीं ठेवली होती. हे प्रार्थनासमाजिस्ट् असून शिमग्यांतील बीभत्स प्रकार नाहींसे व्हावे म्हणून यांनीं नगरला शिमगाप्रदर्शन सुरू केलें व त्याचें पुढें इतरत्राहि अनुकरण झालें. हे निरलस, मानी व तेजस्वी होते. निमंत्रणाशिवाय गव्हर्नर्ला त्याच्या खाजगी आगमनप्रसंगीं भेटावयास जाणें त्यांस उपमर्दकारक वाटे. फीमेल हायस्कूलच्या उद्घाटन समारंभ गायकवाड सरकारच्या अध्यक्षतेखालीं झाल्यावेळीं अध्यक्षास गर्दी असल्यानें अखेरचें राष्ट्रगीत (राष्ट्रगीत कसचें?—राजनिष्ठागीत) ह्मणण्याचें राहून गेल्यामुळें गोरे अधिकारी रागावले. राजद्रोहाच्या शंकेनें पंडितांस सस्पेंडही करण्यांत आलें. पण रानडे, सर् रेमंड् वेस्ट् वगैरेंच्या खटपटीनें हें संकट टळलें. 'सम्पादक'

१. आग्र्याचे वकील फुलर् (Fuller) यांनीं एके रविवारीं प्रार्थनेकरतां चर्चकडे जाण्याचे वेळीं आपल्या घोडेवाल्यास गाडी आणण्यास फर्माविलें. पण गाडी येण्यास विलंब लागल्यामुळें रागावून सदर घोडेवाल्याला [Syce] तोंडावर व डोक्यावर गुद्दे मारून व केंस धरून ओढून त्यांनीं घायाळ केलें. घोडेवाला बिचारा तेथेंच पडला. फुलर् साहेबांची स्वारी गाडी घेऊन चर्चकडे गेल्यावर उठून उभें राहण्याचीहि ताकद नसल्यामुळें सदर सैस रांगत रांगत कांपाउंडांत गेला पण तेथें त्याचें लगेच प्राणोत्क्रमण झालें. आग्र्याचे जॉइंट् मॅजिस्ट्रेट् लीड्स् (Leeds) यांचे पुढें इंडिअन् पिनल् कोडाच्या ३२३ कलमाखालीं खटला चालला. लीड्स्नीं तीस रुपये दंडाची शिक्षा करून आरोपी फुलर् यास सोडून दिलें. वायव्य प्रांताच्या हायकोर्टानें निकाल फिरविला नाहीं व लेफ्टनंट् गव्हर्नरनेंहि तिकडे कानाडोळाच केला. पुढें त्या वेळचे गव्हर्नर् जनरल् लिटन् यांनीं याबद्दल या तिघांस दोष देऊन कलकत्त्याच्या सरकारी गॅझेटांत एक पत्रक प्रसिद्ध केलें. सदर पत्रकांत युरोपिअन् लोक आपल्या हिंदी नोकरास मारहाण करतात ही शरमेची गोष्ट असून यामुळें सर्व इंग्लिश् लोकांस काळोखी लागणार आहे असें लिटन् साहेबांनीं लिहिलें होतें. या पत्रामुळें गोऱ्या लोकांत खूप खळबळ उडली, अनेक वर्तमानपत्रांनीं गिल्ला केला, व हिंदी नोकरांस मारण्याचा आपणांस हक्क आहे असें निर्लज्जपणाचें प्रतिपादन करण्यांत आलें.

'सम्पादक'

२. R. G. Melville, सिव्हिल् सर्व्हंट्, यानें मुसलमानी धर्माच्या सत्यतेची खात्री पटल्यामुळें नव्हे तर केवळ सोयीकरितां मुसलमानी धर्म पत्करला. 'सम्पादक'

या सर्व स्थलींचे उल्लेख 'एलिफास्' साहेबांसारख्या परम विद्वान् व सत्यनिष्ठ लोकांस फारसे रुचले नसतील हें आम्ही कबूल करतों; पण येवढ्यानेंच ते असत्य व राजद्रोहासारख्या भयंकर आरोपास पात्र झाले काय? ज्या गोष्टी सर्वांस सूर्याच्या प्रकाशाप्रमाणें ढळढळीत स्पष्ट दिसताहेत व ज्या सर्वजनविश्रुत व ग्रंथप्रमाणसिद्ध आहेत, शिवाय ज्यांचा चालू राजकीय प्रकरणांशीं बिलकुल संबंध नाहीं, त्या तोंडावाटे काढल्या असतां जर आमच्या प्रस्तुत सुधारलेल्या इंग्रेजी अमलांत राजनिष्ठाभंग घडतो, तर मागल्या मोगलाई व मराठेशाई कारकिर्दीस कां हंसावें? आमचा जुना मराठी जोडा इंग्रेजी बुटाच्या इतका निर्मळ असतो असें म्हणतांक्षणींच राजनिष्ठेचा सुराडा होऊन तिची हत्या जर शिरावर चढते व म्हणणारा भयंकर राजदंडास पात्र होतो, तर अरबी गोष्टींत शमसुद्दिनानें आपल्या पुतण्यास पुन्यांत मसाला कमी घातल्याबद्दल सुळावर देण्याचें योजिलें तें काय वाईट? वरील उताऱ्यांपैकीं पहिल्या चोहोंस 'रत्नें' ही संज्ञा देऊन गव्हर्नर् साहेबांच्या हुजुरास तीं 'एलिफास्' साहेबांनीं प्रविष्ट केलीं आहेत हें वर सांगितलेंच आहे. आतां या 'रत्नां'ची सरकारी जवाहीरखान्यांत काय व्यवस्था झाली असेल हें आम्हांस माहीत नाहीं; पण आम्हांस खचीत वाटतें कीं, त्यांवरून 'एलिफास्' साहेबांच्या समंजसतेची जितकी पारख करतां येईल तितकी आमच्या पुस्तकाच्या राजनिष्ठेविषयीं करतां येणार नाहीं!

येयवर 'बॉंबे गॅझिट्' मधल्या पत्रांत आमच्या पुस्तकाविरुद्ध जें येवढें भयंकर अवडंबर आलें होतें त्यांत तथ्यांश किती आहे तो वाचकांस कळवला. आतां याखेरीज इतर ज्या कित्येक गोष्टी त्यांत प्रसंगवशात् आणल्या आहेत त्यांच्या खरेखोटेपणाचा निवाडा येथें करण्याची गरज नाहीं. शाळांतून व विद्यालयांतून शिकलेल्या लोकांस सरसकट 'चतकोर विद्येचे धनी' अशी संज्ञा आमच्या महाविद्वान् गौरवर्ण बंधूनें दिली आहे. हें तर काय पण येथल हायस्कूल्चे हेडमास्तर व सरकारचे रिपोर्टर् हेही 'एलिफास्' साहेबांच्या खिसगणतींत नाहींत. यांच्या जागीं एकादे 'महाअरि' किंवा खिस्ती दीक्षेनें पावन झालेले एकादे गृहस्थ जर सरकारनें नेमले असते, तर त्यांत आमच्या चाणाक्ष साहेबांच्या मतें सरकारचा कांहीं शहाणपणा दिसून येता. याप्रमाणें सार्वजनिक सभेसही कोरडा[1] लगवून सरतेशेवटीं

१. एलिफास् म्हणतोः—'No wonder that after reading it (a noble tribute to the superior prowess of the followers of Islam), the Sarvajānik Sabha of Poona was moved to dispatch a deputation to Bombay to express its sympathy with the Turks, the manly violator and murderer of Bulgarian women and children—just as it came forward last year to plead for the "great ruler who was tried like a common cutpurse,' simply because he had committed the petty crimes of murder, attempted murder, and oppression, and had a remarkable predilection for his subject. 'सम्पादक'

विचाऱ्या शंकराचार्यांसही [1] एक निसटता फटका पांचवण्याची आमच्या 'गजेंद्र'-पंडितांनीं तजवीज ठेवली आहे. आतां या सर्व आक्षेपांवर आमचें उत्तर येवढेंच आहे कीं, विद्येच्या संपूर्ण कळा उघडल्याचा प्रकाश 'गॅझिट्' पत्रांत पडला आहे येवढाच जर असेल तर तिजपासून आमच्या 'एलिफास्' सारख्या प्रचंड विद्वानांसच लखलाभ होवो. आम्हांस त्या कळांतला चतुर्थांश तर काय, पण एक अंशही नको! तसेंच या शहरांतल्या वरील दोघां कामगारांच्या संबंधानें आमच्या पत्रकारास येवढेंच कळवणें बस आहे कीं, ते सांप्रत ज्या हुद्द्यांवर आहेत ते त्यांस देवाचे लाडके किंवा सरकारचे प्यारे म्हणून प्राप्त झाले आहेत; असें नाहीं तर त्यांच्यापेक्षां विद्वत्ता व गुणांची चढ़ा हे गुण ज्यांचे ठायीं शतपट अधिक होते अशा वजनदार अधिकाऱ्यांच्या हातून त्यांच्या नेमणुका झाल्या आहेत. शिवाय त्यांच्यावर त्यानें जे पोरकट आरोप आणले आहेत, ते वर्तमानपत्रद्वारें सर्वांस जाहीर करण्यापूर्वी त्यांच्या कामाविषयींची बरोबर माहिती अगोदर कोणापासून तो करून घेता तर त्यासच बरें पडलें असतें. सरतेशेवटीं येथील सार्वजनिक सभेस जें आमच्या प्रतिपक्ष्याकडून बक्षीस मिळालें आहे, त्याविषयीं लिहिण्याची तर सोयच नाहीं; कां कीं, एतद्देशीय ओढ्याचाही कैवार घेतलेला आमच्या पाश्चात्य बंधूस खपत नाहीं, मग लोकांच्या हक्कांविषयीं वगैरे लिहिलें तर केवढा राजद्रोह होईल हें सांगणें नकोच! तरी हें कलम संपण्यापूर्वी आम्हीं तिसाव्या अंकांत केलेलें मुसलमानांचें वर्णन व सार्वजनिक सभेनें प्रोत्साहन करून विलायतेस पाठवलेला अर्ज, या दोहोंची आमच्या पत्रकारानें जी मौजेनें सांगड घालून दिली आहे तिचा आम्हांस जो चमत्कार वाटला तो येथें प्रदर्शित केल्यावाचून राहवत नाहीं. मुसलमानांनीं [2] राणी साहेबांकडे पाठविलेला

---

1, The late Vishnu Shastri (Pandit. *Ed*) and a large number of his coreligionists advocated widow-re-marriage. but the illiterate Shankaracharya very soon rooted all but their leader.

'सम्पादक'

२. २४ सप्टेंबर १८७६ रोजीं मुंबईस जुम्मा मशिदींत सुन्नी, शिया; अरब, मोगल; मेमन, खाजे; बोहरी, कोंकणी; अशा सर्व पंथांच्या व जातींच्या मुसलमानांची प्रचंड जाहीर सभा भरली होती. पंधरा हजार लोक जमले होते. त्यांनीं तुर्कस्तानसंबंधीं अर्ज राणीकडे पाठविण्याचें ठरविलें. या अर्जांत बल्गेरियांतील ख्रिस्ती लोकांवर मुसलमानांनीं केलेल्या अत्याचारांबद्दल खेद प्रदर्शित केला असून तें कांहीं व्यक्तींचें काम असल्यानें सुलतानाचें त्यांत अंग असणें शक्य नाहीं याकडे व तुर्की साम्राज्य कायम ठेवण्याच्या १८५६ च्या तहनाम्यानें दिलेल्या हमीकडे लक्ष देऊन राणीनें सुलतानाशीं पूर्वीप्रमाणें सलोख्याचें वर्तन ठेवावें अशी विनंति करण्यांत आली होती.

'सम्पादक'

अर्जे, [1] कोणीकडे आणि 'निबंधमाला' कोणीकडे! शेकमिऱ्याचा [2] डोला आणि पर्वतीच्या पायऱ्या इतक्या तऱ्हेचाच दोहोंचा परस्परसंबंध आहे!!

याप्रमाणें 'एलिफास्' साहेबांनीं आमच्या लहानशा पुस्तकावर मेहेरबानी करून आपल्या सोंडेनें त्यास उडवून देण्याचा किंवा भारदस्त पायाखालीं चेंगरून टाकण्याचा जो प्रयत्न केला आहे त्याचा आमच्या अल्पमात्र शक्तीप्रमाणें आह्मीं प्रतिकार केला. हा त्यास व तद्वर्गीयांस तुच्छ वाटेल यांत संशय नाहीं. पण याच्या योगानें आमच्या वाचकांस जर येवढें कळून येईल, कीं हजारों युरोपिअनांच्या हातीं जाणाऱ्या पत्रांतही किती झोटिंगपाच्छाईचा मजकूर खपला जातो, व दुराग्रहास वश झाले असतां आमचे विद्यासंपन्न ह्मणवणारे पाश्चात्य बंधुही कोठवर मरकट्व घातात, तर येवढ्यानेंच त्या प्रत्युत्तराचें आह्मी साफल्य मानूं.

सत्यदीपिका—या नांवाचें एक मासिक पुस्तक येथें निघत असतें. हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् ऐकूनही माहीत नसेल; कां कीं, हें ख्रिस्ती मताचें प्रतिपादक असल्यामुळें व त्या धर्माचें गौरव आणि हिंदुधर्माची निंदा यांखेरीज यांत फारसा मजकूर कधींही येत नसल्यामुळें मराठी मासिक पुस्तकांत हें विशेष मोडत नाहीं. याचे वर्गणीदार पाहिले तर ते अर्थातच भाविक युरोपिअन, धर्मांतर झालेले लोक, हिंदुधर्मांच्या अज्ञानास्तव त्याची टवाळी केलेली ज्यांस आवडते असे परभू, शेणवी वगैरे व यांच्याहूनही हीन जातीचे लोक हेच आढळतात. हें पुस्तक अलीकडे चार वर्षे जें चाललें आहे हा त्याचा दुसरा जन्म होय. पहिल्या

---

१. हा जो निराधार मजकूर 'गॅझिट्' पत्रांत होता तो येथील सार्वजनिक सभेच्या चिटणिसांनीं खरी गोष्ट कळवून खोडून टाकावेला, हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस कदाचित् माहीत असेलच.

२. शेखमिरा वांईकर-सातारच्या महाराजांच्या सैन्यांतील पायदळावरचा छोटासा अम्मलदार. शाहू महाराज कैदेंतून सुटून आल्यावर हा त्यांस मिळाल्यामुळें याला त्यांजकडून १७०९ सालीं पसरणी गांव इनाम मिळाला. शिवाय १८०० रुपयांचा सरंजाम, व आठ स्वारांची मनसबदारी मिळून खर्चासाठीं ४०००० रुपयांची नेमणूक झाली. १७३४ सालीं शेंदुरजणें येथें पंधरा बिघे जमीन देवस्थान इनाम मिळाली. शेखमिरा १७५४ सालचे सुमारास वारला असावा. पुढें त्याचा दत्तक पुत्र खानमहंमद व त्याच्याहि पश्चात् नातू शेखमिरा व पुढें पणतू खानमहंमद यांजकडे वारसा आला. १८६१ मध्यें खानमहंमद व त्याचा बंधु अबदुल ऊर्फ गुलाम कादर यांच्या तंट्याचा निकाल होऊन बंधूस वांटणी मिळाली. पण त्यानें लबाडी केल्यामुळें त्याचें नांव सरदारांचे यादींतून कमी करण्यांत आलें. गुलाम कादरची मुलगी मिसमिल्ला बेगम इचा वडील मुलगा अजीमोद्दीन याच्या मृत्यूमुळें धाकटा मुलगा गुलाम जिलाणी साहेब हा जहागिरीचा मालक झाला. याचा वांई येथें वाडा आहे, पण याचें बहुधः पुण्यांसच राहणें असतें. याची जहागिर वीस बावीस हजारांची असावी. 'सम्पादक'

जन्माचीं [1] त्यानें बारा वर्षें कंठलीं; पण त्याचा सांचा अतिशयित लहान असतां व वर्षाची किंमत अवघी दोन आणे असतांही येथील 'चुटक्या' प्रमाणें [2] त्यास निजधामास जावें लागलें. 'ख्रिश्चन् व्हर्नॅक्युलर् एज्युकेशन् सोसायटी' हिनें ही छोटी 'दीपिका' असत्यरूप अंधकाराच्या ध्वंसनार्थ हातीं धरली होती; पण महिन्याच्या महिन्यास एक दिवलीभरही तेल पुरवण्याची तीस ऐपत नाहींशी झाल्यानें ह्मणा, अगर तिजपासून आपलें कार्य कांहींच होत नाहीं असें वाटल्यावरून ह्मणा, तिनें तीस आपल्या हातची एकाएकीं सोडून दिली. हा आश्रय सुटतांच बिचारी 'दीपिका' भंग पावून तिची दिव्य ज्योत मातीच्या धुराळ्यांत मालवून गेली! सत्याची ज्योत मालवल्यावर मग तो अनर्थ काय पुसावा! 'ज्ञानोदया' चीं कोवळीं किरणेंही न पोंचून जिकडे जिकडे अज्ञानांधकार जमत चालला तिकडे तिकडे सैतान महाराजांची स्वारी पुनः आपल्या संवगड्यांसहवर्तमान यथेच्छ विहार करूं लागली. पण ही त्यांची दंगल फार दिवस चालली नाहीं तोंच ख्रिस्तभक्तांनीं मशालीची व बुधलीची तजवीज करून पहिलीच्या सवाईनें उजेड पडे अशी दुसरी 'दीपिका' [3] उभी केली! हीही आज चार वर्षें आपलें पवित्र काम बजावते आहे; तरी आमच्या देशाच्या दुर्दैवानें हिची देखील प्रभा अलीकडे मंदावत चालली आहे. देशहिताचें येवढें काम तिनें उचललें असतां तिच्या दीनवाण्या काकुळतीकडे कोणी लक्ष देत नाहीं. असें करतां करतां एकादे दिवशीं तीस 'ख्रिस्त' ह्मणण्याची पाळी येऊन ती आपल्या मयत भगिनीच्या भेटीस जाईल कीं काय कोण जाणें!

या पुस्तकाचें एकंदर स्वरूप वर जें सांगितलें आहे त्यावरून त्याचें त्याच्या हिंदुबंधूंशीं कितपत सूत असेल हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. या सर्वांत जुनें जें "विविधज्ञानविस्तार' हें आजपर्यंत धर्मविषयक वादांत जरी कधींही पडलें नाहीं व आमच्या ख्रिस्ती बंधूंशीं द्वेषभावही त्यानें जरी कधींही बुद्धिपुरःसर प्रगट केला नाहीं, तरी त्याच्या मुखपत्रावर 'श्री' हें परम अमंगल व मूर्तिपूजाभिमानसूचक जें अक्षर घातलेलें असतें तेवढेंच अत्यंत नाजुक प्रकृतीची जी 'सत्यदीपिका' तिच्या कपाळांत माथेशूळ उठवण्यास बस झालें! मग येवढें जिचें मूर्तिपूजानिषेधाचें कडकडीत व्रत तिचा दुसऱ्या दोन मासिक पुस्तकांशीं तर केवढा स्नेह असेल हें उघडच आहे. 'दंभहारका'शीं तर तिचें व तिच्या बन्धूचें निरंतर खडाष्टक चालत असतें हें

---

१. जुनी सत्यदीपिका १८६१ जानेवारी (ख्रिस्ती). 'सम्पादक'

२. सुमारें तीन चार वर्षांपूर्वी वरील नांवाचें एक टुमदार पत्र येथें दर पंधरवड्यास निघत असे. हें कोण काढीत असे हें शेवटपर्यंत कोणाच्याही समजण्यांत आलें नाहीं. हें इंग्रेजींत निघत असे. यांतील भाषापद्धति अंमळ विशेष डौलाची असे; पण विषयाचें प्रतिपादन फार पोक्त व वजनदारीचें असे. अशीं पत्रें क्वचित् निघायाला लागून तीं फार दिवस टिकत नाहींत, ही मोठ्या दुःखाची गोष्ट आहे!

३. नवी सत्यदीपिका १८७४-७५; सम्पादक-रेव्हरंड् बाबा पदमजी. 'सम्पादक'

पुष्कळांस माहीत असेलच. त्याचा जो मध्यें कांहीं काळपर्यंत अस्त झाला होता त्या वेळेस दोघांहीं खिस्ती मावंडांनीं आपलें जगद्बंधुत्व स्पष्ट दाखवून आनंद प्रदर्शित केला होता. आह्मांवरही त्यांची कृपादृष्टि कधीं मधीं होत असतेच. 'ज्ञानोदय' बोवांनीं आमच्या आठव्या अंकाच्या वेळेस खूप मनावर घेऊन तीन चार अंकांत आमच्यावर जो वाग्बाणांचा वर्षाव चालवला होता त्याचा झणत्कार तरी पुष्कळांच्या कानावर आला असेलच. वरील वृद्ध पितामहांनीं बहुधा भारती युद्धांतील प्रथम सेनानीप्रमाणें 'लघु लेंकराच्या गर्वखंडनार्थ हातांत धनुष्य धरिलें' असावें; पण त्याच्यासारखा पराक्रम मात्र न घडून लवकरच आमच्या अल्प दृष्टीनें ते शरपंजरीं जे खिळून गेले ते अद्याप उठत नाहींत. आमच्या 'मयत जननी' स ज्यांनीं खपवून टाकली त्यास तिचें 'पुस्तकरूप पिलूं' मारी व्हावें ही मोठ्या आचंब्याची गोष्ट होय! असो; वरील प्रसंगीं प्रस्तुत 'दीपिके'च्या कर्त्यांनींही आमची खबर घेतली होतीच. वरील 'एलिफास्' साहेबांप्रमाणें आमच्या वंशपरंपरेची व गुरुपरंपरेची हकीकत आपल्या शुभ वर्तमानवाल्या बंधूंस आरंभीं जाहीर करवून नंतर आपली राजनिष्ठा व पवित्रशास्त्रनिष्ठा त्यांनीं भरपूर प्रदर्शित केली होती. शिवाय मुसत्या मराठी शिव्यांनींच आह्मी ऐकणार नाहीं असें जाणून आपल्या 'एका पुणेंकर हिंदु मित्रा'स माध्यानें आणून त्याकडून इंग्रेजी पुष्पवृष्टि त्यांनीं आह्मांवर करवली. ही वृष्टि प्रकृत पुस्तकाच्या त्याच अंकांत [ जानेवारी १८७५ ] असून तिच्या शेवटीं 'पुढें चालू' म्हणून आपल्या दुखावलेल्या बंधुवर्गास त्यांनीं आश्वासन दिलें होतें; पण हें वचन पुरें झालेलें कोठें दिसण्यांत आलें नाहीं. मग या 'हिंदु मित्रा' ची लोककल्याणाची इच्छा तितक्यांतच गोठली; किंवा आह्मांस भय दाखविण्याकरतांच ती हिकमत केली होती; किंवा सत्यदीपिकेच्या ऑफिसांत या विद्वान् 'पुणेंकरा'स येशूच्या शरीराची व रक्ताची बिदागी बरोबर पोंचली नाहीं यावरून त्यानें रागानें आपली लेखणी आधींच थांबवून धरली की काय कोण जाणे! त्यावर आतां पुनः दोन वर्षांनीं 'दीपिके'ची व 'माले'ची गांठ. इतक्या काळांत परस्परांचा संबंध पुष्कळच बदलला आहे. त्या वेळेस प्रस्तुत 'दीपिके'ची बरीच भरभर असून आमच्या पुस्तकाचें डोकें कोठें उगीच वर होऊं लागलें होतें. सध्यां 'दीपिके'च्या पात्रांत ठणठणाट होण्याचा सुमार दिसूं लागून इतके स्नेही असतां व "जगाच्या समाप्तीपर्यंत मी तुम्हांबरोबर सर्वकाळ आहें" असें आकाशांतील प्रभूचें साक्षात् अभिवचन असतां तिचीच शाश्वती तीस सांगवेनाशी झाली आहे. इकडे आमच्या 'माले'ची स्थिति आज दोन वर्षांत कशी होत आली आहे हें आमच्या वाचकांस माहीत आहेच. पूर्वी तीस 'दीपिके'चें शत्रुत्व जसें थोडेंबहुत तरी बाधक होण्याचा संभव होता तसा आतां तर मुळींच नाहीं. उलट तिचें मात्र मंदही आंदोलन 'दीपिके'च्या सूक्ष्म होत चाललेल्या ज्योतीस निर्वाण पदवीस पोंचवण्यास कदाचित् कारण होईल!

येवढी प्रस्तावना करून आतां सदहू पुस्तकाच्या गेल्या नोव्हेंबरच्या अंकांत

आमच्यावर जी टीका आली आहे तिच्यांत सत्याचा व समंजसतेचा अंश कितपत आहे तो आमच्या वाचकांस सादर करतों. याच प्रसंगीं वर सांगितलेला जो जाने-वारीचा अंक त्यांतीलही कांहीं आक्षेपांचा विचार करूं.

'सत्यदीपिका' कर्ते हे पूर्वी हिंदुधर्मांतले असून पुढें ख्रिस्ती झाले, व आज वीस पंचवीस वर्षें ते आपल्या देशबंधूंच्या मेळ्यांत नसून ज्यांचे आचार विचार वगैरे सगळें भिन्न अशांचा समागम त्यांस इतका काळ सतत घडला, यास्तव त्यांच्या समजुती त्यांच्या पूर्वीच्या धर्मबंधूंहून पुष्कळ निराळ्या झाल्या असल्यास त्यांत फारसें आश्चर्य नाहीं. पण त्यांचीं मतें त्यांच्या देशबंधूंच्याहून जेथें तेथें अगदीं निराळींच पडावीं हें मोठें चमत्कारिक नाहीं काय? ज्यांस आमच्या देशची पुरती भाषाही येत नसते व जे एतद्देशीयांपासून नेहेमीं दूर फटकून राहतात त्यांच्या ठायीं आह्मांविषयीं भलभलत्या कल्पना असल्यास तें सहजच आहे; पण लहानपणापासून जे इकडील रीत-रिवाजांत वाढले व अजूनही ज्यांचा संबंध अगदीं तुटला नाहीं, त्यांच्या ठिकाणींही तेंच अज्ञान व तोच दुराग्रह आढळावा हें नवल आहे. खोटे तेहतीस कोटि देव सोडून एका खऱ्या देवास भजल्याचें व नित्य सांजसकाळ पवित्र शास्त्राचा पाठ केल्याचें फळ हेंच काय? निवळ सत्याचें सेवन करणारे व विद्यासमुद्रांत सतत पोह-णारे जे मिशनरी व इंग्रेज लोक त्यांच्या अत्यंत परिचयानेंही सांप्रत पुस्तकांत दृष्टीस पडते इतकीच समंजसता व तर्कशक्ति जर येत असेल तर वरील समागमाचा लाभ घडला नाहीं ह्मणून कोणासही खेद करण्यास फारसें कारण राहणार नाहीं. तसेंच आज वीस वर्षें या पुस्तककर्त्याचा मराठीकडे इतका सारखा व्यासंग चालला असतां आणि मराठी व इंग्रेजी या भाषांचे कोशही त्याच्या हाताखालून गेले असतां, वाक्यार्थ करण्याची व लिहिणाराचा एकंदर मतलब जाणण्याची जी शैली त्याचे ठायीं दिसून येते तीही कांहीं अपूर्व आहे!

या सर्व दूषणांचा प्रत्यय वाचकांस येण्याकरतां आतां पूर्वोक्त दोन लेखांतले आह्मांवर केलेले आक्षेप क्रमाक्रमानें पुढें आणतों. त्यांचें निरसनही त्याच्या त्याच्या पुढें केलेलें वाचकांस आढळेलच.

'दीपिका'कर्ते वगैरे मंडळींचा आमच्यावरच काय पण एकंदर सर्व नव्या शिकलेल्या लोकांवर एक मोठा आक्षेप हा आहे कीं, आह्मी ख्रिस्ती धर्माची निंदा करतों. हा आक्षेप किती समंजसपणाचा आहे बरें! आमच्या ख्रिस्ती बांधवांस येवढेंही कळूं नये काय, कीं जी गोष्ट आपण निःशंकपणें कायावाचामनेंकरून नित्य करीत आहों तीच दुसऱ्यानें केल्यास आपणास बोलायास तोंड राहत नसतें! आपण जर कोणावर शस्त्र उगारलें, तर त्यानें आत्मरक्षणार्थही शस्त्र धारण करूं नये काय? आतां हें खरें कीं, त्यांच्या पैगंबरानें त्यांस आज्ञा दिली आहे कीं, एका गालावर मारलें असतां दुसरा गाल पुढें करावा. पण या आज्ञेचा असा अर्थ काय, कीं तुह्मी दुसऱ्यांचा हवा तितका छळ करीत जा, आणि ते कांहीं गडबड करूं लागले, कीं

हें माझें वचन त्यांच्या तोंडावर फेंकून देत चला ! शिवाय आह्मी पुस्तकास आरंभ करतेवेळीं अशी प्रतिज्ञा भोगलेलीही कोठें आह्मांस आठवत नाहीं, कीं बैबलास व त्याच्या भक्तांस आह्मी बिलकुल धक्का लावणार नाहीं. असें आह्मीं करावेंसें जर त्यांस वाटत असेल,तर त्यांचा साऱ्या जगभर चाललेला क्रम त्यांस सोडून द्यावा लागेल. हें एक झालें, दुसरें असें आहे कीं, पवित्र शास्त्र जर ईश्वरप्रणीत आहे तर मानवी निंदेचें त्यास येवढें भय कसचें ! सूर्याचें तेज मनुष्याच्या तोंडच्या वाफेनें कधीं मलिन झालें आहे काय ! न्यूटन्च्या किंवा युक्लिड्च्या सिद्धांतावर आजपर्यंत कोणीं कधीं आक्षेप काढले आहेत ! आणि ते जर काढले तर त्यांचें समाधान किती लवकर करतां येतें असें आमच्या 'सत्यदीपिके'त कधीं तरी असतें काय ! आठव्या अंकांत साऱ्या पृथ्वींतील लोक बैबलावर ज्या शंका काढतात त्या दाखल केल्या असतां त्यावर 'सत्या'च्या ज्योतीचा उजेड इतकाच पडतो कीं,—'खिस्ती शास्त्राचें यांचें ज्ञान तर अनुपम आहे ! "—" खिस्ती शास्त्राचें व त्यासंबंधीं एकाद्या अर्थ-प्रकाशक ग्रंथाचें सहा महिने तरी शुद्ध हेतुपूर्वक अध्ययन केलें असतें तर अशा थोरकट गोष्टी त्यांच्या लेखांत आल्या नसत्या ! " या दुसऱ्या वाक्यांतील 'शुद्ध हेतू'-चेंही बीज आह्मांस नीटसें कळत नाहीं. हिऱ्याची परीक्षा करायाच्या वेळीं अगोदर नेत्रस्पर्श करून प्राणायाम करावा लागतो काय ! तसेंच युरोपांतील सहस्रावधि मोठमोठे ग्रंथकार शुभवर्तमानास जे मानीतनासे झाले आहेत ते लबाड व दुष्ट म्हणून काय !

दुसरें जबरदस्त दूषण असें कीं, आमचें सरकार आह्मांस हवें तें लिहिण्याची व बोलण्याची जी मोकळीक देत आहे तिचा आह्मी दुरुपयोग करून सरकारास नेहेमी शिव्या देत असतों. हें दूषण तर अगदींच पोकळ आहे. या लिहिण्यावरून स्वतः योजलेल्या शब्दांचा अर्थही आमच्या 'दीपिका' कारांस बरोबर कळत नाहीं असें म्हणणें भाग येतें. 'सरकार' म्हणजे काय व 'दुरुपयोग' म्हणजे काय याचा आमच्या खिस्ती बंधूंनीं आपल्याशीं कधीं क्षणभरही विचार केला आहे काय ! आह्मी हातांत घेतलेलें काम त्यांच्यासारखेंच केवळ मासिक पुस्तक चालवण्याचें आहे, वर्तमानपत्र लिहिण्याचें नाहीं हें त्यांस माहीत आहेच;मग या मासिक पुस्तकांत सरकारच्या ठरावांचें, सार्वजनिक विषयांचें वगैरे विवेचन केलेलें त्यांस कधीं आढळलें आहे काय ! पण आमच्या भाविक व राजनिष्ठ बंधूस जळीं, स्थळीं, काष्ठीं, पाषाणीं तर सरकार दिसत नसेलना ! म्हणजे पाद्रीसाहेब सरकार, पवित्र शुभवार्ता सरकार, मेकॉलेप्रभृति ग्रंथकार सरकार, टेम्स् नदी सरकार, साहेबी बूटही सरकार,—फार तर काय, दूरच्या परंपरासंबंधानें 'ज्ञानोदय', 'सत्यदीपिका' हींही जबरदस्त सरकारचें ! सरकारत्वधर्माची येवढी जबर व्याप्ति असल्यास मग आह्मी मोठे राजद्रोही खरे ! पण असें म्हटलें तर बोलण्या-लिहिण्याची मोकळीक जी आमच्या सरकारनें आह्मांस दिली आहे तिचा अर्थ काय, व तिचा दुरुपयोग म्हणजे तरी काय, हें आह्मांस कळत नाहीं. विलायती बुटासही

शिरसावंद्य मानीत जा, एरवीं तुह्मांला हवें तें बोलण्याची मुभा आहे, असें ह्मणणें म्हणजे मनुष्याचे पाय बांधून टाकून त्यास त्रिभुवनांत संचार करण्याची सदर परवानगी दिल्याप्रमाणेंच आहे.

पण हेंही क्षणभर एकीकडे ठेवूं. आमच्या राजनिष्ठ बंधूच्या मनोगतास अनुसरून 'सरकार' शब्दाचा अर्थ वरच्याइतका किंवा त्याहीपेक्षां पाहिजे तितका व्यापक जरी घेतला, तरी आमचें लिहिणें सर्व याच रोखाचें असतें असें 'सत्यदीपिका'कारांस शुभवर्तमानावर हात ठेवून म्हणवेल काय ? आमच्या राज्यकर्त्यांच्या अंगीं मनुष्यस्वभावास अनुसरून असणारे कित्येक दोष जसे आह्मीं स्पष्टपणें आमच्या वाचकांस कळवले आहेत, त्याप्रमाणें त्यांच्या गुणांचा कोठेंच उल्लेख केला नाहीं काय ? हरएक प्रकारच्या विद्येंत त्यांचें नांव जें साऱ्या जगभर गाजलें आहे, त्यासंबंधानें एतद्देशीयांच्या मनांत पूज्यताबुद्धीची प्रेरणा करून देण्याचा यत्न गेल्या तीन वर्षांच्या लेखांत त्यांच्या नजरेस कोठेंच आला नसल्यास त्यांच्या डोळसपणाची मोठी तारीफ केली पाहिजे ! त्याप्रमाणेंच आमच्या देशबांधवांचे जे पुष्कळ दोष व न्यूनता सर्वांस दिसताहेत त्यांचाही निर्देश आह्मीं केला नाहीं काय ? नाहीं म्हणण्यास एक मात्र केलें नाहीं खरें, कीं पिसें पांढरीं करून खबुतरांच्या मंडळींत शिरल्याबरोबर खबुतरांचे सर्व प्रकारें गुणानुवाद व कावळ्यांचें जेवढें सांपडेल तेवढें पैशुन्य काढून जगास जाहीर करणें. येवढें न केल्याबद्दल जो कांहीं दोष येईल तो पतकरण्यास आम्ही राजी आहों.

प्रस्तुत पुस्तककर्त्यांच्या वर्गांतले जे लोक आहेत त्यांचे आमच्या देशांतील नव्या मंडळीवर जे आक्षेप वरचेवर येत असतात त्यांचा शुष्कपणा येथवर दाखवला. आतां आमच्या 'इंग्रेजी भाषा' या निबंधावर या खिस्ती पंडितांनीं जें एक मोठें दूषण दिलें आहे त्यावर चर्चा करून हें चवर्येंसदर आटपतों.

आमच्या अंगीं पक्षपातित्व किती पूर्णपणें विंबून गेलें आहे हें आपल्या वाचकांस दाखवण्याकरतां 'सत्यदीपिका' कर्ते गेल्या नोवेंबरच्या अंकांत दोन मोठीं जबरदस्त प्रमाणें दाखल करतात. त्यांतील एक हें—

"इंग्रेजी भाषेंत जो ग्रंथसंग्रह आहे त्याविषयीं सांगतांना ज्यांच्या योगानें ती भाषा इतक्या उत्तम दशेप्रत येऊन पोंचली आहे असे जे धर्मसंबंधीं गद्यपद्यात्मक ग्रंथ त्यांचा तर मुळींच कोठें उल्लेख दिसत नाहीं. ह्यूम, गिबन्, जॉन् स्टुअर्ट मिल् इ० चीं नांवें दृष्टीस पडतात, परंतु कौपर्, बनियन्,[१]

१. John Bunyan (1628–1688) मूळचा टिन्मेकर् होता. पुढें १६५५ मध्यें (Bedford) बेड्फर्ड्मधील एका बॅप्टिस्ट् सोसायटींत दाखल झाल्यावर धार्मिक भावनेची उचल होऊन तो धर्मोपदेशक बनला. 'रेस्टोरेशन्' नंतर त्याला घडलेल्या तुरुंगवासांत त्यानें "Pilgrim's Progress" व "The Holy War" हे दोन उत्कृष्ट ग्रंथ लिहिले. 'सम्पादक'

पेली,[1] व्हेट्ली, वॉट्स्,[2] जॉन, न्यूटन् चामर्स्,[3] रॉबर्ट्[4] हॉल्, बट्लर्[5], इ० जे नामांकित ग्रंथकार व वक्ते झाले व ज्यांच्या ग्रंथाकडून इंग्लिश भाषेला

---

१. William Paley (1743-1805) धर्म व तत्त्वज्ञान यांवरील विख्यात लेखक ह्याच्या 'Evidences of Christianity' व 'Elements of Moral and Political Philosophy' या ग्रंथांमुळें याची फार कीर्ति झाली. 'सम्पादक'

२. Watts Isaac (1674-1748) इंग्लिश् स्तोत्रकर्ता व तत्त्वज्ञानी. पांचव्या वर्षी लॅटिन् शिकून थोडेसें भक्तियुक्त काव्य आईला रंजविण्याकरतां यानें आठव्या वर्षी रचलें. Stoke Newington येथील विद्यापीठांत सोळाव्या वर्षी अभ्यास करण्यासाठीं गेला. फाजील श्रम केल्यामुळें याची प्रकृति खालावली. प्रवचनें, फावल्या वेळांत स्तोत्ररचना व तत्त्वज्ञानविषयक लेखन हा याचा व्यवसाय होता. Lyricae (1706), Hymns (1707), Psalms of David (1719), Divine and Moral Songs for Children (1720), Logic or the Right Use of Reason in the Enquiry of Truth (1725) व Knowledge of the Heavens and the Earth made easy (1726) हे यांचे प्रमुख ग्रंथ होत. 'सम्पादक'

३. Thomas Chalmers D. D. (1780-1847) स्कॉटिश् फ्री चर्च् मिनिस्टर् व तत्त्वज्ञानी, धर्मोपदेशक व तत्त्वज्ञानावरील लेखक या नात्यानें याची फार ख्याति झाली. 'सम्पादक'

४. Hall Robert (1764-1831) इंग्लिश् बॅप्टिस्ट् भविष्यवादी व धर्मोपदेशक. अगदीं बालपणापासून याला वाचनाचा अत्यंत शोक होता. शाळा सुटल्यावर रात्र पडेतों हा एकादें पुस्तक वाचीत बसावयाचा. नवव्या वर्षाच्या आंतच बट्लर्चा 'Analogy' हा ग्रंथ व Janathan Edward चें 'Treatise on the Will' हें पुस्तक यानें वाचण्याची घाई केल्यामुळें याच्या प्रकृतीवर फार वाईट परिणाम झाला. प्राचीन वाङ्मय तत्त्वज्ञान व गणित या विषयांत याचा हातखंडा असे. 'Christianity Consistent with the Freedom of the Press (1793), 'An Apology for the Freedom of the Press' (1793), 'Modern Infidelity' (1801) 'Reflections on War' (1802)' हीं याचीं प्रमुख पुस्तकें असून Sentiments proper to the Present Crysis' या विषयावरील याचीं व्याख्यानें १८०३ सालीं प्रसिद्ध झालीं. १८०४ सालीं याचा मेंदू बिघडून त्याच दुखण्यांत शेवटीं याचा अंत झाला. हा विख्यात वक्ता व उपदेशक होता. लेखांपेक्षां याचीं भाषणेंच अधिक जोमदार असत. 'सम्पादक'

५. Samuel Butler (1612-1680) अत्यंत विनोदी कविता 'Hudibras' यानें लिहिली. याचीं अखेरचीं वर्षें अत्यंत दारिद्र्यांत गेलीं. तथापि 'वेस्ट् मिन्स्टर् अॅबे' मध्यें (In the Churchyard of St. Paul's, Covent Garden) त्याला पुरण्यांत आलें, व अशा रीतीनें जिवंतपणीं अत्यंत कंगाल स्थितींत असणाऱ्या मनुष्यास सुद्धां मेल्यावर अत्यंत मानाचें स्मारक लाभणें अशक्य नाहीं हें सिद्ध झालें. 'सम्पादक'

मातबरी व माधुर्य आलें त्यांची ह्या नि०क०स कशी माहिती नाहीं ! तसेंच खिस्ती मताच्या मंडनार्थ व नास्तिकमताच्या खंडनार्थ जीं शेंकडों पुस्तकें इंग्रेजी भाषेंत आहेत त्यांतून कांहीं तरी सांगायाचीं होतीं."

दुसरें प्रमाण—

"चॉसर्, मिल्टन् वगैरे दोन चार धर्मसंबंधी ग्रंथकारांचीं नांवें लिहिलीं आहेत, परंतु त्यांचे ग्रंथांचे विषय काय होते, व धर्माच्या योगानें इंग्लिश कवितेला केवढें साह्य झालें आहे हें कांहींच सांगितलें नाहीं."

'दीपिके'च्या कर्त्यांनीं आठव्या अंकावर टीका करतांना आरंभीं आह्मांस कळवलें होतें कीं, आह्मीं युनिव्हर्सिटीच्या परीक्षेच्या वेळीं उंटाच्या ओझ्याचीं पुस्तकें जरी वाचलीं असलीं तरी त्याच्या यागानें खिस्ती मंडळीच्या १८०० वर्षांच्या इतिहासाचेंही ज्ञान आह्मांस प्राप्त झालें असेल असें नाहीं. हें त्यांचें ह्मणणें वाजवी होतें; का कीं सरकारी विद्यालयांतून वरील विषय अगदीं शिकवीत नाहींत. पण हाच आपला उपदेश त्यांनीं वरील वाक्यें लिहितांना कसा ध्यानांत आणला नाहीं कोण जाणे ! कदाचित् त्यांस वाटलें असेल कीं, ज्या विद्वान् पाद्रीसाहेबांपासून आपण धर्मदीक्षा घेतली त्यांपासूनच त्यांचें इतर सर्व ज्ञानही आपणांस अर्थातच प्राप्त झालें पाहिजे; एकदां दत्तविधान झालें ह्मणजे झाडून साऱ्या जिनगानीवर आपला कबजा बसलाच. अशी आमच्या खिस्ती बंधूची समजूत झाली असल्यास तिनें त्यास या ठिकाणीं मोठ्या गोत्यांत आणलें असें ह्मटलें पाहिजे. इंग्रेजी भाषेस आज जी येवढी उत्कर्षाची स्थिति प्राप्त झाली आहे ती वरील धर्मोपदेशकांच्या ग्रंथांनीं झाली असून इंग्रेजी कवींसही पवित्र शास्त्रानेंच स्फुरण आलें, या दोन गोष्टी आज आह्मांस नव्याच कळल्या. हीं दोन तत्त्वें कॉलेजांतील प्रोफेसरांनीं आह्मांस कधींही सांगितलीं नाहींत, व ग्रंथांतरींही असे उल्लेख आह्मांस अद्याप आढळले नाहींत. इंग्लंडांत व युरोपांत जेवढें जेवढें ह्मणून चांगलें आहे तेवढें सर्व खिस्ती धर्माचें फळ अशीं भाविक मतें मिशनरीच्या ग्रंथांतून जशीं आढळतात, तशींच वरील दोन आमच्या धर्मपरायण बंधूनें बहुधा आपल्या 'दीपिके'त ठेवून दिलीं असावीं. पण शुभवर्तमानावरील भाव आपला अंमळ एकीकडे ठेवून व आपल्या विचारशक्तीस उकिंचित् प्रखर करून जर तो पाहील तर त्यास खचीत कळून येईल कीं, वरील मतें सत्यास फार अनुसरून आहेत असें नाहीं. वरील सर्व ग्रंथकार नामांकित आहेत खरे, व पाद्रींच्या मंडळांत तर त्यांस पुष्कळच मान आहे हें उघड आहे; पण इंग्रेजी भाषेस उत्कृष्ट दशेस आणून पोंचवण्यास कोणकोणते ग्रंथकर्ते कारणभूत झाले असें कोणीं विचारलें असतां वरील धर्मोपदेशकांचीं प्रधानत्वेंकरून कोणी नांवें घेईल असें आह्मांस वाटत नाहीं; त्यांतून धर्मविषयक ग्रंथांनीं भाषेस 'माधुर्य' हा गुण प्राप्त होणें हेंही विचित्रच आहे ! तसें जॉन् न्यूटन् सारख्यांच्या ग्रंथांनीं इंग्लंडच्या

माषेस मातबरी कितपत आली असेल याचा प्रत्यय पाहणें फार सोपें आहे. सध्यां सामान्यतः इंग्रेज लोकांचीं खाजगी पुस्तकालयें किंवा सार्वजनिक ग्रंथालयें जर पाहिलीं, तर 'सत्यदीपिके' चे आवडते असे वरील महान् महान् ग्रंथ त्यांतून सांपडण्याचा जितका संभव आहे त्याहून आह्मीं निर्दिष्ट केलेलेच पाहणाराच्या दृष्टीस पडण्याचा अधिक संभव आहे. फार तर काय, पण पवित्र शास्त्राशीं दांडगाई करणारी जी वरील ह्यूमप्रभृति मंडळी तीस तर सर्वांच्या ग्रंथसंग्रहांतून मुख्य स्थान दिलेलेंही आमच्या भाविक पुस्तककर्त्यांस पुष्कळ ठिकाणीं आढळलें असेल. असें होण्याचें कारण आह्मीं वादविषयक निबंधांत स्पष्टपणें दाखल केलें आहे; पण तें आमच्या बंधूस अर्थात् अत्यंत दुःसह होऊन त्याचें खंडन करण्याचा त्यानें प्रयत्न केला आहे. पण त्यानेंच आरंभीं मोठ्या दुःखानें कबूल केलें आहे कीं, "वास्तविक पाहतां या देशांत येणारे फारच थोडे इंग्लिश लोक खिस्ती असतात !!" हा दिलगिरीचा अनुभव सांप्रत पुस्तककारास आपल्या वर्गणीदारांवरूनच बहुधा आला असावा.

दुसरा मुद्दा इंग्रेजी कवींचा. यांस बैबलाच्या योगानें वाग्देवता कितपत प्रसन्न झाली असेल याची प्रचीति थोडी आहे.त्यांच्या काविमंडळांत धार्मिक ह्मटलें तर मिल्टन् व कौप या दोहोंखेरीज कोणी आढळतील असें वाटत नाहीं.बाकीचे पाहिले तर बहुधा सारे बेताबाताचेच खिस्ती असून कांहीं तर उघड नास्तिक होते. बियूरन् व शेली यांची ख्याति एतद्देशीय खिस्ती मंडळांतही नसेलसें नाहीं; व ड्रायडन्, पोप, चॉसर्[१] यांच्या

१. 'सत्यदीपिका' कारांनीं वरील कवीची धार्मिक ह्मणून जी वर गणना केली आहे ती पाहून हंसूं आल्याशिवाय राहत नाहीं; आमचे बंधु वरील कवीच्या पुरातनत्वावर फसून गेले असावे; पण असें असेल तर बोकेशियो महाराजांसही सन्मणिमालेंत प्रथम वंदन कां करूं नये ! नित्याच्या पवित्रशास्त्रपाठाबरोबर चॉसर्च्या 'कँटर्बरी टेल्स्' * या काव्याचाही पाठ तर ते करीत नसतीलना !

* Canterbury Tales—थॉमस् ए बॅकेट्च्या पवित्र आत्मत्यागानें माग्यशाली झालेल्या त्याच्या कबरेला वंदन करण्यासाठीं घोड्यावरून जात असलेल्या अनेक इंग्लिश यात्रेकरूंनीं सांगितलेल्या गोष्टी 'कँटर्बरी टेल्स्' या नांवानें एकत्र केल्या आहेत. पंचवीस वर्षें आधीं वारलेल्या बोकॅशिओ (Boccaccio) च्या डेकॅमेरॉन् (Decameron) वरून अनेक कथा एकत्र करण्याची कल्पना चॉसर्ला सुचली असावी. बोकॅशिओच्या पुस्तकांत १३४८ सालच्या फ्लॉरेन्स नगरी उध्वस्त करून सोडणाऱ्या प्लेगच्या आपत्तीचे वेळीं सात रंगेल बाया तीन फक्कड पुरुषांस घेऊन एका बागेंत जातात. या बाराहि व्यक्ति समान दर्जाच्या असून थोड्याच अंतरावर तडफडून मरणाऱ्या मित्रांबद्दल व शेजाऱ्यांबद्दल सहानुभूति वाटून कर्तव्यभावना जागृत होऊं नये म्हणून परस्परांचीं मनें गोष्टी सांगून रंजवीत असत. चॉसर्नें बारा रंगेल इटॅलियन् व्यक्तीऐवजीं धार्मिक भावनेनें प्रेरित झालेले

(पुढें चालू)

कुठींत तर जो ख्रिस्तीपणा आहे त्यासंबंधानें शेवटल्या न्यायाच्या दिवशीं देवपुत्रास आपल्या बापाशीं रदबदली करतांना बहुधा मोठीच पंचाईत पडणार आहे! तसेंच स्पेन्सर, शेक्सपीयर् यांच्या कवितेतही शुभवर्तमानाचा संबंध पाहूं गेलें असतां आमच्या पुराणाचा जितका सांपडेल तितकाच बहुधा वरील ईश्वरप्रणीत पुस्तकाचा सांपडेल[1] आणि त्यांतही वरील जोडीतले दुसरे जे वाग्देवतेचे प्यार म्हटलेले महाकवि त्यांच्या नाटकांत व विशेषतः दोन लहानशा काव्यांत तर जे चमत्कार आढळतात त्यांविषयीं यापूर्वी अनेकशः उल्लेख केलेच आहेत. असो; तेव्हां हें ख्रिस्ती धर्माचें गौरवही आमच्या 'दीपिका'कारांच्या माविकपणाचाच केवळ उद्गार होय; तींत 'सत्या'चा अंश म्हणण्यासारखा नाहीं.

पण हें सर्व खंडन करण्याचीही वस्तुतः पाहतां मुळींच गरज नाहीं. आमच्या आक्षेपकांनीं प्रस्तुत टीकेस हात घालण्यापूर्वी आमच्या चार अंकांचा नुसता विषयक्रम जरी वाचून पाहिला असता, तरी त्यांस कळलें असतें कीं, त्यांचे दोष केवळ निराधार होत. कां तर वरील चार अंकांत आम्हीं फक्त निबंध व इतिहास या दोन सदराचाच काय तो विचार केला आहे. या सदरांपैकीं कोणत्यांतही त्यांची 'बन्यान्' प्रभृति दोनशे मंडळी व पवित्रशास्त्राचा बचाव करणारे धर्मवीर यांस घेण्यास अवकाश नव्हता हें उघड आहे. तरी गिबन्च्या व ह्यूमच्या संबंधानें बिशप् वॉट्सन यांनीं केलेल्या ग्रंथांचा निर्देश[2] आम्हीं केला

घोडेस्वार घेतले. व त्यांजकडून निवळ चटोरपणाच्या मनोरंजक गोष्टी सांगविण्या-ऐवजीं विकट मार्गानें एकाच पवित्र ध्येयार्थ प्रवास करणाऱ्या अनेक अपरिचित व्यक्तींच्या प्रासंगिक परिचयामुळे पुनः भेटी कदाचित होणारहि नाहींत अशा कल्पनेनें संकोचरहित होऊन व परमेश्वरापुढें सर्व प्रकारचे भेद नष्ट होतात अशी खात्री होऊन, प्रवासांतील नीरसपणा नष्ट करण्याकरतां चाललेल्या गोष्टी चॉसरनें एकत्र केल्या. चॉसरचा मुख्य हेतु चर्चची अवनत स्थिति चव्हाट्यावर मांडावी हा होता.व त्याच्या योजनेप्रमाणें सार्‍या (१२८ निदान ५८) गोष्टींचा यांत समावेश झाला असता तर चर्चचें बिघडलेलें स्वरूप पूर्णपणें उघड झालें असतें. 'सम्पादक'

१. शेक्सपीयर कवीस पवित्र शास्त्रावरून कितपत प्रेरणा झाली असेल हें पुढील उताऱ्यावरून लक्षात येईल. हा उतारा आमच्या बधूस विशेषेकरून मान्य होण्याजोगा आहे हें सांगण्यास नकोच.

"His genius is unrivalled; but it is the earthly and natural he paints. Of the heavenly and supernatural—the spiritual, in the highest sense, he says nothing. His characters are all *human*. For the divine, we must turn to another book and to other Teachers."          Angus's *Handbook of English Literature*.

२. पृष्ठ ५८० पाहा. 'Apology for the Bible' चा कर्ता Richard Watson (1737—1816)          'सम्पादक'.

आहे.[१] पण हें आमच्या सत्याभिमानी 'दीपिका'कारांच्या कोठून लक्षांत यावें! त्यांचा मुख्य उद्देश जो, कीं कोणत्याही तऱ्हेनें आपले पवित्र धर्मबंधु या द्वाड पुस्तकावर जितके अधिक दांत ओंठ खातील व लाग साधल्यास सरकारच्या कानावर त्याची कागाळी वरचेवर जितकी जाईल तितकें आपलें शुभवर्तमान स्मरून आपणाला करायाचें. मग मूळचा मजकूर नीट लक्षपूर्वक वाचा काय म्हणून! शिवाय ज्यांवर त्यांनीं आपली पवित्र लेखणी फिरवली ते अंक त्यांनीं आपल्या एको 'विद्वान् व सन्मान्य' मित्राकडून आणवले, तेव्हां त्याची परत करण्याबद्दल निकड लागल्यावरून कदाचित् त्यांस ते नीटसे वाचायलाही सांपडले नसतील. असें असल्यास आमच्या ख्रिस्ती बंधूस आम्ही येथें कळवतों कीं, (पण हें कळवणेंही त्यांस कोणी कळवलेंच पाहिजे!) वरच्यासारखा पुनः कधीं काळीं योग आल्यास त्यांनीं आम्हांकडे मागणें केल्यास आमचें पुस्तक त्यांजकडे रवाना करण्यांत येईल. मग त्यांचें काम झाल्यावर तें त्यांनीं परत पाठवलें तरी चालेल किंवा आपल्यापाशींच ठेवलें तरी चालेल.

येथपर्यंत या चवथ्या आक्षेपकांच्या दूषणांपैकीं जीं विशेष विचार करण्यासारखीं होतीं त्यांच्या यथार्थत्वाविषयीं आम्हीं आपलीं मतें वाचकांस कळवलीं. त्यांवरून सदर्हू पुस्तकाचें एकंदर स्वरूप सर्वांच्या बरेंच लक्षांत येईल. आतां शरतेशेवटीं आम्हांस येवढेंच सांगायाचें आहे कीं, आम्हीं आपल्या पुस्तकावर 'सत्या'चा ठळठळीत छाप जरी मारला नाहीं, व पवित्रशास्त्राच्या योगानें पवित्र आत्म्याचा समागम नित्य घडून आमच्या ख्रिस्ती बंधूंस जो लाभ होत असेल तो जरी आम्हांस मुळींच होण्याचा मार्ग नाहीं, तरी परमेश्वरानें अवघ्या मनुष्यजातीबरोबर आम्हांस जी थोडीबहुत ज्ञानशक्ति दिली आहे, तिच्या साह्यानें आम्हांस जें कांहीं खरें खोटें, बरें वाईट वगैरे दिसतें तें आम्हीं मनोभावेंकरून आमच्या एतद्देशीय वाचकांस कळवतों. आमच्या सद्धर्मी बंधूस हातीं धरलेल्या 'दीपिके'च्या प्रकाशानें जो पक्षपातरूप महादोष आमच्या अंतःकरणांत दिसला त्याच्या वास्तव्याचें निदान आम्हांस तरी ज्ञान

१. गिबन्चें येवढें माहात्म्य वर्णून त्याच्या प्रतिपक्ष्यांविषयीं आम्हीं विशेष कां लिहिलें नाहीं याचें कारण पुढील उताऱ्यावरून आमच्या वाचकांच्या ध्यानांत येईल—

"Gibbon's *Decline and Fall* has now been jealously scrutinized by two generations of eager and unscrupulous opponents, and I am only expressing the general opinion of competent judges when I say that by each successive scrutiny it has gained fresh reputation. Against his celebrated fifteenth and sixteenth chapters all the devices of controversy have been exhausted; but the only result has been, that while the fame of the historian is untarnished, the attacks of his enemies are falling into complete oblivion. The work of Gibbon remains; but who is there who feels any interest in what was written against him? Buckle's *History of Civilization*.

नाहीं. आह्मांस ह्यूमसारखा नास्तिक सारखाच, व डॉक्टर चामर्ससारखा आस्तिक्य बुद्धीचा वक्ता व ग्रंथकारही सारखाच. दोघांतही जो ग्राह्य अंश आमच्या बुद्धीनें दिसेल तो आह्मांस तिऱ्हाईतपणानें अवश्य घेणें आहे; पहिल्याचा बुद्धि प्रभाव पाहून जसे आह्मी थक्क होतों त्याप्रमाणेंच दुसऱ्याचें अद्भुत वक्तृत्वही आह्मांस मोहून टाकतें. आमच्या प्रतिपक्ष्यांस ज्याप्रमाणें हिंदुधर्म हा केवळ तुच्छ असून सारे वेद व सारीं शास्त्रें हीं केवळ केरकचरा होते,[१] त्यासारखी पवित्र बुद्धि आमची इतर धर्मांविषयीं मुळींच नाहीं. सारें सत्य काय तें एका बुकांत सांठवलें आहे, व सारें मनुष्यजातीचे गुण जगन्नियंत्यानें एका राष्ट्रांत कोंडून भरले आहेत, हें मत आह्मांस बिलकुल पसंत नसून त्यासारखें मूर्खपणाचें व अधमपणाचें मत कोणतेंही नाहीं अशी आमची पक्की समजूत आहे. व ती आह्मीं 'यथाशक्ति' व यथावकाश गेल्या तीन वर्षांच्या अंकांत प्रगट केली आहे. हें आमच्या सत्यवादी व राजनिष्ठ बंधूसारख्यांस मुळींच न आवडून ते आह्मांस 'जुन्या शाळेचें' 'धर्मभोळे', 'इंग्रेजी राज्याचे अहितचिंतक' वगैरे[२] अमोलिक विशेषणें देतील हें उघड आहे; पण अशांच्या दांत ओंठ

१. 'सत्यदीपिके'च्या कर्त्यांनी गेल्या वर्षाच्या पहिल्या अंकांत आपल्या तीर्थरूपांचा जो जीवनवृत्तांत दिला आहे त्यांत ते आपल्या स्वतःविषयीं लिहितात—

"पुढें जसजसें त्या मुलाचें ('दीपिका'कारांचें) नवीन धर्मसंबंधीं ज्ञान वाढावत चाललें, तसतशी रा॰ पदमनजी यांची हिंदु व ख्रिस्ती धर्मांची परीक्षा करण्याची इच्छाही वाढत चालली. त्यांनीं कित्येक विद्वान्, शास्त्री व वैदिक यांस आपल्या घरीं बोलावून आणून त्यांस आपल्या मुलाशीं वाद करायास लावावें, व ते कुंठित झाले ह्मणजे त्यांस दक्षिणा देऊन वाटेस लावावें."

या दुसऱ्या वाक्यावरून आमच्या बंधूचा अगदीं आरंभींचा पराक्रम व त्याच्या वडिलांचें औदार्य हीं दोन्ही अगदीं व्यक्त होतात, व प्रभु येशूच्या धर्माचें तेज किती प्रखर आहे हेंही दिसून येतें. खरेंच, जर येशूनें बाराव्या वर्षी प्लेटोच्या व ॲरिस्टॉटलच्या शिष्यांस खुद्द अथेन्स् शहरांतील पाठशालांत वादांत हटवलें, तर त्याच्या भजकानेंही एका सराट्यास वैदिकांस व शास्त्र्यांस पार धुडकावून दिलें यांत काय आश्चर्य! तरी येवढ्या अकटोविकट विद्वानाचें पुढील पांडित्य पाहा—

"जनानां पिडा हर्तुम परमेश्वर समर्थोस्ती"

असलें लंगडें संस्कृत वरील बालपंडिताच्या पुस्तकांत आज वीस पंचवीस वर्षें लोटून गेल्यावरही आढळतें हा काय चमत्कार आहे बरें!!

२. 'सत्यदीपिके'च्या पुढील प्रकाशाकडे वाचकांनीं लक्ष पुरवावें—

"ज्यांच्या विद्येनें व प्रयत्नानें भूगोलज्ञानाची वृद्धि झाली, देशोदेशच्या व्यापाराचा मार्ग मोकळा झाला, सुधारणुकीचा व कलाकौशल्याचा प्रसार झाला, त्यास (कोलंबस वगैरे पुरुषांस) हें फारच योग्य सर्टिफिकीट ह्या १९ व्या शतकांत पुण्यग्रामवासी

(पुढें चालू)

खाण्याची व अतथ्य खटपटींची आह्मी बिलकुल पर्वा करीत नाहीं, आह्मांस जो सत्याचा व देशहिताचा मार्ग दिसत आहे त्यास अनुसरणें हेंच आह्मांस प्राप्त झालेल्या विद्येचें चीज होय, व त्यास सध्यां कितीही अडथळे आले व लोकांच्या मनांत त्याविषयीं कितीही कुत्सित कल्पना आल्या तरी त्याची योग्यता उत्तरोत्तर यथार्थपणें प्रगट होत जाईल हा आमचा कृतनिश्चय आहे.

---

निबंधमाला—हें या पुस्तकाचें तिसरें वर्ष समाप्त झालें.यास्तव प्रथमतः जगत्पाल-काचें भक्तिपुरःसर चिंतन करून व नंतर आमच्या आश्रयदात्यांचे आभार मानून सालाबादप्रमाणें एकंदर वर्षाची थोडीशी हकीकत देतों.

हें वर्षही गेल्या सालाप्रमाणेंच एकंदर जगाच्या व हिंदुस्थानच्या इतिहासांत नोंदून ठेवण्यासारखें गेलें. युरोपांत तर तुर्कस्थानच्या लढाईची गडबड साऱ्या वर्ष-भर चालून तिजपासून कोणकोणते परिणाम उद्भवणार याचें अद्याप कोणासही धोरण बांधवत नाहीं. रशियन् लोकांच्या उत्तेजनानें जे चार प्रांत बंड करून उठले होते त्यांचें तुर्क लोकांनीं यथास्थित पारिपत्य करून आपलें प्रभुत्व दृढतरपणें स्थापित केलें हें मागें एके ठिकाणीं सांगितलेंच आहे. शिवाय आज कित्येक शतकें चाललेली रूम-शामची गादी जी इकडील मोगल बादशाहीच्या बरोबरीची असून तिच्याही अगोदर स्थापली गेली,—तिच्या संबंधानें गेल्या वर्षांत जे अपूर्व फेरफार झाले व अद्याप अधिकाधिक होतें चालले आहेत तेही जगजाहीर झाले आहेत. या सर्व गोष्टींवरून आह्मां प्राच्य लोकांविषयीं ज्या पाश्चात्यांच्या अनेक कुकल्पना आहेत त्यांचें बरेंच खंडन झालें. असो; आमच्या देशांत तर गेल्या सालभर काय हालहवाल चालत होती ती सर्वांस माहीत आहेच. गेल्या सालीं महामारी व जलप्रलय या अनर्थां-पासून सारा देश जसा गलबलून गेला, तसा या वर्षी तिसराच अनर्थ कोसळून लोक-

---

इंग्लिश शिकलेल्या नि० क० कडून मिळालें! असो. आतां या सर्टिफिकीट देणा-रास जर कोणीं असें पुसलें कीं, अहो महाराज, आपण गोमुखींत हात घालून एकाद्या तीर्थाच्या जागीं गायत्री मंत्र जपत बसण्याचे, अथवा एकाद्या देवळांत बायाबाप-ड्यांस जमवून वटसावित्रीची अथवा ऋषिपंचमीची कथा सांगण्याचें सोडून येवढी जबरदस्त यातायात करून इंग्रेजी कशाला शिकलां, व असले अप्रयोजक निबंध लिहिण्याच्या खटपटींत कां पडलां तर ते काय उत्तर देतील!"

तसेंच पुढें—

"ह्या निबंधाचा दर्शनी विषय जरी इंग्रेजी भाषा हा आहे, तरी याचा सर्व रोंख इतकेंच दाखवण्याकडे आहे कीं, इंग्रेज लोकांसारखी साडेसाती या देशाला कधींच लागली नव्हती, आणि तिच्या अनिष्ट—दशाशमनार्थ निबंधकारासारखे अनुष्ठानी दुसरे कोणी मिळाले नसते."

क्षय झाला, व अद्याप ती महदशा चालूच आहे. या शतकाच्या दुसऱ्या [1] व बाविसाव्या [2] सालीं महाराष्ट्र देशावर जो कहर गुजरला होता त्याच्या सवाईनें या सालीं इकडील लोकांवर अवर्षणामुळें [3] दुष्काळाची धाड येऊन पडली. शेंकडों गांवें ओसाड पडून लक्षावधि लोकांची अन्नान्नगत झाली. गुरांची तर राखरांगोळी होऊन शेतकरी लोक भिकेस लागले आहेत. हजारों बुभुक्षित व दीन लोक जागोजाग सुरू केलेल्या कामांवर मेटाकुटीनें काम करून सरासरी प्राण रक्षण करून राहिले आहेत. ही दक्षिणेकडची स्थिति. उत्तर हिंदुस्थानांत यंदां बरीच सुबत्ता असून लोक जो संतोष मानीत आहेत तो वरुण महाराजांचा क्षोभ होऊन समुद्ररूप भयंकर जलकुंडांत साठ सत्तर हजार मनुष्यांची एकदम आहुति [4] झाली. हें भयंकर वर्तमान कर्णोपकर्णी सर्वांनीं ऐकलेंच आहे. असो; तेव्हां आतां हें आमच्या देशाचें नष्टचर्य अद्याप किती उरलें आहे व लोकस्थिति उत्तरोत्तर काय होत जाणार याची कांहींच कल्पना करवत नाहीं !

गेल्या सालीं विशेष लक्षांत ठेवण्यासारखी दुसरी एक गोष्ट घडून आली तीही येथें लिहिली पाहिजे. ही प्रसिद्ध फुल्लर् साहेबांचा खटला व त्यापासून साऱ्या हिंदुस्थानांत किंबहुना साऱ्या जगभर झालेला गवगवा होय. या खटल्यावर आमचे नवे लोकप्रिय गव्हर्नर् जनरल् यांचा अभिप्राय प्रगट झाला असतां इंग्रेजी पत्रांनीं काय गोंगाट करून सोडला, व आमच्या परम दयावंत महाराणीसाहेबांकडून वरील व्हाइसरॉयें साहेबांस काय लिहून आलें वगैरे सर्व गोष्टी वर्तमानपत्रद्वारें सर्वत्र प्रसिद्ध झाल्याच

---

१. १८०२ सालीं यशवंतराव होळकरानें पुणें लुटलें, त्यासंबंधीं हा उल्लेख असावा. 'सम्पादक'

२. हा उल्लेख कशासंबंधीं आहे समजत नाहीं. 'सम्पादक'

३. या १८७६ सालच्या दुष्काळानें चौसष्ट हजार चौरस मैलांचा प्रदेश व नव्वद लाख लोक हवालदिल झाले होते. म्हैसूर, निजामचें राज्य व मद्रासकडील कांहीं भाग हिशेबांत घेतल्यास या दुष्काळाची आंच तीन कोट रयतेस व दीड लक्ष चौरस मैल प्रदेशास लागली होती असें म्हणण्यास हरकत नाहीं. 'सम्पादक'

४. सदर उल्लेख १ नोव्हेंबर १८७६ रोजीं बंगालच्या उपसागरांत झालेल्या मोठ्या तुफानासंबंधीं आहे. या तुफानामुळें बकरगंज तालुक्यांत फारच नासाडी झाली दौलतखान शहर अजीबात वाहून गेलें. पिकासहि पुष्कळ धोका बसला. बारिसाल प्रांतांत अनेक घरें पडलीं. नावा वाहून गेल्या. डेकन शहाबनपूर बेटांत तर सत्तरऐंशी हजार माणसें मेलीं. १८६४ सालीं असेंच वादळ हुगळी नदींत कलकत्त्याजवळ झालें होतें. पण त्या वेळीं अठेचाळीस हजारपेक्षां जास्त लोक दगावले नाहींत. पण या खेपेस [ १८७६ ] सुमारें एक लक्ष वीस हजार माणसें दगावलीं असावीं, असें त्या वेळच्या वृत्तपत्रांवरून कळतें. 'सम्पादक'

आहेत. तसेंच वरील गडबडींत 'युरोपिअन्'[1] नांवाचें एक अमोलिक [2] वर्तमान-

---

१. मद्रास येथें कांहीं युरोपियनांनीं रोज सायंकाळीं प्रसिद्ध होणारें 'युरोपियन्' नांवाचें पत्र काढलें होतें. याचें धोरण 'फुल्लर्' सारख्यानरपशूंच्या अमानुष वर्तनाचें समर्थन करणें हें होतें. 'सम्पादक'

२. या पत्राचें धोरण त्याच्या Prospectus मध्यें खालीलप्रमाणें दाखल केलेलें आढळतें—

"An honest and fearless expressiou oi European thought and feeling, not only as regards our relations to the natives of this country, but towards the Government, which, from its recent action in certain cases, and from an implied future policy, seems bent on consigning the paramount race in the country to a position subordinate to that of its ignorant and degraded inhabitants,...... Government has resolved upon exalting natives at the expense of Europeans, and giving them......, what every Englishman with an ounce of brains in his head and any experience of the country must pronounce a deplorably abortive attempt at converting semibarbarians into civilised legislators......We refuse to believe that there is, in this vast continent, a single Englishman who can conscientiously affirm that he believes the native to be his equal, either morally, socially, physically ... ... ...No ! Such is impossible. We maintain that the country is our property—absolutely ours, to be governed, or disposed of in such a manner as may best suit our own interests. It is ours by the most indisputable of all rights—the right of conquest....Dispensation of justice administration of financial affairs and high executive offices in general are of too great moment to be entrusted to men who are at present in a transition stage, between the most odions and superstitious barbarism and elementary civilization. We solicit support from the European community whose interests we shall sedulously advocate. From natives we expect, no support, and, what is more, we do not desire it."

इतका लांब उतारा देण्याचें कारण फुल्लर्च्या खटल्यानंतर प्रिन्सिपॉल् वर्ड्स्वर्थ् साहेबांनीं पत्र लिहून समंजस इंग्रजांचें म्हणून जें मत प्रतिपादण्याचा प्रयत्न केला तें खरोखरी इंग्लिश् लोकांच्या मताचें कितपत निदर्शक होतें याची स्पष्ट कल्पना यावी हेंच होय. उपरिनिर्दिष्ट उद्दाम धोरणाचें पत्र चालण्यास पुरेशी आर्थिक मदत हिंदुस्तानांतल्या मूठभर गोऱ्या लोकांतून त्या वेळीं मिळूं शकली यावरून वर्ड्स्वर्थ् साहेबांचें मत हें या मूठभर गोऱ्या लोकांतील अल्पसंख्याक सज्जनांचेंच असून त्यांचें बहुमत फुल्लरी विचारसरणीच मान्य करणारें होतें, हें उघड उघड सिद्ध होतें. आणि जेतृत्वाच्या दर्पात गुंगलेल्या सामान्य माणसांकडून याहून ज्यास्त औदार्याची अपेक्षा तरी काय करावी! हिंदी बहुजनसमाजाच्या लक्षांत ही गोष्ट येत नाहीं, व आलीच तरी वर्ड्स्वर्थ् साहेबांसारख्या एखाद्या गोडबोल्या धूमकेतूमुळें त्याची पुनः दिशाभूल होते या दैवदुर्विलसितास काय म्हणावें ! 'सम्पादक'

पत्र निपजून प्रहात होतें, व एल्फिन्स्टन् कॉलेजचे प्रिन्सिपॉल् वर्ड्स्वर्थ् साहेब यांच्या पत्रावरून मिशनरी साहेबांचा व त्यांचा ख्रिस्ती धर्मप्रकरणीं एक तिसराच वाद मधें उत्पन्न झाला होता हेंही आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस निदान ऐकून तरी माहीत असेलच. असो; तेव्हां एका य:कश्चित् घोडेवाल्याच्या मृत्यूपासून इतक्या इतक्या गोष्टी निष्पन्न झाल्या !

आतां या आमच्या शहराच्या संबंधानें पाहतां गेल्या वर्षाप्रमाणें यंदा कांहीं विशेष लिहिण्यासारखें घडलें नाहीं. तरी येथें सत्यपराक्रम स्वामी [१] श्रीमध्वाचार्य यांची स्वारी बरेच महिने असून बालविवाहाच्या संबंधानें एक दोन सभा [२] झाल्या, ही एक ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट झाली. श्रीस्वामी हे गेल्या सालीं गाजलेल्या परमहंसाहून [३] फार निराळ्या तऱ्हेचे [४] आहेत. त्यांचा काळ वृथापुष्टत्व संपादण्यांत व पाखंडवाद करण्यांत गेला नसून त्यांच्या मोठ्या अधिकारास शोभा आणणारे व संन्यासिधर्मास आवश्यक जे अनेक गुण ते सर्व त्यांचे ठायीं आहेत. सध्यांच्या काळीं फार विरळ आढळणारी जी शास्त्रविद्या तींत ते स्वतः चांगले निष्णात असून तिचें अध्यापन आपल्या शिष्यवर्गास करवण्यांत व सर्व यतिधर्म आचरण्यांत त्यांचें कालक्रमण होत असतें. असो; तर अशा योग्य पुरुषास अध्यक्षस्थान देऊन येथील पुढारी

---

१ श्रीमत्परमहंस परिव्राजकाचार्य सत्यपराक्रम श्रीमध्वाचार्य स्वामी महाराज यांची स्वारी पुण्यांत १८७६ च्या जूनच्या सुमारास दाखल झाली. सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत बालविवाह कसा बंद करतां येईल याचा विचार करण्याकरतां विद्वज्जनांची एक सभा बोलावण्यांत आली. शास्त्राधार शोधण्यांत आले. अनेक विद्वानांचीं भाषणें झालीं व सुमारें एक महिन्यानें निर्णय जाहीर करण्याचें आश्वासन देण्यांत आलें. पण त्याप्रमाणें घडून मात्र आलें नाहीं. २८ सप्टेंबर रोजीं सदर स्वामींस एक मानपत्रहि देण्यांत आलें. सदर स्वामीमहाराजांनीं शिष्यांच्यापासून खंडणी घेण्याकडेच लक्ष न देतां ३ सप्टेंबर १८७६ रोजीं शनवारवाड्यांत प्रचंड दानधर्म केला. 'सम्पादक'

२. दुसरी सभा खासगीवाल्यांच्या वाड्यांत ८ आक्टोबर १८७६ रोजीं स्वामींच्या अध्यक्षतेखालीं होऊन तींत बालविवाहाला अनुकूल व प्रतिकूल अशीं अनेक भाषणें झालीं. पण अखेर निर्णय मात्र कांहींच झाला नाहीं.

३. दयानंदसरस्वती. 'सम्पादक'

४. स्वामींनीं शनवार-वाड्यांत ३ सप्टेंबर १८७६ रोजीं पांच हजार लोकांस दक्षिणा वांटून व पुढें नोव्हेंबरमध्यें रोज पांचशें लोकांस मुक्तद्वार जेवण घालून आपल्या शक्तीबाहेर दानधर्म केला. अशा तऱ्हेचें दातृत्व यापूर्वी फक्त चारच लोकांनीं गाजविलें. त्यांचीं नांवें:—१ श्रीमंत खंडेराव महाराज, बडोदा. २ श्रीमंत बायजाबाई शिंदे. ३ श्रीमंत तुकोजीराव होळकर. ४ धारचे पवार. 'सम्पादक'

लोकांनीं मोठ्या महत्वाचा जो बालविवाह विषय त्यावर सान्या लोकसमाजापुढें प्रसिद्धपणें भवति न भवति करण्याचा जो उद्योग केला तो परम स्तुत्य होता यांत संशय नाहीं. पण एकंदर वादाचा जो प्रकार सर्वांच्या दृष्टीस पडला तो पाहून थोड्याच समजंस व सभ्य जनांस खेद झाल्याशिवाय राहिला असेल. प्रथमत: तर दोहों पक्षांकडील पंडितसमुदाय पाहिला असतां पुण्यासारख्या शहरांतही शास्त्रविद्येचा न्हास होतां होतां किती निकृष्टतेची अवस्था तीस प्राप्त झाली आहे हें मनांत पूर्णपणें बिंबण्यासारखें होतें. ज्या ठिकाणीं पूर्वी मोठमोठ्या नामांकित पंडितांचे अनेक वेळां वादप्रसंग झाले असतील त्याच ठिकाणीं वरील वीरसमुदाय पाहून आखाड्यांत भारी भारी कुस्त्या सान्या आटपल्यावर बालमल्लांची झटापट लागलेली पाहून जशी मौज वाटते तशीच वरील प्रसंगीं वाटण्यासारखी होती. बरें हा जो छोटा वाद झाला तो निदान शांतपणानें व सभ्यपणानें तरी चालायाचा होता! अध्यक्षस्थानीं स्वामींस बसवलें होतें, व एकंदर सभेंतही चांगली संभावित व विद्वान् मंडळी होती; तेव्हां अशा प्रसंगीं अप्रयोजक कोट्या, अद्वातद्वा भाषण, विदूषकी प्रकार अगदीं अयोग्य होते हें कोणीही कबूल करील. पण यांची तर दोन्ही वेळीं जी चंगळ चालली होती ती पाहून मंडळीस फाल्गुन मासाचीच आठवण झाली.[१] याखेरीज दुसरा एक मोठा अश्लाघ्य प्रकार वरील प्रसंगीं सर्वांस स्पष्ट दिसून आला. तो आमच्यांत प्रमुखपणानें मिरवणारी जी विद्वान् मंडळी तिचें दंभयुक्त व कुटिल आचरण होय. याचा नवा मासला वरील परमहंसांच्या संबंधानें सर्वांस असा दृष्टीस पडला कीं, माजी परमहंसांच्या प्रमाणेंच यांसही आपल्या मधुर वाग्जालानें बद्ध करण्याचा वरील देशहितेच्छूंनीं प्रथमत: आपल्याकडून पुष्कळ घाट घातला. एका वर्षापूर्वी मूर्तीस गटारांत झुगारून देऊन त्यांच्या परम द्वेष्ट्यास जसें त्यांनीं हत्तीवर बसवून त्यांचा जयजयकार केला, व स्वस्थानीं प्राप्त झाल्यावर त्यांची आरती केली; त्याप्रमाणेंच त्या गोष्टीस कांहीं महिने लोटत नाहीं ( त ! सं० ) तोंच मूर्तिपूजेचा तापलेला छाप हातीं धारण

१. वरील आमचा उल्लेख बाहेरच्या लोकांस बहुधा अत्युक्तीचा वाटेल, व तो खरोखर तसा वाटण्यासारखाही आहे. कारण पुण्यासारख्या शहरांत व त्यांतून मोठमोठ्या विद्वानांच्या सभेंत अडाणीपणाची वर्तणूक कोणी करील हें संभवत नाहीं. पण प्रस्तुत प्रसंगीं एका पंडितांच्या तोंडून निघालेलीं दोन वाक्यें येथें मासल्याकरितां देतों. त्यावरून आमच्या लेखाचें तथ्य वाचकांस बरेंच कळून येईल. बालविवाह हा रूढिमार्ग ह्मणून कोणी शास्त्री प्रतिपादन करीत असतां वरील पंडित वक्तृत्वाच्या व लोककल्याणेच्छेच्या आवेशांत त्यास बोलले—" काय राव बोलतां ! " असें बोलाल तर येथल्या येथें हापटून टाकीन ! " असें मुद्दाम वाणीचें स्फुरण वरील दोन्ही प्रसंगीं प्रगट होत होतें. त्यावरून आह्मांस तर तुकारामाच्या सर्वप्रसिद्ध अभंगाची व हितोपदेशांतील पुढील श्लोकाची आठवण झाली—

अतीत्य हि गुणान् सर्वान् स्वभावो मूर्ध्नि वर्तते ।।

करणाऱ्या स्वामींच्या ते भजनीं लागले. त्यांच्या पायांवर डोचकीं ठेवतांना व त्यांचा प्रसाद मोठ्या भाविकपणानें ग्रहण करतांना दयानंदजींचे शिष्य आपली स्वामिभक्ति अगदीं विसरून गेले. तसाच सरतेशेवटीं माजी जगद्‌गुरूंच्या प्रमाणें या मूर्तिपूजकांच्या गुरूंचेंही आमच्या मंडळीनें भक्तिपूर्वक गीर्वाण वाणीनें स्तवन केलें.[1] पण इतक्या मानसन्मानास व शेवटल्या वाङ्मौक्तिकांसही हे नवे परमहंस जेव्हां मुळींच भुलले नाहींत, व इतक्या युक्तीनें जाळें पसरल्याचे श्रम जेव्हां अगदीं व्यर्थ गेले; तेव्हां सदहू देशहितेच्छूंस स्वामींचा भारी राग आला. मग काय! पूर्वी जी त्यांवर पुष्पवृष्टि होत होती तीच पुढें निराळ्या तऱ्हेची होऊं लागली. ज्यांच्या तोंडून स्वामींच्या विद्वत्तेची व समंजसपणाची निरंतर स्तुति ऐकूं येत असे, व ज्यांनीं आपल्या प्रचंड विद्वत्तेचा व सरकारी हुद्दयाचा अभिमान क्षणभर एकीकडे ठेवून स्वामींच्या पदाब्जीं आपलें अत्युच्च मस्तक लववलें, त्यांच्याच तोंडून पुढें लवकरच त्यांच्या मूर्खत्वाचा महिमा कानावर येऊं लागला. लोककल्याणाच्या कामाला स्वामी जर मदत करणार नाहींत तर पुण्याच्या लोकांची त्यांच्यावर गैरमर्जी होईल अशा प्रकारच्या अप्रयोजक सूचना[2] वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध होऊं लागल्या. पण पहिल्या गौरवानें व हांजीहांजीनें सत्यपराक्रम स्वामींस जसा विशेष आनंद झाला नाहीं, तसा पुण्यजनांच्या या रोषापासूनही त्यांस विषाद न वाटून त्यांनीं त्यांच्या धमकीकडे बिलकुल लक्ष दिलें नाहीं. असें होतां होतां बालविवाहाची गडबड पुढें लवकरच नाहींशीं झाली.'[3]

---

१. २८सप्टेंबर रोजीं पुण्याच्या कित्येक सद्‌गृहस्थांनीं स्वामींस संस्कृत मानपत्र दिलें. सदर मानपत्र पुणें हायस्कूलमधील संस्कृत भाषेचे गुरु वे.शा. सं. रघुनाथशास्त्री शेंडे यांच्या एका विद्यार्थ्यानें तयार केलें होतें. 'सम्पादक'

२. २५ सप्टेंबर १८७६ च्या ज्ञानप्रकाशांत एक पत्र आलें होतें त्यांत "अमुक गोष्ट आह्मांस संमत आहे अथवा शास्त्रदृष्टीनें मुलांचें वय अमुक वर्षें प्रशस्त आहे असें सांगण्यास स्वामींस कोणचीहि हरकत नाहीं. स्वामींनीं आपलें मत पुण्यांतील पंचवीस शिष्ट असामींसमक्ष सांगितलेंच आहे.पण तें अजून सर्व लोकांस उघडपणें जाहीर झालेलें नाहीं. स्वामींनीं जर हें कार्य केलें नाहीं तर स्वामींच्या वर नगरवासी जन असंतुष्ट होतील व स्वामींस पुण्यांत यश मिळालेसें होणार नाहीं याकडे स्वामींनीं लक्ष दिलें पाहिजे. विद्येचें पीठ व दक्षिण हिंदुस्थानचें शिरोरत्न असें जें हें पुण्यनगर येथील लोकांची मर्जी राखण्यास स्वामींनीं कांहींच केलें नाहीं असें ह्मणावें लागेल" अशा अर्थाचा मजकूर होता. 'सम्पादक'

३. बालविवाहनिषेध वगैरे जीं लोककल्याणाचीं कामें आहेत तीं साध्य करण्याविषयीं आमच्यांतील प्रमुख मंडळीचे उपाय मोठे चमत्कारिक दिसण्यांत येतात. आपल्या लोकांत लहानपणीं लग्न करण्याची जी वाईट चाल आहे ती मोठमोठ्या सभा केल्यानें

( पुढें चालू )

आतां सरतेशेवटीं या पुस्तकाविषयींही नेहेमीप्रमाणें कांहीं मजकूर लिहून एकंदर वर्षांचा कारभार आटपतों. या सालींही आमचे वर्गणीदार बरेच वाढून आमच्या एका मित्राच्या साह्यानें एका संस्थानाकडून आह्मांस बराच आश्रय मिळाला आहे हेंही आमच्या हितचिंतकांस कळवणें इष्ट दिसतें. तशींच ठिकठिकाणांहून निरनिराळ्या विषयांवर आह्मांकडे पत्रें येऊन त्यांचीं उत्तरेंही प्रसंगविशेषीं आह्मीं दिलीं. श्री॰ बापूसाहेब कुरुंदवाडकर[1] यांचें गेल्या ऑगस्ट महिन्याच्या अंकांतील

---

व निरनिराळ्या ऋषींचीं नांवें काढून भवति न भवति केल्यानें बंद होणार आहे काय? अशा सभांनीं फार तर अमुक अमुक पंडित मोठे शास्त्रप्रवीण आहेत व मोठे वक्ते आहेत अशा प्रकारची प्रसिद्धि अज्ञान लोकांत कोणाकोणास मिरवायास सांपडेल इतकेंच. यापलीकडे कांहीं कार्य होणें नाहीं. पण इतकेंही करून समजा कीं, धर्मशास्त्राचा मथितार्थ कोणीं पंडितांनीं काढलाच, व स्वामींनीं आपला सत्यपराक्रम गाजवून त्यावर आपली अधिकारमुद्राही ठोकली तरी त्या नुसत्या शिक्क्याच्या अक्षरांचा प्रभाव तो काय प्रगट होणार? स्वतःवर बालविवाहाचा प्रसंग आला असतां आईच्या किंवा बायकोच्या तोंडास वरील मुद्रा जाऊन बसेल काय? किंवा स्वतः-च्याच हौसेनें आपल्या लाडक्या मुलाचीं हाडें भाजून आमचे लोककल्याणेच्छुच सर्वांस जेव्हां सांगूं लागतील कीं, आह्मी या कार्यांत प्रमुख असलों ह्मणून काय झालें? आह्मी स्वतः याप्रमाणें वागूं ह्मणून तुह्मांस कोणीं सांगितलें? तेव्हां तरी वरील श्रींची आज्ञा तोंडांत मारल्यासारखीच गपचीप बसणार कीं नाहीं? तेव्हां या सर्व कृत्यांत स्वामींनीं मोठा शहाणपणा केला असें आह्मी समजतों कीं आमच्या पंडितमंडळीच्या वाङ्माधुर्यास भुलून (त्यांनीं? सं॰) माजी परमहंसांप्रमाणें आपली फटफजिती निष्कारण करून घेतली नाहीं!

१. पूर्वी पेशव्यांच्या ब्राह्मण सरदारांत प्रधानत्वेंकरून ज्या कुलाची गणना होती, हैदर, टिप्पू, निजाम अशा सारख्यांसहि वरचेवर जेर करून प्रत्यक्ष मुंबई सरकारच्या मोहिमेचीहि धूळदाण ज्यांनीं केली व ज्यांतील दोघां पुरुषांस अलीकडे मुंबई कायदेकौन्सिलांत जागा मिळाल्या होत्या व ज्यांचा सरकारांत बडेजाव असे अशा राजकुलांत कुरुंदवाडकरांचा जन्म झाला असून सेवकवर्ग, ख्यालीखुशालीची मंडळी, हांजीहांजीवाली मंडळी इतक्यांच्या गर्दीतून मुख्य गादीपर्यंत विद्येचा रिघाव होत नाहीं. या नियमाला अपवादभूत असें लक्ष्मी व सरस्वती यांच्या साहचर्याचें विरळ दिसणारें उदाहरण म्हणजे बापूसाहेब कुरुंदवाडकर होते. त्यांचा संस्कृत व मराठीचा व्यासंग सतत चालू असून इंग्रेजीशींहि थोडाफार परिचय होता. 'भट्टवंश' काव्याचे हे कर्ते असून 'गंगा' या विषयावर 'दक्षिणा प्राइझ' कमिटीकडून यांस दुसरें बक्षीस मिळालें होतें. 'सम्पादक'

पत्र[1] हें वरील सर्वांत विशेष महत्त्वाचें होय; व तें त्यांच्यासारख्या थोर पदवीच्या गृहस्थाकडून आल्यामुळें तर त्याची योग्यता विशेषच वाढली हें उघड आहे. त्यास जे गेल्या अंकांत[2] आह्मांकडून उत्तर गेलें त्याच्या योगानें एतद्देशीय प्राचीन कवींविषयीं आमच्या वाचकांच्या मनांत जर कांहीं जिज्ञासा उत्पन्न होईल, तर तिजबद्दल त्यांनीं वरील कुलीन पत्रकारांचे आभार मानणें उचित होय. असो; गेल्या बारा अंकांत मागला अवशिष्ट राहिलेला 'मुक्तामाले' चा भाग आटपून भर्तृहरीच्या तिन्ही शत-

---

१. गणपतराव हरीहर कुरुंदवाडकर यांचें पत्र बत्तिसाव्या (आगस्ट १८७६ च्या) अंकांत आलें असून त्यांत "मल्लिनाथादिकांच्या मोठमोठ्या संस्कृत काव्यांवरील सर्वमान्य टीकांत शब्दार्थ, अलंकारनिदर्शन, व्याकरणाच्या अडचणींचा खुलासा या तीन चार ठरीव गोष्टीच असून इंग्रेजी टीकाकारांप्रमाणें मूळ काव्यांतील रसविशेषात्मक स्थलें, वर्णनाच्या खुब्या वगैरे प्रकार आढळत नाहींत त्यामुळें त्यांच्या मतें सारे कवि सारखेच, सान्यांचीं काव्यें उत्कृष्टच व सारींच पद्यें बहारीचीं असावीं अशी वाचकांची समजूत होईल. पाश्चात्यांहून विद्वत्तेंत अति वरचढ असूनहि एतद्देशीय पंडितांस कालिदासादि कवींचीं मर्में पाश्चात्यांप्रमाणें समजत नाहींत" अशा अर्थाच्या कविपंचकांतील कालिदासावरील निबंधाच्या उपोद्घातांत शास्त्रीबोवांनीं केलेल्या विधानावर खंडनपर टीका केली होती. 'सम्पादक'

२. सदर उत्तर नोव्हेंबर १८७६ च्या ह्मणजे ३५ व्या अंकांत आलें असून त्यांत कुरुंदवाडकरांच्या आक्षेपांचें निरसन केलें आहे. त्यांत "विद्वत्त्व व कवित्व हे दोन गुण फार भिन्नच नव्हेत तर परस्परविरोधी आहेत, निदान त्यांचें नित्य साहचर्य तरी नाहीं. रसिकत्वाची अत्युत्कट अवस्था म्हणजेच कवित्व, तेव्हां विद्वत्तेचा व रसिकत्वाचाहि विरोध असतो; पण कामी व कामिनी यांच्या ठायीं समानत्वानें संचरणाऱ्या प्रणयवृत्तीप्रमाणें कवि व रसिक हे समानधर्मीय असून स्वानुभवाच्या बाबतींत परस्पराभेदच असतो." अशा अर्थाचें विवरण केलें असून पुढें त्याचा सोदाहरण विशेष विस्तार केला आहे. व आपल्या ह्मणण्याच्या पुष्ट्यर्थ गीतगोविंदकार जयदेव यांच्या प्रसन्नराघवांतील (मागें तिसऱ्या अंकांत पृष्ठ ३२ चे अखेर आलेला) उतारा देऊन 'विद्वत्कवित्वमिव केकिरुतं न रेजे।' [म्हणजे 'मयूरांचा शब्द विद्वानांच्या कवित्वाप्रमाणें गोड लागेना'] हें भोजप्रबंधांतील वचन व 'नैव व्याकरणज्ञमेति पितरं न भ्रातरं तार्किकं। दूरात् संकुचितेव गच्छति पुनश्चाण्डालवच्छान्दसात्। मीमांसानिपुणं नपुंसकमिति ज्ञात्वा निरस्तादरा काव्यालङ्करणज्ञमेत्य कविताकान्ता वृणीते स्वयम्॥' हें सुभाषित उद्धृत करून आपल्या विधानाला संस्कृत कवींचाहि पाठिंबा आहे असें शास्त्रीबोवांनीं सिद्ध केलें. सदर पत्र व त्याचें उत्तर हीं दोन्ही या आवृत्तींत प्रविष्ट केलेलीं नाहींत.

'सम्पादक'

कांचें वामनकृत प्राकृत भाषांतरही संपूर्ण झालें. ¹ तसेंच वसंतर्मांच्या साहित्यांत कळवल्याप्रमाणें संस्कृत कवींचीं शिरोरत्नें जे कालिदास व भवभूति त्यांवरचे आमचे निबंध छापून प्रसिद्ध झाले. पुढील तिन्हींही क्रमाक्रमानें लवकरच प्रसिद्ध होतील.

या पुस्तकाविषयीं ठिकठिकाणच्या संबंधानें लोकमत या वर्षी विशेष झाला; वास्तव यासंबंधानेंही कांहीं लिहिलें पाहिजे. हा लोकमत मोडून टाकण्या-विषयीं यापूर्वी अनेक वेळां आम्ही वाचकांस अभिवचन दिलें आहे; पण त्याप्रमाणें कल्पची-गति आटोपण्याचा अद्याप योग आला नाहीं. हें केवळ आमच्या ढिलेपणामुळें होत आहे असा पुष्कळांचा समज झालेला दिसतो; व त्याप्रमाणें गेल्या वर्षांत मधून मधून आमच्या प्रतिपक्ष्यांच्या व मित्रांच्या आम्हांस सूचनाही आल्या. आतां यांपैकीं पहिल्या ( पहिल्यांच्या ! सं० ) आक्षेपास तर मुळींच उत्तर देण्याची गरज नाहीं. उलटें आम्ही असें मात्र समजतों कीं, वरील आक्षेप आमच्या पुस्तकास कांहीं अंशीं भूषणरूप होय; कां कीं, दुसरे दोष काढावयास न सांपडल्यामुळें बरोबरीनें कांहीं तरी पोकळ दूषणें त्यांस हुडकणें प्राप्त पडतें. आतां या दूषणादूषकालेरीज इतर जे कोणी प्रांजळपणानें सदरील पुस्तकास नांवें ठेवीत असतील कीं, हें महिन्याचे महिन्यास न निघाल्यामुळें वाचकांचा आशाभंग होतो व त्यांस विनाकारण पुष्कळ दिवस तिष्ठत बसावें लागतें, त्यांस मुद्दां आमचें असें सांगणें आहे कीं, ते फक्त आपल्या स्वतः-पुरताच विचार करून दुसऱ्याचे श्रम विशेष लक्षांत आणीत नाहींत. जो लेख तास दोन तासांत ते वाचून पार करतात तो प्रथमतः मनांत पूर्णपणें आणण्यास, देखणेपणें

---

१. भर्तृहरीचें जें भाषांतर आम्ही गेल्या अंकांत समाप्त केलें त्याहून निराळेंच एक आम्हांपाशीं सध्यां आहे. हें पूर्वीच मिळालें असतें तर बहुधा त्यासोबत कदाचित् छापलें असतें. याचा कर्ता कोण हें बरोबर कळत नाहीं. शेवटल्या पृष्ठांत १७१२ हा शक घालून खालीं हा श्लोक आढळतो—

महायोगी भर्तृहरी कृती वैराग्यसंभवी ।
ब्रह्मानंदें समश्लोकी केली टीका तुका म्हणे ॥

वरील ग्रंथ आम्हांस मिळाल्याचा वृत्तांत तर त्याहूनही चमत्कारिक आहे. तो आमच्या एका विद्वान् मित्रास वाण्याच्या दुकानीं सांपडून त्यानें त्याला किंमत देऊन त्याच्या हातून सोडवून आणला. दुसऱ्या एका ग्रंथाची अशीच सोड-वण्यानें दुर्गति टळली. तो संस्कृत भाषेंतील मोठ्या ग्रंथांपैकीं असून परम दुर्मिळ जो 'कथासरित्सागर' तो होय. वाग्देवीच्या अपत्यांची आमच्या देशांत अशी दुर्दशा होत असावी हें केवढें दुःखास्पद व लज्जास्पद आहे! असो; येथें शेवटीं आमच्या वाचकांस ही सूचना केल्यावांचून राहवत नाहीं, कीं आमच्या वरील मित्रासारखा कोणास लाभ झाल्यास त्यानें पैशाचा लोभ न धरतां त्याच्यासारखें ग्रंथ सोडण्याची संधि दवडूं नये!

हवा तसा यथास्थित उतरण्यास, त्याच्या समर्थनार्थ किंवा मंडनार्थ ग्रंथातरींचे आधार काढून ते दाखल करण्यास,व अवांतर माहितीच्या टिपा बहुधा दर एक पृष्ठास जोडण्यास किती काळ लागत असेल हें मनांत आणलें असतां, तसेंच त्यापुढें वरील कच्चा खर्डा ठशांवर पडून त्याचें पुनः पुनः शोधन करून ती स्वच्छ कागदावर पडे तोंपर्यंत व त्यापुढले अनेक संस्कार होऊन पुस्तकें अखेर टपालाच्या पेटींत पडत तोंपर्यंत किती विलंब होत असेल याचाही अंमळ विचार केला असतां, आमच्या पुस्तकाकडे वाचकांची विशेष कडक नजर होणार नाहीं असें आह्मांस खचीत वाटतें. शिवाय आमच्या देशाची युरोपांतील देशाप्रमाणें अशी अद्याप स्थिति आली नाहीं, कीं केवळ लोकाश्रयावर ग्रंथकाराचा चरितार्थ चालून इतर व्यवधानें त्यास मुळींच धरण्याची गरज नाहीं. हें ज्या दिवशीं होईल त्या दिवशीं वरील अडचण तेव्हांच दूर होऊन सांप्रत राज्यांत लिहिण्याचें स्वातंत्र्य जें आपणांस अनुकूल आहे त्याचेंही अधिक चीज करतां येईल. तेव्हां वरील गोष्ट, व त्यांतून हें पुस्तक कोणाच्या मदतीशिवाय चाललें आहे, हेंही आमच्या हितचिंतकांनीं मनांत आणलें पाहिजे. आतां आमचा एक विदर्भदेशीय मित्र आह्मांस कळवतो कीं, "पुणें मुक्कामींच 'सत्यदीपिका' या नांवाचें मासिक पुस्तक निघत असतें, त्याचा नियमितपणा आपल्या नियमितपणाशीं नि० मा० कर्ते जर ताडून पाहतील तर फार चांगलें होईल." तसेंच तो आणखी असेंही ह्मणतो कीं, आह्मी वर्गणीदारांच्या हाकाटीकडे बिलकुल लक्ष न देतां 'वाटेल तेव्हां पुस्तकचे राहिलेल्या अंकापैकीं एकादा अंक तयार करतों.' या दोहों ह्मणण्यांवर आमचें उत्तर येवढेंच आहे कीं, आमच्या खिस्ती बंधूचा नियमितपणा आमच्या पुस्तकाचे ठायीं आणण्याविषयीं आह्मी वरील मित्रास वाटलें तसे केवळ बेफिकीर आहा असें नाहीं. त्याचा स्तुत्य क्रम अनुसरण्याची आमची पूर्ण इच्छा आहे व तीप्रमाणें आमचा उद्योगही चालू आहे; ज्या महिन्याचा त्या महिन्याला आमचा अंक जरी वाचकांच्या हातीं न पडला तरी वर्षांचे सरासरीनें बारा अंक त्यांच्याकडे जातात. एकादा अंक निघण्यास जसा महिना उलटून जातो तसा एकादा पंधरा दिवसांनींही वाचकांस मिळतो. शिवाय वरील सूचना करणाऱ्या आमच्या मित्रानें हेंही लक्षांत ठेवायाचें होतें कीं 'दीपिका' पेटवण्यापेक्षां 'माला' गुंफण्याचें काम पुष्कळ निराळ्या तऱ्हेचें आहे. ती सर्वांशीं सारखी असून दोहों पुस्तकांचें सर्व प्रकारें जर साम्य असतें, तर वाचणारांस हाकाटी करण्याचा व त्याच्यासारख्यास सूचना लिहिण्याचाही प्रसंग फार करून आला नसताच!

सारांश, या गोष्टीच्या संबंधानें आमच्या वाचकांस पुनः आमचें विनयपूर्वक कळवणें आहे कीं, सदहू पुस्तकाच्या अनियमितपणाचीं वर सांगितलीं त्यांव्यतिरिक्त दुसरीं कोणतींही कारणें नाहींत. तें जितकें उपयुक्त व वाचकांस पसंत होईल तितकें करण्याचा आमचा मुख्य उद्देश असल्यामुळें प्रसंगानुसार कमज्यास्त वेळ लागल्या-

बद्दल आह्मी फारशी फिकीर करीत नाहीं; तसेंच वाचकांनींही केलें पाहिजे. त्यांनीं असें मनांत आणलें पाहिजे कीं, घटकाभर बसलें कीं, पांच सहा पानें लिहून टाकलीं असें जॉन्सन्सारखें सामर्थ्य आमच्या अंगीं नाहीं; व इकडील छापखान्यांचीही स्थिति इतकी अद्याप सुधारली नाहीं, कीं अंगावर मूळ प्रत टाकून दिली कीं, लागलींच थोड्या दिवसांत आयती बुकें घ्यावीं. शिवाय दर खेपेस नव्या नव्या विषयांवर रचना करण्याचें काम सुट्टी न घेतां व रजा न मागतां वर्षानुवर्ष एकट्यानें नियमित वेळांत सतत करीत असणें हें बरेंच श्रमाचें आहे हें आह्मीं स्वतः सांगितलें पाहिजे असें नाहीं. यास्तव तें स्वसंतोषानें व उत्साहपूर्वक कोणी हातीं घेतलें असतां त्यांत जें जें उणें पडेल तें तें आमच्या सुज्ञ व उदार देशबंधूंनीं संभाळून घेतलें पाहिजे हें उघड आहे!

---

## डॉक्टर जॉन्सन्.

सूरतसे कीरत बडी विना पंख उड जाय।
सूरत तो जाती रही कीरत कभूं न जाय॥ तुळशीदास.

अंक ३३.–(१) प्रस्तुत विषयाचें अपूर्वत्व. (२) त्यावर लिहिण्याचा उद्देश. (३) जॉन्सन्चा जन्म व बाल्यावस्था. (४) त्याचें अध्ययन. (५) अभ्यासाचा प्रकार. (६) बापाच्या मरणानंतर उपजीवनार्थ उद्योग. (७) विवाह–विद्यालयस्थापन–लंडन् शहरास प्रस्थान. (८) गॅरिक्.

१. प्रस्तुतसारख्या विषयाचें विवेचन आमच्या भाषेस अनेक प्रकारांनीं केवळ अपूर्व होय. एक तर असें कीं, या भाषेंत किंबहुना हिंदुस्थानांतील जुन्या नव्या कोणत्याही भाषेंत, चारित्रलेखनाचा प्रकार मुळींच आढळत नाहीं. इतिहासाच्या अभावामुळें एकंदर राष्ट्राविषयींची जुनी माहिती जशी अगदीं बुडाली, त्याप्रमाणेंच चारित्रांच्या अभावीं प्राचीन काळीं होऊन गेलेल्या महान् महान् पुरुषांचें वृत्तही केव्हांच समूळ नष्ट होऊन गेलें आहे. आतां 'शंकरविजय,' 'ललितविस्तार,' 'भोजप्रबंध' वगैरे कांहीं ग्रंथ संस्कृतांत व मराठींत 'भक्तिविजय,'[1] 'संतलीलामृत,'[2] अशांसारखे देशांत कांहीं आहेत

---

१. भक्तविजय असें नांव पाहिजे. हा ग्रंथ तुकारामबोवांचा दृष्टांत झाल्यामुळें नाभाजी व उद्धवचिद्घन यांच्या ग्रंथाधारें लिहिला आहे असें लेखकच ग्रंथारंभीं सांगतो. 'सम्पादक'

२. संतलीलामृत एकाच ग्रंथाच्या आधारानें न लिहितां अनेक ग्रंथ व अनेक पुरुष यांपासून मिळालेल्या माहितीच्या आधारें रचला आहे. यांत दृष्टांतादिकांची रेलचेल असल्यामुळें हा ग्रंथ बराच मोठा झाला आहे. 'सम्पादक'

खरें;[१] पण पुराणांत व इतिहासांत जितकें अंतर तितकेंच वरील ग्रंथांत व खऱ्या चरित्रांत. ग्रीक् व रोमन् लोकांत प्लूटार्क्,[२] कॉर्नेलियस्

१. 'शंकरविजयां'त बौद्धांचें खंडन करून ब्राह्मणधर्माची ह्मणजे वैदिक मार्गाची ज्यांनीं पुनः संस्थापना केली त्या प्रख्यात जगद्गुरूंचें चरित्र वर्णिलें आहे; 'ललितविस्तरां'त अर्ध्या मानवजातीभर जो धर्म आज हजारों वर्षे पसरला आहे त्याचा आद्यगुरु जो शाक्यसिंह, गौतम किंवा बुद्ध त्याचा वृत्तांत दिला आहे; 'भोजप्रबंधां'त भोज राजा व त्याच्या पदरचे जे कालिदासादि विख्यात कवि त्यांज-विषयींच्या दंतकथा आहेत. शेवटले दोन महीपति* कृत ग्रंथ तर प्रसिद्धच आहेत.

* महीपतिबोवा कांबळे ताहराबादकर; वडिलांचें नांव दादोपंत; मातोश्रींचें गंगाबाई. हे ऋग्वेदी वासिष्ठगोत्री देशस्थ ब्राह्मण होते. महिपतिबोवांचा जन्म त्यांच्या वडिलांच्या वृद्धपणीं शके १६३७ मध्यें झाला. शिक्षक मोरोबा तांभेरकर. वडील यांच्या सोळाव्या वर्षी वारले. त्यामुळें संसाराचा भार अंगावर पडतांच लहानपणचा हुडपणा नाहींसा झाला. यांचें शिक्षण जितक्यास तितकें, अक्षरहि अगदीं साधारण पण घटलेलें, मोडीपेक्षां बालबोध ज्यास्त चांगलें असून भाषा कुणबाऊ आहे. यांनीं सुमारें पन्नास वर्षांचे सुमारास ग्रंथलेखनास सुरुवात केली. भक्तविजय हा ग्रंथ शके १६८४ मध्यें पुरा झाला. यांत भक्तचरित्रें आलीं असून तुकारामचरित्राचे अध्याय फारच सरस वठले आहेत. कथासारामृत या दुसऱ्या ग्रंथांत व्रतांचें ( कार्तिक–माघ-वैशाख–महात्म्यें व एकादशी–महात्म्य ) वर्णन आहे. हा शके १६८९ मध्यें संपला. भक्तविजयानंतरहि पुष्कळ चरित्रें राहिलीं ह्मणून संतलीलामृत ग्रंथ शके १६८९ मध्यें लिहून संपविला. पुढें भक्तलीलामृत ( पहिले दोन ग्रंथ होऊनहि फार चरित्रें राहिल्यामुळें ) शके १६९६ मध्यें संपविला. यानंतरचा रामदास व बावाजी गोसावी या दोघांच्याच चरित्रांचा अपूर्ण ग्रंथ संतविजय होय. हा संपण्यापूर्वीच महीपति-बोवा शके १७१२ मध्यें वारले. बोवांच्या या चार ग्रंथांखेरीज भक्तिरसपूर्ण पश्चात्ताप-युक्त 'अपराधनिवेदनस्तोत्र' व पंतांच्या संशयरत्नमालेची आठवण करून देणारें 'पांडुरंगस्तोत्र' ( शके १६८८ ) हे यांचे किरकोळ ग्रंथ होत. 'सम्पादक'

२. Plutarchus—ग्रीक् तत्त्वज्ञानी व चरित्रकार; क्लॉडिअस् ( Claudius ) च्या कारकिर्दीत चॅरोनी ( Chaeronea ) येथें जन्मला. डॉमिटिअन् ( Domitian ) च्या कारकिर्दीत तो रोम येथें व्याख्यानें देत असे. आयुष्याच्या उत्तर भागांत मॅजि-स्ट्रेटचें व धर्मोपदेशकाचें अशी कामें त्यानें चॅरोनी येथें केलीं. ग्रीक् व रोमन् महा-पुरुषांचीं चरित्रें हा याचा ग्रंथ अत्यंत लोकप्रिय झाला असून याच्या इतके वाचक दुसऱ्या कोणत्याहि प्राचीन ग्रंथाला लाभले नाहींत. व याचें कारण ह्मणजे त्याचीं चरित्रें विश्वसनीय व चरित्र-नायकांचीं शब्दचित्रें हुबेहुब देणारीं असून चरित्रकाराच्या धंद्यांतील कसबांत त्यानें पूर्णपणें प्रावीण्य मिळविलें होतें. Moralia ( or Ethical works ) या नांवानें त्याचे बाकीचे साठवर लेख प्रसिद्ध झाले आहेत. याचा मृत्यु-काळ निश्चित नाहीं. 'सम्पादक'

नीपॉस्[१] वगैरे चारित्रकार जसे होऊन गेले तसा प्रकार इकडे बहुधा कधींही झाला असेलसें वाटत नाहीं. तर वरील विषय एतद्देशीयांस अत्यंत अपरिचित वाटण्याचें हें एक कारण आहे.

आतां इंग्रज सरकारचा या देशावर अंमल सुरू झाल्यापासून पाश्चात्य विद्येचा इकडे जसा प्रचार होत चालला तसा त्याबरोबर वरच्यासारख्या ग्रंथरचनाविशेषाचाही प्रचार वस्तुतः पाहतां व्हावयाचा होता. पण वरील विद्येचा उपक्रम येथील लोकांत नुकताच झाला असल्यामुळें व वरील रचनाविशेष अगदीं नवाच पडल्यामुळें अद्याप त्याविषयीं लोकांत विशेष अभिरुचि उत्पन्न झालेली नाहीं. कांहीं वर्षांमागें इंग्रजी भाषेंत प्रथम प्रवेश होऊन आमच्या विद्वान् मंडळीस मराठी भाषेंत ग्रंथरचना करण्याची जोंपर्यंत वरीच होस वाटत असे, तोंपर्यंत इतर विषयांप्रमाणें या विषयावरही बरेच ग्रंथ झाले; पण हल्लीं त्यांपैकीं एक मात्र सर्वप्रसिद्ध आहे. बाकीचे बहुतेक बुडाल्यासारखेच आहेत.[२] आजपर्यंत लोकाश्रयास

१. Cornelius Nepos—सिसेरो (Cicero) ॲटिकस् ( Atticus ) व कॅटलस् ( Catullus ) यांचा स्नेही व समकालीन; व्हिरोना ( Verona ) चा राहणारा. हा ऑगस्टस्च्या कारकिर्दीत वारला. याचे पुष्कळ ऐतिहासिक ग्रंथ असून प्रसिद्ध सेनापतीच्या चरित्रांचा Vilae Excellientium Imperatorum हा ग्रंथ उपलब्ध आहे. पण हस्तलिखितांत हा ग्रंथ एमिलिअस् प्रोबस् ( Aemilius Probus ) च्या नांवावर दाखल आहे. मात्र ( Cato the Censor ) केटो व ( Atticus ) ॲटिकस् यांचीं चरित्रें नीपॉसचींच म्हणून सर्वमान्य आहेत. 'सम्पादक'

२. गेल्या वीस पंचवीस वर्षांत सॉक्रेटिस्, कोलंबस्, लूथर, नाना फडनवीस, कॅप्टन् कुक्§ वगैरेंच इतक्यांचीं चरित्रें प्रसिद्ध झालीं. शिवाय दोन तीन वर्षांपूर्वी दक्षिणा प्रैज कमिटीकडून पसंत झालेलीं वॉशिंग्टन्, फ्रांक्लिन्,† लॉर्ड् क्लैव हीं चरित्रें इंदुप्रकाशांत छापलीं गेलीं. याखेरीज अलीकडे रा० विनायक कोंडदेव ओक यांनीं केलेलीं 'शिकंदरबादशाहा,' 'पीटर् धि ग्रेट' व 'ड्यूक ऑफ् वेलिंग्टन्'‡ हीं सरकारानें विकत घेऊन प्रसिद्ध केलीं आहेत. पण इतक्या सर्व चरित्रांत सॉक्रेटिसाचें मात्र चोहोंकडे प्रसिद्ध असून तिसऱ्या आवृत्तीपर्यंत त्याची मजल पोहोंचली आहे.

§ Captain James Cooke ( 1728-1779 ) धाडसी खलाशी. 'Voyages Round the World,' हा याचा ग्रंथ उत्कृष्ट साधला आहे. यानें ग्रेट् ब्रिटन्करतां पुष्कळ अज्ञात प्रांत व विशेषतः ( Sandwich Islands ) सँड्विच् बेटें शोधून काढलीं. हवाई ( Hawaii ) येथें याचा खून झाला. १९१२ सालीं याचा पुतळा ( whitby ) व्हिट्बी येथें उभारण्यांत आला. 'सम्पादक'

† Benjamin Franklin ( 1706-1790 ) विख्यात अमेरिकन् मुत्सद्दी व

[ पुढें चालू † फ्रांकलिन् , शिकंदर—अलेक्झांडर दी ग्रेट, पीटर दी ग्रेट व ड्यूक ऑफ् वेलिंग्टन ‡ या टिपा पुढील पानावर पाहा. ]

पात्र झालेल्या मासिक पुस्तकांतून तरी 'प्रसिद्धपुरुषचरित्रें' म्हणून मूळ संकल्पांत घातलेलें एक सदर जरी नेहेमी असे व अद्यापही आहे, तरी फार करून हें सदर कोरडेंच राहत गेलें आहे. कधीं मधीं एकाद्या विख्यात पुरुषाचा वृत्तांत आलाच तर तो चारपांच पृष्ठांहून बहुधा अधिक नसतो. याचें कारण उघडच आहे. इक-

तत्त्वज्ञानी. प्रथम हा मुद्रणाचें कार्य करी. 'Poor Richard's Almanac' प्रसिद्ध होतांच याच्याकडे लोकांचें लक्ष वेधलें. नंतर अनेक शास्त्रीय प्रयोग करून यानें विद्युद्वाहक-तैचा (Lightning Conductor) शोध लावला. हा दहा वर्षे General Assembly चा सभासद होता आणि पुढें अठरा वर्षे आपल्या संस्थानाचा एजंट् म्हणून ब्रिटन्मध्यें राहिला व परत आल्यावर युनायटेड् स्टेट्सची घटना तयार करण्याच्या कामांत यानें बराच भाग घेतला. 'सम्पादक'

§ Alexander the Great (खि. पू. ३५६–खि. पू. ३२३) मॅसिडोनियाचा राजा, आपला बाप फिलिप् याच्या पश्चात् खि. पू. ३३६ मध्यें गादीवर बसला. यानें क्रमानें थीबन् लोकांचा व पार्शियन् राजांचा पराभव केला, डेरायसला पदच्युत केलें, सिरिया व फोएनिशिया हे देश पादाक्रांत करून भूमध्य समुद्राच्या किनाऱ्यावरील सर्व शहरें काबीज् केलीं व ईजिप्त जिंकून अलेक्झांड्रिया वसविलें. पुढें एक मोठें साम्राज्य स्थापून बाबिलोन हें प्राचीन शहर त्या साम्राज्याची राजधानी करावी या हेतूनें तो बाबिलोनला गेला पण अकराच दिवसांत वारला. 'सम्पादक'

ꜱ Peter the Great. (1672-1725) हा १६९६ सालीं रशियाचा झार झाला व सैन्य आणि आरमार यांची पुनर्रचना करून Deptford येथें जहाजांचें बांधकाम शिकला. १७०३ सालीं यानें सेंट्पीटर्स्बर्ग् वसविलें. पुल्टोवा (Pultowa) च्या लढाईत एका स्वीडिश् शिपायाची पत्नी त्याच्या पश्चात् पीटर्च्या हातीं कैदी म्हणून सांपडली. तिला पीटर्नें सेंट्पीटर्स्बर्गला नेऊन तिशीं लग्न केलें व तिनेंहि चातुर्यानें त्याची सत्ता दृढतर केली. 'सम्पादक'

‡ Arther Wellesly Duke of Wellington (1769-1852) एकोणिसाव्या शतकांतील अत्यंत विख्यात ब्रिटिश सेनापति. १७८७ सालीं हा सैन्यांत शिरला. हिंदुस्थानांत यानें इतकी मर्दुमकी गाजविली कीं १८०५ सालीं त्याला नाइट् (Knight) करण्यांत आलें. पुढें 'पेनिन्शुलर् वॉर्' मध्यें नेपोलिअन्च्या सैन्याविरुद्ध १८०९ सालीं यानें Talavera येथें जय मिळविला. व्हिक्टोरिया येथें यानें मिळवलेल्या जयानें तर पॅरिस्मध्यें दोस्त सैन्यांचा प्रवेश निश्चित झाला व नेपोलिअनलाहि राज्यत्याग करावा लागला. इंग्लंडांत याचा जयजयकार होऊन १८१४ सालीं याला पॅरिस् येथें ब्रिटिश वकील म्हणून पाठविलें. पुढें नेपोलिअन् (Elba) एल्बाहून निसटला, पण वॉटर्लू (Waterloo) च्या लढाईत वेलिंग्टन्नें त्याचा नक्षा पूर्णपणें उतरविला. १८२८–३० पर्यंत वेलिंग्टन् मुख्य प्रधान व १८४२ पासून पुढें कमांडर् इन् चीफ् होता. त्याचा St. Paul's मधील अंत्यविधि अत्यंत संस्मरणीय झाला. 'सम्पादक'

डील देशांत चरित्रलेखनाचा प्रचार पूर्वीपासून मुळींच नसल्यामुळें इकडच्या विख्यात पुरुषांचा जीवनवृत्तांत लिहिण्याचें मूळच खुंटलें; तेव्हां युरोपांत होऊन गेलेल्या नामांकित पुरुषांच्या संबंधानेंच काय तो लिहायास सांपडणार. पण तिकडची नुसती भूगोलसंबंधीं सुद्धां माहिती इकडील लोकांस चांगलीशी असण्याची पंचाईत; मग तिकडील लोकाचारांविषयीं व ज्यांचें नांवही पूर्वी ऐकलें नाहीं अशा प्रसिद्ध पुरुषांच्या चरित्रांविषयीं त्यांस जिज्ञासा उत्पन्न होण्याचा कितीसा संभव आहे?

तर याप्रमाणें हें पुढील चरित्र, एक तर ही नवीन ग्रंथपद्धति ह्मणून व शिवाय ती कांहींशी सुरू केली असतां पुनः मागें पडली,या दोहों कारणांनीं आमच्या वाचकांस अपूर्व वाटणारें आहे. पण इतकेंच नव्हे, पुढील लेखांत आणखी दोन नवे प्रकार वाचकांस आढळतील. पहिला हा कीं, आजपर्यंत महाराष्ट्रभाषेंत जीं जीं चरित्रें रचलीं गेलीं तीं कोणी विख्यात राज्यकर्ता, कोणी विख्यात शोधक, कोणी विख्यात तत्त्वज्ञ, अशांविषयींचीं होतीं. प्रस्तुत लेखाच्या विषयाप्रमाणें केवळ ग्रंथकाराचें चरित्र कोणीं लिहिलें नाहीं. दुसरा विशेष असा कीं पुढील वृत्तांत कोणत्या एका ग्रंथाच्या आधारानें रचला आहे किंवा कशाचें भाषांतर आहे असा नाहीं. तर अनेक ठिकाणची माहिती गोळा करून ती वाचकांस चरित्ररूपानें सादर केली आहे.

२. आतां सदरील लेखास वरील विषय निवडण्याचा हेतु काय व यापासून वाचकांस लाभ तो काय होणार याविषयीं अगोदर थोडेंसें लिहिलें पाहिजे. चरित्रवाचनापासून सामान्यतः कोणते लाभ आहेत ते तर आज कोणालाही सांगायाला नकोत; तेव्हां ते प्रस्तुत लेखापासूनही होणारे आहेत हें उघडच आहे. पण कोणी कदाचित् ह्मणतील कीं, जॉन्सन्सारख्याच्या आयुष्यांत येवढया मोठ्या वर्णन करावयाजोग्या गोष्टी कोणत्या घडलेल्या असणार? तो अमुक वर्षी जन्मला, अमुक वर्षी मेला, त्यानें अमुक अमुक ग्रंथ केले, त्यावरून त्याचा असा असा लौकिक झाला, इतकेंच त्यांत असायाचें कीं नाहीं? मोठमोठ्या राजांच्या वगैरे कथांत जसें मन रमून जातें तसें प्रस्तुत विषयांत काय होणार? असा जे आक्षेप करतील त्यांस आमचें असें उत्तर आहे कीं, वरील समजूत जर खरोखरच त्यांच्या मनांत बिंबून गेली असेल, तर चरित्रांच्या वाचनापासून होणारा वास्तविक फायदा त्यांस बिलकुल कळलाच नाहीं असें ह्मटलें पाहिजे. मनोरंजन किंवा चित्तास चमत्कार भासणें याच लाभाची चरित्रवाचनापासून जर कोणी अपेक्षा करीत असेल, तर वरील हेतु कादंबरीपासून किंवा नाटकापासून जसा साध्य होईल तसा प्रस्तुत प्रबंधविशेषापासून होणार नाहीं. शिवाय चरित्रांचा उपयोग जर हा आहे, कीं त्यांपासून संसारास व लोकव्यवहारास उपयोगी असा सदुपदेश प्राप्त होतो, तर हा उपदेश मोठमोठ्या सार्वभौम राजांच्या लढाया वाचल्यापासून ज्यास्त होईल, कीं सामान्य लोकांस ज्या अडचणी व जे प्रसंग येतात ते त्यांच्या सारख्याच मनुष्यांनीं कसे टाळले किंवा ते कसे उदयास आले हें समजल्यानें ज्यास्त होईल बरें? तर हें सर्व मनांत आणील त्यास खचीत असें वाटल्या-

वांचून राहणार नाहीं कीं, ज्या विख्यात पुरुषाचें चरित्र आह्मी लिहावयास सरसावलों आहों तो जरी शिकंदराप्रमाणें सगळें भुवन जिंकून आणखी भुवनें जिंकायास नाहींत, ह्मणून एकीकडे तोंड करून रडला नाहीं, त्यानें जरी कोलंबसाप्रमाणें नवें जग शोधून काढलें नाहीं, किंवा वाशिंग्टनाप्रमाणें नव्या जगांत नवें राज्य स्थापन केलें नाहीं, तसेंच सॉक्रेटिसाप्रमाणें त्यानें जरी स्वर्गलोकींचें तत्त्वज्ञान भूलोकास आणलें नाहीं, किंवा हिंदुस्थानच्या म्याकिबेलाप्रमाणें[1] 'खूप शर्तीनें राज्य राखिलें' नाहीं, तरी चरित्राचा विषय होण्यास त्याची योग्यता वरील महाजनापेक्षां कोणत्याही प्रकारें कमी नसून पुष्कळ अंशीं उलटी ज्यास्तही आहे.

पण इतकेंच नव्हे तर प्रस्तुत चरित्राचें वर जें सामान्यतः महत्त्व सांगितलें त्याशिवाय त्यापासून विशेषतः आणखी कित्येक लाभ आहेत. कोणा एका इंग्रेज ग्रंथकारानें असें ह्मटलें आहे कीं, जॉन्सन् यास त्याच्या राष्ट्राचा प्रतिनिधिभूत मानला असतां चालेल, ह्मणजे सान्या इंग्लिश् लोकांत सामान्यत्वेंकरून जे गुण आढळतात त्यांचा समुच्चय वरील व्यक्तींत आढळतो. हें कसें हें पुढें क्रमाक्रमानें व्यक्त होत जाईल. तर प्रस्तुत लेखावरून एतद्देशीय लोकांस इंग्रेजांच्या स्वभावाविषयीं व त्यांच्या आचार विचाराविषयीं वगैरे बरेंच ज्ञान होईल, हा एक त्यापासून उपयोग होणार आहे. दुसरा असा कीं, जॉन्सन्च्या वेळची इंग्लंड्ची स्थिति व सध्यांची आपल्या देशाची स्थिति यांत अनेक प्रकारचें साम्य आहे; यास्तव इकडूनही वरील स्थितीचें ज्ञान होणें हें इष्ट आहे. तशीच तिसरी गोष्ट ही कीं, वरील नामांकित ग्रंथकाराच्या वेळीं कित्येक मोठमोठ्या गोष्टी घडून येऊन मोठमोठे बुद्धिमान् पुरुष प्रख्यातीस चढले होते. तेव्हां त्यांचाही मुख्य कथानकाच्या अनुषंगानें निर्देश होऊन वाचकांस सहजरीत्या तितकी ज्यास्त माहिती होऊन मनास करमणूकही होईल.

३. याप्रमाणें प्रकृत लेखाच्या अपूर्वत्वास्तव त्याच्या संबंधानें सामान्यतः येवढा प्रस्ताव अगोदर केला. आतां मुख्य विषयास आरंभ करूं.

डॉक्टर्[2] सॅम्युएल् जॉन्सन् याचा जन्म इंग्लंड् देशांत स्टॅफर्ड्-

---

१. नाना फडणवीस Macchiavelli, Nicolo (1469-1527) हा फ्लॉरेंटाइन् (फ्लॉरेन्सचा रहिवाशी) मुत्सद्दी व इतिहासकार होय. हिकमतीनें राज्य कसें करावें याची अप्रतिम मीमांसा याच्या 'Il Principe' या ग्रंथांत असल्यामुळें त्याची ख्याति आज शतकानुशतक कायम टिकली आहे. यानें (Florence) फ्लॉरेन्सचा इतिहासहि लिहिला आहे. 'सम्पादक'

२. आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच कीं वरील उपपद 'भट्ट' आचार्य 'पंडित' यांच्या सारखें केवळ सन्मानार्थक होय. 'डॉक्टर्' हा शब्द एतद्देशीय भाषांतून 'इंग्रेजी वैद्य' या अर्थी जरी रूढ होऊन गेला आहे, तरी त्याचा मूळचा अर्थ 'विद्वान्', 'निष्णात,' इतकाच आहे. जॉन्सन् यास ऑक्स्फर्ड् युनिव्हर्सिटीनें 'एल्एल्. डी.' हा किताब त्याच्या विद्वत्तेस्तव व तत्कालीन ग्रंथकर्त्यांत तो अग्रगण्य होता यास्तव आपण होऊन पाठवून दिला.

शायर्‌मध्यें[1] लिच्‌फील्ड्[2] नांवाच्या गांवीं इ॰ स॰ १७०९ या वर्षी झाला. याचीं आईबापें गरीब अवस्थेंतच होतीं; तरी तीं शालस व संभावित असल्यामुळें त्यांस त्यांच्या गांवीं बराच मान असे. एकदां तर जॉन्सन्च्या बापास लिच्‌फील्डचा मॅजिस्ट्रेटही नेमला होता; पण त्याचा नेहेमीचा धंदा म्हटला म्हणजे पुस्तकें विकण्याचा होता.[3] त्याचें दुकान मोठें असून, त्यास जवळचे ग्रंथ स्वतः चांगले समजत असत; यामुळें त्याचा लौकिक इतर पुस्तकविक्यांपेक्षां फार असे. जॉन्सन् यास लहानपणींच 'स्क्रॉफ्युला'[4] या नांवाचा एक रोग झाला होता; तो त्याच्या कुळींतलाच होता असें कोणी म्हणतात, व कोणाच्या मतीं ( तें ! सं० ) तो त्याच्या दाईच्या संसर्गानें त्यास लागला. तो जाण्याविषयीं जॉन्सन्च्या[5] आईबापांनीं पुष्कळ औषधोपचार करून पाहिले, पण कांहीं गुण आला नाहीं. शेवटीं त्यांनीं आपल्या तीन वर्षांच्या मुलास त्या वेळची राज्यकर्त्री बी ॲन राणी तिजकडे नेलें. पण तिच्याही हस्तस्पर्शानें कांहीं कार्य झालें नाहीं.

४. जॉन्सन्च्या विद्याभ्यासाचा आरंभ लिच्‌फील्ड् येथील शाळेंतच झाला. त्या शाळेंत सगळीं मुलें नादार घेत असत; त्यामुळें जॉन्सन्च्या गरीब आईबापांवर

---

१. Staffordshire येथें लोखंड व दगडी कोळसा विपुल सांपडत असल्यामुळें 'Black Country' म्हणून हा प्रांत प्रसिद्ध आहे. 'सम्पादक'

२. Lichfield. 'सम्पादक'

३. हा धंदा इकडील देशांत अद्याप चांगलासा सुरू झाला नाहीं. विलायतेंतील पुस्तकें विकणारे लोक येथील मेमणांसारखा नुसता व्यापार करतात असें नाहीं; तर त्यांचे मोठमोठे छापखाने असून ते स्वतः पुस्तकें छापतात. दर वर्षास लाखों पुस्तकें तयार होऊन त्यांचा खपही तसाच जंगी चाललेला असतो. मार्ग स्कॉट्, मेकॉले वगैरे ग्रंथकारांस मिळालेला जो पैसा सांगितला आहे त्यावरून त्यांचे ग्रंथ छापणाऱ्या पुस्तकवाल्यास तर काय किफायत झाली असेल याची वाचकांनींच कल्पना करावी !

४. Scrofula—गंडमाळा. दूषितरक्तजन्य असें हें दुखणें वेळींच उपाय न केल्यास क्षयावर जातें. प्रथमावस्थेंतच Muriate of Calcium, कॉड्लिव्हर तेल व सातूचें सत्त्व घेतल्यास उपयोग होतो. वेळींच उपाय करून पू वगैरे काढून न टाकल्यास व्रण राहतात. 'सम्पादक'

५. जॉन्सन्च्या शरीरास राणीसाहेबांचा हात लावण्याचें कारण हें कीं, त्यास जो रोग झाला होता त्यावर राजस्पर्श हें मोठें रामबाण औषध आहे असा त्या वेळेस लोकांचा समज होता. असला प्रकार युरल् नदीच्या दुसऱ्या तीरीं घडत असता तर लागलीच तो 'वेडगळ' व 'रानटी' झाला असता हें उघडच आहे !

त्याच्या शिक्षणाबद्दल कांहीं खर्च पडला नाहीं. या शाळेंत लॅटिन् व ग्रीक या दोन्ही भाषांचें व त्यातून पहिलीचें त्यानें चांगलें ज्ञान संपादन केलें. पुढें कांहीं वर्षें तो घरींच राहून आपल्या बापाच्या दुकानचें काम कांहीं पाहूं लागला. त्याचा स्वभाव अगदीं लहानपणापासून पराकाष्ठेचा स्वच्छंदी असे; सारखें बसून कोणतेंही काम पुष्कळ वेळ करीत असणें हें त्यास कधींही आवडलें नाहीं. तेव्हां शाळेंत व घरीं मिळून जो त्यानें अभ्यास केला तो सगळा अशाच प्रकारचा. त्याची बुद्धि अतिशयित चलाख असल्यामुळें हवा तो विषय त्यास तेव्हांच समजे; व स्मरणशक्तिही विलक्षण असल्यामुळें जें त्यानें एकदां वाचलें किंवा ऐकलें तें त्याच्या मनांतून कधींही जात नसे. पण सारखा नेट लावून असा अभ्यास त्यानें कधींच केला नाहीं. शरीरानें चांगला घट्टपुष्ट व मला मक्कम असल्यामुळें शाळेंतील उनाड पोरांत त्याचा पहिला नंबर असून कांहीं दांडगाई किंवा दंगा करणें असल्यास सर्वांचा मो ( म्हो ! सं० ) रक्या हाच होई. या गुणांमुळें व नित्याचे धडे कधीं लक्ष लावून तयार न केल्यामुळें त्यावर चवदाव्या रत्नाचा प्रयोग वारंवार होई. या प्रयोगाचें महात्म्य तो शेवटपर्यंत वर्णीत असे; व म्हणे कीं, माझ्या पंतोजीनें जर मला मरे मरे तों खूप मारलें [1] नसतें तर माझ्या हातून कांहीं शिकणें झालें नसतें.[2] असो; पुढें एकोणिसाव्या वर्षी तो ऑक्स्फर्ड युनिव्हर्सिटींत मोडणारें जें पेंब्रोक कॉलेज तेथें एका श्रीमंत मुलाचा सहाध्यायी [3]

---

१. या पंतोजींचें नांव हंटर् (Mr. Hunter). हे अत्यंत कुशल तसेंच कडक अध्यापक होते. लॅटिन्मध्यें यांचा हातखंडा असे. निष्ठुरपणें आपल्या विद्यार्थ्यांस झोडपून काढते वेळीं हंटर्साहेब म्हणत. ( ,And this I do to save you from the gallows. ) आईच्या कडक शिस्तीमुळें सुवृत्त बनलेल्या कांहीं तरुणींना पाहून एकदां जॉन्सन् म्हणाला—'Rod, I will honour thee for this thy virtue.' 'संम्पादक'

२. 'छडी वाजे चम् चम्, विद्या येई घम् घम्' या वचनाचा पुरस्कार वरील पंडित नेहेमी करीत असे. तो ह्मणे कीं, पोरांकडून शाळेंतील धडे तयार करून घेण्यास वादीसारखें दुसरें साधन नाहीं. त्यांस लाजवून व परस्परांत ईर्ष्या उत्पन्न करून वरील हेतु सिद्धीस नेण्याचा यत्न करणें हे बरोबर नाहीं. कां कीं, त्याच्या योगानें मत्सरादि दुष्ट भाव लहानपणींच मुलांत वाढूं लागतात. आलीकडे मोठमोठ्या शाळांतूनही जो दांडगाईचा व टारगेपणाचा प्रकार दृष्टीस पडतो, व वेळेनुसार शाळागुरूंची शोभा राहत नाहीं, याकडे लक्ष दिलें असतां चौदाव्या रत्नाचा अंमल दिवसेंदिवस ढिला पडत चालला आहे हें कोणासही इष्ट वाटणार नाहीं.

३. इंग्लंडांत अशी चाल आहे कीं, श्रीमंतांचीं मुलें विद्याभ्यासाकरतां कॉलेजांत पाठवलीं म्हणजे त्यांच्याबरोबर अभ्यास करण्याकरतां सोबती ह्मणून दुसरीं गरीब मुलें त्याच्यापाशीं ठेवेतात. यांचा खर्च अर्थातच त्या आईबापांवर किंवा पालकांवर असतो. वरील अर्थी ' सहाध्यायी ' हा शब्द योजला आहे. याचा नेहेमीचा अर्थ

( पुढें चालू )

म्हणून गेला. [१] पण पुढें कांहीं दिवसांनीं त्या मुलानें कॉलेज सोडलें; तेव्हां याचा मुख्य आधार सुटला. तरी मोठ्या पंचाइतीनें त्यानें आणखी कांहीं दिवस येथें काढले. याप्रमाणें एकंदर तीन वर्षे येथें राहून शेवटीं युनिव्हर्सिटीची डिग्री (किताब) न घेतांच त्यास आपल्या घरीं परत यावें लागलें.

५. जॉन्सन्चें विद्याध्ययन म्हणजे गुरुमुखानें विद्याग्रहण करणें हें येथेच आटपलें, यापुढें तसा योग त्यास आलाच नाहीं. यापुढें जें त्यानें ज्ञान संपादन केलें तें केवळ स्वतःच्याच श्रमानें, म्हणजे शेंकडों पुस्तकें वाचून व जगाचे व्यवहार पाहून केलें इतकेंच. यापूर्वी तरी त्याची जेवढी विद्या झाली होती तेवढ्यांत गुरूंच्या शिकवणीपेक्षां स्वतःच्या जिज्ञासेनें व परिश्रमानेंच त्यास अधिक ज्ञान प्राप्त झालें होतें. त्याच्या बापाच्या दुकानीं पुष्कळ निरनिराळ्या विषयांवर रचलेले ग्रंथ होते. ते यानें तब्येत लागेल तेव्हां वरचेवर उलथे पालथे करीत असावे. जेवढें मौजेचें वाटेल तेवढें वाचून कंटाळा आला कीं, तितकेंच टाकून द्यावें. याप्रमाणें लॅटिन्, ग्रीक्, इटॅलियन् वगैरे भाषांतील ग्रंथांशीं खेळतां खेळतां या लहानग्या पोरानें इतकें ज्ञान मिळवलें कीं, तितकें मोठमोठ्या विद्यानिष्णात म्हणवणाऱ्या पंडितांसही नव्हतें. ऑक्सफर्डमध्यें प्रवेश झाला त्या पहिल्या दिवशींच जॉन्सन्नें एका लॅटिन् ग्रंथकाराचें वचन बोलण्याच्या ओघांत मधेंच झोंकून दिलें; तें ऐकून त्याचे गुरु जागच्या जागीं अचंबा करीत राहिले! तसेंच तेथें असतां पोप कवीचा 'मेसाया' म्हणून एक काव्याचा चुटका नुकता प्रसिद्ध झाला होता त्याचें लॅटिन् भाषांतर [२] विद्यार्थ्यास दिलें असतां तें जॉन्सन्नें कसें उडवून दिलें याविषयीं मागें [३] एके ठिकाणीं [अंक १२ मध्यें] सांगितलेंच आहे. याशिवाय त्याच्या एका विद्यालयस्थ गुरूनें [४] बॉसवेलपाशीं काय

---

पाहिला असतां 'बरोबर अभ्यास करणारा,' 'गुरुबंधु' इतकाच होतो.

१. हा मुलगा (Shropshire) श्रॉप्शायरमधील असून जॉन्सन् Pembroke कॉलेजांत ३१ आक्टोबर १७२८ रोजीं दाखल झाला. 'सम्पादक'

२ Mr. Jordan नामक गुरुजींनीं जॉन्सन्ला न समजूं देतां त्याच्या वृद्ध वडिलांकरतां हें भाषांतर छापून काढलें तेव्हां जॉन्सन्ला फार राग आला. १७३१ सालीं ऑक्सफोर्ड येथें हस्बंड्स् (Husbands) नामक एक गृहस्थ A Miscellany of Poems प्रसिद्ध करीत असे. त्यांत जॉन्सन्चें Messiah चें भाषांतर आलें. त्यावर Scaliger चें खालील नम्रत्वसूचक अवतरण घालण्यांत आलें होतें:—"Ex alieno ingenio Poeta, ex suo tantum versificator." पोपनें या भाषांतराची फारच प्रशंसा केली. 'सम्पादक'

३. पृष्ठ १७४ ओळी १७–१९ पहा. 'सम्पादक'

४. (The Reverend Dr. William Adams) रेव्हरंड डॉक्टर् ॲडम्स्

पुढें चालू

ह्मटलें तेंही प्रसिद्धच आहे. तो ह्मणाला, "मी जॉन्सन्चा उगीच नांवाचा मात्र गुरु होतो, खरोखर पाहतां तो माझ्याहूनही वरचढ होता."

प्रस्तुत विख्यात ग्रंथकाराच्या शिक्षणाचा वर जो वृत्तांत सांगितला आहे त्यावरून आमच्या मार्मिक वाचकांच्या लक्षांत एक मोटी महत्त्वाची गोष्ट आल्यावांचून राहणार नाहीं. ती ही कीं, मनुष्यानें विद्येंत किंवा कोणत्याही गुणांत निपुणत्व पावणें हें त्याच्या स्वप्रयत्नाधीन जितकें आहे तितकें त्याच्या शिक्षकांच्या ज्ञानावर किंवा श्रमावर नाहीं. आजपर्यंत मोठमोठे विद्वान् ग्रंथकर्ते जे या पृथ्वीच्या पाठीवर होऊन गेले आहेत त्यांचा गुरूंपासून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा अंश व पुढें त्याच्या परिश्रमानें तें जितकें वाढलें तो अंश यांची जर परस्परतुलना केली तर पहिला दुसऱ्यापुढें कांहींच नाहीं असें नेहेमी दिसून येईल. यास्तवं ज्यास ज्ञानप्राप्तीची इच्छा असेल त्यानें त्याविषयीं स्वतः उद्योग केला पाहिजे; शिक्षकांचें काम मुख्यतः दिग्दर्शनापक्षां दुसरें नाहीं. हल्लीं युरोपांत व अमेरिकेंत मुद्रणकलेचा अतिशयित प्रसार होऊन पुस्तकें अगदीं स्वल्प किंमतीस मिळूं लागल्यामुळें, व तीं सर्व विषयांवर व सर्वांस सहज समजतील अशा प्रकारचीं झाल्यामुळें, शिक्षकाचीही गरज बहुतेक अंशीं नाहींशी झाली आहे. यामुळें शेंकडों मोठमोठे ग्रंथकार असे निपजले आहेत कीं त्यांस शिकविण्यास कोणाचीच गरज लागली नाहीं; त्यांचें सर्व ज्ञान त्यांस स्वतःसिद्धच प्राप्त झालें. अशासारखी स्थिति इकडे जर कांहीं सुरू झाली तर विद्याखात्याचा किती अटाट वांचेल व लोकांचें किती हित होईल!

६. असो; जॉनसन् कॉलेज सोडून घरीं आल्यावर कांहीं दिवसांनीं त्याचा बाप

---

हा पुढें पेम्ब्रोक कॉलेजचा प्रेसिडेंट् झाला. जॉन्सन्चे गुरुजी जॉर्डन् साहेब यांनीं पेम्ब्रोक कॉलेज १७३१ सालीं सोडल्यावर जॉर्डन्चे वर्ग ॲडम्स् घेऊं लागले. जॉन्सन्नींहि १७३१ च्या पावसाळ्यांत पैशाच्या अभावीं कॉलेज सोडलें होतें. तेव्हां तो जर परत आला असता तर ॲडम्स् त्याचे गुरुजी झाले असते अशी वस्तुस्थिति आहे, आणि असें होतें तर त्यांच्या सौम्य स्वभावाचा, जॉन्सन्चा कठोरपणा कमी होण्यास पुष्कळच उपयोग झाला असता. तथापि पुष्कळ लोक ॲडम्सूना जॉन्सन्चे गुरुजी मानीत असत हें खरें आहे. डेव्हिड् ह्यूमच्या 'Essay on Miracles' या निबंधाला बिनतोड पण शांतपणानें उत्तर देऊन डॉ. ॲडम्सूनीं ख्याति मिळविली होती. खुद्द ह्यूमनें सुद्धां आपणावर ॲडम्सूनीं फाजील सौम्यपणानें टीका केली. इतक्या सौम्यपणास आपण लायक नव्हतों अशी कबुली दिली. 'सम्पादक'

१. "Dr. Adams paid Johnson this high compliment. He said to me at Oxford, in 1776. "I was his nominal tutor; but he was above my mark." When I repeated this to Johnson, his eyes flashed with grateful satisfaction, and he exclaimed, "That was liberal and noble!" Boswell's *Life of Johnson*.

मरण पावला. याम् त्याच्या धंद्यांत कधींही बरकत आली नाहीं. व शेवटीं शेवटीं तर एका व्यापारांत त्यांस मोठी ठोकर लागून तो अगदीं डबघाईस आला. त्यास प्रपंच भागवण्याचीही पंचाईत पडूं लागली. अशा स्थितींत त्याच्या मरणानें जॉन्सन्, त्याचा एक भाऊ व त्याची आई, यांची केवढी तारांबळ झाली असेल, याची कोणासही सहज कल्पना होईल. तरी असल्या संकटांतही प्रस्तुत चरित्राचा विषयभूत जो विख्यात पुरुष त्यानें अगदीं धैर्य सोडलें नाहीं. बापानें मरते वेळीं ठेवलेला पैसा सगळा वीस पौंड [ दोनशें रुपये ] होता तो आपल्या आईपाशीं ठेवून व आपल्या भावास बापाच्या दुकानावर लावून स्वतः केवळ आपल्या विद्येवर चरितार्थ चालवण्यास व आपलें नशीब काढण्यास तो निघाला. पहिल्यानें त्यानें एका शाळेंत चाकरी धरली. ही शाळा खाजगी होती; व हींत जॉन्सन् हा दुय्यम म्हणून राहिला व शाळेच्या अध्यक्षाचें व याचें कधींही नीट न पटल्यामुळें त्यानें ती जागा लवकरच त्रासानें सोडून दिली. शाळेचे सरमास्तर स्वभावानें मोठे गर्विष्ठ व तिरस्कारखान होते; त्यांचा हिशेब असा होता कीं, या दुय्यमाला आम्ही मोठी मेहेरबानी करून अन्नाला लावला आहे तेव्हां आमचा मोगलाई अंमल यानें निमुटपणें मान खालीं करून सोसला पाहिजे. आम्ही सांगूं तें यानें शिरसावंद्य करून बंदा गुलामाप्रमाणें प्रत्येक शब्दास ' हां जी, जी हां ' अशी मान डोलवली पाहिजे. पण जॉन्सन् कसचा ! जो पुढें ऑस्बोर्न [१] याच्या डोक्यांत त्याचेंच एक मलें मोठें बूक . घालून घालायाला चुकला नाहीं, व ज्यानें चेस्टरफील्ड [२] सारख्याचीही पर्वा ठेवली नाहीं;

---

१ Mr. Thomas Osborne नांवाच्या बुकसेलरनें अर्ल् ऑफ् ऑक्स्फोर्डच्या लायब्ररीतील ग्रंथांची यादी तयार करून लॅटिन् पुस्तकांची माहिती जोडण्याचें काम १७४२ सालीं जॉन्सन्कडे सोंपविलें होतें. एके दिवशीं जॉन्सननें एक पुस्तक सदर ऑस्बर्नच्या डोक्यांत घालून त्याला खालीं पाडलें व त्याच्या गळ्यावर पाय दिला अशी हकीकत ऐकिवांत आहे. खुद्द जॉन्सन् म्हणतो:—" Sir, he was imperti. nent to me, and I beat him. But it was not in his shop; it was in my own chamber. " 'सम्पादक'

२. फिलिप् डॉर्मर् स्टॅन्होप ( Philip Dormer Stanhope, fourth Earl of Chesterfield ) १६९४–१७७३. मुत्सद्दी व पत्रलेखक. शिक्षण केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत झाल्यावर १७२६ सालीं सरदार ( Peer ) होईपर्यंत हाऊस ऑफ् कॉमन्स्मध्यें बसे. हॉलंड्चा वकील, सेक्रेटरी ऑफ् स्टेट वगैरे अनेक महत्त्वाचीं कार्यें यानें केलीं. विनोद, संवादकौशल्य व रुबाबदार वागणूक यांबद्दल याची ख्याति आहे. यानें आपल्या मुलास लिहिलेलीं पत्रें वाङ्मय–दृष्टया महत्त्वाचीं असून तत्कालीन खालावलेल्या नीतिमत्तेची चांगली कल्पना आणून देतात. तीं चतुरस्रपणा व जगाचें ज्ञान यांनीं परिपूर्ण व ओजस्वी आहेत. कोशाच्या आश्रयासंबंधीं यांचा जॉन्सन्शीं उडालेला खटका विश्रुतच आहे. 'सम्पादक'

तो यःकश्चित् शाळामास्तराला विचारतो काय ! त्यानें लाइदिशीं चाकरीला लाथ मारली, व बर्मिंगहॅम् नामक शहरास निघाला. तेथें एक त्याचा परममित्र होता त्याच्या घरीं तो कांहीं दिवस राहिला. तेथें असतां एका पुस्तकवाल्याच्या सांगण्यावरून त्यानें एका फ्रेंच् ग्रंथानें भाषांतर आरंभलें. हा ग्रंथ लोबो [१] नामक एका जेसुइट् [२] ग्रंथकारानें 'अबिसिनिया देशाची सफर' ह्मणून केला होता तो होय. लोबो हा कोणी पोर्त्युगीज मिशनरी होता; व हबशांच्या मुलुखांत जाऊन तेथील सर्व सृष्टिचमत्कारांचें व लोकांच्या रीतीभातींचें वगैरे त्यानें अनुभवसिद्ध वर्णन केलें आहे.

---

१. Geronimo Lobo ( 1593—1678 ) पोर्तुगीज जेसुइट् मिशनरी; जन्म लिस्बन्. सोळाव्या वर्षी Order of Jesus मध्यें दाखल झाला. १६२२ सालीं हा हिंदुस्तानांत गोंव्यास आला. १६२४ सालीं अबिसिनियाला जाण्यास निघाला. अबिसिनियाचा बादशहा Negus Sequed यास Pedro Paez यानें रोमन् कॅथॉलिक् धर्मपंथाची दीक्षा दिली होती. लोबो मोंबासाच्या किनाऱ्यावर उतरला पण त्यास परतावें लागलें. १६२५ सालीं पुन: Mendez व आणखी आठ जणांसह निघून तो तांबड्या समुद्राच्या किनाऱ्यावर उतरून सेक्वेड् (Sequed) बादशहाच्या मृत्यूपर्यंत मिशनऱ्यांचा प्रमुख ह्मणून अबिसिनियांत राहिला. पुढें अनान्वित छळ होऊं लागल्यामुळें ते सर्व तेथून निघाले पण मेसावा ( Messawa ) येथें तुर्कांच्या हातीं सांपडले, त्यांनीं खंडणी वसूल करण्याकरतां लोबोला हिंदुस्तानांत पाठविलें. खंडणीची भरपाई झाल्यावर त्यानें पोर्तुगीज व्हाइसरॉयला अबिसिनियावर स्वारी करण्याची विनंति केली पण त्याची संमति मिळेना ह्मणून तो पोर्तुगालला निघाला; पण वाटेंत नाताळच्या किनाऱ्यावर जहाज फुटून चांच्यांच्या तावडींत सांपडला. तेथून सुटून त्यानें लिस्बन्, माद्रिड् , रोम येथेंहि अबिसिनियावर स्वारी करण्यास संमति मिळविण्याची खटपट केली पण यश आलें नाहीं. अखेर हिंदुस्तानला परत येऊन व बढती मिळवून लिस्बन्‌ला परत गेला व तेथें वारला. त्यानें पोर्तुगीज भाषेंत आपल्या सफरीचें वर्णन लिहिलें पण तें केव्हांच छापून निघालें नाहीं. लिस्बन् येथें St. Roque च्या मठांत मूळ प्रत ठेवण्यांत आली आहे. या ग्रंथाचें फ्रेंच् भाषांतर ' Abbe Joachime Grand नें 'Voyage Historique d' Abissinie' या नांवाचें केलें व या भाषांतराची संक्षिप्त आवृत्ति जॉन्सन्‌नें इंग्रजींत वॉरन् व हेक्टर् यांच्या आग्रहावरून तयार केली व ऑस्बोर्न्‌नें १७३१ सालीं ती छापली. याबद्दल जॉन्सन्‌ला पांच गिनी मिळाल्या. 'सम्पादक'

२. जेसुइट् हे कोण लोक आहेत ते आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असतीलच. कांहीं वर्षांपूर्वी मुंबई युनिव्हर्सिटींत त्यांच्या संबंधानें बोभाटा झाला होता हेंहि पुष्कळांस आठवत असेल. या पंथाचें नांव ' जोजफ ' येशू यावरून पडलें

[ पुढें चालू ]

याच्या मुशाफरीचा मुख्य हेतु त्याच्या धर्मबंधूप्रमाणें शुभवर्तमानाचा प्रसार करण्याचा होता; व निघतांना त्याच्या बरोबर आणखी दोघे पाद्री होते. पण या दोघांस इबशांनीं मधल्यामध्येंच ठोकून टाकल्यामुळें पुढें यास एकट्यासच येवढ्या अफाट रानटी

---

आहे. व त्याचें स्थापन इ० सन १५३४ या सालीं झालें. या 'खिस्तशिष्यां'चा उद्देश रोमन् कॅथलिक् मताचें मंडन करून त्याचा साऱ्या जगभर प्रसार करायाचा हा होय; व तो साधण्यासाटीं इवें ते करावें असा त्यांचा मूलभूत सिद्धांत आहे. चोरी करावी, खोटें बोलावें,§ फार तर काय, प्रत्यक्ष खूनहि पाडावे पण आपला पवित्र हेतु सिद्धीस न्यावा, हें मत येशूचे अनुयायी खोडून दाखवतात व आजपर्यंत अगणित वेळां त्याप्रमाणें त्यानीं आचरणही केलें आहे. सारांश, या मंडळास खिस्ती ठग ह्मटलें असतां फारसा बाध येणार नाहीं. वरील मतांस्तव या मंडळीस युरोपांतील बहुतेक देशांतून वेळोवेळां घालवून दिलें आहे, व एकदां तर खुद्द पोपमहाराजांसही हा पंथच मुळीं बंद करून टाकावा लागला. पण पुढें तो त्यांनीं सुरू केला, तो अद्याप आहेच. या लोकांच्या अंगीं दोन मोठे जबरदस्त गुण आहेत. एक विद्यार्थ्यांच्या पोटांत शिरून त्यांकडून विद्या करवणें व दुसरा गुण धारिष्ट. पहिल्या कलेंत यांची किती निपुणता आहे याचा प्रत्यय या देशांतही घेण्यासारखा आहे; व दुसऱ्याचें स्वरूप वरील मिशनरीच्या प्रवासावरून ध्यानांत येईलच. मेकॉलेनें एके ठिकाणीं या दुसऱ्या गुणाविषयीं लिहिलें आहे—

" The Old World was not wide enough for this strange activity. The jesuits invaded all the countries which the maritime discoveries of the preceding age had laid open to European enterprize. They were to be found in the depths of the Peruvian mines, at the marts of the African caravans, on the shores of the Slice Islan'ds, in the observatories of China. They made converts in regions which neitheı avarice nor curiosity had tempted any of their countrymen to enter; and preached and disputed in tongues of which no other native of the West understood a word. "

*Ranke's History of the Popes.*

‡(Society of jesus) जीससूच्या सोसायटींतील सभासदांचें व त्यांच्या पंथाचें नांव. संस्थापक, लूथरचा कट्टा शत्रु सेंट् इग्नेशस लोयोला (St. Ignatius Loyola). भिक्षा हें यांचें ब्रीदवाक्य, दारिद्र्य, पावित्र्य व आज्ञाधारकत्व हीं तीन व्रतें या पंथांतील प्रत्येकाला घ्यावीं लागतात. त्यांचें पूर्ण नांव Clerks Regular of the Society of Jesus असें आहे. जेसुइट् हें नांव प्रथम या पंथाच्या शत्रूंनीं त्याला दिलें. हें वापरण्याचा आद्य मान कॅल्विन्-व पॅरिसूची १५५२ची पार्लमेंट् यांना आहे. शिस्त व स्वातंत्र्य यांच्या मधुर मीलनामुळें प्रॉटेस्टंट् पंथाची लाट या पंथानें

(पुढें चालू)

देशांत व अपरिचित राष्ट्रांत मार्गक्रमण करावें लागलें.तरी गेल्या शतकातील मंगोपार्क् १

मार्गे फिरविली.पण प्रॉटेस्टंट् व कॅथॉलिक् या दोहों पंथांतील लोक या पंथाकडे संशयाच्या व शत्रुत्वाच्या दृष्टीनें पाहतात. या पंथाला खरा बुद्धिमान् पुढारी (लोयोला व सेंट् फ्रॅन्सिस् झेवियर् हे अपवाद वगळलें तर) न लाभल्यामुळें सर्व कार्यांत यांच्या वांट्याला अपयश हमखास येतेंच! या पंथाचे सुमारें वीस हजार अनुयायी आहेत.

'सम्पादक'

§ तथापि अद्यापपावेतों जेसुइट् लोकांनीं राजकीय खुनांत प्रत्यक्ष भाग केव्हांहि घेतलेला नाहीं असें म्हणतात. मात्र राजकीय हेतूंवर धार्मिक बहिरंगाचें पांघरूण घेतल्यामुळें त्यांना अनेक वेळां फ्रान्स, स्पेन, रशिया, हॉलंड् वगैरे देशांतून हद्दपार करण्यांत आल्याचे दाखले आहेत.

'सम्पादक,

१. Mungo Park [१७७१–१८०६ (?)] नायगर् (The Niger) नदीच्या उगमाचा स्कॉटिश संशोधक. तीन वर्षे एडिंबरो विद्यापीठांत अध्ययन करून यानें शस्त्रवैद्याची परीक्षा दिली व १७९१साली डिप्लोमा घेतला.१७९२साली यानें सुमात्रा बेटाकडे जलपर्यटण केलें.नायगर् नदीच्या उगमाचा शोध लावीत असतां सहारा वाळवंटांत १७९०साली नष्ट झालेला हौटन् (Major Daniel Houghton) याच्या जागीं मंगोपार्कची नेमणूक झाली. १७९५च्या २१ जूनला तो गँबिया नदीपर्यंत पोंचला व उगमाकडे दोनशें मैल त्यानें तिचा मार्ग काढला. पुढें त्याजवर अनेक संकटें आलीं. एका मूरिश् सरदारानें त्याला चार महिने कैदेंतहि ठेवलें. पण मोठ्या शिताफीनें १ जुलै १७९६ रोजीं तो तेथून पळाला. २१ जुलै रोजीं सेगू (Segu) येथें नायगर् नदीचा शोध त्याला लागला. पुढें ३० जुलैपासून त्यानें नायगर् नदीचा ३०० मैल मार्ग काढला.पण त्यामुळें थकून सात महिने आजारी पडला असतां एका शिदी कुटुंबानें त्याची शुश्रूषा करून त्यास वांचविलें.अखेर १० जून १७९७रोजीं पिसानिया येथून अमेरिकेच्या मार्गानें परत इंग्लंड्ला २२ डिसेंबर १७९७ रोजीं येऊन पोंचला. तो मेला अशी सार्वत्रिक समजूत असल्यामुळें तो जिवंत परत येतांच त्याचें प्रचंड स्वागत झालें. १७९९ सालीं Travels in the Interior of Africa हें त्याचें पुस्तक प्रसिद्ध झालें. १८०१ पासून पीब्लस् (Peebles) येथें त्यानें डॉक्टरी सुरू केली. पण या कंटाळवाण्या आयुष्यक्रमाला वैतागल्यामुळें सरकारनें दुसऱ्या सफरीवर याची नेमणूक करतांच त्यानें ३१ जानेवारी १८०५ रोजीं पोर्ट्स्मथ् सोडलें. मध्यंतरीं (Sidi Ambak Bubi) शिदी अम्बक् बबी याजपाशीं तो अरबी शिकला व सर वॉल्टर् स्कॉट्ची मैत्री त्यानें संपादन केली. या सफरींत एकंदर सुमारें चाळीस लोक होते पण ऑगस्ट्मध्यें नायगर्ला पोंचेपर्यंत ताप व हगवण यानें अकरांखेरीज सर्व बळी पडले. पुढें आपल्या बरोबरीच्या लोकांबरोबर स्वदेशीं पत्रें देऊन हा आठ मंडळींसह नायगर्चा शेवटपर्यंत शोध लावावयाचा अगर मरावयाचें,

(पुढें चालू)

व नुकता निवर्तलेला लिविंग्स्टन्[१] यांच्याप्रमाणें यानें मोठ्या धैर्यानें व हिकमतीनें साऱ्या देशभर भ्रमण केलें. नील नदीचा उगम शोधून काढण्याविषयीं आज हजारों वर्षें यत्न चालला आहे तो त्यानें कांहींसा तडीस नेला.[२] असो; तर असल्या ग्रंथांचें इंग्रेजी भाषांतर जॉन्सन्नें तयार केलें. या कामा-

---

जिवंत म्हणून परत हात हालवीत यावयाचें नाहीं. या निश्चयानें निघाला. अनेक संकटांतून निभावून सुमारें एक हजार मैल तो नदींतून नावेंत बसून गेला. पण पुढें नाव खडकावर आपटून फुटली व तद्देशीय लोकांनीं त्याच्यावर हल्ला केल्यामुळें दोघां तिघां सोबत्यांसह मंगोपार्कनें यौरी (Yauri) येथें नदींत उड्या टाकल्या व सर्वजणांना जलसमाधि मिळाली. पुढें त्याचा मुलगा थॉमस् हाहि १८२७ सालीं बापाचा शोध लावण्याकरतां आला (कारण त्याला कोणी तरी कैद केलें असावें अशी त्याची समजूत होती.) पण तापानें मेला. 'सम्पादक'

१. David Livingstone (1813-1873) मिशनरी संशोधक. एका कापसाच्या गिरणींत वयाच्या दहापासून चोवीस वर्षांपर्यंत होता. पुढें लंडन् मिशनरी सोसायटींत शिरून १८४६ सालीं दक्षिण आफ्रिकेस निघाला. पुढें अंतर्भागांत हिंडून Ngami सरोवर १८४९ सालीं व झांबेसी नदी (Zambesi) १८५१ सालीं शोधून काढली. १८५६ सालीं इंग्लंडला परत येऊन यानें Missionary Travels हें पुस्तक १८५७ सालीं प्रसिद्ध केलें. १८५८-६४ पर्यंत क्विलिमेन (Quilimane) येथें तो वकील (Consul) होता. १८५९ सालीं पुनः पूर्व व मध्य आफ्रिकेंत हिंडून त्यानें शर्वा (Shirwa) व नियासा (Nyassa) हीं सरोवरें शोधून काढलीं व पुनः इंग्लंडला जाऊन The Zambesi and its Tributaries हा ग्रंथ १८६५ सालीं प्रसिद्ध केला. पुनः आफ्रिकेस परत जाऊन बँग्वोलो (Bangueolo) सरोवर शोधून काढलें. टँगानिका सरोवराजवळ याजवर अनेक संकटें येऊन हा बेपत्ता झाला होता. पण स्टॅन्लेनें येऊन त्याला शोधून काढलें. अनंत हालअपेष्टा सोसून नाईल नदीचे उगम शोधण्याकरतां खूप हिंडतां हिंडतां एका खेडेगांवीं याचा अंत झाला. पुढें याच्या अस्थि इंग्लंडला नेऊन 'वेस्ट् मिन्स्टर ॲबे' मध्यें पुरण्यांत आल्या. या उदात्त व निधड्या छातीच्या संशोधकाची डायरी १८७४ सालीं 'Last Journals of David Livingstone in Central Africa' या नांवानें प्रसिद्ध झाली.

'सम्पादक'

२. मिसर देशांतील जी नील नदी तिला दरवर्षी अपरंपार पूर येऊन सारा भोंवतालचा देश त्या पुरावर पिकतो व पाऊस कसा तो तिकडे कोणास माहीत नाहीं ही गोष्ट जगद्विख्यात आहे. ही नदी अबिसिनिया, न्युबिया, आणि इजिप्ट् या तीन विस्तीर्ण देशांतून वाहत जाऊन अलेक्झांड्रिया शहराशीं समुद्रास सातां मुखांनीं मिळते. हिचा ओघ एकंदर ३००० मैल आहे. या नदीचे उगम कोठें आहेत

(पुढें चालू)

बद्दल त्यास वर सांगितलेल्या पुस्तकवाल्यानें पांच पौंड दिले. यानंतर त्यानें एका लॅटिन् कवीचे ग्रंथ छापण्याबद्दलची जाहिरात दिली. तींत त्यानें असें कळवलें होतें कीं, वरील कवीचीं काव्यें थोडया किंमतींत समग्र मिळून शिवाय त्या कवीचें चरित्र व एकंदर लॅटिन् कवितेचा इतिहास हाही सदरहू आवृत्तीस जोडायाचा आहे. पण या ग्रंथास कोणीं फारसा आश्रय दिला नाहीं; वर्गण्या फार थोडया आल्यामुळें व कोणी पुरस्कर्ताही न मिळाल्यामुळें वरील संकल्प तसाच असिद्ध राहिला.

७. यापुढें बहुधां सर्व मनुष्यांच्या आयुष्यांतली एक मोठी ठोकळ गोष्ट जो विवाह तो जॉन्सन्चा झाला. तो बर्मिंगहॅम् येथें असतां तेथील एका व्यापान्याची व याची ओळख पडली होती. त्याच वेळेस त्याच्या बायकोचा व याचाही बराच परिचय जडला होता; याच्या विद्वत्तेस्तव व भाषणचातुर्यास्तव हा तिला आवडूं लागला होता; व यासही तिच्या रसिकतेमुळें व इतर गुणांमुळें ती पसंत झाली होती. पुढें ती गतभर्तृका झाल्यावर परस्परांच्या स्नेहाचा व प्रेमाचा परिपाक वर सांगितल्याप्रमाणें झाला. जॉन्सन्नें आपल्या आईची आज्ञा विचारून गृहस्थधर्माचा स्वीकार केला व आजपर्यंत जो मुशाफरासारखा एकटा राहिला तो आतां घरदार, चाकरमाणसें, बायको अशा थाटानें राहूं लागला. बायकोनें लग्नसमयीं आठशें पौंड जॉन्-

---

याविषयीं पहिल्यापासून साऱ्या जगास मोठी प्रबल जिज्ञासा वाटत आहे; तरी अद्याप त्याचा पक्का शोध लागला नाहीं. ते विषुववृत्तापाशीं असावे असा भूगोलवेत्त्यांचा अजमास आहे. सन १८५४ सालीं ब्रुसाऽ नांवाच्या एका मुशाफरानें वरील वृत्ताच्या चार अंशांपर्यंत वरील नदीचा मार्ग काढला होता.

ऽ James Bruce ( 1730–1794 ) स्कॉटिश् संशोधक. यानें हॅरो व एडिंबरो विद्यापीटांत शिकून कायद्याचा अभ्यास सुरू केला. पुढें एका दारू विकणाऱ्याच्या मुलीशीं विवाह करून आपणहि त्या धंद्यांत शिरला. पण लग्नानंतर नऊ महिन्यांतच १७५४आक्टोबरमध्यें बायको मेल्यामुळें विरक्त होऊन स्पेन,पोर्तुगाल्मध्यें फिरतीवर गेला. अरबी व गीझ् ( Geez ) भाषा शिकला व स्पेनशीं युद्ध सुरू होतांच ब्रिटिश् सरकारला फेरोल् ( Ferrol ) वर हल्ला चढविण्याचा यानें सल्ला दिला; तो मान्य झाला नाहीं, पण त्याला अल्जीर्स् ( Algiers ) येथें ब्रिटिश् कॉन्सल् नेमून प्राचीन अवशेषांचा अभ्यास करण्यास १७६३–६५ पर्यंत ठेवलें. पुढें रोमन् अवशेषांचें शोधन करून त्रिपोलीला जाऊन हा कँडिआकडे निघाला, पण जहाज फुटून यास क्रीटच्या किनाऱ्याकडे पोहत जावें लागलें. पुढें सिरियामध्यें हिंडून औषधींचेंही थोडें-फार ज्ञान यानें मिळविलें. १७६८ सालीं जूनमध्यें आबिसिनियाच्या सफरीवर हा निघाला. कारण त्याच्या कल्पनेप्रमाणें त्या देशांत असलेला नाईल नदीचा उगम

( पुढें चालू )

सन्च्या स्वाधीन केले व ते चांगल्या व्यवस्थेंत लावले असते तर त्यास पुष्कळ दिवस, किंबहुना जन्मभर चांगल्या रीतीनें पुरले असते. पण तें होतें कसें! त्यास अद्याप पुष्कळ काळ दारिद्र्यांत व विपत्तींत काढावयाचा होता! तेव्हां त्यास अशी बुद्धि आठवली कीं, आपला संसार थाटलाच आहे, तेव्हां सध्यांप्रमाणेंच पुढेंही चालण्यास आपण स्वतः एक निराळें विद्यालय स्थापावें. हें विद्यालय त्याच्याच घरीं असून विद्यार्थ्यांचा जेवणाखाण्याचा वगैरे बंदोबस्त तेथेंच ठेवण्याचें त्यानें योजलें. मग सर्व तयारी झाल्यावर एका वर्तमानपत्रांत जाहिरात आली कीं, 'सॅम्युएल् जॉन्सन् याच्या घरीं विद्यार्थ्यांची राहण्याची सोय केली असून लॅटिन्, ग्रीक् या भाषांचें अध्ययन चालावयाचें आहे, तर श्रीमान् व संभावित लोकांनीं आपलीं मुलें येथें पाठवावीं.' या जाहिरातीचें फारसें फळ दृष्टीस पडलें नाहीं. अठरा महिने लोटून गेले. तरी दोन तीन मुलांवर ज्यास्त त्यास मिळेचनात. याचें कारण असें होतें कीं जॉन्सन्ची पुढें जी विलक्षण ख्याति होऊन बसली, कीं त्याच्या सहज बोलण्यावरही मोठमोठे लोक सुद्धां झुलूं लागले व तो केवळ अप्रतिम पंडित ठरला, तसें या वेळेस कांहीं नव्हतें. त्याची प्रसिद्धि काय ती विद्यालयांतच असून एकंदर लोकांस तो विशेष माहीतही नव्हता. शिवाय शिक्षकाच्या अंगीं जे गुण अवश्य लागतात त्यांपैकीं कांहींची त्याच्या अंगीं उणीव होती. एक तर शारीरव्यंगें. त्याचा चेहरा मूळचा जरी वाईट नसून उलटा भव्यही होता तरी मागें सांगितलेल्या [1] रोगाच्या योगानें त्यावर मोठमोठाले वण पडले होते. व त्याची दृष्टि अधू झाली होती. शिवाय त्याची बोलण्याचालण्याचीही ढब श्रोत्यांच्या व त्यांतून पोरांच्या मनांत भरण्यासारखी नसून त्यांस उपहासास्पद वाटण्यासारखीही होती; वायुग्रस्त मनुष्याप्रमाणें हात पाय वरचेवर वेंगाडायाची त्यास लहानपणापासून संवय लागून गेली होती; व त्याच्या मेंदूंत

---

त्याला शोधावयाचा होता. केरो येथें अली बे नामक सरदाराची मदत मिळून त्यानें कोसिअर्पर्यंत मजल मारली, व तुर्की खलाशाच्या पोषाखांत पर्यटन करून १७६९ सालीं (Jidda) जिडाला पोंचला. कांहीं दिवस अरबस्तानांत राहून पुनः तांबडा समुद्र ओलांडून गोंडाळ्ला गेला; दोन वर्षें तेथें राहून धैर्य, चातुर्य व गीझ् भाषेचें ज्ञान यांच्या जोरावर यानें परकीयद्वेष्ट्या आबिसिनियनांचें प्रेम संपादन केलें व The Blue Nile च्या उगमापर्यंत १४ नोव्हेंबर १७७० रोजीं हा पोंचला. १७७१ सालीं यानें Blue व White Nile या दोहोंचा संगम शोधून काढला. १७७४ सालीं तो लंडन् येथें परत आला. Travels to discover the Source of the Nile in the years 1768–73 हा याचा ग्रंथ १७९० सालीं पांच खंडांत प्रसिद्ध झाला. या पुस्तकावर कांहीं लोकांनीं अविश्वसनीयतेचा आरोप केला, तथापि तें पुष्कळच लोकप्रिय झालें. 'सम्पादक'

१. स्क्रॉफ्युला. पृष्ठ ६७२ पाहा. 'सम्पादक'

कांहीं विकार असल्यामुळें त्याची कृति पुष्कळ अंशीं वेड लागलेल्या मनुष्यासारखी दृष्टीस पडे. हा सर्व प्रकार घरींच विद्याभ्यासास राहिलेल्या पोरांच्या प्रत्यहीं नजरेस पडायाचा. मग अशांची गुरुविषयीं पूज्यबुद्धि न जडतां त्याची त्यास चेष्टाच वाटत असेल यांत नवल काय ? याखेरीज वरील विद्यालयांतली दुसरी मोठी नकल ह्मटली ह्मणजे गुरुपत्नी होय. तिचें वय जॉन्सन्च्या दुप्पट होतें; ह्मणजे तिचें अठ्ठेचाळीस व नवऱ्याचें सव्वीस ! मग अशा जोड्याचें जें परस्पर प्रेम चालत असेल तें पाहून त्या तरुण विद्यार्थ्यांस केवढी मौज वाटत असेल व ते त्याविषयीं किती मस्करी करीत असतील ! या विद्यार्थ्यांत शेक्सपीअर पात्रांचा सर्वोत्कृष्ट अभिनय करणारा जो प्रख्यात गॅरिक्[1] तो होता. तो अगोदरच नकल्या व पुढें नाटकाचें कसब पुरतेपणीं शोधून त्यांत पहिल्या पदवीस चढलेला आणि वरील सर्व मजा त्यानें स्वतः लहान वयांत पाहिलेली, तेव्हां पुढें लंडन् शहरांतल्या बड्या बड्या मंडळींत तो जेव्हां आपल्या गुरूची नकल करी तेव्हां ती किती हुबेहुब व मजेदार उतरत असेल हें सांगायाला नको. ऐकणाऱ्या मंडळीचें हसतां हसतां पोट दुखूं येई. असो; तर जॉन्सन्चें विद्यालय चांगलेसें न चालण्याचीं वर सांगितलेलीं कारणें होतीं. शिवाय त्याचा स्वभावही सौम्य व मनमिळाऊ नसून पराकाष्ठेचा कडक असे; व विद्यार्थ्यांस अगदीं मूलभूत सिद्धांतापासून क्रमाक्रमानें शिकवीत जाण्याची जी दगदग असते तीही त्यास अगदीं आवडत नसे. तेव्हां या सर्व गोष्टींमुळें वर सांगितलेल्या विद्यालयाची कधींही ऊर्जितदशा आली नाहीं. शेवटीं बायकोनें जो ऐवज आणला होता

---

१. David Garrick ( 1717-1779 ) अभिनयपटु नट व थिएटरचा मॅनेजर. फ्रेंच् कुलांत जन्म. प्राथमिक शिक्षण लिचफील्डच्या शाळेंत झाल्यावर जॉन्सन्च्या विद्यालयांत यास याचा भाऊ जॉर्ज यासह पाठविण्यांत आलें. २ मार्च १७३७ रोजीं शाळा बंद झाल्यावर गुरुशिष्य लंडनला गेल्या वेळीं गुरूजवळ अडीच व शिष्याजवळ दीड पेन्स अशी इस्टेट होती. नाटकाबद्दल गॅरिकला स्वाभाविकच आवड असे. नाटकांवर टीका व नाटकें लिहिणें असे दोन्ही प्रकार त्यानें हातीं घेतले मार्च १७४१ मध्यें त्याचें पहिलें नाटक 'Lethe or Aesop in the Shades' हें रंगभूमीवर आलें. १९ आक्टोबर १७४१ रोजीं तिसऱ्या रिचर्डची भूमिका केल्यावेळीं त्यानें टाळ्या घेतल्या. सुंदर पण अविचारी वॉफिंग्टन बाईवरील प्रेमाच्या कचाटींतून सुटल्यावर Mademoiselle Violette या जर्मन् स्त्रीशीं गॅरिकचा विवाह झाला. तिनें व्हायेन्ना, फ्लॉरेन्स वगैरे ठिकाणीं नर्तकी या नात्यानें कीर्ति मिळविली होती. ड्रुरी लेन थिएटर बारा हजार पौंडांस त्यानें विकत घेतलें. शेक्सपीअरचीं उत्तमोत्तम नाटकें करून दाखवून त्यानें नाट्यव्यवसाय १७६६ मध्यें सोडला. शेक्सपीअरच्या पुतळ्याच्या पायाशीं त्याला वेस्ट्मिन्स्टर् ॲबेमध्यें पुरण्यांत आलें. 'The Lying Valet' व 'Miss in her Teens' हीं यांचीं उत्कृष्ट नाटकें होत. जॉन्सन् व गॅरिक् यांना परस्परांबद्दल आत्यंतिक प्रेम ( आकर्षण ) व आत्यंतिक तिटकाराहि वाटत असे. 'सम्पादक'

तो अशा प्रकारें सगळा व्यर्थ खर्चून जाऊन पुनः ददात ती ददात राहिलीच. हें पाहून जॉन्सन्नें आपल्या लेखणीवर आपला चरितार्थ चालवायाचा हा पूर्वीचा संकल्प पुनः मनांत आणून लंडन् शहरची वाट धरली. बरोबर आपला विद्यार्थी वर सांगितलेला गॅरिक् यांस घेतलें.

ही गुरुशिष्यांची जोडी वरील राजधानीस सन १७३७ वर्षाच्या आरंभीं येऊन दाखल झाली. दोघेही पहिल्यानें केवळ उपजीवनार्थ तेथें आले असून पुढें पुढें आपआपल्या गुणाच्या योगानें अत्यंत विख्यात व सर्वांत प्रमुख होऊन बसले. हें अत्युच्च स्थान जॉन्सन् यांस कसें प्राप्त झालें तें यापुढें क्रमाक्रमानें सांगायाचेंच आहे. सध्यां गॅरिकूची हकीकत लिहून हा अंक आटपतों. हा महाविख्यात नट जॉन्सन्चा परम मित्र होता व याचा प्रस्तुत चरित्रांत अनेक वेळां संबंधही येणार आहे, यास्तव व शिवाय सामान्यतः माहितीचा विषय ह्मणून, पुढील वृत्तांत अप्रासंगिक होणार नाहीं असें वाटतें.

८. गॅरिक् हा जॉन्सन्हून आठ दहा वर्षांनीं लहान होता. याच्या शिक्षणाचा वगैरे प्रकार वर सांगितलाच आहे. याचा कल लहानपणापासून नाट्यविद्येकडे असे. लंडनास आल्यावर पहिल्यानें तो कांहीं दिवस व्यापाराच्या नादांत गुंतला होता; पण त्या कामाचा त्यास कंटाळा येऊन तो लवकरच नाटकांत शिरला. शिरल्याबरोबर लागलीच कांहीं दिवसांनीं त्यानें आपल्या सोबत्यांस व त्या शहरांतील सर्व नटांस मागें टाकलें. इतर सर्व नाटकगृहें हळू हळू शुष्क होत जाऊन सारी गर्दी इकडेच जमूं लागली. ख्यालीखुशाली करणारी शौकीन मंडळी व मोठमोठे अमीर उमराव यांचा आश्रय गॅरिक ज्या मंडळींत होता तीसच मिळूं लागला. फार तर काय, पण पोपसारख्यांनीं व मोठमोठ्या नामांकित ग्रंथकारांनीं व उत्कृष्ट रसिकांनीं सुद्धां हा अपूर्व नाट्यप्रकार पाहून तोंडांत बोटें घातलीं. १

---

१. पोपनें गॅरिकूचा अभिनय जेव्हां पहिल्यानें पाहिला तेव्हांच त्याच्यासारखा नट आजपर्यंत झाला नाहीं व पुढेंही होईलसा दिसत नाहीं असा अभिप्राय दिला. तो म्हणाला, " याशीं स्पर्धा करण्यासारखा कोणीच नट नाहीं ही मोटी वाईट गोष्ट आहे. याच्या योगानें हा लवकरच बिघडून जाईल. " दुसऱ्या दोन प्रेक्षकांचे उल्लेख येणेंप्रमाणें आहेत.

" If manly sense; if nature linked with art;
If thorough knowledge of the human heart;
If powers of acting vast and unconfined;
If fewest faults with greatest beauties joined;
If strong expression, and strange powers which lie
Within the magic circle of the eye;
If feelings which few hearts, like, his, can know.

( पुढें चालू )

ाप्रमाणें थोड्याच काळांत गॅरिक्ची चोहोंकडे मोठी कीर्ति झाली असतां त्यानें स्वत:
्क नाटकगृह आपल्या ताब्यांत घेतलें, व त्या मंडळींत आपण मुख्य झाला. हें आवि-
ात्य त्यानें पसतीस वर्षे चालवलें. सरतेशेवटीं आपल्या समाजनांची बहुमानपुरःसर
। प्रेमपूर्वक आज्ञा घेऊन ज्या कामांत त्यानें येवढी कीर्ति मिळवली तें सोडून दिलें.
ाटकगृहाची मालकी त्यानें विकली, तिजबद्दल त्यास ३७००० पौंड मिळाले. या
कमेवर व पूर्वीच्या मिळालेल्या संपत्तीवर आपले शेवटले दिवस आनंदानें काढ-
ायाचा त्याचा संकल्प होता. पण पुढें लवकरच तो मरण पावला. गॅरिक्च्या मार्गे
याच्यासारखा नट अद्याप झाला नाहीं.

---

And which no face so well as his can show.
Deserve the preference; Garrick ! take the chair,
Not quit it till thou place an equal there. "

*Churchill's* § *Rosciad.*

" And how did Garrick speak the soliloquy last night " " O, against all rule, my lord, most ungrammatically; betwixt the subs-antive and the adjecitve, which should agree together in number, case and gender, he made a breach thus—stopping as if the point vanted settling;—and betwixt the nominative case, which your rdship knows should govern the verb, he suspended his voice in epilogue a dozen times, three seconds and three fifths by a p—watch, my lord, each time. " " Admirable grammarian ! But suspending his voice was the sense suspended likewise ? Did o expression of attitude or countenance fill up the chasm ? Was he eye silent ? Did you narrowly look ? " "I looked only at the topwatch my lord. "—" Excellent observer ! "

Sterne's *Tristram Shandy*.

‡Charles Churchill ( 1731-1764 ) इंग्रेज कवि व औपरोधिक लेखक. वेस्टमिन्स्टरच्या शाळेंत शिकला व प्राचीन वाङ्मयांत प्रवीण झाला. १७४९ सालीं केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत गेला. पुढें एका मुलींच्या शाळेंत शिक्षक झाला. लग्न दुर्दैवानें सुखद झालें नाहीं. त्यानें लहानपणीं जोडलेला मित्र रॉबर्ट् लॉइड् नसता तर कर्जापायीं त्यास तुरुंगांत जावें लागलें असतें. लॉईड्च्या बापानें त्यास मदत केली. त्याला रंगभूमीची विलक्षण माहिती होती. त्याचें उपहासपर मनोरंजक काव्य ( Rosciad ) रोसिअड् १७६१ सालीं प्रसिद्ध झालें. त्यांत त्यानें नट व व्यवस्थापक यांवर निष्ठुरपणें हत्यार धरलें. रोसिअड्मुळें चार्चिल्ची ताबड-तोब कीर्ति झाली व त्याला खूप पैसा मिळाला. The Ghost मध्यें त्यानें जॉन्सन्-वरहि हत्यार उपसलें. गॅरिक्खेरीज कोणताहि नट त्याच्या टीकेच्या मार्‍यांतून सुटला नाहीं. कोणीहि प्रकाशक त्याचें रोसिअड् छापेना, तेव्हां त्यानें तें स्वत: छापून प्रसिद्ध केलें. चर्चिल्च्या बहिणीचें लॉइड्वर प्रेम होतें. चर्चिल्च्या मृत्यूमुळें लॉइड् आजारी

[ पुढें चालू ]

आमच्या देशांत अलीकडे नाट्यविद्या अगदीं नाहींशी होऊन तिचा उदय नुकता कोठें उगीच झाल्यासारखा असल्यामुळें 'नाटक,' 'नाटकवाला' हे शब्द केवळ निंदास्पद होऊन बसले आहेत. तेव्हां इकडील स्थितीवरून पाहिलें असतां जॉन्सन्सारख्याचा शिष्य व परम मित्र नाटकांत शिरला व त्या कसबांत मानमान्यता पावला ही गोष्ट मोठी विलक्षण वाटण्यासारखी आहे, पण आमच्या साऱ्या वाचकांस माहीत असेलच कीं, नाटकाचा धंदा हा सामान्यतः पाहतां जरी मोठा प्रतिष्ठित धरलेला नाहीं, व सदाचरणप्रवर्तक असाही विशेष मानता येत नाहीं,[१] तरी प्राचीन काळच्या व अर्वाचीन काळच्या मोठमोठ्या प्रमुख राष्ट्रांत नाट्यकलेस गायन, वादन, नृत्य, चित्रविद्या इत्यादींच्या प्रमाणें मोठा मान असे व अद्याप आहे. तेव्हां हल्लीं व विशेषतः गेल्या शतकांत साऱ्या युरोपांत प्रमुख असणारें जें इंग्लंड् त्यांत गॅरिक् हा वर सांगितल्याप्रमाणें मोठी कीर्ति पावला यांत कांहीं नवल नाहीं. त्याच्या अंगीं सामान्य नटांप्रमाणें यथोचित अंगविक्षेप करण्याचा व नाटकी स्वरानें बोलण्याचा येवढाच गुण होता असें नाहीं. तर खरा अभिनय त्यानेंच प्रथमतः प्रवृत्त

---

पडला व मेला व लॉइड्नागें चर्चिल्च्या बहिणीलाहि फार दिवस जिवंत राहतां आलें नाहीं. चर्चिल्च्या कठोर टीकेमुळें त्यास अनेक शत्रु झाले, व त्याची खासगी वर्तणूक निष्कलंक नसल्यानें तीवर टीका सुरू झाली तेव्हां उत्तरादाखल तो ह्मणे ढोंगीपणापेक्षां दुर्गुण पुरवला. 'सम्पादक'

१. जॉन्सन् हा जरी मोठा धर्मशील व सदाचरणी होता, तरी त्याच्या मनावरही नाटकी मंडळीच्या अल्पकालिक समागमानेंही कोणते विकार उत्पन्न झाले हे पुढील लेखावरून दिसून येईल. त्याच्या नाटकाचा प्रयोग व्हावयाचा असतां तो अगोदर कांहीं वेळ पडद्याच्या आंत बसे. त्या वेळच्या त्याच्या स्थितीविषयीं त्याचा चरित्रकार लिहितोः—

"He, for a considerable time, used to frequent the Green-Room, and seemed to take delight in dissipating his gloom, by mixing in the sprightly chat-chit of the motley circle then to be found there. M. David Hume ralated to me from M. Garrick that Johnson at last denied himself this amusement, from considerations of rigid virtue; saying, 'I'll come no more behind your scenes, David; for the silk stockings and white bosoms of your actresses excite my amorous propensities.'"

§ स्टेजवरील दिव्यांच्या चकचकाटामुळें त्रासलेल्या डोळ्यांना किंचित् शांतता मिळावी ह्मणून रंगभूमीच्या मागील बाजूस नाटकांतील पात्रांस विश्रांति घेण्याकरतां राखून ठेवलेली खोली. दिपलेल्या डोळ्यांना हिरवा प्रकाश सुखकर वाटत असल्याकारणानें या खोलीच्या भिंतींना हिरवा रंग देण्याचा प्रघात असे, व त्यावरून त्या खोलीला 'Green Room' हेंच नांव कायम झालें. 'सम्पादक'

करून लोकांस दाखवला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्या त्या नाटकपात्रांशीं केवळ तादात्म्य पावून बोलणें चालणें, स्वर वगैरे हुबेहुब उठवून देऊन मूळचें मनुष्यच प्रेक्षकांच्या पुढें आणून जसें काय उभें करणें व मनाच्या निरनिराळ्या वृत्ति चेहऱ्यावर दाखवणें, ही अपूर्व कला त्याच्याच ठायीं पाहिल्यानें पूर्ण रीतीनें दृष्टीस पडली. शरीरानें व मनानें सारखाच वांकडा असणारा इंग्लंडचा राजा जो तिसरा रिचर्ड्, तसाच डेन्मार्क् राजाचा वेडाचें सोंग केलेला मुलगा हॅमलेट्, इत्यादि पात्रांचीं सोंगें त्यानें अशीं हुबेहुब आणावीं कीं सभाजनांनीं केवळ तटस्थ होऊन जावें. वर टिपेंत पोप कवीचें गॅरिक्‌विषयीं जें मत दिलें आहे तें त्यानें वरील रिचर्डाचें सोंग पाहतांच दिलेलें आहे; व स्टर्नच्या [1] ग्रंथांतील उतारा दिला आहे त्यांतील विषय वरील राजकुमाराची [2] सर्वप्रसिद्ध जी आत्मगत उक्ति ती होय. तर यावरून रंगभूमीवर नाचणाऱ्या सोंगाड्याची येवढी विलक्षण ख्याति कशामुळें झाली हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईल. पण जॉन्सन्‌चा शिष्य नुसता सोंगाड्याच नव्हता. त्याच्या अंगीं जातीनेंही बरीच कवित्वशक्ति असून तो त्या वेळच्या विद्वन्मंडळांत मोडत असे. 'जॉन्सन्‌चा क्लब' ह्मणून जी बर्क्, गिबन् अशा सभासदांची मंडळी आठवड्यांतून एकदां एके ठिकाणीं जमत असे तींत तो होता; आणि भाषणचातुर्यांत व विनोद-कलेंत त्याची सर्वांवर ताण होती. [3] पण आपल्या राष्ट्रावर किंबहुना साऱ्या जगावर त्यानें केलेला मोठा उपकार

१. Lawrence Sterne (1713–1764) प्रख्यात कादंबरीकार. शिक्षण हॅलिफॅक्स् व केंब्रिज येथें झाल्यावर तो आपल्या आवडीविरुद्ध चर्चमध्यें शिरला. १७६० सालीं Tristram Shandy या त्याच्या विख्यात कादंबरीचे दोन खंड प्रसिद्ध झाले. स्वाभाविक विनोद, परंपरेचा तिटकारा व प्रसंगीं अनुचित वर्णनें हे या कादंबरीचे विशेष होत. ही कादंबरी तावडतोब अत्यंत लोकप्रिय झाली. तिसरा व चवथा खंड १७६१ सालीं, पांचवा व सहावा १७६२ सालीं, सातवा व आठवा १७६५ सालीं, आणि आठवा—अखेरचा—१७६७ सालीं प्रसिद्ध झाला. हा अत्यंत बुद्धिमान् होता. पण बुद्धिपुरःसर ग्राम्यपणाचीं वर्णनें लिही हा याचा मोठा दोष होय.

'सम्पादक'

२. हॅम्लेट्. 'सम्पादक'

३. प्रख्यात कवि गोल्ड्स्मिथ् हा वरील क्लबाचा सभासद होता; त्यानें गॅरिक्‌विषयीं लिहिलें आहे—

"As an actor confessed without rival to shine
As a wit, if not first, in the very first line."

*The Retaliation.*

अद्याप सांगायाचाच आहे. तो इंग्लंडातल्या, किंबहुना तद्देशियांच्या मतें साऱ्या जगांतल्या कवींत अग्रगण्य जो शेक्स्पीयर त्याच्या संबंधानें होय. या महाकवीचे ग्रंथ पहिल्यापासून जरी सर्वांस प्रिय होऊन राहिले आहेत, तरी गॅरिक्च्या पूर्वी त्यांची असावी तशी चहा नसे. कांहीं काळपर्यंत तर ते अगदींच अप्रसिद्ध झाल्यासारखे होऊन जॉन्सन्च्या वेळीं त्याच्याहून ड्रायडन्, पोप यांच्याकडेच लोकांचा विशेष भर असे. पण वर वर्णिलेला अपूर्व नाट्यप्रकार जेव्हांपासून सुरू झाला तेव्हांपासून तें मान फिरत चाललें. शेक्स्पीयरच्या कीर्तीचें पुनरुज्ज्वलन होऊन ज्या कवितेच्या अंतर्गत गुणांकडे लोकांची दृष्टि तोंपर्यंत पोचली नव्हती ती तिजकडे तेव्हांपासून पोंचूं लागली. गॅरिक्ची तर वरील कवीविषयीं जी पूज्यबुद्धि होती ती कांहीं अतोनात! सन १७६९ सालीं त्यानें शेक्स्पीयरची जन्मभूमि जे स्ट्रॅटफर्ड तेथें त्याच्या निमित्त एक मोठा महोत्सव केला. तो सारखा तीन दिवस चालून हजारों लोकांनीं तेथील तुतीचें झाड, तेथली खुर्ची व एकंदर सर्व देखावे डोळे भरून पाहून घेतले, व तेथील खुणा देवाच्या प्रसादाप्रमाणें पदरीं बांधून नेल्या.[1] असो, तर या नटानें केलेल्या नाटकप्रयोगांनीं त्या वेळच्या लोकांचें तात्कालिक रंजन झालें इतकेंच नव्हे तर त्या राष्ट्राच्या महाकवीविषयीं सर्वांचे ठायीं पुनः अतिशय प्रेम उत्पन्न होऊन लोकाभिरुचीस नवेंच वळण दिल्यासारखें झालें. तशीच हीही दुसरी मोठी गोष्ट म्हटली पाहिजे कीं, गॅरिक्सारख्या संभावित व सर्वमान्य मनुष्यानें नाट्यकर्मा अंगीकार केल्यानें त्यास प्रतिष्ठा येऊन नाटक करणारी मंडळी म्हणजे दुराचरणा माहेरघर होऊन जी राहिली होती तोही प्रकार बराच मोडला.

---

१. वरील समारंभाविषयीं कौपर कवीनें लिहिलें आहे—

The mulb'ry-tree was hung with blooming wreaths.
The mulb'ry-tree stood centre of the dance,
The mulb'ry-tree was hymned with dulcet airs,
And from his touch-wood trunk the mulb'ry-tree
Supplied such relics, as devotion holds
Still sacred, and preserves with pious care.
So't was a hallowed time; decorum reigned
And mirth without offence. No few returned
Doubtless much edified and all refreshed."

*The Task.*

अकृत्वा परसन्तापमकृत्वा खलनम्रताम् ।
अनुसृत्य सतां वर्त्म यत्स्वल्पमपि तद्बहु [1] ॥

अंक ३४—(१) अवतरण. (२) जॉन्सन्च्या विपत्तीचा आरंभ. (३) तिची कारणें. (४) त्या वेळची विद्योपजीवि-जनांची स्थिति. (५) जॉन्सन्चा उपजीवनार्थ उद्योग. (६) त्याचीं काव्यें व नाटकें. (७) इंग्रेजी भाषेचा कोश.

१. मागील अंकांत वरील विख्यात पुरुषाचें पूर्ववृत्त सांगून गुणिजनांच्या गुणांस निकषभूत व अत्यंत समृद्ध जी लंडन् राजधानी तिथपर्यंत त्यास आणून सोडलें. आता येथें त्याचा जो शेवटपर्यंत काळ गेला तो कसा गेला, व क्रमाक्रमानें त्याची विद्वत्त्वकीर्ति अप्रतिम होऊन त्यास स्वास्थ्य कसें प्राप्त झालें तें सर्व सविस्तर कथन करतों.

२. जॉन्सन् इ० स० १७३७ सालीं लंडनास येऊन दाखल झाला, हें पूर्वी सांगितलें आहे. येथपासून त्याच्या विपत्तीस जो आरंभ झाला तो बरोबर पंचवीस वर्षे त्याची तशीच स्थिति होती. त्यानें अनेक मोठमोठे ग्रंथ केले, निबंध लिहिले, काव्यें रचलीं, व त्याची कीर्तीही चोहोंकडे अधिकाधिक पसरत होती; पण त्याची ददात म्हणून सुटली नाहीं. लक्ष्मीचा व सरस्वतीचा विरोध जो आपल्या लोकांत प्रसिद्ध आहे, त्याचें उत्कृष्ट उदाहरण त्याचे ठायीं दृष्टीस पडत होतें. त्याचीं शेवटलीं वीस बावीस वर्षे मात्र बरींच सुखांत व स्वस्थतेंत गेलीं; तरी शेवटपर्यंत त्याजपाशीं धनाची विपुलता अशी कधींच नव्हती. वरील स्वास्थ्याचा प्रकार कशामुळें घडून आला याविषयीं क्रमेंकरून सांगायाचेंच आहे. सध्यां वरील दरिद्रता जॉन्सन् यास दीर्घकाळ कशामुळें भोगावी लागली तें लिहितों.

३. पहिलें मोठें कारण त्या वेळची लोकस्थिति होय. मागें (२८ व्या अंकांत) एके ठिकाणीं [2] वाचकांस कळविलें आहे कीं, ॲडिसन्च्या 'स्पेक्टेटर्'नांवाच्या निबंधांनीं एकंदर लोकांस वाचायास शिकविलें. वरील निबंधावलि सन १७११–१२ या दोन वर्षभर प्रतिदिवशीं ( आदितवार खेरीज करून ) निघत असे त्या काळास व वरील कालास नुकतीं पंचवीस वर्षे काय तीं निघून गेलीं होतीं.तेव्हां जे लोक ॲडिसन्च्या वेळेस ट फ करायाला लागले त्यांची गति एक पिढी लोटून गेल्यानें किती ज्यास्त झाली असेल याची सहज कल्पना करतां येईल. हल्लीं वरील कालास दीडशें अधिक वर्षे होऊन गेल्यामुळें जें विलक्षण स्थित्यंतर होऊन गेलें आहे त्यावरून पाहतां हल्लींच्या इंग्रेज लोकांच्या पांचव्या सहाव्या पिढीचे लोक इतके अज्ञान होते ही कल्पना करणें सुद्धां कठिण पडतें. पण, मिल्टन्सारखा कवि कीं, ज्याचें नांव

---

१. "दुसऱ्यास ताप न देतां, दुष्टापुढें नम्रभाव प्रगट न करतां, आणि सज्जनांचा मार्ग न सोडतां, जें प्राप्त होईल तें थोडकें असलें तरी पुष्कळच आहे!" सं.

२. पृष्ठ ५६२ टीप १ पाहा.

'सम्पादक'

घेतल्याबरोबर सध्यां इंग्लंडांतील लहान पोरांच्या मनांत सुद्धां पूज्यभाव व प्रेम हीं उत्पन्न होतात, त्याची कविता त्याच्या वेळेस तर केवळ उपेक्षेसच पात्र होऊन पुढेंही तीस चाळीस वर्षेंपर्यंत बहुधां तशीच लोळत पडली होती,[1] तिची अभिरुचि ॲडिसन्‌नेंच पाहिल्यानें आपल्या देशबांधवांस लावली या एका गोष्टीवरून त्या वेळेच्या स्थितीचें अनुमान सहज होण्यासारखें आहे. असो; तर जॉन्सन् ज्या वेळेस लंडनास येऊन आपल्या लेखणीवर उपजीविका चालवण्याचा उद्योग करूं लागला त्या काळीं लोकांस विद्येची अभिरुचि उगीच कोठें लागत चालली होती हें एक त्याच्या दरिद्रतेचें कारण होय. सध्यांसारख्या स्थितींत त्याच्या एकाद्या ग्रंथाचें उत्पन्न त्यास जन्मभर पुरलें असतें. दुसरें कारण असें कीं, पुस्तकवाल्यांचा धंदा त्या वेळेस आतांप्रमाणें चांगला पिकला नसल्यामुळें ते स्वतः बहुधा अगदीं अडाणी असत. एकादा नवा ग्रंथ त्यांच्याकडे छापण्यास व विकण्यास आणला असतां त्याच्या खपाचा अदमास त्यांस स्वतः करतां येत नसे. कोणा प्रसिद्ध ग्रंथकाराची संमति जेव्हां ते घेत तेव्हां तो हातीं घेण्यास ते धजत. यामुळें जॉन्सन्‌चें नांव चांगलें प्रसिद्ध होईपर्यंत त्याच्याही ग्रंथाबद्दल पुस्तकवाले त्यास फार पैसा देत नसत; व तोही स्वतः पैशाच्या कामांत सदळच असल्यामुळें इतर ग्रंथकाराइतकीही आपल्या ग्रंथास किंमत मागत नसे. जें एकदां पहिल्या बोलीला ठरेल तेंच संतोषानें घेत असे. हें दुसरें कारण झालें. पण तिसरें कारण तर दोहोंहूनही मोठें होतें. तें या विख्यात मनुष्याची निस्पृही व मानी अशी मनाची स्वाभाविक वृत्ति होय. तो शरीरानें जसा धट्टाकट्टा व बळकट होता, तसाच मनानेंही आडदांड व उच्छृंखळ होता. कोणी मनुष्य केवढाही मोठा असला तरी त्याच्या वैभवास्तव त्याशीं लवून वागणें किंवा त्याचें मनोधारण करूं पाहणें हें त्यास अगदीं आवडत नसे. जसा अगदीं गरीब मनुष्याशीं तसाच थेट त्याच्याशींही तो वागत असे, व बोलण्याचालण्यांत कांहीं कमज्यास्त झालें असतां तो त्यास खडखडीत उत्तर देण्यांत किंवा हे ड्यूक् आहेत, अर्ल् आहेत आणि आपण काय गरीब मनुष्य, आपणांस वेळेनुसार दोन प्रहरचीही भ्रांत, हें मनांत आणून त्यांचें अज्ञान किंवा उर्मटपणा त्यांस भासवून देण्यांत तो कधींही कमी करीत नसे. मग अशा स्वारीचें व बड्या बड्या लॉर्ड् साहेबांचें कीं जे छानछूक करून आलेल्या लेडीसाहेबांची खुषामत करतां करतां मरून जाणार व मोठ्या आदबीनें बोलणें चालणें, नटणें मुरडणें या नाटकी कलेंत आपण मोठे बाके म्हणून आपली धन्यता मिरवणार, अशांचें कसें जमावें ! तेव्हां अर्थातच या बड्या मंडळींत त्यास पुरस्कर्ता कोणीही न

[1]. मिल्टन्‌चें जगत्प्रसिद्ध काव्य 'पॅराडाइज लॉस्ट्' याबद्दल त्यास सगळे पंधरा पौंड एका पुस्तकवाल्यानें दिले ! आमच्या महाराष्ट्र-मार्गेतील वीररसप्रधान काव्यास ( कुंटेकृत राजा शिवाजी–सं० ) सुद्धां आमच्या ' दक्षिणा प्रैज कमिटी'कडून अधिक बक्षीस मिळालें.

मिळाल्यामुळें त्यास स्वतःच्या श्रमानेंच व जें मिळेल त्यावर बहुधां शेवटपर्यंत गुजारा करावा लागला.

४. जॉन्सन् लंडन् शहरास निघाला तेव्हां त्याजवळ सामग्री झटली ह्मणजे दोन तीन गिनी,[१] दोन तीन शिफारशीचीं पत्रें, व एक अर्धेमुर्धे तयार झालेलें नाटक, येवढीच काय ती होती. वरील शिफारसपत्रांपैकीं एक एका प्रसिद्ध पुस्तकवाल्यास लिहिलेलें असून जॉन्सन्ची विद्वत्ता, कवित्वशक्ति वगैरे गुणांविषयीं त्यांत त्याची प्रशंसा केली होती; व शेवटीं सांगितलें होतें कीं, यास तुह्मी भाषांतराचें वगैरे काम दिलें असतां हा तुमच्या चांगला उपयोगीं पडेल. हें पत्र त्या पुस्तकवाल्यानें वाचून असेंच जॉन्सन्कडे थंमळ रेखून पाहिलें, आणि तो विनोदानें ह्मणाला; "गड्या, तूं जर बाजारांत हमालाचें पोतें विकत घेऊन ओझीं वाहत जाशील तर तुझा निर्वाह याहूनही बरा चालेल." या त्याच्या भाषणांत नुसती थट्टाच होती असें नाहीं. त्याच्या व इतर पुस्तकवाल्यांच्या आश्रयानें जे ग्रंथकार आपली उपजीविका करीत असत त्यांची अवस्था कशी असे ती त्याच्या नेहेमीच्या पाहण्यांतली होती. त्यांचें राहणें चवथ्या पांचव्या मजल्यावरच्या खोलींत, जेवणखाण एकाद्या मटाऱ्याच्या दुकानांत, अंगावर कपडालत्ताही वेळच्या वेळेस घालायाला मिळायाचा नाहीं, कधीं कधीं तोही सावकारानें शिपाई आणून पुढें उभा केला असतां जप्त व्हावयाचा, अशा प्रकारें ते काळ काढीत असत. जॉन्सन्नेंच आपली या वेळची स्थिति अनेक प्रसंगीं वर्णिली आहे कीं, त्यास नित्य चिंता ह्मणून कधीं सुटली नाहीं. आज जर आळसामुळें कांहीं काम केलें नाहीं तर उद्यां खडखडीत उपास पडायाचा अशी स्थिति त्याची वीस पंचवीस वर्षें होती. कधीं कधीं तर दोन दोन दिवस त्यानें अन्नावांचून काढावे.[२] दोनदां तर नाझरच्या शिपायानें त्यास पकडलें असतां त्याचा मित्र प्रख्यात कादंबरीकार रिचर्ड्सन्[३] यानें त्यास पांच

---

१. विलायतेंत सोन्याचेंही नाणें चालतें. गिनी ह्मणजे साडेदहा रुपये व पौंड ह्मणजे दहा रुपये होत. शिलिंग ह्मणजे अधेली व सहा पेन्स ह्मणजे चार आणे हें बहुतेकांस माहीत असेलच.

२. जॉन्सन्चीं पत्रें जीं छापलीं आहेत त्यांतील एकावर Impransus अशी सही आहे. हिचा अर्थ लॅटिन् भाषेंत 'बुभुक्षित,' 'भुकेला' असा होतो.

३. Samuel Richardson ( 1689—1761 ) लंडन् येथील छापखानेवाला. पन्नाशी उलटून गेल्यावर यानें आपली पहिली कादंबरी 'Pamela' प्रसिद्ध केली. हिच्या चार आवृत्त्या पहिल्याच तडाक्यासरशीं एका वर्षांत उडून गेल्या. अशा रीतीनें कीर्ति झाल्यावर 'Clarissa Harlowe' १७४९ सालीं व Sir Charles Grandison' १७५३ सालीं प्रसिद्ध झाली. त्याच्या साऱ्या पुस्तकांत शब्दावडंबर फार असून मुद्दयाचें कथासूत्र थोडेंच असतें; तरी त्याचें हें दीर्घसूत्री

[ पुढें चालू ]

पौंड उसने देऊन सोडवलें. असो; तर असल्या विपन्न स्थितींत प्रस्तुत ग्रंथकारानें आपले ऐन उमेदीचे व भर तारुण्याचे दिवस काढले. तरी त्याची नीति व सदाचरण हीं लवमात्रही सुटलीं नाहींत. एकदोनदां मात्र त्याचा प्रसिद्ध मित्र सॅव्हेज [१] याच्या संगतीनें त्याचें जरा वांकडें पाऊल पडलें; पण त्यानें तत्क्षणींच वाटेवर येऊन त्याबद्दल त्यास जन्मभर अनुताप होत असे. सॅव्हेज हा मोठा विलक्षण पुरुष होता. त्याचा जन्म मोठ्या कुळांत झाला असून त्याजवर मोठमोठे चमत्कारिक प्रसंग येऊन

---

चऱ्हाट उदात्त भावनापोषक असल्यामुळें रिचर्डसनची फार कीर्ति झाली. जॉन्सनच्या ' The Rambler ' या द्विसाताहिकांत चार पांचच वेळ जे दुसऱ्याचे लेख आले त्यांपैकीं एक ( सत्याण्णवाव्या अंकांतील ) रिचर्ड्सनचा होता. या लेखास जोडलेल्या प्रास्ताविक टिपेंत जॉन्सन् रिचर्ड्सनचें वर्णन खालीलप्रमाणें करतो:—An author who has enlarged the knowledge of human nature, and taught the passions to move at the command of virtue.' याच्याविषयीं एक मजेदार आख्यायिका आहे ती अशी:—

एकदां एका मेजवानीच्या प्रसंगीं पॅरिसहून आलेल्या एका पाहुण्यानें रिचर्ड्सनला खुष करण्याकरतां त्याची कादंबरी ' Clarissa ' आपण फ्रान्सच्या राजाच्या भावाच्या टेबलावर पाहिल्याचें सांगितलें. पण मंडळी आपसांत बोलत असल्यानें आपला द्विग्विजय सर्वांच्या कानीं जाणार नाहीं या भीतीनें त्या वेळीं रिचर्ड्सनने ऐकलें न ऐकलेंसें केलें व थोड्या वेळानें शांतता झाल्यावर हळूच मानभावीपणानें विचारतो, ' काय हो, तुम्ही कायसें म्हणत होतां ना मघाशीं ? कशाबद्दल बरें ? ' पण पाहुणाहि शेरास सव्वा शेर होता. रिचर्ड्सनची खोड मोडण्याकरतां तो म्हणाला, 'छे, हो ! अगदींच क्षुल्लक गोष्ट. ती काय पुनः सांगायची ? रिचर्ड्सनला वर्मी घाव बसला व त्याच्या आत्मप्रशंसा ऐकल्यास चटावलेल्या मनाला असा धक्का बसला कीं त्यानंतर त्या सबंध दिवसांत तो दहा शब्दहि बोलला नाहीं. जॉन्सन् या प्रसंगीं हजर असून रिचर्ड्सनच्या आढ्यतेखोरपणाबद्दल त्याची चांगली खोड मोडलेली पाहून त्याला फार आनंद झाला. 'सम्पादक'

१. Richard Savage ( 1696-1743 ) हा Macclesfield च्या काउंटेसचा मुलगा असून हें जन्म-रहस्य गुप्त ठेवून त्याचें बालपणीं पोषण चाललें होतें. हें रहस्य त्याला समजल्यावर आईची मदत मिळेना. तथापि तो कर्तबगार असल्यानें काव्यें, नाटकें वगैरे द्वारां वाङ्मयसेवा करून कित्येक दिवस त्यानें आपला चरितार्थ चालविला. कॉफीच्या दुकानांतील भांडणांत एका माणसास ठार मारल्यामुळें १७२७ सालीं याला फांशीची शिक्षा झाली. पण पुढें माफी होऊन कॅरोलाइन ( Caroline ) राणीकडून त्यास थोडें पेन्शनहि मिळालें. शेवटीं लॉर्ड् टर्कॉनेल् ( Tyrconnel ) यांच्या आश्रयानें राहत असतां हा तेथूनहि मांडून गेला व अखेर मोठ्या हालअपेष्टा होऊन ब्रिस्टल्च्या दिवाणी तुरुंगांत मेला. 'सम्पादक'

गुजरले होते; व जगाच्या सर्व स्थितींचा अनुभव त्यास घडला होता. शेवटीं जॉन्सन् वरील विपत्तींत रखडत असतां हा त्यास जोडीदार मिळाला, व 'समानशीलव्यसनेषु सख्यम्' या न्यायानें दोघांचा लवकरच परिचय होऊन अत्यंत स्नेह जडला. सॅव्हेजच्या अंगीं बरीच कवित्वशक्ति असून तो विद्वान् व बहुश्रुतही होता; व जगाच्या व्यवहारांत पुष्कळ घोळून गेला असल्यामुळें त्याची संगति जॉन्सन् यास विशेषच प्रियकर झाली. दोघेही फटिंग व दोघेही सारखेच कफल्लक; तेव्हां दोघांनीं सारी रात्रची रात्र शहरभर हिंडावें व साऱ्या जगाच्या उलाढाली कराव्या.[1] या वेळेस वरील स्नेह्याच्या संगतीनें जॉन्सन् यास ज्या कित्येक संवयी लागून गेल्या त्या शेवटपर्यंत त्यास लागून राहिल्या. त्या रात्रभर जागणें व दिवसा दोन दोन वाजेतों निजून राहणें, कोणाचीही फारशी मुरवत न ठेवतां त्यास चापून उत्तर करणें, रागाच्या सपाट्यांत हातघाईवर येणें, अशा तऱ्हेच्या कांहीं होत. असो; पण हा समागम फार वेळ टिकला नाहीं. सॅव्हेज यास लंडन् शहराचा त्रास येऊन तो वेल्स् प्रांतांत निघून गेला आणि पुढें लवकरच तिकडे दिवाणी तुरुंगांत मरण पावला.

५. इकडे जॉन्सन्चा क्रम 'शनैः पंथाः' या न्यायानें सारखा चाललाच होता. फ्रेंच्, इटॅलियन्, लॅटिन वगैरे भाषांतल्या ग्रंथांचीं भाषांतरें; नव्या ग्रंथांवर टीका; प्रसिद्ध पुरुषांचीं चरित्रें; निरनिराळ्या विषयांवर निबंध, कविता वगैरे; नाटकारंभींच्या सामाजिक विज्ञापना; ग्रंथार्पणपत्रें; पुस्तकालयांतील ग्रंथांची विषयवार याद; याप्रमाणें जो जो उद्योग सांपडेल व जो जो कोणी सांगेल तो जॉन्सन् करीत असे. तो स्वभावतः मोठा आळशी व मनस्वी होता, व शिवाय त्यास जी चमत्कारिक मनोविकृति जडली होती तिच्यामुळें तर त्यास जागचें उठूं नये असेंही वाटे; पण क्षुधेपुढें उपाय नाहीं. तिचें शमन करण्याचें साधन त्यास दुसरें अनुकूल नसल्यामुळें त्यास अंग मोडून दररोज कांहीं तरी उद्योग करावा लागे, या त्याच्या विपन्न स्थितीमुळें त्याच्या बुद्धिरूप भांडारांतील इतकी संपत्ति बाहेर पडली; व त्याच्या देशाचें कल्याण होऊन तिजपासून एकंदर जगासही इतका उपयोग घडला. नाहीं तर खाणींतल्या खाणींत राहिलेल्या सोन्यारुप्याप्रमाणें वरील संपत्ति बहुधां तशीच गुप्त राहती; किंवा निदान फारच थोडी प्रकट झाली असती. या गोष्टीची प्रचीति या ग्रंथकाराचीं शेवटलीं

---

१ "Johnson has often been heard to relate, that he and Savage walked round Grosvener-Square till four in the morning; in the course of their conversation reforming the world, dethroning princes, establishing new forms of government, and giving law to the several states of Europe; till, fatigued at length with their legislative office, they began to feel the want of refreshment, but could not muster up more than fourpence—half-penny,"

*Murphy's Life of Johnson*

वीस वर्षे जी आमदानींत ( आबादानींत ? सं० ) गेली तिजवरून पुढें येईलच. असो, आतां वरील ग्रंथसमूहांत व निरनिराळ्या कृतींत विशेष प्रसिद्ध ह्मणून जेवढ्या आहेत तेवढ्यांविषयीं वाचकांस माहिती देतों.

६. जॉन्सन्च्या नांवावर दोन प्रसिद्ध काव्यें जीं आहेत तीं त्यानें याच वेळेस लिहिलीं. हीं 'लंडन्'[१] व मानवी आशेचें वैफल्य'[२] अशीं दोन होत. पहिलें त्यानें आपल्या मित्राच्या प्रयाणसमयीं लिहिलें. त्यांतील पहिलीं पद्यें त्यासच उद्देशून लिहिलीं असून बाकीच्यांत इंग्लंडच्या राजधानींत जो दुराचाराचा, अनीतीचा वगैरे प्रकार आहे त्याचें वर्णन केले आहे. दुसऱ्या काव्यांत मोठमोठे राजे, मोठमोठे सरदार, मोठमोठे मुत्सद्दी यांचीं उदाहरणें देऊन मनुष्याच्या मनाची धांव कशी निष्फळ होते, ह्मणजे मोठें अवडंबर रचलें असतां त्याचा शेवटीं एका क्षणांत कसा विध्वंस होऊन जातो हें दर्शविलें आहे. हीं दोन्ही काव्यें लॅटिन् कवि जुवेनल्[३] याच्या धाटणीवर लिहिलीं

---

१. 'London, a Poem in Imitation of the Third Satire of Juvenal. जॉन्सन्नें हें काव्य १७३८ सालीं लिहिलें. जुव्हेनल्च्या या काव्याचें फ्रेंच् कवि Bolleau यानें अनुकरण करून पॅरिसवर खूप कडाका उडविला होता. जॉन्सन्पूर्वी इंग्रेज कवि 'Oldham' ओल्डहॅम यानेंहि असाच प्रयत्न केला होता. पण या दोघांहिपेक्षां जॉन्सन्चेंच काव्य अधिक सरस उतरलें आहे. या काव्यांत जुलूम व दडपशाही यांवर अत्यंत कडक भाषेत कोरडे ओढले आहेत. 'सम्पादक'

२. "Vanity of Human Wishes," in imitation of the Tenth Satire of Juvenal. 'सम्पादक'

३. Juvenal ( Decimus Junius Juvenalis. ) [ Circa 60—140 ] रोमन् कवि व औपरोधिक लेखनपटु. जन्मस्थल —Acquinum. याचें विश्वसनीय साधार चरित्र उपलब्ध नाहीं. अर्धे आयुष्य संपेतोपर्यंत यानें अलंकारिक वक्तृत्वाचे अध्ययन केलें. व आपला पहिला औपरोधिक निबंध म्हणून त्यानें (Paris) पॅरिस् बादशहावर एक कवन रचलें. तें यशस्वी ठरल्यामुळें उत्साहानें व तत्परतेनें त्यानें हेंच कार्य पुढें चालविलें. पण त्यानें आपलीं कवनें प्रसिद्ध केलीं नाहींत किंवा सार्वजनिक रीत्या ह्मणूनाहि दाखविलीं नाहींत. त्यामुळें अखेर जेव्हां तीं प्रसिद्ध झालीं तेव्हां तीं गाइलेलीं ऐकण्यास यत्रेच्या यत्रे जमत. पण एका नव्या कवनांत पॅरिसवरील कविता समाविष्ट केल्यामुळें एका मत्सरी नटास राग आला, व तो बादशहाच्या प्रेमांतला असल्यामुळें राजाकडून लष्करावरोबर ईजिप्तमध्यें पाठविण्याच्या मिषानें त्यानें त्यास हद्दपार करविलें. अखेर मोठ्या हालअपेष्टांत त्याचा अंत झाला. यानें एकूण सोळा औपरोधिक कवनें ( Satires ) रचलीं असून पांच विभागांत ती प्रसिद्ध केलीं. पहिल्या भागांत पांच कवनें असून खि. पू. पहिल्या शतकांतील रोमची परिस्थिति वर्णिणारें तिसरें कवन या पहिल्या भागांत आहे. याचेंच

( पुढें चालू )

आहेत. जुवेनल्नें रोम शहरावर कडाका उडवून रोमच्या इतिहासांतील उदाहरणें कशीं घेतलीं होतीं, त्याचप्रमाणें जॉन्सन्नें आपलें वसतिस्थान व आपल्या देशचा इतिहास यांच्या आधारानें वर्णन केलें. हीं दोन्ही काव्यें मूळ लॅटिन काव्याच्या तोडीचीं आहेत; कोठें कोठें तर मूळच्यावरही ताण झाली आहे. पहिलें 'लंडन्' प्रसिद्ध झालें त्या वेळेस पोप हयात होता, त्यानें मागील[1] 'मेसाया'प्रमाणें याचीही फार तारीफ केली, आणि त्याचा कर्ता कोण असावा, याविषयीं आपल्या मित्राकडून शोध करवला.[2] शोधाअंतीं जेव्हां असें समजलें कीं हा कोणी गरीब व अप्रसिद्ध मनुष्य आहे, तेव्हां त्यानें भाकीत केलें कीं, 'हा मनुष्य फार दिवस अप्रसिद्ध राहणार नाहीं.' याप्रमाणें या काव्याची प्रथमारंभींच चोहोंकडे मोठी प्रशंसा झाली; कित्येक तर असेंही ह्मणूं लागले कीं आतां पोपचेंही वर्चस्व[3] फार दिवस टिकणार नाहीं. याचा खपही तसाच असा जलद झाला कीं दुसऱ्या आठवड्याला दुसरी आवृत्ति काढावी लागली. तरी जॉन्सन् यास पुस्तकवाल्याकडून या काव्याबद्दल दहा गिनीच काय ते

---

अनुकरण जॉन्सन्नें केलें. बाकीच्या चार कवनांत Dominitan: बादशहावर खूप कडक टीका आहे. दुसऱ्या भागांत सहावें व सर्वांत मोठें कवन असून त्यांत स्त्रीजातीवर कडाका उडविला आहे. तिसऱ्यांत सातवें, आठवें, नववें व चवथ्यांत दहावें, अकरावें व बारावें अशीं कवनें विभागलीं आहेत. दहाव्यांत मानवी आशांची विफलता अनेक ऐतिहासिक उदाहरणें देऊन सिद्ध केली आहे. पांचव्या भागांत तेराव्यापासून सोळाव्याअखेर कवनें आलीं आहेत. हीं सारीं कवनें इ. स. १००–१३० च्या दरम्यान लिहिलीं असावीं. जुव्हेनल्च्या नैराश्यवादांत भावी व दूरच्याहि आशेचा किरण सुद्धां नसे. पण त्याचा समकालीन टॅसिटस् (Tacitus) याला विद्यमान दुःस्थितीचा शेवट व नव्या आशाजनक कालांतराचा उदय दिसे. जुव्हेनल्च्या ठिकाणीं काव्यप्रतिभेपेक्षां अलंकारिक भाषाकौशल्यच अधिक होतें.

'सम्पादक'

१. पृष्ठ ६७४ पाहा. 'सम्पादक'

२. जॉन्सन्नें आपलें नांव, चोहोंकडे प्रख्यात होईपर्यंत आपल्या कोणत्याही ग्रंथावर घातलें नाहीं; तरी त्यांतील मजकुरावरून व भाषापद्धतीवरून तें तेव्हांच समजण्यांत येई हें उघड आहे.

'सम्पादक'

३. कारण पोपचें '१७३८' हें औपरोधिक काव्य व जॉन्सन्चें 'लंडन्' दोन्ही १७३८ च्या मे महिन्यांत एकाच दिवशीं सकाळीं प्रसिद्ध झालीं व इंग्लिश जुव्हेनल् (जॉन्सन्) चेंच तेज इंग्लंडच्या हॉरेस् (Horace)–पोपपेक्षां ज्यास्त पडलें.

'सम्पादक'

मिळाले. याप्रमाणेंच दुसऱ्या [1] काव्याचीही जरी चोहोंकडे वाखाणणी झाली, तरी त्यापासून त्यास मिळकत पंधरा पौंडच [2] झाली.'[3]

जॉन्‌सन्‌नें लंडनास येतांना बरोबर एक अपुरतें राहिलेलें नाटक आणलें होतें असें वर [4] वाचकांस कळवलें आहे. तें त्यानें येथें आल्यावर संपूर्ण केलें; तें 'ऐरीन' हें होय. इंग्लिश् भाषेंत, किंबहुना युरोपांतल्या साऱ्या भाषांतून, नाटकांचे दोन प्रकार मानलेले आहेत; एक ट्रॅजेडी (शोकरसप्रधान) आणि दुसरा प्रकार कॉमेडी(हास्यरसप्रधान)यांपैकीं पहिल्या वर्गांतलें वरील नाटक होय. याचें संविधानक तुर्क लोकांच्या इतिहासांतील एक चमत्कारिक वृत्तांत घेऊन त्यावर बांधलें आहे. याचा प्रयोग जॉन्‌सन्‌चा शिष्य गॅरिक् यानें मूळच्यांत पुष्कळ फेरफार करून [5] रंगभूमीवर तेरा वेळ करवला. या प्रसंगीं गॅरिक्‌नें आपल्या गुरूकरतां आपलें कसब होतें तितकें प्रगट केलें. व एकंदर नाटकाची तयारी जितकी उत्कृष्ट ठेवता आली तितकी ठेवली. पण मूळ कृतींत अंतःकरणास द्रवण्यासारखें विशेष कांहीं नसल्यामुळें समाजनास तें फारसें पसंत झालें नाहीं. त्यांतील भाषा व विचार हीं दोन्ही प्रौढ होतीं. यास्तव तें श्रोत्यांनीं शेवटपर्यंत गंभीरपणानें व स्वस्थपणानें ऐकून घेतलें; पण एकंदर प्रकार थंडाईचाच झाला. तेव्हांपासून पुढें तर त्याचा प्रयोग कधींच झाला नाहीं व जॉन्‌सन्‌च्या इतर ग्रंथांच्या मानानें पाहतां ॲडिसन्‌च्या 'केटो' [6] प्रमाणें तें

---

१. Vanity of Human Wishes 1749 हें काव्य जुव्हेनल्‌च्या दहाव्या औपरोधिक काव्याच्या (Satire) आधारें लिहिलें असून निर्दयपणा, हांवरेपणा, व नीचपणा यांचीं नमुनेदार उदाहरणें ह्मणून Domitian, Otho, Nero, Claudius, Messalina वगैरेंचीं उदाहरणें त्यानें दाखल केलीं आहेत. यांतहि त्याचा औपरोधिक स्वर कायम असला तरी क्रोधाचा पारा बराच खालीं उतरला आहे. 'सम्पादक'

२. गिनीच. 'सम्पादक'

३. वरील दोन काव्यांवर निरनिराळ्या ग्रंथकारांचे असे अभिप्राय आहेत—

"*London* has all the ease and all the spirit of an original." Gray.

*The Vanity of Human Wishes* is a satire, the deep and pathetic morality of which has often extracted tears from those whose eyes wander dry over pages professedly sentimental. Sir Walter Scott.

"*The Vanity of Human Wishes* is an excellent imitation of the tenth satire of Juvenal. It is in truth not easy to say whether the palm belongs to the ancient or the modern poet" Macaulay

४. पृष्ठ ६८९ पाहा. 'सम्पादक'

५. प्रसंगीं जॉन्सन् नाखुष व्हावा अशा प्रकारचेहि फेरफार करून. 'सम्पादक'

६. ॲडिसन् (१६७९-१७१९) व्हेनिस येथें गेला असता केटोच्या

(पुढें चालू)

आतां विशेष प्रसिद्धही नाहीं. ही दोन्ही नाटकें आतां सर्वांच्या मते वाचण्यास मात्र चांगलीं असून रंगभूमीवर प्रयोग करण्याच्या उपयोगी नाहींत असें ठरलें आहे. असो; या नाटकाच्या प्रयोगांवरून व छापण्याचा हक्क विकल्यावरून जॉन्सन् यास एकंदर तीनशें पौंड मिळाले, हेच त्या वेळेस त्यास हजाराच्या जागीं होते.

७. जॉन्सन्नें पद्यरूप जी ग्रंथरचना केली ती वर सांगितली तेवढीच. यापुढचे त्याचे सर्व ग्रंथ गद्यरूपच आहेत. त्याची पुढें पुढें जी येवढी विलक्षण ख्याति झाली व अद्यापही चालत आहे ती या गद्यग्रंथांवरूनच होय. कांहीं अंशीं या पद्धतीस त्यानें नवें स्वरूप देऊन तिचा प्रचार वाढवला असें सुद्धां ह्मणण्यास हरकत नाहीं. या वेळीं इंग्लंडांत 'जेटलमेन्स मॅगेझैन' [१] ह्मणून एक पत्र निघत

---

मृत्यूवरील एक नाटक तेथील रंगभूमीवर चालू होतें तें त्यानें पाहिलें. तें जरी उत्कृष्ट साधलें नव्हतें तरी इंग्रेजी रंगभूमीकरतां तें इंग्रेजींत आणण्याचा ॲडिसन्चा विचार तेथेंच ठरला असला पाहिजे. ( Cato ) केटोचें मन सिपिओ ( Scipio ) च्या मुलीवर बसलें होतें; पण तिनें आपलें हृत्सुमन सीझरच्या पायीं वाहिलें होतें. प्रेमभंग झाल्यामुळें आत्महत्या करण्याचा निश्चय करून केटो आपल्या लायब्ररींत जातो व हातांत तरवार घेऊन ती छातींत खुपसून घेण्यापूर्वी एक आत्मगत भाषण करतो, अशा प्रकारचें इटॅलियन् नाटकाचें कथानक होतें. लगेंच ॲडिसन्नें इंग्रेजींत केटो नाटक लिहिण्यास सुरुवात केली व तेथून निघण्यापूर्वी चार अंक लिहून टाकले. आपल्या शोकपर्यवसायी नाटकाचा कदाचित् बोजवारा उडेल या भीतीनें ॲडिसन्नें तें रंगभूमीवर आणण्याची घाई केली नाहीं. पण हस्तलिखित प्रत फार आवडून अनेक वाचकांनीं तें नाटक निदान छापून तरी काढावें अशी ॲडिसन्ला विनंति केली. कारण नाटकांतील सीझरचे अनुयायी, सेम्प्रोनिअस् ( Sempronius ) आणि रोमच्या स्वातंत्र्याकरतां अखेरपर्यंत झगडणारा केटो यांची शब्दचित्रें पाहतांच इंग्लंडांतील टोरी, व्हिग् आणि हॅलिफॅक्स् (Halifax) व व्हॉर्टन् ( Wharton ) यांच्या भोंवतीं उभी राहणारी देशभक्तांची सेना वगैरेंचींच तीं वर्णनें आहेत असें वाटून वाचकांस फार आवडतील अशी त्यांची कल्पना होती. पुढें रंगभूमीवर आल्यावर केटो नाटक खरोखरच फार लोकप्रिय झालें. नाटकगृह महिनाभर सारखें चिकार भरून जात असें. ॲडिसन्ची या नाटकामुळें फार प्रसिद्धि झाली.

'सम्पादक'

१. Gentleman's Magazine, सम्पादक एड्वर्ड केव्ह् (Edward Cave) Sylvanus Urban हें त्याचें टोपण नांव होय लंडन्ला वाङ्मयसेवेसाठीं येण्यापूर्वीच या मासिकानें जॉन्सन्चें लक्ष वेधून घेतलें असून त्याचे तें फार आवडतें झालें होतें. लंडन्ला आल्यावर या मासिकाच्या जागे ( St, John's Gate ) चें

असे, त्यांत त्याचें लेख पहिल्यानें येऊं लागले. या पत्रांत निबंध वगैरे व सामान्य लौकिक विषय जसे असत, त्याप्रमाणेंच पार्लमेंटांत होणाऱ्या बाटाघाटींचीही हकीकत लोकांस कळवली असे. हें दुसरें काम कांहीं दिवसांनीं जॉन्सन् स्वतः करूं लागला. वरील पत्राचा मालक आपल्या वतीचे कांहीं लोक पार्लमेंटांतील वादविवाद ऐकण्यास पाठवीत असे; व त्यास तेथील चोपदारांनीं कांहीं हरकत करूं नये अशी त्यानें आंतून गुप्त तजवीजही केली होती. या बातमीदारांनीं भाषणांचा सारांश लिहून आणावा, व कोणकोणत्या वक्त्यानें कोणत्या पक्षाकडचें भाषण केलें हेंही लिहून आणावें; आणि मग येवढ्यावर काय ती सगळी इमारत रचायाची! तरी जॉन्सन्ची विद्वत्ता व चातुर्य असें होतें कीं, वरील तुटक तुटक माहितीवरून त्यानें दोहीं पक्षांकडील वक्त्यांचीं भाषणें स्वकपोलकल्पित नवींच तयार करावीं. मग तीं तयार झाल्यावर वरील पत्रांत गोष्टींच्या रूपानें [1] छापलीं जात; ह्मणजे अमुक अमुक नगरी तेथील राजाच्या प्रधानांनीं अशीं अशीं भाषणें केलीं असा आरंभीं उपोद्घात करावा लागे.[2] असो; या भाषणांचेंही कर्तृत्व पुष्कळ दिवसपर्यंत गुप्तच होतें; तें हळू हळू प्रसिद्ध होत जाऊन सरतेशेवटीं जॉन्सन्नेंच स्वतः एके प्रसंगीं कबूल केलें. या भाषणांत प्रस्तुत ग्रंथकर्त्याची प्रौढ रचना व चातुर्य हीं दोन्ही अर्थात् आहेतच; तरी त्यांची आतां फारशी प्रसिद्धि नाहीं.

जॉन्सन्चा यापुढचा ग्रंथ त्याचा परम मित्र वर सांगितलेला जो सॅव्हेज[3] त्याचें चरित्र होय. याचा मागें सांगितल्याप्रमाणें बेल्स् प्रांतीं एका तुरुंगांत शेवट झाला असतां त्याच्या एकंदर चरित्राविषयीं लोकांस मोठी उत्कंठा व कौतुक हीं

---

दर्शन त्यानें फार आदरानें घेतलें. जॉन्सन्ला या मासिकांतच नांव गुप्त ठेवून लेख लिहिण्याची प्रथम संधि मिळाली होती. उत्तमोत्तम निबंध लिहून जॉन्सन्नें या मासिकाला फारच महत्त्वाला पोंचविलें. 'Senate of Lilliput' या मथळ्याखालीं पार्लमेंटांतील विवाद कित्येक वेळां काल्पनिक व्यक्तींच्या तोंडीं तर कित्येक वेळीं नांवांचीं अक्षरें ओळखतां येतील अशा रीतीनें मागें पुढें करून नव्या नांवांच्या व्यक्तींच्या तोंडीं घालून जॉन्सन् प्रसिद्ध करीत असे. 'सम्पादक'

१. ('Reports of the Debates of the Senate of Lilliput') 'लिलिपुट नगरीच्या राजसभेंतील चर्चा' या प्रच्छन्न नांवाखालीं लंडनच्या पार्लमेंटांतील भाषणें जॉन्सन् देई. 'सम्पादक'

२. वरील गोष्टीवरून इंग्लंडांतील लोकांस तेव्हां किती स्वातंत्र्य होतें याचा अजमास होतो. हल्लीं पार्लमेंटांतील कारभार इतका गुप्त रीतीनें न चालून तेथील भाषणें साऱ्या जगभर बर्शाचीं तशीं प्रसिद्ध होतात हें सर्वप्रसिद्धच आहे. यावरून सुमारें शंभर वर्षांतच इंग्लंडांत लोकस्वातंत्र्याच्या संबंधानें केवढा फेरफार झाला आहे हें सहज मनांत येईल! 'सम्पादक'

३. पृष्ठ ६९० पाहा. 'सम्पादक'

उत्पन्न झाली होतीं. अशा संधीस वरील ग्रंथ लिहून जॉन्सन्नें तीं दोन्हीं पुरवलीं व सर्वांस अगदीं थक्क करून सोडलें. याही ग्रंथावर जॉन्सन्चें नांव नव्हतेंच; तरी पुष्कळांस तोच त्याचा कर्ता ह्मणून तेव्हांच माहीत झालें. या वेळेपर्यंत इंग्लंडांत चरित्रें लिहिण्याचा प्रकार विशेष चालू नव्हता; व जो होता तोही मोठ्याशा पूर्ण दशेस आला नव्हता. कोणी मोठा प्रख्यात मनुष्य मरण पावला असतां जॉन्सन्च्या-सारखे जे विपन्न ग्रंथकार आपल्या लेखणीवर उदरनिर्वाह करीत असत त्यांनीं त्यांचीं चरित्रें तयार करावीं; मग त्यांत जीं बरीशीं व खपतीलशीं वाटतील तीं पुस्तकवाल्यांनीं विकत घेऊन छापून प्रसिद्ध करावीं. अशा बुभुक्षाप्रेरित ग्रंथांची योग्यता कितीशी असणार! कांहींच नसे. त्या पक्षीं तसल्यांतही जीं चरित्रें अंमळ बरींशीं असत तीं लोकांच्या आश्रयास कांहीं वेळ पात्र होत, व पुढें नाहींशीं होऊन जात. पण प्रस्तुत चरित्र फार निराळ्या तऱ्हेचें होतें. त्यांत सॅव्हेजच्या आयुष्यांत घडलेल्या ज्या चमत्कारिक चमत्कारिक गोष्टी त्या सर्वांचें यथास्थित व चित्तवेधक कथन अशा कांहीं खुबीनें केलें आहे कीं, वाचकांची वृत्ति तन्मय होऊन जाऊन त्यांस पुस्तक खालीं ठेववतच नाहीं.[1] तसेच जागोजागीं जे विचार प्रकट केले आहेत तेही मोठे मार्मिकपणाचे व प्रौढतेचे असल्यामुळें सामान्यतः सर्वांस व विशेषतः तरुण-जनांस तर ते अत्यंत हितावह होण्यासारखे आहेत.

---

१. जॉन्सन्च्या मित्रमंडळींत सर * जॉशुआ रेनॉल्ड्स् ह्मणून एक मोठा विख्यात चित्रकार होता. त्याच्याविषयीं वरील ग्रंथाच्या संबंधानें एक चमत्कारिक गोष्ट लिहिली आहे. त्याचा वरील ग्रंथकाराशीं जो स्नेह जमला तो वरील ग्रंथावरून. रेनॉल्ड्स् यानें एक दिवस सहज वरील चरित्र वाचावयास घेतलें व रस्त्याच्या बाजूस एका धुराड्यावर हात टेंकून तें वाचायास आरंभ केला. पण त्या ग्रंथानें त्याचें मन इतकें वेधून टाकलें कीं, तें सगळें तेव्हांचें तेव्हांच त्यानें वाचून टाकलें. मग शेवटीं धुराड्यावरून हात काढायाला जों जातो तों तो बधिर होऊन गेलेला! पुढें दोघांची परस्पर ओळख होऊन जो स्नेह जमला तो आमरणान्त राहिला. जॉन्सन्चें चित्र जें त्याच्या पुष्कळ ग्रंथांवरून काढलेलें असतें तें त्याच्या हातच्या तसबिरीवरून काढलेलें होय.

* Sir Joshua Reynolds (1723—1792) चित्रकार व लेखक. इटालींत चित्रकलेचें अध्ययन करून हा लंडन् येथें स्थाईक झाला. तेथें चित्रकार ह्मणून याची फार कीर्ति झाली. जॉन्सन्, बर्क्, गोल्ड्स्मिथ् वगैरे विख्यात गृहस्थांशीं याची दाट मैत्री होती. रॉयल् अॅकेडमीपुढें दिलेलीं चित्रकलेवरील पंधरा व्याख्यानें (Fifteen Discourses) ऐड्लर्मधील लेख व डू फ्रेस्ने (Du Fresney) च्या 'Art of Painting' या ग्रंथाचें भाषांतर, यामुळें वाङ्मयांत प्रमुख दर्जा रेनॉल्ड्स्ला मिळाला. त्याला बधिरता व म्हातारपणीं दृष्टिमांद्य अशीं वैगुण्यें होतीं. सं०

८. जॉन्सनूचे येथवर जे जे ग्रंथ सांगितले ते ते त्याच्या पूर्व वयांत व तो तादृश प्रसिद्ध नसतां रचलेले होत. आतां यापुढचा जो त्याचा प्रचंड उद्योग सांगायाचा आहे त्याच्यापासून मात्र त्याची कीर्ति अगदीं स्थायिक होऊन तो त्या कालच्या विद्वन्मंडळांत सर्वानुमतें अग्रगण्य ठरला. हा उद्योग इंग्रेजी भाषेचा कोश होय. जॉन्सनूची मागील ग्रंथावरून चोहोंकडे ख्याति होऊन बऱ्यासारख्या कामास तो किती योग्य होता हें चोहोंकडे माहीत झालें होतें. यास्तव सन १७४७ सालीं लंडन् शहरांतले कित्येक मोठमोठे पुस्तकवाले एकत्र जमून त्यांनीं विचार केला कीं, जॉन्सनूकडे हा उद्योग सोपवून दिला असतां तो चांगल्या तऱ्हेनें शेवटास जाऊन आपणांस चांगला नफा होईल मग त्यांनीं तो बेत त्यास कळवून त्याबद्दल त्यास १५७५ गिनी[1] देण्याचें कबूल केलें. जॉन्सन् यासही दररोज नवा उद्योग शोधीत बसण्याचा त्रास आला होता, यास्तव दोन तीन वर्षांचें हें आपणास एकदमच काम मिळालें असें समजून त्यासही वरील बेत पसंत झाला. मग हाताखालीं तीन चार मदतनीस घेऊन व एक निराळें घर भाड्यानें घेऊन त्यानें इंग्रेजी भाषेचा कोश रचण्यास आरंभ केला. हा संस्कार त्या भाषेस तोंपर्यंत मुळींच घडला नव्हता. नुसते शब्दवर्णानुक्रमानें लावलेले व त्यांचा अर्थ थोडक्यांत दिलेला असे लहानसान कांहीं कोश होते. पण तोंपर्यंत त्या भाषेत जो गोंधळ माजला होता तो मोडून टाकून नीट व्यवस्था लावण्याचा उद्योग त्यापूर्वी कोणींच केला नव्हता. जॉन्सनूनें या कोशाच्या आरंभीं जी प्रस्तावना लिहिली आहे तींत त्या वेळीं प्रस्तुत भाषेची जी स्थिति होती, तिचें स्वरूप चांगलें वर्णन केलें आहे. ह्मणजे वर्णोच्चाराविषयीं भेद, शब्दाक्षरांच्या लेखनाविषयीं अनियम, वाक्यांची रचना व्याकरणभ्रष्ट, भाषापद्धति ग्राह्य कोणती अग्राह्य कोणती याचा बिलकुल विचार नाहीं, पाहिजे त्या ग्रंथकारानें मनास वाटतील ते परकी शब्द भाषेंत घुसडून द्यावे, अशी अव्यवस्था एकंदर भाषेत माजली होती. तेव्हां हा सर्व गोंधळ मोडून एकट्या मनुष्यानें तीस चाळीस हजार शब्दांची वर्णव्यवस्था, उच्चार, अर्थ वगैरे सर्व नीट बसवून देऊन चोहोंकडे व्यवस्था करून देण्याचा यत्न करणें ह्मणजे केवढें अचाट साहस आहे व केवढी जबरदस्त यातायात आहे! पण ही सर्व या महापंडितानें आपल्या अंगावर घेऊन तो उद्योग कालेंकरून तडीस नेला. त्याच्या पूर्वसंकल्पाप्रमाणें हें काम दोन तीन वर्षांत अर्थात् संपलें नाहींच; त्यास पुरीं सात आठ वर्षें लागलीं. इतक्या कालांत त्यास दिलेली रक्कम पार खलास होऊन गेली, त्यास दोनदां दिवाणी तुरुंगांत कर्जदारांनीं नेऊन बसवलें दोनदां त्याच्या मित्रानें[2] त्यास नाझरच्या शिपायांच्या हातून सोडवलें, व सर्वांत मोठी दुःखाची गोष्ट झाली ह्मणजे ही कीं, जीवर तो जीव कीं प्राण करीत असे, जिच्या सुखार्थ स्वतःला

---

१ १५७५ पौंड. 'सम्पादक'

२. ( Richardson ) रिचर्डसन्. 'सम्पादक'

किंतीही कष्ट पडले तरी त्यानें आनंदानें सोसावे, व प्रस्तुत अवाढव्य ग्रंथ संपला असतां त्यापासून उत्पन्न होणारी संपत्ति व कीर्ति यांचा उपभोग जिच्याबरोबर चिरकाळ घेण्याचें त्याच्या मनांत होतें, ती त्याची आवडती बायको मरण पावून तो पुनः सडाचा सडाच राहिला![1]

---

१. जॉन्सन्‌च्या या स्थितीचें मेकॉलेनें मोठें हृदयास लागण्यासारखें वर्णन केलें आहे.

"The last Rambler was written in a sad and gloomy hour. Dr. Johnson had been given over by the physicians. Three days later she died. She left her husband almost broken-hearted. All his affection had been concentrated on her. He had neither brother nor sister; neither son nor daughter. To him she was beautiful as the Gunnings, × and witty as Lady Mary. † Her opinion of his writings was more important to him than the voice of the pit of Drury lane's Theatre or the judgment of the Monthly Review. The chief support which had sustained him through the most arduous labour of his life was the hope that she would enjoy the fame and the profit which he anticipated from his Dictionary. She was gone; and in that vast labyrinth of streets, peopled by eight hundred thousand human beings, he was alone. Yet it was necessary for him to set himself, as he expressed it, doggedly to work. After three more laborious years, the Dictionary was at length complete."

×. गनिंग् आडनांवाच्या दोघी सुंदर आयरिश् बहिणी होत्या त्यांच्यासंबंधीं हा उल्लेख आहे. वडील बहिणीचें नांव मेरिआ. धाकटीचें एलिझाबेथ्. मेरिआचा जन्म १७३३ सालीं व एलिझाबेथ्‌चा १७३४ सालीं झाला. मेरिआचें लग्न १७५२ सालीं जॉर्ज वुइलियम् ( George Wiliam Earl of Coventry ) यांशीं झाला. धाकटी एलिझाबेथ् हिनें वैचित्र्य-(Romance)-प्रियतेमुळें हॅमिल्टन्‌चे ड्यूक जेम्स् यांशीं १७५२ सालीं एके दिवशीं मध्यरात्रीं गुप्तपणें विवाह केला. पण १७५८ सालीं सदर जेम्स् वारल्यामुळें १७५९ सालीं जॉन् कॅम्बेल् (Marquis of Lorne) यांशीं पुनर्विवाह केला. दोघीहि बहिणी कमालीच्या सुंदर होत्या. पण त्यांतल्या त्यांत थोरलीचें सौंदर्य कांहीं औरच होतें. मात्र ती ( थोरली ) मूर्ख व घमेंडखोर होती. यांच्या बापाचें नांव जॉन् गनिंग् असून तो कॅसल्कूट्‌चा रहिवासी होता. मेरिआ १७६० सालीं वारली व एलिझाबेथ् १७९० सालीं वारली. यांच्या अतुल सौंदर्यामुळें या उपमानपद पावल्या. 'सम्पादक'

[ पुढें चालू ]

वरील कोशाच्या संबंधानें एक मोठें प्रकरण झालें तेंही येथें सांगितलें पाहिजे. तें मागें सांगितलेला जो लॉर्ड चेस्टर्फील्ड् त्याच्या संबंधाचें होय. चेस्टर्फील्ड् हा त्या

---

† Lady Mary Wortly Montague (1689-1762) विख्यात पत्रलेखिका. ऐन तारुण्यांत तिच्या ठिकाणीं अप्रतिम सौंदर्य व आत्यंतिक चतुरस्रता या दोन्ही बहुमोल गुणांचें संमीलन झालें होतें. तिच्या बापानें तिच्या शिक्षणाकडे मुळींच लक्ष दिलें नाहीं. पण तिला स्वतः शिकण्याची हौस असल्यामुळें तिचा चुलता बिशप् बर्नेट् [ Burnet ] यानें मदत केल्यामुळें तिचें बरेंच शिक्षण झालें. पोप, ॲडिसन्, स्विफ्ट् व स्त्रियांच्या हक्कांची पुरस्कर्त्री मेरी ॲस्टेल् ( Mary Astel ) यांशीं तिचा चांगला स्नेह होता. ॲन ( Anne Wortley Montague ) इच्याशीं तर तिचा इतका दाट परिचय होता कीं त्या दोघींमध्यें उद्दीपक मर्मित सारखा पत्रव्यवहार चालू असे. ॲनचीं पत्रें वस्तुतः तिचा भाऊ एड्वर्ड् लिहीत असे. १७०९ सालीं ॲन वारल्यावर एड्वर्ड् व मेरी यांचा प्रत्यक्ष पत्रव्यवहार सुरू झाला. मेरीच्या मनांत एड्वर्डशीं लग्न करावयाचें होतें. पण बापाला ही गोष्ट नापसंत असल्यामुळें त्यानें तिचें लग्न दुसऱ्याच एका गृहस्थापाशीं ठरविलें त्यामुळें १७१२ सालीं ती एड्वर्ड्-बरोबर पळून गेली. त्यांचा विवाह झाल्यावर तिनें पहिलीं कित्येक वर्षें काटकसरीनें दिवस काढले. तिचा पति १७१५ सालीं वेस्ट्मिन्स्टर्तर्फे पार्लमेंटांत निवडून आला. अलेक्झांडर् पोपनें तिला उच्छृंखलपणाचीं पत्रें लिहिलीं त्यामुळें पोपशीं तिचें भांडण झालें. रेमंड् (Remond) नांवाचा फ्रेंच् गृहस्थ, तिचें दर्शनहि त्याला झालें नव्हतें तरी तिजवर आसक्त होऊन तिला गुप्तपणें प्रेमसूचक पत्रें लिहीत असे. त्याच्याच विनंतीवरून तिनें South Sea Company मध्यें सट्टयांत पैसे गुंतविले. पण पुढें किंमत निम्यावर आल्यामुळें सदर रकम त्यानें तिचा पत्रव्यवहार तिच्या नवऱ्यास दाखविण्याची दहशत घालून कर्ज म्हणून तिला मान्य करावयास लाविलें. १७३९ सालीं ती इटालीला गेली. तेथून ती आपल्या पतीस प्रेमादरपूर्वक पत्रें पाठवीत असे. पण त्यांची पुढें केव्हांहि प्रत्यक्ष भेट झाली नाहीं. देवीची लस टोंचून घेण्याचा उपाय तिनें तुर्कस्तानांत पाहिला व आपल्या मुलास टोंचून घेऊन तिनें हा उपाय पाश्चात्य देशांत सुरू करण्याची खटपट केली. तिचा नवरा लक्षाधीश होऊन १७६१ सालीं मेला. मुलीनें बोलवल्यावरून ती इंग्लंड्ला परत आली, पण पुढील सालीं वारली. 'Letters from the East' हीं तिचीं पत्रें अत्यंत विख्यात आहेत. पोप व स्विफ्ट् या दोघांनीं तिजवर कसून हल्ले चढविले व तिनेंहि तितकींच तडफदार उत्तरें दिलीं. 'सम्पादक'

८ डूरीलेन थिएटर–लंडनमधील सर्वांत जुनें नाटकगृह. १६७१सालीं हें बळलें. (Wren)त्याच जागीं बांधलेलें नवें नाटकगृहहि१८०९सालीं अग्निराजाच्या मत्सरस्थानीं पडलें. सध्यांचें नाटकगृह १८१२ सालीं बांधण्यांत आलें. शेरिडन् ( Sheriden )

(पुढें चालू.)

वेळेस सेक्रेटरी ऑफ् स्टेट्च्या हुद्द्यावर होता. त्याची विद्वत्तेविषयींही बरीच ख्याति असून त्या वेळच्या वक्त्यांत तर तो प्रमुखच होता. या बड्या सरदाराची वरील कोशास अनुकूलता दिसल्यावरून जॉन्सन्नें पहिलें संकल्पपत्र [1] त्यास उद्देशून लिहिलें. यावरून सदरहू लॉर्ड साहेबांकडून जॉन्सन् यास बोलावणें आलें, तेव्हां तो त्यांजकडे जाऊं लागून कांहीं दिवस दोघांची बरीच गोडीगुलाबी चालली. जॉन्सन् यास वाटलें कीं, आपल्या कृत्यास येवढा पुरस्कर्ता मिळाला हें फार चांगलें झालें; व चेस्टर्फील्ड् यांसही वाटलें कीं, येवढा मोठा ग्रंथ आपल्या आश्रयानें होणार हें आपल्या नांवास चिरकाळ भूषणच झालें. पण ही स्थिति फार वेळ टिकली नाहीं. दोघांचा लवकरच जो बेबनाव झाला तो शेवटपर्यंत तसाच राहिला; व वरील अर्ल् साहेबांच्या मनांत आपल्या नांवाचा इंग्रेजी[2] भाषेच्या कोशाशीं ज्या प्रकारचा संबंध असावा असें होतें त्यापेक्षां तो आतां फार निराळ्या तऱ्हेचा आहे. याचें कारण असें झालें कीं, अर्ल्साहेब हे जन्मापासून सरदारमंडळींत व मोठमोठ्या लेडीसाहेबांच्या मेळ्यांत वागलेले असून रीतरिवाजाच्या टापटिपींत बारीक लक्ष पुरवणारे होते; व जॉन्सन् काय? त्याचा काळ सगळा अगदीं नीच पदवीच्या लोकांच्या संगतींत गेला असल्यामुळें वरील नोकझोकांत तो पुरा अडाणी होता, व स्वभावानें आडदांड असल्यामुळें थोर लोकांपुढें जाणें तर मोठें भीत भीत जावें, त्यांच्याशीं बोलायाचें तें मोठ्या अदबीनें व लवून बोलावें, वगैरे प्रकार तो बिलकुल जाणत नसे. मग अशा रानवट मनुष्याशीं गांठ पडली असतां वरील नाजुक साहेबांच्या अंगांत हींव भरत असेल यांत नवल काय?[3] त्यांनीं दोनतीनदां जॉन्सन् यास मुलाखत देऊन पुढें देव-

---

कित्येक दिवस या नाटकगृहाचा व्यवस्थापक होता. स्टुअर्ट् राजांच्या कारकार्दीपासून या नाटकगृहाचा उल्लेख आढळतो. 'सम्पादक'

१. आपल्या कोशाचें योजनापत्र (Plan of prospectus) इ. स. १७४७ साली जॉन्सन्नें प्रसिद्ध केलें. तें (Phillip Dorner Earl of Chesterfield) यांस उद्देशून लिहिलें होतें. 'सम्पादक'

२. इंग्लंडांतील अमीरउमरावांच्या पदव्या ड्यूक्, अर्ल्, मार्किस्, बॅरोनेट् वगैरे असून लॉर्ड्, सर् वगैरे त्या त्या पदवींचे किताब होत हें आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस माहीत असेलच.

३. हिंवाचा प्रकार अर्ल्साहेबांनींच स्वतः वर्णिला आहे. आपल्या चिरंजिवास ते जीं पत्रें लिहीत असत त्यांपैकीं एकांत त्यांनीं जॉन्सन्विषयीं पुढील मजकूर लिहिला:—

"There is a man whose moral character, deep learning, and superior parts I acknowledge, admire, and respect; but whom it is so impossible for me to love, that I am almost in a fever when-

(पुढें चालू)

डीवाल्यास ताकीद देऊन ठेवली कीं या मनुष्यानें विचारलें असतां स्वारी बाहेर गेली आहे ह्मणून सांगत जा. हा मजावीचा प्रकार जॉन्सन्नें दोनतीनदां पाहून मनांत गांठ घातली कीं, पुनः म्हणून याच्या दाराशीं पाऊल घालायाचें नाहीं. पुढें याही गोष्टीस सात आठ वर्षें लोटून गेलीं; व जॉन्सन्नें वर सांगितलेल्या अडचणींत, विपरीत व

---

ever I am in his company. His figure (without being deformed) seems made to disgrace or ridicule the common structure of the human body. His legs and arms are never in the position which, according to the situation of his body they ought to be in, but constantly employed in committing acts of hostility upon the Graces. He throws anywhere but down his throst, whatever he means to drink; and mangles what he means to carve. Inattentive to all the regards of social life, he mistimes and misplaces everything. He disputes with heat indiscriminately, mindless of the rank, character and situation of those with whom he disputes. Absolutely ignorant of the several gradations of familiarity and respect, he is exactly the same to his superiors, his equals and his inferiors; and therefore by a necessary consequence, is absurd to two of the three. Is it possible to love such a man? No. The utmost that I can do for him is, to consider him a respectable Hottentot!"*

वरील पत्रें छापून प्रसिद्ध झालीं असतां त्यांवर जॉन्सन्नें काय अभिप्राय दिला तोहि सर्व प्रसिद्ध आहे—

"These Letters teach the morals of a harlot and the manners of a dancing-master."

* हॉटेंटॉट् हे केपकॉलनी व शेजारच्या जर्मन् आफ्रिकेच्या भागांत राहणारे लोक होत. हे पूर्वी दक्षिण आफ्रिकेभर पसरले होते. डच् वसाहतवाल्यांनीं त्यांस हें नांव दिलें. त्यांचें मूळचें नांव Khoi-Khoin (or Quae-Quae) खोइ खोइन असून त्याचा अर्थ (Men of Men) श्रेष्ठ मनुष्यें असा आहे. हे लोक सभ्य, आदरातिथ्य करण्यांत फाजील सढळ हाताचे, शिकार करण्यांत प्रवीण, दांडगे, सशक्त, मध्यम उंचीचे व पिंगट रंगाचे असून यांचीं नाकें रुंद, जाड व मुळाशीं चपटीं, डोळे गडद पिंगट अगर काळे, चेहरे वाटोळे व मोठे, दाढी तुरळक व केंस कुरळे आणि आंखूड असतात. एकस्थानीं बसून खाणें, पिणें अगर धूम्रपान करणें त्यांना तिरस्करणीय वाटतें. यांचा पोषाख म्हणजे कातड्याचे दोन झगे–एक खांद्यावर व दुसरा कंबरेभोंवतीं–होत. व हेच झगे चोवीस तास–झोपेंतहि–कायम असतात. इतकेंच नव्हे तर मृत्यूनंतर या झग्यांसकट प्रेतें पुरण्याचा त्यांचा प्रघात आहे.

'सम्पादक'

दुःखांत आरंभलेलें महत्कार्य तडीस नेऊन पोंचवलें. तें पाहून वरील लॉर्डसाहेबांस आशा सुटली कीं, हा तयार झालेला कोश आपणांस नजर होऊन आपलें नांव यावर यावें या हेतूस्तव त्या वेळेस चालू असणाऱ्या 'वर्ल्ड' [१] नामक पत्रांत त्यांनीं दोन निबंध लिहिले; व त्यांत जॉन्सन्च्या एकंदर विद्वत्तेची अतिशय तारीफ करून नुकत्या प्रसिद्ध होणाऱ्या कोशाविषयीं तर भारीच गोड गोड मजकूर लिहिला होता. चेस्टर्फील्ड्चा हें सर्व करण्याचा मतलब उघडच होता कीं, जॉन्सन्च्या मनांत आपल्याविषयीं जर अद्याप राग असेल तर तो वरील मधुर शब्दांनीं घालवावा व पूर्वींच्या संकल्पाप्रमाणेंच सर्व घडून यावें. पण तें कसचें होतें! जॉन्सन् यास वरील मजकूर जेव्हां समजला तेव्हां त्याचा राग शांत न होतां उलटा अधिक प्रदीत मात्र[२] झाला. पोराच्या हातावर खाऊ ठेवून जशी समजूत करावी तसा वरील खुषामतीचा प्रकार पाहून आपली मानहानि केलीशी मात्र त्यास वाटली; व तत्क्षणींच त्यानें त्यास असें खडखडीत पत्र लिहिलें कीं, त्यांतील प्रत्येक अक्षर वरील नाजुक लॉर्ड्

---

१. The World हें पत्र Spectator मागून निघालें होतें. त्याच्या लागोपाठच्या दोन अंकांत जॉन्सन्च्या कोशाची अगदीं मनमुराद स्तुति करून सदर लॉर्ड-साहेबांनीं (चेस्टर्फील्ड्) सुचविलें होतें कीं, ('He should be made a dictator-nay a Pope over our language, and his decisions about the meaning and spelling of words should be received as final.') त्याला भाषा-प्रभु मानून शब्दांचे अर्थ व लेखनपद्धति या बाबतींत त्याचा निर्णय अखेरचा मानण्यांत यावा. 'सम्पादक'

२. हें पत्र ता. ७ फेब्रुवारी १७५५ रोजींचें आहे. यांतील एक दोन महत्त्वाचे उतारे खालीं देत आहों:—

"Seven years ....... I have been pushing on my work through difficulties, of which it is useless to complain, and have brought it, at last to the verge of puplication, without one act of assistance (except ten pounds, Ed..), one word of encouragement, or one smile of favour. Such treatment I did not expect: for I never had a Patron before..... .The notice which you have been pleased to take of my labours, had it been early, had been kind; but it has been delayed till I am indifferent, and cannot enjoy it; till I am solitary, and cannot impart it; till I am known, and do not want it. I hope it is no very cynical asperity; not to confess obligations where no benefit has been received, or to be unwilling that the Publick should consider me as owing that to a Patron, which Providence has enabled me to do for myself.

Having carried on my work thus for with so little obligation to any favourer of learning, I shall not be disappointed though I should conclude it, if less be possible, with less; for I have been long wakened from the dream of hope, in which I once boasted myself with so much exaultation."

साहेबांच्या मर्मीच पोंचलें असेल.[1] या एका पत्रावरून जॉन्सन्चा एकंदर स्वभाव व त्याची लिहिण्याची शैली हीं जशीं व्यक्त होतात तशीं मोठाल्या ग्रंथावरूनही होणार नाहींत!

याप्रमाणें प्रस्तुत कोशाच्या अर्पणाच्या संबंधानें येथें प्रकरण माजलें व सरतेशेवटीं त्याचा वरच्यासारखा शेवट झाला. जॉन्सन्नें कोणाचेंही सहाय्य न मागतां व कोणाचाही आश्रय न घेतां, फार तर काय, पण घरीं चालत आलेला आश्रयही वरच्यासारखा धुडकावून लावून, आपला कोश संपवला, व वर कोणाही बड्या मनुष्याचें नांव न घालतां तसाच तो केवळ आपल्या नांवावर प्रसिद्ध केला. या वेळेस त्याच्या मित्रांनीं त्याजकरतां खटपट करून ऑक्स्फर्ड् युनिव्हर्सिटीकडून त्यास एम्. ए. हा किताब देवविला. त्यासकट सदरील ग्रंथावर त्याचें नांव प्रकट झालें. यापुढचा किताब एल्एल्. डी. हा त्याच युनिव्हर्सिटीनें त्यास पुढें आपण होऊन पाठवून दिला, हें मागें [2] सांगितलेंच आहे.

येथवर या कोशाचा वृत्तांत काय झाला तो सांगितला. आतां खुद्द त्याविषयींच कांहीं माहिती वाचकांस देतों. हा कोश आतां प्रसिद्ध नाहीं, हें बहुधा सर्वांस माहीत असेलच. त्याची संक्षिप्त आवृत्ति जी जॉन्सन्नें लवकरच पुढें काढली ती मात्र अद्याप क्वचित् दृष्टीस पडते. त्या वेळेपासून आतांपर्यंत इंग्रेजी भाषेचा विस्तार व फैलावा अतिशयित झाल्यामुळें, व त्या वेळेस माहीतही नसणाऱ्या अनेक विषयांवर सहस्रावधि उत्तमोत्तम ग्रंथांची तेव्हांपासून भर पडत चालल्यानें, मागचे कोश उत्तरोत्तर निरुपयोगी होत चालले आहेत. सध्यां साऱ्या जगभर

---

१. वरील अर्ल्साहेबांनीं आपणांकडून जॉन्सन्सारख्या कंगाल मनुष्यावर जी मोठी मेहेरनजर केली तिचा उलटा प्रकार कसा झाला तें पुढील वाक्यांवरून दिसून येईल. वरील बातमी समजली असतां जॉन्सन् आपल्या मित्रमंडळांत म्हणाला:—

"I have sailed a long and painful voyage round the world of the English language, and does he now send out two cockboats to tow me into harbour?"

वरील सांगितलेल्या पत्रांत S तर पुढील कोरडा प्रत्यक्षच दिला—

"Is not patron, my Lord, one who looks with unconcern on a man struggling for life in the water, and when he has reached ground, encumbers him with help?"

S हें पत्र जॉन्सन्नें ७ फेब्रुवारी १७५५ रोजीं लिहिलें होतें. मूळ समग्र पत्र पाहणें असल्यास बॉस्वेलकृत चरित्राच्या पहिल्या खंडाचीं १७३–१७५ पृष्ठें पाहावीं. 'सम्पादक'

२. पृष्ठ ६७१ टीप २ पाहा. 'सम्पादक'

ज्याचा प्रचार आहे असा कोश वेब्स्टर्चा [1] होय [2]. आतां यापुढील सर्व इमारतींचा पाया म्हटला म्हणजे वरील प्रचंड ग्रंथच होय हें खरें आहे. मूळचा म्हणण्यासारखा कांहीं आधार नसतां एकट्यानें येवढ्या श्रमाचा व येवढ्या जोखमीचा उद्योग पत्करून कोणाही विद्वानाचें किंवा श्रीमान् मनुष्याचें काडीइतकेंही साह्य न घेतां दोनप्रहरची भ्रांत, संकटें व दुःखें, [3] हीं सर्व संभाळून सात आठ वर्षांत तो सर्व तडीस नेला ही खरोखर मोठी आश्चर्य करण्यासारखी गोष्ट आहे.'[4] आमच्या मराठी भाषेचे दोन कोश [5] सुमारें चाळीस वर्षांपूर्वी जे तयार झाले त्यांस सरकारचा केवढा

---

१ Noah Webster (1758—1843) अमेरिकन् शिक्षक, वकील, लेखक, कोशकार व वैयाकरण. दहा वर्षें भाषाशास्त्राचें अध्ययन करून १८२८ सालीं (Dictionary of the English Language) इंग्रेजी भाषेचा कोश यानें तयार केला. १८६६ सालीं याची सुधारून वाढविलेली आवृत्ति प्रसिद्ध झाली. याच्या Elementary Spelling Book या पुस्तकाचा सात कोटि खप झाला असें म्हणतात. A philosophical and Practical Grammar of the English Language हा याचा ग्रंथ १८०७ सालीं प्रसिद्ध झाला. यानें युनायटेड् स्टेट्स्चा एक संक्षिप्त इतिहासहि लिहिला आहे. 'सम्पादक'

२. वरील कोशकार इंग्रेज नसून अमेरिकन् आहे हें सर्वांस माहीत असेलच. वरील कोशाचे ठसे आतां कायमचे करून ठेवले आहेत. दर वर्षी लाखों प्रती उडत असल्यामुळे ते झिजून जातात, यास्तव मात्र ते बदलावे लागतात. वरील कोशानें इंग्लंडांतल्या कोशांस मागें सारलें यामुळे पुष्कळ त्यास कांहींना कांहीं तरी नांव ठेवून हीनत्व आणूं पाहतात. माजी डायरेक्टर् हॉवर्ड्साहेब यांनीं आपल्या व्याकरणांत पुढील सूचना दिली आहे—

"N. B.—The student should be warned against the *American* Dictionary of Webster, wherein are many proposed novelties ( among others this of mitting the *u* of *honour*, &c. ) which have not been accepted by standard English writer. He also pronounces many words obsolute which are not so in fact."

३. कोशाच्या प्रस्तावनेंत जॉन्सन्नें आपणास पडलेल्या त्रासाचें वर्णन केलें आहे. तें वाचून त्याचा कट्टा शत्रु ( Horne Tooke ) हॉर्न टुक याच्याहि डोळ्याला पाणी आलें. 'सम्पादक'

४. जॉन्सन्नें स्वतःच सदरील ग्रंथाच्या प्रस्तावनेंत लिहिलें आहे—

"It may gratify curiosity to inform the world, that the English Dictionary" was written with little assistance of the learned and without any patronage of the great; not in the soft obscurities of retirement, or under the sheller of academic bowers, but amidst inconvenience and distraction, in sickness and in sorrow."

५. मोल्स्वर्थ् व कँडी या साहेबद्वयाकडून तयार करविलेले 'इंग्रेजी-मराठी' व 'मराठी-इंग्रेजी' कोश. 'सम्पादक'

आश्रय होता व किती पंडितांचें साहाय्य घ्यावें लागलें याचा विचार केला असतां, व फ्रेंच भाषेचा तद्देशीय विद्वानांनीं जो कोश तयार केला त्यावर पॅरिस् येथील सर्व विद्वन्मंडळ पन्नास वर्षें सारखें खपत होतें हेंही मनांत आणलें असतां वरील पंडिताच्या साहसाचा व बुद्धिवैभवाचा कोणास चमत्कार वाटणार नाहीं ![1] तेव्हां कोशासारखें प्रचंड काम जॉन्सननें एकट्यानें हातीं घेऊन पार पाडलें हीच अगोदर एक मोटी गोष्ट आहे. पण प्रस्तुत ग्रंथाचा मोठेपणा केवळ येवढयावरूनच नाहीं. भाषेचा कोश म्हटला म्हणजे त्यांत पुढील गोष्टी सर्व आल्या पाहिजेत. पहिल्यानें सर्व शब्दांचा समावेश, पुढें त्यांचा उच्चार व लेखनपद्धति, नंतर त्यांची व्युत्पत्ति, हें एक प्रकरण झालें. पुढें प्रत्येक शब्दाचा सर्वांस समजेल अशा तऱ्हेचा बरोबर अर्थ; आणि त्यानंतर मोठमोठ्या प्रसिद्ध ग्रंथांतून काढलेलीं उदाहरणें.[2] आतां हे सर्व प्रकार प्रस्तुत कोशांत कितपतसे आहेत हें

---

१. जॉन्सन्चा शिष्य व मित्र जो गॅरिक त्यानें वरील कोश प्रसिद्ध झाला असतां त्यावर पुढील चुटका रचला—

'ON JOHNSON'S DICTIONARY.'

Talk of war with a Briton, he'll boldly advance,
That one English soldier can beat ten of France.
Would we alter the boast from the sword to the pen,
Our odds are still greater, still greater our men,
In the deep mines of science, though Frenchmen may toil
Can their strength be compar'd to Locke, Newton and Boyle?
Let them rally their heroes, send forth all their pow'rs
Their verse-men and prose-men, then match them with ours!
First Shakspeare and Milton, like gods in the fight.
Have put their whole drama and epick to fight
In satires, epistles, and odes would they cope.
Their numbers retreat before Dryden and pope;
And Johnson well-arm'd like a hero of yore
Has beat forty § French, and will beat forty more!"

§ फ्रेंच् भाषेचा कोश तयार करण्याचे वेळीं भाषाभेदांचा निर्णय करण्यास नेमलेल्या विद्वन्मण्डळांत ( Academy ) चाळीस गृहस्थ चाळीस वर्षें खपत होते; पण जॉन्सन्नें एकट्यानेंच इंग्रेजी भाषेचा कोश फक्त तीन वर्षांत तयार करण्याचें योजिलें होतें, त्यासंबंधीं येथें उल्लेख आहे. 'सम्पादक'

२. वरच्याहूनही आणखी कांहीं नवे प्रकार आलीकडील सर्वप्रसिद्ध जो वेब्स्टर्चा कोश त्यांत आढळतात. एक तर भाषासाम्य, म्हणजे आरंभीं प्रत्येक शब्दाचीं रूपें निरनिराळ्या भाषांतून कशीं होत गेलीं आहेत तीं दाखवलेलीं असतात. दुसरा प्रकार समानार्थक शब्द; म्हणजे सारख्या अर्थाचे वाचक असे सर्व शब्द एकत्र करून त्यांतले बारीक भेद सांगितलेले असतात. याशिवाय भिन्न भिन्न विषयांवरच्या पुरवण्या, पदार्थमात्रांचीं चित्रें, वगैरेही प्रकार दिवसांदिवस येत चालले आहेतच.

( पुढें चालू )

जर पाहिलें तर असें आढळून येईल कीं, एका व्युत्पत्तीखेरीज बाकीचीं सर्व सदरें यांत जशीं असावीं तशीं आहेत. इंग्रेजीसारखी भाषा,—जी मुळीं अनेक भाषांच्या भेसळीनें झाली आहे, व जींत जगांतील बहुतेक भाषांतले शब्द आले आहेत तिच्या सर्व शब्दांची व्युत्पत्ति द्यायची झटली ह्मणजे तो व्युत्पत्तिकार मोठाच भाषाभिज्ञ पाहिजे. हें अंग जॉन्सन्चें कमीच होतें. त्यास परकी भाषांपैकीं उत्कृष्ट अशी लॅटिन् हीच काय ती येत होती; व इंग्रेजीची मूळभाषा जी अँग्लो-सॅक्सन् तिचेंही त्यास विशेष ज्ञान नव्हतें. यास्तव सांप्रत ग्रंथांत ही मात्र मोठी उणीव राहिली. पण याशिवाय बाकी सर्व भाग यथास्थित उतरले; शेवटलें दोन ह्मणजे शब्दांची व्याख्या व त्यांस प्रमाणभूत असे ग्रंथांतरींचे आधार, यांत तर या कोशाची पहिल्यापासून मोठी ख्याति आहे. जॉन्सन्ची बुद्धि मोठी सूक्ष्म असल्यामुळें त्यानें मोठमोठ्या कठिण शब्दांच्याही व्याख्या अगदीं समर्पक दिल्या आहेत; तशीच त्यास स्वभाषेंतील ग्रंथांची माहिती उत्कृष्ट असल्यामुळें वरील व्याख्यांच्या खालीं जी अवतरणें दिलीं आहेत तींही मोठीं उत्कृष्ट निवडून काढलीं आहेत. तीं अशीं कीं, उगीच कोणी गमतीखातर जरी वरील ग्रंथ चाळीत बसलें, तरी सुभाषितापासून जसें मनोरंजन होतें तसें ठिकाठिकाणचे नुसते उतारे वाचल्यानेंही तें व्हावें. [1] असो;

अशासारखा एक प्रचंड उद्योग आमच्या देशांत चालला आहे तोही येथें सांगणं अप्रासंगिक होणार नाहीं. सर्व संस्कृतज्ञांस माहीत असेलच कीं, कलकत्याकडील प्रसिद्ध पंडित तारानाथ+तर्कवाचस्पति हे आज कित्येक वर्षे 'बृहदभिधान' नांवाचा एक संस्कृत भाषेचा मोठा कोश तयार करीत आहेत. हा चालू सालच्या अखेरीस पुरा होणार होता. याचे कांहीं भाग प्रसिद्ध झाले आहेत.

+ पंडित तारानाथ तर्क-वाचस्पति ( इ. स. १८१२-१८८५ ) जीवानन्द विद्यासागर यांचे हे चिरंजीव. काशी, कलकत्ता येथील संस्कृत कॉलेजांत अध्ययन करून यांनीं तर्कवाचस्पति ही पदवी मिळविली. पंडित ईश्वरचंद्र विद्यासागर यांच्या शिफारशीनें यांस कलकत्ता संस्कृत कॉलेजांत प्रोफेसरची जागा १८४५ सालीं मिळाली. यांची घरची सुस्थिति असून सराफी कापड वगैरे इतर व्यापार, शेती, अशी सर्वस्वीं अनुकूलता असतांना सुद्धां यांचा जबरा विद्याव्यासंग होता. हे स्त्रीशिक्षणास अनुकूल पण विधवाविवाहास मात्र प्रतिकूल होते. वाचस्पत्य बृहदभिधान, शब्दस्तोम-महानिधि, विधवाविवाहखंडन, शब्दार्थरत्न, आशुबोधव्याकरण वगैरे यांचे ग्रंथ होत. शिवाय अनेक संस्कृत नाटकांच्या सटीक आवृत्त्याहि यांनीं काढल्या. हे काशीस वारले. 'सम्पादक'

१. मेकॉलेनें वरील गुणांबद्दल प्रस्तुत कोशाविषयीं झटलें आहे—

" The public, on this occasion, did Johnson full justice, and something more than justice. The best lexicographer may well be content if his productions are received by the world with cold

( पुढें चालू )

तर इंग्रेजी भाषेचें नियमन ज्या कोशानें प्रथमतः केलें तो वर सांगितल्या प्रकारें सिद्धीस जाऊन प्रस्तुत ग्रंथकाराच्या कीर्तिमंदिराचा तो जणूं काय मजबूत पायाच होऊन राहिला!

---

तें श्वान एक तुकड्यास्तव चार नाना
दावी धन्यास जठरार्थ कसें पहाना।
दे आळवूनि जरी हस्तिप बाप भाई
घे तोचि घांस गजराज; कशी बढाई? ॥ नीतिशतक-वामन.

अंक ३५—(१) जॉन्सन्चे निबंध—'रँब्लर्'[१] व 'ऐड्लर्'. (२) 'रासेलस्'. (३) वर्षासनाची नेमणूक.

१. मागील अंकांत सांगितलेला जॉन्सन्चा प्रचंड ग्रंथ जो इंग्रेजी भाषेचा कोश त्याबरोबर दुसरेही त्याच्या मानानें लहान असे दोन ग्रंथ त्यानें रचले. ते मागें[२]

esteem. But Johnson's Dictionary was hailed with an enthusiasm such as no similar work has ever excited. It was indeed the first dictionary which could be read with pleasure. The definitions show so much acuteness of thought and command of language, and the passages quoted from poets, divines and philosophers are so skilfully selected, that a leisure hour may always be very agreeably spent in turning over the pages."

१. Rambler— यापूर्वी इंग्लंडांत The Tatler, Spectator, Guardian अशीं अनेक नियतकालिकें निघालीं होतीं. हीं सारीं नाहींशीं होऊन अनेक वर्षें झालीं असल्यामुळें नैतिक व धार्मिक ज्ञानाचा उपदेश करण्यास अशा तऱ्हेचा प्रयत्न उपयुक्त होईल, असें जॉन्सन्ला वाटलें. मध्यंतरींच Lay Monastery, Free Thinker, Plain-dealer अशीं नवीं पत्रें निघालीं व बुडालीं; The Tatler चेंहि पुनरुज्जीवन झालें. तथापि लवकरच तें पुनः बंद पडल्यामुळें जॉन्सन्नें स्पेक्टेटर्च्या अस्तानंतर पसतीस वर्षांनीं २० मार्च १७५० रोजीं रँब्लर् सुरू केलें. हें दर आठवड्यास मंगळवारीं व शुक्रवारीं असे दोन वेळ निघे. शनिवार १७ मार्च १७५२ रोजीं अखेरचा अंक निघून तें बंद पडलें. या कालांत अनेक व्यवसाय मागें असूनहि त्याला हें पत्र चालवितां आलें. कारण, He sat himself doggedly to it. चार पांच अंकांखेरीज सर्व जॉन्सन्नें एकट्यानें लिहिलें. प्रथम प्रथम किंमत फक्त दोनच पेन्स असूनहि रँब्लर्च्या फक्त पांचशेंच प्रती खपत. पण पुढें लवकरच फक्त इंग्लंडांत तेरा हजार प्रती खपूं लागल्या. स्कॉट्लंड् व आयर्लंड्करतां वेगळ्याच काढाव्या लागत. 'सम्पादक'

२. पृष्ठ १२३ पाहा. 'सम्पादक'

भाषापद्धतीच्या निबंधांत सांगितलेले 'रँब्लर्' व 'ऐड्लर्'[1] हे होत. हे स्पेक्टेटर्' प्रमाणें निरनिराळ्या विषयांवर लिहिलेले निबंध आहेत. 'स्पेक्टेटर्' आटपल्यानंतर तीस चाळीस वर्षें त्याच्या धाटणीवर कांहीं पत्रें चाललीं होतीं; पण त्यांची प्रसिद्धि तावन्मात्रच असून पुढें लवकरच त्यांचा मागमूसही नाहींसा झाला. जॉन्सन्च्या वेळेपासून तरी त्यांचें अनुकरण पुष्कळ ग्रंथकारांनीं केलें; पण त्यांच्या निबंधावलि वरच्याप्रमाणेंच आतां तादृश प्रसिद्ध नाहींत. तेव्हां सर्वांत अत्यंत प्रसिद्ध अशा वरील तिन्ही मात्र होत.[2]

'रँब्लर्' व 'ऐड्लर्' यांतील निबंधसमुदाय 'स्पेक्टेटर्' च्या सरासरी अर्ध्यानें आहे; तरी त्यांतील मजकूर पाहिला तर तो वरील ग्रंथाच्या इतका सहज भरेल. ॲडिसन्चें पत्र एकंदर लोकांस रिझविण्याकरितां व त्यांचा प्रवेश विद्येंत सहज मौजेनें करून देण्याकरतां सुरू झालें होतें; यास्तव चालू लौकिक विषय व नाटकादि लोकरंजनाचे प्रकार असल्या सामान्य गोष्टीवरच मुख्यतः त्याचा भर असे, व त्याचे पत्रकारही असल्यावरच त्याच्या पत्रकास मजकूर पाठवीत. पण जॉन्सन्ची वरील दोन पुस्तकांत अगदीं निराळी तऱ्हा दृष्टीस पडते. त्यानें आपलें पत्र ख्याली-खुशालीवाल्या पुरुषांनीं व स्त्रियांनीं चहा पिण्याच्या वेळीं सहज वाचण्याकरतां काढलें नसल्यामुळें त्यांतील विषय नेहेमी विद्येच्या संबंधानें किंबहुना धर्मसंबंधाचे सुद्धां असत. शिवाय राजघराण्यांतील पुत्रजन्मविवाहादि उत्सव, परराष्ट्रांशीं झालेल्या लढाया, तह वगैरे, असले प्रकारही तो आपल्या विवेचनांत कधीं आणीत नसे. यामुळें वरील दोन्ही पत्रें तादृश लोकप्रिय नव्हतीं. त्यांच्या सरासरी पांचसहाशें प्रती काय त्या खपत. प्रत्येक निबंधाबद्दल त्यास पुस्तकवाल्याकडून चार गिनी मिळत म्हणजे महिन्याच्या आठांबद्दल सुमारें तीनसाडेतीनशें रुपये दरमहा पडत. पुढें हे दोन्ही निबंध एकत्र करून जेव्हां छापले, तेव्हां मात्र त्यांचा खप पुष्कळ चालून जॉन्सन्च्या हयातीपर्यंत त्यांच्या एकंदर दहा आवृत्ति निघाल्या.

ॲडिसन्च्या व जॉन्सन्च्या निबंधाची परस्पर तुलना केली असतां दोहोंत

---

१. Idler १७५८ च्या उन्हाळ्यांत १५ एप्रिलपासून ऐड्लर् हें नवें वृत्तपत्र दर शनिवारीं जॉन्सन् काढूं लागला. याचा अंतर्भाव न्यूबेरी (Newbery) च्या The Universal Chronicle ऊर्फ Weekly Gazette मध्यें होत असे. हेंहि पत्र दोन वर्षें चालून ५ एप्रिल १७६० रोजीं बंद पडलें. हे एकंदर एकशेंतीन निबंध आहेत. पैकीं बारांखेरीज सर्व जॉन्सन्च्या हातचे आहेत. हे फार उत्सुकतेनें वाचले जात. यांचा प्रसारहि फार मोठा होता. ऐड्लर् हे निबंध रँब्लर्चे उत्तरार्धरूप मानण्यास हरकत नाहीं. रँब्लर्पेक्षां हे किंचित् ज्यास्त ओजस्वी आहेत. 'सम्पादक'

२. आजपर्यंत एकंदर जे निबंधकार विलायतेंत होऊन गेले त्या सर्वांच्या ग्रंथांचा संग्रह 'ब्रिटिश् एसेइस्ट्स्' (ब्रिटन् देशांतील निबंधकार) नांवाच्या पुस्तकांत केला आहे. याचे एकंदर ५० भाग आहेत!

पुष्कळ तफावत दिसणारी आहे. एक तर विषयाच्या संबंधानें जी आहे ती वर सांगितलीच आहे. ॲडिसन्नें 'स्पेक्टेटरा' स जी सुरवात केली ती त्याची विद्वत्त्व-कीर्ति व त्याचा लौकिक हीं दोन्ही चांगलीं स्थाईक झाल्यावर केली होती; यामुळें पुष्कळांच्या आश्रयानें व मदतीनें तें पत्र पुष्कळ दिवसपर्यंत चांगल्या रीतीनें चाललें. जॉन्सन् हा स्वभावानें पराकाष्ठेचा निःस्पृही व कोणाची गरज न बाळगणारा असा असल्यामुळें सारा निबंधसमूह त्यानें स्वतःच लिहिला. पहिल्या भागांत दुसऱ्यांनीं पाठवले असून छापलेले असे दहा अंक आहेत, व दुसऱ्यांत बारा आहेत. बाकीचे सर्व मागील अंकांत सांगितलेलें कोशाचें काम चालत असतां व दुसऱ्या अनेक उपाधि मागें असतां, त्यानें स्वतः लिहिलें. 'या कारणामुळें त्यांत' स्पेक्टेटर्' प्रमाणें वैचित्र्य फारसें नाहीं. दुसरी मोठी तफावत भाषेच्या संबंधानें जी आहे ती सर्वांस माहीतच आहे. ॲडिसन्ची शब्दरचना अगदीं साधी व सुबोध असून पुनः डौलदार व गहन आहे; आणि जॉन्सन्ची पुढील दोन गुणांनीं युक्त असून पहिल्या दोहोंचा तिचे ठायीं बहुधा अभावच आहे. वर सांगितलेला कोश त्याच वेळेस चालत असल्यामुळें शास्त्रीय परिभाषेचे वगैरे मोठमोठाले शब्द त्यानें त्यांत घालून दिले, व कालांतरानें ते भाषेंत स्थाईकही झाले. ॲडिसन्च्या 'स्पेक्टेटरा'नें इंग्लंडांतील एकंदर लोकांस जसें वाचायास शिकवलें, त्याप्रमाणें या पुढील दोन निबंधांनीं त्यांस विचार करायाला शिकवलें अशी प्रसिद्धि आहे.

२. जॉन्सन्चा यापुढचा ग्रंथ त्याची प्रसिद्ध कादंबरी 'रासेलस्'[२] हा होय. याविषयीं मराठी वाचकांस विशेष माहिती सांगण्याची गरज नाहीं; कां कीं, माझी 'आला-

---

१. असले निबंध रचण्यास जॉन्सन् यास किती आयास पडत हें पुढील गोष्टीवरून लक्षांत येतें. तो एकदां ऑक्सफर्ड् येथें गेला असतां त्यानें आपल्या एका मित्रास पुसलें कीं, टपालाची गाडी निघण्यास किती अवकाश आहे? त्यानें सांगितलें, अर्धा तास. मग ताबडतोब स्वारी कागद, शाई व पेन् घेऊन बसली, आणि तेवढ्या वेळांत पुढील दिवसाचा अंक तयार केला. शेवटले शब्द संपतांच कागदाची घडी करून त्यानें वर पत्ता लिहिला. हें पाहून जवळ बसलेला वरचा स्नेही म्हणाला, "थांबा थांबा, मला एकदां वाचूं द्या." जॉन्सन्नें उत्तर केलें, "अरे, मीं तरी कोठें पुनः वाचून पाहिला आहे!" असें म्हणून त्यानें लखोटा गाडींत नेऊन टाकला.

२. Rasselas, Prince of Abyssinia (1759). स्ट्रहन् (Strahan) वगैरे तिघां प्रकाशकांनीं हा ग्रंथ शंभर पौंडांस घेतला होता. पण दुसऱ्या आवृत्तीचे वेळीं त्यांनीं जॉन्सन्ला आणखी पंचवीस पौंड दिले. या ग्रंथाचें व्हॉल्टेअरच्या (Candide) 'कँडाईड' ग्रंथाशीं पुष्कळ सादृश्य आहे. इतकें कीं वर हे ग्रंथ एकामागून एक अत्यंत थोड्या अल्पावधींत प्रसिद्ध झाले नसते

(पुढें चालू)

पत्रका' वरून व कांहीं वर्षांपूर्वी त्यांतील सर्व भाग एकत्र करून सबंध भाषांतर जें छापलें आहे त्यावरून सदरील पुस्तकाचें स्वरूप पुष्कळांस थोडेंबहुत माहीत असेलच. तथापि प्रस्तुत चरित्राच्या पूर्णतेस्तव व इतर वाचकांच्या माहितीकरतां या जगद्विख्यात ग्रंथाविषयींही पूर्वक्रमास अनुसरून कांहीं लिहितों. या गोष्टीची मूळ कल्पना मागें[1] सांगितलेल्या 'अबिसिनिया देशाच्या सफरी' पासून जॉन्सन् यास सुचली हें उघडच आहे. वरील ग्रंथांत त्या देशाच्या सृष्टिवैभवाविषयीं त्यानें वृत्तान्त वाचला होता, व तो सर्व भाषांतर करतांना त्याच्या हाताखालून गेला होता, यास्तव आपल्या कादंबरीचें स्थल त्यानें तेथेंच योजलें. याशिवाय बाकीची सर्व योजना त्यानें आपल्या देशाच्या रीतरिवाजावरून केली. आतां या कादंबरीची येवढी योग्यता कशावरून घरली आहे हें जर पाहिलें, तर ती संविधानकावरून किंवा रसपरिपाकावरून आहे असें नाहीं. संविधानक तर अगदींच लहान व साधें असून प्रस्तुत कादंबरींत कोणता रस म्हणजे पूर्णपणें किंवा अंशतःही साधला आहे असें नाहीं. तींतील बहार काय ती आंतील मजकुरावरच आहे. एक तर बाह्यतः भाषेची रमणीयता म्हणजे ती प्रस्तुत ग्रंथकाराच्या पद्धतीप्रमाणें अंमळ अवजड तर आहेच; पण गजाच्या गतीप्रमाणें तींत भारदस्तपणा व डौल हेही गुण पण आहेत. परंतु याहून प्रस्तुत ग्रंथाचा मुख्य मोहक गुण म्हटला म्हणजे वर्णन करण्याची शैली व आयुष्यांतील निरानिराळ्या स्थितींचें तींत जें यथार्थ व चित्तवेधक विवेचन केलें आहे तें होय. या एका गुणावरून 'रासेलस' ची प्रख्याति तें प्रसिद्धच होतांच चोहोंकडे इतकी झाली कीं, ज्या पुस्तकवाल्यानें तें विकत घेतलें त्यास त्याच्या विक्रीपासून पुष्कळ नफा झाला, व जॉन्सन्च्या हयातींतच त्याचें भाषांतर युरोपांतल्या साऱ्या भाषांतून झालें !

वरील कादंबरी लिहिण्याचा प्रसंग मोठा चमत्कारिक आहे. तो प्रस्तुत ग्रंथकाराची आई मरण पावली व तन्निमित्त खर्च भागवण्यास त्यानें हें साधन काढलें हा होय.[2] मागें सांगितल्याप्रमाणें जॉन्सन् घरदार सोडून लंडनास आपलें नशीब काढण्याकरतां जो आला तो पुनः आपल्या आईला भेटण्यास फार करून गेलाच नाहीं.

---

तर एकानें दुसऱ्याची चोरी केली असें वाटण्यास जागा झाली असती. दोन्ही ग्रंथ या जगांत सज्जनापेक्षां दुर्जनच अधिक असून दुर्जनांचीच सद्दी चालते असें दाखवितात; पण असें करण्यांत व्हॉल्टेअरचा हेतु परमेश्वराची सार्वत्रिक सत्ता व धर्म यांवरील श्रद्धा डळमळीत करण्याचा होता, तर जॉन्सन्चा हेतु एवंप्रकारें ऐहिक जीवनाचें वैयर्थ्य पटवून देऊन पारलौकिक व नित्य वस्तूंकडे मानवाचें लक्ष वेधण्याचा होता. Vanity of Human wishes या काव्याचेंच विस्तृत प्रमाणावर गद्य रूपांतर म्हणजे रासेलस् असें म्हणण्यास फारशी हरकत नाहीं. 'सम्पादक'

[1]. पृष्ठ ६७७ ओळी २ ते ५ पाहा. 'सम्पादक'

[2]. पृष्ठ ६८८ पाहा. 'सम्पादक'

येथेंच त्यास आपला चरितार्थ चालवण्यास मोठी पंचाईत पडत असे, तेव्हां आण्यास मुळींच सवड नव्हती हें उघडच आहे, तरी वरचेवर आपलीही अडचण करून तो तिजकडे पैसाअडका पाठवीत असे. सरतेशेवटीं एकुणनव्वदाव्या वर्षी तिचा अंत झाला. तेव्हां आपला पुत्रधर्म जागवण्याकरतां वरील ग्रंथाचें मोल जें शंभर पौंड मिळालें तेवढें घेऊन तो परत आपल्या गांवीं गेला; व तिचें उत्तरकार्य करण्यांत व कर्ज वारण्यांत वगैरे वरील रकम त्यानें खर्चली. 'रासेलस्' सारखा ग्रंथ योजण्यास व लिहिण्यास जॉन्सन् यास एका आठवड्याचा संध्याकाळचा वेळ म्हणजे सरासरी वीस पंचवीस तास पुरले !!

३. येथवर या विख्यात ग्रंथकर्त्यास स्वोपजीवनार्थ जे सतत परिश्रम पडत व निरंतर विपत्तींत राहावें लागे, ती स्थिति संपण्याचा आतां समय आला. सन १७६० त दुसरा जॉर्ज राजा निवर्तून तिसरा गादीवर आला. हा इंग्लंडांत जन्मला असल्यामुळें व इंग्रजी रीतरिवाजांत वाढल्यामुळें त्याच्या घराण्याविषयीं पुष्कळ लोकांच्या मनांत जे ग्रह वागत होते ते बरेच नाहींसे झाले व तो जातीनें बराच बुद्धिमान् असल्यामुळें पहिल्या पहिल्यानें तर सान्या प्रजेस तो अत्यंत प्रिय झाला. जॉन्सन्च्या मनाची वरच्याप्रमाणेंच स्थिति झाली. तो मागील राजांस सर्वांदेखतां उघाडून शिव्या देत असे; पण वरील राजाच्या हातीं राज्यसूत्र आल्यापासून त्याची वृत्ति एकंदर राष्ट्राप्रमाणें पालटली. अशा संधीस राजाच्या प्रधानानें त्यास पेन्शन् (वर्षासन) करून देण्याचें योजलें. राजानेंही त्याचा लौकिक पुष्कळ दिवस ऐकला होता, यास्तव वरील संकल्पास त्यानें अनुमोदन दिलें. पण पेन्शनाची गोष्ट काढली असतां त्यास आवडेल कीं नाहीं, हाच पहिल्यानें मोठा विचार होता. जॉन्सन्ची वृत्ति आरंभीं सांगितलीच आहे कीं, तो अतिशयित निःस्पृह असे, व त्यामुळें कोणी केवढाही मोठा असला तरी त्याची पर्वा तो बिलकुल बाळगीत नसे. शिवाय चेस्टर्फील्ड्चा मागें सांगितलेला[1] वृत्तांत झाल्यापासून तर त्याचा स्वभाव सर्वांस जाहीर झाला होता, व त्यासही बडे लोकांच्या आश्रयाचा पुरा त्रास येऊन गेला होता[2] यामुळें वरील हेतु सिद्धीस कसा न्यावा याची वरील प्रधानास पंचाईत पडली. शेवटीं त्याच्या मित्रांकडून संधान बांधून वरील मनोगत त्यास बेताबेतानें कळवलें. जॉन्सन्ला या गोष्टीचा पहिल्यानें मोठा विचार पडला; कारण ताबेदारीचा त्यास अतिशय त्रास असे, व शिवाय त्यानें आपल्या कोशांत 'पेन्शन्' व 'पेन्शनर्' या शब्दांच्या व्याख्या ज्या दिल्या होत्या त्यांस अनुसरून म्हटलें म्हणजे वरील इनाम

---

१. पृष्ठें ७००–७०४ पाहा. 'सम्पादक'

२. 'रँब्लर' चालत असतां राजाचा ज्येष्ठ पुत्र फ्रेडरिक्, जो पुढें लवकरच मरण पावला, त्याच्याकडून सात प्रती घेण्याबद्दल ठराव होऊन तो बेत जॉन्सन् यास कळवला होता. पण तो या वेळेस इतका बेफिकीर झाला होता कीं, येवढ्या आश्रयाचाही त्यानें आदर केला नाहीं. यामुळें तो तेथेंच खुंटला हें उघडच आहे.

त्यानें घ्यावें की नाहीं याचा सहज निवाडा होतो.[१] पण राजाकडून आलेल्या मनुष्यांनीं [२] त्यास निक्षून सांगितलें कीं, हें वर्षासन राजानें जें दिलें आहे, ते इतःपर सरकारची तुह्मी कांहीं कामगिरी बजवावी या उद्देशानें दिलें आहे असें नाहीं; तर फक्त यापूर्वी तुह्मीं मोठमोठे ग्रंथ रचून लोकहित जें केलें त्याबद्दल तुह्मांस हें बक्षीस आहे. हें समजल्यावर जॉन्सन्नें त्या वेतास आपला रुकार दिला; आणि [३] हयातीपर्यंत सालीना तीनशें पौंडांची रकम त्याच्या घरीं चालत येत होती.

---

सृजति तावदशेषगुणाकरं पुरुषरत्नमलङ्करणं भुवः ।
तदपि तत्क्षणभङ्गि करोत्यहो अहह कष्टमपाण्डितता विधेः ॥ [४]
नीतिशतक—भर्तृहरि.

अंक ३७ (१) जॉन्सन्चा उत्तरकाल. (२) 'क्लब्' ची स्थापना. (३) बॉस्वेल्. (४) स्कॉट्लंड् देशावर मुशाफरी. (५) शेक्स्पीअर्ची आवृत्ति. (६) राज्यप्रकरणीं लेख. (७) 'कविचरित्र'. (८) अखेरची हकीकत.

१. गेल्या अंकांत प्रस्तुत विख्यात ग्रंथकारास राजाश्रय कसा मिळाला तो प्रकार सांगितला. ही गोष्ट घडल्यापासून जॉन्सन्चा येथवरचा क्रम अगदीं पालटून गेला. सकाळीं निजून उठल्याबरोबर आज भोजनाची तजवीज काय ही काळजी जी त्याच्या समोर नित्य उभी राहत असे, ती आतां नाहींशी झाली. त्याच्या मनास मानेल त्याप्रमाणें केवळ स्वतंत्रतेनें वागण्यास तो आतां मुक्त्यार झाला. यापूर्वी त्याची बायको व आई यांचा खर्च त्यास चालवायाचा असे; पण आतां तो अगदीं

---

१. Pension—*pay given to a state hireling for treason to his country.*

(पेन्शन्—फितूर राहून देश बुडवण्याकरतां सरकारच्या बंद्या गुलामास जो पगार देतात तो.)

Pensioner—*a slave of state hired by a stipend to obey his master*

(पेन्शनर्—तोंडावर तुकडा टाकून वश करून घेतलेला बंदा नोकर)

२. Sir Joshua Reynolds and Lord Bute.　　'सम्पादक'

३. १७६२ पासून　　'सम्पादक'

४. "संपूर्ण गुणांनीं मंडित व पृथ्वीस भूषणभूत अशा पुरुषरत्नास निर्माण करून त्याचें जीवित केवळ क्षणभंगुर करून ठेवतो, हा ब्रह्मदेवाचा केवढा वेडेपणा आहे!"　　'सम्पादक'

एकेकटा[1] राहिल्यामुळें त्यास कोणत्याही प्रकारचें बंधन उरलें नाहीं. या वेळेस त्याची विद्वत्त्वकीर्तिही स्थाईक झाल्यासारखी होऊन तत्कालीन पंडितमंडळांत तो सर्वानुमतें अग्रगण्य ठरला, व येथपासून पुढील वीस वर्षे मोठमोठे विद्वान् व नामांकित ग्रंथकारही त्याच्याशीं स्पर्धा करण्याचें टाकून देऊन त्याचें वक्तृत्व शिष्यवर्गाप्रमाणें भक्तिपुर:सर ऐकूं लागले. हीं वीस वर्षे जॉन्सन्च्या एकट्याच्या संबंधानेंच काय, पण एकंदर इंग्लंड् देशच्या संबंधानेंही चांगलीं ध्यानांत ठेवण्यासारखीं आहेत. त्यांत राजकीय प्रकरणीं मोठमोठाल्या उलाढाली होऊन एक जबरदस्त राज्यक्रांति[2] झाली; व प्रस्तुत ग्रंथकाराची ख्याति शिखरास जाऊन पोंचून त्याचे कित्येक अत्यंत लोकमान्य ग्रंथ[3] प्रसिद्ध झाले.

२. जॉन्सन्च्या येथवर सांगितलेल्या क्रमांत व यापुढें जो सांगावयाचा त्यांत दुसरा एक मोठा विशेष असा आहे कीं, यापुढचा त्याचा काळ प्राय: वाक्पांडित्य करण्यांत गेला. येथपर्यंत जसें त्यास ग्रंथरचनेचें काम केवळ अगत्याचें होतें,—कां कीं, त्याशिवाय उपाशी मरायाचीच पाळी यावयाची—तसें इत:पर नसल्यामुळें, व वादप्रतिवादाशीं त्यास स्वभावत:च पराकाष्ठेची हौस असल्यामुळें, ती त्यानें यापुढील वीस वर्षांत यथेच्छ पुरवून घेतली. त्याच्या नांवावर सुमारें साठ सत्तर वर्षे पुढें चाललेला जो 'क्लब'[4] तो त्यानें याच वेळेस स्थापला. यांत त्या वेळचे मोठमोठे नामांकित पुरुष होते; ते बर्क्, गिबन्, गॅरिक्, गोल्ड्स्मिथ्, रेनाल्ड्स्,[5] प्रख्यात वक्ता फॉक्स्, प्रसिद्ध भाषाभिज्ञ सर् विल्यम् जोन्स् इत्यादि होत. हीं मंडळी दर

---

१ 'एकेकटा' याऐवजीं 'एकटा' असा शब्द योग्य झाला असता. 'सम्पादक'

२. War of American Independence 1763-1793. 'सम्पादक'

३. (Edition of Shakespeare) शेक्स्पीअर्ची आवृत्ति इ. स. १७६५ कवींचीं चरित्रें (Lives of the Poets) दहा खंड १७७९-८१ व Journey to the Western Isles of Scotland इ. स. १७७५ हे ते ग्रंथ होत. 'सम्पादक'

४. 'Literary Club' ऊर्फ जॉन्सन्चा क्लब इ. स. १७६४ मध्यें स्थापला 'सम्पादक'

५. Sir Joshua Reynolds, (1723-1792) चित्रकार व लेखक, इटलींत कलेचें अध्ययन करून हा धंद्यासाठीं लंडनला आला. तसबिरी काढण्याबद्दल याची तेथें फार ख्याति झाली, व त्यास 'रॉयल् ॲकॅडेमी'चा अध्यक्ष करण्यांत आलें. जॉन्सन् गोल्ड्स्मिथ्, बर्क् वगैरे मंडळींशीं याचा दाट परिचय होता. चित्रकलेवर ॲकॅडेमींत दिलेल्या पंधरा व्याख्यानांमुळें (Fifteen Discourses) वाङ्मयक्षेत्रांत त्याला उच्च स्थान मिळालें. 'आयड्लर्' मध्येंहि तो लिहीत असे. त्यानें Du Fresney च्या 'Art of Painting' या ग्रंथाचें भाषांतर केलें आहे. १७६९ सालीं त्याला नाइट् (Knight) करण्यांत आलें. बधिरता व म्हातारपणीं दृष्टिमांद्य यांपासून त्यास फार त्रास झाला. 'सम्पादक'

आठवड्यास एकदां एके ठिकाणीं जमत असे. त्या वेळेस जेवायाची तयारी केली असून तें काम व संभाषण हीं दोन्हीं बरोबर सुरू होतें. वरच्यासारखी मंडळी एकत्र झाली असतां जें भाषण होत असेल त्याची वाचकांस सहज कल्पना करतां येईल. या पंडित-मंडळांत निरनिराळे विषय निघत; पण ते प्रायः इंग्रेजी भाषेंतील नव्या जुन्या ग्रंथकारांविषयींचे असत. एकादा नवा ग्रंथ प्रसिद्ध झाला असतां त्यावर वरील सभेंत अवश्य चर्चा होत असे, व तींत त्याच्या गुणावगुणांचाही निर्णय तेथेंच होऊन तो साऱ्या लंडनभर लवकरच होई. तेणेंकरून नव्या ग्रंथांच्या साऱ्या प्रती भराभर खपून जाणें किंवा त्या वाण्यांच्या दुकानीं जाऊन पडणें हा मोक्षमोक्ष होण्यास उशीर लागत नसे. असो; तर जॉन्सन् ज्या मंडळीचा अध्यक्ष होता ती अशा तऱ्हेची होती.[1] हींतील मुख्य मुख्य सभासदांची बरीच माहिती यापूर्वी प्रसंगवशात् दिलेलीच आहे. यास्तव प्रस्तुत स्थलीं त्यांपैकीं एकाचा मात्र वृत्तांत येथें विशेषतः देतों. हा सभासद जॉन्सन्चा प्रसिद्ध चरित्रकार बॉस्वेल् हा होय. ज्याची गणना चरित्रकारांत अग्रेसरत्वेंकरून करतात, व ज्यानें भाषणांचीं भाषणें समर्पक व मनोवेधक रीतीनें उतरण्याची अपूर्व कला प्रगट केली, त्याची हकीकत आमच्या वाचकांस समजणें अवश्य होय.

१. बॉस्वेल् हा स्कॉट्लंडांतील एका जहागिरदाराचा मुलगा होता. याच्या बापाकडे तेथील सेशन् जज्जाचें काम असून बॉस्वेल् यासही त्यानें कायदे शिकण्याकडेच पहिल्यापासून घातलें होतें. तरी त्याचा स्वभाव कांहींसा हूड व हौसी असल्यामुळें बराचा अभ्यास त्यानें सारखा चालवला नाहीं. कांहीं वेळ लष्करी खात्यांत शिरून कांहीं वर्षें फ्रान्स, इटाली, स्वित्सर्लंड्, कॉर्सिका वगैरे देशांतून त्यानें मुशाफरी केल्या. त्यास लहानपणापासून विद्येचा भारी शौक असे. निरनिराळ्या विषयांवर पुस्तकें वाचावीं व मोठमोठ्या विद्वानांचा स्नेह संपादन करावा, याचा त्यास अतिशयित नाद असे; त्या वेळच्या इंग्लंडांतल्याच काय, पण दूरदूरच्या देशांतल्या महान् महान् पंडितांचाही परिचय त्यानें जोडला होता. याचा अभ्यास पुरा झाल्यावर यानें बापाच्या इच्छेप्रमाणेंच वकिलीचा धंदा पतकरला. एडिन्बर्गच्या पार्लमेंटांत हा मोकद्दमे चालवीत असे; व त्याची त्या वेळेस ख्यातिही पुष्कळ होती. पुढें बापाच्या मरणानंतर त्याची जहागीर याजकडे आली. हिचा उपभोग दहा पंधरा वर्षें घेऊन शेवटचा काळ त्यानें संतति, संपत्ति व कीर्ति या ऐश्वर्यानें युक्त होत्साता घालवला.

---

१. वरील अतिविख्यात मंडळीविषयीं मेकालेनें लिहिलें आहे:—

" In 1764 was formed a club, which gradually became a formidable power in the Commonwealth of letters. The verdicts pronounced by this conclave on new books were speedily known all over London and were sufficient to sell off a whole edition in a day, or to condemn the sheets to the service of the trunkmaker and the pastry-cook. Nor shall we think this strange when we

(पुढें चालू)

बॉस्वेल्ची जॉन्सन् याशीं प्रथमत: जी ओळख झाली, ती १७६३ सालीं झाली. या वेळेस त्याचें वय सारें बावीस वर्षांचें होतें. तरी इतक्या वयांतही त्यानें इतकें ज्ञान संपादन केलें होतें व त्यास विद्येची इतकी अभिरुचि होती, कीं जॉन्सन् हा बराच वयातीत झाला असतां व त्याचा स्वभाव तुसडा असतां, दोघांचा लवकरच अतिशयित परिचय जडून पक्का स्नेह जमला. [1] जॉन्सन्सारख्या वृद्ध व सर्वमान्य होऊन बसलेल्या महापंडितानें ज्यास बरोबरीनें बोलायाला चालायाला योग्य असा मित्र निवडला, व इतर सर्वांहून जो त्यास लवकरच अतिशयित प्रिय झाला तो केवळ महामूर्ख व महानीच असेल हें मुळींच संभवत नाहीं. तरी मेकॉलेसाहेबांनीं या बिचाऱ्या चरित्रकारावर जो कडाका उडवून दिला आहे व त्याची जी फटफजिती करून दिली आहे, ती पुष्कळांस माहीत असेलच. असो; यासंबंधानें यापुढेंच लिहायाचेंच आहे. या दोघां मित्रांचा वर सांगितल्याप्रमाणेंच जो एकदां संबंध जडला तो थेट जॉन्सन्च्या हयातीच्या अखेरपर्यंत म्हणजे सुमारें बावीस वर्षे राहिला. इतक्या काळांत त्यांचें अनेक भाषणादि प्रसंग झाले. एकदां तर दोघांनीं एक दूरचा प्रवास [2] केला; व शिवाय दर वर्षी बॉस्वेल् हा आपल्या देशांतून इंग्लंडास जेव्हां येई तेव्हां वर सांगितलेल्या 'क्लब'च्या वगैरे ठिकाणीं जॉन्सन् व त्याचें मित्रमंडळ यांचा

---

consider what great and various talents and acquirements met in the little fraternity. Goldsmith was the representative of poetry and light literature, Reynolds of the arts, Burke of political eloquence and political philosophy. There too were Gibbon, the greatest historian, and Jones, the greatest linguist, of the age. Garrick brought to the meetings his inexhaustible pleasantry, his incomparable mimicry and his consummate knowledge of stage effect. To predominate over such a society was not easy: yet even over such a society Johnson predominated. Burke might indeed have disputed the supremacy to which others were under the necessity of submiting. But Burke though not generally a very patient listener, was content to take the second part when Johnson was present; and the club itself, consisting of also many eminent men is to this day (1856) popularly designated as Johnson's club."

१. जॉन्सन्ची व त्याच्या भावी चरित्रकाराची जी पहिली भेट झाली तिची हकीकत * मोठी चमत्कारिक आहे; ती बॉस्वेल्च्या ग्रंथांतून वाचण्यास आमच्या इंग्रेजी जाणणाऱ्या वाचकांस शिफारस केल्यावांचून राहवत नाहीं.

२. स्कॉट्लंड्च्या पश्चिम किनाऱ्यानजीक असलेल्या हेब्रिडीज् (Hebredes) बेटांकडे केलेली सफर.

'सम्पादक'

* १६ मे १७६३ रोजीं Mr. Davies च्या घरीं जॉन्सन्ची व बॉस्वेल्ची प्रथम भेट झाली. जॉन्सन्चा स्कॉच् लोकांबद्दल असलेला दूषित ग्रह माहीत असल्यामुळें आपली ओळख करून देतांना आपण स्कॉट्लंडांतून आल्याचा उल्लेख

(पुढें चालू)

त्यास समागम होई. यावेरीज जॉन्सन्चा व त्याचा अगदीं घरोबा जमला असल्या-मुळें दोघांचें खाजगी रीतीनें जें संभाषण होई तें निराळेंच. बॉस्वेल् हा अगदीं मोकळ्या मनाचा व मोठा लाघवी असल्यामुळें, व जॉन्सन् हा एकेकटा[1] असून शिवाय पूर्वी सांगितलेला जो मेंदूचा विकार त्याच्यापासून त्यास वारंवार पीडा होत असल्यामुळें, ते परस्परांस अत्यंत इष्ट असत. बॉस्वेल् यास या महापंडिताचें वक्तृत्व सेवन करण्याची व प्रत्येक विषयावर त्याचीं काय काय मतें आहेत तीं समजून घेण्याची अतोनात इच्छा होती; व इकडे जॉन्सन् यासही कोणी माविक श्रोता मिळाला असतां चंद्रसमुद्रन्यायानें त्याच्या वाणीस मोठें भरतें येई. त्यानें पन्नास वर्षें जगाचा अनुभव घेतला होता, व हजारों ग्रंथांचें त्यास अवलोकन झालें होतें. शिवाय त्याची बुद्धि स्वभावतःच परम सूक्ष्म व शोधक होती, यास्तव कोणी कसलाही वाद काढला तरी त्यावर तो इतक्या उत्तम तऱ्हेची चर्चा करी, कीं एक शब्दही इकडचा इकडे न करतां त्याचें भाषण खुशाल छापायाला पाठवावें. असो; तर याप्रमाणें वीस वर्षें पावेतों बॉस्वेल्नें जॉन्सन्च्या व त्याच्या मित्रमंडळींच्या भाषणरत्नांचा जो मोठ्या श्रमानें व आस्थेनें आपणांपाशीं संग्रह करून ठेवला होता तो त्यानें सरते-शेवटीं चरित्ररूपानें मोठ्या चातुर्यानें ग्रथित करून साऱ्या जगास प्रगट केला.

येथें प्रसंगवशात् बॉस्वेल्च्या स्वभावाविषयीं व योग्यतेविषयीं कांहीं लिहिलें पाहिजे. याचें कारण वर सांगितलेंच आहे कीं, मेकॉलेसाहेबांनीं जॉन्सन्विषयींच्या[2]

---

जॉन्सन्जवळ न करण्याबद्दल बॉस्वेल्नें डेव्हीसला विनंति केली. पण डव्हीसनें तो उल्लेख केलाच. तेव्हां बॉस्वेल् म्हणाला, Mr. Johnson, I do indeed come from Scotland, but I cannot help it." असें म्हणण्यांत बॉस्वेल्चा हेतु जॉन्सन्ला चीड येऊं नये इतकाच होता. कारण आपल्या मातृभूमीचीहि निंदा करून कोणाचें लांगूलचालन करणें हें बॉस्वेल्च्या स्वभावांतच नव्हतें. पण एकंदरींत बॉस्वेल्चें हें उत्तर दुर्दैवाचेंच ठरलें. कारण जॉन्सन् हजरजबाबी व कोट्या करण्यांत कुशल असल्यानें त्यानें चटकन् 'Come from Scotland' येवढेच शब्द उचलून त्या शब्दांचा 'मी त्या देशाचा रहिवासी आहें.' असा बॉस्वेल्चा अभिप्रेत अर्थ गुंडाळून ठेवून 'मी तेथून निघून आलों ( Come away from ) आहे. मीं त्या देशाचा त्याग केला आहे' असा अर्थ त्या शब्दांतून काढून बॉस्वेल्ला असा टोमणा मारला कीं, "That, Sir, is what a very great many of your countrymen cannot help," अशी फेर पहिल्याच भेटींत झडली. 'सम्पादक'

१. 'एकेकटा' याऐवजीं 'एकटा' असा शब्द योग्य झाला असता.

'सम्पादक'

२. जॉन्सन्च्या वावदूकत्वाविषयीं मेकॉलेंचा अभिप्राय येणेंप्रमाणें आहे—

" The influence exercised by Johnson's conversation, directly upon those with whom he lived, and indirectly upon the whole

( पुढें चालू )

दोन लेखांत व इतर ठिकाणींही प्रस्तुत चरित्रकार हा मूर्खांतला मूर्ख, पाजींतला पाजी असें जगजाहीर करून टाकलें आहे; व त्याच्या लेखांत समयविशेषीं सत्याचा किती अत्यल्प अंश असतो हें अद्याप चोहोंकडे पुरतेपणीं माहीत झालें नसल्यामुळें वरील समजूतच पुष्कळांच्या मनांत खिळून राहिली असेल यांत संशय नाहीं. या महान् टीकाकारानें बॉसवेल् यास त्याच्या परिश्रमांबद्दल जें बक्षीस दिलें आहे त्याचा सारांश येणेंप्रमाणें आहे:—" बॉसवेल् हा पहिल्या प्रतीचा ढ होता; त्याला अक्कल कशी ती आल्या जन्मांत कधींच आली नाहीं. चातुर्य, तर्कशक्ति, रसिकता, इत्यादि गुणांचा त्यास गंधही नव्हता. शिवाय कोणी मोठा पाहिला कीं, त्याची थुंकी झेलायाला लागावें, रिकाम्या उलाढाल्या ( टी १ सं० ) करीत असून चोंबडेपणा करावा, इकडची चुगली तिकडे व तिकडची इकडे सांगावी, अशा प्रकारचा हा अगदीं बेशरम, हलकट, पोरकट असा मनुष्य होता." याप्रमाणें आरंभीं त्याच्या ग्रंथाचें येवढें माहात्म्य वर्णिलें आहे, त्याच्या सर्व गुणांची एका सपाट्यास धुळधाण करून देऊन पुढें तर वरील टीकाकर्त्यानें जी एक मौज सांगितली आहे ती वाचून तोंडांत बोट घातल्याशिवाय राहवत नाहीं! ती आश्चर्यकारक गोष्ट ही कीं, 'बॉसवेल् हा वर सांगितल्याप्रमाणें बडा शंख होता म्हणून त्याच्या हातून येवढा ग्रंथ तयार झाला!!!' ही[१] आमच्या साहेबांची कोटि मागें कित्येक जे विलायती तर्क त्याशीं आपल्या वाच-

---

civilized world, was altogether without a parallel. His coloquial talents were indeed of the highest order. He had strong sense, quick discernment, wit, humour, immense knowledge of literature and life and an infinite store of curious anecdotes. Every sentence which dropped from his lips was as correct in structure as the most nicely balanced period of the Rambler. He uttered his short, weighty, and pointed sentences with a power of voice, and a justness and energy of emphasis of which the effect was rather increased than diminished by the rollings of his huge form, and by the asthmatic gaspings and puffings in which the peals of his eloquence generally ended. To discuss questions of taste, of learning, of casuistry in language, so exact and so forcible that it might have been printed without the alteration of a word, was to him no exertion, but a pleasure. He loved, as he said, to fold his legs and have his talk out."

१. "If he ( Boswell, Ed. ) had not been a great fool, he would never have been a greater writer. Without all those qualities which made him the jest and the torment of those among whom he lived without the officiousness, the inquisitiveness, the effrontery, the toadeating, the insensibility to all reproof, he never could have produced, so excellent a book.........He had, indeed, a quick observation and a retentive memory. These qualities, if he had been a man of sense and virtue, would scarcely of themselves have sufficed to make him conspicuous; but because he was a dunce, a parasite, and a coxcomb, they have made him immortal."

कांस सादर केले आहेत त्यांच्या वर्गांत ठेवण्यासारखीच आहे. महामूर्खत्व हें उत्तम ग्रंथरचनेचें कारण कसें होऊं शकेल हें आम्हांस कळत नाहीं. आमचा तर अद्याप असा समज आहे कीं,

न प्रभातरलं ज्योतिरुदेति वसुधातलात् ।

"विचित्र प्रभा मिरवणारें तेज पृथ्वीच्या पृष्ठभागापासून कधींही निर्माण व्हावयाचें नाहीं." उघडच आहे कीं, अभावरूप कारणापासून भावरूप कार्य कसें निष्पन्न होईल! मूर्खत्वापासून ज्ञानतत्त्वाचा प्रादुर्भाव होणें हें अंधकारापासून प्रकाशाचा उदय होण्यासारखें वस्तुगत्याच अशक्य होय!

प्रस्तुत चरित्रकाराविषयींच्या वरील उल्लेखांवरून मेकॉलेसाहेबांच्या मनावर दुष्ट ग्रहांचा अंमल किती चालत असे, व त्या अंमलांत ते कोठपर्यंत भरकटत जात हें आमच्या वाचकांच्या सहज लक्षांत येईल. जॉन्सन् हा राजपक्षाचा असून लोकपक्षीय लोकांचा तो अत्यंत द्वेष करीत असे, व शिवाय मेकॉलेच्या घरची प्रतिदैवतें जीं शेक्स्पियर् व मिल्टन्[१]

---

१. John Milton (1608-1674) बापापासून गायनाची आवड व गाननैपुण्य यानें संपादिलें. प्राथमिक शिक्षण बापाच्या एका स्कॉच् स्नेह्याकडून मिळाल्यावर तो सेंट्-पॉल्च्या शाळेंत गेला व पुढें १६२५ मध्यें केंब्रिजच्या Christ's College मध्यें दाखल झाला. या ठिकाणीं त्याच्या सौंदर्यामुळें व मनाच्या कोमलतेमुळें विद्यार्थी त्याला 'The lady' असें चिडवीत. ॲन् नामक बहिणीच्या पहिल्या अपत्याच्या अल्पवयांतील मृत्यूमुळें याला 'On the Death of a Fair Infant' ही कविता लिहिण्याची स्फूर्ति झाली. यानंतर पुढील सात वर्षांत त्यानें अनेक कविता केल्या. १६३२ सालीं *L' Allegeo* and *Il Penseroso*, १६३४ सालीं 'कोमस्' व १६३५ सालीं Lycidas हीं काव्यें त्यानें लिहिलीं. हीं इतकीं उत्तम साधलीं आहेत कीं दुसरें कांहींहि त्यानें लिहिलें नसतें तरी केवळ येवढ्यांवरच त्याची कीर्ति अजरामर झाली असती. १६३८ सालीं त्याचें शिक्षण संपलें. तो फ्रान्स व इटली देशांत गेला असतां पॅरिस् येथें (Grotius) ग्रॉटियस्ची व फ्लॉरेन्स येथें (Galileo) गॅलिलिओची त्यानें गांठ घेतली. पण चर्च् व राज्य यासंबंधीं तंटे इंग्लंडांत सुरू झाल्यामुळें तो परत आला. आल्यावर त्याच्या मनांत एक मोठें काव्य लिहिण्याची योजना चालू होती. पण पुढील वीस वर्षें राज्यकारण व धर्म एतद्विषयक तंट्यांच्या धकाधकीच्या मामल्यांतच गेल्यामुळें तद्विषयक गद्य वाङ्मय त्यानें लिहिलें. पैकीं 'Tractate on Education' आणि 'A speech on the Liberty of Unlicensed Printing' हे ग्रंथ महत्त्वाचे होत. १६४३ सालीं त्याचें पहिलें लग्न मेरी पॉवेल् नामक एका सतरा वर्षांच्या मुलीशीं झालें. पण त्याच्या तपोध्ययन-गांभीर्यामुळें तिचें उल्हासी मन विषण्ण झालें; दोघांचें पटेना. घटस्फोटापर्यंतहि पाळी आली. पण अखेर समेट झाला. तीन मुली होऊन ही बायको १६५२ सालीं

[पुढें चालू]

त्यांशीं वरील पंडितानें जागोजाग विरोधभक्ति प्रगट केली आहे, इत्यादि अनेक कारणांवरून जॉन्सन्‌विषयीं वरील ग्रंथकाराच्या मनांत मोठेंसें प्रेम नव्हतेंच; यास्तव बासवेल्‌च्या ग्रंथाविषयीं लिहिण्याचा जेव्हां प्रसंग आला तेव्हां 'शिष्यापराधे गुरोर्दण्ड:' या न्यायाचा विपर्यय करून बिचाऱ्या शिष्यावर वरील टीकाकारानें आपली लेखणी खूप मनमुक्त झाडून घेतली. पण हा धडाका उडवून देण्यापूर्वी त्यानें हें लक्षांत कसें आणलें नाहीं कोण जाणे की बॉसवेल्‌ हा केवढाही महामूर्ख असला, तरी मोठमोठ्या शहाण्यांचे ग्रंथ जेव्हां पार धुळीस मिळून गेले असतील तेव्हांही त्याचा आजच्याप्रमाणेंच कोरा करकरीत राहील! त्याचप्रमाणें जॉन्सन्‌विषयीं सदरील चरित्रकाराच्या ज्या वृत्ति होत्या व ज्या त्यानें पदोपदीं प्रकृत ग्रंथांत मोकळ्या मनानें प्रगट केल्या आहेत, त्या केवळ त्याच्याच टायीं वास करीत होत्या असें नाहीं. बर्क्‌सारख्यांनीही * ज्याच्याशीं नम्रतेंकरून शिष्यभाव प्रगट करावा, तशाच येवढा

---

वारली. चार वर्षांनी मिल्टन्‌नें द्वितीय संबंध केला. पण बाळंतपणांत तीहि १६५७ सालीं आटपली व १६६३ सालीं अंधळेपणामुळें अगदीं असहाय स्थिति प्राप्त झाल्यामुळें आपला स्नेही डॉ. पॅजेट याच्या पसंतीनें एलिझाबेथ्‌ मिन्शल्‌ या पंचवीस वर्षांच्या मुलीशीं त्यानें लग्न केलें व तिजपासून त्याला म्हातारपणीं सुखहि झालें. रेस्टोरेशन्‌नंतर आपल्या महाकाव्याच्या तयारीस तो लागला व १६५८–६४ पर्यंत paradise Lost त्यानें लिहिलें. हें १६६७ सालीं प्रसिद्ध झाल्यावर Thomas Ellwood नामक एका स्नेह्याच्या सूचनेवरून त्यानें Paradise Regained लिहिलें. १६७१ सालीं हें काव्य व Samson Agonistes प्रसिद्ध झालीं. मिल्टन्‌चा 'A History of Britain' नामक एक इतिहास–ग्रंथहि आहे पण तो तादृश महत्वाचा नाहीं. 'सम्पादक'

*Edmund Burke (1729–1797) वक्ता व मुत्सद्दी. हा १७५६ सालीं लंडन्‌ला गेला व 'Sublime and Beautiful' या विषयावरचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ प्रसिद्ध करून यानें वाङ्मयांत नांवलौकिक मिळविला. पुढें हा मार्किस्‌ ऑफ्‌ रॉकिंगहॅम्‌चा खासगी कारभारी झाला व पार्लमेंटांत शिरून तत्कालीन सर्व चळवळींत व विवादांत यानें भाग घेतला. १७९५ सालीं याला पेन्शन्‌ मिळालें. 'A vindication of Natural Society' (1756), 'The present state of the Nation' (1769), 'Letters of Junius,' 'Thoughts on the present Discontent' (1770), 'Letter to the Sheriffs of Bristol' (1777), Reflections on the French Revoluton' (1790), 'Letter on a Regicide Peace' (1796) हे याचे प्रमुख ग्रंथ होत. 'Conciliation with America' (1775) व 'The Nabob of Arcot's Debts (1785) हीं याचीं सर्वोत्कृष्ट भाषणें होत. यानें वॉरन्‌ हेस्टिंग्जच्या कारकिर्दीतील हिंदुस्थान–सरकारचे कागदपत्र मागविले व त्यांचा वॉरन्‌ हेस्टिंग्जवर १७८७–९४ पर्यंत झालेल्या खटल्यास फार उपयोग झाला. 'सम्पादक'

वक्ता फॉक्स्[1] व येवढा प्रचंड इतिहासकार गिबन् पण त्यासही ज्याच्याशीं बोलण्याचा धाक वाटत असे,[2] त्याच्या पुढें बॉस्वेल्सारख्यानें आपला कितीही नीच भाव प्रगट केला व त्याविषयीं पूज्यता कितीही नम्रभावानें प्रदर्शित केली, तरी त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. सारें जग ज्यांच्या बुद्धिवैभवानें चकित होतें व ज्यांची कीर्ति गातें, त्यांच्याविषयीं पूज्यता मनांत धरणें व ती व्यक्त करणें हें जर नीचपणाचें व मूर्खपणाचें दर्शक होय, तर मेकॉलेसाहेब स्वतःवरील दोषांपासून सुटतील असें नाहीं. त्यांनींही स्वतःची प्रेमाची व भक्तीची उकळी बॉस्वेल्हून ज्यास्त आंवरून धरलेली कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. पुष्कळ ठिकाणीं असें मात्र नजरेस येतें कीं त्यांची दृष्टि प्रेमाश्रूंनीं अत्यंत व्याप्त होऊन त्यांस गुणदोषांचें मान यथास्थित होत नाहीं. हें प्रेमांधत्व प्रस्तुत महामूर्ख चरित्रकाराच्या ग्रंथांत फारच क्वचित् आढळेल.[3]

---

१. Charles James Fox (1749-1806) मुत्सद्दी, इतिहासकार व उत्कृष्ट वक्ता, 'History of the Reign of James the Second'. हें याचें पुस्तक अर्धवटच लिहून झालें. यांत फक्त सातव्या हेन्रीपासून राज्यघटनेचा झालेला विकास व मन्मथ्च्या ड्यूकच्या शिरच्छेदापर्यंत (१६८५) इतिहासाचा भाग आला आहे. हा एकोणिसाव्या वर्षी पार्लमेंटांत शिरला. Royal Marriage Bill ला विरोध केल्यामुळें याच्यावर तिसऱ्या जॉर्जची खप्पा मर्जी झाली. पिट्ट प्रेमियर् असेपर्यंत फॉक्स् त्याचा कट्टा प्रतिस्पर्धी होता. हा अमेरिकन् इंडिपेंडन्सचा पुरस्कर्ता, फ्रान्सशीं युद्ध करण्याच्या योजनेचा विरोधक, वॉरन् हेस्टिंग्जविरुद्ध खटला उभारणारा, गुलामांच्या व्यापाराचा कट्टा निषेधक, पार्लमेंटरी सुधारणांना पाठिंबा देणारा असून याला पिट्टच्या मृत्यूनंतर १८०६ सालीं फॉरेन् सेक्रेटरी करण्यांत आलें. पण लवकरच हा वारला. याला वेस्ट् मिन्स्टर् ॲबेमध्यें पुरण्यांत आलें. 'सम्पादक'

२. गिबन् जॉन्सन्च्या मंडळींत नेहमी असतां दोघांचें भाषण झालेलें फारसें आढळत नाहीं. फॉक्स्विषयीं तर बॉस्वेल्नें असें लिहिलें आहे—

"It has been observed and wondered at that Mr. Charles Fox never talked with any freedom in the presence of Dr. Johnson; though it is well known, and I myself can witness, that his conversation is various, fluent and exceedingly agreeable."

३. बॉस्वेल्च्या ज्या वृत्तींस मेकॉलेसाहेबांनीं वरील कुत्सित नांवें दिलीं आहेत त्याच पुढील उताऱ्यांत स्पष्ट दिसतात—

"We must conclude. And yet we can scarcely tear ourselves away from the subject. The days immediately following the publication of this relic of Milton appear to be peculiarly set apart, and consecrated to his memory. And we shall scarcely be censured if, on this his festival, we be found lingering near his shrine, how worthless soever may be the offering which we bring to it. While this

(पुढें चालू)

असो; तर जॉन्सनेजूच्या गुणांचे व योग्यतेचें यथास्थित ज्ञान वरील थोड-क्यांत मुळींच झालें नाहीं किंवा तें त्यानें प्रगट तरी केलें नाहीं, असें म्हणणें भाग आहे. तें सदरील चरित्र वाचलें असतां कोणासही सहज होणारें आहे. सदरील चरित्रकाराच्या पहिला मोठा गुण म्हणजे गुणाची पारख व चहा होय. मोठमोठ्या विद्वानांचा व नामांकित पुरुषांचा समागम करण्याविषयीं त्याची उत्कंठा येवढी प्रबळ असे कीं, तो स्वतः थोर कुळांत निपजला असतां व त्याचा त्यास अभिमान वाटत असतां जॉन्सनसारख्या कंगाल मनुष्याशीं सुद्धां आपण होऊन तो स्नेह करी. ईश्वरदत्त गुणांनीं जे श्रेष्ठ त्यांच्यापुढें केवळ कुळपरंपरेनें आलेल्या वैभवाचा श्रेष्ठपणा केवळ तुच्छ होय ही थोर समजूत अगदीं तरुण वयापासून त्याची दृढ झाली होती. हें तर काय, पण त्याची गुणग्राहकता अशी असे व गुणिजनांविषयीं इतकी पूज्यता त्याचे ठायीं वागत असे, कीं कोणाशीं त्याचा केवढाही मतविरोध असला तरी केवळ गुणांवर नजर देऊन तो त्यांस चाहत असे, व त्यांच्या स्नेहाची इच्छा करी. प्रत्यक्ष

book lies on our table, we seem to be contemporaries of the great poet. We are transported a hundred and fifty years back. We can almost fancy that we are visiting him in his small lodging; that we see him sitting at the old organ beneath the faded green hangings; that we can catch the quick twinkle of his eyes, rolling in vain to find the day; that we are reading in the lines of his noble countenance the proud and mournful history of his glory and his affliction. We imagine to ourselves the breathless silence in which we should listen to his slightest word, the passionate veneration with which we should kneel to kiss his hand and weep upon it, the earnestness with which we should endeavour to consol him, if indeed such a spirit could need consolation, for the neglect of an age unworthy of his talents and his virtues, the eagerness with which we should contest with his daughters, or with his Quaker friend Ellwood, * the privilege of reading Homer to him, or of taking down the immortal accents which flowed from his lips."

—*Essay on Milton.*

* Thomas Ellwood (1639–1713) या तरुण केकरीची मिल्टनशीं १६६२ साली ओळख झाली. एलवुडच्या पुष्कळ वेळ मिल्टनला वाचून दाखविण्यांत गाई. एलवुडच्याच एका प्रश्नामुळें 'Paradise Regained' मिल्टननें लिहिलें. त्यानें आत्मचरित्र लिहिलें असून त्यांत मिल्टनच्या चरित्रांतील गोष्टींबद्दल व तत्कालीन परिस्थितीबद्दल पुष्कळ माहिती दिली आहे. Davideis ही त्याची कविता १७१२ साली प्रसिद्ध झाली. आपल्या धार्मिक मतांबद्दल हालअपेष्टा सोसण्याची त्याची तयारी असे. 'सम्पादक'

जॉन्सन्‌चेंच[1] जरी उदाहरण घेतलें, तरी त्याचें व त्याच्या चरित्रकाराचें सर्वांशीं ऐकमत्य होतें असें नाहीं. राज्यप्रकरणाविषयीं व निरनिराळ्या ग्रंथकारांच्या योग्यतेविषयीं वगैरे त्यांचा बेबनावच असे. हा मतभेद जॉन्सन्‌विषयीं बॉस्वेल्‌ची येवढी सप्रेम भक्ति असतां त्यानें जेथें तेथें स्पष्ट बोलून दाखवला आहे, किंबहुना 'दोषा वाच्या गुरोरपि' या न्यायास अनुसरून त्यास स्थलविशेषीं दूषणेंही दिलीं आहेत. असो; तर स्नेहास विघात करणारीं जीं कारणें सामान्यतः जगांत दृष्टीस पडतात त्यांचा प्रस्तुत चरित्रकारावर बिलकुल अंमल न चालून 'हंसो यथा क्षीरमिवाम्बुमध्यात्।' याप्रमाणें ग्राह्य जेवढा अंश तेवढा ज्याच्या त्याच्यापासून काढून घेण्याची हातोटी त्यास फार चांगली साधली होती. दुसरा गुण विलक्षण स्मरणशक्ति. ही प्रस्तुत ग्रंथकर्त्याच्या कृतीवरून कोणासही स्पष्ट दिसणार आहे. दोन तीन मनुष्यांचें एक अर्धी घटका परस्पर संभाषण झालें असतां तें शब्दशः दुसऱ्यास सांगावाचें असल्यास त्या सांगणारास केवढी पंचाईत पडेल याची कोणासही स्वतःच्या अनुभवावरून सहज कल्पना करतां येईल. मग जॉन्सन्‌सारख्याचें त्याच्या विद्वान् मित्रमंडळीशीं मोठमोठ्या प्रौढ व गहन विषयावर सविस्तर होणारें भाषण त्यानें ध्यानांत धरून नंतर घरीं गेल्यावर लिहून ठेवावें, त्याच्या स्मरणशक्तीचा कोणास चमत्कार वाटणार नाहीं ? बॉस्वेल् यासही पहिल्यापहिल्यानें हें काम भारी जड जाऊन त्यानें जॉन्सन्‌च्या भाषणांचा नुसता सारांश दिला आहे; पण पुढें क्रमाक्रमानें प्रस्तुत महापंडिताची भाषणपद्धति जशी त्यास अत्यंत परिचित होऊन गेली व भाषणें उतरून ठेवण्याच्या कलेंत तो घटावत गेला, तसतसें तें त्यास स्वल्प वाटून तो मोठमोठालीं भाषणें मुद्दां क्रमवार यथास्थित लिहून ठेवूं लागला. हा त्याचा अचाट उद्योग, कीं जो त्यानें वीस वर्षें सारखा चालवला होता त्यावरून जॉन्सन्‌चें वक्तृत्व सर्व लोकांत प्रसिद्ध करण्याची त्याची केवढी उत्कंठा असावी ती स्पष्ट होते. तशीच वरील भाषणाविषयींही ही पहिल्यापासून प्रसिद्धि आहे, कीं त्यांत चरित्रकारानें आपण होऊन पदरचा एक शब्दही घातला नाहीं. आपल्या गुरूप्रमाणेंच बॉस्वेल् हा सत्याचा येवढा निःसीम भक्त होता कीं, एका शब्दाचाही पडताळा पाहणें असतां तो साऱ्या लंडनभर फिरे.[2] पण याहूनही मोठा गुण एक अद्याप सांगायाचाच आहे कीं, ज्याच्या योगानें प्रस्तुत चरित्रास विलक्षण शोभा

१. Paul Whitehead (Manners या उत्कृष्ट औपरोधिक कवितेचा कर्ता); चार्चेल् (Charles Churchill) सुप्रसिद्ध 'The Ghost' चा कर्ता; वगैरे ग्रंथकारांबद्दल जॉन्सन्‌चें मत प्रतिकूल होतें तर बॉस्वेल्‌चें अनुकूल होतें. 'सम्पादक'

२. सर जॉशुआ रेनॉल्ड्स् जॉन्सन्‌चा परम स्नेही असून बॉस्वेल्‌चाही त्याच्याशीं वरील संबंधास्तव अत्यंत परिचय असे. प्रस्तुत चरित्र प्रथमतः त्यालाच नजर केलें होतें. त्याचें वरील ग्रंथाच्या संबंधानें मत पुढील उताऱ्यांत दाखल केलें आहे—

( पुढें चालू )

आली असून तो तसा दुसऱ्या कोणत्याही ग्रंथकाराचे ठायीं आढळत नाहीं. हा गुण मनुष्यस्वभावाचें ज्ञान होय. जॉन्सन् व त्याचें मित्रमंडळ यांच्या स्वभावांची व गुणांची बॉस्वेल् यास इतकी उत्तम पारख होती कीं, प्रत्येकाचें चित्र रेनॉल्ड्सच्या तसबिरींत जसें अगदीं रेखलेलें उतरलें आहे त्याप्रमाणेंच त्यांच्या मनाची तसबीर वरील चारित्रकारानें जणों काय अगदीं हुबेहुब काढून दिली आहे. आजपर्यंत पुष्कळ अतिविख्यात मनुष्यांचीं चरित्रें मोठमोठ्या नामांकित ग्रंथकर्त्यांनीं लिहिलीं आहेत; ह्मणजे सॉक्रेटीस्, जिनोफन् यांच्या वेळेपासून तों थेट या काळपर्यंत.[1] पण हीं सर्व 'जॉन्सन्च्या चरित्रा'पुढें केवळ रद्द होत ! त्यांत मुख्य नायकाचें व त्याच्या मंडळाचेंच काय; पण त्या अवघ्या काळाचें प्रतिबिंब इतकें उत्तम उठलें आहे कीं, तसा प्रकार इतरत्र कोठेंही नाहीं. ही कला प्रस्तुत चरित्रकारास पूर्ण साधल्याबद्दल पुष्कळांनीं त्याची अतिशयित तारीफ केली आहे व त्याच्या ग्रंथाची लोकमान्यता अद्याप पहिल्यासारखी असल्याचें बीज तेंच होय. खुद्द जॉन्सन्नेंही वरील गुणाबद्दल आश्चर्य प्रदर्शित केलेलें व आपल्या वक्तृत्वाचा मासला इतक्या उत्तम तऱ्हेनें जगास प्रसिद्ध होणार हें पाहून त्यास अत्यंत आनंद झालेला प्रस्तुत चरित्रांतच दाखल झाला आहे.

तर याप्रमाणें प्रस्तुत ग्रंथकाराचा विख्यात चरित्रकार बॉस्वेल[2] याची व

---

Sir Josua Reynolds told me at his table, immediately after the publication of this book, that every word of it might be depended upon as if given on oath. Boswell was in the habit of bringing the proofsheets to his house previously to their being struck off; and if any of the company happened to have been present at the conversation recorded, he requested him or them to correct any error; and not satisfied with this, he would run over all London for the sake of verifying any single word which might be disputed."

—Wordsworth.

१. अगदीं नुकता अशा तऱ्हेचा झालेला ग्रंथ 'मेकॉलेचें चरित्र' हा होय. हा पांच सहा महिन्यांपूर्वी वरील ग्रंथकाराच्या पुतण्यानें प्रसिद्ध केला आहे.

२. जेम्स् बॉस्वेल् ( १७४०–१७९५ ). जॉन्सन्च्या चरित्राशिवाय An Account of Corsica ( 1768 ), A Journal of a Tour to the Hebredes ( 1786 ), Letters to William Temple ( 1857 ) हे याचे आणखी ग्रंथ होत. याचा इंग्लंड् व स्कॉट्लंड् दोन्ही देशांत वकिलीचा धंदा चांगला चालेना, तद्वतच राजकारणांत शिरण्याचे याचे प्रयत्नहि व्यर्थ झाले. मेकॉले व कार्लाइल् दोघांनींहि बॉस्वेल्सारख्या हीन दर्जाच्या मनुष्याकडून असला अद्वितीय ग्रंथ कसा निर्माण झाला असावा याबद्दल खूप वाद घातला आहे. पण कार्लाइल्नें अंतर्मुख दृष्टि करून बॉस्वेल्च्या दर्शनी बाह्य दोषांच्या खालीं असलेली तीव्र व गुणग्राही निरीक्षणशक्ति आणि त्याचें गुणज्ञ अंतःकरण यांमुळेंच त्याच्या हातून ही चरित्रलेखनाची अद्वितीय कामगिरी घडली असा योग्य निष्कर्ष काढला आहे. मेकॉलेची मीमांसा काय दर्जाची आहे याची छाननी वर झालीच आहे. 'सम्पादक'

त्याच्या ग्रंथाची हकीकत आहे. ही इतकी सविस्तर देण्याचें कारण एक तर असें आहे कीं, प्रस्तुत चरित्र ज्याच्या योगानें सार्‍या जगास उपलब्ध झालें त्याचा वृत्तांत अशा स्थलीं देणें उचित होय; आणि त्यांतून त्याची निर्भत्सना मेकॉलेसारख्यानें केली असल्यामुळें त्याची वास्तविक योग्यता प्रगट करणें तर अवश्य होय. याखेरीज आमच्या देशाचे दूषक जे वरील साहेब त्यांची स्वदेशीयाच्या संबंधानेंही किती सत्यनिष्ठा व यथार्थबुद्धि आढळते याचाही थोडासा चमत्कार वरील लेखावरून दिसून येणार आहे.[१] असो; आतां यापुढें जॉन्सन्च्या आयुष्यांत विशेष झगण्या-सारख्या कोणत्या गोष्टी घडल्या त्या क्रमानें सांगतों.

---

१. वर जो आम्हीं बॉस्वेल्च्या कैवारानें मजकूर लिहिला आहे तो केवळ स्वतःच्या बुद्धीनें लिहिला नसून प्रस्तुत महामूर्ख चारित्रकाराची पुष्कळ मोठमोठया विद्वानांनीं स्तुति केली आहे हें दाखवणें फार कठिण आहे असें नाहीं. पण वरील सर्व अभिप्राय विस्तारभयास्तव येथें दाखल करतां येत नाहींत. यास्तव वरील खंड-नाच्या समर्थनार्थ दोनच उतारे पुढें देतों—

"We owe the great riches of the English Author's remains to the curiosity excited by his lively and pointed conversation, and the happy accident of his living for the latter part of his life in the society of a person eminently qualified, both by his tastes and his habits, to afford that curiosity an unlimited gratification. In the grateful remembrance of all who relish the pleasures of rafined social intercourse, with the name of Johnson is associated that of Boswell, as indissolubly as are those of Plato § and Xenophon with the more remarkable name of Socrates in the minds of all who love philosophy; and there is perhaps added a zest to the collecti-

( पुढें चालू )

§ प्लेटो (खि. पू. सुमारें ४२९–३४७ ), अथीनिअन् तत्ववेत्ता. व्याकरण, गायन व तालीम यांचें अध्ययन उत्तम गुरूपाशीं झाल्यावर विसाव्या वर्षी तो सॉक्रेटीस्चा अनुयायी झाला. सॉक्रेटीस्च्या मृत्यूनंतर (खि. पू. ३९९) ज्ञानार्जनार्थ प्लेटो ईजिप्त, सिसिली वगैरे देशांत हिंडला प्लेटोची डायोनिसिअसशीं मैत्री झाली, पण डायो-निसिअस्नें त्याला गुलाम म्हणून विकलें.पण Anniceris नें त्याची मुक्तता केली. परत आल्यावर अॅकॅडेमीच्या तालमींत तो शिकवूं लागला म्हणून त्याच्या शाळेस Academic म्हणूं लागले. त्यानें आपल्या घरावर 'Let no one enter who is unacqainted with geometry,' 'भूमिति–ज्ञान नसेल त्यानें आंत येण्याची तसदी घेऊं नये' अशीं अक्षरें कोरविलीं होतीं. हा सॉक्रेटीस्चा शिष्य व ॲरिस्टॉटल्चा गुरु असून याचें मूळ नांव ॲरिस्टॉकल्स् ( Aristocles ) होतें. हा अथेन्स् येथें तत्त्वज्ञानाचा उपदेश करीत असे. याचे लेख व व्याख्यानें फार विख्यात असून 'Dialogues' व 'Republic' हे याचे तत्त्वज्ञानविषयक ग्रंथ सर्वोत्कृष्ट आहेत. 'सम्पादक'

४. यापुढें प्रस्तुत चरित्रांतील विशेष सांगण्यासारख्या गोष्टी म्हटल्या म्हणजे जॉन्सन्ची एक मोठी मुशाफरी व त्यानें प्रसिद्ध केलेले चार पांच ग्रंथ है होत. ही

---

ons of the English writer which the Athenian records possess not. We see the amiable and lively historian figuring always in the group with his more stern idol; affording relief, by contrast, to the picture of the sage, & amusing by his own harmless foibles which he takes a pleasure in revealing. as if he shared the gratification he was preparing for his unknown reader. His cleverness, his tact, his skill in drawing forth those he was studying, his admirable good humour, his strict love of truth, his high and generous principle, his kindness towards his friend, his unvarying but generally rational piety, have scarcely been sufficiently praised by those who nevertheless have been ready, as needs they must be, to acknowledge the debt of gratitude due for perhaps the book, of all that were ever written, the most difficult to lay down once it has been taken up."

Lord Brougham. +

बॉस्वेल्चें महामूर्खत्व हें त्याच्या उत्कृष्ट ग्रंथरचनेचे कारण होय हें जें मेकॉलेचें ह्मणणें त्यावर एका नामांकित ग्रंथकारानें येणेंप्रमाणें चर्चा केली आहे—

"*Bad* is by its nature negative, and can do *nothing* whotsoever enables us to *do* anything is by its very nature *good*. Boswell wrote a *good* book because he had a heart and an eye to discern wisdom, and an utterance to render it forth; because of his free insight, his lively talent, above all of his love and childlike open-mindedness. Towards Johnson, his feeling was not sycophancy, which is the lowest, but reverence, which is the highest, of human feelings. None, but a *reverent* man-which so unspeakably few are-could have found his way from Boswell's environment to Johnson's: if such worship for real God-made superiors shewed itself also as worship for apparent tailor-made superiors even as hollow interested mouth-worship for such,—the case in this composite human nature of ours, was not miraculous, the more the pity! But for ourselves, let every one of us cling to this last article of faith, and know it as the beginning of all knowledge worth the name,—that neither James Boswell's good book nor any other good thing, in any time or in any place, was. is or can be performed by any man in virtue of his *badness*, but always and solely in spite thereof."

—*Carlyle's Miscellanies*.

+ लॉर्ड ब्राउहॅम् (१७७८–१८६८) एकोणिसाव्या शतकांतील प्रमुख कायदेपंडित. चवथा जॉर्ज व कॅरोलिन (Caroline) राणी यांच्या भांडणांत यानें राणीचा पक्ष उचलून ख्याति मिळविली व पुढें राजकारणांतहि महत्त्वाचें स्थान यानें पटकावलें. १८३० सालीं हा लॉर्ड् चॅन्सेलर् झाला. हा शिक्षणाचा मोठा पुरस्कर्ता असून एडिंबरो रिव्ह्यूमध्यें लिहीत असे.

'सम्पादक'

मुशाफरी तो व बॉस्वेल् या दोघांनीं मिळून केली. बॉस्वेल्च्या मनांत फार दिवसांपासून होतें, कीं जॉन्सन्नें आपल्या देशास यावें; व जॉन्सन्नेंही लहानपणीं हिब्रीडीज् बेटांविषयीं वर्णन वाचलें असल्यामुळें तेथील लोकस्थिति पाहण्याविषयीं त्यास फार इच्छा होती. पण त्याची प्रकृति मूळची सुस्त असल्यामुळें व फारां दिवसांनीं त्यास स्वास्थ्य प्राप्त होऊन तो सुखावल्यामुळें, शिवाय साठी उलटून जाऊन तो बराच वयातीत झाला असल्याकारणानें वरील त्याचा संकल्प इतःपर कधींही सिद्धीस जाईलसें दिसत नव्हतें. पण बॉस्वेल्चा फार आग्रह पडल्यावरून सरतेशेवटीं वरील कठिण प्रवास करण्यास तो सिद्ध झाला. वर सांगितलेलीं बेटें स्कॉट्लंड्च्या पश्चिम किनाऱ्यावर आहेत. तीं अगदीं एकीकडे असून मूळचींच उजाड व नापीक असल्यामुळें तेथील लोक अद्याप अगदीं अडाणी स्थितींत आहेत. गेल्या शतकांत तर त्यांची अवस्था याहीपेक्षां वाईट होती; व प्रवासाच्या सोयी तर इतपत होत्या कीं, खाड्या वलांडायास चांगल्याशा होड्याही मिळूं नयेत व तेथील रुक्ष व खरखरीत मैदानांवरून जाण्यास मक्कमशीं तट्टेंही पैसा खर्चून बसायाला सांपडूं नयेत. याशिवाय ज्या वेळेस वरील गुरुशिष्यांनीं प्रस्थान केलें, ती वेळ हिंवाळ्याच्या आरंभींची असल्यामुळें तसल्या अडाणी मुलखांत तर समुद्रावरची सफर बरीच धोक्याची होती.[1] पण इतकीं सर्व अनिष्टें असतांही जॉन्सन्नें ती न जुमानतां वरील बेटांतील लोकस्थिति पाहण्याची जी त्यास उत्सुकता होती ती त्यानें तृप्त करून घेतली. दोन अडीच महिने रानोमाळ फिरण्यांत व ठिकठिकाणचे देखावे आणि स्थितिरीति हीं पाहण्यांत त्यानें कालक्रमण केलें. सरतेशेवटीं एडिन्बरो येथें बॉस्वेल्च्या घरचा पाहुणचार घेऊन व तद्देशीय अनेक पंडितांचा समागम अनुभवून जॉन्सन् आपल्या देशास परत आला.

पुढें लवकरच त्यानें आपल्या प्रवासाची हकीकत लिहून प्रसिद्ध केली. हींत त्यानें त्या देशासंबंधीं कांहीं नवे शोध प्रसिद्ध केले आहेत असें नाहीं; तर जागोजाग जें जें त्याच्या दृष्टीस पडलें, व जें जें विशेष लक्षांत ठेवण्यासारखें त्यास वाटलें, तें तें त्यानें समर्पक व चित्तवेधक रीतीनें वाचकांस कळवलें आहे. या ग्रंथाची अद्यापही

१. या प्रवासांत वेळोवेळीं जॉन्सन् किती त्रासून जाई व त्यास किती कष्ट पडले ती सर्व हकीकत बॉस्वेल्नें इत्थंभूत दिली आहे. हा प्रवासवृत्तांत बॉस्वेल्नें जॉन्सन्च्या मरणानंतर जरी छापला तरी त्याचा पुष्कळ भाग त्यानें खुद्द स्वतः प्रवासांतच पाहिला होता; व अशाच प्रसंगीं आपल्या भावी चरित्रकाराच्या वर्णनकलेची त्यानें अनेक वेळां तारीफ केलेली आढळते. असो; वर जीं तट्टें सांगितलीं त्यांविषयीं सदरील हकीकतींत असा लेख आढळतो कीं, जॉन्सन्च्या ओझ्यानें मोठी मक्कम घोडींही बेजार होऊन अगदीं मेटाकुटीस येत. त्याप्रमाणेंच वरील दोघां मुशाफरांवर समुद्रावर असतां एकदोनदां असे प्रसंग गुदरले कीं, ते वादळांत सांपडून ठार झाले अशी वार्ता वर्तमानपत्रांतून चोहोंकडे प्रसिद्ध झाली होती!

सरीच ख्याति आहे, व त्या वेळेस तर कांहीं दिवस विद्वान् लोकांच्या संभाषणास तोच विषय होऊन राहिला होता. स्कॉट्लंडांतल्या कित्येक दुराग्रही व असमंजस लोकांस मात्र तो अगदीं नापसंत होऊन त्यांनीं कांहीं काळपर्यंत जॉन्सनवर शिव्यांचा वर्षाव चालवला होता. याचें एक मोठें कारण असें झालें कीं, सदहू ग्रंथांत वर्णनकर्त्यानें स्कॉट्लंड् देशाच्या वनश्रीचें वर्णन न करतां त्याच्या दृष्टीस सदरील देशाचा रखरखीतपणा जो आला तो त्यानें साऱ्या लोकांस उघडपणें जाहीर करून टाकला. आपल्या भूमातेची वरील निर्भर्त्सना केलेली 'ब्रिटिश भूमिके'च्या अभिमानी लेंकरांस कशी सहन होईल !

५. यापुढची प्रस्तुत ग्रंथकाराची कृति शेक्स्पीअर्ची नवीन आवृत्ति होय. या कवीचा वृत्तांत मिळवण्याविषयीं व त्याच्या नाटकांत जीं सहस्रावधि दुर्बोध स्थलें आहेत तीं सुगम करण्याविषयीं आजपर्यंत मोठमोठ्या पंडितांनीं पराकाष्ठेचा उद्योग केला आहे; पण त्यास सांगण्यासारखें अद्याप कांहीं यश आलें नाहीं. जॉन्सन्चे परिश्रम या सर्वांतील शेवटले होत. त्यानें प्रस्तुत काळाच्या पूर्वी सुमारें दहा वर्षे सदरील कवीच्या प्रीत्यर्थ उद्योग करण्याचें सर्वांस जाहीर[१] केलें होतें, व त्याप्रमाणें पुष्कळ लोकांच्या वर्गण्याही त्याच्याकडे येऊन कित्येक वर्षे पडल्या होत्या. पण मध्यंतरीं मागें सांगितलेल्या वर्षासनाचा प्रकार घडून आल्यामुळें जॉन्सन्नें वरील काम जें लांबणीवर टाकलें तें वर्षानुवर्षे लांबतच चाललें. त्याच्या मित्रांनीं त्यास वारंवार सूचना कराव्या, व त्यानेंही आपला आळस झाडून टाकण्याविषयीं वरचेवर मनोनिग्रह करावा; पण कांहीं नाहीं. सरतेशेवटीं तत्कालीन एका कवीनें त्यास खरमरीत मात्रेचा चटका जेव्हां दिला, तेव्हां जॉन्सन् खाड्दिशीं चांगला जागा होऊन त्याची आलस्यनिद्रा पार निघून गेली. हा कवि मागें तेराव्या अंकांत एके प्रसंगीं[२] सांगितलेला चर्चिल् होय[३]. याच्या तडाक्यानें इतकें कार्य झालें कीं, नऊ वर्षे जें काम तसेंच पडलें

---

१. १७५७ च्या नाताळापूर्वी ग्रंथ प्रसिद्ध होईल असें आश्वासन जॉन्सन्नें दिलें होतें. 'सम्पादक'

२. पृष्ठ १९१ टीप १ पाहा. 'सम्पादक'

३. वरील कवीचा दूषणापर काव्यरचना करण्यांत मोठा हातखंडा असे. प्रस्तुत प्रसंगींचा त्याचा कडाका येणेंप्रमाणें होता—

"He for subscribers baits his hook
And takes your cash; but where's the book?
No matter where; wise fear, you know,
Forbids the robbing of a foe;
But what, to serve our private ends,
Forbids the cheating of our friends?"

होतें तें लागलीच एका वर्षांत समाप्त झालें. असो; या ग्रंथाविषयीं विशेष सांगण्यासारखें कांहीं नाहीं. पूर्वीच्या टीकांहून हींत कांहीं कांहीं ठिकाणीं अधिक टिपा आहेत; व ह्मणण्यासारखी एक बरीच मोठी आरंभीं प्रस्तावना आहे. तींत वरील कवींवर कित्येक पंडित जे आक्षेप आणतात त्यांचें युक्तिपूर्वक निरसन असून त्याच्या गुणांचें यथार्थ व समर्पक वर्णन केलें आहे.

६. मागें एके ठिकाणीं [1] सांगण्यांत आलेंच आहे कीं, या वेळेस इंग्लंडांत राजकीय प्रकरणीं पुष्कळ गडबड चालली असून एक मोठी राज्यक्रांतीही झाली. ही राज्यक्रांति [2] तर जगत्प्रसिद्धच आहे. हिचा शतसांवत्सरिक महोत्सव गेल्या सालीं अमेरिकेंत गाजला. हा पूर्ण होऊन इंग्लंडास दुसऱ्या महाद्वीपांतील आपल्या वसाहतींवरचा कबजा आपशाच सोडून देणें जेव्हां भाग पडलें, व प्रथमतः केवळ अन्यायानें उपस्थित केलेली जी लढाई तिचा शेवट जेव्हां अत्यंत अपयशाचा झाला, तेव्हां एकंदर लोकांचीं मनें अत्यंत क्षुब्ध होऊन गेलीं. अशा संधीस कित्येक देशहितेच्छु ह्मणवणारे पुरुष लोकांस उत्तेजन देण्यास पुढें सरसावले; व त्यांनीं तर अशी दंगल करून दिली कीं, राज्यरूप तारूं येवढ्या तुफानांत कोणत्या खडकावर जाऊन आदळतें किंवा त्याचें काय होतें याचा कोणास कांहींच सुमार लागेना! अशा प्रसंगीं राजाच्या प्रधानांनीं जॉन्सन्चें साहाय्य घेऊन लोकपक्षाशीं टक्कर मारण्याचा विचार केला. जॉन्सन्चीं मतें लहानपणापासून राजपक्षाकडीलच होतीं, व त्यांतून आलीकडे कित्येक वर्षें राजवेतनावर तो स्वस्थ झाला होता; यास्तव वरील कामगिरी त्यानें मोठ्या आनंदानें पत्करली. अमेरिकेंतील बंडखोरांनीं आपली राजनिष्ठा झुगारून देऊन स्वतःच्या स्वातंत्र्याचा जाहिरनामा जेव्हां जगासमोर वाचून दाखवला; व राजाचें प्रजेशीं कोणतें कर्तव्यकर्म आहे तें त्यांत स्पष्टपणें बोलून दाखवलें; तेव्हां जॉन्सन्नें आपल्या राष्ट्राचा पक्ष उचलून वरील जाहिरनाम्यास उत्तर ह्मणून एक पत्रक प्रसिद्ध केलें. त्याप्रमाणेंच त्या वेळीं 'जूनियस्' [3] या सहीचीं पत्रें लिहिणारा कोणी नवाच उपस्थित झाला होता; त्याच्या खंडनार्थही जॉन्सन्नें कांहीं वेळ हातांत लेखणी धरली होती. याखेरीज आणखीही कांहीं लेख प्रस्तुतसारख्या प्रकरणीं त्यानें प्रसंगानुसार लिहिले आहेत, पण या विख्यात पंडिताचा राज्यविषयक विचारांकडे कधींही कल नसल्यामुळें व तशा संबंधाचा ऊहापोहही त्यानें कधीं केला नसल्यामुळें

---

१. पृष्ठ ७१२(ब)पाहा. २. स्वातंत्र्याचा जाहिरनामा (Declaration of American Independence) १७७६, इंग्लंडशीं अमेरिकेचें हें स्वातंत्र्ययुद्ध वीस वर्षें (१७६३–८३), चालू होतें. 'सम्पादक'

३. 'Junius' या सहीनें मोठी खळबळ उडवून सोडणारीं पत्रें (Public Advertiser) पब्लिक् अॅड्व्हर्टायझर् मध्यें १७६९ सालीं येत असत. कित्येकजण हीं पत्रें एड्मंड् बर्कचीं असावीं असें म्हणतात, तर दुसरे कांहीं ती सर् फिलिप् फ्रॅन्सिस्ची असावीं असें म्हणतात. निर्णायक पुरावा उपलब्ध नाहीं. 'सम्पादक'

वरील सर्व लेख अगदींच सरासरी आहेत. त्यांत युक्तीपेक्षां भाषासौंदर्य व आवेश हेच गुण विशेषतः आढळतात.

७. आतां एक मात्र ग्रंथ सांगायाचा राहिला. हा जॉन्सन्च्या ग्रंथांतील शेवटलें व अत्युत्तम जें 'कविचरित्र' तें होय. सन १७७७ सालीं लंडन् शहरांतील चाळीस मोठमोठे पुस्तकवाले एके ठिकाणीं जमून त्यांनीं विचार काढला कीं आजपर्यंत नामांकित ह्मणून जेवढे इंग्रेजी कवि झाले त्यांच्या काव्यांची एक नवी आवृत्ति काढावी. हा आपला विचार त्यांनीं जॉन्सन् यास कळवला व त्याच्याशीं असा ठराव केला कीं, प्रत्येक कवीस प्रस्तावनेदाखल असें लहानसें चरित्र त्यानें लिहून द्यावें. हा संकल्प मूळचा इतकाच होता कीं, प्रत्येक कवीचा वृत्तांत अगोदर संक्षेपतः देऊन नंतर त्याच्या प्रसिद्ध प्रसिद्ध ग्रंथांवर थोडीबहुत टीका दिलेली असावी. या कामागिरीबद्दल जॉन्सन् यास दोनशें पौंड (गिनी? सं०) देण्याची त्यांनीं कबुलायत केली. याप्रमाणें दोहों पक्षांचें संमत झाल्यावर प्रस्तुत ग्रंथकारानें आपल्या कामास हात घातला. या वेळेस त्याचें वय सुमारें सत्तर वर्षांचें होतें; तरी इतक्या वृद्धावस्थेंत असतांही त्याची शरीरप्रकृति इतकी सदृढ होती व मनाच्या सर्व शक्ति इतक्या तरतरीत होत्या कीं, ऐन पूर्ववयांत रचलेल्या ग्रंथांत व या शेवटल्यांत कोणत्याहि प्रकारें बिलकुल अंतर दृष्टीस पडत नाहीं. वृद्धत्वदशेंत पुष्कळांस कोणत्याही प्रकारची दगदग होईनाशी होते; स्मरणशक्तीचा तर लोप व्हावयाला लागून बुद्धिही बरोबर चालत नाहीं; आणि जीव दुःखानें व काळजीनें थकून गेला असल्यामुळें चित्त उल्हासयुक्त न राहून उदासपणानें व्याप्त झालेलें असतें. पण जॉन्सन्चे ठायीं वरील विकार एकही उद्भवला नव्हता. ग्रंथरचनेची त्याची जी पूर्वीची त्वरा असे तशाच रीतीनें त्यानें प्रस्तुत ग्रंथ लिहिला, व त्याची स्मृति तर अशी भड होती कीं, जागोजागचीं अवतरणें त्यानें पुस्तकावलोकन न करतां तशींच केवळ आठवणीवरून लिहिलीं. एरवीं असल्या उद्योगाला ह्मटलें ह्मणजे अगोदर पुष्कळ दिवस तयारी केली असून शिवाय पुस्तकसंग्रह चाळण्याकरतां सतत जवळ असणें अवश्य होय. पण सदरहू चरित्रकारास कसलीही गरज पडली नाहीं; कोशरचनेसारखा प्रचंड उद्योग जसा त्यानें एकट्यानें पार पाडला, त्याप्रमाणेंच, किंबहुना त्याहूनही सहज रीतीनें, इंग्रजी कवींचे जीवनवृत्तांत व त्यांच्या काव्यांचें विवेचन हीं त्यानें उडवून दिलीं. प्रस्तुत विषय त्याच्या नेहमींच्या परिपाठांतला व अत्यंत आवडता असल्यामुळें फक्त शब्दरचनेसच त्यास काय वेळ लागला असेल तो असेल; बाकी विवेचनाची पद्धति त्याजपाशीं अगोदर सिद्ध असल्यासारखीच होती. असो; तर अशा तऱ्हेनें प्रस्तुत चरित्रावलि सुमारें तीन चार वर्षांत समाप्त झाली. हींतील मजकूर मूळ संकल्पाहून पुष्कळ वाढल्यामुळें जॉन्सन् यास मूळच्या रकमेच्या इतका पैसा वरील पुस्तकवाल्यांनीं आणखी आपण होऊन पाठवून दिला.

सदरील ग्रंथ हा जॉन्सन्च्या साऱ्या ग्रंथांत शिरोभाग म्हणून धरला आहे; हें वर सांगण्यांत आलेंच आहे. याची भाषापद्धति त्याच्या इतर सर्व ग्रंथांहून साधी व सरळ आहे. याचें कारण यापूर्वीचीं वीस वर्षे त्याच्या हातची लेखणी सुटून तीं प्रायः संभाषण करण्यांत गेलीं हें होय. या वीस वर्षेभर इंग्लंडांत साऱ्या विद्वन्मंडळींत त्याचें प्रमुखत्व गाजलें होतें; व त्यांतून काव्यादि ग्रंथांवर तर त्याचीं जीं मतें होतीं तींच बहुतकरून पुष्कळांनीं उचललीं होतीं. तो स्वतः कवि होता, व गेल्या पन्नास साठ वर्षांची त्यास जातीनें उत्कृष्ट तऱ्हेची माहिती होती; यास्तव कविता-विषयावर यथास्थित विवरण करण्यास त्याच्या इतकी योग्यता त्या काळीं कोणाचेही ठायीं नव्हती. पोप, [1] स्विफ्ट् [2] वगैरे कवींशीं तो स्वतः समकालीन असल्यामुळें व त्याच्या मागल्या कवींविषयींचे लोकप्रवाद त्यास ऐकायाला सांपडले असल्यामुळें, गत

---

१. Alexander Pope (१६८८–१७४४). अगदीं लहानपणीं याची काव्य-प्रतिमा प्रगट झाली. फार हुशार विद्यार्थी नसला तरी ग्रीक् व लॅटिन् भाषांचें चांगलें ज्ञान त्यानें संपादिलें. त्याच्या कवित्वाबद्दल फारच मतभेद आहेत. तथापि Heroic Couplet नांवाचा नवीन काव्यप्रकार त्यानें योजला व पूर्णत्वाप्रत नेला. आयुष्यांतील अनुभव दर्शविणाऱ्या तीव्र, तेजस्वी, परिणामकारक व आटपशीर म्हणी बनविण्यांत याचा हातखंडा असून शेक्सपीअर्खेरीज दुसऱ्या कोणाचींहि अवतरणें याच्या-इतकीं उद्धृत करण्यांत येत नाहींत. अप्रतिम व हुबेहुब शब्दचित्रें काढण्यांत ड्रायडन्-खेरीज कोणीहि याचा हात धरूं शकणार नाहींत. हा फार चिडखोर व गर्विष्ठ असल्यानें याचीं सर्वांशीं भांडणें होत. त्यामुळें Lady Mary Wortly Montague सारख्यांच्या स्नेहास त्याला मुकावें लागलें Pastorals (1709), Essay on Criticism (1711), Rape of the Lock (1714), Windsor Forest and Temple Fame (1713), 'Dunciad' (1728), 'Essay on man' (1733), हे याचे ग्रंथ होत. शेवटचे दोन सर्वोत्कृष्ट व परिणामकारक आहेत. यानें इलियड् (१७१५–२०) व ऑडिसी (१७२५–२६) या ग्रंथांचींहि भाषांतरें केलीं आहेत. 'सम्पादक'

२. Jonathan Swift (1667–1745). अत्यंत दारिद्र्यांत याचें बालपण गेलें. चुलत्याच्या मदतीनें ट्रिनिटी कॉलेजांत शिक्षण घेतल्यावर सर् वुइल्यम् टेंपल्चा सेक्रेटरी झाला. पुढें राजकारणांत शिरण्याचा प्रयत्न फसल्यामुळें चर्चमध्यें शिरला व १७१३ सालीं याला Dean of St. Patrick's ची जागा मिळाली. पुनः राजकारणाच्या तंट्यांत घुसून वारंवार मतें बदलल्यामुळें त्याची लोकप्रियता नाहींशी झाली. पुढें त्यानें वाङ्मयास वाहून घेतलें व औपरोधिक कविता वगैरे लिहिल्या. Gulliver's Travels, A Tale of a Tub, The Battle of the Books हे याचे सर्वोत्कृष्ट ग्रंथ होत. याचें Stella ( Hester Johnson ) व Vanessa यांच्यावर व त्यांचें याच्यावर फार प्रेम होतें. स्टेलाशीं तर त्यानें गुप्त रीतीनें लग्नहि केल्याचें सांगतात.

'सम्पादक'

काळाची स्थिति त्यास पुरतेपणीं ठाऊक होती. शिवाय काव्य व चरित्ररचना हे दोन त्याचे आवडते विषय असून त्यांवर त्यानें पुष्कळ विचार केला होता. या सर्व गोष्टीं-मुळें प्रस्तुत ग्रंथ फार उत्कृष्ट तऱ्हेचा उतरला; व तेव्हांपासून अद्याप त्याची प्रसिद्धि निर्बाध चालत आली आहे. ड्रायडन् १ पोप वगैरे कवींच्या गुणदोषांचें विवेचन व

१. John Dryden (1631-1700). कवि, नाटककार व व्याजोक्तिपर औप-रोधिक लेखक. Westminster च्या शाळेंत व केंब्रिजच्या ट्रिनिटी कॉलेजांत शिक्षण झाल्यावर १६५७ सालीं हा लंडनला आला. कॉलेजांत असतां कांहीं साधारण दर्जाच्या कविता यानें लिहिल्या होत्या. रेस्टोरेशन्नंतर नाट्यलेखनाला जें अत्यंत घाणेरडें स्वरूप प्राप्त झालें, त्या वेळीं ड्रायडन्नेंहि नाटकांची टांकसाळ सुरू केली. हातीं घेतलेलें कोणतेंहि काम परिणामकारक रीतीनें करून दाखविण्याच्या त्याच्या नैसर्गिक गुणामुळें जरी नाट्यलेखन हें त्याच्या आवडीचें क्षेत्र नव्हतें तरी त्यानें आपल्या नाट-कांनीं खूप खळबळ उडवून दिली. पण तत्कालीन अनीतिप्रचेच्या चांगल्या गडद छटा त्याच्याहि नाटकांत दिसून येतात. The Wild Gallant (१६६३) हें त्याचें पहिलें नाटक पडलें. पण The Rival Ladies या दुसऱ्या नाटकानें त्याची नाट्यलेखक या नात्यानें कीर्ति प्रस्थापित झाली. The Indian Queen, Amboyna (1673), Aurang-zebe (औरंगजेब) 1675, All for Love (1678), Tyrranic Love (1669), Almanzar and Almahide हीं याचीं प्रमुख नाटकें होत. १६६५ च्या प्लेग-मध्यें लंडन् सोडून गेल्या वेळीं Annus Mirabilis हें उत्कृष्ट काव्य यानें लिहिलें व लंडनला परत आल्यावर प्रसिद्ध केलें. १६६८ सालीं त्याचा Essay on Dramatic Poetry हा संवादात्मक टीकापर गद्य निबंध प्रसिद्ध झाला. १६७० सालीं त्याला Poet Laureate करण्यांत येऊन सालीना तीनशें पौंडांचें पेन्शन देण्यांत आलें. १६७१ सालीं तत्कालीन नाटकांची टर उडविण्यासाठीं बकिंगहॅमनें Rehearsal लिहून तद्द्वारां ड्रायडनवर खूप जोराचा हल्ला चढविला. पण ड्रायडन्नें उत्तर देण्याचा उता-वळेपणा न करतां योग्य प्रसंगाची वाट पाहून १६८१ सालीं Absalom and Achitophel हें काव्य लिहिलें. त्यांत तत्कालीन सर्व प्रमुख व्यक्तींना भिन्न नांवांनीं आणून ड्रायडन्नें Rehearsal चें उट्टें काढलें. Mac Flecknoe हें ड्रायडन्च्या सुडाच्या भावनेचें फळ असून त्यांत त्यानें आपल्या साऱ्या प्रतिस्पर्ध्यांची रेवडी उडवून दिली आहे. रेव्होल्यूशन्च्या वेळीं त्याचें पेन्शन् वगैरे गेलें. त्याला दारिद्र्य आलें. Love Triumphant वगैरे नाटकेंहि त्यानें लिहिलीं, पण कांहीं जमेना. तथापि लवकरच भाषां-तरांच्या चलतीचा काल आला. Juvenal, Perseus वगैरेंच्या भाषांतराखेरीज त्यानें 'Virgil' हि १६९७ सालीं लिहिलें. चॉसर् व बोकॅशिओ यांच्या गोष्टींच्या आधारें त्यानें १७०० सालीं 'The Fables' हा ग्रंथ लिहून प्रसिद्ध केला. त्याच्या टीकेचे बाण इतके तीक्ष्ण असत कीं शत्रूच्या हृदयांतील रक्त बाहेर काढल्याखेरीज ते राहत

(पुढें चालू)

त्यांचें वृत्तान्तकथन वगैरे प्रकार यांत जसे आहेत तसे दुसऱ्या ठिकाणीं क्वचितच सांपडतील. कोठें कोठें मात्र राज्यप्रकरणीं मतभेदास्तव प्रस्तुत टीकाकाराची लेखणी बरीच कडक झाली आहे, व स्थलविशेषीं त्याच्या बुद्धिस्थैल्यास्तव त्यास रसानुभव यथास्थित न होऊन त्याचे अभिप्राय मार्मिक रसज्ञांस अत्यंत असंमत होण्यासारखे पडले आहेत. पण हा प्रकार थोडा असून एकंदर ग्रंथ सामान्य वाचकास व रसिकास अत्यंत प्रिय व मान्य होण्यासारखा आहे. [१]

८. वरील ग्रंथ सन १७८१ त संपूर्ण झाला. यापुढचा जॉन्सन्‌चा वृत्तान्त प्रायः दुःखमयच आहे. त्याच्या आयुष्याचीं यापुढें जीं तीन चार वर्षें उरलीं तीं इष्टमित्रांचें वियोगदुःख व वार्धक्यक्लेश हीं सहन करण्यांतच बहुधां गेलीं. त्याच्या मित्रमंडळापैकीं गोल्डस्मिथ्, गॅरिक् व आणखी कांहीं जण याच सुमारास मरण पावले व आपल्या घरांत, त्यानें कांहीं निराश्रित अशा स्त्रीमंडळीस कित्येक वर्षें जागा देऊन त्यांचें संगोपन केलें होतें त्यांपैकींही बहुतेक खपून त्याचें घर शुष्क होऊन गेलें. थ्रेल[२]

---

नसत. Satires त्यानें आपल्या नैसर्गिक आवडीनुसार लिहिल्यामुळें त्यांनीं त्याचें नांव अजरामर झालें आहे. पण केवळ खप व लोकांना आवड असल्यामुळें व्यापारी दृष्टीनें त्यानें खंडीमर नाटकें लिहिलीं असलीं तरी तीं त्याच्या कीर्तीस साजतीलशीं नाहींत. 'सम्पादक'

१. वरील ग्रंथाची योग्यता पुढील वाक्यांवरून नजरेस येणार आहे—

"The Lives of the Poets are, on the whole, the best of Johnson's works. The narratives are as entertaining as any novel. The remarks on life and on human nature are eminently shrewd and profound. The criticisms are often excellent, and, even when grossly and provokingly unjust, well deserve to be studied.

—Macaulay.

२. Henry Thrale. याचा बाप एका दारूच्या दुकानांत वीस वर्षें नोकर होता. त्याला दर आठवड्यांस सहा शिलिंग पगार मिळे. कारखान्याचा मालक वारल्यावर त्याला मुलगा नसल्यामुळें व मुलीचा नवरा सरदार, अर्थात् दारूचा कारखाना चालविणें त्यास अप्रतिष्ठादायक असल्यामुळें प्रामाणिक व हुशार थ्रेलला तो कारखाना त्यानें तीस हजार पौंडांस विकला. अकरा वर्षांत थ्रेलनें सर्व पैसे दिले. त्याची प्रतिष्ठा पुढें येवढी वाढली कीं, तो Southwark तर्फें पार्लमेंटांत निवडून आला. त्यानें आपल्या मुलांमुलींना उत्कृष्ट शिक्षण दिलें. हेन्रीला शाळेंत व ऑक्स्फोर्डच्या विद्यापीठांत उच्च कुलांतील सहाध्यायी लाभले. कॉलज सोडल्यावरहि हेन्रीला बापाकडून सालीना हजार पौंड मिळत. हेन्रीनेंहि बापाचाच धंदा उत्कृष्टपणें चालविला. त्यालाहि मुलगा नसल्यानें त्याच्या मृत्यूनंतर (४ एप्रिल १७८१) कारखाना विकला तेव्हां त्याची दीड लाख पौंड किंमत मिळाली. थ्रेलचें लग्न Miss Hesther Lynch

(पुढें चालू)

नांवाच्या एका श्रीमान् व संभावित गृहस्थानें जॉन्सन् यास पंधरा वर्षे आपल्या घरीं ठेवलें होतें; व त्याची आणि त्याच्या बायकोची आवडे ठायीं अतिशयित भक्ति पाहून प्रस्तुत ग्रंथकारही पहिल्या प्रतीचा निःस्पृह व फटिंग असतां त्यांच्या घरचा निरंतरचा पाहुणा होऊन इतके दिवस राहिला होता, पण तोही कालमजकुरीं मरण पावल्यामुळें जॉन्सन्नें आपल्या म्हातारपणाचीं इतकीं वर्षे ज्या स्थळीं सुखासमाधानानें काढलीं तें त्यास यापुढें लवकरच अंतरलें. तें असें कीं, घरधन्याचा दाब नाहींसा होऊन त्याची यजमानीण जेव्हां स्वतंत्र झाली, तेव्हां तिचें जॉन्सन्वरचें घरकरणी प्रेम तेव्हांच लयास गेलें; व तिची वृत्ति लवकरच चंचळ झाल्यामुळें तो तीस दुस्मानासारखा मानूं लागला. असा प्रकार दृष्टीस पडूं लागतांच जॉन्सन्नें आपलें बिऱ्हाड उचललें, व आपल्या उदासवाण्या घरांत आपले शेवटचे दिवस घालवण्यास तो तिकडे निघून गेला. तो जातांच थ्रेलबाई अगदीं निर्धास्त होऊन आपले मनोरथ तिनें पुरवून घेतले. एका इटाली देशांतल्या सारंग्यावर तिचें मन बसून लवकरच दोघांचा विवाह झाला. या कृत्यानें तिची लंडन् शहरांत अतिशयित छी थू होऊन तीस देशत्याग करावा लागला; पण ती आपल्या नव्या नवऱ्याच्या देशास जाऊन तेथें सुखरूप राहिली. हा सर्व वृत्तान्त कळण्यास जॉन्सन् वांचला नाहीं. तिचा लाजिरवाणा द्वितीय संबंध ऐकल्यापासून त्याचें मन तिजविषयीं अगदीं विटून गेलें होतें, व त्यानें तिचें नांवही सोडून दिलें होतें. असो; तर अशा स्थितींत प्रस्तुत पंडिताचे सरतेशेवटचे दिवस गेले. तो शेवटीं शेवटीं शरीरानें पुष्कळ स्थूल झाला होता; वास्तव स्थूलत्वाचें आनुषंगिक जें जलोदर त्यानें त्याचा शेवट केला. लंडनांतले त्या वेळचे अत्यंत नामांकित असे चार [1] वैद्य एक पैसा न घेतां त्यास उपचार करीत होते; व त्यांच्या अनुमतानें त्यानें आपल्या शरीरावर मोठे कठिण असे शस्त्रप्रयोगही मोठ्या धैर्यानें करून घेतले; पण त्यांपासून विशेष गुण आला नाहीं. सरतेशेवटीं सन १७८४ च्या अखेरीस [2] जॉन्सन्चें देहावसान झालें. त्याच्या मागें त्याच्या संबंधाची म्हटली म्हणजे एक सावत्र मुलगी मात्र होती. ही त्याच्या बायकोच्या पहिल्या संबंधाची होय. त्यानें आपली सर्व

---

Salusbury शीं झालें. हीं बाईहि चांगली सुशिक्षित होती. पण मि. थ्रेलच्या पुढें तिचें ज्ञान अर्थातच फिकें पडे. जॉन्सन्बद्दल Mr. Murphy नीं प्रशंसा केल्यावरून थ्रेल साहेबांनीं जॉन्सन्ला जेवावयास बोलावलें व त्या प्रसंगीं पति–पत्नी थ्रेल व जॉन्सन् हे परस्परांवर इतके खुष झाले कीं जॉन्सन्ला जेवणासाठीं सारखीं निमंत्रणावर निमंत्रणें येऊं लागलीं व अखेर त्यांच्याच वाड्यांत एक खोली जॉन्सन्ला राहण्यास देण्यांत आली. 'सम्पादक'

१. Dr. Heberden. Dr. Brocklesby, Dr. Warren, and Dr. Butter, व पांचवा शस्त्रवैद्य Mr. Cruikshank. 'सम्पादक'

२. सोमवार ता. १३ डिसेंबर सायंकाळीं सातच्या सुमारास. 'सम्पादक'

जिनगी व सुमारें पंधरा हजारांचा ऐवज आपल्या शिद्दी[1] चाकराच्या नांवें करून दिला. हा त्याच्या एका प्रिय मित्रानें त्यास नजर केला असल्यामुळें जॉन्सन्चा त्यावर पुष्कळ लोभ असे, व त्यानेंही आपल्या धन्याची पुष्कळ वर्षे एकनिष्ठपणानें चाकरी केली होती.

जॉन्सन्चा अंत्यविधि वेस्ट्मिन्स्टर् नांवाच्या विख्यात स्मशानभूमींत झाला. हें इंग्लंडांतील मोठमोठ्या नामांकित होऊन गेलेल्या पुरुषांचें कबरस्थान होय. या प्रसंगीं जॉन्सन्चें अवशिष्ट मित्रमंडळ व इतर कित्येक बडी बडी मंडळी जमा झाली होती. आलीकडे सेंट् पॉल् नामक विख्यात देवळाच्या घुमटाखालीं मोठ्या कीर्तिमान् पुरुषांचे पुतळे जे उभे केले आहेत त्यांत प्रस्तुत चरित्रनायकाची प्रतिमा अग्रस्थानीं स्थापली आहे. ज्यानें आपल्या देशभाषेची दैना फेडून तीस व्यवस्थित व सुसंबद्ध केली, व आपल्या चिरस्थायी ग्रंथांनीं तीस शोभा आणली; आणि आपल्या अनेक गुणांनीं व विशेषतः निर्मल आचरणानें जो स्वभूमीचें अभिमानस्थान होऊन साऱ्या जगास उदाहरणभूत झाला, त्या महापंडितास वरील मान अगदीं यथायोग्य मिळाला असें कोण सुज्ञ मनुष्य कबूल करणार नाहीं !

---

वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि ।
लोकोत्तराणां चेतांसि को हि विज्ञातुमर्हति ॥[2]

अंक ३९—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) जॉन्सन्चें शरीर. (३) पोषाखाचा वगैरे बेतबात. (४) विक्षिप्तपणाचे प्रकार व जडलेल्या खोडी. (५) स्वभाव. (६) दयालुत्व. (७) मानित्व. (८) सत्यप्रीति. (९) बुद्धिगुण. (१०) कल्पनाशक्ति. (११) तर्कशक्ति. (१२) उपसंहार.

१. मागील चार अंकांत जॉन्सन्च्या हयातीच्या अखेरपर्यंत झालेला वृत्तान्त

---

१. (Francis Barber) फ्रॅन्सिस् बार्बर याचा जन्म जमेकांत झाला. १७५० सालीं कर्नल् बॅथर्स्ट् (Bathurst) नें त्याला इंग्लंड्ला आणलें. या कर्नल्चा बाप डॉक्टर् असून जॉन्सन्च्या बापाचा स्नेही होता. कित्येक दिवस यॉर्कशायरमधील बार्टन् (Barton) येथील रेव्हरंड् जॅक्सन्च्या शाळेंत त्याला घातलें होतें. कर्नल्नें मृत्युकाळीं त्यास स्वतंत्रता दिली, व १७५२ पासून जॉन्सन्च्या मृत्यूपर्यंत तो जॉन्सन्चा नोकर होता. एकदां मांडण झाल्यामुळें व एकदां समुद्रपर्यटन करण्याची हुक्की आल्यामुळें असा दोन प्रसंगीं थोडाथोडा खंड पडला. एरव्हीं सर्व काळ त्यानें जॉन्सन्ची फार प्रामाणिकपणें सेवा केली व जॉन्सन्चेंहि त्याच्यावर फार प्रेम असे.

'सम्पादक'

२. "वज्राहूनहि कठोर व फुलाहूनहि कोमल अशीं जीं लोकोत्तर पुरुषांचीं अंतःकरणें त्यांचा ठाव कोणास लागला आहे ?" 'सम्पादक'

सगळा सांगितला. आतां यांत त्याच्या स्वभावाचें एकंदर वर्णन करूं म्हणजे तो कोणत्या तऱ्हेचा मनुष्य होता, त्याची चालचर्या कशी असे, त्याचे मनोधर्म कसकसे होते, वगैरेंविषयीं सामान्यतः निरूपण करतों.

२. प्रथमतः शरीरवर्णन. यापूर्वी अनेक ठिकाणीं सांगण्यांत आलेंच आहे कीं, जॉन्सन् हा शरीरानें मला दांडगा होता. त्याचा बांधा ठेंगणाच पण चांगला खंबीर होता. ही शरीरसंपत्ति त्यानें आपल्या कमाईनें मिळवलेली ह्मणजे तालीम, कसरत वगैरे करून संपादली होती असें नाहीं; तर कुलपरंपरेनेंच ती चालत आली होती. त्याचा बाप त्याच्यासारखाच बळकट होता, व चुलता तर एका आखाड्याचा वस्ताद होता. शरीराची ठेवण पाहिली तर ती जॉन्सन्ची मोठी दबदार होती असें नाहीं. पोट मोठें असून पुढीस वयांत तर तें पुष्कळच सुटलें होतें; व पाय बांकदार असून ते एकंदर शरीराच्या अवजडपणामुळें चालतांना डळमळत. त्याचा चेहरा लहानपणीं बराच सुरेख होता. पण पुढें शस्त्रक्रियेचा त्यावर प्रयोग झाल्याकारणानें व एका डोळ्याची दृष्टि अधु झाल्यामुळें तो पुढील वयांत विरूप दिसत असे. तरी त्याची मुखश्री जात्या भव्य असल्यामुळें विद्येच्या तेजानें व अंगच्या हुशारीमुळें तीस विशेष शोभा येई.

३. पोषाखाच्या टापटिपीकडे वगैरे जॉन्सन्चें बिलकुल लक्ष नसे. त्यास डामडौलाचा व नोकझोकाचा नेहेमी तिरस्कार वाटत असल्यामुळें लत्ताकपडा वगैरे जसा असेल तसा त्यास खपत असे. घरचा एरवींचा वेतव्रातही त्याचा वरील तऱ्हेचाच होता. हल्लीं इंग्रेज लोकांत सामानसुमानाचा वगैरे साऱ्या घरभर जसा थाट दृष्टीस पडतो, तसें त्याचें नसून केवळ निर्वाहाच्या वस्तूंचेंच तो अगत्य बाळगीत असे. त्यास सरकारांतून जें नियमित वेतन मिळत असे तें त्याच्यासारख्या एकट्या एक मनुष्यास अगदीं जरी रगाडीचें होतें, तरी रिकाम्या छानछुकींत किंवा ऐषआरामांत त्यानें कधींही त्याचा व्यय केला नाहीं. हा व्यय कशांत होत असे याविषयीं यापूर्वी थोडासा उल्लेख केलाच आहे, व तो पुढें विशेषतः करायाचाच आहे. तर याप्रमाणें जॉन्सन्चें वर्तन एकंदरींत पाहतां पुरातन काळच्या तत्त्वज्ञाप्रमाणें असे. ह्मणजे तें स्वभावतःच निरिच्छ असून जें यदृच्छेनें मिळेल त्यावर कालक्रमणा करून जसे नित्यसंतुष्ट असत तसाच प्रस्तुत महापंडित असे.

४. जॉन्सन् हा स्वभावतःच स्वच्छंदी होता, व तो वयांत आल्यापासून तर एकटा स्वतंत्रतेनें राहून त्याच्या डोईवर कोणीही नव्हतें, यामुळें त्याचा स्वभाव तऱ्हेवाईक होऊन त्यास कित्येक विलक्षण संवयी व खोडी लागून राहिल्या होत्या. त्या सर्वांचा येथें उल्लेख करणें हें कित्येकांस कदाचित् बरोबर वाटणार नाहीं; कां कीं मोठ्या मनुष्यांच्या बारीकसारीक गोष्टी प्रगट करणें बरोबर नाहीं व त्यापासून कांहीं उपयोगही नाहीं असें कोणास वाटण्याचा संभव आहे. तसेंच थोरांच्या चरित्रश्रवणापासून जो लाभ व्हावयाचा तो क्षुल्लक गोष्टींनीं नष्ट होऊन त्यांजवरची पूज्यबुद्धि

उद्भून जाते असेंही सकृद्दर्शनीं वाटण्यासारखें आहे. पण या सर्व समजुती खोट्या आहेत. एक तर चरित्र म्हटलें म्हणजे त्यांत तद्विषयभूत मनुष्याच्या संबंधाची साऱ्या प्रकारची माहिती आली पाहिजे. ज्या गोष्टींनीं त्याचा गौरव होतो त्यांचा उल्लेख जसा अवश्य होय, तसेंच ज्येणेंकरून त्यास हीनत्व येईल तेंही निःपक्षपातपणानें सांगणें जरूर आहे. शिवाय ज्या अर्थी कोणीही मनुष्य सर्वगुणसंपन्न व सर्वदोषविवर्जित असा नाहीं, त्या अर्थी कोणी केवढाही मोठा विख्यात असला तरी त्याच्या दोषनिरूपणानें त्याची वास्तविक कीर्ति यथार्थज्ञांच्या दृष्टीनें तरी कमी खास होणार नाहीं. तर हें ध्यानांत ठेवून प्रस्तुत ग्रंथकाराच्या संबंधाच्या ज्या गोष्टी यापुढें येणार त्या वाचकांनीं वाचाव्या.

मागें एके ठिकाणीं [1] सांगण्यांत आलेंच आहे कीं, जॉन्सन् यास एक चमत्कारिक मेंदूचा [2] रोग जडला होता. हा त्याच्या कुळांत परंपरेनें चालत आलेला होता. याच्या योगानें त्याची वृत्ति नेहमीं उदासीन होत असे. कोणत्याही गोष्टीविषयीं उल्हास न वाटून त्याचें चित्त इतकें उद्विग्न होत असे कीं, त्यास जिवाचा देखील कंटाळा येई. या मज्जारोगाच्या [3] योगानेंच त्याचा स्वभाव पराकाष्ठेचा त्रासिक झाला होता, व त्यास भ्रमिष्टपणा जडला होता. या भ्रमिष्टपणाचे अनेक प्रकार बॉस्वेल्नें लिहून ठेवले आहेत, त्यांपैकीं कांहीं सांगतों. अर्धांगवायूनें पीडलेल्या मनुष्याचे शरीरावयव जसे आपोआप हालत असतात, त्याप्रमाणें जॉन्सनचें डोकें लटलटां कांपत असे; व हातापायांचे चाळे चालू असत. ही हालचाल त्याच्यानें बंद करवत नसे. भर मंडळींत त्यानें कधीं कधीं देहभान न राहून कवितेचे चुटके मोठ्यानें म्हणावे; व एकटा असला म्हणजे तर घटका घटका आपणाशींच मोठ्यानें बोलत उभें राहावें. रस्त्यानें चालत असतां बाजूच्या खांबांस हात लावीत गेल्याखेरीज त्यास चैन पडूं नये; व एखादा खांब चुकलासा जर त्यास वाटला, तर त्यानें पुनः माघारीं येऊन पुनः एकवार तो विधि यथासांग करावा. साहेबलोकांच्या जेवणांत टेबलावर फळफळा-

---

१. पृष्ठ ६८२ ओळ २०–२१ व (अ) १–२ पाहा. 'सम्पादक'

२. या रोगास Dr. Cheyne यानें 'The English Malady' असें नांव दिलें आहे. 'सम्पादक'

३. Hypochondria = रोग नसून तो झाला आहे अशी समजूत (असा भ्रम). भ्रमिष्टपणा व वेड यांतील फरक Prince of Orangeचा वैद्य Gaubius of Layden खालीलप्रमाणें करतो:—" If a man tells me that he is grievously disturbed, for that he *imagine* he sees a ruffian coming against him wilh a drawn sword, though at the same time he is *conscious* it is a delusion, I pronounce him to have a disordered imagination; bnt if a man tells me that he *sees* this, and in consternation calls to me to look at it, I pronounce him to be *mad*." 'सम्पादक'

चळही ठेवली असे. हिच्यापेक्षां नारिंगावर जेव्हां पाळी येई, तेव्हां जॉन्सन्‌नें त्याची सोललेली सालपटें फेंकून न देतां मोठ्या दक्षतेनें आपल्या अंगरख्याच्या खिशांत तीं सांठवून ठेवावीं. यांचा विनियोग पुढें काय होत असे तो समजण्यांत आला नाहीं!

वरील उदाहरणांवरून जॉन्सन्‌च्या भ्रमिष्टपणाची वाचकांस बरीच कल्पना होईल. जॉन्सन्‌ यासही आपल्या व्यथेचा होतां होतां काय परिणाम होईल याचा नेहेमी धाक असे. हा त्याचा रोग कधीं कधीं अतिशय बळावे, व कधीं कधीं बहुतेक नाहींसा झाल्यासारखाही होई. जेव्हां तो प्रबळ होई तेव्हांची त्याची विपत्ति कांहीं पुसूं नये! इंद्रियज्ञानासही अशा वेळीं विकार पोंचे. त्याची आई घरीं कित्येक कोस दूर असतां ती आपणांस हांक मारीत आहे असें त्यास स्पष्ट ऐकूं यावें. रस्त्यांतील घड्याळापुढें घटका घटका उभें राहिलें असतांही किती वाजले याचा त्यास निश्चय करतां येऊं नये. पण या सर्वांहूनही दुःखाची गोष्ट ही की, ही भ्रमावस्था स्थाईक होऊन मुळींच बुद्धिभ्रंश आपला होईल की काय याची त्यास अतिशयित भीति वाटे. पण त्याच्या व एकंदर लोकांच्या भाग्यास्तव या कडेलोटावर केव्हांही गोष्ट येऊन ठेपली नाहीं.[1]

वरील व्याधीपासूनच विरळपणा व आळस हे गुणही प्रस्तुत ग्रंथकाराच्या ठायीं बळवत्तर झाले. ते असे कीं, तो मूळचा निःस्पृह व अभिमानी होताच; व वेळ आल्यास कोणाचीही पर्वा ठेवीत नसे. त्यांतून वरील पीडा ज्या अर्थी त्यास बहुधा नेहेमी जडली असेच, त्या अर्थी व्यथित मनुष्याचें जसें होतें त्याप्रमाणें त्याचा मूळचा स्वभाव तिच्या योगानें दुणावला हें उघडच आहे. याशिवाय जॉन्सन्‌चें पूर्व वय हलक्या प्रतीच्या लोकांत गेलें असल्यामुळें बड्या मंडळींत जे सभ्यपणाचे प्रकार असतात,—म्हणजे राग आला तरी तो कळूं न देणें, कोणी अपमान केला असतां त्याचा प्रतिकार उघडपणें एकदम न करतां समय पाहून हांसत हांसत आपल्या प्रतिपक्ष्याचे दांत पाडणें,—वगैरेही तो बिलकुल जाणत नसे. त्याचा जबाब नेहेमी ज्या वेळचा त्या वेळेस रोकडा दिलेला असे. कधीं कधीं तर अत्यंत परिचित मित्रांवरही तो संतापे, व त्यांस टाकून बोले. बॉस्वेल्‌च्या 'चरित्र' भर जॉन्सन्‌च्या कडक तऱ्हेतीचीं उदाहरणें आहेत, व खुद्द दोघांचींही रुसणीं फुगणीं अनेक वेळां झालीं आहेत. असो; वरील मनोविकृतीचा दुसरा परिणाम जॉन्सन्‌चा सुस्तपणा होय. हा गुणही त्याच्या

१. हा जो वर मज्जारोग सांगितला आहे हा प्राच्य राष्ट्रांत किवपत आहे किंवा मुळींच नाहीं याविषयीं कांहीं माहिती नाहीं. इंग्लंडच्या सर्द व कुंद हवेनें जर तो उत्पन्न होत असेल तर इकडे तो मुळींच नसण्याचाही संभव आहे. इंग्रजी कवींपैकीं पुष्कळांस वरील विकाराची बाधा होती. असो; जॉन्सन्‌नें एकदां तर असें खुद्द कोणापाशीं म्हटलें कीं, मी सार्‍या जन्मभर वेडाच होतों, या विकाराचें वर्णन प्रस्तुत ग्रंथकारानें आपल्या 'रासेलस'तील ज्योतिष्याच्या द्वारें सविस्तर केलें आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस आठवेलच.

अंगीं जात्या असून तो वरच्याप्रमाणेंच वरील विकाराच्या योगानें दृढतर झाला. दुखणाईत मनुष्यास जसा कामाचा कंटाळा येतो व स्वस्थ पडून राहावेंसें वाटतें, त्याप्रमाणेंच त्यास निरंतर होई. पण जवळ पैसा ना अडका, व उपासमार पडण्याची पाळी; तेव्हां झक मारीत त्यास जागचें उठून नित्यनिर्वाहाची कांहीं तरी तजवीज पाहावी लागे. असें होतां होतां राजाकडून प्रस्तुत विख्यात ग्रंथकारास जेव्हां एकदांचें पेन्शन् झालें, तेव्हां त्याचा नित्याचा घोर नाहींसा होऊन त्याची स्वभाववृत्ति अत्यंत प्रबळ झाली. मग काय ! बोवांनीं सकाळीं लवकर लवकर ह्मणजे केव्हां निजून उठावें ?–बारावर दोन वाजतां [1] ! ! मग दोहोंच्या पुढें मुखमार्जनादि विधि व भोजन

---

१. इंग्रज लोकांत निजून उठण्याची मर्यादा कोठपर्यंत आहे याची कल्पना वरील उल्लेखावरून होणारी आहे. जॉन्सन्‌चाच समकालीन प्रख्यात कवि टॉम्सन् × यानें आपल्या 'ऋतुवर्णनां'त एके ठिकाणीं लिहिलें आहे—

"Falsely luxurious, will not man awake,
And springing from the bed of sloth enjoy
The cool, the fragrant and the silent hour.
To meditation due and sacred song ?
For is there aught in sleep can charm the wise ?
To lie in dead oblivion, losing half
The fleeting moments of too short a life;
Total extinction of the enlightened soul,
Or else to feverish vanity alive,
" Wildered, and tossing through distempered dreams!
Who would in such a gloomy state remain
Longer than Nature craves; when every Muse
And every blooming pleasure wait without.
To bless the wildly—levious morning walk ? "

*Summer*,

पण प्रभातदेवतेची येवढी खुशामत करणारे कविमहाराज स्वतः बिछान्यावरून केव्हां हालत येवढी मात्र कोणीं विचारपूस करूं नये ! यांची पहाट टळटळीत दोन प्रहर झाले ह्मणजे होई ! 'निरंकुशः कवयः' दुसरें काय ह्मणायाचें आहे !

× James Thomson ( 1700–1748 ) हा स्कॉट्लंडशायरमधील एड्नम्‌चा राहिवाशी. १७२५ सालीं लंडन्‌ला आला. व १७२६ सालीं 'The Seasons' या विख्यात कवितेचा 'Winter' हा भाग यानें प्रसिद्ध केला. लागोपाठ 'Summer', 'Spring' व 'Autumn' हेही भाग प्रसिद्ध झाले. व त्याची कीर्ति पसरूं लागली. त्याला सालीना शंभर पौंड पेन्शन् मिळे व लीवर्ड बेटांचा सर्व्हेअर जनरल् या नात्यानें सालीना तीनशें पौंड मिळत, मात्र ही सर्व्हेअर जनरल्‌ची नोकरी प्रतिनिधिद्वारां तो करीत असे. 'The Castle of Indolence' 'Liberty' 'Alfred' ह्या त्याच्या आणखी कविता असून 'Alfred' मध्येंच 'Rule Britannia' राष्ट्रगीत आलें आहे. –'सम्पादक'

रात्रीचा प्रकार याच मासल्याचा. एकदां बें बाहेर पडावें, तें फीर फीर सगळ्या रात्रभर रस्त्यांतून फिरत असावें; एकादा मित्र घरीं आला असला, तर त्या गप्पा चालाव्या त्या रात्र उजाडेपर्यंत; किंवा वाचण्याची अथवा लिहिण्याची लहर लागली तरी रात्रची रात्र उलटून जावी!

५. जॉन्सन्च्या स्वभावास त्याच्या स्थितिविशेषाच्या योगानें जो तऱ्हेवाईकपणा जडला होता, त्याचे कांहीं प्रकार वर सांगितले. त्यांवरूनच केवळ पाहतां कोणासही सकृद्दर्शनीं असें वाटणार आहे कीं तो कोणी वेडगळ, छांदिष्ट व तुसडा असा मनुष्य होता. हीच समजूत जॉन्सन्च्या ह्यातींत पुष्कळ जणांची होती. त्याची अचाट बुद्धि सर्वांस कबूल करावी लागेच, पण वरील समजूत बहुधां सर्वांची दृढ होऊन गेली असल्यामुळें त्याच्या नेहेमीच्या मित्रमंडळीखेरीज फारच थोडे त्यास चाहते असत. बॉस्वेलनें जें येवढें सविस्तर चरित्र लिहिलें त्याचा मुख्य हेतु हाच होता कीं, आपल्या मित्राच्या व गुरूच्या स्वभावाविषयीं लोकांत ज्या विलक्षण समजुती पहिल्यापासून पडून गेल्या आहेत त्या नाहींशा व्हाव्या. हा हेतु त्यानें कितपत सिद्धीस नेला आहे याविषयीं त्याचा ग्रंथ वाचला असतां तेव्हांच खात्री होणार आहे. असो; आतां या स्वभावाविषयीं कांहीं निरूपण करून नंतर जॉन्सन्च्या बुद्धिगुणांविषयीं वगैरे लिहूं.

६. मनुष्यस्वभावाचें अवलोकन ज्यानें उगीच वरवर केलें असेल त्याच्याही लक्षांत ही गोष्ट आल्याशिवाय राहणार नाहीं कीं, मनुष्याचें बाह्य व अंतर्गत स्वरूप हीं पुष्कळदां अगदीं भिन्नभिन्न असतात. कांहीं मनुष्यें दिसायास उग्र असून आंत फारच कोमल असतात; व कांहीं बोलणारे मोठे मिठ्ठ असून त्यांची कृति अगदीं निराळी किंबहुना विपरीतही असते. जॉन्सन्चा प्रकार यांपैकीं पहिला होता. त्याची मुद्रा व आचरण हीं इतकीं विलक्षण असत कीं, त्याच्या अत्यंत जिवलग मित्रांसही त्याशीं कमीज्यास्त बोलण्याचें भय वाटत असे. त्याची वृत्ति किती तापट असे व तो केवढा निःस्पृह वक्ता होता, याविषयीं पूर्वी जे उल्लेख केले आहेत त्यावरून वरील गोष्टींची प्रचीति सहज येईल; पण असें असून त्याचें अंतःकरण किती कोंवळें होतें याचे दाखले त्याच्या चरित्रांतून शेंकडों आहेत. त्याची आपल्या आईबापांवर भक्ति, बायकोविषयीं प्रेम, मित्रांचे ठिकाणीं स्नेहपूर्वक निष्ठा, आश्रित व सेवक यांविषयीं आदर, प्राणिमात्रांविषयीं भूतदया, वगैरेंची उदाहरणें दाखल केलीं असतां निराळा ग्रंथच होईल. यास्तव वरील निरानिराळ्या वृत्तींचें केवळ संक्षेपतः येथें निरूपण करतों. जॉन्सन्चा बाप त्याच्या पूर्ववयांतच वारला, पण त्याची आई पुष्कळ वयातीत होऊन तो प्रौढ वयाचा झाल्यावर मरण पावली हें मागें[1] कळवलें आहे. हिजविषयीं जॉन्सन्ची भक्ति किती होती हें मागील चरित्रावरून व विशेषतः 'रासेलस्'

१ पृष्ठ ७११ पाहा. 'सम्पादक'

या ग्रंथाच्या रचनाप्रसंगावरून वाचकांच्या ध्यानांत आलेंच असेल. शिवाय त्याच्या ग्रंथांतही कोठें कोठें हीच वृत्ति प्रगट झालेली आढळते [1] आपल्या स्त्रीविषयीं तर जॉन्सन्चें इतकें प्रेम होतें कीं, तिच्या मरणानें त्यास अतोनात दुःख होऊन तें शेवटपर्यंत बुजून गेलें नाहीं. त्याला विवाहित स्थितीचा संस्कार काय तो सात आठ वर्षें घडला, व पुढें तीस बत्तीस वर्षें त्यानें विधुरावस्थेंत घालवलीं, तरी त्याच्या अंतःकरणांत त्याच्या प्रियकर स्त्रीची मूर्ति इतकी दृढ बसून गेली होती कीं, शेवटपर्यंत तिच्या स्मरणानें तो सद्गदित होत असे. तिचा मरणदिवस व्रताप्रमाणें पाळून तो त्या दिवशीं उपोषण करी; व वारंवार तिच्या नांवानें तो प्रार्थना करीत असे. मित्रांचीही गोष्ट अशीच. ज्यांचा त्याच्याशीं एकदां स्नेह जडला त्यांजवरचें त्याचें प्रेम कधींही उतरलें नाहीं. हरएक तऱ्हेनें तो त्यांच्या उपयोगी पडत असे. संकटसमयीं त्यांच्या साह्यार्थ धांवणें, त्यांस सदुपदेश करणें, त्यांच्या तर्फेनें शिफारशी लावणें, त्यांस कोणी नांव ठेवलें असतां त्यांचा कैवार घेणें, हा क्रम त्याचा सतत चाललेला असे. प्रसंगवशात् त्याचें यांशीं भांडणही होई, पण लवकरच पुनः दोघांचें (चा ? सं०) समेट बनून येई. हा जॉन्सन्चा स्नेह परंपरासंबंधानें पुढेंही चालत असे. म्हणजे त्याच्या स्नेह्यांचा आप्तवर्ग, चाकरमाणसें यांजवरही त्याचा लोभ जडे. मागील अंकाच्या शेवटीं [2] सांगितलेला शिद्दी चाकर, ज्याच्या नांवानें जॉन्सन्नें शेवटीं मृत्युपत्र करून ठेवलें व आपला सर्व ऐवज ज्याच्या नांवें करून दिला, तो अशा परंपरासंबंधाचाच होता. जॉन्सन्चा एक मित्र [3] अमेरिकेंत

---

१. पोप कवीची आई जॉन्सन्च्या आईसारखीच फार उतार वयाची होऊन मरण पावली; व पोपचाही जॉन्सन्प्रमाणेंच तिजवर लोभ असे. हिजविषयीं वरील कवीच्या चरित्रांत ग्रंथकार लिहितो—

In the next year he lost his mother, not by an unexpected death, for she lasted to the age of ninety-three; but she did not die unlamented. The filial piety of Pope was in the highest degree amiable and exemplary, his parents had the happiness of living till he was at the summit of poetical reputation, till he was at ease in his fortune, and without a rival in his fame, and found no diminution of his respect or tenderness. Whatever was his pride, to them he was obedient; and whatever was his irritability, to them he was gentle. Life has, among its soothing and quiet comforts, few things better to give than such a son.

२. पृष्ठ ७३१ पाहा. 'सम्पादक'

३. वस्तुतः जॉन्सन्च्या मित्राचा बाप कर्नल् बॅथर्स्ट (Bathurst) यानें मृत्युसमयीं केलेल्या मृत्युपत्रांत फ्रॅन्सिस् बार्बरला गुलामगिरींतून मुक्त केलें, व त्याचा मुलगा अर्थात् जॉन्सन्चा स्नेही डॉ. रिचर्ड् बॅथर्स्ट यानें त्याला जॉन्सन्कडे नौकरी पत्करण्यास परवानगी दिली. 'सम्पादक'

पुष्कळ दिवस जाऊन राहिला होता व तेथें असतां वरील शिद्दी चाकरास त्यानें आपणापाशीं बाळगलें होतें. पुढें स्वदेशास परत आल्यावर आपल्या मित्रास त्यानें तो चाकर नजर केला. त्यास या नव्या धन्यानें ख्रिस्ती धर्माची दीक्षा देऊन त्याच्या विद्याभ्यासाकडेही तो लक्ष पुरवीत असे. याप्रमाणेंच आणखीही कित्येक मनुष्यांस जॉन्सन्नें आपल्या घरांत आश्रय दिला होता; व सामान्यतः कोणीही दुःखित व दीन असा त्याच्या दृष्टीस पडला असतां त्याच्यावर तो दया करीत असे. सारांश, थोर पुरुषांस अत्यंत शोभादायक जें दयाशीलत्व, जें ख्रिस्ती धर्माचें अनुषंगि म्हणून त्याचा महिमा जिकडे तिकडे ऐकूं येतो, तें प्रस्तुत पंडिताचे ठायीं पूर्ण नांदत असे.

७. वर जो गुण सांगितला त्याचें व मानित्वाचें साहचर्य हें कित्येकांस सकृद्दर्शनीं विचित्र वाटेल; पण पहिल्याप्रमाणेंच हा दुसराही गुण म्हणजे मानीपणा जॉन्सन्चे ठायीं पूर्ण होता. मानी पुरुषाचें लक्षण हें आहे कीं, त्यास दुसऱ्यानें केलेली अवज्ञा व दुसऱ्यापुढें माकायाचें दैन्य, हीं दोन्ही लवमात्रही सहन होत नसतात. पहिल्याचा प्रतिकार केल्याखेरीज तो कधींही राहत नाहीं; व दुसरा प्रसंग येण्यापेक्षां मरण बरें असें त्यास वाटत असतें. जॉन्सन्च्या वर्तनांत वरील दोन्ही गोष्टी कितपत दृष्टीस पडत याचें चांगलें उदाहरण [1] गेल्या अंकांत 'महदाख्यायिका' या सदराखालीं दिलेलें आहे, तें वाचकांस स्मरत असेलच. त्यावरून सहज ध्यानांत येईल कीं, कोणी आपण होऊन त्यास व कोणासही नकळत देणगी दिलेली जर त्यास खपली नाहीं व तिचा त्यानें इतका धिक्कार केला, तर स्वतः याचना करण्याचें तर त्याच्या केवढें जिवावर येत असेल! बापाच्या मरणानंतर याच्या अंगावर जेव्हां संसार पडला व स्वतःची व आपल्या कुटुंबांतील माणसांची तजवीज करणें हें जेव्हां याच्याकडे आलें, तेव्हां त्यानें जे निश्चय केले ते त्याच्या रोजनिशीवरून कळून येतात. ते हे होते कीं, कोणापाशींही दैन्य न दाखवतां स्वतःच्या हिंमतीवर पैसा कमवायाचा; दारिद्र्याच्या योगानें मन निरुत्साह व दुर्बळ होऊं द्यावयाचें नाहीं; व उदरनिर्वाहार्थ कोणतेंही दुराचरण करायाचें नाहीं. अगदीं पूर्ववयांत जॉन्सन्नें वरील संकल्प दृढ

---

१. जॉन्सन्च्या अट्टीवाजपणाची ही आख्यायिका अशी आहेः—

जॉन्सन् घरचा गरीब व केवळ दुसऱ्याच्या आश्रयानें विद्यालयाचा संसर्ग त्यास लागलेला. यास्तव श्रीमंत पोराप्रमाणें त्यास तेथें चंगळ उडवायाला सांपडत नसे हें उघड आहे. हें तर काय पण त्याचा सहाध्यायी त्यास सोडून गेल्यावर त्यास, कित्येक महिने इतकी विपत्ति काढावी लागली कीं, वस्त्रपात्रादिकांचीही त्यास कमताई पडूं लागली. एके समयीं त्याचा जोडा अगदीं फाटून गेलेला पाहून कोणीं त्याच्या दाराशीं एक नवा कोरा आणून ठेवला. ही कोणीं आपणावर नकळत मेहेरबानी केलेलीही जॉन्सन्ला खपली नाहीं. त्यानें खाड्दिशीं तो नवा बूट लायेनें दूर झुगारून दिला, आणि तसाच पुढें चालता झाला. 'सम्पादक'

करून ठेवले हें व त्याच्या हिंमतीचें व सात्त्विकपणाचें अगोदर थोडें प्रमाण आहे असें नाहीं; व वरील स्वकृत मर्यादा त्यानें शेवटपर्यंत लवमात्रही उल्लंघिल्या नाहींत, यावरून त्याच्या अंगीं धैर्य कितपत वसत होतें व प्रस्तुत गुण जो अभिमान तो कसा जागृत होता हें सहज ध्यानांत येणारें आहे. वस्तुत: पाहतां प्रस्तुत ग्रंथकारास शेवटपर्यंत लोकाधिकार तर कधींच नव्हता, व पैशाच्या संबंधानें पाहिलें तर त्याचें निम्में अधिक वय दरिद्रांतच गेलें; तरी इतर सामान्य मनुष्य लोकावशेनें जसे खचून जातात तसा हा कधींही गेला नाहीं. त्याचा व लॉर्ड् चेस्टर्फील्ड् याचा जो प्रसंग झाला तो पूर्वी[1] सविस्तर सांगण्यांत आलाच आहे; व तसेंच थ्रेलबाईची वृत्ति बावरून तिच्या घरीं इत:पर आपला बोज राहणार नाहीं हें समजतांच त्यानें तेथून आपलें बिऱ्हाड उचललें व अंतसमय जवळ येऊन ठेपला असतांही आपल्या ओसाडवाण्या घराची वाट धरली, हेंही मागें[2] सांगण्यांत आलेंच आहे: याच वृत्तीची उदाहरणें त्याच्या 'चरित्रां'त व ग्रंथांतही पुष्कळ आहेत.[3]

८. जॉन्सन्चा दुसरा एक मोठा गुण झटला म्हणजे सत्यप्रीति हा होय. त्यास सत्य हें स्वभावत:च आवडत असे, व खोटें बोलणें, लफंगेपणा करणें याचा त्यास तसाच अतिशयित तिरस्कार वाटे, 'चित्ते वाचि क्रियायां च महतामेकरूपता' हें महाजनांचें लक्षण त्यावर पूर्ण लागू पडतें. त्याच्या अगदीं बारीक सारीक भाषणापर्यंतही त्याच्या अनेक चरित्रकारांनीं वृत्तांत लिहून ठेवला आहे, पण वरील वाक्यास जेणेंकरून विरोध येईल असें त्या सर्वांत एक अक्षरही सांपडायाचें नाहीं. जसें त्यास वाटे त्याप्रमाणेंच तो बोलून दाखवी; व जें बोलून दाखवी त्याप्रमाणेंच त्याचें आचरण असे.[4] हा तिहीं प्रकारचा मेळ

---

१. पृष्ठ ७००–७०३ पाहा. २. पृष्ठ ७३० पाहा. 'सम्पादक'

३. वरच्यांपैकीं एक उदाहरण 'रँब्लर्'च्या शेवटीं आहे. शेवटल्या म्हणजे २०८ व्या निबंधांत निबंधकारानें पुस्तक समाप्त करून एकंदर लोकांवर कडाका उडवून दिला आहे. प्रथमत: अवतरणच पुढील बाण्याचें आहे—

" Begone, ye blockheads! Heraclitus § cries,
And leave my labours to the learned and wise;
By wit, by knowledge, studious to be read
I scorn the multitude, alive and dead."

§ Heraclitus हेरॉक्लिटस्–विख्यात ग्रीक् तत्त्वज्ञानी (खि. पू. सुमारें ५३५–४७५) त्याचें मत वस्तुमात्राचें मूलतत्त्व अग्नि होय असें होतें. तो Ephesus येथें जन्मला व तेथेंच आयुष्यक्रमण करून वारला. 'सम्पादक'

४ "त्याच्या लेखांत त्याच्या स्वत:च्या वास्तविक मताहून बुद्धिपुर:सर विपर्यास केलेला कोठेंही आढळत नाहीं. जें त्याच्या खात्रीस पटलें तेंच त्यानें आपल्या ग्रंथांत लिहून ठेवलें आहे. बोलण्यांत जशी त्याची वेळेनुसार लटपट दृष्टीस पडे तशी हातांत लेखणी धरल्यावर तो बिलकुल होऊं देत नसे." असा आणखी मजकूर येथें हवा असें शास्त्रीबोवांनीं वा. दा. ओ, नागपूर यांच्या पत्रास उत्तर देतांना लिहिलें आहे. (अंक ४० पृष्ठ १४–१५). 'सम्पादक'

इतका पूर्ण असे की, त्याच्या योगानें जॉन्सन्चें आचरण व्यवहारदृष्टया दोषरूप सुद्धां होई ह्मणजे 'हितं मनोहारि च दुर्लभं वचः' या वचनाप्रमाणें लोकांस कडू लागेल अशा प्रकारचें भाषण करण्याचीही त्यास पाळी येई. त्यास सभ्य लोकांची रीत मुळींच माहीत नसून त्याचें वर्तन उद्धट व दांडगेपणाचें असल्याविषयीं जो पहिल्या पहिल्यानें बोभाटा होता त्याचें कारण वरीलच होय. त्याप्रमाणेंच त्याचे ग्रंथही पुष्कळांस अमान्य होऊन अद्यापही ते सर्वप्रिय झाले आहेत असें नाहीं. असो; सामान्यतः बोलण्याचालण्यांतही जॉन्सन्चें वरील गुणाकडे इतकें लक्ष असे कीं, तो जसा काय कोर्टांतील प्रतिज्ञा भोगून शपथेवर जबानी देत आहे असें वाटे असा त्याच्या एका मित्राचा लेख आहे.

९. आतां प्रस्तुत ग्रंथकाराच्या बुद्धिगुणांविषयीं कांहीं लिहितों; ह्मणजे तो एवढया विख्यातीस जो चढला तो कशामुळें, कोणत्या मानसिक शक्ति त्याचे ठायीं अत्यंत प्रबळ होत्या, याविषयीं निरूपण करायाचें. मानसिक शक्तींत दोन प्रधानभूत आहेत. एक तर्क ह्मणजे विवेचनशक्ति; व दुसरी कल्पनाशक्ति. पहिलीच्या योगानें मनुष्यास सत्यासत्याचें विवेचन करतां येतें, व वाद करण्याचें सामर्थ्य प्राप्त होतें. दुसरीच्या योगानें अदृष्ट किंबहुना अवास्तव पदार्थांचीही यथास्थित भावना मनोमय करतां येते, व त्यामुळें यथावत् वर्णन करण्याची शक्ति प्राप्त होते. पहिल्या शक्तीचा उत्कर्ष तत्त्वज्ञाचे ठायीं आढळतो; व दुसरीचा कवीचे ठायीं दिसून येतो. असो; आतां जॉन्सन्च्या ठायीं त्या कितपत वसत होत्या याविषयीं निरूपण करूं.

१०. प्रथमतः कल्पनाशक्ति. हिचें वास्तव्य प्रस्तुत पंडिताचे ठायीं होतें हें त्याच्या काव्यांवरून व त्यानें एक कादंबरी [१] व एक नाटक [२] रचलें यांवरून सर्वांच्या लक्षांत येईलच. शिवाय त्याच्या 'चरित्रां'त बॉस्वेलनें त्याच्या सुरस भाषणांचा जो संग्रह सर्वांस सादर केला आहे, त्यावरूनही वरील कल्पकतागुण व्यक्त होतो. जॉन्सन्च्या ठायीं समयोचित भाषण करण्याची शक्ति कांहीं विलक्षण तऱ्हेची होती. त्यानें एकदां कोटिक्रम सुरू केला ह्मणजे त्यावर कोणाचीही मात्रा चालत नसे; व यामुळेंच मोठमोठे पटाईत बोलणारे सुद्धां त्याच्याशीं सामना घालायाला भीत. कोणी कसाही पूर्वपक्ष करून त्याशीं डौलानें वाद करायाला लागला, कीं त्यानें आपलें विनोदरूप शस्त्र उचलून त्याचें ह्मणणें असें हास्यास्पद करून टाकावें कीं, त्यास आपण कोठून बोललों असें होऊन जावें. या भाषणचातुर्याचें बीज वरील कल्पकतागुणच होय. ज्यानें अनेक तऱ्हेचें ज्ञान प्राप्त करून घेऊन बहुश्रुतपणा चांगला संपादन केला आहे त्याच्यापाशींच कल्पकपणाचेंही साहित्य उत्कृष्ट असलें, तर आपल्या प्रतिपक्ष्यावर कोटीवर कोटि लढवून त्यास वादांत जिंकण्याचें साधन त्यास उत्तम रीतीनें सांपडेल हें उघडच आहे. तर जॉन्सन्च्या कल्पकतेची हीं सर्व प्रमाणें होत. आतां हें खरें कीं, प्रस्तुत

---

१. रासेलस् २. ऐरीन ( Irene ) 'सम्पादक'

मानसिक शक्ति त्याच्या ठायीं जी होती ती विशेष सूक्ष्म व चलाख अशा तऱ्हेची नसून बोजड, अवजड अशा तऱ्हेचीच होती व यामुळेंच वरील काव्यादि ग्रंथांची आतां तादृश प्रसिद्धि नसून त्यांचा विनोदप्रकारही कांहींसा कृत्रिमतेचा दिसतो,[१] गोल्ड्स्मिथ् वगैरे ग्रंथकारांचे ठायीं तो ज्या तऱ्हेचा आढळतो तसा जॉन्सन्च्या ग्रंथांत किंवा भाषणांत आढळत नाहीं. त्याप्रमाणेंच संगीत, नाट्य, चित्रविद्या, कविता, यांचेंही मर्मज्ञान त्यास जें नसे त्याचें तरी कारण वरीलच होय.[२]

---

१. जॉन्सन् यास स्वतःवरील संबंधाचा उणेपणा भासून तो केव्हां केव्हां म्हणे—

"Topham Beauclerk has wit, and everything comes from him with ease; but when I say a good thing I seem to labour."

बोक्लार्क हा जॉन्सन्च्या 'क्लब्'पैकीं होता. याच्या अकालिक मरणानें सारी मित्रमंडळी हळहळत असतां जॉन्सन्नें त्याची येणेंप्रमाणें प्रशंसा केली—

"Our club has had a great loss since we met last—a loss that perhaps the whole nation could not repair! No man ever was so free, when he was going to say a good thing, from *a look* that expressed that it was coming; or when he had said it, from a look that expressed it had come. Beauclerk's talents are those which I have felt myself more disposed to envy than those of any whom I have known."

२. जॉन्सन्च्या मित्रमंडळींत त्या काळचा उत्तम गायक, उत्तम नट, उत्तम चित्रकार व उत्तम कवि असे होते. ते अनुक्रमेंकरून बर्नी, ‡ गॅरिक्, रेनॉल्ड्स्, व गोल्ड्स्मिथ् हे होत. या चवघांपैकीं पहिल्याचें कसब तर आमच्या महापंडितास बिलकुल कळतच नसे, दुसऱ्या व तिसऱ्याच्या कर्तबगारीची त्यास कांहीं चहा असे, आणि चवथ्याच्या गुणाची मात्र त्यास पूर्ण पारख असून, त्याबद्दलची प्रशंसा त्यांच्या तोंडून वरचेवर ऐकूं येई. तरी त्याच्याहून तेजस्वी जीं इंग्रेजी भाषेंतील कविरत्नें त्यांचें यथार्थज्ञान जॉन्सन् यास नव्हतें हें सर्वप्रसिद्धच आहे.

‡ Dr. charles Burny (१७२६–१८१४.) इंग्रेज गवई व गायनेतिहासलेखक. एड्मंड् बेकर् हा याचा गायनशाळेंतील पहिला गुरु. आपला सावत्र भाऊ जेम्स् याचेपाशीं तीन वर्षें गायनाचें अध्ययन केल्यावर लंडन् येथें डॉ. अर्ने (Arne) याजकडेही आणखी तीन वर्षें यानें काढलीं. ड्रूरी लेन थिएटरांत मार्च १७४५ चे अखेर झालेल्या थॉम्सन्च्या आल्फ्रेड नाटकांतील पद्य भाग यानेंच तयार करून दिला. २३ जून १७६९ रोजीं ऑक्सफर्ड् विद्यापीठानें B. M. व D. M. (गान-विशारद व गान-पारंगत) या पदव्या त्याला दिल्या. त्याच्या मनांत गायनाचा इतिहास लिहिण्याचें फार दिवस घोळत होतें. त्यांकरितां माहिती मिळविण्यासाठीं जून १७७० मध्यें तो लंडन् येथून निघून पॅरिस्, जिनेव्हा, ट्यूरिन् (Turin), पॅडुआ, (Padua), व्हेनीस, फ्लॉरेन्स, रोम वगैरे शहरांतून हिंडला. १७७१ सालीं 'फ्रान्स

(पुढें चालू)

११. दुसरी तर्कशक्ति. ही वरच्याहून जॉन्सन्चे ठायीं अधिक प्रखर होती. त्याची बुद्धि जात्याच परम सूक्ष्म असून तिची पहिल्यापासून तत्त्वशोधाकडे सतत प्रवृत्ति झाली असल्यामुळें सत्यासत्यविवेचनाविषयीं तीस अत्यंत पटुत्व प्राप्त झालें होतें. तें इतकें कीं,त्याशीं कोणी वाद करूं लागला असतां त्यांत यत्किंचितही लटपट केलेली तो तेव्हांच हुडकून काढी. अप्रमाण भाषण किंवा पोकळ कोटि हीं त्याच्यापुढें पळभरही टिकत नसत. सराफ ज्याप्रमाणें रुपये पारखतांना खोटा रुपया चटदिशीं फेंकून देतात, त्याप्रमाणें कोणीं कितीही हिकमतीनें खोटें प्रमाण लेखांत किंवा भाषणांत घुसडून दिलें असतां तें तो तेव्हांच बाहेर काढी. बॉस्वेल्चा ग्रंथ ज्यांनीं कोणी समग्र वाचला असेल त्यांची वरील गोष्टीविषयीं खात्री होऊन गेली असेल. त्यांत किती शेंकडों तऱ्हेचे वाद प्रसंगानुसार निघालेले आहेत; पण तितक्यांवर जॉन्सन्नें पांडित्य करून आपली कल्पनाशक्ति व तर्कशक्ति ह्या लढवून दिल्या आहेत ! बॉस्वेल्सारखा पृच्छक आणि जॉन्सन्सारखा वक्ता,मग विषयवैचित्र्यास काय कमी ! बॉस्वेल् वर्षांतून एकदोनदां आपल्या देशाहून लंडनास जो येई त्याचा मुख्य उद्देश जॉन्सन्चें भाषण ऐकावें हा असे.अशा प्रसंगीं जेवढा वेळ त्यास जॉन्सन्च्या समागमांत घालवायास सांपडे तेवढा तो घालवी; व तितक्या वेळांत जितक्या विषयावर भाषणाचा ओघ आणवेल तितका आणण्याचा त्याचा प्रयत्न चाललेला असे. यामुळें असें झालें कीं, नाना प्रकारचे विषय—ह्मणजे काव्य, शास्त्र, तत्त्वज्ञान, धर्म, लोकव्यवहार, राज्यतंत्र, किंबहुना सामान्य संसारांतील गोष्टी यांविषयींही जॉन्सन्सारख्या पंडिताचे अत्यंत द्दढ्त विचार प्रगट झाले आहेत; आणि त्यामुळें प्रकृत ग्रंथ हा नुसता चरित्ररूप आहे असें नाहीं तर नानाविध ज्ञानाचें व मनोरंजनाचें जणों काय भांडारच

---

व इटालींतील गायनकलेची सद्यःस्थिति' हा ग्रंथ त्यानें प्रसिद्ध केला. या ग्रंथाची जॉन्सन्नें मनमुराद प्रशंसा केली. १७७३ सालीं 'जर्मनी, नेदर्लंड् व युनायटेड् प्रॉव्हिन्सीस् येथील गायनकलेची सद्यःस्थिति' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. त्याच्या A 'History of Music' या ग्रंथाचा पहिला खंड १७७६ सालीं, दुसरा १७८२ सालीं आणि तिसरा व चवथा १७८९ सालीं प्रसिद्ध झाल्यावर जर्मनींतील (Forkel) फॉर्केल्नें व स्पेनमधील (Requeno) रेक्विनोनें त्याच्यावर खूप कडक टीका केली. फॉक्स् व बर्क याचे मोठे स्नेही होते. १८०६ पासून त्याला दरसाल तीनशें पौंड पेन्शन् मिळे. Ode for St. Cecila's Day ही याची प्रख्यात कविता १७५९ सालीं प्रसिद्ध झाली. त्याचें खासगी व सार्वजनिक चारित्र्य अत्यंत शुद्ध व अनुकरणीय होतें. त्याचें चित्र रेनॉल्ड्सनें व अर्धपुतळा (Nollekens) नॉलेकेन्सनें १८०५ सालीं तयार केला. 'Evelina' वगैरे कादंबऱ्या लिहिणाऱ्या Frances D-Arblay (१७५२–१८४०) नामक याच्या मुलीचा जॉन्सन्शीं बराच दाट परिचय होता. 'सम्पादक'

बनला आहे. जॉन्सन्नें वर्षांचीं वर्षें खपून अनेक मोठमोठे ग्रंथ रचले; पण यांत त्याच्या बुद्धीचें ऐश्वर्य जसें प्रगट झालें आहे तसें त्या सर्वांत मिळूनही झालें नाहीं.[१] हा ग्रंथ महामूर्ख जो बॉस्वेल् त्याच्या हातून निर्माण जर न होता, तर जॉन्सन्च्या स्वभावाचें यथार्थज्ञान नष्ट होऊन त्याच्याविषयीं अनेक कुकल्पना सर्वांच्या मनांत भरून राहत्या हें तर एक झालेंच असतें; पण याहून मोठी गोष्ट ही कीं; शेक्सपीअर्प्रभृति ग्रंथकारांचें वाक्चातुर्य जसें कीर्तिशेष मात्र राहिलें आहे त्याप्रमाणेंच जॉन्सन्चीही अवस्था झाली असती. पन्नास वर्षांच्या सांठवणीचें ज्ञान आपल्या आयुष्याच्या शेवटच्या पंचविशींत तो जें सतत ओतीत असे तें प्रस्तुत चरित्रकारासारख्या सत्पात्राशिवाय केव्हांच जिरून मुरून जाऊन पार झालें असतें! असो; तर बॉस्वेल्च्या ग्रंथांत प्रस्तुत पंडिताची प्रखर तर्कशक्ति उत्तम रीतीनें प्रगट झाली आहे. आतां हें खरें, कीं जॉन्सन् जसा मोठा वावदूक होता तसाच कांहींसा आग्रही व गर्विष्ठही होता. याचमुळें त्याचीं भाषणें वरील ग्रंथांत जीं आलीं आहेत तीं सर्वच युक्तीस सर्वथा अनुसरून आहेत असें नाहीं. कधीं कधीं तो वादविवादाच्या भरांत अप्रमाण गोष्टीही बोलून जाई व आपला पक्ष खोटा आहे असें आंतून पक्कें जाणत

---

१. बर्क असें म्हणत असे—

" Johnson appears greater in Boswell's book than in his own."

त्याप्रमाणेंच—

"His conversation, which was one of the most powerful instruments of his extensive influence, was artificial, dogmatical, sententious, and poignant; adapted with the most admirable versatality to every subject as it arose, and distinguised by an almost unparallelled power of serious repartee- "—

Sir James Mack intosh§

§ सर् जेम्स् मॅकिन्टॉश् (१७६५–१८३२) तत्त्वज्ञानी व इतिहासकार. प्राथमिक शिक्षण ॲबर्डीन् (Aberdeen) येथें झाल्यावर वैद्यकाच्या अभ्यासासाठीं एडिम्बरोला गेला व १७८७ साली वैद्यकांत ग्रॅज्युएट् झाला. १७८८ साली लंडनला जाऊन वर्तमानपत्रांत लेख लिहूं लागला व कायद्याचाही अभ्यास त्यानें सुरू केला. १७९१ साली यानें बर्कच्या 'Reflections on the French Revolution' ला उत्तरादाखल Vindiciae Gallicae लिहिलें. The Law of Nature and Nations या त्याच्या १७९९ च्या व्याख्यानानें त्याची कीर्ति वाढली. तो १८०४–११ पर्यंत हिंदुस्थानांत होता. येथें त्यानें न्यायाधीशाचें काम उत्कृष्ट केलें. हिंदुस्थानांतून परत गेल्यावर १८१३ साली पार्लमेंटांत निवडून आला. Haileybury येथें १८१८–२४ पर्यंत तो कायदा व राजकारण यांचा प्रोफेसर् होता. वस्तुतः तो वाङ्मयसेवक असून त्याचा इतका काळ व उत्साह अन्य उलाढालींत गेल्यामुळें त्याची वाङ्मयसेवा थोडीच झाली. एन्सायक्लोपीडिया ब्रिटानिकाकरितां 'A Disser-

असतांही तो खरासा [1] भासवून देण्याचा यत्न करी. [1] त्याप्रमाणेंच आपली बाजू घसरते आहे असें त्यास एकादे वेळेस वाटूं लागलें असतां उगाच वितंडवादांत शिरून प्रतिपक्ष्यावर प्रखर भाषणांचा प्रयोग करणें, किंबहुना 'शेषं कोपेन पूरयेत्' ही दयानंदी युक्ति लढवणें, यांतही तो वेळेनुसार मागें घेत [3] नसे. याखेरीज राष्ट्रविशेषांविषयीं, व्यक्तिविशेषांविषयीं वगैरे त्याचे कित्येक ग्रह पूर्ववयापासून किंबहुना अगदीं बाळपणापासून दृढ होऊन गेले होते, त्यांचें पटलही प्रसंगविशेषीं त्याच्या बुद्धिचक्षूवर येऊन तें प्रकृत विषयाचें यथावत् भान त्यास होऊं देत नसे.

१२. येथवर प्रस्तुत चरित्रांतील नायकाचें सामान्यतः अनेक प्रकारांनीं वर्णन केलें. त्यावरून त्याच्याविषयीं एकंदरीनें आमच्या वाचकांस बरीच कल्पना करतां येईल असें वाटतें. आतां सरतेशेवटीं दोन गोष्टींच्या संबंधानें मात्र येथें उल्लेख करून

---

tation on the Progress of Ethical Philosophy' हा लेख; लॉर्डनरच्या कॅबिनेट् सायक्लोपीडियाकरितां 'A Sketch of the History of England' व 'A Life of sir Thomas more,' हे लेख, एडिंबरो रेव्ह्यूमधील कांहीं लेख, व 'A Fragment of a Proposed History of the Revolution of 1688, येवढीच याची वाङ्मयसेवा. 'सम्पादक'

१. बॉस्वेल्चा पुढील उतारा पाहा:—

"Exulting in his intellectual strength and dexterity, he could when he pleased, be the greatest sophist that ever contended in the list of declamation; and from a spirit of contradiction a delight in showing his powers, he would often maintain the wrong side with equal warmth and ingenuity; so that when there was an audience his real opinions could seldom be gathered from his talk; though when he was in company with a single friend, he would discuss a subject with genuine fairness; but he was too conscientious to make error permanent and pernicious, by deliberately writing it; and in all his numerous works, he earnestly inculcated what appeared to him to be the truth; his piety being constant, and the ruling principle of all his conduct." 'सम्पादक'

२. "वादविवादाच्या भरांत जरी तो असत्य पक्षाचेंही मंडन करी तरी वाद आटपल्यावर त्यानें आपल्या प्रतिपक्ष्यांस अनेक वेळां असें प्रांजलपणानें सांगितलेलें आढळतें कीं मी मघाशीं तुमच्याशीं मांडलों तो सारा वितंडवाद होता; माझें खरें मत तुमच्यासारखेंच आहे." असा आशयाचा मजकूर येथें पाहिजे होता असें नागपूरच्या कोणा निबंधमालाहितेच्छू वा. दा. ओ. नामक पत्रलेखकास उत्तर देतांना शास्त्रीबोवांनीं सांगितलें आहे. (अंक ५० वा, पृष्ठ १४.) 'सम्पादक'

३. गोल्ड्स्मिथनें म्हटलें आहे—

"There is no arguing with Johnson; when his pistol misses fir, he knocks you down with the butt-end of it."

हा अंक आटपतों. या दोन गोष्टी जॉन्सन्चीं धर्मसंबंधीं व राज्यप्रकरणीं मतें होत. हीं येथें शेवटीं देण्याचें कारण असें आहे कीं, हें सदर सर्व देशांतील विख्यात पुरुषांच्या चरित्रांत आढळणारें नव्हे. उदाहरणार्थ, आपल्या देशांतील एकाद्या प्राचीन किंवा अर्वाचीन पुरुषाचें चरित्र जर कोणीं लिहिलें, तर त्यांत वरील दोन संबंधांचा उल्लेख करण्याचा बिलकुल प्रसंग येणार नाहीं. उघडच आहे कीं, कालिदास व्हिग् ( लोकपक्षीय ) होता कीं टोरी ( राजपक्षीय ) होता असें कोणी तरी विचारील काय? अथवा नाना फडनविसाचीं धर्मसंबंधीं काय मतें होतीं असें जर कोणीं विचारलें तर त्याचें काय उत्तर येईल ? अर्थात् वरील दोन्ही प्रश्न केवळ निरर्थक होत. पण युरोपांत व विशेषतः इंग्लंडांत तसें नाहीं. आलीकडे दोन तीन शतकें तिकडे धर्म व राज्यव्यवस्था या विषयांवर बहुधा सर्व लोकांची सतत चर्चा चालू आहे; त्यामुळें सर्व विख्यात पुरुषांच्या चरित्रांत वरील दोहों संबंधांचा उल्लेख अवश्य असतो. आलीकडे तर सर्व मनुष्यांस आपलीं हरएक विषयावरील मतें मोकळेपणानें प्रसिद्ध करण्यास बिलकुल अटकाव राहिला नसल्यामुळें ' मूर्ति तितक्या प्रकृति ' या ह्मणीप्रमाणें मनुष्यें तितकीं मतें असेंच झाल्यासारखें आहे. युरोपांत बाह्यतः जरी ख्रिस्ती धर्माचा सर्वत्र प्रचार आहे, तरी वस्तुतः पाहतां प्रत्येकाचा धर्म निरानिराळा ह्मणजे ज्यास जसें वाटेल तसें तो धर्माचरण करतो अशी आंतली स्थिति आहे. कोणी जे माविक शुद्ध मार्गाचे आहेत ते पवित्र शास्त्रास शिरसावंद्य मानून पाखंड्यांच्या वाऱ्यास सुद्धां उभे राहायाचे नाहींत अशा प्रकारचे पक्के ख्रिस्ती आहेत. कोणी केवळ ख्रिस्ती तर नाहींत, कारण त्यांस त्यांच्या शास्त्रांतील व्यंगें सर्व ढळढळीत दिसतात; पण आपल्या पूर्वजांच्या धर्मावर उघडपणें आक्षेप घेणें त्यांस आवडत नाहीं. कोणी रंगेल जे आहेत ते सब झूट है ह्मणून सर्वच धुडकावून देतात; त्यांच्या मतें सारे धर्म खरे व सारेही खोटे ! कित्येकांस आलीकडच्यांस तर धर्म कसा तो यावज्जन्म मुळीं माहीतच झाला नाहीं, जन्मास आले तसें कोरेच कोरेच ते जगांतून बाहेर पडले. यांहूनही शेवटल्या कोटीचे लोक ह्मणजे नास्तिक, तें मुळीं ईश्वरालाच गुंडाळून ठेवतात ![1] हें एक प्रकरण झालें. दुसरें राज्यप्रकरण. यावरही बऱ्यासार-

---

१. "The various modes of worship which prevailed in the Roman world were all considered by the people as equally true, by the philo- sopher as equally false, and by the magistrate as equally useful." —Gibbon.

" Sapping a solemn creed with solemn sneer,
The lord of irony, that master spell. "

—Byron.

" I am one of the very few examples, in this country, of one who has not thrown off religious belief, but never had it; I grew up in a negative state with regard to it. I looked upon the modern exactly as I did upon the ancient religion, as something which in no way concerned me. " —*Mill's Autobiography*

खेंच मतवैचित्र्य आहे. कोणी टोरी ह्मणजे राजपक्षाचे आहेत; त्यांचे मत असें आहे कीं, राजा हा ईश्वरांश, ईश्वरानेंच मनुष्यांवर त्यास नेमून ठेवलें आहे, यास्तव त्याचा आज्ञाभंग करणें पाप होय. दुसरे जे वरच्यांचे प्रतिपक्षी आहेत त्यास व्हिग् म्हणजे लोकपक्षाचे असें म्हणतात. यांच्या मतें राजा हा केवळ प्रजेनें नेमलेला अधिकारी आहे; यास्तव प्रजा धनी व राजा तिचा चाकर. तिसरे आहेत ते प्राचीन रोमन लोकांप्रमाणें 'राजा' या नांवाचाही तिटकारा करून लोकसत्तात्मक राज्य चांगलें असें प्रतिपादन करतात. चवथे तर वरच्या नास्तिकांप्रमाणें सगळें राज्यतंत्र गुंडाळून टाकून सार्वस्विक संप्रदाय असावा ह्मणून मांडतात. सार्वस्विक संप्रदाय ह्मणजे साऱ्या राष्ट्रानें आपआपल्या परीनें उद्योग करून यथमाशा-प्रमाणें सार्वजनिक कोठार करावें, आणि त्यांतून ज्यास जें पाहिजे तें त्यानें आपल्या विनियोगार्थ न्यावें. या प्रकारास इंग्रेजींत 'कम्युनिझम्' म्हणतात.[1] असो; तर युरोपांत हल्लीं वरील दोन विषयांच्या संबंधानें इतक्या तऱ्हा आहेत. यांपैकीं जॉन्सन् यानें पहिल्या दोन उचलल्या होत्या; ह्मणजे तो पक्का खिस्ती व पक्का टोरी असा होता. त्याची आईबापें मोठीं सात्त्विक होतीं; व बाप तर इंग्लंडच्या धर्माचा पुरा अनुयायी असून स्टुअर्ट घराण्याचा मोठा कैवारी होता. तींच मतें लहानपणीं सॅम्युएलच्या मनांत पक्केपणीं भिनून जाऊन वयाच्या मानानें उत्तरोत्तर बळावत गेलीं. इंग्लंडच्या धर्मांचा तो इतका अभिमानी झाला कीं, बॉस्वेल्बरोबर तो स्कॉट्लंडास जेव्हां गेला तेव्हां तेथील देवळांत त्यानें पाऊलही ठेवलें नाहीं; त्याप्रमाणेंच ह्यूम येवढा इतिहासकार व त्याच्या परिचयाविषयीं उत्सुक, पण त्यानें त्याचें कधीं मुखावलोकन केलें नाहीं. राज्यप्रकरणींही त्याचा हेका वरच्यासारखाच होता. त्यांत येवढा मात्र फरक झाला कीं, 'मुद्राराक्षसां'तील अमात्य राक्षसाप्रमाणें त्याची राजभक्ति स्थळांतर पावली. पूर्वी स्टुअर्ट घराण्याचा पक्ष घेऊन हॅनोवरच्या घराण्यांस जसा तो शिव्या देत असे, त्याप्रमाणेंच पुढें हें दुसरें राजकुल जसें दीर्घकाळ प्रतिष्ठापित झालें तशी त्यावरही त्याची भक्ति जडली. असें होण्यास तिसऱ्या जॉर्ज राजाचें गादीवर येणें, व त्यांतून त्यानें जॉन्सन् यास वर्षासन करून देऊन एके प्रसंगीं तर स्वतः होऊन त्यानें त्यास मुलाखत दिली, हें कारण होय हें उघडच आहे. मागें एके ठिकाणीं[2] सांगण्यांत आलेंच आहे कीं, तिसऱ्या जॉर्ज राज्याच्या वेळीं पुष्कळ दंगाधोपा[3] चालला होता; तर या वेळीं

१ मुंबईचे प्रख्यात ब्रह्मचारी कैलासवासी विष्णुबोवा यांनी 'सुखदायक राज्यप्रकरणी निबंध' ह्मणून एक लहानसा ग्रंथ केला होता, त्यांत वरील प्रकारचींच मतें प्रणीत केलीं होतीं हें कित्येकांस माहीत असेलच.

२. पृष्ठें ७१२–७१३ पाहा. 'सम्पादक'

३. जॉन वाइल्क्स् (John Wilkes) १७२७–१७९७. नॉर्थ् ब्रिटन् (The North Briton) या पत्राचा सम्पादक. यानें सरकारवर आपल्या पत्रांत कडक टीका केल्यामुळें याला 'टॉवर ऑफ् लंडन्' मध्यें कैदेंत ठेवण्यांत आलें. पण तो

(पुढें चालू)

जॉन्सन्नें राजकीय पक्षास आपल्या लेखणीनें बरीच मदत केली. या राजकारणी लेखांविषयीं मागें यथास्थलीं [1] लिहिलेंच आहे.

येथवर खुद्द चरित्राचा भाग संपूर्ण झाला. आतां आरंभीं संकल्पांत [2] सुचवल्याप्रमाणें एक सदर मात्र शिल्लक राहिलें आहे. तें पुढील अंकांत घेऊं.]

---

भवो हि लोकाभ्युदयाय तादृशाम् [3]

रघुवंश—कालिदास

अंक४०—(१) पूर्वचरित्रापासून बोध. (२) सतत उद्योग. (३) गृहाचार. (४) धर्म.

१. गेल्या पांच अंकांत प्रस्तुत महापंडिताचें चरित्रकथन व त्याचें सामान्यतः स्वभाववर्णन इतकें सर्व आटपलें. आतां यापुढें मागील अंकाच्या शेवटीं सुचवल्याप्रमाणें पूर्वकथित चारित्रापासून वाचकांनीं कोणकोणता बोध ग्रहण करायाचा हें लिहायाचें. प्रकृत चारित्राच्या उपोद्घातांत [4] त्यापासून होणारे फायदे जे सांगितले आहेत

---

पार्लमेंटचा सभासद असल्यामुळें त्याला सोडून द्यावें लागलें. पुढें सदर लेखाबद्दल त्याच्यावर खटला करण्यांत आला तेव्हां सूड म्हणून वाइल्क्सनें आक्षेपितें मजकुराचा पंचेचाळिसावा अंक पुनः छापून प्रसिद्ध केला. Essay on Woman नामक एक आक्षेपार्ह लेख लिहिल्यामुळें त्याला हाउस ऑफ् कॉमन्स् मधून काढून टाकण्यांत आलें. तो फ्रान्सला निघून गेला. पण फिरून १७६८ सालीं परत येऊन मिड्ल्सेक्स्तर्फे पार्लमेंटांत निवडून आला. पुनः नवा खटला झाला. पुनः त्याला पार्लमेंटांतून गचांडी देण्यांत आली. पुनः तो निवडून आला. असा प्रकार लागोपाठ तीन वेळां झाला. प्रचंड खळबळ उडाली. व तो इतका लोकप्रिय झाला कीं त्याला क्रमानें लंडन्चा अल्डर्मन( Alderman ), शेरिफ् व लॉर्ड् मेयर् निवडण्यांत आलें. अखेर त्याच्या प्रतिपक्षीयांनीं हार खाल्ली; त्याच्या विरुद्ध काढण्यांत आलेले हुकूम परत घेण्यांत आले व १७७९ पासून तो लंडन्चा चेंबरलेन ( Chamberlain ) झाला. तो जोरदार, धाडशी व कर्तबगार मुत्सद्दी होता. त्याच्या खटल्याचे वेळीं पत्राचे मुद्रक, प्रकाशक व संपादक यांस पकडावें असा हुकूम, त्यांत विशिष्ट व्यक्तींच्या

(पुढें चालू)

१. पृष्ठें ७२६ अ–७२६ ब पाहा. 'सम्पादक'

२. पृष्ठें ६७० ड व ६७१ पाहा. 'सम्पादक'

३. "अशा पुरुषांचा जन्म लोकाभ्युदयार्थ होय असतो!"

४. पृष्ठें ६७० ड–६७१ पाहा. 'सम्पादक'

हें आमच्या वाचकांपैकीं विशेष बहुश्रुत व मार्मिक जे असतील त्यांस झालें असतील यांत संशय नाहीं; ह्मणजे जॉन्सन्च्या एकंदर जीवनवृत्तान्त जो दिला तो वाचतांना त्या त्या स्थलीं जो जो उपदेश त्यांच्या मनावर ठसायाचा व जे जे विचार त्यांच्या मनांत उत्पन्न व्हावयाचे ते ते त्यास स्थलविशेषीं सुचले असतील. पण आमच्या एकंदर वाचकांची स्थिति तितपत होण्यास अद्याप पुष्कळच काळ लोटला पाहिजे. वरील दोन्ही गुण जे बहुश्रुतपणा व मार्मिकता त्यांचा त्यांचे ठायीं नुकता कोठें उदय होऊं लागला आहे. यास्तव वरील चरित्रापासून उपलभ्य जो उपदेश तो तात्पर्यादाखल फोड करून सांगणें अवश्य आहे. शिवाय जॉन्सन्सारख्या दूरद्वीपस्थ ग्रंथकाराचें येवढें सविस्तर चरित्र एतद्देशीयांस कळून काय करायाचें आहे असें कित्येकास वाटून त्यांस कदाचित् त्याचा कंटाळाही आला असेल; व विषयांची सामग्री खुटल्यामुळें आह्मी कांहीं तरी मजकूर वाचकांवर लादून देत आहों असाही कोणास अंदेशा येऊन चुकला असेल; यास्तव येथपर्यंत झालेल्या कथानकापासून किती महत्त्वाच्या गोष्टी शिकण्यासारख्या आहेत त्या उघड करून दाखवणें जरूर आहे. तसें केलें असतां चरित्रलेखनाकरतां प्रस्तुत विषयाचीच कां निवड झाली हेंही कळून येईल.

२. प्रस्तुत चरित्राच्या साग्र अवलोकनापासून पहिली मोठी गोष्ट ही लक्षांत येते कीं, जॉन्सन् हा नुसता पुस्तकवाल्याचा मुलगा असून पुढें जो येवढ्या अप्रतिम योग्यतेस चढला तें त्याच्या विशाळ बुद्धीचें तर फळ आहेच, पण बुद्धीपेक्षां निश्चयाचें बळ वरील उन्नतीस विशेष कारण झालें असें ह्मटलें पाहिजे. हें बळ ज्यास अनुकूळ नाहीं तो केवढाही अचाट बुद्धीचा असला तरी ती बुद्धि त्यास कांहीं कामास पडायाची नाहीं; वाऱ्यावांचून अग्नि जसा निर्बळ त्याप्रमाणेंच मोठी जाज्वल (त्यां सं०) बुद्धिही दृढनिश्चयावांचून केवळ पंगु होय. जें काम हातीं धरलें तें शेवटास न्यावयाचेंच अशा अटीनें जो त्यास प्रवृत्त होईल, त्याच्याच हातून तें सिद्धीस जाईल, व अशाच निश्चयाचा मनुष्य विख्यातीस चढेल. जॉन्सन्नेंच कोठेंसें ह्मटलें आहे कीं, मोठमोठीं कामें जीं उठतात तीं केवळ बुद्धिसामर्थ्यावर उठत नसतात, तर सतत उद्योग व निर्धार यांच्या बळावर उठतात. त्याचीच गोष्ट पाहा बरें, कीं इंग्लिश्सारख्या परिपक्वतेस येऊन पोंचलेल्या भाषेचा कोश पहिल्याप्रथम आणि पुनः एकट्यानें करायाचा ह्मणजे केवढें साहसाचें व केवढ्या अचाट श्रमाचें काम! सदर्हू पुस्तक साद्यंत वाचायाचें किंवा लिहून

---

नांवाचा उल्लेख नसल्यामुळें, कोर्टानें बेकायदेशीर ठरविला. त्याच्याबद्दल अनुकूल लोकमत प्रदर्शित करण्यासाठीं अनेक जाहीर सभा भरविण्यांत आल्या. राष्ट्राला सार्वजनिक सभांचा उपयोग, किंमत व महत्त्व पटवून देण्याचें श्रेय सर्वस्वीं वाइल्क्सचाच आहे. अनीतिमान् असूनहि त्यानें राष्ट्राची एका विवक्षित दिशेनें प्रचंड कामगिरी केली. हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. या वेळीं इंग्लंडांत उडालेली खळबळ 'न भूतो न भविष्यति' अशाच स्वरूपाची निःसंशय होती. यासंबंधीं व (Woodfall) वुड्फॉल्च्या पब्लिक् अॅड्व्हर्टाय्झरमध्यें १७६९ ते १७७३ पर्यंत ज्यूनियस् या सहीनें प्रसिद्ध झाले. सत्तर जोरदार पत्रांसंबंधीं हा उल्लेख आहे. 'सम्पादक'

काढायाचें येवढेंच काम कोणाच्या माथीं मारलें समजा, तर त्यास आपल्या डोक्यावर केवढा बोजा ठेवलासा वाटेल बरें! त्याची छाती अगदीं दडपून जाऊन हें कोठून ल्चांड गळ्यांत पडलें असें त्यास वाटेल यांत संशय नाहीं. मग जी अवाढव्य इमारत नुसती डोळ्यांनीं पाहणें किंवा आयता मालमसाला असतां पुनः रचणें हें येवढें दुर्घर काम वाटतें, ती स्वतः खाणींतून दगड काढून झाडें तोडून चुना कमावून पायापासुन उभी करणें ह्मणजे तर केवढा पर्वतप्राय उद्योग आहे! पण तोही प्रस्तुत प्रचंड पंडितानें सहज लीलेनें [1] शेवटास नेला; व मध्यें अनेक प्रकारचीं विघ्नें व संकटें आलीं तरी ती जुमानलीं नाहींत. हें तर काय, पण जॉन्सन्चें बुद्धिवैभव येवढें अपार होतें व तो एकदां अंग मोडून बसला ह्मणजे काम सपासप उडवण्याची त्याची अशी विलक्षण हातोटी होती कीं, ज्या कोशरचनेच्या कामाखालीं कोणी सामान्य मनुष्य चिरडून जाऊन डोकें वर उचलण्याचेंही त्यास सामर्थ्य राहतें ना, त्याच्याच ऐन गर्दींत त्यानें एक काव्य [2] रचलें, एक नाटक [3] संपूर्ण केलें, व त्याच्या ग्रंथांपैकीं उत्तम मानलेला जो 'रँब्लर्'त्याचे दोनशें आठ अंक लिहिले! बरें इतकेंही करून स्वारी पुनः थकली काय! नाहीं. थकून करते काय! कोश संपून वर्गणीदारांच्या हातीं तो समग्र जाऊन पडला व साऱ्या राष्ट्राच्या अभिमानास व हर्षास कारण झाला; पण कोशकारांची अवस्था काय! 'इंग्लिश् भाषारूप समुद्रा'चें बरी त्यांनीं समंततः पर्यटन केलें, तरी पर्यटन करणारा जसा निघालेल्या जागीं येऊन पुनः लागतो, त्याप्रमाणें ते नेमकेच पूर्वस्थितीशीं येऊन पुनः भिडले; म्हणजे पुनः चाबूके

---

१. वरील शब्दांची सार्थकता पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल:—

'Dr. Adams found him one day busy at his *Dictionary*, when the following dialogue ensued:—'*Adams*. This is a great work, sir. How are you to get all the etymologies? *johnson*. Why, sir, here is a shelf with Junius, and Skinner, ‡ and others; and there is *Welch* gentleman who has published a collection of Welch proverbs, who will help me with the Welch. *Adams*. But, sir, how can you do this in three years? *johnson*, Sir, I have no doubt, that I can do it in three years. *Adams*. But the French Academy, which consists of forty members, took forty years to compile their Dictionary. *johnson*. Sir, thus it is. This is the proportion. Let me see; forty times forty is sixteen hundred. As three to sixteen hundred, so is the proportion of an Englishman to a Frenchman.' With so much ease and pleasantry could he talk of that prodigious labour which he hed undertaken to execute."

—Boswell's *Life*, Vo 1. page 127.

‡ Stephen Skinner. 'सम्पादक'

२. (The Vanity of Human Wishes.) मानवी आशेचें वैफल्य. 'सम्पादक'

३. (Irene) ऐरीन. 'सम्पादक'

माझे दरवेशीं ही अवस्था कांहीं चुकली नाहीं! येवढा इकडचा डोंगर इकडे केला, पण पुन: हातातोंडाशीं गांठ आहे ती आहेच. वरील प्रचंड उद्योग संपतांच पूर्ववत् अल्पस्वल्प उद्योग करून दोन प्रहरची वेळ टाळावी हा त्यांचा क्रम लागलाच सुरू झाला. असो; तर अशा विपत्तींतही सदहू ग्रंथकारानें इकडे मोठमोठाले ग्रंथ रचले. व आपलें सर्व आयुष्य विद्यासंपादनांत व विद्याप्रसार करण्यांत खर्चलें, हें मोठें विलक्षण नव्हे काय? तर प्रस्तुत चरित्रापासून सर्व लोकांनीं व विशेषत: आमच्या नवीन विद्वानांनीं सतत उद्योग करण्याविषयीं उपदेश घ्यावा. हें नवीन मंडळीस विशेषें-करून सांगण्याचें प्रयोजन असें आहे कीं, जॉन्सन्नें आपल्या देशबंधूंची जी सेवा केली, ती करण्याचें सामर्थ्य व तिचा बोजा सारा त्यांच्याच डोक्यावर आहे. आणि सामान्यत: पाहतां ही देशकल्याणाच्या कामाची धुरंधरता त्यांच्याचकडे आहे, व ती चहिवाटण्यास वरील गुणाची तर अत्यंत अवश्यकता आहे, यास्तव त्यांनींच त्याच्या संपादनार्थ विशेषत: झटलें पाहिजे. आजपर्यंत त्यांचा क्रम जो चालत आला आहे, कीं सरकारच्या मेहेरबानीनें व देशाच्या खर्चानें जी विद्या त्यांस दिली जाते तिचें वास्तविक चीज करण्याचें कधीं स्वप्नांतही न येऊन गप्पाटप्पा, ख्यालीखुशाली वगैरेंतच बहुधां कालक्रमणा करायाची; ज्या गोष्टी आपल्या हातून होण्यासारख्या आहेत त्यांविषयीं काडीइतकाही प्रयत्न न करतां, नवे धर्म स्थापणें, जुने अनादि-सिद्ध चालत आलेले प्रचार मोडून टाकून कोणीं कधीं न ऐकलेलें असें नवें बखेंच सुरू करणें, अशांसारख्या रिकाम्या उठाठेवी करीत बसायाचें; सुधारणा करण्याच्या मिषानें परकी लोकांचे निंद्य आचार प्रचारांत आणूं पाहायाचें; व ज्यांस सज्ञान करण्याकरतां सरकारानें त्यांस रानटी स्थितींतून काढून सुशिक्षित केलें, त्यांस स्वत: तर ज्ञानाचा लेशही पोंचवण्याची कधीं तजवीज न करतां उलटा त्यांचा उपहास मात्र करून फुकाची फुशारकी मिरवायाची व आपले हात आज गगनाला लागले आहेत, तेच आपण कांहीं काळापूर्वी काय होतों याचें बिलकुल स्मरण ठेवायाचें नाहीं;—हा सर्व प्रकार अगदीं बदलून गेला पाहिजे. इंग्रेजांसारख्या परम ज्ञानसंपन्न राष्ट्रांशीं सुदैवेंकरून एतद्देशीयांचा जो योग झाला आहे त्याचें जर साफल्य व्हावयाचें असेल, व स्वातंत्र्यनाशरूप जी या देशाची महाहानि झाली आहे तिची जर भरपाई व्हावयाची असेल, तर लोकसुधारणेचे खांब म्हणवणारांनीं सध्यां-पेक्षां फार निराळ्या तऱ्हेनें आपलें वर्तन ठेवलें पाहिजे. हल्लीं जी त्यांस पोकळ घमेंडी वाटते, कीं युनिव्हर्सिटींतून आपण पार पडलों कीं ज्ञानाची अत्यंत सीमा आपण गांठली, ती त्यांनीं अगोदर दवडली पाहिजे. विद्यालयांतील सर्व संस्कार होऊन बाहेर पड-लेला मनुष्य हा खरोखर पाहतां पांखवील फुटून घरट्याबाहेर पडलेल्या पांखराच्या बच्च्यासारखा होय. म्हणजे त्यास त्याचीं आईबापें ज्याप्रमाणें पोसून उडायाजोग्या स्थितीपर्यंत आणून पोंचवतात, त्याप्रमाणेंच आमचे विद्यालयीन पंडितही तीन चार

न्वर्षांच्या शिक्षणाच्या योगानें सामान्यतः कोणत्याही विषयांत स्वतःच्या परिश्रमानें प्रवेश होई इतक्या प्रगल्भतेला येऊन पोंचलेले असतात, इतकेंच काय तें. मग ही ज्यांची स्थिति त्यांनीं ज्ञानसमुद्राचें पैल तीर गांठलें, कीं ते आलीकडच्याच तिरावर आहेत हें कोणासही समजेल. पांख फुटलेल्या पक्ष्यास आकाशक्रमण जसें पुढें करायाचें असतें, त्याप्रमाणेंच विद्यालयाच्या बंधांतून जो सुटला तो विद्यासमुद्रावर सफर करण्यास नव्या नाविकाप्रमाणें नुकता तयार झालेला असतो. वर ही वास्तविक स्थिति मनांत आणून आमच्या होतकरू लोकांनीं अल्प विद्येंत संतोष न मानतां व वृथा गर्वानें फुगून न जातां जॉन्सन्ची ज्ञानप्राप्तीविषयीं जशी पराकाष्ठेची उत्कंठा होती व तो स्वतः मोठमोठ्या ग्रंथकारांस वंद्य असतांही शेवटपर्यंत त्याचें अध्ययन जसें सुटलें नाहीं, तसाच त्यांनीं क्रम ठेवला पाहिजे.[१] त्याप्रमाणेंच परीक्षांच्या तडा-

---

१. जॉन्सन् यास पुस्तकें वाचण्याचा भारी नाद असे. तो स्वभावतः आळशी असल्यामुळें कोणतेंही पुस्तक तडीस नेऊन पोंचवीत नसे; पण अर्धें मुर्धें वाचल्यानेंही त्याच्या लक्षांत ग्रंथांतील एकंदर मतलब येई. अशा रीतीनें त्यानें जितके ग्रंथ वाचले होते तितके त्या काळीं थोडक्यांनींच वाचले असतील. असें असतांही आपला अभ्यास व्हावा तसा होत नाहीं हें त्याच्या मनास किती जाचत असे हें त्याच्या रोजनिशी-वरून दिसून येतें. या रोजनिशा व त्याचे इतर कागदपत्र चट सारे छापून काढले आहे. यांतले कांहीं चुटके पुढें देतों. ते वाचले असतां कशास कांहीं ठिकाण नसतांही जे आपणास कृतकृत्य मानीत असतील व मूर्खपणांत काळ घालवीत असतील त्यांस आपलें क्षुद्रत्व भासल्यावांचून राहणार नाहीं!—

I resolve,

To read good books; to study theology.
To treasure in my mind passages for recollection.
To rise early; not later than six, if I can; I hope sooner, but as soon as I can.
To keep a journal both of employment and expenses.
To take care of my health, by such means as I have designed.
To set down at night some plan for the morrow.

| Resolved, | I hope. |
|---|---|
| To apply to study. | To rise at eight. |
| To reclaim imagination. | To be temperate in food. |
| To rise early. | To waste less time. |
| To study religion. | To regulate my sleep as to length and choice of hours. |
| To go to church. | To read a certain portion every week. |
| To drink less strong liquors. | |
| To keep a journal. | |
| To put books in order. | |

I have read five books of Homer, and hope to end the sixth to—night.

( पुढें चालू. )

त्यांतून सुटून आपला चरितार्थ व्हावयाला लागला ह्मणजे आपण कृतकृत्य झालों,व इतःपर कोणतीही कर्तव्यता उरली नाहीं,हीही कोती समजूत वरील मंडळीनें सोडून दिली पाहिजे. वर विद्येच्या संबंधानें असें सांगितलें कीं जें तीर त्यांस पलीकडचें वाटतें तें वस्तुतः पाहतां आलीकडचें आहे; त्याप्रमाणेंच जेथें कर्तव्यतेची त्यांच्या बुद्धीनें समाप्ति झाली तेथेंच खरोखरीं पाहिलें असतां तिचा नुसता आरंभ आहे असें त्यांनीं समजावें. उघडच आहे कीं शिपायास कवाइतींत तयार करून त्यास ग्राम्यानिम्यानिशीं बाहेर पाठवून दिला, ह्मणजे त्याच्या कामाची सुरवात झाली ह्मणायाची कीं अखेर झाली ह्मणून समजायाची? कवाइतीची अखेर झाली खरी, पण ती होऊन पुरा शिपाई तयार होतांच त्याच्या कामाची सुरवात झाली असें समजायाचें तर याप्रमाणें विद्यालयांतील सर्व अध्ययन पुरें होऊन ज्यांचा शेवटला सोहळा झाला, व इलाखाधिपतींचा गुरुमंत्र [1] ज्यांच्या कानीं पडला, त्यांनीं लगेच दुसऱ्या दिवसापासून आपल्या सान्या बुकांस एकदम रजा देऊन टाकावी; व शिकंदर बादशहा त्याप्रमाणें सारें जग जिंकून बाबिलोन शहरीं स्वस्थ येऊन पडला, व जे जे मनास वाटलें ते ते चार करून आपल्या परम देदीप्यमान् कीर्तीस डाग लावून घेऊं लागला, त्याप्रमाणेंच आमच्या नव्या मंडळींपैकीं बहुतेकांचा प्रकार आढळून यावा ही केवढी दिलगिरीची गोष्ट आहे! जॉनसन्‌साहेबांचा कित्ता घेऊन वरील मंडळीनें थोडाबहुत जरी

---

I this day read a great part of Pascal's life.
I tried in this summer to learn Dutch, but was interrupted by an inflammation in my eye.

Almighty and merciful God, I again appear in thy presence the wretched mispender of another year, which Thy mercy has allowed me.........This year has passed with so little improvement, that I doubt whether I have not rather impaired than increased my learning...........I have now begun the sixtieth year of my life. How the last year has past, I am unwilling to terrify myself with thinking.........When I look back upon resolution of improvement and amendment, which have year after year been made and broken, either by negligence, forgetfulness, vicious idleness, casual interruption, or morbid infirmity; when I find that so much of my life has stolen unprofitably away, and that I can descry by retrospection scarcely a few single days properly and vigorously employed; why do I yet try to resolve again? I try because reformation is necessary, and despair is criminal. I try in humble hope of the help of god.

१. पदवीची कोणतीहि परीक्षा (बी. ए., बी. एस्. सी., एम्. डी., वगैरे) पास झालेल्या विद्यार्थ्यांस पदवीदानप्रसंगीं (Convocation) विद्यापीठाचे चॅन्सेलर (हे गव्हर्नर असतात.) उपदेशपर व्याख्यान देतात त्यासंबंधीं हा उल्लेख आहे. 'सम्पादक'

आजपर्यंत उद्योग केला असता तरी त्यांच्या विद्वत्तेचें किती चीज झालें असतें व लोकांस किती उपयोग घडता ! युनिव्हर्सिटी स्थापन होऊन आज वीस वर्षें झालीं; व त्यापूर्वीही कित्येक वर्षांपासून इकडे इंग्रेजी विद्येचा प्रचार सुरू झाला होता; मग इतक्या वीस तीस वर्षांत लोकसुधारणेला किती साह्य झालें असतें ! तरुण जनांस वाचण्यालायक अशीं नाना प्रकारचीं मनोरंजक पुस्तकें, बहुश्रुत लोकांच्या उपयोगी पडण्यासारखे तऱ्हेतऱ्हेच्या माहितीचे चमत्कारिक ग्रंथ; विद्यार्थ्यांस इष्ट असे देशोदेशींचे संक्षिप्त इतिहास; निरनिराळ्या शास्त्रांवर सुबोध ग्रंथ; त्याप्रमाणेंच या देशांतील जुनी कविता व जुना इतिहास यांचा संग्रह,—कीं जो होण्याची सोय दिवसांदिवस कमी होत चालली आहे; तसेंच सान्या भारतवर्षीयांच्या किंबहुना सान्या जगाच्या प्रीतीचें व पूज्यबुद्धीचें स्थान झालेली जी प्राचीन गीर्वाण भाषा, तींत काय काय ज्ञानभांडार आहे, तिच्या खालोखाल मानलेली जी फारसी भाषा तींत काय मौज आहे, याविषयीं शोध; हिंदुस्थानी, गुजराथी, वगैरे एतद्देशीय भाषांचा मराठीशीं कितपत संबंध आहे, व्याकरणरीत्या सर्वांचा कसा कसा मेळ आहे इत्यादि विचार;—या या प्रकारें उद्योग करण्याचें आमच्या पुढारी मंडळीनें जर मनावर घेतलें असतें तर आजला लोकांची किती निराळी स्थिति असती ! यासारखेंच देशी शेतीकडे व देशी व्यापाराकडे जर कोणीं लक्ष दिलें असतें; व आपल्या इंग्रेजी ज्ञानाचा लाभ आपल्या देशबंधूंस त्यांच्या भाषेच्या द्वारें करून दिला असता, व व्यावहारिक कृत्यांच्या संबंधानेंही त्यांस उपयुक्त माहिती करून दिली असती, तर त्यांस व सर्वांस केवढें भूषण झालें असतें ! आतां एक मात्र खरें, कीं वरील क्षुल्लक कृत्यांकडे आमच्या पंडित मंडळीची बहादरी खगळी खर्चून जाती, म्हणजे मुंबईस प्रार्थनासमाजमंदिर उठतें ना, पुण्यास हत्तीची बडी वरात मिरवतां आली नसती, व टळटळीत अवसेच्या शुभमुहूर्तावर मंगलकार्यंही न गाजतें ! [1]

---

१. जी एकदां गतभर्तृका झाली तिला पुनः संसारसुखाची गोडी लावून देण्याचा जो उद्योग आमच्या देशहितेच्छूंनीं सदय अंतःकरणेंकरून उपस्थित केला आहे, त्यावर कोणत्याही तऱ्हेचा आक्षेप केलेला त्या मंडळीस बहुधां खपणार नाहीं. पण आपला व पुष्कळ लोकांचा अभिप्राय कळवणें हें ज्या अर्थी पुस्तककर्त्याचें कर्तव्य होय—मग तो अभिप्राय सुधारणेच्या पक्षास अनुकूळ किंवा प्रतिकूळ असो !—त्या अर्थी वर सांगितलेला अमावास्येचा जो विवाह झाला तो चमत्कारिकच असें म्हटल्यावांचून राहवत नाहीं. पुनर्विवाह हा पूर्णपणें शास्त्रसंमत असून पुरातन काळीं चालू होता व तोच मार्ग केवळ रूढि नसल्यामुळें आजपर्यंत बंद पडला होता, तो आम्ही पुनः सुरू करणार असें जर त्याचे पक्षकार म्हणतात, व जगद्गुरूंस मध्यस्थानीं बसवून त्यांजकडून त्याबद्दल शास्त्रार्थ मिळण्याबद्दल जर त्यांनीं एवढी खटपट केली; तर आज पांच सात वर्षें लोटलीं नाहींत तोंच सारें शास्त्र एकीकडे गुंडा-

(पुढें चालू)

प्रस्तुत ग्रंथकारानें इतकें अध्ययन केलें, व इतका उद्योग केला यावरून आमच्या देशांतील बुद्धिमान् लोकांनीही सामान्यत: एक मोठी गोष्ट शिकण्यासारखी आहे. ती ही कीं, मनुष्याची बुद्धि जात्या कितीही प्रखर असली तरी अभ्यासावांचून व उद्योगावांचून तिचें कांहीं तेज पडायाचें नाहीं. पाहा कीं, एकादी जमीन उत्तम लागवडीची जरी असली, तरी तिची मालमशागत जर नीट केली नाहीं, तर तिचें स्वरूप पाहिजे तसें वठायाचें नाहीं. मोठा उत्तम जातीचा जरी आंबा घेतला तरी तो रुजून त्याचें झाड होऊन तें पूर्ण दशेस आल्याविना त्याचा गुण प्रगट व्हावयाचा नाहीं. मोठा हापूसचा आंबा आहे. म्हणून लहानसा रोपडा असतांही त्याचीं पानें चाखलीं तर गोड लागतील काय ? अथवा वाफेचें उदाहरण घ्या. हिच्या अद्भुत शक्तीचें या काळांत कोणासही वर्णन द्यावयाला पाहिजे असें नाहीं. पण तिचें सामर्थ्य प्रगट होण्यास तिची तशी योजना झाली तर उपयोग. ती न झाली तर जी हजारों खंडींचें ओझें वायुवेगेंकरून एका देशांतून दुसऱ्या देशांत नेऊन टाकते, पर्वतप्राय लाटांस व वाऱ्याच्या सोसाट्यांस न जुमानतां मोठमोठ्या सागरांवरून अग्निनौकांस लोटीत नेते, व हजारों चाकांस एकसमयावच्छेदेंकरून गति देऊन अवघ्या राष्ट्राचें विणकाम एकाद्या महाराक्षसीप्रमाणें एकटी पतकरते, तीच एरवीं सैपाकघरांत चुलीवरील भांड्याचें झांकण नुसती थडथडावीत बसेल इतकेंच ! तर मूळची बुद्धि कितीही उत्कृष्ट असली, तरी तिचें तेज पडण्यास उद्योगाची अपेक्षा आहे. ही गोष्ट आमचें

---

ळून ठेवून सूर्यचंद्रांच्या दृष्टीआड व पुरतें वेदाक्षरही न उमटूं देतां लुटूपुटीच्या खेळाप्रमाणें सारा विधि एका चार घटकेंत आटपून टाकला यांत त्यांचा काय मतलब असेल तो असो ! सुमारें दोन तीन वर्षांपूर्वी येथील एक नामांकित विद्वान् बंगाल हिंडून माघारीं आले होते. व पुढें आपल्या प्रवासाची हकीकत त्यांनीं सभेंत जेव्हां निवेदन केली, तेव्हां तिकडील एका ब्राह्मविषयीं त्यांनीं सांगितलें कीं, त्यानें ब्राह्मविधीनें एका शूद्रीशीं पुनर्विवाह केला; व असें केल्यानें एकांत तीन निरनिराळ्या सुधारणा त्यानें केल्या. त्या अशा कीं, एक तर पुनर्विवाह; दुसरा जातिभेदभंग; आणि तिसरा, विवाहाचा अपूर्व प्रकार; म्हणजे पूर्वीचें मंत्रातंत्राचें सारें बंड मोडून टाकून नवी सुधारलेली पद्धत सुरू करणें. मग अशा प्रकारचीच कांहीं दुहेरी तिहेरी सुधारणा करण्याचा तर वऱ्हाड्यांचा बेत नसेल ना ! असें असेल तर आम्ही त्यांस अशी सूचना करतों कीं, पुन: जेव्हां एकादी अशी शिकार सांपडेल तेव्हां आणखीही एक दोन नव्या सुधारणा त्यांनीं अमलांत आणाव्या. त्या ह्या कीं, विवाहभोजनास ब्राह्मणांस जें निमंत्रण करतात त्याऐवजीं पुढल्या समारंभास सत्यशोधक मंडळी उर्फ जोतीबा फुल्यांची शिष्यशाखा यांस आमंत्रणें द्यावीं, व याज्ञिकं चालवण्यास कोणी रेणा * तीरवासी गौरवर्ण आचार्य शर्मण्य देशाहून मागवावा ! !

* जर्मनींतील ऱ्हाईन ( The Rhine ) नदी. 'सम्पादक.

लोक आलीकडे विसरत चालले आहेत. कोणाच्या ठायीं कोणताही गुण असो; त्याची अंमळ प्रशंसा झाली कीं पुरें, तेथें गर्व जडलाच. गर्व जडला कीं, उद्योगाचें मान कमी झालेंच. असें होतां होतां लवकरच अशी स्थिति येते कीं, इसापनीतींतील ससा जसा अंमळ दूर धांवून लागलाच वृक्षच्छायेंत शीतळ जागीं गाढ निद्रिस्त झाला, त्याप्रमाणेंच आरंभीं मोठे चलाख दिसणारे विद्यार्थी लवकरच प्रशंसेनें बिघडून जाऊन अगदीं कुचकामाचे होऊन जातात, किंवा युनिव्हर्सिटीच्या परीक्षांपर्यंत त्यांची मजल पोंचलीच, तर नानाप्रकारचीं ढंगें व व्यसनें त्यांस जडून त्यांच्या योगानें देशास भूषण व्हावयाचें तें तर एकीकडे राहून उलटा कलंक मात्र लागतो. बरें, येवढी वाहवा जिकडे तिकडे होऊन त्यांच्या पदरीं विद्या तरी किती शी पडते, ह्मटलें तर ती अर्थात् थोडीच; कारण विद्यापर्वताची चढण अगोदर कठिण, मग त्यांत पायथ्यापासूनच 'ग' महाराज पाटुंगळीस चिकटल्यावर मोठा खंबीर चढणारा असला तरी त्याची किती मजल होणार ! तर प्रस्तुत ग्रंथकाराच्या चरित्रावरून आमच्या वाचकांनीं 'ग' रूप रोगावर महामात्रा घ्यावी. त्यांनीं असें ध्यानांत आणावें कीं, जॉन्सन् ची येवढी लोकोत्तर बुद्धि होती तरी त्याचा उद्योग राहिला नाहीं. आपण बुद्धिमान् आहों तेव्हां जडबुद्धीच्या सामान्य लोकांप्रमाणें आपणांस सतत अध्ययनाची काय गरज आहे, इतरांस पुस्तकांपासून व शिक्षकांपासून जें ज्ञान प्राप्त होणार तें आपल्या ठायीं जिवंत झऱ्याप्रमाणें आपोआपच प्रादुर्भूत होईल, या मूर्खत्वाच्या भ्रमांत तो कधींही पडला नाहीं. तर ज्ञानप्राप्तीचा जो एकच मार्ग,—कोणता ? तर अध्ययन, (आतां हा कोणास बुद्धिमत्त्वास्तव सुगम होतो, कोणास स्वाभाविक जाड्यास्तव दुर्गम असतो, इतकाच काय तो भेद)—तोच प्रस्तुत महापंडितानें शेवटपर्यंत क्रमिला. हें एक झालें. दुसरी गोष्ट अशी कीं, बुद्धिमत्तेचा उपयोगही इकडे कांहीं निराळाच पाहण्यांत येतो. या गुणाबद्दल ज्याची ख्याति व्हावयाला लागते त्याला वाटूं लागतें कीं, मी कांहीं इतरांसारखा नाहीं, तेव्हां माझें वर्तन अर्थातच जगानिराळें असलें पाहिजे. ही समजूत एकदां डोक्यांत शिरली ह्मणजे तिचे परिणाम कोठवर जाऊन थडकतील याचा नेम नाहीं. विक्षिप्त आचार, कुत्सित मतें, अद्वातद्वा भाषण इत्यादि विशाल बुद्धीचे तरंग जितके प्रगट होतील तितके थोडे ! त्याप्रमाणेंच आपणाखेरीज कोणालाही मानायाचें नाहीं, कोणाची प्रसिद्धि होऊं लागली असतां त्यास विरोध करायाचा, जेथें तेथें जेव्हां तेव्हां आत्मप्रतिष्ठा गात बसायाचें, हाही प्रकार नजरेस येतो. सारांश, ज्याप्रमाणें रूपवत्वाचा अभिमान स्त्रियांस कधीं कधीं कुमार्गावर चालवतो व संपत्तीचा गर्व सामान्यतः शीलभ्रंशास कारण होतो, त्याप्रमाणेंच बुद्धिमत्त्व हेंही वर सांगितल्याप्रमाणें चित्तास विकार करतें. पण जॉन्सन्च्या ठायीं बुद्धिवैभव येवढें अपूर्व वसत असतां त्याच्या वरील दुष्ट विकार कोणतेही उत्पन्न झाले नाहींत. त्याची उलटी अशी समजूत असे कीं, ईश्वरानें ज्या अर्थी आपल्या ठायीं बुद्धिविशेष ठेवला आहे त्या अर्थी त्याचा उपयोग पूर्णपणें करून परोपकाराकडे त्याचा जितका व्यय होईल तितका अवश्य

केला पाहिजे; तो न केला तर परमेश्वराचा मी दोषी होईन.[1] त्याप्रमाणेंच इतरांचा अवमान करणें, त्यांची प्रसिद्धि झालेली न खपणें हेंही त्यास बिल्कूल माहीत नव्हतें. उलटें त्याचें असें मात्र असे कीं, आपल्याकडून होईल तितकें साह्य करून दुसऱ्यास प्रसिद्धीचा मार्ग सुगम करून द्यावयाचा. गोल्ड्स्मिथ् कवीस त्याचा आश्रय न मिळता तर कदाचित् शेवटपर्यंतही त्याची विशेष ख्याति न होती.

३. मागील चरित्रावरून दुसरी शिकण्यासारखी गोष्ट म्हटली म्हणजे जॉन्सन्चा गृहाचार होय. गृहाचार म्हणजे घरांतील वागणूक. ही पुष्कळ वेळां मोठमोठ्या लोकांची सुद्धां बाह्याचरणाहून म्हणजे जगांत जी त्यांची वर्तणूक दिसते तिजहून अत्यंत भिन्न असते. जे बाहेर बोलायाला चालायाला मोठे गोड, दिसायाला मोठे सभ्य, व सकृद्दर्शनीं लोकहितार्थ झटणारे अशा प्रकारचे वाटत असतात, तेच कधीं कधीं उंबरठ्याच्या आंत पाऊल ठेवतांच कपाळास आंठ्या पडणारे, नाना प्रकारच्या दुराचारांत निःशंक रमणारे, व पहिल्या प्रतीचे आपमतलबी असे असतात. हा चमत्कारिक विरोध जगांत अनेकशः आढळत असतो, यास्तव प्रसिद्ध पुरुषांच्या लौकिक चरित्रांच्या शेवटीं त्यांच्या गृहचरित्राचा नेहमीं वृत्तान्त दिलेला असतो. हा मागील चरित्रांत दाखल झाला आहेच; व त्यावरून जॉन्सन्ची घरगुती वागणूक म्हणजे आईबापाशीं, बायकोशीं, चाकरांशीं वगैरे त्याचें वर्तन कोणत्या तऱ्हेचें होतें हें वाचकांस कळलेंच आहे. आतां एतद्देशीय लोकांनीं वरील वर्तनापासून काय बोध ग्रहण करायाचा तो सांगतों. प्रथमतः चाकर या सदरावर कांहीं विशेष लिहिण्यासारखें नाहीं. कां कीं सेवकपरिवार बाळगण्याची ऐपत आमच्या लोकांत थोड्यांसच आहे, व ज्यांस आहे त्यांचें त्यांशीं वर्तनही दूषणास्पद असतें असें नाहीं. इतर प्रकारच्या बऱ्याच सुधारणा जरी आमच्या घरांतून शिरल्या आहेत, तरी चाकरांस धरून बोपटण्याची व त्यांस बूट मारण्याची तऱ्हा अद्याप कोठें दृष्टीस पडूं लागली नाहीं. यास्तव दुसऱ्या दोन संबंधांचें मात्र येथें लिहितों. जॉन्सन्चें आपल्या बायकोवर केवढें प्रेम होतें हें यापूर्वी[2] सांगितलेंच आहे; तथापि तिचा दाब आपणावर बसूं न देण्याविषयीं तो जपत असे, याविषयींही एक आख्यायिका मागें[3] दिली आहे, तिजकडे आमच्या नवीन मंडळीनें अंमळ

१. जॉन्सन्चीं वरील समजूत त्यानें एके ठिकाणीं दाखल केली आहे—"Of him to whom much is given much shall be required." या वाक्याप्रमाणेंच जॉन्सन्नें आपला कार्यभागही आटपला. तो म्हणत असे कीं, मीं आपल्या वांट्याचें लिहून चुकलों आहे. (I have written my share) राजाची व त्याची मुलाखत होऊन जो भाषणप्रसंग झाला त्यांतही वरच्यासारखाच उद्गार निघाला आहे.

२. पृष्ठें ६८१, ६९८ व ७३७ पाहा. 'सम्पादक'

३. सदर आख्यायिका अशी:—नवी प्रीत.

आम्ही भरतखंडवासी लोक अर्धेमुर्धे रानटीच आहों व आम्ही आपल्या बायकांस

( पुढें चालू )

विशेष लक्ष पुरवलें पाहिजे. कां कीं, इंग्रेजांचे आचार म्हटले म्हणजे ते सर्वथा निर्दोष समजून ते सुधारणेदाखल इकडे चालू करण्याचा कांहीं दिवसांपूर्वी जो सपाटा असे तो आतां जरी बराच मोडत चालला आहे, व कुलांगनांचें परम भूषण म्हणून मानलेली वेडी लज्जा टाकून देऊन नवऱ्याच्या हातांत हात घालून चालणाऱ्या सुधारलेल्या स्त्रियांचें मानही आलीकडे जरी कमीच होत चाललें आहे; तरी सामान्यतः पाहतां कांहींसा स्त्रैणत्वाकडेच लोकांचा कल दृष्टीस पडतो. हा प्रस्तुत पंडिताच्या वर्तनाचा कित्ता घेऊन त्यांनीं मोडला पाहिजे. आतां हें खरें कीं, बायकोस आपणांवांचून दुसरी गतिच नाहीं, आपण पाहिजे तसा तिजवर अंमल चालवला असतां चालणार आहे हें लक्षांत आणून तिला सतत जाच करणें हें परम अधमाचें कृत्य आहे; व रथचक्र-

---

पशूंप्रमाणें वागवतों हें त्याचें एक मोठें प्रमाण होय. ही पाश्चात्य जनांची समजूत आज अनादिसिद्ध चालत आली आहे हें आमच्या वाचकांपैकीं सर्वांस विश्रुत असेलच. पुढील गोष्टीवरून जॉन्सन्चें वर्तन आमच्या सुधारलेल्या स्त्रीजित बंधूंशीं कितपत जमून होतें हें सर्वांच्या लक्षांत सहज आल्यावांचून राहणार नाहीं.

ख्रिस्ती लोकांचा पाणिग्रहणविधि देवळांत होत असतो. त्याप्रमाणें नेमलेल्या दिवशीं प्रस्तुत वधूवरें देऊळ कांहींसें दूर होतें तिकडे घोड्यावर बसून निघालीं. या प्रसंगींचा वृत्तान्त जॉन्सन्नें खुद्द आपल्या प्रिय शिष्यास येणेंप्रमाणें निवेदन केलाः— " माझ्या बायकोनें जुन्या कादंबऱ्या पुष्कळ वाचल्या होत्या, त्यांनीं तिचें डोकें फिरून जाऊन तीस असें वाटूं लागलें होतें कीं बायको बाणेदार म्हटली म्हणजे तिनें आपल्या नवऱ्यास दारच्या कुत्र्याप्रमाणें वागवीत असावें. असें करील तर ती बायको! असें तिला वाटून तिनें मला प्रथमतः सांगितलें कीं, तुम्ही ( वस्तुतः हा बहुवचनी प्रयोग बरोबर नाहीं. युरोपांतील बायका आमच्या वेड्या खुळ्या बायकांप्रमाणें कधींहि लाजत नसतात. त्या नवऱ्यास एकेरी शब्दानेंच नेहेमी हाक मारतात. हें तर काय? पण वर पाणीदार बायकोचें जें लक्षण सांगितलें आहे तें मनांत आणलें असतां नवऱ्यानें आपण केवढी मिळवली म्हणून समजलें पाहिजे हें कोणाच्याही सहज लक्षांत येणार आहे. ) घोडा फार जलद हांकतां; माझ्यानें तुमच्या बरोबर येववत नाहीं. हें ऐकतांच मीं लगाम आंखडला व हळू हळू चालूं लागलों. अहो! किती हळू तुम्ही चालणार? तुमच्या बरोबर कोणीं रेंगाळत बसावें? हें ऐकतांच मीं तिचा मतलब जाणला व मनांत गांठ बांधली कीं ही एव्हांपासून डोक्यावर बसूं पाहणार तर हें अगदीं उपयोगी नाहीं. मग तत्क्षणींच मीं घोड्यास टांच दिली, व तेव्हांच पार दिसेनासा झालों. त्या रस्त्याच्या दोहों बाजूंस कुंपण होतें. तेव्हां मी पुढें निसटून गेलों तरी ती रस्ता चुकणार नाहीं, हें मला पक्कें माहीत होतें. पण पुढें अगदीं हळू हळू चालायाला लागून ती मला येऊन मिळेसें मीं केलें. ती जवळ आली तों तिच्या डोळ्यांवाटें अश्रु चालले होते!" 'सम्पादक'

न्यायानें स्त्रीचा अधिकार संसारकृत्यांत पुरुषाच्या बरोबर आहे यास्तव तोही तिला देणें हें रास्त आहे; परंतु 'अबला यत्र प्रबला' असा प्रकार घरांत असून पुरुषानें निर्माल्य होऊन बसणें किंवा वेडे लाड करून बायकोस वडील माणसांहून शिरजोर करून ठेवणें हीं दोन्हीं कृत्यें अत्यंत लज्जास्पद होत. यास्तव स्त्रीचा बंदा होऊन न राहतां तिजशीं प्रेमभावानें वागण्याचें उदाहरण प्रस्तुत चरित्रापासून घेण्यासारखें आहे. याप्रमाणेंच जॉन्सनूनें पहिला संबंध तुटला असतां शेवटपर्यंत दुसरा जोडण्याची बिलकुल इच्छा केली नाहीं व यावज्जन्मांत दहा बारा वर्षें संसारसुखाचा अनुभव जो त्यास घडला, तितक्यांतच त्यानें संतोष मानला, हा प्रेमातिशय व मनोनिग्रहही अत्यंत विचारार्ह होय. आमच्या जुन्या लोकांस स्त्रीचे हक्क मुळींच न समजून नवी बायको करणें व नवा जोडा विकत घेणें या दोन्ही गोष्टी सरासरी सारख्याच वाटतात, व त्यामुळें चार चार पांच पांच पर्यंतही बायका करण्याचा प्रघात आजपर्यंत चालत आला आहे हें सर्वांस माहीत आहेच; त्याविषयीं आम्हांस बोलणें नको. पण हें नवल नव्हे काय, कीं मोठे विद्वान् व कनवाळू म्हणविणारांनीं ज्या स्त्रीवर आपण नुकतेच अगदीं मरमरून जात होतों व जीस आपलें अप्रतिम प्रेम परोपरीनें शतशः बोलून दाखवलें तिचीच अत्यल्प काळांत अगदीं आठवण बुजून जाऊन द्वितीय संबंधाविषयीं त्यांनीं जसें काय धांदावून जावें, व आपल्याच स्वार्थावर केवळ नजर देऊन जीं अर्भकें त्यांस अपत्यांसारखीं शोभतील व ज्यांचे मनोधर्म त्यांच्यांहून अर्थातच वयःपरत्वेंकरून अत्यंत भिन्न असणार त्यांस विवाहरूप पाशांत गोंवून टाकून आपल्या नियतकालिक सुखाकरतां त्यांच्या संसाराचें मातेरें करून टाकावें! हें तर काय, पण वेळेनूसार लोककल्याणाची पाठीवरील गोणीही लोक हां हां म्हणत असतां बेलाशक झुगारून देऊन एकदांचे चटकर चतुर्भुज होऊन आईपुढें जाऊन उभें राहावें हा तरी काय थोडा चमत्कार आहे!

यापुढचा उपदेश आईबापांशीं वागण्याच्या संबंधानें. हाही प्रस्तुत चरित्रापासून बराच घेण्यासारखा आहे. तो असा कीं, जॉन्सन् हा आपला चरितार्थ चालवून द्रव्यसंपादन जरी करूं लागला, व त्याची कीर्ति तर सान्या विद्वन्मंडळांत जरी गाजूं लागली, तरी आपल्या वृद्ध मातेची लवमात्रही उपेक्षा न करतां पूर्वीप्रमाणेंच त्याची तिचे ठायीं अतिशयित भक्ति राहिली. ही त्याची भक्ति अशीच शेवटपर्यंत होती, व शेवटपर्यंत तिच्या नांवानें तो प्रार्थना करीत असे हें मागें[1] सांगितलेंच

---

१. पृष्ठें ७३६-७३८ पाहा. 'सम्पादक'

आहे. [1] आतां वरील गुण आमच्या नवीन मंडळींत कितपत आढळतो हें जर पाहिलें तर एकाद्या आणीबाणीच्या विवाहादि प्रसंगीं जरी तो पूर्ण उदयास येतो, तरी सामान्यतः पाहतां त्याचें तेज मलिनच दृष्टीस पडतें. कित्येक ठिकाणीं तर यासंबंधानें पाहतां एका महाराष्ट्र-कवीचें वर्णन सर्वथा प्रत्ययास येतें. [2] आतां या वर्तणुकीचें मुख्य बीज काय हें जर पाहिलें, तर पाश्चात्य विद्येच्या योगानें उत्पन्न झालेला मूर्खपणाचा गर्व हें तें होय यांत संशय नाहीं. या विद्येचें फळ आजपर्यंत काय दृष्टीस पडत असे तें सर्वांस माहीत आहेच. तींत यत्किंचितही प्रवेश होतांक्षणींच आपली पूर्वजपरंपरा मूर्खत्वाचें केवळ आगर होती या महातत्त्वाची तात्कालिक स्फूर्ति सर्वांच्या मनांत होत असे. मग असें असल्यावर वरील परंपरेंतील

---

१. Prayers and meditations ( प्रार्थना आणि मनन ) या नांवाचा एक भाग जॉन्सन्च्या ग्रंथांस जोडलेला आढळतो, त्यांत पुढच्यांसारखे उल्लेख सांपडतात—

"I went to chruch, after sermon. I recommended Tetty ( बायकोचें लाडकें नांव ) in a prayer by herself, and my father, mother and brother in another."

हा मरणोत्तर प्रार्थना करण्याचा प्रकार ख्रिस्ती लोकांस मान्य नाहीं; कारण जिवंत असतां जें पापपुण्य झालें असेल त्याप्रमाणें त्या त्या मनुष्यास अक्षय्य स्वर्गवास किंवा अक्षय्य नरकवास भोगावा लागणार असें त्यांचें मत आहे. यास्तव मेल्यानंतर प्रार्थना करणें हें मेल्यानंतर औषधोपचार करण्यासारखेंच केवळ व्यर्थ होय असें ते समजतात. असें असतां जॉन्सन्चा वरील प्रघात शेवटपर्यंत चालू होता. आपल्या बायकोचा मरण-दिवस तर तो उपोषणांत घालवी हें मागें * सांगितलेंच आहे. असो; वरील सर्व प्रकार यत्किंचित् ध्यानांत आणला असतां हिंदु लोकांचे श्राद्धादि आचार निखालस वेडगळपणाचेच असें थोडयांसच वाटेल!

२. नामदेवाचा अभंग आहे—

कलियुगाचे मुळें झालें धर्माचें वाटोळें ।
पलंगीं बैसवूनि राणी माते हातीं आणवी पाणी ।
स्त्रिये पाटावाची चोळी माता अखंड चिंध्या गाळी ।
ऐसा कलियुगाचा महिमा म्हणे विष्णुदास नामा ॥

ही तर चौदाव्या शतकांतली गोष्ट. पण एकोणिसाव्या शतकांत व 'सुधार-लेल्या इंग्रेजी राज्यांत' वरील अभंगावरही कडी होणार हें वरील कवीच्या ध्यानीं मनींहि नसेल! आपल्या अगाध ज्ञानवैभवास शोभत नाहींत म्हणून प्रत्यक्ष आई-बापांस टाकून दिलेले व श्राद्धास ब्राह्मण जितके असतील तितके घालावे म्हणून मातोश्रीशीं विनोद केलेले सत्पुत्र इंग्रेजी विद्येस व आर्यजननीस केवढे भूषणास्पद होत हें सांगायाला नको!

* पृष्ठें ३३६-३३८ पाहा.

शेवटलीं जीं मातापितरें तीं तरी वरील कोर्टांतून कोठून सुटणार! खरोखरच, जर ज्ञान हें थोरपणास कारण आहे, तर ग्रहणसमयीं राहूचा जप करीत बसणारा, कलकत्ता ही इंग्रेजांची विलायत ह्मणून समजणारा, व बेरीज–वजाबाकीच्या पलीकडे ज्याचें ज्ञान सांऱ्या जन्मांत गेलें नाहीं, असा महामूर्ख बाप कोणीकडे; व सारें आकाश ज्यानें धुंडाळून काढलें आहे, साऱ्या पृथ्वीचा नकाशा ज्यास मुखोद्गत येत आहे, व शून्य-लब्धीपर्यंत मजल मारून जो केवळ गणिताब्धि होऊन राहिला आहे, असा द्विग्विजयी लेग्व कोणीकडे! त्याप्रमाणेंच आलीकडील महान् महान् युरोपियन् राष्ट्रांनीं शोधून काढलेल्या नव्या देवाचें शुद्ध सुधारलेल्या रीतीनें नेत्रमीलनपूर्वक ध्यान करून एक-दांच आठां दिवसांचें जो अघमर्षण करून टाकतों अशा पुत्रानें आपल्या वेड्या आईस दररोज देवधुपारतीची कटकट करतांना व धोंड्याच्या दगडाच्या पायां पड-तांना जर पाहिलें तर त्याच्या ठायीं तिजविषयीं अवज्ञा कशी बरें उत्पन्न होणार नाहीं! खरें आहे; इंग्रेजी पुस्तकें वाचून जो जाडा विद्वान् झाला व मिशनरींच्या प्रसादानें ज्याच्या अंतःकरणांत सद्धर्मप्रकाश फांकला त्यास आपल्या मूर्ख व मूर्तिपूजक आई-बापांची लाज कां बरें वाटणार नाहीं!

४. आतां वरील सदराच्या संबंधानेंच धर्म या विषयावर कांहीं विचार मनांत येण्यासारखे आहेत, ते येथें दाखल करून सदई अंक आटपतों. मागें[1] सांगण्यांत आलेच आहे कीं, जॉन्सन् हा भाविक ख्रिस्ती होता. लहानपणीं त्याच्या आईबापांनीं जीं धर्मसंबंधीं मतें त्याच्या मनांत भरवून दिलीं होतीं तींच त्यानें शेवटपर्यंत ठेवलीं, व त्यांच्याच तर्फेनें तों नेहेमी मांडत असे. कॉलेजमध्यें असतांना त्याच्या मनांत बरीच चलबिचल होऊन ख्रिस्ती धर्माची चेष्टा करणें व त्याच्या विरुद्ध प्रतिपादन करणें यांत सुद्धां त्याला मौज वाटायाला लागली होती; पण पुढें कांहीं काळानें त्याचें त्यासच तें वाईट वाटायाला लागून तो पक्का भाविक बनला. आतां येवढ्या उल्ले-खांवरून किती गोष्टी सिद्ध होतात पाहा! एक तर ख्रिस्ती धर्माचें गौरव त्याच्या अनुयायांच्या तोंडून जें ऐकूं येतें कीं, तो ईश्वरप्रणीत असल्यामुळें तो स्वीकारल्या-बरोबर सर्व संशय छिन्न होऊन मनास अप्रतिम शांतिसुखाचा अनुभव होऊं लागतो हें बिलकुल खरें नाहीं. खरें असतें, तर जॉन्सन् हा जन्मतःच सत्यधर्माचा असून व पवित्र सत्याचा त्यास लहानपणापासून सारखा बोध चालला असतां व तें तो आचरीत असतां कॉलेजचें वारें लागतांच त्यास स्वधर्माची टवाळी करण्याची कां इच्छा व्हावी![2]

---

१ पृष्ठ ७४४ पाहा. 'सम्पादक'

२. मेकॉलेसाहेबांनीं एका निबंधांत मोठें संतोषपूर्वक लिहिलें आहे—

"In this way, undoubtedly, the progress of science may indirectly serve the cause of religious truth. The Hindu mythology, for example, is bound up with a most absurd geography. Every

(पुढें चालू)

यावर कोणी सद्धर्माभिमानी प्रतिपक्षी कदाचित् ह्मणतील कीं, त्या वेळेस त्याची बुद्धि परिपक्क झाली नव्हती ह्मणून वरील उपहासास तो प्रवृत्त झाला; तर तसेंही केवळ निवळ ह्मणता येत नाहीं. का कीं पुढें जरी नास्तिकपणा अगदीं सोडून देऊन जॉन्सन्नें शेवटपर्यंत अत्यंत भाविकपणाची वृत्ति धारण केली; तरी हें केवळ भक्तीच्या बळानें त्यानें केलें. स्वतः सर्वथा छिन्नसंशय होऊन कोणी वाद करायाला उभा राहील त्याशीं सामना घालण्यास तो तयार झाला असें कधींही झालें नाहीं,¹ हें त्याच्या'चरित्रा'वरून तर जागोजाग दिसतेंच आहे, व शिवाय मिल्टन्, ह्यूम्, गिबन्, यांनीं इंग्लंडांत व व्हॉल्टेर्, रूसो, वगैरे मंडळीनें फ्रान्स देशांत खिस्ती धर्मावर सारखा तडाका चालवला असतां प्रस्तुत महापंडित नुसते मूग गिळून आगच्या जागीं बसला यावरून काय मनांत येतें बरें ? ज्यानें इंग्रेजी भाषेचें परिज्ञान सर्वांस व्हावें ह्मणून कित्येक वर्षेंपर्यंत सतत परिश्रम केले, त्यांस बहुश्रुत करण्याकरतां दोन निबंधावलि लिहिल्या, व आपल्या देशाच्या कर्वींच्या कीर्तीस उज्ज्वलित केलें, त्यानें स्वधर्माच्या रक्षणार्थ कांहींच खटपट करूं नये काय ? इंग्रेजी भाषेंतील एकाद्या शब्दाची व्याख्या बरोबर न समजली, किंवा

---

young Brahmin, therefore, who learns geography in our colleges, learns to smile at the Hindu mythology."

Ranke's *History of the Popes.*

वरील वाक्यें वाचून मनुष्यस्वभावाचा चमत्कार कोणास वाटणार नाहीं? काय मौज आहे पाहा, कीं पदार्थविज्ञानांतील प्रत्येक शोध पवित्र शास्त्रास पदोपदीं खोडून टाकीत असतां आमच्या साहेबांस आपल्या जवळचें उदाहरण देतां आलें नाहीं; हिंदुधर्माकडे बोट दाखवणें भाग पडलें ! विद्येच्या तेजापुढें खोटे धर्म लोपून जातात हें जर खरें आहे, तर त्याच तेजानें खिस्ती धर्माचें मंडन न होतां विद्यालयीन लोकांची प्रवृत्ति त्याचीही विटंबना करण्याकडेच होते, हें मोठें नवल नव्हें काय !

१. याप्रमाणेंच एका आलीकडील ग्रंथकाराचा अभिप्राय आहे—

"If his political opinions were srtong, his religious ones were stronger still, and after wavering, even disbelieving, at one time, and for some years "caring for none of these things," he became one of the most sincerely believing, and truly pious Christians that ever professed the faith of the Gospel. That he had very minutely, or very learnedly, examined the various points of contoversy connected with this most important subject cannot be affirmed, nor even that he had with adequate patience, and with undisturbed calmness, scrutinized the foundations of his own general belief. His extreme anxiety to believe, his nervous dread of finding any cause for doubt; his constitutional want of some prospect on which to fix his hopes; his excessive alarm at the appearance of any cloud arising over that prospect prevented him from possessing his soul in the perfect peace and unruffled serenity necessary for him who would rise to the height of this great argument, nay indisposed him altogether to enter upon the discussion" Lord Brougham—*Johnson.*

एकाद्या प्रसिद्ध काव्याचें गुणदोषज्ञान यथास्थित झालें नाहीं, म्हणजे जी हानि होणार ती आत्म्याच्या हानीपेक्षां मोटी आहे काय? तेव्हां स्वभावतःच दुर्बळ अशा पक्षाच्या समर्थनाविषयीं त्यानें व्यर्थ यातायात केली नाहीं असें म्हटलें पाहिजे. असो; दुसरी गोष्ट वरील उल्लेखावरून अशी ध्यानांत आणायाची कीं, जॉन्सन् हा ख्रिस्ती धर्माचें अनुसरण जो करीत होता तें केवळ पूर्वसंस्कारामुळें व हट्टामुळें, बुद्धिपुरःसर म्हणून नव्हे; तेव्हां मिशनरी साहेबांचे स्वधर्माच्या तर्फेचें मोठें प्रमाण जें, कीं पाहा येवढा तत्त्वज्ञ बेकन्, येवढा गणिती व येवढा शोधक न्यूटन्, येवढा कवि मिल्टन्, येवढा ग्रंथकार जॉन्सन्, पण हे सर्व ख्रिस्तचरणीं सदा लीन असत; मग येवढ्या बड्या मंडळींनीं 'अंतःकरणपूर्वक पाळलेला' जो धर्म त्याच्याकडे येथील तरुण विद्वानांनीं दुर्लक्ष करावें काय? व त्याची टवाळी करावी काय?—हें प्रमाण: अर्थातच लटपटून जातें. ज्याच्या बुद्धीस यत्किंचित्‌ही प्रखरत्व आहे त्याच्या सहज लक्षांत येईल कीं, वरील सर्व मंडळी इतर कोणत्याही देशांत उत्पन्न झाली असती तरी तेथलाही धर्म ती बरच्यासारखाच 'अंतःकरणपूर्वक पाळती'!

आतां वरील उल्लेखापासून एतद्देशीयांनीं विशेषतः कोणता बोध ग्रहण करण्यासारखा आहे तो सांगतों. एक तर अर्थात् हा कीं शुभवर्तमानासारख्या लटपटीत शास्त्रावर भरंवसा ठेवूनही प्रस्तुत पंडितास जर पारमार्थिक लाभ झाले,—म्हणजे दया, शांति वगैरे सद्गुण त्याचे ठायीं नांदून दुराचारापासून त्याची निवृत्ति झाली—तर वरील पुस्तकाहून फार मोठ्या योग्यतेचे आमच्या लोकांत जे धर्मग्रंथ सर्वप्रसिद्ध आहेत त्यांचा आश्रय केल्यानें तर किती अधिक फळ होईल! तर या दुसऱ्या ग्रंथांवर जे पूर्ण भाव ठेवून चालत असतील त्यांस नांव ठेवणें हें बरोबर नाहीं; का कीं, त्यांचा त्यांवर जर पूर्ण विश्वास आहे, व हा विश्वास बैबलासारख्या ग्रंथावर ठेवल्यानेंही पूर्वोक्त फळ जर प्राप्त होत आहे, व त्यामुळेंच तो विश्वास निंद्य होत नाहीं, तर आमच्या देशांत जे मोठमोठे मुमुक्षु होऊन गेले व त्यांनीं आध्यात्मिक ज्ञानावर जे सर्वमान्य ग्रंथ करून ठेवले त्यांचें अनुकरण केलें असतां तें मात्र निंदास्पद का व्हावें? अगदीं तान्ह्या मुलाच्या डोक्यावर पाद्रीसाहेबांनीं आपल्या पवित्र हातानें पाण्याचे चार थेंब टाकले म्हणजे त्याचा नरकवास चुकून तें मोक्षास जाण्यास योग्य होतें हें मत जर अत्यंत समंजस होय, तर गंगेसारख्या महानदींत मज्जन केल्यानें पापक्षालन होतें हें मत कशानें बरें वेडगळ झालें? येशूनें वादळ शांत करून तो समुद्रावरून चालत गेला, व सरतेशेवटीं थडगें फोडून वर येऊन लोकांदेखत आकाशांत आपल्या बापाकडे गेला, हा जर पवित्र इतिहास, व त्यावर शंका काढणें हें अघोर पाप; तर सेतुबंधाची कथा किंवा तुकारामबोवांचें स्वर्गारोहण हें तरी कशावरून खोटें? पवित्रशास्त्रांत खोटा भूगोल, खोटी जगदुत्पत्ति, खोटें पदार्थविज्ञान, वेडगळ मतें, अप्रयोजक व बीभत्स कथा हें सर्व साहित्य भरपूर असूनही तें जर ईश्वरप्रणीतच आहे, तर पृथ्वींतील इतर सारे धर्मग्रंथ तरी मनुष्यकृतच होत यास तरी काय प्रमाण?—

तर याप्रमाणें आमच्या बिचाऱ्या निराश्रित धर्मावर जे जे कोट्या करायास सरसावतात त्यांनीं जर शांत व निःपक्षपात बुद्धीनें विचार केला, तर त्यांस खचीत आढळून येईल कीं, जे जे आक्षेप त्यांस येथील लोकांवर व त्यांच्या धर्मावर आणतां येतील तेच आक्षेप, किंबहुना त्यांहूनही अधिक, परद्वीपस्थ लोकांवर व त्यांच्या धर्मावर सहज घेतां येणार आहेत; यास्तव असल्या वादग्रस्त विषयावर उगाच हुजत घेत बसणें व एकमेकांच्या रिकाम्या कुटाळक्या करण्यांत कालक्षेप करणें यांत कांहीं जीव नाहीं. हें करण्यापेक्षां जो धर्म ज्यास जन्मतः प्राप्त झाला आहे, त्यासच अनुसरून त्यांतच सदाचरणाचा व परमार्थाचा जो मार्ग त्यास सांपडेल तो त्यानें स्वीकारला असतां कलहाचें तोंड मिटेल, अमूल्य कालाचा अपव्यय होणार नाहीं, व खरी धार्मिकताही जगांत वाढेल असें आह्मांस वाटतें. [१]

---

१. जॉन्सन्च्या संभाषणांत एके ठिकाणीं वरच्यासारखाच रोंख आला आहे त्याच्या ओळखीच्या एका बाईनें इंग्लंडचा धर्म सोडून 'क्केकर्स्' ह्मणून एक पंथ आहे तो स्वीकारला, ती हकीकत तिची एक मैत्रीण * त्यास सांगत असतां तो अतिशय संतापला, व त्या धर्मांतर केलेल्या बाईवर त्यानें पुढील वर्षाव केला—

*Johnson*, ( frowning very angrily, ) "Madam, she is an odious wench. She could not have any proper conviction that it was her duty to change her religion, which is the most improrlant of all subjects and should be studied with all care, and with all the helps we can get. She knew no more of the church which she left and that which she embraced, than she did of the difference between the Copernican and Ptolemaick systems.....We ought not, without very srtong conviction indeed, to desert the religion in which we have been educated. That is the religion given you, the religion in which it may be said Providence has placed you. If you live conscientiously in that religion, you may be safe. But errour is dangerous indeed, if you err when you choose a religion for yourself." *Mrs. Knowles* "Must we then go by implicit faith?" *Johnson* "Why, Madam, the greatest part of our knowledge is implicit faith: and as to religion, have we heard all that a disciple of Confucius, all that a Mahometan, can say for himself?" He then rose again into passion, and attacked the young proselyte in the severest terms of reproach, so that both the ladies seemed to be much shocked.

—Boswell's *Life*. Vol. II page 225.

वरील वाक्यांचें मनन करण्यास आह्मी आमचीं ख्रिस्ती भावंडें 'ज्ञानोदय,' 'सत्यदीपिका' आणि या देशाच्या पारलौकिक हितार्थ ह्मणणारे जे मिशनरी लोक त्यांस फार फार शिफारस करतों !

* Mrs. Knowles. ·सम्पादक·

महाजनो येन गतः स पंथाः ।[1]

महाभारत—व्यास.

अंक ४१–(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२)इंग्रेजी राष्ट्राचे गुण जॉन्सन्च्या ठायीं प्रतिबिंबित होण्याचें कारण. (३) निश्चय. (४) अभिमान. (५) सदयत्व. (६) धैर्य. (७) स्वकीयांविषयीं व स्वदेशाविषयीं प्रेम. (८) दोषांचा उल्लेख. (९) तुटकपणा. (१०) ग्रह.

१. प्रस्तुत चरित्राच्या आरंभीं जो थोडा उपोद्घात केला आहे त्यांत[2] असें सांगितलें होतें कीं, इंग्रेज लोकांचा स्वभाव व त्यांचे आचारविचार यांविषयीं त्यांपासून एतद्देशीयांस माहिती होऊन, शिवाय लोकस्थितीच्या सादृश्यामुळेंही इकडील लोकांस स्वहिताच्या बऱ्याच गोष्टी कळतील. आतां वरील दोन्ही प्रकारची माहिती काय काय होण्यासारखी आहे ती सांगतों.

२. सदरील उपोद्घातांत[3] असें लिहिलें होतें कीं, जॉन्सन् यास त्याच्या राष्ट्राचा प्रतिनिधिभूत मानला असतां चालणार आहे; ह्मणजे सामान्यतः इंग्रेज लोकांचा स्वभाव जो आढळतो तो त्याचे ठायीं दिसत असे. अशा व्यक्ति प्रत्येक राष्ट्रांत असतातच; कां कीं मनुष्यास जन्मतः स्थलविशेषाचे संस्कार सहजच लागतात, आणि त्यांतून स्वदेशप्रीति बळकट असली व अन्यदेशीय संस्कार कधींच लागले नसले ह्मणजे मूळ प्रकृति जशीची तशीच कायम राहते. जॉन्सन्चा प्रकार असाच होता. इंग्लंड्चा धर्म, इंग्लंड्ची राज्यव्यवस्था, इंग्रेजी रिवाज, इंग्रेजी विद्या वगैरे सर्व कांहीं अत्युत्तम असा त्याचा मूळपासून जो एकदां ग्रह होऊन गेला होता तो शेवटपर्यंत हलला नाहीं. त्यांतून लंडन् शहराची तर त्यास अशी आवड असे कीं, तें सोडून इंग्लंडांतल्या इंग्लंडांतही देशावर फिरायाला जाणें सुद्धां त्यास आवडत नसे. आपल्या देशांतून बाहेर असा दोनदां मात्र तो पडला; एकदां स्कॉट्लंडास बॉसूवेलूबरोबर गेला तें, आणि दुसऱ्यानें पॅरिस् शहरास थ्रेलच्या बरोबर गेला तें. यांत पहिली मुशाफरी त्याच्या स्वदेशांतीलच ह्मणायाची; दुसरी मात्र खरोखरी बाहेरची, पण तिचा जॉन्सन्नें सांगण्यासारखा कांहीं उपयोग करून घेतला नाहीं. 'गाड्याबरोबर नळ्याची यात्रा' या ह्मणीप्रमाणेंच सरासरी त्यानें प्रवास केला. आपला यजमान व यजमानीण जिकडे जिकडे गेलीं, व पॅरिस् शहरांतील पाहण्यासारखीं स्थलें जीं जीं त्यांनीं पाहिलीं, तें मात्र सर्व यानें पाहिलें. त्याच्यासारख्या विद्वानानें व शोधकानें अशा प्रसंगीं जें औत्सुक्य प्रगट करायाचें व जी जिज्ञासा त्यास वाटायाची, तसा प्रकार त्याच्या त्या वेळच्या रोजनिशींत बिलकुल दृष्टीस पडत नाहीं. हें तर काय, पण जॉन्सन् तेथील लोकांशीं पुरता बोलला सुद्धां नाहीं. त्याला फ्रेंच् भाषा जरी समजत होती, तरी ती बोलण्याचा सराव नसल्यामुळें एतद्देशीय लोकांस तेवढी फुशारकी वाटेल व तेवढाच

१. "थोर पुरुष ज्या मार्गानें गेले तोच हिताचा मार्ग!"

२. पृष्ठ ६७१ पाहा. ३. पृष्ठ ६७१ पाहा. 'सम्पादक'

वर्चस्मा ते आपणावर मिरवतील, या भयास्तव वरील प्रसंगच त्यानें मुळीं टाळले. असो; मग अशा व्यक्तीचे ठायीं स्वदेशजन्य सर्व संस्कार पूर्णपणें कां प्रतिबिंबित होणार नाहींत?

३. आतां वरील गुण कोणकोणते तें सांगतों. एक तर निश्चय. निश्चय म्हणजे जें एकदां करीन म्हटलें तें केल्याखेरीज कधीं सोडायाचें नाहीं. हा गुण प्रस्तुत चरित्रावरून व मागल्या अंकांत[1] सतत उद्योगाविषयीं जो मजकूर लिहिला आहे त्यावरून प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायीं किती पूर्ण होता हें तेव्हांच लक्षांत येणारें आहे. त्यांतून जॉन्सन्चा स्वभाव मूळचा आळशी व त्यांत मज्जारोगाची पीडा, शिवाय दारिद्र्य तर इतकें कीं जेमतेम करून एक एक दिवस पार पाडायाचा; पण इतकें सर्व असतां असल्या विपत्तींतही ज्यानें पंचवीस वर्षे काढलीं, व कोणापुढेंही दैन्य न दाखवतां किंवा कोणाची ताबेदारी न पतकरतां केवळ स्वकष्टानें इतकीं वर्षे आपलें व आपल्या माणसांचें पोषण केलें, त्याची शर्थ कोणास वाटणार नाहीं! पंचवीस वर्षे एकसारखी खळ न पडतां लेखणी चालवणें,—मग लिहिण्यास मन लागो न लागो, प्रकृति बरोबर असो नसो, गृहसंबंधीं अडचणी असोत, दुःखें असोत,[2] कांहींही असलें तरी लेखणीची गति थांबतां उपयोगीं नाहीं. आणि पुनः वर्तमानपत्रांच्या सारख्या क्षणिक महत्त्वाच्या विषयावर लिहायाचें नसून अवघ्या शब्दसमूहाचें परिगणन करून भाषेची एकंदर व्यवस्था करायाची, निबंधरचना करायाची, सर्वमान्य कवींच्या गुणदोषांचें विवेचन करायाचें म्हणजे केवढें दुर्घट आहे हें सांगायास नको! तर या गुणाचें वास्तव्य इंग्रेजी राष्ट्रांत कितपत असेल याची कल्पना सदरील चरित्रावरून वाचकांनीं करावी. वस्तुतः पाहतां आमच्या देशांत वरील लोकांचें प्रभुत्व होऊन प्रस्तुत चरित्र एतद्देशीय भाषेंत लिहिण्याचा योग आला हेंच वरील गुणाचें थोडें प्रमाण आहे असें नाहीं. हा गुण त्यांचे ठायीं नसता तर आजपर्यंत शेंकडों विकट प्रसंग जे त्यांच्यावर येऊन गुदरले तितक्यांतून पार पडून येथील आधिपत्य त्यांच्याकडे जातेंच ना! याप्रमाणेंच अट्लांटिक् महासागरांत दूर एका कोपऱ्यांत पडून राहिलेलें जें बेट होतें,—कीं जें दोन हजार वर्षांपूर्वीं तर कोणास माहीतही नव्हतें, व हजार वर्षांपूर्वीं ज्यास जगांत कांहींच मानमान्यता नव्हती, तें

---

१. पृष्ठें ७४६–७५३ पाहा. 'सम्पादक'

२. 'रँब्लर्' चालवीत असतां जॉन्सन्ची स्थिति कशी होई ही त्याच पुस्तकाच्या शेवटच्या अंकांतील एका उल्लेखावरून दिसून येते:—

"He that condemns himself to compose on stated days will often bring to his task an attention dissipated, a memory embarrassed, an imagination overwhelmed, a mind distracted with anxieties, a body languishing with disease; he will labour on a barren topic till it is too late to change it or in the ardour of invention diffuse his thoughts into wild exuberance, which the pressing hour of publication cannot suffer judgment to examine or reduce.

आज जें वैभवाच्या शिखरास चढलें आहे व सारें जगही त्याच्या उलाढालीस पुरेसें न होऊन विद्या, कला, कौशल्य यांचें तें केवळ माहेरघर होऊन राहिलें आहे, हा तरी वरील अमोलिक गुणाचाच प्रभाव होय !

४. दुसरा गुण अभिमान. अभिमान म्हणजे दुसऱ्याकडून झालेली अवज्ञा तिळमात्रही न सपून स्वतःच्या पराक्रमावरच सर्वथा अवलंबन करण्याविषयींची मनाची साहजिक वृत्ति. हा गुण वरच्याचाच अनुषंगी आहे, व वरच्याप्रमाणेंच उन्नति होण्यास अत्यंत आवश्यक होय. जॉन्सनच्या अंगीं हा किती वसत होता व तो कोणकोणत्या प्रसंगीं पूर्णपणें प्रगट झाला, हें मागें[1] सांगितलेंच आहे. त्यास आपले ऐन उमेदीचे दिवस दारिद्र्यांत व कष्टांत जे काढावे लागले त्याचें तरी कारण वरील मनोवृत्तिच होय. तो घरांतून बाहेर पडल्यावर प्रथमतः ज्या शालाध्यक्षांच्या हाताखालीं कांहीं दिवस राहिला होता,[2] तेथेंच जर कुडुंगी कुत्र्याप्रमाणें नेहमीं पुढें पुढें नाचून तो आपल्या धन्याची सतत मनधरणी करता किंवा पुढें सेक्रेटरी ऑफ स्टेट्[3] साहेबांचा वशिला लागल्यावर त्यांच्या अनुसंधानानें जर राहता तर मध्यान्हकाळची भ्रांत मुळीं नाहींशी होऊन उलट ऐषआरामांतही तो राहता; पण जे खऱ्या तेजस्वी असतात त्यांस मोठ्या धनिकाची किंवा मोठ्या प्रभूचीही ताबेदारी पतकरत नसते. कुत्र्यानें आपल्या सुखाचें वर्णन केलें असतां शेवटीं त्याच्या गळ्यामोंवताल्च्या करकोंचा पाहून लांडगा जसा दचकला, व मागल्या पायीं तडक चालता झाला, त्याप्रमाणेंच परदास्यावर वृथापुष्ट होऊन पडण्यापेक्षां आपलें स्वातंत्र्य राहून बाडीभरडीच (? भाकरी॰सं॰) मिळते आहे तर तिजवरही महात्मे पुरुष संतुष्ट राहतात.[4] तर जॉन्सन्ची याप्रमाणेंच गोष्ट होती. तो पराकाष्ठेचा निःस्पृह असल्यामुळें व खऱ्या धीट असल्यामुळें थोरथोरांची मनधरणी करणें त्याच्या हातून होत नसे. हें तर काय, पण प्रसंग पडल्यास कोणी केवढाही मोठा असला तरी त्याची शोभा करतांना तो मागें पुढें पाहत नसे. शिवाय दुसरा चमत्कार असा कीं, दुसऱ्याकडे हात पसरण्याचा जसा त्यास कंटाळा, त्याप्रमाणेंच दुसऱ्यास स्वतः आश्रय देण्याविषयीं त्याची पराकाष्ठेची उत्कंठा असे. तो स्वकष्टावर मोठ्या पंचाइतीनें निर्वाह

---

१. पृष्ठें ६७७ व ७००–७०४ पाहा. 'सम्पादक'

२. पृष्ठ ६७७ पाहा. 'सम्पादक'

३. लॉर्ड् चेस्टर्फील्ड्. 'सम्पादक'

४. वरील गोष्ट केवळ इंग्लंडासच लागू आहे असें नाहीं. भर्तृहरीच्या 'शतकां'तून व इतर कित्येक कवींच्या ग्रंथांतून राजसेवेचा मुद्दा किती निंद्य केला आहे हें आमच्या संस्कृतज्ञ वाचकांस माहीत असेलच. 'पंचतंत्रा'त व 'हितोपदेशा'त तर एके ठिकाणीं दोन्ही कोल्ह्यांचा जो संवाद चालला आहे तो इंग्लंडांतल्या 'व्हिग्' आणि 'टोरी'च्या वादासारखाच होय !

करीत असतां आपल्या इष्टमित्रांचा समाचार घेण्याविषयीं नेहेमी तत्पर असे, व पुढें पुढें तर कित्येक निराश्रित मनुष्यांस त्यानें आपल्या घरीं बाळगलीं ( लें. ? सं० ) असून त्यांची सान्या प्रकारची वर्दळही तो मोठ्या सहनशीलपणानें सोशी. असो; तर प्रस्तुत ग्रंथकारास व त्याच्या राष्ट्रास साधारण असणारा हा दुसरा गुण होय. इंग्रज लोकांस स्वतःविषयीं किती अभिमान आहे व स्वतंत्रतेस ते किती चाहतात, हें येथें विशेष फोड करून सांगायाला पाहिजे असें नाहीं. इतर देशांप्रमाणेंच त्यांच्यामध्यें हरएक प्रकरणीं परस्परांत मतभेद असतां, व निरंतर राज्यप्रकरणांत वगैरे निकरानें कलह चालले असतां, संकटसमयीं सर्वांनीं एक होणें व सान्या पृथ्वीभर उलाढाल चालली असतां स्वदेशाचें वारें न विसरणें, या दोन गोष्टींवरूनही यांच्या स्वाभिमानाचें स्वरूप कोणाच्याही लक्षांत येणारें आहे. शिवाय परराज्याची गोष्ट तर दूरच, पण स्वराजाचाही जुलूम त्यांस सहन न होऊन त्यांनीं एकाचा[1] शिरच्छेद केला व एकास[2] पळवून लावला, व राजाचे अधिकार आणतां आणतां त्यांनीं अगदीं संपुष्टांत आणून ठेवले आहेत आणि अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्याच्या खालोखाल स्वातंत्र्याचा झेंडा त्यांच्याच देशांत मिरवत असून थोरापासून तों लहानापर्यंत सर्वांस हवें तसें बोलण्याचालण्याची पूर्ण मोकळीक आहे हें जगद्विश्रुतच आहे.

५. तिसरा गुण सदयत्व. या गुणाच्या संबंधानेंही जॉन्सनविषयीं अनेक उल्लेख यापूर्वी केले आहेत. तो बाह्यतः जरी उग्र व उद्दाम दिसे, तरी त्याचें अंतःकरण अत्यंत दयार्द्र असे. 'परदुःखेन दुःखिता विरला' असें जें म्हटलें आहे त्या कोटींतच तो येतो. कोणीही मनुष्य असला आणि त्यानें दुःखाक्रोश केला तर तो त्यास बिलकुल सहन न होऊन तो यथाशक्ति त्याच्या संकटाचें निवारण करी. जे निराश्रित व दुबळे त्यांस त्याचें घर धर्मशाळेसारखें असे, असें त्याच्या एका मित्रानें म्हटलें आहे. तो स्वतः थ्रेलच्या घरीं निरंतरच्या पाहुण्यासारखा राहत असतां त्याच्या घरांत कोणती मंडळी भरली असे व त्याच्या पेन्शनवर कोणाचा सतत निर्वाह चालला असे, हें यापूर्वी[3] अनेक वेळां सांगितलेंच आहे. स्वतः इतका आळशी कीं बारा बारा, दोन दोन वाजेतोंपर्यंत आंथरुणांतून हलायाचा नाहीं. पण छापखानेवाल्यानें सांगितलें पुरें, कीं जर आज मजकूर आला नाहीं, तर ठसे जुळणाराची आजची मिळकत बुडून त्यास उपास काढावा लागेल, कीं स्वारी लागलीच उठून कामाला लागे. त्याचें नांव मोठें व त्यामुळें पुष्कळ मोठमोठ्या लोकांशीं त्याचा परि-

---

१. पहिला चार्लस् ( १६००–१६४९ ) याचा ३० जानेवारी रोजीं शिरच्छेद करण्यांत आला. 'सम्पादक'

२. दुसरा चार्लस् ( १६३०–१६८५ ) हा १४ जून १६४५ रोजीं नेस्बी ( Naseby ) च्या लढाईनंतर इंग्लंडांतून पळून गेला. 'सम्पादक'

३. पृष्ठे ७२९ व ७३७ पाहा. 'सम्पादक'

चय जडला असे, यास्तव आपल्या मित्रांस किंवा त्यांच्या तर्फेनें इतर मनुष्यांस तो शेंकडों वेळां शिफारसपत्रें देई; यांपैकीं पुष्कळ बॉसूवेलच्या 'चरित्रां'त आढळतात. असो; तर हाही गुण त्याच्या राष्ट्राचे ठायीं नांदणाऱ्यांपैकींच होय. हें ह्मणणें आमच्या विपन्न देशबंधूंस कदाचित् व्याजोक्तीचें वाटेल, किंवा येथील राज्यकर्त्यांची खुशामत करण्याकरतां लिहिलें आहे असें वाटेल; पण तसें बिलकुल नाहीं. सदरील राष्ट्राची आमच्या देशांत जी वर्तणूक दृष्टीस पडते, तीस वरील गुणाचें नांव सर्वथा लावतां येणार नाहीं हें खरें; पण तिचीं कारणें पाहूं गेलें असतां निराळींच सांपडतील. तीं सर्वांस सहज समजण्यासारखीं असल्यामुळें व येथें त्यांचें कारण नसल्यामुळें प्रस्तुत स्थलीं देत नाहीं. इतकेंच सांगणें बस आहे कीं, वरील लोकांचें आचरण त्यांच्या मूळ जागीं जर पाहिलें तर त्यांच्या एकंदर राज्यरीतीवरून, त्यांचीं शेंकडों धर्मार्थ कृत्यें जीं ह्मपाट्यानें निरंतर चालू आहेत त्यांवरून, गुलामांच्या मुक्तयर्थ त्यांनीं कोट्यवधि रुपये खर्चले, व हॉवर्ड्, क्लार्क्सन्, फॉसेट्[१] यांच्यासारखे उदार पुरुष त्यांच्या देशांत निरंतर निपजत आहेत यावरून, वरील उल्लेखाची सार्थकता निःपक्षपात मनुष्यांच्या नजरेस आल्यावांचून राहणार नाहीं.

६. चवथा गुण धैर्य. धैर्य हें दोन प्रकारचें आहे; एक मानसिक व दुसरें शारीरिक मानसिक धैर्य ह्मणजे जो एकदां संकल्प केला तो कितीही प्रत्यवाय आले तरी तडीस नेऊन पोंचवणें, जें आपल्या मनास प्रमाणसिद्ध सत्य वाटलें तें बेधडक बोलून दाखवणें, लोकमताचे अंधपरंपरान्यायानें अनुसरण न करतां केवळ प्रांजलपणानें व स्वतंत्रबुद्धीनें तत्त्वशोध करण्याचा यत्न करणें, इत्यादि होय. हें जॉन्सन्च्या अंगीं कितपत होतें, हें यापूर्वी सांगण्यांत आलेंच आहे. आतां दुसरें जें शारीरिक धैर्य ह्मणजे अंगधिट्टाईनें कोणावर चालून जाणें, प्रसंगीं न गडबडणें, हें प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायीं होतें कीं नाहीं, याविषयीं त्याच्या 'चरित्रां'त दाखले आहेत. त्यांवरून पाहतां हाही गुण त्याच्या अंगीं पूर्ण होता असे ह्मणण्यास हरकत नाहीं. तो लष्करी खात्यांत कधींही शिरला नाहीं,—एकदां मात्र लंडनच्या शिबंदींत कांहीं दिवस राहून निशाण मारण्याचा वगैरे त्यानें थोडा अभ्यास केला होता,—तरी खऱ्या शिपायांचे गुण जें धैर्य व प्रसंगावधान तें त्याच्या अंगीं पुरतेपणीं होतें. तो अंगानें चांगला घट्टाकट्टा असून जोरदार असल्यामुळें मारामारीपर्यंत येऊन बेतली असतांही मागें घेत नसे, याविषयीं मागें[२] एक दोन उदाहरणें दिलींच आहेत. त्यांशिवाय बॉसूवेलच्या ग्रंथांत आणखी

१. John Howard (1726–1790) Thomas Clarkson (1760–1846) Henry Fawcett (1833–1884). पहिल्यानें तुरुंगांत सुधारणा घडवून आणण्यांत आयुष्य खर्चलें. याच प्रयत्नांत असतां रशियांत भयंकर ताप येऊन हा मेला. दुसऱ्यानें गुलामांच्या उन्नतीकरतां होणाऱ्या चळवळीस आयुष्य वाहिलें. तिसरा विख्यात अर्थशास्त्रज्ञ होता. 'सम्पादक'

२. पृष्ठें ६७६–६८१ पाहा. 'सम्पादक'

पुढील उल्लेख आहेत. एके समयीं मध्यरात्र उलटून जाऊन जॉन्सन् आपल्या नित्यक्रमाप्रमाणें जागत बसला असतां एकदम त्याच्या दारावर कोणीं मोठ्यानें ठोठावलें. तें ऐकतांच शेकोटी[1] ढवचण्याचा दांडा हातांत होता, तोंच घेऊन स्वारीनें दार उघडलें. पाहतो तों दार ठोठावणारे चोर नसून कॉलेजांतले दोघे स्नेही होते. मग त्यांच्या बरोबरच बाहेर पडून हिंड हिंड हिंडून व पुष्कळ हूडपणा करून प्रहर दिवसास बोवा बिऱ्हाडीं आले. याप्रमाणेंच बॉस्वेलूबरोबर स्कॉट्लंडावर जी मुशाफरी केली, तींत अनेक वेळां समुद्रावर वादळ सुटून होडी डबघईस आली होती, व इंग्लंडांत तर दोघांचीही गच्छंती झाल्याचें वर्तमान सुद्धां पत्रांतून जाहीर झालें होतें; पण असल्या प्रसंगींही जॉन्सन् बिलकुल डगमगला नाहीं. बॉस्वेल्नें भय प्रदर्शित केलें असतां त्यास तो उलटा रागें मात्र भरे. त्याच्या मित्रमंडळांत बोक्लार्क् ह्मणून एक खानदानींचा गृहस्थ होता. तो आपल्या शेतवाडीच्या बंगल्यांत जाऊन राही, तेव्हां जॉन्सन् त्याच्या घरीं आतिथ्य अनुभवण्यास कधींमधीं जाई. अशा वेळचें आपल्या मित्राचें आचरण बोक्लार्क् मंडळींत सांगे. तें हें कीं, त्याच्या दाराशीं भले जंगी कुत्रे पाळलेले असत; असे कीं, पटाईत चोरांसही त्यांची वचक वाटावी. पण जॉन्सन् त्यांस बिलकुल मोजीत नसे. एकदां तर दोघांची झोंबी लागली असतां, तो त्यांच्या अंगांवर जलदीनें धांवत गेला; आणि दोघांच्या डोक्यांवर दोन ठुस्से लगवून त्यानें त्यांस पळवून लावलें. शेवटल्या क्लेशदायक दुखण्यांतही प्रस्तुत ग्रंथकारानें वरील धैर्यवृत्ति प्रगट केली. पोटांतलें पाणी काढण्याकरतां त्यानें अनेक वेळां शस्त्रप्रयोग करून घेतले. तशा वेळीं खुद्द डॉक्टरही भ्रीत; पण तो स्वतः बिलकुल कचरला नाहीं. तसाच त्याचा शेवटही अगदीं स्वस्थपणानें झाला. असो; तर हा गुणही जॉन्सन्च्या राष्ट्राचे ठायीं आढळणारा आहे. हा वर सांगितलेल्या दोन्ही प्रकारांनीं इंग्रेज लोकांचे ठायीं कितपत वसत आहे, याविषयीं त्यांचाच इतिहास काय पण साऱ्या जगाचा इतिहासही स्पष्टपणें सांगत आहे, असें ह्मणण्यास कांहीं हरकत नाहीं.

७. स्वकीयांविषयीं व स्वदेशाविषयीं प्रेम. ही वृत्तिही जॉन्सन्चे ठायीं बळकट असून त्याच्या देशबंधूंचे ठायीं तशीच आढळणारी आहे. स्वकीयांविषयीं प्रेम ह्मणजे आईबाप वगैरे वडील माणसांवर भक्ति, इष्टमित्रांविषयीं स्नेह वगैरे होय; व स्वदेशप्रीति ह्मणजे आपल्या राजाच्या ठायीं निष्ठा; धर्माविषयीं पूज्यबुद्धि, व सामान्यतः सर्व गोष्टींविषयीं योग्य अभिमान असणें हें होय. वरील निरनिराळ्या वृत्ति जॉन्सन्चे ठिकाणीं कसकशा होत्या हें यापूर्वी अनेक वेळां सांगितलेंच आहे; आतां त्याच त्याच्या राष्ट्राच्या ठायीं आहेत. कीं नाहीं (त १ सं०) याविषयीं मात्र लिहायाचें. प्रथमतः स्वकीयांकडे ओढा हा प्रस्तुत राष्ट्रांत कितपत

१. इंग्लंडांत अतिशयित थंडी असल्यामुळें शेकोटी बहुधां बाराहि महिने पेटलेली असते, व यास्तव तिजकरतां एक निराळी जागाच केलेली असते, हें वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच.

असतो, याविषयीं दुसरें मोठें प्रमाण नको;– 'home', 'hearth' इत्यादि शब्दांत किती प्रेम सांठवलें आहे, व इंग्रेजी कवितेंत वगैरे त्यांविषयींचे उल्लेख किती सहृदयत्वाचे असतात, यावरूनच वरील गोष्टीचा निकाल होणार आहे. तसेंच कोणत्याही प्रख्यात मनुष्याचें चरित्र वाचलें असतां त्यांत बहुधा वरील प्रकारचा मजकूर सांपडेलच सांपडेल. कोणास आपल्या बापाची लाज वाटून त्यानें त्यास भिक्षा मागायास लावलें आहे, किंवा आईशीं पशुवत् विनोद केला आहे, असें तर कोठेंही सांपडणार नाहीं. त्याप्रमाणेंच इंग्रेज हे स्वभावतःच साहसी व उद्योगी असल्यामुळें त्यांचा पुष्कळ दिवसांपासून साऱ्या पृथ्वीवर व्याप चालू आहे. कोणी चिनांत आहेत, कोणी इराणांत आहेत, कोणी तुर्कस्थानांत आहेत; पण असाही प्रकार कोठें वाचण्यांत किंवा ऐकण्यांत येत नाहीं, कीं कोणी बहादर चिनांत गेल्याबरोबर चौलकर्म करवून सर्वभक्षक बनले, किंवा रूमशामच्या राज्यांत इमाम बनून घरीं आल्याबरोबर आईपुढें गुडघे टेंकून 'अल्ला बिस्मिल्ला अबदुल् रहिमान्' हा कुराणोक्त मंत्र पढायाला लागले! पण आमच्या येथील बड्या बड्या विद्वानांची स्थिति कशी आहे पाहा! युनिव्हर्सिटीचे सोळा संस्कार पूर्ण झाल्याबरोबर जामानिमा करून आईबापांनीं एकदांचें समुद्रांत जहाज लोटावें, व सगळ्या लोकांसही मोठी आशा लागावी कीं, आजपर्यंत आमचे महामूर्ख पूर्वज अटक नदी धरून बसले, पण आतां बरीक ठीक झालें, आतां हिंदुस्थानाची सुधारणा झाल्याखेरीज खास राहत नाहीं,–याप्रमाणें सर्वतोमुख आशीर्वाद अनुभवीत आर्यजननीच्या वीरांनीं आपल्या भूमीचा तीर सोडावा. पुढें कांहीं थोडा काळ जाईपर्यंत आमच्या बहादरांसही वाटावें कीं, आपणांवर सर्वांची येवढी जी भिस्त आहे त्याप्रमाणें आपणांस कांहीं केलें पाहिजे खरें. पण हे विचार सरासरी तांबड्या समुद्रापर्यंत! तोंवर आईबापांचे ठिकाणीं प्रेम, लोणच्यापापडाविषयीं तिखटमीठ लावलेलीं पत्रें, व ज्या समुद्रांत आकाशांतील प्रभूनें मिसरी लोकांच्या राजास सहकुटुंब सहपरिवार बुडवलें व आपल्या लाडक्या लेकरांस तेवढी खाशी कोरडी वाट दिली,[१] त्याच्या पवित्रोदकानें नेत्रस्पर्श करून भगवद्गीतेचे

१. वरील पवित्रशास्त्रोक्त कथेवर रचलेली एक नक्कल * १३ व्या अंकांत दिली आहे ती आमच्या कित्येक वाचकांस आठवत असेलच. असल्या नकला इंग्रेजी पुस्तकांतून येऊं लागल्या. यावरून खिस्ती वाचकांची आस्तिक्यबुद्धि कितपत आहे याची कल्पना बरीच होणारी आहे!

* सदर नक्कल एका चित्रकाराच्या हुशारीसंबंधीं आहे. तिचा सारांश असा:– एका इंग्रेज गृहस्थाच्या मनांत आपण बांधलेल्या देवळाच्या जिन्यांत धर्मपुस्तकांतील कांहीं वृत्तान्ताचें चित्र काढवावें असें येऊन त्यानें एका चित्रकारास 'तांबड्या समुद्रांतून यहुदी लोक पार जाताहेत व मिसर देशचे लोक त्यांचा पाठलाग करताहेत' या प्रसंगास अनुलक्षून चित्र काढण्यास सांगितलें. पण चित्रकारानें ती भिंत झटकन् सगळी येथून तेथून तांबड्या रंगानें सारवून दिली. धन्यानें तें पाहून विचारलें "हें

( पुढें चालू )

पठन,—हे सर्व प्रकार एशिया खंडास सीमाभूत जो वरील पवित्र सागर त्याचें उल्लंघन होईपर्यंत. पण त्यांतून पार पडून सुधारलेल्या युरोपखंडाचें एकदां वारें लागलें व तिकडील रागरंग, मजलशीचे प्रकार, व डंकन् रोड्च्या सवाईच्चीं वेश्यामंदिरें यांत स्त्राऱ्या एकदां भडकल्या, ह्मणजे मग हिंदुस्थान कसला व विद्याभ्यास तरी कसला ! असें करतां करतां वर्ष सहा महिन्यांत विलायती संस्कारांचें आमच्या पंडित मंडळीवर असें जबरदस्त पूट बसून, जातें कीं, मूळचें सर्व बदलून जाऊन ते पक्के इंग्रेज बनतात ! खरेंच, जर येथल्या येथेंच इंग्रेजांच्या नुसत्या भाषेच्याच अल्पमात्र ज्ञानानें आमच्या पंडितांस स्वभाषा येईनाशी होते, आपले आचार सर्व वेडगळ वाटूं लागतात, व पूर्वींचे सर्व लोक सरसकट महामूर्ख मासूं लागतात; तर युरोपांत जाऊन वरील लोकांचें ऐश्वर्य पाहिल्यावर व त्यांच्या देशांतल्या अनेक मौजा जातीनें अनुभवल्यावर तर काय स्थिति होऊन जाईल बरें ! उघडच आहे कीं, जो येथून आगबोटीवर पाय ठेवण्यापूर्वी नुसता यःकश्चित् हिंदु होता, तो कांहीं काळानें इंग्रेजी शिंप्यांच्या हातची विजार,इंग्रेजी दुकानांतून घेतलेली टोपी, इंग्रेजी हवेनें वाढलेली मजेदार दाढी, अशा सुधारलेल्या जिनसा घेऊन माघारा आला, व 'गाडयाबरोबर नळ्याची यात्रा' या न्यायानें ज्याच्या बरोबरचा लोणचेपापडवाला ब्राह्मणही खासा बुटणेर बनून आला, त्यानें परत आल्यावर आपल्या आईबापांस ओळखलें व आपल्या इष्टमित्रांस क्षेमकुशल पुसलें, तर त्याची थोरवी ती काय मग राहिली ! येवढी महायात्रा केल्यानें जें पुण्य संग्रहीं पडलें, त्याचा वऱ्ह्यासारख्या हलक्या लोकांशीं व्यवहार केल्यानें लाड्‌दिशीं क्षय होऊन जाणार नाहीं काय ? असो; तेव्हां एकंदरींत मोठी जेमतेम करून इकडून जी कांहीं मंडळी विलायतेस पाठवण्यांत आली त्यांच्या वर्तनांत व तिकडून इकडे व चोहोंकडे जॉन्सन्चे देशबंधु जे आज शेंकडों वर्षें संचार करीत आहेत त्यांच्या वर्तनांत, जमीनअस्मानची तफावत नजरेस येते असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

---

रे काय ! चित्र झालें ह्मणतोस आणि येथें तर कांहींच दिसत नाहीं ! यहुदी लोक कोठें आहेत?" चितारी ह्मणतो, "महाराज,ते तर गेले समुद्रपार निघून!"—आणि मिसरी लोक?" "वा: महाराज! ते तर समुद्रांत बुडून गेले !" ही गोष्ट बायबलाच्या 'जुन्या करारां'त प्रसिद्ध आहे. यहुदी लोकांचा पैगंबर मोसेस् यानें त्यांस मिसर देशांतील कैदेतून सोडवून परत स्वदेशास आणलें. पण वाटेनें एक मोठा चमत्कार झाला. हे देवाचे लाडके लोक तांबड्या समुद्राशीं येऊन ठेपले. तों पुढें वाट नाहीं, आणि मागून तर मिसर देशचे लोक त्यांच्या पाठीमागें लागलेले ! पण देवाची करणी ! तांबडा समुद्र तेव्हांच दुभंग होऊन त्यानें यहुदी लोकांस वाट दिली ! तें पाहून मिसरी लोकहि आंत शिरले. पण समुद्र कसला लबाड ! त्यानें त्यांस बरेंचसें आंत येऊं दिलें, आणि—'समुद्रास्तृप्यन्तु !' अशाच गोष्टी नानासाहेब बंडवाल्याविषयीं गंगेच्या संबंधें ऐकिवांत आहेत.

'सम्पादक'

हा एक प्रकार झाला; दुसरा स्वदेशविषयक प्रीतीचा. हिचें स्वरूप वर जें सांगितलें आहे, त्यावरूनही लक्षांत येईलच. शिवाय हरएक गोष्टीच्या संबंधानें इंग्रेज लोकांस आपल्या देशाचा अभिमान जो वाटतो; व कोणत्याही तऱ्हेचें दूषण त्यांस बिलकुल न खपून तें ऐकतांच त्यांची तळव्याची आग मस्तकाला जाऊन पोंचते, हेंही त्यांच्या स्वदेशभक्तीचेंच दर्शक होय. आतां ही भक्ति कधीं कधीं अत्युत्कट होऊन दुराग्रहापर्यंत जाऊन पोंचते, व त्यामुळें ती प्रशंसेस पात्र न होतां उलटी गर्हणीयही होते हें खरें आहे; पण कांहीही असलें तरी आमच्या नवीन मंडळींत जी पूर्ण परमहंसता दृष्टीस पडते कीं आपल्या देशाविषयीं कोणीं कांहीही ह्मटलें तरी पूर्ण समाधानवृत्ति प्रगट करायाची, किंबहुना स्वतः जितकीं अप्रयोजक दूषणें त्यावर ठेवायाला सांपडतील तितकीं अवश्य ठेवायाचीं, यापेक्षां वरील हेकटपणाही शंभर वाटेनें बरा. आतां या कलमाच्या आरंभीं इंग्रेज लोकांच्या राजनिष्ठेविषयीं व धर्मनिष्ठेविषयीं जें लिहिलें आहे त्यावर मात्र अंमळ स्पष्टीकरण केलें पाहिजे. वरील उल्लेख कित्येकास कदाचित् विलक्षण वाटेल. कां कीं यापूर्वी अनेक वेळां खिस्ती धर्माविषयीं आह्मीं लिहिलें आहे कीं, त्याचें माहात्म्य दिवसांदिवस अगदीं कमी होत चाललें आहे, व इंग्लंडांतील राजकीय अंमलाविषयीं तर नुकतेंच वर लिहिण्यांत आलें आहे कीं, तो आतां अगदीं बेताबाताचा असून खरी सत्ता राजाच्या हातांत कांहींच उरली नाहीं. मग या दोन्ही गोष्टी जर खऱ्या आहेत, तर इंग्लिश् राष्ट्रांत राजनिष्ठा व धर्मनिष्ठा आहेत हें कसें असा सहजच आक्षेप निघणार आहे. तर याचें उत्तर असें आहे कीं, वरील दोन्ही उल्लेख एकंदर राष्ट्राच्या संबंधाचे आहेत; ह्मणजे धर्मावर अश्रद्धा व लोकस्वत्रंतेविषयीं प्रीति या दोन्ही वृत्ति सुशिक्षित लोकांचे ठायीं जरी आढळतात तरी अशा लोकांखेरीज बाकीचा जो एकंदर लोकसमुदाय त्याचे ठिकाणीं स्वदेशाच्या राजाच्या ठायीं प्रीति व स्वधर्मावर भाव हे पहिल्याप्रमाणेंच कायम आहेत ते आहेत. आतां विद्येचा फैलावा दिवसांदिवस होत चालल्यानें सर्वांस आपापले हक्क व धर्मांतील तथ्य हीं अधिकाधिक कळूं लागलीं आहेत खरीं, तरी शुक्ल द्वितीयेस जसें चंद्राचें बिंब अंशतः मात्र प्रकाशित असून बाकीचा पुष्कळ भाग अंधकारग्रस्त असतो त्याप्रमाणेंच प्रस्तुत राष्ट्राची स्थिति आहे. यापुढें त्याची स्थिति उत्तरोत्तर सुधारत जाऊन कालेंकरून कदाचित् पौर्णिमेचा चकचकाट होईल, पण सध्यांची अवस्था पाहिली तर सज्ञान व अज्ञान लोकांचें प्रमाण सरासरी वर सांगितल्याइतकेंच आहे.

८. येथवर जॉन्सन् व त्याचे देशबंधु यांस साधारण असणाऱ्या गुणांचा निर्देश केला. आतां गुणांप्रमाणेंच दोषांचाही उल्लेख केला पाहिजे. व्यक्तिभूत मनुष्याचे ठायीं गुणदोष जसे साहचर्यानें नेहेमी आढळतातच, किंबहुना गुणांच्या अनुषंगानें दोष व दोषांच्या अनुषंगानें गुण राहावे असाही नियम या मनुष्यलोकांचे ठायीं आढळतो, त्याप्रमाणेंच राष्ट्रासही हा नियम लागू पडेल हें उघडच आहे. वास्तव

यापुढें इंग्रेज लोकांचे ठायीं असणाऱ्या दोषांचें जें निरूपण करायाचें तें विषयानुरोधानें सहज प्राप्त झालें आहे, हें सर्वांच्या लक्षांत येईलच. हें येथें विशेषेंकरून सांगण्याचें कारण इतकेंच कीं, वरच्यासारखा प्रसंग विषयानुरोधास्तव आजपर्यंत जेथें जेथें आला आहे तेथें तेथें आमच्या कित्येक सत्यनिष्ठ व ज्ञाननिष्ठ बंधूंचा असा समज होत आला आहे कीं, येथील राज्यकर्त्यांची निंदा करण्याची आह्मांस अतिशय प्रीति असल्यामुळें आह्मी तसें करण्यास प्रवृत्त झालों आहों. अशा समंजस लोकांची कानउघाडी यापूर्वींच नुकती [१] पुष्कळपणीं केली आहे; यास्तव पुनः येथें इतकेंच सांगणें बस आहे कीं, आमचे लेख कोणाच्याही तरफदारीनें लिहिलेले नसतात. काळ्यांस काळा न्याय व गोऱ्यास गोरा न्याय ही व्यवस्था आमच्या घरची नाहीं. कोणत्याही पक्षाच्या संबंधानें आमच्या बुद्धीस जें खरें वाटेल तें लिहिण्याचा आमचा मूळ संकल्प आहे. तो पाद्री साहेबांच्या पुढें गोंडा घोळायाचा, अधिकाऱ्यांचे आर्जव करायाचें, असा मुळींच नसल्यामुळें प्रस्तुत पुस्तकांतील मजकूर 'ज्ञानोदया'च्या ज्ञानमय लेखाहून व 'दीपिके'च्या सत्यरूप ज्योतीहून पुष्कळ वेळां अत्यंत भिन्न असतो यांत नवल तें कोणतें ? तेव्हां पुढें जें दोषनिरूपण करायाचें आहे तें वरील गुणनिरूपणाप्रमाणेंच केवळ प्रांजलपणानें केलेलें आहे असें समजावें.

९. पूर्वी [२] सांगितलेंच आहे कीं, निश्चय व अभिमान हे गुण प्रस्तुत ग्रंथकाराच्या ठायीं असून त्याच्या राष्ट्रांतही ते तसेच आढळतात. या गुणांचे अनुषंगी दोष ह्मटले ह्मणजे तुसडेपणा व तुटकपणा हे होत. निस्पृहपणानें वागण्याची व कोणाचीही गरज न बाळगतां स्वतःच्या हिंमतीवर नेहेमी राहण्याची ज्यास संवय लागून गेली असते त्याची प्रकृति सहजच तापट बनते. कोणाचेंही मिंधें राहण्याची त्यास गरज न पडल्यामुळें तो अर्थात् कोणाशींही आर्जवानें राहत नाहीं, व यामुळें एकलकोंडेपणा व तिरसटपणा हे गुण त्यास जडतात. जॉन्सन्‌विषयीं यासंबंधाचे उल्लेख पूर्वी [३] अनेकशः केलेच आहेत, कीं कोणी पदवीनें केवढाही थोर असला किंवा त्याचा कितीही परिचित असला तरी वेळ आली असतां त्याचा तामसपणा पूर्णपणें प्रगट होत असे; व एरवीं तो स्वभावानें पराकाष्ठेचा सज्जन असतांही या त्याच्या प्रकृतीस्तवच लोक त्याजपासून दूर राहत. इंग्रेज लोकांचाही एकंदरींत पाहतां हाच स्वभाव आहे. त्यांचा देश साऱ्या युरोपापासून विलग असल्यामुळें बेपर्वाईपणा व तुटकपणा हे गुण त्यांच्या ठायीं जसे आढळतात तसे बहुधा कोणत्याही युरोपस्थ राष्ट्रांत आढळणार नाहींत. आतां हें खरें कीं, या वृत्तींच्या योगानेंही त्या देशाचें

---

१. पृष्ठे ६५०-६६० पाहा. 'सम्पादक'
२. पृष्ठे ७६३-७६४ पाहा. 'सम्पादक'
३. पृष्ठे ७००-७०४ पाहा. 'सम्पादक'

कांहीं अंशीं कल्याण झालें आहे; तरी कांहीं असलें तरी त्या दोषरूप होत यांत संशय नाहीं.[१]

१०. पण वरच्याहूनही एक मोठा दोष पूर्वोक्त गुणांपासून उत्पन्न होणारा आहे; तो तसाच जॉन्सन् यांत व एकंदर इंग्रज लोकांत साधारणभूत आहे. हा कोणता तर दुराग्रह होय. बॉस्वेल्चें 'चरित्र' समग्र वाचलें असतां जॉन्सन्सारख्या थोर व पोक्त बुद्धीच्या मनुष्यासही हरएक विषयासंबंधीं किती विलक्षण ग्रह जडलेले असत ते सर्व स्पष्ट दिसतात, व त्यांचा वाचकांस अतिशयित अचंबा वाटल्यावांचून राहत नाहीं.[२] या ग्रहांपैकींच आपल्या देशाची सर्व प्रकारें स्तुति व परदेशांची बहुधां सर्व गोष्टींच्या संबंधानें निंदा करण्याची जी त्याची प्रवृत्ति वरील ग्रंथांत भरपूर दृष्टीस पडते ती होय. एशियाखंडांतील दूर व अप्रसिद्ध राष्ट्रांची गोष्ट तर दूरच, पण फ्रान्स,

---

१. वर सांगितलेलें दूषण कित्येक राजनिष्ठ मंडळींस कदाचित् स्वकपोलकल्पित वाटेल, यास्तव त्यांच्या प्रत्ययार्थ तिकडचींच कांहीं प्रमाणें दाखल केलीं पाहिजेत. गोल्ड्स्मिथ्नें 'मुशाफर' या नांवाच्या काव्यांत आपण पाहिलेलीं युरोपांतील राज्यें मुख्य मुख्य वर्णिलीं आहेत, त्यांत स्वदेशाविषयीं त्यानें लिहिलें आहे:—

"That Liberty, which Britons prize too high.
Keeps man from man, and breaks the social tie.
The self-dependent lordlings stand alone
All claims that bind and sweeten life unknown."

आपल्या देशबंधूंचें वर्तन एका ओळींत त्यानें वर्णिलें आहे:—

"Pride in their port, defiance in their eye!"

पण दूर कशाला ! खुद्द जॉन्सन्चाच अभिप्राय पाहा.—

"Though a stern trueborn *Englishman*, and fully prejudiced against all other nations, he had discernment enough to see and candour enough to censure, the cold reserve too common among Englishmen towards strangers. "Sir" said he, "two men of any other nation who are shown into a room together, at a house where they are both visitors, will find some conversation. But two Englishmen will probably go each to a different window, and remain in obstinate silence. Sir, we as yet do not enough understand the common rights of humanity." —Boswell's *life*.

२. "The characteristic peculiarity of his intellect was the union of great powers with low prejudices. If we judged of him by the best parts of his mind, we should place him almost as high as he was placed by the idolatry of Boswell; if by the worst parts of his mind, we should place him even below Boswell himself. Where he was not under the influence of some strange scruple, or some domineering passion, which prevented him from boldly and fairly investigating a subject, he was a wary and acute reasoner, a little too much inclined to scepticism, and a little too fond of paradox. No man was less likely to be imposed upon by fallacies in argu—

(पुढें चालू)

स्कॉट्लंडासारखे जवळचे देश व ग्रीक्, रोमन् यांसारखीं साऱ्या अर्वाचीन सुधारणेस मूलस्तंभभूत व जगत्प्रसिद्ध राष्ट्रें हींही प्रस्तुत महापंडिताच्या तडाक्यांतून सुटलीं नाहींत. सर्वांवर पाळीपाळीनें त्याच्या वाक्शस्त्राचा तीव्र प्रहार झालेला आहेच. ग्रीक् व रोमन् लोकांविषयीं जॉन्सननें एकदां असें मत प्रदर्शित केलें कीं, तें सामान्यत: पाहतां रानटीच असावें; का तर त्यांच्यांत छापखाने नसल्यामुळें ज्ञानप्रसार होण्याचें साधन त्यांस मुळींच अनुकूल नव्हतें. स्कॉच् व फ्रेंच् यांजविषयींही तो नेहेमी अत्यंत तिरस्कार प्रगट करीत असे. तो म्हणे, या लोकांसारखे गलिच्छ लोक कोणतेही नसतील! या भयंकर आरोपाचें कारण येवढेंच झालें कीं, तो पॅरिस शहरांत होता तेव्हां एका फ्रेंच् चाकरास भुईवर थुंकून ती थुंकी बुटानें पुसून टाकतांना त्यानें पाहिलें; व तसेंच एडिन्बरो शहरांत तो एका खानावळींत उतरला असतां त्यानें साखर मागितली ती एका चाकरानें हातांत आणून त्याच्यापुढें केली. या पाजीपणाच्या कृत्याचा जॉन्सन्ला त्या वेळेस इतका राग आला होता कीं, त्यास उचलून खिडकींतून खालीं झुगारून द्यावा असें त्यास वाटलें!![1] फिनिशियन् लोक प्राचीन काळीं मोठे नामांकित नाविक होते; व जेव्हां होकायंत्राची माहिती नव्हती, व समुद्रांचे नकाशे वगैरे बिलकुल साधन नव्हतें, अशा काळींही सगळ्या भूमध्यसमुद्रभर ते हिंडत व ब्रिटन्सारख्या दूरदूरच्या बेटांशींही त्यांचा व्यवहार चालत असे, यावरून तर त्यांच्या नाविकज्ञानाचें व धाडसाचें अतिशयित आश्चर्य वाटतें! पण अशा लोकांचीही प्रशंसा जॉन्सन्च्या ज्ञानमय कर्णरंध्रांस दुःसह होई. एके प्रसंगीं त्यांच्या नाविकविद्येची कोणी वाखाणणी करीत असतां त्याचा उद्गार निघाला, "काय हो! यांची ती काय मोठी तारीफ करतां! कुत्रीं नाहींत का पोहत!" चिनी लोक रानटी का सुधारलेले या-

ment, or by exaggerated statements of fact. But if, while he was beating down sophisms and exposing false testimony, some childish prejudices, such as would excite laughter in a well-managed nursery, came across him he was smitten as if by enchantment. His mind dwindled away under the spell from gigantic elevation to dwarfish littleness. Those who had lately been admiring its amplitude and force were now as much astonished at its strange narrowness and feebleness as the fisherman in the Arabian tale, when he saw the Genie, whose stature had overshadowed the whole sea-coast, and whose might seemed equal to a contest with armies, contract himself to the dimensions of his small prison, and lie there the helpless slave of the charm of Solomon!"

—Macaulay.

१. वरील गोष्ट वाचून वाचकांस सहज तर्क होईल कीं, साखरेचा स्पर्शही जॉन्सन्सारख्यास जर इतका अमंगळ वाटला, तर कढीचा भुरका तर किती अपवित्र ठरेल कोण जाणे! खरोखर, हिंदूंच्या रानटीपणाचें प्रमाण दुसरें कोणतेंहि पाहायाला नको!!

विषयीं एके प्रसंगीं गुरुशिष्यांचें खलबत चाललें असतां बॉस्वेल् या बिचाऱ्या प्राच्य राष्ट्राची कड घेऊन ह्मणाला-"चिनी लोक ज्ञानसंपन्न आहेत." गुरूनें लागलीच त्याच्या डोळ्यांत अंजन घालून त्याचा दृग्भ्रम दूर केला—"खरें बोला, भांडीं करण्याची विद्या त्यांस अवगत आहे खरी!" दुसऱ्या एका प्रसंगीं हिंदुस्थानांतील प्रसिद्ध सेनापति सर् ऐर कूट, ज्यानें नुकताच हैदरअल्लीचा पराभव करून मद्रास इलाखा बचावला होता, त्याच्या घरीं भोजनाचे वेळीं अरब लोकांची गोष्ट निघाली. कूटसाहेब नुकताच अरबस्थानांतून आला होता, यास्तव वाटेनें तद्देशीयांची स्थिति जी त्यास दृष्टीस पडली होती तिची तारीफ करून त्यांचें प्राच्यदेशप्रसिद्ध जें इमान व शौर्य त्यांचें तो वर्णन करीत होता, हें अर्थातच आमच्या पाश्चात्य पंडितशिरोमणीस न खपून त्यांनीं आपल्या आवडत्या देशबंधूंचा शह बिचाऱ्या अरबांवर बिनदिक्कत ठेवून दिला![1] पण हेंही सर्व जुन्या जगाविषयीं झालें. नव्या जगांत इंग्रेज लोकांनींच वसवलेलें एक मोठें राज्य आहे हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. हें राज्य जॉन्सन्च्या वेळेपर्यंत इंग्लंड्च्या ताब्यांत होतें, पण त्याच्या हयातीच्या शेवटीं शेवटीं या वसाहतवाल्यांची व इंग्रेजांची करांच्या बाबतींत कुरबुर होऊन होतां होतां युद्धप्रसंगावर येऊन बेतली. तरी वसाहतवाले न डगमगतां त्यांनीं मोठ्या शर्थेनें आपला बचाव करून इंग्लंड्चा पराभव केला. ही गोष्ट

---

१. "We went to Sir Eyre Coote's, at the governor's house & found him a most gentlemanlike man. His lady is a very agreeable woman, with an uncommonly mild and sweet tone of voice. There was a pretty large company: Mr. Ferne, Major Brewse, and several officers. Sir Eyre had come from the East Indies by land, through the deserts of Arabia. He told us the Arabs could live five days without victuals, and subsist for three weeks on nothing else but the blood of their camels, who could lose so much of it as would suffice for that time, without being exausted. He highly praised the virtue of the Arabs: their fidelity, if they undertook to conduct any person; and said they would sacrifice their lives rather than let him be robbed. Dr. Johnson, who is always for maintaining the superiority of civilized over uncivilized men, said, "Why, sir, I can see no superior virtue in this. A serjeant and twelve men, who are my guard, will die rather than that I shall be robbed." Colonel Pennington of the 37 th regiment, took up the argument with a good deal of spirit and ingenuity. *Pennington*. "But the soldiers are compelled to this, by fear of punishment." *Johnson*. "Well, Sir, the Arabs are compelled by the fear of infamy." *Pennington*. "The soldiers have the same fear of infamy, and the fear of punishment besides; so have less virtue; because they act voluntarily." Lady Coote observed very well, that it ought to be known if there was not among the Arabs some punishment for not being faithful on such occasions."

—*Tour to the Hebrides*.

जॉन्सन्च्या मरणाच्या आदल्या वर्षी घडून तेव्हांपासून युनैटेड् स्टेट्स् ( संयुक्त संस्थानें ) या नांवाचें अमेरिकेंत नवेंच राज्य स्थापित झालें. स्वातंत्र्य व भरभराट या दोहोंच्या संबंधानें पाहतां यासारखें राज्य आज साऱ्या भूमंडळावर नाहीं अशी त्याची सर्वत्र कीर्ति आहे; व वॉशिंग्टन् फ्रँक्लिन्[1] यांसारखे जगन्मान्य पुरुष प्रस्तुत ग्रंथकाराच्या वेळेसही स्वदेशास भूषित करीत होते. पण कांहीं नाहीं, एक राज्यनिष्ठेचें तत्त्व जॉन्सन्च्या हृदयांत पूर्ण बिंबून गेलें असल्यामुळें न्याय्य पक्षा-विषयीं अभिमान, गुणिजनाविषयीं पूज्यबुद्धि वगैरे सर्व वृत्ति त्याचे ठायीं एका क्षणांत लीन होऊन गेल्या. त्यानें आपल्या लेखणीचेंही सामर्थ्य वरील राज्यक्रांतीच्या प्रसंगीं अन्यायाच्या तर्फेनेंच प्रगट केलें हें मागें[2] सांगितलेंच आहे. असो; तर या अमेरिकन् लोकांविषयींही जॉन्सन्च्या ठिकाणीं जबरदस्त दुराग्रह नांदत असे. इंग्लंड्चें वर्चस्व चोहोंकडे गाजत असतां यांनीं मात्र त्याचें नाक खालीं केलें, हें त्यास बिलकुल न खपून तो त्यांच्यावर नेहेमी दांत ओंठ खात असे. 'त्यांस जाळून पोळून टाकलें पाहिजे,' 'एका मृत्यूच्या शिक्षेखेरीज बाकी कोणतीही सजा जी आम्ही त्यांस देऊं तिजबद्दल त्यांनीं आमचे उपकार मोजले पाहिजेत' अशा तऱ्हेचीं भयं-कर व क्रूरतेचीं वाक्यें त्याच्या तोंडून वरील लोकांविषयीं नेहेमी ऐकूं येत. 'अमे-रिकन्' हें नुस्तें नांव काढल्यावरोबर तो रागानें खवळून जाऊन वेडा होई. एके प्रसंगीं त्यानें असें बोलून दाखवलें कीं, साऱ्या जगास मी मित्रासमान लेखतों, एका अमेरिकनास मात्र नाहीं. असो; तेव्हां वरील सर्व उदाहरणांवरून आमच्या वाच-कांच्या सहज लक्षांत येईल कीं, जॉन्सन्च्या मतें प्रशंसनीय तेवढे सर्व गुण त्याच्या राष्ट्राचे ठायीं असून सारें अज्ञान, मूर्खत्व, दुष्टत्व काय तें इतर राष्ट्रांत पाहून घ्यावें !

आतां वर जो विशेषतः एका व्यक्तीविषयीं उल्लेख केला तो सामान्यतः सर्व राष्ट्राचे ठिकाणींही कोणत्या प्रकारें आढळतो तें सांगणें अवश्य होय, व पूर्वक्रमास अनुसरून झटलें झणजे तसें केलेंही पाहिजे. पण प्रस्तुत स्थलीं तसें करणें इष्ट दिसत नाहीं. कां कीं, एक तर यापूर्वी अनेक स्थलीं प्रकृत विषयावर उल्लेख केलेलेच आहेत. यास्तव ते येथें पुनरुक्त होणारे आहेत. पण याहून मोठें सबळ कारण झटलें झणजे हें होय कीं, तसें केल्यानें आमच्या विद्यालयसंपादित ज्ञानाचा अपव्यय होणारा

१. Benjamin Franklin (1706—1790) प्रख्यात अमेरिकन् मुत्सद्दी व तत्त्वज्ञ हा छापखान्यांत उमेदवार होता. याचें Poor Richard's Almanac प्रसिद्ध होतांच याच्याकडे लोकांचें लक्ष वेधलें. पुढें त्यानें शास्त्रीय शोध सुरू केले. व विद्युद्वाहकत्वाचा शोध लावला. तो दहा वर्षे जनरल असेंब्लीचा सभासद असून पुढें अठरा वर्षे आपल्या संस्थानाचा एजंट म्हणून इंग्लंडांत राहिला. अमेरिकेला परत आल्यावर संयुक्त संस्थानांची राज्यघटना तयार करण्याचे कामीं यानें बरीच खटपट केली. 'सम्पादक'

२. पृष्ठें ७२५–७२६ पाहा. 'सम्पादक'

आहे. आमच्या मूढ देशबंधूंस सन्मार्ग दाखवण्याची ज्यांनीं परम दीक्षा धारण केली आहे अशा कित्येक ज्ञानमूर्तींचा असा अभिप्राय अनेक वेळां प्रगट झालेला आहे, कीं सरकारानें श्रमाचा व अर्थाचा येवढा व्यय करून ज्ञानांजनशलाकेनें एतद्देशीयांची दृष्टि स्वच्छ जो केली ती येवढ्याकरतां कीं, त्यांनीं आपले दोन्ही डोळे साफ उघडून न पाहतां एक नेहेमी मिटून ठेवला पाहिजे. हा मिटायाचा डोळा दोषदर्शनाचा होय. याचा उपयोग पाहिजे तर आपल्या स्वदेशांतील हरएक प्रकरणीं छिद्रें बाहेर काढून तीं 'ज्ञान व सत्य' या नांवांनीं साऱ्या जगास प्रकट करण्यांत खुशाल करावा; तसें करण्यांत पुण्यसंग्रह आहे व देशाचें अपरिमित कल्याण आहे. पण हीच दुर्बीण युरोपाकडे व विशेषेंकरून त्यांतील एका बेटाकडे लावण्याचा मात्र आह्मांला बिलकुल अखत्यार नाहीं. तिकडे दृष्टि फेंकायाची असेल तर दुर्बीण उलटी करून थोरलें भिंग पुढें सरसावलें पाहिजे. तसें केलें असतां सहजच तिकडे मेघमंडळास भेदून गेलेले पर्वत, समुद्रप्राय अफाट नद्या, नाना धान्यसमुदायांनीं सतत आच्छादित असणारा भूपृष्ठभाग, इत्यादि वैभव दृष्टिगोचर होणार आहे! असो; तर आमच्या सन्मान्य सद्धर्मी बंधूंच्या वरील उपदेशास मान देऊन आमच्या देशावर राज्य करणाऱ्या राष्ट्राच्या संबंधानें वर जें लिहिणें जरूर होतें तें येथें लिहीत नाहीं. आह्मांस मेहेरबानीनें दिलेल्या विद्याधनाचें खरें चीज जर जॉन्सनच्या देशबंधूंचा स्तव केल्यानेंच होणार आहे, तर तसेंच कां होईना! माजी बादशाही अमलांत जसें 'हां जी, जी हां' या शब्दांचें माहात्म्य असे, व रूमच्या पादशहांपुढें जसा देवतांप्रमाणें धूपही जळत असे, तशीच जर या वर्षापासून सुरू झालेल्या सुधारलेल्या बादशाहीचीही स्थिति असेल, तर आपलें तरी काय जातें 'दीपिका' ओंवाळायाला व 'उद्योऽस्तु' ह्मणायाला! उगाच विनाकारण लांबलचक मजकूर लिहून 'हत्ती महाराजांस आपला शुंडादंड उचलण्याचा प्रसंग आणा, किंवा त्यांच्या पुच्छावलंब करणाऱ्या आमच्या देशबंधूंस व त्यांच्या धर्मबंधूंस राजनिष्ठेनिमित्त दौतींत लेखणी बुडवायास लावा, यांत मौज ती कोणती!

असो; येथवर आरंभीं सांगितलेलें जें प्रस्तुत ग्रंथकाराचें व त्याच्या राष्ट्राचें सादृश्य त्याचें निरूपण केलें. यापुढचा राहिलेला भाग आतां सरतेशेवटच्या अंकांत येईल.

---

कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें
तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें॥ नीतिशतक–वामन

अंक ४३–(१) प्रकृत अंकाचा विषय. (२) लोकस्थितीचें द्विविध सादृश्य. (३) जॉन्सनच्या वेळीं लोकभाषेची व विद्येची स्थिति. (४) महाराष्ट्र–भाषा; कोश व व्याकरण. (५) निबंधादि रचनापद्धति. (६) या सादृश्यावरून घ्यावयाचा बोध. (७) दुसरें राज्यपद्धतीचें सादृश्य.

१. मूळ उपोद्घातांत सांगितल्यापैकीं एक सदर मात्र आतां उलगडायाचें

राहिलें आहे; बाकी मूळ संकल्पाप्रमाणें सारें विवरण झालें. हें सदर लोकस्थितीचें सादृश्य होय. जॉन्सन्च्या वेळेस इंग्लंडांतली स्थिति जी होती ती सांप्रतच्या या देशांतील स्थितीला बऱ्याच अंशीं मिळते; यास्तव दोहोंचें विवरण करून परस्पर तुलना केली असतां एतद्देशीयांस बरीच माहिती होऊन कांहीं उपयोगाच्या गोष्टीही कळणार आहेत.

२. हें सादृश्य दोन प्रकारचें आहे; एक विद्येच्या संबंधानें व दुसरें लोकस्थितीच्या संबंधाचें. पहिलें सादृश्य असें कीं, जॉन्सन्च्या वेळीं इंग्रेजी भाषेची स्थिति हल्लींच्या महाराष्ट्र-भाषेप्रमाणेंच कित्येक अंशीं असून वाचकांच्या अंगींही इकडच्या इतकीच अभिज्ञता व रसिकता होती. लोकस्थिति पाहिली, तर इकडूनही सरकार व प्रजा यांची अधिकाराच्या संबंधानें परस्पर स्पर्धा लागली असल्यामुळें हल्लींचा येथील प्रकार तिकडे पुष्कळ दृष्टीस पडत होता. असो; तर आतां दोहोंचें अनुक्रमानें निरूपण करतों.

३. जॉन्सन्नें मागील चरित्र समग्र वाचून आधुनिक महाराष्ट्र-भाषेचें व तत्कालीन इंग्रेजी भाषेचें बरेंच सादृश्य शोधक वाचकांच्या लक्षांत येऊन चुकलें असेल. आलीकडे दहा वीस वर्षांत इकडे ज्याप्रमाणें देशभाषेची सुधारणा करण्याकडे विद्वानांचें लक्ष लागलें आहे, त्याप्रमाणेंच तिकडेही जॉन्सन्च्या वेळेच्या सुमारास इंग्रेजी भाषेस परिपक्वता आणण्याविषयीं विद्वज्जनांचे परिश्रम चालू झाले होते. प्रथमतः जॉन्सन्च्या 'कोशा' विषयीं विचार केला असतां ध्यानांत येईल कीं, त्याच्या वेळेपर्यंत भाषेचें नियमनही झालें नव्हतें. ज्याला जसें वाटेल तसें तो लिहीत असे. लेखनपद्धति, उच्चार व शब्दप्रयोग याविषयीं तादृश निर्बंध नव्हता[१] याप्रमाणेंच निबंध,

---

१. जॉन्सन्नें इंग्रजी भाषेचें सुकाणूं हातीं धरून तिचें नियमन करण्यापूर्वीं तींत काय काय घोटाळा होता तो त्याच्या कोशाच्या प्रस्तावनेवरून तर कळणारच आहे; पण पुढील उताऱ्यावरूनही त्याचें स्वरूप वाचकांस थोडक्यांत कळेल. हा उतारा 'रँब्लर्'च्या शेवटच्या अंकांतील होय. ही निबंधावलि वरील कोश चालत असतांच सुरू होऊन शेवटास गेली हें वाचकांस कळलेंच आहे—

"Whatever shall be the final sentence of mankind, I have at least endeavoured to deserve their kindness. I have laboured to refine our language to grammatical purity, and to clear it from colloquial barbarisms, licentious idioms, and irregular combinations. Something, perhaps, I have added to the elegance of its construction and something to the harmony of its cadence. When common words were less pleasing to the ear, or less distinct in their signification, I have familiarised the terms of philosophy, by applying them to popular ideas, but have rarely admitted any word not authorised by former writers; for I believe that whoever knows the English tongue in its present extent, will be able to express his thoughts without further help from other nations."

कादंबरी व चरित्र यांचा प्रघातही प्रस्तुत पंडिताच्या वेळेपासूनच विशेष पडला. 'स्पेक्टेटर्' व 'रँब्लर्' यांची लोकमान्यता पाहून त्यांच्या धाटणीवर अनेक ग्रंथकारांनीं निबंधावलि रचल्या. या जरी बहुतेक लवकरच लयास गेल्या, तरी प्रस्तुत शतकाच्या आरंभीं निबंधरचनेचा त्रैमासिक पुस्तकांच्या रूपानें जो नवा प्रकार सुरू झाला त्यास त्या कारणीभूत झाल्या हें मागें[1] एके निबंधांत सांगितलेंच आहे. कादंबऱ्यांचा प्रघातहि जॉन्सनच्या वेळेस सुरू होऊन रिचर्ड्सन्, फील्डिंग्, [2] स्मॉलेट्[3] वगैरे नामांकित कादंबरीकार

---

१. अंक २८ वा, पृष्ठ ५६४–५६५ पाहा. 'सम्पादक'

२. Henry Fielding (1707–1754) व Sarah Fielding (1710–1768) हीं दोघें बहीणभावंडें कादंबरीलेखनाचा व्यवसाय करीत. साऱ्हाला आपल्या बुद्धिमत्तेचा फार अभिमान वाटे. David Simple (1744), The Governess the countess of Dellwyn या तिच्या मुख्य कादंबऱ्या असून शिवाय झीनोफनच्या Memorabilia व Apologia या ग्रंथांचेंहि तिनें भाषांतर केलें आहे.

हेन्री फील्डिंग्चें प्रायमिक शिक्षण एका खासगी शिक्षकापाशीं झाल्यावर त्याला ईटन् (Eton) येथें अध्ययनार्थ पाठविलें. परंतु Lyme Regis येथील एका इस्टेटवाल्या गृहस्थाची वारस असलेल्या एका तरुण कुमारिकेच्या प्रेमपाशांत स्वारी सांपडली. पुढें त्यास Leyden येथें कायद्याचा अभ्यास करण्यास पाठविण्यांत आलें. परंतु त्याच्या उधळ्या बापानें द्वितीय विवाह केल्यामुळें त्याला त्याजकडून मिळणारी आर्थिक मदत बंद झाली. तेव्हां लंडनला जाऊन हा नाटकें व फार्स लिहून उपजीविका करूं लागला. Tom Thumb येवढें एकच त्याच्या सुमारें वीस नाटकांत टिकून राहिलें. १७३५ सालीं त्याचें लग्न झालें. त्यानें बरेच दिवस आपल्या जन्मस्थानीं सहकुटुंब चैनींत घालविले. पण वर्षअखेर बायकोकडून मिळलेले १५०० पौंड खलास झाल्यामुळें लंडनला जाऊन हा पुनः नाटकें लिहूं लागला. त्यानें एका नाटकांत वॉल्पोलवर खूप जोराचा हल्ला केल्यामुळें १७३७ सालीं Licensing Act पास झाला व लॉर्ड् चेंबर्लेनच्या परवानगीखेरीज नाटकें छापण्यास बंदी झाली. तेव्हां कायद्याचा अभ्यास करून तो १७४० सालीं वकील झाला. रिचर्ड्सन्ची पॅमेली कादंबरी याच सालीं वाचतांच त्यालाहि स्फूर्ति झाली, व याचा परिणाम म्हणजे Joseph Andrews ही त्याची पहिली कादंबरी १७४२ सालीं प्रसिद्ध झाली. १७५१ सालीं Amelia ही दुसरी कादंबरी प्रसिद्ध झाली. तथापि याचा सर्वोत्कृष्ट ग्रंथ म्हणजे The History of Tom Jones, a Foundling (1749) हा होय. 'सम्पादक'

३. Tobias George Smollett (1721-1771) ग्लास्गो येथें शिक्षण झाल्यावर आपलें शोकपर्यवसायि नाटक (The Regicide) रंगभूमीवर आणण्याकरतां १७३९ सालीं तो लंडनला गेला. पण त्यास या कामीं यश न आल्यामुळें निराश होऊन एका जहाजावरील शस्त्रवैद्याकडे त्यानें नोकरी धरली व परत आल्यावर

(पुढें चालू)

उदयास आले. जॉन्सन् व गोल्ड्स्मिथ् यांनींही एक एक कादंबरी [1] रचली ती सर्वप्रसिद्धच आहे. हाही प्रकार वरील निबंधाप्रमाणेंच या शतकांत वृद्धिंगत होऊन स्कॉट्, [2]

---

स्वतःच वैद्यकीचा धंदा सुरू केला; पण याहि कामीं त्याला यश मिळालें नाहीं. तेव्हां त्यानें वाङ्मयसेवेला वाहून घेतलें. Roderick Random (1748), The History of an Atom (1749), Peregrine Pickle (1751), Ferdimand, Count Fathom (1753), Sir Lancelot Greaves (1766). व त्याची सर्वोत्कृष्ट कादंबरी Humphrey Clinker (1770) हे त्याचे ग्रंथ होत. शिवाय त्यानें व्हॉल्टेअरचेंहि भाषांतर केलें आहे. हा वारंवार सार्वजनिक भांडणांत पडे व टीकापर लेख लिही. एका प्रसंगीं त्याची टीका बेअब्रूकारक ठरून त्याला दंड व शिक्षाही झाली होती. 'सम्पादक'

१. रासेलस् (Rasselas) व व्हिकार् ऑफ् वेक्फील्ड् (The Vicar of Wakefield). 'सम्पादक'

२. Sir Walter Scott (1771-1832) प्रख्यात ब्रिटिश् कादंबरीकार व कवि. यानें प्रथम कायद्याचा अभ्यास करून धंदाहि सुरू केला होता. पण १८०२ सालीं Minstrelsy of the Scottish Border हें काव्य त्यानें लिहिलें व वाङ्मयक्षेत्रांत प्रवेश केला. पुढें लागोपाठ त्याची The Lay of the Last Minstrel, Marmion, The Lady of the Lake, Rokeby वगैरे काव्यें प्रसिद्ध झालीं. १८१४ सालीं त्यानें आपला मोर्चा कादंबरीच्या क्षेत्राकडे वळविला व 'Waverley' कादंबरी प्रसिद्ध होतांच लोकांचें लक्ष तिजकडे वेधलें. पण 'Waverley' कादंबरी त्यानें निनांवीच प्रसिद्ध केली होती. 'The Great Unknown' असें लेखकाचें नांव प्रसिद्ध झालें होतें. Guy Mannering, The Antiquary, Old Mortality, Rob Roy, Heart of Midlothian वगैरे कादंबऱ्या प्रसिद्ध होईपर्यंत स्कॉट् लेखक आहे हें गौप्य फुटलें नाहीं. हा 'मोठा अज्ञात' कोण याबद्दल सर्वत्र खल सुरू होऊन मोठी खळबळ उडून गेली. स्कॉट्नें आपल्या लेखणीवर खूप पैसा मिळवून १८१२ सालीं Abbotsford नांवाचा प्रचंड वाडा बांधला. १८२० सालीं त्यास सरदार करण्यांत आलें. पण लवकरच नशिबाचें गाडें उलटलें व त्याच्या प्रकाशकांचें दिवाळें निघून १८२५ सालीं त्याच्यावर सुमारें दीड लाख पौंड कर्जाचा बोजा बसला. तशांतच त्याची प्रिय पत्नीहि वारली. पण स्कॉट्नें प्रतिकूल परिस्थितींतच आपली विलक्षण धीरोदात्तता प्रगट केली व पांच वर्षांत अविश्रांत खटपट करून लेखणीच्या जोरावर निमें कर्ज फेडलें व मृत्यूपूर्वी बाकीचेंहि कर्ज देऊन टाकून आपली Abbotsford येथील इस्टेट त्यानें पुनः विकत घेतली. लेखणीच्या जोरावर इतका पैसा मिळविल्याचें असलें उदाहरण वाङ्मयक्षेत्रांत दुसरें आढळणें अशक्य आहे. Waverley Novels शिवाय Tales of a Grand father, Life of Napoleon हे स्कॉट्चे आणखी ग्रंथ होत. 'सम्पादक'

डिकन्स [1], लिटन् [2], यांच्यासारखे जगत्प्रसिद्ध कादंबरीकार निपजले, व आपल्या देशभाषेस आपल्या अमोलिक ग्रंथांनीं त्यांनीं भूषित केलें. तिसरा चरित्ररचनेचा प्रकार; हा तर जॉन्सनच्याच चांगल्या उत्कर्षास आणला हें त्याच्या 'कविचरित्रा'विषयीं निरूपण करतांना सांगितलेंच आहे. याप्रमाणेंच इंग्रेजी भाषेंत इतिहासग्रंथांचीही प्रवृत्ति वरील काळापासूनच पडून ह्यूम, रोबर्टसन् [3], गिबन्, वगैरे ग्रंथकार प्रसिद्धीस

---

१. Charles Dickenes (1812-1870) एकोणिसाव्या शतकांतील अत्यंत लोकप्रिय कादंबरीकार. पिक्विक् पेपर्स् ( Pickwick papers ) च्या प्रकाशनापासून तों मृत्यूपर्यंतच्या तीस वर्षांत त्यानें कादंबऱ्यांचा नुसता पाऊस पाडला. तथापि इतक्या झपाट्यानें लिहिल्या तरी त्या नीरस उतरल्या नाहींत हें लक्षांत ठेवण्यासारखें आहे. याचें शिक्षण नियमितपणें झालें नाहीं, आयुष्याच्या आरंभी याला फार कष्ट सोसावे लागले. या परिस्थितीचें चित्र त्याच्या David Copperfield कादंबरीच्या प्रारंभीं आढळतें. हा १८३५ च्या सुमारास पार्लमेंटांत रिपोर्टर् होता. Sketches by Boz (1839), Pickwick Papers (1837-39), Oliver Twist The Tale of two Cities, David Copperfield ( 1849-50), Hard Times (1854), Great Expectations (1860-61) वगैरे याचे प्रमुख ग्रंथ होत.

'सम्पादक'

२. Edward Bulwer Lytton, Ist. Lord (1803-73) विख्यात मुत्सद्दी, कादंबरीकार व नाटककर्ता. अगदीं अल्पवयांत यानें लेखन सुरू केलें. Ismael and other Poems चें प्रकाशन १८२० सालीं झालें. रोझिना व्हीलर् नामक आयरिश सुंदरीशीं याचा १८२५ सालीं विवाह झाला. त्यामुळें आईशीं तंटा होऊन त्याच्या उत्पन्नावरचा हक्क नाहींसा झाला आणि त्याला वाङ्मयसेवा करणे भाग पडलें. स्त्रीहि दुर्दैवानें ठरून १८३६ त काडीमोड झाली. पण या अकरा वर्षांत त्यानें फारच मोठ्या प्रमाणावर वाङ्मयसेवा केली. Falkland, Pelham, The Pilgrims of the Rhine, Last Days of Pompeii, Rienzi, Last of the Barons, Harold या याच्या प्रमुख कादंबऱ्या. १८३१ त लिबरल् पक्षाचा म्हणून तो पार्लमेंटांत शिरला पण त्याचा कल हळू हळू कॉन्झर्वेटिझम्कडे होऊं लागला. १८५८–५९ मध्यें तो कलोनियल् सेक्रेटरी झाला. नाट्यक्षेत्रांतील याची कामगिरी म्हणजे The Lady of Lyons, Richlieu, Money हीं तीन अत्यंत लोकप्रिय असलेलीं नाटकें. याचा लेखनव्यवसाय आमरण चालू होता. याचे साठांवर ग्रंथ आहेत.

'सम्पादक'

३. William Robertson ( 1721-93 ) स्कॉटिश् धर्मोपदेशक ( Divine ) व इतिहासकार. प्रथम डाल्कीथ् ( Dalkeith ) येथें याचें शिक्षण झालें. पण बापाची बदली एडिंबरोला झाल्यामुळें पुढें तेथील शाळेंत शिकून त्यानें तेथील विद्यापीठांत प्रवेश केला. १७५९ सालीं History of Scotland हा याचा इतिहासग्रंथ प्रसिद्ध

( पुढें चालू )

आलें हेंही यापूर्वी एका निबंधांत [1] सविस्तर सांगण्यांत आलेंच आहे.

४. आतां इकडे महाराष्ट्रभाषेची स्थिति पाहा. या भाषेची पूर्वीची स्थिति कशी होती, व अलीकडे पंचवीस तीस वर्षांत तीस कोणकोणते संस्कार घडले, याविषयीं यापूर्वी अनेक वेळीं प्रसंगवशात् उल्लेख केलेलेच आहेत. यास्तव प्रकृत स्थलीं दोन गोष्टींच्या संबंधानें मात्र लिहितों म्हणजे पुरे. भाषेचें नियमन होण्यास दोन मोठीं साधनें लागतात; एक कोश व दुसरें व्याकरण. कोशाच्या योगानें तींतील शब्दसमुदाय निश्चित होऊन तिचा लेखनप्रकार, वर्णोचार व व्युत्पत्ति हीं ठरून जातात. तसेंच व्याकरणानें तिचे नियम ठरून जाऊन शुद्धाशुद्धतेविषयीं निर्बंध होतो. हीं दोन्ही साधनें मराठीस अनुकूल आहेत हें सर्वांस माहीत आहेच. कोश म्हटले म्हणजे शास्त्रीमंडळीनें केलेला मराठी कोश, आणि मोल्स्वर्थ् व कँडी यांनीं रचलेले मराठी व इंग्रजी कोश, हे होत; व व्याकरण तर रा० ब० दादोबा पांडुरंग यांचें सर्वप्रसिद्धच आहे. आतां पहिला मराठी कोश सध्यां मुळींच प्रसिद्ध नसून कोठें आहे तो जुन्या पुस्तकालयांतून वगैरे लोळत पडलेला आढळतो, व त्याचा संक्षेप कांहीं वर्षांपूर्वी छापला गेला त्याचीही अवस्था मूळ कोशाप्रमाणेंच आहे; [2] तसेंच दुसरा व तिसरा कोश हे इंग्रेजी भाषेंत असल्यामुळें ती भाषा ज्यांस चांगली समजते त्यांसच त्यांचा उपयोग, व शिवाय त्यांची किंमत भारी असल्यामुळें त्यांचा सार्वजानिक प्रचार होणेंही दुरापास्त; त्याप्रमाणेंच दादोकृत व्याकरणाच्या योगानें भाषेस जरी पुष्कळ साहाय्य झालें तरी त्यांत न्यूनतेचे अनेक प्रकार आहेत. हें सर्व खरें; तरी भाषाप्रसाधनाची वरील जीं दोन मुख्य साधनें तीं आमच्या भाषेचीं सिद्ध होऊन चुकलीं आहेत ही गोष्ट संतोषाची होय यांत संशय नाहीं. वरील उद्योग मागेंच होऊन गेल्यामुळें आजला भाषा इतक्या स्थितीस येऊन पोंचली ही एक नफ्याची गोष्ट झाली; व त्यांतून कोशां-

होऊन त्याला ब्रिटिश इतिहासकर्त्यांत प्रमुख स्थान मिळालें. १७६१ साला त्याला एडिम्बरो विद्यापीठाचा प्रिन्सिपाल नेमलें; १७६९ सालीं The History of the Reign of Emperor Charles V, १७७७ सालीं The History of America व १७९१ मध्यें Historical Disquisition on Ancient India हे याचे ग्रंथ प्रसिद्ध झाले. याचे ग्रंथ ह्यूमप्रमाणेंच ऐतिहासिकदृष्टया तादृश महत्त्वाचे नसून त्यांचें खरें महत्त्व वाङ्मयदृष्टयाच आहे.

'सम्पादक'

१. अंक २९, इंग्रेजी भाषा, पृष्ठें ५७१-५८२ पाहा.

'सम्पादक'

२. मागील अंकाच्या आरंभीं सांगितलेला जो मराठी कोश तोच वरील संक्षेप होय. माजी डायरेक्टर मेहरबान ग्रँट् साहेब यांच्या हुकुमावरून रा. गोडबोले यांनीं तो तयार केला होता; पण तो छापून प्रसिद्ध होण्यापूर्वी ग्रँट् साहेबांची कारकीर्द संपल्यामुळें वरील कोश जागच्या जागींच राहिला ! तो आतां सरकारी डिपोंत पडला आहे. ही माहिती कोशकर्त्यांकडून आम्हांस मिळाली आहे.

विषयीं पाहिलें तर ते सरकारच्याच आश्रयानें रचले जाऊन पुन: इतक्या आस्थेनें जे तयार झाले, ते लोकाश्रयानें तर होण्याचा मुळींच संभव नव्हता. तेव्हां महाराष्ट्र-भाषेवर सरकारची ही एक मोठी मेहेरबानीच झालीशी समजली पाहिजे. विशेषत: मोल्स्वर्थच्या कोश तर मराठी भाषेचें उत्तम ज्ञान होण्यास फारच उपयोगी आहे. व कांहीं अशीं जॉन्सनच्या कोशाचीही उपमा त्यास साजेल. असो;[१] तर कोश व व्याकरण यांची सध्यां इतपत स्थिति आहे.

आतां वरील दोन साधनांच्या योगानें भाषेची अभिवृद्धि जर व्हावयाची असेल तर त्यांचा सार्वत्रिक प्रचार झाला पाहिजे हें उघडच आहे; हा प्रचार वर सांगितलेल्या व्याकरणाचा झालेलाच आहे, कोशाचा मात्र झालेला नाहीं. वास्तव जॉन्सनच्या कोशाप्रमाणें वरील कोशाचें जर रूपांतर झालें, म्हणजे महाराष्ट्र-शब्दांची महाराष्ट्र-भाषेनेंच व्याख्या होऊन तो सर्वजनगम्य जर झाला, तर भाषा ठरीव होण्यास व घेडगुजरी प्रकार मोडून तिची सुधारणा होण्यास तो कारणीभूत होईल. तर भाषेचा उत्कर्ष व देशाचें हित हीं व्हावींशीं ज्यांस वाटत असतील त्यांनीं वरील साधन लोकांस अनुकूल करून देण्याविषयीं झटलें पाहिजे. पूर्वोक्त दोन कोशांवरून पाहिलें असतां वर सांगितला तसा कोश तयार होणेंही मोठें कठीण आहे असें नाहीं. कारण शब्दांचें संग्रहण व त्यांचें व्याख्यान हें दोन्ही मुख्य भाग अगोदरचे सिद्धच आहेत. एक नवा जोडण्यासारखा भाग म्हटला म्हणजे

---

१. मोल्स्वर्थच्या कोशास वरील उपमा जी दिली आहे, ती यावरून कीं त्यांत नाना प्रकारची माहिती जेथें तेथें सांपडते. आपल्या लोकांत सध्या प्रचारांत असणाऱ्या व कालगत्या लोपून गेलेल्या सर्व चमत्कारिक ह्मणींचा संग्रह त्यांत केलेला आहे, त्याप्रमाणेंच शेंकडों जुने व प्रौढ शब्द व भाषणपद्धति हीं त्यांत आहेत. याखेरीज, 'अष्टविवाह§' 'अठरा कारखाने' 'नवरत्नें×' 'चौदा विद्या' 'चौसष्ट कला' 'राग+' इत्यादि शब्द पाहिले असतां सदरील ग्रंथ केवढ्या श्रमानें व किती आस्थेनें तयार केला आहे; हें पूर्णपणें लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

§ ब्राह्मो दैवस्तथैवार्षः प्राजापत्यस्तथासुरः ।
गान्धर्वो राक्षसश्चैव पैशाचश्चाष्टमोऽधमः ॥ 'सम्पादक'

× मुक्तामाणिक्य वैदूर्यगोमेदा वज्रविद्रुमौ ।
पद्मरागो मरकतं नीलश्चेति यथाक्रमम् ॥

कित्येकांच्या मतें रत्नें पांच:—

(१) नीलकं, वज्रकं, पद्मरागः, मौक्तिकं, प्रवालम्. किंवा (२) सुवर्णं, रजतं, मुक्ता, राजावर्तं, प्रवालकम्. किंवा (३) कनकं, हीरकं, नीलं, पद्मरागश्च, मौक्तिकम् ।

(पुढें चालू)

अवतरणांचा मात्र होय. जॉन्सन्च्या कोशांत जशीं भरपूर अवतरणें आहेत तशीं महाराष्ट्रभाषेंतील जुन्या व सर्वमान्य ग्रंथांतून बरींच देतां येणार आहेत आतां येवढें खरें कीं, जॉन्सन्च्या वेळेपर्यंत गद्यरचना व पद्यरचना करणारे शतावधि मोठमोठे ग्रंथकार होऊन गेले होते, तशी आमची मराठीची निदान अद्याप तरी स्थिति झालेली नाहीं. यास्तव त्यास आपल्या कोशांत जसें वैचित्र्य आणतां आलें तसें इकडे आणतां येणार नाहीं. तरी सध्यां पूर्वींच्याच पद्यात्मक ग्रंथांतून मुख्यतः अवतरणें दिलीं असतां कांहीं काळानें पुढें गद्यग्रंथांतूनही तीं देऊन कोशास क्रमाक्रमानें पूर्णता आणतां येईल हें उघड आहे.

मराठी व्याकरणाविषयीं पाहिलें, तर त्याचा आज वीस पंचवीस वर्षें चांगला प्रचार पडून तें बहुधा ठरीव झाल्यासारखेच झालें आहे. तरी अद्याप मराठीच्या मूलभाषा ज्या संस्कृत, प्राकृत, फारसी वगैरे त्यांच्याकडे एतद्देशीय पंडितांचें हवें तसें लक्ष न लागल्यामुळें त्यांच्या धोरणानें वरील विषयाचा व्हावा तसा विचार अजून झाला नाहीं. तो झाला असतां व्याकरणविषय सध्यां आहे त्याहून अधिक सुगम व चित्तवेधकही होईल असें आह्मांस खचीत वाटतें.

५. आतां वर सांगितलेले गद्यप्रकार ह्मणजे निबंध, कादंबरी, चरित्र व इतिहास हे आपल्या भाषेंत कसे सुरू झाले आहेत व त्यांची मजल कोठपर्यंत पोंचली आहे याविषयीं यापूर्वी एक दोन अंकांत बरेंच निरूपण केलें आहे. त्याहून अधिक विवरण ह्मटलें ह्मणजे निराळ्याच ठिकाणीं केलें पाहिजे. यास्तव येथें सामान्यतः इतकेंच सांगतों कीं, ज्या अर्थी इंग्रेजी भाषेंतील नमुन्यांवर वरील पद्धति सुरू झाल्या आहेत त्या अर्थी त्या सुधारण्यास मूळ नमुन्यांची उत्कृष्ट माहिती करून घेणें व त्यांवर निरंतर विचार करणें हें अवश्य होय. उत्कृष्ट चित्रकर्म किंवा मूर्तिकर्म साध्य करून घ्यावयाचें असल्यास ज्याप्रमाणें मूळ अस्सल प्रती नेहेमी पुढें धरून कलम किंवा छिंणी हें चालवावें लागतें, त्याप्रमाणेंच वरील रचनाविशेषांचीही गोष्ट आहे. ही गोष्ट इतकी उघड असतांही ती आमच्या लोकांस अद्याप चांगलीशी समजत नाहीं. याविषयींचा प्रत्यय पाहणें असल्यास आलीकडे वरचेवर निघणाऱ्या ज्या कादंबऱ्या त्यावरून पाहावा. या कादंबऱ्यांतील बहुतेक तर अगदीं सामान्य प्रतीच्या ह्मणजे

---

तर कित्येकांच्या मतें चौदाः—

लक्ष्मीःकौस्तुभ–पारिजातक–सुरा धन्वन्तरिश्चन्द्रमाः ।
गावः कामदुघाः सुरेश्वरगजा रम्भादिदेवाङ्गनाः ॥
अश्वः सप्तमुखो विषं हरिधनुः शंखोऽमृतं चाम्बुधेः ।
रत्नानीह चतुर्दश प्रतिदिनं कुर्युः सदा मङ्गलम् ॥ 'सम्पादक'

+ भैरवः कौशिकश्चैव हिन्दोलो दीपकस्तथा ।
श्रीरागो मेघरागश्च रागाः षडिति कीर्तिताः ॥ 'सम्पादक'

थोडेंबहुत शिक्षण त्यांस प्राप्त झालें आहे न आहे अशा लोकांच्या हातूनच रचल्या जातात हें सर्वांस माहित आहेच. अशा लोकांस इंग्रजींतील विख्यात कादंबरीकारांची नांवेंही माहीत असण्याचा संभव नाहीं हें उघड आहे. पण हें असो; ज्यास जें साधन अनुकूल नाहीं त्याचा त्यानें उपयोग करून न घेतल्याबद्दल त्यास नांव ठेवणें रास्त नाहीं. पण जे चांगले सुशिक्षित म्हणवणारे त्यांजकडूनही वरील साधनाचा उपयोग झालेला विरळतच पाहण्यांत येतो. असो; तर वरील पद्धति व इतर कोणतीही गोष्ट उत्तम स्थितीस यावी असें जर मनांत असेल, तर त्याचें अनुकरण करायाचें त्यावर निरंतर ध्यान ठेवून सतत परिश्रम चालले पाहिजेत हें एतद्देशीयांनीं पक्कें मनांत वागवलें पाहिजे.

६. वर जें साहस्य सुमारें शंभर वर्षांपूर्वींच्या इंग्रेजी भाषेंत व हल्लींच्या मराठी भाषेंत दाखवलें त्यावरून एक मोठी गोष्ट वाचकांच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. ती ही कीं, इंग्रज ग्रंथकारांच्या परिश्रमांनीं ती भाषा जर आज इतक्या नांवारूपास आली, तर आमच्या लोकांनीं जर तसाच उद्योग केला, तर तितकें किंवा निदान त्याच्या खालोखाल तरी त्यांच्या श्रमांस यश कां येणार नाहीं! जॉन्सन्च्या वेळीं 'रँब्लर्'सारख्या पत्राच्या जर पांचशेंच प्रती कायत्या निघत असत, व काव्यें, नाटकें, कोश वगैरे रचूनही मोठमोठ्या ग्रंथकारांस सुद्धां उदरनिर्वाहाची पंचाईत पडे. तर यावरून तिकडे त्या वेळीं लोकांची अभिरुचि कितपत होती हें स्पष्ट दिसत नाहीं काय! आमच्या देशांत सार्वजनिक शिक्षणाचा नुकता कोठें प्रघात सुरू झाला आहे, व त्यांतून संपत्तीच्या मानानें पाहतां तर आमच्या बिचाऱ्या देशास आंग्लभूमीची पूर्वींही कधीं सर आली नाहीं, मग सध्यांच्या दुबळ्या स्थितींत तर कशाला गोष्ट बोलायाला पाहिजे![1] पण इतकें असतांही आज जर येथील

---

१. मेकॉले साहेबांनीं बराटे फांकणाऱ्या ऐरश् लोकांहून किंबहुना पोर्चुगीज लोकांहूनही हिंदु लोकांस कंगाल करून दाखवले आहेत हें आमच्या वाचकांस पूर्वी एकदोनदां कळवलेंच आहे. मग जागोजाग हिंदु राजे व जहागीरदार असतांहि जेव्हां वरची स्थिति, तेव्हां आतां तर आमच्या देशावर अठरा विश्वे दारिद्र्याची पुरी कळा आली असेल यांत काय नवल! वरील साहेबांचे त्यांच्यासारखेच एक जाडे बंधु हिंदुस्थानाविषयीं म्हणतात कीं, येवढा अफाट देश जिंकल्याची दगदग केल्यासारखी त्यापासून इंग्लंडास कांहींच प्राप्ति होत नाहीं, उलटें तें पैशाचें नुकसान मात्र त्यास आहे:—

"If India affords a surplus revenue which can be sent to England, thus far is India beneficial to England. If the revenue of India is not equal to the expense of governing India, then is India a burden and drain to England."=

—*Mill's British India.*

= मिल्स् साहेबांनीं वरीलप्रमाणें विधान करून तें ज्या तत्त्वांवर आधारलें आहे त्याचें स्पष्टीकरण खालीलप्रमाणें केलें आहे:—

लोकांत वाचनाचा इतका प्रचार दृष्टीस पडतो, तर पुढल्या काळाविषयीं कोणाच्या मनांत उमेद येणार नाहीं ! हें एक झालें. दुसरी गोष्ट वरील साद्दश्यावरून व पूर्वीच्या

---

"If the new territory increases the revenue more than the charges, it is advantageous; if it increases the charges in proporiton to the revenue it is hurtful. It is also to be observed, that the interest and redemption of the money expended in making the acquisition must be taken into account; and the new territoty must increase the revenue beyond the charges in a degree adequate to the interests and redemption of the whole sum expended in the war; otherwise the acquisition is a positive loss. If the surplus of the revenue were the same after the acquisition as before,the whole expense of war would be lost; the nation would not be richer for the acquisition, but the poorer; it would have been its wisdom to have abstained from the war and to rest contented with the territory which it possessed. If the revenue, after the acquisition is lessened in proportion to the charges; if the surplus of the revenue is diminshed, or the deficit enlarged; in that case the loss is not confined to that of the whole expense of the war it is all that, and more; ii is the expense of the war, added to the sum by which the balance of the annual receipt and expenditure is determined."

व या शहाणपणाबद्दल टिप्पणीलेखक वुइल्सन् साहेब यांनीं त्यांचे कान असे उपटले आहेत:-

"It is singular that a writer of in general such liberal sentiments should have taken so narrow a view of the advantages derived to England from her Indian possessions. India, he argues, is beneficial to England only as it affords a surplus revenue which can be sent to England, that is, in proportion to the direct tribute it can pay. Now this is to affirm that during the greater number of the years in which we have been in possession of India,it has been of no benefit at all. Who will venture to maintain a proposition so contrary to the fact ? Regarding our connection with India even only on the paltry consideration of how much money we have made by it, the assertion that we have profited solely by its surplus revenue, thet is,that in five years out of six we have realised no profit at all, is palpably false. In every year of our intercourse with India, even in those in which the public revenue has fallen far short of the expenditure, there has been a large accession to English capital brought home from India. What are the profits of the Indian trade, what is the maintenance of thirty thousand Englishmen, military included: what is the amount of money annually remitted to England for the support of relations, the education of children, the pensions of officers; and finally what can we call the fortunes accumulated by individuals in trade or in the service of the Company, which they survive to spend in England or be-

( पुढें चालू )

एकंदर चारित्रावरून एतद्देशीय ग्रंथकारांनींही घेण्यासारखी आहे कीं, ग्रंथरचनेच्या श्रमाचें साफल्य किती दीर्घ काळानें होत असतें तें त्यांनीं लक्षांत आणावें. पाहा कीं, जॉन्सन्सारखा अलौकिक बुद्धीचा मनुष्य-की ज्याचा पाठशाळेंतील धडा ह्मणून

---

queath to their descendants? What is all this but additional capital, remitted from India to England; additional, largely, additional, means of recompensing British industry? It is idle then to talk of a surplus revenue being the sole source of the benefits derivable from India. On the contrary, it is, and it ought to be, the least even of our pecuniary advantages; for its transfer to Engalnd is an abstraction of Indian capital. for which no equivalent is givin; it is an exhausting drain upon the resources of the country, the issue of which is replaced by no reflux; it is an extraction of the life-blood from the veins of national industry, which no subsequent introduction of nourishment is furnished to restore. Whatever profit to England, then, the payment to it of a surplus revenue raised in India might afford; the injury done to India would be so disproportionate, that it is to be hoped the legislators of either country will never seriously propose so objectionable a mode of enriching the parent state. In fact it would do no such thing; the impoverishment of the new territory would very soon, disappoint all prospect of gain in the old, and the coffers of England would not long be filled by the surplus revenues of India. Surplus revenue is in fact an absurdity. Properly speaking there can be no surplus revenue whilst there is a debt to be discharged. If the current charges fall below the current receipts, and the balance is not required for the liquidation of public debt, the receipts will be rduced, and the burdens of the people be relieved .................. the nature of our connection with India, unfortunately to such an extent for the latter, does impose an annual tribute, but, 'considerations of policy, of justice and humanity, all alike concur to condemn unmeasured exaction.' The notion of extorting a large tribute or any tribute from India, except by direct means, calculated to do infinite mischief, and to annihilate in the end the numerous and great benefits which both England and India reap from their mutual intercourse. This is with reference to the connection even in its most unworthy aspects. The gain of a higher character, the moral and political power derived from India by England is a much more real, and important, and honourable benefit, than all the pounds, shillings, and pence, that have ever been. or ever will be "conveyed" from the pockets of the people of India to those of the people of Great Britain."

पुस्तक ६ वें, भाग १३ वा, पृष्ठ ४७१ पाहा. 'सम्पादक'

वरील विलक्षण वाक्यावर ग्रंथप्रकाशक विल्सन् साहेब यांनीं चांगली समर्पक-टीका केली आहे ती आमच्या वाचकांपैकीं ज्यांस तशी अनुकूलता असेल त्यांनीं अवश्य वाचावी.

रचलेला काव्याचा चुटका त्या वेळचा अद्वितीय कवि पोप यानें वाचून वाहवा केली, ज्याची स्वकपोलकल्पित पार्लमेंटांतलीं भाषणें वाचून एका पंडितानें तर त्यास प्रत्यक्ष डिमॉस्थेनीसच्याही वर जागा दिली,[१] व कोशाचें प्रचंड काम उरकल्यावर तर जो आपल्या देशभाषेचा जणों काय अधिपतिच होऊन बसला त्यास नित्य निर्वाहाचीही पंचाईत असावी काय! पण हेंही एक असो; आपल्या लोकांच्या समजुतीप्रमाणें कोणाकोणास द्रव्यदृष्टि नसते, व दुसऱ्या समजुतीप्रमाणें 'नादत्तमुपतिष्ठति' ('पूर्व-जन्मीं न दिलेलें लाभत नाहीं') असें समजून जरी एकवार त्याच्या दारिद्र्याची उपपत्ति केली, तरी हें चमत्कारिक नव्हे काय, कीं त्याच्या प्रचंड विद्वत्तेनुरूप त्याची कोरडी मानमान्यताही होऊं नये! ही शेवटीं शेवटीं बरीच होऊं

---

१. हा प्रसंग जॉन्सन्च्या एका चरित्रकारानें सविस्तर कथन केला आहे, तो येणेंप्रमाणें–

"That Johnson was the author of the debates during that period was not generally known; but the secret transpired several years afterwards, and was avowed by himself on the following occasion; Mr. Wedderburne, Dr. Johnson, Dr. Francis, the present writer, and others, dined with the late Mr. Foote. An important debate towards the end of Sir Robert Walpole's administration being mentioned Dr. Francis observed, "That Mr. Pitt's speech on that occasion was the best he had ever read." He added "That he had employed eight years of his life in the study of Demosthenes, and finished a translation of that celebrated orator, with all the decorations of style and language within the reach of his capacity; but he had met with nothing equal to the speech above-mentioned." Many of the company remembered the debate; and some passages were cited, with the approbation and applause of all present. During the ardour of conversation Johnson remained silent. As soon as the warmth of praise subsided, he opened with these words; "That speech I wrote in a garret in Exeter-street." The company was struck with astonishment. After staring at each other in silent amaze, Dr. Francis asked how that speech could be written by him. "Sir," said Johnson, "I wrote it in Exeter-street. I never had been in the gallery of the House of Commons but once. Cave had interest with the door-keepers. He, and the persons employed under him, gained admittance; they brought away the subject of discussion, the names of the speakers, the side they took, and the order in which they rose, together with notes of the arguments advanced in the course of the debates. The whole was afterwards communicated to me, and I composed the speeches in the form which they now have in the parliamentary debates." To this discovery Dr. Francis made answer: "Then, Sir, you have exceeded Demosthenes himself; for to say that you have exceeded Francis's Demosthenes would be saying nothing." —*Murphy's Life of Johnson.*

लागली, तरी जशी व्हावी तशी कधींही झाली नाहीं. एकच उदाहरण पाहा; आपला यजमान व यजमानीण यांजबरोबर जॉन्सन् हा आपल्या वयाच्या सहसष्ठाव्या वर्षी पॅरिस शहरास गेला[1] म्हणून पूर्वी सांगितलेंच आहे. आतां त्याजसारखा अलौकिक पंडित कोठेंही गेला असतां 'स्वदेशे पूज्यते राजा विद्वान् सर्वत्र पूज्यते' या न्यायानें पाहतां त्याचा वरील ठिकाणीं किती मान व्हावा! पुढें कांहीं वर्षांनीं बेंजामिन् फ्रांक्लिन् तेथेंच आला असतां त्याचा आबालवृद्धांकडून केवढा गौरव झाला! चंद्रदर्शनाच्या दिवशीं सान्या लोकांची दृष्टि जशी सकौतुक व उत्कंठापूर्वक आकाशाकडे लागलेली असते, किंवा धूमकेतु उगवला असतां सारें जग जसें त्याच्याकडे सचमत्कार पाहतें, त्याप्रमाणेंच मोठमोठ्या अमीरउमरावांपासून तों साधारण गरीबगुरिबांपर्यंत सर्वांनीं त्याचा जयजयकार केला. असाच प्रकार त्याच्याहीपुढें कितीका वर्षांनीं सर् वॉल्टर् स्कॉट् हा हवा पालटण्याकरतां इटाली देशास निघाला असतां जेथें तेथें घडून आला. मग यावरून पाहतां वरील दोघांहूनही कित्येक अंशीं त्याची योग्यता मोठी त्याचा वरील ठिकाणीं बिलकुल मानमरातब न होतां तो केवळ साधारण मनुष्याप्रमाणें गेला तसा माघारीं आला ही मोठी अचंबा करण्यासारखी गोष्ट नव्हे काय![2]

---

१. पृष्ठ ७६१ पाहा. 'सम्पादक'

२. जॉनसन्ची त्याच्या मंडळांत जरी पराकाष्ठेची चहा होती, व सर्व जण त्यास गुरुप्रमाणें मान देत, तरी बाहेर त्याचें जाणें येणें व परिचय फार बेताबाताचाच होता. याविषयीं 'जॉन्सन्च्या चरित्रा'चा आलीकडील प्रकाशक क्रोकर्* यानें हिंदुस्थानचे माजी गव्हर्नर् जनरल् वेलस्लीसाहेब यांचा दाखला येणेंप्रमाणें दिला आहे:

"His polite acquaintance did not extend much beyound the circle of Mr. Thrale, Sir Joshua Reynolds, and the members of the Club. There is no record that the editor recollects, of his having dined at the table of any peer in London except Lord Lucan: he seems scarcely to have known an *English* bishop, except Dr. Shipley and Dr. Porteus, whom every one knew; and except by a few occasional visits at the *basbleux* assemblies of Mr. Montagu and Mr. Vessey, we do not trace him in anything like *fashionable* society. This seems srtange to us; for happily, in our day a literary man of much less than Johnson's eminence would be courted into the highest and most brilliant ranks of society. Lord Wellesley reco lects, with regret, the little notice compared with his posthumous reputation, which the *fashionable* world seemed to take of Johnson. He was known as a great writer; but his social and conversational powers were not so generally appreciated."

* John Wilson Croker (1780--1857) मुत्सद्दी, लेखक व प्रकाशक. क्वार्टर्ली रेव्ह्यूचा एक उत्पादक व राजकीय विषयांवरील जोरदार लेखक, डब्लिनच्या

(पुढें चालू)

तर वरील गोष्टीपासून एतद्देशीय ग्रंथकर्त्यांनीं दोन प्रकारचा बोध घ्यावा. एक द्रव्याच्या संबंधानें. त्यांनीं असें मनांत आणावें कीं, जॉन्सन्सारख्यास गेल्या शतकांतील इंग्लंडासारख्या देशांत जर इतकी विपत्ति सतत काढावी लागली व तितकी काढावी लागली असतांही त्यानें एकदां धरलेला मार्ग अस्खलितपणें तसाच सतत चालवला, तर आमच्या धनहीन व ज्ञानहीन देशांत ग्रंथरचनेपासून फलनिष्पत्ति कितपत होण्याचा संभव आहे हें जाणून मुख्यत: देशहितबुद्धीनेच आपलें काम आपण बजावलें पाहिजे. भाषारूप उपवनास आपल्या ज्ञानोदकाचें सेचन निदान आरंभीं तरी त्यांनीं केवळ निरपेक्ष बुद्धीनेंच केलें पाहिजे. कालेंकरून त्यांच्या श्रमांचा परिपाक कीर्तिरूप सुमनांनीं व अर्थरूप फलांनीं प्रगट होईलच होईल; पण त्या अदृष्ट लाभावर नजर न देतां पहिल्यानें केवळ आपलें कर्तव्यच ह्मणून त्यांनीं हातांत लेखणी धरली पाहिजे. दुसरी गोष्ट कीर्ति अथवा लोकमान्यता. हीही जॉन्सन्सारख्यास सुद्धां किती दीर्घ काळानें प्राप्त झाली, हें वर सांगितलेंच आहे. खडकाळ डोंगराची चढण जशी मोठी कठिण असते तसाच लोकप्रसिद्धीचा मार्गही परम विषम होय. तो क्रमण्यास मनुष्यानें एकदां कंबर बांधली ह्मणजे मग कितीही अडथळे आले तरी त्यानें धैर्य सोडतां कामास नाहीं. हा उपदेश, जॉन्सन् प्रथमत: लंडन् शहरास आपलें नशीब काढण्यास जों आला तेव्हांपासून तों शेवटपर्यंत त्याचा आयुष्यक्रम पूर्वी जो सांगण्यांत आला आहे, त्यावरून चांगला ठसण्यासारखा आहे. इतक्या काळांत त्याजवर दु:खें व अडचणी हीं तर पुष्कळ आलींच; पण कीर्तीचे विघातक जे दूषक त्यांचाही शेवटपर्यंत त्याजवर कडाका उडत होता. पण इसापनीतींतील 'बैल व मुरकूट' या गोष्टीप्रमाणेंच त्याचें वर्तन नेहेमी दृष्टीस पडे. मुरकूटबोवास बलीवर्दानें असें उत्तर दिलें कीं, "बाबारे, तूं माझ्या शिंगावर बसलास केव्हां हेंही मला समजलें नाहीं, व आपली स्वारी केव्हां उठून जाईल हेंही कळणार नाहीं," त्याप्रमाणेंच जॉन्सन् पक्का धिम्मा असे. सूर्यबिंबावरून ढग जसे येतात जातात व अखेरीस आपोआप वितळूनही जातात, त्याप्रमाणेंच वरील पंडिताच्या ग्रंथावर दूषकांचे आक्षेप शतशः झाले व कालगत्या लोपूनही गेले! [1] तर एतद्देशीय ग्रंथकारांनींही दूषकांचे आक्षेप घेण्यास वरच्याप्रमाणेंच तयार व्हावें. जो कोणी कोणत्याही संबंधानें जगांत वर डोकें काढूं जाईल त्याजवर आक्षेपांचा भडिमार व्हावयाचाच हें त्यांनीं ध्यानांत आणावें. जग हें त्रिविध आहे,

---

ट्रिनिटी कॉलेजांत याचें शिक्षण झालें. तो टोरी पक्षातर्फे पार्लमेंटांत शिरला व वीस वर्षेपर्यंत त्यानें मोठमोठ्या अधिकाराच्या जागांवर कामें केलीं. १८३१ सालीं त्यानें बॉस्वेल्कृत जॉन्सन्च्या चरित्राची आवृत्ति प्रकाशित केली. 'सम्पादक'

१. जॉन्सन्नें आपल्या आक्षेपकांच्या संबंधानें धरलेली जी निर्वाण औदासीन्याची वृत्ति तिजविषयीं मेकॉलेनें लिहिलें आहे:—

(पुढें चालू)

वास्तव एकच वस्तु तिघांस तीन प्रकारांनीं भासेल यांत नवल कसचें? तर हें जाणून सुज्ञ जे आहेत ते वृथा दूषकांच्या तोंडीं लागत नसतात. जर कोणाचा खरा आक्षेप असेल तर तेवढा मात्र स्वीकारून वरकड कोल्हेकुईकडे ते बिलकुल लक्ष देत नाहींत. मोरोपंतांची आर्या पुष्कळांस माहीत असेलच:—

इंसें मुक्ता नेली मग केला कलकलाट काकांनीं।

हा प्रकार कोणास कीर्तीचा लाभ होतांच मत्सरी जे खल त्यांच्याकडून नेहेमी व्हावयाचाच. तर ज्यास आपली योग्यता यथार्थ भासत असेल त्यानें वरील कर्णकटु काकरवाची अगदीं पर्वा न करतां उलटें असें समजावें कीं, हा गोंगाटच आपल्या यशाचा दर्शक असून त्यास अत्यंत अनुकूलही आहे! १

---

"Of his assailants Johnson took no notice whatever. He had early resolved never to be drawn into controversy; and he adhered to his resolution with a steadfastness which is the more extraordinary, because he was both intellectually and morally, of the stuff of which controversialists are made. In conversation, he was a singularly eager, acute, and pertinacious disputant. When at a loss for good reasons, he had recourse to sophistry; and when heated by altercation, he made unsparing use of sacrasm and invective. But when he took his pen in his hand, his whole character seemed to be changed. A hundred bad writers misrepresented him and reviled him; but not one of the hundred could boast of having been thought by him worthy of a refutation or even of a retort. The Kenricks, Campbells, Mac Nicols, and Hendersons did their best to annoy him, in the hope that he would give them importance by answering them. But the reader will, in vain, search his works for any allusion to Kenrick or Campbell, to Mac Nicol or Henderson. He had learned, both from his own observation and from literary history, in which he was deeply read, that the place of books in the public estimation is fixed, not by what is written about them, but by what is written in them; and that an author whose works are likely to live is very unwise if he stoops to wrangle with detractors whose works are certain to die. He always maintained that fame was a shuttlecock which could be kept up only by being beaten back, as well as beaten forward, and which would soon fall if there were only one battledoor. No saying was oftener in his mouth than that fine apophthegm of Bentley, that no man was ever written down but by himself."

१. दूषक व आक्षेपक हे जरी आपल्याकडून ग्रंथकाराची दुर्दशा करून टाकण्याविषयीं यत्न करीत असतात, तरी त्यांचे प्रयत्न वस्तुतः पाहतां त्याची प्रसिद्धि वाढवण्यास मात्र कारण होतात, हें प्रमेय पुष्कळांस कळत नाहीं. जॉन्सनर्ने जागजागीं त्याचा उल्लेख केलेला आढळतो:—

(पुढें चालू)

या कलमाचा निकाल करण्यापूर्वी आणखी एक मोठा महत्त्वाचा उपदेश ग्रंथरचनेच्या संबंधानें एतद्देशीयांनीं घेण्यासारखा आहे, तो सांगितला पाहिजे, तो हा. पूर्वी जॉन्सन्च्या सर्व ग्रंथांचा क्रमाक्रमानें जो निर्देश केला आहे त्यावरून शोधक वाचकांच्या लक्षांत कदाचित् एक मोठी गोष्ट येऊन चुकली असेल कीं, 'इंग्रेजी भाषेचा कोश,' 'शेक्सूपीअरची आवृत्ति', 'रँब्लर्', 'कविचरित्र' वगैरे जे ग्रंथ तयार झाले, त्यांच्या वृत्तान्तांत कोठें 'सरकारचा उदार आश्रय' किंवा 'दाक्षिणा-प्रैज कमिटीकडून बक्षीस' असा कांहीं प्रकार दृष्टीस पडत नाहीं. कोशासारखीं प्रचंड कामेंही जीं उठलीं तीं फक्त लोकाश्रयावर! तर देशभाषांचा उत्कर्ष व्हावा अशी ज्यांची मनःपूर्वक इच्छा असेल त्यांनीं वरील गोष्टीचें चांगलें मनन करणें अवश्य होय.[1]

---

( ७८६ वरून चालू )

"Abuse is often of service; there is nothing so dangerous to an author as silence. His name, like a shuttle-cock, must be beaten backwards and forwards; or it falls to the ground."

"Never let criticisms operate on your mind; it is very rarely that an author is hurt by his critics. The blaze of reputation cannot be blown out; but it often dies in the socket. A very few names may be considered as perpetual lamps shine that unconsumed."

"Dr. Johnson was famous for disregarding pubiic abuse. When the people criticised and answered his pamphlets, papers, &c, he would say: 'Why now, these fellows are only advertising my book; it is surely better a man should be abused than forgotten."

Mrs. Piozzi's * *Anecdotes*.

* Piozzi, Hester Lynch ( Salisbury ) १७४१-१८२१. हेन्री थ्रेलची बायको. हेन्रीच्या पश्चात् गॅब्रिएल् पिओझी (Gabriel Piozzi) नामक इटालियन सारंग्याशीं १७८४ सालीं विवाह केल्यामुळें जॉन्सन् ( तोंपर्यंत तिच्या घरीं राहत असे तरी ) तरी तिचें घर सोडून गेला. तिनें एक आत्मचरित्र लिहिलें असून ( Anecdotes of Dr. Johnson ) डॉक्टर् जॉन्सन्च्या आख्यायिका नामक एक उत्कृष्ट ग्रंथहि लिहिला आहे. तो फारच लोकप्रिय झाला. 'The Three Warnings' नामक एक कविता तिनें लिहिली असून ती डॉ. जॉन्सन्नें ठाकठीक केली असें म्हणतात. जॉन्सन्शीं तिचा फार दाट परिचय होता. 'सम्पादक'.

१. इंग्रेज लोकांचे ठायीं जे कित्येक लोकोत्तर गुण आहेत त्यांत मुख्य म्हटला तर वर सांगितलेलें जें स्वावलंबन तेंच होय यांत संशय नाहीं. त्यांच्या देशांत ज्या ज्या मोठ्या गोष्टी झालेल्या आहेत त्या केवळ त्यांच्या स्वतंत्र श्रमांचें फळ होत. येथील लोकांस प्रत्येक गोष्टीकरतां सरकारच्या तोंडाकडे पाहण्याची जी संवय लागली आहे व कोणतीही गोष्ट सरकार मनावर घेईल तरच ती सिद्धीस जाईल, ही जी त्यांची बळकट

( पुढें चालू )

७. आतां दुसरें सादृश्य जें लोकस्थितीच्या संबंधानें त्याविषयीं विवेचन करूं. जॉन्सन्नें सध्यांचें जें इंग्लंडांतील राजघराणें त्याच्या पहिल्या तीन कारकीर्दी चांगल्या पाहिल्या. यांपैकीं पहिल्या दोहोंविषयीं त्याचें काय मत होतें तें यापूर्वी प्रसंगवशात्[१] सांगण्यांत आलेंच आहे कीं त्या त्यास बिलकुल पसंत नसून पहिल्या व दुसऱ्या जॉर्ज राजांस तो बोलण्याच्या ओघांत बेलाशक शिव्या देत असे. त्यापुढें तिसऱ्याच्या कारकिर्दीपासून त्याच्या मनांत जो फेर झाला, आणि बर्कासन व राजदर्शन यांच्या योगानें त्याची वृत्ति जी दृढ होऊन बसली, तिचाही पूर्वी[२] उल्लेख केलाच आहे. हें मतांतर ज्या काळीं झालें तो काळ मोठा विलक्षण आणीबाणीचा होता. राजा पराकाष्ठेचा दुराग्रही व अपक्व बुद्धीचा, प्रधानमंडळ त्याच्याच तंत्रानें चालणारें व राजकारणांत अचतुर, आणि एकंदर प्रजा तर आपले योग्य अधिकार ओळखून त्यांत कंसभरही मागें घ्यावयाचें नाहीं अशा निकरास येऊन पडलेली, अशी भयंकर स्थिति त्या वेळची होती. अशांत अमेरिकेंतील वसाहतवाल्यांचा व इंग्लंडचा तंटा झुंपला. वसाहतवाल्यांचें म्हणणें इतकेंच होतें कीं ज्याअर्थी आम्ही इंग्लंडची प्रजा म्हणून आमच्यावर करांचा बोजा तुम्ही लादतां त्यापक्षीं तिकडील लोकांप्रमाणें आमच्याकडून कांहीं सभासदही पार्लमेंटांत घेत चला. हें त्यांचें म्हणणें वाजवी होतें हें कोणासही सहज कळणारें आहे; व थोरला पिट्, बर्क् वगैरे शहाण्या मुत्सद्दयांचाही सल्ला अमेरिकन् लोकांशीं तडजोड पाडून तंटा मिटवून टाकण्याविषयींचाच होता. पण त्यांचें ऐकतो कोण! पार्लमेंटांत त्यांनीं वल्गना कर कर केल्या व शेवटीं उगीच बसले. इकडे युद्धाची कडेकोट तयारी होऊन इंग्रेजी फौज आपल्या वसाहतींवर चालून जाण्यास निघाली. वसाहतवाले तरी त्याच आंग्लभूमीचे पठ्ठे! त्यांनीं लढाईचा घाट पाहतांच कंबर बांधली, व इंग्लंडची सत्ता मुळींच झुगारून देऊन अमेरिकेंतील प्रजासत्ताक राज्य या नांवानें आपला स्वातंत्र्याचा झेंडा उभारला. पुढें वॉशिंग्टनानें कोणत्या चातुर्यानें व हिंमतीनें लढाई शेवटास नेली, व स्वतः स्थापलेल्या नव्या संस्थानाचा पहिला अधिपति होऊन तें उच्चपद कालेंकरून सोडून दिलें, व साऱ्या जगाची वाहवा मिळवली, हें सर्वत्र विश्रुत आहेच. असो; तर या लढाईच्या संबंधानें वर सांगितलेला जो राज्यांतील बखेडा तो फारच माजला. युद्धांत इंग्लंडची धुळधाणी उडून शेवटीं राज्यचें राज्य हातचें गेलें यामुळें राजा व प्रधानमंडळ यांची अविश्वसित नाचकी

---

समजूत होऊन गेली आहे ती त्यांच्या पंगूपणाचें एक मोठें कारण होय. या रीतीनें पाहिलें असतां सरकारचा व रयतेचा पूर्वीचा लाडीकपणा जात जाऊन दिवसांदिवस दुरभाव जो होत चालला आहे तोही कांहींसा हिताबहूच होय. दूर: टाकून दिल्यानें तरी आमचे डोळे उघडून आपलें कर्तृत्व गाजवण्याची आम्हांस आवश्यकता पडो म्हणजे झालें!

१ पृष्ठ ७१२ पाहा. 'सम्पादक'

२ पृष्ठ ७२६ (अ) पाहा. 'सम्पादक'

झाली, व लोकपक्षास तेज आलें.[1] त्यांतून विल्कीज् जुनियस् यांच्यासारखे लोकपक्षाचे कैवारी यांनीं तर आपल्या लेखांनीं लोकांस आपले हक्क पुरतेपणीं भासवून देऊन

---

१. वरील काळीं इंग्लंडाची स्थिति कशी होती याविषयींची हकीकत + बकल नामक आलीकडील नामांकित ग्रंथकारानें आपल्या इतिहासाच्या पहिल्या भागाच्या शेवटीं सातव्या प्रकरणांत उत्कृष्ट दिलेली आहे. ती वाचीत असतां एतद्देशीय वाचकांस इकडील सादृश्य बरेंच लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

+ ही हकीकत अशीः—

Nothing, however, could stop the government in its headlong career. The ministers secure of a majority in both houses of parliament, were able to carry their measures, in defiance of the people, who opposed them by every mode short of actual violence.........for some years England was ruled by a system of absolute terror. The ministers of the day, turning a struggle of party into a war of proscription, filled the prisons with their political opponents, and allowed them, when in confinement, to be treated with shameful severity. If a man was known to be a reformer, he was constantly in danger of being arrested; and if he escaped that, he was watched at every turn, and his private letters were opened as they passed through the post-office. In such cases no scruples were allowed. Even the confidence of domestic life was violated. No opponent of government was safe under his own roof, against the tales of eavesdroppers and the gossip of servants. Discord was introduced into the bosom of families, and schisms caused between parents and their children. Not only, were the most strenuous efforts made to silence the press, but the booksellers were so constantly prosecuted that they did not dare to publish a work if its author were obnoxious to the court. Indeed, whoever opposed the government, was proclaimed the enemy to his country. Political associations and public meetings were strictly forbidden. Every popular leader was in personal danger; and every popular assemblage was dispersed either by threats or by military execution.........Spies were paid; witnesses were suborned; juries were packed. The coffeehouses, the inns, and the clubs, were filled with emissaries of the government, who reported the most hasty expressions of common conversation...........Such was the way in which, at the end of the eighteenth century, the rulers of England under pretence

(पुढें चालू)

आपल्या प्रतिपक्ष्यांवर सारखा घडाका चालवला होता. जॉन्सन्सारख्यांनींही राज-पक्षाचें मंडन करण्याचा व वरील लेखांचें खंडन करण्याचा प्रयत्न चालवला होता. पण एकंदरींत पाहतां हा दुसरा पक्ष किती दुर्बळ होता याचें प्रमाण पाहण्यास फार लांब जाणें नको. जॉन्सन्चेच वरील प्रकरणीं लेख पाहिले असतां त्यांतील कोटिक्रम किती पोकळ आहे, व त्याच्या स्वाभाविक सत्यनिष्ठेवर राजनिष्ठेचा व दुराग्रहाचा पगडा बसून तो कसा भरकटला आहे हें तेव्हांच लक्षांत येईल.

आतां वरील स्थितीचें सादृश्य इकडे आमच्या देशांतही कसें दृष्टीस पडूं लागलें आहे हें सर्वांस माहीत आहेच. पाश्चात्य विद्येचा संस्कार इकडील लोकांस घडून तो नमुना जसा इकडे उतरत चालला आहे, त्याप्रमाणेंच त्याच्याबरोबर वर्तमानपत्रांचा फैलाव, लौकिक प्रकरणांची चर्चा, सार्वजनिक सभा, वगैरे प्रकारही सहजच सुरू झाले आहेत. वरील विद्येचें अध्ययन इकडे सर्वत्र चालू झालें आहे, व आज वीस वर्षें तर युनिव्हर्सिटींतल्या मोठमोठ्या परीक्षांतून पसार झालेली मंडळी चोहोंकडे पसरली आहे, तेव्हां या कारणापासून वरील कार्य उद्भवावें हें सहजच आहे. गारगोटीवर आपण होऊन जर चकमक झाडली, आणि तींतून झाडण्यासरसा बाहेर विस्तव पडला, तर त्याबद्दल कोणास आश्चर्य वाटेल काय? पण नवल पाहा काय कीं, ज्यांनीं एतद्देशीयांस अज्ञानसागरांत मग्न झालेले पाहून त्यांस सदय अंतःकरणेंकरून वर काढलें, आणि ज्ञानाच्या व सुधारणेच्या मार्गास लावून दिलें, त्यांसच त्यांनीं तो मार्ग क्रमण्यास आरंभ केला असतां ती गोष्ट आतां खपेनाशी झाली आहे. 'बाँबे गॅझिट' सारख्या पत्रांचे पुरस्कर्ते व त्यांत लिहिणार हे नेटिवांस आलीकडे कसे पाण्यांत पाहूं लागले आहेत, व त्यांनीं कोणत्याही संबंधें कोठें डोकें वर काढलेलें दिसल्याबरोबर आपली कलमबहादरी ते कोणत्या प्रकारें गाजवीत असतात, हें सर्वांस माहीत होत चाललेंच आहे. एल्फिन्स्टन्, माल्कम्, मनरो वगैरे राजकार्यधुरंधरांनीं येथील प्रभुत्व कोणत्या तऱ्हेनें संपादन केलें, व आपल्या राष्ट्राचा बोज जेणेंकरून राहील तशा रीतीनें एतद्देशीय लोकांशीं वर्तन ठेवून त्यांच्या ठायीं आपल्या परकी अंमलाविषयींही कोणत्या वृत्ति त्यांनीं उत्पन्न केल्या, त्याप्रमाणेंच बेंटिक्, मेकॉले वगैरेंचे हिंदुस्थानाच्या राज्याविषयीं कोणकोणते स्तुत्य हेतु होते, हें सर्व आलीकडाल

---

of protecting the institutions of the country, oppressed the people, for whose benefit alone those institutions aught to exist.........Taxes were laid upon nearly every product of industry and of nature. In the vast majority of cases, these taxes fell upon the great body of the people, who were thus placed in a position of singular hardship.........Thus it was that the government diminished the liberties of the people, and wasted the fruit of their industry, in order

(पुढें चालू)

आमच्छाही मंडळीच्या कधीं स्वप्नांतही येत नसेल!¹ हिंदुस्थान ह्मणजे आपल्या तरवारबहाद्दूर पूर्वजांनीं एक चैनीची जागा आपणांस करून ठेवली आहे, तेथें मनास मानेल तशी चंगळ करावी व सरकारच्या जांवईपणाची चार दिवसांची सत्ता इच्छेच्छ चालवून घ्यावी,

---

to protect that very pepole against opinions which the growth of their kuowledge had irresistibly forced upon them.......The political movement was, no doubt, more threattening than it had been for several generations. On the other hand, the intellectual movement was highly favourable, and its influence was rapidly spreading. 'सम्पादक'

१. मेकॉलेनें पार्लमेंटांत जी अनेक भाषणें निरनिराळ्या प्रसंगीं केलीं तीं एकत्र छापलेलीं आहेत. त्यांत एक 'हिंदुस्थानची राज्यव्यवस्था' या विषयावर आहे. त्यांतील पुढील उतारे वाचले असतां त्या वेळेंत व सांप्रत काळांत किती फेर पडला आहे तो दिसून येईल:—

"Do I call the government of India a perfect government? Very far from it. No nation can be perfectly well governed till it is competent to govern itself. I compare the Indian government with other governments of the same class, with despotisms, with military despotisms, with foreign military despotisms. I compare it with the government of the Roman provinces; with the government of the Spanish colonies; and I am proud of my country and age. It is a source of constant amazement to me that is it so good as I find it to be.

"There is one part of the bill on which I feel myself irresistibly impelled to say a few words. I allude to that wise, that benevolent, that noble clause, which enacts that no native of our Indian empire shall, by reason of his colour his descent or his religion, be incapable of holding office. At the risk of being called by that nickname which is regarded as the most opprobrious of all nicknames by men of selfish hearts and contracted minds, at the risk of being called a philosopher, I must say that, to the last day of my life, I shall be proud of having been one of those who assisted in the framing of the bill which contains that clause. We are told that the time can never come when the native of India can be admitted to high civil and military office. We are told that this is the condition on which we hold our power. We are told that we are bound to confer on our subjects every benefit—which they are capable of enjoying?—

(पुढे चालू).

यापलीकडे कधीं काळीं बहुतेकांच्या मनांतही बिलकुल कल्पना येत नसेल. असो; या विषयावर पूर्ण विवेचन करून या देशाची राज्यरीति सुधारण्यास काय काय गोष्टी अवश्य आहेत, सध्यांचा जो प्रकार चालू आहे त्यापासून राज्यकर्त्यांचें व प्रजेचें असें उभयपक्षींही कोणतें अहित होत आहे वगैरे दर्शविण्याचा यत्न केल्यास फारच विस्तार होणार आहे; व चालू विषयाचें व मासिक पुस्तकाच्या मर्यादेचें अतिक्रमण होणार आहे; यास्तव वरील दिग्दर्शन केलें येवढेंच बस आहे. वरील विषय वस्तुतः वर्तमानपत्रांचा असून त्यांतून त्याची चर्चा निरंतर चालू असतेच. तर सरतेशेवटीं वरील साहश्यावरून आमच्या देशबंधूंनीं हा बोध घ्यावा कीं, इंग्लंडांतील लोकांनीं सतत प्रयत्न करून आपले हक्क जसे वरचेवर सरकारच्या कानावर घातले, त्याप्रमाणें स्वदेशाच्या उन्नत्यर्थ त्यांनींही कंबर बांधावी. तसें केलें असता अल्पदृष्टि व स्वार्थपरायण जे 'एलिफास्' चे बंधु ते आपल्या स्वभावास अनुसरून कोल्हेकुई करतीलच; पण तीस या देशाच्या कैवाऱ्यांनीं अगदीं भिऊं नये. वीस वर्षांपूर्वी साऱ्या जगासमोर जो जाहिरनामा प्रसिद्ध झाला तो जर नुसता दप्तरच्या दप्तरांत राहावयाचा नसेल, यंदा आमच्या दयावंत राणीसरकारनें येवढ्या समारंभानें जो 'चक्रवर्तिनी' पदाचा स्वीकार केला तो केवळ आत्मगौरवार्थ जर नसेल, युवराजासारखी खाशी मंडळी या देशांतील जयजयकार घेऊन माघारीं जाते याचें जर कांहीं सार्थक होणें असेल, युनिव्हर्सिटीच्या वार्षिक उत्सवाच्या प्रसंगीं चक्रवर्तिनीच्या प्रतिनिधींकडून आम्हांस जें आश्वासन मिळत गेलें आहे, कीं इंग्रेज सरकारचा हेतु या देशाचें कल्याण करावें व लोकांस सुजाण करून त्यांची सत्ता त्यांच्या हातीं परत द्यावी, तें त्यांचें वचन जर केवळ उपचारार्थ नसेल; तर पाश्चात्य विद्येचा परिपाक आमच्या ठायीं इतके लवकर इतका दृष्टीस पडूं लागला आहे, या गोष्टीचा आमच्या राज्यकर्त्यांस आनंद व अभिमानच वाटला

---

no;—which it is in our power to confer on them?—no;—but which we can confer on them without hazard to the perpetuity of our own dominion. Against that proposition I solemnly protest as inconsistent alike with sound policy and sound morality.

"Are we to keep the people of India ignorant in order that we may keep them submissive? Or do we think that we can give them knowledge without awakening ambition? Or do we mean to awaken ambition and to provide it with no legitimate vent? Who will answer any of these questions in the affirmative? Yet one of them must be answered in the affirmative, by every person who maintains that we ought permanently to exclude the natives from high office. I have no fears. The path of duty is plain before us; and it is also the path of wisdom, of national prosperity, of national honor.

"We are free, we are civilized to little purpose, if we grudge to any portion of the human race an equal measure of freedom and civilization."

पाहिजे. बापाचें ओझें डोईचें खांद्यावर घेण्याचा जर पुत्रानें प्रसंग आणला, किंवा शिष्य गुरूच्या योग्यतेस येण्याचा जर सुमार दिसूं लागला, तर दोघांसही त्या गोष्टीचा खेद वाटावा, कीं आपल्या श्रमाची कृतार्थता वाटावी ? तर या न्यायानें पाहिलें असतां आमच्या देशांत वर्तमानपत्रें सार्वजनिक, सभा इत्यादि रूपांनीं जो उद्योग चालू झाला आहे त्याचें सर्वांनीं अभिनंदनच करणें योग्य आहे. पण असा प्रकार इकडे येणाऱ्या आलीकडील आंग्लभौमांचे ठायीं प्रायः न दिसून उलटा त्यांचा सापत्नभाव मात्र प्रगट होत असतो. पण त्याची फारशी पर्वा न करतां आमच्या देशहितेच्छूंनीं हें लक्षांत ठेवावें कीं, ज्या देशांत जॉन्सन्, बर्क् यांच्यासारखी मंडळी निपजली, व जेथें आजही ब्राइट्, फॉसेट्, यांच्यासारखे महात्मे पुरुष नांदत आहेत, तेथपर्यंत इकडील गाऱ्हाणीं पोंचलीं असतां केवळ अरण्यरुदित केल्याप्रमाणें होईल असें नाहीं, तरी कालेंकरून तर त्यांच्या श्रमांस यश येईलच येईल !

याप्रमाणें या शेवटच्या अंकाचा विषय समाप्त झाला. गेल्या सतेचाळिसाव्या अंकांत आरंभीं उपक्षेप केल्याप्रमाणें प्रस्तुत चरित्राचे सर्व भाग येथें संपूर्ण झाले. दोन वर्षांपूर्वीं बॉस्वेलकृत 'चरित्र' समग्र वाचलें असतां आम्हांस सुचलें कीं, जॉन्सनचें चरित्र एतद्देशीय वाचकांस समग्र कथन केलें असतां पुष्कळ तन्हेचा फायदा होण्यासारखा आहे. तो कोणकोणता हें यापूर्वीं* सांगण्यांत आलेंच आहे. आतां हा आमचा मूळ संकल्प कितपत सिद्धीस गेला असेल हें आमच्यानें सांगवत नाहीं. तरी आम्हीं केलेल्या दिग्दर्शनावरून आमच्या वाचकांपैकीं जे कोणी इंग्रजी जाणणारे असतील त्यांस वर सांगितलेला इंग्रजी ग्रंथ वाचण्याची जर इच्छा होईल, व केवळ मराठी जाणणारास चरित्रनायकाचें व त्याच्या राष्ट्राचें बरेंच स्वरूप ध्यानांत येऊन महत्त्व प्राप्त होण्यास कोणकोणते अमोलिक गुण अंगीं असावे लागतात हें जर स्पष्टपणीं दिसून येईल, तर येवढें सविस्तर चरित्र लिहिल्याच्या श्रमांचें पुष्कळ साफल्य झालें असें आम्ही समजूं.

---

## मोरोपंताची कविता.

जसे होती देव प्रमुदित शची–नायक–वनीं
तसे सारस्वाते बुध–जन मयूरेश–कवनीं ।

मंत्ररामायण–उत्तरकांड–उपसंहार, १२.

अंक ४९—(१) प्रस्तुत निबंधाचें स्वरूप. (२) त्यांत येणारे विषय. (३) विवेचनाच्या विस्ताराबद्दल वगैरे वाचकांस सूचना. (४) प्रस्तुत विषयाचे भाग. (५) मोरोपंतावर आक्षेप. (६) त्यांशा तर्केचीं मतें.

---

* अंक ३३ वा पृष्ठें ६७०इ, ६७१–६७२ पाहा. 'सम्पादक'

१. प्रस्तुत अंकाचा विषय अगदीं नवा असून आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस तो मोठा चित्तवेधक होईल असें वाटतें. अशासारखे विषय आम्हीं अद्याप कसे हातीं धरले नाहींत याबद्दल पुष्कळांस आजपर्यंत नवल वाटलें असेल; कां कीं आमचें पुस्तक महाराष्ट्रभाषेच्या अभिवृद्ध्यर्थ जर निघालें आहे, तर त्या अभिवृद्धीचे मुख्य साधक जे महाराष्ट्रकवि त्यांच्या संबंधानें कधींच विवेचन होऊं नये हें विचित्र आहे- हें जाणून कित्येकांनीं आम्हांस यासंबंधानें सूचनाही केल्या आहेत. पण प्रकृत विषय आजपर्यंत तसाच ठेवण्याचीं अनेक कारणें झालीं. एक तर हें कीं मराठी कविता हा विषय कांहीं लहान नाहीं. ज्ञानेश्वरी, एकनाथकृत रामायण, मुक्तेश्वराचीं चार पर्वें, तुकाराम, नामदेव इत्यादिकांचे हजारों हजार अभंग, मोरोपंताचे भारत, भागवत, रामायण इत्यादिविषयक ग्रंथ[१], येवढेच मोठमोठाले ग्रंथ घेतले तरी ते समग्र व मननपूर्वक वाचणें म्हणजे थोड्या श्रमाचें व काळाचें काम आहे असें नाहीं. त्यांतून 'ज्ञानेश्वरी'सारखे ग्रंथ तर भाषेच्या संबंधानें व अर्थाच्या संबंधानेंही दुर्बोध; कां कीं त्यांतील शब्द व रचना ही अर्धी मराठी व अर्धी प्राकृत आहे, व विषयही अध्यात्म किंवा वेदान्त असल्यामुळें आकलन होण्यास कठिणच. शिवाय महाराष्ट्रकवितेचा संपूर्ण संग्रहही अद्याप झाला आहे असें नाहीं. 'सर्वसंग्रह' पुस्तक सहा सात वर्षेंच काय तें चालून त्यांत जो काय थोडाबहुत महाराष्ट्रकवितेचा जीर्णोद्धार झाला तो झाला. त्याचा आयुर्दाय संपून आज दहा वर्षें होत आलीं; व इतक्या काळांत शेंकडों गोष्टींचें 'उत्तेजन' व वर्धन' झालें,—तालीमबाजांचे आखाडे ओस पडले होते ते पुनः गजबजून राहिले, लोकांचे ठायीं सद्धर्माचा अभाव होऊं लागला होता, तो दोन रुपये रोजींचा महाग धर्मगुरु मुंबापुरीहून मागवून आणून त्याच्या करवीं देशोन्नतीस मुख्यस्तंभभूत जी धर्मोन्नति ती करवली, कलाकौशल्य अस्तंगत होऊं पाहत होतें त्यास शिवणकलेपासून पुनः ओनामा ह्मणायाला लावला,—तशीच गेल्या दशकांत लोककल्याणकर्ती मंडळीही आर्यजननीचें बिरीद दंडाला बांधून जिकडे पाहावें तिकडे

---

१. मराठी कवितेचा एकंदर विस्तार पाहिला तर लहान आहे असें नाहीं. एकट्या मोरोपंताच्या आर्या तीन लक्ष§ आहेत असें म्हणतात. तुकाराम, नामदेव, ज्ञानदेव, इत्यादिकाचे अभंगही तसेंच किती आहेत यांचा ठिकाण नाहीं! याविषयीं कांहीं प्रसिद्ध अभंग येणेंप्रमाणें आहेतः—

चार कोटी एक लक्षाच्या शेवटीं।
चवतीस सहस्र सांगितले ॥
सांगुनी इतुके तुका कथिता झाला।
चवदा अभंगां ह्या सोडूं नका ॥

§ वस्तुतः मोरोपंतांची प्रकाशित व अप्रकाशित कविता सुमारें साठ हजारच आहे.— 'सम्पादक'

कंबरा बांधून उठली, व पश्चात् देशहिताच्या कामाला लागली; पण इतक्या लोककल्याणेच्छूंपैकी एक दोनही आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्रकवींच्या वांट्यास आले नाहींत. रा. माधव चंद्रोबा, 'सर्वसंग्रहा'चे मालक, यांनी सरकारचा आश्रय तुटला असतां आपल्या देशबंधूंची जी काकळूत केली ती केवळ अरण्यरुदिताप्रमाणें निष्फळ झाली! याही गोष्टीस कांहीं काळ लोटला असतां आमच्या मराठी कवींस दुसरी एक महापर्वणी आली होती. माजी गव्हर्नर् नेक नामदार सर् बार्ट्ल् फ्रीयर्[1] हे विलायतेस जाऊं लागले, तेव्हां तुकारामाचा जीर्णोद्धार करण्याचें त्यांनीं मनांत आणून माजी डायरेक्टर् मेहेरबान ग्रँट्[2] साहेब यांचेकडे तें काम सोंपवून दिलें. ग्रँट् साहेबांचीही भक्ति वरील कवीवर होतीच; तेव्हां त्यांनीं वरील काम मोठ्या उत्साहानें पतकरून आपल्या शिष्यमंडळीपैकीं कांहीं जणांची तिकडे योजना केली. येवढी धुरंधर मंडळी ज्या कामांत पडली व २४००० रुपयांची रकम ज्याकरतां निराळी काढून ठेवली तें कसें हं हं म्हणतां उठलें असेल हें सांगायाला नकोच! 'राजा बोले आणि दळ हाले' या म्हणीप्रमाणें वरील प्रसंगीं मोठमोठे चमत्कार घडण्यांत आले. ज्याच्या

---

१. Sir Henry Bartle Edward Frere (1815—1884). १८३४ सालीं याची सिव्हिल् सर्व्हिसमध्यें नेमणूक होऊन लेखक म्हणून हा मुंबईस आला. देशीं भाषेची परीक्षा पास होतांच १८३५ सालीं हा पुण्याचा ॲसिस्टंट् कलेक्टर् झाला व पुढें १८४२ सालीं मुंबईच्या गव्हर्नर्चा प्रायव्हेट सेक्रेटरी, १८४४ सालीं साताऱ्यास पोलिटिकल् रेसिडेंट्, १८५० सालीं सिंधचा चीफ् कमिशनर् व १८६२ सालीं मुंबईचा गव्हर्नर् झाला. यानें मुंबई युनिव्हर्सिटीच्या इमारतीच्या पाया बसविला व डेक्कन् कॉलेज व एंजिनिअरिंग् कॉलेज पुण्यास स्थापलीं. 'सम्पादक'

२. Sir Alexander Grant (1826—1884). विद्वान् व शिक्षणाचा मोठा पुरस्कर्ता. जन्म न्यूयॉर्क् येथें. हॅरो व ऑक्स्फर्ड् येथें याचें शिक्षण झालें. मुद्दाम ॲरिस्टॉट्ल्च्या तत्त्वज्ञानाचा अभ्यास करून १८५७ सालीं त्यानें Ethics हें पुस्तक प्रसिद्ध केलें व तें ऑक्स्फर्ड् विद्यापीठांत टेक्स्ट् बुक् नेमण्यांत आलें. १८५५ सालीं आय्. सी. एस्. परीक्षेचा परीक्षक, १८५९ सालीं मद्रासच्या शाळांचा इन्स्पेक्टर्, १८६० सालीं मुंबईच्या एल्फिन्स्टन् कॉलेजांत इतिहास व अर्थशास्त्र या विषयांचा प्रोफेसर, १८६२ सालीं प्रिन्सिपाल् एल्फिन्स्टन् कॉलेज, १८६३ सालीं मुंबई विद्यापीठाचा व्हाइस् चॅन्सेलर् याप्रमाणें चढत चढत १८६५ सालीं हा मुंबई इलाख्याचा डायरेक्टर् ऑफ् पब्लिक् इन्स्ट्रक्शन् झाला व १८६८ सालीं लेजिस्लेटिव्ह कौन्सिल्चा मेंबर व एडिंबरो विद्यापीठाचा प्रिन्सिपाल् झाला. पुढील आयुष्य त्यानें एडिंबरो विद्यापीठाकरतांच खर्च केलें. १८५९ सालीं याचा 'Story of the University of Edinburgh during its First Three Hundred years' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला. 'सम्पादक'

हातांत मराठी पुस्तकाचा विटाळ कधीं होवयाचा नाहीं, व मराठी कवींचें तर त्यांनीं कधीं मुखावलोकनही करायाचें नाहीं, असे बडे बडे किताबधारी गुरुजनांपुढें दीन होऊन कोणी त्याचें चरित्र लिहिलें, कोणी अभंगांचें शुद्धपत्र तयार केलें, कोणी ग्रंथप्रकाशन व टिप्पणी हें काम पत्करलें; तसेंच कोणी साहेबांचे आज्ञेवरून मूर्तिपूजारूप पातकाचीं आगरें जीं आळंदी, देहू वगैरे स्थानें त्यांच्या दर्शनास जाऊन संतमंडळींचा आश्रय केला, व अभंगांचीं बाडें जमा केलीं. असें होतां होतां कांहीं काळानें वरील संकल्प सिद्ध होऊन जो बिचारा शूद्रकवि आपल्या लंगोटीबहादर व घोंगडीवाल्या मठमंडळींतच काय तो रमावयाचा, फार झालें तर हरदासांच्या कथाप्रसंगीं सत्कार पावावयाचा, त्यास एकाएकीं अरबी गोष्टींतील अबू हसनाप्रमाणें मोठें ऐश्वर्य प्राप्त झालें! इंदुप्रकाश मुद्रणशाळ्यांतील मुक्ताफळें अंगभर उधळलेलीं, महावस्त्रांत शरीर लपेटलेलें, व युनिव्हर्सिटीनें शानदार झगे घातलेले तरुण विद्वान् डोक्यावर मोरचेल उडवताहेत व चवऱ्या ढाळताहेत अशा थाटानें तुकाराममहाराज कांहीं दिवसांनीं आपल्या अभिधानाची सार्थता पावून विराजमान झाले. महाराष्ट्र-देशाच्या पहिल्या अधिपतीनें[1] पाठवलेलें ऐश्वर्य परत लावून वरील कवीनें जी आपली हानि करून घेतली होती, तिची भरपाई दोन शतकांनंतर त्याच देशाच्या परद्वीपस्थ प्रभूनें करण्याचें मनांत आणलें की काय कोण जाणे! असो; झाली ती गोष्ट बरीच झाली. पण एकट्या तुकोबाचीच वरील संभावना झालेली पाहून कोणाही सज्जन मनुष्यास असें वाटणारें आहे कीं, दाराबाहेर जर शेंकडों आगंतुक आरोळ्या देत आहेत तर त्यांपैकीं एका-सच आंत घेऊन त्यास राजोपचार करून पंचरसाचें भोजन घालणें बाकीच्यांस हुसकून मुक्तद्वार करून त्यांच्या मंडळींस सारस्वताचा वाटा नेत करणें हें नव्हे काय![2] तर एवढ्या उघड गोष्टीविषयींही सूचना करण्याचें श्रेय वरील पंडितमंडळीनें घेतलें

१. छत्रपति श्रीशिवाजी महाराज. ‘[illegible]’

२. वरील उपमा कित्येक वाचकांस कदाचित् फार अप्रशस्त वाटेल; पण वास्तविक स्थिति पाहिली तर आमच्या देशाच्या हरएक प्रकरणीं वरील सादृश्यच लागू पडेल. इंग्लंडांतील अगदीं सामान्य कवींविषयीं ग्रंथ छापून निघाले आहेत, पण आमच्या देशांतील मोठमोठ्यांसही कोणी विचारीना. इंग्लंडांत अगदीं साधारण घडणाऱ्या गोष्टींचीही हकीकत लिहिली जाऊन सामान्य प्रसिद्धीच्या मनुष्याचेंही चरित्र सर्वांस विश्रुत होतें; येथली स्थिति पाहिली तर आपल्या पूर्वजांनीं केलेल्या दिग्विजयादि पराक्रमांविषयींही कोणास जिज्ञासा होत नाहीं, व मोठी दिगंतकीर्ति मिळवलेल्या महापुरुषांचीं पुरतीं नांवेंही कोणास विचारल्यास सांगतां येणार नाहींत. यामुळेंच जुन्या काळची प्रत्येक विद्या व प्रत्येक कला निराश्रित होत्साती दिवसांदिवस समूळ लय पावत आहे, व आमचे विद्वान् व सुधारकेच्छु देशबंधु खुशाल बिनघोर हें स्थिति पाहत आहेत हें कोणाही मनुष्यास चोहोंकडे दृष्टि फेंकली असतां कळणार आहे!

नाहीं, हें त्यांस मोठें भूषणास्पद झालें असें नाहीं. असो; तर महाराष्ट्रकवितेचा अद्याप संपूर्ण संग्रह झाला नाहीं, व जितका झाला आहे तितक्यांचें अवलोकनही श्रमाचें व काळाचें काम होय हें प्रस्तुत विषय तसाच राहूं देण्याचें एक कारण होय. दुसरें कारण असें कीं महाराष्ट्रकवींविषयींच्या निरूपणांत संस्कृत कवींच्याहून एक विशेष भाग येण्यासारखा असतो; तो कवींविषयींचा वृत्तान्त किंवा निदान दंतकथा हा होय. हा भाग प्राचीन जे संस्कृत कवि त्यांच्या संबंधानें येण्याचा बहुधा संभवच नसल्यामुळें त्यांच्या ग्रंथांचेंच विवेचन करण्यास हरकत नसते. पण मराठी कवींविषयीं तसें करतां येत नाहीं. कोणत्याही कवीविषयीं सविस्तर निरूपण करायाचें म्हटलें म्हणजे वाचकांची अपेक्षा प्रथमतः कवीच्या वृत्तान्ताविषयीं सहजच होण्यासारखी असते. या अपेक्षेप्रमाणें बहुतेक मराठी कवींचा वृत्तान्त त्यांच्या त्यांच्या जागीं थोडाबहुत तरी मिळण्याचा अद्याप संभव आहे. पण हें काम चौकस व युक्तिवान् मनुष्यांचें असल्यामुळें केव्हां सिद्ध होईल हें सांगवत नाहीं. तेव्हां या कारणावरून हा प्रस्तुत विषय तूर्त तहकूब ठेवण्यांत आला. तिसरें कारण असें कीं, महाराष्ट्रकवि, महाराष्ट्र देशाचा इतिहास, अशांसारखे विषय अत्यंत महत्त्वाचे असल्यामुळें इतर सामान्य विषयांप्रमाणें त्यांचें निरूपण सरसकट रीतीनें करतां उपयोगी नाहीं. ते हातीं घेणारानें त्यांचें मनन दीर्घकाळ करून व त्यांजवर पुष्कळ शोध करून यथावकाश विचारपूर्वक त्यांजवर ग्रंथरचना केली पाहिजे. यास्तव मासिक पुस्तकांतून असले विषय संगतवार साद्यंत असे कधींही येत नसतात; आलेच तर प्रस्तुत निबंधाप्रमाणें, खंडशःच यावयाचे. तर याप्रमाणें अनेक कारणांस्तव महाराष्ट्रकवितेचा विषय आजपर्यंत लिहायास न घेऊन सध्यां जो घेतला आहे तो तरी 'मोरोपंत' अशा रूपानें न घेऊन 'मोरोपंताची कविता' असा घेतला आहे. याचें कारण उघडच आहे कीं, पहिलें सदर घातलें असतें तर कवीचा वृत्तान्त, व त्याच्या सर्व ग्रंथांचें गुणदोषविवेचन हें करणें भाग पडतें. पण वृत्तान्त अजून जसा जमावा तसा जमला नाहीं, व ग्रंथही सर्व अद्याप छापून निघाले नाहींत. तेव्हां पहिलें सदर टाकून दुसरेंच प्रकृत निबंधास घालावें लागलें.

२. आतां वर सांगितल्याप्रमाणें विषयसंकोच केला असतां प्रकृत निबंधांत निरूपण करण्यासारखें काय राहिलें असें कोणास कदाचित् वाटेल; पण वरील सदरांतही थोडा विषय येणार आहे असें नाहीं. मोरोपंताच्या कवितेविषयीं लोकांत पुष्कळ मतभेद आहे; कोणाच्या मतें त्याच्यासारखा कवि आजपर्यंत महाराष्ट्रांत, किंबहुना हिंदुस्थानांतही, झाला नाहीं; कोणाच्या मतें त्याची योग्यता चित्रकवित्वाच्या संबंधानेंच विशेषतः मानायाची; व कोणाच्या मतें तर तो मुळींच कवि नसून उगीच मारा-

भार गावाळ लिहून ठेवण्यांत त्यांनें मूर्खपणानें आपलें आयुष्य घालवलें. तर येवढ जेथें वाद आहे, व तोही पुनः आमच्या अशिक्षित जुन्या लोकांत नव्हे तर विद्या संपन्न ह्मणवणाऱ्या मोठमोठ्या नामांकित मंडळीमध्यें, तेथें निःपक्षपातपणें यथाव गुणदोषविवेचन होण्यास पुष्कळ अवकाश आहे हें उघड आहे.

वरील विवेचनावरून आणखीही कांहीं गोष्टींविषयीं निर्णय झाल्यासारखा होईल. एक तर एकंदर महाराष्ट्रकवितेविषयीं. या विषयावर पाश्चात्य ग्रंथकारांचं मतें अद्याप ह्मणण्यासारखीं प्रगट झालीं नाहींत; तरी जेथें संस्कृत कवितेचीही डा शिजत नाहीं तेथें मराठी कवितेची गोष्ट बोलायासच नको! [१]आमची नवीन विद्वा मंडळी तर सर्वतोपरी आपल्या परद्वीपस्थ गुरूंच्या सूत्रानेंच चालणारी, तेव्हां त्यांचे

---

१ संस्कृत कवितेविषयीं मेकॉले साहेबांचें मत काय होतें हें नुकतेंच ए ठिकाणीं (अंक ४२ टीप) * दाखल केलें आहे. मिल् साहेबांचें मत पाहायाचं असल्यास तेंहीं त्यांच्या इतिहासांत स्पष्ट लिहिलेलें सांपडेल § (पुस्तक २ भाग ९) हे दोघे रसिकशिरोमणि लोकांतरास गेल्यापासून त्यांची गादी चालवणारा कोणी अद्या निघाला नाहीं व कदाचित् यापुढेंही निघणार नाहीं. कारण कीं, एक तर दिवसा दिवस इकडील भाषांचा प्रसार तिकडे अधिकाधिक होत चालला आहे, व ज्य विषयाची माहिती आपणास सरासरी शून्यच त्यावर निःशंकपणें अभिप्राय ठोकू देण्याचें साहसही आलीकडील काळांत कमीच झालें पाहिजे! तरी अद्याप संस्कृ कवींची प्रसिद्धि काय ती संस्कृतज्ञांच्या मंडळींतच आढळते. तिच्या पलीक सामान्य बहुश्रुत लोकांपर्यंत ती अजून पोंचली नाहीं. त्यांचा तिजविषयीं सामान्यत तिरस्कारच आढळतो. मग कालिदास, भवभूति वगैरे मंडळीचा जेथें इतका बोज ते बिचाऱ्या वामन–मोरोपंतांना कोण पुसतो! या बिचाऱ्या प्राकृत कवींचा येवढ भाग्योदय कधीं काळीं होईल तो होवो. सध्यां नाहीं ह्मणायाला आमचे साळेभों तुकोबा मात्र युरोपांतील कांहीं लायब्ररी [च्यां! सं.] तून जाऊन बसले आहेत युरोपखंडाची सुधारलेली हवा यांच महाराष्ट्रकवीस लागण्याचा कोणता योग आला वर सांगण्यांत आलेंच आहे.

* पृष्ठ ४३८ पाहा. 'सम्पादक'

§... "The literature of any people is one of the source

[पुढें चालू]

विचारही सदरील विषयावर त्यांच्यासारखेच असून जुन्या शास्त्रीलोकांप्रमाणेंच प्राकृत कवितेविषयीं त्यांचा सामान्यतः तिरस्कारच आढळतो. तर विद्वानांच्या

---

from which the surest inferences may be drawn with respect to their civilization.

The first literature is poetry. Poetry is the language of passions, and men feel before they speculate. The earliest poetry is the expression of the feellings, by which the minds of rude men are the most powerfully actuated. Before the invention of writing, men are directed also to the use of versification by the aid of which it affords to the memory. . . . . . .Even after the noble art of writing is known, the habit of consigning to verse very idea, destined for permanency, continues till certain new steps are effected in the intellectual career.

At the first stage the literature of the Hindus has always remained. The habit of expressing everything in verse; a habit which urgent necessity imposes on a people unacquainted with the use of permanent signs, and which the power of custom upholds, till after a certain progress in improvement, even among those to whom permanent signs are known; we trace among the Hindus to the present day. All their compositions with wonderfully few exceptions are in verse. For history they have only certain narrative poems, which depart from all resemblance to truth and nature and have evidently no further connection with fact than the use of certain names and a few remote allusions. Their laws like those of rude nations in general are inverse. Their sacred books and even their books of science are in verse; and what is more wonderful still, their dictionaries. . . . . . . . Among those whose disposition was more to admire than explore scarcely any poetry has been regarded as presenting higher claims to admiration."

अशी प्रस्तावना करून पुढें मिल्ल साहेब ह्मणतातः—

"Among the Hindus there are two great poems, the Ramayan, and the Mahabharat, which are long narratives, or rather miscellanies, in verse, and which their admirers have been puzzled

[पुढें चालू]

तिरस्कारास पात्र जी वरील कविता तिचें स्वरूप पुढील विवेचनांत बरेंच प्रगट होणार आहे. मोरोपंताची योग्यता मराठी कृतींत मोठी घरली अस-

---

whether to denominate history, or epic poems. By the Hindus themselves, they are moreover regarded as books of religion; nay further as books of law... They may even be regarded as books of philosophy....... They describe a series of actions in which a number of men and gods are jointly engaged. These fictions are not only more extravagant, and unnatural, less correspondent with the physical and moral laws of the universe, but are less ingenious, more monstrous, and have less of anything that can engage the affection, awaken sympathy, or excite admiration, reverence or terror, than the poems of any other, even the rudest people with whom our knowledge of the globe has yet brought us acquainted. They are excessively prolix and insipid. They are often, through long passages, trifling and childish to a degree, which those acquainted with only European poetry, can hardly conceive. .......All the vices which characterised the style of rude nations. and particularly those of Asia they exhibit in perfection. Inflation; metaphors perpetual and these the most violent and strained, ofthe the most unnatural and ridiculous, obscurity, tautology, repetition, verbosity, confusion, incoherence; distingush the Mahabharat and the Ramayan. That amid the numberless effusions, which a wild imagination throws forth, in its loose and thoughtless career, there should now and then be something which approaches the confines of reason and taste, is so far from surprising, that it would be truly surprising if they were not. A happy description, or here and there the vivid conception of a striking circumstance, are not sufficient, the exact observation of nature, and the symmetry of a whole, are necessary, to designate the poetry of a cultivated people."

प्रास्ताविक भागावर वुइल्सन् साहेबांची टीका पुढीलप्रमाणें आहे:—

"It is not clear what the writer means by 'permanent signs." If he means the art of printing, the Hindus are, in that respect situated similarly as the Greeks and Romans were, and they should have also retained the use of metre in their literature. If he means the art of

[पुढें चालू]

त्यामुळें त्याच्या गुणावगुणांवरून एकंदर कवींविषयीं सामान्यतः निर्णय होणार आहे कीं, वरील रसज्ञ मंडळीची त्यांजवर जी अवकृपा झाली आहे ती कितपत यथार्थ आहे. दुसरी

writing, the Hindus have been in possession of that, as long as of a literature, for anything we know to the contrary—certainly long enough to have rendered the use of memorial stanzas as a substitute for writing, unnecessary and obsolete. A little consideration might have led the writer to suspect that his theory did not satisfactorily account for the singularity; for, the practice has nothing in common with the *carmina antiqua* of the Germans. The principal reason for the continued use of metre, seems to be the greater facility of its composition. Sanscrit metre is unencumbered by rhyme—the prosody is infinitely varied—and the greater freedom of syntax, and the facility of forming compound terms, in which grammatical inflections are merged, render it less laborious to construct metrical stanzas, than to attend to the niceties of a complex grammar, which are indispensable to the composition of intelligible prose. This seems to be the chief inducement to the continuation of the practice, and not the power of habit alone."

आणि मुख्य भागासंबंधीं हुरल्सन् साहेबांनीं मिल्लची अशी पूजा बांधली आहे:—

"At the same time at which this was written, no other specimen of the Mahabharat had been translated, than the philosophical dialogue of the Geeta, and as there are certainly no such faults in that composition as those which Mr. Mill describes, he must have depended wholly upon his imagination for his knowledge of their existence in the rest of the poem. Some portions of the Ramayan had been rendered very uncouthly into English; but whatever may be the defects there so ruthlessly stripped of every redeeming grace, most certainly page after page will be searched in vain for "metaphors perpetual, and these the most violent, strained, unnatural, and ridiculous." It is clear therefore that Mr. Mill had not read even such portion of the Ramayan as was within his reach, but condemns both it and the Mahabharat upon the credit of some vague and superficial criticism, applicable not to Hindu, but to Mohammedan poetry; the characteristics of which are totally unlike. There is not so wide a contrast between Hindu and European poetry, as between Hindu and Persian. With respect to the particular poems under consideration, they are not to be judged of by a European standard; and that which to a person professing the Hindu religion, constitutes their greatest charm, is to us their main deformity; but, leaving the absurd inventions of mythology out of

[ पुढें चालू. ]

गोष्ट पुढील विवेचनावरून ही स्पष्ट होणार आहे कीं, ज्यांचीं मतें सर्व लोक सत्य व यथार्थ ह्मणून समजत असतात ते कितीसा ऊहापोह करून कोणत्याही विषयावर आपला अभिप्राय निश्चित करीत असतात. हें मान एकदां सर्वांस कळलें ह्मणजे अनेक प्रकारचे त्यांचे भ्रम जाणार आहेत.

३. वरील दोन कलमांत प्रकृत विषयाच्या संबंधानें वाचकांस जें उपोद्घातरूपानें कळवायाचें होतें तें कळवलें. आतां मुख्य लेखास आरंभ करण्यापूर्वी एका गोष्टीविषयीं मात्र वाचकांस कांहीं सूचना करणें अवश्य वाटतें. ती ही कीं, हा जो नवा विषय आह्मीं हातीं धरला आहे तो किती लांबेल याचा आह्मांस सध्यां कांहीं अजमास करवत नाहीं. तर आमचें आख्यान फार लांबून वाचक मंडळीपैकीं जर कोणास डुकल्या यायला लागल्या तर त्यांनीं खुशाल मधून उठून जाऊन अंगाई करावी. तसें केल्याबद्दल व्याख्यात्यास यत्किंचितही राग येणार नाहीं; चालू कथानक आटपून दुसऱ्यास आरंभ झाला ह्मणजे तो त्यांस उठण्याबद्दल पुन: सूचना करील. ही अपूर्व सूचना श्रोतृवृंदास करण्याचें यान्व खेपेस आह्मीं मनांत आणल्याचें कारण काय हें थोडा तर्क केला असतां कळणार आहे. यापूर्वी जेव्हां जेव्हां निबंधाचा विषय कमज्यास्त लांबत गेला तेव्हां तेव्हां कित्येकांस तो कंटाळवाणा वाटून त्यांचे उद्गार निघाले आहेत, कीं 'हें वक्तृत्व आतां कोठवर लांबणार?' 'इंग्रेजी भाषा संपणार तरी केव्हां?' 'जॉनूसनचें भारूड आतां पुरें झालें!' आमच्या 'ज्ञानोदय' नामक वृद्धबंधूंस पवित्रशास्त्र व त्यावरच्या छप्पन्न टीका वाचायाचा त्रास येत नसेल, पण जॉनूसनचा निबंध इंग्रेज लोकांच्या संबंधानें येवढा स्तुतिपर असतांही त्याचा त्यांस कंटाळा येऊन तो त्यांस 'महाभारत'च वाटला. तर या पूर्वीच्या अनुभवावरून या प्रसंगीं वरील सूचना अगोदरच करून ठेवणें जरूर दिसलें. आतां हें खरें कीं, आह्मीं आरंभलेली स्वदेशसेवा जे मनोभावेंकरून मानून घेत असतील व आमच्या खऱ्याखोट्या विचारांचें जे स्वस्थपणानें व प्रांजलपणानें मनन करीत असतील त्यांच्या तोंडून सहसा वरील उक्ति निघत नसतील, याविषयीं आह्मांस खात्री आहे, व यास्तवच वरील आक्षेपांची आह्मी फारशी मातब्बरीही मानीत नाहीं. ज्यांनीं पुस्तकाची परीक्षा झटली ह्मणजे त्याच्या बांधणीवरून वगैरे करायाची किंवा तें महिन्याच्या महिन्याला निघतें, किंवा त्यांतील मजकूर ठरीव राजनिष्ठेस अनुसरून आहे कीं तीस विरुद्ध आहे, अस्सल सुधारणेचीं ह्मणून नाणावलेलीं जीं मतें त्यांचेंच त्यांत मंडन आहे, कीं खंडन आहे, चहापात्र तोंडास लावून तें मालत्यान् मेजावर ठेवींपर्यंत पुरेसा चुटकेदार त्यांत निबंध आहे कीं कपाळ उठेसें लांबलचक चऱ्हाट वळलें आहे, येवढेंच काय तें पाहून पुस्तकाचा चांगलेपणा किंवा वाईटपणा जे ठरवीत असतात, अशाच लोकांचे प्राय: वरील आक्षेप होत. अशा मंडळीस आमचें उत्तर येवढेंच आहे कीं, मासिक पुस्तक हें कांहीं वर्तमानपत्र किंवा 'पंच' आहे असें नाहीं. त्यांतील विषय विशेष

---

view, they both abound in poetical beauties of the first order, and particularly in delineations of picturesque manners and situations, and in the expression of natural and amiable feeling." पृष्ठें ३३-३६ पाहा. 'सं०'

महत्त्वाचे असावे लागतात, व त्या मानानें त्यांचें निरूपणही तसेंच यथास्थित व पूर्ण व्हावें लागतें. विषय ज्या तऱ्हेचा असेल त्या मानानें त्यावरील विवरण अर्थात् अधिक उणें होणारच. त्यांतून असाही आजपर्यंत कोणीं राज्यकर्त्यानें किंवा शास्त्रकारानें कायदाकानू केलेला आठवत नाहीं कीं, अमुक अमुक विषयास अमुक अमुकच पृष्ठें लागावीं; तीं शास्त्रोक्त मर्यादा उल्लंघली कीं, लोण बारगळलें! ज्याला ज्या विषयावर जेवढे विचार सुचतील तेवढे दाखल करण्यास तो मुखत्यार आहे, व वाचकांच्या रुचिविशेषपरत्वें ते पसंत होतील किंवा नापसंत होतील, हें उघड आहे. असो; हें एक झालें. दुसरी गोष्टही प्रकृत स्थलीं अगोदर सुचवून ठेवण्यासारखी ही वाटते कीं, प्रस्तुत विवेचनांत 'आमचे नवीन विद्वान् लोक' 'त्यांनीं उपस्थित केलेले सुधारणेचे मार्ग', 'वीररसप्रधान काव्य' व 'खिस्ती धर्म' यांचा संबंध कोठेंच येणार नाहीं असेंही बहुशः होणार नाहीं. या चौकड्यापैकीं पहिल्याचा व तिसऱ्याचा तर चालू निबंधाशीं अत्यंत निकट संबंध आहे हें उघडच आहे; कां कीं, नवीन विद्वानांचीं प्रस्तुत कवीविषयीं काय मतें आहेत तीं सांगून त्यांचें यथातथ्य परीक्षण आम्हांस करावेंच लागेल, व 'वीररसप्रधान काव्या'चा जन्म किमर्थ आहे हेंही बहुधां सर्वांस विश्रुत असेलच. आतां दुसऱ्याच्या व चवथ्याच्या संबंधानें तरी कोठें लिहिणें येईल कीं नाहीं याचें सध्यां कांहीं सांगवत नाहीं; तरी तें आलेलें पाहून ज्यास विषाद होईल त्यानें 'वेदार्थयत्ना'सारख्या विद्वद्वर्यमान्य पुस्तकाचे अंक चाळले असतां किंवा वृद्ध 'ज्ञानोबा'चा बहुधां कोणताही अंक उलटून पाहिला असतां त्याचें दुःख व आश्चर्य बरेंच कमी होईल असें आम्ही त्यास आश्वासन देतों.

४. आतां यापुढें मुख्य विषयास लागायाचें. हा विषय कोणता याचा निर्देश वर केलाच आहे, कीं मोरोपंताचा वृत्तांत किंवा त्याच्या काव्यांचें समग्र परीक्षण हें त्यांत यावयाचें नसून फक्त त्याच्या कवित्वाविषयीं विचार करायाचा. म्हणजे 'कवि' ही संज्ञा त्यास लागेल कीं नाहीं, लागेल तर त्याचे ठायीं कोणकोणते कवित्वगुण दृष्टीस पडतात, त्याच्या काव्यांतले गुणदोष कोणते वगैरे संबंधानेंच मुख्यतः विवेचन करायाचें आहे. हें विवेचन पुढील क्रमानें करूं. प्रथमतः सदरील विषयावर उभय पक्षांचीं जीं मतें आहेत, म्हणजे प्रस्तुत कवीची वाहवा करणारे व त्याच्या कवितेस नाक मुरडणारे यांचें काय काय म्हणणें आहे तें वाचकांस कळवून नंतर त्या मतांच्या याथातथ्याविषयीं विचार करूं आणि शेवटीं प्रस्तुत कवीच्या संबंधानें आमच्या काय समजुती झाल्या आहेत त्या दाखल करून विषय समाप्त करूं.

५. आतां प्रथमतः मोरोपंताचे जे दूषक आहेत त्यांचे आक्षेप काय काय आहेत ते पाहूं. यांचा उल्लेख अगोदर करण्याचें कारण असें आहे कीं, हल्लींच्या मन्वंतरांत वरील आक्षेपकांचाच विशेष भरणा आहे. पूर्वीचें मन्वंतर फिरून अमुक अमुक मतें अडाणी वेंडगळ लोकांचीं व अमुक अमुक सुधारलेल्या विद्वान् मंडळीचीं अशी जेव्हांपासून आमच्या लोकांत दुफळी पडली, तेव्हांपासून प्रस्तुत कवीची अवहेलना करणें हें समंजसतेचें व रसिकतेचें एक मोठें लक्षण बनून राहिलें आहे. आपल्या जन्मभूमीची हरएक प्रकरणीं

टवाळी करणें हें जसें आजपर्यंत शहाणपणाचें चिन्ह मानलें जात असे, व हा उपहास जो जितका जितका अधिक करील तितका तितकी त्याची विद्वत्ता विशेष समजत असत, त्याप्रमाणेंच मोरोपंताच्या कवितेवर जितकी जितकी अधिक कोटि लढवावी तितकी तितकी त्या लढवणाराची चातुर्याबद्दल व रसिकत्वाबद्दल तारीफ व्हावयाची! हा प्रकार अद्यापही तसाच आहे. मोरोपंताला वाग्देवीच्या न्यायासनापुढें पिंजऱ्यांत जर चौकशीकरतां उभा केला, व नवीन विद्वन्मंडळांतले पंच त्याचा इनसाफ करण्यास नेमले, तर बहुधा इसापनीतींतील पंचाइतींत मेंढ्यास जो न्याय मिळाला, किंवा शंभर वर्षांपूर्वी इंग्रेजी जूरीनें नंदकुमाराच्या तर्फेनें जो आपला अभिप्राय दिला, त्यासारखीच आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्रकवीचीही अवस्था व्हावयाची! त्याची व एका तुकारामाखेरीज बाकीच्या साऱ्या कवींची जी आजपर्यंत उपेक्षा झाली ती वरील मतांचेंच फळ होय. 'सर्वसंग्रहा'चा येवढा सात वर्षें चाललेला उद्योग जो एकाएकीं डुबला त्याचें तरी कारण वरचेंच झटलें पाहिजे; कारण जर प्राकृत कवितेची योग्यता विद्वानांस व तद्द्वारा इतर लोकांस यत्किंचितही भासती, तर सरकारचा आश्रय तुटल्यावरही वरील पुस्तक चालण्यास मोठीशी अडचण पडती असें वाटत नाहीं. तर येवढा ज्या मतांचा प्रभाव त्यांच्या यथार्थत्वाचा विचार करणें अत्यंत आवश्यक होय.

आतां वरील मतांचा क्रमानें निर्देश करतों. मोरोपंताच्या संबंधानें व तसेंच सामान्यतः एकंदर महाराष्ट्रकवींच्या संबंधानें एक पहिलें मोठें मत झटलें ह्मणजे हें आहे कीं, त्यांस स्वतंत्र योग्यता नाहीं. त्यांचे काव्यग्रंथ संस्कृतांतील 'रामायणभारता'दि ग्रंथांचीं किंवा त्यांतील प्रकरणांचीं केवळ भाषांतरें होत. यास्तव त्यांनीं जो कांहीं रसाचा अंश साधला असेल तो वस्तुतः पाहतां त्यांचा आहे असें नाहीं. चंद्राचा प्रकाश जसा त्याचा स्वतःचा नसून केवळ सूर्यापासून प्राप्त झालेला, त्याच्या अंगचा असा त्यांतला एकही किरण नाहीं; त्याप्रमाणेंच मुक्तेश्वर, मोरोपंत वगैरेंच्या ग्रंथांत कितीही शोभा असली तरी ती खरोखरीं पाहतां व्यासवाल्मीकांचीच होय! तेव्हां या मताप्रमाणें वरील प्रसिद्ध कवि हा अश्वादि वाहनांप्रमाणें केवळ अर्थवाहक होय असें झालें. या पहिल्या आक्षेपानें कवित्वाचें मोठें अंग जें स्वतउद्भूत स्फूर्ति तें मोरोपंताचें व एकंदर महाराष्ट्रकवींचें, नाहींसें होऊन ते दुसऱ्या प्रतीचे कवि असें ठरलें. दुसरें मत तर वरच्याहूनही भयंकर आहे. तें आमच्या एका बंधूच्या शब्दांनींच येथें दाखल करतों:—"महाराष्ट्र व संस्कृत या दोन्ही भाषा मोरोपंताला करतलामळ होत्या व प्रास वगैरे साधण्यास त्यास यत्किंचितही श्रम लागत नसे. तथापि त्याला रसज्ञ देखील ह्मणवत नाहीं. कांहीं तरी लिहावें, मात्रा आणि यमक साधलें ह्मणजे झालें. किंबहुना मात्रा, यमक, आणि अपरिचित शब्द यांतच काय तो रस असें त्याला वाटत असे." आणखी कांहीं पुढें वरील लिहिणारानेंच असें झटलें आहे:—"एकाद्या देशांत मोठमोठे ग्रंथकार झाले असून मग जर दुर्दैववशात् त्या देशांतील लोकांची बुद्धि मंद होईल, तर ते लोक मग अर्थापेक्षां शब्दांवर लक्ष फार देत असतात. जसा एकादा मनुष्य अगोदर श्रीमान् असून नंतर गरीबीस येतो, आणि ती गरीबी छपवण्याकरतां बाहेर सगळे डामडौल पूर्वींच्यापेक्षां चांगले राखतो. मोरोपंताचें लक्ष इतर अलंकारांपेक्षां यमका-

दिकांवर विशेष होतें, यांत सगळा अपराध त्याचाच नव्हे. त्याच्या वेळेच्या विद्वज्जनांची रुचि कांहीं विलक्षणच होती. गूढ व दुर्बोध शब्द ज्याच्या लेखनांत येतात त्यालाच काय तो विद्वान् ह्मणायाचें; इतरांस मूर्ख नाहीं तर प्राकृत ह्मणत असत."[१] या आक्षेपांनीं तर कवित्वाचें सर्वस्वभूत जें रसिकत्व त्यावरही धाड पडली. यांनीं प्रस्तुत कवीच्या वाग्वधूचें शरीरलावण्यही नाहींसें होऊन गुंजांचीं वगैरे भूषणें धारण करणाऱ्या वनचरस्त्रीचें तीस साम्य येतें. यांखेरीज इतर जे आक्षेप विद्वान् मंडळीच्या तोंडून ऐकूं येतात व कधीं कधीं लेखांत दृष्टीस पडतात त्यांचा सारांश वरील वाक्यांत आला आहे. हे आक्षेप असे—एक 'अपरिचित शब्दां'चा. हा आक्षेप पुष्कळांच्या तोंडून ऐकूं येतो. ते ह्मणतात, "काय हो ! कसला कवि हा ! येथून तेथून संस्कृत शब्द ह्मणजे काय ! कोणाला समजूं नये अशी कविता करण्यांत यास काय थोरवी वाटली असेल तीं असो. 'अन्या धन्या कन्या'—काय ही कविता !" हाच आक्षेप कोणी शास्त्रीय परिभाषेनें बोलून दाखवतात. संस्कृतांत द्राक्षापाक,* नारिकेलपाक,† असे काव्यरचनेचे प्रकार आहेत. यांपैकीं मोरोपंताच्या काव्याची दुसऱ्या वर्गांत गणना होते. ती अशाकरतां कीं, त्याचें काव्य असोल्या नारळासारखें कठिण असून तें उकलायास मोठा प्रयास पडतो. ही आपल्या देशबंधूंची दुःखकारक स्थिति पाहून कांहीं अर्वाचीन पंडितांनीं द्राक्षापाकात्मक कविता रचली आहे. वामन, मोरोपंत यांणीं संस्कृत शब्दांची आपल्या कवितेंत रगाडी जी करून दिली आहे, तिच्या उलट प्रकार या सदय कवींनीं केलेला आढळतो. पूर्वींच्या मूर्ख कवींनीं मोठमोठे संस्कृत शब्द योजून कवितावधूस उंची रेशमी व लोंकरी वस्त्रें लेववलीं, तें न साहून आमच्या अर्वाचीन$ कविवरांनीं

१. 'विविधज्ञानविस्तार' पुस्तक १ अंक ५, ७, यांत मोरोपंताविषयीं आणखी जो बराच मजकूर लिहिला आहे तो वाचला ह्मणजे असें वाटतें कीं, ७ व्या अंकाच्या शेवटीं 'पुढें चालेल' ह्मणून जें वचन दिलेलें आहे तें सदरील लिहिणारानें पुरें केलें नाहीं ही फार चांगली गोष्ट झाली. नाहीं तर आमच्या बिचाऱ्या कवीवर आणखी काय काय घोरपडी आल्या असत्या न कळे ! या टीका-कर्त्यांचे एक दोन आक्षेप येथें सांगतों, त्यांवरून त्याचें मन प्रस्तुत कवीवर केवढें रुष्ट झालेलें होतें हें कळून येईल. मोरोपंतानें एके आर्येंत कृष्णास 'शिनळ' ह्मटलें यावरून 'ईश्वराला तो फारच थोडा मान देत असे.' आपला पोशिंदा जो बाबूजी नाईक त्यावर या कवीनें तीन चार [ प्रस्तुत लिहि-णाराच्या मतें ] अगदीं साधारण आर्या केवळ टाकभाडयाप्रमाणें रचल्या, यावरून 'मोरोपंताच्या' हृदयांत कृतज्ञता देखील फारच थोडी होती.' कोण विलक्षण कल्पना ह्या ! !

* द्राक्षाचा रस जसा स्वच्छ व पारदर्शक तसा ज्याचा अर्थ स्पष्ट व असंदिग्ध असतो असा लेखनप्रकार. 'सम्पादक'

† ज्यांतला गूढ अर्थ उकलणें हें मोठया परिश्रमाशिवाय होत नाहीं असा लेखनप्रकार. 'सं०'

$ सदर उल्लेख 'महादेव मोरेश्वर कुंटे' बी. ए. यांच्या 'राजा शिवाजी' या 'वीररसप्रधान महाकाव्या'संबंधीं आहे. उदाहरणार्थ तिसऱ्या भागांतील खालील श्लोक पाहा:—

हणी धूम, चाले, जसा वायु वाहे; । भरे जोर अंगांत; रानांत राहे. ॥
नसे ठेंगणा तो, नसे उंच भारी; । जरा रोडका. देश कैवारधारी. ॥४॥
महावेग रे ! थार धारिष्ट ज्याचें, । मुसलमान लोकां रणीं फार चांचे. ॥
शिरे वीर युद्धांत घेऊन तट्टू, । करी जें मुसल्मान फौजेस खट्टू. ॥१३२॥ इत्यादि.

'सम्पादक'

'तट्टु', 'खट्टु', 'चकाके', 'ठोका', 'बडवा', 'ठुस्सा' वगैरे अगदीं साधे व जोरदार शब्द योजून तिला लकतऱ्यांनीं विभूषित केली आहे, व कोठें कोठें 'लांबनाक्या', 'देशकैवारधारी' वगैरे मोठीं शोभादायक ठिगळेंही जोडलीं आहेत; असो, 'भिन्नरुचिर्हि लोकः' किंवा 'निरंकुशाः कवयः' यांतून कोणत्या तरी वचनाचा आश्रय करून स्वस्थ बसावें, दुसरा उपाय नाहीं! दुसरा आक्षेप यमक, प्रास वगैरेच्या संबंधानें. मोरोपंताचा वरील शब्दालंकाराकडे मोठा भर जो जेथें तेथें दृष्टीस पडतो तो त्यास मोठा बाधक झाला आहे. कवितेच्या अंतरंगावर जें धोरण ठेवायाचें तें टाकून यमकादि केवळ बाह्यांगावरच जो अगदीं चूर होऊन गेला तो कवि कसला, व याबद्दलच त्याची प्रशंसा करणारे जे जुने लोक ते कसले रसिक, अशी नवीन विद्वान् मंडळींची आज पुष्कळ दिवस समजूत होऊन राहिली आहे. त्यांतून 'अष्टोत्तरशत रामायणें' रचून तर आपल्या शतमूर्खत्वाचा, अप्रयोजकपणाचा, व अरसिकत्वाचा मोठा बाव्द(हु? सं०)टाच त्यानें आपल्या हातानें रोंवून ठेवला असें म्हणायास हरकत नाहीं! तिसऱ्या एका रसिकवर्गाची कल्पना अशी धांवते कीं, अलीकडे आमच्या देशांत बुद्धीचा सामान्यतः ऱ्हासच झाला आहे, आणि त्यांतून सरस्वतीचा पूर्वीं भोजविक्रमादिकांच्या वेळीं एकदां जो वीणानाद होऊन गेला तो गेला. त्यावर आज हजार दोन हजार वर्षें तिनें आपलें वाद्य जें गवसणींत गुंडाळून ठेवलें आहे तें हल्लींच्या सुधारलेल्या इंग्रेजी राज्यांत ती सोडण्याचें मनांत आणील तर न जाणो! बाकी निवळ मूर्खत्वाचा जो हा मध्यंतरीं काळ गेला त्यांत साधारण समजूतही लोकांस दुर्लभ, मग कवित्वाची गोष्ट तर दूरच! तेव्हां अर्थातच मोरोपंतासारख्या रसानभिज्ञ कवींनीं पोकळ शब्दालंकारांनीं कवितेस भूषित केली व लोकांचीही रसज्ञता तितपतच असल्यामुळें तसल्या थाटमाटालाच भुलून जाऊन त्यांनीं त्यांस कवित्वाच्या उच्चपदावर नेऊन बसवलें![1]

आता वरील मतांच्या उलट म्हणजे प्रस्तुत कवीच्या तर्फेचे जे कित्येक अभिप्राय आहेत ते दाखल करतों. जुन्या लोकांत मोरोपंताची वहा कितपत असे व अद्याप आहे हें सर्वांस माहीत आहेच. त्यास निवर्तून अद्याप संपूर्ण शतकही लोटलें नाहीं, तरी त्याची कीर्ति साऱ्या देशभर केव्हांच पूर्वींच्या अतिविख्यात कवींप्रमाणें चोहोंकडे पसरून राहिली आहे. त्याच्या जिवंतपणींही स्वतःची ख्याति सर्वतोमुख झालेली त्यानें ऐकली असेल. कीर्तनांचा प्रघात त्याच्या काळीं चोहोंकडे अतिशय फैलावला असल्यामुळें त्याच्या कवि-

१. वरील मतें नवीन विद्वानांच्या तोंडून पुष्कळांनीं ऐकलीं असतीलच. तीं त्यांच्या लिहिण्यांतही प्रसंगवशात् दृष्टीस पडतात. एका महापंडितांनीं वामन, मोरोपंत, इत्यादि कवींस एका दावणींत गोंवून त्यांच्यावर "Degenerate Sanscrito-Marathi Poets" (भ्रष्ट संस्कृत ना मराठी असे भिकार मराठी कवि) असा सरसकट एक कोरडा उडवला आहे. दुसऱ्या एकानें मोरोपंताची योग्यता बरीच वर्णिली आहे, पण चित्रकाव्यरूप रचनेंत त्यानें आपल्या बुद्धीचा अपव्यय केला असें त्यानें म्हटलें आहे. मुंबई युनिव्हर्सिटींतही एकदां असा प्रश्न घातला होता:— "मोरोपंताची कवित्वाच्या संबंधानें जी सर्वत्र ख्याति आहे तिचीं कारणें तुम्हांस काय वाटतात तीं सांगा." या प्रश्नास उत्तर कोणत्या प्रकारचें अपेक्षित होतें, हें त्याच्या रोंखावरून सहज ध्यानांत येणार आहे.

त्याचा प्रसार पूर्वीच्या कवींहूनही त्वरित झाला असेल. हा प्रघात अद्याप सुरूच आहे. तेव्हां कीर्तनकार मंडळींतच मुख्यतः प्रस्तुत कवीची प्रशंसा विशेष आढळते हें उघड आहे. श्रोत्यांच्या रंजनास यमकप्रासप्रचुर असें पंतांचें कवन उत्कृष्ट साधन असल्यामुळें त्याजवर ज्यांची वृत्ति त्या हरदासांच्या तोंडून त्याजविषयीं अत्यंत प्रशंसापर उद्गार कां न निघावे? तेच सामान्यतः इतर जनांच्याही तोंडून कानीं पडतात. ते असे:—मोरोपंतासारखा कवि त्याच्यापूर्वी कोणी झाला नाहीं, व पुढेंही होणार नाहीं. त्याची कविता इतकी गहन आहे कीं, ज्यानें संस्कृताचें चांगलें अध्ययन केलें आहे त्यासच ती लागेल; सामान्य मराठी जाणणारास तर ती मुळींच कळावयाची नाहीं. मोरोपंताची विद्वत्ता मोठी असून संस्कृत भाषेचे छप्पन्न कोश जसे काय त्याच्यापुढें हात जोडून उभे होते व सरस्वतीचा त्यास वरप्रसाद होता; यामुळें जागोजागीं त्यानें असे चमत्कार केले आहेत कीं, एकेका आर्येचे दहा दहा§ अर्थ करतां येतात! सारांश, मोरोपंत हा केवळ आद्वितीय कवि होय व त्याचें काव्य ज्यास कळेल तो आद्वितीय पंडित होय!

---

अगारे कान्तारे कुचकलशहारे मृगदृशां
मणेस्तुल्यं मूल्यं सहजसुभगस्य द्युतिमतः॥[1] कालिदास.

अंक ४६. (१) विषयाचा उपक्षेप. (२) पहिला आक्षेप—मराठी कविता केवळ भाषांतररूप होय. (३) भाषांतररूप ग्रंथांचीं उदाहरणें. (४) वरील वादाविषयींचीं अवांतर प्रमाणें. (५) प्रत्यक्ष प्रमाण. (६) दुसरा आक्षेप—अपरिचित शब्द.

१. मागील अंकांत मोरोपंताच्या कवितेविषयीं अनुकूल व प्रतिकूल मतें कसकशीं आहेत तीं दाखल केलीं. आतां त्यांवर अनुक्रमानें आह्मी आपले अभिप्राय वाचकांस सादर करतों.

२. मोरोपंताविषयीं व एकंदर मराठी कवींविषयीं विद्वन्मंडळाचा पहिला मोठा आक्षेप हा आहे कीं, त्यांची कविता स्वतंत्र रचलेली नव्हे, तर केवळ भाषांतररूप होय. आतां निवळ भाषांतर असल्यानें ही काव्याची शोभा व कवीची योग्यता कितपत कमी होते हा एक स्वतंत्रच विचार आहे. त्याविषयीं पूर्वी एका अंकांत आह्मीं विस्तारेंकरून निरूपण केलेंच आहे. तें पाहिलें असतां महाराष्ट्रकवींचा अधिक्षेप करण्यास कितपत कारण आहे हें लक्षांत येईल.[2] पण वरील आक्षेप हा मुळींच कितपत खरा आहे याचा अगोदर पुरतेपणीं विचार केला पाहिजे.

---

§ वस्तुतः ही अतिशयोक्ति आहे. 'सम्पादक'

१. "जें रत्न आहे तें घरीं असलें, रानांत पडलें असलें, किंवा तरुणींच्या स्तनहारांत गुंफलें असलें, तरी त्याची योग्यता सारखीच; कां कीं तें स्वभावतःच तेजस्वी व सुंदर असतें!"

२. प्रकृत पुस्तकाच्या १२ व्या अंकांत* वरील निरूपण केलें आहे. त्यांतच आरंभीं वरील विषयावरही कांहीं विचार दाखल केले आहेत.

* पृष्ठें १६३-१६४ पाहा. 'सम्पादक'

३. 'भाषांतर' या शब्दाचा अर्थ काय हें कोणासही सांगावयास नको. कोणत्याही पदार्थाचें प्रतिबिंब आरशांत, स्थिर उदकप्रवाहांत, वगैरे पडलें असतां मूळ पदार्थाची साव-यव प्रतिमा जशी स्थलांतरीं दृष्टिगोचर होते, त्याप्रमाणें एका भाषेंतील अर्थ दुसरींत यथास्थित व्यक्त झाला असतां त्याचें भाषांतर झालें असें ह्मणतात. अशीं भाषांतरें आपल्या भाषेंत व दरएक भाषेंत अनेक आहेत. जगद्विख्यात कवि होमर् व व्हर्जिल् यांचीं भाषांतरें इंग्रेजींत अनुक्रमेंकरून पोप व ड्रायूडन् यांनीं केलीं आहेत. वरच्यांच्या जोडीस बसवण्या-सारखा जो आमचा 'कविकुलगुरु' त्याच्या अप्रतिम नाटकाचें भाषांतर सर् विल्यम् जोन्स् यानें केलें आहे. आमच्या भाषेंत वामनपंडितानें भर्तृहरीचीं 'शतकें', जगन्नाथरायाची 'गंगालहरी', तशीच 'भगवद्गीता' यांचीं भाषांतरें रचलीं आहेत; व मोरोपंतानें 'सप्तशती' व 'गीता' यांवर प्राकृत टीका केल्या आहेत. आलीकडे दहा वीस वर्षांत तशीच संस्कृत नाटकांचीं व 'मेघदूता'दि काव्यांचीं भाषांतरें होऊन गेलीं आहेत. तर हीं सर्व पद्यात्मक भाषांतराचीं उदाहरणें होत. आतां अशाच तऱ्हेचे वामन, मोरोपंत, मुक्तेश्वर इत्यादिकांचे ग्रंथ आहेत कीं काय हें पाहूं.

४. वरील गोष्टीविषयीं निर्णय प्रत्यक्ष प्रमाणावरून ह्मणजे मूळ रामायण, महाभारत व भागवत यांशीं वरील कवींचे ग्रंथ ताडून पाहिले असतां तर होणार आहेच; पण एरवींही सामान्य अनुमानावरून तिजविषयीं बराच निकाल होण्यासारखा आहे. तो येणें-प्रमाणें एक तर ग्रंथविस्तारावरून रामायणाची ग्रंथसंख्या २४००० व भागवताची १८००० आहे, आणि महाभारत तर लक्ष ग्रंथ ह्मणून प्रसिद्धच आहे. मग यावरूनही उघड दिसणार आहे कीं, सदरील मराठी ग्रंथांस या प्रचंड ग्रंथांचीं भाषांतरें ह्मणणें अगदींच शोभणार नाहीं. मोरोपंताच्या 'भारता'वरील आर्या पुरत्या वीस हजारही* नाहींत, 'मंत्रभागवत' तर सरासरी साडेतीन हजार† आहे व 'मंत्ररामायण' तर हजार§ सुद्धां असेल नसेल! मुक्तेश्वराच्या 'रामायण' व 'भागवत' यांवर ओंव्या असल्याचें आह्मांस अद्याप माहीत नाहीं; व 'भारता'वर ज्या आहेत त्याही पहिल्या चार पर्वांवरच्याच प्रसिद्ध असून त्यांतलींही तीनच छापून निघालीं आहेत.[1] ओंवी छंद हा बहुधां संस्कृतांतील अनुष्टुपावरूनच प्राकृत कवींनी

---

* आर्याभारताच्या आर्या १७१३३ आहेत. 'सम्पादक'

† मंत्रभागवताच्या आर्या ३५९४ आहेत. 'सम्पादक'

§ मंत्ररामायणाची पद्यसंख्या १९१३ आहे. 'सम्पादक'

१. मुक्तेश्वराच्या 'भारता'विषयीं असा लोकप्रवाद आहे कीं, त्यानें मूळ समग्र ग्रंथ रचला असतां त्यांतील चार पर्वें मात्र सध्यां उरलीं आहेत; बाकीचीं सर्व कोणीं द्वेषानें बुडवलीं असें ह्मण-तात. मुक्तेश्वर 'नवनीतां'तील शकावरून पाहतां शिवाजी महाराजांच्या वेळीं असावा. मग त्याचे समकालीन जे रामदास, तुकाराम व वामनपंडित यांचे ग्रंथ या काळापर्यंत चालत आले असतां याचेच कां बुडावे, हें कळत नाहीं. कवि एकदां प्रसिद्ध झाला,—ह्मणजे त्याच्या ग्रंथांची चहा होऊन त्यांच्या अनेक प्रती झाल्या व हरदासांच्या वगैरे तोंडीं त्याची कविता बसली,—ह्मणजे त्याचें काव्य बुडवणें हें एका राजाखेरीज दुसऱ्या कोणासही शक्य नाहीं हें उघड होय. कोणी केवढाही पटाईत

( पुढें चालू. )

नवा सुरू केला असावा, तेव्हां मूळ संस्कृत वृत्तांतील अर्थ मराठींत उतरण्यास हा छंद चांगला सोईवार पडण्यासारखा आहे हें उघड आहे. तरी असें असतांही मुक्तेश्वराचीं पर्वें ग्रंथसंख्येंत मूळ पर्वांहून कमीच आहेत. तीं खरोखरीं पाहतां मूळच्याहून वाढावीं; कां तर संस्कृतांत समास व संधि यांच्या योगानें पुष्कळ अर्थाचा थोड्या शब्दांत समावेश होतो, व तसें मराठींत नसल्यामुळें भाषांतर करतांना मूळच्याहून मोठें वृत्त घरावें लागतें, किंवा मूळच्या एकांतील अर्थ मराठींत दोहोंत आणावा लागतो. असो; तर ग्रंथविस्ताराचें हें एक प्रमाण झालें. दुसरें प्रमाण कविताविषयावरून. बहुतेक महाराष्ट्रकवींची कविता जर पाहिली, तर तिचे विषय स्वतंत्र ह्मणजे संस्कृतांतून न घेतलेले असे आहत हें तेव्हांच लक्षांत येईल. उदाहरणार्थ वामन, आनंदतनय व रघुनाथपंडित घ्या. यांनीं निरनिराळ्या विषयांवर जीं आख्यानें रचलीं आहेत त्यांस केवळ कथानकाखेरीज दुसरा कोणताही मूळ संस्कृतांतला आधार नाहीं. त्यांतील विचार, कल्पना, अलंकार वगैरे सर्व त्या त्या कवीच्या(चे ? सं०) स्वतःचे होत. तिसरें प्रमाण यमकादि शब्दालंकार. हे महाराष्ट्रकवितेंत वामनानें प्रथमतः आणले व त्यावरून त्यास 'यमक्या वामन' असें नांव प्राप्त झालें होतें. मोरोपंतानें तर हें यमकांचें प्रकरण कोठपर्यंत वाढवलें हें सर्वप्रसिद्धच अहे. आनंदतनय, रघुनाथपंडित यांणींही आपल्या कवितेस प्रासानुप्रासांनीं जागोजाग अत्यंत शोभा आणली आहे हें सर्वांस माहीत आहेच. तर यावरूनही वरील आक्षेपाचें बरेंच निरसन होतें; कां कीं, जें निवळ भाषांतर आहे, त्यांतून संस्कृतासारख्या अत्यंत अभियुक्त भाषेंतून मराठी-

---

खळ असला तरी त्यास फार झाटलें ह्मणजे रविकुक्कुटन्यायानें आपल्याजवळची प्रत किंवा असेंही करतां आपल्या इष्टमित्रांच्या प्रती नष्ट करून टाकतां येतील! बरें, येवढा खलद्वेष संपादण्यासारखें प्रस्तुत कवीच्या ग्रंथांत तर कांहीं दिसत नाहीं; कां कीं, अर्वाचीन रामजोशासारखे त्यानें कोणावर फटाके उडवलेलेही आढळत नाहींत. आचरणांत कांहीं वावगें असेल ह्मणावें तर तो मुळीं प्रसिद्ध साधु एकनाथ यांचा नातू व शिष्य; तेव्हां त्या 'शांतिजलधी'च्या निदान एकाद्या लहरीचा तरी असल्या सत्पात्राचे ठायीं समावेश झाला असेल हें उघड आहे! दुसरा असा चमत्कार आहे कीं, जो खळ राहु भारतपर्वांच्या ग्रासीं एकदां प्रवृत्त झाला, त्यानें पहिल्या चार कला तरी चावायाच्या कशा ठेवल्या! तेवढ्यापुरतीच त्याच्या मनांत कींव उत्पन्न झाली काय? एकंदरींत ही दंतकथा आह्मांस मुळींच निराधार वाटते. कदाचित् असें झालें असेल कीं कवीच्या हातून चारच पर्वें पार पडून तो निवर्तला असेल; किंवा कदाचित् आरंभींच कांहीं अनिष्टापात होऊन विराटोत्तर पर्वांचा लय झाला असेल. तर आमच्या वाचकांनीं या टिपेवरून हा बोध घ्यावा कीं, असले लोकप्रवाद असले तरी कविवित्तांच्या शोधाविषयींची त्यांची प्रवृत्ति कुंठित होऊं नये. चिरनष्ट मानलेल्या वस्तूंपैकीं प्रसंगवशात् कोठें काय उदयास येईल याचा नेम नाहीं!

वरील चार पर्वांपैकीं आदिपर्व, सभापर्व, व विराटपर्व, हीं तीन माजी 'सर्वसंग्रहां'त छापून निघालीं आहेत. मधल्या 'वनपर्वा'विषयीं या पुस्तकांत सुमारें दोन वर्षांपूर्वी एका रत्नागिरीकरानें जाहिरात दिली होती; पण लोकाश्रय पाहिजे तसा किंवा मुळींच न मिळाल्यामुळें तें काम तसेंच राहिलें असावें. तें वरील कवीचें भाग्य आतां पुनः उदयास येऊं पाहत आहे हें मागील अंकाच्या शेवटच्या बाजूच्या जाहिरातीवरून सर्वांस कळलेंच आहे.

सारख्या भाषेंत, त्यांत भाषांतरकारास लांब लांब यमकें व प्रासांवर प्रास ही गर्दी कधींही साधतां येणार नाहीं हें कोणासही सकृद्दर्शनीं सुद्धां स्पष्ट दिसणार आहे.[1]

पण ही केवळ चार पांच मराठी कवींची व त्यांच्याही ग्रंथांचीच काय ती गोष्ट झाली. त्यांस सोडून बाकीच्यांविषयीं विचार केला ह्मणजे तर वरील मतास कांहींच थारा राहत नाहीं. पाहा कीं, मुकुंदराजानें 'विवेकसिंधु' व 'परमामृत' हे ग्रंथ केले आहेत; ज्ञानेश्वरानें 'अमृतानुभव' केला आहे; एकनाथकृत 'स्वात्मसुख' आहे; व वामनानें 'निगम-सार' व 'श्रुतिकल्पलता' ही रचलीं आहेत. या वेदांतविषयक ग्रंथांस भाषांतरें कोण ह्मणेल ? तसेंच तुकारामप्रभृति अभंगकारांनीं आपले भक्तिपर, वैराग्यपर, स्वानुभवपर वगैरे हरएक प्रसंगींचे उद्गार आपल्या प्रासादिक वाणीनें जगास विश्रुत केले आहेत त्यांवरही भाषांतरत्वाचा आरोप करणारा कोण बहाद्दर सांपडेल तो सांपडो ! हीच गोष्ट अमृतरायाचे कटाव, रामजोशाच्या लावण्या, महिपतीचीं अनेक संतचरित्रें, व 'मनाचे श्लोक', 'केकावली', 'सन्मणिमाला', 'संशयरत्नमाला' इत्यादि शेंकडों स्फुट प्रकरणांसही लागणारी आहे.

५. वरील अवांतर प्रमाणांवरूनही प्रस्तुत वादाचा बराच निकाल होणार आहे. आतां वर सांगितलेलें प्रत्यक्ष प्रमाण वाचकांस सादर करतों. 'महाभारता'च्या आदिपर्वाच्या शेवटीं शेवटीं 'सुंदोपसुंदोपाख्यान' ह्मणून एक कथानक आहे तें व मुक्तेश्वर आणि मोरोपंत यांचीं प्राकृत आख्यानें अशीं तिन्ही पुढें देतों—

"दृष्ट्वा च विश्वकर्माणं व्यादिदेश पितामहः ।
सृज्यतां प्रार्थनीयैका प्रमदेति महातपाः ॥१॥

---

१. मोरोपंतास यमकांची व प्रासांची बेहद्द आवड असतां एका ग्रंथांत त्यानें संस्कृत व इंग्रेजी भाषांप्रमाणें यमकविरहित छंदाची योजना केली आहे. हा ग्रंथ 'भगवद्गीते'चें भाषांतर होय. पुढील आर्या पाहा:—

धर्मक्षेत्रीं कुरुच्या क्षेत्रीं जे युद्धकामुक मिळाले ।
माझे आणि पांडव ते प्रवर्तले सञ्जया कसें सांग ॥१॥
रचलें पांडवबळ तें दुर्योधन देखुनी तया काळीं ।
तो राजा वचन असें द्रोणाच्या जवळि येउनी बोले ॥२॥

वरील आर्या मूळ ग्रंथाशीं किती मिळून आहेत हें पुढील श्लोकांवरून लक्षांत येईल—

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः । मामकाः पाण्डवाश्चैव किमकुर्वत सञ्जय ॥१॥
दृष्ट्वा तु पाण्डवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा । आचार्यमुपसङ्गम्य राजा वचनमब्रवीत् ॥२॥

जो कवि आपणास 'आर्यापति' ह्मणवीत असे, व शब्दालंकार रचण्यांत ज्याचा हातखंडा असे, त्यानें वरील ग्रंथांत आपलें सर्व भाषावैभव दूर गुंडाळून ठेवून केवळ सेवकाप्रमाणें त्यानें अर्थवाहनाचेंच काम कां पतकरलें हें पुढील प्रस्तावनेवरून व्यक्त होईल:—

त्यांचे पाय नमुनि मी दीन अतिज्ञानहीन परि भावें ।
भावें गीतार्थातें ह्मणवुनि टीका कराक्या धावें ॥
मी तों भगवद्गीता-सुधानदीमाजि घालितोंचि उडी ।

( पुढें चालू. )

पितामहं नमस्कृत्य तद्वाक्यमभिनन्द्य च ।
निर्म्ममे योषितं दिव्यां चिन्तयित्वा पुनः पुनः ॥२॥
त्रिषु लोकेषु यत्किञ्चिद्भूतं स्थावरजङ्गमम् ।
समानयद्दर्शनीयं तत्तदत्र स विश्ववित् ॥३॥
कोटिशश्चैव रत्नानि तस्या गात्रे न्यवेशयत् ।
तां रत्नसङ्घातमयीमसृजद्देवरूपिणीम् ॥४॥
सा प्रयत्नेन महता निर्म्मिता विश्वकर्म्मणा ।
त्रिषु लोकेषु नारीणां रूपेणाप्रतिमाऽभवत् ॥५॥
न तस्याः सूक्ष्ममप्यस्ति यद्गात्रे रूपसम्पदा ।
नियुक्ता यत्र वा दृष्टिर्न सज्जति निरीक्षताम् ॥६॥
सा विग्रहवतीव श्रीः कामरूपा वपुष्मती ।
जहार सर्व्वभूतानां चक्षूंषि च मनांसि च ॥७॥
तिलं तिलं समानीय रत्नानां यद्विनिर्म्मिता ।
तिलोत्तमेति तत्तस्या नाम चक्रे पितामहः ॥८॥
ब्रह्माणं सा नमस्कृत्य प्राञ्जलिर्वाक्यमब्रवीत् ।
किं कार्य्यं मयि भूतेश येनास्म्यद्येह निर्म्मिता ॥९॥
॥पितामह उवाच॥ गच्छ सुन्दोपसुन्दाभ्यामसुराभ्यां तिलोत्तमे ॥
प्रार्थनीयेन रूपेण कुरु भद्रे प्रलोभनम् ॥१०॥
त्वत्कृते दर्शनादेव रूपसम्पत्कृतेन वै ।
विरोधः स्याद्यथा ताभ्यामन्योऽन्येन तथा कुरु ॥११॥
॥नारद उवाच॥ सा तथेति प्रतिज्ञाय नमस्कृत्य पितामहम् ।
चकार मण्डलं तत्र विबुधानां प्रदक्षिणम् ॥१२॥
प्राङ्मुखो भगवानास्ते दक्षिणेन महेश्वरः ।
देवाश्चैवोत्तरेणासन् सर्वतस्त्वृषयोऽभवन् ॥ १३॥
कुर्वत्या तं तया तत्र मण्डलं तत्प्रदक्षिणम् ।
इन्द्रः स्थाणुश्च भगवान्धैर्य्येण प्रत्यवस्थितौ ॥१४॥
द्रष्टुकामस्य चात्यर्थं गतया पार्श्वतस्तया ।
अन्यदञ्चितपक्ष्माक्षं दक्षिणं निःसृतं मुखम् ॥१५॥

---

नरजन्म पर्व दुर्लभ जाणुनि घ्यावी कशी न येथ बुडी ॥
आर्यांबुधिपरतीरा पावाया मी प्रवर्तलों धीट ।
पोंहाया न कळे परि अमृतांबुधि ह्मणुनि मज्जनीं धीट ॥
पुरुषाचा धर्म श्रम ह्मणउनि कांहीं पडेल येथ उणें ।
पूर्ण करावें शोधुनि भगवत्प्रीत्यर्थ सज्जनें निपुणें ॥

पृष्ठतः परिवर्त्तन्त्या पश्चिमं निःसृतं मुखम् ।
गतायाश्चोत्तरं पार्श्वमुत्तरं निःसृतं मुखम् ॥१६॥
महेन्द्रस्यापि नेत्राणां पृष्ठतः पार्श्वतोऽग्रतः ।
रक्तान्तानां विशालानां सहस्रं सर्व्वतोऽभवत् ॥१७॥
एवं चतुर्म्मुखः स्थाणुर्म्महादेवोऽभवत्पुरा ।
तथा सहस्रनेत्रश्च बभूव बलसूदनः ॥१८॥
तथा देवनिकायानां महर्षीणां च सर्व्वशः ।
मुखानि चाभ्यवर्त्तन्त येन याता तिलोत्तमा ॥१९॥
तस्या गात्रे निपतिता दृष्टिस्तेषां महात्मनाम् ।
सर्व्वेषामेव भूयिष्ठमृते देवं पितामहम् ॥२०॥
गच्छन्त्या तु तया सर्व्वे देवाश्च परमर्षयः ।
कृतमित्येव तत्कार्य्यं मेनिरे रूपसम्पदा ॥२१॥
तिलोत्तमायां तस्यां तु गतायां लोकभावनः ।
सर्व्वान् विसर्ज्जयामास देवानृषिगणांश्च तान् ॥२२॥

इत्यादिपर्व्वणि राज्यलाभपर्व्वणि तिलोत्तमाप्रस्थापने
एकादशाधिकद्विशतोऽध्यायः

॥नारद उवाच॥ जित्वा तु पृथिवीं दैत्यौ निःसपत्नौ गतव्यथौ ।
कृत्वा त्रैलोक्यमव्यग्रं कृतकृत्यौ बभूवतुः ॥१॥
देवगन्धर्वयक्षाणां नागपार्थिवरक्षसां ।
आदाय सर्व्वरत्नानि परां तुष्टिमुपागतौ ॥२॥
यदा न प्रतिषेद्धारस्तयोः सन्तीह केचन ।
निरुद्योगौ तदा भूत्वा विजह्रातेऽमराविव ॥३॥
स्त्रीभिर्म्माल्यैश्च गन्धैश्च भक्ष्यभोज्यैः सुपुष्कलैः ।
पानैश्च विविधैर्हृद्यैः परां प्रीतिमवापतुः ॥४॥
अन्तःपुरवनोद्याने पर्व्वतेषु वनेषु च ।
यथेप्सितेषु देशेषु विजह्रातेऽमराविव ॥५॥
ततः कदाचिद्विन्ध्यस्य प्रस्थे समशिलातले ।
पुष्पिताग्रेषु शालेषु विहारमभिजग्मतुः ॥६॥
दिव्येषु सर्व्वकामेषु समानीतेषु तावुभौ ।
वरासनेषु संहृष्टौ सहस्त्रीभिर्निषेदतुः ॥७॥
ततो वादित्रनृत्याभ्यामुपातिष्ठन्त तौ स्त्रियः ।
गीतैश्च स्तुतिसंयुक्तैः प्रीत्या समुपजग्मिरे ॥८॥

ततस्तिलोत्तमा तत्र वने पुष्पाणि चिन्वती ।
वेशं साक्षिप्तमाधाय रक्तेनैकेन वाससा ॥९॥
नदीतीरेषु जातान्सा कर्णिकारान् प्रचिन्वती ।
शनैर्जगाम तं देशं यत्रास्तां तौ महासुरौ ॥१०॥
तौ तु पीत्वा वरं पानं मदरक्तान्तलोचनौ ।
दृष्ट्वैव तां वरारोहां व्यथितौ सम्बभूवतुः ॥११॥
तावुत्थायासनं हित्वा जग्मतुर्यत्र सा स्थिता ।
उभौ च कामसम्मत्तावुभौ प्रार्थयतश्च ताम् ॥१२॥
दक्षिणे तां करे सुभ्रूं सुन्दो जग्राह पाणिना ।
उपसुन्दोऽपि जग्राह वामे पाणौ तिलोत्तमाम् ॥१३॥
वरप्रदानमत्तौ तावौरसेन बलेन च ।
धनरत्नमदाभ्यां च सुरापानमदेन च ॥१४॥
सर्व्वैरेतैर्म्मदैर्म्मत्तावन्योऽन्यं भ्रुकुटीकृतौ ।
मदकामसमाविष्टौ परस्परमथोचतुः ॥१५॥
मम भार्य्या तव गुरुरिति सुन्दोऽभ्यभाषत ।
मम भार्य्या तव वधूरुपसुन्दोऽभ्यभाषत ॥१६॥
नैषा तव ममैषेति ततस्तौ मन्युराविशत् ।
तस्या रूपेण सम्मत्तौ विगतस्नेहसौहृदौ ॥१७॥
तस्या हेतोर्गदे भीमे सङ्गृहीतावुभौ तदा ।
प्रगृह्य च गदे भीमे तस्यां तौ काममोहितौ ॥१८॥
अहं पूर्व्वमहं पूर्व्वमित्यन्योऽन्यं निजघ्नतुः ।
तौ गदाऽभिहतौ भीमौ पेततुर्धरणीतले ॥१९॥
रुधिरेणावसिक्ताङ्गौ द्वाविवार्कौ नभश्च्युतौ ।
ततस्ता विद्रुता नार्यः स च दैत्यगणस्तथा ॥२०॥"

---

"तपस्वी ऋषेश्वर ब्रह्मयाप्रती येऊनि क्लेशांतें सांगती ।
तेणें विचारूनियां चित्तीं विश्वकर्मा निरोपी ॥१॥
रत्नें घालोनि अवयवीं दिव्यांगना निर्मीं बरवी ।
जीतें देखतां वैरभावीं नाश होय असुरांतें ॥२॥
अवश्य ह्मणोनि विश्वकर्मा तीहीं लोकींच्या ललामा ।
एकवटोनि दिव्य प्रतिमा तिलोत्तमा निर्मिली ॥३॥
तिळतिळ जडोनि रत्नकण सजीव घडिलें प्रमदारत्न ।
ह्मणोनि तिलोत्तमा हें अभिधान ब्रह्मा ठेवी तियेतें ॥४॥

सकुमार सुंदर सुलक्षणी चातुर्य-प्रकाशाची खाणी ।
जीतें अवलोकितां नयनीं चोज आलें अद्भुत ।।५।।
उभी ठाके जया सवा तिकडे मुखें निघती देवा ।
सहस्रनयन झाला मघवा चतुरानन विरंची ।।६।।
तिनें होतांचि मागें पुढें अग्नी दुतोंडा दोहींकडे ।
अवलोकनाचेनि पाडें स्कंद झाला षण्मुख ।।७।।
तीसि बोधोनि वर्मकळा विरिंची पाठवी विंध्याचळा ।
जेथें असुरगणाचा पाळा परमानंदें क्रीडत ।।८।।
नृत्यांगनांचीं नर्तनें किन्नरांचीं मधुर गायनें ।
डोल देती आसव-पानें अंकासनीं अंगना ।।९।।
तेचि वनीं विलोल-नेत्रा तिलोत्तमा शशांकवक्त्रा ।
रक्तवर्ण-एकवस्त्रा वेढोनि वेंची पुष्पांतें ।।१०।।
तीसीं अवलोकितां नयनीं काम-व्याधें विंधिलें बाणीं ।
देह-स्मरणातें विसरूनि भोग भूलीं भूलले ।।११।।
आलिंगनालागीं उतावळे दोघे धावूनि पातले जवळे ।
परस्परें लाऊनि डोळे करसंकेतें वारिती ।।१२।।
दक्षिणकरीं धरिली सुंदें वामहस्तीं उपसुंदें ।
दोघे कामाच्या उन्मादें रमावया झोंबती ।।१३।।
सुंद ह्मणे रे ज्येष्ठपत्नी तुवां मानावी मातृस्थानीं ।
येरू ह्मणे कन्या भगिनी स्नुषा तुझी मम भार्या ।।१४।।
दोघे चढले अति विषादा वश झाले निष्ठुर क्रोधा ।
पडताळूनि प्रचंड गदा युद्धकंदना मिसळले ।।१५।।
घे घे ह्मणोनि घालिती घावो लक्षूनि भेदिती वर्मे ठावो ।
लोपला सुहृद-पणाचा भावो घेवूं पाहती प्राणांतें ।।१६।।
सुंदें ताडितां हृदयकमळीं उपसुंद हाणी कर्ण-मूळीं ।
मूर्छना दाटोनि भूमंडळीं दोघे प्राणा मूकले ।।१७।।
होतां प्रमदेचें दर्शन व्यर्थ दोघे पावले मरण ।
जेवीं करिणींलागीं करीण युद्ध करितां काननीं ।।१८।।
स्त्रिया आणि असुरमेळा भयें पातला पाताळा ।
ब्रह्मा आदि सुरां सकळां परमानंद ते काळीं ।।१९।।"

---

"त्रस्त-तर-सुर-प्रार्थित-विधि-वचनें चतुर विश्वकर्मा तें ।
व्यसन हराया, द्याया निज कौशल्यें सुरांसि शर्मातें, ।।१।।

लोक-त्रय-स्थ तिळ तिळ उत्तम लावण्य मेळउनि यत्नें।
स्त्रीरत्न रची, जाणों अवयव ते न खचिलींच तीं रत्नें. ॥२॥
नामें तिळोत्तमा ती, लावण्य तिचें नृपा! अपाराचि तें,।
जेणें वेधावेंचि क्षण तरि, जें मन महातपा रचितें. ॥३॥
तसि ह्मणे द्रुहिण, 'अये! देवि! त्रैलोक्य-सुंदरि! पुनीते!।
वारीं ताप, जगा जे दिधले सुंदोपसुंदरिपुनीं ते. ॥४॥
ती, भुलले सुर हरि-हर पाहुनी लोकैकसुंदरा ज्याला,।
ब्रह्म-नियोगें दावी तें मोहक वदन सुंदराज्याला. ॥५॥
विंध्य-वनीं ललना-जन-परिवृत ते दैत्यराज पीत-सुर,।
स्वर्गाधिपत्य साधुनि होते स्व-बळेंकरूनि भीतसुर. ॥६॥
पुष्पावचयव्याजें, जैसी चपळा घनीं, वनीं चपळ।
फिरतां तिला पहाती, स्थिर पाहुनि बैसती न नीच पळ. ॥७॥
अवलोकितांचि चित्तें तद्रूपीं जेविं सुंद रमला हो!।
उपसुंदही ह्मणे, 'हें प्राप्त स्त्रीरत्न सुंदर मला हो.'॥८॥
धावुनि धरिति कर तिचे सोडुनि सुंदोपसुंद रीतीतें,।
दोघांचेंहि कटाक्षें अनुमोदी कृत्य सुंदरी ती तें. ॥९॥
सुंद ह्मणे, 'म्यां वरिली, सर परता, त्यजुनि हात तो डावा;।
गुरुदारधर्षणोद्यत जो, तो लागेल हात तोडावा.' ॥१०॥
उपसुंद ह्मणे, 'माझी न करावी धर्महानि, करकरुनीं।
कां धरिला मृदुकर? सर, हर! हर! मरशील हा निकर करुनीं.'॥११॥
सुंद जसा, उपसुंदहि दे, दे त्या दे जसें गगन गाळी,।
ज्यासि अमर्ष रुचे, तो अंध विवेकासि कां मग न गाळी? ॥१२॥
सुंदीं जैसा काम क्रोध उठे, तदनुजीं तसाचि तदा.।
बिंबप्रतिबिंबचि तें; वे ज्येष्ठ, कनिष्ठही तसीच गदा. ॥१३॥
सुंदाची उपसुंदीं, उपसुंदाची गदा पडे सुंदीं,।
तन्मरणमुदुद्धासें गणपतिच्या कळ तुटेल कां तुंदीं? ॥१४॥"

अध्याय ३८ आर्या ९-२३.

वरील तिन्ही आख्यानें परस्पर ताडून पाहिलीं असतां सदरील मतास कितपत बळकटी येते हें वाचकांस कळून येईलच. तिन्ही आख्यानांची पद्यसंख्याच नुसती पाहिली तर त्यांचें प्रमाण सरासरी १, ३, ½ इतकें पडेल. आंतील अर्थ पाहिला तरी मुक्तेश्वराच्या ओंव्यांतही पुष्कळ फेर केलेला आढळेल, आणि मोरोपंताच्या आर्यांत तर मूळच्या कथा-सूत्राखेरीज थोडेंच सादृश्य सांपडेल.

वरील सादृश्य तरी 'भारतां'तील एक विवक्षित कथानक घेतलें ह्मणून इतकें आढळलें. एकंदर इतिहासाच्या संबंधानें जर वरील तिन्ही ग्रंथ परस्परांशीं ताडून पाहिलें

तर तें याहूनही थोडें आढळेल. तेव्हां एकंदरींत 'भारत,' 'रामायण' वगैरे ग्रंथांचा सरासरी आधार घेऊन वरील दोघां महाराष्ट्रकवींनीं स्वतंत्रपणेंच काव्यरचना केली आहे असें ह्मणायास हरकत नाहीं. वामनादि कवींचीं स्फुट आख्यानें तर बहुधा 'रघुकिराता'दि काव्यांप्रमाणेंच स्वतंत्र होत !

६. याप्रमाणें एका आक्षेपाविषयीं विचार झाला. दुसरा आक्षेप 'अपरिचित शब्दां'चा. हा आक्षेप बहुधा अशा लोकांच्या तोंडून ऐकूं येतो कीं, ज्यांनीं स्वभाषेचें कधींही ह्मणण्यासारखें अध्ययन केलें नसून इंग्रेजीच्या ज्ञानावरच जे आपणास थोर व विद्वान् ह्मणून लेखीत असतात. यांपैकीं कित्येक बहादर असे आहेत कीं, त्यांस मोरोपंताची सामान्य आर्या किंवा वामनाचा सामान्य श्लोकही लागण्याची पंचाईत ! अशांची रसिकता काय ती, कोणा कवीला 'गुळगुळीत' ह्मण, कोणाला 'कुचकट' ह्मण, कोणाला 'खुळा' ह्मण, असा चारगटपणा करण्यानेंच बहुधा प्रगट होत असते. केवळ उपहास केल्यानें कोणत्याही गोष्टीची माहिती होत नसते, उपहास करणें तर उपहास्य वस्तूचें अगोदर कांहीं ज्ञान तरी आपणांस असलें पाहिजे, नाहीं तर आकाशावर थुंकल्याप्रमाणें आपलीच शोभा होत असते, येवढी साधी गोष्टही वरील महारसिकांस कळत नाहीं ! अपरिचित शब्दांचा प्रयोग करण्याबद्दल जो आपण कवीस दोष ठेवावा, त्याच्या अगोदर ते शब्द कोणाला अपरिचित याचा कांहींच विचार होऊं नये काय ? 'अपरिचित शब्द' ह्मणून कविता वाईट येवढाच महासिद्धांत गृहीत केला असतां मराठी वाचकानें कानडी किंवा हिंदुस्थानी कवीस कां नांव ठेवूं नये ? किंबहुना फारसी भाषेंतील, फ्रेंच् भाषेंतील, ग्रीक् भाषेंतील कविता सरसकट नादान अशीही भरारी कां मारूं नये ! मोरोपंताची कविता 'अपरिचित शब्द'मय आहे हें जर खरें मानलें, तर आज पाऊणशें ऐंशी वर्षें सर्वांच्या मुखीं जो त्याच्या नांवाचा जयजयकार ऐकूं आला आहे तो कसा आला असता ? ज्याची कविता कोणास कळण्यासारखीच मुळीं नाहीं त्याची सामान्य लोकांतही चहा होईल काय ? तेव्हां प्रस्तुत कवीच्या काव्यांतील शब्द सर्वासच 'अपरिचित' आहेत असें मनांत येत नाहीं. आतां हें खरें, कीं जे महाविद्वान् थोड्याथोडक्या काळांत येथल्या येथेंच जन्मभाषाही विसरून गेलेले आढळतात, त्यांच्या दृष्टीनें पाहिलें असतां कोणत्याही मराठी कवीचे, आणि त्यांतून मोरोपंताचे तर, शब्द भारीच 'अपरिचित' ! पण अशांच्या अभिप्रायावरून जर महाराष्ट्रकवींवर आक्षेप काढायाचे, तर पाद्री साहेबांचे व बाट्या लोकांचे आमच्या देशाच्या हरएक प्रकरणीं जे मोलवान् विचार सहस्रशः प्रगट झालेले आढळतात, तेही शिरसावंद्य कां करूं नयेत ? कोणतीही भाषा पाहिली तरी तिचे आंतल्या आंत अनेक प्रकार असतात,—मोठमोठ्या पंडितांच्या भाषेपासून तों अगदीं अडाणी लोकांच्या भाषेपर्यंत ! मग अशा भाषाभेदांत एकाचे शब्द दुसऱ्यास सहजच 'अपरिचित' वाटणार आहेत. मोरोपंत, वामन यांच्या सारख्यांची भाषा सामान्य अडाणी शूद्रांस तर काय पण सामान्य प्रतीच्या लोकांसही पुष्कळ ठिकाणीं 'अपरिचित' वाटणारी आहे, व त्याप्रमाणेंच अडाणी कुणब्यांच्या लावण्या व पवाडे हेही कांहीं अंशीं पंडितांस 'अपरिचित' वाटतील. पण अशा परस्पर 'अपरिचया'नें

दोहोंपैकीं कोणाचीही वास्तविक योग्यता कमी होते कीं काय, हें कोणाही समंजस मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. आतां येथें कोणी असें जर विचारील, कीं सर्वांस समजण्यासारखी कविता करायाची टाकून मोरोपंतानें येवढे मोठे मोठे संस्कृत शब्द, लांब लांब समास वगैरे योजून तीस येवढें दुर्बोधत्व कां आणलें, तर त्यावर प्रस्तुत कवीच्या तर्फेनें उत्तर देणें मोठें कठिण आहे असें नाहीं. रुचिपरत्वेंकरून जगांत हरएक प्रकरणीं कृतिभेद आढळतो हें सर्वप्रसिद्धच आहे. दोघेही कोष्टा(ष्ट्या? सं०)धंद्या असतात; पण एकास साधाच पोषाख पसंत पडतो, व एकास भपकीदार आवडतो. दोघींही रूपानें चटकचांदण्या असतील; पण एकीस माणिकमोत्यांनीं आपणास लेववण्याची हौस असेल, व दुसरी—

कृताभ्यङ्गस्नाना कनकमणिभूषाविरहिता
विराजे सिंदूरें धवल वसनें भूपवनिता।

अशा प्रकारची असेल. अशीच ग्रंथकर्त्यांचीही गोष्ट. कालिदासाची वाणी शुद्ध, साधी व रसाळ अशी त्याच्या साऱ्या ग्रंथांतून आढळते. भवभूति त्याच्याहून कमी होता असें नाहीं. पण त्याच्या नाटकांतील भाषा म्हटली म्हणजे प्रौढ, उद्दाम, व साहित्योक्त गौडी रीतीस अनुसरणारी अशी आहे. हाच फरक इंग्रेजी भाषेंत अॅडिसन् व जॉन्सन् यांच्या ग्रंथांत आढळतो. शेक्सपीयर व मिल्टन् यांची जोडी कांहीं अंशीं वर सांगितलेल्या दोघां कविवरांच्यासारखीच होय, व दोघांच्यामधली तफावतही तशीच आहे. पहिल्याचें कवित्व 'वाचमर्थोऽनुधावति' या वचनाप्रमाणें केवळ स्वतःप्रेरित असल्याप्रमाणें भासतें; व त्यामुळेंच कधीं व्याकरण चुकलें, कधीं अलंकार चुकला, कधीं अर्थाची असंगति झाली, असे प्रमाद त्याच्या कवितेंत जागोजाग आढळतात. दुसऱ्याचा प्रकार अगदीं वेगळा. तो स्वकालीन पंडितांत अग्रगण्य असल्यामुळें त्याच्या ग्रंथांत वरील दोष नाहींत इतकेंच नव्हे, तर त्याच्या रचनेंत प्रगल्भता व अलंकारादिकांचा थाटमाट हा जागोजाग दृष्टीस पडतो. वास्तवच त्याची कविता पंडितांस जितकी प्रिय आहे तितकी सामान्य अडाणी लोकांस नाहीं. ग्रीक् व रोमन् ग्रंथकारांवर अनुसंधान ठेवून लिहिण्याचा त्याचा पुष्कळ प्रघात असल्यामुळें वरील भाषांचें मार्मिक ज्ञान त्याचें काव्य यथास्थित समजण्यास पुष्कळ अंशीं अवश्य आहे, व वास्तवच मोठमोठ्या पंडितांनीं त्याच्या काव्यावर टीका लिहिल्या आहेत. असो; तर मग जें रुचिवैचित्र्य इतर भाषांतील कवितेंत आढळतें तेंच आमच्या महाराष्ट्रभाषेंतही कां आढळूं नये? कोणी कवि शुद्ध, सरळ व सुबोध शब्दांनीं पुण्यपत्तनाचें वर्णन करतो:—

"पुणें गांव आहे. नदीकांठ आहे.
मर्दी जाळिती लोक. तें पात्र वाहे."

कोणी पुढील बिकट तऱ्हा काव्यांत आणतो:—

"अनलसमीहित साधी रावा वारा महीवरा कामा।
अनलस मीहि तसा धीरा यावा रामही वराका मा॥"

ये नाम केचिदिह नः प्रथयन्त्यवज्ञाम्
जानन्तु ते किमपि तान् प्रति नैष यत्नः ॥[1]
मालतीमाधव (१,६)—भवभूति

अंक ४७—(१) सदरील अंकाचा विषय. (२) यमक व प्रास. (३) संस्कृत कवींचा प्रघात. (४) इंग्रेजी कवींचा. (५) वरील आक्षेपाचा ग्राह्य अंश. (६) तो मोरोपंतावर कितपत लागू पडतो याविषयीं विचार. (७) तत्कालीन पंडितांची अभिरुचि प्रस्तुत कवीस कितपत बाधक झाली याविषयीं विवरण.

१. मागील अंकांत मोरोपंताच्या कवितेवरील दोन आक्षेपांचें निरसन केलें. आतां पुढल्यांविषयीं विचार करूं.

२. प्रस्तुत कवीच्या पदरचनेच्या संबंधानें आधुनिक पंडितमंडळीचा त्याजवर मोठा आक्षेप म्हटला म्हणजे यमक व प्रास यांच्या संबंधानें आहे. या दोहोंचें प्राचुर्य त्याच्या काव्यांत जें आढळतें तें त्याच्या अरसिकत्वाचें दर्शक होय, व जे वाचक किंवा श्रोते वरील शब्दालंकारांस चाहतात तेही अरसिक वर्गांतच येतात, असें आज बहुत वर्षे मत चालत आलें आहे; या मताविषयींचे कांहीं उल्लेख आरंभींच्या अंकांत* दिलेच आहेत, त्याशिवाय आलीकडील महाराष्ट्रकविता पाहिली तर तींतही वरील मतांचा प्रभाव दृष्टीस पडतो. तो अर्थात् हा कीं, तींत यमकादि शब्दालंकारांच्या परित्यागाविषयीं वाग्देवीस जणो काय कडकडीत व्रत घरवलें आहे असें वाटतें. असो; तर हें जें येवढें पंडितमान्य मत आहे याच्या यथार्थत्वाविषयीं सविस्तर विवरण करणें अवश्य होय.

३. कोणत्याही प्रकाराच्या युक्तायुक्ततेचा जो विचार करायाचा तो दोन गोष्टींवरून होत असतो; एक तत्त्वदृष्ट्या, व दुसरा थोर मानलेल्या लोकांच्या आचारांवरून. युक्तीच्या दृष्टीनें एकादी गोष्ट बरोबर दिसत असते हें एक; किंवा सर्वमान्य लोक तीस अनुसरतात हें दुसरें. आतां यमक व प्रास काव्यांत असणें हें वाईट कीं चांगलें याविषयीं वस्तुतः जर विचार केला, तर हें कोणासही स्पष्ट दिसणारें आहे कीं, ज्या अर्थी ते शब्दालंकार होत, त्या अर्थी ते कवितेस शोभवणारे आहेतच आहेत. सोन्यारुप्याचे दागिने अंगावर घालणें हें चांगलें कां वाईट याविषयीं निर्णय ठरवण्यास जशी पंडितांची सभा मिळवून भवति न भवति करण्याची गरज नाहीं, त्याप्रमाणेंच कर्णाचें रंजन करणारे जे वर्णसाम्याचे प्रकार ते कवीनें योजावे कीं नाहीं, याविषयीं फार वाटाघाट करणें नलगे. काव्यांत रसाचें प्राधान्य मानूनही कवि ज्याप्रमाणें छंदोबद्ध शब्दरचनेचें साहित्य रसपुष्ट्यर्थ अवश्य घेतात, त्याप्रमाणेंच यमक व प्रास हेही मनास आल्हाद करणारे असल्यामुळें त्यांचा प्रयोग सत्कवींनींही केलेला आढळतो यांत नवल काय! तेव्हां प्रस्तुत शब्दालं-

१. "जे कोणी आमची अवहेलना करतात त्यांनीं असें समजावें कीं आमचा हा यत्न त्यांजकरतां नव्हे!" 'सम्पादक'

* अंक ४५ कलम ५ पृष्ठें ८०३–८०६ पाहा.

कारांत वस्तुत: दूषणीय कांहीं आहे असें नाहीं. आतां दुसरी गोष्ट जें सत्कवींच्या प्रयोगाचें प्रमाण तेंही प्रकृत वादास प्रतिकूल आहे असें नाहीं. संस्कृतांत पूर्वीपासून यमकाचा मुळींच प्रघात नाहीं, तेव्हां त्याच्या संबंधाचें त्या भाषेंत प्रमाण सांपडणार नाहीं हें उघडच आहे. पण अनुप्रासाविषयीं पाहिलें तर अगदीं मोठमोठ्या कवीश्वरापासून तों अर्वाचीन सामान्य कवीपर्यंतही त्याचें प्राबल्य आढळतें. कालिदासाचे ठायीं वाग्देवीचें सर्वस्व आढळतें. व त्याच्या काव्यांत संस्कृत कवितेची जितकी पूर्ण दशा दिसते, तितकी अन्यत्र कोठेंही दिसत नाहीं; पण असें असूनही अनुप्रासाविषयीं त्याची मोठी करडी नजर दिसते असें नाहीं, उलटी वरील शब्दालंकाराविषयीं त्याची आवडही जागोजाग दिसते.[1] संस्कृताचें अध्ययन केलेल्यांस 'रघुवंशा'च्या नवव्या सर्गांत कोणता प्रकार बहुधां साऱ्या सर्गभर आढळतो तो सांगायाला नकोच. त्यांत दर एक श्लोकाच्या शेवटल्या चरणांत तीन तीन अक्षरांची अनुवृत्ति होई अशी रचना केली आहे. ही तर 'कवींच्या कुलगुरू'चीच प्रत्यक्ष गोष्ट झाली. भवभूति कालिदासाच्या बराच मागून झाला असावा, तरी त्याचें स्थान वाग्देवीच्या सिंहासनासमोर कालिदासाच्या पलीकडचेंच आहे, ही प्रसिद्धि पहिल्यापासून चालत आली आहे. पण याच्या कवितेंत पाहूं जावें तों शब्दालंकारांविषयीं याचीही पराङ्मुखता दृष्टीस पडत नाहीं, इतकेंच नव्हे तर उलटी बरीच हौस सुद्धां दृष्टीस पडते.[2] यांच्या पुढला प्रचार तर सांगायालाच नको. भारवि, माघ, बाण, सुबंधु, श्रीहर्ष, जयदेव इत्यादिकांच्या काव्यांत शब्दालंकाराविषयीं उदासीनता कितपत दृष्टीस पडते हें या कवींच्या ग्रंथांतलें एकादें पृष्ठ उलटून पाहिलें असतांही कळणार आहे. हें तर काय पण पहिल्या दोघांनीं आपापल्या महाकाव्यांच्या* अनुक्रमेंकरून १५ व्या व १९ व्या सर्गांत चित्रकवित्वाचे जे चक्रबंध, गोमुद्रिकाबंध वगैरे प्रकार, त्यांची रचना करूनही आपली हौस फेडून घेतली आहे. दुसऱ्या दोघांची श्लेषप्रियता तर पंडितप्रसिद्धच आहे. 'नैषध' काव्य तर अनेकार्थसंभवाविषयीं केवळ कामधेनुच होय ही प्रसिद्धि सार्वलौकिक आहे. आतां या मध्यमकालीन कवींपासून आलीकडे जों जों येऊं लागावें तों तों वरील शब्दालंकारांचें प्राबल्य तर कितपत दृष्टीस पडूं लागतें हें सांगायासच नको. 'विश्वगुणादर्श', 'लक्ष्मीसहस्र', 'भारतचंपू', 'नलचंपू', इत्यादि ग्रंथांवरून कवितेच्या बाह्यालंकारांवर अर्वाचीन कवींचे

---

१. उदाहरणार्थ पुढील श्लोक पाहा:—

ततो मृगेन्द्रस्य मृगेन्द्रगामी वधाय वध्यस्य शरं शरण्यः ।
जाताभिषङ्गो नृपतिर्निषङ्गात् उद्धर्तुमैच्छत् प्रसभोद्धृतारिः ॥ रघुवंश २—३०.

२. पुढील उदाहरण पाहा:—

असारं संसारं परिमुषितरत्नं त्रिभुवनं
निरालोकं लोकं मरणशरणं बान्धवजनम् ।
अदर्पं कन्दर्पं जन-नयन-निर्माणमफलं
जगज्जीर्णारण्यं कथमसि विधातुं व्यवसितः ॥ मालतीमाधव ५,—३०.

* किरातार्जुनीय व शिशुपालवध. 'सम्पादक'

परिश्रम केवढे दृढ होत आले आहेत हें कोणासही सकृद्दर्शनीं मुद्दां कळणार आहे. असें होतां होतां अगदीं आलीकडे किंबहुना आधुनिक काळचा प्रघात असा आढळतो कीं, सामान्य भाषणांत किंवा लिहिण्यांतही शब्दचमत्कारावांचून व्हावयाचें नाहीं. सरस्वतीचा ओघ निघाला कीं तो जलयंत्रोद्गारांप्रमाणें चित्रविचित्रतेनेंच प्रगट झाला पाहिजे !¹

---

१. हा वाग्वैचित्र्याचा प्रकार शास्त्रीमंडळीच्या लेखांतून व भाषणांतूनही नेहेमी दृष्टीस पडतो हें पुष्कळांस माहीत असेलच. याचें एक उत्कृष्ट उदाहरण गुर्जरदेशीय प्रसिद्ध पंडित गट्टूलालजी यांचा सुमारें चार वर्षांपूर्वी प्रसिद्ध झालेला एक लेख होय. डेक्कन् कॉलेजच्या मंडळीनें ७३ सालीं जो 'मृच्छकटिक' नाटकाचा प्रयोग केला त्या वेळीं पंडित मजकूर पुण्यांत असल्यामुळें इतर शास्त्रिसमुदायाबरोबर त्यांसही प्रयोगप्रेक्षणार्थ निमंत्रण झालें होतें. खरोखरी पाहिलें असतां 'प्रेक्षणार्थ' हा शब्द पंडितजींच्या संबंधानें पाहतां अनर्थक होय; कां कीं हे दोन्ही डोळ्यांनीं आंधळे आहेत. ही महापत्ति त्यांस पूर्ववयांतच प्राप्त झाली असें समजतें. तरी असें असतांही त्यांची विद्वत्ता येवढी मोठी आहे कीं, त्यांच्या तोडीचे पंडित या काळांत अवघ्या भारतवर्षांत थोडेच असतील. पण यांच्या संबंधानें सांगण्यासारखी सर्वांत अत्यंत आश्चर्याची गोष्ट म्हटली म्हणजे यांचें शीघ्रकवित्व होय. वरील प्रयोगाच्या समयीं विद्यालयांतील पुष्कळ मंडळी एके दिवशीं त्यांच्या घरीं गेली होती; तेव्हां समस्यापूरणादि अनेक चित्रकवित्वाचे प्रकार पाहून सर्वांस मोठें कौतुक व आश्चर्य वाटलें. बोलतां बोलतां हव्या त्या वृत्तांत पद्य जुळणें, हव्या त्या विषयावर श्लेषादि चमत्कारयुक्त वर्णन करणें, एखादे तीन चरण दिले असतां चवथा अर्थसंगतीची हानि न होतां जुळून देणें, इत्यादि अनेक प्रकार एक चार घटकेंत प्रत्यक्ष पाहिल्यावरून आमची खात्री झाली कीं, कालिदासादिकांच्या 'भोजप्रबंधा'दि ग्रंथांत आढळणाऱ्या व आख्यान-परंपरेनें चालत आलेल्या ज्या गोष्टी सर्व प्रसिद्ध आहेत, त्यांस असंभाव्य मानण्याची बिलकूल गरज नाहीं. असो; याच प्रसंगीं वरील नाटकप्रयोगावर त्यांनीं आपला अभिप्राय संस्कृतांत लिहून दिला; तो सदरील वर्षाच्या जून महिन्याच्या आरंभींच्या 'ज्ञानप्रकाशां'त छापला होता. तो पाहिला असतां जुन्या पंडितांची श्लेषादिप्रियता पूर्ण लक्षांत येईल.

प्रस्तुतसारख्या पंडितांविषयीं मनांत विचार येतांच त्याबरोबर अनेक वृत्तिही तत्क्षणींच उद्भवतात. एक तर विषादयुक्त खेद, कीं आमच्या प्राचीन राष्ट्राचें विद्यावैभव अस्तंगत होण्याचा हा समय येऊन ठेपला आहे. सूर्यास्तसमयीं शेवटचे शेवटचे किरण जसे उंच वृक्षांच्या शेंड्यांवर, पर्वतांच्या शिखरांवर, वगैरे क्षणमात्र विश्राम घेऊन अंमळशानें समूळ अस्तास जातात, त्याप्रमाणें आमच्या प्राचीन विद्या सध्यां उगाच कोठें कोठें निसटता आधार धरून राहिल्या आहेत. आणखी थोड्याच काळानें प्राचीन इराण, मिसर वगैरे देशांतील विद्यांप्रमाणें त्यांचा चिरंतन अस्त होण्याचा सुमार दिसतो. याप्रमाणें चित्तास खिन्नता प्राप्त झाली असतां आमच्या सरकारची अनास्था व विद्वन्मंडळीचें विचित्र वर्तन पाहून आश्चर्य व उद्वेग हीं उत्पन्न होतात. सरकारची उपेक्षाबुद्धि तर आलीकडे हरएक प्रकरणीं दिसण्यांत येतेच, तेव्हां एकाच संबंधानें तिजबद्दल गाऱ्हाणें गाणें जरूर आहे असें नाहीं. पण आमच्या नूतन पंडितांची वरील तारीफ करावी तितकी थोडी. यांपैकीं बहुतेक तर केवळ अर्थसाधनाच्या खटपटींत चूर असतात, तेव्हां विद्येविषयीं व्यासंग पुढें चालवणारे अगोदर विरळाच. त्यांतून प्राचीन विद्येकडे यदाकदाचित् कोणाची नजर फिरलीच तर ती इंग्रेजी तऱ्हेनें फिरावयाची ! म्हणजे शास्त्रांचें अध्ययन करावयाचें तें त्यांचें यथार्थ ज्ञान होण्याकरतां नव्हे, तर 'पंडित' हें उपपद मिळावें, शास्त्रीबोवा यांचेवरून वेदशास्त्रांची परीक्षा घेण्याची योग्यता यावी, पुढें

( पुढें चालू. )

४. इंग्रेजी कवितेंत पाहिलें तरी बरचाच प्रकार आढळेल. तींत अत्युत्तम मानलेले जे शेक्स्पीयर व मिल्टन् यांचे ग्रंथ त्यांत सुद्धां शब्दालंकारास मान नाहीं असें नाहीं. आतां त्या भाषेंत संस्कृताप्रमाणें किंवा संस्कृतांतून मराठींत अंशतः आलेल्याप्रमाणें संधि व समास हे नाहींत व त्यामुळें यमक व अनुप्रास या दोहोंचीही घटना करण्यास तींत वरील दोहों भाषांप्रमाणें सोय नाहीं हें उघड आहे. तरी वरील शब्दालंकारांची जितपत योजना होण्यासारखी आहे तितपत त्यांचा तींत प्रचार आढळतो. ड्रायडन् व पोप यांचा तर यमकबद्ध छंदाविषयीं व अनुप्रासाविषयीं केवढा कटाक्ष होता तो त्यांच्या काव्यांवरून दृष्टीस पडतोच. तो आमच्या वाचकांपैकीं जे इंग्रेजी कविता वाचलेले असतील त्या सर्वांस माहीत असेलच. हीच गोष्ट इतर पुष्कळ कवींसही लागू आहे. इतर भाषांतील मोठमोठ्या कवींचाही प्रघात आमच्या वरील ह्मणण्यासच लागू पडेल अशी आह्मांस खात्री वाटते.

तर वरील दोन्ही प्रमाणांवरून पाहतां वरील शब्दालंकारांत कांहीं अंगभूत दोष आहे किंवा त्यांविषयीं आवड असणें हें अरसिकतेचेंच निश्चित दर्शक होय असें नाहीं, हें कोणाच्याही सहज लक्षांत येईल. जो प्रकार मोठमोठ्या सर्वमान्य कवींच्या काव्यांत आढळतो, व जो वस्तुतः दोषरूप मानणें शोभतच नाहीं, तो आमच्या महाराष्ट्रकवीचे ठायीं आढळल्यानेंच केवळ दूषणीय होतो हें ह्मणणें अर्थातच अत्यंत अयुक्त होय.

५. आतां येवढें मात्र खरें आहे कीं, प्रस्तुत आक्षेप मोरोपंताच्या संबंधानें पाहतां जरी दुर्बळ होय, तरी सामान्यतः त्यांतील कांहीं अंश ग्राह्य आहे. तो येणेंप्रमाणें. शब्दालंकार हे अर्थालंकारांहून अर्थात् कमी योग्यतेचे आहेत; कां कीं, पहिले केवळ कर्णास आल्हाद देणारे होत, पण दुसऱ्यांच्या ठायीं मनास चमत्कृत करण्याची शक्ति असते. तेव्हां सहृदय जो वाचक किंवा श्रोता त्याचें पहिल्यानें जितकें रंजन होईल त्याहून दुसऱ्यानें अधिक होणार आहे, व हा दुसरा आल्हाद पहिल्याहून अधिक वेळ टिकणाराही असतो हें सहृदयानुभवसिद्ध आहे. तर प्रकृत आक्षेपाचा ग्राह्य असा हा एक अंश होय. दुसरा असा कीं, सर्व राष्ट्रांत प्रायः आद्य कवींच्या ग्रंथांत शब्दालंकारापेक्षां अर्थालंकारावर विशेष भर

---

मार्गे प्रोफेसरी पटकावण्यास रस्ता खुला असावा, दहा दहा पानें युरोपीयमट्टादिकांनीं संक्रांतीच्या तिळादाखल दिलेलीं गोड गोड आशीर्वचनें सर्वांस फुशारकीनें दाखवतां यावीं, बेवळ्याच हेतूनें बिचाऱ्या कणादजैमिन्यादिकांचा परिचय करावयाचा व त्यांच्यावर लेखणी मरकटायाची! असो, भाग्य त्यांचें; 'भवितव्यता बलवती' ह्मणून त्यांनीं स्वस्थ बसावें, दुसरा उपाय नाहीं! तरी सरतेशेवटीं आमच्या नवीन मंडळीस वरील महापंडिताच्या संबंधानें येथें पुढील सूचना केल्यावांचून राहवत नाहीं, कीं अजूनही त्यांनीं प्राचीन शास्त्रकारांच्या कीर्तीचें रक्षण करण्याचा उद्योग केला असतां बराच होण्यासारखा आहे. पण तो करण्यास अर्थातच मूर्खत्वाचा अभिमान अगोदर सोडून देऊन अद्याप कोठें कोठें अवशिष्ट राहिलेल्या महापंडितांची यथावकाश वर्षानुवर्ष परिचर्या पतकरली पाहिजे!

असतो; व उत्तरोत्तर कवितेच्या ऱ्हासकाळीं दुसऱ्यापेक्षां पहिल्याचें प्राबल्य विशेष आढळण्यांत येतें. असें होण्याचें कारण काय हें मागें प्रसंगवशात् सांगितलेलेंच आहे.[1]

६. पण या दोहोंसंबंधानीं तरी प्रस्तुत आक्षेप मोरोपंतावर लागू पडतो काय? मुळींच नाहीं. शब्दालंकाराची योग्यता स्वतंत्रतः अर्थालंकाराहून कमी खरी; पण यावरून त्यास मुळींच योग्यता नाहीं असें होत नाहीं. स्त्रीच्या सौन्दर्याचा विचार कर्तव्य असतां मार्मिक जन शरीरलावण्यास सोन्यारुप्याच्या दागिन्यांहून ज्यास्त लेखतील हें निर्विवाद आहे, किंबहुना रुचिपरत्वेंकरून रोम शहरांतील जगद्विख्यात पुतळीच्याप्रमाणें शुद्ध मनोहर लावण्यासच चाहणारे गोवर्द्धन कवीसारखे रसिकवर्यही आढळतील;[2] पण यावरून सोनें व रुपें हीं मातीच्या मोलाचीं असें कोण ह्मणणार आहे? त्यांच्या दागिन्यांची शोभा कृत्रिम, यास्तव स्वभावसिद्ध लावण्यापुढें त्यांचें रमणीयत्व पृथक्त्वेंकरून पाहतां जरी विशेष मानतां येणार नाहीं, तरी जेथें दोहोंचा समागम होतो तेथें नेत्रांस विशेष आल्हाद झाल्यावांचून राहणार नाहीं, हें उघड आहे. तेव्हां याच न्यायानें पाहिलें असतां, यमक व प्रास यांची स्वतःसिद्ध योग्यता जरी कितीही मानली तरी जेथें मूळचा अर्थ सुंदर असून त्यास शब्दालंकारांचेंही साहित्य असतें तेथें तो त्याच्यामुळें विशेष खुलेल हें उघडच आहे. हें तर काय, पण जेथें वर सांगितल्याप्रमाणें सुंदर अर्थाचा व अनुप्रासयमकांचा यथास्थित योग झालेला असतो तेथें

प्रमदालोचनन्यस्तं मलीमसमिवांजनम् ॥[3]

या न्यायानें वरील शब्दालंकारांसही कांहीं अपूर्व शोभा प्राप्त होते. अथवा कालिदासानें 'कुमारसंभवां'त ( सर्ग १, श्लोक ४२. सं० ) जसें ह्मटलें आहे कीं,

अन्योन्यशोभाजननाद्बभूव
साधारणो भूषणभूष्यभावः ॥[4]

त्याप्रमाणें अर्थास अलंकारानें शोभा आली कीं अलंकारास अर्थानें आली याचाही वरील ठिकाणीं निर्णय करवत नाहीं. अशीं स्थळें वामन व रघुनाथपंडित यांच्या काव्यांत अनेक आहेत, व मोरोपंताच्या कवितेंत तर तीं पुष्कळच सांपडतील.

---

१. निबंधमाला अंक ४ था, कलम १० वें, पृष्ठें ४०-४१ पाहा.

२. व्हीनस् ह्मणून ग्रीक् व रोमन् लोकांची शृंगारदेवता होती. हिची एक जगत्प्रसिद्ध प्रतिमा रोम शहरीं आहे. हिच्या चबुथ्यावर वरील रसिकवराची पुढील आर्या खोदून लिहिली असतां समसमांचा योग होणारा आहेः—

रतरीतिवीतवसना प्रियेव शुद्धाऽपि वाङ्मुदे सरसा ।
अलसा सालङ्कृतिरपि न रोचते शालभञ्जीव ॥

३. "जसें काजळ हें मूळचें मलिन असतां तरुण स्त्रियांच्या डोळ्यांत पडल्यानें त्यास शोभा येते!"

४. "परस्परांची परस्परास शोभा प्राप्त झाल्यामुळें भूषणत्व व भूष्यत्व हे धर्म दोहोंस साधारण झाले!"

आतां वरील आक्षेपाचें दुसरें जें अंग, कीं शब्दालंकारांची रचना हें 'लोकांची बुद्धि मंद झाल्या'चें प्रमाण होय, याविषयीं विचार करायाचा. 'विविधज्ञानविस्तारां'तला मूळ लेख निबंधारंभीं दिलाच आहे; त्यावरून प्रस्तुत आक्षेपाचें पूर्ण स्वरूप वाचकांस कळेलच. या लेखांतील मतें जरी आलीकडील काळांत सर्वांस अभिमत असणारीं आहेत, व सकृद्दर्शनीं बहुतेकांस यथार्थही वाटतील, तरी अंमळ शोधक बुद्धीनें विचार केला असतां त्यांची असत्यता लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. एक तर सदरील लिहिणारानें लोकांच्या बुद्धिमांद्याविषयीं जें लिहिलें आहे तें मोरोपंताच्याच काळास अनुलक्षून लिहिलें आहे, कीं एकंदर सगळा अर्वाचीन काळ घ्यावयाचा हें त्यावरून स्पष्ट होत नाहीं. वाक्यांवरूनच नुसता अर्थ घेतला, तर एकंदर आलीकडील काळावर लिहिणाराचा कटाक्ष आहे असें वाटतें. पण पुढें जों पाहावें, तों मोरोपंतावरच टीकाकर्त्यांचा मुख्य रोंख आहे हें दृष्टीस पडतें. आतां कोणत्याही अर्थानें घेतलें तरी वरील बुद्धिमांद्याचा आक्षेप लागू पडत नाहीं. एकंदर अर्वाचीन काळ घेतला, तर सर्वच मराठी कवि येथून तेथून नादान असें ह्मणणें पदरांत येऊन त्यांच्यापैकीं कित्येकांची आलीकडील विद्वानांनींही जी प्रशंसा केली आहे ती मूर्खपणाची ठरणार, व ज्या राष्ट्रांत त्यांची आज शतकांचीं शतकें चहा होत आहे तेंही अप्रयोजकपणाच्या पायरीला पोंचणार ! आणि त्यांतून जेथें सारी कविमालिकाच महामूर्ख ठरली, तेथें तिजपैकीं एकालाच प्रमुखत्वेंकरून पुढें करण्यांत मोठेंसें हंशील नाहीं, व तसें करणें हें वाजवीही होत नाहीं. आणि वस्तुतः पाहिलें असतां प्राचीन संस्कृत कवितेची व अर्वाचीन महाराष्ट्रकवितेची जो सामान्यतः तुलना करील त्यास आलीकडील लोकांची बुद्धि मंदावली आहे असाच निश्चितपणें सिद्धांत करतां येईल असें आह्मांस वाटत नाहीं. रघुनाथपंडिताचें 'नलोपाख्यान' व मोरोपंताची 'केकावलि' हे ग्रंथ कोणत्याही संस्कृत काव्याशीं तोलले असतां त्यांस हलके ठरवणारा रसिक विरळाच सांपडेल असें वाटतें. बरें, दुसऱ्या तऱ्हेनें जर घेतलें, कीं बुद्धिमांद्याविषयींचा उल्लेख मोरोपंताशीं समकाल असणाऱ्या लोकांविषयींच समजायाचा, तर हें ह्मणणें तर वरच्याहूनही अयुक्तिक होय. कां कीं, पूर्वीं ह्मणजे ज्ञानदेवाच्या वेळेस किंवा श्रीधराच्या वेळेस महाराष्ट्रकविता उत्तम स्थितींत असून पुढें अमुक अमुक काळापासून तीस उतरती कळा लागली व अमुक काळीं तर ती अगदीं टेंकीला आली असें मत आजपर्यंत आह्मीं कोणाच्याही लेखांत पाहिलें नाहीं किंवा तोंडचेंही ऐकलें नाहीं. वरील उत्कर्षापकर्ष हे संस्कृत कवितेंत व इंग्रेजी कवितेंत स्पष्ट आढळतात. पण मराठींत तसा प्रकार बिलकुल आढळत नाहीं. तींतील कवि सामान्यतः कवित्वगुणांत सर्व एकसारखेच आहेत. महाराष्ट्रकवितेंतच हा विशेष कां आढळतो याचीं कारणें पाहूं गेलें असतां बरींच सांपडतील; पण तीं येथें विस्तारेंकरून देतां येत नाहींत. थोडक्यांत येथें इतकेंच सांगतों कीं, छापण्याची युक्ति निघाल्यापासून इंग्लंड् वगैरे देशांत ग्रंथकर्तृत्व हें अर्थप्राप्तीचें जसें साधन झालें, तसा प्रकार इकडे नसल्यामुळें ज्यास स्वाभाविक कवित्वस्फूर्ति तोच इकडे कवि होत गेला. पैशाच्या लालचीनें आजपर्यंत इंग्लंडांत जसे शेंकडों कवि होऊन गेले, व अद्यापही कोणास सामान्यतः वृत्तरचना करण्याचें कसब अंमळ साधलेंसें झालें की तो कवि बनून त्याचे ग्रंथ

छापून निघूं लागतात, तसा प्रकार इकडे अर्थातच अशक्य होता. तसेंच संस्कृत कविता जशी राजाच्या आश्रयानें व पंडितजनांच्या मान्यतेनें उदयास आली, तसाही प्रकार महाराष्ट्रकवितेंत मुळींच आढळत नाहीं. अगदी जुन्या मराठी कवींपासून तों अगदी आलीकडच्यापर्यंत कोणासही सरकारी दरबार माहीत नव्हतें, व पंडितांमध्येंही कदाचित् एकादोघांखेरीज बाकीच्यास मुळींच मान नव्हता. हें तर काय, पण बहुतेक मराठी कवि केवळ परमार्थपरायण व विरक्त होते, हें सर्वप्रसिद्धच आहे. तर याप्रमाणें दोहों तऱ्हांनी वरील बुद्धिमांद्यविषयक उल्लेख अयथार्थ होय हें लक्षात येईल.

७. आतां टीकाविषयक पूर्वोक्त लेखात प्रस्तुत संबंधाचा दोष सगळा मोरोपंतावरच न घालतां तत्कालीन पंडितमंडळावरही तो बराच लोटून दिला आहे. त्या काळीं 'विद्वज्ज-नांची अभिरुचिच तशी विलक्षण' असल्यामुळें प्रस्तुत महाराष्ट्रकवीसही तेंच वळण लागलें असा प्रस्तुत आक्षेपकाचा अभिप्राय आहे. आतां या म्हणण्यातही कितीसा तथ्यांश आहे याविषयीं जर शोधपूर्वक विचार केला, तर वरील उल्लेखाप्रमाणें इतही असजसा विचार करावा तसतसा पिच्छा पडूं लागेल. अर्वाचीन पंडितांची सामान्यतः कोणत्या तऱ्हेची काव्य-रुचि आढळते याविषयीं आम्हीं पूर्वी अनेक वेळा लिहिलेंच आहे;[1] तेव्हां येथें त्याविषयीं आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं. वरील प्रसंगोपात्त अभिप्रायावरून आमचें मत यासंबंधें वरील आक्षेपकाच्याहून निराळें नाहीं हें वाचकांच्या लक्षात असेलच. तेव्हां मोरोपंताची जी शब्दालंकाराविषयीं व 'दुर्बोध' शब्दाविषयीं आवड ती तत्कालीन विद्वज्जना-पासून त्यास कितपत लागली असेल याविषयीं काय ती वाटाघाट करावयाची.

अर्वाचीन गीर्वाण पांडित्याचा महाराष्ट्रकवितेशीं कितपत संबंध होता व त्याच्या योगानें तीस कितपत वळण लागलें असेल, याविषयीं ज्या कोणी वरील कवितेचें अंमळ शोधपूर्वक पर्यालोचन केलें असेल त्याचीही तेव्हांच खात्री होण्यासारखी आहे. एक तर महाराष्ट्रकवींपैकीं कितीकांच्या अंगीं विद्वत्ता वसत होती, याविषयीं पूर्वी अनेक वेळां आम्हीं प्रसंगवशात् उल्लेख केलेच आहेत.[2] त्यावरून सहज दिसून येईल कीं, मुसत्या व्याक-रणाचीही ज्यास पुरती ओळख नव्हती त्याची गणना विद्वज्जनांत कोठून होणार! महाराष्ट्र-कवींचें व पंडितजनांचें कितपत सख्य असे याविषयीं त्यांच्या चरित्रांत व ग्रंथांतही प्रसंग-वशात् लेख आढळतात. तुकाराम व नामदेव यांच्या ज्या कथा ऐकण्यांत व वाचण्यांत येतात त्यावरून ही गोष्ट स्पष्ट दिसते कीं, त्यास ब्राह्मणांकडून व विशेषतः पंडितांकडून पुष्कळ छळ व अवज्ञा सोसावी लागली. त्यांच्या ग्रंथांतही वरील संबंधाचे अनेक उल्लेख आढळतात.[3] ज्ञानदेव, एकनाथ व रामदास हे जरी ब्राह्मण होते व पुढें दैवकरच ते

---

१. अंक ३ रा, पृष्ठें २३-२५ व ३५ वा (? से०) पाहा. २. अंक ४ था, पृष्ठें ४१-४२ व अंक १० वा पृष्ठें ११७-११८ पाहा.

३ नामदेव भोळेभावानें व नम्रतापूर्वक म्हणतोः—

पंडित ब्राह्मण पुसतील अर्थ।
त्यांस मी अनाथ काय बोलों॥ इ०

( पुढें चालू. )

स्वदेशीयांस येवढें पूज्य होऊन बसले, तरी स्वतःच्या ह्यातींत त्यांचीही स्थिति पुष्कळ अंशीं बरच्यासारखीच असावी. अगदीं शेवटले जे मोरोपंत व रामजोशी यांच्यापर्यंत वरील परंपरा चालत आलेली दृष्टीस पडते. फार काय, पण ह्लींच्या काळीं जरी शास्त्रविद्या प्रायः अस्तंगतच झाली आहे, तरी तिचें जें क्वचित् वास्तव्य दिसतें त्यावरून पूर्वींच्या काळाचें सहज अनुमान करतां येतें. सध्यांही जर पंडित ह्मणून मोडणाऱ्या लोकांच्या ठायीं महाराष्ट्रभाषेची, तींतील कवितेची, व हरदासांची वगैरे अवज्ञा दृष्टीस पडते, तर पूर्वींचे जे भाष्यांत अध्ययन केलेले व प्रतिगदाधर बनलेले सभाधुरंधर *महापंडित त्यांच्यापुढें बिचाऱ्या प्राकृत कवींचा तो काय पाड असणार! कालिदासादिकांसही 'रंडागीतानि काव्यानि' ह्मणून ज्यांनीं धुडकावून द्यावें, त्यांच्यापुढें आमचे अज्ञान शूद्रकवि व अपंडित ब्राह्मणकवि यांनीं किती शेखी मिरवावी!

पण संस्कृत व महाराष्ट्रकवितेचें जो एकंदर स्वरूप लक्षांत आणील, व दोहोंची परस्पर तुलना करील, त्यास तर वरील उल्लेख किती यथार्थ होय, हें तेव्हांच कळणारें आहे. ही तुलना ह्मणजे एक मोठा स्वतंत्र विषयच होय, व त्याच्या निरूपणांत अनेक अवांतर गोष्टींचा विचार करावा लागेल. तरी वरील निरूपणाचा एकंदर रोंख थोडक्यांत सांगतां येण्यासारखा आहे; तो हा कीं, संस्कृत कवितेचा झोंक सामान्यतः पाहतां सगळा ऐहिक विषयांकडे आहे, व मराठी कवितेचा परमार्थाकडे आहे. युरोपांतील संस्कृत भाषा ज्या ग्रीक् व लॅटिन् त्यांत किंवा अर्वाचीन इंग्रेजी वगैरे भाषांत जें कवितेचें स्वरूप दृष्टीस पडतें त्याच रूपानें कालिदासादिकांचे ठायीं या देशांत वाग्देवी अवतीर्ण झाली. ह्मणजे ऐहिक व्यवहारांत नानाविध प्रसंगीं ज्या वृत्ति मनांत उभ्या राहतात त्यांचेंच वर्णन वरील कवितेंत आढळतें. तेव्हां ती अर्थातच सामान्यतः शृंगारवीरादि नवरसात्मक व बाह्यसृष्टिवर्णनपर अशी आहे. पण मराठी कवितेचा रोंख अगदीं उलटा. संस्कृत कवींच्याप्रमाणें वाचकांचें किंवा श्रोत्यांचें रंजन करणें येवढाच महाराष्ट्रकवींचा उद्देश नव्हता; तर लोकांचीं मनें प्रवृत्तिमार्गाकडून निघून निवृत्तिमार्गाकडे लागावीं, हेंच त्यांचें मुख्य धोरण होतें. त्यांच्या काव्यांत नवरसांचें वास्तव्य नाहीं असें नाहीं, पण ते सर्व भक्ति व वैराग्य यांच्या अंगभूत आहेत. संस्कृतांत ज्याप्रमाणें कोणी कामी§ नवमेघाच्या दर्शनानें सोत्कंठ होत्साता त्याज-

---

* तुकाराम वरीलच अभिप्राय वदतो. पण निराळ्या बाण्यानेंः—

बरा कुणबी केलों। नाहीं तरी दंभेंचि असतों मेलों ॥१॥
भलें केलें देवराया। नाचे तुका लागे पायां ॥२॥
विद्या असती कांहीं। तरी पडतों अपायीं ॥३॥
सेवा चुकतों संतांची। नागवण हे फुकाची ॥४॥
गर्वं होता ताठा। जातों यमपंथें वाटा ॥५॥
तुका ह्मणे थोरपणें। नरक होती अभिमानें ॥६॥

§ हा उल्लेख 'कालिदासाच्या 'मेघदूता संबंधीं आहे. 'सम्पादक'

पाशीं आपलें सर्व हितगुज वदतो किंवा राजकन्येचें धर्षण केल्याबद्दल कोणास वधशूलाकडे चालवलें असतां आपल्या हृदयंगमेच्या लीलांचें स्मरणपूर्वक प्रेमभरानें तों† वर्णन करतो, किंवा इंग्रेजांत कोणी रंगेल्यानें‡ आपल्या प्रियकरणीच्या* केसांचा झुबका चोरून कातरला असतां त्यावरून प्रेमकलह माजून तो कलहच§ काव्यास विषय होतो, किंवा कोणा कवींच्या दौतींतील शाई सूर्य पिऊन गेला असतां कविरायाची तार सूर्याशींच बोलायाची लागते,— तसा प्रकार मराठी कवितेचा नाहीं. स्फुट विषयांवर पद्यरचना केलेली अगोदर तींत थोडीच सांपडेल, आणि जी कांहीं सांपडेल तिचें धोरण एकंदर कवितेसारखेंच बहुधा आढळेल. सारांश, संस्कृत व मराठी कवितेंत इतकेंच अंतर आहे कीं, पाहिलीमध्यें नवरसांचें जसें प्रसंगोपात्त मिश्रण सामान्यतः आढळतें, त्याप्रमाणेंच शांत व भक्ति या रसांचेंही क्वचित् आढळतें; त्यांच्याकडे प्राधान्य मुळींच नाहीं. पण मराठी कवितेंत पाहावें तों वरील रसच मुख्य असून इतरांचें मिश्रण असलेंच तर अप्रधानत्वेंकरून असतें. तिचे मुख्य विषय ह्मटले ह्मणजे वैराग्य व अध्यात्म हे होत, तेव्हां यांस अनुसरूनच अर्थात् तींतील रससंपत्ति होय.

तर वरील विरोधावरून हें सहजच लक्षांत येईल कीं, जर संस्कृत कवितेचें व महाराष्ट्र-कवितेचें स्वरूप हीं परस्परांहून इतकीं भिन्न आहेत; तर एकीचें वळण दुसरीस लागलें हें ह्मणणें मुळींच शोभत नाहीं. याखेरीज दुसरी हीही गोष्ट शोधक व मार्मिक जनांच्या ध्यानांत येण्यासारखी आहे कीं, इटालियन्, फ्रेंच्, इंग्रेजी वगैरे अर्वाचीन भाषांतली कविता ही जशी प्राचीन ग्रीक् व लॅटिन् कवितेच्या धोरणावर चालू झाली, तसा प्रकार महाराष्ट्रकवितेचा बिलकुल दिसत नाहीं. अगदीं अव्वलपासून तों अखेरपर्यंत कोणत्याही मराठी कवीस 'रघुकिराता'दि पंडितमान्य काव्यांची बिलकुल ओळख होतीशी सुद्धां दिसत नाहीं. नामदेव, तुकाराम यांची गोष्ट तर बोलायालाच नको, पण पंडितमंडळींत बरेच मोडण्यासारखे जे वामन, मोरोपंत, रामजोशी वगैरे त्यांच्या ग्रंथांतही कालिदासादिकांचा मागमूसही नजरेस येत नाहीं. संस्कृत कवितेच्या धर्तीवर जुनें मराठी काव्य ह्मटलें ह्मणजे रघुनाथपंडिताचें नलोपाख्यान'च एक होय. त्याची रचना श्रीहर्षांच्या 'नैषधा'च्या नमुन्यावर केली आहे असें कवीनेंच सरतेशेवटीं सांगितलें आहे.[1] पण याखेरीज बाकीच्या कोण-

---

† हा उल्लेख काश्मीरनिवासी 'बिह्लण' कवीच्या 'चौरपंचाशिका' काव्याबद्दल आहे. 'सं०'

‡ Willaim, 4th Baron Peter. 'सम्पादक'

* Miss Arabela Fermor. 'सम्पादक'

§ सदर हकीकत John Caryll नामक मित्राकडून कळल्यावर त्याच्याच सूचनेवरून अलेक्झांडर् पोपनें रचलेल्या 'The Rape of the Lock' या कवितेसंबंधीं हा उल्लेख आहे. 'सम्पादक'

१. पुढील श्लोक परस्परांशीं ताडून पाहिले असतां वरील उल्लेखाचा प्रत्यय येईल:—
कोणी वाणिग्जन विकी तुळितां तराजे। कस्तूरिका तिजसर्वे अळिमी विराजे।
दोन्ही समान निरखी विकणार देतो। घेणार तो न समजोनि उगाच घेतो॥

( पुढें चालू. )

च्याही महाराष्ट्रकाव्यांत जुन्या कवींची पद्धति कोणत्याही संबंधानें बिलकुल दृष्टीस पडत नाहीं. प्रस्तुत कवीचेंच उदाहरण पाहा. गेल्या शतकांत पेशव्यांच्या अंमलांत प्राचीन पांडित्याचें जें सर्वत्र पुनरुज्जीवन झालें त्याच्या ऐन भरांत तो हयात होता, तेव्हां कमलांनीं चोहोंकडे फुलून गेलेल्या सरोवरांत विहार करणाऱ्या भ्रमरास परागांच्या छटा जशा सहज लागून जातात त्याप्रमाणें केवळ प्रसंगोपात्त संसर्गानेंही आमच्या प्राकृत कवीवर पांडित्याची छाया पडण्याचा वस्तुतः पुष्कळ संभव होता. ह्मणजे प्राचीन संस्कृत कवींचें उपमाचातुर्य, पदलालित्य, उदात्तता वगैरे गुण, किंवा आलीकडच्यांचे पदार्थक्लिष्टत्वादि कृत्रिम प्रकार हे त्यास सहज लागावे. पण त्याच्या काव्यांत पाहूं गेलें असतां वरील दोन्ही प्रकारांपैकीं कांहींच नजरेस येत नाहीं. त्याची तऱ्हा मुळींच वेगळी. ती इतर मराठी कवींचे ठायीं जशी आढळते तशीच त्याच्याही कवितेंत आढळते. तिचें मूळ वर ज्याविषयीं ऊहापोह केला आहे त्याहून फार निराळें आहे. तें कोणतें याविषयीं पुढें प्रसंगोपात्त विवेचन करायाचें आहे त्यावरून कळून येईल.

---

ज्यांच्या हृत्कासारीं होय गुणस्नेहबिंदुही फार, ।
सारज्ञ, असूयोज्झित, त्यांला माझा असो नमस्कार. ॥
—मंत्ररामायण २,—मोरोपंत.

अंक ५२—मोरोपंताची कविता—

१. प्रस्तुत विषयावरील गेल्या तीन अंकांत मोरोपंतावर येणाऱ्या कित्येक आक्षेपांविषयीं विचार केला. आतां बाकीच्यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं.

२. प्रस्तुत कवीविषयीं आलीकडील पंडितांची एक मोठी समजूत अशी होऊन गेली आहे कीं, त्याची कविता ह्मणजे पराकाष्ठेची कृत्रिम. जो पाहिजे तो प्रकार तींत पाहून घ्यावा. जसें स्वैरिणीचें पाऊल उजू ह्मणून चुकूनही पडायाचेंच नाहीं, त्याप्रमाणेंच या कवीच्या वाग्देवतेचीही पद्धति होय. श्लेष, कोड्या, कूटें, शब्दचित्र, लांब व बिकट समास यांतच कवित्वाचें सर्वस्व आहे असें समजून वरील गौडबंगाल रचण्यांत त्यानें आपला काळ

---

(सममेण-मदैर्यदापणे तुलयन् सौरभलोभनिश्चलम् ।
पणिता न जनारवैरवैदपि गुञ्जन्तमलिं मलीमसम् ॥ [नैषधीयचरिते २,९२. सं०] )
उडत होते ख-ग वायसादि जाणा । तयां भासे तें हंस तो ससाणा ।
नभा मानुनि कीं नि-कष-पाषाणा । स्वर्ण-रेखा तें तेज मनीं आणा ॥
(तनुदीधितिधारया रयाद्गतया लोकविलोकनामसौ ।
छदहेम कषन्निवालसत् कषपाषाणनिभे नभस्तले ॥ [नैषधीयचरिते २,६९. सं०] )

घालवला. या सिद्धांताच्या प्रत्यापनार्थ एका एतद्देशीय व एका पाश्चात्य पंडिताचे उल्लेख येथें घेतों. त्यांपैकीं पहिला हा:—

"With authors who mean only one thing, and whose sole object is to give an expression to that meaning without casting any side-glances, there is no difficulty. But in works of art of our national poetry, like the one under consideration, it may be counted upon as a rule that the author did intend to be variously understood. This capacity of being diversely rendered is deemed to be a great merit, and authors take very considerable pains to succeed in this line."

"जे ग्रंथकार (कवि) एकमार्गी असतात, ह्मणजे मनांत एकच अर्थ धरून तो सरळ रीतीनें व्यक्त करायाचा इतकेंच ज्यांस माहीत, जे इकडे तिकडे कधींही वांकडी नजर करायाचे नाहींत, त्यांच्याविषयीं मुळींच पंचाईत नसते. पण आमच्या देशांतील कवींचीं प्रस्तुतच्यासारखीं ('केकावली'सारखीं) जीं कृत्रिम काव्यें आहेत तीं वाचतांना हें आपलें नेहेमी लक्षांत ठेवावें कीं, कवीचा उद्देश केवळ एकच अर्थ आपल्या काव्यांतून निष्पन्न व्हावा असा नसायचाच, तर त्यांतून अनेक अर्थ निघावे अशाच बुद्धीनें तीं रचलेलीं! हा अनेकार्थसंभव ह्मणजे कवितेचा मोठा गुण मानला असून एतद्देशीय कवींनीं तो साधण्याकरतां मोठी खटपट केलेली आढळते."

दुसरा उल्लेख येणेंप्रमाणें—

"Moropant has undoubtedly great command of the Marathi language, which he sometimes prostitutes by indulging in such poetical conceits as acrostics, and by writing without the use of the labial letters, introducing the conjunction परंतु (but) into every line, and by commencing each line of his verse by the last word of the preceding line."

" महाराष्ट्रभाषा ही मोरोपंताची केवळ अंकित होऊन राहिली होती हें खरें आहे; पण तिचा त्यानें कोठें कोठें अपव्यय केलेला आढळतो. तो असा कीं, कोठें नियमित अक्षरें साधलेलीं, कोठें निरोष्ठ रचना केलेली, कोठें प्रत्येक पद्यांत 'परंतु' घालून दिलेलें, कोठें पूर्वपद्यांतींचा वर्ण पुढील पद्याच्या आरंभीं योजलेला,—इत्यादि प्रकार त्याच्या कवितेंत आढळतात. "

वरच्या दोहोंपैकीं पहिला उतारा 'एज्युकेशनल् रेकर्ड' नामक इंग्रजी शालापत्रकांतील होय. हा सन १८६७ सालाच्या नोवेंबर महिन्याच्या अंकांतून घेतला आहे. या सुमारास रा. ब. महादेव गोविंद रानडे हे ॲक्टिंग् मराठी ट्रान्स्लेटर् असल्यामुळें कै. परशुरामपंत तात्या गोडबोले यांच्या 'केकादर्शा'वर त्यांनीं सरकारी नात्यानें आपला अभिप्राय प्रगट केला. तो कवितामर्मज्ञांच्या अवलोकनांत यावा ह्मणून त्या वेळचे डायरेक्टर् मे॰ ग्रँट् साहेब यांनीं वरील पत्रकाच्या कर्त्यांकडे पाठवल्यावरून त्यानें तो सदरील अंकीं आपल्या वाचकांस सादर केला. तर वरील वाक्यांत सामान्यतः महाराष्ट्रकवींविषयीं व त्यांतून विशेषेंकरून

मोरोपंताविषयीं जें मत दाखल केलें आहे तें वरील नामांकित विद्वानाचें होय. दुसरा उतारा माजी डॉ० विल्सन्, इकडील प्रख्यात मिशनरी, यांच्या लेखांतला होय. मोलस्वर्थकृत कोशाच्या आरंभीं साहेबमजकुरांनीं मराठी भाषेवर व तींतील ग्रंथांवर लिहिलेला एक निबंध आहे, त्यांत प्रस्तुत महाराष्ट्रकवींच्या संबंधानें वरील मजकूर आला आहे. असो; आतां वरील दोन्ही मतांच्या यथार्थत्वाविषयीं विचार करूं.

पहिलें मत रा. ब. रानडे यांचें. रावबहादुरांचा महाराष्ट्रकवितेवर कितपत व्यासंग आहे हें आह्मांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी निदान शोधकपणा व मार्मिकपणा हे गुण त्यांच्या अंगीं पूर्ण असून त्यांचा अभिप्राय, लिहिण्यांत किंबहुना बोलण्यांतही. कधीं लेखापेचा बाहेर पडायाचा नाहीं, तर तो नेहेमी यथान्याय व पोक्त असाच असायाचा, याविषयीं पहिल्यापासून प्रसिद्धि आहे. तेव्हां या ख्यातीवरून पाहतां वर त्यांनीं एकंदर महाराष्ट्रकवींविषयीं व मोरोपंताविषयीं जो येवढा निक्षून अभिप्राय दिला आहे त्याचा आह्मांस अत्यंत विस्मय होतो. त्यांच्यासारख्या बड्या विद्वानाच्या लेखावर आक्षेप घेणें हें कांहीं अंशीं मोठें साहसच होय; पण स्वपक्षाची चांगली बळकटी पाहूनच या साहसास आह्मीं प्रवृत्त होत आहों. आतां इतकेंही करून आमची कोटि जर त्यांच्यावर लागू झाली नाहीं व आमचाच पक्ष खोटा ठरला, तर आह्मी आपले आक्षेप माघारीं घेऊं.

प्रस्तुत आक्षेप दोन प्रकारचा आहे. एक एतद्देशीय कवींच्या संबंधानें व एक मोरोपंताच्या संबंधानें. आतां पहिल्याविषयीं विचार करतां 'एतद्देशीय' या शब्दानें आमचे महाराष्ट्रकवि जर घेतले तर त्यांजवर तर वरील 'कटाक्षप्रेक्षणा'चा आक्षेप बहुधां मुळींच लागू पडत नाहीं. ज्ञानोबा, तुकोबा, एकनाथ; नामदेव, महीपति, श्रीधर, यांची तर श्लेषाची गोष्टच नको. यांच्या वाग्वधूंचा नेत्रकटाक्ष झटला ह्मणजे अरुंधतीलोपामुद्रादि महासत्यां( तीं ? सं० ) च्या कटाक्षाप्रमाणें दुर्लभ ! 'ब्रह्मानंदीं लागली टाळी ' अशी अवस्था होऊन ज्यास देहभानही पुरतें नसायाचें, त्यांस वरील चाळे करण्यास कोठून फावणार ! गरुडपक्षी जसा अस्मानीं राहून सूर्यावर एक टक लावतो, त्याप्रमाणें परब्रह्मरूपावर ज्यांचें लक्ष्य निश्चळ होऊन राहिलेलें व केवळ अंतःप्रेरणेनें ज्यांचें वनपक्ष्यांप्रमाणें सुस्वर निघणारे त्यांच्या वाणींत श्लेषास कोठून जागा मिळणार ! तेव्हां या साऱ्या भाबड्या मंडळीस तर नाशबितीवरून रावबहादुर एकदम खुले करून देतीलच. आतां राहतांपैकीं मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत, रघुनाथपंडित व रामजोशी ही जराशी चवचाल मंडळी राहिली. यांस संस्कृताचें विशेष वारें लागून त्यांतील कांहीं चमत्कार त्यांनीं आपल्या काव्यांत उतरून देऊन महाराष्ट्रकवितेस विशेष प्रगल्भता आणली. तेव्हां वरील आरोप त्यांच्यावर ठरण्याचा अधिक संभव आहे. पण यांच्याही ग्रंथांत पाहूं जातां यांस धरायास फारसें सांपडत नाहीं. पहिल्या दोघांनीं श्लेषप्रयोग केलेला तर आमच्या आठवणींत एकही नाहीं; तिसऱ्याविषयीं पुढील कलमांत पृथक् विचार करायाचाच आहे; आणि शेवटल्या दोघांविषयीं पाहिलें तर पहि-

त्याच्या 'नलोपाख्यानांत' त आठ दहा ठिकाणीं श्लेषरचना आहे, व जोशीबोवांच्या लावण्यांपैकीं एक छेकापन्हुति मात्र श्लिष्ट आहे. * हा महाराष्ट्रकवींचा प्रकार झाला.

'एतद्देशीय' या शब्दानें संस्कृत कवि जर घेतले, तर गीर्वाणवाणीचें लावण्य अपार असल्यामुळें आणि शब्दप्राचुर्यास्तव व समासरचनेस्तव श्लेषघटनेची तींत अतिशयित सुलभता असल्यामुळें मधुर कटाक्षांची तींत वृष्टि आहे हें खरें; पण तींतही जो ग्रंथ हातीं घ्यावा त्याच्या पृष्ठोपृष्ठीं वरील सडा सांपडेल असें नाहीं. वरील शिडकाव ज्यांत मुळींच नजरेस येणार नाहीं, किंवा आलाच तर कोठें एकादा दुसरा शिंतोडा, बाकी सर्व पृष्ठें धुतल्या मोत्यांसारखीं स्वच्छ, अशीं काव्यें संस्कृतांत पुष्कळ आहेत हें संस्कृतज्ञांस सांगायाला नकोच. त्याप्रमाणेंच वरील प्रकाराचें प्राबल्य जसजसें आलीकडे येऊं लागावें तसतसें विशेष आढळतें हेंही अनेक वेळां पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. तेव्हां बादविषयक शब्दाचा वरील अर्थ घेऊनही निर्वाह लागणार नाहीं. आतां प्रस्तुत आक्षेपकास दोन्ही अर्थ विवक्षित असून आमच्या देशांतल्या एकंदर कवितेचें स्वरूप जर वरील इंग्रेजी वाक्यांत सांगितलें असेल, तर इकडूनही कोणती अडचण येणार आहे ती उघडच आहे. जो आक्षेप एकंदर संस्कृत कवितेवर अंशतः मात्र लागू पडतो, व मराठी कवितेवर तर बहुधा मुळींच लागू पडत नाहीं, तो दोघींचें एकीकरण केल्यानें विशेष दृढ होईल असें नाहीं हें स्पष्टच आहे. शिवाय संस्कृत भाषेवरून जरी मराठी भाषा निघाली, तरी संस्कृत कवितेंत व महाराष्ट्र-

---

१. रामजोशाचा 'छंदोमंजरी' म्हणून एक छंदःशास्त्रविषयक ग्रंथ आहे. यांत त्या त्या वृत्ताचें नांव शेवटीं श्लेषानें आणून त्याच वृत्तांत पद्याची रचना कालिदासाच्या 'श्रुतबोधा' प्रमाणें केली आहे. तसेंच वामनानें भर्तृहरीच्या शतकांचें भाषांतर केलें आहे, त्यांतही क्वचित् श्लेष आलेले आहेत. पण या दोहोंनीं वरील उल्लेखास बाध येणार नाहीं हें उघडच आहे. 'छेकापन्हुति'* म्हणजे काय हें साहित्यशास्त्रज्ञांस सांगायास नकोच. वरील लावणी किती बहारीची आहे, हें ती वाचली असतां मार्मिकांस कळणारच आहे; शिवाय तिच्या चित्तमोहकत्वाचें दुसरेंही अशांपाशीं एक चमत्कारिक प्रमाण आहे. अकरा वर्षांपूर्वीं पुण्यांत नातूंच्या एका घराला रात्रीं आग लागली होती, त्याच वेळेस जवळच पन्हाळकर गोसावी यांचें कीर्तन चालू असून त्यांनीं वरील छेकापन्हुति या समयास काढली होती. बोवांची म्हणण्याची रीत जोशीबोवांच्या अस्सल थाटणीची मोठी चटकदार असल्यामुळें मंडळी इतकी गर्क होऊन गेली होती कीं, सगळें कीर्तन आटपून विडा खिरापत होऊन खुशालपणें लोक जों बाहेर पडतात तों आगीचा डोंब त्यांच्या दृष्टीस पडला!!

१. अंक ४७ वा, पृष्ठ ७८५ पाहा.

* अपह्नुतिः—व्याख्याः—प्रकृतं यन्निषिध्यान्यत्साध्यते सात्वपह्नुतिः ।

( उपमेयमसत्यं कृत्वा उपमानं सत्यतया यत्स्थाप्यते सापह्नुतिः । )

या अलंकारांत एकाद्या पदार्थाचा खरा अंगभूत गुण नाकारून भलत्याच पदार्थाचा गुण त्याच्यावर लादण्यांत येतो.

उदाहरणार्थः—न हें नभोमंडल वारिराशी । न तारका फेंसचि हा तयासी ॥ इ०

छेकापह्नुति—छेकापह्नुतिरन्यस्य शङ्कातस्तस्य निह्नवे ।

प्रजल्पन्मत्पदे लग्नः कान्तः किं न हि नूपुरः ॥ चन्द्रालोक ५।२७.

'सम्पादक'

कवितेंत किती अंतर आहे हें नुकतेंच एका निबंधांत आह्मी दाखवलेंच आहे.[1] राजाच्या मंदिरांत व ऋषीच्या आश्रमांत जितका भेद, किंवा उपवनांत व वनांत जितका भेद, तितकाच वरील दोन्ही कवितांमध्यें आहे. तेव्हां दोहोंविषयीं साधारणतः कोणतेंही विधान करणें उचित नव्हे.

आतां मोरोपंतास स्वत: वरील आक्षेप कितपत लागू पडतो हें पाहायाचें. याविषयीं पुढें पुरतेपणीं विवेचन करायाचेंच आहे. सध्यां येवढें सांगतों ह्मणजे बस आहे कीं, आमच्या देशाच्या संबंधानें मोठमोठ्या विद्वानांचे ठायींही जे कित्येक भ्रम आज वर्षानुवर्षे नांदताहेत त्यांपैकींच हाही एक होय. उदाहरणार्थ प्रस्तुत ग्रंथ 'केकावलि' हाच पहा. याबर अभिप्राय देण्यापूर्वी दादोबांची 'यशोदापांडुरंगी' टीका, तिजवर 'ज्ञानप्रसारकां'त व 'इंदुप्रकाशा'त आलेली चर्चा, व अभिप्राय देण्याकरतां हातीं घेतलेला 'केकादर्श' हीं सर्व पुस्तकें रावबहादुरांनीं अगोदर वाचलीं असें त्यांनीं सदरील 'रिपोर्टा'च्या आरंभीं कळवलें आहे. पण याप्रमाणें चारदां प्रस्तुत काव्याचें पर्यालोचन झालें असतां त्याविषयीं त्यांचा अभिप्राय वर दाखल केल्याप्रमाणें पडला. तो हा कीं, हें काव्य कृत्रिम होय, यास्तव आमच्या कवीनें आपल्या राण्याच्या अभिरुचीस अनुसरून जेथें जेथें दुहेरी अर्थ आणण्याची तजवीज केली असेल तेथें तेथें दोन्ही अर्थ जे सांगायाचे ते 'केकादर्श' कारानें सांगितले नाहींत. या दुटप्पी अर्थाविषयीं रावबहादुरांचा फार आग्रह दिसतो. असा अर्थ 'केकावलीं'त अवश्य असलाच पाहिजे, याविषयीं त्यांची पक्की खात्री असून रा० परशुरामपंत यांनीं तो दिला नाहीं हा त्यांच्या ग्रंथाविरुद्ध त्यांचा काय तो मोठा मुद्दा आहे. या महादोषास्तव 'केकादर्शा'ची योग्यता फार कमी झाली असल्यामुळें तो पुढील आवृत्तींत काढून टाकण्याविषयींही शेवटीं ग्रंथकर्त्यास शिफारस केली आहे.

आतां या अर्थबाहुल्याच्या संबंधानें प्रथमत: ही गोष्ट वाचकांस कळवणें जरूर आहे कीं, 'केकावलीं'त मोरोपंताविषयींच्या सामान्य प्रसिद्धीप्रमाणें अनेक अर्थ जर खरोखरच निघण्यासारखे असते, तर रा० परशुरामपंत हे ते दिल्याविना राहते असें आह्मांस वाटत नाहीं. या पंडिताचा सारा व्यासंग काय तो महाराष्ट्रकवितेवर होता हें सर्वांस माहीत आहेच. मराठी कविता वाचणें, लिहिणें, ऐकणें, शोधणें, छापवणें यांतच त्यांचा बहुतेक काळ गेला असल्यामुळें प्रस्तुत विषय हा केवळ त्यांचाच होऊन जसा काय राहिला होता. त्यांतून परशुरामपंत तात्या हे जर जुन्याच हरदासांसारखे केवळ असून अर्वाचीन पद्धतीविषयीं अनभिज्ञ असते, ह्मणजे एकाद्या ग्रंथाची आवृत्ति काढणें आहे तर तींत काय काय असणें अवश्य आहे हें जर त्यांस माहीत नसतें, तर एक निराळी गोष्ट होती. पण या कसबांत तर ते पहिल्यापासून वाकबगार; संस्कृत नाटकांचीं भाषांतरें, 'नवनीत', वगैरे अनेक ग्रंथ त्यांनीं स्वतः तयार केले असून शिवाय जेथून नवे ग्रंथ पसार व्हावयाचे तेथली सर्व घडामोड नेहेमी त्यांच्या नजरेखालीं; मग इतकें असून 'केकावली'सारख्या शतशः वाचलेल्या ग्रंथावर व्याख्यान करतांना त्यांच्या हातून वर सांगितल्यासारखी मोठी चूक

१ अंक ४७ वा, पृष्ठें ८२३-८२४ पाहा.

होईल काय ? आणखी दुसरें हेंही लक्षांत आणलें पाहिजे कीं, वरील गृहस्थ हे आलीकडील पद्धतींत जरी वागलेले होते तरी कालमानाप्रमाणें त्यांच्या मनावरचा संस्कार जुन्या पद्धतीचाच होता; यास्तव पंतांच्या काव्यांत अर्थांतराचा संभव जर लेशमात्रही असता तर तो त्यांनीं मोठ्या आनंदानें व धन्यतेनें प्रगट केला असता. आमची आलीकडील मंडळी एकचोरणी असल्यामुळें, व त्यांच्या नव्या अभिरुचीस अनुसरून केलेल्या महाकाव्यांत दोन दोन तीन तीन अर्थ तर कोठचे, पण कोठें कोठें एका अर्थासही पंचाईत असल्यामुळें, त्यांची दृष्टि अर्थांतरावर न पोंचली तर हें संभवनीय आहे; पण वरील पंडितासारख्या जुन्या अभिरुचीच्या व्याख्याकाराचे ठायीं वरील श्लेषानभिज्ञत्व किंवा श्लेषविमुखता मुळींच संभवत नाहीं. मल्लिनाथासारख्यांनीं 'नैषधा' वर टीका केली आणि येथूनतेथून एकही श्लेष त्यांनीं उलगडला नाहीं, किंवा 'राघवपांडवीय' काव्यावर टीका लिहून एक रामायणपर अर्थ मात्र टीकाकारानें लावला व दुसरा भारतपर अर्थ द्यावयास तो मुळींच विसरला, हें जितकें संभवदुक्तिक, तितकेंच प्रस्तुत महाराष्ट्रटीकाकाराचें प्रस्तुत महाराष्ट्रकवीच्या संबंधाचें विस्मरण होय. त्यांतून रावबहादुरांनीं आपल्या मताच्या पुष्ट्यर्थ 'केकावली'तील कांहीं स्थळांचा नुसता निर्देश जरी केला असता, कीं या या ठिकाणीं दोन अर्थ स्पष्ट असतां रा० गोडबोले यांनीं ते दिले नाहींत, तर टीकाकारावरील आरोपाची शाबिती झाली असती. पण हें ज्यापक्षीं त्यांनीं केलें नाहीं, त्यापक्षीं आपल्या वृद्ध पंडिताची योग्यता नीटशी मनांत न आणतां केवळ वरिष्ठपणाच्या नात्यावर जाऊन त्यांनीं कांहीं तरी अभिप्राय झोंकून दिला असें ह्मणणें भाग आहे !

ही टीकेची गोष्ट झाली. आतां मूळ काव्याविषयीं जर विचार केला तर त्यावर तरी 'कृत्रिम'त्वाचा आरोप त्यांनीं कोणत्या आधारावरून केला आहे, हेंही बरोबर समजत नाहीं. मॉनियर् विल्यम्स् वगैरे कांहीं अर्वाचीन संस्कृतज्ञ पंडितांनीं कालिदासादिकांच्या कवितेसही Artificial Poems ( कृत्रिम काव्यें ) या सदराखालीं ओढलें आहे, तशाच कांहीं रीतीनें 'केकावली'चेंही कृत्रिमत्व रावबहादुरांनीं स्थापित केलें असेल, तर आमचें कांहीं ह्मणणें नाहीं. कां कीं, छंदोभंगाचा, व व्याकरणभंगाचा अभाव, सुंदर रचना, अलंकारांची ठाकठिकीनें योजना, ही सर्व जर 'कृत्रिम'त्वाचीं अंगें ठरतील तर पृथ्वीवरील सर्व भाषांतील हजारों जगन्मान्य होऊन राहिलेलीं सारीं मोठमोठीं काव्येंही याच वर्गांत येणार. मग या वर्गांतच आमच्या कवीच्या 'केकावली'ला कोनाकोपऱ्यांतही जरी थोडीशी जागा मिळाली तरी कांहीं हरकत नाहीं. शब्दरचनेवरून जर प्रस्तुत काव्यास वरील विशेषण मिळालें असेल ह्मणावें, तर पंतांनीं याच काव्यांत कांहीं विशेष शब्दचमत्कार केले आहेत असें नाहीं. त्यांच्या काव्यांचें उथळ वरवर ज्यानें अवलोकन केलें असेल त्यास सुद्धां सहज कळून येणार आहे कीं, या काव्यांत प्रस्तुत कवीच्या वाग्वधूचें स्वरूप जें प्रगट झालें आहे, तें,

लज्जाव्यालोलदृष्टी स्मितरुचिरमुखी भ्रूयुगीं नृत्य नर्में
व्याहारी कोमलांगी अभिनव मिरवे घर्मरोमांच वर्में ।

आशा शृंगारवेषाचें नसून उलटें एकाद्या व्रतस्थ राजस्त्रियेप्रमाणें,

कृताभ्यङ्गस्नाना कनकमणिभूषाविरहिता

विराजे सिंदूरें धवलवसनें भूपवनिता ।

असेंच आहे. प्रास तर प्रस्तुत काव्यांत प्राय: मुळींच नसून यमकेंही चार चार पांच पांच अक्षरांचीं ह्मणजे शिकस्त ! असें असतां रावबहादुरांनीं 'केकावली'वर जें मिनिट लिहिलें आहे त्याच्या शेवटच्या वाक्यांत प्रस्तुत काव्याचें गुणसर्वस्व ह्मणून जें त्यांस वाटलें तें पूर्णप्रमाणें दाखल केलें आहे:—

**As a work of art there is not another equal to it in the language.**

"चित्रकाव्याच्या दृष्टीनें पाहतां प्रस्तुत काव्याच्या तोडीचें महाराष्ट्रभाषेंत दुसरें कोणतेंही सांपडणार नाहीं." या अभिप्रायावरून पाहतां असें ह्मणणें भाग येतें कीं, आमच्या नेटिव ट्रान्सलेटरांनीं 'बृहद्दशम' व 'अष्टोत्तरशत रामायणें', यांची वार्ताही ऐकली नसावी. फार तर काय पण 'नवनीतां'तलें एकादें आख्यान जरी त्यांनीं उलटलें असतें तरी वरील वाक्य येवढें 'धडाकून' लिहितांना त्यांस पंचाईतच पडती![1]

आतां अर्थदृष्ट्या 'केकावली'चें कृत्रिमत्व कितपत सिद्ध होतें तें पाहूं. प्रस्तुत काव्य आज बारा तेरा वर्षें आमच्या अवलोकनांत असून त्याजवर आमची कितीएक वेळां आवृत्ति झाली असेल. पण 'एज्युकेशनल् रेकॉर्डां'तलि वरील लेख वाचीतोंपर्यंत या काव्यांत

१. याच समयां (सन १८६७) पुस्तकें नोंदण्याचा एक नवा आक्ट होऊन जुन्या सर्व पुस्तकांचा सरकारानें संग्रह करविला. यांपैकीं सान्या मराठी ग्रंथांवर रावबहादुरांनीं जो रिपोर्ट केला तो सदरील नोंदणीपटाच्या आरंभीं छापलेला आहे. त्यांत मोरोपंताच्या अष्टोत्तरशत रामायणांवर जो अभिप्राय प्रगट झाला आहे, तो वरील वाक्याशीं फारसा जमण्यासारखा दिसत नाहीं. तो येणेंप्रमाणें आहे:—

**"His (Moropant's) Ramayans, with their fantastic principles of arrangement, are a curiosity in literature."**

(मोरोपंतानें तऱ्हेतऱ्हेचीं जीं अनेक रामायणें रचलीं आहेत तीं सर्वं मिळून एक चमत्कारिक चीजच होय!)

२. 'केकावलि' हा ग्रंथ सन १८६५ या सालीं रा०ब० दादोबा पांडुरंग यांच्या आवृत्तीवरूनच पहिल्यानें सुप्रसिद्ध झाला असें ह्मणण्यास हरकत नाहीं. त्याच्या पुढें ज्या दोन तीन आवृत्ति निघाल्या त्या वरलीच्यांमुळेंच निघाल्या. रावबहादुरांच्या आवृत्तींत पुष्कळ विलक्षण प्रमाद आहेत हें खरें; तरी त्यांच्यासारख्या प्रख्यात विद्वानानें आमच्या कवीच्या अत्यंत रमणीय कृतीचा पुरस्कार करून 'यशोदापांडुरंगी'सारख्या महाराष्ट्रटीकेचा अपूर्व प्रकार प्रथम सुरू केला याबद्दल सर्व रसिकांनीं व महाराष्ट्रभाषेच्या हितचिंतकांनीं त्यांचे आभार मानणें अवश्य होय. वरील टीकेचें नांव आह्मांस तर अत्यंत प्रिय आहे. आमच्या वाचकांस येथें सांगण्यास फारशी हरकत दिसत नाहीं, कीं मयूर कवीचा 'अपूर्व टाहो' आमच्या कानीं समग्र पडण्यास सदरील टीकाग्रंथच कारण झाला; आणि तेव्हांपासून आमचें प्रेम पंतांच्या कवितेवर जें स्थिरता पावलें तें उत्तरोत्तर तेथें दृढतरच होत गेलें. तेव्हांपासून आजपर्यंत प्रस्तुत कवीवर जे जे आक्षेप आह्मीं ऐकले त्यांनीं आह्मांस १०१ ह्या (व्या? सं०) केकेच्या उत्तरार्धाचें* मात्र आठवण होत गेली!

* विलोकुनि विकासिनीजन पुन: पुन्हा कामुका ।
करी वश, नन्हे, बुळा, विवश घेइना कां मुका ! ॥ 'सम्पादक'

अर्थाच्या लटपटीबद्दल आमच्या महाराष्ट्रकवीनें कांहीं खटपट केलेली आहे ही गोष्ट कधीं आमच्या ध्यानींमनींही वागली नाहीं. आमची समजूत अशी होती की हा प्रबंध एकसंधी आहे; यांत कोठेंही सांधा किंवा चीर ह्मणून बिलकुल मिळायाचीच नाहीं. पण वरील अभिप्राय जेव्हां आह्मीं पाहिला व तो कोठून निघाला आहे हें मनांत आणलें, तेव्हां आमची बुद्धि कुंठित झाली. 'हितोपदेशां'तील तीन धूर्तांच्या गोष्टीतील बिचाऱ्या याज्ञिकाप्रमाणें प्रत्यक्ष दर्शनाचें प्रमाणही आह्मांस आभासवत् भासूं लागलें. प्रस्तुत पुस्तकाच्या तेराव्या अंकांत छापलेल्या आमच्या एका मित्राच्या* पत्रावरून जसें आह्मांस व आमच्या वाचकांस अकस्मात् कळलें, कीं मोरोपंतानें आपल्या भारतपर्वांच्या आरंभीं एक एक अक्षर मुद्दाम योजून एक भगवत्पर वाक्य साधलें आहे, त्याप्रमाणेंच 'केकावली'तही आजपर्यंत कोणास कळून न आलेल्या कांहीं हिकमती त्यानें कशावरून करून ठेवल्या नसतील असेंही क्षणमात्र आह्मांस वाटलें. शेवटीं हा संदेह दूर करण्याकरतां सदरील काव्यग्रंथ आह्मी पुन: एकवार बारकाईनें निरखून निरखून पाहिला. गूढ अर्थसंचयाच्या भ्रमानें कोणीं जशी सगळी घरांतली जमीन ठोकठोकून वारंवार पाहावी, कीं कोठें तरी पोकळ आवाज होऊन हा (हं ! सं०) हा हातास लागेल, त्याप्रमाणें प्रकृत काव्यांतील पद ना पद आह्मीं छडून पाहिलें, पण आह्मांस तर अद्याप रावबहादुरांच्या लिहिण्याचा प्रत्यय आला नाहीं. मग हा काय चमत्कार असेल तो असो![1]

वरील संदिग्ध अवस्था आमची जोंपर्यंत राहील तोंपर्यंत आह्मांस असा निर्वाह करणें भाग आहे कीं, आमच्या देशाच्या प्रकरणीं मागील मंडळीचे जे कायमचे ग्रह होऊन राहिलेले आहेत त्यांपैकींच हाही एक होय. यापेक्षां दुसरी तोड आह्मांस सुचत नाहीं.

येथवर पहिल्या आक्षेपाविषयीं विचार झाला. आतां दुसरा आक्षेप डॉ० विल्सन् साहेब यांचा. या पाश्चात्य पंडिताची माहिती आमच्या कांहीं वाचकांस कदाचित् असेल; पण सर्वांच्याकरतां त्यांचें थोडें वृत्त येथें सांगणें जरूर आहे. आमच्या देशाच्या निरनिराळ्या भागांत श्वार्त्स, डफ्, केरी वगैरे मोठमोठे मिशनरी जसे येऊन राहिले होते, व या देशास त्यांनीं आपणांस वाहून घेऊन प्रभु येशूच्या शुभवर्तमानाचा प्रसार करण्यांत आपले जन्मचे जन्म घालवले, त्याप्रमाणेंच डॉ० विल्सन् यांनींही मुंबई इलाखा पतकरून इकडील लोकांस सद्धर्माचें ज्ञान व्हावें एतदर्थ आपलें बहुतेक आयुष्य खर्चलें. या देशांत प्रसिद्ध कोशकार

* सदर पत्र रत्नागिरीचे 'ज० बा० मो०' यांनीं ३० डिसेंबर १८७४ रोजीं लिहिलें असून त्यांत "पांडवसहायो भगवानरविंदाक्षो जयति।" हें अष्टादशाक्षरघटित वाक्य आर्याभारताच्या प्रत्येक पर्वाच्या पहिल्या आर्येचें आद्याक्षर घेतलें असतां निष्पन्न होतें असें त्यांच्या एका मित्रानें त्यांस सांगितलें असें लिहिलें असून तत्प्रत्ययार्थ सदर अठरा आर्या उद्धृत केल्या आहेत. 'सम्पादक'

१. रावबहादुरांचा अर्थद्वैताविषयीं येवढा पक्का ग्रह कशावरून झाला असावा याचा आह्मांस तर्कही होत नाहीं. कदाचित् पहिल्या केकेचा दुसरा वेदांतपर अर्थ लावण्याचा यत्न दादोबांनीं केला आहे, येवढ्यावरच त्यांनीं वरील कल्पना बसवून दिली असेल तर न कळे! पण हा अर्थही किती सुध्या रीतीनें सगळ्या पद्यावर बसतो हें कोणासही तेव्हांच वाचनांतीं कळणार आहे.

कैंडी व इतिहासकार मेडोज् टेलर् यांच्याप्रमाणें मिशनरी मजकुरांनीं चाळीस वर्षे घालवलीं; व त्यांचें देहावसानही येथेंच झालें. इतक्या काळांत त्यांचा एतद्देशीय लोकांशीं अत्यंत परिचय होऊन येथील भाषा, रीतरिवाज, वगैरेही त्यांस चांगलीं माहीत झालीं होतीं हें सांगायास नकोच. शिवाय अनेक लौकिक प्रकरणीं त्यांचा लोकांस पुष्कळ उपयोग होत असून विद्याप्रसाराच्या कामींही त्यांनीं फार मदत केली हेंही सर्वसंमत आहे. तर अशा प्रकारची बडी असामी आमचे दुसरे आक्षेपक होते. तेव्हां त्यांच्या लेखाला किती महत्त्व येणारें आहे, व तो चुकीचा असल्यास खोडून टाकणें किती अवश्य होय हें आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच.

डॉ० विल्सन् साहेबांस दीर्घकाळ वास्तव्यामुळें आमच्या भाषेचें ज्ञान चांगलें झालें असेल असें आम्हांस वाटतें; पण आमच्या ग्रंथांचें ज्ञान त्यांस कितपत होतें याविषयीं कांहीं निश्चयात्मक सांगवत नाहीं. पाश्चात्यजनांच्या व विशेषत: मिशनरी(-यां ? सं०)च्या बाण्याप्रमाणें त्यांची गति सर्वत्र होतीच,—कां कीं, हिंदु शास्त्राचें, पारशी शास्त्राचें व मुसलमानी शास्त्राचें त्यांनीं खंडन केलेलें आढळतें; व 'जाति' या मिशनरीप्रिय विषयावर त्यांचा एक मोठा ग्रंथ आलीकडे त्यांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झाला आहे. शिवाय युनिव्हर्सिटींतलीही अशी मौज ऐकण्यांत येते कीं, अरबी, हिब्रू, चिनी वगैरे भाषांत कोणी उमेदवार हजर झाला असतां कोणी परीक्षक न मिळे तर विल्सन् साहेबांनीं आपला त्याचा पतकर घ्यावा! आतां असलें चतुरस्रत्व संपादन केलें असतां त्यापासून दोष कोणता उत्पन्न होतो हें कोणासही सांगायास नकोच. तो पुढील विवेचनावरून वाचकांच्या चांगला लक्षांत येईलच.

साहेब मजकुरांचा आमच्या कवीवर असा आक्षेप आहे कीं, त्यानें शब्दचित्र रचण्यांत व यंत्रें[1] बांधण्यांत आपल्या भाषाप्रभुत्वाचा अपव्यय केला. आतां हा आरोप त्याच्यावर लागू होण्यापूर्वी दोन गोष्टींचा विचार केला पाहिजे. एक वरील प्रकार मोरोपंतानें केले आहेत कीं नाहींत; दुसरें, ते केले असतां बुद्धीचा अपव्यय होतो कीं काय?

वरच्यांपैकीं पहिल्या प्रश्नाचा निकाल आमचे बहुतेक वाचक करतीलच. कां कीं, 'नवनीता' वरूनही 'निरोष्ठ रामायण', 'दाम-रामायण', व 'परंतु-रामायण' हीं पुष्कळांनीं पाहिलीं तरी असतीलच.शिवाय माजी 'सर्वसंग्रहा'वरून 'मंत्र-रामायण', 'नामांक-रामायण', 'मंत्रमय-रामायण' हेही प्रकार कित्येकांस अवगत असतीलच. तर आमच्या महाराष्ट्रकवीनें वरील कृत्रिम रचना केली आहे येवढा मुद्दा खरा आहे; व केवळ शब्दश: पाहतां डॉक्टर्-साहेबांचा आक्षेप यथार्थ होय.

---

१. कांहीं नियत अक्षरें साधून रचलेल्या प्रबंधास वरील नांव आहे. मोरोपंतांनीं 'मंत्रमय रामायणा'च्या शेवटीं म्हटलें आहे:—

चोविस आर्यांचें हें रामायण, यासि नाम मंत्रमय।
अंतर्गतारिमारक, सार, कवि रचिल असें न यंत्र मय॥

आतां वरील कृत्रिमताही कितपत दोषरूप होय याचा विचार केला असतां प्रथमतः येवढें कबूल करणें भाग आहे कीं, संस्कृत साहित्यांत चित्रकाव्याची* गणना शेवटली आहे.[1] व सामान्यतः कोणत्याही भाषेंत पाहिलें असतां तसाच प्रकार आढळेल. यमक व अनुप्रास हे शब्दालंकारही रसदृष्ट्या जर गौण होत, तर अक्षरबंध तर त्या दृष्टीनें फारच हलके ठरतील यांत संशय नाहीं. कां कीं, शब्दालंकार हे अर्थसौरस्यास जितके प्रतिबंधक होत, त्यापेक्षां यंत्रें हीं तर फारच असून त्यांच्या योगानें अर्थ जसा काय जखडून टाकलेला असतो. तेव्हां सामान्यतः पाहिलें असतां येवढें खरें आहे कीं, रसैकपर जे कवि व वाचक असतील त्यांची वरील शब्दचित्राविषयीं तादृश भक्ति असणार नाहीं. सर्व भाषांतील अति प्राचीन जे सर्वमान्य कवि त्यांचीं काव्यें पाहिलीं असतां वरील गोष्टीची प्रचीति येईल, व मोठमोठ्या रसिकांचाही तसाच कटाक्ष आढळेल. आमच्या देशांतील वाल्मीकि व व्यास यांच्या काव्यांत तर काय, पण कालिदास व भवभूति यांच्या किंवा जगन्नाथराय, गोवर्धनाचार्य यांच्या ग्रंथांतही वरील प्रकार कोठेंही आढळणार नाहीं; व रसिकांस तो कितपत संमत होय याचें प्रमाणही मागील दोन महदाख्यायिकांवरून§ मिळणार आहे.[2] तव्हां कृत्रिम

* ज्यांत दोन दोन चार चार अर्थ संगृहीत केलेले असतात, किंवा वर्णांची चमत्कारिक रचना ज्यांत केलेली असते त्या काव्यास चित्रकाव्य अशी संज्ञा आहे.

'तच्चित्रं यत्र वर्णानां खड्गाद्याकृतिहेतुता ॥' काव्यप्रकाश ९, ८५. 'सम्पादक'

१. काव्याचे तीन प्रकार साहित्यशास्त्रांत सांगितले आहेत; एक ध्वनिकाव्य, दुसरें गुणीभूत व्यंग्य आणि तिसरें चित्र. या तिहींची गणना उत्तम, मध्यम व कनिष्ठ अशी आहे. 'ध्वनि' किंवा 'व्यंग्य' म्हणजे शब्दार्थांहून भिन्न असा मार्मिक अभिप्राय. हा ज्यांत स्पष्ट असतो तें उत्तम काव्य, तादृश प्रधान नसतो तें मध्यम, व मुळींच नसतो तें कनिष्ठ. चित्रकाव्याचे दोन प्रकार आहेत. एक अर्थचित्र व ( दुसरें ! सं० ) शब्दचित्र. पहिल्यांत अर्थाचा चमत्कार केलेला असतो व दुसऱ्यांत केवळ पदरचनेचा.

§ याच संबंधीं ५३ व्या अंकांत चित्रकाव्य या शिरोलेखाखालीं आणखी एक आख्यायिका दिली आहे ती अशी:—

रघुपत्याचार्य म्हणून एक कर्नाटकदेशीय पंडित होते. कोणीं शिष्यानें 'चैतन्यं मुमनं मनं मनमनं' किंवा 'या माता ममता माया' अशा विचित्र तन्हेचा श्लोक त्यांच्याकडे नेला, आणि अर्थ ऐकण्याची इच्छा प्रगट केली, म्हणजे आचार्यबोवांनीं दुसरें कांहीं करूं नये,—मुकाट्यानें कागदाच्या चिंध्या कराव्या आणि अर्थश्रवणेच्छूच्या डोक्यावर ठेवाव्या! त्यानें असें कां म्हणून विचारलें म्हणजे त्यांनीं सांगावें, "अरे, आतां आपण तिघे शाहणे झालों; असला श्लोक सबंध असतां म्हणजे तो रचणारा मूर्ख, तूं तो विचारणारा मूर्ख, आणि मी सांगणारा मूर्ख, अशा तिघांवर मूर्खत्व येत होतें. आतां तिघेहि वरील कोटींतून मुक्त झालों! 'सम्पादक'

२. अंक ९ व अंक ४१† पाहा.

† एकेचाळिसाव्या अंकांतील आख्यायिका ('चित्रकाव्य') अशी:—

एका कवीनें एक नवें काव्य रचून व्हॉल्टेअर नामक जो प्रख्यात कवि फ्रान्स देशांत होऊन गेला त्यास दाखवलें; ते समयीं त्यानें आपली विशेष करामत वरील पंडितास अशी सांगितली कीं, या साऱ्या काव्यांत (G) हें अक्षर एकही सांपडायाचें नाहीं. व्हॉल्टेअर म्हणाला, 'हें काव्य पाहून सुधारावेंसें तुमच्या मनांत आहे कीं नाहीं?' कवि उत्तर करतो, "होय, आहे म्हणून काय सांगावें!"

[ पुढें चालू ]

रचनेच्या विरुद्ध येवढा आक्षेप मात्र काय तो आणतां येणार आहे. पण दुसऱ्या पक्षीं जर पाहिलें तर असें आढळून येईल कीं, प्रस्तुत कृत्रिम पदरचना ही मोठमोठ्या सर्वमान्य कवींच्या कृतींतूनही दृष्टीस पडते. 'किरातार्जुनीय' व 'शिशुपालवध' यांची पंचकाव्यांत गणना आहे हें सर्वप्रसिद्धच आहे. शिवाय 'भारवेरर्थगौरवम्' व 'माघे सन्ति त्रयो गुणाः' ही वचनेंही सर्वविश्रुत आहेत. पण असें असतां भारवीनें व माघानें आपआपल्या महाकाव्यांत एक एक सगळा सर्ग वरील तऱ्हेचा घातलेला आहे, हें यापूर्वीं* प्रसंगोपात्त अनेक वेळां वाचकांस कळवलेंच आहे. 'विदग्धमुखमंडन' म्हणून एक असेंच कूटात्मक प्रसिद्ध काव्य संस्कृतांत आहे. तेव्हां या उदाहरणांवरून पाहतां आमच्या महाराष्ट्रकवीच्या तर्फेनें येवढें सहज म्हणतां येईल कीं, त्यानें वर सांगितलेल्या कांहीं तऱ्हा जरी कोठें कोठें केलेल्या असल्या तरी त्यांबद्दल तो विशेष दोषास पात्र होतो असें नाहीं. निदान त्यांवरून त्याच्या अरसिकतेचें मोठेंसें प्रमाण धरतां येत नाहीं.

मोरोपंताच्या कृत्रिम रचनेच्या तर्फेनें केवळ सामान्यतः वरील आधार दाखवण्यांत आला. वस्तुतः पाहतां त्याच्या अष्टोत्तरशत रामायणांस वरील तरफदारीचीही गरज नाहीं. कां कीं, वरील रामायणें ही आमच्या कवीच्या वाग्देवतेची केवळ स्वतंत्र लीला आहे. होमर्‌च्या महाकाव्यांतील वीर युद्ध आटपल्यानंतर जसे रंगयुद्धांत परस्पर झगडले व नाना तऱ्हेच्या कसरती करून त्यांनीं करमणूक करून घेतली, किंवा चिताऱ्यानें मुख्य चित्र तयार झाल्यानंतर जशी भोंवताली नक्षी व वेलबुट्टी काढण्यांत आपली करामत खर्चावी त्याप्रमाणेंच आमच्या कवीनें 'भारता'दि मोठमोठ्या ग्रंथांनीं आपल्या जन्मभाषेस अलंकृत करून शेवटीं आपल्या उपास्यदेवतेच्या प्रीत्यर्थ आपल्या सरस्वतीचा ओघ जलयंत्रोद्गारांप्रमाणें चित्रविचित्रतेनें प्रगट केला आहे. वास्तव राजमंदिराच्या भोंवतालीं कारंज्यांची शोभा केली असल्यास कारागिरास नांव ठेवणें जसें शोभणार नाहीं, व जलतुषारांचें वैचित्र्य पाहून तटस्थ राहणाऱ्याच्या अंगींही विशेष अरसिकता मानण्याची गरज नाहीं. त्याप्रमाणेंच प्रसंगवशात् कृत्रिमतेचा प्रकार केल्यानें व चाहिल्यानें कवि व रसिकही दोषास पात्र होती असें आह्मांस वाटत नाहीं. सागराचा अफाट विस्तार, नद्यांचें उंच प्रदेशावरून दृष्टिगोचर होणारे सर्पवत् ओघ, नायगारा नदीचा 'रसातलास विदारणारा तटप्रपात', हिमालयाच्या ज्येष्ठ कन्येनें आपल्या 'प्रियपात्र रत्नाकरा'स जेथें सहस्र भुज प्रगट करून सरभसालिंगन केलें आहे तेथला विचित्र व भव्य देखावा, यांच्या अंगीं कवीचें व रसिकाचें मन तल्लीन करून टाकण्याची शक्ति आहे खरी, व वाग्देवतेचीं मुख्य विहारस्थानें हीं होत हेंही खरें. पण सागरावर दूर दूर नजर पोंचवून डोळे दुखूं लागले असतां, व नायगारेच्या धबधब्यांच्या प्रलयगर्जनेनें कर्णविवरें बधिर झालीं असतां, जलयंत्रावर नाचणाऱ्या तुषारांची व त्यांवर मारणाऱ्या इंद्र-

पंडित सांगतो "तर मग यांतलीं बाकीचीं हीं सारीं अक्षरें काढून टाकलीं असतां फारच बहार होईल असें मला वाटतें." 'सम्पादक'

* पृष्ठ ८१९ पाहा. 'सम्पादक'

धनुष्यांच्या लकेरींची शोभा पाहणें व सुखस्पर्श तुषारवृष्टींचा अनुभव घेणें हें त्याच देवीस केवळ तुच्छ वाटेल असें आमचें मन घेत नाहीं !

तर डॉ॰ विल्सन् साहेबांनीं आमच्या कवीवर वरील आक्षेप दाखल करून त्याच्या कीर्तीची हानि करण्याचा यत्न करण्यापूर्वी वरील कांहीं विचार मनांत आणायाचे होते. शिवाय त्यांच्या लेखावरून तिऱ्हाईत वाचणारास असें वाटण्याचा संभव आहे कीं, आमच्या कवीनें आपल्या ग्रंथांत लहर लागेल तेथें वरील कृत्रिम प्रकार आणून आपलें भाषाप्रभुत्व गाजवलें आहे; तर यासंबंधानेंही त्यांनीं वाचकांस कळवणें जरूर होतें कीं, मोरोपंतानें शब्दचित्राचे प्रकार जे केले आहेत ते भारवि व माघ यांच्याप्रमाणें आपल्या मोठमोठ्या ग्रंथांच्या मध्येंच न करतां अगदीं निराळे केले आहेत, शिवाय ते ह्मणण्यासारखे कृत्रिमही नाहींत. खड्गबंध,* गोमूत्रिकाबंध,‡ मुरजबंध,$ समुद्रसमक,† सर्वतोभद्र,$ हे किंवा असले दुसरे प्रकार त्याच्या रामायणांत मुळींच नाहींत. अष्टोत्तरशतांपैकीं सुमारें पाऊणशें रामायणें

---

* उदाहरणः—

माता नतानां, संघट्टः श्रियां, बाधितसंभ्रमा ।
मान्याऽथ, सीमा रामाणां, शं मे दिश्यादुमादिमा ॥ 'सम्पादक'

‡ व्याख्याः—

वर्णानामेकरूपत्वं यद्येकान्तरमर्धयोः ।
गोमूत्रिकेति तत्प्राहुर्दुष्करं तद्विदो विदुः ॥ 'सम्पादक'

उदाहरणः—

प्र वृ त्ते वि क स द्धा नं सा च ने प्य वि षा दि भिः ॥
व
व वृ षे वि क न द्धा नं यु ध मा प्य वि षा णि भिः ॥

शिशुपालवधे १९, ४६.

दुसऱ्या ओळींत पहिल्या ओळींतील जवळ जवळ सर्व वर्ण आल्यानें हा अलंकार होतो. 'सं॰'

$ उदाहरणः—

सरला बहुलारम्भतरलालिबलारवा ।
वारलाबहुला मन्दकरलाबहुलामला ॥

किंवा,

सा से ना ग म ना र म्भे । र सं ना सी द ना र ता ॥
ता र ना द ज ना म त्त । धी र ना ग म ना म या ॥

शिशुपालवधे १९, २९. 'सम्पादक'

† कवितेच्या दोन्ही अर्धांतील अक्षरें तींच पण अर्थ मात्र भिन्न असतां हा अलंकार होतो.

जसें:—

स्यन्दना नो चतुरगाः सुरेभा वाविपत्तयः ।
स्यन्दना नो च तुरगाः सुरेभावा विपत्तयः ॥ किरातार्जुनीये, १५, १६.

अगर,

अनलसमीहित साधीं राया बारा महीवरा कामा ॥
अनलस मीहि तसा धीरा यावा रामही वराका मा ॥१॥.

( पुढें. चालू, $सर्वतोभद्र टीप पुढील पानावर पाहा. )

छापून निघाली आहेत; यांतील बहुतेक तर निरनिराळ्या छंदांत रचलीं आहेत येवढेंच काय तें त्यांचें वैचित्र्य; कित्येकांत 'उमा', 'काशी', 'शिव', अशीं नांवें व कोठें कोठें ऋषींचीं नांवें, तीर्थांचीं नांवें वगैरे साधलीं आहेत. तेव्हां एकंदर रामायणसमूहांत अंमळ करामतीचीं ह्मटलीं ह्मणजे 'परंतु-रामायण', 'दाम-रामायण', 'लघ्वक्षर-रामायण','ओवी-रामायण', 'मंत्र-रामायण', व 'निरोष्ठरामायण' येवढींच काय तीं होत. पण हीं साधण्या-सही आमच्या कवीचे श्रम ह्मटले ह्मणजे हत्तीस आपल्या शुंडादंडावर पुष्पमाला खेळवण्याचे जितके श्रम तितकेच बहुधा होत!

असो; येथवर मोरोपंताच्या कवितेवर एका एतद्देशीय व एका पाश्चात्य पंडितानें काढलेल्या आक्षेपांचा विचार झाला. पुढील खेपेस वरील दोन पंडितांच्याच प्रस्तुतविषयक लेखावर आणखी कांहीं विचार करावाचा आहे.

---

§ उदाहरण:—

र सा सा र र सा सा र। सा व ता क्ष क्ष ता व सा॥
सा ता वा त त वा ता सा। र क्ष त स्त्व स्त्व त क्ष र॥

अगर,

स का र ना ना र का स। का य सा द द सा य का॥
र सा ह वा वा ह सा र। ना द वा द द वा द ना॥ शिशुपालवधे १९, २७.

सम्पादक

१. वरच्या सहांपैकीं तीन रामायणांचें स्वरूप 'नवनीतां'तल्या वेच्यांवरून वाचकांस कळेलच. वास्तव बाकीच्या तिहींचें मात्र येथें सांगतों. 'लघ्वक्षररामायण'* सारें एकमात्रक आहे; उदाहरण:-

दश-मुख-वध-मति विधि-सुर-नुत-पद जगदधिप अ-जित वर-द हरी।
परम करुण ह्मणवुनि दशरथ वर-धर तनुज मनुजपण हि धरी॥१॥

'ओवीरामायणां'त आर्या व ओवी हीं दोन्ही छंदें साधलीं आहेत; उदाहरण:—

वंदुनि सरस्वतीला ध्याती कुलदेवतेस कवि सर्व।
गाती निजपूर्वजगुरु-मूर्ती हरि गुरु तथैव कवि शर्व॥३॥
(वंदुनि सरस्वतीला ध्याती। कुलदेवतेस कवि सर्व गाती।
निजपूर्वजगुरु-मूर्ती। हरि गुरु तथैव कवि शर्व॥)

('मंत्रमय रामायणा'चें उदाहरण):—

श्रीमान् राजशिरोमणि दशरथ, जो निजयशें वरा माहित,।
द्विज-सेवक, यज्ञ-निरत, जन-भय-हर्ता, परा-निकाम-हित॥१॥

वरील आर्येंत संपूर्ण त्रयोदशाक्षरी मंत्र§ श्रीकारापासून मकारापर्यंत साधला आहे हें कळेलच.

* सदर रामायण मोरोपंतांच्या समग्र ग्रंथांत (वराडकरी आवृत्ति) 'मुलरामायण' या नांवानें आढळतें. यांत रामायणकथेवर एकोणपन्नास आर्या असून अंत्याक्षरें दीर्घ असणें अपरिहार्य असल्या-मुळें त्यांखेरीज सर्व लघ्वक्षरें साधलीं आहेत. 'सम्पादक'

§ "श्रीराम जय राम जय जय राम." 'सम्पादक'

अ-प्राप्त-कालं वचनं बृहस्पतिरपि ब्रुवन् ।
प्राप्नुयात् बुद्ध्यवज्ञानमपमानं च शाश्वतम् ॥[1]

अंक ५४—(१) विषयोपक्रम. (२) 'केकावली'विषयीं रावबहादुरांचा अभिप्राव. (३) त्यावर टीका.

१. मागील खेपेस दोघां पंडितांचे आमच्या कवीवरील आक्षेप दाखल करून त्यांवर आह्मीं आपलें मत वाचकांस कळवलें. आतां त्याच पंडितांनीं मोरोपंताविषयीं आणखी जो मजकूर लिहिला आहे त्यांत कितपत तथ्य आहे याविषयीं विचार करूं.

२. रा. ब. रानडे यांनीं आपल्या रिपोर्टाच्या अखेरीस 'केकावली'विषयीं आपला एकंदर अभिप्राय येणेंप्रमाणें दाखल केला आहे—

"A few words upon the subject-matter of the poem itself before I conclude this rather long Report. It is, as I have said, a hymn addressed to the Deity, and belongs to the devotional class of poetry. The devotional breathings are, however, of a sort which can be understood and relished in this country alone. There is no awe about the Deity, nothing of terror surrounding his glory, no humiliation of spirit on the devotee's part, no dazzling of sight at the awful vision. The relations between the worshipper and the worshipped are exceptionally free; every now and then there is a side-thrust and a push at the Deity which can be understood, if not relished, in a country where both the prevailing philosophy and theology place man almost on an equality with God, and advocate either his present unity with or his future absorption in God. This kind of philosophy is destructive of all real devotion. The poem, however, partakes of this fault in common with many other works existing in the language, which possess the same characteristics as the Gopi, Gita, Ganga Lahari. Mahimna Stotra, Gita Govind, and many others of the like description. The highest and most impassioned outbursts of devotion in our poetry all partake of this character. Those attributes of the Deity which have a prominent bearing on the devotional aspect of human faith, His all forgiving temper, His zeal to serve those who seek His help and place their faith in Him, bountifulness and extreme condescension, all these are celebrated as they deserve in successive stanzas of this hymn. There are five passages in the way of episodes in praise of Dhruva, Vyas and Narad, and the other Puranic saints and heroes. The all paramount importance of the sacred story of God's exploits, performed in the course of his various incarnations, is described in a succession of fourteen

१. "अप्रासंगिक असें जें वचन तें प्रत्यक्ष बृहस्पति जरी बोलला, तरी त्याच्या योगानें तो अवज्ञेस व निरंतर अपमानास प्राप्त होईल!"

beautiful stanzas at the end. And the hymn closes with a recital of what the author sums up as the highest boon he craves at the hands of the Almighty. As a work of art there is not another equal to it in the language. As a devotional hymn it does not strike harsh to the orthodox reader, but it is disqualified for any higher acceptance by the fault above pointed out."

("हा रिपोर्ट बराच लांब झाला; आतां प्रस्तुत काव्याच्या ('केकावलीच्या) विषयावर चार शब्द लिहून लेखणी आटपतों. वर सांगण्यांत आलेंच आहे कीं, हें काव्य ईश्वराचें स्तोत्र आहे, व याची गणना भक्तिपर ग्रंथांत होणारी आहे. या स्तोत्रांत जो ईश्वरविषयक भक्तीच्या उद्गारांचा प्रकार आढळतो तो एतद्देशवासी लोकांखेरीज इतर कोणास समजायाचा नाहीं व रुचायाचाही नाहीं. ईश्वराविषयीं भक्ताच्या मनांत ज्या वृत्ति स्वभावतः उत्पन्न व्हाव्या—ह्मणजे त्याचें ऐश्वर्य पाहून भयचकित होणें, आपली क्षुद्रता मनांत येऊन अत्यंत नम्र होणें, त्याच्या अगाध महिम्याकडे लक्ष जाऊन आश्चर्यानें थक्क होऊन जाणें, आपल्या पापमग्नतेमुळें धाक वाटणें,—त्या या काव्यांत बिलकुल दृष्टीस पडत नाहींत. उलटा भज्य आणि भजक यांजमधील संबंध यांत अत्यंत निकटतेचा आढळतो. जागोजाग ईश्वराशीं अतिप्रसंग केलेला व त्याच्यावर कोटि लढवलेली, हा प्रकार प्रस्तुत काव्यांत आहे. यास्तव या देशांतील तत्त्वज्ञानाचें व ईश्वरज्ञानाचें स्वरूप जे जाणत असतील,—ह्मणजे मनुष्य व देव हे समसमान असून ते एकरूपच होत किंवा पुढें तरी त्यांचा अभेद होणारा आहे,—हें ज्यांस माहीत असेल त्यांसच प्रस्तुत काव्यांतील भाषणप्रकार अगोदर कळेल; मग तो आवडणें न आवडणें ही तर स्वतंत्र गोष्ट आहे! वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग हा खऱ्या ईश्वरभक्तीचा केवळ विध्वंसक होय. आतां हें खरं आहे कीं, वर सांगितलेला दोष प्रस्तुत काव्यांतच आढळतो असें नाहीं; 'गोपीगीत', 'गंगालहरी', 'महिम्नस्तोत्र,' इत्यादि काव्यांत वरीलच प्रकार आहे. आणि सामान्यतः पाहतां आमच्या देशांतील कवितेंत भक्तीचे अत्यंत प्रेमळ उद्गार जे जे आढळतात त्या सर्वांत हीच तऱ्हा नजरेस येते. मनुष्यास भक्तीविषयीं प्रेरणा करवणारे जे ईश्वराचे अनेक गुण,—ह्मणजे त्याचें अत्यंत क्षमाशीलत्व, शरण आलेल्या भाविकांच्या साहाय्यार्थ धांवण्याविषयींची त्याची आतुरता, सर्वांवर कृपादृष्टि, आणि दयोदारता,—हे सर्व या काव्यांतील अनेक पद्यांत यथास्थितपणें वर्णिले आहेत. ध्रुव, व्यास, नारद, वगैरे पुराणप्रसिद्ध पुरुषांचा स्तव कथानुषंगानें मधें मधें आणला आहे. तसेंच देवानें निरनिराळ्या अवतारीं जीं चरित्रें केलीं त्यांच्या कथेचें माहात्म्य शेवटच्या चवदा पद्यांत सुंदर रीतीनें वर्णिलें आहे. आणि सरतेशेवटीं कवीच्या समजुतीनें परमेश्वरापाशीं मागायाचें जें अत्युत्कृष्ट वरदान त्याविषयीं प्रार्थना करून या काव्याचा उपसंहार केला आहे. काव्यरचनेच्या करामतीपुरताच विचार केला, तर याच्या तोडीचें काव्य महाराष्ट्रभाषेंत दुसरें नाहीं. भक्तिपर स्तोत्र या दृष्टीनें पाहिलें तर जुन्या धर्मांतील मतें ज्यांस मान्य आहेत अशा वाचकांस त्यांत कांहीं गैर दिसत नाहीं; पण त्यांच्याहून वरच्या पायरीचे जे असतील,—

ह्मणजे ज्यांस ईश्वराविषयीं यथार्थ ज्ञान झालें असेल,-त्यांस पूर्वोक्त दोषास्तव तें मान्य होण्याजोगें नाहीं.")

३. वरील लेख अनेक रीतींनीं पाहतां चांगला मनन करण्यासारखा आहे. आमच्या देशांत पाश्चात्य विद्येचा रिघाव होऊन, तिचा एतद्देशीय लोकांच्या मनावर दृढ संस्कार व्हावयाला लागून, जुनी अडाणी समजूत व नवी सुधारलेली समजूत ही दुफळी जेव्हांपासून व्हावयाला लागली तेव्हांच्या पहिल्या भट्टींत जी मंडळी तयार झाली तिच्या मनाची स्थिति वरील उताऱ्यांत स्पष्ट रेखल्यासारखी दिसत आहे. ती अशी:—वरील मंडळीनें इंग्रजी विद्येच्या प्रकाशानें शोधून काढलेलें महातत्त्व एक हें होय कीं, आमच्या देशांत नांवाजण्यासारखें ह्मणून फार करून कांहींच झालें नाहीं. आमची विद्या घ्या, कलाकौशल्य घ्या, रीतरिवाज घ्या, राजकारण घ्या, शिपाईगिरी घ्या, चोहोंकडे आमच्या मूर्खपणाचा जसा काय ध्वजच उभारला आहे! त्यांतून आमच्या धर्माची गोष्ट तर मुळीच काढूं नका. असला अप्रयोजक व पाजीपणाचा धर्म तर कधीं कोठेंही झाला नसेल!! या महतत्त्वाअन्वयेंच रावबहादुरांनीं सदरील रिपोर्टांत आमच्या बिचाऱ्या कवीवर व त्याच्या टीकाकारावरही साहेबी पेनाची फर्डेशाई उडवली आहे. रावबहादुरांची इंग्रेजी विद्येंतील निपुणता सर्वश्रुतच आहे; तेव्हां तिजप्रमाणें वरील इंग्रेजी लेख मोठ्या सफाईनें लिहिलेला आहे यांत संशय नाहीं. आणि ज्यांनीं ज्यांनीं 'एजुकेशनल् रेकॉर्ड्' पत्रांत सदरील रिपोर्ट् वाचला असेल त्यांनीं या सफाईवरूनच परीक्षा करून रावबहादुरांच्या मतास बहुधा मान डोलवली असेल. दुसऱ्या एका रावबहादुरानें 'केकावलीं'तील कांहीं चरणांचा अर्थ फिरवला येवढ्याबद्दल त्या बिचाऱ्यावर वर्तमानपत्रांतून, मासिकपुस्तकांतून जसा काय गहजब उडाला. पण सगळ्या काव्यावर ज्यांनीं इंग्रेजी पेन फिरवलें त्यांच्या अभिप्रायाबद्दल कोणीं कोठें हूं का चूं सुद्धां केलें नाहीं. ट्रान्स्लेटरसाहेबांच्या खुर्चीला पोपमहाराजांच्या खुर्चीप्रमाणें प्रमादराहित्याचा[१] ताईत बांधलेला आहे कीं काय न कळे! किंवा युनिव्हर्सिटीच्या कितांबांतही कांहीं बीरमंत्र आहे कीं काय कोण जाणे! एकंदरींत या प्रकरणीं माघकवीचाच अभिप्राय लागू पडण्यासारखा आहे:—

तुल्येऽपराधे स्वर्भानुर्भानुमन्तं चिरेण यत्।
हिमांशुमाशु ग्रसते तन्म्रदिम्नः स्फुटं फलम्॥ (शिशुपालवधे) २, ४९. 'सं०'[२]

असो; आतां रावबहादुरांच्या वरील टीकेवर आह्मी आपली टीका आमच्या वाचकांस सादर करतों.

---

१. रोमच्या पोपाचा एक परंपरागत चाललेला महान् अधिकार प्रमादराहित्य (infallibility) हा होय; ह्मणजे जो सेंट्पीटर्च्या खुर्चीवर बसेल त्याच्या तोंडांतून असत्य ह्मणून निघायाचेंच नाहीं असा भाविक कॅथलिक् लोकांचा सिद्धांत आहे. सेंट् पीटर् हा ख्रिस्ताच्या प्रेषितपरिवारापैकीं असून रोम येथील गादी थेट त्याच्यापासून आजपर्यंत चालत आली आहे असाही समज आहे.

२. "चंद्र आणि सूर्य यांचा सारखा अपराध असतां राहु हा चंद्रास वारंवार ग्रासतो व सूर्यास एकादे वेळेस ग्रासतो, हें फळ पहिल्याच्या मृदुत्वाचें व दुसऱ्याच्या तीव्रत्वाचें होय!"

प्रस्तुत काव्याच्या ह्मणजे 'केकावली'च्या संबंधानें रावबहादुरांचा आमच्या महाराष्ट्र कवीवर असा टपका आहे कीं, त्यानें सर्व विश्वाचा नायक जो परमेश्वर त्याच्या पुढें जें अगदीं भयभीत होऊन जावयाचें व आपल्या अपरिमित क्षुद्रत्वास्तव वर मान करण्याचेंही धैर्य न होऊन त्यानें पुरतें ब्रह्म जें काढूं नये, तें सर्व गुंडाळून ठेवून 'इसापनीतीं'तील कोल्ह्याच्या तिसऱ्या आचरणास अनुसरून त्यानें परमात्म्याशीं खुशाल हवी तितकी सलगी किंबहुना हास्यविनोदही केला आहे. या अतिप्रसंगाच्या प्रकारास्तव सदरील काव्य, सुधारलेल्या समाजाच्या लोकांस पसंत होण्याजोगें नाहीं असा रावबहादुराचा सिद्धांत आहे. आतां आमच्या अडाणी कवीनें आपल्या वेडगळ लडिवाळपणानें आलीकडील बड्या बड्या विद्वानांची आपणावर इतराजी होण्याचा प्रसंग आणला हें त्याचें कमनशीब तर खरेंच; पण आह्मांस असें वाटतें कीं, आमच्या रावबहादुरांनीं वरील निकाल कागदावर नमूद करण्यापूर्वीं आमच्या बिचाऱ्या कवीच्या संबंधानें कांहीं गोष्टी ध्यानांत आणल्या असत्या तर बरें होतें.एक तर ही कीं, कैदी(या?सं०)स संशयाचा फायदा देण्याची जशी त्यांची वहिवाट आहे त्याप्रमाणें प्रस्तुत कवीस मागील काळाचा फायदा द्यावयाचा होता. ह्मणजे ज्यापक्षीं तो मागील काळीं जन्मास आला त्या अर्थीं अर्वाचीन काव्चें सुधारलेलें ईश्वरज्ञान त्याच्या स्तोत्रांत न आल्याबद्दल त्यास कांहीं गय करायाची होती. मिल्टन् कवीनें आपल्या महाकाव्यांत पृथ्वीस स्थिर केली आहे व सूर्यास फिरायास लावलें आहे, शेक्स्पीयरबोवांनीं तर बोहेमिया देशाच्या किनाऱ्यावर जहाज उतरवलें आहे, आमच्या कविकुलगुरूंनीं मेघास स्त्रियांच्या 'केशसंस्कारधूपांनीं' पुष्ट होण्याची तजवीज सांगितली आहे, महाभारतवाल्यानें कुरूंच्या तृतीय सेनानीकडून 'सप्तद्वीपा' पृथ्वी रथचक्रासह वर उचलवली आहे, ड्रायड्नलें आपला फलज्योतिषावरील विश्वास आपल्या ग्रंथांत प्रगट केला आहे, गोल्ड्स्मिथ्नें आपल्या जन्मभूमीवरील काव्यांत अर्थशास्त्रदृष्ट्या जे अपसिद्धांत होतें त्यांचें प्रणयन केलें आहे; त्याप्रमाणेंच कोलंबस् बाहामा बेटांस हिंदुस्थानाचा भाग समजला, सीजराच्या वेळेपर्यंत ब्रिटन्ची गणना कल्पित बेटांत होत होती, ग्रीक् व रोमन् लोकांच्या वेळेस हिंदुस्थान हा पृथ्वीची सीमा होऊन राहिला होता, चारशें वर्षांपूर्वीं अट्लांटिक् महासागराच्या पलीकडे कांहीं नाहीं असें सर्व समजत असत, अरिस्टॉटल् हा येवढा पंडितशिरोमणि असतां पदार्थविज्ञानाचे त्याचे सिद्धांत कित्येक अगदीं वेडगळ आहेत—इत्यादि अनेक ठिकाणीं अर्वाचीन पंडित आपली तीव्रता कमी करून मागल्या अडाणी काळांत होऊन गेलेल्या मंडळीची जशी कींव करतात तशी कांहीं मेहेरबानी रावबहादुरांनीं पंतांवर करणें रास्त होतें. प्रस्तुत कवीनें प्रार्थनासमाजांत जर आपलें नांव नोंदलें असतें व मोठमोठ्या पंडितांच्या उपासनांच्या वेळेस हजर असून ईश्वरस्वरूपाचें मार्मिक ज्ञान जर संपादन केलें असतें, किंवा दयानंदजींची तेहतीस कोटि देवांवरची मोहीम पाहिल्यानें मूर्तिपूजाजन्य पातकांचें क्षालन होऊन सद्धर्मोन्नति जर त्याच्या अंगीं संचरती, तर त्याच्या हातून हल्लींच्या 'केकावली'च्या तोडीचें काव्य उतरतें कीं नाहीं याची शंकाच वाटते; पण जें उतरलें असतें त्यांत मराठी ट्रान्स्लेटरांस नापसंत होण्याजोगें कांहीं आलें नसतें, यांत संशय नाहीं. 'रत्नमाला', 'प्रार्थना-

संगीत' या महाकाव्यांत खऱ्या देवाविषयीं खरा भक्तिरस असा प्रगट झाला आहे तसाच 'केकावली'तही संचरून आमच्या सुधारलेल्या भाविक जनांच्या पवित्र नेत्रांतून प्रेमाश्रूंचा प्रवाह चालवण्यास वरील केकारव कदाचित् कारणभूत झाला असता; तरी असल्या पवित्र व सुधारलेल्या काव्यांत कवित्वरस कितपत उतरता याचा मात्र आह्मांस संशय वाटतो! असो; पण ज्या अर्थी आमच्या बिचाऱ्या कवीचा ग्रंथ पेशवाईच्या अमदानींतच आटपला, व पुढील सुधारलेल्या राज्याचा व धर्माचा आमच्या गाढांधकारमय देशांत उदय होऊं लागण्याच्या पूर्वींच त्याचा अस्त झाला, त्या अर्थी वादविषयक काव्यांत ईश्वरभक्तीचा प्रकार परिपक्व बुद्धीच्या लोकांस मान्य होई अशा प्रकारें वठला नाहीं, याबद्दल आमच्या हीनभाग्य कवीवर टपका ठेवणें बरोबर नाहीं. ही एक गोष्ट झाली. दुसरी अशी कीं, 'केकावली'त मयूरानें ईश्वराची करुणा भाकून जरी टाहो फोडला आहे, तरी त्याच्या ईश्वरांत व रावबहादुरांच्या ईश्वरांत अतिशयितच अंतर आहे. आमच्या कवीचा देव साकार, मनुष्यदेहधारी, 'गदारिदरनंदकाम्बुजां'नीं विराजमान, भक्तांच्या साह्यार्थ गरुडावर स्वारी करून धावणारा, विदुराच्या कण्या, शबरीचीं बोरें, सुदाम्याचे पोहे, हे खाणारा, एका अवतारीं कडकडीत एकपत्नीव्रत आचरणारा आणि पुढल्यांत गोकुळवृंदावनांत—

श्लिष्यति कामपि चुम्बति कामपि कामपि रमयति रामाम् ।
पश्यति सस्मितचारु परामपरामनुगच्छति वामाम् ॥१॥[१]

अशा प्रकारचा धुमाकूळ करून देणारा, क्षणांत 'प्रियाकुचतटीं' व क्षणांत 'नूपमखांत' 'पत्रावळी' काढणारा, भृगूनें उरावर लात हाणली असतां तिचें चिन्ह भूषणत्वेंकरून बाळगणारा, अशा प्रकारचा होय. आमच्या टीकाकर्त्यांचा आलीकडील देव म्हटला म्हणजे त्याला रंग नाहीं, रूप नाहीं, तो कधीं अवतरलेला नव्हे, कधीं कोणाच्या दृष्टीस पडलेला नाहीं, कोणाशीं बोललेला नाहीं, डोळे मिटले म्हणजे दिसायाचा, बीणारबानें जागृत व्हावयाचा, अशा प्रकारचा आहे. त्याचीं चरित्रें म्हटलीं म्हणजे त्यानें आमच्या देशांत सद्धर्मोन्नतीसाठीं शाक्यमुनीस* उत्पन्न करून त्याचा धर्म चोहोंकडे पसरवला व शेवटीं ब्राह्मणांकरवीं त्या च धर्माचें उन्मूलन करवलें, इस्राएल लोकांत प्रभु येशूस उत्पन्न करून त्याच लोकांकडून त्याचे हाल हाल करून त्यास मारवलें, महंमदास अरबस्थानांत पाठवून त्याच्या चेल्यांकडून ख्रिस्ती धर्म मलिन करवला व आमच्या देशांतल्या मूर्ती फोडवल्या, पुढें युरोपांत महंमदाचें मातेरें करवून इकडेही शिवाजीच्या हस्तें पुनः मूर्तींचें स्थापन करवलें आलीकडे राममोहनराय व दयानंद सरस्वती यांच्या हृदयांत सद्धर्मप्रकाश फांकवून आर्यांच्या उन्नतीस आरंभ होतो न होतो तों एकाचें अंतर्द्वीपांतच देहावसान झालें व दुसऱ्यावर एकाएकीं गहजब गुदरून त्या वावटळींत देशसुधारणेचें जहाज कोणीकडच्या कोणीकडे हेलकावे खात भडकलें!

---

१. वरील अष्टपदी जयदेवकवींच्या सवप्रसिद्ध 'गीतगोविंदा'तील होय. तिचा अर्थही सुगमच आहे:—
"कोणास आलिंगन देतो, कोणाचें चुंबन करतो, कोण्या स्त्रियेस रमवतो, एकीकडे सस्मित अवलोकन करतो, व दुसरीच्या मागून चालतो!"

* गौतम बुद्ध.

सम्पादक"

असो; तर कवीची ईश्वराच्याविषयींची समजूत व टीकाकर्त्यांची त्याजविषयींची समजूत या परस्पर इतक्या भिन्न आहेत; मग इतका स्पष्ट विरोध असतां 'केकावलीं'तील वर्णन आमच्या रावबहादुरांच्या मनांत असें उतरलें नाहीं यांत नवल कसचें! व यांत आमच्या बिचाऱ्या जुन्या कवींचा दोष तरी कसचा? इंग्रेजी चितान्यानें जर स्त्रीपुरुषांच्या जोडप्याचें चित्र काढलें तर मडम साहेबांच्या पायांत बूट, डोक्यावर टोपी, अंगांत झगा वगैरे सर्व जामानिमा इंग्रेजी तऱ्हेचा, नवऱ्यानें हलकीशी नाजुक छत्री डोक्यावर धरलेली असून स्वतः स्वारी ऊन खाते आहे, मुखकमलांतून जो जो शब्द खालीं पडेल तो तो झेलण्यास जसा काय तो तत्पर होऊन राहिला आहे,—अशा तऱ्हेचें तें उठेल हें उघडच आहे; तोच आमचा हिंदु चितारी असला कीं, बायकोला लाजतां लाजतां पुरेसें होतें आहे, नवरा यथास्थित जामानिमा करून चालत असतां बायको अनवाणी व छत्रीशिवाय अशी त्याज-पासून दूर चालली आहे, पेहेराव इकडच्याप्रमाणेंच अर्थात् असून इकडच्या चालीप्रमाणेंच हातांपायांत वगैरे भूषणें आहेत,—वगैरे सर्व प्रकार असायाचाच! मग असें एकादें जुन्या कारागिरानें काढलेलें चित्र पाहून जर इंग्रेजी रसिकता पावलेले एकादे मर्मज्ञ ह्मणूं लागले, कीं "हें कायहो! स्त्रियांचे पाय उघडे दाखवणें हें किती अप्रशस्त आहे? वक्षःप्रदेश उघडा दाखवला तर तो चालेल, कां कीं सुधारलेल्या देशांत मोठमोठ्या समारंभांत तशा वेषानें स्त्रिया वावरतात; तसेंच कपाळीं कुंकूं लावलें आहे, हें तरी किती अमंगळ आहे! जे रानटी लोक असतात त्यांस आपलें शरीर रंगवावेंसें वाटतें, खरें सुधारलेलें माणूस आहे त्याच्या कपाळीं कधीं कांहीं दृष्टीस पडायाचें नाहीं; त्याप्रमाणेंच नाक व कान टोंचून शरीरास इजा करून तेथें भूषणें घालणें, हातावर तोंडावर गोंदणें हें तरी किती अभद्र आहे! पण या सर्वांत बायकोचें लाजणें हें तर फार विचित्र आहे; येथें तर चितान्यानें आपल्या अडाणीपणाची शिकस्त केली आहे! बायका जर अशा लाजूं लागल्या तर मग त्यांची व त्यांच्या द्वारें देशाची सुधारणा होणार कशी? मिल्‌सारख्यांनीं स्त्रीजातीचा कैवार घेऊन त्यांस पार्लमेंटांत बसवण्याची खटपट करावी; आणि आमच्या खुळ्या देशांत तर बायकांस नवऱ्याच्या समोर उभें राहण्याचाही धीर नसावा ही केवढी शोचनीय गोष्ट आहे बरें!" अशा प्रकारची टीका वरच्यासारख्या तजबिरीखालीं कोणीं लिहून ठेवली तर ती कितीशी समंजस ह्मणून आपण समजूं? तर याप्रमाणेंच आमच्या कवीच्या हृदयांत ईश्वराचें स्वरूप ज्या रीतीचें लहानपणा-पासून ठसलें होतें त्या रीतीची त्याची तजबीर त्याच्या काव्यांत उठली हें उघडच आहे. प्रस्तुत टीकाकारास आवडे अशा प्रकारच्या चित्राची त्याजपासून अपेक्षा करणें हें त्यास इंग्रेजी येत नसल्याबद्दल त्यांस नांव ठेवण्यासारखेंच समंजस होय.

आतां वरील आक्षेपच वस्तुतः कितपत यथार्थ होय याविषयीं जर विचार केला, तर इकडूनही प्रस्तुत काव्याच्या तर्फेनें कांहीं बोलतां येणार नाहीं असें नाहीं. रावबहादुरांनीं आपल्या टीकेंत ईश्वराच्या संबंधाचें वर्णन जसें असावें ह्मणून सांगितलें आहे, तसें 'केकावलीं'त मुळींच नाहीं असें कोणाच्यानेंही ह्मणवणार नाहीं. आपण ईश्वरस्वरूपच आहों असें जर

१. सुबंधु कवीवरील निबंध, पृष्ठ ३७ पाहा.

आमच्या कवीस वाटतें, व त्याच्या ठायीं नम्रभाव व स्वतःच्या पापमलिनतेविषयीं खेद, या वृत्ति जर मुळींच नसत्या, तर वादविषयक काव्याचा प्रादुर्भावच मुळीं होताना! 'कृतांत-कटका'ची पांढरी सफेत पताका फडकूं लागली असतां ह्यानें प्रस्तुत ग्रंथ जो रचला, तो दक्षिणाप्रैज कमिटी किंवा मराठी–ग्रंथ–उत्तेजक मंडळी यांच्या बक्षिसाच्या लालचीवर अथवा पेशव्यांनीं देऊं केलेल्या इनामास भुलून रचला असें नाहीं; तर केवळ अंतःप्रेरणेस वश होऊनच तो लिहिला हें सर्वांस माहीतच आहे. हें या काव्याच्या सर्वसंमत उत्कृष्टत्वा-वरूनच सिद्ध होतें. आतां यांत सलगीचा जो प्रकार आहे तो रावबहादुरांस बिलकुल पसंत पडत नाहीं; कां कीं परमेश्वर केवढा थोर व मनुष्य हा त्याच्यापुढें किती पराकाष्ठेचा क्षुद्र! हा अभिप्राय एका पक्षीं पाहतां खरा आहे हें कोणीही कबूल करील. पण दुसरी एक गोष्ट रावबहादुरांच्या कशी लक्षांत आली नाहीं, किंवा त्यांनी कशी आणली नाहीं, याचा अंमळ चमत्कार वाटतो. मनुष्य हा ईश्वरापुढें अत्यंत क्षुद्र हें खरें, पण तसेंच हंही खरें आहे कीं, त्याचा उत्पन्नकर्ता व जनकही तोच. तेव्हां आमच्या कवीनें देवापुढें कितीही 'लुब्रे'पणा केला असला, तरी त्याचा अपराध ह्मटला ह्मणजे बापापाशीं मुलानें अल्लडपणा केल्याप्रमाणेंच होय. हा पुत्रजनकभाव कवीनेंही कित्येक पद्यांत सुरस रीतीनें वर्णिला आहे. त्यांतून हिंदु धर्म हा प्रार्थनासमाजाच्या धर्मांप्रमाणें अभावरूप व मनोमय नसून त्यांतील देव डोळ्यानें दिसणारा, त्याचीं चरित्रें लिहून ठेवलेलीं, त्यांचा गजर नेहेमी कानाव येणारा, असा प्रकार असल्यामुळें कवीच्या वाणीस स्फूर्ति होण्यास, किंबहुना तिचें चापल्य प्रगट होण्यास, त्याची अनुकूलता किती अधिक आहे हेंही सर्वांच्या सहज लक्षांत येण्या-सारखें आहे. प्रार्थनासमाजीय भक्तानें ईश्वराचे गुण गाणें ह्मटलें ह्मणजे बिशप् हूकर् यांनीं आपल्या सर्वप्रसिद्ध ग्रंथांच्या आरंभीं ह्मटलें आहे तशीच अवस्थाः—

"Our safest eloquence concerning Him is our silence."

"आमचें ईश्वराविषयीं यथार्थ वक्तृत्व ह्मटलें ह्मणजे मौन हें होय.[1]" अशा ठिकाणीं वाग्देवीचा रिघाव करणें हें वाताकर्षक यंत्रानें निर्वायु केलेल्या स्थलीं घंटानाद करूं पाहण्या-सारखेंच होय!

येथवर मोरोपंताच्या तर्फेनें जे जे आह्मीं विचार सुचवले ते रावबहादुरांच्या प्रतिकूल टीकेपासून होणाऱ्या भ्रमाचें बरेंच निवारण करतील असें वाटतें; तरी वरील सर्व निरूपण हें वरील टीकेच्या शाखाविस्ताराचेंच केवळ खंडन झालें. पूर्वोक्त लेखावर केवळ 'मूले

१. आमचे अर्वाचीन सामाजिक हे कोणतेंही धर्मपुस्तक ईश्वरदत्त ह्मणून मानीत नाहींत हें सर्वप्रसिद्धच आहे. त्यांचें ह्मणणें असें आहे कीं सृष्टींत जेवढें ईश्वराचें स्वरूप प्रगट झालें आहे तेवढयावरून त्याचे सर्व गुण व्यक्त होतात. व भजकांस येवढें साधन बस आहे. या त्यांच्या मतास कितपत आधार आहे हें आमच्या मतें माजी जॉन् स्टुअर्ट् मिल्ल् याच्या धर्मविषयक 'निबंधत्रया' वरून बरेंच दिसून येईल. मिल्ल् हा कोणत्याच धर्मांचा नसून त्यानें केवळ मनुष्यबुद्धीनें वरील विषयावर जे विचार शोधक मनुष्याच्या मनांत येण्यासारखे आहेत तेच सदरील ग्रंथांत दाखल केले आहेत. पण असें असतां वरील ग्रंथांतील ईश्वरज्ञान व सामाजिकांचें ईश्वरज्ञान यांचा परस्पर थोडाच जम बसेल!

कुठारः' असा एक विचार अद्याप राहिलाच आहे. हा ह्मणजे आह्मीं रावबहादुरांसारख्यांस सुचवावा असें नाहीं; पण त्यांच्या व बहुतेक जुन्या मंडळींच्या लेखांत व भाषणांत असा प्रकार आढळतो कीं आमच्या देशाची गोष्ट आली ह्मणजे अगदीं डोळ्यांपुढें असणाऱ्या गोष्टींकडेही त्यांचें दुर्लक्ष होतें. ज्या साक्षी व जो पुरावा पाश्चात्यांच्या प्रकरणांत पुरून उरेसा होतो तोच आमच्या प्राच्यदेशीय प्रकरणांत कोता पडूं लागतो, किंबहुना त्याचें स्वरूप उलटें सुद्धां भासायाला लागतें. पाश्चात्यानें ताडावर चढणाऱ्या ताडीवाल्यास गोळी घालून ठार केला तरी बिचारा ताडीवाला मनुष्यजातीच्या खापरपंजोबाच्या ह्मणजे वानराच्या स्वरूपास मिळतो व साहेब दोषमुक्त होतात, किंबहुना त्यांच्या अग्नियंत्रशौंडत्वाची तारीफही व्हावयाला वेळेनसार चुकायाची नाहीं; तेंच इकडे कोणीं खऱ्याखुऱ्या वानरावर चाप झाडला कीं वानराचा मनुष्य होऊन त्याच्या मानेला तात बसते! तेव्हां असा प्रकार आढळत असल्यावरून प्रस्तुत टीकाकर्त्यासारख्या पंडितांसही अगदीं सामान्य सिद्धांताचीही कधीं कधीं आठवण देणें जरूर पडतें. प्रकृत प्रकरणीं लागू पडणारा सिद्धांतही असाच कांहीं मोठासा गूढ आहे असें नाहीं. तो हा होय कीं, काव्यांची परीक्षा जी करायाची ती रसिकजन त्यांतील सिद्धांतांच्या खरेखोटेपणावर तादृश करीत नसतात, केवळ अपसिद्धांताचें ज्यांत प्रतिपादन केलें आहे,ज्यांत सत्याचा लवलेशही नाहीं,असें काव्य केवळ अमोलिक असूं शकेल; आणि ज्यांत सात गाळ्यांतून काढलेलें निवळ सत्य ओतप्रोत भरलेलें आहे असलेंही काव्य कोणीं कवडीला सुद्धां विचारूं नये अशा वसुलाचें असेल. युक्लिड्च्या प्रमेयांवर कोणी छंदोबद्ध रचना केली तर तींत कितीसा रस उतरेल? प्रत्यक्ष भर्तृहरीनें व्याकरणावर कारिका रचल्या आहेत; पण त्यांतील रसाचें माधुर्य कोणत्या प्रकारचें आहे हें पाहण्याची कोणाची इच्छा असल्यास त्यानें संस्कृत भाषेच्या दुसऱ्या पुस्तकांत दाखल केलेल्या पांच सहा कारिकांचा आस्वाद घ्यावा. तो घेतला असतां सत्यदेवतेचा केवढाही भक्त असला तरी तो लवकरच पुरे झाल्याविना राहणार नाहीं! तीच मोठमोठ्या काव्यांची व नाटकांची गोष्ट पाहा; त्यांतील बहुधां सर्वांचीं कथानकें केवळ कल्पित असतात, व जगांत कधीं दृष्टीस न पडणाऱ्या गोष्टीही त्यांत वर्णिलेल्या आढळतात. पण इतकें असूनही कवित्वरसानें वरील ग्रंथ जसे काय उचंबळत असतात! याचें कारण उघडच आहे कीं, असत्यता ही मनोरंजकतेस स्वभावतः मुळींच विरुद्ध नसून उलटी तीस पुष्कळ अंशीं अनुकूलही आहे. तर आमच्या कवीचीं धर्मविषयक मतें रावबहादुरांच्या मताहून कितीही भिन्न असलीं, किंवा वादविषयक काव्यांत त्यानें ईश्वराचें वर्णन कोणत्याही पद्धतीनें केलें असलें, तरी कवित्वदृष्ट्या हे सर्व विचार केवळ बाह्य होत हें रावबहादुरांनीं लक्षांत आणायाचें होतें. प्रार्थनासमाजांत माजी भास्कर दामोदर पाळंदे यांची 'रत्नमाला' चालते, व तींतील पद्यें रावबहादुरप्रभृति विद्वान् भक्तजन दर आठां दिवशीं तालसुरावर गातात, तेव्हां तींतील ईश्वरवर्णन किती चोख असेल हें उघडच दिसतें; पण असें आहे ह्मणून वरील 'माले'स आमचे टीकाकार 'केकावली' वर, 'पॅराडैज लॉस्ट्' वर व 'इलियड्' वर नेऊन बसवतील काय? आमच्या पंतांस किंवा होमर्साहेबांस दी. दी. च्या परिक्षेस बसवून ईश्वरज्ञान या

विषयावर एक पेपर दिला असता तर दोघांसही बेताबातानेच मार्क मिळून 'नापास' हा ठिवा दोघांसही लागता यांत संशय नाहीं. कां कीं, आलीकडील सुधारलेल्या काळांतला व विशेषतः एकोणिसाव्या शतकांतील देव म्हटला म्हणजे तो दुर्बिणींतून व सूक्ष्मदर्शक यंत्रांतून दिसायाचा, पृथ्वीच्या पोटांतील थरांत व वृक्षपर्णावरील रेषांत प्रगट व्हावयाचा, असा आहे. पण बिचाऱ्या होमरच्या वेळेस तर त्याच्या साऱ्या देशभर व एका देवप्रिय लोकांखेरीज बाकीच्या साऱ्या जगभर अज्ञानजन्य व मूर्तिपूजाजन्य अंधकारच चोहोंकडे पसरला होता. त्यांतून कविमहाराजांस एक सोडून सात दुर्बिणी आणल्या असल्या तरी एकीचाही उपयोग न होता. ईश्वरज्ञानाचा दुसरा मार्ग म्हटला म्हणजे पवित्रशास्त्र व कुराण हे ग्रंथ होत. यांपैकीं पहिल्याचा कांहीं भाग कदाचित् होमरच्या वेळेस असेल नसेल ! दुसऱ्या कवीस मात्र दुसरा ग्रंथ सहज प्राप्त होण्याजोगा होता; पण त्यास त्याचे तेहेतीस कोटि देव सोडतील तेव्हां पैगंबर साहेबांच्या देवाकडे जाण्याची त्यास बुद्धि होणार ! त्यांतून 'पंधरा आणे निवळ बाष्कळपणानें भरलेल्या ग्रंथांवर त्याचें उपजीवन असल्यामुळें व अरसिकत्वास्तव त्यांतील भाकड कथांचीच त्यास गोडी लागल्यावर मग ईश्वराविषयीं चोख माहिती करून घेण्याचें त्यास कोठून सुचणार ! अठरा पुराणांनीं ज्यास ग्रासलें त्यास बिचारें एकटें कुराण काय करतें ? बाकी आमची पक्की खातरी आहे कीं, अकबर बादशहाच्या रंगेल पंडितरायांनीं* जसा यवनीशीं समागम करून इहलोकींच्या सुखसर्वस्वाचा अंगीकार केला, त्याप्रमाणें आमचे महाराष्ट्र कवि जर—

'श्रीराम याच नामीं न म्हणुनि अल्ला खुदा नबी रमला'।

या आर्येचा विपर्यास करून एकाद्या सुंदर मशिदींत इमाम होऊन बसते, व आपलें पूर्वपातक समग्र झाडून एक खरा अल्ला ओळखून राहते, तर 'केकावलीं'त त्यांनीं ज्या चुका केल्या आहेत त्या ते न करते, व सुधारलेल्या विद्वान् वाचकांनींही नाक मुरडूं नये असें काव्य त्यांच्या हातून निपजलें असतें. पण त्याविषयीं आतां खेद करून काय उपयोग आहे ! भाषेतील आद्यकाव्याचें विवेचन करतांना जसा कोणीही वाचक कधीं हा विचार करीत बसत नाहीं, कीं, जुपिटर् हा खरा देव होता कीं नाहीं, एक ग्रीक् वीर मार्स् देवाशीं व व्हीनस् देवीशीं लढला आहे असा प्रकार कवीनें घालणें हें बरोबर आहे कीं नाहीं, मार्स् व व्हीनस् यांचा व्यभिचारसंबंध, व्हीनस्नें काव्याच्या नायिकेस तिच्या जाराकडे नेऊन पोंचवणें, जुपिटर् येवढा देवाधिदेव असतां जूनो देवीनें त्याला जादूनें भारून रतिनिद्रापर करून फसवणें, वगैरे प्रकारांवरून होमरच्या देवविषयक कल्पना किती

---

* जगन्नाथराय पंडित—वस्तुतः हा कवि शहाजहानच्या कारकिर्दीत भरभराटीस आला. भामिनीविलास, रसगंगाधर, मनोरमाकुचमर्दिनी, गंगालहरी वगैरे ग्रंथांचा कर्ता. जहांगीर, दारा, शहाजहान या तिघांच्या कारकिर्दी त्यानें पाहिल्याचे उल्लेख खुद्द त्याच्याच रसगंगाधर वगैरे ग्रंथांत आहेत. त्यावरून अकबराच्या दरबारीं तो होता अशी परंपरागत हकीकत निराधार दंतकथाच समजली पाहिजे. नाहीं तर त्याला शंभरांवर वर्षे आयुष्य लाभलें होतें असें मानावें लागेल. 'सम्पादक'

अप्रशस्त होत्या–हे सर्व विचार रसिक वाचकांच्या जसे कधींही मनांत येत नाहींत; किंवा 'पॅराडैज लॉस्ट्' वाचतांना जसा कोणीही वाचक शेजारीं मिल्ल्साहेबांचे 'धर्मावर तीन निबंध' किंवा टॉमस् पेन याचा नास्तिकवाद ठेवीत नाहीं, व मूसा पैगंबरानें 'बैबल' च्या आरंभीं केलेल्या सृष्ट्युत्पत्तीचें वर्णन खरें कीं, अर्वाचीन ज्योतिषसिद्धांत व भूगर्भशास्त्र हीं खरीं, ॲडम् हा मनुष्यजातीचा पूर्वज खरा कीं, डार्विन्साहेबांच्या मताप्रमाणें वानर हा खरा, हे सर्व विचारही जसा तो खुशाल खिशांत घालून ठेवतो, व काव्यरसभरांत निःशंक वाहवतो, तशीच आमच्या महाराष्ट्रकवीच्या अत्युत्तम कृतीचीही गोष्ट आहे. जो खरा रसिक आहे तो रावबहादुरांनीं काढलेल्या आक्षेपांचा कधीं विचारही करणार नाहीं व ते त्याच्या मुळींच मनांतही यावयाचे नाहींत. कोहिनूर हिरा पाहायास सांपडला असतां जसा कोणीही असा विचार करणार नाहीं कीं, हा कोळशाचा भाऊ आहे. हा मूर्तिपूजकांच्या देशांत सांपडला असून जगन्नाथाच्या मूर्तीवर होता, तस्मात् हा कवडीचा माल आहे; फिडियस् * नामक ग्रीक् कारागिरानें केलेला जुपिटराचा पुतळा पाहिला असतां हा खोटा देव आहे, तेव्हां सुधारलेल्या समाजाच्या मनुष्यास संतोष करण्याचें यांत सामर्थ्य नाहीं असें जसा कोणी सामान्य मनुष्यही म्हणणार नाहीं; व्हीनस्ची § उघडी पुतळी पाहिली असतां 'स्त्रियश्चरित्रं' या श्लोकावर जसा कोणी पांडित्य करीत बसणार नाहीं, व कोणी करूं लागल्यास त्यास त्या देवीच्या अवकृपेंतल्या मंडळींत निवडण्यास फारशी अडचण नको; किंवा एकाद्या स्त्रीच्या रूपाची जी परीक्षा करायाची ती तिच्या धर्मावरून

---

* Phidias—(खि. पू. ४९०–खि. पू. ४३२) विख्यात ग्रीक् मूर्तिकार व खोदकाम करणारा. पेरिक्लिस्नें आपल्या कारकिर्दीतील कला–कौशल्याच्या अर्थसमधील सर्व कामांवर देखरेख करण्यास याला नेमलें होतें. Propylala (The Entrances) of Acropolis (or Cecropia) हें प्रमुख काम याच्याच देखरेखीखालीं झालें. Acropolis हा एक फारच प्रचंड खडक (५०० फूट रुंद, ११५० फूट लांब, व १५० फूट उंच) असून तो अथेन्स् शहराच्या मध्यमागीं होता. या खडकावरील Athena चें देऊळ हें दुसरें काम. या देवळाचे अवशेष ब्रिटिश् म्यूझियम् मध्यें आहेत. पण या देवळांतील देवतेची प्रचंड मूर्ति खुद्द फिडियस्च्या हातची होती. पुढें तो Elis व Olympia येथें गेला व आपल्या कारागिरीचा सर्वोत्कृष्ट नमुना Olympian Zeus ऊर्फ गुरु-(Jupiter) चा पुतळा त्यानें तयार केला. अथेन्सला परत आल्यावर पैशांची अफरातफर केल्याचा आरोप करण्यांत आला. पण अथीनाच्या मूर्तीवरील सुवर्णालंकार काढतां येण्यासारखेच तयार केले असल्यानें त्यांचें वजन पाहून आरोप खोटा ठरवितां आला. तथापि पुढें देवनिंदेचा (Impiety) आरोप त्याच्यावर करण्यांत आला. कारण त्यानें मूर्तीच्या ढालेवर पेरिक्लिसचें व आपलेंहि चित्र काढलें होतें. अखेर या आरोपावरून त्याला तुरुंगांत टाकण्यांत आलें व तेथेंच त्याचा अंत झाला.

'सम्पादक'

§ रोमन् लोकांतील प्रेमाची देवता. हिच्या लग्नाच्या दिवशीं पतीनें हिच्या केसांचा एक झुपका कातरून Venus व्हीनस् देवतेस अर्पण केल्यामुळें या नांवानें ती प्रसिद्ध झाली. Myrtle *Myrtus* वृक्ष तिचा आवडता असल्यामुळें Murtea किंवा Murcia हें नांव तिला मिळालें. हिचें ग्रीक् देवता Aphrodite हिशीं सादृश्य आहे. वसंतागमदर्शक एप्रिल महिना या देवतेस फार प्रिय असे. 'सम्पादक'

करणें, अथवा स्वराची करायाची ती तिच्या रूपावरून करूं पाहणें, हें जसें अत्यंत असमंजस; त्याप्रमाणेंच 'केकावलि' हें पुस्तक ट्रान्स्लेटरांच्या टेबलावर असतां व त्यांच्या पेनाच्या सपाट्यांत सांपडलें असतां त्याच्या गुणदोषांचें मान करण्यास काव्यविवेचनाचा जो कांटा काढायाचा तो न काढतां रावबहादुरांनीं त्याच्या ऐवजीं आपल्या प्रार्थनासमाजांतली धर्माधर्मविवेचनाची पवित्र तुला काढून आमच्या बिचाऱ्या नेटिव कवीच्या पदरांत त्यांनीं धर्मविषयक अज्ञानाचें व दांडगेपणाचें बेलाशक माप झोंकून दिलें, याचा आह्मास अत्यंत विस्मय होतो!

प्रस्तुत काव्याविषयीं आपलें मत प्रगट करतांना रावबहादुरांनीं आणखी असाही एक मोठा विचार मनांत आणणें अवश्य होतें कीं, मूर्तिपूजेच्या धर्मापेक्षां अमूर्त देवाची उपासना ही कितीही उत्कृष्ट असली, तरी पहिल्या धर्मांतील काव्याची परीक्षा कर्तव्य असतां हा दुसरा उंच प्रतीचा धर्म विशेष उपयोगी पडणारा आहे असें नाहीं. पाद्री साहेबांच्या पवित्र धर्मोपदेशानें व 'पवित्र शास्त्रां'तील तत्त्वज्ञानानें सद्धर्माचीं तत्त्वें आमच्या अर्वाचीन विद्वानांचे ठायीं बिंबलीं असतील खरीं; तरी ज्याप्रमाणें परिसाशीं संघटन होऊन लोखंड सोनें बनलें खरें; पण लोहचुंबकाची व त्याची संगत तुटली व त्यामुळें लोहचुंबकाचें सामर्थ्य ओळखण्याची त्याची लायकीही पण गेली, तशीच वरील पंडितांची स्थिति आहे. खिस्ती धर्म, मुसलमानी धर्म, ब्राह्मांचा धर्म, प्रार्थनासमाज, या सर्वांतील देवाकडे जितकें सन्निध जावें व तन्मय व्हावें, तितका इकडचा संबंध तुटला, व महाराष्ट्रकवींच्या कृतींवर अभिप्राय देण्याचा तितका अधिकारही कमी झाला.[१] पोरपणाचा अनुभव जसा तरुणपणीं नाहीं, तरुणपणाचा वार्धक्यांत नाहीं, वीराचें बाहुस्फुरण भित्र्यास नाहीं, कामिजनांचा रोमांचानुभव क्लीबांस नाहीं, तसेंच मूर्तिपूजकांच्या काव्यांतील प्रेम इतर धर्मांच्या लोकांस कळायाचें नाहीं, व त्यांच्या काव्यांतील रसानुभव मूर्तिपूजकांस घेतां येणार नाहीं. यास्तव ज्यानें त्यानें आपला जितका अधिकार आहे तितकाच सांभाळून त्याचें अतिक्रमण न करणें हें फार बरें. आमच्या रावबहादुरांस व त्यांच्या सद्धर्मानुसारी समाजबंधूंस आमच्या मूर्तिपूजक कवीचें काव्य पसंत न झालें ह्मणून तें वाईट ठरलें असें मुळींच होत नाहीं. जोंपर्यंत

---

१. दादोबांनीं 'यशोदापांडुरंगी'च्या प्रस्तावनेंत असाच अभिप्राय दर्शविला आहे:—

"ज्या देशांत व ज्या लोकांत रसभरित ह्मणून प्रसिद्ध काव्यें असतात, त्यांच्या गुणांचें यथायोग्य परीक्षण करण्यास, आणि त्यांची रुचि घेण्यास, त्याच देशाचे डोळे आणि जीभ असली पाहिजे. इतर लोकांच्यानें तसें यथान्याय परीक्षण होणें केवळ अशक्य असें माझें ह्मणणें नाहीं. कदाचित् ते विशालबुद्धीचे परीक्षक असल्यास योग्य परीक्षा करूं शकतील. परंतु त्यांच्या रुचीनें जो तद्देशीय सुज्ञांस आनंद होईल, त्याच मानाचा आनंद अन्यदेशीय विद्वानांस होणार नाहीं. याचीं कारणें बहुत आणि सूक्ष्म आहेत. ज्या लोकांत वंशपरंपरेनें ज्यांचा सहवास असतो, त्यांचा पूर्वापार व्यवहार, रीतिभाती, विद्या, ज्ञान, आचार, या सर्व गोष्टींच्या संघट्टनानें त्यांचीं मनें तशींच रंगलेलीं असतात. ह्मणून त्यांच्या काव्यानें जे हर्षशोकादि विकार त्यांच्या मनांवर होतील, तसे विकार अशा संघट्टनाच्या अभावामुळें ज्यांचीं मनें तशीं रंगलीं नसतात, त्यांजवर होणार नाहींत. अशा विचारानें पाहिलें असतां हें पुढील स्तोत्र, प्रौढ आणि रसिक काव्यांत गणिलें पाहिजे."

हजारों महाराष्ट्रजनांच्या हृदयास आमच्या सरस्वतीप्रिय मयूराचा टाहो भेदून जात आहे, जोंपर्यंत त्याचा सारा पिसारा उभारलेला पाहून त्याच्या अप्रतिम वैचित्र्यानें जनसमूह चकित होऊन राहत आहे, जोंपर्यंत मेघदर्शनजनित हर्षभरांत तो नृत्य करीत असतां वाग्देवीच्या नूपुरांचा मंजुल रव रसिकजनांस त्यांच्या कर्णांची धन्यता वाटवीत आहे, तोंपर्यंत कितीही रेवरेंडसाहेबांचें, मुल्लासाहेबांचे किंवा रावबहादुरांचे अभिप्राय त्यास प्रतिकूल पडले तरी त्यास तिळमात्रही धाक बाळगायाला नको. एका कवीनें ह्मटलें आहे:—

उदितवति द्विजराजे कस्य न† हृदयं मुदं परां धत्ते।
संकुचसि कमल यदयं हर हर वामो विधिर्भवतः॥

"चंद्राचा उदय झाला असतां कोणाचें हृदय आनंदभरानें व्याप्त होत नाहीं? पण अशा वेळींही जेव्हां तुझा संकोच होतो, तेव्हां, हे कमला तुझें दुर्दैव बलवत्तर ह्मटलें पाहिजे!" याप्रमाणेंच आमच्या द्विजराजाच्या वाणीचा रसानुभव घडण्यास ज्यांस समाज आडवा येतो ते एकेश्वरभक्तही अत्यंत अनुकंपनीय मात्र होत!

---

सुचिन्त्य चोक्तं सुविचार्य यत्कृतं। सुदीर्घकालेऽपि न याति विक्रियाम्।[1]

अंक ५५—(१) मागील विषय पुढें चालू. (२) द्वैत व अद्वैत मतें. (३) त्यांच्या सत्यासत्यत्वाविषयीं विचार. (४) अद्वैत मत हें 'खऱ्या' भक्तीचें कितपत विध्वंसक होय याविषयीं विवेचन.

१. मागील अंकांत रा. ब. रानडे यांच्या 'केकावली' विषयक लेखावर आम्ही आपले विचार वाचकांस सादर केले. आतां त्यांतील एका वाक्यावर मात्र चर्चा करणें राहिली आहे, तेवढी करून दुसरे आक्षेपक जे डॉ. विल्सन् साहेब त्यांचा आमच्या कवीविषयींचा लेख कसा काय आहे तो पाहूं.

२. वरील वाक्य हें होय—"वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग हा खऱ्या ईश्वरभक्तीचा केवळ विध्वंसक होय." आमच्या देशांत द्वैत व अद्वैत या दोन मतांचा प्रचार प्राचीन काळापासून आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. द्वैत मत ह्मणजे जीवात्मा व परमात्मा हे भिन्न होत हें होय; अद्वैत ह्मणजे ते अभिन्न ह्मणजे एकरूपच होत हें होय. पहिल्या मताचे प्रतिपादक असें म्हणतात कीं, जीव हा अल्पज्ञ, अल्पसामर्थ्य, विकारवश असा असतां सर्वज्ञ, सर्वशक्तिमान्, व निर्विकार जो परमात्मा त्याशीं त्याचें ऐक्य कसें संभवेल? यास्तव त्यांची सदोदित भेदस्थितिच राहणार, व दोहोंमधला सेव्य-

---

† 'हृदये मुदः पदं दधाति' असाहि पाठ आहे. 'सम्पादक'

१. "चांगला विचार करून जें बोलावें व करावें तें दीर्घकालानेंही विकार पावत नाहीं."

सेवकभाव हाही नित्य होय. जीवात्म्यास मुक्ति तीनच. सलोकता, समीपता, आणि सरूपता; सायुज्य मुक्ति त्यास कदापि होणार नाहीं. अद्वैतवाद्यांचें ह्मणणें असें कीं, एका परमात्म्यावांचून अवघ्या विश्वांत दुसरा पदार्थच नाहीं, अवघें चराचर हा त्याचाच आविर्भाव असून सर्व जीव हे त्याचेच अंश होत. ज्याप्रमाणें लाटा,[1] बुडबुडे व गारा हे तिन्ही विकार एका उदकाचेच होत, व तिघांसही पूर्वस्वरूपास मिळण्याची योग्यता आहे, त्याप्रमाणेंच सर्व जीवमात्र एका परब्रह्माचेच अंशभूत असून त्यांचा पृथग्भाग सरला असतां ते परमात्मस्वरूपास सहजच मिळणारे आहेत. हा पृथग्भाव अहंवृत्तीच्या ह्मणजे मीपणाच्या योगानें झालेला आहे. ह्मणजे वस्तुतः परमात्म्याशीं तादात्म्य असतां जीवानें ' मी निराळा ' अशी भावना बळकट धरल्यानेंच काय तो भिन्नभाव आलेला आहे. ज्या वेळेस त्यास स्वस्वरूपाचा बोध होईल त्या वेळेस गार विरून जसें पाणी होतें, त्याप्रमाणेंच अहंवृत्तिही नष्ट होऊन जीवात्मा परमात्म्याशीं अभेद पावेल. तसेंच चोहोंकडे अफाट पसरलेलें जें हें चराचर विश्व तेंही परमात्म्याच्या केवळ इच्छामात्रेंच उत्पन्न झालेलें असून जसा कोळी आपणच आपल्या शरीरापासून केलेल्या विस्तारास आवरूं शकतो, त्याप्रमाणेंच साऱ्या जगाचा आपल्या ठायीं लय करण्याचेंही परमेश्वरास सामर्थ्य आहे !

वरील वाद आज शेंकडों वर्षे या देशांत चालू आहे. शैव व वैष्णव या मतभेदाचें बीज वरील वादच होय; पहिले अद्वैतवादी व दुसरे द्वैतवादी होत. माध्व व रामानुज हे द्वैतमती आहेत; आणि शंकराचार्यांचे अनुयायी सर्व अद्वैतमताचा अभिमान बाळगतात. आमच्या महाराष्ट्र देशांत पाहिलें तर अद्वैताचाच सर्वत्र प्रचार आहे. महाराष्ट्रकवींपैकीं एकही द्वैतवादी नाहीं. हिंदुस्थानच्या बाहेरील राष्ट्रांत पाहतां प्रायः द्वैतमताचाच प्रसार आहे, तरी मुसलमान लोकांत 'सूफी' म्हणून एक पंथ आहे त्याचीं मतें व ग्रीक् लोकांतला मोठा तत्त्वज्ञ जो प्लेटो त्याचे तत्त्वविचार हे अद्वैतालाच पुष्कळ अंशीं अनुसरून आहेत. तसेंच सुमारें दोनशें वर्षांपूर्वी इंग्लंडांत होऊन गेलेला प्रख्यात तत्त्ववेत्ता बर्कले* याच्या उपपत्तिही वेदांतालाच अनुकूल आहेत.

---

१. मुकुंदराजानें ह्मटलें आहे:—

तुझिये इच्छेचा विस्तार विस्तारिलें हें चराचर ।
जीव अंशें अपार एकुरसी तूं ॥
प्रतिबिंबीं अभासक जैसा का तरणी सर्वत्र एक ।
तैसा सर्व जीवांसीं प्रकाशक परमात्मा तोची ॥

* George Berkley (1685–1753) ट्रिनिटी कॉलेज, डब्लिन्, येथें ग्रॅज्युएट झाला. याचा पहिला ग्रंथ गणितविषयक होता. दुसरा ग्रंथ 'Essay towards a New Theory of Vision' १७०९ मध्यें प्रसिद्ध झाला, त्यावर खूप रणें माजलीं पण अखेर त्यांतील सिद्धांत मान्य झाले. पुढें 'Treatise concerning the Principles of Human Knowledge' (१७१०) व 'Dialogues between Hylas and Philonous' (१७१३) हे तत्त्वज्ञानविषयक, खळबळ

( पुढें चालू. )

३. वर येवढा विस्तार करण्याचें प्रयोजन हें कीं, 'वरील तत्त्वज्ञानाचा मार्ग' ह्मणजे कोणता तो वाचकांच्या चांगला लक्षांत यावा. तेव्हां यावरून वाचकांस कळून आलेंच असेल कीं, रावबहादुरांचा रोख अद्वैतमतावर आहे. हें मत ईश्वरभक्तीचें विध्वंसक होय असा त्यावर आक्षेप होय.

रा. ब. रानडे हे प्रार्थनासमाजाचे एक अध्वर्यु आहेत हें आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस माहीत असेलच. या समाजास ख्रिस्ती धर्मांतील तत्त्वें किती संमत आहेत, किंबहुना समाजाच्या उत्पत्तीचा या धर्मांशीं कितपत संबंध आहे, हेंही पुष्कळांस बहुधा सांगायाला नकोच. तेव्हां 'पृथ्वीवरील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचा जो धर्म' त्यास परमसंमत जें द्वैतमत तें प्रस्तुत आक्षेपकांच्या मनांत कितपत बिंबलें असेल, व त्यामुळें तद्विरुद्ध मत त्यांस कितपत मान्य होण्याजोगें असेल, याचीही कोणास सहज कल्पना होईल. आतां आमच्या महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांतून ओतप्रोत भरलेलें जें अद्वैतमत त्याच्या तर्फेनें रावबहादुरप्रभृति आक्षेपकांस आमचें एक तर हें सांगणें आहे कीं, अनेक पवित्र व सत्य धर्मांस तें कितीही असंमत असलें, व मिशनरी साहेबांनीं त्याजवर कितीहि नाकें मुरडलीं तरी जोंपर्यंत जीवात्म्याचें स्वरूप अमुक व परमात्म्याचें अमुक असें कोणाच्याही प्रत्ययास आलें नाहीं तोंवर अद्वैत मत हें असत्यच असें कोणासही ह्मणण्यास अधिकार नाहीं. ज्या दिवशीं रसायनज्ञांचीं यंत्रें आध्यात्मिक विषयांवर चालू होतील, व पंचमहाभूतांचें जसें आलीकडे पृथक्करण झालें आहे, तसें चैतन्याचें व जगचालक शक्तीचेंही होईल, त्या दिवशीं द्वैताद्वैतप्रकरणाचा चोख निकाल होणार आहे. पण हें जोंपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत अमुक खरें व अमुक खोटें असें आग्रहानें पाहिजे तर ह्मणावें, पण 'जुक्ती'स धरून कोणासही ह्मणतां येणार नाहीं. त्यांतून ज्या मताचे प्रतिपादक शंकराचार्यांसारखे शेंकडों महान् महान् तत्त्वज्ञ होऊन गेले व ज्याची छाया द्वीपांतरींही कोठें कोठें दृष्टीस पडते, त्याविषयीं निश्चयात्मक विरुद्ध उल्लेख करणें हें कांहीं अंशीं साहसात्मकच होय.

४. पण हें केवळ प्रस्तुत आक्षेपाच्या सामान्य स्वरूपाविषयीं झालें. साक्षात् त्या-

---

उडवून देणारे, व (Materialism) जडवादावर जोराचा हल्ला चढविणारे ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्याची विचारसरणी अपूर्व असल्यानें त्या वेळीं तिचीं चोहोंकडे टर उडविण्यांत आली. डॉ० क्लार्कसारख्या हाताच्या बोटांवर मोजण्याइतक्या खऱ्या तज्ज्ञांनीं मात्र बर्कलेची बुद्धिमत्ता ओळखली. पुढें तो इंग्लंड्ला गेला. ॲडिसन्, पोप, स्टील यांच्याशीं त्याची ओळख झाली. पुढें युरोप खंडांत जाऊन आल्यावर डब्लिन्च्या पिद्यापीठांत त्यास लेक्चरर् व डी.डी. करण्यांत आलें. १७२५ सालीं वसाहतीं करतां प्रधान व हिंदुस्थानकरतां मिशनरी तयार करण्यासाठीं Bermuda येथें एक कॉलेज स्थापण्याची योजना करून तिला आपली सालिना ११०० पौंडाची मिळकत यानें देऊन टाकली. Aleiphron, or the Minute Philosopher, The Querist, Siris, Further Thoughts on Tar Water हे याचे अखेरचे ग्रंथ होत. Locke व Hume यांच्या दरम्यान याच्या येवढा मोठा तत्ववेत्ता झाला नाहीं.

'सम्पादक'

विषयींचा विचार तर याहूनही जड जाण्यासारखा आहे. रावबहादुरांच्या म्हणण्याप्रमाणें पाहिलें असतां अद्वैत मत आणि खरी भक्ति यांचा परस्पर अत्यंत विरोध आहे; म्हणजे ज्यानें अद्वैत मत अंगीकारलें त्याच्या हृदयांत भक्तीनें ठाव सोडलाच म्हणायाचें! खरेंच, जो येवढा 'निपट धृष्ट' बनला कीं आपण व ईश्वर एकच असें मानायाला लागला, त्याच्या ठायीं भक्ति कशी वास करील? जो दांडगा भक्त,

आधीं होता संतसंग तुका झाला पांडुरंग ।

असें म्हणायाला चुकत नाहीं,

त्याचें भजन राहीना मूळ स्वभाव जाईना ॥

हें संभवेल तरी कसें? तेव्हां 'विवेकसिंधु'कारापासून तों 'केकावलि'कारापर्यंत 'पायलीचे पंधरा व अधोलीचे सोळा झालेले सर्व महाराष्ट्रकवि', तसेंच आळंदी, पंढरपुर, काशी वगैरे ठिकाणीं आजपर्यंत यात्रेस गेलेले कोट्या(ट्य? सं०)वधि लोक, जगद्गुरु आचार्यांसारखे सर्व अद्वैतवादी, हे चट सारे अभक्तिमान् झाले! निदान यांच्यांत 'खऱ्या' भक्तीचा तरी लवलेशही मिळायाचा नाहीं! या 'खऱ्या' भक्तीचें स्वरूप काय असावें याविषयीं आह्मीं पुष्कळ विचार करून पाहिला, पण अद्याप आह्मांस उमज पडत नाहीं. तुकाराम, नामदेव वगैरे मंडळी 'खरे भक्त' नव्हेत. 'केकावली'सारख्या काव्यांत 'खरी भक्ति' नाहीं, तर मग ही भक्तीची चीज आहे तरी कोठें? असें तर नसेल ना, कीं बाप्तिस्मोदकाचें सेचन, त्वगग्राचें लवन, यज्ञसूत्राचें छेदन, अपूपसेवन, हीं महासाधनें जवळ केल्याव्यतिरिक्त 'खऱ्या भक्ती'चा बोध होणेंच नाहीं! अशी कांहीं गुरुकिल्ली असेल तर मग आह्मांस कबूल आहे, कीं आमचे सारे महाराष्ट्रकवि 'खऱ्या भक्ती'चें स्वरूप न जाणतांच निजधामास गेले, व तें आमच्या सारख्यांसही समजण्याची बहुधां गोष्टच नको!

वरील वाक्य हें इंग्लंडांतल्या एकाद्या त्रैमासिकांत किंवा मिशनरीं(ऱ्यां? सं०)च्या एकाद्या पत्रांत आलें असतें, तर फारसा चमत्कार वाटण्यास कारण नव्हतें. कारण विलायतेंत मोठमोठ्या ग्रंथकारांसही इकडच्या अगदीं साधारण गोष्टींचेंही ज्ञान कितपत असतें, व त्यांतून मिशनरी साहेबांच्या मनांत तर आमच्या देशाविषयीं किती पवित्र कल्पना सदोदित घोळत असतात, हें सर्वांस मशहूरच आहे. तेव्हां अशांनीं आमच्या देशांतल्या अद्वैतमताची बातमी ऐकली म्हणजे त्यांस सहजच त्याची तेव्हांच उपपत्ति करतां येणार आहे, कीं हा खिस्तशत्रूचा प्रताप होय! त्याचा साऱ्या मनुष्यमात्रावर संमोहनास्त्र टाकण्याचा पहिल्यापासून उद्योग सतत चालूच आहे, आणि त्यांतून आमच्या हिंदुस्थानावर तर त्याची जी कृपा आहे ती कांहीं अतोनात! तेव्हां पूर्वीं त्यानें आपण स्वत: जसा देवाशीं धष्टाईनें साम्ना केला व आपणास स्वपरिवारासह अक्षय नरकाग्नींत पाडून घेतलें, त्याप्रमाणेंच बिचाऱ्या हतभाग्य हिंदूंच्या मनांत आपण व देव हे एकच आहों अशा अत्यंत धृष्टतेच्या व पातकाच्या कल्पना तो भरवून देत असेल यांत नवल कसचें? याप्रमाणें तेव्हांच उपपत्ति करून एकाद्या पाश्चात्य पंडितानें जर असा सिद्धांत ठोकून दिला असता, कीं असलें दांडगाईचें मत ज्यांचे ठायीं बिंबलें त्यांच्या ठायीं ईश्वरभक्तीचें नांव कशाला पाहिजे, तर तें शोभून

गेलें असतें. कां कीं, दूरस्थ मनुष्यास कोणत्याही गोष्टीचा एकदेशच प्राय: समजत असतो; तेव्हां त्याजपाशीं तर्कशास्त्र कडकडीत असलें म्हणजे मग तो काय उपपत्ति करूं शकणार नाहीं! ह्व्या तितक्या करील. पण तसलें पांडित्य खुद्द तद्देशीयांनींही करणें हें अत्यंत असमंजस होय. इकडील मनुष्यानें कोणीं ऐकलें, कीं विलायतेंत व्हिग् पक्षाचे लोक आहेत ते राजाला व प्रजेला समसमान लेखतात, या पक्षाच्या लोकांनीं एका राजावरचा§ राजद्रोह शाबीत करून त्याचें डोकें तोडलें, व त्याच्या पुत्रास† पुढें कांहीं वर्षांनीं देशोधडीस लावलें, जुनियस्* म्हणून एक बहादर होता त्यानें तर खुद्द राजाला प्रजेच्या तर्फेनें पाहिजे तसें चापून पत्र लिहून वर्तमानपत्रांत प्रसिद्ध केलें,—या सर्व गोष्टी ऐकून इकडे जर कोणीं असा तर्क केला कीं, इंग्रेज लोक हे आपल्या राजाला केराबरोबर मानतात, तर त्यास फारसें नांव ठेवतां येणार नाहीं; कां कीं वरील गोष्टी अगदीं विलक्षण असून त्यांवरून दूरस्थ मनुष्यानें वरील अनुमान काढणें हें सहजच आहे. पण तिकडची स्थिति ज्यास नेहेमीं डोळ्यांपुढें दिसते आहे त्यानेंही वरीलच अभिप्राय प्रगट केल्यास चालेल काय? तर याप्रमाणेंच अद्वैतमताचें पुरतें स्वरूप लक्षांत न आणतां, व त्यास अनुसरणाऱ्या लोकांचा आचार पाहतां आपल्या उपपत्तीस ताळा मिळतो कीं नाहीं याचाही फारसा विचार न करतां केवळ आग्रहपूर्वक एकादा उल्लेख साऱ्या राष्ट्राच्या संबंधानें करणें हें केवढें साहस होय! अद्वैतवाद्यांनीं केवळ उपपत्तीच्या द्वारें जीवात्म्याचें व परमात्म्याचें ऐक्य मानलें म्हणून व्यवहारदृष्ट्या कोणता भेद झाला? रसायनवेत्त्यांनीं हिऱ्याचें आणि कोळशाचें ऐक्य स्थापित केलें म्हणून जवाहिऱ्यांचीं दुकानें बसलीं काय? किंवा हिऱ्यांचे दागिने अंगावर घालतांना कोणास आपलें अंग काळें होईल असा धाक वाटला काय? कोणी पदार्थविज्ञान शिकून तयार झाला, आणि हें तत्त्व त्याच्या मनांत पक्कें बिंबलें, कीं पदार्थ निराधार असले म्हणजे पडतात हें अगदीं खोटें आहे; तर असला मनुष्य आपल्या घराच्या आढ्यावर चढून किंवा एकाद्या कड्यावर जाऊन तेथून खालीं उडी मारील हें संभवतें काय? त्याला जर कांहीं अक्कल म्हणून असेल तर त्यास सहज कळेल कीं, न्यूटनचा सिद्धांत कितीही खरा असला, तरी वरच्यासारखी उडी मला मारतां कामा नये. जोंपर्यंत मी या पृथ्वीवर आहें व तिजपासून कोट्या(व्य? सं०)वधि कोस दूर अंतरालांत जाऊन राहण्याचें मजमध्यें सामर्थ्य आलें नाहीं, तोंपर्यंत माझ्या अंगीं पतनोन्मुखता असली काय, किंवा पृथ्वीच्या अंगीं आकर्षणशक्ति असली काय, मला दोन्ही सारखीच आहेत. अरिस्टॉटलचें मत खरें असलें किंवा न्यूटनचें खरें असलें, तरी माझी तंगडी मोडायाची ती मोडेलच! हीच गोष्ट द्वैत व अद्वैत या मतांसही लागू आहे. कोणतेंही मत घेतलें तरी देव व मनुष्य यांचा पूज्यपूजकभाव सुटत नाहीं. द्वैतवाद्याच्या मतें वरील भाव तर सिद्धच आहे; अद्वैतवाद्याच्या

---

§ पहिला चार्लस्. 'सम्पादक'

† दुसरा चार्लस्. 'सम्पादक'

* मागें पृष्ठ ७२६ टीप व ७४५ ¶ वाइल्कस् ही टीप पाहा. 'सम्पादक'

मतें तरी द्वैत घालवण्याचा उपाय ईश्वरभजनच होय! अद्वैतवादी असें ह्मणणारा तर कोणी अद्याप निपजला नाहीं, कीं मीं सर्व सृष्टि निर्माण केली, सारीं महाभूतें माझ्या सत्तेनें आपापलें काम बजावीत आहेत, मी सर्वशक्तिमान् व सर्वज्ञाता आहे? येवढे अद्वैतवाद-धुरीण शंकराचार्य, पण त्यांनींही आपल्या शिष्यवर्गाकरतां ईश्वरोपासनानिमित्त अनेक स्तोत्रें करून ठेवलीं आहेत. उघडच आहे कीं, सोनें ह्मणून कोणापुढें जर अशोधित धातूचें एक ढेकूळ आणून टाकलें, तर त्यानें लागलीच सोनारास बोलवायास जाऊं नये; अगोदर भट्टी तयार करून रसायनक्रियांच्या तजाविजीस लागावें, मग जशी भट्टी उतरेल तसें सोनें बनेल. आमच्या शूद्रकवीनें ह्मटलें आहे:—

> ब्रह्मज्ञान नव्हे लेंकराच्या गोष्टी। तेथें व्हावा पोटीं अनुताप ॥
> दगडाहुनी जीव करावा कठीण। अंतरींचा शीण तेव्हां जाय ॥
> मेल्या मनुष्याची न धरती आस। तैसा हो उदास संसारासी ॥
> तुका ह्मणे येथें करारचें काम। मग आहे राम जवळींच ॥

तसाच पुढील जनभाषेंत रूढ झालेला अभंगः—

> चणे खावे लोखंडाचे। मग ब्रह्मपदीं नाचे ॥

तेव्हां केवढाही निःसीम अद्वैतवादी असला तरी त्यास भक्ति सुटत नाहीं; द्वैताचें मालिन्य झडून अद्वैत सिद्ध होण्यास वरीलच काय तो उपाय होय व्यवहारांत पाहतां हाच प्रकार आढळतो. वैष्णवांपेक्षां शैवांत कर्मकांडाचा प्रचार कमी आहे असें नाहीं; तसेंच आमच्या महाराष्ट्र देशांतील कवींनीं अद्वैतावर कितीही कटाक्ष ठेवला तरी त्यांनीं भक्तीचा निषेध कोठेंही केला नाहीं. उलटें जेथें तेथें तिचें माहात्म्यच वर्णिलेलें आढळतें. मग इतकें सर्व असून 'हें तत्त्वज्ञान भक्तीचें केवळ विध्वंसक होय' या वाक्याचा अर्थ काय समजायाचा? उपपत्तिदृष्ट्या वरील विध्वंसकता सिद्ध होत नाहीं, आणि व्यवहार तर वरील वाक्याच्या अगदीं उलट नजरेस येतो, मग उक्त वाक्याची प्रतीति घ्यावयाची तरी कोठें?

आतां प्रस्तुत आक्षेपकांचा असा आशय असला तर न जाणों, कीं खऱ्या एकेश्वरास सोडून सतराशें साठ देवांस जें भजणें ती भक्ति कसची? आलीकडील एकोणिसाव्या शतकांतल्या देवाची सुधारलेल्या रीतीनें उपासना न करतां माजी नेटिव देवांस जुन्या खुळ्या रीतीनें भजणें हें काय कामाचें? असा कांहीं रावबहादुरांचा अभिप्राय असल्यास मग कांहीं बोलणें उरलें नाहीं. जर आमच्या अद्वैतवाद्यांस खरा देव मुळीं सांपडलाच नाहीं, तर मग ते खरी भक्ति करतात तरी कसची? मृगजळच जर मुळीं खोटें, तर मग त्यांत स्नान केल्याची प्रतिष्ठा ती काय वर्णायाची आहे? या आक्षेपांवर येवढें मात्र ह्मणतां येईल, कीं ईश्वराचें स्वरूप सर्व जग जें सामान्यतः समजतें, त्यावरून पाहतां, कोणी कशाही रीतीनें त्याचा स्तव केला तरी तो त्यास मान्य व्हावा असें वाटतें. ऐहिक प्रभूंकडे कोणास अर्ज करायाचा असला, तर तो जसा अमुक तऱ्हेनेंच गेला पाहिजे, त्यावर मायना अमुक तऱ्हेचाच असला पाहिजे, अशा शेंकडों भानगडी असतात, व तसें कांहीं नसलें ह्मणजे

अर्जदारावर अर्धचंद्रप्रयोग होण्याचें भय असतें, तसा कांहीं प्रकार या थोरल्या दरबारांत बिलकुल नाहीं असा एकंदर जगाचा अभिप्राय दिसतो. आतां हें खरें, कीं जुना करार, नवा करार, कुराण, जेंदावेस्ता, वेद या सर्वांचें आपल्या परिपक्क बुद्धीनें घाटण करून आमचे नूतन सामाजिक जसें आपल्या एकेश्वरास भक्तीचें मसालेदार खाद्य देतील, तसलें आमच्या जुन्या भक्तमंडळीकडून कोठून मिळणार? त्यांस धड ना व्युत्पत्ति, ना शास्त्रज्ञान, ना व्याकरण; जसे अर्धेबोबडे दोन शब्द वेडेवांकडे त्यांस सुचतील तसे त्यांनीं बोलायाचे! तरी पण 'भक्ती'चा अर्थ आम्हांस जो कळतो त्यावरून पाहतां तिचा अंश आमच्या भावड्या भक्तमंडळींत जितका सांपडेल, तितका मोठमोठ्या सुधारलेल्या समाजांतून आढळेल कीं नाहीं, याचा आम्हांस संशयच आहे. पूर्वीं सोमनाथ, मथुरा, वगैरे ठिकाणीं कुराणवाल्यांनीं जशी खऱ्या देवाप्रीत्यर्थ धुमाळी केली, तसें एखादें वावटळ पुढें कधीं काळीं पुनः सुटलें म्हणा; तर अशा प्रसंगीं विश्वेश्वर, महाकालेश्वर, जगन्नाथ, विठोबा वगैरे देवांच्या संरक्षणार्थ जितकी मंडळी गोळा होईल, तितकी प्रार्थनासमाजमंदिराच्या किंवा दयानंदस्वामी, जोतिबा फुले यांच्या पुतळ्यांच्या बचावाकरतां जमेल काय? आमच्या जुन्या वेडगळ धर्मानें सुलतान महंमद, अवरंगजेब, टिपू सुलतान असल्या जाडी इसमांचा छळ सोसला, व पोप साहेबांच्या शिष्यांनींही शक्त्यनुसार त्याचा बराच उच्छेद मांडला असतां त्यांतूनही तो पार पडला; तसला उगीच थोडासा प्रयोग आमच्या 'खऱ्या भक्तिमान्' अर्वाचीन मंडळीवर होण्याचें जर चिन्ह दिसूं लागलें, तर ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधकसमाज, यांच्या दप्तरांतील पटांवर कितीशीं नांवें उरतील बरें? उद्यां जर 'इसापनीतीं'तील वायुसूर्यांच्या भांडणाप्रमाणें† विठोबाचा व एकेश्वराचा वाद जुंपून कोणा-वर आपल्या भक्तांचें अधिक प्रेम आहे हें त्यांनीं पाहण्याचें मनांत आणलें आणि पंढरपुरच्या देवळाच्या गाभाऱ्यांत व प्रार्थनामंदिराच्या सभास्थानीं असा नाद घुमला कीं पुढील सालच्या अमुक दोन दिवसभर आमच्या भक्तांनीं कडकडीत उपास करावा, तर पारण्याचा तिसरा दिवस उजाडेपर्यंत कोणत्या देवाच्या भक्तांचा धीर निघेल? आम्हांस खचीत वाटतें कीं, तिसऱ्या दिवशीं देवापुढें हजर होण्याचे वेळेस कोणी भक्तजन तरी त्यास असें सांग-णारे भेटतील कीं, 'असल्या विलक्षण अटी आम्ही कधीं सोसणार नाहीं; त्यांतून आम्ही समाजांतील उपासक असलों म्हणून इतकी धस आम्ही आपल्या अंगाला लावून घेतलीच पाहिजे असें कांहीं ठरत नाहीं!' सारांश, आमच्या नवीन भक्तांस ईश्वराविषयीं कदाचित् अधिक यथार्थ ज्ञान झालें असेल, त्यांनीं दुर्बिणींतून व सूक्ष्मदर्शकांतून त्याच्या चातुर्याची व सामर्थ्याची अधिक पारख केली असेल, सेंटपॉलच्या देवालयांतील व्यासपीठावर नेऊन उभें केलें असतां ते मोठें रसभरित 'सर्मन्' देतील, डी. डी. च्या परीक्षेंत शेंकडा नव्वद

---

† सूर्य खूप तापूं लागतांच प्रवाशानें कपडे फेंकून दिले पण वारा जितका जितका ज्यास्त जोराचा सुटूं लागला तितका प्रवासी आपले कपडे अंगाभोंवतीं ज्यास्त ज्यास्तच घट्ट लपेटून घेऊं लागला व अशा रीतीनें सूर्याचें सामर्थ्य ज्यास्त ठरलें अशा अर्थाची ही गोष्ट आहे. 'सम्पादक'

मार्क होवतील, हें सर्व त्याच्या ठिकाणी संभवेल; पण 'खरी भक्ति' ही जर शब्दार्थज्ञाना-पलीकडे कांहीं असेल, तिचा संबंध मानसिक वृत्तींपेक्षा हृदयवृत्तींशी जर विशेष असेल, ती केवळ भाषणानें जर सिद्ध होत नसेल तर तिचें वास्तव्य वगैरे मंडळींत व बूटस्टॉकिंग्-वाल्या आग्या विद्वानांत फार करून थोडेंच दृष्टीस पडेल—

देह जावो अथवा राहो। पांडुरंगीं दृढ भावो॥

असल्या अटीचे बाणेदार शिपाई जर पाहायाचे असले तर तुकोबा, ज्ञानोबा यांच्या कंपूंतच ते आढळणार!

आतां 'खऱ्या भक्ती'चें एक मात्र स्वरूप सांगण्यासारखें राहिलें आहे. तेवढें सांगून प्रस्तुत प्रकरण आटपतों. मागील अंकांवरून§ वाचकांस कळलेंच आहे कीं, 'केकावली'त मोरोपंतानें ईश्वरांत व आपणांत किती अंतर आहे तें न ओळखून त्याशीं सलगी केली आहे. ही सलगी अद्वैतमताचा परिणाम होय व 'खऱ्या भक्तीस' विरुद्ध होय, असा रावबहादुरांचा रोख दिसतो. आतां या आक्षेपाच्या संबंधानें पूर्वीं† एक गोष्ट तर वाचकांस कळवलीच आहे कीं, ईश्वरामध्यें व मनुष्यामध्यें कितीही अंतर असलें तरी तें अंतर सार्वभौम राजा-मध्यें व त्याच्या मुलामध्यें जसें असतें तसें होय. भर दरबारांत बाप आपल्या अमीरउमरावां-बरोबर बसला असतां मुलानें बापाकडे दुडदुडां धावत जाऊन अंकारोहण केलें, किंवा कांहीं लडिवाळपणाचें भाषण केलें, तरी त्या सलगीबद्दल मुलाचें पारिपत्य होण्याचें जसें भय नको; त्याप्रमाणेंच आमच्या देशांतील कवींनी ईश्वराचा गुणानुवाद करतांना प्रसंगानुसार जरी कांहीं अतिप्रसंग केला असला, तरी त्यावर म्हणजे मोठा दोष येतो असें आम्हांस वाटत नाहीं. त्यांतून 'केकावलि' काव्य पूर्वींच्या एकंदर पद्धतीवर व त्यां लोकांकरतांच रचलें असल्या-मुळें त्यांत अर्वाचीन भक्तजनांस अतिप्रसंग वाटण्यासारखा जरी प्रकार मधें मधें असला, तरी काव्याची रसहानि होत नाहीं, हेंही मागें* सांगण्यांत आलेंच आहे. आतां ही सलगी अद्वैतमतापासून झाली आहे हें जें म्हणणें आहे त्यावर एक तर अशी अडचण येणार आहे कीं, आमच्या देशांत वैष्णवांचीं काव्यें पाहिलीं असतां तीं तरी प्रकृत दूषणा-पासून मुक्त आहेत असें नाहीं. त्यांतही वादविषयक काव्यांतला प्रकार किंबहुना त्याहूनही अधिकच आढळेल. उदाहरणार्थ वेंकटाध्वरीचें 'लक्ष्मीसहस्र' घ्या. या काव्याची पंडित लोकांत पुष्कळ ख्याति आहे. यांतील भक्त्युद्गारांविषयी अशी आख्यायिका आहे कीं, 'चंडिकाशतक' रचल्यानें बाणभट्टास जसे पुनः पाय आले व 'गंगालहरी'च्या श्रवणानें सुप्रसन्न होऊन भागीरथीनें जगन्नाथरायास यवनीसहवर्तमान प्रत्यक्ष पावन करून घेतलें, त्याप्रमाणें 'लक्ष्मीसहस्रा'नें वरील द्रविड कवीस पुनः डोळे आले! ही आख्यायिका प्रस्तुत काव्य वैष्णवांस किती प्रिय आहे हें दर्शविते. दुसरा वैष्णवप्रिय ग्रंथ पाहिजे असल्यास

---

§ ५२ वा व ५४ वा. 'सम्पादक'
† पृष्ठ ८५२ पाहा. 'सम्पादक'
* पृष्ठ ८४९—५१ पाहा. 'सम्पादक'

'गीतगोविंद' आहे. यांतील अष्टपद्या कर्नाटकांत आबालवृद्धांस येत असतात व स्त्रियासुद्धां गातात. आतां या दोन्ही ग्रंथांत उपास्य देवतेविषयींचा कवीचा भाव पाहिला असतां तो रावबहादुरांस आवडण्यासारखा आहे असें नाहीं. तो प्रार्थनासमाजांतील उपासनेसारखा मोठा मर्यादेचा व नम्रपणाचा नसून प्रस्तुत 'केकावली'तल्यासारखाच अत्यंत सलगीचा आहे. फार तर काय, पण पहिल्या काव्यांतील शृंगारस्तबक व दुसऱ्यांतील बहुतेक भाग यांतील वर्णनास 'सलगी' हा शब्द तरी मोठ्या मुरवतीनेंच लावायाचा! असो; तर या दोन उदाहरणांवरून अद्वैतावर जें प्रस्तुत दूषणाचें जनकत्व घातलें आहे तें बरोबर नाहीं असें स्पष्ट दिसून येईल.

आमच्या कवीच्या तर्फेचा दुसरा पुरावा 'पृथ्वीवरील अत्यंत सुधारलेल्या राष्ट्रांचें जें पवित्र धर्मपुस्तक' त्यावरूनही घेण्यासारखा आहे. वेदांतशास्त्राचा व 'बैबला'चा किती विरोध आहे हें सांगायास नकोच. पहिल्याचा सिद्धांत जो कीं सर्व जीव व एकंदर विश्व हें परब्रह्माचाच आविर्भाव होय, त्याच्या अगदीं विरुद्ध बैबलांतील लेख आहेत. 'पवित्रशास्त्रा'च्या पहिल्याच दोन अध्यायांत एकंदर सृष्टि व मनुष्यजाति यांची उत्पत्ति वर्णिली आहे; तिजवरून वरील विरोध स्पष्ट लक्षांत येण्यासारखा आहे.[1] तेव्हां सदरील ख्रिस्ती शास्त्र हें पूर्ण द्वैतमय आहे हें उघड आहे. पण असें असतां रावबहादुरांनीं खऱ्या भक्तीचीं लक्षणें ह्मणून सांगितलेल्या ज्या हृदयवृत्ति—ह्मणजे भयचकितता, अत्यंत नम्रीभाव इत्यादि त्या वरील पवित्र ग्रंथांत सर्वत्र दृष्टीस पडतातच असें नाहीं. पहिला मनुष्य जो आदम त्यापासून तों त्याची पुढील संतति जे देवाचे आवडते लोक यहुदी त्यांच्या वृत्तांतापर्यंत पाहतां देव हा मनुष्याचा संवगडी होय किंवा पुढारी होय अशी कल्पना 'पवित्रशास्त्रा'वरून होते. देव हा संध्याकाळच्या थंडगार वेळीं आपण नवीन केलेल्या बागेंत हवा खावयास येत असे तेव्हां आदम व त्याची स्त्री ईव्ह या उभयतांचा समाचार घेई,[2] त्यांचा मुलगा हाबेल् यानें कोंवळीं व पुष्ट कोंकरें देवास अर्पण करावीं तीं त्यानें प्रीतीनें घ्यावीं, नोहास त्यानें नौकेची कल्पना सांगून त्यास एकट्यास जलप्रलयांतून वांचवलें, मोझ्यास सीना पर्वतावर त्यानें दहा आज्ञा सांगितल्या, मिसरी लोकांच्या दास्यांतून सोडवून यहुदी लोकांस स्वदेशास आणतांना त्यानें तांबडा समुद्र दुभंग केला, आणि कधीं 'जळत्या झुडुपां'त दिसून, कधीं 'ढगांचा खांब' व कधीं 'अग्नीचा खांब' होऊन तो त्यांस मार्ग-

१. "प्रारंभीं देवानें आकाश आणि पृथ्वी हीं उत्पन्न केलीं." (उत्पत्ति—अध्याय १, ओंवी १.) "तेव्हां परमेश्वर देवानें भूमींतील मातीचा माणूस घडिला, आणि त्याच्या नाकपुड्यांमध्यें जिवाचा श्वास फुंकिला, मग माणूस श्वासवान् जीव झाला." (कित्ता—अ० २, ओं० ७).

२. "नंतर दिवसांतील वाऱ्याच्या वेळेस परमेश्वर देव बागांत चालत असतां त्याचा शब्द त्यांनीं ऐकिला; तेव्हां आदाम व त्याची बायको हीं परमेश्वर देवाच्या दृष्टीपासून बागांतील झाडांच्यामध्यें लपालीं. तेव्हां परमेश्वर देव आदामाला हाक मारून त्यास बोलला, तूं कोठें आहेस? तेव्हां तो बोलला कीं, म्यां बागामध्यें तुझा शब्द ऐकिला आणि मी नागवा यास्तव भ्यालों व लपालों...." (उत्पत्ति—अध्याय ३.)

दर्शक झाला,—या सर्व वृत्तांतावरून पाहतां रावबहादुरांच्या देवाची प्रतीति होत नाहीं. आकाशांतून क्षणोक्षणीं आपल्या आवडत्या लोकांच्या साह्यार्थ खालीं उतरणारा, व त्यांशीं अतिपरिचिताप्रमाणें बोलणारा देव झटला झणजे आमच्या अर्जुनाचे घोडे खाजवणारा, विदुराच्या गृहीं जेवणारा, बेदरचें पोतें भरणारा जो आमचा हिंदु देव त्यासारखाच 'जुन्या करारा'तला देव झाला. खिस्ती लोकांस विशेष संमत जो 'नवा करार' त्यांत पाहतांही देवाचा सुलतानी थाट फारसा दृष्टीस पडत नाहीं. त्यांत तर मुळीं देव जो भूलोकावर अवतरला तो रूमशामसारख्या बादशहाच्या पोटीं येऊन मोठ्या समारंभानें प्रगट झाला असें मुळींच नसून एका गरीब कुमारीचे पोटीं आला व गवताच्या गव्हाणींत जन्मास आला. पुढें तरी ईश्वराचें किंवा ईश्वरपुत्राचें त्यानें वैभव चोहोंकडे मिरवलें झणावें तर तेंही नाहीं. तीस वर्षेपर्यंत विशेष प्रसिद्धीस न येतांच येशूनें दिवस चालवले; नंतर शेवटल्या तीन चार वर्षांत लोकांस स्वर्गमार्गाचा उपदेश करून व त्यांच्यापासून छळ पावून शेवटीं त्यानें मनुष्य-जातीकरतां देहांत प्रायश्चित्त भोगलें! या शेवटल्या वर्षांत येशूचा व त्याच्या शिष्यांचा परस्पर संबंध जो शुभवार्तिकांच्या लेखांवरून दिसून येतो तो वरील 'भयचकितते'चा व अत्यंत 'नम्रीभावा'चा मुळींच नसून सॉक्रेटीस् व त्याचें शिष्यमंडळ यांच्यांसारखाच केवळ दिसतो.[१] तेव्हां एकंदरींत सांगायाचें काय कीं, जर 'पवित्र शास्त्रां'तही देवाविषयींच्या समजुती वर सांगितल्याप्रमाणें दृष्टीस पडतात, तर आमच्या अपवित्र नेटिव शास्त्रांतून व नेटिव काव्यांतून त्या तशाच आढळल्यास नवल कसचें!

५. आतां दुसरे आक्षेपक डॉ. विल्सन् यांचा लेख वाचकांस सादर करतों. हे साहेब कोण व पुढील लेख कशांतला हें मागें सांगितलेंच आहे.

"If the reign of Shivaji, the Maratha, was honoured by the appearance of the greatest Marathi poet from the common orders of the people, the reign of the first Brahman Peshwah —who was established in his administration in the year 1717—was honoured by the appearance, of the greatest Marathi poet from the priestly order. This was Mayur Pandit, or Moropant, of Baramati in the Deccan. He belonged to a tribe of Brahmans, the Karhadi, having no great pre-eminence in the Maharashtra, but he has become the great favourite of all the Brahmans since his day.[२] He is the lord of the Arya metre, in which

१. सॉक्रेटीस् व खिस्त यांच्या चरित्रांत पुष्कळ साम्य आढळतें. दोघांचा जन्म हलक्या कुळांत होऊन दोघांनींही आपलें आयुष्य लोकांत सन्मार्गाची प्रवृत्ति करण्याकडे खर्चलें. दोघांचाही शिष्य-परिवार त्यांचे ठायीं अत्यंत भक्ति धारण करणारा असा होता. दोघांनीं लोकांचा छळ सोसून दोघांचा शेवट देहांतशासनानेंच झाला. सॉक्रेटीस् यास Forerunner of Christ (खिस्ताचा जासूद) असें जें झणतात तें वरील चरित्रसादृश्यावरूनच होय.

२. "Parashurampant Godbole says of him (Navanit, p. 165.) प्राकृत कवितांमध्यें मोरोपंताच्या कवितेसारखी कविता काहीं. So much for the conquest of prejudice by the talent of the poet!"

he copiously writes, with power and ease, drawing his ideas from the Ramayana, Mahabharata and Bhagwata, so often mentioned as the sources of Marathi excitement, and but seldom improved upon either in thought or feeling. He has undoubtedly great command of the Marathi language, which he sometimes prostitutes by indulging in such poetical conceits as acrostics, and by writing without the use of the labial letters, introducing the conjunction परंतु ( but ) into every line, and by commencing each line of his verse by the 1st word of the preceding line. Though a follower of Vishnu, he wrote with respect for the other deities, for whom, such as Shiva, the acute and intelligent Konkani or Chitpawan Brahmans, in full power at Poona, had a special regard. The rise of the Peshwas, indeed, was the signal for the Marathi bards,—who had nothing like the heavenborn light and fire of the Hebrew prophets,—altering their tune. Moropant is said to have lived to the age of sixty, and to have died about a hundred years ago. One of his books held in most estimation is the Mayur Kekawali, the Trumpeting of the Peacock. so called from his own name. It is devoted principally to the extolment of Krishna."

("शिवाजीच्या राज्यांत ज्याप्रमाणें शूद्र लोकांत उत्पन्न झालेल्या महाराष्ट्रकवींमध्यें अत्यंत विख्यात जो तुकाराम तो निपजला, त्याप्रमाणें पहिल्या पेशव्याच्या कारकिर्दीत. कीं जिचा आरंभ इ. स. १७१७ त झाला तींत ब्राह्मणज्ञातींतला अत्यंत विख्यात कवि जो मोरोपंत तो जन्मास आला. या कवीचें वास्तव्य बारामती मुक्कामीं होतें. तो कऱ्हाडा होता. या ब्राह्मणज्ञातीचें महाराष्ट्रांत मोठेंसें वजन नाहीं; तरी प्रस्तुत कवि निवर्तल्यापासून तो सर्व ब्राह्मणांस अत्यंत प्रिय झाला आहे.[1] यास आर्यापति ह्मणतात. या छंदांत त्यानें पुष्कळ कविता केली आहे; ती चटकदार असून अगदीं सहज केल्यासारखी दिसते. रामायण, महाभारत, आणि भागवत, हे ग्रंथ महाराष्ट्रवासी जनांस अत्यंत आल्हादप्रद होत हें सुप्रसिद्धच आहे; याच ग्रंथांतील विचार घेऊन प्रस्तुत कवीनें ते मराठींत उतरून दिले आहेत. तरी या ग्रंथांपेक्षां अधिक प्रौढ विचार किंवा विशेष सरस वर्णन हीं त्याच्या काव्यांत फार करून आढळत नाहींत. महाराष्ट्रभाषाही प्रस्तुत कवीची केवळ अंकित होऊन राहिली होती हें खरें आहे पण तिचा त्यानें कोठें कोठें अपव्यय केलेला आढळतो; तो असा कीं कोठें नियमित अक्षरें साधलेलीं, कोठें निरोष्ठ रचना केलेली, कोठें प्रत्येक पद्यांत 'परंतु' घालून दिलेलें, कोठें पूर्वपद्यांतींचा वर्ण पुढील पद्याच्या आरंभीं योजलेला,—

---

१. "परशुरामपंत गोडबोले यांनीं (नवनीत-पृष्ठ १६५) वरील कवीविषयीं असें लिहिलें आहे:—'प्राकृत कवितांमध्यें मोरोपंताच्या कवितेसारखी कविता नाहीं.' या वाक्यावरून स्पष्ट दिसतें कीं, प्रस्तुत कवीच्या जातीवरून उत्पन्न होणारा जो ग्रह तो त्याच्या काव्यचातुर्याच्या योगानें अलीकडे नाहींसा झाला आहे."

इत्यादि प्रकार त्याच्या कवितेंत आढळतात. तो जरी विष्णूचा भक्त होता तरी इतर देवतांविषयींही त्यानें आपली पूज्यत्वबुद्धि प्रगट केली आहे; या देवांतीलच एक जो शिव त्याविषयीं पुण्यास भरभराट पावलेले जे चाणाक्ष व कुशाग्रबुद्धि चित्पावन ब्राह्मण (पेशवे) त्यांची विशेष भक्ति होती. महाराष्ट्रकवींचे ठायीं यहुदी भविष्यवाद्याप्रमाणें ईश्वरप्रेरित ज्ञान व स्फूर्ति हीं बिलकुल नव्हतीं, तेव्हां पेशव्यांचा अभ्युदय होतांच त्यांनीं त्यांच्या आवडत्या देवांकडे आपल्या भक्तीचा ओघ वळवला यांत कांहीं आश्चर्य नाहीं! मोरोपंत हा साठ वर्षांचा होऊन वारला व या गोष्टीस आज (सन १८५७) सुमारें शंभर वर्षें होऊन गेलीं आहेत असें ह्मणतात. त्याचा अत्यंत मान्य असा ग्रंथ ह्मटला ह्मणजे 'केकावलि' हा होय. या शब्दाचा अर्थ 'मोराचा टाहो' असा आहे, व हें नांव कवीच्या नांवावरूनच दिलें आहे. या ग्रंथांत मुख्यत: कृष्णाचें माहात्म्य वर्णिलें आहे.")

---

कनकभूषणसंग्रहणोचितो यदि मणिस्त्रपुणि प्रणिधीयते।
न स विरौति न चापि हि शोभते भवति योजयितुर्वचनीयता॥[1]

अंक ५६–(१) विषयोपन्यास. (२) अर्वाचीन पांडित्याचा प्रकार. (३) मिशनरी(न्यां? ई.)ची स्थिति. (४) विल्सन् साहेबांच्या लेखावर दूषणें. (५) प्रस्तुत कवीविषयीं आणखी कांहीं मतें.

१. मागील अंकांत डॉ० विल्सन् साहेबांचा प्रस्तुत कवीविषयींचा लेख वाचकांस सादर केला. आतां त्यांतील तथ्यातथ्याचा विचार करूं.

२. वरील विचार करण्यापूर्वीं युरोपियन् व विशेषतः मिशनरी लोकांच्या संबंधानें कांहीं गोष्टी वाचकांस कळवणें जरूर आहे; त्या लक्षांत आणल्या असतां प्रस्तुत लेखाचें स्वरूप वाचकांच्या चांगलें लक्षांत येईल. आमच्या देशांत पाश्चात्यांचें प्रभुत्व झाल्यापासून एक मोठा चमत्कार दृष्टीस पडूं लागला आहे कीं, ज्ञानसंपादन हें पूर्वीं जें महत्प्रयासाचें काम असे, तें अलीकडे एकाएकीं अत्यंत सुगम झालें आहे! अलीकडे यंत्रविद्या उत्कृष्ट दशेस येऊन पूर्वींचे महिन्यामहिन्यांचे प्रवास हल्लीं जसे एकेका दिवसांत सहज उरकतात, त्याप्रमाणेंच विद्यादेवीच्या मुलखांतही अशा कांहीं यांत्रिक योजना सुरू झाल्या आहेत कीं काय नकळे! पूर्वीं शास्त्राध्ययनास ह्मटलें ह्मणजे तपांचीं तपें लागत असत; ह्मणजे बारा बारा, चोवीस चोवीस वर्षें घालवावीं तेव्हां दोन चार शास्त्रांत गति होत असे! हल्लींचा

---

१. "सोन्याच्या दागिन्यांत घालण्यास योग्य असें जें रत्न तें जर शिशाच्या कोंदणांत बसवलें, तर तें रत्न रडतें असें नाहीं, व तेथें शोभा पावतें असेंही नाहीं, तर योजकाच्या चातुर्याची मात्र चर्चा होते!"

प्रकार पाहिला तर चार वेद, सहा शास्त्रें, अठरा पुराणें या सर्वांचें ज्ञान होण्यास पराकाष्ठा चार पांच वर्षें! हें तर काय, पण एशिया खंडांतील सारी विद्या सुद्धां एका मनुष्यास तादृश प्रयास न पडतां पटकावतां येते! युरोपांतील स्थिति पाहिली तर तेथील विद्या अद्याप इकडच्यासारख्या सुगम झाल्या आहेतसें दिसत नाहीं. तेथील विद्यालयांतून जुन्या ग्रीक् व रोमन् विद्यांचा जरी अभ्यास सतत चालू आहे, व इकडे संस्कृताचें जसें होत चाललें आहे, त्याप्रमाणें तिकडे सामान्यतः पाहतां ग्रीक् व लॅटिन् या भाषांचें ज्ञान जरी पुष्कळांच्या ठायीं आढळतें, तरी वरील दोन विद्यांत महापंडित ह्मणून आजपर्यंत गाजलेले फारच थोडे निघतील! नुसत्या इंग्लंडांत पाहिलें तर असलीं विद्वद्रत्नें आजपर्यंत फार तर चारपांचच झालीं असतील! उघडच आहे; इकडे पेशवाईत शास्त्रविद्येस इतकें उत्तेजन होतें, पण सगळ्या कारकिर्दीत साऱ्या देशभर गाजलेले भट्टाचार्य किती निपजले असतील? पण हल्लींच्या मन्वंतरांत ती स्थिति अगदीं बदलून गेली आहे. एकोणिसाव्या शतकांत पंडित बनवण्याची कृति फारच सुलभ झाली आहे. सरासरी व्युत्पत्ति पैदा करावी, युरोपियन् लोकांनीं रचलेल्या पांचपन्नास ग्रंथांतून सटरफटर गोळा करावें, जुने एक दोन पंडित जवळ करावे की आटपलें! मग व्याख्यान देण्याचा प्रसंग येवो, ग्रंथरचना करण्याचें अगत्य पडो, कांहींही असो; वरील सामग्री जवळ असली ह्मणजे मग कसलीही पंचाईत नाहीं! सारांश, अर्वाचीन पांडित्य हें सरासरी गौडबंगाल झालें आहे. पण इतकें असून तें सामान्य लोकांस उमगण्याचा मार्ग राहिला नाहीं. का कीं, आलीकडील लोकांस स्वतः तर त्यांत मुळींच गम्य नाहीं, तेव्हां 'सर्वान् पुच्छवतो हयानिति वदन्त्यत्राधिकारे स्थिताः' अशी त्यांची स्थिति झाली आहे. ज्या थोड्या लोकांस ह्मणजे जुन्या पंडितांस वरील लटपट कळण्याचा संभव ते तर अगोदर दिवसांदिवस नाहींसेच होत चालले आहेत. जे कोणी थोडे कोठें कोठें आढळतील त्यांस अगोदर इकडची वार्ताही कळण्याचा संभव नाहीं; त्यांतून कोणास कळलीच तर त्या बिचाऱ्यांचें आलीकडील 'जुक्ती'पुढें काय चालणार? "शास्त्रीबोवा, पृथ्वीवर समुद्र किती आहेत?" ह्मणून प्रश्न केल्याबरोबर शास्त्रीबोवांच्या ज्ञानाची तेव्हांच परीक्षा होणार! तर याप्रमाणें आमच्या प्राचीन विद्यांत निष्णात ह्मणवणाऱ्या मंडळीची स्थिति आहे.

३. डॉ॰ विल्सन्सारख्या मिशनरी(ऱ्यां? सं॰)ची तर वरच्याहूनही अधिक पायरी. त्यांनीं इंग्लंड्चें व हिंदुस्थानचें मोठेंच काम पतकरलें असल्यामुळें पाश्चात्य व प्राच्य विद्या त्यांस केवळ करतलामलकवत् असल्या पाहिजेत! इकडील एकाद्या शिष्यानें तिकडची कोणतीही गोष्ट विचारली तरी ती त्यांस सांगतां आली पाहिजे; व तिकडच्या कोणीं पंडितानें किंवा मंडळीनें इकडची कोणत्याही तऱ्हेची माहिती पुसली तरी तीही त्यांस माहीत नसतां उपयोगीं नाहीं. तेव्हां दोन्ही खंडांच्या संबंधाचें हरएक प्रकारचें ज्ञान असावें तेव्हां शुभवर्तमानाच्या प्रेषिताचा जम चांगला बसणार आहे हें उघड आहे.

पण वरील सर्वज्ञता ही शुभवर्तमानाच्या कृत्यास कितीही आवश्यक असली तरी ती साध्य कशी व्हावी? 'अनन्तपारं किल शब्दशास्त्रं स्वल्पं तथायुर्बहवश्च विघ्नाः' ही जी

इहलोकची स्थिति आहे ती कशी बदलेल ? कोणी केवढ्याही अचाट बुद्धीचा असला तरी विद्यांची सीमा कोणाच्यानें गाठवणार आहे ? त्याप्रमाणेंच आयुष्याची स्वल्पता व विघ्नांचें बाहुल्य यांच्यापुढें तरी कोणाचें काय चालणार आहे ? तेव्हां यावरून पाहतां कोणींही मनुष्यानें फार मोठी हांव बांधतां उपयोगी नाहीं हें उघड आहे. ती बांधली असतां बदामाच्या गोष्टींत जशी पोराची अवस्था झाली तशी व्हावयाची ! त्यांतून कोणी तितक्यांतूनही अनेक विद्यांचें प्रभुत्व संपादन करण्याची खटपट चालवलींच तर ज्याप्रमाणें धातूचा पत्रा जितका ठोकठोकून लांब करावा तितका लांब होत जातो खरा पण तितकें जाडीचें मान कमी कमी होत जातें, त्याप्रमाणें जितक्या अधिक विद्यांचा हव्यास धरावा तितकी प्रत्येक विषयांतील गति कमी होते; तेव्हां इकडून तिकडून क्षेत्रफळ सारखेंच ! नाहीं म्हणायाला इतकी मात्र तफावत होते कीं, थोडेच विषय घेऊन त्यांवरच जो व्यासंग चालवतो त्याचे ते पक्के होतात आणि वरील हव्यासी मनुष्याचें ज्ञान विषयबाहुल्यास्तव चोहोंकडे गुडघाभरच पाणी अशा तऱ्हेनें होतें व त्यामुळें अनेक प्रमादांस मात्र तो पात्र होतो.

असो; आतां वरील सिद्धांताच्या प्रत्ययार्थ डॉक्टर मजकुरांच्या लेखांतील सत्यासत्यतेचें विवेचन करूं. हें विवेचन त्यांच्या शिष्यवर्गास वगैरे कदाचित् आवडणार नाहीं, व येवढ्या सर्वमान्य पंडिताच्या लेखावर दूषणें दिल्याबद्दल आम्हांवर कदाचित् धृष्टतेचाही आरोप येईल. पण जोंपर्यंत आमच्या दूषणाची अयथार्थता आम्हांस कोणी दाखवणार नाहीं तोंपर्यंत वरील आरोप आम्ही पतकरूं.

४. पहिल्या वाक्यांत पहिल्या पेशव्याच्या अधिकाराचा सन १७१७ म्हणून दिला आहे तो चुकीचा आहे हें आमच्या सर्व वाचकांच्या ध्यानांत येईलच; कां कीं बाळाजी विश्वनाथ यास सन १७१४ त पेशवाईचीं वस्त्रें मिळालीं हें सुप्रसिद्ध आहे. आमच्या कवीचा जन्मशकही वरील वर्ष नसून सन १७२८$ त तो जन्मला. शूद्रकवीचा उदय§ शिवाजीच्या कारकिर्दींत झाला ही गोष्टही खरी नाहीं. कां कीं, प्रस्तुत पंडितानें दिलेला सन जरी घेतला(१)

$ मोरोपंतांचा जन्म शके १६५१ सौम्य नाम संवत्सरीं पन्हाळगडावर झाला. 'सम्पादक'

§ आतांपर्यंत उपलब्ध झालेल्या पुराव्यावरून तुकाराम महाराजांच्या जन्मतिथीचा निश्चित निर्णय होण्यासारखा नाहीं. जन्मशक बहुशः १५२९ असावा. पण कदाचित् १४९९ हि असणें असंभवनीय नाहीं. त्यांना गुरूपदेश शके १५२० मध्यें अगर कदाचित् १५२४ मध्यें मिळाला असावा. व त्यांचें देहावसान फाल्गुन कृष्ण द्वितीया शके १५७२ रोजीं झालें असणें ज्यास्त संभवनीय आहे. १५७१ सालीं वार व तिथि जमत नाहीं. सोमवार, फाल्गुन, वद्य द्वितीया इतक्यांबद्दल एकवाक्यता आहेच. मतभेद कायतो शकाबद्दल. व १५७२ सालींच वार व तिथि जमत असल्यानें तेंच साल कायम करणें तूर्त तरी योग्य होय. 'सम्पादक'

१. हा सन १६४९ असा दिला आहे. तेव्हां तुकारामाच्या शेवटल्या वर्षी शिवाजी राजा एकवीस वर्षांचा होता असें होतें—तुकारामाच्या जन्ममरणाच्या शकांच्या संबंधानें मोठा घोंटाळा दिसून येतो. 'नवनीतां'त माजी भास्कर दामोदर पाळंदे यांनीं जो वृत्तांत दिला आहे त्यांत वरील

( पुढें चालू. )

तरी शिवाजीच्या कारकिर्दीला पुष्कळच अवकाश राहतो. त्याचा राज्याभिषेक तर १६७४त झाला; व नुसता तो आपणास राजा म्हणवूं लागला ही गोष्टही १६६४ त झाली. सन १६४९ त म्हटलें म्हणजे त्याचा नुकता उदय होऊं लागला होता. त्या वेळेस त्याची सत्ता धोंड्या वाघ किंवा उमाजी रामोशी यांच्या बेताचीच सरासरी होती ! हे केवळ शकांच्या संबंधानें झालें. आतां सदरील वाक्यांतील अभिप्रायाविषयीं जर विचार केला तर तो अशा तऱ्हेचा दिसतो कीं राज्यक्रांति झाली कीं मोठे कवि निपजायाचेच ! हा सिद्धांत कांहीं अंशीं खरा आहे व सर्व देशांच्या इतिहासावरून त्यास बराच आधार मिळतो. तरी ज्याप्रमाणें बीजारोपण झालें न झालें तों फलोत्पत्ति संभवत नाहीं, त्याप्रमाणेंच राज्यक्रांतीची वेळ व कवीच्या जन्माची वेळ हीही एककालिक संभवत नाहीं. त्यांतून आमच्या महाराष्ट्रकवींची गोष्ट तर इतर देशांतील कवींच्याहून अगदींच निराळी. त्यांचें धोरण केवळ परमार्थाचें असल्यामुळें ऐहिक राज्यांच्या घडामोडींनीं त्यांच्या स्फूर्तीस साह्य व्हावें असा मुळींच प्रकार दिसत नाहीं. आमचे कवि भर यवनी अमलांत व भर मराठी कारकिर्दीत जन्मलेले आहेत; तरी एका स्थितीमुळें त्यांच्या वाणीस तेज चढलें आहे किंवा दुसरीच्यामुळें तें उतरलें आहे असें बिलकुल नजरेस येत नाहीं. आह्मांस खास वाटतें कीं, तुकाराम हा जन्मला त्याच्यापूर्वी शें दोनशें वर्षें जरी जन्मता, तरी त्याची अभंगवाणी झाली आहे तशीच प्रगट होती. त्याप्रमाणेंच ज्ञानदेव व मोरोपंत हे कालांतरीं जरी जन्मास येते तरी त्यांची कविता आहे तशीच उदयास येती. येवढें मात्र झालें असतें कीं, 'जाणिजे', 'सागरू', इत्यादि रूपें व 'पढियंते', 'चेववीं', 'साचोकारें' इत्यादि शब्द ज्ञानदेवाच्या कवितेंत येते ना; व मोरोपंताची कविता आहे तशी संस्कृत शब्दांनीं व प्रयोगांनीं गजबजून न जाती, आणि 'काचस्मृतिरपि तापसि मैवं प्रलपात्र भूभुजःसदसि' किंवा 'पकडो लियो इकालो बे बिसवामितर भाग जावेगा' हा चमत्कारही तींत दृष्टीस न पडता !

कऱ्हाडे ब्राह्मणांविषयीं विल्सन् साहेब जें म्हणतात, कीं, त्यांस 'महाराष्ट्र देशांत

---

दोन शक १५१० व १५५१ ( फाल्गुन वद्य १२ ) असे* दिले आहेत. गाथ्यांत तेच शक १५२० व १५७१ ( फा० व २ ) असे आढळतात. हे दोन्ही शक †शिवाजीच्या संबंधानें मुळींच जुळत नाहींत. पहिला शक मानला असतां तुकारामाच्या अंतसमयीं शिवाजी एक वर्षाचा होता असें होतें; दुसरा मानला तरी एकवीस वर्षांचा होता असें निघतें. कोणीकडून पाहिलें तरी 'गाथ्यां'तील शिवाजीकडे पाठवलेल्या अभंगांचा जम बसत नाहीं.

* नवनीताच्या अलीकडील (सहाव्या) आवृत्तींत हे शक १५२० व १५७१ फाल्गुन वद्य १२ असेच दिले आहेत. 'सम्पादक'

† अलीकडच्या शोधाप्रमाणें तर शिवाजी महाराज तुकारामाच्या अंतकाळीं जन्मासहि आले नव्हते व १५७१ सालीं ते एकोणीस वर्षांचे होते असें ठरतें.कारण जन्मशक १५५२(सन १६३०) निश्चित झाला आहे. तथापि इतक्या अल्पवयांतच लोक त्यांस 'छत्रपति' म्हणून संबोधूं लागले होते.शके १५६९ तच त्यांस 'छत्रपति' असा मायना लावलेला अस्सल कागद अलीकडे उपलब्ध झाला आहे. या वयांतच महाराजांनीं प्रतिनिधि वगैरे कामगारांच्या नेमणुकी केल्याचा पुरावा मिळाला असल्यामुळें १५७१ सालापुरता तरी तसा घोंटाळा उरत नाहीं. 'सम्पादक'

मोठीशी मान्यता नाहीं' हेंही आम्हांस कसें तें नीट समजत नाहीं. अन्नोदकादिक व्यवहार किंवा स्नेहसंबंध हे प्रकार कऱ्हाड्यांशीं होत नाहींत असें तर मुळींच नाहीं; किंवा ते कोणत्याही प्रकारें हीन होत असेंही कोणी समजत नाहीं. त्यांजवर पूर्वीपासून एक मोठा अपवाद आहे खरा; पण त्याच्या योगानें त्यांची मान्यता कमी झाली आहे असें कोठेंही आढळत नाहीं.[1] 'क'कारांची कावेबाजपणाबद्दल ख्याति असल्यावरून किंवा देशस्थांची धीमेपणाबद्दल प्रसिद्धि असल्यावरून त्यांच्या लोकमान्यतेंत जसा कमीपणा येत नाहीं त्याप्रमाणेंच वरील ज्ञातीचीही गोष्ट होय. त्यांतून ज्या सालीं साहेब मजकुरांचा वरील लेख प्रगट झाला त्या सालीं एका कऱ्हाड्या बाईचें नांव * साऱ्या देशभर गर्जत होतें, त्यावरूनही विल्सन् साहेबांसारख्या शोधक पंडिताचा वरील भ्रम कसा निघाला नाहीं यांचें आम्हांस आश्चर्य वाटतें ! मोरोपंताची प्रसिद्धि त्याच्या मरणोत्तर झाली, व ज्ञातिजन्य ग्रह मोडण्यास पुष्कळ काळ लोटावा लागला, हे दोन्ही उल्लेखही अत्यंत विस्मयास्पद होत ! आमच्या कवीविषयीं साहेब मजकुरांनीं जर उगीच कोणापाशीं थोडीशी विचारपूस केली असती, तरी त्यांस तेव्हांच कोणीही सांगितलें असतें कीं, मोरोपंताची कीर्ति त्याच्या हयातींतही चोहोंकडे पसरली होती, त्याच्या नूतन कवितेस श्रोतेमंडळीची मान डोलल्यावांचून बहुतकरून एकही दिवस जात नसेल, पेशव्यांचे आप्त जे बारामतीकर जोशी त्यांच्यापाशीं प्रस्तुत कवीचें

---

१. 'Indian caste' ( हिंदुस्थानांतील जातिभेद ) या नांवाचा जो ग्रंथ वरील साहेबांच्या मरणोत्तर प्रसिद्ध झाला त्यांत त्यांनीं वरील ब्राह्मणांविषयीं फार निराळ्या तऱ्हेचा मजकूर लिहिलेला आढळतो:—

"They (The Karhadas) appear in every way as respectable as their neighbours. The great Marathi poet Moropant belonged to their caste. To them, too, belonged one of the most learned natives who has yet appeared in Western India, the late distinguished Bala Gangadhar Shastri Jambhekar, Professor in the Elphinstone Institution. What is generally said of the intelligence of the Konkanasthas is applicable to the Karhadas, with whom they are generally on friendly terms."

* झांशीची राणी लक्ष्मीबाई. गंगाधरराव नेवाळकर यांची दुसरी बायको. हिचें माहेरचें नांव मनू ऊर्फ छबेली. वांईचे मोरोपंत तांबे हे हिचे वडील. हिचा जन्म काशी येथें कार्तिक वद्य चतुर्दशी शके १७५७ ( १९ नोव्हेंबर १८३५ ) रोजीं झाला व विवाह शके १७६४ मध्यें झाला. वडील बाजीराव पेशव्यांचे पदरीं राहिल्यावेळीं ही ब्रह्मावर्तास लिहिणेंवाचणें, दांडपट्टा, काठीबोथाटी वगैरे शिकली. या विद्येचा उपयोग पुढें १८५७ च्या बंडाचे—नव्हे स्वातंत्र्ययुद्धाचे—वेळीं तिनें कसा केला हे वीरांसहि तोंडांत बोट घालावयास लावणाऱ्या तिच्या इतिहासप्रसिद्ध मर्दुमकीवरून दिसून येतें. सदर प्रसंगीं पाठीमागून वार करून तिला मारण्यांत आलें. शत्रूंच्या हातीं तिचा देह लागूं नये म्हणून गवताच्या गंजींत घालून ज्येष्ठ शुद्ध सप्तमी शके १७७० रोजीं त्याला अग्नि देण्यांत आला. 'सम्पादक'

वास्तव्य होतें, आणि सोलापुरकर जोशीबोवा तर त्यांच्या आर्यांवधूस इतके लुब्ध होऊन पडले कीं त्यांचे नाचेपोर सुटून ते ततःपर परमार्थपरायण झाले! पण इतकें सर्व असतां माजी परशुरामपंत तात्यांनीं पंतांची तारीफ केलेली पाहून साहेबांस आश्चर्य वाटलें, आणि त्यांचा सिद्धांत झाला कीं, ज्यापेक्षां कोंकणस्थ पंडिताच्या लेखांत या कऱ्हाड्या कवीची प्रशंसा केलेली आढळते, त्यापेक्षां कवीनें आपल्या देशबंधूंचा जातिभेदजन्य दुराग्रह मोडून टाकला यांत संशय नाहीं! हा तर्क किती समंजस आहे बरें! पोप कवीच्या 'इलियड'ची प्रख्याति पाहून किंवा गोल्ड्स्मिथ्च्या काव्यांची तारीफ ऐकून जर कोणी एतद्देशीय पंडितानें असेच तर्क बांधले,—कीं ज्या अर्थी कॅथलिक् धर्माच्या कवींचें काव्य येवढें सर्वमान्य झालें आहे त्या अर्थी पोपची शहामत खरी, कीं त्याच्या पदलालित्यानें धर्मभेदजन्य दुराग्रहाचेंही खंडन केलें, त्याप्रमाणेंच गोल्ड्स्मिथ् कवीची धन्य, कीं तो ऐर्लंड् देशचा असतां आज इंग्लंडांतील लहानथोरांस त्याचे ग्रंथ परमप्रिय झाले आहेत! त्याप्रमाणेंच स्कॉट् यास सर्व कादंबरीकारांत आग्रगण्य लेखतात, बर्क यास साऱ्या वक्त्यांत श्रेष्ठ मानतात, वेलिंग्टन् यास साऱ्या इंग्लिश् सेनापतींत पहिली पायरी देतात, इत्यादि शेंकडों गोष्टींवरूनही वरच्यासारखीं अनुमानें शतशः होणारीं आहेत! पण हीं किती यथार्थ होत हें पाहण्यास विलायतेस जावयास नको, येथें इंग्रेजी शिकलेले विद्यार्थीही त्यांत तथ्य कितपत आहे तें सांगूं शकतील. उघडच आहे कीं, कोणाच्या कवित्वाची पारख कोणी त्याच्या धर्मावरून किंवा जातीवरून करतात काय? मिशनरी लोकांनीं पहिल्यापासून आमच्या देशांतील जातिभेदाचा बोभाटा ऐकला आहे, व जातिभेद हा पराकाष्ठेचा अनर्थावह होय हें त्यांच्या मनानें एकदा घेतलें आहे. तेव्हां तो नाहीं तेथें आडवा येणारच! कोणी कसाही, कारागीर असो, कोणाच्या अंगीं कांहीही गुण असो, त्याच्या जातभाईखेरीज त्याच्या कारागिरीची वाहवा किंवा त्याच्या गुणाची चहा म्हणून व्हावयाची नाहीं! विल्सन् साहेबांनीं येवढा जातिभेदजन्य दुराग्रह आमच्या देशाच्या कोणत्या भागांत पाहिला असेल तो असो! आमच्या वाचकांपैकीं थोड्यांच्याच आढळांत तो कोठें आला असेल तर असेल!

पुढें आमच्या कवीवर साहेबांचा असा आक्षेप आहे कीं, 'रामायण', 'महाभारत' आणि 'भागवत' या ग्रंथांच्या आधारें त्यानें कविता केली आहे, पण सदरील ग्रंथांपेक्षां अधिक सरस वर्णन किंवा त्यांहून प्रौढ अर्थरचना ही त्याच्या काव्यांत फार करून कोठेंही आढळत नाहींत. वरील वाक्यावर अनेक प्रत्याक्षेप येणारे आहेत. एक तर प्रथमतः अशी शंका उद्भवते कीं, साहेबमजकुरांनीं वरील तिन्ही ग्रंथ व आमच्या प्राकृत कवीचीं काव्यें हीं सर्व येवढ्या बारकाव्यानें वाचलीं असतील काय? 'महाभारत' एक लक्ष, 'रामायण' चोवीस हजार, आणि 'भागवत' अठरा हजार येवढाच ग्रंथसमूह पाहिला तरी सरासरी दीड लक्षाची भरती झाली.ही सर्व संख्या एका पारड्यांत,आणि दुसऱ्यांत आमच्या कवीच्या तीन (?पाऊण.सं.)लक्ष आर्या! मग येवढीं जड पारडीं उचललीं असतां कांटा केंसभरही इकडे कीं इकडे कलत नाहीं असें साहेबांच्या नजरेस आलें काय? हें एक झालें. दुसरें असें कीं, जरी घटकाभर असें कबूल केलें, कीं वरील दोन्ही पारडीं अगदीं तंतोतंत भरलीं, तरी यामुळें

आमच्या कवीकडे कांहीं मोठें गौणत्व येतें असें आह्मांस वाटत नाहीं. मिशनरी साहेबांस इकडील ग्रंथ सरासरी सारेच अप्रयोजक, तेव्हां आमच्या आदिकवीच्यासारखी किंवा इतिहासकाराच्या बरोबरीची ग्रंथरचना करणें ह्मणजे त्यांच्या दृष्टीनें कांहीं मोठें दुष्कर कृत्य आहे असें नाहीं हें उघडच आहे; पण आह्मां नेटिवांच्या दृष्टीनें वरील साम्य ह्मणजे मोठीच पदवी होय.[1] साहेब मजकुरांस शेक्स्पीयरच्या तोडीचें नाटक लिहिणें, किंवा होमरच्या तोडीचें काव्य रचणें हें जितपत सुसाध्य वाटणार आहे तितपतच वाल्मीकिव्यास-प्रभृति कवींनीं साधलेला रस आपल्या काव्यांत उतरणें हें इकडील कवींसही वाटणारें आहे. तर हें ध्यानांत आणून विल्सन् साहेबांनीं मूळ 'रामायणा'दि ग्रंथांवर आमच्या कवीच्या हातून तान(ण? सं०)झाली नाहीं या अपराधाबद्दल त्याची कांहीं गय करायाची होती, असो; पण वस्तुतः पाहिलें असतां साहेबांचा आक्षेप तर मुळींच लागू पडत नाहीं.तो कसा हें आमच्या वाचकांच्या लक्षांत असेलच. गेल्या ४६ व्या* अंकांत व १२ व्या† अंकाच्या आरंभीं जें विवरण केलें आहे त्यावरून सहज लक्षांत येणारें आहे कीं, महाराष्ट्रकवींनीं व्यासादिकांचें आयतें भांडार लुटलें आहे, त्यांत त्यांच्या पदरचें ह्मणून कांहीं नाहीं, हें आलीकडील सर्वसंमत मत केवळ अज्ञानमूलक होय. 'रघुवंशा'दि महाकाव्यांस 'स्वतंत्र ग्रंथ' ह्मणतांना जसें फारसें चांचरायाला नको, त्याप्रमाणेंच तुकारामाची अभंगवाणी किंवा मोरोपंताची आर्यावाणी या प्रायः स्वतःसिद्धच होत असें ह्मणतांनाही फारशी कांकूं करणें नलगे!

यापुढील वाक्यावर गेल्या ५२ व्या$ अंकांत चर्चा केलीच आहे. तेव्हां येथें त्याविषयीं आणखी कांहीं लिहिण्याची गरज नाहीं.

पुढील दोन वाक्यांत साहेबांचा असा मतलब दिसतो कीं, मोरोपंत हा मूळचा विष्णुभक्त असतां पेशव्यांची शिवोपासना पाहून शिवाविषयीं आपली भक्ति प्रगट करूं लागला. इतर महाराष्ट्रकवींच्या पदरींही वरील मतलबी भक्ति साहेबांनीं बेलाशक घालून

---

१. गोवर्धनसारख्यांनीं वरील ग्रंथांविषयीं आपली पूज्यत्वबुद्धि येणेंप्रमाणें प्रगट केलेली आढळते:—

विहितघनालङ्करणं विचित्रवर्णावलीमयस्फुरणम्।
शक्रायुधमिव वक्रं वल्मीकभुवं कविं नौमि॥
व्यासगिरां निर्यासं सारं विश्वस्य भारतं वन्दे।
भूषणतयैव संज्ञां यदङ्कितां भारती वहति॥
श्रीरामायणभारतबृहत्कथानां कवीन् नमस्कुर्मः।
त्रिस्रोता इव सरसा सरस्वती स्फुरति यैर्भिन्ना॥
अतिदीर्घजीविदोषाद् व्यासेन यशोऽपहारितं हन्त।
कैर्नोच्येत गुणाढ्यः स एव जन्मान्तरापन्नः॥

* पृष्ठें ८०८-८१६ पाहा. 'सम्पादक'

† पृष्ठ १६३-१६५ पाहा. 'सम्पादक'

$ पृष्ठ ८३४-८३९ पाहा. 'सम्पादक'

दिली आहे. ज्या मिशनरी साहेबांची अशी ख्याति होती व ती स्वमुखानेंही ते सांगत असत कीं आमच्या देशांतील राजापासून रंकापर्यंत त्यांचें दळणवळण असे; व सकाळीं बडोद्याच्या महाराजांबरोबर भाषण केलें तर संध्याकाळीं नांगर हांकणाऱ्या कुणब्याशीं त्यांचें बोलणें होत असे, त्यांच्या लेखांत आमच्या कवींविषयीं असल्या विलक्षण गैरसमजुती दृष्टीस पडाव्या हें खरोखर मोठें आश्चर्यकारक होय! हिंदुस्थानच्या किनाऱ्यावर पाय ठेवण्याच्यापूर्वीं विलायतेंतही विल्सन् साहेबांच्या कानावर हा मजकूर आला नसेल काय, कीं हिंदु लोक हे ब्रह्मा, विष्णु आणि शिव यांस मुख्य दैवतें मानतात? त्याप्रमाणेंच हिंदूंचे देव किती अपरंपार आहेत व ते त्या सर्वांस भजतात, हेंही त्यांच्या कानीं कधीं आलें नाहीं काय? जर मोरोपंताची सर्व देवांविषयीं ऐक्यभावना असून तो सर्वांस सारखेच पूज्य मानीत असे, व प्रत्येक क्षेत्राच्या देवतेवर, प्रत्येक तीर्थावर, प्रत्येक साधूवर त्यानें स्तुतिपर आर्या केल्या आहेत, तर शिवासारख्या प्रधान देवतांस आमचा कवि आपल्या ग्रंथांत मानतो, हें सांगण्यांत येवढा कोणता अर्थ असेल तो असो! महाराष्ट्रांत वीस वर्षें वास्तव्य असतां व 'हिंदुधर्माचा कृत्रिम कोट' फोडण्याची स्तुत्य मनीषा निरंतर मनांत वागवून त्याविषयीं पुरती माहिती मिळवण्याविषयीं साहेबांची इतकीं वर्षें सारखी खटपट चालली असतां, त्यांस सर्वप्रसिद्ध गोष्टींचीही माहिती व्हावयाची कशी राहिली हें आम्हांस कळत नाहीं! आमच्या देशांत महाएकादशी जशी सर्व आबालवृद्ध करतात त्याप्रमाणेंच शिवरात्रीचेंही व्रत पाळतात, आपल्या पंचायतनांत शालिग्रामशिलेच्या शेजारींच शिवाचा बाणही दृष्टीस पडतो, ज्या कवीनें[*] 'हरिविजय' केला त्यानेंच 'शिवलीलामृत'ही केलें, तसेंच विष्णूचीं, शिवाचीं, देवीचीं, गणपतीचीं वगैरे देवालयें आमच्या देशांत अगदीं शेजारीं शेजारीं असून त्यांच्या संबंधानें कोठें लोकांच्या मारामाऱ्या झालेल्या, खून पडलेले, किंवा नुसती शिवीगाळही झालेली कधींही ऐकण्यांत येत नाहीं, या सर्व गोष्टी विल्सन् साहेबांसारख्या विद्वान् व शोधक पंडितास ठाऊक नसाव्या याचा आम्हांस फारच अचंबा वाटतो! पेशव्यांचें जरी शिव हें दैवत असलें, तरी इतर देवतांविषयीं त्यांचा विरोध असल्याविषयीं आमच्या मिशनरी साहेबांस कोठें प्रमाण मिळालें होतें काय? त्याप्रमाणेंच त्यांनीं प्रस्तुत कवीवर व इतरांवरही उपासनांतर केल्याचा किंवा निदान आपल्या लेखांत तरी आपल्या उपास्य देवतेव्यतिरिक्त अन्य देवतांविषयीं वरकांती भक्ति प्रगट केल्याचा जो आरोप बेलाशक केला आहे, हें तरी केवढें साहस होय! आमच्या बारामतीकर कवीचा

---

[*] आबालवृद्धप्रिय, प्रतिभासंपन्न, विद्वान् आणि रसाळ कवि श्रीधरस्वामी. यांनीं चवदाव्या वर्षींच संन्यास घेतला. यांच्या आईचें नांव सावित्री. व बापाचें नांव ब्रह्मानंद (यांचें पूर्वाश्रमींचें नांव उपलब्ध नाहीं.) श्रीधरस्वामी शाहु महाराजांच्या कारकिर्दीत उदयास आले. यांनीं श्रीक्षेत्र पंढरपूर येथें माघ वद्य तृतीया शके १६५१ रोजीं समाधि घेतली. जन्मशक १६०० असा रूढ आहे. पण त्याला पुरावा नाहीं. हरिविजय (१६२४), रामविजय (१६२५), वेदांतसूर्य (१६२५), पांडवप्रताप (१६३४), शिवलीलामृत (१६४०), जैमिनी अश्वमेध (१६३७) हे यांचे प्रमुख ग्रंथ होत. 'सम्पादक'

आणि पेशव्यांचा तर बिलकुल संबंध नव्हता, त्याचीं सारीं काव्यें धुंडलीं तरी त्यांत पेशव्यां-पैकीं एकाचेंही नांव सुद्धां सांपडायाचें नाहीं; मग त्यांचें स्तवन तर कोठलें![1] त्यानें सारा जन्म ज्या यजमानांच्या समागमें घालवला त्यांविषयीं सुद्धां त्यानें उल्लेख केलेले त्याच्या कवितेंत कोठें आठ दहा ठिकाणीं आढळले तर नशीब! मग इतकी ज्याची निःस्पृहता त्यावर केवळ राजप्रीतिसंपादनार्थ मतांतर केल्याचा आरोप करणें हें केवढें धारिष्ट ह्मणावें! इतर महाराष्ट्रकवींवर साहेबांनीं हाच आरोप जो मोघमपणें केला आहे तो तरी अशाच प्रकारचा होय. अगोदर पेशव्यांच्या अमदानींत कवि झाले तरी किती?—अमृतराय, मोरोपंत, रघुनाथपंडित आणि रामजोशी. मग यांपैकीं स्वदेवतात्याग करून पेशव्यांची खुषामत करायाला कोण तयार झाले असतील ते असोत! लोकांत तर वरील चौकडींतून एकाविषयींही अशा प्रकारचा कांहीं एक बोभाटा नाहीं. मग असें झालें असेल तर नकळे, कीं एकाद्या कॅथलिक् पाद्री(ह्या? सं०)नें वरील कवींच्या मरणकाळीं गुप्तपणें त्यांच्याजवळ जाऊन त्यांची शेवटली जबानी घेतली असेल; व ती आपल्या धर्मबंधूंस कळण्याकरतां इंग्रेजींत कोठें प्रसिद्ध केली असेल! अशी कांहीं कल्पना केल्याखेरीज वरील कवींच्या लबाडीची बातमी मिशनरी मजकुरांस कशी कळली असावी हें कांहीं उमगत नाहीं. आतां आमच्या साहेबांस यहुदी कवींची जर तारीफ करणें होती, व त्यांनीं 'जिवंत देवा'चे जे एकदां पाय धरले ते धरलेच, त्यांच्या पवित्र भूमीचें प्रभुत्व अनेक राष्ट्रांकडे गेलें असतां त्यांची दिव्य स्फूर्ति यशोहवावांचून* अन्य देवांकडे वळलीच नाहीं, इत्यादि प्रकारें जर वरील देवप्रिय लोकांची स्तुति करणें त्यांस अवश्य वाटलेंच होतें तर ती त्यांनीं खुशाल करायाची होती! पण त्यांच्या स्तवनार्थ आमच्या बिचाऱ्या महाराष्ट्रकवींवर स्वकपोल-कल्पित दूषणें देण्याची काय गरज होती? त्यांतून साहेबांनीं हेंही मनांत आणायाचें होतें कीं, हिंदु लोकांची भक्ति जर इतकी कोंवळी असती कीं पाहिजे तिकडे तिनें सहज वळावें, तर मिशनरी खातें आमच्या देशांत येण्याचीच मुळीं गरज उरती ना! भाकरीच्या तुकड्यां-बरोबर कुतरें नाचवावें तसें नाचतें अशीच जर येथील लोकांची स्थिति असती तर आमचा देश केव्हांच सारा इमाममय बनून जाता. त्याप्रमाणेंच साहेबांच्या भाकिताप्रमाणें आज-पर्यंत कोणी तरी ख्रिस्ती तुकाराम किंवा वामन आमच्या देशांत निपजता. पण अद्याप तर तीं चिन्हें कोठेंही बिलकुल दृष्टीस पडत नाहींत![2]

---

१. मोरोपंताविषयीं बराच सविस्तर वृत्तांत 'काव्येतिहाससंग्रहा'च्या येत्या अंकांत येणार आहे. त्यांतील कांहीं आख्यायिकांवरून आमच्या कविसिंहावर मिशनरी साहेबांनीं ग्रामसिंहवृत्तीचा जो आरोप केला आहे त्याची यथार्थता चांगली लक्षांत येईल.

* येशू ख्रिस्त (Jesus Christ). 'सम्पादक'

२. विल्सन् साहेबांनीं महाराष्ट्रकवींचा वृत्तांत संपवून शेवटीं पुढील पवित्र आज्ञा प्रगट केली आहे:—

(पुढें चालू.)

पुढील वाक्यांत साहेबांच्या हातून दोन प्रमाद घडले आहेत. मोरोपंताचें मरणकालीं वय ६० वर्षांचें होतें असें ह्मटलें आहे, तें खरोखरीं ६५ वर्षांचें* होतें. त्याप्रमाणेंच त्यास निवर्तून सुमारें शंभर वर्षें झालीं असें ह्मटलें आहे तेंही बरोबर नाहीं; १८५७ सालीं वरील गोष्टीस अवघीं ६३ वर्षें झालीं होतीं. साहेबांनीं 'नवनीत' उलटून पाहिलें असतें किंवा त्यांच्या एतद्देशीय स्नेह्यांपैकीं कोणापाशीं उगीच चौकशी केली असती, तरी वरील खरी माहिती मिळण्याचा त्यांस संभव होता. पण ते स्वतःच मुळीं सर्वांस गुरुस्थानीं व जातीनें सर्वज्ञ; त्यांतून त्यांच्या वज्रलेखावर कोणाची लेखणी चालणार? तेव्हां त्यांस वरील खटपट करण्याची जरूर दिसली नाहीं हेंही नीटच होय.

शेवटील वाक्यांत विल्सन् साहेब सांगतात कीं, 'केकावली'त मुख्यतः कृष्णाचा महिमा वर्णिला आहे. या वाक्याचा अर्थही आमच्या ध्यानांत चांगलासा उतरत नाहीं. आह्मांस खास वाटतें कीं, ज्यानें 'केकावलि' समग्र वाचली आहे, व ती ज्यास साद्यंत समजली आहे, त्याच्या हातून प्रस्तुत काव्यावर साहेबांच्यासारखा शेरा सहसा पडणार नाहीं. या काव्यांतील मुख्य विषय कृष्ण किंवा इतर कोणीही देव नसून कवीचा स्वोद्धार हाच होय. कोणीं कवीनें लिहिलें आहे:—

तनू भव–वनीं त्रि–ताप–दव–पावकें कावली ॥
ह्मणूनि करुण–स्वरें करि मयूर केकावली ॥

तर संसारांतील तापत्रयानें पीडित होत्सात्या मयूरानें 'दयामृतघना'च्या वृष्टीविषयीं अत्यंत सोत्कंठ होऊन टाहो फोडला, व 'इसापनीतीं'तल्या लाडक्या पक्ष्यानें आपल्या धनिणीपाशीं जसें गाऱ्हाणें गाइलें आहे त्याप्रमाणेंच प्रस्तुत काव्यांतही पहिल्यापासून शेवटपर्यंत

तसाचि उरलों कसा? पतित मी नसें काय कीं? ।
दयामृतघना अहो हरि वळा मयूराकडे ।
रडे शिशु तयासि घे कळवळोनि माता कडे ॥

असाच मयूराचा केकारव आढळतो. प्रसंगवशात् त्यानें मधें मधें बऱ्याच भराऱ्याही मारल्या आहेत तेव्हां एकंदरींत पाहतां प्रस्तुत काव्यांत कोणत्याही देवतेचें विशेष वर्णन आहे असें नाहीं व त्यास 'स्तोत्र' हा शब्दही यथास्थितपणें लागणारा नाहीं. असें असून विल्सन् साहेबांनीं वर जो शेरा मारला तो सरासरी अनमानधबक्यानें मारला ह्मणावा, किंवा पहिली

---

"The Mahrahthas declare that the spirit of poetry has left their country. It may soon appear that in this opinion they are mistaken, even though it may not be expected that Hinduism with its grotesque and impure gods and heroes, will again inspire the bards of the country."

* जन्म शके १६५१, मृत्यु शके १७१६. 'सम्पादक'

तेवढी केका कधीं कानावर आल्यावरून तिजवरून स्थालीपुलाकन्यायेंकरून* त्यांनी ह्याच्या काव्याचें स्वरूप लक्षांत आणलें असावें असें आह्मांस वाटतें.[1]

याप्रमाणें वरील दोघां पंडितांचे प्रस्तुत कवीविषयींचे अभिप्राय दाखल करून त्यांवर आह्मीं आपले विचार प्रगट केले. आतां प्रस्तुत अंक आटपण्यापूर्वी विद्वद्वृंदांत मोरोपंताच्या संबंधानें सामान्यतः आणखी ज्या कित्येक समजुती आढळतात त्यांचाही उल्लेख करतो. एक तर सर्वसाधारण मत हें कीं, मोरोपंत हा मुळीं कविच नव्हे, तर केवळ पद्यांची जुळवाजुळव करणारा होय. त्याच्या वेळचे लोक अज्ञान व अरसिक, त्यामुळें त्याची कविता त्या काळीं खपली गेली, किंबहुना सर्वमान्यही झाली; हल्लींच्या सुधारलेल्या काळांत तिची योग्यता कोणासही कांहीं वाटणार नाहीं, कित्येकांचें ह्मणणें असें पडतें कीं, मोरोपंत हा महाराष्ट्रकवींतला पोप होय. या इंग्रेजी कवीची त्याच्या हयातींत जशी अतिशयित प्रख्याति झाली, व सर्व त्यास कविमुकुटमणि ह्मणून समजत असत, पण चालू शतकांत त्याच्या कवि-

---

* स्थाली-पुलाक-न्याय [ स्थाली=तपेली, पुलाक=भात. ] तपेलींतील भात शिजला आहे कीं नाहीं हें पाहण्यास प्रत्येक शीत चांचपून पाहावें लागत नाहीं. एक शीत चांगलें शिजलें आहे असें आढळलें कीं सगळा भात छान शिजला आहे ह्मणून खुशाल समजावें. याच अर्थाची मराठी भाषेंतील ह्मण "शितावरून भाताची परीक्षा" ही होय. 'सम्पादक'

१. साहेब मजकुरांनीं इतर महाराष्ट्रकवींविषयीं जें निरूपण केलें आहे त्यांतही वर दाखवल्यासारखा अप्रमाण उल्लेखांचा प्रकार बराच आढळतो. त्यांचीं उदाहरणें येथें दाखल करतों. ते नामदेवास ज्ञानोबाच्या अगोदर ढकलतात; यास त्यांस काय प्रमाण मिळालें असेल तें असो! रामदासाचा अंतकाळ§ सन १६६० त ह्मणून दिला आहे. पण या कवीनें 'शिवबा'च्या मरणोत्तर त्याच्या पुत्रास जें पत्र लिहिलें आहे त्यावरून पाहतां वरील काळ फार चुकीचा ठरतो. तुकारामाच्या कवितेस 'अभंगनाटक' ( नाटाचे ? ) अशी संज्ञा आहे; अमृतरायानें पद या छंदांत कविता रचली आहे. तिचा विषय अध्यात्म असल्यामुळें ती कोणास फारशी आवडत नाहीं; रामजोशी हा पहिल्या बाजीरावाच्या† कारकिर्दीत होता, व त्यानें 'लावण्या ह्मणजे शृंगारपर कविता' केली आहे; अनंतफंदी हा शेवटल्या पेशव्याची व त्याचा शूर सरदार बापू गोखला याची खुषामत करणारा होता; कल्याणमल्लानें महाराष्ट्रभाषेंत‡ 'अनंगरंग' ह्मणून एक चावट ग्रंथ केला आहे;—इत्यादि विलक्षण उल्लेख मोलस्वर्थकृत कोशाच्या प्रस्तावनेंत आढळतात. बिचाऱ्या तुकारामावर तर साहेबांनीं जें तर्कट रचलें आहे तें कांहीं पुसूंच नये! एकंदरींत बड्या नांवावर किती चुका व किती अप्रमाण लेख खपले जातात याचा प्रत्यय सदरील प्रस्तावनेवरून चांगला येणारा आहे!

§ रामदासस्वामी माघ वद्य नवमी शके १६०३ रोजीं निजधामास गेले. तेव्हां त्यांचा मृत्यु सन १६८१ मध्यें येतो. 'सम्पादक'

† सोलापुरच्या जगन्नाथपंत जोश्यांचे चिरंजीव रामजोशी हे अठराव्या शतकाअखेर अर्थात् दुसऱ्या बाजीरावाचे कारकिर्दीत उदयास आले. मृत्यु, शके १७३०, चैत्र शु. प्रतिपदा. 'सम्पादक'

‡ कल्याणमल्ल हा कलिंग देशाचा रहिवासी असून तद्देशीय 'अनंग भीम' नामक राजाच्या पदरीं होता. कित्येक हा ब्राह्मण होता असें म्हणतात. पण नांवाशेवटीं मल्ल आहे त्यावरून क्षत्रिय असावा असें दिसतें. हा शालिवाहनाच्या अकराव्या शतकाअखेर उदयास आला. याचा 'अनङ्गरङ्ग' नामक एक कामशास्त्रविषयक ग्रंथ संस्कृतांत आहे. 'सम्पादक'

तेचें बंड मोडून तो अगदीं नादान ठरला आहे, तीच गत मोरोपंताची ! कोणी ह्मणतात, वामन हा महाराष्ट्रकवितेंतला ड्रायडन् व मोरोपंत हा पोप होय; खरें कवित्व पाहिलें तर तें पहिल्यांत जसें आढळतें तसें दुसऱ्यांत आढळत नाहीं. दुसऱ्याचें काव्य ह्मटलें ह्मणजे सारें यमकमय, शब्दचमत्काराच्या पलीकडे त्यांत कांहीं नाहीं. याप्रमाणें ज्याच्या जसें मनास येईल त्याप्रमाणें तो बेलाशक आमच्या कवीविषयीं हवा तसा अभिप्राय ठोकून देतो !

वरील मतांविषयीं आह्मी तूर्त विचार करीत नाहीं. प्रस्तुत कवीविषयीं आमच्या काय समजुती झाल्या आहेत त्या ज्या वेळेस दाखल करूं त्या वेळेस वरील अभिप्रायांतील तथ्यातथ्याविषयींही सहज विवेचन करावें लागेलच.

---

परकृत अपमान जसा त्वकृत बहुमान हा तसा मातें ॥

—अश्वमेधपर्व-४,४८मोरोपंत.

अंक ५७—(१) विषयोपन्यास. (२) मोरोपंताच्या तर्फेची मंडळी. (३) त्याच्या कवितेंतील मोठा विशेष. (४) हा त्याच्या कीर्तीच्या प्रसारास कारण. (५) यावरून त्याचें महाकवित्व कितपत ठरतें याविषयीं विचार. (६) मोरोपंताच्या कवितेचें गहनत्व व दुर्बोधत्व. (७) वरील मताची यथार्थता.

१. येथवर प्रस्तुत कवीवर येणाऱ्या आक्षेपांविषयीं विवेचन झालें. आतां त्याच्या तर्फेची जी मंडळी आहे तिच्या तोंडून त्याचा गुणानुवाद जो ऐकूं येतो तो कितपत यथार्थ होय याविषयीं विचार करायाचा.

२. मोरोपंताच्या तर्फेची मंडळी कोण हें मागें सांगण्यांत आलेंच आहे. जुनें विद्वन्मंडल व नवें विद्वन्मंडल हीं दोन्ही प्रस्तुत कवीच्या प्रतिपक्षिवर्गांतच प्रायः येतात. पहिल्यांच्या दृष्टीनें प्राकृत हें जितकें हलकें तितकेंच दुसऱ्यांच्या दृष्टीनें व्हर्नॅक्युलर् ( एतद्देशीय भाषा ) हें होय; व 'नैषध'कार आणि 'चंपू'कार सोडून मोरोपंताकडे मेहेरनजर करण्यास पहिल्यांस जितके प्रयास, तितकेच दुसऱ्यांस शेक्स्पीयर किंवा पोप सोडून महाराष्ट्रकवितेवर येण्यास ! या दोहोंशिवाय बाकी राहिलेला सारा जनसमूह प्रस्तुत कवीच्या तर्फेचाच ह्मणायास हरकत नाहीं, त्यांतून त्याचे चहाते व सेवक ह्मटले ह्मणजे हरदास हे होत. यांनींच आमच्या 'कवीश्वराच्या मनःपयोनिधिसुते'चा आविर्भाव होतांच मोठ्या उत्साहभरानें तिचें अभिनंदन केलें, आणि लवकरच साऱ्या महाराष्ट्रीय जनांच्या हृदयांत तीस अढळ पदीं बसवून टाकलें. तर याच मंडळीच्या तोंडून प्रस्तुत कवीविषयीं जे उद्गार ऐकूं येतात त्यांतील तथ्यातथ्याविषयीं विवेचन केलें पाहिजे.

३. मोरोपंताची कविता वाचतांना सकृद्दर्शनींही कढून येणारा तिचा एक मोठा

विशेष ह्मटला ह्मणजे लांब लांब यमकें हा होय. हा यमकांचा प्रकार प्रथमतः वामनानें सुरू केला. त्याच्यापूर्वी महाराष्ट्रकविता ही केवळ ओंवी व अभंग या छंदांतच असल्यामुळें यमकांच्या रचनेस अर्थातच अवकाश नव्हता; आणि त्यांतून वरील कवींपैकीं कोणीही पंडित नसल्यामुळें वरील साध्या छंदांतही यमकरचना करण्याचा कोणीं यत्न केलेला दृष्टीस पडत नाहीं.[1] पण पुढें वामनानें जेव्हां गणवृत्तें महाराष्ट्रकवितेंत आणली, तेव्हां ती यमकरचनेस विशेष अनुकूल असल्यामुळें तो यत्न त्यानें केला.[2] नंतर मोरोपंतानें तर वरील शब्दालंकार साधण्यास फार सोयीचें जें आर्यावृत्त[3] तें उचलून त्यांत प्रकृत शब्दचमत्काराची अगदीं कमाल करून सोडली. तीन तीन चार चार अक्षरांचे यमक तर सामान्यत: सर्व आर्यांत असून कोठें कोठें तर सहा सहा आठ आठ अक्षरेंही यमकबद्ध आढळतात. कांहीं कांहीं ठिकाणीं तर दुसरा व चवथा चरण बहुधा एकाच अक्षरांनीं बांधलेला आढळतो. याप्रमाणें यमकरचनेचा प्रकार प्रस्तुत कवीच्या काव्यांत सर्वसाधारण असून शिवाय जागोजाग अनुप्रासाचाही चमत्कार त्यानें केलेला आहे.[4]

४. आतां हा जो मोरोपंताच्या कवितेंत आढळणारा विशेष वर सांगितला तो त्याची प्रसिद्धि प्रथमत: त्वरित होण्यास कारणभूत होऊन पुढें त्याची कीर्ति स्थिरावल्यावरही तीस मुख्यत: आधारभूत होऊन बसला. अजून पाहिलें तरी प्रस्तुत कवीची जी वहा आढळते ती पुष्कळ अंशीं वरील विशेषावरूनच होय. इंग्लंडांत पोपची प्रख्याति त्याच्या अपूर्व पदलालित्यावरून जशी झाली, व वीस वर्षांच्या वयांतच वरील कवि तत्कालीन कवींत अग्रगण्यत्व पावून पूर्वीच्या महाकवींशीं टक्कर मारूं लागला;[5] किंबहुना त्यांच्या-

---

१. अनुष्टुप् छंदांतही शब्दालंकार साधलेले पाहणें असल्यास 'किरातार्जुनीय', 'शिशुपालवध', 'नैषध' वगैरे काव्यांत ते दृष्टीस पडतील. महाराष्ट्रभाषेंतील प्रकार पाहणें असल्यास मोरोपंताच्या 'अनुष्टुप् रामायणां'त तो दृष्टीस पडेल.

२. मोरोपंतानें 'वामनपंडितस्तुतीं'त ह्मटलें आहे:—

अन्यत्र नसे कवनीं यावे रस सर्व हा नियम कांहीं।
केली भाषाकवि जे त्यांची तीं गर्वहानि यमकांहीं ॥

३. प्रस्तुत कवीची आर्यावृत्तविषयक प्रीति सर्वप्रसिद्धच आहे:—

आर्या आर्यांसि रुचे ईच्या ठायीं असे जशी गोडी ॥
आहे इतरां छंदीं गोडी; परि यापरीस ती थोडी. ॥

४. असें सांगतात कीं, बारामतींत मोरोपंताची बसायाची जी खोली असे तींत चोहोंकडे भिंतींवरून यमकबद्ध अक्षरें लिहून ठेवलेलीं होतीं. ह्मणजे कवीस रिकाम्या वेळीं एकादा यमक सुचला कीं तो त्यानें भिंतीवर लिहून ठेवावा. पुढें काव्यरचनेच्या वेळीं जे जे यमक त्या त्या प्रसंगाला उपयोगीं पडतील ते ते त्यानें घ्यावे. हा प्रकार प्रस्तुत कवीच्या काव्यांत जें अपूर्व यमकचातुर्य आढळतें (कीं जें पाहून घटकर्पर कवीस खापराचा घडा घेऊन पाणीच वहावें लागतें!) ह्यावरून पाहतां केवळ संभाव्य दिसतो. 'अगा राया' आणि 'अगारा या', 'हानिकर' आणि 'हा निकर' इत्यादि शेंकडों ठरीव यमकांवरूनही वरील गोष्टीस बळकटी येते.

५. वरील वयांत त्यानें Essay on Criticism ('काव्यविवेचनावर निबंध') हें लहानसें

[पुढें चालू.]

हूनही एकंदर लोकांस अधिक प्रिय झाला, त्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्रकवीचेंही झालें असावें. बारामतींतून त्याच्या आर्या जेव्हां प्रथमतः बाहेर पडूं लागल्या असतील, तेव्हां महाराष्ट्रकवितावधूचा हा नवीन थाटमाट पाहून तत्कालीन जन मोठे चकित होऊन राहिले असतील! 'उदिते तु सहस्रांशौ न खद्योतो न चन्द्रमाः', किंवा 'उदिते नैषधे काव्ये क्व माघः क्व च भारविः'[1] अशाच प्रकारचा त्यांस अनुभव घडला असेल! आपल्या धर्मपित्याच्या आश्रमांत तपस्विकन्येप्रमाणें वाढलेली जी शकुन्तला तिनें पूर्वस्थितींतील वल्कलें टाकून देऊन महिषीपदोचित राजवेष धारण केला असतां तिच्या स्वरूपांत जसें विलक्षण अंतर दिसलें असेल, त्याप्रमाणेंच जी कविता पूर्वी ओंवी व अभंग या छंदांत असून प्रायः अलंकारविरहितच होती तिला

झणत्कार जीच्या पदीं नूपुरांचा
रुणत्कार जीच्या करीं कंकणांचा ॥

असें स्वरूप एकदम प्राप्त झालेलें पाहून सारा जनसमूह अत्यंत विस्मित होऊन गेला असेल! गीर्वाणवाणीच्या सुवर्णसूत्रांनीं जागोजाग विणून काढलेलें व अनुप्रासानें स्थलविशेषीं विचित्रित केलेलें असें उज्वल वस्त्र परिधान केलेली वरील अभिनव कविता जनमनः-प्रांगणीं जेव्हां नटीप्रमाणें अवतीर्ण झाली असेल, तेव्हां तिचा अलंकारांचा थाटमाट पाहून व चरणांत रुणझुणणाऱ्या यमकरूप पैंजणांचा कर्णमनोहर नाद ऐकून जोशीबोवांसारखी मंडळी तल्लीन होऊन गेली यांत काय आश्चर्य?

तर प्रस्तुत कवीची लवकरच जी चोहोंकडे प्रसिद्ध झाली, व पूर्वीच्या महाराष्ट्रकवींत तो तेव्हांच सामील झाला, किंबहुना त्या सर्वांस त्यानें लोपवून टाकलें, हें सर्व वरील रचनाविशेषाचें फल होय. जगांतील रीत पाहतां सामान्यतः अशीच आढळते कीं, अंतरंगाकडे दृष्टि फार थोड्यांची; 'बाह्यरङ्गप्रसङ्गेन के के नानेन वञ्चिताः' हाच प्रकार प्रायः आढ-

---

काव्य रचलें. अॅडिसन्‌चा 'स्पेक्टेटर्' याच वेळेस चालू होता. त्यांत वरील काव्याची फार तारीफ केलेली आढळते. (स्पे॰ अंक २५३). जॉन्सन्‌चा अभिप्राय येणेंप्रमाणें आहेः—

"One of his greatest, though of his earliest works, is the "Essay on Criticism," which, if he had written nothing else, would have placed him among the first critics and the first poets, as it exhibits every mode of excellence that can embellish or dignify didactic composition,—selection of matter, novelty of arrangement, justness of precept, splendour of illustration, and propriety of digression. I know not whether it be pleasing to consider that he produced this piece at twenty, and never afterwards excelled it; he that delights himself with observing that such powers may be soon attained, cannot but grieve to think that life was ever at a stand."

१. 'सूर्य उगवला असतां काजव्याचा उजेड रद्द होतो व चंद्राचाही फिका पडतो.' 'नैषधकाव्य निर्माण झालें असतां माघकवि कोणीकडे व भारवि कोणीकडे?'

ळणारा! निदान सकृद्दर्शनीं तरी बाह्यरंगाला जशी मंडळी भुलते व त्याच्या योगानें छाप बसून जाते, तसें अंतर्गत गुणाच्या योगानें होत नाहीं. तेथपर्यंत दृष्टि जी पोंचावयाची ती प्रथमतः तर फार करून कोणाची पोंचत नाहींच; पोंचलीच तर जे अत्यंत मार्मिक असतील त्यांचीच पोंचते. बाकी एकंदर लोकांची रीत ह्मटली ह्मणजे जें वरकांतीं दृष्टीस पडेल त्यास भुलावें, किंवा फार झालें तर प्रमुख ह्मणून जे निवडले असतील त्यांचें अनुसरण करावें. आतां हें खरें आहे कीं, एका इंग्रेजींतील ह्मणीप्रमाणें[1] केवळ बाह्य चाकचक्याचा फार दिवस टिकाव निघत नाहीं; आंत कांहीं तत्त्व असल्याखेरीज नुसता बाहेरचा डामडौल फार दिवस निभत नाहीं. कालेंकरून खरें नाणें कोणतें व खोटें कोणतें हें उघडकीस येतेंच. पण हा तत्त्वनिर्णय निरनिराळ्या प्रकरणांत कमीज्यास्त अवकाशानें होतो, व तो होणें हेंही कांहीं कांहीं प्रकरणीं अवघड असतें. साक्षात् प्रत्ययावह जीं शास्त्रें आहेत त्यांतील प्रकरणांचा व व्यवहारांतील गोष्टींचा जसा खरेखोटेपणा तेव्हांच निवडतां येतो, त्याप्रमाणें केवळ मानसगोचर ज्या वस्तु त्यांचा निवडतां येत नाहीं. खरा वैद्य किंवा खोटा वैद्य, खरा ज्योतिषी किंवा खोटा ज्योतिषी, खरा शिपाई किंवा खोटा शिपाई ही परीक्षा जशी औषधक्रियेवरून, ग्रहणादि वर्तवण्यावरून, व मर्दुमकीच्या प्रसंगावरून तेव्हांच करतां येण्यासारखी असते, तशी कवित्वाची किंवा तत्त्वज्ञतेची गोष्ट नाहीं. यामुळें पोप कवि आहे कीं नाहीं याविषयींचा वाद आजपर्यंत चालला आहे, व मानसशास्त्रांतील अनेक प्रमेयें अद्याप जशींचीं तशींच संदिग्धावस्थेंत आहेत!

तेव्हां मोरोपंताची प्रख्याति लवकरच जी सार्वत्रिक झाली ती त्याच्या कवितेच्या बाह्य स्वरूपावरून झाली. याच्या उज्वलत्वानें लोकांचे डोळे इतके दिपून गेले कीं, अंतर्गत स्वरूपाची परीक्षा करणें दुर्घट झालें. किंबहुना ती करण्याचें त्यांस अगत्यही वाटलें नाहीं. मोरोपंतासारखा कवि मागें झाला नाहीं व पुढेंही होणार नाहीं, इत्यादि प्रकारांनीं त्याची वाहवा सर्वांच्या तोंडीं जी झाली ती वरील कारणांवरूनच होय. अजून तरी प्रस्तुत कवीची एकंदरींत जी बहा आहे व त्याची प्रसंगविशेषीं जी तारीफ ऐकूं येते तिचें बहुधां दुसरें कांहीं कारण नाहीं. हरदासांच्या तोंडून बहुधां सर्वांनीं असे उद्गार ऐकले असतील कीं, 'वाः! काय पंतांचें चातुर्य! असा कवि दुसरा नाहींच!' पण या उद्गारांचें मूळ पाहूं जातां चमत्कारिक प्रास किंवा यमक यांच्याहून निराळें फार करून आढळणार नाहीं. इतर लोकांतही प्रायः अशीच समजूत दृष्टीस पडते, कीं ज्याची भाषेवर येवढी सत्ता कीं अमुक अमुक अक्षरें चरणाच्या शेवटीं आणावयाचींच तर तीं सहज आणायाचीं, तन्हेतन्हेचे प्रास मधें साधायाचे, रामायणें रचलीं आहेत तर राजाधिराजांचें जसें ऐश्वर्य दृष्टीस पडतें कीं चंदनाचा महाल तर जिकडे तिकडे चंदनच, बिलोरी महाल तर येथून तेथून बिलोरच, संगमवरी दगड तर चोहोंकडे तोच, त्याप्रमाणें लव्वक्षर रामायण ह्मटलें कीं सारी एकमात्रक

१. वरील ह्मण येणेंप्रमाणें:—

'An empty sack cannot long stand upright' (रिकामें पोतें किती वेळ ताठ उभें राहणार?)

अक्षरांचीच गर्दी, निरोष्ठ रामायण ह्मटलें कीं तें खुशाल विडा खाऊन वाचावें, दामरामायणांत पाहावें तों आर्यार्धाचे शेवटले वर्ण व पुढच्याचे आद्य वर्ण शेवटपर्यंत सारखे गुंफलेले,—याप्रमाणें हव्या त्या तऱ्हेवर ज्या नाट्याचार्यानें वाग्देवीस नर्तकीप्रमाणें नाचवावी, त्याचें काव्यचातुर्य काय वर्णावें ?

५. आतां वरील रचनाचातुर्य हें कवित्वाचा मोठा भाग होय असें समजून त्यावरून प्रस्तुत कवीची महाकवींत गणना करणें हें किती समंजस आहे याचा विचार करूं. गेल्या सत्तेचाळिसाव्या अंकांत* शब्दालंकारांच्या योजनेच्या संबंधानें जें विवेचन केलें आहे त्या. वरून व इतर ठिकाणींही प्रसंगवशात् जे उल्लेख केले आहेत त्यांवरून आमच्या वाचकांस कळलेंच असेल कीं शब्दालंकारांची योग्यता अर्थालंकारांहून फार कमी आहे. शब्दालंकार हे वस्तुतः दोषमय नाहींत, व मोठमोठ्या सर्वमान्य कवींनींही त्यांचा प्रयोग केलेला आढळतो, हें खरें; तरी वस्तुतः पाहतां त्यांच्या घटनेस कवित्वाचें अंग मानतां येईल असें नाहीं. केवळ यमकप्रास जुळणाराची आणि कवीची स्पर्धा ह्मटली ह्मणजे 'घटानां निर्मातुस्त्रिभुवनविधातुश्च कलहः'[1] अशासारखीच होय. केवळ छंदाची रचना व यमकप्रास यांची जुळणी हीं दोन्ही सामान्यतः पाहतां व्यवहारोपयोगी शिल्पकर्माप्रमाणेंच श्रमसाध्य होत. सुतारकाम, शिवणकाम वगैरे ज्याप्रमाणें केवळ सामान्य बुद्धीच्या मनुष्यासही श्रमसाध्य होय, व त्या कामांत त्याची जसजशी अधिक मेहनत होईल तसतशी त्याची वाकबगारीही वाढेल, त्याप्रमाणेंच पद्यरचनेचीही गोष्ट आहे. हें कोणास सकृद्दर्शनीं विलक्षण वाटेल; पण अंमळ विचार केला असतां वरील उल्लेख अयथार्थ वाटणार नाहीं. पाहा कीं शाळेंतील मुलांस इतर विषय जसे शिकवतां येतात,—ह्मणजे चांगलें वळणशुद्ध अक्षर, हिशेबठिशेब ठेवणें वगैरे, त्याप्रमाणेंच पद्यरचना करणें हेंही त्यांस मोठेंसें कठिण जातें असें नाहीं. एकादा विषय दिला असतां त्यावर गद्यरचना करणें जसें त्यांस सुलभ असतें त्याप्रमाणेंच छंदोबद्ध रचनाही थोड्या परिश्रमाअंतीं त्यांस सुसाध्य असते. त्यांतून कविता रचण्याचा व वाचण्याचा ज्यास पुष्कळ नाद असतो त्यास तर यमक प्रास साधण्यासही मोठेसे आयास पडत नाहींत. आमच्या देशांत वाचणारांची संख्या थोडी आणि त्यांतून ग्रंथ विकत घेऊन वाचणारे तर फारच थोडे, त्यामुळें कविता करण्याचा धंदा ज्यारीनें चालत नाहीं; पण तेंच विलायतेंत पाहिलें तर दरवर्षास शेंकडों नवीं काव्यें प्रसिद्ध होत असतात व त्यांच्या शेंकडों हजार प्रती उडत असतात! याविषयीं प्रमाण पाहिजे असल्यास जॉन्सनचें 'कविचरित्र' किंवा पोपचें 'डन्सिअड्' हें पाहावें. पहिला ग्रंथ जॉन्सननें लंडन् शहरांतील पुस्तकवाल्यांच्या विनंतीस मान देऊन रचला.[2] व पुस्तकवाल्यांनीं जे कवि निवडून काढले ते त्यानें हातीं घेतले. ही निवडानिवड पुस्तकवाल्यांनीं अर्थातच दुकानांतील विक्रीच्या मानावर केलेली

* पृष्ठें ८१८–८२१ पाहा. 'सम्पादक'

१. "घट निर्माण करणारा कुंभार आणि त्रिभुवनास निर्माण करणारा महादेव यांची झटापट." हा संपूर्ण श्लोक चवथ्या अंकारंभीं आला आहे. २. अंक ३७ पृष्ठ ७२६ कलम ७ पाहा. 'सम्पादक'

होती; ह्मणजे ज्या कवींचे ग्रंथ चांगले विकले व त्यांस चांगली किफायत झाली तेच त्यांनीं पुढें केले; मग त्यांची वास्तविक योग्यता कांहीही असो![1] वरील गोष्टीस हल्लीं बरोबर एक शतक लोटून गेलें आहे. पण इतक्यांत काय चमत्कार झाला आहे पाहा, कीं पारसीकांचा राजा झर्सीज् § यानें उंच मनोऱ्यावर चढून तेथून आपलें अफाट सैन्य पाहिलें असतां त्यास जसा आमच्या अर्जुनाप्रमाणें अत्यंत विषाद झाला आणि वाटलें कीं, अरेरे! येवढ्या अवाढव्य समुदायांतून शंभर वर्षांअंतीं एकही जगणार नाहींना? त्याप्रमाणेंच जॉन्सननें ज्या मंडळीची चरित्रें लिहिलीं त्यांची अवस्था झाली आहे! येवढ्या पंडिताच्या हातून त्यांचीं चरित्रें लिहिलीं गेलीं यास्तव त्यांचें नांव बुडण्याचे आतां तादृश भय नाहीं येवढें खरें; पण एरवीं पाहिलें असतां वरच्यांतली निम्मेशिम्मे मंडळी इतक्यांतच गळून गेली आहे. कोठले 'किंग्'

---

१. वरील चरित्रलेखनाचें काम जॉन्सननें केवळ सांगकाम्याप्रमाणें केलें. इंग्रेजी कवींत अग्रगण्य जे शेक्स्पीयर, चॉसर्, स्पेन्सर् हे सदरील कविमालेंत मुळींच नाहींत, व त्या वेळच्या कित्येक प्रसिद्ध कवींसही असाच फांटा दिला आहे. वर सांगितलेली खोगीरभरती मात्र हवी तितकी आहे. यासंबंधानें बॉस्वेल्चा व जॉन्सन्चा सवाल जबाब झालेला आहे:—

"I was somewhat disappointed in finding that the edition of the 'English poets', for which he was to write prefaces and lives, was not an undertaking directed by him, but that he was to furnish a preface and life to any poet the booksellers pleased. I asked him if he would do this to any dunce's work, if they should ask him. Johnson. "Yes, Sir; and say he was a dunce!"

§ Xerxes (B. C. 485–B. C. 465) इराणचा राजा. स्पार्टीचा राजा लिओनिडास् यानें पारशी सैन्याला थर्मॉपिलीच्या खिंडींत कसें अडवून धरलें पण अखेर एफिआल्टस् (Ephialtes) नामक देशद्रोह्यानें ओएटा (Oeta) पर्वतावरून जाणारी वाट दाखविल्यामुळें पर्शियन् सैन्य ग्रीक् लोकांवर पिछाडीकडून तुटून पडलें व लिओनिडास्चा तेथेंच बळी पडला वगैरे हकीकत मागें आलीच आहे. (पृष्ठ वरील टीप पाहा.) येथून झर्सीज (Phocis) फोसिस् व (Boeotia) बोएशियामधून अथेन्सकडे निघाला. तो अथेन्सला पोंचेतों त्याचें आरमार (Phalerum) फॅलेरम्च्या उपसागरांत दाखल झालें. वादळें व शत्रूंचे हल्ले यामुळें त्याच्या प्रचंड आरमाराचा धुव्वा उडून गेला होता. त्यानें ग्रीक् आरमाराशीं युद्ध करण्याचा निश्चय केला. झर्सीज् येतांच अथिनियन् लोकांनीं नगरत्याग केला व थेमिस्टॉकल्सच्या सल्ल्यावरून स्त्रिया, मुलें आणि वृद्ध व अशक्त पुरुष यांना सालेमिस् (Salamis), एजिना (Aegina) व ट्रोजन् (Troezen) येथें पोंचविलें. (Themistocles) थेमिस्टॉकल्स्ला आरमाराचा मुख्य नेमण्यांत आलें तेव्हां एका विश्वासू गुलामाकडून त्यानें गप्प उठविली कीं ग्रीक् आरमार पळून जाणार असल्यानें त्यांना नुसतें अडविलें तरी पर्शियन् आरमाराला प्रचंड जय मिळणें शक्य आहे. पर्शियनांचा या कंडीवर विश्वास बसला व तदनुसार त्यांनीं सालेमिस्पासून मुख्य जमिनीपर्यंत सर्व खाडी अडवून धरली. ग्रीक् आरमार पळून गेलेंच; पण जातां जातां झर्सीज्च्या आरमाराचा अथीनियन् लोकांनीं धुव्वा उडविला. झर्सीज्नें एगॅलिऑस् (Aegalios) पर्वताच्या शिखरावरून आपल्या आरमाराचा हा सर्वनाश पाहिला तेव्हां त्याला स्वतःच्या सुरक्षिततेचीहि भीति वाटूं लागली; त्यानें तीन लाख लोक मॅर्डोनिअस्च्या ताब्यांत देऊन व त्यास ग्रीस काबीज करण्याचा हुकूम देऊन पोबारा केला. 'सम्पादक'

आणि कोठले 'ड्यूक'? खरे राजे व खरे ड्यूक आजपर्यंत जसे शेंकडों धुळीस मिळून गेले त्याप्रमाणेंच वरील नामधारी 'किंग्' व 'ड्यूक' हे केवळ नामशेष होऊन बसले आहेत! पोपच्या 'डन्सिअड्' काव्यांतील मंडळीची तर याहूनही दुर्दशा! 'डन्स' शब्दाचा अर्थ 'शंख' असा आहे, व वरील काव्यांत सारे शंखमणि ओंवले आहेत म्हणून वरील नांव त्यास दिलें आहे. पोप हा लवकरच कवित्वासिंहासनावर आरूढ झाला असतां त्या वेळचे शेंकडों छोटेखानी कवि रविघूकन्यायानें§ त्याचा मत्सर करूं लागले व अनेक तऱ्हांनीं त्यास त्रास देऊं लागले. शेवटीं त्यानें साऱ्या मंडळीस एका दांवणींत घालून तिजवर आपला विनोदप्रतोद चालू केला. हा प्रतोद वरील काव्य होय.[1] असो; तर वरील उदाहरणांवरून

§ रविघूकन्याय—सूर्य उगवतांच घुबडें (घूक) डोल्यांत तोंडें खुपसून बसतात. 'सम्पादक'

१. वरील ग्रंथ सन १७२८ त प्रसिद्ध झाला. पोपनें कुकविसत्र आरंभल्याची वार्ता अगोदर चोहोंकडे पसरलीच होती; यास्तव सदरील काव्य विकायाला काढायाच्या वेळेस सारी 'शंख' मंडळी पुस्तकवाल्याच्या दुकानाशीं जमली, आणि त्यास पुस्तकें बाहेर काढूं देईनात! ही मौज पोपच्या 'चरित्रां'त काढलेल्या एका चित्रावरून दिसून येते.—पोपचें व्रत अद्यापही इंग्लंडांत चालूच आहे. मेकॉले साहेबांनीं एकास कुकवित्वाबद्दल कसें खरमरीत बक्षीस* दिलें आहे तें कित्येक वाचकांस माहीत असेलच. हे कविवर्य रॉबर्ट् मॉन्ट्गॉमेरी होत. (मेकॉलेचा निबंध, एप्रिल १८३० पाहा.)

* सदर टीकेचा उतारा पुढीलप्रमाणें आहे:—

"In an age in which there are so few readers that a writer cannot subsist on the sum arising from the sale of his works, no man who has not an independent fortune can devote himself to literary pursuits, unless he is assisted by patronage. In such an age, accordingly, men of letters too often pass their lives in dangling at the heels of the wealthy and powerful; and all the faults which dependence tends to produce, pass into their character. They become the parasites and slaves of the great.....................This evil the progress of the human mind tends to remove. As a taste for books becomes more and more common, the patronage of individuals becomes less and less necessary..................... From the time of Pope to the present day the readers have been constantly becoming more and more numerous, and the writers more and more independent............Men of letters have accordingly ceased to court individuals, and have begun to court the public. They formerly used flattery. They now use puffing............The puffing of books is now so shamefully and so successfully carried on that it is the duty of all who are anxious for the purity of the national taste, or for the honour of the literary character, to join in discountenancing the practice.

अशा तऱ्हेची प्रस्तावना करून मेकॉले साहेब आपला बडगा उगारतात:—"(We mean to show to our honest countrymen) what that sort of poetry is which puffing can drive

(पुढें चालू.)

हें लक्षांत आणायाचें कीं पद्यरचना ही श्रमसाध्य होय, व इतर श्रमसाध्य कलांप्रमाणें हींतही परिश्रमानुरूप बरीच निपुणता साधतां येते.

आतां येवढें खरें आहे कीं, यमकप्रासादि चमत्कार जरी श्रमसाध्य असले तरी मोरोपंतानें ते जितक्या तऱ्हेचे केले आहेत तितके करणें व तितक्या सहज रीतीनें करणें हीं दोन्ही कृत्यें प्रायः दुर्घटच होत. सरस्वतीचा ज्यास प्रसाद असेल, ह्मणजे सारी भाषा ज्याच्यापुढें जशी काय हात जोडून उभी असेल, त्यासच वरील गोष्ट साध्य होय. तरी हें भाषाप्रभुत्व बुद्धिमत्त्वाचें जितकें दर्शक होय तितकें कवित्वाचें नाहीं हें वाचकांनीं लक्षांत आणलें पाहिजे. प्रस्तुत पुस्तकाच्या तिसऱ्या व चवथ्या अंकांत* व इतरत्रही प्रसंगोपात्त वरील दोहों गुणांच्या भिन्नत्वाविषयीं विवेचन केलें आहे; त्यावरून सहज समजण्यासारखें आहे कीं शब्दचमत्कारघटनेचें चातुर्य आणि सहृदयत्व यांचा परस्पर कांहीं संबंध नाहीं. दोहोंचें सामानाधिकरण्य क्वचित् संभवेल,—जसें प्रस्तुत कवीचे ठायीं; पण त्यांचा नित्य संबंध ह्मणून बिलकुल नाहीं. ज्याप्रमाणें जो उत्कृष्ट कसरती तो मोठा बळकट असला पाहिजे असा नेम नाहीं, किंवा जो मोठा पहिलवान त्यास दोरीवरून चालतां आलें पाहिजे असेंही नाहीं; त्याप्रमाणेंच जो बुद्धिसामर्थ्यानें यंत्रें, कूटें, निरानिराळे बंध वगैरे रचील त्यास सरस काव्य करतां येईलच, किंवा जो सरस कवि त्यास वरील यंत्रादि प्रकार अवश्य साधतीलच असा कांहीं नियम नाहीं. तेव्हां मोरोपंताच्या कवितेंत यमकप्रासादिकांचे जे चमत्कार आहेत त्यांवरून त्याची गणना महाकवींत करणें हें असमंजस होय. तेवढ्यांवरून जर येवढ्या

---

through eleven editions, and how easily any bellman might, if a bellman would stoop to the necessary degree of meanness, become "a master spirit of the age." We have no enmity to Mr. Robert Montgomery. We know nothing whatever about him, except what we have learned from his books, and from the portrait prefixed to one of them, in which he appears to be doing his very best to look like a man of genius and sensibility, though with less success than his strenuous exertions deserve. We select him, because his works have received more enthusiastic praise and have deserved more unmixed contempt, than any which, as far as our knowledge expands, have appeared within the last three or four years. *His writings bear the same relation to poetry which a Turkey carpet bears to a picture. There are colours in the Turkey carpet out of which a picture might be made. There are words in Mr. Montgomery's verses, which, when disposed in certain orders and combinations, have made, and will again make, good poetry. But as they now stand, they seem to be put together on principle in such a manner as to give no image of any thing "in the heavens above, or in the earth beneath, or in the water under the earth."* (Italics ours.) 'Editor.'

* पृष्ठें २३, २४; ३१, ३२; व ३६, ३७, पाहा. 'सम्पादक'

पायरीवर त्यास चढवावें तर मग 'रामकृष्णविलोमकाव्य', 'नलोदय', 'राघवपांडवीय' इत्यादि प्रबंधांत कवित्वाचें सर्वस्व उतरलें आहे असें ह्मणणें भाग येईल !

६. तर याप्रमाणें प्रस्तुत कवीविषयीं यमकादि प्रकरणांवरून झालेली जी समजूत तिजविषयीं विचार झाला. आतां मोरोपंतांची कविता ह्मटली ह्मणजे मोठी गहन, जो संस्कृतज्ञ पंडित असेल त्यासच ती लागेल, इत्यादि जे प्रवाद सामान्यतः ऐकूं येतात त्यांतील तथ्यातथ्याचा विचार करूं.

वरील समजुती कशावरून उत्पन्न झाल्या हें मागील निरूपणावरून वाचकांच्या लक्षांत येईलच. मोरोपंतांची प्रख्याति मागें सांगितल्याप्रमाणें जेव्हां चोहोंकडे झाली असेल तेव्हां त्याचें संस्कृत पद्धतीचें काव्य पाहून लोकांच्या मनांत वरच्यासारख्या कल्पना भरल्या असतील याची कल्पना करणें मोठें कठिण आहे असें नाहीं. नैषधकार, चंपूकार यांच्या-बरोबर हरदासांच्या कीर्तनांत या नव्या आर्याकाराचें काव्य जेव्हां निघूं लागलें असेल, तेव्हां वरील कवींविषयींच्या सर्व समजुती या नव्या कवीसही जडल्या असतील हें सहजच आहे. त्यांतून मोरोपंतांची कविता 'प्राकृतसंस्कृतमिश्रित' असल्यामुळें व अशिक्षित लोकांस तात्काळ कळण्याजोगी नसल्यामुळें वरील अनेक भ्रम माजण्यास विशेषच कारण झालें हें उघड आहे.

७. आतां वरील समज कितपत खरे आहेत याविषयीं विचार करूं. प्रथमतः कवी-विषयींच पाहिलें तर तो श्रीहर्ष, जगन्नाथराय, अपय्या दीक्षित यांसारखा पंडित होता असें मुळींच नाहीं. तो केवळ पुराणिक होता. पुराण सांगतां येण्यास कितपत काव्यव्युत्पत्ति लागते हें बहुधां पुष्कळांस माहीत असेलच. आदिकवीच्या 'मधुर कूजितां'त आणि भारवीच्या 'नारिकेलफलतुल्य वचनां'त सुबोधतेच्या दृष्टीनें पाहतां किती अंतर आहे हें बहुधा कोणासही सांगायास नको. तेव्हां आमच्या कवीचा अत्यंत परिचय ज्या ग्रंथांशीं ते वरील आद्यकाव्यांच्या तोडीचे अत्यंत सुबोध ग्रंथ होत. ते सोडून त्यानें तज्जातीय इतर ग्रंथांकडे नुसतें अवलोकनही केलेलें दिसत नाहीं. आजपर्यंत जेवढा ह्मणून प्रस्तुत कवीच्या ग्रंथांचा भाग आमच्या पाहण्यांत आला तेवढ्यांत असें एकही स्थल आह्मांस आठवत नाहीं कीं, ज्यावरून संस्कृतांतील पंचमहाकाव्यांशीं$ किंवा नाटकांशीं मोरोपंतांचा परिचय होता

$ वस्तुतः मोरोपंत चांगलेच व्युत्पन्न पंडित होते. पण व्यवसाय पुराणिकाचा व श्रोते आबाल-वृद्ध, विद्वान्–अविद्वान्, स्त्री–पुरुष, सेव्य–सेवक असे हरप्रकारचे असल्यानें सर्वांस समजावें, आवडावें, असें व्याख्यान पंत करीत. सौम्य हास्यरस, मुग्ध शृंगार, मार्यादित करुणरस, आटोपशीर वीररस, हे पंतांचे विशेष आहेत व जाडी विद्वत्ता आणि भरपूर बहुश्रुतपणा असूनहि श्रोतृवृंदाला साजेल, समजेल, कंटाळवाणें न होईल असें व्याख्यान करण्याची त्यांनीं दक्षता घेतल्यामुळें चिकित्सक व चतुरस्र वाचकांनाहि काव्यवाचनावरूनच अनुमान काढतांना पंतांची ही पुराणिक दृष्टि चकविते; याच गुणामुळें त्यांचे ग्रंथ 'उपजतांच काशीरामेश्वराला' जाऊं शकले. नाहीं तर किती तरी कवि शब्दसृष्टीचे ईश्वर असतात. रघुकिरातादि पंचमहाकाव्यें पंतांना माहीत होतीं इतकेंच नव्हे तर त्यांत

( पुढें चालू. )

असें अनुमान करतां येईल ! कालिदासादिकांचे अर्वाचीन काव्यग्रंथ जरी सफई बुडून जाते तरी प्रस्तुत महाराष्ट्रकवींचे ग्रंथ सध्यां जसे निपजले त्यापेक्षां निराळ्या तऱ्हेचे निपजते ना असें आह्मांस खास वाटतें. तर जो काव्यव्युत्पत्ति पांडित्याचा केवळ निकृष्ट भाग, किंबहुना मुळींच भागही नव्हे, ती आमच्या कवीची वर सांगितल्या तऱ्हेची ह्मणजे पौराणिक पद्धतीचीच केवळ होती. हें सांगितल्यावर मग पांडित्याचा शिरोभाग जीं न्यायमीमांसादि शास्त्रें त्यांत तर त्याची कितपत गति असावी हें सांगायाला नकोच![१] तेव्हां एकंदरींत प्रस्तुत कवि हा महापंडित होता ही जी सामान्यतः त्याच्या प्राकृतसंस्कृतामिश्रित काव्यावरून लोकांची समजूत झालेली आहे ती अगदीं खोटी आहे. महाराष्ट्रकवींत पंडित असा एक वामन मात्र होता; बाकीच्यांस वरील संज्ञा लावणें हें अप्रशस्त होय.

मोरोपंताच्याच ग्रंथांवरून पाहतां तो आपणास पंडित समजत असे किंवा त्या पदावर चढण्याविषयीं त्याची हांव होती असाही प्रकार बिलकुल नजरेस येत नाहीं. तो आपली पदवी ओळखून तींत संतुष्ट होता असें दिसतें. आपलें कवित्व कोणत्या तोलाचें आहे हें पक्केपणीं जाणून तो त्याविषयीं योग्य अभिमान बाळगीत असे, व दूषकांच्या आक्षेपांची पर्वा करीत नसे, हें त्याच्या कांहीं उल्लेखांवरून दिसतें खरं; तरी जगन्नाथरायाप्रमाणें* 'पंडितराज', 'पंडितपति', 'पंडितराजराजितिलक' इत्यादि विशेषणें त्यानें आपणास घेतलेलीं

---

ते पूर्ण पारंगत होते. कित्येक तर त्यांनीं स्वतः लिहून काढलीं होतीं. थोडक्यांत सांगावयाचें तर पंत हे चतुरस्र, बुद्धिमान् , उद्यमशील, व सर्वशास्त्रपारंगत असे 'चौरस राष्ट्रीय पुराणिक' होते.

'सम्पादक'

१. मोरोपंताची एक आर्या प्रसिद्धच आहे:—

नलगे व्याकरणाची न्यायाची घटपटादि खटपट ती।
वैकुंठपेठ मोठी नांवावरि हीनदीन खटपटती ॥

या आर्येवरून प्रस्तुत कवीस वरील शास्त्रांची कितपत अभिज्ञता असावी याचें कांहीं अनुमान करण्यास जागा आहे. शिवाय त्याच्या खुद्द ग्रंथांतही प्रस्तुत प्रकरणीं निर्णायक होण्यासारखीं कांहीं स्थलें आहेत. उदाहरणार्थः—

ऐसें ह्मणतां स्त्रीच्या कंठीं घालुनि मिठी ह्मणे, 'अयि ! ते।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते !' ॥—आदिपर्व (३१, २७. सं०)
तीस ह्मणे द्रुहिण, 'अये ! देवि ! त्रैलोक्यसुंदरि ! पुनीते !।
वारीं ताप, जगा जे दिधले सुंदोपसुंदरिपुनीं ते. ॥

—किष्किंधा (३८, १३. सं०)

आमचा कवि जर वैयाकरण असता तर 'अनुष्ठितुं' व 'पुनीते' अशीं रूपें तो न लिहिता हें उघडच आहे. इतर महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांतून व्याकरणशुद्धतेचा प्रकार कितपतसा दृष्टीस पडतो हें प्रस्तुत पुस्तकाच्या १० व्या अंकाच्या शेवटीं$ एका टिपेंत कांहीं उदाहरणें दाखल केलीं आहेत त्यांवरून लक्षांत येईल.

$ पृष्ठ ११७ टीप १ व पृष्ठें ११५-११७ पाहा. 'सम्पादक'

* जगन्नाथपंडित म्हणतात:—

'वाचामाचार्यतायाः पदमनुभवितुं कोऽस्ति धन्यो मदन्यः ? ॥' 'सम्पादक'

कोठेंही आढळत नाहींत. फार तर काय, पण रामजोशाप्रमाणें 'कविराय' किंवा जयदेवाप्रमाणें 'कविराजराज' अशा उपपदांचाही त्यानें प्रयोग केलेला नसून स्वतःविषयींचा उल्लेख केवळ 'मयूर', 'मोर', 'मयूरेश' अशा साध्या पदांनींच त्यानें केलेला आढळतो. शिवाय पांडित्य मिरवण्याचा दुसरा जो प्रकार असतो, ह्मणजे शास्त्रीय प्रकरणांस अनुलक्षून काव्यांत उल्लेख करायाचे, किंवा अर्थबाहुल्याचा चमत्कार करायाचा, तोही प्रकृत कवीच्या कृतींत कोठेंही दृष्टीस पडत नाहीं. हें तर काय, पण आपल्या अंगीं पंडितत्व वसत नसल्यामुळें आपलें काव्य पंडितांच्या दोषदृष्टीस पात्र होईल हा धाकही आमच्या कवीनें वागवलेला कोठें कोठें नजरेस येतो![1]

८. हें एक झालें. आतां याच्याच अनुषंगानें राहणारा दुसरा भ्रम जो कीं मोरोपंताचें काव्य जो संस्कृतज्ञ असेल त्यासच कळेल, किंबहुना स्थलविशेषीं मोठमोठ्या पंडितांसही तें समजण्याची मुष्कील पडते,-यांत कितपत तथ्य आहे तें पाहूं.

या भ्रमाचा निरास करण्यापूर्वीं अर्वाचीन काळीं लोकांच्या मनास बळकट जडून राहिलेल्या एका मिथ्या कल्पनेचा ऱ्हास केला पाहिजे. ही कल्पना अशी कीं, काव्य जितकें जितकें दुर्बोध तितकें तितकें तें चांगलें. आपण कविता केली आणि ती वाचणारास किंवा ऐकणारास चटदिशीं कळली ह्मणजे मग आपली करामत व आपलें चातुर्य तें काय? खरें काव्य ह्मटलें ह्मणजे तें, कीं ज्यांतील पद्यें येथून तेथवर सबंध वाचलीं असतां बोध ह्मणून बिलकुल होऊं नये. पोरींच्या उखाण्यांतला 'काय तुझ्या मनांत सांग माझ्या कानांत' हा जसा प्रकार, किंवा विठ्ठलकवीच्या* कोड्यांतला 'षण्मासच्या(सिंच्या ? सं०) वायद्या'चा†

१. कथांसि उपमा दिली सुरभिची, दिसे नीट ती;  
परंतु बहु मंद मी ह्मणुनि सच्छ्रुती वीटती;।  
कथा निरुपमा तयांप्रति पशूपमा शुद्ध तें  
नव्हेचि; न विचारिलें बुधजनांसि म्यां उद्धतें. ॥  
—' केकावलि, (५९ सं०)

असेंहि उपदेशिती गुरु रहस्य मंदा 'रुचे  
निजस्तव जसा तसा, अगुण घे न वंदारुचे;'।  
ह्मणोनि निगमस्तुता भलतसें तुला वानितों;  
परंतु हृदयीं महाजनभयास मी मानितों ॥०  
—किता, (६० सं०)

* 'विठ्ठल' कवीला कूटश्लोक करण्याची भारी हौस असून तो पहिल्या तीन चरणांत कोडें सांगून शेवटच्या चरणांत 'बोले विठ्ठल हा पदार्थ उगवा षण्मासिचा वायदा॥' असें आव्हान करतो.  
'सम्पादक'

† कौशिकगोत्रोत्पन्न आश्वलायन शाखेचा ऋग्वेदी ब्राह्मण. बापाचें नांव अनंत, आडनांव क्षीरसागर. सोळाव्या शतकाअखेर व सत्राव्याच्या आरंभीं हा होऊन गेला. रुक्मिणस्वियंवर, पांचालीस्तवन, सीतास्वयंवर, द्रौपदीवस्त्रहरण, विद्वज्जीवन व विठ्ठलचरित्र यांतून नऊाहि रस साधण्याचा,

( पुढें चालू. )

प्रकार, तशी जेव्हां बहार असेल तेव्हां तें काव्य !' ही समजूत अत्यंत असमंजसपणाची व अरसिकतेची आहे. काव्याचा उद्देश जर मनोरंजन आहे, व रस हा त्याचें केवळ तत्त्व होय, तर वरील दुर्बोधपणा हा काव्याचा गुण नसून उलटा दोषच होय; का कीं, जेथें अर्थ-ज्ञानच दुर्लभ तेथें मनोरंजन कसलें व रसोत्पत्तीचा संभव तरी कसचा ! शिवाय अर्थगांभीर्य व उत्तानार्थत्व हे गुण स्वभावतः परस्परविरोधी नव्हेत हें तत्त्व वरील अरसिक मंडळीस कळत नसतें. उत्कृष्ट पाणी जसें स्वच्छ असतें आणि खोलही पण असूं शकतें, त्याप्रमाणें ज्या काव्याचीं पदें प्रसादयुक्त ह्मणजे अत्यंत व्यक्त आहेत त्यांत अर्थही पण मोठा सखोल असूं शकेल ! हें मर्म न समजून वरच्यासारखे लोक साध्या कवितेस भिकार समजतात, व मोठमोठे संस्कृत शब्द आणि लांब लांब समास योजून रचलेल्या काव्यास प्रौढ व गहनार्थक मानतात. केवळ सुबोधत्वावरून व दुर्बोधत्वावरून वरील कल्पना बांधणें हें केवळ स्वच्छ-पणावरून किंवा गढूळपणावरून पाण्याच्या खोलीचें अनुमान करण्यासारखें असमंजस होय. दोन हातच खोल आहे पण आंतील गोटे बिलकुल दिसत नाहींत अशा गढूळ डबक्यास भारी खोल मानून ज्यांतील रत्नसंचय वरून लख्ख दिसतो आहे अशा सागरास वरील स्वच्छतेवरूनच केवळ उथळ मानला असतां तें किती समंजस होईल !

असो; आतां प्रस्तुत महाराष्ट्रकवींचे ग्रंथ वरील दोहोंपैकीं कोणत्या प्रकारांत येतात तें पाहूं. सदहू प्रकरणीं आजपर्यंत कोणत्या समजुती लोकांच्या मनांत दृढ होऊन बसल्या आहेत हें या पूर्वीच्या विवेचनावरून वाचकांस कळलेंच आहे. त्या या कीं, मोरोपंतांचें काव्य ह्मणजे दुर्बोध; जसा असोल्या नारळ असतो, कीं त्यास फोडायास कुऱ्हाडच आणली

अनेक संस्कृत वृत्तें ( वर्णनाच्या ओघांत सहजरीत्या त्या त्या श्लोकांत वृत्ताचें नांवहि सार्थ रीतीनें गोंवून ) आणण्याचा, आणि प्रेक्षणीय शब्दकौशल्यप्रदर्शनाचा यानें प्रयत्न केला आहे. ओंवी, अभंग, दिंडी, साकी वगैरे मराठी वृत्तांवर याचा कडकडीत बहिष्कार आहे. तथापि भाषाप्रभुत्व व शब्द-भांडार मात्र वेतावाताचेंच आहे. विद्वत्त्व आहे, पण कवित्व नाहीं. कष्टसाध्य रचना, नाजुक शब्द-चमत्कार यांची नुसती रगाडी आहे; यमकें तर अद्भुतच आहेत. जसें:—

वीराजवे मत्त उदार पाहें । वीरा धरीं शक्ति शराव साहे ॥
हे सावरा शक्ति शरीं धरावी । हें पारदा उत्तम तेज रावी ॥ रुक्मिणीस्वयंवर.

यांत सार्थ यमक तर आहेच. पण 'प्रतिलोम' यमकहि आहे. पहिला चरण उलट वाचला कीं चवथा होतो; व दुसरा उलट वाचला कीं तिसरा होतो ! रसमंजरी, व बिल्हणचरित्र यांत मात्र हा अतिरेक नाहीं; त्यामुळें तीं ( विशेषतः बिल्हणचरित्र ) अत्यंत मनोहर साधलीं आहेत. 'सम्पादक'

१. सर्व देशांतील महाकवींच्या पद्धतीप्रमाणें कालिदासाचें काव्य प्रसादगुणविशिष्टच आहे; तरी 'नलोदय' या नांवाचें एक अत्यंत क्लिष्ट काव्य त्याच्या नांवानें प्रसिद्ध आहे. याचें कर्तृत्व आलीकडील मंडळी दुसऱ्या एका कालिदासाकडे देतात. जुन्या मंडळींत वरील काव्याच्या अप्रस्तुततेची अशी उपपत्ति करतात कीं, तें आमच्या कविमुकुटमणीनें लोकांच्या सांगीवरून लिहिलें. आपलें उत्तानार्थक काव्य हवें त्यास समजतें, तर असें नसून जें गहन अर्थाचें काव्य नुसत्या पंडितांसच लागेल असें रचावें असें लोकांनीं सांगितल्यावरून कालिदासानें 'नलोदय' रचलें अशी एक गोष्ट ऐकण्यांत आहे. मोरोपंताच्या 'बृहद्दशमा' विषयींही अशीच आख्यायिका आहे. या दोहोंत संभाव्यता कितपत आहे हें सांगायास नकोच !

पाहिजे, तशी प्रस्तुत कवीची कविता; साहित्यांत सांगितलेल्या नारिकेलपाकाचें उत्कृष्ट उदाहरण ती होय. खरी कविता झटली झणजे द्राक्षापाक या तऱ्हेची असावी; कीं द्राक्षांत जसा अंतर्गत रस बाहेर लखलखीत दिसत असतो, व द्राक्ष तोंडांत घालण्याचा अवकाश,— कीं तें विरघळून गेलेंच, त्याप्रमाणें कवितेच्या अंगीं सुबोधपणा असावा ! पण मोरोपंताचें तर याच्या अगदीं विरुद्ध. हा प्रस्तुत कवीच्या प्रतिपक्ष्यां(क्षीयां ?सं०)चा त्यावर भडिमार. त्याच्या तर्फेच्या मंडळीची प्रशंसा पाहिली तरी ती याच मुद्द्यावर. पंतांचें काव्य झणजे काय हो ! किती गहन, मोठमोठ्या पंडितांसही तें उकलण्याची पंचाईत,[१] एकेका आर्येंत दहा दहा अर्थ ! ! एकूण दोहों पक्षांचें भांडण तर खरें, पण मुद्द्याची गोष्ट एक,—कीं मोरोपंताची कविता दुर्बोध. या दुर्बोधत्वामुळें कितीएक जणांची अशी प्रसिद्धी झाली आहे, कीं मोरोपंताची कविता लावणें झालें तर त्यांनींच लावावी. अशा मंडळीस 'आर्यापंडित' ही लौकिक संज्ञा आहे.

आतां ही जी मोरोपंताच्या कवितेच्या संबंधानें हाकाहाक आहे ती पुष्कळ अंशीं निवळ व्यर्थ आहे हें कोणासही सकृद्दर्शनीं सुद्धां दिसणार आहे. पाहा कीं, मोरोपंताची कविता मराठी पांचव्या व सहाव्या यत्तेच्या पोरांसही चांगली समजते. कीर्तनसमयीं हरदास मोरोपंताच्या आर्या झणतात; पण या आर्या निघाल्या कीं श्रोतेमंडळी डुकल्या घ्यावयाला लागली किंवा उठून जावयाला लागली असेंही कोठें आढळत नाहीं. हरदास तरी जातीनें मोठे विद्वान् व महापंडित असतात असें नाहीं. महाराष्ट्रकवितेचें ज्ञान व तिची चांगली उपस्थिति, आणि सामान्य प्रकारची व्युत्पत्ति येवढी सामग्री असली झणजे त्यांचें काम चांगलें चालतें. मग अशांसही जी कविता स्वत: समजायास व श्रोतृजनांस समजावयास मोठीशी कठिण जाते असें नाहीं तिच्या दुर्बोधतेची प्रसिद्धि किती पोकळ झणावी ! असें तर आजपर्यंत कोणाच्या पाहण्यांत आलें नसेल, कीं आज अमुक अमुक आख्यान लावायाचें तर त्यावरील आर्यांचा कोणा महापंडितापाशीं जेव्हां संथा घेऊन फोड करून घ्यावी तेव्हां मग हरदासानें कीर्तनाला उभें राहावें ! शिवाय, हेंही पुष्कळांस माहीत असेल कीं छापण्याचा प्रचार इकडे सुरू झाल्याच्यापूर्वीं प्रस्तुत कवीचे ग्रंथ इतर महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांप्रमाणें लोक हस्तलिखित प्रती करून संग्रहास ठेवीत, व पुष्कळांचा प्रस्तुत कवीच्या आर्याविषयीं छंद असल्याविषयींही लौकिक असे. तर या सर्व प्रकारांवरून प्रस्तुत प्रकरणाचा काय निकाल होतो ती वाचकांनींच पाहावा !

---

१. दादोबांनीं मोरोपंताची श्रीहर्षाशीं जी तुलना केली आहे तिजवरून वरील भ्रम उत्पन्न होणारा आहे. शिवाय त्यांच्या इंग्रेजी व मराठी प्रस्तावनेंत जो उल्लेख आहे तो येणेंप्रमाणें:—

"Experience has perfectly satisfied me that even among Sanskrit scholars in this country, few can pretend to the full and easy comprehension of this little poem without mental efforts of no ordinary kind." (Pp. 4. 'Ed'.)

"त्यांत आणखी पंतांच्या काव्यांत निष्णात झणून वाखाणलेल्या पुरुषांमध्येंही बहुतेकांस 'केकावलि' हा ग्रंथ सार्थंत लागत नाहीं, असाही बोभाटा माझ्या ऐकण्यांत होताच; या सर्व कारणांवरून मोरोपंतांच्या ग्रंथावर टीका करण्यास हाच लहानसा ग्रंथ म्यां निवडून काढला."

कवीविषयींच पाहिलें तर त्याच्या ग्रंथांतही आपलें काव्य मोठें गहन आहे व तें उकलणें हें पंडितांशिवाय इतर कोणाच्यानेंही होणार नाहीं अशा प्रकारची कोठेंही प्रौढी झोकलेली आढळत नाहीं. स्वतःविषयींचे जे त्याचे कोठें कोठें उल्लेख आहेत त्यांत आपल्या कृतीच्या सरसत्वाविषयींच त्यानें लिहिलेलें आढळतें.[1] उलटा एके ठिकाणीं ('मंत्ररामायणा'-च्या प्रस्तावनेंत) असा मात्र उल्लेख आढळतो:—

कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली असेल यतिमात्र; ।
'अतिमात्र दोष' ऐसें न वदोत कवी समस्तगुणपात्र. ॥ (परिभाषा, १९. सं०)

जो कवि दूरान्वयाच्या योगानें वाचकांस काव्य समजतांना अडचण पडूं नये याविषयीं येवढा संकोच बाळगीत होता तो आपलें काव्य होईल तितकें दुर्बोध करण्याविषयीं झटेल कीं काय याचें अनुमान कोणासही सहज होणार आहे!

आतां येवढें मात्र खरें आहे कीं, मोरोपंताचें कवित्व केवळ द्राक्षापाकाच्याच वर्गांत येणार नाहीं. साऱ्या महाराष्ट्रकवींत त्याचें काव्य समजण्यास अंमळ श्रम लागतील खरे. तरी जो बहुश्रुत आहे ह्मणजे ज्यास संस्कृत शब्द बरेच माहीत असून समासांची मोडणी समजली आहे, आणि प्रस्तुत कवीची पद्धति ज्यास थोडीशी ठाऊक झाली आहे, त्यास ह्मणजे दरएक आर्येशीं अर्थबोध होण्याकरतां थबकून राहावें लागेल असें मुळींच नाहीं. बहुतेक आर्या त्यास वाचतां वाचतां सहज उलगडतील. क्वचित् ठिकाणीं मात्र, कीं जेथें यमकामुळें, प्रासामुळें वगैरे वाक्याची रचना अंमळ अव्यवस्थित झाली असेल, तेथें थोडासा विचार करावा लागेल; तरी ज्याप्रमाणें सूर्याच्या आड आलेला ढग त्याच्या बिंबावरून निघाला असतां अंधार जाऊन एकदम चख्ख होतें, किंवा धुराचा भपकारा वर निघून जाऊन अग्नीची ज्वाला प्रगट होते, त्याप्रमाणें वरील ठिकाणीं एकदम अर्थव्यक्ति झाली असतां मनांस चमत्कार व आल्हाद होतो! तसेंच कांहीं थोड्या ठिकाणीं अर्थ खरोखरच दुर्बोधही असेल. 'नवनीतांत'ही अशीं कांहीं स्थलें आहेत; तीं आमच्या

१. उदाहरणार्थ पुढील आर्या पाहा:—

हें 'भीष्मपर्व' पावो साधु-श्रुतिशष्कुली-नभा सावें, ।
श्रीव्यासकृत मयूरेश्वर-विलिखित वेगळें न भासावें. ॥
रसिक कवि, परम सज्जन, भगवद्भक्त प्रसन्न होतील ।
न गमेल यापरिस हित तो, जो वदनांत अमृत ओतील. ॥
भारत, (भीष्मपर्व, ११–७८ व ८१ सं०.)

जैमिनिकृताश्वमेध-स्थित कुशलवचरित वर्णिलें आहे ।
या हे रीति पहावी मग तों वाटे सुधानदी वाहे ॥
नामरसायन.

पद्माकांतपदींच 'कृष्णविजय'ग्रंथांबुजन्मांजळी
भावें वंदुनि अर्पिला; हरिजनामध्यें किती जे अळी, ।
ते याचा रस सेवितीलचि, शिरीं वाहेल सन्मंडळी,
हा स्वस्वामिपदप्रसाद, खळ तों भीतील जैसा कळी. ॥
बृहद्दशम (ऊर्फ भागवतांतर्गत कृष्णविजय ९०, ४५.सं०)

वाचकांपैकीं पुष्कळांच्या लक्षांत असतीलच. पण हा दुर्बोधपणा वाचकांस मुद्दाम घोळांत पाडण्याकरतां कवीनें आणलेला असतो किंवा यमकादिरचनेमुळें झालेला असतो असें ह्मणवत नाहीं. कां कीं, असला प्रकार बहुतेक कवींच्या ग्रंथांत, आणि त्यांतून ज्यांनीं ग्रंथरचना पुष्कळ केली त्यांच्यांत तर आढळायाचाच. प्रस्तुत कवीविषयीं असें ऐकण्यांत आहे, कीं तो एका बैठकीस शंभर शंभर दीडशें दीडशें आर्या रचीत असे, व त्याच्या हातच्या पंढरपुरच्या प्रती ज्यांनीं पाहिल्या आहेत ते सांगतात कीं त्यांत एकही अक्षर कोठें खोडलेलें आढळत नाहीं. यावरून स्पष्ट दिसतें कीं, कित्येक इंग्रेजी कवींचा जसा प्रघात असे, कीं आपली कृति जितकी उत्कृष्ट व जितकी निर्दोष करवतां (करतां ! सं०) येइल तितकी झाली व शेकडों वेळां तिजवरून नजर व लेखणी फिरली ह्मणजे मग ती बाहेर काढायाची, तसा प्रकार मोरोपंताचा नसावा. तर शेक्स्पीयर, ड्रायडन् इत्यादि कवींप्रमाणें जें एकदां पहिल्या तडाक्यास लिहून टाकलें तें टाकलें, त्यांत पुनः फार करून फेरफार व्हावयाचा नाहीं, ही त्याची तऱ्हा असावी. तर या कारणामुळें प्रस्तुत कवींच्या ग्रंथांत कोठें कोठें दुर्बोध स्थळें राहिलीं असावीं असें वाटतें.[1] याखेरीज अपपाठ हेही स्थलविशेषीं अर्थभ्रम होण्यास कारणभूत होत असतील; कां कीं, इंग्लंडांत जसें आहे, व हल्लीं इकडेही चालू झालें आहे, कीं छापखान्याच्या सोईमुळें ग्रंथकारानेंच खुद्द तयार केलेली प्रत वाचकांस मिळते—तसा प्रकार अर्थातच जुन्या महाराष्ट्रकवींस लागू नाहीं. तेव्हां लेखकपरंपरेच्या योगानें झालेल्या प्रमादांचें प्रायश्चित्त बिचाऱ्या कवीस भोगणें येतें ![2]

---

१. रचनाचापल्याच्या योगाने होणाऱ्या दुर्बोधत्वाचे एक चमत्कारिक उदाहरण स्कॉटच्या 'लेडी ऑफ् दि लेक' नामक काव्यांत आहे. याच्या पहिल्या सर्गांत एके ठिकाणीं वनश्रीच्या वर्णनांत पुढील दोन ओळी आढळतातः—

Fox-glove and night-shade, side by side,
Emblems of punishment and pride, (XII LL 7-8.'*Editor*')

या ओळी कवीस स्वतःच्या स्वतःस कळेनात याविषयीं एके ठिकाणीं पुढील चमत्कारिक लेख आढळतो:—

"Soon after the publication of the *Lady of the Lake*, and whilst his fame was at its highest, Scott received a visit from an old and valued friend. Their conversation naturally turned on the successful poem, and the friend, delighted with the work as a whole, still declared that some lines were quite unintelligible to him. Picking up a copy of the book, he opened it at this passage, and pointed it out to Scott, saying, "There, I have puzzled over those two verses for hours, and I can't see your meaning." "Well", replied the poet, with his broad smile and accent. "It would have been a strange thing if you had seen my meaning, for I could never see it myself." This anecdote is related on the authority of the son of Scott's friendly critic."

२. वरील गोष्टीचा प्रत्यय 'मंत्रमय भागवता'वरून आह्मांस आला. याची एक जुनी प्रत

[ पुढें चालू ]

गतानुगतिको लोको न लोकः पारमार्थिकः ।[१]

अंक ५८.—(१) विषयोपक्षेप. (२) लोकांची गतानुगतिकत्वाविषयीं प्रवृत्ति. (३) मोरोपंताच्या काव्याचें अनेकार्थत्व. (४) प्रस्तुत कवीचें पांडित्य. (५) श्रीहर्षाची व त्याची तुलना. (६) त्याच्या कवितेंतील अनेकार्थात्मक स्थळें. (७) ५३ व्या अंकांतील आर्येविषयीं विचार.

१. गेल्या अंकांत मोरोपंताच्या संबंधानें जे कित्येक विलक्षण समज लोकांत आहेत त्यांविषयीं बहुतेक विचार झाला. आतां त्यांतील एक मात्र कलम राहिलें आहे. हें कलम कोणतें तर प्रस्तुत कवीचें श्लेषप्रियत्व, म्हणजे त्याच्या आर्यांचे दहा दहा अर्थ होतात, हें होय.

२. लोकांची सामान्यतः प्रवृत्ति अशी आढळते कीं, जो समज एकदां होऊन बसला तो ' पीछेसी आई ' या न्यायानें केवळ अंधपरंपरेनें पुढें चालवायाचा. एकंदर राष्ट्राच्या मानानें कोणत्याही देशांत पाहतां विद्वज्जनांची संख्या थोडीच असल्यामुळें, आणि त्यांतून रायचंदाच्या$ टिपेवर निर्वाह न करतां आपणाजवळ आपला खाजगी कांटा बाळगून सत्यासत्य तोलणारी मंडळी तर बरच्यांहूनही फारच थोडी असल्यामुळें बरचा गतानुगतिकत्वाचा प्रकार सर्वत्र आढळण्यांत येतो. आमच्या देशांत वेदांविषयीं काय समजूत आहे. ती कोणासही सांगायास नकोच;—कीं त्यांचा अर्थ केवळ अगम्य आहे. जसा नीलनदीच्या उगमांचा शोध अद्याप लागला नाहीं, व तो लागण्याचा उद्योगही ' नदीचें मूळ आणि ऋषीचें कूळ ' या वचनाप्रमाणें निषिद्ध होय; त्याप्रमाणेंच अनादि जी श्रुति तिचा अभिप्राय परम दुरापास्त असून त्याविषयीं परिश्रम करणेंही व्यर्थ व साहसात्मकच होय ! पण हा समज कितपत खरा आहे याविषयीं आलीकडे कोणासही संशय उरण्यास जागा राहिली नाहीं. आमचे रेणानदीकांठचे * पाश्चात्य आर्यबंधु तर रूपावळी झाली कीं, प्रथमतः ' अग्निमीळे ' वर‡ धडाका उडवतात ! आणि एकंदरींत पाहतां ऋग्वेदाचा अर्थ कोणासही होत नाहीं हें ह्मणणें ' रामायण ' किंवा ' राजा शिवाजी ' हीं काव्यें कोणासही कळत नाहींत असें ह्मणण्याप्रमाणेंच अत्यंत असमंजस होय. पण लोकांच्या मनाचा असा एक चम-

---

आह्मांस मिळाली होती. ती व पंढरपुरची प्रत यांत अनेक ठिकाणीं विलक्षण तऱ्हेचे फेर आढळले. वरील अस्सल प्रतीखेरीज पुष्कळ ठिकाणचा अर्थ कांहीं कळला नसता ! वरील रामायण ( भागवत? सं● ) हें हल्लीं 'काव्येतिहाससंग्रहा'त छापत आहे.

१. "जग हें गतानुगतिक आहे, ह्मणजे जिकडे एक गेला तिकडे दुसऱ्यांनीं डोळे मिटून जावयाचें; परमार्थ ह्मणजे वास्तविक गोष्ट काय आहे तिच्याविषयीं कोणी शोध करीत नाहीं."

$ प्रेमचंद रायचंद यांच्या मुंबई व कलकत्ता येथें दोन मोठया सराफी पेढ्या आहेत. यांनीं कलकत्ता विद्यापीठांत सालीना दहा हजार रुपयांचें बक्षीस ठेवण्याकरितां पांच लक्षांच्या ( तितकें व्याज येण्यापुरत्या ) गव्हर्नमेंट् प्रॉमिसरी नोट्स् सन १८६६ सालीं विद्यापीठास दिल्या. अलीकडे बक्षिसाऐवजीं स्कॉलर्शिप् ठेवली आहे. राजाभाई टॉवर व मुंबई विद्यापीठाची इमारत यांच्याच देणगींतून बांधण्यांत आल्या आहेत. 'सम्पादक'

* ऱ्हाईन (The Rhine) नदी. ‡ ऋग्वेदावर, वेदाध्ययनावर. 'सम्पादक'

स्कारिक स्वभाव आहे,—तो येथेंच नव्हे तर चोहोंकडेही असावं आढळतो—कीं जें दृश्य व परिचित त्यापेक्षां जें अदृश्य व अपरिचित त्यास अधिक मान¹. तेव्हां या स्वभावास अनुसरून जो वेद येवढा परमपूज्य त्याचा अर्थ येवढा उत्तान² असेल हें लोकांच्या मनाच्यानें घेववत नाहीं. असो; दुसरें उदाहरण मूर्तिपूजेचं घ्या हा मार्ग वेदविहित आहे किंवा नाहीं, अन्या 'जिवंत देवास' मूर्तिपूजेची चीड येते किंवा नाहीं वगैरे विचार एकीकडे ठेवले असतां केवळ इतिहासज्ञानावरून कोणासही कळणार आहे कीं, मांजरास व सुसरीस भजणाऱ्या लोकांनीं* पर्वतप्राय मनोरे बांधले, जुपिटरच्या एका भक्तांनीं† साऱ्या पृथ्वीवर आपलीं गरुडांकित‡ निशाणें फडफडावलीं व दुसऱ्यांनीं§ सर्व विद्यांचें व कलांचें सार्वभौमत्व संपादन केलें, मारया देवीच्या भजकांतच$ अत्युत्कृष्ट मूर्तिकार, चित्रकार व

---

१. वरील प्रमेयाचें पुढील दोन सुभाषितांत दृष्टांतासहित निरूपण केलें आहे:—

अतिपरिचयादवज्ञा सन्ततगमनादनादरो भवति ।
मलये भिल्लपुरन्ध्री चन्दनतरुकाष्ठमिन्धनं कुरुते ॥

अतिपरिचय खोटा मान राहात नाहीं
प्रगट दिसत भानू तो जगीं तुच्छ पाहीं
लघु शशि द्वितियेचा वंदिती सर्व भावें
ह्मणवुनि सखया रे दूर देशीं रहावें ॥

२ वेदाचा अर्थ सुगम आहे, व युरोपियन् लोक प्रथमतःच ऋग्वेद हातीं धरतात, या दोन्ही गोष्टी पुष्कळ वाचकांस कदाचित् विलक्षण वाटतील; पण वेदाचें दुर्बोधत्व त्यास कशामुळें प्राप्त झालें आहे हें समजलें असतां वरील विस्मय नाहींसा होईल. 'ज्ञानेश्वरी'च्या दुर्बोधतेचें जें कारण तेंच वेदाच्या दुर्बोधतेचें होय. 'ज्ञानेश्वरी'ची भाषा जुनाट असल्यामुळें अर्वाचीन महाराष्ट्रभाषा जाणणारांस वरील ग्रंथ जसा अवघड लागतो, त्याप्रमाणेंच पंचमहाकाव्यांशींच ज्याचा परिचय त्यास ऋग्वेदाची भाषाही अत्यंत अपरिचित वाटते. हल्लींच्या इंग्रेजी भाषेंत व चॉसर् कवीच्या भाषेंत तसाच फरक आढळतो. शिवाय 'सप्तसिंधूं'च्या तीरीं यज्ञयाग करणाऱ्या प्राचीन आर्यांच्या काळांत व हल्लींच्या मनूंत जमीनअस्मानचें अंतर असल्यामुळें पूर्वींच्या पद्धति आतां बिलकुल कळेनाशा झाल्या आहेत हेंही वरील दुर्बोधतेचें एक दुसरें मोठें कारण होय. तरी ज्या अर्थी पारशी लोकांच्याप्रमाणें आमचे जुने ग्रंथ नाहींसे झाले नाहींत, व प्राचीन आर्यांचे वंशज आम्ही या देशांतल्या देशांत अद्याप असून पूर्वींची परंपराही अद्याप केवळ विच्छिन्न झालेली नाहीं, त्या अर्थी 'झेंदावेस्ता' ग्रंथाप्रमाणें आमच्या वेदांस निवळ दुर्बोधत्व आलें नाहीं! त्यांची रचना साधी असल्यामुळें व विषयही सुगम असल्यामुळें आणि त्यांतून भाष्यादि साधनें अनुकूल असल्यामुळें, अर्थाचा फोड होण्यास मोठेसे प्रयास आहेत असें नाहीं.

* इजिप्शियन् लोकांनीं. † रोमन् लोकांनीं, विशेषतः अलेक्झांडर् दि ग्रेट् यानें. 'सम्पादक'

‡ रोमन् निशाणावर प्रथम लांडगा, घोडा, अस्वल इ० व त्यांबरोबरच गरुडपक्षी यांचीं चित्रें असत. परंतु (Pinly) प्लिनी ह्मणतो कीं रोमन् निशाणावर गरुड पक्ष्यांच्या जोडीशिवाय दुसरें कसलेंहि चित्र असूं नये असा Gaius Marius यानें हुकूम सोडला व तेव्हांपासून त्याची कायमची अंमलबजावणी झाली. 'सम्पादक'

§ ग्रीक् लोकांनीं. $ ( Virgin Mary ). खिस्ताची आई, कुमारी मेरी इचे भजक ह्मणजे रोमन् कॅथलिक् लोक होत. 'सम्पादक'

मंदिरकार जन्मले आहेत, खुद्द आमच्या देशांतच पाहिलें असतां गाईच्या भजकांनीं साऱ्या आर्यभूमीचें आधिपत्य संपादन केलें आहे, व तुळशीच्या पायां पडणाऱ्या बायांनींही वेळोवेळां राज्याचें सुकाणूं हातीं धरलें आहे; किंबहुना रणमंडळांत गर्जनाही केली आहे! तसेंच एकंदरींत पाहतां आजपर्यंत जेवढीं राष्ट्रें उदयास आलीं त्यांतील बहुतेक मूर्तिपूजकच होतीं, व आज जगांत जी सुधारणा दृष्टीस पडते आहे तीही फार करून वरील लोकांपासूनच आलेली आहे. पण हें सर्व सर्वांच्या येवढें डोळ्यांसमोर ढळढळीत असतां पाद्री (ह्यां ! सं० )चें व्याख्यान किंवा सामाजिकांची जुक्ती ऐकली असतां त्यांत मतलब काय आढळतो,—कीं मूर्तिपूजेसारखा घोर पापमार्ग दुसरा कोणता नाहीं; जेथें मूर्तिपूजा आहे तेथें विद्या नाहीं, कला नाहीं, नीति नाहीं, शौर्य नाहीं, दया नाहीं,- कांहीं नाहीं ! चोरी, चहाडी, शिंदळकी, मारामाऱ्या, खून, रक्तपात, या अनर्थपरंपरेची मात्र रगाडी ! मूर्तिपूजा असली कीं, तेथें सुखाचें वारें सुद्धां लागायाचें नाहीं, व विद्येची वार्ताही ऐकूं यावयाची नाहीं ! या सर्व उद्गारांचें मूळ पाहूं जातां यहुदी, ख्रिस्ती व मुसलमानी धर्मांत उपदेशिलेला जो मूर्तीचा द्वेष तो आज हजारों वर्षें अनेक राष्ट्रांच्या मनांत बिंबून जाऊन ' बाबावाक्यं प्रमाणम् ' या न्यायानें पितृपुत्रपरंपरेनें पुढें चालत गेला हें होय. आमच्या देशांतही मिशनरीं( ह्यां ! सं० ) नीं मूर्तिपूजेच्या नांवानें शतशः आरोळ्या मारल्या असल्यामुळें तेंच तुणतुणें पुढें ब्रह्मोंनीं, सामाजिकांनीं, दयानंदभक्तांनीं व शेवटीं सत्यशोधकांनींही चालवलेलें आढळतें[१] !

---

१. परवां जो आगीचा भयंकर कहर$ उसळला त्याच्या संबंधानें एक पत्रिका या शहरांत दुसरे दिवशीं वांटली गेली. ती आमच्या वाचकांपैकीं फारच थोड्यांच्या पाहण्यांत आली असेल यास्तव तिचें पूर्वार्द्ध येथें उतरून घेतों:—

"सूचना—ता० १३ व १४ मे १८७९ दिवशीं पुणें शहरांत जो अग्निप्रलय झाला आणि तेणेंकरून जी लोकांस भयंकर स्थिति प्राप्त झाली, त्यावरून आमच्या मनांत अशी कल्पना उत्पन्न झाली कीं, आज चाळीस वर्षांपासून ह्या पुणें शहरांतल्या लोकांस तारक जो प्रभु येशूख्रिस्त याजकडे फिरण्याविषयीं बहुत बोध व सूचना मिळत असतांना लोक येशूख्रिस्ताचा धिःकार करून आपल्याच गर्वानें फुगून पापामध्यें राहिले आहेत. ह्मणून त्यांजवर देवाचा भयंकर क्रोध पेटलेला आहे, आणि त्याच

(पुढें चालू.)

$ मंगळवार मिति वैशाख वद्य अष्टमी शके १८०१ रोजीं रात्रीं अकरा वाजण्याच्या सुमारास विश्रामबागेंतून धूर निघत असल्याचें दीक्षितांचे वाड्यांतून बाहेर आलेल्या एका गृहस्थास दिसतांच त्यानें शंखध्वनि केला.लोक धांवले,पोलीस व डॅन्युपलू साहेबहि लवकरच दाखल झाले;बंब आणून आग विझविण्याची व्यवस्था झाली; विश्रामबाग हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनींहि खूप खटपट केली; पण अर्धा वाडा जळून खाक झालाच! उत्तररात्रीं दोन वाजतां ढमढेऱ्यांच्या वाड्यालाहि आग लागली ! दुकानांतून कागद व रॉकेल भरलें असल्यामुळें आगीला मदतच झाली. प्लंकेट्‌ साहेब गॅरिझनसह सकाळीं ९ च्या सुमारास दाखल झाले. बुधवार-वाड्यापासून बेलबागेचे समोरच्या रस्त्यापर्यंत दर रांगेंत पांच शिपाई अशा छत्तीस रांगा उभ्या होत्या. खूप खटपटीनें दुपारीं तीन वाजतां आग विझविण्यांत आली. पण कांहींहि सुरक्षित हातीं लागलें नाहीं. धरपकड झाली व रात्रीं आठापुढें रस्त्यांत हिंडण्यास बंदी करण्यांत आली. चौकशीअंतीं तिघांवर गुन्हा शाबीत झाल्यावरून दोघां बापलेकांस जन्मठेप काळेंपाणी व तिसऱ्यास दहा वर्षें अशी सजा फर्माविण्यांत आली. 'सम्पादक'

३. तर प्रस्तुत कर्वाच्या काव्याच्या अनेकार्थत्वाविषयीं आज सुमारें शंभर वर्षे लोकांत जी बोलवा आहे ती वरील कलमांतील दोन सिद्धांतांप्रमाणें निवळ बाजारगप्प आहे. तिला आधार ह्मणून बिलकुल नाहीं. मोरोपंताचे ग्रंथ उगीच चाळून जो पाहील त्यास सुद्धां कळून येईल कीं वरील गोष्टींस शेंडा ना बुडखा ! आतां इतके दिवस चालत आलेल्या

क्रोधाग्नीनें सदहूं दिवशीं आपल्या पुढें होणाऱ्या शिक्षेचा थोडासा मासला दाखविला. तर पृथ्वीवर ब्राह्मणाऱ्यांच्या दुष्टपणाचें शासन करायाला परमेश्वर आपले स्थानांतून निघाला आहे. त्यानें सूप आपले हातांत घेतलें आहे. आणि तो आपलें खळें निर्मळ करील. गहूं कोठारांत सांठवील, आणि भूस न विझणाऱ्या अग्नींत जाळून टाकील. जसा रात्रीं चोर येतो तसा प्रभूचा दिवस येईल, आणि कुशल व सर्व सलामत आहे असें जेव्हां मनुष्यें ह्मणतील तेव्हां जसी प्रसूतीची वेदना स्त्रीला लागते तसा त्यांचा अकस्मात् नाश होईल. आणि ते निभावणार नाहींत."

नुकता जो साऱ्या दक्षिण हिंदुस्थानभर भयंकर दुष्काळ पडला होता त्याच्या संबंधानेंही वरच्यासारखेच विलक्षण लेख खिस्ती वर्तमानपत्रांतून येत असत, हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस आठवत असेलच. बंगाल्यांतले प्रख्यात मिशनरी डॉक्टर् डफ् यांचा 'हिंदुस्थानांतील बंड' या नांवाचा पत्ररूप ग्रंथ आह्मीं नुकताच वाचला, त्यांत तरी वरीलच चमत्कार आढळला. सदरील ग्रंथांतील एक मोठें प्रमेय हें होय कीं, वरील सालीं येवढा बंडावा व येवढा रक्तपात झाला याचें कारण काय?—काडतूस प्रकरण, राजेरजवाड्यांची दगाबाजी, रशियन् लोकांनीं केलेली चिथावणी, वगैरे केप्रभृति इतिहासकारांनीं वर्णिलेलीं कारणें नव्हत, तर ईश्वराचा माजी कंपनी सरकारावर कोप ! तो कशाकरतां?—तर हिंदुधर्माचें उन्मूलन करण्यांत त्यांच्याकडून जी कसर होत गेली तिजवरून ! ! बकलच्या इतिहासाच्या तिसऱ्या भागाच्या शेवटीं सन १८५३ सालच्या महामारीबद्दल इंग्रेजी प्रधानमंडळीचा व स्कॉट्लंड् येथील धर्माध्यक्षांचा जो चमत्कारिक पत्रव्यवहार * झाला तो दाखल केला आहे; तोही प्रस्तुत प्रकरणीं समजूत पडण्याकरतां वाचकांनीं वाचण्यासारखा आहे.

* In the autumn of 1853, the Presbytery of Edinburgh............ caused their Moderator to address a letter ostensibly to the English Minister, but in reality to the English nation. In this choice production the Home Secretary is assured that the members of the Presbytery had delayed appointing a day for fasting and humiliation on their own ecclesiastical authority, because they thought it likely that one would be appointed by the royal authority. But as this had not been done, the Presbytery respectfully requested to be informed if it was intended to be done. ("whether the appointment of a national fast by the Queen is in contemplation.") They apologized for the liberty they were taking; they had no desire unduly to intrude themselves; neither did they wish the Home Secretary to answer their question unless he felt himself justified in doing so.

"This letter was in fact a covert reproach on the English Government for having neglected its spritual duties, and for not having perceived that fasting was the most effectual way of stopping an epidemic. In

( पुढें चालू. )

प्रवादाविषयीं व रावबहादुरांसारख्यांच्या अभिप्रायाविषयीं येवढें लिहून जें आह्मी मत प्रगट करतों तें कशावरून हें सांगणें अवश्य आहे.

४. एक तर ही गोष्ट प्रथमतः लक्षांत आणली पाहिजे कीं मोरोपंत हा पंडित

---

Scotland, generally, it received great praise, and was regarded as a dignified rebuke addressed to the irreligious habits of the English people, who, seeing the cholera at their doors, merely occupied themselves with sanitary measures, and carnal devices to improve the public health, showing thereby that they trusted too much to the arms of flesh. In England, this manifesto was met with almost universal ridicule.........The scotch clergy took for granted that the cholera was the result of the divine anger, and was intended to chastise our sins..........The Presbytery (in reply) were informed (by Lord Palmerston) that the affairs of this world are regulated by natural laws, on the observance or neglect of which the weal or woe of mankind depends. One of those laws connects disease with the exhalation of bodies; and it is by virtue of this law that contagion spreads, either in crowded cities, or in places where vegetable decomposition is going on. Man by exerting himself, can disperse or neutralize these noxious influences. The appearance of the cholera proves that he has not exerted himself. The towns have not been purified; hence the root of the evil. The Home Secretary, therefore, advised the Presbytery of Edinburgh, that 'it was better to cleanse than to fast.' He thought that the plague being upon them, 'activity was preferable to humiliation.' It was now autumn, and before the hot weather would return, a considerable period must elapse. That period should be employed in destroying the causes of disease, by improving the abodes of the poor. If this were done, all would go well. Otherwise, 'pestilence would be sure to revisit them 'in spite of all the prayers of a united, but inactive nation.'

"The calamities with which the world is afflicted, are the result of the ignorance of man, and not of the interference of God. We must not, therefore, ascribe to Him what is due to our own folly, or to our own vice. We must not calumniate an all-wise and all-merciful Being, by imputing to him those little passions which move ourselves, as if He were capable of rage, of jealousy, and of revenge, and as if He, with outstretched arm, were constantly employed in aggravating the sufferings of mankind, and making the miseries of the human race more poignant than they would otherwise be."—(Single-inverted ours.) *'Editor'*.

नव्हता. त्याची विद्वत्ता कोणत्या तऱ्हेची होती याविषयीं गेल्या अंकांत* कांहीं निरूपण केलेंच आहे. त्याच्या वेळीं मराठी बादशाहीचा कळस झाला असल्यामुळें एतद्देशीय जुन्या विद्येचें पुनरुज्जीवन होऊन तिचा प्रचार हल्लीं जसा इंग्रेजी विद्येचा झाला आहे तसा सर्वत्र झाला होता खरा, तरी प्रस्तुत कवि तिजविषयीं केवळ उदासीन होता. पौराणिक व्युत्पत्तीच्या पलीकडे त्यानें कधीं हांव बांधली नाहीं. तो शास्त्रांच्या अध्ययनास लागता तर त्यांत पारंगत होऊन भट्टाचार्य पदवीला पोंचता यांत संशय नाहीं, पण त्याच्या मनाची प्रवृत्तिच निराळी पडली. तुकारामास दिल्लीपद देऊं केलें असतें तर तें त्यास जितपत पसंत पडलें असतें, किंवा रामदासांच्या पायांवर त्यांच्या दिग्विजयी शिष्यानें आपल्या कमाईची नवी बादशाही वाहिली असतां तिजविषयीं त्यांनीं जितपत लोभ प्रगट केला, तितपतच आमच्या कवीसही कणाद, पाणिनी, जैमिनि इत्यादि शास्त्रकारांच्या वाङ्मयाचें सार्वभौमत्व संपादन करण्याची हौस होती. तेव्हां 'घटपटादि खटपटीं'त न पडतां प्रस्तुत कवीनें परमार्थसाधनास जेवढा व्युत्पत्तीचा भाग अवश्य तेवढाच संपादन केला. बहुतेक महाराष्ट्रकवींची पंडितता कितपत होती याविषयीं पूर्वीं§ अनेक वेळां लिहिलेंच आहे, व त्यांपैकीं 'पंडित' हें उपपद कोणत्या कवीस$ मात्र यथार्थत्वानें लागू पडतें हेंही गेल्या अंकांत† सांगितलेंच आहे. या पंडित कवीसही पुढें स्वपांडित्याचाच पश्चात्ताप होऊन तें ओझें भगवद्भक्तीच्या पायीं उतरून ठेवावें लागलें; व बाकीच्यांचा तर पांडित्यावर केवढा कटाक्ष होता हें त्यांच्या ग्रंथांतील उल्लेखांवरून दिसून येतें.[1] मग असलें पांडित्य जोडून आपल्या मुख्य उद्देशास बळेंच व्याघात करून घेण्याचा

---

* पृष्ठें ८८१–८८२, कलम ७ वें पाहा. 'सम्पादक'

§ पृष्ठें ४१–४२, ११७–११८ व ८२४ पाहा. $ वामन. 'सम्पादक'

† पृष्ठ ८८२ पाहा. 'सम्पादक'

१. तुकारामाचा एक अभंग पूर्वीं (पृ. ८२५ सं०) दिलेला आहे. तोच येथें दाखल करतों:—

बरा कुणबी केलों। नाहीं तरि दंभेंचि असतों मेलों॥
भलें केलें देवराया। नाचे तुका लागे पायां॥
विद्या असती कांहीं। तरी पडतों अपायीं॥
सेवा चुकतों संतांची। नागवण हे फुकाची॥
गर्व होता ताठा। जातों यमपंथें वाटा॥
तुका ह्मणे थोरपणें। नरक होती अभिमानें॥

रामदासानें म्हटलें आहे:—

नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी
जडे गर्व ताठा अभीमान पोटीं।

रंगनाथाचें एक पद आहे:—

श्रुतिपारायण शास्त्र सुभाषित उत्तम पंडित झाला रे।
योगकळा सकळा अनुलक्षित वायु समग्रहि प्याला रे॥
भूतभविष्य गमे समयीं यमनियमहि वश्य तयाला रे॥

(पुढें चालू.)

उद्योग मोरोपंतानें केला नाहीं हें सहजच आहे. वरील उद्देश त्याचा दोन प्रकारचा होता. एक तर 'दयामृतघना'ची प्रसादवृष्टि आपणावर होण्याची आपल्या अंगीं पात्रता यावी, आणि दुसरा हा कीं, आपल्या देशबंधूंसही वरील लाभ होण्यास साधनीभूत असा नूतन कवित्वप्रकार दाखवावा. या दोहोंखेरीज त्याचा आणखी कोणताही हेतु नव्हता हें त्याच्या सर्व ग्रंथांवरून स्पष्ट दिसतें.[1]

५. आतां प्रस्तुत कवीच्या ग्रंथांचें ज्यांनीं उगीच वरवर अवलोकन केलें आहे त्यांची अशी समजूत होणें सहज आहे, कीं ज्या कवीनें संस्कृत शब्दांची भरपूर योजना,

---

भुललारे भुललारे प्राणी भुलला या आभासा रे।
आत्मकळा नकळे भ्रमला नर व्यर्थ पराक्रम गेला रे॥धु०॥

पंतांनींही 'अकराव्या स्कंधां'त म्हटलें आहे:—

गलिताहंकृति जाणे बंधा मोक्षासि अनुभवीं चढला, ॥
तो पंडित; इतर नव्हे, जन्हि पुष्कळ शास्त्र सर्वेही पढला. ॥ (मंत्रभागवत, ११-४००. सं०)

१. 'विविधज्ञानविस्तारा'च्या पहिल्या वर्षाच्या पांचव्या अंकांत पुढील विलक्षण मजकूर आढळतो:—

"मोरोपंत वैराग्यामुळें जर कारकुनीचा धंदा टाकून कविता करावयाला लागला असता, तर त्याणें एकनाथ, ज्ञानेश्वर प्रभृति साधूंप्रमाणें भक्तिमार्ग धरिला असता व एकनाथ, ज्ञानेश्वर, रामदास यांप्रमाणें केवळ पारमार्थिक विषयांवर ग्रंथ केले असते; किंवा वामनासारिखे तरी कांहीं ग्रंथ इतर विषयांवर व कांहीं नुसते पारमार्थिक विषयांवर केले असते, परंतु त्या प्रकारचें कांहींच नाहीं. त्याणें जी कविता केली ती सर्व स्वतःचे कीर्तिसाठीं केली, परमेश्वराचें गुणवर्णन करण्याकरितां रचली नाहीं. सूक्ष्म पाहिलें असतां असें वाटतें कीं, मोरोपंत ईश्वराला फारच थोडा मान देत असे."

वरील 'सूक्ष्मदृष्टि' आक्षेपकाची नजर पुढील पद्यांवर गेली असती तर 'स्वतःचे कीर्तिसाठीं कविता केल्या'चा भयंकर आरोप तो आमच्या बिचाऱ्या कवीवर बहुधा न घालता!—

हरि ज्यांचा कैवारी, त्या पांडुसुतांसि वंदितों भावें.।
वाटे, चरित्र त्यांचें कांहीं आपण तरावया गावें. ॥

'आदिपर्व,' (१, ८. सं०)

ज्यांच्या गानें व्हावें प्रेमाश्रु-क्षपित-चंदन मयूरें, ।
आर्या समर्पिल्या हरि-चरणीं श्रीरामनंदनमयूरें. ॥

'स्वर्गारोहण पर्व,' (२, ५५. सं०)

सुयश न जयांत हरिचें, चित्रहि गुणभवन कवन तें अशुची।
त्यांत सुमति नर न रमति पळही, बहु मानिती तया पशुची. ॥

'मंत्रभागवत,' (१, ८. सं०)

पुन्हां न मन हें मळो दुरित आत्मबोधें जळो॥

'केकावलि,' (११९. सं०)

ज्या कवीनें भगवद्यशोवर्णनपर ग्रंथांतही मंत्ररचना केली, एक रामायण पुरेसें न वाटून अष्टोत्तरशत रामायणें रचण्याचा विलक्षण खटाटोप केला, व केवळ लोकहितपर बुद्धीनें रामायणभारतादि ग्रंथांचें सार प्राकृत वाणीनें सर्वांस समर्पण केलें, त्याच्याचविषयीं वरील उल्लेख करणें हें केवढें आश्चर्य होय, केवढें अज्ञान होय, किंवा केवढा दुराग्रह होय!!

समासांची रचना, आणि यमक व प्रास यांचा थाटमाट हें सर्व आपल्या कवितेंत आणून तीस संस्कृत कवितेचें साम्य आणलें त्यास ही स्फूर्ति पंचकाव्यांवरून व विशेषेंकरून 'नैषधा'-वरून, तसेंच 'लक्ष्मीसहस्र', 'वासवदत्ता', 'कादंबरी' वगैरे ग्रंथांवरून झाली असावी. रा० ब० दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या व्याकरणाच्या प्रस्तावनेंत व 'यशोदा पांडुरंगी'च्या प्रस्तावनेंत मोरोपंताची श्रीहर्षाशीं जी तुलना* केली आहे ती वरील समजुतीवरूनच होय. पण वस्तुतः पाहतां वरील साम्य अत्यंत भ्रामक होय. तें इतक्यापुरतें मात्र खरें धरतां येईल, कीं संस्कृत भाषेचें अत्यंत उज्वल स्वरूप जसें 'नैषधां'त दृष्टीस पडतें तसें मराठीचें मोरोपंताच्या काव्यांत आढळतें. 'नैषधां'त जशी अनुप्रासाची गर्दी आढळते व रचनेची कृत्रिमता नजरेस येते त्याप्रमाणेंच आमच्या महाराष्ट्रकवीच्या कवितेंतही अनुप्रास व यमक हीं दोन्ही भरपूर असून पदरचनाही प्रायः केवळ सुगम नसते. पण येवढ्याखेरीज बाकी कोणत्याही प्रकारचें सादृश्य वरील दोघां कवींत किंवा त्यांच्या कवितेंत बहुधां आढळणार नाहीं. श्रीहर्ष केवढा पंडित होता हें त्याच्या महाकाव्याच्या शेवटीं त्यानें स्वरचित नानाशास्त्रविषयक ग्रंथांचे जे उल्लेख केले आहेत त्यांवरून स्पष्ट दिसतें; आमच्या महाराष्ट्रकवीच्या पांडित्याविषयीं मागें‡ लिहिलेंच आहे. श्रीहर्षाच्या काव्यांत पदलालित्य उत्कृष्ट प्रकारचें आढळतें; आमच्या मराठी कवींपैकीं तर एकानेंही वरील गुण साधण्याविषयीं विशेष परिश्रम केलेले दिसत नाहींत. 'नैषधां'त तेराव्या सर्गांत पांच नलांचें वर्णन करतांना कवीनें श्लेषाची कमाल करून सोडली आहे.—एक अर्थ नलाकडे, एक इंद्राकडे; पुनः एक नलाकडे, दुसरा अग्नीकडे, याप्रमाणें नलाचें व चार लोकपालांचें एकेकाच श्लोकांत× वर्णन केलें आहे; पुनः

---

* "अलीकडेस पेशवाईंत बारामतीकर पांडुरंगराव यांच्या पदरीं मोरोपंत या नांवाचे कारकून होते, पुढें त्यांची काव्यव्युत्पत्ति सर्वोत्कृष्ट पाहून त्यांस पांडुरंगरावांनीं आपल्या घरचे पुराणिक केलें; त्यांणीं तर आपल्या रसभरित काव्यानें या भाषेस केवळ संस्कृत भाषेचीच प्रौढी आणिली. वामन आणि मोरोपंत यांस अनुक्रमें महाराष्ट्रभाषेचे व्यास व श्रीहर्ष म्हटल्यासहि साजेल. प्राकृत भाषेविषयीं नाक मुरडणारे जे शास्त्री व पंडित यांस यांनींच लाजविलें. आजपावेतों जें कांहीं भांडार संस्कृत भाषारूप पेटींत कुलुप घालून ठेविलें होतें, आणि तिची किल्ली ब्राह्मणांच्याच स्वाधीन होती, तें ज्ञानेश्वर, एकनाथ, मध्वनाथ, मुक्तेश्वर, वामन, मोरोपंत आदिकरून जे ब्राह्मण कवि झाले त्यांणीं उघडून काढून, त्याचें प्राकृत लेणें करून, सर्व लोकांस अर्पण केलें; ह्मणोन नुसतें यांचें कौशल्य व चातुर्य वर्णावें इतकेंच नाहीं, परंतु यांची औदार्यपूर्वक जी औपकारिक बुद्धि तिचीहि या प्रसंगीं तारीफ केली पाहिजे." यापुढें ८९६ पानावरील टीप पाहा. 'सम्पादक'

‡ पृष्ठें ११७ व ८२४ पाहा. 'सम्पादक'

× अस्याजिलब्धविजयप्रसरस्त्वया किं विज्ञायते रुचिपदं न महीमहेन्द्रः ॥
प्रत्यर्थिदानवशताहितचेष्टयासौ जीभूतवाहनधियं न करोति कस्य ॥२८॥
येनामुना बहुविगाढसुरेश्वराध्वराज्याभिषेक विकसन्महसा बभूवे ॥
आवर्जनं तमनु ते ननु साधु नामग्राहं मयानलमुदीरितमेवमत्र ॥२९॥
यच्चण्डिमारणविधिव्यसनं च तस्य बुद्धाशयाश्रितममुष्य च दक्षिणत्वम् ॥

[पुढें चालू.]

उलट घेऊन एकेका लोकपालाचें व नलाचें श्लेषेंकरून वर्णन केलें आहे; आणि शेवटी एका श्लोकांत* तर नलाचें व चारी दिक्पालांचें वर्णन केलें आहे![१] आमच्या प्राकृत मयूरकवींच्या नलोपाख्यानांत पाहिलें तर वरच्यासारखी काहीं एक गडबड नसून मूळ भारतकाराचाच त्यानें साधा किता बळवला आहे. श्लेषाच्या संबंधानें पाहिलें तर साऱ्या उपाख्यानांत एका आर्येत मात्र एक लहानसा श्लेष केलेला आढळतो.[२] बाकी जो कविता-प्रदेश वरील संस्कृत कवींच्या वाग्देवीनें पदलालित्यपूर्वक नृत्य करून सारा अलक्तकांकित करून सोडला, व रसिककामिजनांच्या हृदयाचा भेद करणाऱ्या कटाक्षशरांनीं मदनाचें पंचशरत्व सार्थ करून कालिदासानें वर्णिल्याप्रमाणें

श्यामीचकार वनमाकुलदृष्टिपातै-
र्वातेरितोत्पलदलप्रकरैरिवार्द्रैः ॥[१]

---

सैषा नले सहजरागभरादमुष्मिन्नात्मानमर्पयितुमर्हसि धर्मराजे ॥३०॥
किं ते तथा मतिरमुष्य यथाशयः स्वात्वत्पाणिपीडनविनिर्मितयेऽनपाशः ॥
कान्मानवानवति नो भुवनं चरिष्णूनासावमुत्र नरता भवतीति युक्तम् ॥३१॥ 'सम्पादक'

* देवः पतिर्विदुषि नैषधराजगत्या निर्णीयते न किमु न व्रियते भवत्या ॥
नायं नलः खलु तवातिमहानलाभो यद्येनमुज्झसि वरः कतरः परस्ते ॥३४॥ 'सम्पादक'

१. रघुनाथ पंडितानें 'नैषधा'चें अनुकरण करून शारदेकडून चारी लोकपालांचें व नलाचें सश्लेष वर्णन करवलें आहे हें आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच. 'नलोपाख्याना'तील २२७-२३१ श्लोक* पाहा.

२. वरील आर्या ही होय:—

अनुपम अनु-रूप अनघ जरि वरिला त्वां नृपात्मजे! न नळ।
होइल केवळ ताप-द, कीं जो नर नळ न होय तो अनळ॥
(वनपर्व, ४, ३३. सं०)

* ज्याचीं पदें धरिति देव शिरोललामीं। स्वाराज्य तो मिरवितो गज-राज-गामी॥
जो वज्रपाणि बहुलोचन कांति भारी। हा† पाहिजे तरि वरीं नळरूपधारी॥ २२७ ॥
साहील कोण सजणे†† बहुतेज याचें। मध्यस्थ रूप धरितो हरिचें यमाचें॥
स्नेहा धरी अधिक होय तमासि वारी। हा¶ पाहिजे तरि वरीं नळरूपधारी॥ २२८ ॥
संपूर्णतेसम जयास्तव दक्षिणाशा। पाप्यास दंड धरितो करितो विनाशा॥
देहीं जया मिरविते घनकांति भारी। हा‖ पाहिजे तरि वरीं नळरूपधारी॥ २२९ ॥
आधार हाच सजणे†† बहुजीवनाचा। रक्षी दयेंकरूनि मान कृषीजनाचा॥
यादांस¶¶ फार म्हणती जन सौख्यकारी। हा‖‖ पाहिजे तरि वरीं नळरूपधारी॥ २३० ॥
होतील नंदनविलास जयास तो हा। आहे धनंजयहि धर्महि जाण तो हा॥
रत्ना करीं तुज विराजविता विहारी। हा§ पाहिजे तरि वरीं नळरूपधारी॥ २३१ ॥

†इंद्र. ††प्रिये, सखि. ¶अग्नि. ‖यम. ¶¶जलचरांस. ‖‖वरुण. § नळ. 'सम्पादक'

१. दशरथ राजाच्या मृगयेचें वर्णन:—

तत्प्रार्थितं जवनवाजिगतेन राज्ञा
तूणीमुखोद्धृतशरेण विशीर्णपंक्ति।

(पुढें चालू.)

अशी स्थिति तिनें ज्याला आणली, त्याच प्रदेशावरून. पंतांची वाग्वधू कुलस्त्रीप्रमाणें दृष्टि-चांचल्य मुळीं प्रगट न करतां केवळ मर्यादशीलपणानें नीट गेली आहे ! तेव्हां एकंदरींत पाहतां प्रस्तुत महाराष्ट्रकवीची वरील संस्कृत कवीशीं तुलना करणें हें यथार्थ-नव्हे.

दुर्बोधतेच्या संबंधानें तर प्रकृत कविद्वयाची तुलना वरच्याहूनही असमंजस होय; कां कीं दोषांवरही वरील आक्षेप ह्मणण्यासारखा लागू पडत नाहीं. जो सामान्य व्युत्पन्न आहे त्यास 'नैषधा'चे श्लोक अगदींच कळणार नाहींत असें नाहीं, व ज्याचा महाराष्ट्र-कवितेशीं बराच परिचय झाला असेल त्यास मोरोपंताच्या आर्या मुळीं लागणार नाहींत असेंही नाहीं [1] येवढें मात्र ह्मणतां येईल खरें, कीं एका पक्षीं कालिदासाच्या किंवा बाण-भट्टाच्या कवितेंतील प्रसाद जसा प्राय: आढळणार नाहीं, त्याप्रमाणेंच दुसऱ्या पक्षीं वामन किंवा मुक्तेश्वर यांच्यासारखें सुगमत्वही बहुधां सांपडायाचें नाहीं. तसेंच एका पक्षीं पंचनली प्रकरणांतून पार पडण्यास जसें टीकाकाराचें थोडेंबहुत तरी साहाय्य घ्यावें लागेल, त्याप्रमाणेंच

---

श्यामीचकार वनमाकुलदृष्टिपातै-
र्वातेरितोत्पलदलप्रकरैरिवार्द्रैः ॥ ( रघुवंश, ९-५६. सं० )

"चपल घोड्यावर बसलेला आणि भात्यांतून ज्यानें वर बाण ओढलेला आहे असा तो राजा त्या कळपाच्या मागें लागला असतां सारीं हरणें विसकटून त्यांनीं तो वनप्रदेश आपल्या भयचंचल दृष्टिपातांनीं काळा सांवळा करून टाकला:—जणों काय वाऱ्यानें उडालेल्या अशा जलार्द्र नील—कमलपत्रांनींच !"

१. दादोबांनीं 'यशोदा पांडुरंगी'च्या प्रस्तावनेंत पुढील अभिप्राय प्रगट केला आहे:—

"कालीदास, भवभूति, माघ, आणि श्रीहर्ष, यांचीं अनुक्रमें रघुवंशकिरातादि जीं प्रसिद्ध महा-काव्यें आहेत, त्यांमध्यें शब्दांच्या काठिन्यावरून आणि अर्थान्वयाच्या गूढत्वावरून श्रीहर्षाचें जें शेवटलें नैषधकाव्य, त्याचें दुर्बोधत्व बहुधा लोकानुभूत आहे; तसेंच ज्यांस संस्कृतभाषा अवगत नाहीं, अशा प्राकृत जनांस मोरोपंताच्या काव्यांत संस्कृत शब्दांचा भरणा पुष्कळ असल्यानें, सहाजिक त्या शब्दांच्या अपरिचयामुळें, आणि प्राकृत जनांस अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द, आणि निवळ प्राकृत व ग्राम्य शब्द, यांचें मिश्रण असल्यानें संस्कृतभाषाभिज्ञ अशा पंडितांसहि त्यांची निवड करून अर्थयोजना करण्यांत अवघड प्रसंग असण्याच्या दृढ संभवामुळें, तसेंच समयविशेषीं शब्दांचा दूरान्वय असल्यानें अर्थज्ञानाच्या दु:साध्यत्वामुळें, मोरोपंताचें काव्यहि दुर्बोध आणि कठिण ह्मणून बहुधा सर्व जनांस अनुभूत आहे." ( पृ४ ५ पाहा. 'सम्पादक' )

वरील अभिप्रायांपैकीं दुसऱ्याविषयीं येथें कांहीं लिहावयास नकोच. पहिल्याचें यथार्थत्व पुढील उताऱ्यावरून कळून येईल:—

"With the structure or frame of the poem our delight is nearly unqualified. The language is highly elaborate, bearing the mirror's polish. It never becomes common-place, and bears throughout a sustained tone of sprightliness and elevation. Although we find a continual play upon words for many verses together, yet, not only is the sense not lost in a mere jingle of syllables, but the general effect is often much enhanced by the harmonious contrast of open and concealed meanings." Dr. Roer.

'बृहद्दशमा'ची† फोड करतांनाही केवळ प्राकृत वाचकास संस्कृतज्ञाची मदत घेतल्याशिवाय फार करून चालणार नाहीं. तरी ज्याप्रमाणें 'किरातार्जुनीया'च्या व 'शिशुपालवधा'च्या एकेका‡ सर्गावरून साऱ्या काव्यावर दुर्बोधतेचा दोष आणणें बरोबर होणार नाहीं, त्याप्रमाणेंच वरच्यासारख्या प्रसंगोपात्त दुर्गम स्थलांवरून वरील दोघां कवींचे ग्रंथ डोंगराळ प्रदेशांप्रमाणें मोठे अडचणीचे आहेत असें ह्मणणेंही उचित नव्हे!

तेव्हां प्रस्तुत कवीच्या काव्यांत भरपूर श्लेष आहेत हा जो लोकप्रवाद आजपर्यंत चालत आला आहे तो खरा असण्याचा कितपत संभव आहे हें वरील निरूपणावरून लक्षांत येईल. आतां प्रत्यक्ष प्रमाणावरून काय सिद्ध होतें तें पाहूं.

६. आमच्या वाचकांस माहीत असेलच, कीं यापूर्वी अनेक वेळां प्रस्तुत विषयाच्या संबंधानें उल्लेख करून मोरोपंताच्या आर्यांच्या अनेकार्थत्वाचें प्रत्यक्ष उदाहरण दाखवण्याविषयीं आह्मीं सूचना केल्या आहेत.पण गेल्या ५३ व्या अंकांतील एका पत्राखेरीज| आजपर्यंत कोणाकडूनही वरील संबंधाचा कांहीं एक मजकूर आलेला नाहीं. तेव्हां यावरून निदान आज तरी इतकें ह्मणण्यास प्रत्यवाय नाहीं, कीं ज्या अर्थी आजपर्यंत निदान दोन अर्थांची तरी एकही आर्या कोणाकडून दाखवण्यांत आली नाहीं, त्या अर्थी पंतांच्या आर्यांचे दहा दहा अर्थ होतात ही लोकवार्ता पृथ्वीवर सिंहाचें एकच जोडपें आहे, वेरुळचीं लेणीं हीं पांडवकृत्यें होत, अग्निपुराणांत आगगाडी आहे, शतपथ ब्राह्मणांत तारायंत्र आहे, या गप्पांपैकींच एक गप्प होय!

आतां आह्मी आपल्या तर्फेचें जें प्रत्यक्ष प्रमाण दाखवणार तें दोन प्रकारचें आहे. एक 'नवनीतां'च्या दोन भागांवरून व मोरोपंताचा अत्यंत मान्य ग्रंथ जो 'केकावलि' त्यावरून. आणि दुसरा प्रकार वर सांगितलेल्या पत्रांत दाखल केलेल्या आर्येचें बहुलार्थत्व कितपत यथार्थ होय हें दर्शवण्यांत येईल हा होय.

तेव्हां प्रथमतः 'नवनीता'चे दोन भाग घ्या. पहिला भाग तर प्रसिद्धच आहे; दुसरा कदाचित् सर्वांस माहीत नसेल, यास्तव त्याविषयीं इतकें सांगणें अवश्य दिसतें कीं, तो

† भागवतांतर्गत कृष्णविजयच 'बृहद्दशम' या नांवानें प्रसिद्ध आहे. 'सम्पादक'

‡ अनुक्रमें पंधराव्या व एकोणिसाव्या. 'सम्पादक'

| सदर पत्र नेरें, तालुके पनवेल येथील मोरो गणेश लोंढे नामक गृहस्थांनीं १ फेब्रुवारी १८७९ रोजीं पाठविलें असून त्यांत दुसरा अर्थ प्रश्नोत्तररूपानें खालीलप्रमाणें दिला आहे. सदर अर्थ तेथेंच एका हरदासानें आपल्या कीर्तनप्रसंगीं सांगितला असें लोंढे म्हणतातः—

अर्जुन—(हे) कृष्णा, अनुजा (तुझी धाकटी बहीण) सुभद्रा लग्नाला योग्य (झाली आहे.)

कृष्ण—(बरें तर, तिच्याशीं लग्न करण्याकरतां) जा.

अर्जुन—(तें खरें रे कृष्णा, पण तो) हली (बलराम) आहे (ना! तो कसचा ती मला मिळूं देणार? त्यानें तिला धृतराष्ट्राच्या मुलाला द्यावयाचा निश्चय केला आहे.)

कृष्ण—(छे रे, अर्जुना, तसें नव्हे;) हलधर (बलराम) स्वमतें (आपण होऊनच) तीतें (तिला) धृतराष्ट्रसुतासि (धृत आहे राष्ट्र ज्यानें तो धृतराष्ट्र त्याच्या अर्थात् पंडूच्या मुलाला म्हणजे अर्जुनाला) द्यावया पाहे (देण्याच्या विचारांत आहे.) 'सम्पादक'

के० परशुरामपंत तात्या यांनींच केलेला आहे.[1] हा भाग पहिल्याच्या सरासरी तिसरा हिस्सा असेल नसेल, तरी एकंदरीनें पाहतां यांतील वेंचे पहिल्यांतल्यांपेक्षां सरस आहेत. आतां हे जे दोन भाग आहेत यांत साऱ्या महाराष्ट्रकवींचें स्वरूप बऱ्याच अंशीं प्रतिबिंबित झालें असेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं; कां कीं साऱ्या महाराष्ट्रकवितेचें आलोडन करून जें सार निघालें तें वरील ग्रंथकर्त्यानें दोनदां रसिकजनांस अर्पण केलेलें आहे. त्यांतून मोरोपंताच्या काव्यावर तर रा० गोडबोले यांची विशेषच भक्ति असल्यामुळें तदनुरूप त्यावर त्यांचा विशेष व्यासंग झाला असेल हें उघडच आहे.[2] मोरोपंतास निवर्तून अद्याप फार काळ लोटला नसल्यामुळें व त्यानें ग्रंथही पुष्कळ लिहून ठेवला असल्यामुळें त्याच्या इतका भरणा फार करून दुसऱ्या कोणत्याही महाराष्ट्रकवीचा दिसत नाहीं. या दोन कारणांस्तव 'नवनीता'च्या दोन्ही भागांत वरील कवींतील वेंचे चांगले भरपूर आलेले आहेत. यास्तव त्याच्या कवित्वाचें स्वरूप सदरील दोन ग्रंथांत जसें प्रगट झालें आहे तसें इतर कोणत्याही महाराष्ट्रकवीचें झालें नाहीं असें ह्मणण्यास हरकत नाहीं. तर प्रस्तुत वादांत बऱ्याच अंशीं निर्णय होण्यास वरील दोन ग्रंथांतील वेंचे उपयोगीं पडतील हें उघडच आहे.

'नवनीत' भाग पहिला यांत श्लेषात्मक ह्मणून जीं स्थलें आह्मांस आढळलीं तीं येणेंप्रमाणें:—

*तूं **'मलिन', 'कुटिल', 'नीरस', 'जड'** हि, **'पुनर्भव'** पणेंहि कचसाच; ।
**'धरिला शिरीं'** हि न स्व-प्रकृतिगुण त्यजिसि; नाम **'कच'** साच.$ ॥
'कचोपाख्यान', (आदिपर्व, १०-९. सं०)

---

१. वरील दुसऱ्या भागाच्या शेवटीं असें पद्य आहे:—

**जरि याचा जन आदर करितिल घेतील हा पहायास ।**
**तरि उत्तेजन होइल मज तिसरा भाग तो करायास ॥**

ही आशा कितपत सफळ झाली हें सांगायाला नकोच. तिसऱ्याची गोष्ट तर दूरच, पण दुसरा भागही करण्याची विशेष जरूर नव्हती असें सदरील ग्रंथकारास बहुधां लवकरच वाटलें असावें !

२. परशुरामपंत तात्यांच्या पद्यमय ग्रंथांवरून तर वरील भक्ति व्यक्त होतेच; कां कीं त्यांतील धाटणी प्रस्तुत कवीपासूनच उचललेली आहे. शिवाय असेंही ऐकण्यांत असे कीं, रात्रींतून दिवसांतून जो वेळ रिकामा सांपडे तो बहुधां मोरोपंताचें काव्य वाचण्यांतच वरील पंडिताचा जात असे.

* ही ओळ पराडकरी आवृत्तींत पुढीलप्रमाणें आहे:—
मलिन, कुटिल, नीरस, जड, अजड, पुनर्भवपणेंहि कचसाच; । 'सम्पादक'

$ मलिन=(अ) काळे, मळकट, घाण केश, (आ) पापी-कच.
कुटिल=(अ) वक्र, वांकडे, कुरळे-केश, (आ) दुष्ट-कच.
नीरस=(अ) रसहीन, शुष्क-केश; (आ) [ विषाहेच्छु, तरुण व सुंदर देवयानीचा धिक्कार करणारा अतएव] अरसिक-कच.
जड=(अ) निर्जीव-केश, (आ) मन्दबुद्धीचा-कच.
अजड=(अ) (आ) नष्ट केले तरी पुनः पुनः (उत्पन्न होणारे) वाढणारे म्हणून सचेतन केश व कच दोघेहि.

(पुढें चालू.)

बृहदश्व 'द्विजराज'‡ धर्माच्या समीप आला, जो।
ताप उरोंचि न दे जो,§ त्यासि विधु न कां ह्मणोनि "हा!" लाजो? ॥×
'नलोपाख्यान', (वनपर्व, ४-२. सं०)

अनुपम अनुरूप अनघ जरि वरिला त्वां नृपात्मजे! न नळ।
ईइल केवळ तापद, कीं जो नर नळ न होय तो 'अनळ' ॥$
किता, (११-४, ३३. सं०)

लेशाहि शर-द-मळ न भा धवळी अमृतांशुचीहि शारदमळ-नभा; ॥※
'अंबर'* सितरुचि रजनीविलासिनी धरि, भ-मौक्तिकें रुचिर; जनीं. ॥†
'रासारंभीच्या आर्या'. (कृष्णविजय, २९, १. सं०)

"हा सीते! हा लक्ष्मण!" ऐसें मरतां ह्मणोनि मोठ्यानें।
'अमृत'प्रदीं|| करावें अहिनें, केलें तसेंचि खोट्यानें. ॥
'भारती रामायण'. (आर्याभारत, वनपर्व, ११, २४. सं०)

"मोहूत 'भुजग;'¶ मोहा केंवि तुह्मी मजसम स्तनग! होतें।
तुमचेंहि सुकृत सरलें कां? सांगा मज समस्त नग हो! तें." ॥÷
किता. (आर्याभारत, वनपर्व, ११, ९८. सं०)

---

धरिला शिरीं=(अ) डोक्यावर वागविले (शब्दशः)—केश, (आ) डोक्यावर घेतलें (अलंकारिक), मान दिला—कच.

कच=(अ) केश, (आ) कच.

* कचा, तूं खरोखरच 'कच' हें नांव सार्थ केलेंस. 'सम्पादक'

‡ (अ) ब्राह्मण-श्रेष्ठ, (आ) चंद्र. 'सम्पादक'

§ 'दे जो' बद्दल 'देतां' असा पाठ पराडकरी प्रतीत आहे. 'सम्पादक'

× द्विज-राज ह्मणजे ब्राह्मणश्रेष्ठ बृहदश्व धर्मराजाजवळ आला. बृहदश्व हा त्रास उर्फ न देणारा असल्यानें तोच जणों काय द्विजराज—चंद्र—आहे असें वाटून आकाशांतील प्रत्यक्ष चंद्राकाहि लाज वाटून तो 'हाय!' कां म्हणणार नाहीं? 'सम्पादक'

$ (अ) अग्नि (आ) नळाव्यतिरिक्त कोणीहि. 'सम्पादक'.

※ शर-द-मळ=जल-द-मळ=ढगांचा अंधार; भा=तेज; धवळी=धवळ (पांढरें, स्वच्छ) करते; अमृतांशुचीहि=चन्द्राचीहि (भा); शरदमळ—नभा=शरदृतूंतील अमळ (निर्मळ, स्वच्छ) आकाशाला. 'सम्पादक

* अंबर=(अ) आकाश (आ) वस्त्र (रूपकासाठीं). 'सम्पादक'

† रात्र हीच कोणी विलासिनी स्त्री सितरुचि (शुभ्रकांतीचें) अंबर (आकाशरूपी वस्त्र) व नक्षत्ररूपी सुंदर मोत्यें धारण करित्ये. 'सम्पादक'

|| (अ) दूध (आ) मोक्ष, देणाराचे ठिकाणीं. 'सम्पादक'

¶ (अ) साप. (आ) दण्डावरील अलंकार, बाजूबंद, वाकी इ. 'सम्पादक'

÷ भुजग ह्मणजे दण्डावरील दागिने मोहूत ह्मणजे स्थानभ्रष्ट होवोत, त्याबद्दल मला कांहीं विशेष वाटत नाहीं; कारण ते तर बोलून चालून भुजग ह्मणजे सापच! तेव्हां रावण सीतेला मला—

( पुढें चालू. )

हा सीते! मज देतो त्वन्मुखजित चंद्र ताप हा सीते!।
हा सीते! करितो 'द्विज-राज'हि* म्हणवूनि ताप† हा सीते! ॥
किता. (आर्याभारत, वनपर्व, ११, ७७. सं०)

वरील आर्यांपैकीं पहिलींत मात्र भरपूर श्लेष असून बाकीच्यांत ज्या शब्दांभोंवतीं अवतरणचिन्ह केलें आहे तेवढे [ जाड ठशाचे सं. ] मात्र श्लिष्ट आहेत.

'नवनीत' भाग दुसरा यांतील वेंच्यांत कोठेंही बिलकुल श्लेष नाहीं.

'केकावलीं'त म्हणण्यासारखा श्लेष पुढील केकेंतील एका शब्दावर मात्र आहे:—

तुझ्या गुणकथा महासुरभि, त्यांत ही रासभी
शिरे विषयवासना, जसि छुका अहीरास भी, ।
तशी न इतरास भी; इस 'सदंड'ही‡ हाकिती;
तथापि बहु लाथळी; मग अदंड मी हा किती? ॥§

बाकी लहानसान श्लेष पुढील कांहीं स्थलीं आहेत:—

गमो मधुर हें विष स्तवन, सेवितां भाजवी;
करी मलिन सद्यशोमुख, हलाहला लाजवी, ।
हरापरिस तूं बरा प्रभु—वरा! सदा जो पिशी
असा रस समर्पि, त्या 'अ-मृत'× आपुलें ओपिशी. ॥÷
म्हणोनि कवितासुता तुज समर्पितों; साजरी
नसे बहु तशी गुणी कनकपीतवासा! जरी, ।
तरी न इतरा वरी; हरि! करीं इला किंकरी;
मयूरहि 'निजात्मजाग्रह—विमुक्त', जैसा¶ करी. ॥$

---

गिरीवरून लंकेकडे नेत असतां मलयगिरीवरील चंदनवृक्षांच्या सुवासाला भुलून त्यांनीं सीतेच्या शरीराचा त्याग करणें संभवनीय आहे. पण अहो तुम्ही सीतेच्या स्तनांवर लोळणाऱ्या अलंकारांनो, तुम्ही भुजग नसून स्तनग आहां. मग तुम्ही कां बरें स्थानभ्रष्ट झालां? तुम्ही कसे सीतेच्या अंगावरून खालीं पडलां? कां मजप्रमाणें तुमचीहि पुण्याई संपली? बोला, सर्व अलंकारांनों, याचें काय तें उत्तर मला द्या. 'सम्पादक'

* (अ) चंद्र (आ) ब्राह्मण-श्रेष्ठ. 'सम्पादक'

† पाठांतर:—पाप (पराडकरी प्रत). 'सम्पादक'

‡ (अ) हातांत दंड म्हणजे काठी घेतलेले. (आ) हातांत (इंद्रियनिग्रह व विषयवासना यांचा त्याग दर्शविणारा ) दंड धरणारे अर्थात् संन्यासी. काठी घेऊन मारणारास व सर्वसंगत्यागरूप दण्ड धरणारास दोघांसहि ही विषयवासनारूपी गाढवी लाथा मारते असा अर्थ. 'सम्पादक'

§ मुळांतील चौपन्नावी केका. 'सम्पादक'

× (अ) दूध (आ) मोक्षसाधक अमृत अगर मोक्ष. 'सम्पादक'

÷ मुळांतील एकतिसावी केका. 'सम्पादक'

¶. 'निजात्मजेचा आग्रह' आणि 'निजात्मजारूप ग्रह' अशीं दोन प्रकारचीं पदें वरील समासांत पडण्यासारखीं आहेत. 'किरातार्जुनीय' सर्ग १ यांतील पुढील (३३ व्या. सं०) श्लोकांत अशा प्रकारचा पदच्छेद आहे:— ( पुढें चालू ¶, $ या टिपा पुढील पानावर पाहा. )

तिलाहि बरवी ह्मणा, उचित होय; तोषाकरें
असेल सजली यथारुचि तयीं स्वयोषा करें।
जशी पदरजें शिला, परि असे न हे शापिली
घवें 'हरिमनोहराकृति'* सती अवें व्यापिली. ॥ §
कथासुरभि या भल्या स्वजननीहुनी वाटती;
शिशूंसि जठरांसही निरखितां 'रसें'† दाटती; ।
दुहोत भलते सदा, तरि न लेश ही आटती;
स्ववत्स-'मल'‡ भक्षिती परि न सर्वथा वाटती. ।।×
तुझ्यासमचि हें गुणें; अणु उणें नसे नाम; हा
दिसे अधिकही, तसा गुण तुला असेना महा; ।
सदैव भलत्यासही सुलभ; आणखी गायका
'छळी'§§ न, न 'अधोगति'‡‡ क्षणहि दे अगमायका! ॥**
वरी प्रगट शांतिला धरि, परंतु मीना बकी
गिळी; तशि तुला टपे सुकृतबुद्धिहीना बकी। ·
जिणें गरळ पाजिलें, 'अमृत'†† पाजिलें तीस तां;
खळासि न दिसो भलेपण, खरे भल्या दीसतां. ।।$$
सुरासुरनरोरगां भुलवुनी कथा न त्यजी;
न भेद कार पंक्तिचा; 'अमृत'†† पाजिती सत्य जी; ।

---

अवन्ध्यकोपस्य विहन्तुरापदां भवन्ति वश्याः स्वयमेव देहिनः ।
अमर्षशून्येन जनस्य जन्तुना न जातहार्देन न विद्विषा—'दरः' ॥

¶ माझ्या स्तुतिकन्येच्या आग्रहांतून (कीं मी परमेश्वरासच वरीन, दुसऱ्याला वरणार नाहीं) मला (तिचा स्वीकार करून) मुक्त करा. (आ) माझ्या कन्यारूपी ग्रहापासून (तिचा स्वीकार करून) मला सोडवा. (उपवर अविवाहित कन्या म्हणजे बापाला पीडा देणारा ग्रहच होय.) हा सर्भगश्लेष होय. 'सम्पादक'

$ मुळांतील तेहतिसावी केका. 'सम्पादक'

* हरीला [ह्मणजे (अ) इन्द्राला (आ) विष्णूला] मनोहर आहे आकृति जिची ती. अर्थात (अ) अहल्या, अगर (आ) कवितावधू. 'सम्पादक'

§ मुळांतील छत्तिसावी केका. 'सम्पादक'

† (अ) दुधानें (आ) भक्तिरसानें. 'सम्पादक'

‡ (अ) [वासरांचें] मलमूत्र (आ) [भक्तांचें] पाप. 'सम्पादक'

× मुळांतील अठ्ठावन्नावी केका. 'सम्पादक'

§§ (अ) छळ करणें (आ) कपट करणें [वामनानें कपटानें बळीस पाताळांत घातलें.] 'सम्पादक'

‡‡ (अ) दुर्गति (आ) पाताळवास. 'सम्पादक'

** मुळांतील पंचाहत्तरावी केका. 'सम्पादक'

†† (अ) सुधा (आ) मोक्ष. 'सम्पादक'

$$ मुळांतील एक्याण्णवावी केका. 'सम्पादक'

तिणें जरि सुधारस स्वरतमानसां पाजिला,
वधी अमृत घोटितां, द्रव न येचि बापा! जिला. ॥†

तर वर सांगितलेल्या तीन ग्रंथांत श्लेषप्रयोगाचीं उदाहरणें वर दाखल केल्याइतकींच काय तीं आहेत. यांखेरीज इतरत्र जीं आमच्या वाचण्यांत आलीं तीं येणेंप्रमाणें:—

नमुनि जरत्कारि* ह्मणे, "नसतां अपराध, टाकितां दासी;।
'द्विजराज'‡ तुह्मी या अप—राधें कैं§ याल हर्ष चांदासी."॥

'आदिपर्व', (५, १०७. सं०)

करुनि प्रदक्षिणा, धनु उचलूनि, ख्याति तो करी मोटी,।
चापाच्याचि न केवळ नरवीरांच्याहि वांकवी 'कोटी'.¶ ॥

किता, (३५, ५०. सं०)

झाली झाला$ केवळ 'कृष्णा'§§ पोषूनि अंधकारा ती,।
जाणों सुयशोऽर्य तमो—गुण घाडी तेथ अंधकाराती.††॥

'विराटपर्व', (१, १२४. सं०)

भीमें पाठविला शर दुसरा हि सुषेण—जीवनाचमना,।
कर्णे तयासहि खंडी, ये 'मार्गण—फळ—विघात'** ह्राच मना. ॥

'कर्णपर्व', (३०, ५३. सं०)

जरि 'शुचिमूर्ति'¶¶ 'सुवृत्ता'‡‡ मान्या 'श्रवणोचितें गुणें'⊗ मुक्ता ।।
विद्धा जडाहि ते हे अगुणा ही तीस करि उणें मुक्ता ।।

'सन्मणिमाला'.

वर जीं उदाहरणें दाखवलीं त्यांवरून मोरोपंताची दहा दहा अर्थांविषयींची जी सार्वत्रिक प्रसिद्धि, व मोठ्या पंडितांचीही त्याच्या काव्याच्या संबंधानें चिरकाल दृढ होऊन

---

† मुळांतील १०४ वी केका. 'सम्पादक'

* जरत्कारूची पत्नी. पाठभेदः—जरत्कारु (पराडकरी प्रत.) 'सम्पादक'

‡ (अ). ब्राह्मण-श्रेष्ठ, (आ) चंद्र. § पाठांतरः—अपवादांकें (पराडकरी प्रत.)'सम्पादक'

¶ (अ) धनुष्यांचीं टोकें (आ) शत्रुवीरांच्या कोटि (संख्या). 'सम्पादक'

$ पाठांतरः—शाळा (पराडकरी प्रत.). §§ (अ) काळी (आ) द्रौपदी. 'सम्पादक'

†† अंधक+आरातिः=अंधक राक्षसाचा शत्रु=शंकर. अंधक हा कश्यप व दिति यांचा पुत्र. याला हजार मस्तकें होतीं. हा अंधळ्यासारखा चाले म्हणून याचें अंधक नांव पडलें. पार्वती-(कित्येकांच्या मतें)-पारिजात वृक्ष पळवून नेण्याचा प्रयत्न केल्याबद्दल यास शंकरांनीं ठार मारलें. 'सम्पादक'

** (अ) बाणापासून होणाऱ्या फळाचा नाश. (आ) भिक्षुकाच्या फळाचा (मनोरथाचा) नाश. 'सम्पादक'

¶¶ (अ) शुद्ध, पवित्र—मुक्ताबाई. (आ) पांढरें, पाणीदार, तेजस्वी—मोतीं. 'सम्पादक'

‡‡ (अ) सद्वर्तनी, चारित्र्यसंपन्न—मुक्ताबाई. (आ) गोल, वाटोळें, गरगरीत—मोतीं. 'सम्पादक'

⊗ (अ) ऐकण्यास योग्य अशा सद्गुणानें (आ) कानांत (अलंकार ह्मणून) घालण्यास योग्य अशा गुणानें. 'सम्पादक'

बसलेलीं मतें,[1] हीं दोन्हीं कितपत यथार्थ होत याविषयीं आमच्या वाचकांची खात्री होईलच. त्यांस दिसून येईलच, कीं साऱ्या आर्याभर श्लेष असा काय तो वर दोनच आर्यांत आहे. पहिली 'कचोपाख्यानां'तील व शेवटली 'सन्मणिमालें'तील! बाकी साऱ्या पद्यांतून एकादें पद श्लिष्ट आहे, व तोही श्लेष अप्रसिद्ध किंवा बळें ओढून ताणून आणलेला अशा पैकीं मुळींच नसून अगदीं परिचयांतला असा आहे.

७. आतां शेवटलें व्यतिरेकप्रमाण ५३ व्या अंकांतील आर्येचें ही आर्या पुढील होय:-

कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे।
तीतें स्व-मतें हल-धर धृतराष्ट्र-सुतासि द्यावया पाहे॥

(कृष्णविजय, उत्तरार्ध, ८६-२. सं०)

ही आर्या कोणत्या प्रसंगाची आहे व हिचा अर्थ काय हें मराठी शाळांतील शेवटल्या यत्तेंतील पोरेंही सांगतील. पण प्रकृत अर्थ येवढा उत्तान असतां अरसिक व छांदिष्ट मंडळीनें या बिचाऱ्या आर्येचा जो धुडगुस मांडला आहे व हिजवर जे कांहीं आपल्या पांडित्याचे तारे तोडले आहेत तें कांहीं पुसूं नये! आमच्या मयूरकवीच्या येवढ्या एका पराशींच अर्वाचीन प्राकृत पंडित येवढे कां बागडतात हें कांहीं समजत नाहीं! या एका आर्येंत मीं काय ती बहार सांठवून ठेवली आहे, व सोरटी सोमनाथाची पिंडी सुलतान महमदानें फोडली असतां अपरिमित अर्थसंचय जसा खळ्दिशीं बाहेर पडला त्याप्रमाणें सरस्वतीची ऐन जिनगी काय ती या एकां पद्यांत लिकवून ठेवली आहे असा एकादा गुप्त लेख तर

१. रावबहादुर रानडे यांचें 'केकावली'च्या अनेकार्थत्वाविषयीं येवढें दृढ मत ज्यावरून झालें त्या स्थलांचें स्वरूप पुढील दोन उताऱ्यांवरून बरेंच लक्षांत येईल:—

(केका १)—"गदारिदरनंदकांबुजधरा—गदा-अहंकृतिजन्यप्रपंचमिथ्याज्ञानसद्बुद्धीतें जागृत करणारी जी भगवच्चिच्छक्ति तिचें उपलक्षण. अरि-चक्र-सत्ज्ञानरूप जो अंतःप्रकाश त्याचें उपलक्षण. दर-शंख-नादमूलक जो प्रणव-ओंकार त्याचें प्रतिरूपक. नंदक-विष्णूचें खड्ग-अज्ञानरूप अथवा संशयरूप जी हृदयग्रंथी तिचें छेदक जें आत्मज्ञान त्याचें प्रतिरूपक. अंबुज-कमल-संसारदुःखें-करून पीडित जो जन त्याच्या म्लान आणि आकुंचित अंतःकरणाचें भगवद्भक्तिजन्य प्रेमानंदानें जें विकाशन त्याचें निदर्शन; या सर्व चिन्हांतें धारण करणारा, अर्थात् या सर्व उपलक्षणांनीं उपलक्षित परब्रह्मरूप जो भगवान् त्याचें संबोधन;—असा सच्चिदानंदरूप जो तूं त्या.

(केका ४३)—"हरिमदापहें—हरि-सूर्य-अर्थात् सूर्यासारखे उग्रप्रतापी जे रावणकंसा-सारिखे; अथवा, हरि-सिंह-अर्थात् सिंहासारिखे पराक्रमी जे हिरण्यकशिपुबलिदुर्योधनादिकांसारिखे भूपाल; अथवा, हरि-शुक-पोपट-अर्थात् क्रियाहीन असतां केवळ पोपटासारिखे वाचालमात्र असे जे वार्प(त्पं? सं०)डित; अथवा हरि-अग्नि-अर्थात् अग्नीसारिखे दुसऱ्याच्या अंतःकरणास पोळणारे जे दुष्ट जन-अथवा सर्व गोकुळाचा नाश करणारा जो दावाग्नि तो या सर्वांचा मद-गर्व त्याचा नाश करणारा जो तूं त्या त्वां; अथवा, हरि-यम-कृतांतरूप जो काळ त्याचा, मीं सर्व भुवनत्रयाचा संहार करणारा म्हणून जो मद म्ह० गर्व; अथवा हरि-इंद्र-हा एकदां अतिवृष्टि पाडून सर्व गो-कुळाचा नाश करण्यास उद्युक्त झाला होता तेव्हां त्वां आपल्या अंगठीनें गोवर्धन उचलून त्याच्या छत्राखालीं सर्व व्रजवासी प्राण्यांचें रक्षण करून तेणेंकरून त्या इंद्राच्या मदाचा त्वां नाश केला अशी जगत्प्रसिद्ध तुझी कीर्ति आहे, अशा—

पंतांनीं कोणा भक्तापाशीं ठेवला नाहींना! काय असेल ते असो! आम्हांस तर याच एकव्या आर्येची अशी दुर्दशा कां व्हावी हें कांहीं कळत नाहीं. एक कारण मात्र दिसतें, कीं भोजनादि प्रसंगीं प्रस्तुत कवीच्या ज्या आर्या म्हणण्यांत येतात त्यांतील ही एक असल्यामुळें हिजकडे कल्पक मंडळीचें विशेष लक्ष लागलें व हिच्या कांहीं पदांशीं कल्पनेचा विहार होण्याजोगा असल्यामुळें हिजविषयीं परंपरेनें प्रसिद्धि पडत गेली.

रा० लोंढे हे पनवेलकर बोवांच्या वाक्प्रवाहासरसे एकदम वाहवत जाऊन अगदीं भांबावून गेले ही कांहीं अंशीं आश्चर्याचीच गोष्ट! तसेंच बोवांच्या हातचलाखीनें केवळ चकित होऊन जाऊन 'केकावली'विषयींही आपला भ्रम असाच नसेलना, तर काय भानगड असेल ती आपली आपण पाहून घ्या, याप्रमाणें सदरील पत्रकारानें दोहों कानांवर हात ठेवले आहेत. या गोष्टीचीही आम्हांस मोठी मौज वाटते! एकंदरींत 'गतानुगतिक'त्वाचा प्रकार लोकांत किती प्रबळ आहे, व धडधडीत उघड दिसणाऱ्या गोष्टीविषयींही लोकमताच्या विरुद्ध अभिप्राय प्रगट करण्याचें साहस किती थोडें आढळतें, ही गोष्ट सदरील पत्रावरून स्पष्ट दिसते. असो; आतां वरील आर्येविषयीं विचार करूं

आमच्या पनवेलकर मित्रानें जो अर्थ सांगितला आहे त्याहीपेक्षां आणखी दोन तीन निरनिराळे अर्थ आम्हीं हरदासांच्याच तोंडून ऐकलेले आहेत. तें असे:—

(१) "अर्जुनास कोणीं सुभद्रेविषयीं बातमी सांगितली, कीं 'कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य' म्हणजे उपवर झाली आहे; तें ऐकून तो विषादपूर्वक म्हणतो, 'तें खरें, पण ती सुभद्रा 'जाहली' म्हणजे मोठी 'जलाल' आहे म्हणून ऐकतों; शिवाय 'हलधर तीतें स्वमतें धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे'."

(२) "अर्जुन म्हणतो, 'कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य.' त्यावर त्यास कोणी त्याचा मित्र सांगतो, असें आहे तर तूं 'जा; हरी (रलयोरभेदः) आहे,' म्हणजे तूं गेलास तर कृष्ण तुझी शिफारस करील. अर्जुन उत्तर देतो 'पण, ' तीतें स्वमतें हलधर धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे,' तेव्हां धाकट्या भावाची शिफारस कशी लागू पडणार ?"

(३) "अहो हलधर! 'कृष्णानुजा सुभद्रा लग्नाला योग्य जाहली आहे, तीतें स्वमतें धृतराष्ट्रसुतासि द्या,' परंतु 'वया पाहें,' कांहीं वयाकडे पाहा!"

तेव्हां एकंदरींत वादविषयक आर्येवर पांच अर्थ तर बसले! 'नैषध'काराचें आणि आमच्या महाराष्ट्रकवीचें साम्य तर अगदीं तंतोतंत जुळलें! आतां दुसरी एक आर्या पाहा:—

आर्या आर्यांसि रुचे ईच्या ठायीं असे जशी गोडी।
आहे इतरां छंदीं गोडी परि यापरीस ती थोडी ॥

हिचाही साधा सरळ अर्थ आबालवृद्धांस श्रुत आहे. पण त्यांत कांहीं बहार नाहीं. खुबीदार अर्थ पुढेंच आहे—"स्त्री ही जे श्रेष्ठ आहेत त्यांस आवडते; स्त्रीच्या सुखासारखें दुसरें सुख नाहीं; इतर छंदांत बहार नाहींशी नाहीं, पण हिची सर त्यांस येणार नाहीं."

एकंदरींत कवीचा हृद्गतार्थ असा कीं, "बाबांनो, तुह्मांस खरी चैन भोगायाची असेल तर इतर फंदांत पडूं नका; शांभवी देवी, बाटलाबाई, वगैरे सर्व या शोकापुढें तुच्छ !"

'अनेक अर्थाविषयीं प्रसिद्ध अशा सूर्त आह्मीं दोनच आर्या ऐकल्या आहेत व वर जितके अर्थ सांगितले तेवढेच वरील आर्यांतून निष्पन्न होतात अशी आजच्या घटकेला आमची समजूत आहे. हें येथें लिहिण्याचें कारण इतकेंच कीं, न जाणों कदाचित् उद्यां एकादा नवा पंडित निघून तो बरच्यासारख्या आणखी आर्या व त्यांतील आणखी अर्थ शोधून काढील !' असो; आतां वरील पांडित्यप्रकारावर आमच्या मनांत कांहीं आक्षेप उद्भवतात ते येथें प्रगट करून हें श्लेषप्रकरण आटपतों.

(१ ला अर्थ)—पंतांनीं प्रश्नोत्तरें आर्येंत ग्रथित केल्याचा हा नवाच मासला आहे. याचें दुसरें उदाहरण आह्मांस तर अद्याप कोठेंही आढळलें नाहीं. 'कृष्णा' हें संबोधन असतां 'अनुजा' शब्दाशीं त्याचा संधि केलेला पंतास कसा खपला ! 'धृतराष्ट्र' ह्मणजे 'पंगु' हा अर्थ पनवेलीस नवा निर्माण झाला असल्यास नकळे; पण साऱ्या भारतवर्षांतले लोक तर वरील अर्थ ऐकून आमच्या पत्रकाराप्रमाणें भांबावून जातील यांत संशय नाहीं ! 'धृत आहे राष्ट्र ज्यानें' असा यौगिक अर्थ घेऊन प्रस्तुत शब्द जर बिचाऱ्या पंडूवर बळेंच लागू करा-याचा असेल तर मग आमचे सध्यांचे प्रतिनिधि नेकनामदार लॉर्ड् लिटन् साहेब यांनींही जपूनच असलें पाहिजे; कां कीं उद्यां कोणी नवा टीकाकार उत्पन्न होऊन त्यानें नेकनाम-

---

१. वरील वाक्य लिहून गेल्यास फार दिवस निघून गेले नाहींत तोंच एक पत्र* येऊन धडकलें. तें पुढील अंकांत वाचकांस सांपडेल.

* सदर पत्र सांगरूळ (कोल्हापुर) येथील मल्हार सखाराम जां० यांनीं १० जुलै १८७९ रोजीं पाठविलें आहे. त्याचा मथितार्थ असाः—मासं तरतरतीति मास्तरः—महिना भरतांच फीसाठीं तरतरतो, तरं होतो तो मास्तर असला समासविग्रह, महाराष्ट्र=महा–अरि–राष्ट्र असले पदच्छेद, 'कृष्णा'चाच अपभ्रंश 'ख्रिस्त' असली शब्दसाधनिका ज्या वर्गांत आहे त्याच तर्कटी वर्गांत अशा (एका कवितेवर अनेक अर्थ लादणाऱ्या) लोकांस ढकलावें लागेल. अशा प्रकारचे अर्थ कवीचे हृद्गत नसावे. विलक्षण तर्कशक्तीनें हव्या त्या कवितेचे अगर शब्दाचे हवे तसे अर्थ निघण्याचा संभव आहे. वादविषयक कवितेचा सरळ अर्थ घ्यावयाचा सोडून सवाल जबाब कशाला ? शिवाय या सवाल जबाबांस शब्द, अभिप्राय वगैरे पदरचे किती घालावे लागतात ! यदाकदाचित् जयाच्युतांस संवाद कर्तव्य असता तर इतक्या शब्दादिकांची भिक्षा मागणेंसाठीं ते आमच्या हरिदासाकडे गेले नसते. धृतराष्ट्र ह्मणजे पंडु असा ओढाताणीचा अर्थ मान्य केला तरी कसा अनवस्थाप्रसंग ओढवतो पाहाः— पंडूच्या मुलास ह्मणजे अर्जुनास मुलगी (बहीण? सं०) द्यावयाची हा बलरामाचा निश्चय कृष्णाला व त्याच्यातर्फें अर्जुनाला कळूनहि 'सांबट्या पांढऱ्या करारनाम्या'प्रमाणें यतिवेष धारण करून अर्जुन 'जशा एकाद्या चोरा'प्रमाणें कन्यारत्न हरून नेण्याच्या मानगडींत खुळ्यासारखा पडतो. आणखी एक बोवा याच आर्येचा असा अर्थ लावतातः— कृष्णानुजा सुभद्रा ह्याला योग्यः हलधर (बलराम) तीतें स्वमतें धृतराष्ट्रसुतासि द्यावया पाहे. (पण तो काय नुसता) हली (नांगऱ्या) आहे. [अर्थात् त्याची अक्कल ती काय ? त्याचा बेत साधणार नाहीं;] (तूं) जा. [ह्मणजे ती तुलाच मिळेल !] 'तूं सागर करुणेचा' या कवितेचेहि असेच तीन चार अर्थ करण्यांत येतात. पण असले तर्कटी अर्थ काय कामाचे ? ते कवीला अभिप्रेत असणें तर अशक्यच. 'सम्पादक'

दारांची 'हलधरा'शीं सोयरीक बनवून दिली तर करतां काय ? त्यांतून वरील आप्तसंबंध जडण्यास पूर्वीचा मुळींच आधार नाहीं असेंही नाहीं. प्रख्यात 'विलासतरंगिणी'कार यांनीं आपला नायक सूर्यकुलोत्पन्न कमलनाभ यास आंग्लो—मुसलमीन क्षत्रिय महंमद जॉनूसन् याची कन्या दिल्याची पूर्वींची परंपरा वरील शरीरसंबंधास अनुकूलच होय !

(शालापत्रक—१८७४ जानेवारी पाहा)

(२ रा अर्थ)—यावर विशेष आक्षेप घेण्यासारखा नाहीं. एकंदर अर्थाचा अप्रयोजकपणा स्पष्टच आहे.

(३ रा अर्थ)—किस्सा.

(४ था अर्थ)—'कांहीं वयाकडे पाहा' याचा अर्थ काय ? अर्जुन मात्र ऐन पंचविशीच्या भरांतला आणि दुर्योधन ऐंशी वर्षांचा थेरडा असा तर कांहीं प्रकार नव्हता; मग 'वया'कडे काय पाहायाचें ? आह्मांस खास वाटतें कीं अशी अर्जुनाची तरफदारी करणाराच्या डोकींत 'हलधर' बोवा नांगर घालायास चुकतेना ! आणि सदरील अर्थकार नांगराला योग्यही खरेच !

याप्रमाणेंच दुसऱ्या आर्येतील दुसरा आषकपर अर्थही केवळ अप्रयोजक होय. तो अर्थ जर खरा मानावा, तर 'उभाभ्यामुतते नमः' व 'प्रजापतेर्यत्सहजं पुरस्तात्' इत्यादि श्रुतींचे दुसरे अर्थ व 'हस्तादेनेचेरस्तेये,' या पाणिनीय सूत्राचें अर्थांतर हीं सर्व खरीं मानलीं पाहिजेत !

असो; एकंदरींत पाहतां प्रस्तुत कवीची अर्थबाहुल्याच्या संबंधाची प्रसिद्धि केवळ अज्ञानानें व अंधपरंपरेनें झालेली आहे. त्यांतून 'जाहली आहे', 'जा हली आहे', 'जा हरी आहे' वगैरे पदच्छेद करणें ह्मणजे तर निवळ पोरखेळ आहे ! आकाशांतील ढगांकडे पाहून हत्तीचा उंट झाला, उंटाचें गाढव झालें, गाढवाचा राक्षस झाला वगैरे रूपांतरें बघत बसणें यांत जितपत अर्थ आहे तितपतच वरील शब्दक्रीडेंत होय ! किंबहुना वरील आकाशप्रेक्षणही एक्या अर्थी बरें; कां कीं तें कर्मणुकीच्या सदरांत तरी ओढतां येईल. पण सत्कवींच्या कृति छिन्नभिन्न करून त्यांत मौज वाटणें यास मनुष्यभक्षक रानटी लोकांचा जो प्रेतांशीं विनोद चालतो[१] त्याचीच उपमा साजेल ! आणि त्यांतून वरील पोरखेळावरून कवीचा अभिप्राय तसाच होता ह्मणून त्यावर बालिशत्व आणूं पाहणें, आणि या बालिशत्वावरून त्याची महाकवींत गणना करणें ह्मणजे तर अरसिकत्वाचा व असमंजसपणाचा कडेलोटच होय ! ! !

---

१. पृथ्वीच्या पाठीवर मनुष्यभक्षक लोकांची वस्ती अद्याप आहे. 'रॉबिनूसन् क्रूसो' नामक अति विख्यात इंग्रेज (जों? सं०) कादंबरीचें मराठींत भाषांतर झालें आहे, त्यावरून वरील प्रकाराचें स्वरूप आमच्या मराठी वाचकांच्याही लक्षांत येणारें आहे. पॅसिफिक् महासागरांतील बेटांकडचा बोभाटाही कधींमधीं वर्तमानपत्रद्वारें कानावर येतोच,—कीं नुकतेच अमुक अमुक मिशनरी सागरस्थ लोकांनीं गट्ट करून टाकले !

सच्चेतःकैरवांतें विकच करि, जगत्ताप संपूर्ण टाळी,
अज्ञान-ध्वांत सारें हरि, रसिकचकोरांशि अत्यंत पाळीः।
नाना वस्तु प्रकाशी, कवि-हृदय-पयो-राशि-संतोष-हेतु,
काव्येंदु स्व-प्रभेनें खळ-विरहि-जनीं होतसे धूमकेतु. ॥
'मंत्ररामायण' उपसंहार, ८.—मोरोपंत.

अंक ५९.—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) मोरोपंत हा कवि आहे की नाहीं हा वाद. (३) याचें मूळ. (४) चार आक्षेपात्मक उतारे व त्यांविषयीं विचार.

१. येथवर मूळ संकल्पाप्रमाणें प्रस्तुत विवेचनाचे दोन भाग झाले. एक प्रस्तुत कवीवर येणाऱ्या आक्षेपांवर विवरण; आणि दुसरे, त्याजविषयींच्या प्रशंसापर उद्गारांविषयीं विचार. आतां राहिलेला तिसरा भाग झटला म्हणजे प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आमच्या ज्या समजुती झाल्या आहेत त्या होत. त्या यापुढें दाखल करतों.

२. मोरोपंतांच्या संबंधानें पहिला मोठा वाद झटला म्हणजे हा होय कीं, त्याला 'कवि' ही संज्ञा देतां येईल कीं नाहीं. हा वाद अर्थातच नव्या विद्वन्मंडळांत उत्पन्न झालेला आहे; जुन्यांस या वादाचा अर्थही फार करून कळावयाचा नाहीं. नव्या लोकांत तरी मोरोपंत हा कवि आहे कीं नाहीं ही चर्चा कशावरून निघाली याचा जर विचार केला, तर ती प्रख्यात इंग्रेजी कवि ड्रायड्न् व पोप यांच्यावरून निघाली आहे हें उघड आहे. अर्वाचीन मंडळीची ही एक चमत्कारिक प्रवृत्ति सर्वांच्या सहज लक्षांत येण्यासारखी आहे, कीं युरोपांतल्या व इकडल्या गोष्टींत सकृद्दर्शनीं साम्य आढळून आलें कीं लागलीच देशकालभेदाकडे बिलकुल लक्ष न पुरवतां, व वरील साम्य वस्तुतः बरोबर आहे कीं नाहीं याचाही फारसा विचार न करतां तिकडच्यासारखी कृति इकडे उठवून द्यावयाची! युरोपाच्या इतिहासांत आढळलें, कीं मार्टिन् लूथर् हा पोपवर[1] उठून त्यानें धर्मक्रांति केली; कीं लागलीच इकडे शंकराचार्यांवर हत्यार घरून मंडळी सरसावलीच! पण साऱ्या युरोपाला दरारा घालणारा, आणि जॉन् राजास पदच्युत करून खुद्द नेपोलियनावर बहिष्कार घालणारा पोप कोणीकडे, आणि आमचे भिक्षावृत्ति गरीब बिचारे जगद्गुरु कोणीकडे हा कांहीं विचार नाहीं! 'स्कोलास्टिसिजम्'† म्हणून एक पांडित्यप्रकार युरोपांत कांहीं शतकांपूर्वीं मोठा जारी चालू होता,

१. रोमन् कॅथ्लिक् लोकांचा रोम शहरांत राहणारा धर्माध्यक्ष पोप याचा व वरील कवीचा कांहीं संबंध नाहीं हें आमच्या मराठी वाचकांस सांगणें जरूर आहे. इतकें मात्र होतें कीं, वरील कवि कॅथलिक् धर्माचा होता.

† Scholastic Philosophers ऊर्फ Schoolmen नामक एक धर्मपंथ मध्ययुगांत (Middle Ages) स्थापन झाला होता. या पंथानें कठिण धार्मिक प्रश्नांचा अभ्यास व त्याविषयीं खुलासा हीं कार्यें पत्करलीं असून चर्चची शिकवणूक मानवी सदसद्विवेकबुद्धीला पटण्यासारखी आहे हें सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. या पंथांतील प्रमुख लोक म्हणजे Roscellinus, Abelard, William of Champeaux, Archbishop Anselm, Albertus Magnus, Thomas Acquinas, Peter Lombard and Duns Scotus हे होत. हा पंथ नवव्या शतकाच्या अखेरपासून पंधराव्या शतकाच्या प्रारंभापर्यंत प्रचलित होता. व Erigina पासून Occam व त्याचे अनुयायी यांच्यापर्यंत या पंथाचे भक्त होते. 'सम्पादक'

त्यापासून लॉर्ड बेकननें लोकांचीं मनें पराङ्मुख केलीं; हें ऐकल्याबरोबर आमच्या नवीन मंडळीस येथील शास्त्रविद्येचें व वरील प्रकारांचें पूर्ण साम्य दिसून येऊन न्यायमीमांसादि शास्त्रांचें शुष्कत्व तेव्हांच कळून येतें !' मूर्तिपूजेच्या संबंधानें आलीकडील विद्वत्समूहांत व विशेषतः नवीन सामाजिकांचे ठायीं कशा समजुती आढळतात याविषयीं गेल्या अंकाच्या आरंभीं * थोडासा उल्लेख केलाच आहे. असो; तर प्रस्तुत वादाचें जें बीज,—की मोरोपंत हा कवि नव्हे,—हें ड्रायडन् व पोप यांचें साम्य आमच्या महाराष्ट्रकवीशीं बळेंच घालून दिल्याचें फळ होय.

३. ड्रायडन् हा मिल्टन्शीं समकालीन होता. त्यानें अठ्ठावीस नाटकें रचलीं व अनेक लहान मोठीं काव्यें लिहिलीं. लॅटिन् भाषेंतील महाकाव्य जें 'ईनियड' $ त्याचें

---

१. वरील उल्लेख सकृद्दर्शनीं अतिशयोक्तिरूप वाटण्यासारखा आहे. पण त्याजविषयींची खात्री करून घेणें असल्यास 'लोकहितवादिकृत निबंधसंग्रह' पाहावा किंवा रा. ब. देशमुख व रानडे यांचीं व्याख्यानें ऐकावीं. त्याप्रमाणेंच मेकॉलेचा 'लॉर्ड् बेकन्' हा निबंध वाचला असतां जुन्या ग्रीक् व रोमन् लोकांच्या तत्त्ववेत्त्यांची साहेब बहादुरांनीं कशी टर उडवून दिली आहे तें समजेल !

* पृष्ठ ८९० पाहा. 'सम्पादक'

$. Publius Virgilius Maro ऊर्फ (Virgil) व्हर्जिल् (खि. पू. ७० ते खि. पू. १९) नामक रोमन् महाकवीचें काव्य Aeneid. यानें आपल्या मृत्युपत्रांत व रोमचा बादशहा ऑगस्टस् यास लिहिलेल्या पत्रांत आपण स्वतः प्रसिद्ध न केलेलीं काव्यें जाळून टाकावीं, प्रसिद्ध करूं नये अशी इच्छा प्रदर्शित केली होती. मग तीं सुधारावयाचें त्याच्या मनांत होतें कीं काय न कळे ! यांपैकींच Aeneid हें काव्य असून तें साधारण दर्ज्याचें असण्याचें वरील कारण सांगण्यांत येतें. अर्थातच ऑगस्टस्नें त्याची इच्छा धाब्यावर बसविली व त्यामुळेंच तें काव्य आज उपलब्ध आहे हें सांगणें नलगे. ट्रॉय् पडल्यानंतर विख्यात ट्रोजन् (Trojan) वीर आणि Anchises व Aphrodite यांचा पुत्र Aeneas यानें स्वतंत्र राज्याची स्थापना केली. येथपासून या काव्याला सुरुवात होते. म्हाताऱ्या बापाला खांद्यावर घेऊन व मुलास हातीं धरून हा किनाऱ्यापर्यंत जातो; बायकोची व याची चुकामूक होते; Thrace, Delos, Crete, Sicily वगैरे भागांत हा भयंकर जलपर्यटणें करतो. सिसिली येथें याचा बाप मरतो, पुढें वादळांत सांपडून हा आफ्रिकेच्या किनाऱ्यास लागतो. तेथें कार्थेजची राणी Dido याला आपल्याजवळ राहण्यास विनवितें; हा नाकारतो, ती आत्महत्या करते. नंतर आफ्रिका सोडून हा टायबर् नदीच्या मुखाशीं उतरतो. Latium देशचा राजा Latinus याचें स्वागत करून याला आपली कन्या Lavinium ही अर्पण करतो. लॅव्हिनियम्नें Rutuli चा राजा (Turnus) टर्नस् याची मागणी झिडकारलीं असल्यामुळें तो यांच्यावर हल्ला करतो, पण Aeneas त्याला Numicius नदीवर ठार मारतो असें या काव्याचें थोडक्यांत कथानक आहे. 'सम्पादक'

† "Two words form the key of the Baconian doctrine, Utility and Progress. The ancient philosophy disdained to be useful, and was content to be stationary. If dealt largely in theories of moral perfection, which were so sublime that they never could be more than theories; in attempts to solve insoluble enigmas; in exhortations to the attainment of unattainable frames of mind. It could not condescend to the humble office of

(पुढें चालू)

यानें इंग्रेजींत भाषांतर केलें. याच्या कवितेंतील मौज विशेष असल्या मुळे पद्यमालिका हा

ministering to the comfort of human beings. All the schools contemned that office as degrading; some censured it as immoral. Once indeed Posidonius, a distinguished writer of the age of Cicero and Cæsar so far forgot himself as to enumerate among humbler blessings which mankind owed to philosophy, the discovery of the principle of the arch, and the introduction of the use of metals...........Seneca vehemently disclaims these insulting copmliments...........The object of her (philosophy) lessons is (according to Seneca) to form the soul.........."We shall next be told" exclaims Seneca, "that the first shoe-maker was a philosopher." For our own part, *if we are forced to make our choice between the first shoe-maker and the author of three books On Anger, we pronounce for the shoe-maker. It may be worse to be angry than to be wet. But Shoes have kept millions from being wet; and we doubt whether Seneca ever kept anybody from being angry*.........The business of a philosopher was to disclaim in praise of poverty with two millions sterling out at usury, to meditate epigramatic conceits about the evils of luxury, in gardens which moved the envy of sovereigns, to rant about liberty while fawning on the insolent and pampered freedom of a tyrant, to celebrate the divine beauty of virtue with the same pen which had just before written a defence of the murder of a mother by a son...................................If the tree (of philosophy) which Socrates planted and Plato watered is to be judged of by its flowers and leaves it is the noblest of trees. But if we judge of the tree by its fruits...........we are forced to say with Bacon that this celebrated philosophy ended in nothing but disputation, that it was neither a vineyard nor an olive ground, but an intricate wood of briers and thistles, from which those who lost themselves in it brought back many scratches and no food.........The powers of eminent philosophers of antiquity were in truth misdirected. For how else could it be that such powers should effect so litte for mankind ?...............Words, and mere words, and nothing but words, had been all the fruit of all the toils of all the most renowned sages of sixty generations.....Man is not made for philosophy, but philosophy is made for man; it is a means to an end; and that end is to increase the pleasures and to mitigate the pains of millions who are not and cannot be philosophers...............The boast of the ancient philosophers was that their doctrine formed the minds of men to a high degree of wisdom and virtue. This was the only practical good which the most calebrated of those teachers even pretended to effect; and

(पुढें चालू.)

गुण होय. पूर्वींचे शेक्स्पीयरप्रभृति महाकवि व त्यांशीं समकालीन असणारे मिल्टन् वगैरे

---

undoubtedly, if they had effected this, they would have deserved the greatest praise. *But the truth is that, in those very matters in which alone they professed to do any good to mankind, in those very matters for the sake of which they neglected all the vulgar interests of mankind, they did nothing, or worse than nothing. They promised what was impracticable; they despised what was practicable; they filled the world with long words and long beards; and they left it as wicked and as ignorant as they found it.*

An acre in Middlesex is better than a principality in Utopia. *The smallest actual good is better than the most magnificient promises of impossibilities.* The wise man of the Stoics would, no doubt, be a grander object than a steam engine. But there are steam-engines. And the wise man of the stoics is yet to be born. A philosophy which should enable a man to feel prefectly happy while in agonies of pain would be better than a philosophy which assuages pain. But we know that there are remedies which will assuage pain; and we know that the ancient sages liked the toothache just as little as their neighbours. A philosophy which should extinguish cupidity would be better than a philosophy which should devise laws for the security of property. But it is possible to make laws which shall, to a very great extent, secure property. And we do not understand how any motives which the ancient philosophy furnished could extinguish cupidity. We know indeed that the philosophers were no better than other men. From the testimony of friends as well as of foes,.........it is plain that *these teachers of virtue had all the vices of their neighbours, with the additional vice of hypocrisy*............ After they had been declaining eight hundred years, had they made the world better than when began? *Our belief is that among the philosophers themselves, instead of a progressive improvement, there was a progressive deganeracy*.....................We know that guns, cutlery, spy-glasses, clocks are better in our time than they were in the time of our fathers, and were better in the time of our fathers than they were in the time of our grand fathers. We might, therefore, be inclined to think that, when a philosophy which boasted that its object was the elevation and purification of the mind, and which for this object neglected the sordid office of ministering to the comforts of the body, had flourished in the highest honour during many hundreds of years, a vast moral amelioration must have taken place. Was it so? Look at the

(पुढे चालू.)

यांची काव्यशक्ति त्याच्याहून फार मोठी खरी; पण वरील गुण इंग्रेजी कवितेंत जो विशे करून दृष्टीस पडला तो प्रथमतः याच्या काव्यांत.' याच्यापुढें वरीलच काव्यपद्धति पोप यां

---

schools of this wisdom four centuries before the Christian era and fou centuries after that era. Compare the men whom those schools forme at those two periods Compare Plato and Libanius. Compare Perecle and Justian. This philosophy confessed, nay boasted, that for every en but one it was useless. Had it attained that one end ?...............A larg proportion of the ablest men of every generation has been employed i constant efforts to bring the philosophy to perfection; its professors hav been held in the highest esteem by the public; it has drawn to itsel almost all the sap and vigour of the human intellect: and what has i effected ? *What profitable truth has it taught us which we should no equally have known without it ? What has it enabled us to do which we should not have been equally able to do without it ?"* (Italics ours *'Editor'*

याचा थोडक्यांत सारांश असा:—

"प्राचीन तत्त्वज्ञान उपयुक्तता-वादाच्या विरुद्ध असून त्याची प्रगति खुंटली होती; तें उज्ज्वल पण अव्यवहार्य नीतिसिद्धान्तांचा पुरस्कार करी; 'कर्मसु कौशलम्'शीं त्याला कांहींच कर्तव्य नव्हतें; आत्म विलास येवढेंच त्याचें ध्येय होतें. आमच्या मतें असल्या तत्त्वज्ञान्यांपेक्षां चांभारहि बरे; कारण, रागा वणें हें भिजण्यापेक्षां वाईट हें कबूल केलें तरी जोडयांनीं कोट्यवधि लोकांचे पाय कोरडे ठेवले आहेत, पण उलट पक्षीं तत्त्वज्ञान्यांच्या उपदेशानें मात्र एकाहि माणसाला क्रोध जिंकतां आल्याचें उदाहरण उपलब्ध नाहीं. लाखों रुपये खिशांत खुळखुळत असतां दारिद्र्याच्या स्तुतिपर वक्तृत्व गाजविणें, राजालाहि हेवा वाटेल अशा बागेंत बसून चैन व ऐषआराम यांची मनसोक्त निंदा करणें, हीं तत्त्वज्ञान्यांचीं कामें ! वाक् दूकपणा पलीकडे तत्त्वज्ञानांत कांहींच नाहीं. व जे एकदां या चर्पटपंजरींत शिरले त्यांना पुष्टिकारक अ मिळणें तर दूरच पण अंगावर ओरखाडे निघून रक्त मात्र निघालें असेल ! ज्या बाबतींत मानव जातीचें कल्याण करण्याच्या वल्गना तत्त्वज्ञान्यांनीं केल्या त्याच बाबतींत त्यांना कांहींहि करतां आले नाहीं. मानव जातीच्या ऐहिक हितसंबंधांकडे दुर्लक्ष, व व्यवहार्य गोष्टींचा निरस्कार त्यांनी केला आणि अव्यवहार्य गोष्टींचा उपदेश केला. या साऱ्या नीतिमत्तेचा उपदेश करणाऱ्यांच्या अंगीं त्यांच्या शेजाऱ्यांचे सर्व दुर्गुण तर होतेच पण आणखी त्या साऱ्यांच्या भरतीला ढोंगीपणाहि त्यांच्यांत पूर्ण भरलेला असे. केवळ तत्त्वज्ञान्यांविषयींच विचार केला तरी त्यांच्यामध्यें वाढती उन्नति दिसण्याऐवजीं वाढती अवनति मात्र आढळून येते. असे कोणतें सत्य त्यांनीं जगाला शिकविलें कीं जें त्यांच्याशिवाय जगाला आकलन करतां आलें नसतें ? साठ पिढ्यांतील सुविख्यात सत्पुरुषांचें सगळें साध्य म्हणजे पोकळ शब्दावडंबर ! त्यांनीं लांब लांब शब्द व त्याहूनहि लांब लांब दाढ्या मात्र प्रचलित केल्या खऱ्या ! ! पण जग मात्र त्यांच्या अवतारकृत्याच्या सुरुवातीस होतें तसेंच तसेंच दुष्ट अज्ञानी राहिलें ! ! ! 'सम्पादक'

१. ड्रायडन्नें इंग्रेजी भाषेवर कोणकोणते उपकार करून ठेवले हें जॉन्सन् पुढील उताऱ्यांत सांगतो:—

"Of Dryden's works it was said by Pope, "that he could select from

(पुढें चालू.)

चालू केली. ड्रायूडन्‌विषयीं पोपची पराकाष्ठेची पूज्यबुद्धि होती. पूर्वी होऊन गेलेल्या साऱ्या कवींमध्यें त्यानें वरील स्वकालीन कवीस पसंत करून त्याची पद्धति पुढें चालू करण्यांत व ती पूर्णदशेस आणून पोंचवण्यांत आपल्या आयुष्याचा व्यय केला. या परिश्रमांचें फळ 'इलियड्'चें भाषांतर व दुसरे पुष्कळ नानाविषयात्मक काव्यग्रंथ यांच्या रूपानें प्रादुर्भूत झालें. पोपचा मोठा कवित्वगुण तरी पदलालित्य हाच होय. या गुणांत त्यानें इतकी कमाल करून टाकली आहे कीं, आतां त्याहून कोणी चरचढ होऊं पाहील तर तें प्रायः केवळ असाध्य होय.[१] पोपचें माहात्म्य त्याच्या काळांत इतकें होतें कीं, त्याच्यापूर्वी ड्रायूडन्‌ची जशी सर्वतोमुख ख्याति झाली होती, व पुढें जॉन्सन्‌चें जसें अतोनात प्रस्थ माजलें, त्याप्रमाणें लोकांची त्याजविषयींची समजूत 'न भूतो न भविष्यति' अशाच प्रकारची बहुतेक झाली होती. त्या वेळचे सर्व मोठमोठे ग्रंथकारही त्याच्या आर्जवानें होते. काव्यकलेच्या संबंधानें पाहतां तर ती पोपनेंच पूर्ण उदयास आणली अशी सर्वत्र प्रसिद्धि होऊन त्याचें अनुकरण करण्याची प्रवृत्ति तेव्हांपासून जी पडली ती अद्यापही दृष्टीस पडते. जॉन्सन्‌नें जीं दोन लहानशीं काव्यें * रचलीं तीं वरील प्रवृत्तींचेंच उदाहरण होत.[२] वरील ग्रंथकारास साऱ्या इंग्रेजी कवींत वरील दोघांचेंच काव्य फार आवडत असे; त्याच्या 'कविचरित्रां'त

---

them better specimens of every mode of poetry than any other English writer could supply." Perhaps no nation ever produced a writer that enriched his language with such a variety of models. To him we owe the improvement, perhaps the completion, of our metre, the refinement of our language, and much of the correctness of our sentiments. By him we were taught *sapere et fari*, to think naturally and express forcibly. Though Davis has reasoned in rhyme before him, it may be perhaps maintained that he was the first who joined argument with poetry. He showed us the true bounds of a translator's liberty. What was said of Rome, adorned by Augustus, may be applied by an easy metaphor to English poetry embellished by Dryden, *lateritiam invenit marmoream reliquit*. He found it brick and left it marble."

१. "It is remarked by Watts, that there is scarcely a happy combination of words, or a phrase poetically elegant in the English language, which Pope has not inserted into his version of Homer.......New sentiments and new images others may produce but to attempt any further improvement of versification will be dangerous. Art and diligence have now done their best, and what shall be added will be the effort of tedious toil and needless curiosity." —Johnson. ( Life of Pope '*Ed.*' )

* लंडन् (London) व मानवी आशेचें वैफल्य (Vanity of Human Wishes). 'सं॰'

२. अंक २४, पृष्ठें ६९२–६९४ पाहा. 'सम्पादक'

त्याजविषयींचा वृत्तांत फार सविस्तर दिलेला असून दोघांची त्यानें फार चमत्कारिक तुलना केलेली आहे.[1]

प्रस्तुत शतकास आरंभ झाल्यापासून इंग्लंडांत अनेक विषयांवर मतांतरें सुरू झालीं. प्रकृत विषयाच्या संबंधानें तसेंच होऊन नवीन उपस्थित झालेल्या 'एडिन्बर्ग् रिव्ह्यू' वगैरे त्रैमासिकांतून वरील कवीविषयीं विरुद्ध मजकूर येऊं लागला. जॉन्सन्‌सारख्या रसिकांनीं ज्या कवींची येवढी तारीफ केली होती, व ज्यांस कवित्वसिंहासनावर आरूढ करून सर्वांच्या अभिवंदनास त्यांस पात्र करून ठेवलें होतें, त्यांस मेकॉलेप्रभृति अर्वाचीन निबंधकारांनीं पदच्युत करून 'इंद्राय स्वाहा तक्षकाय स्वाहा' या न्यायानें जॉन्सन्‌प्रभृति मोर्चेलवाल्यांसही त्यांच्याबरोबरच खालीं ओढलें. तेव्हां आलीकडे सर्वानुमतें एकंदर असें ठरलें आहे कीं पोपप्रभृति कवि नादान व जॉन्सन्‌प्रभृति टीकाकारही नादान ! कवित्वाचें तत्त्व दोघांसही माहीत नसून केवळ टुमदार रचना व नोकझोक या बाह्यगुणांवरूनच ते कवितेची पारख करीत ! या नवीन मतांचा विशेष प्रसार व दृढीकरण हें वर्ड्स्वर्थ् नामक अर्वाचीन विख्यात कवीनें केलें. त्यानें आपल्या काव्यांत पूर्वींच्या वेळोवेळीं लिहिलेल्या प्रस्तावना एकत्र करून ज्या जोडल्या आहेत त्यांत अठराव्या शतकांतील कवींस व रसिकांस खऱ्या कवित्वाचें स्वरूप कितपत समजत होतें तें दाखवलें आहे. शिवाय प्रस्तुत विषयाच्या संबंधानें नुसतीं मतेंच प्रगट न करतां आमच्या 'रसगंगाधर'कार पंडितरायांनीं ज्याप्रमाणें स्वकृत व्याख्या-

---

१. वरील तुलना पोपच्या चरित्राच्या शेवटीं शेवटीं आहे. ती फारच लांब आहे वास्तव शेवटला उपसंहार मात्र येथें उतरून घेतों:—

"Of genius, that power which constitutes a poet; that quality without which judgment is cold, and knowledge is inert; that energy which collects, combines, amplifies, and animates; the superiority must, with some hesitation, be allowed to Dryden. It is not to be inferred, that of this poetical vigour Pope had only a little, because Dryden had more; for every other writer since Milton must give place to Pope; and even of Dryden it must be said, hat, if he has brighter paragraphs, he has not better poems. Dryden's performances were always hasty, either excited by some external occasion, or extorted by domestic necessity; he composed without consideration, and published without correction. What his mind could supply at call, or gather in one excursion, was all that he sought, and all that he gave. The dilatory caution of Pope enabled him to condense his sentiments, to multiply his images, and to accumulate all that study might produce or chance might supply. If the flights of Dryden, therefore, are higher, Pope continues longer on the wing. If of Dryden's fire the blaze is brighter, of Pope's the heat is more regular and constant. Dryden often surpasses expectation, and Pope never falls below it. Dryden is read with frequent astonishment, and Pope with prepetual delight."

नांचें पूरण स्वरचित उदाहरणांनीं केलें आहे, त्याप्रमाणें आपल्या स्वतःच्या नवीन कवितेच्या रूपानें वरील कवीनें आपल्या मतांचें समर्थन केलें आहे.

आतां वरील गोष्टींचें सादृश्य आमच्या मराठी कवितेकडे कसें लागतें तें पाहा. ड्रायडन्‌विषयीं मिल्टन्‌नें एकदां अशी उक्ति प्रगट केली कीं, 'तो काय नुसता यमक्या आहे, कवि कसचा ?' पोपविषयींही पुष्कळांनीं अशाच प्रकारचा अभिप्राय दर्शविला आहे. या दोन गोष्टींवरून मोरोपंताविषयीं नवीन मंडळीचें मत ठाम ठरून गेलेंच,—कीं हा कवि कसचा ? हा बोलून चालून यमक्या; प्रास जुळावे, यमक साधावे, या गोष्टींकडे ज्याचें सदासर्वदा लक्ष लागून राहिलेलें, व त्यांतच ज्याची काय ती प्रतिष्ठा त्याचें कवित्व तें काय असणार ? जॉन्‌सन्‌नें वर सांगितल्याप्रमाणें ड्रायडन्‌ची व पोपची तुलना करून ड्रायडन्‌ यास पोपहून वरची पायरी दिली आहे. हें पाहतां इकडे वामन व मोरोपंत यांच्याविषयीं मत उत्पन्न झालेंच, कीं कवि म्हटला तर वामनच, मोरोपंताचा नुसता थाटमाटच पाहून घ्यावा ! पुढें मूषकमंडूक न्यायानें ड्रायडन्‌ व पोप या दोघांसही उचलून भरारी मारणारा जसा वर्ड्स्वर्थ्‌ इंग्लंडांत निपजला, त्याप्रमाणेंच इकडे आमच्या देशांतही वामनास वामनत्व देणारा व मयूराचा पिच्छभार उतरवणारा एक महाकवि* निपजून त्यानें सारा महाराष्ट्र देश दणाणून दिला आहे ! सारांश, आमच्या माजी पडलेल्या जगद्गुरूंच्या म्हणण्याप्रमाणें इंग्रेजी व मराठी कवितांचें साम्य एकंदरींत 'ठीकसें ठीक' जुळून बसतें !

तर याप्रमाणें मोरोपंताच्या मुळीं कवित्वावरच जी आलीकडे धाड येऊन पडली आहे, तिचें कारण वर सांगितलेला ड्रायडन्‌ व पोप यांच्यासंबंधानें उत्पन्न झालेला वाद होय. तिकडचें अनुकरण करून इकडेही तिकडच्यासारखी कांहीं तरी गडबड उडवून द्यावयाची ही जी आधुनिक प्रवृत्ति तिचेंच केवळ फळ वरील वाद होय. बाकी ज्या पंडितांच्या तोंडून वरील कल्मांत दाखल केलेले अनेक सिद्धांत ऐकूं येतात, त्यांनीं म्हणजे पोपचीं किंवा ड्रायडन्‌चीं शेंदोनशें तरी पानें वाचलेलीं असतात किंवा आमच्या इकडच्या महाराष्ट्रकवींच्या वाङ्मयाशीं ते विशेष परिचित असतात असा मुळींच अर्थ नाहीं. एकाद्या मिशनरी(च्या ? सं०)स 'वेदा'विषयीं व्याख्यान देण्याची हुक्की आल्यास त्यास जितपत संहितेचें पारायण करावें लागतें,[1] 'षड्दर्शनां'विषयीं अभिमान प्रगट करतांना 'ज्ञानोदया'सारख्या पत्रांच्या प्रकाश-

* 'राजा शिवाजी' या वीररसप्रधान महाकाव्याचे कर्ते. के. कुंटे. 'सम्पादक'

१. वरील वेदव्याख्यानाचा एक मासला परवां येथें दृष्टीस पडला. अहमदनगरचे मिशनरी रे० टेलर्‌ साहेब यांनीं नुकतें येथील पाद्रीशाळेंत वरील विषयावर एक व्याख्यान दिलें. मिशनरीमजकुरांस मराठी भाषेचें ज्ञान बऱ्यापैकीं आहे असें त्यांच्या भाषणावरून दिसून आलें; पण याखेरीज सदरील व्याख्यानांत दुसरा कोणताही गुण दृष्टीस पडला नाहीं. मुख्य विषयाचें विवेचन म्हटलें तर कांहीं इकडच्या तिकडच्या दहावीस ऋचा व श्लोक गोळा करून टिपून आणले होते, व वेदांत किती विरोध आहेत हें दाखवण्याकरतां ते सर्वांस वाचून दाखवले, इतकेंच काय तें. आलीकडे शिक्षणाचा फैलावा पुष्कळ झाल्यामुळें पहिल्यासारखें 'पल्लवग्राहि पांडित्य' हल्लीं पुण्यासारख्या ठिकाणीं तरी चालणार

( पुढें चालू. )

कांस जितपत कणादजैमिन्यादि अपवित्र शास्त्रकारांची ओळख करून घ्यावी लागते,* मेकॉले प्रभृति बहादरांस प्राच्य देशांतील कोणत्याही कोनाकोपऱ्याविषयीं लिहावयाचें असल्यास त्यांस जितपत परिश्रम करणें अवश्य होतें,१ किंवा आमच्या अर्वाचीन महापंडितांस जेंदा वेस्ता आणि वेद, वेद आणि कुराण, कुराण आणि पवित्रशास्त्र, पवित्रशास्त्र आणि धम्मपद, धम्मपद आणि गुलामगिरी यांची झां(सां? सं०)गड घालून देतांना जितपत पंचाईत पडते,२ तितपतच

नाहीं हें रेवरेंड साहेबांच्या सारख्यांसही कसें कळत नाहीं कोण जाणे! तरी सदरील व्याख्यानाच्या शेवटीं एका तरुण सभासदाकडून व्याख्यानकारास जें एक बरेंच खरमरीत उत्तर मिळालें त्यावरून त्यास कळलेंच असेल कीं आपलें पवित्रशास्त्रीय बीज येथें फारसें रुजलें नाहीं व रुजण्यासारखेंही नाहीं।

* २५ जुलै १८७७ रोजीं मुंबईहून 'कणाद' या सहीनें आलेल्या व मालेच्या ४१ व्या अंकांत प्रसिद्ध झालेल्या पत्रासंबंधीं उल्लेख येथें आहे. सदर पत्रांत दरमहा भेट म्हणून मोफत मिळणाऱ्या पंडित कुंटेकृत षड्दर्शनचिंतनिकेवर स्तुतिपर अभिप्राय दिल्याबद्दल ज्ञाननिधान 'ज्ञानोदया'ची खूप हजेरी घेतली आहे. ज्ञानोदय १२ जुलै १८७७ च्या अंकांत म्हणतो "या ग्रंथांचीं भाषांतरें करण्यास मोठी 'विस्पन्नता' पाहिजे! वेदांमध्यें जे विषय आहेत त्यांपेक्षां षड्दर्शनांतील विषय फार 'काल्पनिक' व गहन आहेत! सदरील पुस्तकाची भाषा फार 'उंच' आहे!" पण षड्दर्शनाचिंतनिकाकार जरी योग्य असले तरी वृद्ध 'ज्ञानोबां'च्या मतें षड्दर्शनें मात्र 'वाडिलांच्या हातचा निवडक खड्यांचा संग्रह' होत! अर्थात् षड्दर्शनें म्हणजे प्राचीन मूर्ख ऋषींस म्हातारचळ लागून त्यांनीं जे तर्कट लिहून ठेवलें तें! केवढा हा ज्ञानाचा उदय!!! 'सम्पादक'

१. वरील ग्रंथकारानें एके प्रसंगीं आमच्या राममोहनरायाविषयीं असें म्हटलें:—

"Is it not notorious that the profundity of one age is the shallowness of the next; that the profundity of one nation is the shallowness of a neighbouring nation? Rammohun Roy passed, among Hindoos, for a man of profound Wastern learning; but he would have been a very superficial member of this institute." 'Literature of Britain.'

या ठिकाणीं विद्वत्तेच्या खोलीचें व उथळपणाचें जें माप घेतलें आहे त्या मापानें आमच्या पाश्चात्य पंडितांचें इकडील विषयांचें ज्ञान कितीसें भरेल? ब्रह्मसमाजाच्या आद्यस्थापकास इंग्लिश भाषेचें व इंग्रेजी विद्यांचें जितपत ज्ञान होतें तितपत संस्कृताचें ज्ञान व शास्त्रांची माहिती किती प्रोफेसरांच्या ठायीं आढळेल? आणि त्यांतून ज्या पंडितवर्यांनीं प्राच्य व पाश्चात्य विद्यांच्या योग्यतेवर बेधडक मिनिट झोकून दिलें त्यांच्या ज्ञानाची गंभीरता तर कोठवर वर्णावी!! (अंक ३० पृष्ठें ६००-६०१ पाहा.)

२. वरील श्रेणीपैकीं पहिल्या विषयावर एक बडें व्याख्यान आम्हांस कांहीं दिवसांपूर्वी मुंबापुरस्थ आर्यसमाजांत ऐकावयास सांपडलें. व्याख्यान कोणत्या तऱ्हेचें होईल याची कल्पना आम्हांस पूर्वी झालीच होती. पण मुंबईकरांस व विशेषतः दयानंदजींच्या जुक्तिवाल्यांस तें कितपत रुचतें हें पाहण्याची आमची इच्छा होती. पाहिलें तों सर्व यथास्थित चाललें होतें! व्याख्यात्यांनीं हिंदुस्थानावरून पार्सदेशावर, पार्सदेशावरून रूमशामच्या मुलखावर, रूमशामावरून शार्मण्य देशावर याप्रमाणें उड्डाणावर उड्डाण चालवून शेवटीं स्वारी ऐर्लंडावर जाऊन थांबली, व या सर्व देशांतून आर्यधर्म चालू होता असें आपल्या गुरुबंधूंस व परम भाविक श्रोत्यांस त्यांनीं कळवलें! इंग्रेजी बहुमानार्थक संबोधन 'सर्' याचीही त्यांनीं नवीच उत्पत्ति आपल्या प्रिय समाजबंधूंस सादर केली; ती ही कीं, वरील शब्द 'आर्य' शब्दाचा अपभ्रंश होय!! या अजब चिजा ऐकून आम्ही तर अगदीं थक्क होऊन गेलों,

(पुढें चालू.)

वरील कवित्वाची तुला धारण करणाऱ्या रसिक मंडळीस! यास्तव या केवळ स्वकपोलकल्पित साम्याच्या संबंधानें येथें कांहीं लिहिणें अवश्य आहे असें वाटत नाहीं. त्यांतून वरील तुलनेचा एक पक्ष आमच्या मराठी वाचकांस अगदींच अपरिचित पडल्यामुळें आह्मीं जरी वरील खटपट केली तरी व्यर्थ खटाटोप मात्र होणार!

यास्तव ड्रायडन् आणि वामन, पोप आणि मोरोपंत, वर्ड्स्वर्थ् आणि 'वीररसप्रधान काव्या'चे कर्ते, या युग्मत्रयांत परस्पर कितपत साम्य आहे याविषयींचें विवेचन तूर्त एकीकडे ठेवूं. प्रस्तुत वादाचा निर्णय होण्यास सध्यां येवढेंच बस आहे कीं, मोरोपंत हा कवि नव्हे असें जे प्रतिपादन करतात त्यांच्या आक्षेपांचें निरसन करून आमच्या स्वतःच्या मतांचीं कारणें पुढें वाचकांस सादर करतों.

४. मोरोपंत हा कवि नव्हे या प्रमेयावर सविस्तर उपपादन ज्यांत केलें आहे असा ग्रंथ अद्याप मुळींच झाला नाहीं. मराठी कविता वाचणारे आपल्या लोकांत किती आहेत याचा विचार केला असतां वरील गोष्टीचें आश्चर्य वाटणार नाहीं; आणि त्यांतून प्रस्तुत महाराष्ट्रकवींचें काव्य वाचून वरील निर्णय करणारा मनुष्य तर थोडाच आढळेल असें वाटतें! ज्यांस शोध न करतां मतें भराभर झोकून देण्याची भारी हौस, जे केवळ दुसऱ्याच्या अभिप्रायाचा अनुवाद करणारे, किंवा ज्यांचा एकाद्या गोष्टीविषयीं एकादा ग्रह एकदां होऊन बसला ह्मणजे बसला; अशाच मंडळीच्या पायीं आजपर्यंत आमच्या बिचाऱ्या देशाची विटंबना झालेली आहे. असो; तर वरील सविस्तर ग्रंथाच्या अभावीं प्रस्तुत विषयावर कोठें कोठें जे दोन चार उल्लेख आमच्या आढळण्यांत आले आहेत त्यांचें येथें अवतरण करून त्यांविषयीं विवेचन करतों.

'विविधज्ञानविस्तारा'च्या पहिल्या वर्षाच्या पांचव्या व सातव्या अंकांत 'मोरोपंत' या सदराखालीं कांहीं मजकूर लिहिलेला आहे, हें मागें (पृष्ठ ८०५ टीप १ सं०')सांगण्यांत आलेंच आहे. त्यांतील पुढील तीन उतारे घेतों:—

"नलाख्यानांत कोठें एक आर्या आहे, ती अशी:—

राधाप्राप्त्यर्थ जसा तो स्वकरगतामळा यशा शिनळ§, ।

सोडी दमयंत्यर्थ क्षिप्रचि अतिदुर्लभा तशाशि‡नळ.।।(आर्याभारत,वनपर्व,४,४५,'सं'०)

यमक जोडण्यासाठीं ज्याणें भगवंताला 'शिनळ' असें विशेषण दिलें, त्याची भक्ति

---

पण आमच्या मुंबईकर आर्यबंधूंच्या चेहेऱ्यावर आश्चर्याचें वगैरे कांहीं एक चिन्ह नजरेस आलें नाहीं. जें जें आलें तें तें त्यांनीं खुशाल कान पसरून बहुमानपूर्वक ऐकून घेतलें. ठीकच आहे, ज्या महामाविकांस 'आदम' (आदिमः), 'पूजारी' (पूजेचा अरी) या व्युत्पत्ति महागुरूंच्या मुखावाटें निघाल्या असतां चांगल्या ग्राह्य झाल्या, ज्यांच्या माजी अध्यक्षांनीं विलायतेंत छापलेल्या गीताभाष्याच्या उपोद्घातांत 'कौरव' (कौरव) शब्द 'कैवार' शब्दापासून निघालेला आहे ह्मणून प्रतिपादन केलें आहे, ती मंडळी 'सर्' शब्दाच्या मूळपीठिकेला कशाला नाक मुरडील? आह्मांस खास वाटतें कीं, 'आर्याः' याचें इंग्रेजी रूपांतर Sirrah असें करून जरी व्याख्यात्यांनीं आपल्या प्रिय बंधूंस सादर केलें असतें तरी तें चाललें नसतें असें नाहीं!

§ पाठभेदः 'सिनळ' (पराडकरी प्रत). ‡पाठभेदः 'तशासि' (पराडकरी प्रत).'सम्पादक'

केवढी होती ती सहज ध्यानांत येईल. श्रीमद्भागवतांत दुष्टांनीं जी परमेश्वराची निंदा केली आहे त्या श्लोकांचा टीकाकारानें प्रथम वास्तविक अर्थ सांगून, नंतर टीकेच्या योगानें भगवंताची निंदा आपल्याही तोंडांतून झाली म्हणून दोषशमनार्थ पुन: त्याच श्लोकांचा अर्थ ओढून ताणून स्तुतिपर केला आहे. मोरोपंताला हें ठाऊक असून त्याला तें अभद्र भाषण करण्यास अगदीं संकोच वाटला नाहीं; किंबहुना लज्जा देखील वाटली नसावी.

येथें श्रीकृष्णाला शिनळ म्हणून, त्याणें राधेसाठीं आपलें निर्मल यश घालवलें असें कवि म्हणतो. असें जर आहे तर त्याचे गुण कां गावे? श्रीमद्भागवतांत कृष्णाची आणि गोपींची क्रीडा शुकाचार्यानें वर्णिली आहे. परंतु शुकाचार्य एवढा साधु आणि ऊर्ध्वरेता असून त्याणें ती क्रीडा कधीं दूषिली नाहीं; परंतु त्या कृत्यांला भगवंताचें यश असें म्हटलें आहे. मोरोपंताला तीं कृत्यें वाईट वाटत होतीं असेंही कोठें आढळत नाहीं. दुसरें, जर श्रीकृष्ण जार, तर त्याची उपमा नळाला साजत नाहीं. कारण नळानें हंसाला पाठवलें तें जारकर्मांच्या हेतूनें नव्हे."

" विराटपर्वांत अर्जुन उत्तरास सांगतो:—

न्यावा चमूवरि तुवां

रथ, तरुणीप्रति जसा स्मरें तरुण. ॥ (३, ११४. 'संपादक')

वीररसांत शृंगाररस मिसळल्यानें काव्यास कशी गोडी येत असते ती एक मोरोपंताचे भक्तच केवळ जाणत असतात; इतरांस अतर्क्य. अशाच एका प्रतीचें उदाहरण देऊन होरेशियस् * नामें रोमी कवि म्हणतो:—

Resum teneatis, amici? 'मित्रहो, हें पाहून तुम्ही हंसल्याशिवाय रहाल काय?"

" मोरोपंतानें रामायणांत कोठें एक उत्प्रेक्षा केली आहे ती अशी:—

सेतु न तो यत्पतिनें स्वसुता नेली, जसी वृकें एणी, ।

त्या लंकेची श्रीभूदेवीनें ओढिली असे वेणी. ॥ (आर्याभारत–वनपर्व,१२,२१'सं०')

रामचंद्रानें शिलासेतु बांधला, तो कवि म्हणतो सेतु नव्हे, तर काय? आपली कन्या जानकी रावणानें नेली या कारणानें पृथ्वीनें त्या रावणाची लंकारूप जी स्त्री तिची वेणी धरून ओढिली आहे.

काय हा अलंकार! रावणानें जर दुसऱ्याची बायको आणली, तर त्याच्या स्त्रियेला तें बरें वाटेल काय? सहसा वाटणार नाहीं. तर मग तिचीं उगीच कां वेणी धरून ओढावी?

रा. ब. भास्कर दामोदर यांणीं नवनीताचे प्रस्तावनेंत या उत्प्रेक्षेची फारच प्रशंसा केली आहे. त्यांला तिजमध्यें काय जो चमत्कार वाटला असेल तो वाटो. आमचें मत तर अगदीं भिन्न."

'अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रहा'त एके ठिकाणीं$ असा लेख आहे:—

*Quintus Horatius Flaccus ऊर्फ Horace (खि. पू. ६५–खि. पू. ८). 'Satires', 'Odes', 'Epodes' व 'Epistles' वगैरेंचा कर्ता. 'सम्पादक'

$ "वाक्यांतले अलंकार" या धड्यांत. 'सम्पादक'

" वाक्याचा किंवा त्यांतील शब्दांचा अर्थ दोहोंकडे लागत असला ह्मणजे श्लेषनामक अलंकार होतो. जसें:—

तूं मलिन कुटिल नीरस
जडाहि पुनर्भवपर्णेंहि कच साच; ।
धारिला शिरीहि न स्व—
प्रकृतिगुण त्यजिसि; नाम कच साच. ॥

मोरोपंत, कचोपाख्यान, [ आदिपर्व, १०-९. सं० ]

ह्या स्थळीं कचनामक ब्राह्मणास जीं विशेषणें दिलीं आहेत, तीं केंसासही लागतात. साधारण कवि ह्या अलंकाराचा हवा तेथें प्रयोग करून आपल्या काव्यांस दुर्बोधता आणितात, व त्यांच्या ग्रंथांत एका शब्दाचे दोन अर्थ होत असतात, एवढ्यानेंच त्यांस व कितीएक अरसिकांस ते ग्रंथ मोठे चांगले वाटतात; पण सहृदय पुरुष तसले लेख पसंत करीत नाहींत; हें आमचेंच मत आहे असें वाचणाऱ्यांनीं समजूं नये; तर मोटमोठ्या शुद्ध ग्रंथकारांचेंही मत असेंच आहे."

आतां अनुक्रमेंकरून वरील चारी स्थलांविषयीं विचार करूं.

( १ ) प्रस्तुत आर्या वनपर्वांतर्गत नलोपाख्यानांतील आहे. तिचा अर्थ उघडच आहे, कीं, नलराजाच्या हातीं हंस सांपडला असतां तो त्यास सोडून देता झाला; कसा ? तर जसें कृष्णानें राधेशीं रमण्याची इच्छा धरून आपल्या हातचें निर्मल यश घालवलें. या आर्येंत नलाचें आणि कृष्णाचें, दमयंतीचें आणि राधेचें, हंसाचें आणि यशाचें, असें तीन प्रकारचें साम्य कवीनें वर्णिलें आहे, व उपमालंकार[1] केला आहे. वरील तीन साम्यांत चित्तास चमत्कार देणारें साम्य ह्मटलें ह्मणजे हंस आणि यश यांचें होय, व उपमेचा मुख्य भाग हाच होय. कृष्ण आणि राधा यांच्या जागीं आणखी कोणाची योजना केली असती तरी चालली असती; कारण त्यांचें नल आणि दमयंती यांशीं जें सादृश्य वर्णिलें आहे तें केवळ गौण आहे. मुद्द्याची गोष्ट काय ती अमूर्त जें यश त्याशीं संस्कृत कवींच्या संकेतास[2]

१. उपमा ह्मणजे दोन वस्तूंचें चमत्कारिक सादृश्य असल्यामुळें सजीव व निर्जीव, मूर्त व अमूर्त, अशांचें सादृश्य विशेष चमत्कारास्पद होय हें उघडच आहे. प्रस्तुत शतकाच्या आरंभीं विलायतेंत त्रैमासिकांची जी नवीन तऱ्हा निघाली तींतील पहिलें जें 'एडिन्बर्ग् रिव्ह्यु' ( अंक २८ पृष्ठें ५६५,५६६ पाहा. ) त्याचा मुख्य स्थापक व प्रकाशक जो विख्यात टीकाकर्ता जेफ्री त्यानें एके ठिकाणीं असें लिहिलें आहे:--

"It has always been our opinion that the very essence of poetry—apart from the pathos, the wit, or the brilliant descriptions which may be embodied in it, but may exist equally in prose-consists in the fine perception and vivid expression of that subtle and mysterious analogy which exists between the physical and the moral world, which makes outward things and qualities the natural types and emblems of inward gifts and emotions."

२. संस्कृत कवींचे संकेत अनेक आहेत. ते येणेंप्रमाणें:--कीर्ति व हास्य यांचें शुभ्रत्व; तरुण

[ पुढें चालू. ]

अनुसरून मूर्त जो परम शुभ्र हंस त्याची तुलना करून दोहोंशीं 'सोडणें' या क्रियेचा चमत्कारिक रीतीनें अन्वय करून दिला आहे ही होय. ही तुलना यथार्थ असली म्हणजे कवीचें काम झालें; व जो खरा रसिक आहे त्याचें लक्ष तिच्यापलीकडे तिळमात्रही जाणार नाहीं. आमच्या टीकाकर्त्यानें कृष्णास 'शिनळ' हें विशेषण लावणें बरोबर आहे कीं नाहीं, शुकाचार्यांचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय होता व मोरोपंतांचा कसा होता. हंसाला जो दमयंतीकडे पाठवला तो जारकर्माच्या हेतूनें नव्हे, अतएव श्रीकृष्णाची उपमा नळाला साजत नाहीं—वगैरे जें पांडित्य केलें आहे तें निवळ अरण्यरोदन आहे. त्याचा वरील आर्येतील उपमेशीं बिलकुल संबंध नाहीं मोरोपंताच्या धर्मसंबंधी मतांविषयीं जर विचार कर्तव्य असता, तर प्रस्तुत लिहिणाराचा वरील सर्व ऊहापोह यथायोग्य होता; पण, जोंपर्यंत कवित्वाच्या संबंधाचेंच विवेचन आहे तोंपर्यंत वरील धर्ममीमांसा केवळ अप्रस्तुत होय!

(२) विराटपर्वांत उत्तरगोग्रहण प्रसंगींची पुढील आर्या आहे:—

बैस रथीं, तूं माजा सारथि हो, तरणिचा जसा अरुण; ।
न्यावा चमूवरि तुवां रथ, तरुणीप्रति जसा स्मरें तरुण. ॥ (आदिपर्व १०, ९ सं०)

या आर्येंत वीररसांत शृंगाररसाची भेसळ झाली आहे ती आमच्या आक्षेपकास खपत नाहीं. वरील रससंकराच्या योगानें त्याच्या ठायीं हास्यरसाची उत्पत्ति होऊन तो जो वाहवत गेला आहे आहे तो टैबर् नदींत जाऊन पडला आहे! आम्ही रोमकभाषानभिज्ञ असल्यामुळें होरेशियस् बोवांचें काय रससूत्र आहे व वरील हास्यरसोद्गार त्यांनीं कोणत्या संबंधानें प्रगट केला हें आह्मांस माहीत नाहीं. तरी गीर्वाणभाषेच्या आयुधागारांतील पुढील कालिदासीय अस्त्र आमच्या बिचाऱ्या प्राकृत कवीचा बचाव करील असें वाटतें—

राममन्मथशरेण ताडिता
दुःसहेन हृदये निशाचरी ।
गंधवद्रुधिरचन्दनोक्षिता
जीवितेशवसतिं जगाम सा ॥[१]

हें पद्य 'रघुवंशा' च्या अकराव्या सर्गांतलें (विसावें सं०) आहे. प्रसंग ताटकावधाचा असून वरील पद्यांत ताटकेवर श्लेषेंकरून अभिसारिकेचें रूपक केलें आहे हें उघडच आहे.

आतां शृंगारांत वीराचें मिश्रण असल्याचा प्रकार पाहा—

---

स्त्रियांच्या मद्यगंडूषांनीं बकुलवृक्षाचें फुलणं; हत्तींच्या गंडस्थळांत मोतीं; चकोरांचें चंद्रकिरणसेवन; चक्रवाक पक्ष्यांचा सूर्यास्ताबरोबर वियोग व सूर्योदयाबरोबर संगम, इ० इ०

१. "(नाटकापक्षीं) रामाच्या दुःसह शरानें हृदयाचे ठायीं विद्ध झालेली ती राक्षसी दुर्गंधयुक्त रक्तानें न्हालेली होत्साती यमसदनास गेली."

"(अभिसारिकापक्षीं) मदनाच्या दुःसह शरानें विद्धहृदय होत्साती ती अभिसारिका सुगंधयुक्त रक्तचंदनाचा लेप केलेली अशी प्राणेशाच्या संकेतस्थानीं गेली."

शान्ते मन्मथसङ्गरे रणभृतां सत्कारमातन्वती
वासोऽदाज्जघनस्य पीनकुचयोर्हारं श्रुतेः कुण्डलम् ।
बिम्बोष्ठस्य च वीटिकां स्मितमुखी पाण्यो रणत्कङ्कणे
पश्चाल्लंबिनि केशपाशनिचये युक्तो हि बन्धक्रमः ॥ *

वरील दोन उदाहरणांवरून वाचकांस कळून येईलच, कीं शृंगार आणि वीर यांचा परस्पर केवळ विरोध आहे असें नाहीं. येवढें मात्र खरें आहे कीं, कोणी वीर रणावेशानें भरून गेला असतां त्याच्या तोंडून शृंगारोक्ति वदवणें, किंवा कोणी अनंगरंगमग्न झाला असतां त्यानें वीरश्रीचें भाषण करणें, हें शोभणार नाहीं; पण उपमेकरतां शृंगारांत वीररस आला किंवा वीरांत शृंगार आला तर तो हास्यास्पद होतो असें नाहीं. लौकिक भाषेंतही 'रतियुद्ध' आणि 'रणनवरा' या शब्दांवरून वरीलच प्रमाण मिळतें.

त्यांतून ज्या प्रसंगविशेषीं वरील शृंगारोपमा योजली आहे तेथें तर ती विशेष शोभते असें आम्हांस वाटतें. ज्या महावीरानें पंजरस्थ सिंहाप्रमाणें बारा वर्षें वनवास काढला, व तेराव्या वर्षी तर ज्यास क्लीबवेष धारण करून स्ववीर्याचा निन्हव करणें भाग पडलें, आणि भावी समरप्रसंगाची ज्यास नुसती वार्ता कळल्याबरोबर--

उठल्या उत्साहाच्या त्या शांतश्रीमदुदधिवरि लहरी ।

अशी ज्याची अवस्था झाली, त्यास चिरकांक्षित जें शत्रुसेनेचें दर्शन तें घडलें असतां केवढा हर्ष होणारा आहे व रणतुंबळ करण्याविषयीं केवढें प्रबळ बाहुस्फुरण होणार आहे ! वरील बाहुस्फुरणास आमच्या मतें एकच अत्यंत समर्पक दृष्टांत होय ![1]

---

* ४१ व्या अंकांत 'सुभाषित' या सदराखालीं प्रस्तुत श्लोक व त्याचा अर्थ दिला आहे. तेथून अर्थ उतरून घेतों:—

" 'रतिसंगर आटपला असतां रणांगणीं ज्यांनीं चांगली चाकरी बजावली त्यांचा सत्कार करण्याकरतां स्त्रीनें जघनास वस्त्रदान केलें, पीनकुचांस हार व कर्णास कुंडलें अर्पिलीं, बिंबोष्ठावर तर मर्जी सुप्रसन्न होऊन त्यास विडा दिला व हस्तांस रणत्कार करणारीं कंकणें बहाल केलीं; पण युद्धांत मागल्या मागेंच राहिलेला जो केशपाश त्याचें मात्र राजद्रोह केल्याबद्दल बंधन केलें !' हें असंबंधातिशयोक्तीचें उदाहरण होय." 'सम्पादक'

१. गीर्वाणकविमुकुटमणीच्या ग्रंथांतही पुढील उपमा आढळतात:—

स निर्विश्य यथाकामं तटेष्वालीनचन्दनौ ।
स्तनाविव दिशस्तस्याः शैलौ मलयदर्दुरौ ॥
असह्यविक्रमः सह्यं दूरान्मुक्तमुदन्वता ।
नितम्बमिव मेदिन्याः स्रस्तांशुकमलङ्घयत् ॥

रघुवंश. ४ (५१, ५२. सं०)

२. प्रख्यात इंग्रेजी कवि स्कॉट् याच्या अत्युत्कृष्ट काव्यांत पुढील उल्लेख आढळतो. हा तर वादविषयक आर्येबरोबर अर्थसादृश्याच्या सदराखालीं देण्यासारखा आहे:--

"Twice have I sought clan-Alpine's glen,
In peace; but when I come agen,

( पुढें चालू. )

( ३ ) आमच्या आक्षेपकास लंकादेवीची वेणी धरून ओढल्याबद्दल तिची फार कींव आली आहे. या किंवेवरून त्याची सदयता प्रगट होते, पण सहृदयता होत नाहीं. पहिल्या आक्षेपांत कृष्णभक्ति अस्थानीं प्रगट होऊन ती जशी प्रस्तुत रसिकाच्या यथार्थ दर्शनास विघातक झाली त्याप्रमाणेंच येथें वरील हृदयवृत्ति झाली आहे. लंका ही रावणाची स्त्री यास्तव तिजविषयीं सीतेची माता जी भूदेवी तिची अत्यंत द्वेषबुद्धि होणें हें स्त्रीस्वभावास अनुसरूनच आहे, व आपल्या कन्येचा ज्या दुष्टानें विनाकारण छळ आरंभला आहे त्याच्यावर कसा तरी प्रतीकार घडो अशी इच्छा तीस होणें हेंही सहजच आहे. द्वेषाचें व प्रेमाचें मनुष्यापासून मनुष्याकडे किंबहुना पदार्थांकडेही कसें संक्रमण होत असतें हें मनुष्यस्वभावाकडे ज्यानें अंमळ लक्ष पुरवलें असेल त्याच्या सहज लक्षांत येणारें आहे. आमचे कविकुलगुरु यक्षाच्या मुखें मेघास सांगतात—

भर्तुः कण्ठच्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः[1]।

"बा मेघा! तुजकडे शिवगण मोठ्या प्रेमानें बघत राहतील. कां? तर तुझा वर्ण त्यांच्या स्वामीच्या कंठासारखा आहे झणून!" तर हृदयवृत्तीच्या संक्रमणाचा इतका प्रभाव आहे. आतां हें खरें आहे कीं, रावणानें आपली मुलगी चोरून नेली तर त्याच्या बायकोकडे काय अपराध आहे, तिला तर घरांत सवत आल्यानें वाईटच वाटणार आहे, वगैरे गोष्टींचा विचार आमच्या आर्यभूमीनें करणें जरूर होतें. पण हा तीस कसा झाला नाहीं कोण जाणे! असो; स्वतः क्षमा खरी, पण या प्रसंगीं तीच आमच्या रसिकाच्या क्षमेस पात्र आहे! आमच्या कवीच्या हातून तरी वरील चूक कशी घडली हेंही चांगलेंसें कळत नाहीं. पण पुढील शतकांत सगळेंच पारडें फिरून जाऊन नवे प्रभु, नवी विद्या, नवे महाकवि, नवे रसिक अशी गर्दीच गर्दी होऊन जाणार आहे, व उपमा, उत्प्रेक्षा वगैरे जोख-

---

I come with banner, brand and bow,
As leader seeks his mortal foe.
*For love-lorn swain, in lady's bower,*
*Never panted for the appointed hour,*
As I, until before me stand,
This rebel Chieftain and his band."

*Lady of the Lake.*—*V*, *Viii*, 19-26

१ भर्तुः कण्ठ-च्छविरिति गणैः सादरं वीक्ष्यमाणः
पुण्यं यायास्त्रिभुवन-गुरोर्धाम चण्डीश्वरस्य।
धूतोद्यानं कुवलय-रजो-गन्धिभिर्गन्धवत्या—
स्तोय-क्रीडा-निरत-युवति-स्नान-तिक्तैर्मरुद्भिः॥

—'मेघदूत,' (पूर्वमेघ,३५-सं०)

(महाकाल जो त्रिभुवनपति त्या वंदाया मग जावें
प्रभुकंठाची प्रभा मानुनी गण तुज बघातेल भावें॥
तया स्थलींचीं बालोद्यानें हलवी मारुत मंद
विलसित पद्मां डोलवूनि जो हरी तयांचा गंध॥)

—'पद्यरत्नावली'

ण्याचे विलायती कांटे या देशांत येऊन थडकणार आहेत हें तरी त्या बिचाऱ्याच्या कोठून लक्षांत यावें ?

वरील उत्प्रेक्षेची प्रशंसा केल्याबद्दल कै॰ भास्कर दामोदर पाळंदे यांजवरही प्रस्तुत टीकाकर्त्यांचा शेवटचा फटकारा गेला आहे, पण माजी रावबहादुरांसारख्या खऱ्या रसिकास चमत्कार वाटण्याजोगें वरील उत्प्रेक्षेंत कांहींच नाहीं असें आह्मांस वाटत नाहीं. एक तर केशाकर्षणाचा प्रकार स्त्रियांच्या कृतीस अनुसरून असल्यामुळें स्वभावोक्तिरूप होय; आणि शिवाय सेतूचें आणि वेणीचें सादृश्य कृष्णत्वास्तव, दैर्घ्यास्तव, आणि संवीतत्वास्तव अत्यंत समर्पक व हृदयंगम होय !

याप्रमाणें 'विविधज्ञानविस्तारां'तील आक्षेपांचें निरसन झालें. यावरून आमच्या वाचकांच्या लक्षांत येईलच कीं, जे आक्षेप कित्येक पंडितंमन्य प्रस्तुत कवीवर आपल्या विद्वत्तेच्या घमंडींत झोकून देतात त्यांविषयीं यथार्थ बुद्धीनें विचार केला असतां ते प्रायः असेच नाहींसे होणार आहेत. त्यांतून कवींचे विचार तर्कशास्त्राच्या तराजूंत जोखूं पाहणें हें तर अरसिकतेचें केवळ शिखर होय !

असो; आतां शेवटला जो 'अनेकविद्यामूलतत्त्वां'तील उतारा त्याविषयीं विचार करायाचा. हा हातीं घ्यावयाचें आह्मास मोठें भय वाटतें. यापूर्वीं आह्मी आमच्या प्रस्तुत राज्यकर्त्यांविषयीं, इंग्रजी ग्रंथकारांविषयीं, विलायती धर्मांविषयीं, वगैरे जें जें लिहिलें त्या सर्वांवरून राजद्रोहाचा व सद्धर्मद्रोहाचा जबरदस्त चार्ज आह्मांवर आला, व वरील महापातकांची निष्कृति आह्मी अद्याप करीतच आहों. तेव्हां यावरून पाहतां वरील पुस्तकांतील लेखाविरुद्ध अभिप्राय प्रगट केल्यानें तर केवढा भयंकर गुन्हा होणार आहे याची कल्पनाही करवत नाहीं ! जर इंग्रज लोकांस न रुचण्यासारखें कांहींही लिहिल्यानें राजनिष्ठेचा लगेच चुराडा होऊन जातो; आणि तो कां, तर ते आमच्या देशाचें राज्यसूत्र हातांत वागवून आमचें रक्षण करताहेत व त्यांच्या कृपेनें आह्मांस ज्ञानप्राप्ति झाली आहे ह्मणून; तर मग मुळीं जन्मलाभच जेथपासून त्या ठिकाणीं विरोध प्रगट करणें हें तर केवढें धाष्टर्य व केवढा अधमपणा होय ! आपले राज्यकर्ते जें जें करतील त्यास नेहेमी मान डोलवीत जायची ही जर राजनिष्ठा, इंग्रज ग्रंथकारांच्या पेनांतून जें जें निष्पन्न होईल तें तें शिरसावंद्य करायाचें ही जर सत्यनिष्ठा, पाद्री साहेब जें जें सांगतील त्यास 'आमेन्' (तथास्तु) या एक्या पदानेंच उत्तर करायाचें ही जर धर्मनिष्ठा, तर मग 'बाबावाक्यं प्रमाणम्' हेंच पितृभक्तीचें परमस्वरूप होय ! या कडकडीत व्रताची दीक्षा घेऊन तें आजन्म अबाधित पाळण्याचा ज्यांचा कृतसंकल्प असेल व त्यांत ज्यांस धन्यता वाटत असेल त्यांस ती सुखेनैव वाटो. आमच्या मनाची नैसर्गिक प्रवृत्ति तर अगदीं निराळ्या प्रकारची आहे; व आह्मीं आजपर्यंत जेवढें वाचलें व ऐकलें त्यावरून वरील प्रवृत्तीचें दोषरूपत्वही अद्याप आमच्या लक्षांत आलें नाहीं. शिवाय हेंही सांगणें या प्रसंगीं अप्रस्तुत होणार नाहीं, कीं ज्या महापंडिताचा पितृनामानें निर्देश करण्याचा अधिकार जगदीशाच्या कृपेनें आमच्याकडे आहे, ज्याचें पूर्ववय गदाधरादिकांच्या समागमें जाऊन उत्तरवय मिल्लप्रभृति पाश्चात्य तत्त्वज्ञांच्या संगतीनें गेलें, रवि-

करगतकमलन्यायानें ज्याच्या विकासप्रद सान्निध्याचा अमूल्य लाभ आजपर्यंत इतका काळ आह्मांस लाभला, आणि ज्याचें स्वभाषाभिवृद्धीचें व्रत आज पांच वर्षे यथाशक्ति चालवून देशोन्नतीच्या धुराकर्माचा अंगीकारही ज्याच्या पद्धतीस अनुसरून आह्मांस अवश्य करणें आहे,—त्या विख्यात पुरुषाचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय पडता याची आह्मांस पूर्ण खात्री आहे. तर आतां येवढी प्रस्तावना करून व परमपूज्य श्रीमत्पितृपदीं प्रणाम करून पूर्वोक्त अवतरणाविषयीं आमचे विचार वाचकांस सादर करतों.

सदरील उताऱ्यांतील मुख्य गोष्ट 'इवा तेथें प्रयोग' ही होय. ह्मणजे मोरोपंतानें ज्या प्रसंगीं वरील आर्येत श्लेषाची योजना केली आहे तो प्रसंग श्लेषरचनेस उचित नव्हे हा त्या-वर आक्षेप होय. आतां वरील श्लेष अप्रासंगिक कां याचा जर विचार केला तर येवढेंच कारण दिसतें कीं, देवयानीचें बोलणें रोषाचें आहे; व रागाच्या वितस्तींत बहुत झाली असतां श्लेषाची स्फूर्ति कोठून होणार ! मिरवणुकीच्या वेळची थोड्याची ऐटदार चाल अशी रणां-गणावर अप्रासंगिक होईल, त्याप्रमाणेंच क्रोधाच्या, शोकाच्या वगैरे भाषणांत श्लेष तर काय पण सामान्यतः कोणताही अलंकार शोभणार नाहीं ! पण असें असतां सर्वमान्य महाकवींच्या ग्रंथांतून पाहिलें असतांही शोकाच्या, क्रोधाच्या वगैरे आवेशात केलेलीं भाषणेंही केवळ अलंकारविरहित असतात असें नाहीं. काव्याचा मुख्य हेतु मनोरंजन असल्यामुळें अलं-काराचा थोडाबहुत प्रयोग वरील प्रसंगींही केलेला आढळतो. उदाहरणार्थ पुढील श्लोक पाहा:—

> स्वप्नान्तरेऽपि खलु भामिनि पत्युरन्यं
> या दृष्टवत्यसि न कञ्चन साभिलाषम् ।
> सा संप्रति प्रचलितासि गुणैर्विहीनं
> प्राप्तुं कथं कथय हन्त परं पुमांसम् ॥ (भामिनीविलास, ३, १७. सं०)
> निर्दूषणा गुणवती रसभावपूर्णा
> सालङ्कृतिः श्रवणकोमलवर्णराजिः ।
> सा मामकीनकवितेव मनोभिरामा
> रामा कदापि हृदयान्मम नापयाति ॥[1] ( भामिनीविलास, ३, ६. सं० )

---

१ न पाही स्वप्नींही पतिविण कधीं जी नर दुजा
स्पृहायुक्तें चित्तें जितकमलनालोत्तमभुजा ।
सुशीला तूं ऐशी पर पुरुष जो निर्गुण तया
कशी पाहूं जाशी हरिणनयने सत्वरतया ॥
गुणांनीं जी पूर्णा अणुसम नसे दोषहि जिला
अलंकारीं साजे रस वसतसे जींत पाहिला ।
मृदू जीचे वर्ण श्रवणसुख देती परिसतां
वसे ती पद्माक्षी मम हृदयिं जैंवी सुकविता ॥
—'पद्यरत्नावली'.

वरील पद्यें जगन्नाथकृत 'भामिनीविलासा'च्या 'करुण' नामक तृतीय विलासांतलि आहेत. पहिल्या पद्यांत 'गुण', आणि 'पर पुमान्' हे शब्द श्लिष्ट आहेत; व दुसऱ्याचा तर सगळाच अर्थ श्लेषमय आहे.

तेव्हां वादविषयक आर्येंत श्लेषाच्या प्रयोगाबद्दल जर आमच्या कवीवर दूषण आलेंच तर तें वरील महारसिकावर व महाकवीवरही तितक्याच मानानें येणार आहे !

शिवाय हेंही लक्षांत आणलें पाहिजे कीं, निर्भर्त्सनेच्या भाषणांत नामाच्या यथार्थत्वाविषयींचा किंवा अयथार्थत्वाविषयींचा उल्लेख येणें हें अगदीं साहाजिक आहे. कोणी गोरा मनुष्य असतां त्यास उद्देशून रागानें बोलतांना 'तूं बाहेर जितका गोरा आहेस तितका आंतून काळा आहेस,' किंवा तो वर्णानें काळा असल्यास 'तूं आंत बाहेर सारखाच काळा आहेस' अशी बोलण्याची प्रवृत्ति लोकव्यवहारांतसुद्धां आढळते. मग काव्यांत तर हा प्रकार आढळेलच आढळेल. 'गीतगोविंदां'त विप्रलब्धा नायिका नायकास रोषपूर्वक ह्मणते:—

बहिरिव मलिनतरं तव कृष्ण मनोऽपि भविष्यति नूनम् ।
कथमथ वञ्चयसे जनमनुगतमसम–शर–ज्वर–दूनम् ॥(हरिहारे याहि०॥सर्ग८,६सं०)

"हे कृष्णा ! तूं बाहेरून जसा अत्यंत मलिन (काळा) आहेस त्याप्रमाणेंच तुझें मनही आहे असें वाटतें; एरवीं मदनसंतापानें पीडलेल्या अशा स्वानुरक्त जनाचें वंचन तुझ्या हातून कसें होईल ?"

कृष्णास व बलरामास धनुर्यागप्रेक्षणार्थ बोलवायास कंसाकडून अक्रूर आला असतां गोपी भग्नमनोरथ होत्साल्या अक्रूरास शिव्या देतात:—

"यमदूतशतक्रूर स्वमुखें 'अक्रूर' ह्मणवितो मेला; ।
आला गांव वधाया, परि बाई हो ! न लेश कोमेला. ॥"
(मंत्रभागवत, दशमस्कंध, ४९५. सं०)

तेव्हां वरील प्रमाणांवरून पाहतां वादविषयक आर्येंतील श्लेषावर अप्रासंगिकत्वाचा जो दोषारोप केला आहे तो दूर होईल असें वाटतें.

वरच्यांखेरीज इतर जीं दूषणें प्रस्तुत कवीवर वरील लेखांत सामान्यत: दिलेलीं आहेत त्यांविषयीं यापूर्वी विचार झालेलाच आहे. श्लेषाचा प्रयोग आमच्या कवीस कितीसा प्रिय होता व तो त्याच्या कवितेंत कितीसा आढळतो, तसेंच जीं थोडींबहुत अशीं स्थलें आहेत त्यांस श्लेषरचनेच्या योगानें दुर्बोधत्व कितीसें आलें आहे, याविषयीं येथें कांहीं निराळें लिहिणें नकोच. वरील सर्व गोष्टींचा विचार झाला असतां प्रस्तुत महाराष्ट्रकवीची 'साधारण कवि' या पदांनीं जी अवगणना केली आहे तीही सहजच निराधार होणार आहे.[१]

---

१. आमच्या वडिलांचा प्रस्तुत महाराष्ट्रकवीवर शेवटपर्यंत मोठा कटाक्ष असे. सुमारें पंधरा वर्षांपूर्वी आह्मी शाळेंतील पाठाच्या आर्या त्यांजपाशीं वाचीत होतों, तेव्हांपासून तों परवां 'नवनीता'च्या नवीन आवृत्तीच्या वेळीं कांहीं मंडळी त्यांजकडे कांहीं दुर्बोध आर्या घेऊन आली होती तोंपर्यंत त्यांचा रोख प्रस्तुत कवीवर सारखा होता. इतर विषयांवर त्यांच्या मतांची चलविचल झालेली

[पुढें चालू.]

# उत्तरें.

हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा ॥[1]

—'रघुवंश', (१.१० 'सं०') कालिदास.

अंक ६२.—(१)चालू अंकाचा विषय. (२) रा. ओक यांच्या पत्रास उत्तर. (३) रा. कानेटकर यांच्या आक्षेपांचें परीक्षण.

१. या अंकांत दोन पत्रांचीं उत्तरें घालावयाचीं आहेत. एक पत्र गेल्या अंकांत बहुतेक आलेंच आहे, त्याचा राहिलेला भाग या अंकांत येईल. याखेरीज दुसरेंही एक महत्त्वाचें पत्र आह्मांकडे आलें आहे. तेंही या अंकांत दाखल होऊन त्याचें उत्तरही यथानुक्रम याच अंकांत दृष्टीस पडेल.

दोनही पत्रांतील विषय चालू विषय जो 'मोरोपंताची कविता' त्याच्याच संबंधाचा आहे, यास्तव या अंकांत त्याचाच समावेश केला आहे. कोणत्याही विषयाची पूर्णपणें चर्चा झाली असतां तो चांगला व्यक्त होतो व त्याची पुरती शहानिशा होते हें उघडच आहे; यास्तव वरील पत्रें व त्यांचीं उत्तरें हीं प्रस्तुत विवेचनाचींच अंगें समजून त्यांकडे वाचक चांगलें लक्ष देतील अशी आह्मांस उमेद आहे.

तर आतां यथानुक्रम वरील दोन पत्रांचा विचार करूं.

२. पहिलें पत्र नागपुरकर ओक यांचें आहे. या पत्रकाराचा आमच्याशीं पूर्वी एक दोन वेळां वादप्रसंग* झालेला आहे. रा. ओक हे मोठे शोधक व उद्योगी आहेत; आमच्या पुस्तकांत त्यांचीं एरवींही कांहीं पत्रें आलेलीं आहेत. आमच्या पुस्तकांत जो जो मजकूर प्रसिद्ध होत जातो त्यावर प्रस्तुत पत्रकारासारख्यांची निरंतर चर्चा होत असावी अशी आमची पहिल्या अंकापासून इच्छा आहे हें वाचकांस माहीत आहेच, व कोणत्याही प्रतिपक्ष्यास आह्मी आजपर्यंत विमुख झालों नाहीं हेंही वरील मंडळीस सांगायास नकोच. तर सध्यां चालू असणाऱ्या विषयावर आजपर्यंत जें चोहोंकडे सामसूम होतें तो प्रकार मोडून या खेपेस दोन प्रतिपक्ष्यांस उत्तरें देण्याचा प्रसंग आला आहे या गोष्टीचा आह्मांस मोठा

आमच्या लक्षांत आहे; पण प्रकृत विषयावर मात्र त्यांचा अभिप्राय जो एकदां ठाम बनून गेला होता तो होता! जुन्या व नव्या पंडितांचें बिचाऱ्या मयूरकवींविषयींचें अप्रेम त्यांच्या ठायीं एकवटलेलें होतें. मोरोपंत मुळीं कविच नव्हे, तर पुराणांतील अर्थ घेऊन तो शुद्ध प्राकृत भाषेंत त्यानें आर्यारूपानें ग्रथित केला येवढीच काय ती त्याची करामत, हें त्यांचें ठरीव मत होतें. महाराष्ट्रकवींत 'कवि' ही संज्ञा एका मुक्तेश्वराला मात्र बरोबर रीतीनें लागेल असें ते नेहेमी ह्मणत असत. सन १८६६ सालच्या ट्रेनिंग् कॉलेजांतील परीक्षेंत पुढील प्रश्न आढळतोः—

"(३ प्र०)—मुक्तेश्वर व मोरोपंत या दोघांनींही शकुंतलाख्यान लिहिलें आहे, त्यांत तुह्मांस विशेष चांगलें कोणतें वाटतें तें सांगून त्याचीं कारणें लिहा."

शालापत्रक—जुलै १८६६.

१. "सोनें शुद्ध निघतें कीं काळसर पडतें याची परीक्षा अग्नीवरून तेव्हांच होते!"

* ५० व्या अंकांत १४ डिसेंबर १८७८ चें ओकांचें पत्र आलें होतें. परंतु तें या आवृत्तींत दाखल करण्यांत आलेलें नाहीं. 'सम्पादक'

संतोष वाटतो. त्यांतून आमच्या नागपुरकर मित्राच्या कृशानुसदृश$ आक्षेपांचें निरसन करणें तर विशेषच उत्साहप्रद होय!

रा. ओक यांचे आक्षेप आमच्या दोन लेखांच्या संबंधानें आहेत. ते लेख येणेंप्रमाणें:-

(अंक ५७)-" मोरोपंताची कविता वाचतांना सकृद्दर्शनींही कळून येणारा तिचा एक मोठा विशेष ह्मटला ह्मणजे लांबलांब यमकें हा होय. हा यमकांचा प्रकार प्रथमत: वामनानें सुरू केला. त्याच्या पूर्वी महाराष्ट्रकविता ही केवळ ओवी व अभंग या छंदांतच असल्यामुळें यमकांच्या रचनेस अर्थातच अवकाश नव्हता; आणि त्यांतून वरील कवींपैकीं कोणी पंडित नसल्यामुळें वरील साध्या छंदांतही यमकरचना करण्याचा कोणीं यत्न केलेला दृष्टीस पडत नाहीं. पण पुढें वामनानें जेव्हां गणवृत्तें महाराष्ट्रकवितेंत आणलीं, तेव्हां तीं यमकरचनेस विशेष अनुकूल असल्यामुळें तो यत्न त्यानें केला." (पृष्ठें८७३-८७४ पाहा.'सं०')

(अंक ४७)—" अगदीं अव्वलपासून तों अखेरपर्यंत कोणत्याही मराठी कवीस 'रघुकिराता'दि पंडितमान्य काव्यांची बिलकुल ओळख होतीशी सुद्धां दिसत नाहीं. नामदेव, तुकाराम यांची गोष्ट तर बोलायालाच नको. पण पंडितमंडळींत बरेच मोडण्यासारखे जे वामन, मोरोपंत, रामजोशी वगैरे त्यांच्या ग्रंथांतही कालिदासादिकांचा मागमूसही नजरेस येत नाहीं. संस्कृत कवितेच्या धर्तीवर जुनें मराठी काव्य ह्मटलें ह्मणजे रघुनाथ पंडिताचें 'नलोपाख्यान'च एक होय. त्याची रचना श्रीहर्षाच्या 'नैषधा'च्या नमुन्यावर केली आहे असें कवीनेंच सरतेशेवटीं सांगितलें आहे. पण याखेरीज बाकीच्या कोणत्याही महाराष्ट्रकाव्यांत जुन्या संस्कृत कवींची पद्धति कोणत्याही संबंधानें बिलकुल दृष्टीस पडत नाहीं." (पृष्ठें ८२६-८२७ पाहा.'सं०')

आतां या दोन लेखांत आलेल्या कित्येक गोष्टींवर आमच्या प्रतिपक्ष्यानें जे जे आक्षेप काढले आहेत त्यांवर आमचें काय काय ह्मणणें आहे तें वाचकांस सादर करतों.

रा. ओक यांचा पहिला आक्षेप असा आहे कीं, 'हा यमकांचा प्रकार प्रथमत: वामनानें सुरू केला' हें ह्मणणें बरोबर नाहीं. ¶कां कीं, रामदास, मुक्तेश्वर, आणि विठ्ठल वगैरे कवींच्या ग्रंथांतून वरील प्रकार आढळण्यांत येतो, व हे कवि वामनाच्याच वेळेस

---

$ कृशानु-सदृश—वेंकटाध्वरीच्या विश्वगुणादर्शचम्पूंत वस्तुमात्रांतील गुणांकडे कानाडोळा करून दोषैकदृष्टीनें त्यांतील उणिवाच शोधून काढणारा कृशानु व नंतर त्या दोषांचा परिहार करून दाखविणारा गुणग्राही विश्वावसु असे दोघे गंधर्व दाखविले आहेत, त्यांसंबंधीं हा उल्लेख आहे. ह्मणून कृशानुसदृश=कृशानूसारखे=दोषच तेवढे शोधून काढण्याच्या प्रवृत्तीचे असा अर्थ करावा. 'सम्पादक'

¶ ओकांचें यासंबंधीं आणखी ह्मणणें असें कीं "गणवृत्तें महाराष्ट्रकवितेंत वामनानें आणिलीं असें विधान निर्विवादपणें करितां येत नाहीं. कारण तीं तत्समकालीन जे रामदास, मुक्तेश्वर व विठ्ठल यांच्या ग्रंथांत अनुक्रमानें अधिकाधिक आढळतात असें ह्मणणें भाग पडतें. वामनाच्या व रामदासाच्या ग्रंथांविषयीं शक मिळाला असतां प्रस्तुत वादाचा निकाल सफाईनें होणार आहे. परंतु तसा ग्रंथांचा शक मिळण्याची संभावना फारशी दिसत नाहीं. श्रीधरानें आपले ग्रंथ केव्हां समाप्त केले याचा शक प्रत्येक ग्रंथाच्या शेवटीं जसा दिला तसा वामनानें दिला असता तर प्रस्तुत वादाचा निकाल करण्यास उत्तम साधन झालें असतें. अस्तु............वामनानें गणवृत्तें महाराष्ट्रकवितेंत आणिलीं हें निर्विवाद आहे असें मला वाटत नाहीं." 'सम्पादक'

होते; मग वामनानेंच वरील प्रकार सुरू केला हें कशावरून ! या आक्षेपावर आमचें उत्तर येवढेंच आहे कीं, आमच्या आक्षेपकानें वरील वाक्यावर येवढें पांडित्य करण्यापूर्वी जर त्याचा पूर्वापर संबंध पाहिला असता तर बरें झालें असतें. हा 'प्रकार' ह्मणजे केवळ यमकरचना असा अर्थ नव्हे, तर लांब लांब यमकें जुळण्याचा प्रघात असा अर्थ होय. नुसता यमकाचाच प्रकार पाहिला तर रामदास, मुक्तेश्वर हेच कवि कशाला पाहिजेत, तो प्रकार अगदीं आदिकवि मुकुंदराज किंवा ज्ञानेश्वर यांच्यापासूनही महाराष्ट्र-कवितेंत चालू झाला आहे. इंग्रजींत जशी यमकरहित छंदोरचना ( blank verse ) आढळते, व संस्कृतांत तर तिचाच प्रचार दृष्टीस पडतो, तसें मराठींत एका ठिकाणीं खेरीज करून कोठेंही आढळत नाहीं, हें बहुधां कोणासही सांगायास नको.[1] मग यमकाचा महाराष्ट्र-कवितेंत येवढा सर्वतो-मुख प्रचार असतां आमच्या बिचाऱ्या शूद्रकवीला¶ व बीडवासी$ चित्रकूटकार कवीला येवढी तसदी देण्याची पंचाईत आमच्या नागपुरकर मित्रानें कशाला केली हें आह्मांस समजत नाहीं. अगदीं 'विवेकसिंधु'पासून व 'ज्ञानेश्वरी'पासून तों थेट 'ब्राह्मणांच्या कसबा'पर्यंत व 'एका साहेबानें केलेल्या कविते'पर्यंत ज्या यमकाची जबरदस्त व्याप्ति पसरून राहिली आहे त्याला हुडकून काढण्यास रा. ओक हे विठ्ठलकवीकडे कशाला घुसले कोण जाणे ! असो; तर वामनपंडिताला जो आह्मीं मान दिला तो नुसत्या यमकरचनेच्या संबंधानें नव्हे, तर पांच पांच सहा सहा अक्षरांचीं यमकें कवितेंत घालण्याची पद्धति त्याच्या काव्यांत प्रथमत: दृष्टीस पडूं लागली याबद्दल तो होय.

आतां वामनपंडित अगोदर श्लोकरचना करूं लागला, कीं रामदास, विठ्ठल वगैरे मंडळीनें प्रथमत: अक्षरगणवृत्तें उचललीं, या विषयावर जें आमच्या आक्षेपकानें येवढें विवेचन केलें आहे, त्याचा प्रस्तुत प्रकरणास फारसा उपयोग आहे असें आह्मांस वाटत नाहीं. मुक्तेश्वर, विठ्ठल वगैरे कवींचें कवित्व सामान्यत: पाहतां कोणत्याही योग्यतेचें असलें, तरी श्लोकरचनेच्या कामांत त्यांस वामनाची सर येणार नाहीं हें कोणीही सांगेल. फार लांब जावयाला नको. प्रस्तुत पत्रकारानेंच विठ्ठलाच्या ग्रंथांतले जे थोडेसे उतारे* दाखल केले आहेत

---

१. संस्कृतांत सर्वत्र यमकरहित छंदोरचनेचाच प्रकार दृष्टीस पडतो. 'घटकर्परा'दि काहीं थोड्या काव्यांत मात्र मुद्दाम यमकरचना केलेली आढळते, मराठींत बरोबर उलट प्रकार असून मोरोपंतकृत 'गीतार्थां'त मात्र यमकांचा अभाव आढळतो.

'सम्पादक'

¶ तुकाराम. $ विठ्ठल.

* सदर उतारे हे:—

या ग्रन्थीं प्रतिपाद्य सत्कविकृती छंदादि नानाविधें ।
सीतासदृश देवता भगवती ज्या सर्वदां सन्निधें ॥
गंबीजादि-सशक्ति-कीलक धरापुत्री प्रयोगान्तरें ।
जाणावाचि नियोग विठ्ठल ह्मणे पर्वे जपा आदरें ॥

—सीतास्वयंवर, १.६.

श्रोतेहो जितुकें चरित्र तितुकें मी काय वर्णू शकें ? ।
सर्पारीस निकें सुधारस पिकें नेणे जसें मातुकें ॥

( पुढें चालू. )

त्यांवरून पाहतांही रचनेच्या संबंधानें दोघां कवींत किती अंतर आहे, तें सहज दिसून येईल. तेव्हां असें जरी कबूल केलें कीं, वामनाची कविता वरील साऱ्या कवींच्या मागून प्रगट झाली, तरी दीर्घ यमकांचा प्रकार त्याच्या ग्रंथांवरून प्रवृत्त झाला असें ह्मणण्यास सेंठीशी हरकत दिसत नाहीं. शिवाय नवीन पद्धतीची प्रवृत्ति पडणें ही गोष्ट प्रवर्तकाच्या प्रसिद्धीवर अवलंबून असते हेंही कोणास सांगायास पाहिजे असें नाहीं. मग वामनाच्या श्लोकांच्या इतकीच विठ्ठलकवीच्या दोन 'स्वयंवरां'ची किंवा मुक्तेश्वराच्या 'कौतूहल नाटक रामायणा'ची आजपर्यंत प्रसिद्धि असेल किंवा हल्लीं आहे असें आमच्या आक्षेपकांच्यानें ह्मणवेल काय ? आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस तर वरील दोघां कवींच्या गणवृत्तात्मक ग्रंथांची नुकतीच माहिती झाली असेल असें ह्मणण्यास हरकत नाहीं. रा. ओक यांचा तरी वरील ग्रंथांशीं कितीसा जुना परिचय असेल कोण जाणे !

---

तैसें म्यां इतुकें कवित्व यमकें आरंभिलें कौतुकें ।
सालंकार तुकें विचित्र गमकें वाचा मनोरंजकें ॥

रुक्मिणीस्वयंवर.

छंदबंध यमकें अनुपम्यें । वाक्यरीति वचनें ननु रम्यें ॥
दोष टाकुनि तुह्मी गुण घ्यावा । विठ्ठलासि अभयंकर द्यावा ॥—कित्ता.
प्रणमित जगदंबे कल्पवल्ली कदंबे । कवि तुज न विसंबे प्रेम पोटीं झळंबे ॥
मजवरि जरि अंबे त्वत्कृपादृष्टि तिंबे । तरि रस अविलंबें काव्यसाहित्य बिंबे ॥
बाळा सोळा कळांची छवि नवि रविची तेवि दावी सवीची ।
माला ज्याला नलाची गुणिफणिमणिची हारि भारी मरीची ॥
झुंकारे कामुकाची घटिकटितटिची ख्याति गाती सतीची ।
हंसाची साक्ष साची गति रतिपतिची कांतिमा तीव्र तींची ॥
मराष्ट्रे होस्साते चतुर जनिं हे मान्य करिती ।
मनाच्या उल्हासें रचिन तरि मी नाटक रिती ॥
टिका मूळाधारें प्रथम धरिली संस्कृत कथा ।
सभेमध्यें श्रोते परिसतु महाराष्ट्र उलथा ॥
येशींसहस्र वनिता मज रावणाशी । तूं होय त्या मुखरणी मणिभूषणासी ॥
मंदोदरीप्रमुख होतिल सर्व दासी । तूं वंद्य जेंवि कनक प्रिय पारदासी ॥
ह्मणे काय मंदोदरी रावणातें । तुह्मी विघ्न हें आणिलें आपणातें ॥
इला ये स्थलीं सर्वथा ने ठवावें । पवित्रा स्थळा आणखी पाठवावें ॥
कदाचिद्गोपाळा ह्मणसिल महाधीट नवरी ।
न नेता पाचारी किमपि शिशुपाळासि नवरी ॥ 'सम्पादक'

१. या यमकप्रकरणीं दादोबांचा लेख येणेंप्रमाणें आहे:—

"त्यांत आणखी रसान्वित यमकें साधण्याची तर इतोटी या कवीप्रमाणें कोणत्याहि इतर महाराष्ट्र-कवीची आढळत नाहीं. अशीं रसान्वित यमकें साधूनहि इतका विपुल ग्रंथ रचणारा महाराष्ट्र-भाषेंत हा एकच कवि. मला वाटतें अशीं यमकें साधण्याचा कित्ता मोरोपंतानें वामनपंडिताकडून घेतला असावा." ( यशोदा पांडुरंगी-प्रस्तावना.—[पृष्ठ १७ ] सं० )

रा. ओक आह्मांस सांगतात कीं, "कोणत्याही छंदांत यमकरचना साधणें हें त्या छंदावर फारसें नाहीं, तर कवीच्या चातुर्यावर ही गोष्ट अवलंबून असते. चांगला कल्पक कवि असला तर तो हव्या त्या छंदांत यमकांची रेलचेल उडवून देईल." आमच्या आक्षेपकानें आमचा मूळचा लेख जर अधिक लक्षपूर्वक वाचला असता तर वरील महातत्त्व प्रगट करण्याचें व त्यावर येवढा विस्तार* करण्याचें त्यास प्रयोजन दिसलें नसतें. यमकाला काय,

* वा. दा. ओक ह्मणतात:—'महाराष्ट्रकविता ओंवी व अभंग या छंदांत असल्यामुळे यमकाच्या रचनेस अर्थातच अवकाश नव्हता' असा आपला उल्लेख आरंभींच्या घेतलेल्या वाक्यांत आहे. हा अभिप्राय तरी आपण शोधपूर्वक पर्यालोचन करून नमूद केला असावा असें ह्मणवत नाहीं. आपलें ह्मणणें सर्वस्वीं अयथार्थ आहे असें ह्मणण्याचें साहस जरी माझ्यानें करवत नाहीं, तरी त्यांत अयथार्थत्वाचा अंश बराच आहे असें ह्मणतों. जें धडधडीत दिसत आहे तें तसेंच आहे असें निर्भीडपणें व कोणाची मुरवत न धरतां सांगितलें पाहिजे. असें न करणें मात्र अहितावह होय. आपल्या वाक्यांशावरून असा अर्थ निष्पन्न होतो कीं, 'ओंवी' व 'अभंग' हे छंद यमकात्मक शब्दरचनेस निसर्गतः प्रतिकूल होत. 'यमकाच्या रचनेस अर्थातच अवकाश नव्हता' या ह्मणण्याचा मतलब असा दिसतो कीं, 'ओंवी' व 'अभंग' या छंदांत यमकें आणितां येत नाहींत. याशिवाय वाक्याच्या ओघाकडे पाहिलें असतांही अन्य अर्थाची संभावना होत नाहीं. आतां ह्या आपल्या अभिप्रायावर एक आक्षेप आहे तो असा. कोणत्याही छंदांत यमकरचना साधणें हें त्या छंदावर फारसें नाहीं, तर कवीच्या चातुर्यावर ही गोष्ट अवलंबून असते. चांगला कल्पक कवि असला तर तो हव्या त्या छंदांत यमकांची रेलचेल उडवून देईल. ते छंद त्याला अंतरायरूप होतील असें नाहीं. कित्येक छंद जसे शोक, करुणा, शृंगार इ० रसांना अनुकूल आणि पोषक आहेत त्याप्रमाणें कांहीं छंद यमकांना पोषक आहेत असें नाहीं. पंतांनीं 'सीतागीत' आणि 'रुक्मिणीहरणगीत' हीं दोन चिमुकलीं काव्यें अभंगवृत्तात्मक केलीं आहेत. यांस कोणी ओंवीबद्ध असेंही ह्मणतात. यांत पंतांनीं यमकरचना साधली आहे. सदहू दोन काव्यांतील मासल्याकरितां कांहीं ओंव्या दाखल करितों:—

'तो ह्मणे आणीला आला वासुदेव। हा लावा सुदेव वाटे शीघ्र ॥
विप्रहस्तीं देती हात पुण्यश्लोक। सात पुण्यश्लोक वाचितांची ॥
विस्तार तूं पूसों नको टिके सरी। न कोटिकेसरी बळ याच्या ॥
घेकिली न नत घातलीला जुनी। घातली लाजुनी पायीं मिठी ॥
भावाची सांगों मी काय काय शोभा। नायकाय शोभा यदू ज्याची ॥'

'रुक्मिणीहरणगीत'

' भावोजींनीं सर्व वृत्त कळविलें। मुख मळविलें अश्रुपातें ॥
शिबिकेंत मज घालोनी आणिलें। देह ज्यां न्हाणीलें अग्निकुंडीं ॥
श्रीराम दयेचा मेघ त्यासमोर। प्रेमें दास मोर नाचताती ॥'

'सीतागीत'

या वरील उताऱ्यांवरून ओंवी व अभंग या छंदांत यमकरचनेस केवढा अवकाश असतो हें दिसून येणार आहे. प्रख्यात शूद्रकवीनें आपल्या दोन चरणी अभंगांत कित्येक ठिकाणीं यमकें साधलीं आहेत असेंही दाखवितां येईल. आतां हें खरें कीं त्या कवीचा कटाक्ष पदलालित्यादि शब्दचमत्कारांवर तादृश नसल्यामुळें व त्याचें विद्वत्त्व आणि पांडित्य हीं बेतावाताचीं असल्यामुळें त्याच्या अभंगांत पूर्वोक्तगुणविशिष्ट अशीं फारशीं उदाहरणें आढळणार नाहींत.

(पुढें चालू.)

तें एकाक्षरी वृत्तांतही येणार नाहीं काय? पण ज्या अर्थी त्याची योजना शोभेकरतां आहे, त्या अर्थी तें कोणत्या ठिकाणीं विशेष शोभेल याचा कांहीं विचार नको काय? मोठमोठाल्या वृत्तांत जसें पांच सहा अक्षरांचें यमक शोभेल तसें तें लहानशा छंदांत शोभणार नाहीं हें उघड आहे. सात आठ अक्षरांचा छंद, आणि त्यांत पांच सहा अक्षरांवर यमक, हा प्रकार झटला ह्मणजे मध्यें वीतभर काय ती जमीन आणि दोहोंकडे हातहातभर रेशमी कांठ अशा बाजीरावी धोतरजोड्याप्रमाणें किंवा 'मिया मूठभर आणि दाढी हातभर' यासारखाच होय, तर ओंवी व अभंग हे छंद यमकरचनेस विशेष अनुकूल नसल्याविषयीं जें आह्मी लिहिलें आहे त्याचें वरील कारण होय; व त्यामुळेंच वामनास गणवृत्तांचा प्रयोग करतांना दीर्घ यमकांची योजना करण्यास अवकाश सांपडून यमकरचनेच्या विशेषास्तव त्याची महाराष्ट्र-कवींत प्रसिद्धि झाली असावी हें थोडासा विचार केला असतां कोणाच्याही लक्षांत येणारें आहे.

मोरोपंतानें वामनाविषयीं जें ह्मटलें आहे, कीं त्यानें महाराष्ट्र-कवींची आपल्या यमकांनीं गर्वहानि केली, त्यावर आमच्या पत्रकारानें जें तर्कशास्त्र * लढवलें आहे तें

"व्रत नेम तप ध्यान योग कळा। करुनी मोकळा झालासी तूं॥
अवघे होती लाभ एका या चिंतेनें। नामसंकीर्तनें गोविंदाच्या॥
दया तीचें नांव भूतांचें पाळण। आणिक निर्दळण कंटकाचें॥
रूप नाहीं देखा जयासी आकार। आह्मीं तो साकार भलीं केला॥
तुका ह्मणे देहें दिला एकसरें। जयास दुसरें नाहीं मग॥
बहुतां दिवसांचें राहिलें मातुकें। नाहीं कवाडकें कुरवाळिलें॥"

या उताऱ्यावरून 'अभंग व ओंवी' हे छंद निसर्गतः यमकरचनेस प्रतिकूल आहेत ह्मा ह्मणण्याचें अयथार्थत्व दिसून येणार आहे. शब्दचमत्कार व रचनाचातुर्य ज्याच्या अंगीं विशेष असेल तो यमकादि शब्दालंकार कोणत्याही छंदांत साधील. त्यास छंद प्रतिबंधक होतील असें नाहीं. 'सं०'

* ओक ह्मणतातः—"मोरोपंतांनीं 'वामनपंडितस्तुतीं'त ह्मटलें आहेः—

केली श्रीगीतेची व्याख्या बहुभक्ति जोत गाजविली॥
साजविली साधुसभा भाषा-कवि-कवनशक्ति लाजविली॥५॥
अन्यत्र नसे कवनीं यावे रस सर्व हा नियम कांहीं॥
केली भाषाकवि जे त्यांची तीं गर्वहानि यमकांहीं॥९॥

वरील आर्यांत पंत असें दर्शवितात कीं, वामनपंडितानें "भाषाकविकवनशक्ति लाजविली" व त्यांची ह्मणजे कवींची 'गर्वहानि यमकांहीं केली.' येथें काव्यरचनाशक्ति व यमकात्मक सुंदर पद-रचनाचातुर्य हे दोन गुण वामनाच्या अंगीं होते असें पूर्वोक्त अवतरणांकित पदांनीं सुचविलें आहे; ह्मणजे ह्मणण्याचें तात्पर्य असें कीं वामन याची प्रतिभा उज्ज्वलित आणि यमकरचनाचातुर्यांत तो हातखंडा होता असें स्पष्ट होतें. आतां 'लाजविली' आणि 'यमकांहीं गर्वहानि केली' या पदांवरून असा ध्वनितार्थ निघतो कीं वामनाच्या पूर्वी किंवा तत्समान कालीं कांहीं कविजन होऊन गेले व त्यांनीं आपल्या काव्यांत यमकरचना साधण्याचा यत्न केला होता व ते आपल्या यमकरचनाचातुर्या-विषयीं मोठी घमंड बाळगीत होते परंतु वामनासारखा ज्या वेळेस कवि-तारा-पति कीर्ति-नभो-मंडळांत तळपूं लागला त्या वेळेस इतर कवि-ताऱ्यांचें तेज हीन झालें व वामनानें त्यांस अर्थांतच

(पुढें चालू.)

पाहून आह्मांस अचंबा वाटतो. बिचाऱ्या पंताच्या मनांतही येवढा खोल अर्थ वरील आर्या लिहितांना आला असेल, किंवा असा अर्थ काढणारा पुढें आपणास कोणी भेटेल अशी कल्पनाही त्याच्या मनांत आली असेल, असें आह्मांस वाटत नाहीं. आह्मांस तर वादविषयक आर्यार्द्धांचा येवढाच अर्थ भासतो कीं, त्यांत आमच्या कवीनें आपल्या वडील बंधूची त्याच्या काव्यांत आढळणारा जो विशेष त्याच्या संबंधानें प्रशंसा केली आहे. हा विशेष मोरोपंतास स्वत: अत्यंत संमत असल्यामुळें, व तो वामनाच्या काव्यावरूनच त्यानें प्राय: उचलला असल्यामुळें, आपल्या गुरूचें ऋणच त्यानें जणूं काय वरील प्रशंसेच्या रूपानें फेडलें असें मानण्यास हरकत नाहीं. कोणा एकाद्याच्या ठायीं एकादा गुणविशेष असून त्यावरून जर त्याच्या श्रेष्ठत्वाचें वर्णन केलें, तर तो गुणविशेष तद्व्यतिरिक्त इतरांचे ठायीं अवश्य मानायासच पाहिजे असें आह्मांस वाटत नाहीं.

याप्रमाणें यमकांच्या प्रवृत्तीच्या संबंधानें आह्मीं वामनास का प्रथम स्थान दिलें याविषयीं विचार झाला. आतां गणवृत्तांच्या संबंधानेंही वरील कवीस आह्मी तोच मान दिला आहे, तर याविषयींही आमचा अभिप्राय कळवणें अवश्य आहे.

गणवृत्तें हीं प्रथमत: वामनानें महाराष्ट्र-कवितेंत आणलीं व त्याच्या पूर्वी प्रस्तुत कविता ही अभंग व ओंवी या छंदांतच § होती असा आमचा उल्लेख आहे. यावर रा. ओक

---

खालीं पाहावयास लाविलें असा अर्थ न घ्यावा तर लाजविलें कोणास? आणि गर्वहानि केली कोणाची? असे प्रश्न साहजिक उद्भवतात. त्यांचें उत्तर वामनाच्या पूर्वी अथवा तत्समान काळीं जे कविजन होऊन गेले त्यांस लाजविलें व त्यांचा गर्व हरण केला असेंच असणें जरूर दिसतें. एरवीं पूर्वोक्त पदांची सार्थकता होत नसून वैयर्थ्य मानणें भाग पडतें. आतां असा अर्थ न केला तर आपल्या कवीवर अस्थानस्तुतिपाठकत्वाचा अभियोग करण्याची पाळी येते, असें मला वाटतें. दुसरा असाही अर्थ करतां येईल:—पंतांच्या पूर्वी जे कवि झाले त्यांस लाजविलें व त्यांचा गर्वपरिहार केला. असा जरी अर्थ केला तरी वामनाच्या नंतर व पंतांच्या आधीं ह्या मध्यंतरीच काळांत कोणी थोर कवि झाल्याचें दिसत नाहीं. व जे कोणी झाले त्यांचा यमकाविषयीं बाणा असल्याची प्रसिद्धिही नाहीं. एतावता पूर्वीचाच अर्थ बरा दिसतो. त्यावरून वामनाच्या पूर्वी व वेळीं यमककार कवि होते इतकें निष्पन्न होतें. वरील प्रतिपादनावरून वामनानें हा यमकाचा प्रकार प्रथमत: सुरू केला हें लिहिणें प्रमादमूलक होय असें ह्मटलें असतां गैरवाजवी होणार नाहीं." 'सम्पादक'

§ यासंबंधीं ओकांचें ह्मणणें असें:—

"हें आपलें ह्मणणें पुष्कळ अंशीं ग्राह्य करवत नाहीं. तुह्मी आपला अभिप्राय स्पष्टपणें प्रदर्शित करून त्याच्या पुष्टीकरणार्थ 'केवळ' या शब्दाचा उपयोग केला असावा; ह्मणजे अवांतर छंद वर्ज करून वामनाच्या पूर्वी मराठी कविता ही ओंवी व अभंग याच छंदांत निरपवादपणें आढळते, इतर छंद तिला प्रतिबद्धप्रवेश होत, असें स्वरूप तुमच्या अभिप्रायास येतें. हा आपला अभिप्राय यद्यपि साहसमूलक व चित्तभ्रमसूचक आहे असें जरी मी ह्मणत नाहीं, तरी तो शोधकबुद्धीनें लिहिलेला असावा असेंही माझ्यानें ह्मणवत नाहीं. त्याजवर अनिर्धार्यत्वरूप आक्षेपाची धाड येऊन पडते. हें अनिर्धार्यत्व महाराष्ट्रकवींच्या जन्ममरणाच्या शकांची बरोबर विल्हेवाट झाली नसल्यामुळें उत्पन्न होतें. वामन केव्हां जन्मला हें ठरविण्यास आधारभूत लेख नसल्यामुळें तुमच्या ह्मणण्यावर

(पुढें चालू.)

यांचे आक्षेप येणेंप्रमाणें आहेत. जोंपर्यंत वामनाचा जन्मकाळ समजला नाहीं तोंपर्यंत गणवृत्तांचा प्रवर्तक तोच हें ह्मणणें बरोबर नाहीं. कां कीं, रामदास, विठ्ठल व मुक्तेश्वर या तिघांनीं गणवृत्तात्मक कविता केली आहे, व हे सर्व वामनाशीं समकालीन होते; मग यांच्यापैकीं कोणीं प्रथमतः गणवृत्तांची योजना कशावरून केली नसेल? वामनानेंच ती केली यास आधार काय? दुसरें असें कीं, वामनाच्या पूर्वीं तरी गणवृत्तांचा प्रचार नव्हता यास तरी प्रमाण काय? हे दोन्ही आक्षेप एका रीतीनें पाहतां खरे आहेत. गणवृत्तात्मक रचना वामनानेंच प्रथमतः केली, किंवा त्याच्या पूर्वींही कोणीं इंद्रवज्रा, मालिनी, शिखरिणी इत्यादि छंदांत काव्यरचना केली होती, तसेंच विठ्ठल, रामदास व मुक्तेश्वर यांनीं कोणकोणत्या वेळीं ग्रंथरचना करण्यास आरंभ केला; या सर्व गोष्टींची माहिती आमच्या आक्षेपकास जशी अद्याप लागली नाहीं तशीच आह्मांसही ती अजून मिळाली नाहीं, हें आह्मांस कबूल करणें भाग आहे. वरील गोष्टींविषयीं चांगलीशी माहिती नसल्यामुळें आमच्या उल्लेखावर वस्तुतः पाहतां अनिश्चितता येणार आहे हेंही उघड आहे. पण सामान्यतः व्यवहारदृष्ट्या पाहिलें असतां आमचा उल्लेख यथार्थ मानण्यास हरकत दिसत नाहीं. ज्या अर्थीं वामनाच्या काळापूर्वींची जेवढी कविता आज प्रसिद्ध आहे तेवढी सर्व अभंग व ओंवी या दोन छंदांतच आहे, व वामनाशीं समकालीन असणारे जे विठ्ठलप्रभृति कवि त्या सर्वांत वामनाचीच श्लोकरचनेच्या संबंधानें अधिक प्रख्याति असून आजपर्यंत गणवृत्तांची जी प्रसिद्धि झाली तीही

---

अनिश्चितत्वाचा आरोप करण्यास कांहीं प्रत्यवाय दिसत नाहीं. समजा कीं, वामन हा १५५२ मध्यें जन्मला ही गोष्ट जर गृहीत केली, तर त्याच्यापूर्वीं रामदास आणि मुक्तेश्वर यांस होऊन २४।२५ वर्षें झालीं होतीं असें होतें. त्यांनीं आपल्या २४ व्या अथवा २५ व्या वर्षीं श्लोकबद्ध रचना केली असेल असाही संभव दिसतो. जोंपर्यंत रामदास व मुक्तेश्वर यांनीं अमुक काळपर्यंत श्लोकबद्ध रचना केली नाहीं असें ह्मणण्यास पुरावा मिळणार नाहीं तोंपर्यंत 'महाराष्ट्रकविता ही वामनाच्यापूर्वी केवळ ओंवी व अभंग या छंदांतच होती' हें तुह्मीं ज्याप्रमाणें प्रतिपादन करतां त्याप्रमाणेंच तुमच्या प्रतिपक्ष्यांनींही वामनाच्या पूर्वीही महाराष्ट्रकविता ही केवळ ओंवी व अभंग या छंदांत नसून गणवृत्तांतही होती असेंही प्रतिपादन केलें असतां त्यांस नांवें ठेवण्यास व त्यांनीं तुमच्या ह्मणण्यावर काढलेले आक्षेप अयुक्तिसिद्ध अथवा असमंजस असें ह्मणण्यास तुह्मांस आजकाल योग्य कारण आहे असें दिसत नाहीं. यापुढें कालगत्या नवीन शोध लागून प्रस्तुतची डळमळीतपणाची स्थिति दूर झाली तर तो वेगळा प्रकार आहे. आतां जर करितां वामनाचा जन्मकाळ आपणांस समजला असेल तर ठीकच आहे. मग वादाचें मूळच बहुतेक खुंटतें. आपण तरी निराधार लिहिण्याचें साहस करणार नाहीं अशी माझी कल्पना आहे. कारण कोणत्याही गोष्टीवर आपला अभिप्राय कधीं लेचापेचा बाहेर पडावयाचा नाहीं. तर तो नेहमीं यथान्याय, पोक्त, व साधार असावयाचा अशी आपल्या लिहिण्याची कीर्ति ऐकितों. वर प्रतिपादित पक्षाची चांगली बळकटी पाहूनच तुम्ही वरील अभिप्राय देण्यास प्रवृत्त झालां असाल. तथापि मनुष्य हा चुकीस पात्र आहे. मोठमोठ्या महापंडितांचे प्रमाद आपल्या मासेंत केव्हां केव्हां दाखवलेले असतात, तेव्हां आपल्या हातूनही नजरचुकी झाली असेल अशा बुद्धीनें व चुकी झाली असतां दुरुस्ती व्हावी या हेतूनें आपल्या लेखावर जे आक्षेप मला सुचले ते दाखल केले आहेत. माझें ह्मणणें खोटें ठरलें असतां मी तें मोठ्या संतोषानें माघारें घेईन."

'सम्पादक'

मुख्यतः त्याच्याच ग्रंथांवरून झालेली आहे, त्या अर्थी सामान्यतः पाहतां आमचा वरील उल्लेख वादास्पद होत नाहीं. पूर्वी अनेक वैयाकरण झाले असतां जर पाणिनीस व्याकरण-शास्त्रप्रणेता ह्मणतात, ग्रीनूलंड् द्वीपकल्पापर्यंत डेन्स् लोक जाऊन पोंचले असतां अमेरिका शोधून काढल्याचा मान जर कोलंबसाकडेच आहे, इकडे आर्यभट्ट व ग्रीस देशांत पायथागोरस्¶ यांस गुरुत्वाकर्षणधर्मांची माहिती असतां जर न्यूटन्‌ची वरील प्रमेयाबद्दल प्रसिद्धि आहे, तर याप्रमाणेंच जरी वामनाच्या पूर्वी गणवृत्तांचा प्रयोग करणारे कोणी असले तरी 'सुश्लोक वामनाचा' या सार्वलौकिक प्रसिद्धीस अनुसरून गणवृत्तांचे प्रवर्तकत्व वरील कवीकडे दिल्यानें मोठासा असमंजसपणाचा दोष अंगीं येतो असें आह्मांस वाटत नाहीं. आर्या व लावणी या छंदांचाही पूर्वी कोणीं प्रयोग केला असेल, किंवा नसला तरी आमचे नागपुरकर आक्षेपक ह्मणणारच कीं कोणी केला नसेल कशावरून ?—तरी असें असतां वरील छंदाची प्रवृत्ति पंतांनीं व जोशीबोवांनीं केली असें ह्मटल्यावांचून कोणी राहील काय ? एके ठिकाणीं (रघुवंश ६,२२.सं०) कालिदासानें ह्मटलें आहे:—

नक्षत्रताराग्रहसङ्कुलाऽपि ज्योतिष्मती चन्द्रमसैव रात्रिः ॥

"नक्षत्रें, तारे आणि ग्रह हे जरी आकाशांत असले तरी रात्रीस चंद्राच्या योगानेंच 'ज्योतिष्मती' (प्रकाशयुक्त) हें नांव प्राप्त होतें." तर हा न्याय रा. ओक यांनी अंमळसा ध्यानांत आणला असता तर बरें झालें असतें !

येथवर आक्षेपास्पद लेखांपैकीं एकाच्या संबंधानें विचार झाला. आतां दुसऱ्या लेखाच्या संबंधानें आमचा अभिप्राय वाचकांस कळवतों.

आमचा मूळचा अभिप्राय असा आहे कीं, अगदीं पहिल्यापासून तों शेवटपर्यंत साऱ्या महाराष्ट्रकवितेचें स्वरूप जर लक्षांत आणलें तर तें कालिदासादिकांच्या कवितेच्या स्वरूपाहून अत्यंत भिन्नतेचें आहे असें दृष्टीस पडेल. हा भिन्नभाव कोणत्या प्रकारचा आहे याविषयीं ४७ व्या अंकांत* बरेंच दिग्दर्शन केलें आहे. याच निरूपणांत आमचा असा उल्लेख आला आहे कीं, एका 'नलोपाख्याना' खेरीज कोणतेंही महाराष्ट्रभाषेंतील काव्य संस्कृत कवींच्या

¶ Pythagoras (अंदाजें खि. पू. ५८२–५००) ब्राह्मणांच्या व बुद्धांच्या पुनर्जन्म (Transmigration of souls or Metempsychosis) सिद्धांताचा आद्य पाश्चात्य पुरस्कर्ता. आपण पूर्वजन्मांत ट्रोजन् युद्ध काळीं (Panthos) पँथॉसचा पुत्र (Euphorbus) यूफोर्बस् असल्याचें तो सांगे. विद्यार्जनानंतर ज्ञानार्जनाकरतां हा इजिप्तमध्यें व इतर पौर्वात्य देशांत फिरला. अंकगणित व गायन यांकडे याचें फार लक्ष होतें. भविष्यज्ञान व ईश्वरसाक्षात्कार यांचीहि तो प्रौढी मिरवी. इटलींत (Crotona) क्रोटोना येथें एक गुप्त संस्था स्वधर्ममतप्रसारार्थ यानें काढली. तिचे ३०० सभासद होते. इतरत्रहि ग्रीसमध्यें असल्या अनेक संस्था निघाल्या. अतिमानुष पदवीस चढून परमेश्वरी कृपेस पात्र होण्याचे मार्ग तो आपल्या शिष्यांस सांगे. क्रोटोनाचे लोक क्षुब्ध होऊन त्यांनीं या संस्थेच्या गृहाला आग लावली. पायथागोरस् जळून मेला. कित्येकांच्या मतें तो तेथून निसटला पण पुढें अन्नान्न करीत Metapontum येथें वारला. हा खगोलशास्त्रज्ञ असून याचीं मतें कोपर्निकस्प्रमाणेंच होतीं. 'सम्पादक'

* पृष्ठें ८२४–८२७ पाहा. 'सम्पादक'

पद्धतीवर लिहिलेलें आढळत नाहीं; व मराठी कवींपैकीं रघुनाथपंडिताखेरीज इतरास कोणासही कालिदासादि संस्कृत कवींशीं परिचय होतासाही दिसत नाहीं. रा. ओक यांनीं दहा बारा पृष्ठांवर जें येवढें अकांडतांडव केलें आहे त्याला आधार पाहिला तर येवढाच !—कीं कालिदासादिकांच्या ग्रंथांची महाराष्ट्रकवींस बिलकुल ओळख नव्हती असें तुह्मी ह्मणतां पण हा * पाहा आह्मांस विठ्ठलकवीच्या 'सीतास्वयंवरां'त कसा दाखला मिळाला आहे तो ! विठ्ठलकवीनें 'हनूमन्नाटक' व कालिदासाचा 'रघुवंश' हीं दोन्हीं वाचलीं होतीं हें अगदीं स्पष्ट आहे ! ! आमच्या नागपुरकर आक्षेपकाच्या नेहेमीच्या वहिवाटीप्रमाणें पाहतां येथेंही आह्मी हरलों ह्मणून गपचीप बसणें भाग आहे. तरी वरच्याप्रमाणेंच पुनःएकवार आमच्या प्रतिपक्ष्यास हलवून अंमळ जागें करणें जरूर आहे. तें इतक्याच संबंधानें कीं आमचा उल्लेख त्यानें अगोदर पुरतेपणीं ध्यानांत आणायाचा होता, आणि मग पाहिजे तेवढी भरारी मारायाची होती ! महाराष्ट्रकवींपैकीं कोणींही 'रघुवंशा' दि काव्यें वाचलींच नव्हतीं असा आमचा मुळींच उल्लेख नाहीं; आमचा उल्लेख केवळ काव्यपद्धतीच्या संबंधानें आहे. संस्कृत कवितेची व महाराष्ट्रकवितेची पद्धति अगदीं भिन्न आहे, व तिजवरून पाहतां कालिदासादिकांची मराठी कवींस बिलकुल ओळख सुद्धां नव्हती असें वाटण्यासारखें आहे, येवढाच आमचा अभिप्राय आहे.[१] वामन, मोरोपंत वगैरे मंडळीचा संस्कृत कवींपैकीं कितीकांशीं व कितीसा परिचय होता हें समजणें अशक्यच आहे. पण येवढें खरें आहे कीं, त्यांच्या ग्रंथांत पाहूं जातां वरील परिचयाचें फारच थोडें प्रमाण सांपडेल. आणि यावरूनच तो परिचय जरी कांहींकांचा यथाकथंचित् असलाच, तरी तो ह्मणण्यासारखा दृढ नव्हता असें ह्मणण्यास हरकत दिसत नाहीं.

आमच्या प्रतिपक्ष्यानें 'कांहीं श्रीहनुमंतनाटककथा कांहीं रघूवंशींची' येवढ्या एका पराला धरूनच जें येवढें प्रचंड उड्डाण केलें आहे त्यापेक्षां दहा वीस वामनी श्लोक किंवा पांचपंचवीस मोरोपंती आर्या, अथवा विठ्ठलकवीचीं दहापांच 'चित्रकूटें' घेऊन त्यांशीं समानार्थक अशीं जर पंचमहाकाव्यांतील कांहीं स्थलें दाखवलीं असतीं तर आह्मीं आपला लेख संतोषानें माघारीं घेतला असता; व तेणेंकरून आमच्या 'वाचण्याची सीमा' किती आकुंचित आहे व रा० ओक यांची किती विस्तृत आहे हेंही दिसून आलें असतें. पण हें ज्या अर्थी त्यांनीं केलें नाहीं त्या अर्थी आमचा मुद्दा पाहिला आहे तसाच आहे असें ह्मणणें भाग

* सदर दाखला म्हणजे तिसऱ्या सर्गांतील खालील श्लोक होय:—

"कांहीं श्रीहनुमंतनाटककथा कांहीं रघूवंशिंची ।
कांहीं आदिकविप्रमेयरचना कांहीं गिरा देशिंची ॥
कांहीं सार्थक पादपूर्तिरचना नाहींत गौणाक्षरें ।
चैत्रींचे नवरात्र रामनवमीपर्यंत गा आदरें ॥"

'सम्पादक'

१. सदरील पत्रांत रा० ओक यांचा जसा आमच्या लेखाविषयीं गैरसमज झाला आहे तसाच पूर्वी आमच्या दुसऱ्या एका आक्षेपकाचाही§ झाला होता.

§ गणपतराव हरीहर कुरुंदवाडकर यांचा अंक ३५ पृष्ठें ६६५-६६६ वरील †, ‡ या टिपा पाहा.

'सम्पादक'

पडतें. विठ्ठलकवीनें वरील दोन ग्रंथांचा केवळ प्रसंगोपात्त निर्देश केल्यानें कांहीएक ठरत नाहीं.

आतां चालू मुद्द्याच्या संबंधानें एका गोष्टीविषयीं मात्र लिहिणें राहिलें. तें येवढेंच कीं, आह्मीं एकंदर महाराष्ट्रकवितेच्या संबंधानें जें येवढें विधान केलें आहे तें कोणत्या आधारावरून ? आह्मीं यच्चयावत् † महाराष्ट्रकवित्व अवलोकनांत आणून वरील सिद्धांत केला

† यांसंबंधीं ओकांचें म्हणणें असें:—

'फक्त पंतांचे सर्व ग्रंथ वाचून त्यांजवर ठामपणाचा आणि बिनदिक्कतपणाचा अभिप्राय देण्यास निदान तप दीड तप तरी त्यांच्या कवितेवर सतत व्यासंग केला पाहिजे. 'पंतांच्या कवितेवर सन १८६५ पासून आमचें प्रेम जें स्थिरता पावलें तें उत्तरोत्तर तसें दृढतरच होत गेलें.' असा तुम्हीं एका ठिकाणीं शेरा मारिला आहे. तसेंच दुसऱ्या एका प्रसंगीं तुमचें वाक्य असें आहे:—'१५८ वर्षांपूर्वीं आम्हीं आपल्या वडिलांजवळ शाळेंतील पाठाच्या आर्या वाचीत असूं' इत्यादि. यावरून आपला पंतांच्या कवितेवर व्यासंग सुमारें पंधरा वर्षांचा होतो. परंतु इतक्या अवधींत आपल्यास अनेक कामें उरकून घ्यावयाचीं होतीं. परीक्षेकरितां अभ्यास करावयाचा होता. विद्यापर्वताच्या शिखरावर जाण्याची चढण फार कठिण व सुळासारखी असल्यामुळें कदाचित् अर्ध्या वाटेवरून माघारेंही यावें लागलें असेल; शिक्षकाचें काम, संस्कृत कवि, शालापत्रक, पुस्तकपरीक्षा, निबंधमाला इत्यादि लहानमोठीं कामें होतींच. इतकीं कामें उरकून घेण्यांत बहुतेक वेळ गेल्यावर पंतांचे ग्रंथ वाचण्यास वेळ तो कोठून राहणार ? जॉन्सन्सारखी तुमची कांहीं तैलबुद्धि नाहीं, 'घटकाभर बसलें कीं पांच सहा पानें लिहून टाकलीं असें जॉन्सन्सारखें सामर्थ्य आमच्या अंगीं नाहीं' असें तुम्हीच कबूल करतां;(अंक ३६ पृष्ठ६६८ पाहा 'सं०') तर मग वेळ कोठचा ! एकट्या पंतांच्या समग्र ग्रंथांचें मनन-पूर्वक अवलोकन तुमच्या हातून झालें असेल असें मान्य केलें तरी दुसरीकडून निराळीच नड उभी राहते. ती अर्थात् हीच कीं, पंतांचे समग्र ग्रंथ सांप्रतकाळीं मिळण्याची अवश्यकता. (अशक्यता ? सं०) आपल्या मालेच्या २८ व्या अंकाच्या शेवटीं मोरोपंतकृत ग्रंथांची एक याद दिली आहे तिजवरून व 'काव्येतिहाससंग्रहां'तील यादीवरून पतांचे ग्रंथ अनेक आहेत असें होतें. ते समग्र मिळण्यास अद्याप पुष्कळ दिवस पाहिजेत. या यादींतच 'सर्वसंग्रहां'त वगैरे छापलेल्या ग्रंथांवर तुम्हीं खूण केली आहे ती तरी सर्वच ठिकाणीं बरोबर आहे असें नाहीं. उदाहरणार्थ:—नामरसायन, गीतेच्या आर्या, ब्रह्मोत्तरखंड, प्रातःप्रार्थना १० प्रकरणें छापून प्रसिद्ध झालीं आहेत व तींही 'सर्वसंग्रहां'त आहेत, यावरून 'सर्वसंग्रहां'तील पंतांचीं सर्व काव्यें आपण वाचलीं असावींत असें सुद्धां म्हणवत नाहीं. छापून प्रसिद्ध झालेले जे ग्रंथ तुम्हांस माहीत होते त्यांजवर तुमची खूण आहे ह्याजवरून आपली माहिती आणि वाचण्याची सीमा हीं दिसतात.सारांश सन १८७६च्या जुलै महिन्यापर्यंत आपल्या हातून 'सर्वसंग्रहां'तील सुद्धां पंतांच्या समग्र लेखांचें वाचन झालें नव्हतें असें म्हणण्यास जागा राहते........ पंतांच्या वंशजांशिवाय करून त्यांचे सर्व ग्रंथ कोणाजवळ आहेत असें ऐकिवांतही नाहीं. आपल्याजवळ तर ते नाहींतच; जर असते तर ज्या कवीच्या कवितेवर तुमचें प्रेम १८६५त स्थिरता पावून उत्तरोत्तर दृढतरच होत गेलें त्याच्या काव्यांची याद तरी तुम्हीं मोठ्या उत्साहभरानें आपल्या वाचकांस सादर केली असती. दुसरें 'काव्येतिहाससंग्रह'कर्ते हे तुमचे स्नेही व विद्यालयबंधु आहेत. त्यांच्याकडे काव होतें काय नाहीं याची खबर तुम्हांस असतेच असें तुमच्या मालेच्या ५६ व्या अंकांतील नवम पृष्ठाच्या खालील टिपेवरून (पृ० ७० टीप १ सं०) समजतें. आतां येवढा दुर्मिळ व अपूर्व संग्रह आणि तो पंतांच्या काव्यांचा तुम्हांजवळ असून त्याची वार्ता सुद्धां 'काव्येतिहाससंग्रह' कर्ते यांस नसावी हें

(पुढें चालू.)

कीं कसें ? या आक्षेपावर आमचें असें उत्तर आहे कीं, प्रत्येक सिद्धांत स्थापित करतांना तदाकलित सर्व व्यक्तींविषयीं पृथक् पृथक् शोध करणें नेहेमी अवश्य असतें असें नाहीं. 'कावळ्यांचा रंग काळा असतो' किंवा 'एशिया खंडांत लोकसत्तात्मक राज्याची पद्धति कोठें आढळत नाहीं,' असें सामान्यतः ह्मटलें ह्मणजे सारे कावळे एके ठिकाणीं बोलवायाला पाहिजेत किंवा साऱ्या एशिया खंडभर हिंडलें पाहिजे असें नाहीं. जेवढे कावळे आजपर्यंत दृष्टीस पडले तेवढे सर्व जर काळेच होते, व जेवढ्या एशियांतील राज्यांची आपणांस माहिती आहे तेवढ्यांतून राजसत्तेखेरीज दुसरा प्रकार जर चालूच नव्हता, तर वरील दोन सिद्धांतांचें विधान करणारास मोठीशी धास्ती बाळगायाला नको. तर याचप्रमाणें आमचें महाराष्ट्र कवितेंत जेवढें अवलोकन आहे तेवढ्यावरून पाहतां वरील सिद्धांत यथार्थ वाटून त्याचा आह्मीं उल्लेख केला. ज्यांचें अवलोकन आमच्याहून विस्तृत असेल त्यांनीं आमच्या सिद्धां-

---

कसें ? जसजसे ग्रंथ उपलब्ध होतात तसतसे त्यांचीं नांवें प्रसिद्ध करावीं अशी त्यांची चाल आहे, पण त्यांनीं हा नित्याचा नियम तुमच्याच संबंधानें वर्ज केला असल्यास कोण जाणे ? यदाकदाचित् त्यांना या संग्रहाची अद्यापही बातमी लागली नसल्यास ती पत्रद्वारां कळविण्याची तसदी देण्यास मी राजी आहे. पंतांसारख्या कवीचा समग्र ग्रंथसमूह आपल्या मित्राच्याच घरीं आहे व तो अनायासें प्राप्त होण्याजोगा आहे असें जर त्यांना समजेल तर या लाभानें त्यांस केवढा आनंद होणार आहे ! व आपलें काम बजाविण्यास किती हुशारी येणार आहे ? याशिवाय ग्रंथाच्या प्रती करवून घेण्यास व त्या इकडून तिकडे व तिकडून इकडे डाकेच्या मार्गानें धाडण्यास जो पैसा हल्लीं खर्चीं घालावा लागत आहे तोही वांचल्यासारखा होईल. वर उतरून घेतलेल्या लेखांतील अभिप्रायाची मातबरी केवढीही असो; ती तूर्त एकीकडे ठेविली असतां चालेल; पण त्यापासून 'संग्रह'कारांस पंतांचे ग्रंथ मिळाले तर त्यांच्यावर आणि एकंदर महाराष्ट्रावर आपले जे उपकार होणार आहेत त्यांची मातबरी विशेष गणली पाहिजे.'

ओकांचें भाषणही म्हणणें असें:—

'एक तर या कवीच्या समग्र काव्यधनाचें भांडार कोणा संग्रहेच्छूकडे अथवा रसिक शिरोमणीकडे असल्याचें ऐकिवांत नाहीं. दुसरें आजपर्यंत छापून निघालेला ग्रंथसंग्रह फार थोडा आहे. 'निरंकुशाः कवयः' अशी लोकप्रसिद्धि आहे. हिच्या लाक्षणिक अर्थाच्या अनुरोधानें पाहिलें तर कविवर्य हे कोणती गोष्ट कोठें सांगतील याचा नियम नाहीं. पाहिजे ती गोष्ट पाहिजे त्या ठिकाणीं सांगून ते स्वातंत्र्यामृताचें सेवन करितात. त्यांस कोणाची पर्वा करण्याची बहुधा अवश्यकता नसते. खुद्द 'आर्यापतीं'नें विराटपर्वांत परवशतेची खरमरीत निर्भर्त्सना (याहुनि बरी निरयगति परवशता शतगुणें करी जाच ॥) केली आहे........तेव्हां सांगण्याचा म्हणून आशय इतकाच कीं कवि कोठें कोणत्या गोष्टीचा निर्देश करितील याचा नेम नाहीं. क्षणभर एकाद्या पर्वाचीं वरचीं वरचीं पानें चाळलीं किंवा मधले दोन चार अध्याय वाचिले असतां सर्व ग्रंथाविषयींच नव्हे, तर त्या कवीच्या एकंदर ग्रंथसमूहाविषयीं सुद्धां मन मानेल तसा अभिप्राय झोंकून देणें माझ्या मतें गर्हणीय आणि अनुचित होय. असें धडकावून लिहिण्याचा अधिकार कोणासही नाहीं. शिवाय, "लोकाश्रयाच्या बलावर भाषोत्कर्षाचें सहाय्य करण्याचें काम (आपण होऊन) अंगीं पत्करलें त्यांस........ग्रंथाच्या गुणावगुणांविषयीं विवेचन" पूर्वोक्त प्रकारानें म्हणजे "शितावरून भाताची परीक्षा करणें" या न्यायानें केलें असतां अत्यंत अश्रेयस्कर होय.' 'सम्पादक'

त्याचा असत्यपणा दाखवावा म्हणजे अर्थातच आम्हांस त्याचा त्याग करणें भाग आहे. पण हें जोंपर्यंत होणार नाहीं, तोंपर्यंत आमचा मूळ उल्लेखच कायम समजला पाहिजे. अशा प्रकरणीं पुराव्याचा बोजा विरुद्ध पक्षावर राहतो हें उघडच आहे.

याप्रमाणें आमच्या नागपुरवासी आक्षेपकाच्या लांबलचक पत्रांत जेवढे मुद्दे आहेत तेवढ्यांच्या संबंधानें आम्हीं आपलें मत कळवलें. आतां याखेरीज त्यांत जो पुष्कळ पाल्हाळ-वार व फाजीलपणाचा मजकूर¶ आहे त्याच्या संबंधानें कांहीं विशेष न लिहितां त्यांतील एका मोठ्या मुद्द्याविषयीं मात्र थोडेसें लिहून हें उत्तर आटपतों.

प्रस्तुत पत्रकाराचा तदरील लेख लिहिण्यांतला मोठा उद्देश आम्हांस हा वाटतो कीं, आम्हीं जसे आजपर्यंत बऱ्याबऱ्या मंडळीवर प्रहार केले आहेत, व त्यांच्या अनेक मतांवर निर्भीडपणें चर्चा करून त्यांचा शुष्कपणा दाखवला आहे, तसाच प्रकार आमच्याशीं करून महन्निंदारूप महापातकाची आमच्याकडून निष्कृति करवावी. आमच्या आक्षेपकवर्गास आमचें पुस्तक हें कांहीं अंशीं

अयमश्वः पताकेयमथवा वीरघोषणा।[1]

---

¶ "रघुनाथपंडिताच्या नलोपाख्यानाखेरीज कोणत्याही महाराष्ट्रकाव्यांत जुन्या संस्कृत कवींची पद्धति कोणत्याही संबंधानें बिलकुल दृष्टीस पडत नाहीं." हा शेरा सर्व महाराष्ट्रकाव्यांवर मारण्यापूर्वी आपल्यास किती विचार करावा लागला असेल व आपल्यास किती वर्षेंपर्यंत महाराष्ट्र-काव्याध्ययनाचे परिश्रम करावे लागले असतील याची कल्पना मनांत आली म्हणजे आपल्यासारख्या-विषयीं सहजगत्या मुखांतून धन्यवाद निघतात. या प्रसंगोपात्त अभिप्रायावरून समग्र महाराष्ट्रकविता-ग्रंथांचें आलोडन व मननपूर्वक वाचन आपल्या हातून खास झालें असावें असें अनुमान होतें. महाराष्ट्रकविता हा विषय किती मोठा गहन, व्यापक व विस्तृत आहे हें मीं सांगावें असें नाहीं. विषयाच्या संबंधानें आणि भाषेच्या संबंधानें त्यास केवढें काठिण्य आलें आहे हें सुज्ञांस विदित आहेच. अव्वलपासून अखेरपर्यंत महाराष्ट्रकाव्यग्रंथ वाचून त्या समग्र ग्रंथांची रघुकिरातादि पंडित-मान्य काव्यांशीं तुलना अद्यापपर्यंत कोणींच केली नव्हती. येवढें अचाट काम बजाविल्याचें श्रेय ज्यास सुदैवानें प्राप्त झालें आहे त्याजविषयीं धन्यतोक्ति कां निघणार नाहींत? तुमच्या पुण्यामध्येंच कै० परशुरामपंत तात्या गोडबोले पंतभक्तशिरोमणि रसिकवर्य होऊन गेले. त्यांनीं कावल्यावेळीं आमरणपर्यंत पंतांचे ग्रंथ वाचावे, तथापि त्यांस सुद्धां जें कर्म अत्यंत दुर्घट तें आज अत्यंत सुकर आहे असें तुम्हीं आपल्या स्वतांच्या प्रयत्नावरून लोकांस भासवीत आहां हा आपला मोठा उपकारच समजला पाहिजे." हा मुख्य मजकूर झाला. याशिवाय ठिकठिकाणीं उपरोधिक मजकूर सर्व पत्रभर आहेच. 'सम्पादक'

१ अयमश्वः पताकेयमथवा वीरघोषणा।
सप्तलोकैकवीरस्य दशकण्ठकुलद्विषः॥

'उत्तररामचरित', (४, २७ सं०).

(सप्तलोकांतील एक वीर असा जो दशकंठकुलांतक (राम) त्याचा हा अश्व व ही पताका आहे, अथवा मूर्तिमती वीरघोषणाच आहे!)

यासारखें भासत आहेसें दिसतें! प्रस्तुत पत्रकारानें एके ठिकाणीं नेपोलियनचा ¶ संबंध आणला आहे, त्यांतीलही हाच आशय आहे हें उघड आहे. आतां ही जी आमच्याविषयींची समजूत ती आमचे ख्रिस्ती बंधु 'ज्ञानोदय' किंवा पुरे राजभक्त 'एलिफास' अशांच्या ठायीं आढळली तर नवल नाहीं; कां कीं आमच्याकडे त्यांची मेहेरनजर कधींकाळीं वर्षां सहा महिन्यांनीं झाली तर होणार; आणि सद्धर्माचीं व राजनिष्ठेचीं पवित्र व शुद्ध तत्त्वें त्यांच्या जशीं काय हाडांला खिळून राहिलेलीं! पण आमच्या देशबंधूंचेही वरच्यावरसारखे समज होऊन बसले असावे हें खरोखर आश्चर्य आहे! रा॰ ओक यांनीं आमच्या अंतःकरणांत प्रवेश करून पुढील हृद्गतें किती मौजेचीं बाहेर काढलीं आहेत पाहा:—

---

¶ सदर उल्लेख येणेंप्रमाणें:—

"मागल्या पंचेचाळिसाव्या अंकांत प्रकृत विषयास अनुसरून तुह्मी लिहितां, 'ज्ञानेश्वरी, एकनाथकृत रामायण, मुक्तेश्वराचीं चार पर्वें, तुकाराम, नामदेव इत्यादिकांचे हजारों हजार अभंग, मोरोपंताचे भारत, भागवत, रामायण इ॰ विषयक ग्रंथ; येवढेच मोठमोठाले ग्रंथ घेतले तरी ते समग्र व मननपूर्वक वाचणें म्हणजे थोडक्या श्रमाचें व काळाचें काम आहे असें नाहीं.' यांत मुकुंदराजाचे 'विवेकसिंधु' व 'परमामृत', ज्ञानेश्वराचा 'अमृतानुभव', वामनकृत 'निगमसार' व 'यथार्थदीपिका' व संस्कृतांतील पंचमहाकाव्यें इतक्या ग्रंथांची भर घातली असतां एकंदर ग्रंथविस्तार केवढा होणार आहे! व तो मननपूर्वक वाचून त्यांत काय आहे व त्यांत काय नाहीं असा शोध करून त्यावर अभिप्राय लिहिणें हें काम कितपत कठिण आहे! 'ज्यामध्यें विरोधात्मकता नसते ती गोष्ट अशक्य नसते', अशा अर्थानें एक इंग्रजींत वाक्य आहे. या न्यायानें पाहिलें तर मनुष्याच्या बुद्धीला पूर्वोक्त काम बजाविणें अशक्य आहे असें नाहीं. नेपोलियन बोनापार्ट असें ह्मणत असे कीं 'मला तर ह्या जगांत कोणतीच गोष्ट अशक्य दिसत नाहीं.' व त्याप्रमाणें त्यानें आपलें ह्मणणें आपल्या पराक्रमानें यथार्थ करूनही दाखविलें. यावरून सर्व महाराष्ट्रकवींचे ग्रंथ, रघुकिरातादि पंचमहाकाव्यें शाकुंतलादि नाटकें वाचून तुम्हांसारख्यास अभिप्राय देणें अशक्य आहे असें म्हणण्याचा मुळींच हेतु नाहीं; पण हें अवजड काम जितक्या वेळांत (चार पांच वर्षांत) झालें आहे असें दिसतें, तितक्या वेळांत होणें दुरापास्त होय. दुसरें, यदाकदाचित् वेळ असला तरी समग्र ग्रंथ मिळण्याची मारामार आहेच; ही अडचण कशानें निवारितां येणार आहे? पंतांच्या कवितेवर आपलें प्रेम स्थिरता पावल्याचें आपण वाचकांस कळविलें आहे. 'प्रेम हें अंधळें आहे', तें कोठें कां बसतें व कोठें कां बसत नाहीं, याचा कांहीं नेम नाहीं. तर तुमचें प्रेम पंतांच्या कवितेवर बसून त्या प्रेमाच्या भरांत पंतांनीं रघुकिरातादि पंचमहाकाव्यें पाहिल्याशिवाय व संस्कृत काव्यपद्धतीची ओळख बिलकुल नसतांही सुद्धां काव्यरचना केली अशी त्यांची थोरवी तुम्ही गाइली आहे ती तरी यथार्थ मानणें आतां बरोबर दिसत नाहीं. कारण प्रेमाच्या भरानें लिहिलेलें सर्व खरेंच असतें असा कांहीं नियम नाहीं. कदाचित् यापुढें तुमची मर्जी फिरली तर तुम्ही तिसराच कांहीं अभिप्राय फेंकून द्याल................प्रत्येक मनुष्य चुकीस पात्र आहे. त्यांत एक प्रकारचा प्रमाद क्षम्य आहे; दुसऱ्या प्रकारचा प्रमाद क्षम्य नाहीं. न समजून प्रमाद घडला तर तो क्षम्य आहे, पण समजून उमजून केलेला प्रमाद क्षम्य नाहीं. आपला प्रमाद दुसऱ्या प्रकारचा दिसतो असें आक्षेपक म्हणणार आहे; तो कसा हें थोडक्यांत सांगण्याचा यत्न करितों. सर्व मराठी कवींचे ग्रंथ वाचून तुम्ही जर अभिप्राय दिला असता आणि त्यांत प्रमाद असता तर तो क्षम्य होता; परंतु ही गोष्ट बऱ्याच अंशीं अशक्य असें पूर्वींच दाखविलें आहे. म्हणून तुमचा हा प्रमाद क्षम्य नाहीं."

'सम्पादक'

"आपल्या लेखाकडे कोणी पाहत नाहीं, कोणीं पाहिलें तर वाचण्याच्या भरीस कोणी पडत नाहीं, कोणीं वाचलें तर त्यांत खरें काय आहे खोटें काय आहे हें पाहून त्यांतील दोष तुह्मांस कळवण्याचें कोणीच मनावर घेत नाहीं, अशी ज्या वेळेस अनास्था तुमच्या नजरेस येऊं लागली, तेव्हां तुह्मांसही सहज वाटलें असावें कीं आपण तरी शोध करण्याची उरस्फोड कशास करावी ? यावें कांहीं तरी खेंचून आणि अंक भरून काढावा; आपण तरी मागें पुढें पाहा आणि ग्रंथ उलथे पालथे घाला कशासाठीं ! "

ही आमच्या हद्दतांची मीमांसा झाली. आतां आमच्या झोटिंग बादशाहीपासून देशाचें कोणतें भयंकर नुकसान होत आहे, यावर ओक महाराजांचा अभिप्राय कसा काय आहे तो पाहा !:—

ज्यांनीं लोकांस मार्ग दाखवून कांहीं प्रकारविशेषानें ज्ञानामृत पाजण्याचा जिम्मा घेतला आहे, तेच जर अरेरावपणाचें प्राबल्य माजवितील, आणि निव्वळ हुक्कीखातर अद्वातद्वा लेख प्रसिद्ध करितील तर इतर जनांनीं कोणाकडे पाहून धीर धरावा ? मुख्य नाविकानेंच जर डुलकी देत देत सुकाणूं फिरविलें, आणि जहाज वहावत वहावत आणून खडकावर आदळण्याची वेळ ठेपली, तर इतर नाविकांची आणि वरील लहानथोर मंडळीची काय त्रेधा उडणार आहे ? "

वरच्यासारख्या लेखांवर काय उत्तर द्यावें ? आमच्या पुस्तकाच्या संबंधाची ज्यास थोडीबहुत माहिती असेल, व ग्रंथरचना ह्मणजे काय याविषयीं जो क्षणभर समंजसपणानें विचार करील त्यास सुद्धां वरील दोन लेख किती विलक्षण आहेत हें कळून येईल. आमच्या पुस्तकाचे वाचक किती आहेत, तें कितपत लक्ष लावून लोक वाचतात, त्यांतील सत्यासत्याचें कोणी विवेचन करतात कीं नाहीं, आमचे अभिप्राय नमूद करण्यापूर्वी आह्मांस कांहीं शोध करावा लागतो कीं नाहीं,पुस्तकें कांहीं चाळावीं लागतात कीं खसूचित्व* प्रगट करून तब्बेत लागेल तशी लेखणी चालवण्याबद्दल वाग्देवीच्या दरबारचा आह्मांस एकादा चांद मिळाला आहे, वगैरे गोष्टींविषयीं लिहूं गेल्यास पुष्कळ लिहितां येईल. त्याप्रमाणेंच अरेरावपणा माजवण्याचा व खडकावर जहाज नेऊन हपटण्याचा चार्ज आह्मांवर कितपतसा लागू होईल याविषयींही थोडें लिहितां येईल असें नाहीं. पण स्वतःच्या संबंधानें सविस्तर लिहिणें हें स्वदोषनिवारणाच्या प्रसंगींही विशेष प्रशस्त होईल असें आह्मांस वाटत नाहीं. यास्तव आह्मी आपल्या तरफदारीनें आमच्या प्रतिपक्षिवर्गास येवढेंच कळवतों कीं, आह्मीं आपल्या दरबारीं अव्याहतरच्या नवव्याप्रमाणें¶ अद्याप एकही आवट पसार केला नाहीं. आमचें तारूं सहा वर्षांपूर्वी जेव्हां बंदर सोडून बाहेर पडलें तेव्हांच त्याच्या निशा-

---

* समासाअंतीं 'खसूचि' याचा निंदापर अर्थ होतो. जसें:—वैयाकरणखसूचि=वाईट व्याकरणकार, ज्याचें व्याकरण विसरलें आहे असा वैयाकरण. ह्मणून खसूचित्व=दुर्लक्ष, विस्मृति, निष्काळजीपणा. 'सम्पादक'

¶ पृष्ठ ५२९, *टीप पाहा. 'सम्पादक'

णावर आमचा लेख फडकला आहे, कीं आमचें मत स्वीकारण्याविषयीं आमचा कोणास आग्रह नाहीं, व कोणीं आमची चूक आह्मांस दाखवल्यास ती आह्मी मोठ्या संतोषानें पदरांत घेऊं. याच प्रतिज्ञेची आह्मीं पुढेंही अनेकवार पुनरुक्ति केली आहे. रा. ओक यांनीं तर आपल्या सदरील पत्रांतच शंभर वेळां आमच्या प्रांजल बुद्धीचा महिमा गाइला आहे.$ मग तेच आह्मी 'अरेरावपणाचें प्राबल्य माजवतों' ह्मणून त्याच तोंडानें आह्मांवर भडिमार करतात यास काय ह्मणावें? आह्मी हवा तसा अद्वातद्वा लेख प्रसिद्ध केला ह्मणून त्यांच्या हातची लेखणी कोणीं हिसकावून घेतली आहे? सदरील पत्रासारखा अद्वातद्वा व फाजील मजकूरही आह्मीं आपल्या पुस्तकांत खुशाल येऊं दिला हें अरेरावपणाचेंच लक्षण काय? पण रागाच्या किंवा हेकटपणाच्या आवेशांत बुद्धीची समता राहती तर मग काय न होतें? वरील वृत्तींच्या योगानें आमच्या पत्रकाराची बुद्धि इतकी कलुषित झाली आहे कीं अगदीं उघड दिसण्यासारख्या गोष्टीही त्यास दिसल्या नाहींत. टीका करण्यास हातीं घेतलेल्या दोन लेखांचा अर्थ ध्यानांत घेतांना तो कसा चकला आहे हें मागें दाखवलेंच आहे. त्यांतून वरच्या दोन अवतरणांपैकीं दुसऱ्यावरून पाहतां तर त्याची मति अगदींच घसरली आहे असें

$ (अ) 'ज्यास जसें मनास येईल त्याप्रमाणें तो बेलाशक आमच्या कवीविषयीं हवा तसा अभिप्राय ठोकून देतो,' अशा विद्वान् मंडळांत आपली गणना नसून तुमच्या लिहिण्यास खूप मजबूत आधारही असेल. जो लेख तुम्ही लिहितां 'त्याच्या समर्थनार्थ किंवा मंडनार्थ ग्रंथांतरींचे आधार काढूनही ठेविले असतील.' केवळ सरासरी अनमानधपक्यानें आपण वरील उल्लेख केला असावा असा विचार मनांत येऊन आपल्यास विनाकारण तसदी देण्यास मन घेईना. पण ज्यास जें खरें दिसतें तें निर्भीडपणें व स्पष्टपणें कळविलें असतां तें लिहिणें स्वमताविरुद्ध असलें किंवा कदाचित् अगदीं खोटें ठरलें तरी मोठ्या प्रेमानें वाचण्याचें आपण अभिवचन द्वितीय अंकांत दिलें आहे व त्याचा थोडासा दोन तीन प्रसंगीं प्रत्ययही घरला आहे त्याच्या बळावर लिहितों.

(आ) आपल्या मालेंतील दोषस्थलें कोणीं दाखवून दिलीं असतां आपण आक्षेपकांवर रुष्ट न होतां त्यांच्या पत्रांचा योग्य विचार करतां व तसाच प्रस्तुत प्रकरणींही होईल अशा आशेनें हें पत्र लिहिलें आहे. 'आमच्याविरुद्ध जर कोणाचे अभिप्राय येतील तर ते आम्ही मोठ्या प्रेमानें वाचूं व ते लिहिणाराचे आभार मानून आमच्या बुद्धीनें आम्हांस त्यावर प्रत्युत्तर देणें सुचेल तें देऊन आमच्या दीन भाषेचा भाग्योदय झाला असें समजूं," असें जर आपलें आश्वासन नसतें व "आपल्या मनास निःपक्षपातबुद्धीनें जें वाटेल तें प्रांजलपणानें जो लिहूं लागेल त्याचे अभिप्राय सर्वांस आवडण्यासारखे निघतील असें नाहीं" असें जर आपलें मत नसतें तर प्रस्तुत पत्रकार येवढें लांबलचक पत्र लिहिण्याच्या भानगडींत कधींच पडता ना. याशिवाय आपला मोठा गुण हाही आहे कीं आपला दोष कबूल करण्यास तुम्ही सदां राजी असतां. जें चांगलें तें कोणत्याही पक्षाकडील असो तें निमुटपणें स्वीकारण्याविषयीं आपली उत्सुकताही केव्हां केव्हां दिसून येते. सुज्ञांचें वर्तन असेंच असतें. पंत म्हणतात:—

"अरिच्याहि सद्गुणातें प्रेमें वाखाणितातिं सुज्ञानी."

असो, तर वरच्यासारख्या अनेक गोष्टी अनुकूल दिसल्यावरून सदहू पत्र लिहिण्याचें माझ्या मनांत आलें. त्यांत कोठें कोठें लहानतोंडीं मोठा घांस घेतल्यासारखें वर्तन दिसून आल्यास त्याचें कारण विषयमहत्त्व होय."

[ पुढें चालू. ]

ह्मणावें लागतें. आमच्या पत्रकाराचा सरासरी असा मतलब दिसतो कीं, आपल्या लिहिण्यांत प्रमादाला लवलेश स्थल नाहीं अशी जेव्हां कोणाची खात्री होईल तेव्हां त्यानें हातांत लेखणी धरावी, दरम्यान धरूं नये. कोणतेंही विधान करायाचें ह्मटलें ह्मणजे साऱ्या जगभर हिंडून जेव्हां त्याची शहानिशा करून घ्यावी तेव्हां मग लेखणीचा टांक कागदाला लावावा. या समजुतीवरून आमच्या आक्षेपकास मनुष्याच्या बुद्धीचें आकुंचितत्व, प्रमादपरत्व इत्यादि

---

यासंबंधी ओकांचें म्हणणें असें:—

कोणत्याही विषयावर सर्वांचे अभिप्राय सारखे पडणार नाहींत ही एक पक्की आहेच. आतां हें ह्मणणें जरी खरें आहे तरी तांबडी काठी हातांत घेतली आणि दुसऱ्यास ही कोणत्या रंगाची काठी आहे असें विचारलें असतां तो काळ्या रंगाची आहे किंवा पांढऱ्या रंगाची आहे असें कधींही सांगावयाचा नाहीं. त्या काठीच्या किंमतीविषयीं मतभेद पडेल. तर याच न्यायानें अमकी गोष्ट महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांत आहे किंवा नाहीं याविषयीं मतभेद पडूं नये. कारण अमुक गोष्ट महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांत आहे किंवा नाहीं असें कोणी ह्मटलें असतां त्या ह्मणण्याचा खरेखोटेपणा तेव्हांच ताडून पाहतां येतो. महाराष्ट्रकवींनीं पंचमहाकाव्यांचें अनुकरण केलें आहे किंवा काय या प्रश्नाचा उलगडा संस्कृत आणि महाराष्ट्रकाव्यांतील समान प्रसंगांचीं वर्णनें परस्पर ताडून पाहिलीं असतां होणार आहे. दुसरें प्रसंगवशात् कवि हे अमुक अमुक ग्रंथास अनुसरून मी हें काव्य रचितों असेही कोठें कोठें उल्लेख करतात. तर अशा प्रकारचा कांहीं शोध न करितां तुह्मी एकदम जी भरारी मारली आहे तिचा अर्थ काय? कित्येक सुधारणा ह्मणविणाऱ्या समाजवाल्यांनीं आलीकडे मूर्तिपूजा वेदप्रतिपादित नाहीं, तीस वेदांत आधार नाहीं अशी जी बडबड माजविली आहे ती सर्वज्ञतादर्शक, वेदपारंगतत्व—बोधक, साहसमूलक व वाक्चापल्यद्योतक अशी आहे असें तत्प्रतिपक्षी ह्मणतात त्याप्रमाणेंच सर्व महाराष्ट्रकवींविषयींचा आपला अभिप्राय त्याच धर्तीचा नव्हे काय? मोरोपंताचे सर्व ग्रंथ एकीकडेच राहूं द्या, परंतु सर्वसंग्रहांतील छापून प्रसिद्ध झालेला पंतांचा समग्र भाग तुह्मी न वाचतां एकदम सगळ्या काव्यात्मक महाराष्ट्रवाङ्मयावर निखालसपणाचा अभिप्राय देण्यास सरसावलां हें केवढें धाडस! हा आपला अभिप्राय इंग्रेजी तऱ्हेचा दिसतो; म्हणजे 'रूपावली'ची समाप्ति होतांच 'अग्निमीळे' इ० वेदवचनांवर जसा रेणातीरस्थ महापंडितांचा तडाखा चालतो; मीमांसाशास्त्रांतील एकदोन गोष्टी अर्धवट कळल्या आहेत नाहींत तोंच ज्याप्रमाणें महापंडितांचीं कणादजैमिन्यादि शास्त्रकारांवर व्याख्यानें चालतात, अथवा आलीकडील विद्वानांत एकानें आपणास मिल्टन् ह्मणवून घ्यावें, दुसऱ्यानें आपणास डेमॉस्थेनीस समजावें, व तिसऱ्यानें आपल्या अंगीं लूथरची योग्यता मानावी हीं सर्व कृत्यें ज्या धाडसाचीं दर्शक होत त्याच धाडसाचा परिणाम आपलाही अभिप्राय होय असें सुद्धां तुमचे प्रतिपक्षी तुह्मांस ह्मणणार नाहींत काय? कोणत्याही महाराष्ट्रकाव्यांत जुनी संस्कृत पद्धति कोणत्याही संबंधानें बिलकुल दृष्टीस पडत नाहीं हा उल्लेख करण्यापूर्वी महाराष्ट्रकाव्यग्रंथ वाचून पाहिले असते तर बरें झालें असतें. अशा सर्वज्ञतेच्या लिहिण्यानें फार तोटे आहेत ते तेथें सांगितले पाहिजेत असें नाहीं. जो कोणी मलभलतें बोलेल अथवा लिहील तो कितीही मोठा असला तरी त्या योगानें अवहेलना व अपमानास पात्र होणार आहे. वास्तव जी गोष्ट आपल्यास चांगलीशी माहीत नाहीं तिजवर अभिप्राय देण्याचा हात घालूं नये हें उचित होय. विशेषतः लोकभ्रमाचें आणि लौकिक दुर्मतांचें निरसन करणें हा ज्यांचा धर्म आहे त्यांनीं तरी अशी प्रमादप्रवणता आपल्या लेखांत न आणण्याविषयीं खबरदारी ठेविली पाहिजे.

'सम्पादक'

धर्म कबूल नाहींत असें वाटतें. त्यानें नाविकाचा दाखला घेतला आहे. तर तोच घेऊन आह्मी त्यास असें विचारतों कीं, समुद्रयान करण्याचा जर त्यास प्रसंग आला तर कपतानाकडून नौकेबद्दल अभयलेख घेतल्यावांचून तो तिजवर पाऊल ठेवणार नाहीं काय ? व वरील अभयलेख देणारे कपतान तरी त्यास किती भेटतील ! तसेंच वरील लेख मागणाराविषयीं मुख्य नाविकाच्या मनांत कल्पना तरी काय येईल ! तर हीच गोष्ट ग्रंथकारासही लागू आहे. मोठा कपतान कुक् घेतला किंवा कोलंबस् घेतला तरी त्याच्याही स्वाधीन जसे वारे नाहींत, समुद्रांतील खडक नाहींत, किंवा इतर होण्यासारखे शेंकडों अपायही नाहींत त्याप्रमाणेंच कोणी केवढाही ग्रंथकार असला तरी प्रमादराहित्य हा गुण त्यास कधींही लाभायाचा नाही. हें तर काय, पण वरील गुण आपल्या ठायीं असावा अशी हांव धरणारा मनुष्य 'रासेलस्'मधील पंचमहाभूतांवर अंमल चालवणाऱ्या ज्योतिष्याच्या इतपतच शहाणा ह्मणायाला पाहिजे. असो; तर या सर्व गोष्टी आमच्या आक्षेपकानें लक्षांत आणायाच्या होत्या. त्या इतक्या उघड असतां त्याच्या ध्यानांत आल्या नाहींत याचा खरोखर आह्मांस अचंबा वाटतो. तर त्यास सरतेशेवटीं येवढेंच सांगतों ह्मणजे बस आहे कीं, जसा मोठा शूरही पराभव पावल्यानें¶ नामर्द ठरत नाहीं, त्याप्रमाणेंच वेळेनसार लेखणी घसरली तरी तिजबद्दल कोणत्याही ग्रंथकारास मोठीशी शरम वाटायाला पाहिजे असें नाहीं. जगांत आजपर्यंत ज्ञानाचा व सत्याचा प्रसार कोणत्या तऱ्हेनें झाला हें पाहिलें असतां कोणासही कळून येणारें आहे कीं, ज्यास जें मत वाटेल तें त्यानें प्रगट करावें हीच वरील प्रसाराची रीति आहे. सत्याचा आविर्भाव एकदम होत नसतो, तो क्रमाक्रमानेंच व्हावयाचा. वास्तव निवळ सत्य हातीं लागेल तेव्हांच मी तें प्रगट करीन असें ह्मणून कांहींच होणार नाहीं. ज्याला जितपत शोध लागेल तितपत त्यानें लोकांस प्रसिद्ध करावा, त्याविषयीं लोकांनीं निरंतर चर्चा चालू ठेवावी, आणि मग कालेंकरून जें निष्पन्न होईल तें सत्य, हीच आजपर्यंतची सत्यशोधनाची पद्धति आहे. तर हीच आह्मींही आजपर्यंत चालवली आहे. हींतही ज्यांस अरेरावपणा दिसेल त्यांची धन्य ह्मटली पाहिजे. तर याप्रमाणें आह्मीं अनुसरलेल्या पद्धतीविषयीं रा० ओक यांस पुन: एकवार जागें करून कलम खालीं ठेवतों.

---

¶ खण्डिता एव शोभन्ते वीराधरपयोधराः ॥

पराभव झाल्यानें, खंडन झाल्यानें व मर्दन झाल्यानें वीर, अधर व पयोधर शोभतात, त्यांस कांहींच कमीपणा येत नाहीं. 'सम्पादक'

३. आतां आमचे दुसरे आक्षेपक रा० कानेटकर यांच्या * कोटिक्रमाविषयीं विचार करूं.

५७ व्या अंकांत आह्मीं मोरोपंताच्या संबंधानें असा उल्लेख केला आहे कीं, ती पंडित नव्हता, तर केवळ पुराणिक होता. हा उल्लेख प्रस्तुत पत्रकारांस साहसात्मक व चमत्कारिक दिसतो. ज्याची कवित्वाच्या संबंधानें एवढी सर्वतोमुख ख्याति आज शंभर वर्षे गाजते आहे तो 'आर्यापति' केवळ पुराणिक होता, ही गोष्ट आमच्या आक्षेपकांस जशी वाटली तशीच पंतांच्या बहुतेक भक्तांस अप्रिय वाटेल यांत संशय नाहीं. शेक्स्पीयर अविद्वान् होता हें जसें त्याच्या कित्येक भक्तांस खपत नाहीं १, व मिल्टननें शाळा घातली होती ही गोष्ट जशी त्याच्या चाहत्यांस लाजिरवाणी वाटते, २ तसाच प्रकार प्रस्तुत महाराष्ट्रकवीच्या

* केशव बाळकृष्ण कानेटकर, कठापुरकर, मु० वांई, यांनीं ता. ३१ आक्टोबर १८७९ रोजीं लिहिलेल्या पत्रांतील.

प्रथम कानेटकर खालीलप्रमाणें प्रास्ताविक प्रशंसोद्गार काढतात:—

"मराठींत विनोदात्मक लिहिण्याची पद्धत आपण चांगलीच सुरू केली आहे. यामुळें मराठी भाषेस विनोदात्मक वळण लावण्याबद्दलचें पूर्ण श्रेय आपल्यास आहे. भाषापद्धति, विषय-विवेचन, विनोदात्मक तन्हा यांनीं इंग्रजी भाषेंतील प्रसिद्ध निबंधकार मेकॉले साहेब यांशीं आपलें साम्य खासें जुळेल असें म्हटल्यास अत्युक्ति होईलसें वाटत नाहीं. मेकॉलेच्या ग्रंथांत असा सुबोधपणा (भाषेच्या संबंधानें) आहे तसाच केवळ आपल्या लेखांत कितीएक ठिकाणीं नसतो इतकें मात्र खरें आहे. तशाच प्रतीची रसिकता व प्रौढपणा ज्यांच्या ठायीं नसतो अशा वाचणाऱ्यांस मेकॉले जसा प्रीतीचें स्थान होऊं सकत नाहीं, तशीच आपली मालाही पुष्कळांनीं कंठांत धारण केलेली आढळते; पण तिचा उत्कृष्ट सुगंध घ्राणेंद्रियांत अभिनिवेशित होऊन त्यांपैकीं कित्येकांस तल्लीन करीत असेल तें असो. आपण आपल्या कल्पनाशक्तीच्या जोरानें व विनोदाच्या घुटक्यांनीं वाचकांचीं अंतःकरणें सद्गदित करून त्यांची मुरकुंडी आपल्या लेखणीवर पडावी ह्मणून लिहिण्यांत फारच चमत्कार करतां. या कल्पनाशक्तीच्या भरारीमुळें कित्येक वेळां प्रमाद व पूर्वापरविरोध यांस जागा होते. आपल्या लिहिण्यांत कितीएक ठिकाणीं असावें ह्यापेक्षां अधिक संस्कृताचें मिश्रण असतें व लिहिण्याचा थाट-माटही पुष्कळ अलंकारिकच असतो असें नजरेस येतें. आपण थोर व खरे सज्जन आहां, तेव्हां या स्पष्टोक्तीबद्दल मला आपण माफी कराल्च." 'सम्पादक'

१. "They who accuse him of wanting learning give him the greatest commendation. He was naturally learned. He needed not the spectacles of books to read nature. He looked inward, and found her there."

—*Dryden.*

२. This is the period of his life from which all his biographers seem inclined to shrink. They are unwilling that Milton should be degraded, to a school-master; but, since it cannot be denied that he taught boys, one finds out that he taught for nothing, and another that his motive was only zeal for the propagation of learning and virtue; and all tell what they do not know to be true, only to excuse an act which no wise man

(पुढें चालू.)

संबंधानें होणार आहे. पण या गोष्टीस उपाय नाहीं. जी खरी गोष्ट आहे ती मनाला गोड न वाटे ह्मणून दडवून ठेवणें बरोबर नाहीं. शिवाय कानेटकरप्रभृति मंडळींनीं ह्याही विचार करायाला पाहिजे कीं अंगीं पांडित्य नसल्यानें कवीस कमीपणा तो कोणता? कवित्वाचा व विद्वत्त्वाचा वस्तुतः विशेष संबंध मुळींच नाहीं; कांहीं अंशीं तर वरील दोन्ही गुण परस्परविरुद्धही आहेत. या प्रमेयावर आह्मीं यापूर्वी अनेक वेळां प्रतिपादन केलें आहे. मग ज्या विद्वत्त्वाचा कवित्वगुणाशीं अशा प्रकारचा संबंध तें आमच्या कवीच्या ठायीं बळेंच स्थापित करण्यापासून फायदा कोणता? शिवाय पौराणिकत्वाच्या योगानें त्यास हीनत्व तें काय येणार? कविरायांची * डफावर थाप पडत नव्हती काय? आंग्लभौमकविमुकुटमणि घोडेवाल्याचें काम करीत नव्हता काय? स्कॉट्लंड्च्या कविश्रेष्ठाचा कृषिव्यापार चालत असतां वाग्देवी हलारूढ होत नव्हती काय? मग त्याच देवीच्या हातून पंतांच्या व्यासपीठाची अवधीरणा होण्यास कोणतें कारण आहे तें आह्मांस समजत नाहीं! असो; आतां प्रस्तुत आक्षेपकाचें ह्मणणें काय आहे तें पाहूं.

रा॰ कानेटकर यांचें आपल्या तर्फेचें पहिलें प्रमाण हें आहे कीं, मोरोपंताच्या काव्यांत महाराष्ट्रभाषेचें अत्यंत उज्वल स्वरूप दृष्टीस पडतें; चित्रविचित्र संस्कृत शब्द, सबंध संस्कृत वाक्यें, कठिण व अप्रसिद्ध संस्कृत शब्द, हे सर्व त्याच्या ग्रंथांत आढळतात; शिवाय

---

will consider as in itself disgraceful. His father was alive; his allowance was not ample; and he supplied its deficiencies by an honest and useful employment. —*Johnson's Life of Milton.*

१. अंक ३ व ४, (पृष्ठें २८ व ३२–३५ सं॰) पाहा.

* तीव्रबुद्धीचे, अति विद्वान्, कमालीचे छंदी आणि फंदी सोलापुरनिवासी ब्राह्मण शाहीर रामजोशीबोवा हे व्युत्पन्न शास्त्री व पुराणिक अशा जगन्नाथपंत जोश्यांचे चिरंजीव. यांनीं लहानपणापासून उनाडक्या कराव्या, लावण्या ह्मणाव्या, तमासगिरांच्या बैठकींत बसावें. वडील बंधु याबद्दल एकदां रागावून बोलल्यामुळें गृहत्याग करून हे तुळजापुरास गेले. कांहीं दिवसांनीं पंढरपुरास जाऊन यांनीं व्याकरण व काव्य यांचें अध्ययन केलें पुनः तमाशाचा छंद लागला व धोंडीबाच्या फडाला हे लावण्या रचून देऊं लागले. त्यावेळीं नागेश शाहीर फार प्रसिद्ध होता; पण रामजोश्यांनीं त्यावरहि ताण केली. प्रथम आपलें नांव घालण्याची लाज वाटून ते धोंडी शाहीराच्या नांवानें लावण्या रचीत. परंतु पुढें लावण्यांत 'राम' असें आपलें नांव जोशीबोवा घालूं लागले; पण याहि नांवानें घोंटाळा होऊं लागल्यानें 'कविराय' असें नांव घालण्यास त्यांनीं सुरुवात केली. यांच्या लावण्यांच्या मोहकपणामुळें बयाबाई व सौंदर्यखनि चिमाबाई त्यांजवर बेहद्द लुब्ध झाल्या. जोशीबोवा या दोघींच्या सहवासांत इष्काचे प्याल्यावर प्याले यथेच्छ पिऊन त्या रंगांत काव्यदेवतेची आराधना करीत. यांचा थाट तर राजासारखा असे. आप्पा सांगलीकर व नटाचें तोंडहि न पाहण्याची प्रतिज्ञा असलेले मोरोपंत वगैरे मंडळीहि यांच्या लावण्यांनीं मोहून जात. उत्तरवयांत हे कीर्तनकार झाले व या विषयांतहि पहिली जागा यांनीं पटकावली. छेकापन्हुति हा यांचा सर्वोत्कृष्ट काव्यप्रकार असून मुक्तेश्वराखेरीज भाषाकामिनी यांच्याइतकी अन्यत्र कोठेंच खुलली नाहीं. त्यांनीं काशीयात्रेस जाण्याची इच्छा लोकांस दर्शवितांच पंचवीस हजार रुपये लोकांनीं दिले, पण काशीयात्रा त्यांच्या नशिबींच नव्हती. दुखणें येऊन चैत्र शु. प्रतिपदा शके १७३० रोजीं त्यांचा अंत झाला. 'सम्पादक'

'मुक्तामाला'दि संस्कृत काव्यें त्यानें रचलीं असून क्वचित् स्थलीं त्याची कृति इतकी दुर्बो असते कीं ती कोणास उकलतही नाहीं. मग असें असून केवळ पौराणिक व्युत्पत्ति त्या ठायीं होती असें आह्मी ह्मणतों हें कसें ? यावर आमचें असें उत्तर आहे कीं, वरील स गोष्टी सिद्ध होण्यास पौराणिक व्युत्पत्तीपेक्षां अधिक सामर्थ्याची आह्मांस गरज दिसत नाहीं ज्यानें 'रामायण,' 'महाभारत' इत्यादि ग्रंथांचें अनेकशः पारायण केलें आहे त्यास वरी सर्व गोष्टी सुसाध्य आहेत असें आह्मास वाटतें त्यांतून आमच्या कवीची अमदान कोणत्या वेळीं होती हें ध्यानांत आणलें असतां व त्याच्या नैसर्गिक बुद्धिमत्तेचा विचा केला असतां त्याच्या कवितेचें स्वरूप जितपत उज्वल दृष्टीस पडतें तितपत सिद्ध होण्यार साक्षात् शास्त्राध्ययनाची कितीशी अवश्यकता होती हें सहज दिसणारें आहे.

रा॰ कानेटकर यांचा दुसरा मुद्दा असा आहे कीं, मोरोपंताची विद्वत्ता किती होत याचें अनुमान त्याच्या ग्रंथांवरून* कसें बांधतां येईल ? त्याच्या ग्रंथांत वरील ज्ञान प्रग होण्यास जर अवकाशच नव्हता, तर मग त्यांत तें दृष्टीस न पडल्यावरून त्याचा अभाव कसा निखालसपणें मानावा ? हा मुद्दा नमूद करतांना प्रस्तुत आक्षेपकानें आमच्या मागल्य दोन आक्षेपकांप्रमाणेंच चूक केली आहे. आमचा मूळचा उल्लेख येवढाच आहे कीं, पंच महाकाव्यांशीं किंवा नाटकांशीं मोरोपंताचा परिचय होता असें ज्यावरून अनुमान करत येईल असें स्थळ त्याच्या ग्रंथांत आढळत नाहीं. याचा अर्थ अंमळ लक्षपूर्वक वाक वाचलें असतां कोणाच्याही लक्षांत येणार आहे. त्यांत प्रस्तुत महाराष्ट्रकवीचा पंचमहा काव्यांशीं परिचय होता कीं नव्हता याविषयीं साक्षात् विधान कांहींच केलेलें नाहीं. जर

* कानेटकर ह्मणतात, "ज्या कोणाचें जेवढें ह्मणून अध्ययन असतें व त्यानें जेवढें अवलोकन कें असतें तेवढें ह्मणून त्याच्या ग्रंथांत दृष्ट होतें, अगर तें दृष्टीस पडण्याचा संभव असतो, हा आपला अभिप्राय तो सर्वांशीं मला खरा भासत नाहीं. कारण एक तर कसलाही ग्रंथ असला तर त्यांत विषयानुरूप ग्रंथरचना व्हावी लागते. यामुळें ग्रंथकारास आपली विद्वत्ता आपले ग्रंथांत दाख वितां येण्यास संधि व अवकाश असावा लागतो. या दोन्ही गोष्टींची अनुकूलता असतांही कित्येकां तसें करणें पसंत नसतें.........वामनाची(हि) पंडितत्वाविषयीं प्रसिद्धि आहे. पण त्याच्या ग्रंथां पाहिलें तर तसें फारसें दिसत नाहीं.........लौकिक विषयांवर लिहितांना तसाच विषय असल्या त्यांत ग्रंथकाराची विद्वत्ता दृष्टीस पडण्यास अवकाश असतो. यामुळें तशा विषयांवर ज्यांचे ग्रं असतात त्यांतून कित्येकांच्या ग्रंथांत आपण ह्मटलेला प्रकार आढळतो. पण मोरोपंतास हाही प्रक लाग नाहीं. कारण त्यानें जी कविता केली ती भगवत्परायण होऊन केवळ केलेली आहे. तिच विषयही केवळ भगवंताचें यशोवर्णन किंवा भक्ति होय. मग असल्या प्रकरणांत पंचमहाकाव्यांशी त्याचा जरी अत्यंत परिचय असला तरी तो सदर्हू विषयांत कोणत्या मार्गानें यावा हें लक्षांत ये नाहीं. फार लांब कशाला ? आपल्या या महाराष्ट्रभाषेची सेवा आजपर्यंत कित्येक चांगल्या नांवाजलेल्या विद्वानांच्या हातून झाली आहे. पण आपल्या मालेंत जसा प्रकार पदोपदीं आढळतो— आपलें जबरदस्त अनेकग्रंथावलोकन व अध्ययन—तसा प्रकार या विद्वानांच्या लेखांत अगदीं दृष्टी पडत नाहीं.........'साक्रेटिसाचें चरित्र', 'अनेकविद्यामूलतत्वसंग्रह', 'पद्यरत्नावली' हे ग्रंथ ज्यांन महाराष्ट्रभाषेंत रचले त्यांच्या ठायीं जी पंडितता व गहन विद्वत्ता होती तिजविषयीं वरील ग्रंथांवरूनच जर कोणी कल्पना करूं लागला तर ती मूळच्या खऱ्या प्रकाराशीं कितपत जुळेल ? " 'सम्पादक

एकाद्या मनुष्याविषयीं ह्मणावें, कीं पोषाखावरून हा श्रीमंत असावासा दिसत नाहीं, त्याप्रमाणेंच वरील विधान होय. त्यांतील मुद्दा येवढाच आहे कीं जर मोरोपंताच्या ग्रंथांवरून पूर्वोक्त काव्यांशीं त्याचा परिचय होता असें कोणी ह्मणूं लागेल तर त्यास तसें ह्मणतां येणार नाहीं. यापलीकडे वरील वाक्यांतून अर्थनिष्पत्ति होत नाही. प्रस्तुत कवि पंडित नव्हता हा जो आमचा उल्लेख आहे त्याचे आधार निराळे आहेत.

प्रस्तुत आक्षेपकाचें तिसरें ह्मणणें असें आहे कीं, केवळ 'अनुष्ठितुं' व 'पुनीते' या दोन रूपांवरून प्रस्तुत कवीच्या व्याकरणज्ञानाची परीक्षा करतां येत नाहीं. ही कोटि § आह्मांस सयुक्तिक वाटत नाहीं. आह्मांस खास वाटतें कीं, ज्यानें व्याकरणाचें अध्ययन केलें आहे त्याच्या हातून वरच्यासारख्या चुका कधींही होणार नाहींत. वामन पंडिताच्या एका चरणाचें पत्रकारानें उदाहरण दिलें आहे. पण त्यावरून वरील कवीच्या शैथिल्याखेरीज दुसरी कोणतीही गोष्ट ठरत नाहीं. रचनेच्या संबंधानें वरील प्रमाद कवीनें बुद्धया केले असतील असें ह्मणणेंही ठीक नाहीं; कां कीं, आमच्या कवीची व्यावकरणशुद्धतेबद्दल अतिशयित ख्याति आहे. मग याच ठिकाणीं त्यानें मुद्दाम चिखलांत पाय बुडवला असेल हें मुळींच संभवत नाहीं. याप्रमाणेंच लेखकप्रमादाची कल्पनाही बसण्यासारखी नाहीं हें उघड आहे; कां कीं, तसें असतें तर खरा पाठ बसवण्यास फारशी पंचाईत पडतीना. आतां एक मात्र सदरील पत्रकाराची कल्पना वास्तविक आहे खरी; कीं 'मुक्तामाला'दि ग्रंथांत शेंकडों चुका आढळण्याचा संभव होता. पण हे ग्रंथ निवळ संस्कृत असल्यामुळें कवीनें त्यांच्या रचनेकडे विशेष लक्ष पुरवलें असेल असें ह्मटल्यास साजणार आहे.

रा० कानेटकर यांचा प्रस्तुत कवीच्या तर्फेनें चौथा मुद्दा † असा आहे कीं, कालि-

---

§ कानेटकर ह्मणतात, "जर प्राकृत आर्यांत मोरोपंताच्या अशा चुका दृष्टीस पडतात, तर मग या कवीचे संस्कृत ग्रंथ जे 'मुक्तामाला', 'मंत्ररामायण' वगैरे यांत तर त्या किती असल्या पाहिजेत कोण जाणे? त्यांची गणती चित्रगुप्तास देखील होणार नाहीं. व असाच प्रकार त्या ग्रंथांत असल्यास त्यांस ग्रंथ हें थोर नामाभिधान तरी शोभेल काय? शिवाय वरील रूपें मोरोपंतानें लिहिलीं आहेत यावरून जर त्याच्या व्याकरणज्ञानाची परीक्षा करावी तर मग वामनपंडिताच्या एका श्लोकांतील एका ओळींत जितके शब्द आहेत त्याच्या दुप्पट चुका आहेत असें आपण एके ठिकाणीं लिहिल्याचें स्मरणांत येतें. (ती ओळ बहुधा ही असावी—'मौन्यपणें अथवा बस तूं उगा'). मग त्यावरून पंडितांचें पंडितत्व कितीसें ठरेल ? व असाच निर्णय झाल्यास ज्यानें सुवर्णाची सुरी यज्ञोपवीतास लावून व दिवसां दीपशिखा प्रज्वलित करून आर्यावर्तांतील अनेक पंडितांच्या माना शास्त्रवादांत मोडल्या त्याची ही सर्वप्रसिद्ध गोष्ट केवळ दंतकथेंत झुगारून द्यावी लागेल ! ! वरच्यासारखीं मोरोपंताच्या काव्यांत जर अशीं स्थळें आढळलीं तर तीं प्राकृत भाषेच्या जुळणीसाठीं किंवा प्रासयमकादिकांकरितां तशीं तीं त्यानें बुद्धया केलीं नसतील कशावरून ?.........लेखक-प्रमादानें व बुद्धिपुरःसर पाठ फिरविले असतील तर 'अनुष्ठितुं', 'पुनीते' वगैरे शब्द मूळचे कवीचेच कीं कसें हा प्रकार संदिग्धच दिसत आहे." 'सम्पादक'

† कानेटकर लिहितात, "मोरोपंतानें आपणास मयूर, मयूरेश असें ह्मणविलें आहे येवढ्या—

( पुढें चालू. )

दासानेंही ' रघुवंशा 'च्या आरंभीं आपली अत्यंत नम्रता प्रगट केली आहे; मग याच अर्थानें मोरोपंताच्या दोन केकाही घ्याव्या. हें केकांचें प्रमाण आह्मी मोठेसें प्रबळ ह्मणून दाखल केलें आहे असें नाहीं; तें केवळ पूर्वोच्यांस पुष्टीकरणरूप होय. ग्रंथांच्या आरंभीं वगैरे वाचक मंडळीची क्षमा मागण्याची जशी सर्वत्र शिष्टजनरीति आढळते तसा कांही प्रकार पूर्वोक्त श्लोकांत मानण्यास हरकत नाही हें खरें; तरी एकंदर धोरणावरून पाहतां पूर्वोक्त केका केवळ उपचारार्थक आहेत असें आह्मांस वाटत नाही.

आतां प्रस्तुत पत्रकारानें शेवटीं एकंदर महाराष्ट्रकवींच्या संबंधानें जो आपला उद्गार* प्रकट केला आहे त्याचा विचार करून हें उत्तर आटपतों. हा उद्गार • कृतज्ञताबुद्धीनें

वरून तो आपली पदवी ओळखून होता असें आपलें ह्मणणें आहे. परंतु हेंही मला खरें भासत नाहीं. आपण जगन्नाथ, जयदेव, व रामजोशी अशीं उदाहरणें आपल्या मताच्या समर्थनार्थ दिलीं आहेत. पण मला असें वाटतें कीं, हा आपल्यास मोठें उपपद घेऊन स्वतांविषयींचा उल्लेख करण्याचा प्रघात संस्कृतांत अगदीं अलीकडे पडला असावा. ह्यास ... ... आपण दाखविलेल्या उदाहरणांखेरीज आणखी दोन उदाहरणें आहेत. एक सुबंधु व दुसरे भारतचंपूचे कर्ते अनंतकवि. पण हे प्राचीन नाहींत हें उघड आहे.......पंडितांच्या ग्रंथांप्रमाणें सर्व कवींच्या ग्रंथांत दर्पोक्तिच असतील असें मला वाटत नाहीं. आपले कविकुलगुरु वाग्देवीचे येवढे मोठे आवडते कंठमणि असतां त्यांणीं आपल्या ग्रंथांत स्वतांविषयींची फुशारकीची दर्पोक्ति प्रगट केली आहे असें नाहीं. एका ठिकाणीं मात्र सूत्रधार श्रोतृवृंदास अनुलक्षून ह्मणतो कीं, ही कृति कालिदासाची आहे यासाठीं श्रोत्यांनीं अवधान द्यावें. पण ही अहंकारोक्ति नसून कालीदास लोकप्रिय होता इतकेंच यापासून होतें. पण उलट मात्र प्रमाण आहे. मोरोपंताप्रमाणें कालिदासानेंही आपल्या कृतीविषयीं धाक बाळगिला दृष्टीस पडतो. 'रघुवंश' सर्ग १ ला यांतील आरंभींचीं चार पांच पद्यें (क सूर्यप्रभवो वंशः क चाल्पविषया मतिः। तितीर्षुर्दुस्तरं मोहादुडपेनास्मि सागरम् ॥२॥ रघूणामन्वयं वक्ष्ये तनुवाग्विभवोऽपि सन्। तद्गुणैः कर्णमागत्य चापलाय प्रचोदितः ॥९॥ इ० सं०)पाहिलीं असतां माझ्या ह्मणण्याचा प्रत्यय येईल. याशिवाय कवीच्या स्वतःविषयींच्या उक्तींवरूनच त्याच्या अंगच्या गुणांविषयीं अगर योग्यतेविषयीं अनुमान करूं गेल्यास तेंही चमत्कारिकच होईल. 'रघुवंशां'त आरंभींच कालिदासानें ह्मटलें आहे:—

"मन्दः कवियशः प्रार्थी गमिष्याम्युपहास्यताम्।
प्रांशुलभ्ये फले मोहादुद्बाहुरिव वामनः ॥३॥"

ज्यानें आपणास 'मंद' ह्मणजे जडबुद्धि असें ह्मणवून घेतलें त्याची योग्यता त्याच्या ह्मणण्यावरूनच ठरवावी काय ? प्राकृतांत तर असा प्रकार पुष्कळच आहे. श्रीधरानें तर आपल्या ग्रंथांत जागजागीं असें लिहिलें आहे कीं, 'ही सर्व ग्रंथरचना पांडुरंगानें केली आहे. मी केवळ अज्ञान बालक आहें.' प्रस्तुत प्रसंगीं इंग्रजी भाषेंतीलही एक ठळक उदाहरण येथें देण्यासारखें आहे. तें हें कीं अर्वाचीन निबंधकारांतील अतिविख्यात जे मेकॉलेसाहेब त्यांणीं इंग्रजी भाषेंत येवढी सरस, मार्मिक व चटकदार ग्रंथरचना केली असतां व ते अनेकभाषाकोविद असतांही स्वकृतीविषयीं त्यांनीं मनांत धाक बाळगला होता असें त्यांच्या निबंधग्रंथांतील प्रस्तावनेवरून दिसून येणार आहे." 'सम्पादक'

* कानेटकर ह्मणतात, "सरतेशेवटीं माझें असें ह्मणणें आहे कीं, ज्या महाराष्ट्रकवींनीं भारत, भागवत आदिकरून पुराणग्रंथांचा सर्व आशय विषयानुक्रमानें व कथासूत्रानें महाराष्ट्रवाणींत आपल्या रसाळ व प्रासादिक उक्तींनीं ग्रथित केला ते केवळ अविद्वान् किंवा अगदीं साधारण प्रतीचे होते असें

(पुढें चालू.)

परिप्लुत आहे खरा, पण त्यावरून आमच्या आक्षेपकानें कवित्वाच्या स्वरूपाविषयीं चांगलासा विचार केला नाहीं, व 'विद्वत्व' या शब्दाचा अर्थही तो फार संकुचित घेतो, हें व्यक्त होतें. वर(पृ.९४५'सं.') टिपेंत सांगितल्याप्रमाणें प्रस्तुत मालेच्या तिसऱ्या व चवथ्या अंकांत वरील विषयाच्या संबंधानें ऊहापोह केला आहे; तो ध्यानांत आणला असतां महाराष्ट्रकवींवर अविद्वत्त्व स्थापल्यानें केवळ साहसोक्तीचा दोष येतो असें नाहीं हें आमच्या आक्षेपकास कळून येईल. 'रसाळ व प्रासादिक उक्तीं'स विद्वत्तेची काय गरज आहे ? तुकाराम-प्रभृति शूद्र कवींचे ठायीं व महिपत्यादि ब्राह्मण कवींचे ठायीं कितपत विद्वत्ता होती, ती त्यांच्या एकंदर स्थितीवरून व ग्रंथांवरूनही स्पष्ट दिसण्यासारखी आहे. मग ज्या गुणाची ते स्वत:ही पर्वा करीत नसत त्याची त्यांवर बळेंच स्थापना करूं पाहणें हा कृतघ्नतेचा कोण प्रकार !

---

किं कवेस्तस्य काव्येन किं काण्डेन धनुष्मतः ।
परस्य हृदये लग्नं न घूर्णयति यच्छिरः ॥[१]

अंक ६३ (१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) मोरोपंतास कवि ही संज्ञा लागेल कीं नाहीं याविषयीं विचार. (३) प्रस्तुत कवीचे कवित्वगुण. (४) त्याच्या कवितेंतील गुण. (५) दोष. (६) उपसंहार.

१. येथवर प्रस्तुत विषयाच्या संबंधानें लोकांत अनुकूल व प्रतिकूल मतें काय काय आहेत त्याविषयीं विवेचन झालें. आतां आमचीं मतें काय काय ठरलीं आहेत तीं दाखल करतों.

२. प्रथमत: अगदीं मुख्य मुद्दा जो कवित्वाचा,—ह्मणजे मोरोपंतास 'कवि' ही संज्ञा यथार्थरीत्या लावतां येईल कीं नाहीं,—याच्या संबंधानें विचार करायाचा. या मुद्द्यावर आमचें ठरीव मत काय आहे हें फार करून सांगायाला नकोच. इतर अनेक विषयांवर आमचा व इतर मंडळीचा जसा मतभेद आहे त्याप्रमाणेंच यावरही आहे, व आमचें मत पूर्णपणें वाचकांस कळावें यास्तव गेल्या दहा अंकांत त्यावर सविस्तर विवरण केलें आहे.

---

ह्मणणें साहसाचें आहे. कारण येवढाले प्रचंड ग्रंथ वाचून त्यांचा संपूर्ण अर्थ ग्रहण करून तो प्राकृत मुशींतून यथास्थितपणें ओतण्यास तयार होणें ह्मणजे साधारण काम नव्हे. ते जरी मोठे जबरे पंडित नसतील तरी त्यांच्या अंगीं विद्वत्ता पुष्कळ चांगली असावी यांत संशय नाहीं. विद्वानास जशी आपल्या ज्ञानाचा तोरा मिरविण्याची सोय असते तशी सोय मोरोपंतादि प्राकृत कवींच्या अंगच्या खऱ्या साधुत्वामुळें त्यांना नव्हती. पण असल्या ज्ञानाचीही ते बिलकुल पर्वा करीत नसत हें त्यांच्या शेंकडों उद्गारांवरून स्पष्ट दिसत आहे." 'सम्पादक'

१. "तें कवीचें काव्य काय कामाचें, व तो तिरंदाजाचा तीर काय कामाचा, कीं जीं हृदयाशीं येऊन थडकलीं असतां मुरकुंडी वळत नाहीं !"

त्यावरून पाहतां आमचा अभिप्राय सर्वांच्या सहज लक्षांत येण्यासारखाच आहे. तो हा की, 'कवि' ही संज्ञा प्रस्तुत कवीस पूर्णपणें लागेल.

वरील निर्णय आह्मीं कशावरून केला असें जर प्रस्तुत कवीचे प्रतिपक्षी आह्मांस विचारतील तर त्यांस निश्चयात्मक उत्तर देणें कठिण पडेल.[1] कविता हा विषय हृदयगम्य आहे, बुद्धिगम्य नव्हे; ह्मणजे कविता ह्मणावी कोणती व न ह्मणावी कोणती याचा निर्णय सहृदय मनुष्यास करतां येईल, केवळ जो बुद्धिमान् आहे तो करूं शकणार नाहीं. ज्याप्रमाणें अंधळ्या मनुष्यास एकाद्या पदार्थाची केवळ स्पर्शज्ञानावरून काय होईल तेवढीच कल्पना होईल, रंगाची कल्पना तर त्यास स्वप्नींही व्हावयाची नाहीं; किंवा उत्कृष्ट रूपवतीविषयींही स्त्रीबाची भावना ह्मणजे काय ती मानुषीत्वधर्मेंकरून होईल; बाकी कामिजनास जो अनुभव घडतो, की—

स्पृशन्त्यास्तारुण्यं किमिव न हि रम्यं मृगदृशः ? ।[2]

"यौवनांत आलेल्या सुंदर स्त्रीचें मनोहर नाहीं असें काय आहे ?"—या गोष्टीची

---

१. पोप यास कवि ह्मणावा कीं नाहीं हा वाद जॉन्सनच्या वेळेपासून चालत आला आहे. त्यास उद्देशून वरील पंडितानें जें लिहिलें आहे तेंच प्रस्तुत प्रसंगींही लागू पडणारें आहे. हा लेख वरील कवीच्या चरित्राच्या शेवटीं आहे:—

"After all this, it is surely superfluous to answer the question that has once been asked, whether Pope was a poet, otherwise than by asking in return, "If Pope be not a poet, where is poetry to be found ?" To circumscribe poetry by a definition will only show the narrowness of the definer, though a definition which shall exclude Pope will not easily be made. Let us look round upon the present time, and back upon the past; let us inquire to whom the voice of mankind has decreed the wreath of poetry; let their productions be examined, and their claims stated and the pretensions of Pope will be no more disputed. Had he given the world only his version, the name of poet must have been allowed him; if the writer of the "Iliad" were to class hiss uccessors, he would assign a very high place to his translator, without requiring any ether evidence of genius."

२. वरील चरण भर्तृहरीच्या 'शृंगारशतकां'तील एका श्लोकांतील आहे. तो श्लोक हा:—

स्मितं किञ्चिद्वक्त्रे सरलतरलो दृष्टिविभवः
परिस्पन्दो वाचामविरलविलासोक्तिसरसः ।
गतीनामारम्भः किसलयितलीलापरिकरः
स्पृशन्त्यास्तारुण्यं किमिव न हि रम्यं मृगदृशः ? ॥६॥

याचें वामनकृत भाषांतर येणेंप्रमाणें आहे:—

डोळे विशाळ अणि चंचळ मंद हास
चातुर्ययुक्त वचनीं मिरवे विलास ।
शोभा हरी चरण कोमल पल्लवांची
कीं चांगलीच तरुणत्व—दशा स्त्रियांची ॥

त्यास कल्पनाही करतां येणार नाहीं, त्याप्रमाणेंच सत्कवींच्या कृतींचा साक्षात्कार नेत्रद्वारां अथवा कर्णद्वारां झाला असतां थरारून जाणें, गहिंवरून जाणें, देहभान विसरणें, साश्रु होणें, हीं सर्व लक्षणें जो सहृदय त्याचेच ठायीं दृष्टीस पडतील; एरवीं कोणी केवढाही पंडित असला तरी वरील गुणाव्यतिरिक्त त्यास अत्युत्कृष्ट काव्याचेंही रमणीयत्व बिलकुल कळून येणार नाहीं. तसेंच काव्यांतील रस हा केवळ स्वानुभवगम्य असल्यामुळें तो दुसऱ्याच्या आटोक्यांत आणून देणें हेंही दुर्घटच आहे. प्रस्तुत विषय तर्कशास्त्रास अगोचर असल्यामुळें अमुक काव्य रसभरित आहे व अमुक नीरस आहे हें सिद्ध करून दाखवणें केवळ अशक्य होय. यास्तव मोरोपंत हा खरा कवि होय असें आह्मी कां समजतों याचीं कारणें आमच्यानें देववत नाहींत. वरील विधानाची सिद्धता आह्मी केवळ पुढील रीतीनें करतों.

पहिली गोष्ट तर ही कीं, आज शंभर वर्षे मोरोपंताची जी ख्याति चालत आली आहे ती त्याच्या अंगीं खरे कवित्वगुण नसते तर कधीं चालत आली नसती. कोणत्याही कवीच्या योग्यतेचें ठीकळ प्रमाण त्याची लौकिक प्रसिद्धि व या प्रसिद्धीचा काळ हीं धरायास हरकत नाहीं. आजपर्यंत जगांत जेवढे कवि होऊन गेले त्या सर्वांस वरील प्रमाण पूर्णपणें लागू पडतें. ज्याची जेवढी योग्यता तेवढ्याच मानानें त्याची लोकांत प्रसिद्धि व त्याच्या कीर्तीचा स्थाईकपणा. तर हेंच प्रमाण प्रस्तुत कवीवर लागू केलें असतां चालणार आहे. आतां हें खरें आहे, कीं आलीकडील विद्वान् मंडळीनें त्याच्या प्रसिद्धीचें एक मोठें कारण काढून ठेवलेंच आहे; तें कोणतें तर त्याची यमकरचना! पण केवळ यमकरचनेवरून कोणाचा कविवर्गांत रिघाव होईल हें संभवत नाहीं. तसें असतें तर संस्कृतांतील 'रामकृष्णविलोमकाव्य' इत्यादि कृत्रिम प्रबंधांची पंचमहाकाव्यांहून ज्यास्ती प्रसिद्धि होती. अर्थाला बिलकुल धक्का न लागतां लांबलांब यमकें सहज साधणें हा प्रकार जेव्हां प्रस्तुत कवीच्या काव्यांत प्रथमतः दृष्टीस पडूं लागला असेल तेव्हां श्रोत्यांचीं व वाचकांचीं मनें तेव्हांच तल्लीन होऊन गेलीं असतील हें खरें; पण यमकें मात्र भपकेदार असून आंत कांहीं अर्थ नाहीं असा जर वरील काव्यांतील प्रकार असता तर त्याची येवढी प्रसिद्धि कधीं न होती, व पूर्वींच्या महाराष्ट्रकवींत मोरोपंताची जी एकदम गणना झाली, व उत्तरोत्तर तर तो वरील मंडळींत शेवटला असतां अग्रगण्य होऊन बसला हेंही कधीं घडतेंना. तर प्रस्तुत वादाचा निर्णय करण्यास वरील सामान्य प्रमाण बरेंच उपयोगीं पडेल.

वरच्याहून सबळ कारण अर्थातच प्रस्तुत कवीच्या कृतींतच जें सांपडतें तें होय. आह्मांस खास वाटतें कीं, ज्यास लवमात्र ह्मणून सहृदयता आहे तो प्रस्तुत कवीच्या ग्रंथांचें उगीच वरचेवर (वरवर'सं'•) अवलोकन करूनही प्रकृत वादाच्या संबंधानें फार वेळ द्वैधांत राहणार नाहीं. ज्याप्रमाणें लोहचुंबकाची परीक्षा करायाची असल्यास त्याचें व लोहाचें सान्निध्य झालें कीं बस आहे, मग लोहाला मागें ओढलें तरी तें जाऊन चुंबकास चिकटणारच; त्याप्रमाणेंच ज्यास सत्काव्याचें मर्म समजतें आहे व ज्यावर सत्कवींचीं वचनें मोघ होत नाहींत, तो आमच्या महाराष्ट्रकवींचा सरस्वतीनिष्यंद सेवतांच लुब्ध होऊन जाईल यांत बिलकुल संशय

नाहीं. तसेंच ज्यास प्रकृत कविता वाचून बरच्यापैकीं कांहींच अनुभव येणार नाहीं त्यानें आपले ठायीं अरसिकता मानली अथवा आपल्या मनावर दुराग्रहाचा पगडा जबरदस्त आहे असें मानलें तर मोठीशी चूक होणार नाहीं असें आह्मी खात्रीनें सांगतों.

३. असो; आतां ज्या कवित्वगुणांवर आह्मी इतके लुब्ध होऊन गेलों आहों, व ज्यांच्या योगानें आमचें प्रेम प्रस्तुत कवीवर इतका काळ पावेतों स्थिर होऊन बसलें आहे, ते गुण कोणते ते सांगतों. कवितेचीं अंगें दोन; एक पदरचना, व दुसरें अर्थरचना. उत्कृष्ट कवींच्या पदरचनेचे गुण ह्मटले ह्मणजे शब्दांचा साधेपणा व अन्वयाचा सरळपणा हे होत. व अर्थरचनेचे गुण प्रसाद व गांभीर्य हे होत. या चार गुणांपैकीं दुसरा व चवथा हे प्रस्तुत कवीच्या कृतींत दृष्टीस पडतात कीं नाहींत याविषयीं कोणी अभिज्ञ व रसिक शंका घेईलसें वाटत नाहीं. पहिल्या व तिसऱ्याविषयीं मात्र तसें केवळ विधान करवत नाहीं. आमच्या कवीस भवभूत्यादिकांप्रमाणें प्रौढ रचनेची अत्यंत आवड असल्यामुळें त्यानें आपल्या प्राकृत काव्यांतही मोठमोठ्या संस्कृत शब्दांस व लांब लांब समासांस स्थल देऊन जॉन्सन्‌नें ज्या प्रकारचें स्वरूप इंग्रेजी भाषेस दिलें तसें यानें मराठीस दिलें. या त्याच्या रचनाविशेषास्तव केवळ प्राकृतज्ञास त्याच्या काव्यांत पुष्कळ ठिकाणीं प्रसन्नत्व दिसणार नाहीं हें खरें, तरी व्युत्पत्तीचा ज्यास अंमळ संस्कार लागला आहे त्याची कुरकुर प्रस्तुत कवीच्या ग्रंथांच्या संबंधानें फारशी येईल असें वाटत नाहीं. तर याप्रमाणें पदरचना व अर्थरचना या दोन्ही प्रकारांवरून पाहतां आह्मी मोरोपंताची महाकवींत गणना करतों.

महाकवींचे ठायीं दुसरें मोठें लक्षण हें आढळतें कीं, संपूर्ण रसवर्ग जसा काय त्यांच्या स्वाधीन असतो. चितान्याच्या पाशीं सारे रंग जसे सदैव सिद्ध असतात, पाकाचार्यापुढें षड्रस जसे हात जोडून उभे असतात, त्याचप्रमाणें कवीचीही गोष्ट होय. सारी भाषा ही जशी काय त्याची अंकित होऊन गेलेली असते, यास्तव तो अशी कांहीं चमत्कारिक शब्दांची सांगड घालून देतो कीं, वर्णनविषयक पदार्थ जसा काय डोळ्यांसमोर उभा राहतो, व वर्ण्य मनोवृत्तीशीं वाचकाच्या चित्ताचें तादात्म्य होऊन जातें! मोरोपंताच्या कवितेंत वरील रसाविर्भावाचीं शेंकडों उदाहरणें आहेत. तीं आमच्या वाचकांपैकीं बऱ्याच मंडळीस निर्दिष्ट करायास पाहिजेत असें वाटत नाहीं. शिवाय या पुस्तकांतच अनेक उतारे आजपर्यंत दाखलही केले आहेत. तरी प्रस्तुत विवेचनाच्या परिपूर्त्यर्थ कांहीं उत्कृष्ट स्थलांचा येथें विशेषत: निर्देश करणें प्राप्त आहे.

प्रस्तुत कवीची शृंगारवर्णनाची हतोटी कोणत्या तऱ्हेची आहे हें ज्यास पाहावयाचें असेल त्यानें 'आदिपर्वा' तील शर्मिष्ठा व ययाति आणि शकुंतला व दुष्यंत यांचे प्रसंग पाहावे; 'वनपर्वा' तील उर्वशीकृत अर्जुनविलोभन व 'विराटपर्वा' तील कीचककृत द्रौपदीप्रमाथ हीं दोन प्रकरणेंही वरील रसाचींच उदाहरणें होत. विप्रलंभ शृंगाराचा प्रकार पाहणें असल्यास 'मंत्ररामायणा'त रामास पंपेच्या दर्शनानें उत्पन्न झालेल्या सोत्कंठ अवस्थेचें वर्णन केलें आहे तें पाहावें. वीररसाचा मासला पाहावयाचा असेल त्यानें 'वनपर्वा'-तील किरातार्जुनयियुद्ध, 'विराटपर्वा' तील अर्जुनप्रकटन, 'भीष्मपर्वा' तील भार्गवभीष्मयुद्ध

इत्यादि कथानकें पाहावीं. सारें ' रामायण ' व ' महाभारत ' हीं काव्येंच मुळीं ' इलियड् '-प्रमाणें वीररसानें परिप्लुत असल्यामुळें तो रस त्यांत हव्या तितक्या स्थलीं सांपडणारा आहे हें उघडच आहे, यास्तव प्रस्तुत रसाच्या संबंधानें स्थलनिर्देशन हेंच वस्तुतः पाहतां अप्रस्तुत होय. अद्भुत रसही वीररसप्रधान काव्यांच्या अनुषंगानेंच राहणारा आहे यास्तव त्याचीं उदाहरणेंही विशेषतः सांगायाला नकोत. करुणरसाची परीक्षा कर्तव्य असतां ती पुढील उदाहरणांवरून चांगली होण्यासारखी आहे;—वनपर्वांत नल दमयंतीला निजल्या जागीं अरण्यांत सोडून जात आहे तो प्रसंग; यक्षाच्या शापेंकरून चारी भाऊ मरण पावले असतां धर्मराजाचा शोक; ' स्त्रीपर्वा 'त समरांगणांवर कुरुस्त्रियांनीं केलेला विलाप; व ' मंत्ररामायणां 'त रामलक्ष्मणांस इंद्रजितानें मूर्छित केलें असतां सीतेस त्यांचीं निश्चेष्ट शरीरें पाहून झालेलें दुःख. ' गदापर्वा 'त भयानक रस पूर्ण आहे. रौद्राचें उत्कृष्ट उदाहरण ' कर्णपर्वा '-तर्गत दुःशासनवधप्रकरण होय.

याखेरीज मोरोपंताच्या कवितेंत जागोजाग मनोरम पद्यें, वर्णनें, भाषणें वगैरे महाकवींच्या कृतींतून आढळणारे सर्व प्रकार भरपूर आहेत. त्यांचा निर्देश करणें केवळ अशक्य होय. यास्तव सरतेशेवटीं येवढेंच सांगून बस करतों कीं, ज्या कोणास प्रस्तुत कवीच्या कवित्वगुणांची थोडक्यांत परीक्षा कर्तव्य असेल त्यानें ' केकावलि ' काव्य पाहावें. तें हातीं घेतलें असतां कालिदासाचें गुणसर्वस्व जसें ' मेघदूतां 'त आढळणारें आहे, जगन्नाथाच्या वाणीचें रससर्वस्व जशी ' गंगालहरी ' प्रगट करते, त्याचप्रमाणें वरील केकारवही प्रस्तुत कवीच्या गुणांविषयीं निर्णायक होईल.

वरील विवेचनावरून मोरोपंत हा कवि आहे कीं नाहीं या मुख्य मुद्द्याचा व कविवर्गांत त्याची पायरी कितीशी उंच येईल या गोष्टीचाही निकाल होण्यासारखा आहे. आतां प्रस्तुत विषयाच्या एका भागावर मात्र लिहून हा दोन वर्षें चाललेला निबंध आटपतों.

४. हा अवशिष्ट भाग प्रस्तुत कवीच्या गुणदोषांचें विवेचन हा होय. टीकाकर्त्याचें काम म्हटलें म्हणजे कोणत्याही विषयाचें जें स्वरूप त्याच्या लक्षांत येईल तें त्यानें निःपक्षपात बुद्धीनें वाचकांस सादर करावें हें होय. तर हें कर्तव्य मनांत आणून आजपर्यंत मोरोपंताच्या कवितेशीं आमचा जेवढा परिचय घडला तेवढ्यावरूनच आमच्या मनांत तिचें स्वरूप जें आलें तें येथें प्रगट करतों. हें स्वरूप अर्थातच गुणदोषात्मक होय. तर आतां दोहोंचा क्रमानें निर्देश करतों.

मोरोपंताच्या कवितेंत आढळणारा पहिला मोठा गुण म्हटला म्हणजे हा होय कीं, त्यानें भाषेच्या शुद्धतेकडे[1] अत्यंत लक्ष दिलेलें आढळतें. हें लक्ष पूर्वींच्या कोणत्याही महा-

---

1. नागपुरच्या वा. दा. ओकांचें १६ जून १८८० चें पत्र मालेच्या ६६ व्या (जून १८८० च्या) अंकांत आलें असून त्यांत ते म्हणतातः—

"आपला उल्लेख माझ्या अल्पबुद्धीस पूर्णपणें यथार्थ वाटत नाहीं. कारण मोरोपंताच्या कवितेंत ऱ्हस्वाचें दीर्घ, दीर्घाचें ऱ्हस्व, इत्यादि प्रकार कोठें कोठें आढळतात. मराठी भाषेस ज्या-

(पुढें चालू.)

राष्ट्रकवीचे ठायीं दिसून येत नाहीं. सरासरी अर्थाचा बोध झाला ह्मणजे झालें. मग व्याक-

करणशुद्धता येईल तितकी आणण्याकरितां मोरोपंतानें प्रयत्न केला आहे. बहुधा अशुद्ध रूपें त्याच्या काव्यांत फारच थोडीं आढळतील. मराठी भाषेला संस्कृत भाषेच्या पद्धतीवर नेण्याचा त्याचा यत्न पुष्कळ ठिकाणीं नजरेस येतो; इतकें. सर्व खरें आहे; तथापि त्याच्या काव्यांत ऱ्हस्वदीर्घांचे दोष आढळत नाहींत असें नाहीं. अशा दोषांचीं उदाहरणें.........:—

(अ) ऱ्हस्वाचें दीर्घः—

नागपुरीं भगिनीचें शकुनी पूजूनि सूरि, दान करी. ।
नगरपथांतें पंकिल करिती तद्दत्त भूरिदान करी. ॥
आर्याभारत, आदिपर्व (१६. १४ सं०)

सत्य, प्रिय, हित बोलुनि, योजुनि अंकीं निवास, रमणीतें ।
घेउनि, देवुनि अधरामृत, भोगी रत्न वासरमणी तें ॥ कित्ता,(१७,१४. सं०)

'कर्णा ? दंडक रुचला तुज फार तुझा, परंतु हा नीच; ।
सावध हो, नाहीं तरि, होईल प्राणकीर्तिहानीच'. ॥ कित्ता, (२६,३४. सं०)

बापा धर्मा ! कोणी विधेनें मज असा कवी नाहीं. ।
प्राचीनांहीं जैसे, तैसे कर जोडिले नवीनाहीं. ॥
आर्याभारत, अनुशासनपर्व, ६, ४१.

जननीजनकपदांतें नित्य नमस्कारिति प्रभू तनय, ।
शिकवी गुरुभक्ति जना देवांचा करि हित प्रभूत नय. ॥ बृहद्दशम, (८५,३४. सं०)

गणपतिसे सर्वांहीं पूजावे जे जपोनि, धीरा या ।
प्रभुसि पुसुनि, पिंडारक जें, त्या गेले, तपोनिधी, राया ! ॥
मंत्रभागवत, ११, ४.

कोठें दूरान्वित पद, कोठें चुकली असेल यतिमात्र; ।
'अतिमात्र दोष' ऐसें न वदोत कवी समस्तगुणपात्र. ॥
मंत्ररामायण, उपक्रम, १९.

ज्या वेद-प्रतिपाद्याप्रति पाद्या सत्यलोकपति अर्पी ।
तें पाप ताप धारी धारी विश्वेश्वरासही तर्पी ॥ भीष्मभक्तिभाग्य, २.

देवर्षि ब्रह्मर्षी राजर्षी तेथें तेधवां आले, ।
त्या भरतनायकातें देखाया सर्व एकवट झाले. ॥ कित्ता, ३६.

जेव्हां मानेल मना तेव्हां टाकीन या शरीरा हो ! ।
तोंवरि मदग्रमार्गी हा गीताऽमृतनिधी हरी राहो ॥ कित्ता, ८४.

[नागपुरी=हस्तिनापुरांत; सूरि=विद्वान्, पंडित; पंकिल=चिखलानें भरलेले; तद्दत्त भूरिदान करी=त्यानें दिलेले व गंडस्थलांतून पुष्कळ मदजल वाहत असलेले हत्ती. वासरमणि=सूर्य. दंडक=रीत, नियम. या=कृष्णाला; पिंडारक हें एका क्षेत्राचें नांव आहे. यतिमात्र=विरामस्थान. सं०] यासारखीं ऱ्हस्वाचें दीर्घ केल्याविषयींचीं अनेक उदाहरणें पंतांच्या काव्यांत आढळतात. संस्कृतांतील ऱ्हस्व इकारांत आणि ऱ्हस्व उकारांत नामें कवितेंत छंदानुरोधानेंच लिहिण्याचा प्रघात आहे."

याच मुद्द्यासंबंधीं उत्तरादाखल गणपतराव हरीहर कुरुंदवाडकर यांचें पत्र ६९ व्या (सप्टेंबर १८८० च्या) अंकांत आलें असून त्यांचें या बाबतींत असें ह्मणणें आहे कीं "ऱ्हस्वाचें दीर्घ सामासिक

(पुढें चालू.)

रण किती कां चुकेना, असें पूर्वींच्या कवींचें एकंदर धोरण दिसतें. पण या चरम महाराष्ट्र-

शब्दांतील मधल्या अक्षरास जाहलें असतें तर दूषणीय होतें. हे सर्व प्रयोग शब्दांतीं झालेले आहेत. ज्या संस्कृत शब्दांस प्राकृतत्व येतें. तेथें आह्मी नेहमीं ऱ्हस्वाचे ठिकाणीं दीर्घ उच्चार करितों. तेव्हां भाषासरणीचे नियमाप्रमाणें हे दोष आहेत असें ह्मणतां येणार नाहीं."

(आ) "दीर्घांचें ऱ्हस्वः—

त्या काळीं हृतशेष स्त्रीजनधन, तींचि बहुत भाउनि घे. ।
धर्मांचा, समरमखीं चोरांतें करुनि न हुत, भाउ निघे ॥
आर्याभारत, मौसलपर्व, (२, ५५. सं०)

गंगेमाजि उलूपी तापोनि उडी जसी मगरि घाली. ।
आर्धी बहु शोकीं, मणिपूरीं चित्रांगदा मग रिघाली. ॥
आर्याभारत, महाप्रस्थानिकपर्व (१, २०. सं०)

त्यजुनि मृतनिभा, उतरे हरि; वासुकिचाहि मोहजळ भाउ तरे. ।
जाणोनि हरादीना स्तवि आहि, 'मज रक्ष मृतिजनिहरा ? दीना'. ॥
पूर्व-बृहद्दशम, (१६, ४८. सं०)

'तव चरणसरोज्यांचा ध्यास न मच्चित त्वहि विसरो; ज्यांचा ।
भ्रमतम रजकण वेची, वाणि न करि सत्प्रियतम रज कणवेची. ॥
कित्ता, (२७, ८. सं०)

पाहुनि तो भाउ, सरी देवी न करी जिची, विशोभा उसरी ।
जाली; बहुविध वाहे ताप; रडे, आठवूनि बहु, विधवा हे. ॥
कित्ता," (४९, ८. सं०)

[हृतशेष=हरण केल्यानंतर शिल्लक राहिलेले. भाउनि=मानुनि. मृतनिभा=मृतप्रायाला. वासुकिचा भाउ=कालिया. हरादीना=हर+आदि+ईना=शिवादि देवांच्या स्वामीला. मृति-जनि-हरा !=जन्ममरण चुकविणाऱ्या ! भ्रमतम=भ्रमरूपी अंधार. वाणि=वाण, उणीव. रज=धूळ. कणवेची=करुणेची. सरी=बरोबरी. उसरी=वाळलेलीं वांगीं. 'सम्पादक']

या मुद्द्यासंबंधीं गणपतराव हरीहर कुरुंदवाडकर म्हणतात, "पहिल्या, चवथ्या व पांचव्या आर्यांत 'भाउ' असें ऱ्हस्व रूप आलें आहे तें 'बंधु'याचा 'भाऊ' हा शब्द अपभ्रंश असल्यानें विकल्पानें ऱ्हस्वहि मानणें योग्य दिसतें."

[परंतु बाकीच्या दोन उदाहरणांबद्दल मात्र त्यांचाहि आक्षेप नसल्यानें व उत्तरहि पुरेसें समाधान-कारक नसल्यानें ओकांनीं काढलेला दोष वास्तविक आहे असें म्हणण्यास हरकत नाहीं. दीर्घांचें ऱ्हस्व केल्याचीं आणखीहि उदाहरणें पाहिजे असल्यास बृहद्दशमांतच किती तरी आहेत जसें:— ($\frac{६}{१}$, $\frac{१५}{१}$, $\frac{३८}{१५}$, $\frac{३९}{२३}$, $\frac{४८}{१}$, इ.) आडव्या रेषेच्या वरचा अंक अध्याय व खालचा श्लोक दर्शवितो. 'सम्पादक']

(इ) "अनुस्वाराचें वास्तव्यः—

ओक लिहितातः—"ज्या ठिकाणीं अनुस्वाराकडे लक्ष पुरविलेलें नाहीं अशीं स्थळें पंतांच्या काव्यांत पाहूं गेलें असतां बहुत आढळतील. उदाहरणार्थ पुढील पद्यें पाहा. यांत अनुस्वाराचें वास्तव्य मानलें असतां यमकास धक्का बसतो, कोठें विभक्तिप्रत्ययलोप होतो, इत्यादि दोष उत्पन्न होतात असें वाटतें.

पवनापासुनि झाला सुत बळनिधि भीमसेन, तज्जननीं ।
होय गगन–गी, हर्षें भूमिहि, केवळ न एक तज्जननीं ॥
आर्याभारत, आदिपर्व, (१९, ७१. सं०)

कवीनें आपल्या साऱ्या पूर्वजांचा कलंक धुवून टाकून आपल्या देशभाषेस पुरें प्रायश्चित्त

---

"दुर्योधन साहेना यासि जसा शिशु कणासि नवनींच्या; ।
वाटे, वधिला तेणें; अन्यायचि आवडे, न नय, नीच्या. ॥ किता, (२१,३५. सं०)
तेव्हां स्मित ये वदनीं, न मनीं ये कीं करील हा हानी, ।
झालें दीप्त अलातें जें गेह विझेल काय हाहानीं ? ॥
आर्याभारत, उद्योगपर्व, ४, ८२.
वाढिव धर्मा प्रेमें, वाढवि मज जेंवि नंद नवनीतें, ।
सत्पुत्रांनीं भवनीं सुरतरुनीं न सुख नंदनवनीं तें. ॥ किता, ८, १५.
तों मंत्रौषधिवीर्यें होवूनि विशल्य धर्म राजमणी ।
आला, गगनीं जैसा पूर्ण शरत्पर्वरात्रिनाथ, रणीं. ॥
आर्याभारत, कर्णपर्व, ४७, २१.
"जो हरिपुढें करिल गज, होवूनि मदांध, काननीं चेष्टा, ।
प्राप्ता दशा तयाला होयिल तात्काळ कां न नीचेष्टा ?"॥ हरिवंश, २३, ७.
वामेला बहु भुकला, मानी पहिलीच नवनवी रजनी; ।
झाला जागा; जिकी कामा तो कीर्तिभवन, वीर, अनीं. ॥ मंत्रभागवत, ११,५१३.
तों सामयुक्त वाक्यें राम म्हणे, 'मी असें सदार अनीं; ।
अलीक बंधु माझा; त्याला युग होतसे सदा रजनी.॥ मंत्ररामायण,अरण्यकांड,२०.
असुरांचें उर गांजे§ यत्स्मरणें, वर्ण्य, करिकरां उरगां जे. ॥ बृहद्दशम, ३८,३२.
कुलटा गणिका कामुक जेथें बहुनीच जन तशा स्थानीं ।
राहूं नको क्षणहि कीं दुर्देशीं न प्रवर्तती ज्ञानी ॥ प्रश्नोत्तरखंड, ११, ५१."

[गगन–गी=आकाशवाणी; हाहानीं=हाहाकारांनीं; विशल्य=निघाले आहेत बाण ( शरीरांतून ज्याच्या) असा; शरत्पर्वनाथ=शरदृतूंतील पौर्णिमेचा चन्द्र; नीचेष्टा=नीचास इष्ट (योग्य) अशी; करि–करां=हत्तींच्या सोंडांना; उरगां=सर्पांना. सं०]

याबाबत कुरुंदवाडकर म्हणतात:—"अनुस्वाराचें 'वास्तव्य' या ठिकाणीं 'व्यत्यय' असें असतें तर बरें......प्रथम–यमकावर जर अनुस्वार आहे तर उत्तर–यमकावर आणावयाचाच असा नियम असतां कोठें कोठें या नियमाचा भंग कवीनें केला आहे........प्रथमतः हें मनांत ठेविलें पाहिजे की असा व्यत्यय येणें हा कांहीं वास्तविक दोष नव्हे. कवीनें आपलें बुद्धिवैभव अधिक प्रकट व्हावें म्हणोन हा एक नवीन नियम करून आपलें नियमन करून घेतलें आहे. बरें असो. आपणच केलेल्या नियमाचा आपणच वारंवार भंग करणें हें तरी सत्कवीस योग्य नाहीं या मुद्द्यावर पत्रकारांनीं हा दोष काढिला. ........पैकीं नऊ आर्यांवर जो अनुस्वारव्यत्यय आहे तो (न) आणि (ण) याच अक्षरांवर आहे; व मी खात्रीनें सांगतों कीं मयूरकवीचे स्वकृतानुस्वारनियमभंग जितके म्हणून आढळतील तितके (न), (ण), (म) याच अक्षरांवर आढळतील असा कोणाही वाचणाऱ्याचा मयूरकवीचें काव्य वाचिलें असतां भूयोदर्शनानें व्याप्तिग्रह झाल्यावाचून राहणार नाहीं व मग त्यास कळेल कीं पूर्वोत्तर यमकावर अनुस्वारव्यत्यय येऊं नये असा जरी कवीनें नियम केला आहे तरी (ञ–म–ङ–ण–न) इतक्या अक्षरांचे ठिकाणीं या नियमाचा स्वीकार कवीनें केला नाहीं........कारण हें पांच वर्ण स्वभावतःच अनुनासिक आहेत. याजकरितां त्यांजवर अनुस्वार असला आणि नसला तरी हानि किंवा लाभ कांहीं नाहीं..........करितां त्या (नऊ आर्या) कधींहि कवीस कलंकी करणार नाहींत, उलटें भीडच

( पुढें चालू. )

दिलेलें आढळतें. ऱ्हस्वाचें दीर्घ, दीर्घाचें ऱ्हस्व हा प्रकार कोठें आढळत नाहीं येवढेंच नव्हे;

करितील. राहिली दहावी आर्या. ही मात्र वर लिहिलेल्या नियमाशिवाय आहे. (उरगाजे) (उरगां जे) असें यमक या आर्येचें आहे. या ठिकाणीं (ग) या अक्षरावर अनुस्वारव्यत्यय दिसतो, तथापि मयूरकवीचें अनुस्वारव्यत्यय न होऊं देण्याविषयीं जें लक्ष आहे तें फक्त शेवटील एका अक्षरापुरतेंच, मागील अक्षरांवरही अनुस्वारव्यत्यय होऊं नये अशी कवीची इच्छा व तदनुसार उद्योग आहे, पण तितका कडकपणें नाहीं, जितका शेवटच्या अक्षराविषयीं आहे. [§पराडकरी प्रतींत 'उर गांजे' असा पाठ आहे, 'उरगाजे' असा नाहीं. त्यामुळें एक अनुस्वार नुसता अनुनासिक आहे, दुसरा मात्र वस्तुतः उच्चारावा लागतो, 'असुरांचें उर गान्जे (गांजते)' व 'उरगां (उरगांना) जे' येवढा अल्पच फरक उरतो. 'सम्पादक']. आतां इतकें खरें कीं मनुष्यस्वभावास दोष हा लागलाच आहे, त्याप्रमाणें या मुद्द्यावरही कोठें कोठें अनुस्वारव्यत्यय-दोष मयूरकवीस शिवला आहे, परंतु फारच विरळ. किंबहुना नाहींच म्हटलें तरी चिंता नाहीं. हा दोष कवीस शिवल्याच्या मला एक दोन आर्या आढळल्या आहेत त्या खालीं लिहितों:—

> पौरव रौरव-गौरव-कर्ता, भर्ता मला भला गमसीं; ।
> समशीलबुद्धि होउनि, नीतीनें आजि बोलुं लाग मसीं. ॥
>
> आर्याभारत, आदिपर्व, (१२, ७६. सं०)

[पराडकरी प्रतींत 'मसीं' नसून 'मसी'च आहे. मसीं=मजशीं; मसी=मला. सं०]

> 'देवा ! व्हावे चक्षुस्तेजःसंपन्न आश्रमामाजीं ।
> मामाजी ऐसें या; मति साहेनाचि त्या श्रमा माजी' ॥ किता, वनपर्व, १३, ६६.

[पराडकरी प्रतींत 'आश्रमामाजीं' नसून 'आश्रमामाजी'च आहे. माजी (२री ओळ)=माझी. 'सम्पादक'.]

> संजय ह्मणे कृतैकाश्रितसर्वस्वद्रुं शौरि संगतिं हीं ।
> कां जी ! करिजेल इतर मणिमंत्रौषधिरसज्ञसंग तिहीं ? ॥
>
> आर्याभारत, भीष्मपर्व." (५, ५. सं०)

[ पराडकरी प्रतींत पहिली ओळ " कृतैकाश्रितसर्वस्वद्रुंशौरिसंगतिहीं " अशी आहे. अर्थात आश्रितांचा सर्वकल्पतरू जो कृष्ण त्या एकाचीच संगति केली आहे ज्यांनीं अशांहीं (पांडवांनीं), असा होऊन दोष उरत नाहीं. सं० ] 'सम्पादक'

१. उदाहरणार्थ पुढील पद्यें पाहा:—

> असुर ह्मणति, 'विघ्नें प्रबळ करायासि देव, या नीचें ।
> मन मोहिलें गुरूचें, गुरुचित्ताहूनि देवयानीचें.' ॥
>
> आदिपर्व, (९-१३. सं०)
>
> 'ताप दिला जेणें, तो हा कामी तापसा ? हतांस दया ।
> उठवि तुझी, किति मारूं हाका ? मीं ताप साहतां सदया ! ॥'
>
> किता, (११-५०. सं०)
>
> ह्मणा मज वताविळा गुणचि घेतला घावरें
> असो मन असेंचि वा भजकबर्हिमेघा बरें ।
> दिसे क्षणिक सर्व ही भरंवसा घडीचा कसें
> धरील मन आधिनें बहु परिश्रमे चाकसें ॥
>
> केकावलि, (४५. सं०)

( पुढें चालू. )

तर अनुस्वार, प्रयोग इत्यादिकांकडेही त्यानें लक्ष पुरवलेलें आढळतें. सारांश, प्रस्तुत कवीनें महाराष्ट्रकवितेस व्याकरणशुद्धतेचें पुरतें वळण लावून या गुणास्तव तिचें स्वरूप विशेष उज्वल केलें आहे.

---

मुखीं हरि वसो तुझी कुशलधाम नामावली
क्षणांत पुरवील जी सकल कामना मावली।
कृपा करिशि तूं जगत्त्रयनिवास दासांवरी
तशी प्रकट हे निज श्रितजना सदा सांवरी॥

किता, (१२०. सं०)

प्रयोगाच्यीं कांहीं चमत्कारिक उदाहरणें पाहाणें असल्यास अंक १० पृष्ठ (११५ सं०) पाहा.

† यासंबंधीं ओकांचा पहिला आक्षेप असाः—

"आपण दोषनिर्देश करतांना व्याकरणसंबंधें एक दोन गोष्टींकडे दुर्लक्ष केलें असें दिसतें. कदाचित् मी जो प्रकार येथें दाखविणार आहें तो आपल्या ध्यानांत आला नसेल असें वाटतें. मोरोपंताच्या काव्यांत यमकासाठीं, छंदासाठीं वगैरे शब्दांची ओढाताण केली आहे असें कोठें कोठें आढळतें या मुद्द्याचा आपल्या निबंधांत मुळींच उल्लेख नाहीं याचें आश्चर्य वाटतें.

मति वधकामा ज्यांचि स्वप्रभवें केलि घातका माम्याची॥

पूर्वबृहद्दशम, ३९, ५.

[वधकामा=ठार मारूं इच्छिणारा. स्वप्रभवें=आपल्या जन्मानें. सं०]

कीं, तो पामर दीन 'स्वबळेंचि' ह्मणे, 'त्रिलोकपा मरदीन !'॥ किता, १९,१०.

स्वरथाखालें उतरुनि नमुनि ह्मणे विजय, "विजय दे दुर्गे !।
त्वत्पदभजनीं बहु सुख ह्मणुनि ह्मणे भक्त मुक्तिला 'दुर्गे !'॥"

आर्याभारत, भीष्मपर्व, १, ४४.

मारविला ज्यां सतनय वृद्ध महाराज बाह्लिक रणांत,।
ताताहि, गुरुहि, न ज्यांच्या तेज वयाचें शतांश करणांत.॥

आर्याभारत, आश्रमवासिक पर्व, (४, ७६. सं०)

शरणागतासि सांग श्रेय; क्षीरें सदा नहाला जो,॥

आर्याभारत, मौसलपर्व, (२, ७९, पूर्वार्ध. सं०)

या पांच उदाहरणांत 'माम्याची' 'मरदीन' 'दुर्गे' 'करणांत' व 'नहाला' या पदांची यमकांसाठीं कशी दुर्दशा केली आहे ती दिसतच आहे. कोणाचे हातपाय खूब लांबविले आहेत व कोणाचे अवयव साफ तोडून टाकिले आहेत, असे शब्दांचे खून कोठें कोठें आढळतात त्यांची चौकशी आपल्यासारख्या महाराष्ट्रभाषानियमनेच्छु पोलिसानें करून खुनी अपराध्यास यथायोग्य शिक्षा होण्याची तजवीज केली पाहिजे होती. ज्यांवर फक्त खून केल्याचा वहीम येतो परंतु चांगली शाबुदी होत नाहीं त्यांस शिक्षा होऊं नये.

दाखविती तोक रिती, पूजुनि गुरुसा कृतार्थ बहु तो करिती.।
प्रेमा सज्जनिं त्यांनीं आत्मगत प्रकटिला जगज्जनित्यानीं॥

बृहद्दशम, (३८, ४५. सं०).

[पराडकरी प्रतींत 'तोक रिती' बद्दल 'लोकरिती' असा पाठभेद आहे. सं०]

(पुढें चालू.)

मोरोपंताच्या कवितेचा दुसरा गुण तिची प्रौढ रचना होय. प्राकृत भाषेच्या अर्थें

---

प्रिय न वदावे, दार-प्राण-हर प्रकट अदय दावेदार. ।
हे सजती तडक, रिती दाखविति नवीच; गोप तांतड करिती. ॥
किंवा, (३९, २७. सं०)

[पराडकरी प्रतींत या ओळींचा अनुक्रम बदलला असून, 'हे सजती' बद्दल 'हे सजतां' असा पाठभेद आहे. प्रिय=प्रिय-कर. दारप्राणहर=स्त्रियांचे प्राण हरण करणारे. सं०]

द्रववुनि अजडा केली यत्पादरजोलवानिलें कुशिला; ।
यज्जननीच्या होउनि दुग्धधिनें लोल वानिलें कुशिला ॥
आर्याभारत, द्रोणपर्व, (५, ५. सं०)

[अजडा=हलकी, पापहीन; यत्पादरजोलवानिलें=ज्याच्या पादरजाच्या मंद वायूनें; कुशिला=कुत्सित (वाईट) शीला; दुग्ध-धि=क्षीरसागर; लोल=साभिलाष; वानिलें=स्तुति केली; कुशिला=कुसव्याला. सं०]

हीं उदाहरणें फार थोडीं आहेत, तरी माझ्या म्हणण्यास त्यांच्या योगें कांहीं बळकटी येते असें तुमच्या नजरेस येईल. हेच शब्द इतर ठिकाणीं जसे लिहावयाचे तसे शुद्ध लिहिलेले पंतांच्या काव्यांत आढळतात:—

तों दिव्याश्व उतरला व्योमांतुनि जाहली गगनवाणी ।
हा शत्रुजितातें दे तुझिया सुयशा सुखा न मग वाणी. ॥ —मदालसाख्यान.
या लावण्यांबुधीला अनुसरलि असे जी अनन्या नईचें ।
पत्नीचें भाग्य लोकीं अतुळ, सुकृत जें मोजवे तें न ईचें; ॥
ती धन्या होय ऐसें विमळ उपजलें रत्न जीच्या कुशीला, ।
न स्पर्शावी तुला बा! रुचिरतरतनो! दृष्टि कीं जी कुशीला. ॥
बृहद्दशम, (५५, ३१. सं०)

[नईचें=नदीचें; कुशीला=दुष्ट. सं०]

कैंची इतर जनीं ती जी दावी ज्ञान-राशि शक रीति ।
परि गुरुच्या अनुकारें गुरुला उत्सव बरा शिशु करीति. ॥ भीष्मभक्तिभाग्य.
[मार्या मल्या सुवर्णा थोडयाचि बहुत, नको बहु कुशीला. ।
पुत्रत्वें साध्वींच्या यावें ध्यां द्यावया यश कुशीला. ॥ वनपर्व, ५, ८५. सं०]

वरचीं बहुतेक उदाहरणें मराठी शब्दांचीं आहेत. तुमच्या उल्लेखांत संस्कृत शब्दांविषयीं अथवा महाराष्ट्रशब्दांविषयीं स्पष्टपणें उच्चार नसल्यामुळें दोन्ही भाषांतील शब्दांचीं उदाहरणें सरमिसळ सादर केलीं आहेत. पंतांच्या वेळींच काय पण आज सुद्धां मराठी भाषेचें नियमन झालें नसल्यामुळें मराठी शब्दांच्या ऱ्हस्वदीर्घत्वाविषयीं बराच मतभेद दिसून येणार आहे. तेव्हां पंतांच्या काव्यांत मराठी शब्द विद्यमानरूपानें जरी न आढळले तरी त्याजबद्दल पंतांस दोष लावूं नये.......पण हीच गोष्ट संस्कृत शब्दांस लागू करतां कामा नये. कारण त्या भाषेचें नियमन झालेलें आहे. तुमचा उल्लेख फक्त संस्कृत शब्दांविषयीं असता तर बरें झालें असतें.

दीर्घाच्या ठिकाणीं ऱ्हस्व केल्याचें उदाहरण पंतांच्या काव्यांत सांपडण्यास कांहीं श्रम पडतील हें खरें आहे, पण जो कोणी शोधपूर्वक त्यांच्या काव्याचें अवलोकन करील त्याचा यत्न निष्फळ होईल असें म्हणवत नाहीं. दुसरें, दोन किंवा तीन प्रमादांवरून जर पंतांच्या पदरीं संस्कृतव्याक-

(पुढें चालू.)

संस्कृत भाषेचा डौल आणण्याविषयीं प्रस्तुत कवीस पराकाष्ठेची हौस होती असें त्याच्या

---

रणानभिज्ञता यांधूं पाहतां व त्या गोष्टीविषयीं तुमचा जरा आग्रहही दिसतो, तर दहा बारा प्रमाद दाखविल्यानें त्यांच्या माथीं दुसरा नवीन दोष मारण्यास केवढा जबर आधार होणार आहे हें कोणासही सांगावयास नको. निदान तुमची तरी वरील आधारांवरून बरीच खात्री होईल."

यासंबंधीं कुरुंदवाडकर म्हणतात:—"......(माम्याची) हें दूषणीय स्थळ आहे; या ठिकाणीं शब्दाची ओढाताण केल्याचा दोष कवीस लाविल्यापेक्षां अश्लीलत्वाचा दोष देणें बरें आहे. कारण (मामा) हा शब्द विनोदानें उच्चारिला असतां (माम्या) असा उच्चार करण्याचा पाठ आहे;...... (मरदीन) हें मात्र दुर्वार आमचे कवीस दोष लावीत आहे;.......(दुर्गे!) या ठिकाणीं कांहींच दोष दिसत नाहीं. कारण, असें (दूरगे), (अगे दूर हो) असें म्हणण्याची सरसहा वहिवाट आहे, तसेंच (दुर्गे) असेंही म्हणण्याची वहिवाट कमी नाहीं......(करणांत):—या आर्येचा खरा अर्थ असा कीं, धृतराष्ट्र व्यासास आपले पुत्रादि आप्त मेले याजपासून आपल्यास किती दुःख झालें हें सांगत आहे......धृतराष्ट्र असें म्हणतो कीं.......म्यां सतनय म्हणजे मुलांसुद्धां वृद्ध जो महाराज बाल्हिक (भीष्माचा चुलता); तसाच तात म्हणजे भीष्म, आणि गुरु म्हणजे द्रोण; ज्यांच्या करणांत म्हणजे इंद्रियांत वयाचें म्हणजे तारुण्याचें शतांशही तेज राहिलें नव्हतें.....म्हणजे ते अगदीं वृद्ध झाल्यामुळें युद्ध करण्यासारखे नसतांही (गलितगात्र असूनहि सं०) म्यां दाटून मारविलें.....(करण) शब्दाचा अर्थ (इंद्रियें) स्पष्ट असून कुंतीसुत कर्ण असा काय म्हणून अर्थ घ्यावा हें कांहीं कळत नाहीं. तेव्हां या ठिकाणीं पंत अगदीं चुकले नाहींत असें स्पष्ट होतें [नाहलों] [नहाल्यों] दोनही शुद्ध आहेत. (मोलस्वर्थ पाहा.). (कुशिला) वरच्याप्रमाणेंच दोनही तऱ्हेनें म्हणण्याचा पाठ आहे."

ओकांचा दुसरा आक्षेप व्याकरणाप्रमाणें अशुद्ध समास केल्याचीं अनेक उदाहरणें पंतांच्या काव्यांत सांपडतात हा होय. ते ह्मणतात:—

"व्याकरणशुद्धतेविषयीं पंतांचा मोठा बाणा असून त्यांच्या कृतींत अग्राह्य समासांस येवढा मान मिळाला हा मोठा चमत्कार आहे. परस्परविभिन्न भाषांतील शब्दांचा समास करूं नये असा व्याकरणकारांचा नियम आहे, परंतु या गोष्टीकडे फारच दुर्लक्ष केलेलें दिसतें." कुरुंदवाडकरांनाहि हें मान्य आहे. पण जे शब्द संस्कृतांतील असून अगदीं साधारण प्राकृतांत आले आहेत, [असें 'याच आर्येतील (पापांदोरी) हा मात्र अग्राह्य समास मानूं नये; कारण 'पाप' शब्द संस्कृत आहे तरी तो केवळ प्राकृत होऊन गेला आहे इतकेंच नाहीं; 'पाप' शब्द जर प्राकृत नव्हे असें मानिलें तर प्राकृत भाषेंत पापाचें नांवच नाहींसें होईल. 'सुकविमंडळी' हाही अग्राह्य समास म्हणतां येत नाहीं.'] त्यांचा समास अग्राह्य मानूं नये अशी त्यांची विचारसरणी आहे.

अग्राह्य समासांचीं ओकांनीं दिलेलीं उदाहरणें:—

तोडुनियां गृह—वेड्या. आलां, आलां न देखतां मज, वेड्या. ।
न फिटे हें स्नेह-रिण; प्रिया तुझी मधुरगीति, वद्य मी हरीण. ॥

पूर्व बृहद्दशम. ३२, २९.

तव दर्शन या! यांचा प्राणा सुखलाभ; हा जननि—बापांचा ॥

किता, ३९, ६, पूर्वार्ध.

हा 'विधि—नेम उगे हा' ह्मणतां तो वाय होउनी मउ गेहा. ॥

किता, (४. १८, उत्तरार्ध. 'सं०')

।कीति जेविति यर-द-गडी कुसुमफळीं शिक्यपल्लवांकुरवुगळीं. ॥

किता, (१३. ७. उत्तरार्ध. 'सं०')

[वर-द-गढी=कृष्ण-सखे; कुसुमफळीं=फुलांफळांवर; शिक्यपल्लवांकुरदगडीं=शिंकें, पानें, अंकुर व दगड यांवर. 'सं०']

कुंकुम मा-थानींचें ज्या, कर तो पाविजेल माथां नीचें.

किता, (३८, १६. उत्तरार्ध. 'सं०')

[माथानींचें=लक्ष्मीच्या स्तनावरील; नीचें=मीं नीचानें. 'सम्पादक']

मृदु रक्त सहज चरण; व्याळ-शिरो-मणि-खड्यावरी संचरण ॥

किता, (१६, ३५, पूर्वार्ध. 'सं०')

[व्याळ-शिरो-मणि-खडयावरी=सर्पश्रेष्ठाच्या (मस्तकांतील) खडयावर. 'सं०']

जो कर वरि अनघा मा पुसि सुरत-श्रांत-गोपिकानन-घामा ॥

किता, (३३, २१, उत्तरार्ध. 'सं०')

[जो कर-हात अनघा-निष्पाप मा-लक्ष्मीला वरि-वरतो ( तोच ) सुरतामुळें श्रांत-दमलेल्या गोपिकांच्या आननावरील-तोंडावरील घामा-घाम पुसि-पुसतो. 'सं०']

दूत त्रासासि घेती, ह्मणुनि सुमति ते जोडिती पाय-माचे. ॥

उत्तरबृहद्दशम, (७२, ५३. चतुर्थ चरण. 'सं०')

[माचे=पलंग. 'सं०']

हा पापी एकदाचि स्वजनभरवसा, रत्न, निश्वास, सोडी. ॥

किता, (५७, १९, चतुर्थ चरण. 'सं०')

[स्वकीयांचा विश्वास, रत्न ( मिळण्याची आशा ) व सुसकारा हीं तीनहि हा पापी शतधनु एकदम सोडतो. 'सं०'].

माय त्रिजगाची तसि कन्या हे शुद्ध, यशहि उडु-राय. ॥

किता, (८३, १७५, उत्तरार्ध. 'सं०')

[उडु-राय=चन्द्र. 'सं०']

मग कुजकी जशि दोरी, आयुष्याची तुटे; स्व-पाप-शिदोरी ॥

किता, (४९, ३६, पूर्वार्ध. 'सं०')

[स्व-पाप-शिदोरी=स्वतःचें दुराचरण हीच शिदोरी. 'सं०']

पावे हाहि, पसरुनि प्रभुसि तपःपदर विप्र मव्यास. ॥

आर्याभारत, अनुशासनपर्व, ६, ५६, पूर्वार्ध.

हे सुकविमंडळीचें दिव्य सदा नव्य मव्य माहेर; ॥

आर्याभारत, शान्तिपर्व, (७, ४५, पूर्वार्ध. 'सं०')

झाला हा निवर-वया; हानि बरवया, न जाणतां, होय; ॥

आर्याभारत, अश्वमेधपर्व, (२, ८७, पूर्वार्ध. 'सं०')

[निवर-वया=उतार वयाचा; बरवया=बरव्याला, चांगल्याला. 'सं०']

नवल रविपुढें कीट स्व-कृत-तमो-नाश-काज वाखाणी. ॥

आर्याभारत, वनपर्व, (३, ११, उत्तरार्ध. 'सं०')

[कीट=किडा, काजवा. 'सं०']

त्या सुगुणसागराचा पावेल न अंत सु-कवि-धी-टिटवी ॥

आर्याभारत, द्रोणपर्व, (४, ७९, उत्तरार्ध. 'सं०')

[सु-कवि-धी-टिटवी=चांगल्या कवीची बुद्धिरूपी टिटवी. 'सं०']

( पुढें चालू. )

एकंदर काव्यपद्धतीवरून स्पष्ट दिसून येतें. संस्कृत शब्दांचा वोहोंकडे भरणाई, लांब लांबऽ

हीं संभ्मवळिचा तसा न पुरवी श्रीही श्रीही सुता डोइळा ॥

भीष्मभक्तिभाग्य, पृष्ठ ४९९.

[आणखीहि एक उदाहरण. (अश्वमेधपर्व, २, १५२, पूर्वार्ध.) पाहा:—

उत्तंक ह्मणे अजगर-गिळितैक-तनय-जनापरिस 'हाय!' ॥

अज०=अजगरानें गिळला आहे एकटा मुलगा ज्याचा त्याप्रमाणें. 'सं०']

ओकांचा तिसरा आक्षेप पंतांनीं 'समास व संधि करणें जरूर असून केला नाहीं) याबद्दल असून ते त्याबद्दल पुढील उदाहरण (बृहद्दशम, ३१, ८, उत्तरार्ध. 'सं०') देतात:—

तीर्णे दासी मोहाकुळ विरहीं; अधर अमृत पाजें; शमो हा. ॥

[हा=हा मोह. 'सं०']

यासंबंधीं कुरुंदवाडकरांचें मत असें आहे कीं संधि करणें न करणें हें कवीचे इच्छेवर असतें. व आपल्या ह्मणण्याच्या समर्थनार्थ, 'धिक् तां च तं च मदनं च इमां च मां च ॥' (भामिनीविलास, २,२) हें उदाहरण महावैयाकरण कवि भर्तृहरि याचे काव्यांतून त्यांनीं उद्धृत केलें आहे.

ओकांचा चवथा आक्षेप पंतांनीं कांहीं ठिकाणीं 'संस्कृत शब्दांच्या शेवटच्या व्यंजनाचा लोप करून समास केला आहे' असा असून तत्समर्थनार्थ,

पोषिलि होती चुंबुनि जी शांतिसुरभि तदूध-भा तातें ॥

(अनुशासनपर्व, २, ५, पूर्वार्ध. 'सं०')

हा आर्यार्ध ते दाखल करतात. तद्+ऊधस्+भा (=तिच्या कांसेंतील तेज, अर्थात् दूध.) हा समास वास्तविक 'तदूधोभा' असा व्हावयास पाहिजे.

ओकांचा पांचवा व शेवटचा आक्षेप पंतांनीं 'कांहीं स्थलीं कित्येक शब्द निरर्थक योजिले आहेत' हा होय. पूर्वबृहद्दशमांत अशीं स्थलें अनेक असून शंकर पांडुरंग पंडित यांनीं सदर स्थलांचा निर्देश आपल्या टिपांत केला आहे.

कुरुंदवाडकरांनीं आपल्या पत्राअखेर आपण केलेल्या गणेशपुराण आर्या ( १६ सप्टेंबर १८७८ सोमवारच्या) इंदुप्रकाशांत आल्या होत्या त्यांबद्दल फार श्रम घेऊन काव्यदृष्ट्या त्यांच्या वास्तविक योग्यतेपेक्षां फारच ज्यास्त स्तुतिपर वर्णन करणाऱ्या बामन दाजी ओकांबद्दल समर्पक आभारदर्शक दोन शब्द लिहिण्याआधींच त्यांच्या मतास विरोधि पत्र लिहिण्याचा प्रसंग आल्याबद्दल दिलगिरी प्रदर्शित केली आहे. 'सम्पादक'

ऽ खुद्द पंत ह्मणतात:—

गीर्वाण शब्द पुष्कळ, जनपदभाषाचि देखतां थोडी, ।
यास्तव गुणज्ञ लोकीं याची घ्यावी हळूहळू गोडी. ॥ १७ ॥
प्राकृतसंस्कृतमिश्रित, यास्तव कोणी ह्मणोत बरि कंथा, ।
भवशीतभीतशांतस्वांताला दाविला बरा पंथा. ॥ १८ ॥

मंत्ररामायण-परिभाषा.

कृष्णविजयांत ( बृहद्दशमांत ) तर हें वैशिष्ट्य आत्यंतिक दिसून येतें. 'सम्पादक'

ई याचीं पुढील उदाहरणें रा. बा. दा. ओक यांनीं १८।६।१८८० रोजीं पाठविलेलीं मालेच्या ६६ व्या ( जून १८८० च्या ) अंकांत प्रसिद्ध झालीं होतीं:—

( पुढें चालू. )

भगवत्प्रसाद-कल्प-द्रुम-शिखर-समाश्रितापगेय-पिकें ॥
श्रोतृक्षेत्रीं सात्त्विक भावांचीं पिकविलीं अनेक पिकें ॥ भीष्मभक्तिभाग्य,९४.
राष्ट्रारंभीं दशशत-रवि-तेज्याचा विलोकिला पुंज,।
जो विविधवर्ण-शतमख-चापशतद्युति-विलासिनीकुंज.॥
आर्याभारत, अनुशासनपर्व, (५, २१.'स०')

( आपगेय=गांगेय=भीष्म शेंकडों रंगीबेरंगी इंद्रधनुष्यांची कांति हीच विलासिनी स्त्री-तिचें संकेतस्थान. पराडकरी आवृत्तींत 'चष्टारंभीं' असा पाठ आहे. 'सम्पादक')

एवं धृतराष्ट्राच्या, गांधारीच्याहि, घे न उक्तिस ती; ।
कीं गुरु-मेघ-निवृत्ति-स्वाती-वाग्वृष्टि-रत्न-शुक्ति सती ॥
आर्याभारत, आश्रमवासिक पर्व, ३,५१.

( पराडकरी प्रतींत दुसरी ओळ खालीलप्रमाणें छापली आहे:—
कीं, गुरु मेघ, निवृत्ति स्वाती, वाग्वृष्टि, रत्नशुक्ति सती ॥
अर्थ, [ धृतराष्ट्र, गांधारी वगैरे ] गुरुजन ( वडील मंडळी ) हेच मेघ ( ढग ); [ कुंतीची ] निवृत्ति ( तिला परत पाठविणें ) हेंच स्वाती नक्षत्र; [ धृतराष्ट्र, गांधारी वगैरेंची एतद्विषयक ] वाक् ( भाषणें ) हीच वृष्टि ( पाऊस ); पण, सती ( कुंती ) [ मात्र ] रत्नशुक्ति ( स्वाती नक्षत्राचें उदक वायां जाऊं न देणारी मुक्ताशुक्ति नव्हे तर जणों काय रत्नाचीच शिंप ) [ होती. ] व अशा रीतीनें घेतल्यास हें उदाहरण लागू पडत नाहीं. कारण एकच लांब समास मग उरतच नाहीं. 'सम्पादक')

रूपमात्र धरिलें परिवेल । प्राकृतासमनतें कुलशैल ॥
हृत्तमक्षयकरेश्वरहस्त-स्पर्शकामहृतचित्त समस्त ॥ उत्तरबृहद्दशम ( कृष्णविजय ) ५८, ५९.

( अंतःकरणांतील तमाचा-अज्ञानाचा नाश करणाऱ्या ईश्वराच्या हाताला स्पर्श करण्याच्या इच्छेनें ज्यांचें मन हरण केलें आहे असे सगळे. 'सम्पादक')

भू-वस्त्रान्नेभ-शय्या-तिळ-रजत-गृह-स्वर्ण-रत्नादि-दानें, ।
इष्टापूर्तेंहि केलीं सकळ निजमनःशुद्धिचीं जीं निदानें; ॥
या मार्गीं वर्ततां जें मजवरि पडलें संकट, श्रीधवा ! तें ।
ऐकावें त्वां स्व-नाम-स्मरण-पर-जन-क्लेश-पाथोद-वातें. ॥ किता, ६४, ९.

[ जमीन, वस्त्र, अन्न, हत्ती, शय्या, तीळ, चांदी, सोनें, रत्नें घर इत्यादिकांचें दान; तुझें नामस्मरण करणाऱ्या भक्तांच्या क्लेशरूप मेघांस जणों वात ( वारा )च अशा ( तूं ). 'सम्पादक' ]

विध्युक्त-स्नान-संध्या-जप-शिव-चरण-ब्रह्म-गो-पूजनातें ।
संपादी आह्निक श्रीयदुकुळपतिचें पुण्य ओपू जनातें; ॥
गोदानें बद्ध बद्ध प्रतिसदनिं सदा दे. घरी शुद्ध वास-।
स्रग्भूषा, सात्यकीस स्वरथिं बसुनि घे सत्प्रिया उद्धवास. ॥ किता, ७०, २.

( यथाविधि, स्नान, संध्या, जप, शिवपूजा, गोपूजा, व ब्रह्मपूजा यांना. बद्ध=चौदा लक्ष तेरा हजार सातशें चोऱ्यायेंशीं. 'सम्पादक' )

त्रासानें शिशुपालसेवकबळें सारीं पळालीं पिलीं ।
वीशास्त्रास्त्रहिचीं, न ठाकति जन्हि क्ष्वेडें सदा लिंपिलीं; ॥
दानार्द्र-द्विप-यूथ-नायक-शिरो-मुक्ताफळीं आवडी ।
सिंहाची; परि सर्व भीति जन्हि त्या शिष्या न तो सावडी. ॥ किता, ७४, २६.

संस्कृत समास, संस्कृत पद्धतीवर केलेले प्राकृत भाषेचे प्रयोग,[1] कोठें कोठें संस्कृत सबंधचीं *

( तरुण हत्तींच्या मस्त नायकाच्या गंडस्थळांतील मोत्यांबद्दल. क्ष्वेड=विष. 'सम्पादक' )

पुनरपि हरि शत–योजन–विस्तृत–कासार–पद्म–गाळांत. ।
बिसतंतुमाजि राहे, जो मान्य समस्त लोकपाळांत. ॥
आर्याभारत, उद्योगपर्व, २,४५. 'सं०' )

( शंभर योजनें–चारशें कोसपर्यंत पसरलेल्या सरोवरांतील कमळाचे देंठांत. 'सम्पादक' )

१. वरील प्रयोगांचीं उदाहरणें अंक १० पृष्ठ ११६ यांत सांपडतील.

* रा. वा. दा. ओक यांनीं याच्या उदाहरणादाखल पुढील श्लोक उद्धृत केले आहेतः—

राजा म्हणे, 'कवण तूं ! कोणाचा पुत्र ! काय गे वदसी ? ।
काच स्मृतिरयि, तापसि ! मैवं प्रलपात्र भूभुजःसदसि. ' ॥
आर्याभारत, आदिपर्व, (१२, ६३.'सं०')

( अयि तापसि ! का च स्मृतिः ? अत्र भूभुजःसदसि मा एवं प्रलप, म्हणजे, हे तपस्विकन्ये ! आठवण ? कसली आठवण ? येथें राजदरबारांत अशी बडबड करूं नको. 'सम्पादक' )

परिसुनि धर्म वदे, 'अयि ! सति ! कुंति ! मतं ददामि किं ते ? ' तें ।
परिसुनि म्हणे पृथा, 'जें सुतरत्न हरील सर्व चिंतेतें ' ॥ किता, ( १०, ६४.'सं०' )

( अगे सति कुंति, तुला हवें असें काय देऊं ? 'सम्पादक' ).

शरतिमिरीं कृष्ण म्हणे, '-मच्चेतोऽब्जु–ज–भवातप ! कासी? ।
चित्र, अपक्वाहि फळप्रकरा पाही न बात पक्वासां.' ।
आर्याभारत, द्रोणपर्व ( २, १४. 'सं०' )

( माझ्या अंतःकरणरूप कमलाच्या बालसूर्या अर्जुना, तूं कोठें आहेस ? 'सम्पादक' )

कां मोसी ? भय केंवें मज असतां त्वत्प्रसाद–पवि–कवच ? ।
'भक्तः प्रणश्यति न मे' हें कीं वदलासि तूंचि मविकवच. ॥ किता,( २, ७१. 'सं०' )

( माझ्या भक्ताचा कधींहि नाश होत नाहीं. 'सम्पादक' )

भक्त्या कृष्णीं यकिन शक्ति, असा वृषविचार करि एक; ।
नित्य म्हणे. 'सिंहोऽस्मि, यत्स्त्वं गन्तासि कृष्णकरिप क्व?'॥ किता(२०, ४७ 'सं०')

( हे कृष्णरूप हस्तिश्रेष्ठा ! मी सिंह आहें. त्वां कोठें पळशील ? 'सम्पादक' )

भीष्म प्रसन्नचित्तें 'वार्ष्णेय ! स्वागतं तव' असेंच, ।
धर्मादिकांप्रति वदे, 'सांगा, युष्मात्प्रयोचत ‖ असेंच.'॥ आर्याभारत, भीष्मपर्व (१०, २५'सं०')

( ‖ मूळ पाठः—युष्मादितोचत. कृष्णा, तुझें स्वागत असो. 'सम्पादक' )

' पार्थं न हन्मि यावत्पादौ तावन्न धावयेऽहमिति ' ।
घोरं यस्य व्रतमिदमहह ! कथं सोऽप्यगाद्युधं सामिति ? ॥
आर्याभारत, कर्णपर्व ( ६, ५७ 'सं०' )

( जोंपर्यंत अर्जुनवध केला नाहीं तोंपर्यंत पाय धुणार नाहीं असें ज्याचें घोर व्रत होतें, अरेरे ! तोहि ( दुःशासन ) युद्धांत कसा नाश पावला ? 'सम्पादक' )

' पादौ न धावयिष्ये पार्थे जीवत्यहं कदापी'ति ।
ज्याची व्रतप्रतिज्ञा दुर्जन मानुनि सुधा सदा पीती. ॥ किता, ( ४०, २२. 'सं०' )

( अर्जुन जिवंत आहे तोंपर्यंत कधींहि पाय धुणार नाहीं, असा अर्थ. 'सम्पादक' )

कर्णेन गीर्णचक्रा ससद्वीपा धरा सशैलवना, ।

(पुढें चालू.)

सबंध वाक्यें, हे सर्व प्रकार प्रस्तुत कवीच्या कृतींतून आढळतात. आतां या गुणांच्या

---

चतुरङ्गुलमुत्क्षिप्तेत्यूचे भगवान् मुनिर्विशुद्धमनाः ॥ किता ( ४८, ५८. 'सं०' )

( रथचक्र गिळणारी सप्तद्वीपा वसुंधरा कर्णानें पर्वत व अरण्यें यांसकट चार बोटें वर उचलली असें शुद्ध अंतःकरणाचे भगवान् व्यासमुनि वर्णिते झाले. 'सम्पादक' )

धृष्टद्युम्न-वृकोदर-सात्यकि-माद्रेय म्हणति, ' हा नृप या, ।
संश्रित-जन-कल्पतरोर्जयतितरां यदुशिरोमणेः कृपया.' ॥ किता, ( ५०, ६८. 'सं०)

[ आश्रितांना कल्पवृक्षाप्रमाणें असणाऱ्या या यदुश्रेष्ठा ( कृष्णा )च्या कृपेनें हा राजा ( धर्म ) विजय पावतो. 'सम्पादक' ]

ब्रूयात् क्षमी गभीरोऽसीति बत युधिष्ठिरं प्रभुं को न ? ।
निज नीचपण प्रकटिसि, तूं श्वान भल्याबरींहि भुंकोन. ॥ आर्याभारत, सभापर्व, (४, ८५. 'सं०')

( क्षमी गभीरः असि इति प्रभुं युधिष्ठिरं कः न बत ब्रूयात् ? आपण गंभीर व क्षमाशील आहां असें धर्मराजास कोण बरें म्हणणार नाहीं ? 'सम्पादक')

" हे नाथ । रमानाथ ! व्रजनाथ ! हरे ! मुकुन्द ! कंसारे !
गोविंद ! कृष्ण ! केशव ! दीनार्तिहरस्त्वमेव संसारे ॥ किता (५, ६९ 'सं०')

( हे नाथ, हे रमापते, हे गोकुळेश्वर, हे हरे, हे मुकुंद, हे कंसशत्रो, हे गोविंद, हे कृष्ण, हे केशव, संसारांत दीनांचें दुःख हरण करणारा तूंच आहेस. 'सम्पादक' )

' जयतितरां श्रीरामः सुग्रीवो जयति लक्ष्मणो जयति ' ।
ऐसे कपि गर्जति, तों लंका कांपे धरूनियां भय ती. ॥ मंत्ररामायण, युद्धकांड, २६१

( श्रीरामाचा मोठा जय होतो, सुग्रीवाचा जय होतो, लक्ष्मणाचा जय होतो. 'सम्पादक' )

' अयि ! क्वासि क्वासि प्रियतम ! ' असें गद्गद वदे, ।
रडे, लाजे, ताप प्रबळ पतिविश्लेषदव दे; ॥
प्रभूत-स्वेदाश्रु-स्नपित-तनु ती, सेज भिजली, ।
उठे भ्रांतस्वांतें गडबडुनि आलींत निजली ॥ बृहद्दशम, उत्तरार्ध, ६२, १५.

( कोठें आहेस ? अरे प्रियकरा, तूं कोठें आहेस ? 'सम्पादक')

भगवन् ! साम्ब ! नमस्ते, शर्व ! नमस्ते, महेश्वर ! नमस्ते; ।
त्वं प्रभुरसि शिव ! जगति त्रातुं शरणागतानिह समस्ते ॥ हरिवंश, (५०, ३८ 'सं'०)

[हे भगवन्-देवा, हे सांब-शंकरा, तुला नमस्कार असो; हे शर्व-शंकरा, तुला नमस्कार असो; हे महेश्वर-महादेवा, तुला नमस्कार असो; (कारण,) हे शिव-शंकरा, इह समस्ते जगति (या साऱ्या जगांत) शरणागतान् त्रातुं (शरण आलेल्यांचें रक्षण करण्यास-त्यांस तारण्यास) त्वं प्रभुरसि (तूं समर्थ आहेस.) 'सम्पादक']

तस्याः स्नुषा रत्नगर्भा सपत्नी चामरावती ।
तस्याः श्रीगोपिकादेव्याः किमपीदं कृते कृतम् ॥ भीष्मभक्तिभाग्य.
ज्यासि अहो रूपमहो महिमाऽयं सुकृतुर्वयं धन्याः ।
ऐसें पाहुनि वदले मुनि नृप हे पूज्यता नसे अन्या ॥ किता, १६६.

[ आणखी एक उदाहरणः—
ऐसें म्हणतां स्रीच्या कंठीं घालुनि मिठी म्हणे, 'आयि ! ते ।
कथमेवमुक्तमदयं तदयं किमनुष्ठितुं क्षमो दयिते !' ॥ आदिपर्व, ३१, २७.

अयि दयिते ? ते कथं एवं अदयं उक्तम् ? तत् अनुष्ठितुं अयं क्षमः किम् ?—हे प्रिये, तूं हें निष्ठुर भाषण कसें बोललीस ? हा ( मी ) तें करण्यास समर्थ आहें काय ? 'सम्पादक'

योगानें प्रकृत कविता केवळ प्राकृत वाचकांस बरीच दुर्बोध * झाली आहे खरी, तरी अंमळ वरल्या प्रतीच्या वाचकांस वरील गुणास्तव ती अत्यंत प्रिय झालेली आहे.

* पृष्ठ ८१६ ओळी ६–१६ व पृष्ठ ८१७ ओळी ५–२७ पाहा.

यासंबंधीं विविधज्ञानविस्तारकर्ते म्हणतात कीं संस्कृत शब्दांची सर्वभर योजना, लांबलांब सामासिक पदें, संस्कृत काव्यें, संस्कृत व्याकरणास अनुलक्षून केलेले प्रयोग, दीर्घयमकरचना, प्रासानुप्रासांची गर्दी यांमुळें पंतांची कविता बरीच दुर्बोध झाली आहे. अभिज्ञ व अनभिज्ञ मंडळीची पंतांच्या कवितेविषयीं सारखींच मतें दिसतात; ज्ञानाचा व अज्ञानाची बर कोठें या जगांत बरोबरी होत नसेल तर तीं येथें मात्र होणार आहे. ती केवळ प्राकृत वाचकांसच नव्हे तर महाराष्ट्र भाषेच्या शुद्धाशुद्धतेविषयीं नियम करून तिच्या शब्दनियमनार्थ व्याकरण तयार करणारे प्रतिपाणिनि रा. ब. दादोबा पांडुरंग तर्खडकर, ज्याची गांठ पडतांच प्रथमदर्शनींच भाषाभिज्ञत्वाचा सर्व अभिमान गुंडाळून ठेवण्याचा प्रसंग येणार नाहीं असे विद्वान्हि विरळा त्या 'बृहद्दशमा'वर सुबोध टीका लिहिणारे रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, नवनीतकर्ते श्रीकृष्णशास्त्री तळेकर, रावजीशास्त्री गोडबोले, किंवा यांचे मदतनीस मोडक अगर पाठक (यांपैकीं कोणीतरी नवनीताच्या नव्या आवृत्तीच्या वेळीं कृष्णशास्त्री चिपळूणकरांकडे कांहीं दुर्बोध आर्या घेऊन आले होते असें विष्णुशास्त्र्यांनीं ५९ व्या अंकांत लिहिलें आहे.) अशा महाराष्ट्रभाषामर्मज्ञ पंडितांस सुद्धां दुर्बोध वाटते. दादोबा केकावलीच्या प्रस्तावनेंत म्हणतातः—"........प्राकृत जनांस अप्रसिद्ध असे संस्कृत शब्द, आणि निवळ प्राकृत व ग्राम्य शब्द, यांचें मिश्रण असल्यानें संस्कृतभाषाभिज्ञ अशा पंडितांसहि त्यांची निवड करून अर्थयोजना करण्यांत अवघड प्रसंग असण्याच्या दृढ संभवामुळें, तसेंच समयविशेषीं शब्दांचा दूरान्वय असल्यानें अर्थज्ञानाच्या दुःसाध्यत्वामुळें, मोरोपंताचें काव्यहि दुर्बोध आणि कठीण म्हणून सर्व जनांस अनुभूत आहे." कृष्णविजयाच्या प्रस्तावनेंत रा. ब. पंडित म्हणतातः—"संस्कृत नवे नवे शब्द; अव्यवहारित जुने, देशिक असे प्राकृत शब्द, वारंवार येणारे संस्कृतांतील भाषणसंप्रदाय; संस्कृत शब्दांचे लांबलांब समास; सर्व पदें, मध्यें जागा सोडल्याशिवाय, एकत्र लिहिलेलीं; छंदासाठीं शब्द, वाक्यरचनेच्या नियमांप्रमाणें न लिहितां, मागेंपुढें लिहिलेले; अर्थावश्यकता साधून आलीं तर कवितेचीं मुख्य भूषणेंच, पण अर्थास आपल्या मागून चालावयास लावतील तर कवितेला लज्जा आणणारीं व्यंगेंच, अशीं लांबलांब यमकें व प्रास; आणि यांतून कित्येकांस सुसह करणारें जें विरामचिन्हांकन तें तर अगदींच नाहीं;—या सर्व प्रौढ, अज्ञात आणि दृष्टीला दिपवून टाकणाऱ्या अलंकारांसह आणि सद्गुणांस व दुर्गुणांस गोंधळून टाकणाऱ्या अशा व्यंगांनिशीं जेव्हां आमची कविता एखाद्या वाचणाऱ्यापुढें येऊन ठाकते, तेव्हां तो बिचारा तिजकडेस पाहण्याचेंच सोडून देतो....... या कारणांतून मुख्य तीन; अज्ञात शब्द, पदें पाडलेलीं नसणें, आणि विरामचिन्हें न लिहिणें...... कित्येक आर्यांचा संशय आल्यामुळें त्यांचीं पदें पाडल्याशिवाय, व पाडलींच तर विरामचिन्हें न लिहितां तशाच सोडल्या आहेत." 'पाऊणशें पैशीं वर्षें सर्वांच्या मुखीं जयजयकार व चहा होत असल्यामुळें मोरोपंतांच्या 'काव्यांतील शब्द सर्वांसच अपरिचित आहेत असें मनांत येत नाहीं' या शास्त्रीबोवांच्या मुद्द्यासंबंधीं विस्तारकर्ते म्हणतात, कीं गुणांची परीक्षा होऊनच सर्व प्रसंगीं जयजयकार होतो असा कांहीं नेम नाहीं. सामान्यतः लौकिक मतांत गतानुगतिकत्वाचा प्रभाव विशेष........ पंतांच्या आर्यांचे दहा दहा अर्थ होतात हा समज जसा सार्वलौकिक असून खोटा आहे, त्याप्रमाणेंच पंतांची जी चहा झाली आहे ती त्यांच्या कवितारसमाधुरीसेवनापासून झालेली नाहीं. लोकमताचें प्रमाण फार जपून मानलें पाहिजे. कालिदास, व भवभूति यांची सार्वत्रिक प्रसिद्धि व लोकमान्यता

[ पुढें चालू. ]

प्रकृत कवितेचें तिसरें मोठें अंग यमकप्रासमय रचना होय. या रचनेच्या संबंधानें मापूर्वी कांहीं ठिकाणीं लिहिण्यांत आलेंच आहे, त्यावरून ती दोषमय आहे कीं काय याविषयीं वाचकांची संशयनिवृत्ति झालीच असेल. यास्तव येथें इतकें सांगतों म्हणजे बस आहे, कीं वरील शब्दालंकार साधण्यास प्रस्तुत कवीनें पुष्कळ परिश्रम केले आहेत; व व्याकरण बिघडूं न देतां किंवा अर्थाची हानि न करतां लांब लांब यमकें साधण्याची व प्रासांची सांखळीची सांखळी जुळवण्याची जी या कवीची अपूर्व करामत दृष्टीस पडते ती समय-विशेषीं अर्थ खुलवण्यास किंवा निदान नुसता मनास चमत्कार वाटवण्यास फार उपयोगीं पडते. तिजवरून कवीच्या भाषाप्रभुत्वाविषयीं मोठें प्रमाण मिळतें हेंही येथें सांगायास पाहिजे असें नाहीं.

मोरोपंताच्या कवितेच्या बाह्यरचनेच्या संबंधानें कोणते गुण सर्वांच्या लक्षांत येण्या-सारखे आहेत ते वर सांगितले. आतां अर्थरचनेच्या संबंधानें विचार करूं. अर्थदृष्ट्याही प्रस्तुत कवीचें काव्य प्रौढ व रसभरित आढळतें. सर्व महाकवींच्या ग्रंथांतून जशी सुंदर व प्रौढ अर्थाची सुंदर व प्रौढ भाषेत रचना केलेली आढळते त्याप्रमाणेंच मोरोपंताच्या कवि-तेंतही सहृदय वाचकांस केवळ तल्लीन करून टाकणारीं व हजारों वेळां वाचलीं तरी पुरेशीं न होणारीं अशीं सहस्रावधि स्थलें सांपडतात. त्या त्या पात्रास व समयास उचित * व विव-क्षित रसानें पूर्ण भरलेलीं अशीं भाषणें व वर्णनें त्याच्या ग्रंथांत जागोजाग आहेत. आतां हें

असतांही महाराष्ट्र भाषांतराच्या वेळीं त्यांच्या 'मेघदूता'ची व 'मालतीमाधवा'ची प्रत मिळण्याची मारामार! [मालतीमाधव नाटक (मराठी) याची प्रस्तावना पाहा.] पंतांची कविता कोणासच कळत नाहीं असा कोणाचाच आक्षेप नाहीं. कारण त्यांच्या आर्या लावणारास 'आर्यापंडित' म्हणतात असें शास्त्रीबोवाच ५७ व्या अंकांत लिहितात. पंतांच्या काव्यसरोवरांत जीं मनोरम कमलें आहेत त्यांची प्राप्ति मोठमोठ्यांसही कधीं कधीं घडत नाहीं आणि हिकडून तिकडे व तिकडून हिकडे हेलपाटे खाले तरीही प्रसंगविशेषीं रसप्राप्त्यानंद अमतुल्य होत नाहीं, असें म्हणणें भाग आहे. 'सम्पादक'

* विविधज्ञानविस्तारकर्त्यांचा यासंबंधीं अभिप्राय अगदीं उलट आहे:—"पंतांची भाषासरणी वर्णनविषयानुरोधानें मुळींच बदलत नाहीं. विषयास अनुसरून भाषापद्धति असलीच पाहिजे. परंतु पंतांच्या काव्यांत सर्वच पात्रांची भाषा एकसारखी आढळते. मनुष्याची चित्तवृत्ति जशी प्रसंग-विशेषीं उदासीन, रंगेल, तापट, शांत, गंभीर अशी नानाविध आढळते, त्याप्रमाणें त्याचें भाषणही त्या त्या प्रसंगीं त्या त्या वृत्तीस अनुरूप असणें जरूर आहे. पोप कवीनें Essay on criticism या ग्रंथांत म्हटलें आहे कीं 'The sound must seem an echo to the sense.' म्हणजे कवितेचा ध्वनि कवितेच्या अर्थाचा प्रतिध्वनि असला पाहिजे. अर्थानुषंगानें शब्दरचना कोमल, कठोर, मृदु, मधुर, कर्कश अशी असावी. परंतु तो प्रकार पंतांच्या काव्यांत फारसा आढळत नाहीं. [अपवाद:—

समजावुनि त्यांसि म्हणे, 'ऐसें कालिंचलासि मालीन;।
कां ळलतां आळलतां? पलतां मीं सागलांत ताळीन'.॥आदिपर्व (३१,३२,'सं०')]

याचें कारण यमकरचनेचीच हौस असावी. सर्व पात्रें सारखींच यमकबद्ध भाषणें करतात. आपले हृदयोद्गार यथास्थितपणें स्वभावानुरूप भाषेनें प्रकट करण्यापेक्षां ते यमकबद्ध यंत्रांनीं कसे व्यक्त

[पुढें चालू.]

खरें आहे की वरील सरसता जेथें तेथें आढळते असें नाहीं; पण हा प्रकार सान्यास कवींच्या व ग्रंथकारांच्या ठायीं आढळणारा आहे. येथून तेथून सारें सारखेंच असें उज्वल काव्य किंवा असा ग्रंथ प्राय: थोडाच सांपडेल. त्यांतून ग्रंथाचा जेवढा विस्तार अधिक तेवढा वरील सार्वत्रिक सरसत्वाचा संभव कमी. जॉन्सनने एके ठिकाणीं ह्मटलें आहे, की हिरा ह्मटला ह्मणजे अर्थातच कोंदण त्याच्याहून कमी योग्यतेचें असलें पाहिजे. तर याच न्यायावरून पाहतां कोणत्याही ग्रंथाचे सरस भाग ह्मटले ह्मणजे त्यांहून इतर भाग अर्थातच नीरस असले पाहिजेत.

---

करावे ही मोठी काळजी सर्व पात्रांस पडलेली दिसते......या दोषाचें मान अल्प असण्याचें कारण सहज समजण्यासारखें आहे. तें अर्थात् हेंच की पंतांच्या रसिकतेमुळें पूर्वोक्त प्रकारच्या रचनेस आपला अंमल फारसा माजवितां आला नाहीं. पंतांच्या काव्यांत यमकरचनेच्या योगानें रसहानिकारक अशीं जीं कित्येक स्थलें आढळतात, तेवढ्यांपुरता पूर्वोक्त आक्षेपाचा अंश ग्राह्य मानला पाहिजे. जसें:—

बहुदिवसां सुत पाहुनि कुंती झांकूनि आननास रडे, ।
सरडेंसही बहुप्रिय जे मत न पुरा न कानना सरडे. ॥
आर्याभारत, स्त्रीपर्व, ३, ६०.

कुरवाळुनि एकैका कुंती क्षतकायनंदनास रडे; ।
त्या प्रेमा ते वीरचि, अनुभवितिल काय नंदना सरडे ? ॥ किता, ३, ६१.

दुर्योधनास भेटे, होय तिच्या फार भर विलापाला, ।
दैवें शतपुत्रविपच्छयामेचा तीस मरविला पाला ॥ किता, ४, १३.

हार विलासवतीनें केला हा लक्ष्मणप्रसूनें कीं ! ।
हारविला सवतीनें क्षितिनें, पुजिला सुरप्रसूनें कीं ! ॥ किता, ४, १६.

होच उपासक विद्यावृद्धांचा, शंभुचा उपासकसा; ।
सेवीं तद्वचनास प्रेमें, जन सेवितो तुपास कसा. ॥
आर्याभारत, आश्रमवासिकपर्व, २, २६.

अर्जुन झाला रविसुतमर्मी वरबाणपंक्ति शिरकविता, ।
ती कांपवी तयाचें, रसिकाचें जेंवि काय शिर कविता. ॥
आर्याभारत, कर्णपर्व, ४७, ४६.

लज्जा बहु दे, गहनीं शिरल्या, अभिमन्युजनक, वणव्याला; ।
त्रिवर्गी विजया जिंकी ऐसा पुत्रासि जन कवण व्याला ? ॥
आर्याभारत, शल्यपर्व, ३, ८५.

'ठावें पुण्य उदंड, अल्प अघ, हें तार्टी जसा पापड; ।
आधीं भोगिन मीं' ह्मणें, यम ह्मणे मातें 'रसापा ! पड'. ॥
उत्तररामायण, ६५, १९, पूर्वार्ध.

[क्षतकायनंदनास=क्षत-जखमी झालेलें आहे काय-शरीर ज्याचें अशा नंदनास-पुत्रास. नंदना=नंदनवनास. शतपुत्रविपच्छयामा=शत-शंभर पुत्रांवरील विपद्-विपत्ति हीच श्यामा-रात्र. लक्ष्मणप्रसूनें=(दुर्योधन-पुत्र) लक्ष्मणाच्या मातेनें=भानुमतीनें. सुरप्रसूनें=सुरकुसुमांनीं. गहनीं=अरण्यांत. रसापा !=भूपा, नृगा !, राजा नृगा ! 'सं०'] 'सम्पादक'.

हें प्रस्तुत कवीच्या कवितेचें सामान्य स्वरूप झालें. याहून सदरील कवितेविषयीं विशेषत: लिहिण्यासारखें दुसरें कांहीं नाहीं. संस्कृत कवींत किंवा इंग्रेजी कवींत पुष्कळांचे कवित्वविशेष जसे सांगण्याजोगे असतात तसा प्रकार महाराष्ट्रकवींत प्राय: दिसून येत नाहीं. संस्कृतांत ज्याप्रमाणें

उपमा कालिदासस्य भारवेरर्थगौरवम् ।
दण्डिन: पदलालित्यं माघे सन्ति त्रयो गुणा: ॥[1]

अशी निवड करतां येते, किंवा पाश्चात्य कवींत—

"The first in loftiness of thought surpassed,
The second in majesty, in both the last."[2]

असे कवित्वविशेष जसे एका प्रसिद्ध कवीनें काढले आहेत, तसा प्रकार महाराष्ट्रकवींत होण्यास ह्मणण्यासारखी जागा नाहीं. एक मात्र गोष्ट अंमळ लक्षांत ठेवण्यासारखी आहे खरी, कीं मोरोपंताच्या कवितेंत पूर्वींच्या सर्व कवींपेक्षां ठाकठिकी विशेष आढळते. ह्मणजे दरबारांत वगैरे वागलेल्या मनुष्याचा जसा बोलण्याचालण्यांत, उठण्याबसण्यांत वगैरे बेतबात आढळतो, त्याप्रमाणेंच प्रस्तुत कवीचे ठायींही वाक्यरचना सरळ, शब्दरचना शुद्ध, वर्णन करायाचें झालें तर तें पाल्हाळवार न करतां मुद्देशीर व थोडक्यांत, इत्यादि प्रकार आढळतात. संक्षिप्त रीतीनें मुद्देसूद मजकूर लिहिण्याची पद्धत प्रस्तुत कवीच्या ग्रंथांवरून बरीच लागण्यासारखी आहे.

५. आतां मोरोपंताच्या कवितेंत दोष कोणकोणते आढळतात याविषयीं विचार करायाचा. हें निरूपण करण्याच्या अगोदर एक मोठी गोष्ट लक्षांत आणण्यासारखी आहे, तिजविषयीं येथें थोडें लिहितों. ही गोष्ट मोरोपंताच्या कवितेचें, किंबहुना एकंदर महाराष्ट्रकवितेचें, स्वरूप ही होय.

या विषयावर थोडें दिग्दर्शन आह्मीं पूर्वीं एक वेळ केलेंच आहे.[3] सामान्यत: पाहतां मोरोपंताच्यासारखें संस्कृतशब्दप्रचुर व थाटमाटाचें काव्य पाहून कोणाचाही असा समज होणें स्वाभाविक आहे, कीं ही काव्यसरणी संस्कृतावरून उचललेली आहे. सदरील निबंधांत प्रस्तुत कवीच्या संबंधाचे लोकांचे अनेक ग्रह जे यापूर्वीं दाखल केलेले आहेत,— कीं मोरोपंत हा महापंडित होता, त्याच्या काव्याचे दहा दहा अर्थ होतात, वगैरे—ते सर्व वरील समजुतीवरूनच उत्पन्न झालेले आहेत हें उघड आहे. पण वस्तुत: पाहतां वरील समज अगदीं चुकीचा आहे. पूर्वनिर्दिष्ट निबंधांत आह्मीं दाखवलेंच आहे कीं, संस्कृत कवितेचें

१. "उपमा अशी कालिदासानेंच करावी; अर्थगौरव असें भरवीचेंच; पदलालित्य ह्मणजे शब्दांची दुमदार रचना ही दंडीसच साधली; पण माघकवीचे ठायीं मात्र हे तिन्ही गुण आढळतात."

२. "पहिल्याचा कवित्वविशेष उदात्तत्व हा होता; व दुसऱ्याचा पदलालित्य हा होय; आणि तिसऱ्याचे ठायीं वरील दोन्ही गुणांचें यौगपद्य आढळतें."

३. अंक ४७ (पृष्ठ ८२५--८२६.'सं०') पाहा.

स्वरूप व प्राकृत कवितेचें स्वरूप हीं दोन्ही अत्यंत विसदृश§ होत. वामन, मोरोपंत इत्यादि कवींपासून जो वाक्प्रवाह निघाला त्यास कालिदासभवभूत्यादिकांची वाणी ही मुळींच कारण नाहीं. तसें असतें तर महाराष्ट्रकविता आहे त्याहून फार निराळ्या तऱ्हेची असती. उदाहरणार्थ, मोरोपंताचेंच काव्य घ्या. मोरोपंताचा जर पंचकाव्यांवर व नाटकादिकांवर सतत परिश्रम असता तर त्यांतील सर्व विशेष त्याच्या कवितेंत दृष्टीस पडल्यावांचून राहतेना. हे विशेष कोणते ते पुढें लक्षांत येतीलच. यांचा वरील कवींच्या ग्रंथांत जो अभाव दृष्टीस पडतो त्यावरून असें स्पष्ट दिसतें कीं, वरील संस्कृत कवींचें वळण आमच्या महाराष्ट्रकवीस लागलें असावें हें मुळींच संभवत नाहीं. आतां मोरोपंतादि कवींच्या मनावर संस्कार† कोणाचा पडला व

§यासंबंधों विविधज्ञानविस्तारकर्त्यांचें ह्मणणें असें कीं मराठी काव्यें हीं रामायण–भारतादि संस्कृत ग्रंथांचीं अथवा त्यांतील प्रकरणांचीं 'केवळ भाषांतरें' आहेत असें कोणीही म्हणणार नाहीं व कोणीं असा उल्लेख केला आहे असें आमच्या पाहण्यांत नाहीं. बहुतेक मराठी काव्यांस संस्कृत ग्रंथांचा आधार असल्यामुळें त्यांस स्वतंत्र योग्यता जितकी असावी तितकी नाहीं असें मात्र पुष्कळांचें मत आहे. ह्मणजे महाराष्ट्रकाव्यें हीं बहुधा संस्कृत ग्रंथांतील कथानकांवरून रचलेलीं आहेत व त्या त्या विषयांवर संस्कृत काव्यरचना झाली असल्यामुळें व तीं संस्कृत काव्यें समजण्यापुरतें महाराष्ट्र-कवींना संस्कृतभाषाज्ञान असल्यामुळें त्यांच्या महाराष्ट्रकाव्यांतही पूर्व संस्कृत काव्यांतील गुणदोष कांहीं अंशानें आले आहेत. एका भाषेंतील अर्थांचें प्रतिबिंब दुसऱ्या भाषेंत यथास्थित पडलें असतां मूळ ग्रंथांतील विषयाची प्रतिमा जर दृष्टिगोचर झाली तरच तें भाषांतर. कुमारसंभव, मेघदूत, भामिनीविलास यांप्रमाणें वामन, मोरोपंत, मुक्तेश्वर इत्यादिकांनीं भारत, भागवत, रामायण या संस्कृत ग्रंथांचीं भाषांतरें केलीं असा आक्षेप कोणाचाच नाहीं. पद्यात्मक भाषांतर करणें किती दुर्घट आहे यासंबंधीं Dryden ह्मणतो:—

"A man should be a nice critic in his mother-tongue before he attempts to translate in a foreign language. Neither is it sufficient that he be able to judge of words and style, but he, must be a master of them too: he must perfectly understand his author's tongue, and absolutely command his own: so that to be a thorough translater, he must be a thorough poet. Neither is it enough to give his author's sense in good English, in poetical expressions, and in musical numbers; for, though all these are exceeding difficult to perform, yet there remains a harder task; and it is a secret of which few translators have sufficiently thought. I have already hinted a word or two concerning it; that is, the maintaining character of an author, which distinguishes him from all others, and makes him appear that individual poet whom you would interpret." 'सं॰'

† या मुद्यासंबंधीं विविधज्ञानविस्तारकर्ते ह्मणतात:—

"त्यांनीं व्यासादिकांचा कित्ता गिरविला असेल त्यांच्या काव्यांत व्यासादिकांची कल्पना-सरणी, वर्णनपद्धति वगैरे प्रकार आढळावयाचाच. त्यांच्या कृतींत त्यांच्या गुरुवर्यांच्या सरस्वतीचा ओघ सहजगत्या कल्पनाविचारालंकारादिरूपानें मिसळला असावा. परंतु 'विचार, कल्पना, अर्थ—

(पुढें चालू.)

त्यांस कवित्वस्फूर्ति कोठून प्राप्त झाली या गोष्टीचा जर विचार केला तर अंमळ शोधाअंतीं असें कळून येईल कीं, वरील कवींचे गुरु झटले ह्मणजे व्यास, वाल्मीकि वगैरे मंडळी होत. यांच्याच साध्या व प्रासादिक वाणीचा कित्ता आमच्या महाराष्ट्रकवींनीं वळवला. वास्तव

---

कार वगैरे सर्व त्या त्या (ह्मणजे अर्वाचीन) कवीचे" (अंक ४६ पृष्ठ ८०९ ओळी ११–१२ पाहा. 'सं०') होत हें ह्मणणें मुळींच शोभणार नाहीं. पटाईत शिष्यानें आपल्या सर्वमान्य गुरूच्या गुणांचें अनुकरण जर केलें नाहीं, तर शिष्यगुरुत्वाचें नातें प्रस्फुट न करणें हाच उत्तम पक्ष." 'सम्पादक'

१. "वरील गोष्टीचें एक मोठें प्रमाण हें आहे कीं जो ज्याचें अनुकरण करतो त्याच्याविषयींचा उल्लेख त्याच्या ग्रंथांत आढळतो. अर्वाचीन संस्कृत कवींच्या ग्रंथांतून (उदाहरणार्थ, 'प्रसन्नराघव', 'विश्वगुणादर्श', 'आर्यासप्तशती' इ०) पूर्वींच्या संस्कृत कवींस,—ह्मणजे कालिदासभवभूत्यादिकांस—उद्देशून केलेले उल्लेख आढळतात व कोठें कोठें नमनेंही आढळतात. महाराष्ट्रकवींत पाहावें तों कालिदासादि मंडळीचें नांवही आढळत नाहीं. त्यांचे उल्लेख व नमनेंही व्यासवाल्मीकांस व पूर्वकालीन महाराष्ट्रकवींसच उद्देशून केलेलीं आढळतात. रघुनाथपंडितानें मात्र सरतेशेवटीं 'नैषधा'विषयीं उल्लेख§ केलेला आढळतो. पण यापूर्वीं अनेक वेळां सांगण्यांत आलेंच आहे कीं, पंचकाव्यकारांच्या धर्तीवर* रचना केलेला हा एकच महाराष्ट्रकवि होय.

§ सदर उल्लेख हा:—

लोकीं सौरभ काव्यनाटक-कलालंकार-चूडामणी।
सर्वां 'नैषध' विद्दौषध असे विख्यात वाग्धोरणी.॥
हे त्याचीच टिका टिकोनि घटिका ऐकेल जो आदरें,।
बोले त्या रघुनाथपंडित कवी भेटे हरी सादरें.॥ 'सम्पादक'

* सदर मजकुरासारखाच मजकूर मागें (अंक ४७ पृष्ठ ८२६, शेवटच्या सात ओळी आणि पृष्ठ ८२७ पहिली ओळ व टिपेंतील चार श्लोक पाहा.) आला आहे. परंतु याशीं विसदृश असा मजकूर अंक ४६, पृष्ठ ८०९, ओळी ७–१२ येथें आला आहे. कारण तेथें स्वतंत्र रचना करणाऱ्या तिघांत रघुनाथपंडितांचाहि उल्लेख करण्यांत आला आहे तो अयथार्थ होय. यासंबंधीं विविधज्ञानविस्तारकर्ते ह्मणतात कीं ज्या महाराष्ट्रकाव्यरचनाकारांस संस्कृतांतील काव्यें समजण्यापुरतें त्या अभियुक्त भाषेचें ज्ञान होतें ते ह्मणजे नुसतें कथानक घेऊन स्वस्थ बसतील असा संभव नाहीं. आयते मनोरम विचार आणि अपूर्व कल्पना यांचे ताट पुढें गच्च भरून ठेविलें असतां, त्यांतून कोणी कांहींएक उचलून घेणार नाहीं असा हेकेखोर बहाद्दर कोण असेल तो असो. ज्याला स्वतःच्या काव्यस्फूर्तींचा इतका अभिमान असेल तो कथानकरूप परद्रव्यास हात लावण्यास सहसा धजणार नाहीं. वामनानें तर जीं आख्यानें रचिलीं आहेत त्यांस संस्कृत काव्यांचा केवळ कथानकापुरता आधार आहे इतकेंच नव्हे तर त्यांतील कल्पना, विचार इत्यादिकांचाही वामनानें आधार घेतला आहे. वामन 'भागवत रामायणा'च्या उपसंहारांत ह्मणतोः—

"समश्लोकीमध्यें रघुपति करी तो नियम कीं।
कथावे श्लोकार्थ स्वगुणरचनायुक्त यमकीं॥"

तसेंच 'ध्यानमाले'च्या शेवटीं तो ह्मणतोः—

"पद्यासि पद्यचि निघे मुखिं वामनाच्या॥"

मुक्तेश्वरानें भारत ग्रंथ आपल्यापुढें ठेवून आपलें काव्य रचिलें असावें असा उभय ग्रंथ समोरासमोर

(पुढें चालू.)

ठेवून वाचिले असतां भास होतो. अर्थात् कायद्याच्या ग्रंथांप्रमाणें निवळ शब्दशः भाषांतर केलें नसून, केवळ अर्थवाहकाचें म्हणजे टाकभाड्याचें काम न पतकरितां मूळ 'भारता'चा साधला तेवढा म्हणजे घेतां आला तेवढा आधार घेऊन, त्याजवरच स्वचातुर्याची भर घालून इंग्रजींतील 'Adaptation'च्या धर्तीवर 'स्वतंत्र' काव्यरचना करण्याचा त्यानें चांगला प्रयत्न केला. या आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ विस्तारकर्त्यांनीं मुक्तेश्वराच्या पहिल्या दोन पर्वांतील कांहीं उतारे व समानार्थक मूळ संस्कृत श्लोकहि मे, जून, जुलै (१८८०) च्या तिहेरी अंकांत दाखल केले आहेत. ज्या कवींनीं आपल्या काव्यांत जागोजाग दीर्घयमकरचना व प्रासानुप्रासरचना साधून अत्यंत सुशोभित केलें आहे त्यांस मूळ ग्रंथांचा अर्थ यथास्थित साधून प्रासांची व यमकांची समृद्धि कधींही साधितां येणार नाहीं. कोणती तरी एक गोष्ट साधितां येईल, परंतु दोन्ही उत्तम प्रकारें साधणें दुरापास्तच होय हें शास्त्रीबोवांचें प्रमाण (पृष्ठ ८०९ ओळ १२ ते पृष्ठ८१० ओळ २ पाहा) विस्तारकर्त्यांचे मतें कांहींसें अमेस धरण्याजोगें पण एकपक्षीय होय. कारण यमकप्रासादि शब्दालंकार भाषांतरास अंतरायभूत होतील असे दोन तीन कवींच्या कवितेखेरीजकरून कोणाच्याहि कवितेंत दृष्टीस पडत नाहींत. ग्रंथविस्तारावरून प्रचंड संस्कृत ग्रंथांचीं मराठी ग्रंथ भाषांतरें नव्हेत असेंहि शास्त्रीबोवा लिहितात (पृष्ठ८०८ ओळी १७–१९ पाहा.) पण विस्तारकर्त्यांस हें प्रमाण सर्वस्वीं प्रबळ वाटत नाहीं. कारण हा फरक कांहीं काव्यांसंबंधीं फारच अल्प आहे. मूळ आदिपर्व सुमारें ८८०० तर मुक्तेश्वराचें सुमारें ७२००. सकृद्दर्शनीं हाहि मोठा फरक वाटेल म्हणून याहून अल्पतर विस्तारदर्शक सभापर्व विस्तारकर्त्यांनीं दाखल केलें आहे, याचा विस्तार मुळांत २५११ व मुक्तेश्वराच्या ग्रंथांत २६१४ आहे. तेव्हां हें प्रमाण अमेस धरण्या-लायक नाहीं.

शास्त्रीबोवांचें आणखी एक प्रमाण हें कीं संस्कृताच्या मराठी भाषांतराचा विस्तार वाढतो पण मुक्तेश्वराचीं पर्वें मुळाहूनही ग्रंथसंख्येंत कमीच आहेत, संस्कृताप्रमाणें मराठींत संधि व समास असली योजना नसल्यानें थोडक्या शब्दांत भाषांतर होत नाहीं, मूळच्याहून मोठें वृत्त धरावें लागतें अगर मूळच्या एका पद्याचीं मराठींत दोन करावीं लागतात (पृष्ठ ८०९ ओळी १–६ पाहा) त्यासंबंधें विस्तारकर्ते म्हणतात कीं वामनानें अध्यात्मपर गीतेवर समश्लोकी टीका लिहिली आहे तींतहि अर्थ यथास्थित उतरला आहे. त्याचप्रमाणें जगन्नाथपंडिताच्या 'गंगालहरी'चेंहि मूळ छंदास धरून वामनानें अप्रतिम भाषांतर केलें आहे, पुढें विस्तारकर्त्यांनीं भामिनीविलास, मेघदूत, शुक्रनीति, कुमारसंभव यांचीं आपल्या काळचीं भाषांतरेंहि आपल्या म्हणण्याच्या पुष्टीकरणार्थ दाखल केलीं. असून मराठी कवींसहि मोठमोठे सामासिक पदसमूह आपल्या काव्यांत योजण्याचा पूर्ण अधिकार आहे. तो हजारों स्थलीं मोरोपंतासारख्या संस्कृतज्ञ कवीनें यथास्थित गाजविला आहे. जुने पंडित तर काव्यनाटकादिकांच्या भाषांतरांत एका श्लोकाचा अर्थ एकाच श्लोकांत व विशेषतः समान वृत्तांत करण्याचा कटाक्ष ठेवीत असें लिहितात. ते पुढें असेंहि म्हणतात कीं मोरोपंताप्रमाणें भाषा वश असल्यास चतुर कवि कदाचित् संस्कृतांतल्या मोठ्या वृत्ताच्या श्लोकाचें भाषांतर मराठींत थोडयाशा लहान वृत्तांत सुद्धां यथास्थित करील व शेवटीं प्रत्यक्ष अनुभवाच्या दृष्टीनें कुमारसंभवाच्या भाषांतरकर्त्यांचे (कृष्णशास्त्री दातारांचे) उद्गार त्यांनीं प्रस्तावनेंतून उतरून घेतले आहेत:—

"संस्कृत ग्रंथांतील प्रत्येक श्लोकाचा अर्थ प्रायः एक श्लोक, दोन साक्या, किंवा दोन आर्या यांत बांधला आहे. जेथें असें करतांना मूळ अर्थ संपून गेला तेथें पूर्वापर अमेळ व मूळ अर्थाची हानि ज्यानें होणार नाहीं अशा अर्थाचें वाक्य अगर वाक्यें पदरचीं घातलीं आहेत. स्थलविशेषीं जेथें एकाच आर्येंत किंवा साकींत मूळ श्लोकाचा अर्थ बांधितां आला तेथें तसाही बांधिला आहे." येणेंप्रमाणें मराठी कविता भाषांतररूप नव्हेच या मुद्द्याविरुद्ध बाजू विस्तारकर्त्यांनीं मांडली आहे. 'संम्पादक

सहजच त्यांच्या कृतींत जी सरस्वती प्रगट झाली आहे ती कालिदासप्रभृति मंडळीच्याहून निराळी आहे. उत्कृष्ट शिल्पकारानें आपलें सर्व कौशल्य खर्च करून शाणोल्लेखादि संस्कारांच्या योगानें ज्याचें सर्व तेज प्रगट करवलें आहे व नंतर मोठ्या नक्षीच्या कोंदणांत बसवून दिल्यानें तर जो विशेषच खुलतो आहे अशा हिऱ्यांत व वरील संस्कार व उपचार ज्यास झाले नाहींत अशा नूतन खनिज रत्नांत जितकें अंतर तितकेंच संस्कृत व महाराष्ट्र-कवितेंत होय. जयदेवानें पहिलीचें वर्णन येणेंप्रमाणें केलें आहे:—

यस्याश्चोरश्चिकुरनिकरः कर्णपूरो मयूरो
भासो हासः कविकुलगुरुः कालिदासो विलासः ।
हर्षो हर्षो हृदयवसतिः पञ्चबाणस्तु बाणः
केषां नैषा कथय कविताकामिनी कौतुकाय ॥ [१]

'प्रसन्नराघव,' (१, २२ 'सं०')

हें वर्णन संस्कृत कवितेस पूर्ण लागू आहे. पण महाराष्ट्रकवितेस तें लागू पडणार नाहीं. महाराष्ट्रकविताकामिनीचे ठायीं तिच्या वडील बहिणीचा थाटमाट, नोकझोंक, चापचोपी हे गुण बहुधां नाहींतच झटलें तरी चालेल. पहिलीचें ऐश्वर्य काय वर्णावें ? तिच्या प्रसाधनकर्मावर केवढ्या बड्या बड्या मंडळींची नेमणूक ! प्रत्यक्ष 'मुनित्रय' तीस निर्मल व उज्वल पटांनीं प्रावृत्त करण्यास व 'अंजनशलाके'नें तिचे कटाक्ष अमोघतर करण्यास व्यापृत झालेलें; 'रंभादि देवांगनां'स ज्यानें इंद्राच्या कचेरीत नाचण्याकरतां सजवाव्या त्या भरताचार्यांकडून तीस नाट्याविषयक शिक्षा मिळालेली; मम्मटादि अलंकारिकांच्या हातून तीस भूषाविधि होणारा ! मग असलें अपार ऐश्वर्य अनुकूल असल्यावर आमच्या गीर्वाण कवितेच्या अंगीं जी जगन्मोहकता आली आहे ती कां न यावी ? आतां दुसऱ्या बहिणीस वरील संपत्तीची कितीशी अनुकूलता आहे हें पाहिलें तर यासंबंधाची माहिती कोणासही द्यावयास पाहिजे असें नाहीं. पहिलीचा पुरस्कार करण्यास व तिचें लालनपालन करण्यास जसे विक्रमभोजप्रभृति अनंत राजे झाले तशी तर अगोदर दुसरीस मुळींच सोय नव्हती. ती बाढली झटली तर ज्ञानोबांच्या मठांत, तुकोबांच्या दुकानांत, रायजींच्या 'गंतातीरच्या झोंपडी'त किंवा दासांच्या सज्जनगडावर ! शेवटीं तर बिचारीस 'वाणी बाणो बभूवेति' †

१. "ज्या कविताबधूचा चोर हा चिकुरनिकर (केशपाश), मयूर हा कर्णपूर (कर्णभूषण), भास हा हास (हास्य), कविकुलाचा गुरु ह्मणजे कविश्रेष्ठ जो कालिदास तो जिचा विलास, हर्ष हा हर्ष (चित्ताचा उल्हास), आणि बाण हा जिच्या हृदयांत संचार करणारा साक्षात् पंचबाण (मदन) होय. ती कोणाच्या मनास कौतुक करीत नाहीं ?"

† गोवर्धन नामक रसिक व चतुर कवीनें आपल्या 'सप्तशती'त बाणभट्टाविषयीं झटलें आहे:-

जाता शिखंडिनी प्राग्यथा शिखंडी तथाऽवगच्छामि ॥
प्रागल्भ्यमधिकमाप्तुं वाणी बाणो बभूवेति. ॥

'ज्याप्रमाणें पूर्वी शिखंडिनी ही कन्या (एका यक्षानें आपलें पुंस्त्व दिल्यामुळें) शिखंडी झाली तद्वत् वाणी (सरस्वती) ही अधिक धीटपणा अंगीं येण्याकरितां बाण ('बवयोरभेदात्) झाली असें मला वाटतें.' 'सम्पादक'

या वचनास अनुसरून भावुकजनांच्या रंजनार्थ दफावरही पदविक्षेप करावा लागला! सारांश, वरील दोन्ही कवितांची स्थितिरीति अत्यंत भिन्न होय. कालिदासादिकांची जी अर्वाचीन कविता ती महाराष्ट्रकवितेची जनयित्री मुळीच नव्हे; तर तिच्याहून प्राचीन जी वाल्मीकिव्यास इत्यादि आद्यकवींची वाणी तिच्यापासून हिचा उगम आहे.

वरील गोष्ट ध्यानांत ठेवली असतां मोरोपंताच्या कवितेंत जे दोष आढळतात त्यांची उपपत्ति सहज होणार आहे. या दोषांपैकीं कांहीं भावरूप आहेत व कांहीं अभावरूप आहेत. ज्यानें संस्कृत कवितेचें किंवा इंग्रेजी कवितेचें स्वरूप पाहिलें असेल त्यास प्रस्तुत कवीचे ठायीं पदलालित्य, माधुर्य, प्रसाद इत्यादि गुण † असावे तसे नाहींत हें सहज वाटणार आहे.

† यासंबंधीं विविधज्ञानविस्तारकर्ते म्हणतातः—

"प्रास, यमक, श्लेष इत्यादि शब्दालंकारांच्या रचनेकडे लक्ष दिलें म्हणजे अर्थाची ओढाताण होते, एवढेंच केवळ नव्हे; तर काव्याचा अर्थ मनांत येण्यास प्रयास पडतात. गणितांतला प्रश्न जितका जितका कठिण, तितका तितका तो सोडविल्यापासून आनंद अधिक होतो......हीच गोष्ट काव्याच्या अर्थास कांहीं अंशीं लागू आहे. परंतु काव्य वाचावयाचें असतें मनोरंजनाकरितां; त्यांत इतका त्रास सोसणें रसिक जनांस आवडत नाहीं.........शिवाय, अमुक एक श्लोक पुष्कळ वर्षें अडला होता, तो अमक्या पंडितानें लाविल्यामुळें अमुक बिचेस उत्तेजन आलें असेंही कांहीं सांगतां यावयाचें नाहीं......एका भाषणाचे दोन दोन तीन तीन अर्थ होणें, हें क्वचित् एकादे वेळेस मनास आनंदप्रद होतें; त्यापासून नेहमीं संतोष होत नाहीं. बोलण्यामध्यें एकादे वेळेस अशी कोणीं खुबी केली, तर तिची मौज वाटते; पण जें बोलायाचें तें नेहमीं दोन अर्थांचें बोलायाचें, असा जर एकादा मनुष्य असेल, तर त्याशीं भाषण करणें कोणालाही आवडणार नाहीं. कां कीं त्याच्या बोलण्याचा खरा आशय कोणता, ह्याचा विचार मनुष्यास पावलोपावलीं करावा लागेल.

शब्दालंकार हे सर्वस्वीं दूषणीय होत हें मत मात्र अयथार्थ होय. कारण अलंकार जे आहेत ते शोभादायक असले पाहिजेतच आणि त्यांचा उपयोग जर सत्कविवर्गांतील कित्येकांनीं केलेला आढळतो तर शब्दालंकार हे त्याज्य असें सिद्ध होत नसून ते आदरार्ह आहेत असें ठरतें.........पण या गौण अलंकारांची जी अतोनात रेलचेल कांहीं काव्यांतून दिसून येते, ती अर्थप्रतिबंधक असल्यामुळें सहृदय लोकांस पसंत नाहीं. कालिदासाच्या 'रघुवंशा'मध्यें अथवा भवभूतीच्या 'मालती-माधव' नाटकांत तीन तीन अक्षरांची अनुवृत्ति होई अशी रचना केली असली कीं, त्यांच्या प्रयोगाचें प्रमाण धरून सर्व पद्यभर यमकरचना करावी हा प्रकार मात्र अनुचित.........कालिदासानें रघुवंशाच्या द्वितीय सर्गांत 'वधाय वध्यस्य शरं शरण्यः' अशी रचना केली आहे तर आपल्यास—

अनळसमीहित साधीं राया! वारा महीवरा! कामा,।
अनळस मोहि तसा धीरा! यावा रामही वराका मा.॥ [वनपर्व, ८,५०. 'सं०']

अशी तन्हा आणावयास अथवा इतक्याच विचित्रतेनें तृप्ति न झाली तर ती होण्यासाठीं,

नूनं नुन्नानि नानेन नाननेनाननानि नः ।
नाऽनेना ननु नाऽनूनें नैनेनानानिनो निनीः ॥

अशी एक-वर्ण-रचना करण्यास काय हरकत आहे? हा पक्ष मात्र आम्हांस बिलकुल संमत नाहीं. शब्दालंकार हे वस्तुतः शोभादायक खरे, परंतु त्यांच्या अंगीं असें कांहीं प्राबल्य आहे कीं, त्यांचा सहवास जसजसा ज्यास्त आणि दृढ होतो तसतसा तो सदभिरुचीस विघातक होऊन, मूळ गुणाचा

(पुढें चालू.)

संस्कृतांत श्रीहर्षानें व इंग्रेजींत पोपनें भाषा कमवण्यांत जी मेहेनत घेतली व त्या कामांत

---

अपकर्ष करितो......कवितावधूच्या नैसर्गिक लावण्यास शोभा आणणारे उपमादिक अर्थालंकार घाला-वयाचे टाकून, तिच्या कमनीय अंगावर दीर्घयमकादिक अवजड अलंकार घातले असतां तिच्या स्वाभाविक सौंदर्याची वृद्धि न होतां उलट हानि होते व तिच्या ललित स्वरूपाचा सुद्धां लोप होतो. .........स्वाभाविक लावण्य व कृत्रिम सुवर्णादिक अलंकार या दोहोंचा जेथें समागम झाला आहे तेथें एकमेकांस एकमेकांपासून शोभा प्राप्त होणारी आहे; व तसा संयोग अधिक मनोहर होणारा आहे हेंही स्पष्ट आहे. पण जेथें स्वभावसिद्ध लावण्याचा फारसा अंश नसून कृत्रिम दागिन्यांची मात्र गर्दी आहे, तेथें कोणाही रसिकाचें मन कधींही लुब्ध होऊन बसणार नाही. मोरोपंताची वर दाखल केलेली आर्या कोणा रसिकव्यास बरें पसंत पडेल?......यमकबद्ध छंदाविषयीं आणि प्रासानुप्रासा-विषयीं एकदां हौस उत्पन्न झाली म्हणजे ती थोडथोडक्यानें तृप्त होत नाहीं. तिचें प्राबल्य असजसें वाढत जातें, त्या त्या मानानें कवीची अभिरुचि बिघडून तिचा क्रमाक्रमानें अपकर्ष होण्याचा संभव असतो.........या शब्दचित्राच्या वेढांत ज्याचा पाय एकदां अडकला, त्याची बहुधा फसगतच झालेली दृष्टीस पडते. सुंदर अर्थाची आणि सुंदर, मृदु व कर्णमधुर शब्दांचा सांगड घालून देणें हें काम बहुतेक अशक्य असेंच लेखिलें पाहिजे. या दोहोंचा निर्दोष समागम करून देण्याची ज्या ज्या कविजनांनीं खटपट केली आहे, त्यांस त्यांच्या श्रमाप्रमाणें यश आलें आहे असें म्हणतां येत नाहीं.... सर्व महाकवींच्या कृतींत आढळणारा हा 'प्रसाद' नामक प्रमुख गुण, पंतांच्या काव्यांत फारसा नाहीं, म्हणून प्रसन्नार्थत्वही फारसें सांपडत नाहीं. आतां कृत्रिम रमणीयत्वाची जी अपूर्व इमारत पंतांनीं आपल्या कौशल्यानें उठवून दिली आहे ती पाहून रसिक प्रेक्षकांचें मन खचित तल्लीन होईल हें खरें; परंतु मिष्टान्नाचें सेवन रोजच होत गेलें, तर त्याचा जसा कांहीं दिवसांनीं वीट येण्याचा संभव असतो व साधे अन्नाची कधींही अरुचि उत्पन्न होण्याचा जसा संभव नसतो, तसाच प्रकार पंतांच्या काव्य-रसाविषयीं होय.........पंतांच्या मार्गांत पाचपेंच आणि आडवेढे फार आहेत. वादविवादांमध्यें वैयाकरण, नैयायिक, अथवा पंडित ज्याप्रमाणें पूर्वपक्ष उत्तरपक्ष करूं पाहतात, त्यांच्यासारखी पकडींची ठेव पंतांच्या कवितेंत असल्यामुळें तिच्या प्रसन्नार्थत्वाची कांहीं अंशीं हानि झाली आहे.... जें कांहीं वरकांतीं दृष्टीस पडेल त्यास भुलून लोक एकाद्याचा खूब स्तुतिपाठ जसा गातात, तसाच पंतांचा प्रकार झाला असावा. त्यांच्या कवितावधूच्या दागिन्यांची बाह्य चकाकी आणि कटाक्षविक्षेप पाहून तिचें अंतरंग पाहण्याचें कोणास मानच राहिलें नसावें......कालिदासासारख्या कवीश्वराच्या संस्कृत काव्यांत सुद्धां जे अवघड शब्द कधींही आढळावयाचे नाहींत ते पंतांनीं स्वकाव्यांत खुशाल-पणें गुंफून दिले आहेत. कालिदासाचीं काव्यें समजण्यास 'अमरकोश' येत असला तर चांगला निर्वाह होतो; परंतु पंतांचें प्राकृत काव्य समजण्यास तेवढ्या कोशाची सामग्री पुरी कधींच व्हावयाची नाहीं. शिवाय निरनिराळ्या प्रांतांत चालू असणाऱ्या शब्दांचा पंतांनीं उपयोग केल्यामुळें यमकरचनेस चांगलें साधन झालें. पण पूर्वोक्त दोषास त्याचे योगानें ज्यास्त अवकाश मिळाला......नैषध, लक्ष्मी-सहस्र, भारतचंपू, विश्वगुणादर्श, राघवपांडवीय काव्य इत्यादि ग्रंथांच्या रससंपत्तीस लुब्ध झालेल्या रसिकांचें मन आपल्या कवित्वानें बद्ध करून सोडण्याचा यत्न जेव्हां पंतांनीं केला, तेव्हां त्यांस आपलें भाषाप्रभुत्व व शब्दचमत्काररचनाचातुर्य हीं दाखविणें भाग पडलें असावें.........पंतांनीं साधी पदरचना केली असती तर तत्कालीन रसिकांस त्यांची कविता कधींच आवडली नसती..... संस्कृत काव्यांची बरोबरी करणारी पंतांची कविता पाहून काव्यालंकारज्ञांचेंही मन तिकडे लागलें असावें व शीघ्रकवित्वास्तव आणि बुद्धिचातुर्यास्तव मोरोपंतांची पंडितांमध्यें बरीच मान्यता असावी असें दिसतें."

'सम्पादक'

त्यांस जें यश आलें, तसा प्रकार प्रस्तुत कवीचे ठायीं, किंबहुना कोणत्याही महाराष्ट्रकवीचे ठायीं, त्यास आढळून येणार नाहीं. आमच्या महाराष्ट्रकवींनीं सामान्यत: पाहतां अर्थव्यंजनाच्या पलीकडे थोडेंच लक्ष दिलेलें आढळेल. आपल्या मनांतील अर्थ शब्दांनीं व्यक्त झाला ह्मणजे झालें, मग शब्दांच्या ठाकठिकीकडे किंवा सौंदर्याकडे विशेष लक्ष पुरवायाचें नाहीं, असा त्यांचा सामान्य प्रघात आढळतो; व त्यांचा ग्रंथरचना करण्यांतला उद्देश केवळ भक्ति, ज्ञान, वैराग्य यांपैकींच असल्यामुळें भाषा कमवण्याचा जो अप्रधान उद्योग त्याची त्यांनीं उपेक्षा केली यांत मोठेंसें नवल नाहीं. प्रस्तुत कवीवर लागू होण्यासारखा वरील भाषासंबंधी पहिला दोष होय. दुसरा अर्थरचनेच्या संबंधानें. या प्रकरणांत आमच्या एकंदर महाराष्ट्रकवींचे ठायीं, व पुष्कळ अंशीं या चरम कवीचे ठायींही, न्यून काढण्यास जागा आहे. संस्कृत कवींचा प्रयत्न जसा वाचकांस पदोपदीं चमत्कृत करण्याचा आढळतो तसें या अर्वाचीन कवीच्या ग्रंथांतून आढळत नाहीं. आतां वरील हेतु साधण्यास संस्कृत कवींस जीं साधनें आहेत, तीं सर्व प्राकृत कवींस नाहींत हें उघड आहे;[1] तरी येवढें खरें आहे कीं, जर आमचे महाराष्ट्रकवि साहित्यशास्त्रज्ञ असते § तर सध्यां आहे त्याहून मराठी कवितेंत पुष्कळ बहार दृष्टीस पडती; ह्मणजे संस्कृत कवितेंत[2] जशीं हृदयंगम वर्णनें, अलंकारिक भाषणप्रकार वगैरे आढळतात तसे प्रकार मराठी कवितेंतही आले असते.

तर संस्कृत व इंग्रेजी कवितेशीं परिचित असलेल्या वाचकांस पुष्कळ ठिकाणीं मोरोपंतांचें काव्य मनोरम वाटणार नाहीं. वाचकाचें चित्त वेधून टाकण्याचे वर जे शब्दरचनेचे व अर्थरचनेचे उपाय सांगितले त्यांविषयीं इतर महाराष्ट्रकवींप्रमाणें त्यानेंही विशेष प्रयत्न

---

१. वरील साधनांपैकीं एक मोठें साधन श्लेषयोजना हें होय. श्लेषप्रकरणीं प्रस्तुत कवीची कीर्ति किती आहे व ती किती निराधार आहे, याविषयीं पूर्वी पुष्कळ विवेचन झालेलेंच आहे. प्रकृत स्थलीं येवढेंच सांगतों कीं, ज्या काळीं संस्कृत विद्येचें सामान्यत: पुनरुज्जीवन होऊन त्या भाषेंतील काव्यपद्धतींची चोहोंकडे वाहवा होती, व कीर्तनप्रसंगीं वगैरे 'चंपूकारा'दिकांच्या श्लेषवैचित्र्यावर पंडितजनांची वारंवार मान डोलत असेल व वाहवा उडत असेल, त्या काळींही आमच्या कवीनें वरील अलंकाराचा थाटमाट आपल्या प्राकृत कवितेंत आणण्याचा प्रयत्न केला नाहीं हें त्याच्या समंजसतेचें व रसिकतेचें मोठें प्रमाण आह्मी समजतों.

§विस्तारकर्ते ह्मणतातः—"साहित्यशास्त्रानभिज्ञतेस्तव आमच्या कवींना मूळ संस्कृत ग्रंथांतील अलंकारांचें साहित्य घेऊन आपल्या काव्यांस सालंकार करणें अवश्य पडलें असावें. व स्वकाव्यप्रसाधनार्थ त्यांनीं आपल्या गुरूंच्या घरची सामग्री घेतली असावी असा संभव आहे व तो कोठें कोठें दृग्गोचरही होतो;" मग 'विचार, कल्पना, अलंकार वगैरे सर्व त्या त्या कवीचे स्वत:चे होत' व शास्त्रीबोवांच्या विधानाची (पृष्ठ ८०९, ओळी ११-१२ पाहा) संगति या विधानाशीं कशी लावावयाची? असा त्यांचा सवाल आहे. 'सम्पादक

२. 'संस्कृत कविता' या शब्दांनीं कालिदासभवभूत्यादिकांची कविता घ्यावयाची हें संदर्भावरून स्पष्टच आहे. एरवीं वेद, पुराणें, इतिहास हीं सर्व वरील संज्ञेत येणारींच आहेत, पण तीं घ्यावयाचीं नाहींत.

केला नसल्यामुळें पुष्कळ ठिकाणीं प्रस्तुत कवीच्या ग्रंथांत नीरसता भासेल. येवढें खरें आहे कीं, प्रस्तुत कवीस महाराष्ट्रभाषा ही केवळ करतलामलकवत् असल्यामुळें त्याच्या शब्दरचनेच्या सफाईनें व यमकप्रासांच्या योजनेनें वाचकांस वरील ठिकाणींही बरीच करमणूक होते, पण अशा स्थळीं विशेष उपयोगीं पडण्यासारखे जे पूर्वोक्त प्रकार त्यांची अनुकूलता प्रकृत काव्यास असती तर याहून बरें झालें असतें यांत संशय नाहीं.

आतां प्रस्तुत कवीच्या कृतींत आढळणाऱ्या एका मोठ्या दोषाचें निरूपण करून हें विवरण व एकंदर निबंध समाप्त करतों. हा दोष अश्लीलत्व होय. अश्लीलत्व ह्मणजे चावटपणा नव्हे; हा दोष मोरोपंताच्या काव्यांत मुळींच आढळत नाहीं. अश्लीलत्व ह्मणजे प्रौढ काव्यांत न खपण्यासारख्या ग्राम्य शब्दांचा प्रयोग व केवळ व्यावहारिक दाखले हे होत. सत्कवीची शब्दपद्धति व अर्थपद्धति लक्षपूर्वक पाहिली असतां ही गोष्ट सहज लक्षांत येण्यासारखी आहे, कीं दोहोंमध्यें ग्राम्यतेचा लेशही त्यांस खपत नसतो; नुसती वाक्यरचनाही कवितेंत व्यावहारिक भाषेहून निराळी असावी लागते. आणि त्यांतून शब्द व दृष्टांत हे तर प्राकृत व्यवहारांतले व ग्राम्य भाषेंतले मुळींच उपयोगी नाहींत. काव्याचा उद्देश मनोरंजन हा असल्यामुळें, व जे विषय नेहेमीच्या व्यवहारांतले व अत्यंत परिचित त्यांच्यापासून वरील उद्देश साध्य होत नसल्यामुळें, त्यांचे वाचक शब्द व त्यांचे दृष्टांत हे मनास आल्हाद देत नाहींत; उलटें असें सुद्धां होतें कीं, एकादें पद्य सुंदर साधलें असून त्यांत मोठा प्रौढ अर्थ संगृहीत केलेला असतो, पण वरच्या प्रकारच्या एका शब्दानें किंवा दाखल्यानें दुधांत मिठाचा खडा टाकल्याप्रमाणें होऊन जातें! हा आक्षेप सर्व वाचकांस बहुधां नवीनच वाटणार आहे, यास्तव त्याच्या स्पष्टीकरणार्थ कांहीं उदाहरणें † देतों:—

---

१. 'विविधज्ञानविस्तार' अंक ७ पाहा.

† पुढील सात उदाहरणांसंबंधीं खालीलप्रमाणें खुलासा. मोरोपंतांच्या बाजूनें गणेशशास्त्री लेले, त्र्यंबकेश्वर, मु० नासिक यांनीं २५-७-१८८० रोजीं पाठविलेला, मालेच्या ७० व्या (आक्टोबर १८८० च्या) अंकांत प्रसिद्ध झाला होता:—

(१) 'आ' हा शब्द व 'तेला' 'तुपा'चा दृष्टांत ग्राम्यजनैकव्यवहार्य (हलक्या लोकांच्याच मात्र व्यवहारांत येणारे) नसल्यानें त्यांस ग्राम्य ह्मणवत नाहीं.

(२) वणिकापाशीं कणिक, साखर, तूप वगैरे नाना जिन्नस असतात. त्यांतून गिऱ्हाइकास हवा तो जिन्नस तो काढून देतो. तद्वत् आपल्याजवळच्या नाना नीतींच्या पोतड्यांतून धृतराष्ट्रास रुचेशी नीति कणिक ऋषीनें सांगितली हा अर्थ सुव्यक्त करण्यासाठीं समर्पकपणें पंतांनीं वणिकाचा दृष्टांत घेतला आहे.

(३) भोळसरांना वाणी दडपतो खरा पण आपलें कपट ओळखणाऱ्यापुढें हातच जोडतो, अशा अर्थयोजनेच्या योगें हा वणिकाचा दृष्टांत समर्पक होय.

(४) आर्त ह्मणजे दुखणाईत त्याला आराम बाजेनें वाटतो त्याप्रमाणें व्यसनरोगानें जे दुखणाईत त्यांस धर्मस्थितिरूप बाजच आरामदायक होय. तेव्हां येथील उपमा व रूपक अत्युत्कृष्ट होय. 'सेतू' वगैरेंची उपमा साजली नसती. 'बाज' हा शब्द 'शब्द ब्रह्म जिये बाजे' इत्यादि स्थळीं ज्ञानेश्वरहि वापरतात. मग तो ग्राम्य कसा?

(पुढें चालू.)

तूं जेंवि देवकीला भेटासि, तैसेंचि भेट आतेला, ।
आह्मांहुनि तूंचि अधिक, घृत सोडुनि कोण करिल आ तेला ? ॥
उद्योगपर्व ६, ( ३५. सं० )

धृतराष्ट्रासि रुचेसी सांगे अत्युग्र नीति तो कणिक. ।
वणिक ग्राहकहस्तीं देतो विष-सर्पि-शर्करा-कणिक. ॥
आदिपर्व, ( २८, ५. सं० )

प्रभुला बिभीषण ह्मणे, 'पावेल जया न रावणि कदापी, ।
निजकपटह्मा पाणी जोडी, भोळ्या नरा वणिक दापी.' ॥
वनपर्व १२, ( ५३. सं० )

आह्मां व्यसनार्तांची धर्मस्थिति हेचि बाज, पावे गा ! ।
त्वां मोडावें न इला, स्वस्वास्थ्यसुखार्थ बा ! जपावें गा ! ॥
सभापर्व ५, ( ४१. सं० )

---

( ५ ) प्रथम प्रेक्षकाला 'चकोरा'ची व पुढें त्याच्या दृष्टीला 'माशी'ची उपमा दिली; दोन्ही दृष्टांतांतील उपमेय व उपमान भिन्न असल्यानें पुनरुक्तिदोष लाग पडत नाहीं. एकामागून एक अनेक दृष्टांत ज्ञानेश्वरी वगैरे ग्रंथांतहि आढळतातच.

( ६ ) वरील माशीचा व हा 'पितृकरतलस्थ फोडा'चा दृष्टांत वरच्या कारणास्तवच ग्राम्य नव्हे.

( ७ ) येथें माथ्यांत तिडीक जाण्यापुरता दृष्टांत दिला आहे. इंद्रानें रायतें मक्षिलें अगर इंद्राचा रायत्याशीं कांहीं संबंध वर्णिला असा कांहींच प्रकार नाहीं. मग उपहास कां ? खूप मोहऱ्या वाटून घातलेलें रायतें मुखप्रिय असल्यानें तें एकदम पुष्कळ खाणाऱ्या बाळकांचे नाकांत फणफणाट होऊन मस्तकांत असह्य तिडीक जाते, तद्वत् राजाचें स्वर्गगमन इंद्राला अत्यंत दुःसह झालें असा उघड अर्थ आहे. इंद्र व रायतें यांची अननुरूपता मानण्यास जागाच नाहीं. सभ्य लोकांच्या व्यवहारांत येणाऱ्या गोष्टि दृष्टांतरूपानें सांगितल्यानें ग्राम्यता-दोष होत नसून सौलभ्य-गुणच होतो. नांगरहांके वगैरे ग्राम्य ह्मणजे हलक्या लोकांच्याच भाषणांत येणाऱ्या शब्दांचा प्रयोग ग्राम्य ठरेल. यमकादि अलंकार साधत असल्यास मोरोपंत अप्रयुक्तत्वादि क्षुद्र दोषांकडे लक्ष देत नसत. सदर सुलभशावरोबरच लेलेशास्त्र्यांनीं मालेसंबंधीं रंगेल प्रास्ताविक उद्गार काढले आहेत ते असेः—

> हिचा वास बहुत चांगला ह्मणून ही कित्येकांस फारच आवडते. परंतु हिच्या वासांत विशेष उग्रता भासून कितीएकांस ती आवडत नाहीं असेंही आढळतें. कितीएक तरुण रसिक तर हिजविषयीं इतके प्रेमळ आहेत कीं, हिच्या अंकाचा दर्शनकाम केव्हां होईल अशी ते मोठ्या उत्कंठेनें वाट पहात बसतात.........हिचें बोलणेंचालणें झपाट्याचें, दृष्टि चपल, मार्मिक आणि दुसऱ्याचे गुणदोष दर्शनसमकाल जाणणारी, व ही रसिक तरुणांस प्रिय असून कित्येक अरसिक व (हिच्याहून) वृद्ध व धर्मभोळे, आणि ह्मणूनच आमही अशा पुरुषांस ही आवडत नाहीं. ही मोठी उद्धट, दांडगी, आणि अमर्याद आहे, असें ह्मणून ते हिचा त्रास करितात आणि हिचें अदर्शन होईल तर बरें अशी देखील इच्छा करितात असा बोभाटा ऐकतों; असो.
>
> 'सम्पादक'

यदुनाथातें गोष्टीं पाहे, जैसा चकोर सोमासी. ।
त्याच्या प्रभु-मूर्ति-रत-दृगुपमेसि सितारता गमो मासी. ॥

मंत्रभागवत, ( स्कंध १०, ४८४. सं० )

उत्तर ह्मणे, 'नको, गे! पायां पडतों बृहन्नडे ! सोड, ।
जोड दिली, दुखउ नको; केवल पितृकरतळस्थ हा फोड.' ॥

विराटपर्व ३, ( ७४. सं० )

गेला स्वर्गासि अमित सुकृतें सोडोनि * राय; तें नाकीं ।
होय सुदु:सह शक्रा, जैसें बाळासि रायतें नाकीं ॥

आदिपर्व, ( ११, ७५. सं० )

पहिल्या आर्येंत 'आ' हा शब्द व तेलातुपाचा दृष्टांत हे दोन्ही ग्राम्य होत. दुसऱ्या व तिसऱ्या आर्येंतील प्रसंगास वाण्याच्या दुकानाचे दाखले अगदीं अप्रयोजक दिसतात. चौथींत 'बाज' शब्द घातला आहे तो मुळींच शोभत नाहीं; सेतूंची वगैरे उपमा अधिक सरस होती. पांचवींत पहिली चंद्रचकोरांची उपमा चांगली आहे व ती कविसंप्रदायसंमतही आहे; पण उत्तरार्द्धांतील साखरेची व माशीची उपमा ही ग्राम्यत्वास्तव अप्रशस्त होय. शिवाय तिची अवश्यकता नसल्यामुळें ती पौनरुक्त्यदोषासही पात्र आहे. सहाव्या आर्येंतील उपमा तर केवळ अश्लील होय. सामान्यत: व्यवहारांत तशा प्रकारची भाषणपद्धति आहे खरी, पण ती कवितेंत शोभा पावणार नाहीं. शेवटल्या आर्येंतील रायत्याचा दृष्टांत वाचून तर थोडेच वाचक हांसल्यावांचून राहतील. इंद्र कोणीकडे आणि रायतें तें काय ! ![1]

---

* पाठांतर:—सोडूनि ( पराडकरी प्रत). 'सम्पादक'

१. वर सांगितलेला दोष शेक्स्पीयरच्या नाटकांतही कोठें कोठें आढळतो. त्याच्या योगानें रसभंग कसा होतो याविषयीं जॉन्सनच्या रँब्लरच्या १६८ व्या अंकांत विवेचन§ केलेलें आहे. तें आमच्या आंग्लभाषाभिज्ञ वाचकांस वाचण्याविषयीं आह्मी शिफारस करतों.

§ सदर विवेचन पुढीलप्रमाणें आहे:—

"It has been observed by Boileau, that 'a mean or common thought, expressed in pompous diction, generally pleases more than a new or noble sentiment delivered in low and vulgar language; because the number is great of those whom custom has enabled to judge of words, than whom study has qualified to examine things.'

This solution might satisfy, if such only were offended with meanness of expression as are unable to distinguish propriety of thought, and to seperate propositions or images from the vehicles by which they are conveyed to the understanding. But this kind of disgust is by no means confined to the ignorant or superficial; it operates uniformly and universally upon readers of all classes; every man, however profound or absracted, perceives himself irresistibly alienated by low terms; they who pro-

( पुढें चालू. )

fess the most zealous adherance to truth are forced to admit that she owes part of her charms to her ornaments; and loses much of her power over the soul when she appears disgraced by a dress uncouth or ill-adjusted.

We are all offended by low terms, but are not disgusted alike by the same compositions, because we do not all agree to censure the same terms as low. No word is naturally or intrinsically meaner than another; our opinion therefore of words, as of other things arbitrarily and capriciously established, depends wholly upon accident and custom.......................

Words become low by the occasions to which they are applied, or the general character of them who use them; and the disgust which they produce arises from the revival of those images with which they are commonly united. Thus, if, in the most solemn discourse, a phrase happens to occur which has been successfully employed in some ludicrous narrative, the gravest auditor finds it difficult to refrain from laughter, when they who are not prepossessed by the same accidental association, are utterly unable to guess the reason of his merriment. Words which convey ideas of dignity in one age, are banished from elegant writing or conversation in another, because they are in time debased by vulgar mouths, and can be no longer heard without the involuntary recollection of unpleasing images.

When Macbeth is confirming himself in the horrid purpose of stabbing his king, he breaks out amidst his emotions into a wish natural for a murderer:—

—Come, thick night!
And pall thee in the dunnest smoke of hell;
That my keen knife see not the wound it makes;
Nor Heaven peep through the blanket of the dark,
To cry, Hold, Hold!

............What can be more dreadful than to implore the presence of night, invested, not in common obscurity, but in the smoke of hell? Yet the efficacy of this invocation is destroyed by the insertion of an epithet now seldom heard but in the stable, and *dun* night may come or go without any other notice than contempt...........If we are alarmed at the terror of the soldiers commanded by Cæsar to hew down the sacred grove, who dreaded, says Lucan, lest the axe aimed at the oak should fly back upon the striker;

None dares with impious steel the grove to rend lest on himself the destined stroke descend; we cannot surely but sympathise with the

( पुढें चालू. concluded on the next page. )

६. असो; याप्रमाणें दोन अडीच वर्षांपूर्वीं जो विषय आह्मीं हातीं घरला त्याची आज समाप्ति झाली. आतां या पंताख्यानाच्या शेवटीं त्याची थोडी फलश्रुति सांगितली असतां अप्रासंगिक होणार नाहीं असें समजून चार शब्द लिहितों. वरील आख्यानावरून पहिली मोठी गोष्ट ही ध्यावयाची कीं, जो कोणी लिहूं लागेल त्यास आमची महाराष्ट्र-कविता हा विषयही योग्यतेच्या मानानें किंवा वैचित्र्याच्या मानानें ल्हान आहे असें भास-

---

horrors of a wretch about to murder his master, his friend, his benefactor who suspects that the weapon will refuse its office, and start back from the breast which he is preparing to violate. Yet this sentiment is weakened by the name of an instrument used by butchers and cooks in the meanest employments; we do not immediately conceive that any crime of importance is to be committed with a *knife*; or who does not, at least from the long habit of connecting a knife with sordid offices, feel aversion rather than terror?

Macbeth proceeds to wish, in the madness of guilt, that the inspection of Heaven may be intercepted, and that he may, in the involution of infernal darkness, escape the eye of Providence. This is the utmost extravagance of determined wickedness: yet this is so debased by two unfortunate words, that while I endeavour to impress on my reader the energy of the sentiment, I can scarcely check my risibility, when the expression forces itself upon my mind; for who, without some relaxation of his gravity, can hear of the avengers of guilt *peeping through a blanket*?........................The injury that grand imagery suffers from unsuitable language, personal merit may fear from rudeness and indelicacy. When the success of Æneas depended on the favour of the queen upon whose coasts he was driven, his celestial protectress thought him not sufficiently secured against rejection by his piety or bravery but decorated him for the interview with preternatural beauty. Whoever desires, for his writings or himself, what none can reasonably contemn, the favour of mankind, must add grace to strength, and make his throughts agreeable as well as useful. Many complain of neglect who never tried to attract regard. It cannot be expected that the patrons of science or virtue should be solicitous to discover excellences, which they who possess them shade and disguise. Few have abilities so much needed by the rest of the world as to be caressed on their own terms; and he that will not condescend to recomenend himself by external embellishments, must submit to the fate of just sentiments meanly expressed, and be ridiculed and forgotten before he is understood."

—The Rambler, No 168, Saturday, Oct. 26, 1751. '*Editor*.'

णार नाहीं. इंग्रेजी व संस्कृत कवितेचा जसा विस्तार मोठा आहे, तसाच हिचाही असून हिजवर हवें तेवढें विवेचन होण्यास जागा आहे. केवळ एका पंडितंमन्य पाद्री साहेबांनीं एका पृष्ठा दोन पृष्ठांत वासलात लावून टाकावी यापेक्षां तिची योग्यता फार अधिक आहे. तर आमच्या नवीन विद्वानांनीं आजपर्यंत धरलेली स्वभाषेविषयींची व तींतील कवितेविषयींची लाज सोडून देऊन व कवितेच्या नव्या शाखा स्थापण्याची वेडगळ हाव तूर्त एकीकडे ठेवून जर जुन्या कवितेचें चांगलें अध्ययन केलें व तिच्या गुणदोषांचें विवेचन केलें तर फार उपयोग होण्यासारखा आहे. एक तर इंग्रेजी भाषेच्या योगानें होणारें जें स्वभाषादूषण तें बंद होईल; दुसरें स्वदेशीय कवितेची त्यांस योग्यता कळून येईल; आणि तिसरें हें कीं, स्वदेशाविषयींच्या अनेक तऱ्हेच्या समजुतीही बऱ्याच पालटतील. तर मागील निबंध वाचून ही एक गोष्ट लक्षांत घेण्यासारखी आहे. दुसरी गोष्ट ही कीं, केवळ परंपरेनें चालत आलेल्या समजुतींत व वस्तुस्थितींत किती अंतर असतें. मोठमोठ्या विद्वानांचीं मतें सुद्धां पुष्कळ वेळां वरील परंपरेनें ग्रहण केलेलीं व विशेष शोध न करतां नमूद केलेलीं आढळतात. तर त्यांविषयीं अधिक विचार केला असतां त्यांचें स्वरूप किती पालटतें हेंही प्रकृत निबंधावरून कळून येणार आहे. याखेरीज जे कोणी पंतांचे भक्त असतील त्यांस व साधारणत: तिऱ्हाईत वाचणारांसही प्रस्तुत विवेचन बरेंच इष्ट वाटणार आहे असें म्हणण्यासही हरकत दिसत नाहीं. असो; आतां सरतेशेवटीं आमच्या पूर्वीच्या भाकिताप्रमाणें जर कोणी मंडळी आख्यानाच्या मध्यें झोंपीं गेली असतील तर त्यांस उठून बसण्याविषयी इशारत करून कलम खालीं ठेवतों.

---

यद्यस्य नास्ति रुचिरं तस्मिंस्तस्यास्पृहा मनोज्ञेऽपि ।
रमणीयेऽपि सुधांशौ न मनःकामः सरोजिन्याः ॥[१]
( शृंगारशतक, १०० सं० ) भर्तृहरि

अंक ७२—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) रा० कानेटकर यांच्या दुसऱ्या पत्राचें उत्तर.

१. हा चालू सालांतला शेवटला अंक होय. याखव सालाबादप्रमाणें सर्वांची खात्री दाखवून हिशेबाचा निकाल केला पाहिजे. हा निकाल यापुढें सरतेशेवटींच ठेवण्याचा आम्हीं बेत केला आहे. यापूर्वी केव्हां केव्हां चालू विषय तहकूब ठेवून मध्येंच प्रतिपक्ष्यांच्या कोटिक्रमाचा विचार आम्ही करीत होतों; पण त्यामुळें आमच्या वाचकांचा मनोभंग होतो,

---

१. "जें ज्याला सुंदर वाटत नाहीं तें कितीही रमणीय असलें तरी त्याविषयीं तो पराङ्मुख असतो. पाहा कीं, चंद्र केवढा रम्य असतांही त्याजवर कमळिनी प्रसन्न होत नाहीं!"

व विषयसरणींसही खंड पडतो, यास्तव ही खातेबाकी शेवटींच काढावी हें बरें असें आम्हांस वाटतें.

२. चालू सालचे आमचे प्रतिपक्षी झटले म्हणजे रा० कानेटकर, रा० ओक, व उमरावतीकर 'शोधक' हे होत.[१] रा० कानेटकर यांच्या एका पत्रास ६२ व्या अंकांत आम्हीं उत्तर दिलेंच आहे. त्याच म्हणजे 'मोरोपंतांची कविता' या विषयाच्या संबंधानें त्यांनीं पुढें दुसरें एक पत्र पाठवलें. तें ६४ व्या अंकांत छापलेलें आहे. तर आतां प्रथमतः या पत्रांतील आक्षेपांचा विचार करूं.

प्रस्तुत वाद हा ५९ व्या अंकांत आम्हीं 'अनेकविद्यामूलतत्त्वां' तील एका लेखावर जी चर्चा केली आहे तिजवरून उपस्थित झालेला आहे. वरील अंकांत जो उतारा आम्हीं काढला आहे, तो त्या प्रसंगाला जेवढा उपयोगी होता तेवढाच काढलेला आहे. यास्तव त्याचा पूर्ण अर्थ मनांत येण्याकरतां समग्र लेखाचें येथें प्रथमतः अवतरण करतों:—

"वाक्याचा किंवा त्यांतील शब्दाचा अर्थ दोहोंकडे लागत असला; म्हणजे श्लेष नामक अलंकार होतो. जसें;

तूं मलिन, कुटिल, नीरस, जडहि, पुनर्भवपणेंहि कच साच; ।
धरिला शिरींहि न स्व-प्रकृति-गुण त्यजिसि नाम कच साच. ॥
मोरोपंत, कचोपाख्यान, ( आदिपर्व १०, ९. सं० )

या स्थळीं कचनामक ब्राह्मणास जीं विशेषणें दिलीं आहेत, तीं केंसासही लागतात. साधारण कवि या अलंकाराचा हवा तेथें प्रयोग करून आपल्या काव्यास दुर्बोधता आणितात, व त्यांच्या ग्रंथांत एका शब्दाचे दोन अर्थ होत असतात, एवढ्यानेंच त्यांस व कितीएक अरसिकांस ते ग्रंथ मोठे चांगले वाटतात; पण सहृदय पुरुष तसले लेख पसंत करीत नाहींत; हें आमचेंच मत आहे, असें वाचणाऱ्यांनीं समजूं नये; तर मोठमोठ्या सुज्ञ ग्रंथकारांचेंही मत असेंच आहे. आतां ह्यावरून श्लेष कोठेंच उपयोगीं पडत नाहीं असें समजूं नये. योग्य स्थलीं त्याची योजना केली असतां त्यापासून मोठा चमत्कार होतो. आपला अर्थ दोघांस दोन प्रकारें दाखवावयाचा आहे, तर त्या स्थलीं श्लेषापासून मोठा चमत्कार होतो, जसें नलाख्यानांत पंचनली प्रकरणीं रघुनाथ कवीनें सरस्वतीच्या भाषणांत(पृष्ठ८९६टिपा १व *पाहा.'सं०')श्लेषाची योजना केली आहे.तेथें तो फारच शोभा देतो.तेथें दुसऱ्या अलंकारापासून श्लेषाचें कार्य न होतें. साधारण बोलतांना सश्लेष प्रसंगोचित भाषण केल्यास त्यापासून मोठा चमत्कार होतो.जसें:–कोणा एका गृहस्थाकडे दुसरा गृहस्थ सहज आला असतां, पहिला गृहस्थ चाकरास म्हणाला.अरे,ह्या गृहस्थास बसावयास पाट आण.त्यावर दुसऱ्या गृहस्थानें,नको, पाट

१. वरच्यांखेरीज इतर कांहीं लेखही यंदा वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झाले; एक 'शिवाजी'त व दुसरा 'नेटिव ओपिनियन्'मध्यें. पण यी दोन्ही लेखांत कांहींच ईशील नसल्यामुळें त्यांस उत्तर देण्याची आम्ही मुळींच पंचाईत करीत नाहीं. आम्हांस लिहिण्याची व वाचकांस वाचण्याची मात्र विनाकारण तसदी पडणार. त्यांतून 'शिवाजी'तला कोटिक्रम तर कितीकांच्या वाचण्यांत आला असेल हेंही अगोदर सांगवत नाहीं!

कशास पाहिजे, मुईसपाटव आहे, असें सश्लेष उत्तर केलें. ह्या असल्या श्लेषापासून मौज वाटते."

वरील लेख सगळा वाचला असतां त्यांतील अभिप्राय कोणाच्याही लक्षांत येण्यासारखा आहे. तो 'कितीएक वेळां' वाचूनही * आमच्या प्रतिपक्ष्याच्या 'कधींही' मनांत आला नाहीं या गोष्टीचें आह्मांस नवल वाटतें. 'या लिहिण्याचा कटाक्ष संस्कृतांतील जीं श्लेषात्मक काव्यें आहेत त्यांवर असावा असें स्पष्ट दिसतें.'† –असें रा. कानेटकर यांचें ह्मणणें आहे.पण हें केवळ निराधार होय. एकंदर निबंधाचें स्वरूप जर ते ध्यानांत आणतील, व जागोजागचे उल्लेख पाहतील, तर त्यांस स्पष्ट दिसून येईल कीं, 'वाक्यांतले अलंकार' या धड्यांत संस्कृत कवितेचा ग्रंथकारानें कोठेंही संबंध आणलेला नाहीं. 'अनेकविद्यामूलतत्त्व' हा ग्रंथ इंग्रेजींतील कोर्स ऑफ् रीडिंग्' नामक ग्रंथावरूनच प्रायः रचलेला आहे; व त्या ग्रंथांत 'फिगर्स् ऑफ् स्पीच्' ह्मणून इंग्रेजी भाषेतील अलंकारांवर एक धडा आहे, तेव्हां त्याच नमुन्यावर मराठी कवींतलीं उदाहरणें घेऊन वरील मराठी धडा रचलेला आहे हें उघड आहे. अलंकारशास्त्राचा विषय संस्कृतांत असल्यामुळें उपमा, रूपक, श्लेष वगैरे जुनीं नांवें आयतींच मराठींत घेतलीं आहेत. व त्यांपैकीं कित्येकांचा संस्कृतावरून सामान्यतः अगोदरचा प्रचारही आहे. संस्कृतांत ज्यांस नांवें नाहींत, व इंग्रेजींत आहेत, असे दोन तीन नवेही अलंकार सामील

---

* कानेटकर ह्मणतातः—

"सदर्हू लेख मीं कितीएक वेळां वाचलेला आहे, पण आपण जो अर्थ बळेंच त्या लेखांतून ओढून काढला आहे तो मात्र माझ्या मनांत कधींही आला नाहीं. मोरोपंताच्या कवितेविषयीं आलीकडील विद्वानांचीं मतें,—तो कवि नव्हे, केवळ यमकांची जुळवाजुळव करणारा आहे, वगैरे—आपण या कवीच्या कवितेवर निबंध लिहूं लागल्यापूर्वी मी पुणें शहरीं असतांना माझ्या ऐकण्यांत आलेलीं होतीं. परंतु मराठी भाषेचे उत्कृष्ट अभिज्ञ व अत्यंत मार्मिक जे शास्त्रीबोवा त्यांचेंही मत याप्रमाणेंच असून त्यांच्या सदर्हू लेखाचाही रोंख तसाच आहे, हें आपला निबंध वाचीपर्यंत माझ्या गांवींही नव्हतें." 'सम्पादक'

† कानेटकर ह्मणतातः—

'या ठिकाणीं ग्रंथकाराचा उद्देश एवढेंच ह्मणण्याचा असावा कीं, श्लेष अलंकाराचा अपव्यय करून कितीएक कवींनीं आपल्या काव्यास दुर्बोधत्व आणलें आहे. आतां या लिहिण्याचा कटाक्ष संस्कृतांतील जीं श्लेषात्मक काव्यें आहेत त्यांवर असावा असें स्पष्ट दिसतें. कारण प्राकृत कविता अशी श्लेषात्मक कितीशी आहे? त्यांतून श्लेषयोजनेपासून संस्कृतांतील अनेक काव्यांस असें दुर्बोधत्व आलें आहे तसें प्राकृतांत कोठें आहे? कोठें कोठें शब्दांवर श्लेष आहेत हें खरें. पण सबंध पद्यांचीं पद्यें श्लेषांत खिळलेलीं अशीं उदाहरणें मराठी कवितेंत कोठें आहेत?.........मोरोपंताच्या ग्रंथांत श्लेषाचा प्रकार कितपत आहे तो आपण (पृष्ठें८९५–९०४ पाहा. सं०) सांगितलाच आहे.यावरून सदर्हू लेखाचा अर्थ.........प्राकृत कवितेस श्लेषविमुखता व श्लेषजन्य दुर्बोधत्वाभाव यामुळें बिलकुल लागू पडणार नाहीं, अशी माझी समजूत आहे. मग मोरोपंतावर तर दूषणोक्तीचा यत्किंचितही कण उडेल अशी कल्पनासुद्धां होत नाहीं.........आपण त्या लेखाचें खंडण ह्मणून जें केलें आहे, त्यांतील कोटिक्रम पाहतां एकानें एक चोरी केली तर दुसऱ्याला दोन करण्यास हरकत नाहीं अशा मासल्याचा आहे.' 'सम्पादक'

केले आहेत; जसें, विरुद्धगुणन्यास (Antethesis) चेतनगुणोक्ति (Personification) इत्यादि. कोठें कोठें संस्कृत अलंकारांस मराठी कवितेंत उदाहरण न सांपडल्यामुळें ग्रंथकारास स्वतःचीं गद्यमय उदाहरणेंही घालावीं लागलीं आहेत; व परशुरामपंत गोडबोले यांच्या भाषांतरांतलीं उदाहरणें घेतलीं आहेत. तेव्हां वरील सर्व गोष्टींवरून विचार करतां हें उघड दिसणारें आहे कीं, प्रस्तुत पाठ हा केवळ मराठी भाषेच्या संबंधानेंच रचलेला आहे; त्यांत संस्कृत काव्यांविषयीं उल्लेख करण्याचें मुळींच प्रयोजन नाहीं. यास्तव वादविषयक लेखांत श्लेषालंकाराच्या प्रासंगिकत्वाविषयीं जें विवरण केलें आहे तें सर्व मोरोपंतासच लागू आहे हें उघड आहे.

आतां 'साधारण कवि' हे शब्द मोरोपंतासच उद्देशून लिहिले आहेत कीं नाहींत याविषयीं विचार करायाचा. आमच्या आक्षेपकाच्या मतें वरील निंदाद्योतक शब्द संस्कृत कवींकडे लावायाचे. ही कल्पना स्वतंत्ररीत्या विचार करतां सयुक्तिक आहे खरी; कां कीं, संस्कृतांत श्लेषांचें बंड फार आहे; व विशेषतः अर्वाचीन कवींनीं तर पाहिजे तेथें श्लेषाची योजना केलेली आढळते. श्लेष ह्मणजे सरस्वतीचें सर्वस्व होय ही कल्पना बहुतेक अर्वाचीन संस्कृत काव्यांवरून होणारी आहे.[1] पण ही कल्पना एरवीं कितीही ठीक असली तरी प्रकृत लेखाला ती मुळींच जुळण्यासारखी नाहीं. एक तर सदरील निबंधांत कोठेंही संस्कृत कवींविषयीं किंवा काव्यांविषयीं मुळींच उल्लेख केलेला नाहीं; यास्तव तो येथेंच तेवढा केला असेल हें ह्मणणें शोभत नाहीं. शिवाय दुसरें असें कीं, एकंदर संदर्भावरून पाहतां श्लेषाच्या संबंधानें लिहिलेला सर्व मजकूर वर दाखल केलेल्या उदाहरणांवरूनच ग्रंथकाराच्या मनांत आलेला असावा ही कल्पना करणें अगदीं सयुक्तिक आहे. या प्रकरणीं कोणास संशय असेल तर तो प्रस्तुत निबंधांतील दुसऱ्या एका लेखावरून निघण्यासारखा आहे. हा लेखही वरच्यासारखाच प्रसंगोपात्त आहे:—

"दोन तीन अक्षरें सन्निध असून, ज्या क्रमानें सन्निध असतील त्याच क्रमानें त्यांची आवृत्ति असली ह्मणजे यमक होतें. जसें;

कड्यावरुनिया उड्या प्रथम टाकुनी त्या गड्या
गडे पशुप भेटती, तटतटां भुजीं आंगड्या
फुगोनि तनु फाटती; मणगटीं कडीं दाटतीं;
सुखें बहुत वाटती; विरहसिंधुतें आटतीं.

—वामन.

ह्या स्थलीं पहिल्या चरणांतील शेवटच्या दोन अक्षरांची आवृत्ति, दुसऱ्या चरणाच्या अंतीं, व तिसऱ्याच्या शेवटच्या अक्षरांची आवृत्ति चवथ्या चरणाच्या अंतीं, आहे; ह्यास्तव

---

१. उदाहरणार्थ सुबंधु कवीची पुढील प्रतिज्ञा पाहा:—

सरस्वतीदत्तवरप्रसादः चक्रे सुबंधुः सुजनैकबंधुः।
प्रत्यक्षरश्लेषमयप्रबंध—विन्यासवैदग्ध्यनिधिर्निबंधनम्॥

येथें यमकालंकार आहे. ह्या अलंकाराचीं व मागल्या अलंकाराचीं वामन पंडित, मोरोपंत वगैरे सर्व महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांत हजारों उदाहरणें सांपडतील. ह्या अलंकारापासून चमत्कार वाटण्यास वाक्याचा अर्थ समजावा लागत नाहीं, नुसत्या ऐकण्यानेंच आनंद होतो, यास्तव अज्ञान लोकांत यांची फारच बहा असते; विद्वान् व रसिकजन ह्यांत ह्यांचें तादृश महात्म्य नसतें. ते ह्यांस गौण मानितात; तथापि अर्थ दुर्बोध न होतां सरस राहून जर शब्दालंकार काव्यांत आले, तर त्यांहींकरून त्यास विशेष रमणीयता येते; ह्यांत संशय नाहीं."

वरील मजकूर मराठी कवींस अनुलक्षून लिहिला आहे कीं संस्कृत कवींच्या संबंधानें लिहिला आहे याविषयीं कोणाच्या मनांत शंका येईल काय? आतां हें खरें आहे कीं, वस्तुतःच विचार केला तर तो संस्कृत कवितेलाही लागण्यासारखा आहे. पण संस्कृत कवितेस लागेल तितपत इंग्रेजी व फारसी कवितेलाही लागणार आहे. हें उघड आहे. तथापि ग्रंथकर्त्यांचा रोंख केवळ मराठी कवितेकडेच आहे, किंवा निदान मुख्यतः तरी आहे, असें ह्मटलें असतां 'बळेंच ओढून ताणून अर्थ केला 'सें होईल असें वाटत नाहीं.

वरील कोटिक्रम हा केवळ अंतःप्रमाणावरून झाला, ह्मणजे ग्रंथांतल्या ग्रंथांतच जें प्रमाण सांपडलें त्यावरच केवळ निर्वाह करून केला. पण बाह्यप्रमाण जें आमच्यापाशीं आहे तें तर वरच्याहूनही अत्यंत सबळ आहे. 'साधारण कवि' हा प्रयोग केवळ मोरोपंतासच उद्देशून केलेला आहे याविषयीं आह्मी तर कधींच संशयांत पडलों नाहीं, व ज्यांचा आमच्या वडिलांशीं बरेच दिवस सहवास घडला असेल तेहीं कधीं पडणार नाहींत. प्रस्तुत मराठी कवीचें नांव कधीं त्यांच्यापाशीं निघालें, आणि बिचाऱ्या कवीला कांहीं तडाखे बसले नाहींत, असें आह्मांस तर कधींही आठवत नाहीं. 'आर्या करणारा', 'पुराणिक', 'भाषांतर करणारा,' 'अप्रयोजक कवि' या व अशासारख्याच पदांनीं नेहेमी मोरोपंताच्या संबंधानें निंदापर अभिप्राय प्रगट होत असत. आमचा प्रस्तुत कवीशीं जो परिचय झाला तो वरील गुरुमुखानेंच झाला. पण तो केवळ अर्थज्ञानाच्या संबंधानें. त्या वेळेस हायस्कुलांतून 'नवनीत' चाले, तेव्हां त्यांतील कवितेचा अर्थ आह्मांस समजून घ्यावा लागे; पण या अर्थविवरणाच्या वेळीं, या आर्येची शब्दरचना चांगली आहे, किंवा हें वर्णन चांगलें आहे, वगैरे कोणत्याही तऱ्हेची प्रशंसा आह्मीं कधींही ऐकली नाहीं. हें तर काय, पण बहुधा दरएक प्रसंगीं प्रस्तुत कवीची उपहास्यता मात्र होत असे. नाहीं ह्मणायाला, प्रस्तुत कवीच्या वांट्याला येवढी मात्र स्तुति येत असे, कीं, त्याच्या कवितेंत अशुद्धतेचा प्रकार कोठेंही आढळत नाहीं; व जो त्याची कविता समजून घेईल त्याच्यापाशीं संस्कृत शब्दांचा पुष्कळ भरणा होईल. या दोन गोष्टींखेरीज मोरोपंताच्या काव्यांत कांहीं वाखाणण्यासारखें आहे असें आमच्या वडिलांस कधींही वाटलें नाहीं. त्यांतून रसाविषयीं तर बोलूंच नका. कवित्वाचें परम तत्त्व जो रस तो प्रस्तुत कवीचे ठायीं त्यांस कधींच आढळला नाहीं. एकाद्या कारागिरानें ठाकाठिकीनें केलेल्या मातीच्या चित्रांत व खऱ्या बोलत्या चालत्या माणसांत जितकें अंतर तितकेंच मोरोपंताच्या कवित्वांत व खऱ्या कवित्वांत होय हें त्यांचें ठरीव मत असे. कैलासवासी गोडबोले यांची जशी एकंदर मराठी कवितेवर भक्ति असून मोरोपंताविषयीं तर

अतिशयितच असे, किंवा भास्कर दामोदर यांनीं आपले उद्गार 'नवनीतां'तल्या निबंधांत जसे प्रगट केले आहेत तसा कांहीं एक प्रकार प्रस्तुत ग्रंथकाराचा नसे. मराठी कवीं- पैकीं मुक्तेश्वरास मात्र ते मान देत, व रघुनाथपंडिताच्या 'नलोपाख्याना'चा पूर्वार्द्ध तेवढा त्यांस पसंत असे; तसेंच रामजोशाच्या कवनांतही कवित्वस्फूर्ति कांहीं आहे असें म्हण- तांनाही आह्मी त्यांस ऐकलें आहे. बाकी आलीकडे ग्रँट् साहेबांच्या कारकिर्दीपासून तुकारामाचा जो जयजयकार होऊं लागला आहे तो किंवा इतर कोणत्याही कवीची तारीफ ते कधींही करीत नसत. आणि सामान्यतः पाहतां महाराष्ट्रकवींविषयीं त्यांचा काय अभिप्राय § होता तो आमच्या प्रतिपक्ष्यानें केलेल्या अवतरणावरूनच (शालापत्रक, जुलई १८६४) स्पष्ट दिसत आहे!

आतां रा. कानेटकर यांनीं आपल्या तर्फेचा पुरावा ह्मणून जीं कित्येक अवतरणें *

---

§ सदर अभिप्राय असाः—"कालिदास, भवभूतीसारखे तर नकोतच,—परंतु यत्किंचित् गोष्टींत तरी ह्यांची बरोबरी ज्यांस करितां येईल, असे सुद्धां कवि मराठींत अद्यापि झाले नाहींत. तसेंच मोरोपंत, वामन, ज्ञानेश्वर, मुक्तेश्वर वगैरे कितीएक कवींचे जे ग्रंथ आहेत, ते समजण्याचीं साधनेंही अद्यापि फारच कमी आहेत. प्रायः नाहींत असें ह्मटलें तरी चालेल."

सदर उतारा देऊन कानेटकर ह्मणतातः—

"या उताऱ्यावरून तर वादविषयाचा निकालच होण्यासारखा आहे. कालिदास, भव- भूति यांसारखी कवित्वशक्ति प्राकृत कवींत नाहीं, आणि त्यांच्या काव्यांप्रमाणें मराठींत काव्यें नाहींत, इतकाच काय तो वरील लेखांतील अर्थ आहे, व तो शब्दशः खरा आहे. आपणही मोरो- पंताची कवित्वशक्ति व कालिदासाची कवित्वशक्ति एकसारखीच आहे असें ह्मटल्याचें दिसत नाहीं." 'सम्पादक'

* कानेटकर लिहितातः—

"मोरोपंतास जर मुळींच कवि नव्हे असें तें ह्मणत होते तर पुढें लिहिलेल्या शास्त्री- बोवांच्या लेखांची वाट काय?—

'ह्या अलंकाराचीं व मागल्या अलंकारांचीं वामनपंडित, मोरोपंत वगैरे सर्व महाराष्ट्रकवींच्या ग्रंथांत हजारों उदाहरणें सांपडतील.'

(अनेकविद्यामूलतत्त्वसंग्रह—वाक्यालंकार, पृष्ठ २०९.)

'सारांश, संस्कृत कवींच्या ग्रंथांतील अर्थ घेऊन मोरोपंत, वामनपंडित, मुकुंदराज, रघुनाथ- कवि यांच्या ग्रंथांप्रमाणें हें स्वतंत्र प्राकृत काव्य केलें आहे असें वाचणारांनीं समजावें.'

(पद्यरत्नावलि, प्रस्तावना.)

'संस्कृत विभक्तींचीं रूपें प्राकृत कवितेंत घालण्याची मोरोपंतादि जुन्या कवींची चाल आहे.'

(पद्यरत्नावलि–विलाप. पृष्ठ ३७, टीप २.)

ज्यांनीं कवियशप्राप्तीसाठीं ज्यांचा कित्ता घेतला ते जर त्यांच्या मतें मुळींच कवि नव्हते तर मग 'पद्यरत्नावलि' ही मोठ्या उत्साहानें व प्रेमानें प्रसिद्ध केली ती कशासाठीं बरें?

'महाराष्ट्रभाषालेखन' या विषयावर कोणीं आपले विचार शास्त्रीबोवांकडे पाठविले होते त्यावर शास्त्रीबोवांनीं जें आपलें स्वतांचें मत दिलें आहे त्यापैकीं कारणापुरता खालील उतारा घेतला आहेः–

[पुढें चालू.]

दाखल केलीं आहेत त्यांच्या योगानें त्यांच्या पक्षास कितीशी बळकटी येणारी आहे हें बहुधा कोणासही सांगायाला नको. 'वामन, मोरोपंत वगैरे महाराष्ट्रकवि' येवढ्याच शब्दांवरून कवित्वाच्या संबंधाचा निकाल झाला काय? वरील शब्द केवळ लोकप्रवृत्तीस अनुसरूनच योजलेले आहेत हें उघड आहे; त्यांचा वास्तविक अर्थ येवढाच आहे कीं, "वामन, मोरोपंत वगैरे ग्रंथकार, ज्यांस आजपर्यंत लोक 'कवि' म्हणत आले आहेत." यापेक्षां ज्यास्त अर्थ वरील शब्दांत नाहीं. येवढाच अर्थ न धरला, तर 'कुकवि', 'bad poet' वगैरे शब्दांवरूनही कवित्व सिद्ध होऊं लागेल. एका उताऱ्यांतील ( 'एवढाल्या कवीं' ची ) या शब्दप्रयोगावर आमच्या प्रतिपक्ष्यानें कटाक्ष ठेवला आहे; पण वरील अवतरणचिन्हित शब्दांवरूनही कवित्वाचे प्रमाण मिळतें असें नाहीं. ' एवढाले कवि ' या शब्दांचा अर्थ ' असले सर्वप्रसिद्ध कवि ' इतकाच घ्यावयाचा हें उघड आहे. वरील उल्लेख केवळ उच्चारपद्धति व लेखनपद्धति यांच्या संबंधानेंच केलेला आहे, कवित्वगुणाच्या संबंधानें नव्हे, हें आमच्या आक्षेपकानें कसें ध्यानांत आणलें नाहीं कोण जाणे !

रा. कानेटकर यांनीं आपल्या पक्षाच्या समर्थनार्थ एक शाब्दप्रमाणही $ आणलें आहे तें ट्रेनिंग् कॉलेजांतील विद्यार्थ्यांचें होय. मोरोपंत हा कवि नव्हे असा जर आमच्या वडिलांचा सिद्धांत असता तर तो त्यांनीं आपल्या शिष्यवर्गाच्या मनांत बिंबवून दिला असता.

---

"'वामनपंडित, मोरोपंत, रघुनाथकवि, इत्यादि जुन्या मराठी कवींचीं' काव्यें निबंधकर्ता ज्या लेखनपद्धतीस अगदीं खोटी पद्धति म्हणतो त्या पद्धतीस धरूनच लिहिलीं आहेत व त्या पद्धतीवरून जो उच्चार दिसतो तोच उच्चार त्यांस विवक्षित होता असें स्पष्ट दिसतें. तेव्हां ' एवढाल्या कवीं 'चा उच्चारपद्धति खोटी व त्यांची लेखनपद्धति खोटी असें अर्वाचीनानें विशेष युक्तीवांचून म्हणणें केवळ साहस आहे." (शालापत्रक—आक्टोबर १८६९)

वर दाखल केलेल्या सर्व उताऱ्यांत शास्त्रीबोवांनीं मोरोपंताची कवींत गणना केली आहे इतकेंच नाहीं, पण स्पष्टपणें 'कवि' असें म्हटलेलें आहे." 'सम्पादक'

$ कानेटकर म्हणतात:—

"'जुन्या व नव्या पंडितांचें बिचाऱ्या मयूरकवीविषयींचें अप्रेम त्यांच्या ठायीं एकवटलें होतें,' असा लेख आपण आपल्या वडिलांच्या संबंधानें लिहिला आहे.........आलीकडील नवीन विद्वानांचे प्रस्तुत विषयावरील मतांचें बीज ('तिकडचें अनुकरण करून इकडेही तिकडच्यासारखी कांहीं तरी गडबड उडवून द्यावयाची' सं०) आपण दर्शविलें आहे. पण शास्त्रीबोवांच्या या मताचा हेतु काय हें आपण दाखविलें नाहीं. "उगीच कांहीं तरी गडबड उडवून द्यावयाची" अशाविषयीं शास्त्रीबोवांचा लौकिकही नव्हता. तशी जर त्यांची प्रवृत्ति असती तर ते ट्रेनिंग कॉलेजांतील मुख्य शिक्षकाचे हुद्द्यावर असतांना त्यांणीं हें प्रमेय आपल्या विद्यार्थ्यांच्या ठायीं भरवून टाकिलें असतें परंतु त्यांच्या हाताखालीं शिकलेल्या विद्यार्थ्यांच्या तोंडून मोरोपंताचा आयार्थ सांगण्याची हातोटी मात्र त्यांची कांहीं विलक्षण अनुपम व असाधारण होती असा शास्त्रीबोवांचा गुणानुवाद व प्रशंसा ऐकण्यांत येते. पण वरील मताचा यत्किंचितही सुगावा या मंडळीच्या तोंडून निघाला नाहीं. मग नवीन विद्वान् अविचारानें व उतावीळपणानें जसे मोरोपंताविषयीं निःशंक अनुवाद करितात त्यांतीलच एक शास्त्रीबोवांचें मत होय असें आपण आपल्या लेखांत गर्भित अर्थानें मासवूं पाहता यांतील हेतु काय ?" 'सम्पादक'

पण त्यांनीं असें कधींही केलें नसून आर्या सांगण्याच्या त्यांच्या हातोटीची प्रशंसा मात्र आह्मीं ऐकली आहे, असें ते ह्मणतात. आमच्या प्रतिपक्ष्याचा वरील उल्लेख कितपत यथार्थ होय, हें आमच्यानें सांगवत नाहीं. आह्मीं स्वतः जें प्रमेय शेंकडों वेळां ऐकलें आहे ते नेहेमीं तसा प्रसंग असतां ट्रेनिंग्च्या मंडळीस कधींच श्रुत झालें नसेल याविषयीं आमचें मन घेत नाहीं. मग वरील प्रमेय वरील मंडळीस दुर्ग्राह्य होय असें वाटल्यावरून त्यावर कधीं विवरण होत नसल्यास न कळे! मोरोपंत कवि कां नव्हे, कालिदास किंवा शेक्सपीयर यांच्या-संबंधानें मात्र वरील संज्ञा अन्वर्थक को, हें मनांत भरण्यास, किंबहुना नुसतें लक्षांत येण्या-सही, इंग्रेजी किंवा संस्कृत भाषेचें ज्ञान आवश्यक होय. वास्तव त्याच्या अभावीं वरील खोल पाण्यांत विद्यार्थ्यांस न शिरवणें हेंच बरें अशा समजुतीनें वरील प्रकार कदाचित् घडत असेल. आतां मोरोपंताच्या आर्या सांगण्याची त्यांची घाटणी अनुपम असे हा जो लौकिक आमच्या पत्रकारानें वरील कॉलेजांतील विद्यार्थ्यांच्या तोंडून ऐकला आहे तो प्रस्तुत वादास मोठासा उपयोगी आहे असें नाहीं. कोणाचीं कोणा ग्रंथकाराविषयीं कांहींही मतें असलीं तरी त्याच्या ग्रंथांचा अर्थ सुबोध रीतीनें सांगतांना कोणती अडचण पडणार आहे? एका-द्यास 'राजा शिवाजी' हें काव्य अगदीं भिकार वाटलें, ह्मणून त्यास तें विद्यार्थ्यांस समजून देण्यास मोठीशी अडचण पडणारी आहे असें नाहीं.

याप्रमाणें प्रस्तुत वादांतील मुख्य गोष्ट जी प्रकृत वाक्यार्थाची मीमांसा ती झाली. वरील प्रमाणांवरून आमच्या सर्व वाचकांच्या सहज ध्यानांत येईल कीं, 'अनेकविद्यामूल-तत्त्वां'तील वादविषयक लेख, हा केवळ मोरोपंतासच लागू आहे. आतां वरील निर्णया-वरून उत्पन्न होणारा जो दुसरा गौण वाद आहे त्याच्या संबंधानेंही कांहीं लिहिलें पाहिजे.

हा दुसरा वाद असा कीं, आमचे वडील 'मराठी भाषेचे उत्कृष्ट अभिज्ञ व अत्यंत मार्मिक' असतां प्रस्तुत कवीविषयीं त्यांच्या मनांत येवढी अढी सदोदित कशी राहिली? ज्या मयूरकवीचा 'अपूर्व टाहो'[1] ऐकून आज शंभर वर्षें आबालवृद्ध महाराष्ट्रीय जन मान डोलवीत राहिले आहेत, ज्याच्या कवितारूप 'मदनमंजरी'नें सोलापुरस्थ फक्कड 'कविराया'च्या गळ्यांत माळ घालून त्याच्या हातचा डफ खालीं ठेविला, ज्याच्या वाणीनें परशुरामपंत गोडबोले, भास्कर दामोदर, शंकर पांडुरंग[2] अशा मंडळीस चटका लावला,

---

१. 'यशोदा पांडुरंगी' या ग्रंथाच्या शेवटीं पुढील आर्या सांपडते. ती कोणीं रचली असेल ती असो!—

ऐकुनि विश्व सुखावे ज्या केकांचा अपूर्व तो टाहो।
त्याला ईशकृपेनें आयुष्याचा कधीं न तोटा हो॥

२. वरील रसिक व मार्मिक गृहस्थाचें प्रस्तुत कवीविषयीं काय मत असे तें$ आमच्या आक्षेप-कारानेंच ६४ व्या अंकांत पत्रद्वारें सादर केलें आहे. बी. ए. च्या परीक्षेंत एके प्रसंगीं त्यांचा पुढील प्रश्नही पाहिलेला आह्मांस आठवतोः—

( पुढें चालू. $ ही टीप पुढील पानावर पाहा. )

व एका रावबहादुरांच्या रुक्ष बुद्धीसही क्षणभर तन्मय केलें. त्याच्याविषयीं एके ठिकाणींच अत्यंत तिरस्कार व पराङ्मुखता कां दृष्टीस पडावी बरें? त्यांतून विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं, कित्येकांची बुद्धि कितीही प्रखर असली तरी ती रुक्षत्वास्तव काव्यांस्वादनाविषयीं असमर्थ असते, तसाही प्रकार प्रस्तुत प्रकरणीं लागू होता असें नाहीं.

---

"What was the spirited rejoinder of Bhisma to his preceptor?"

[भीष्मानें आपल्या गुरूला जें बाण्याचें उत्तर दिलें तें कोणतें?]

वरील उत्तर उद्योगपर्व अध्याय १३ यांत आहे. त्याचें स्वरूप पुढील एका (आर्या ३८. सं०) आर्येवरूनच लक्षांत येण्यासारखें आहे:—

वधिले क्षत्रिय तेव्हां नव्हता हा भीष्म शांतनव समज,।
देवासि मागते ते जाले मरणीं करूनि भवस, मज.॥

वीररसाचे वरच्यासारखे तडाखे जे सदरील कवीच्या ग्रंथांतून जागोजाग आढळतात त्यांवरून पुढील आर्येची सार्थकता भासते:—

नायक वीरकवींचा ऐसा होईल काय अन्य कवी॥

$ याच गोष्टीची (महाराष्ट्रकवितेंत गणवृत्तें व लांबलांब यमकें आणण्याची) सुधारणा मोरोपंतानें कशी व कोठवर केली याविषयींही त्यांचा (शं. पां. पंडित) अभिप्राय पुढें लिहिल्याप्रमाणें आहे:—

"Then followed our lofty and learned poet of the eighteenth century. He wrote, as he says himself, in a mystical Kantha (a patchwork of many-coloured cloth), and carried to the utmost height the outword ornament of rhyme, the logical accuracy and scientific exactness in the use of words, the art of expressing long complicated thoughts within a most wonderfully short compass by means of compounds or samasas (which is one of the characteristic beauties of Sanskrit and thence of Marathi); and lastly almost a reverential observance of the rules of grammar and idiom."—Elphinstone School Paper, (Oct. 1863). 'सम्पादक'

१. रा० ब० महादेव गोविंद रानडे यांचें महाराष्ट्रकवितेविषयीं विशेष प्रेम असल्याचें कोठें दिसून येत नाहीं. 'केकावलि' हें काव्य तरी प्रसंगविशेषानेंच त्यांस वाचावें लागलेंसें दिसतें. असें असतां त्यांच्या रिपोर्टांत पुढील वाक्य आढळतें:—

"The all-paramount importance of the sacred story of God's exploits, performed in the course of his various incarnations is described in a succession of fourteen beautiful stanzas at the end."

[तसेंच देवानें निरनिराळ्या अवतारीं जीं चारित्रें केलीं त्यांच्या कथेचें महात्म्य शेवटीं ज्या चवदा पद्यांत वर्णिलें आहे तीं हृदयंगम आहेत.]

वरील द्यसमूहांत कवीची प्रतिमा अत्यंत उज्वलता पावली आहे हें कोणासही सकृद्दर्शनीं सुद्धां लक्षांत येणारें आहे!

२. मोठमोठ्या पंडितांचे ठायीं काव्यपराङ्मुखत्व कधीं कधीं दृष्टीस पडते याविषयीं एका प्रसिद्ध ग्रंथकाराचा (Isaac D'Israeli चा. 'सं०') येणेंप्रमाणें लेख आहे:—

(पुढें चालू.)

'पद्यरत्नावली' ज्यांनीं वाचली असेल, व विशेषत: शेवटला 'विलाप' वाचला असेल त्यांच्या मनाची खात्री असेलच कीं, तें भाषांतर अत्यंत रसावांचून होण्याजोगें नाहीं. पण काय चमत्कार आहे कीं, कालिदास, भवभूति, बाण, बिल्हण, जगन्नाथराय[1] वगैरे गीर्वाण कवींविषयीं ज्या रसिकाची परमभक्ति असे त्याची महाराष्ट्रकवितेविषयीं सामान्यत: पाहतां उदासीनत्वाचीच बुद्धि दृष्टीस पडे. "कालिदास, भवभूतीसारखे तर नकोतच,—परंतु यत्किंचित् गोष्टींत तरी त्यांची बरोबरी ज्यांस करितां येईल, असे सुद्धां कवि मराठींत अद्यापि आले नाहींत"—या अभिप्रायावर कितीकां रसज्ञांची मंजुरी पडल तीं पडो !

---

"Men of taste are sometimes disgusted in turning over the works of the anti-poetical, by meeting with gross railleries and false judgments concerning poetry and poets. Locke has expressed a marked contempt of poets; but we see what ideas he formed of poetry by his warm panegyric of one of Blackmore's epics! And besides he was himself a most unhappy poet! Selden, a scholar of profound erudition, has given us *his* opinion concerning poets. 'It is ridiculous for a *lord* to print verses; he may make them to please himself. If a man in a private chamber twirls his band-strings, or plays with a rush to please himself, it is well enough; but if he should go into Fleet-street, and sit upon a stall and twirl a band-string, or play with a rush, then all the boys in the street would laugh at him.'—As if 'the sublime and the beautiful' are to be compared to the twirling of a band-string, or playing with a rush!—A poet, related to an illustrious family, and who did not write unpoetically, entertained a far different notion concerning poets. So pursuaded was he that to be a true poet required an elevated mind, that it was a maxim with him, that no writer could be an excellent poet who was not descended from a noble family. This opinion is as absurd as that of Selden's.—But when one party will not grant enough, the other always assumes too much. The great Pascal, whose extraordinary genius was discovered in the sciences, knew little of the nature of poetical beauty. He said 'poetry has no settled object.' This was the decision of a geometrician, not of a poet. "Why should he speak of what he did not understand?" asked the lively Voltaire. Poetry is not an object which comes under the cognizance of philosophy or wit."

—*Curiosities of Literature.*

१. संस्कृत कवींपैकीं वरील मंडळीवर आमच्या वडिलांची विशेष भक्ति असे. बाणभट्टाच्या कादंबरींत मात्र श्लेषाचा प्रयोग उत्तम रीतीचा आहे असें ते ह्मणत असत. जगन्नाथरायाचेंही काव्य त्यांस अत्यंत मान्य असे.

तेव्हां प्रस्तुत प्रकरणीं जो अभिप्राय आह्मीं ५९ व्या अंकांतील टिपेंत (पृष्ठ१२५.'सं०') दाखल केला आहे तोच आह्मांस खरा वाटतो. आमचे वडिलांची बुद्धिमत्ता सर्वोत्कृ होती, व 'अभिज्ञ'त्व 'मार्मिक'त्व, 'चातुर्य', 'चाणाक्ष'पणा या सर्व गुणांनीं जर ते विशिष्ट होते, तरी सूर्याचें तेजोनिधित्व व कलंकित्व यांचें सामानाधिकरण्य जसें संभवत नाहींसें नाहीं, त्याप्रमाणेंच वरील सर्व गुणांचें व आह्मीं आक्षिप्त केलेल्या दोषांचें साह चर्यही केवळ असंभाव्यच मानायाला पाहिजे असें नाहीं. मनुष्यस्वभावाचें ज्यानें बरेंच अव लोकन केलें असेल त्याच्या ही गोष्ट तेव्हांच लक्षांत येण्यासारखी आहे कीं, अगदीं निर्दो अशी बुद्धि थोडी, प्रायः नाहींच ह्मटलें असतां चालेल. कोणाचे ठायीं एकादी मानसिक शक्ति प्रबळ दृष्टीस पडली, तर तितक्याच मानानें दुसरीचें दुर्बलत्व आढळतें, आणि त्यांतू बुद्धीची समता ह्मणजे निःपक्षपातपणा हा गुण तर बहुधा फारच दुर्लभ. मनाच्या ताजव्याची दांडी निरंतर समांतर असलेली फारच विरळा आढळते. व ती तशी ठेवण्याबद्दल खबरदारी घेणारी मंडळीही थोडीच! आपण तराजू उचलून गिऱ्हाइकाच्या पदरांत माल टाकतों आहों, तर दोन्ही पारड्यांची स्थिति काय आहे या गोष्टीकडे लक्ष देणारे बाग्देवीच्या मुलखांतील वणिक् फार थोडे; आणि त्यांतून विशेष आश्चर्य करण्यासारखी गोष्ट ही कीं, गिऱ्हाइकेंही बहुधा अशीं शहाणीं कीं, दांडी कितीही झुकली तरी त्या बिचाऱ्यांस त्या गोष्टीची बिलकुल पर्वा नाहीं. पदर पसरण्याचें व दाम देण्याचें तेवढे बेट्यांचें काम! मेकॉले साहेबांनीं सुमारें पन्नास वर्षांपूर्वी कलकत्ता मुक्कामीं एक भला जंगी घट लावून एके पारड्यांत अरबी, फारसी व संस्कृत ग्रंथांचे गढे, व दुसऱ्या पारड्यांत इंग्रेजी ग्रंथांचे असे घालून लाट साहेब सर् विल्यम् बेंटिंक् यांच्या पदरांत कसें चोख माप घातलें हें यापूर्वी अनेक वेळां आह्मीं सांगितलेंच आहे. वरील तुला करण्यापूर्वी वरील दोघां साहेब बहादुरांनीं घटाचा पासंग तरी पाहिला होता काय? तो कितपत बरोबर होता हें आतांच्या काळचें एकादें पोरही सांगेल. मेकॉले साहेबांनीं वरील तुलनेच्या समयीं एका पारड्यांत आपलें इंग्रेजी विद्येचें भारी ज्ञान घातलें असेल खरें; पण दुसऱ्या पारड्यांत बिचाऱ्यांत कितीसें वजन पडलें असेल तें असो! अशाच प्रकारची दुसरी मोठी गम्मत पाहिजे असल्यास ती आमच्या दक्षिणा प्रैज कमिटीची होय. आज तीस वर्षेंपर्यंत ही कमिटीही सरस्वतीच्या मुलखांत पिकणाऱ्या जिनसांचें माप लोकांच्या पदरांत टाकीत आहे. पण मौज काय आहे कीं, तुलाध्यक्ष कोण? तर मेजर् कँडी किंवा कॅप्टन् जेकब्! ह्मणजे ज्या बिचाऱ्यांचें मत एका किंवा अर्ध्या ओळीवर फार करून कधींही लांबायाचें नाहीं, किंवा कधीं लांबलेंच तर तें आपल्या ठरीव व्याकरणनियमांचा किंवा ठरीव राजनिष्ठेचा वगैरे भंग झालासा आढळल्यासच काय तें, असली बहादर मंडळी नवीन ग्रंथांचा सोक्षमोक्ष काय तो करणार! असो; तर पक्षपाताचा अभाव हा गुण जगांत वर सांगित-तलेल्या तऱ्हेनें सामान्यतः आढळतो. याचें महत्त्व फारच थोडक्यांच्या लक्षांत येतें, व त्याच्या संपादनार्थ मोठेसे परिश्रम केलेलेही प्रायः आढळत नाहींत.

त्यांतून गेल्या मन्वंतराचा असा महिमा होता कीं कोणत्याही विषयावर कसेंही मत द्यावयाचें झालें, तरी मत देणारास कोणाचा धाक बाळगायाला पाहिजे होता असें नाहीं.

आलीकडे विद्येचा प्रसार अधिकाधिक होत चालल्यानें लोकांत शोधकबुद्धि दिवसांदिवस वाढत चालली आहे. केवळ माना डोलवण्याचे दिवस हळूं हळूं जात चालले आहेत, तेव्हां वादविषयक लेख लिहितांना व मोरोपंताविषयींची आपली अवज्ञा प्रगट करतांना प्रस्तुत ग्रंथकारास मोठेसें जड पडलें असावें असें नाहीं. शिवाय नमूद केलेला अभिप्राय अजूनपर्यंतही विद्वान् व मार्मिक म्हणवणाऱ्या मंडळींतून गेला आहे असें नाहीं; मग त्या वेळेस तर तो किती दृढ असेल हें सांगायास नकोच. आतां मोरोपंताच्या काव्यांत श्लेषाचा प्रकार कितीसा आहे व जो क्वचित् आहे त्याच्या योगानें त्याच्या कवितेस कितीसें दुर्बोधत्व आलें आहे, वगैरे गोष्टींचा आमच्या आक्षेपकानें उल्लेख केला आहे; पण त्या सर्व गोष्टी वादविषयक लेख लिहिते समयीं आमच्या वडिलांनीं ध्यानांत आणल्याच असतील्सें आमच्यानें सांगवत नाहीं. एक तर त्यांचीं सर्व विषयांवरील मतें प्रायः मागील मन्वंतरासच अनुसरून होतीं, तेव्हां मोरोपंताची अवहेलना हें त्यांत कलम आलेंच. शिवाय आमचे पत्रकार दुर्बोधत्वाचें जें प्रमाण घेतात तेंही त्यास मान्य नव्हतें. जितकी सोप्या शब्दांत कविता असेल तितकी चांगली असें त्यांचें ठरीव मत होतें. या दुर्बोधत्वावर त्यांचा इतका कटाक्ष असे कीं, आलीकडील श्लेषप्रधान काव्यपद्धति त्यांस बिलकुल आवडत नसे. 'भारतचंपू', 'लक्ष्मीसहस्र' वगैरे ग्रंथांचा ते नेहेमी अधिक्षेप करीत असत. तसेंच ज्यांनीं 'पद्यरत्नावली' पाहिली असेल त्यांच्या सहज लक्षांत येण्यासारखी एक ही मोठी गोष्ट त्या ग्रंथांत आहे कीं, जेव्हां निरुपायास्तव संस्कृत शब्दांचा व समासांचा वरील काव्यांत भरणा करावा लागला, तेव्हां दर एक पानाखालीं भरगच्च टिपा व शिवाय शेवटीं एक निराळा कोश अशी सामग्री सदरील ग्रंथास जोडावी लागली. तर ही गोष्ट ध्यानांत आणली असतां आमच्या आक्षेपकास कळून येईलच कीं, जो श्लेष त्यांच्या बुद्धीनें अत्यंत सुबोध होय तो प्रस्तुत ग्रंथकारासही तसाच वाटत होता असें नाहीं. तेव्हां या रीतीनें पाहतां वादविषयक आर्येवर सदरील ग्रंथांत जो दोष दिला आहे तो ठीकच आहे.

आतां मोरोपंतानें फारच थोड्या जागीं श्लेषाची योजना केली आहे व श्लेषप्रयोग म्हणजे कवित्वचातुर्याची सीमा हें जें अर्वाचीन काळीं मत निघालें आहे तें प्रस्तुत महाराष्ट्र-कवीस अभिमत होतेंसें कोठेंही दिसत नाहीं, या सर्व गोष्टी खऱ्या आहेत. पण त्या कोणाला ? ज्यानें प्रस्तुत विषयावर प्रांजलपणें शोध केला असेल त्याला. आमच्या वडिलांचें सामान्यतः सर्व महाराष्ट्रक विषयीं व विशेषेकरून मोरोपंताविषयीं काय मत होतें तें वर सांगण्यांत आलेंच आहे. शिवाय आम्हांला जातीनें माहीत आहे कीं, त्यांनीं आपण होऊन बुद्धिपुरःसर मोरोपंताचें काव्य कधींही वाचलें नाहीं;—मोरोपंताचेंच असें काय, पण कोणत्याही मराठी कवीचें वाचलें नाहीं. मुक्तेश्वरास जरी ते कवित्वाच्या संबंधानें मान देत*, तरी

* कानेटकर म्हणतातः—"इतर प्राकृत कवांपक्षां मुक्तेश्वराच्या कवितेवर शास्त्रीबोवांचे प्रेम कांहीं विशेष होतें, असें शास्त्रीबोवांच्या कांहीं लेखांवरून मला भासलें होतें. आपला लेख वाचून तें आतां दृढ झालें. मत 'शालापत्रक' शास्त्रीबोवा आरंभीं लिहूं लागले तेव्हां त्यांनीं 'कविता' या विषयावर एक लहानसाच,

( पुढें चालू. )

'नवनीता'च्या बाहेर त्यांचा वरील कवींशीं परिचय होता असें फारसें दिसत नाहीं. ही गोष्ट त्यांच्या लेखांतील जागोजागच्या अवतरणांवरून सुद्धां ध्यानांत येईल. त्यांचें पांडित्य लोकविश्रुतच आहे; तेव्हां ह्यास अनुसरूनच त्यांचीं सर्व मतें होतीं. ह्मणजे पूर्वीची जी शास्त्रीमंडळी† घेतली तर त्यांच्या ठायीं पुराणिक, हरदास वगैरे मंडळीविषयीं व प्राकृत भाषेविषयीं जी अवहेलनाबुद्धि दृष्टीस पडते, तीच प्रस्तुत ग्रंथकाराचे ठायींही आढळत असे. आमच्या आलीकडील बहुधा विद्वानांस जसें मराठी वर्तमानपत्र किंवा पुस्तक हातांत घेणें

पण मोठा उत्तम व खुबीदार निबंध त्यांत लिहिला आहे. त्यांत तरी मुक्तेश्वराचेंच उदाहरण घेऊन त्याच्या कवितेची प्रशंसा केली आहे. तसेंच मराठी व्याकरणावरील निबंध (५ वा)—नामविचारापुढील लिंगविचारांत "रसज्ञ कवीनें" असें विशेषण मुक्तेश्वराचें पद्य दाखल करून त्यास दिलें आहे.

[उपरिनिर्दिष्ट निबंधांतील प्रस्तुत उतारा हा:—

"कनकलतिका सौदामिनी। कीं चंद्रकलिका तनुधारिणी.॥
सुवर्णकेतकी पद्मवर्णी.। सुवर्णखाणी हरिणाक्षी, ॥—मुक्तेश्वर.

शकुंतलेच्या वर्णनाच्या या ओंवींत कनकलतिका व चंद्रकलिका हे शब्द स्त्रीलिंगी असण्याची किती अवश्यकता आहे हें सुज्ञ व मार्मिक वाचणारांच्या सहज लक्षांत येईल. लतिका ह्मणजे लता या शब्दाच्या जागीं त्याच अर्थाचे इतर लिंगांचे वृक्ष किंवा झाड हे शब्द घातले असतां अर्थ कसा बिघडतो व रसभंग कसा होतो हें विचार केल्यास उघड समजेल. तसेंच 'चंद्र' शब्द पुल्लिंगी असल्यामुळें तो साजणार नाहीं असें समजून रसज्ञ कवीनें कलिका हा स्त्रीलिंगी शब्द जोडून चंद्रकलिका हें स्त्रीलिंगी उपमान केलें." 'सम्पादक']

मुक्तेश्वरास ते कवि ह्मणत येवढ्यावरून रसिकता व मार्मिकपणा हे असाधारण असणारे अमोलिक गुण मात्र शास्त्रीबोवांच्या अंगीं पूर्णपणें वसत होते असें स्पष्ट होतें असें माझें मत आहे."

'सम्पादक'.

† कानेटकर लिहितात—"जुने शास्त्री व पंडित हे हेकेखोर:.....असतात. जुन्या शास्त्र्यांतून एक तर प्राकृतभाषानभिज्ञत्व हें आढळतें. दुसरें, त्यांचीं मतें प्राय: दुराग्रहाचीं असतात. त्यांच्या विद्वत्तेत, वाग्गुणांत, व अंगीं तारतम्याभाव असल्याचें बहुधा पाहण्यांत येतें. पण शास्त्रीबोवा यांजला मराठी भाषेचें इतकें सर्वोत्कृष्ट व मार्मिक ज्ञान होतें कीं तसें प्राय: कोणाच्या अंगीं असल्याचें प्रसिद्धीस आलें नाहीं. ते मोठे चाणाक्ष, चतुर व बुद्धिमान् होते. आतां इतक्या गुणांची अनुकूलता असतांही मोठमोठ्या विद्वानांचीं मतें दुराग्रहाचीं व वेडगळ होतीं अशाविषयीं उदाहरणें इतिहासांतरीं आहेत. पण शास्त्रीबोवा निवर्तल्यावर.........एका वर्तमानपत्रांत पुढें लिहिल्याप्रमाणें त्यांच्या दुराग्रहविमुखतेविषयीं वर्णन केलें आहे:—

'त्यांचीं मतें एकपक्षीय लोकांप्रमाणें कोतीं नसतां मोठीं व्यापक व प्रौढ होतीं. तंट्यांत तोड शास्त्रीबोवांनींच काढावी.' (ज्ञानचक्षु—पुणें, मे १८७८.)

मग असल्या पुरुषाविषयीं आपण जो येवढा निर्धास्त अभिप्राय लिहिलांत त्यास काय आधार आपल्याजवळ असेल तो असो! शिवाय, 'इतर विषयांवर त्यांच्या मतांची चलबिचल झालेली आमच्या लक्षांत आहे, पण प्रकृत विषयावर मात्र त्यांचा अभिप्राय जो एकदां ठाम बसून गेला होता तो होता' असें सदहू टिपेंत आपण लिहिलें आहे. पण बाकीच्या (कोणच्या ?) विषयांवरील मतें विरघळून जाऊन प्रस्तुत वादविषयक गोष्टींवरील त्यांचें मत मात्र मूळ जागा न सोडतां ठाम होऊन कां बसलें होतें ? इतर सर्व विषयांवरील मतांचा त्याग करून फक्त मोरोपंतांविषयींचा अभिप्राय मात्र निर्बाणतेंकरून त्यांनीं कंठाशीं कां धारण केला होता !"

म्हणजे अंमळ अप्रशस्तच, किंवा एकाद्या ठिकाणीं कीर्तन चाललें असलें तर तें ऐकणेंही विद्वत्तेस बट्टा आणणारेंच, त्याप्रमाणेंच जुन्या पंडितांचाही सामान्यतः प्रकार होता. तेव्हां या रीतीनें पाहतां आमच्या वडिलांची महाराष्ट्रकवींविषयींची बुद्धि व त्यांची तरफदारी करणाऱ्या प्रस्तुत पत्रकाराची बुद्धि या दोहोंत अतिशयित अंतर होतें हें उघड आहे. जे महाराष्ट्रकवि आमच्या आक्षेपकास सर्वथा वंद्य होत ते वरील महापंडितास आपणाहून खालच्या पायरीचे वाटत असतील हें उघड आहे. मग अशांच्या कृति कोण वाचीत बसतो? संस्कृत काव्यें सादर बुद्धीनें वाचतांना व विशेषतः पंडितरायांच्या 'गंगालहरीं'त वाहवतांना प्रस्तुत रसिकास आम्हीं शेंकडों वेळां पाहिलेलें व ऐकलेलें आम्हांस आठवतें; पण 'ज्ञानेश्वरी' किंवा 'केकावलि', किंबहुना मुक्तेश्वरकृत 'भारतपर्वें', यांत रममाण होतांना आम्हीं त्यांस कधींच पाहिलें नाहीं. हें तर काय, पण वादविषयक कवितेच्या संबंधानें त्यांनीं कित्येक वेळां आमचा निषेधही केलेला आहे!

तेव्हां प्रस्तुत कवीविषयीं आमच्या वडिलांचा जो अभिप्राय होता तो प्रांजल बुद्धीचा किंवा शोधपूर्वक स्वीकारलेला होता असें नाहीं हें उघड आहे. जॉन्सन्च्या ग्रंथांत व भाषणांत विंचाऱ्या ग्रे कवीविषयीं जशी सदोदित अवहेलना आढळते,[1] किंवा संस्कृत विद्येचें नांव निघालें कीं, मेकॉले साहेबांच्या कपाळाला तिडीक गेलीच,[2] तसाच प्रकार प्रस्तुत कवीचा व प्रस्तुत रसिकाचा होता. पहिल्याचें कवित्व सामान्यांतलें आहे असें नाहीं, व दुसऱ्याची रसज्ञताही साधारण होती असें नाहीं; पण एका कवीनें म्हटलें आहे:—

भ्रमन् वनान्ते नवमञ्जरीषु
न षट्पदो गन्धफलीमजिघ्रत्।
सा किं न रम्या स च किं न रन्ता
बलीयसी केवलमीश्वरेच्छा ॥ -(लक्ष्म्याः 'सं०')

---

१. वरील ग्रंथकारानें सदरील कवीचें जें चरित्र लिहिलें आहे तें साऱ्या 'कविचरित्रां'त भिकार म्हणून निवडलें आहे. ज्याच्या अनुपम कृति नवशिक्यांपासून तों थोर थोर पंडितांपर्यंत आज शें-दीडशें वर्षें सर्वांस आल्हादप्रद झाल्या आहेत त्यांवर जॉन्सन्चे अभिप्राय पुढील मासल्याचे आहेत:-

"The second stanza, exhibiting Mar's car and Jove's eagle, is unworthy of further notice. Criticism disdains to chase a school-boy to his common-places." *Life of Gray.*

२. मेकॉले साहेबांचें पांडित्यसर्वस्व पुढील वाक्यांत प्रगट होत आहे:—

"I believe that the present system tends, not to accelerate the progress of truth, but to delay the natural death of expiring errors. I conceive that at present we have no right to the respectable name of a Board of Public Instruction. We are a board for wasting public money; for printing books which are of less value than the paper on which they are printed was while it was blank; for giving artificial encouragement to absurd history, absurd metaphysics, absurd physics, absurd theology.—"
*Minute on Education.*

"भ्रमर हा वनांत विकास पावलेल्या नूतन मंजरींचा सर्वांचा स्वाद घेत असतां एका चंपककलिकेचा मात्र अनादर करता झाला; आतां वस्तुतः पाहतां ती म्हणजे रमणीय नाहीं असें नाहीं, व तो भोक्ता नाहीं असेंही नाहीं; केवळ ईश्वरेच्छा प्रबळ इतकीच गोष्ट!" —सारांश, प्रस्तुत प्रकरणीं वरील समाधानच पतकरलें पाहिजे; दुसरा उपाय नाहीं.†

यापुढें रा. ओकां व उमरावतीकर 'शोधक' यांच्या पत्रांस उत्तरें द्यावयाचीं. पण

---

१. आमच्या आक्षेपकांनीं आपल्या पत्राच्या शेवटीं जो एक उल्लेख केला आहे, तो गैरसमजानें केला आहे. अंक ५९ तील लेख जर ते पुनः वाचून पाहतील तर 'प्रस्तुत प्रकरणीं' या शब्दांचा संबंध* 'मोरोपंताची कविता' या विषयाकडे नाहीं, हें त्यांच्या लक्षांत येईल असें आम्हांस वाटतें.

* पृष्ठ ८७७ ओळी २–३ पाहा.

शास्त्रीबोवा म्हणतातः—"त्या विख्यात पुरुषाचा प्रस्तुत प्रकरणीं कसा अभिप्राय पडता याची आम्हांस पूर्ण खात्री आहे." येथें 'प्रस्तुत प्रकरणीं' म्हणजे मोरोपंतांच्या कवितेसंबंधीं असा अर्थ होत नसून पूर्वापर संबंध पाहतां पित्याच्या मतांवर प्रतिकूल टीका करण्यानें पितृद्रोह होतो कीं काय यासंबंधीं असा अर्थ होतो हें उघड आहे. 'सम्पादक'

† ओक यांनीं नुसता प्रस्तावनेदाखलच पुढीलप्रमाणें भडिमार केला आहे:— .

"........वादामध्यें सत्यासत्याचा निर्णय करण्याचा अधिकार उभय पक्षकार आणि प्रतिपक्षकार यांचा नसून निःपक्षपात, उदासीन व समंजस वाचकांचा आहे. 'नान्तस्तत्त्वविचारणप्रणयिनो लोका बहिर्बुद्धयः' या वर्गांत येणाऱ्या जनांस अर्थातच वरील अधिकार नाहीं........... माझें पूर्वीचें पत्र......दोषयुक्त असतांही तुम्ही आपल्या पुस्तकांत छापून प्रसिद्ध केलें म्हणून तुमचे आभार मानल्यावांचून राहवत नाहीं. माझ्या पत्रांत ज्या अर्थी अकांडतांडव आहे त्या अर्थी 'चार चौघांस पसंत पडेल असें सयुक्तिक प्रतिपादन' नसून 'मजकूर छापण्यालायक' नाहीं असें तुमच्या म्हणण्यावरून ठरतें, तरी इतकें मोठें व्यंग असतां व मजकूर तुमच्या अटीप्रमाणें नसतांही तुम्हीं माझें पत्र छापून प्रसिद्ध केलें आणि तेणेंकरून:—

"तेजस्विनः सुखमसूनपि सन्त्यजन्ति

सत्यव्रतव्यसनिनो न पुनः प्रतिज्ञाम् ॥" (नीतिशतक, विविध, ७. सं०)

या भर्तृहरिवचनास हरताळ लावून स्वसंविदुल्लंघनाचा दोष आपल्या माथीं मारून घेतला हा मजवर आपला कृपाविशेष होय. या उपकारभारास्तव आपले कृतज्ञतापूर्वक आभार मानावे तेवढे थोडेच. प्रस्तुत पत्राच्या प्रसिद्धीविषयीं आपल्यावर भार घालावा अशी माझी बिलकुल इच्छा नाहीं. तुम्हीं छापलें असतां सत्यसंशोधनाविषयीं तुमची उत्कटेच्छा आणि खरी कळकळ या दोन वृत्ति प्रकट होतील, व मीं ज्या दोन ओळी लिहिल्या आहेत त्यांचें साफल्य होऊन, ज्यास्त मजवर विशेष कृपा केल्यासारखें होईल. पण माझ्यासारख्यासाठीं तुम्हीं आपल्या कडकडीत 'असिधारासम व्रता'चा तुमच्या नित्यकर्तव्यास अत्यंत विघातक असा उच्छेद करावा, असें माझ्यानें तुम्हांस म्हणवत नाहीं. तसेंच तुमच्या प्रतिज्ञाभंगाचें तुम्हांस स्मरण करून दिल्याबद्दल माझे आभार मानण्याची जरूरी नाहीं, हें सांगावयास नकोच. शेवटीं इतकीच विनयपूर्वक सूचना आहे कीं, सदहू पत्र कोणत्याही दोषास्तव आपल्या मालेंत छापण्यास अनुचित वाटल्यास बेलाशक परत पाठवून देण्याची मेहरबानी व्हावी. त्याचा विनियोग पुढें जसा व्हावयाचा असेल तसा होईल.......................प्रत्येक मनुष्य केवढाही विद्वत्तेनें व अधिकारानें मोठा असला तरी सामान्य चुकीस सुद्धां पात्र आहे. प्रसंगविशेषीं जी चुकी शाळेंतील एकादा अप्रबुद्ध मुलगा सुद्धां झटकन् शोधून काढील ती बड्या विद्ा-

(पुढें चालू.)

तसें करण्यास आमचें मन घेत नाहीं. कां कीं, एक तर रा. ओक यांचें लांबट पत्र व उमरावतीकरांचें पत्र यांवर आम्हीं आणखी चर्चा चालवली असतां तींत फारसें हंशील असणार

---

नाला स्वतःच्या लेखांत अत्यंत परिश्रम केल्यानें सुद्धां आढळणार नाहीं. याजवरून शाळेंतील अप्रबुद्ध विद्यार्थी आणि बडा विद्वान् हे समान योग्यतेचे होतात असें ह्मणण्याचें साहस कोणीही सुज्ञ करणार नाहीं. हा भाव मनांत धरून पुढील प्रत्यधिक्षेपाभियोगास आरंभ करायाचा..........जे सुज्ञ व स्वस्थ असतात ते आपला वादांत पराभव झाल्यामुळें खेद न पाळतां सत्यांश प्राप्त झाला ह्मणून आनंद मानून 'शत्रोरपि गुणा वाच्या दोषा वाच्या गुरोरपि' या न्यायानें आपल्या जिंकणाराचा गुणानुवादच करितात. तेव्हां ज्याला जी चुकी दिसेल ती त्यानें कबूल केली असतां, त्याच्या गाजलेल्या शोधकतेस, विद्वत्तेस, मार्मिकतेस आणि बहुश्रुतपणास हीनत्व येतें, मानहानि होते अथवा यथार्थज्ञाच्या मतें त्याची योग्यता कमी होते असें नाहीं. उलट पक्षीं चुकी कबूल करणें हें मनुष्यास भूषणास्पद आणि अंतरसाक्षी देवतेस समाधानकारक होय. प्रख्यात निबंधकार जॉन्सन्........ ह्मणतो...........

"As all error is meanness, it is incumbent on every man who consults his own dignity to retract it as soon as he discovers it; without fearing any censure so much as that of his own mind."—Rambler (31).

पण मनुष्याच्यानें असें करवतें तर काय झालें नसतें? त्याच्या मनाचा कल—

अनपेक्ष्य गुणागुणौ जनः स्वरुचिं निश्चयतोऽनुधावति। (शिशुपालवध, १६, ४४, पूर्वार्ध. 'सं'०)

असा असल्यामुळें त्याच्या हातून अनेक दोष घडतात व ते प्रमादपरतेस्तव अपरिहार्य हेंही खरें.

......तुमच्या उत्तरावर प्रत्युत्तर देणें हें जर कोणाच्या मतें धाष्टर्य असेल तर तें न करणें उचित. परंतु प्रस्तुत प्रकरणीं मूकभाव धारण करणें म्हणजे असत्पक्षाला व्यर्थ फूस दिल्यासारखी होते म्हणून सत्पक्षाच्या मंडनार्थ—

"काश्मीरजस्य कटुतापि नितान्तरम्या" (भामिनीविलास, प्रास्ताविक, ६९. 'सं०')

या न्यायानें हें धाष्टर्य करण्यास प्रवृत्त होतों.

तुम्ही आपल्या मालेंतील निबंधांची फारच मोठी योग्यता समजतां म्हणून हें प्रत्युत्तर लिहिण्याचा प्रसंग आला......मेकॉले साहेब येवढा हातखंडा वावदूक व पटाईत लेखणीबहादर होता खरा, तरी त्यासही त्याच्या निबंधावलींत अनेक प्रमाद घडले असतील असें वाटत असे........ मेकॉलेसारख्याला जर त्याच्या निबंधांची—जे निबंध आज पृथ्वीवरील सर्व सुशिक्षित लोकांस अनेक गुणांस्तव मान्य झाले आहेत—त्याची येवढी अभिमानबुद्धि नव्हती, तर त्याच्या निबंधावर जे आपला अनेक प्रसंगीं निर्वाह करूं पाहतात त्यांनीं स्वतःच्या लेखांची येवढी मोठी स्तुति गावी हें चमत्कारिक दिसत नाहीं काय! मेकॉलेचें ह्मणणें,

["The public judges, and ought to judge, indulgently of periodical works. They are not expected to be highly finished. Their natural life is only six weeks. Sometimes their writer is at a distance from the books to which he wants to refer. * * * He may blunder; he may contradict himself; he may give an immoderate extension to one part of his subject and dismiss an equally important part in a few words. All this is readily forgiven, if there be a certain spirit and vivacity in his style."]

[पुढें चालू.]

नाहीं. आमचें ह्मणणें काय आहे, व आमच्या प्रतिपक्ष्यांचा अभिप्राय काय आहे, हें वाचकांस यापूर्वी सविस्तर कळलेंच आहे. यास्तव आतां सदरील प्रकरणीं त्यांनींच तिन्हाईत-

---

ज्यादीं निरभिमानतेचें दिसतें, परंतु तुम्ही आपले निबंध जितके चांगले होतील तितके करण्याविषयीं भारी परिश्रम घेतां असें तुमच्या ह्मणण्यावरून कळतें. तेव्हां त्यांची परीक्षा कसोशीनें व बारकाईनें करणें केव्हां केव्हां भाग पडतें. तर असें परीक्षण करतांना कचित् स्पष्टोक्तीसारखें अथवा अहंतोक्तीसारखें जें दिसेल तें सत्यनिरूपणार्थ निरुपाय होऊन लिहिलें असें समजून माफ कराल अशी आशा आहे...........या खेपेस तुमच्या लेखाविषयीं माझा समज बरोबर झाला असेल असें माझ्यानें आतां सहसा म्हणवत नाहीं. जेथें प्रतिमोरोपंत सुद्धां चुकतात तेथें माझ्यासारख्याचा काय पाड? अस्तु. जें कांहीं समजलेंसें वाटलें तेवढ्यावरून पुढचें पत्र लिहावें लागलें. यांतही कोठें नजरचुकीनें अनेक अपशब्दादि दोष घडले असतील तर त्यांजकडे टवकारून न पाहतां लिहिणाराचा आशय ध्यानांत आणावा."

याप्रमाणें प्रस्तावना करून, यमकांचा प्रकार वामनानें सुरू केला हें ह्मणणें बरोबर नाहीं, म्हणजे संशयात्मक आहे असा आपला आक्षेप असतां, 'यमकांचा प्रकार' याचा अर्थ 'केवळ यमकरचना' नसून 'लांब लांब यमकें जुळण्याचा प्रघात' असा सांगून वामनपंडिताला आम्हीं मान दिला तो नुसत्या यमकरचनेच्या संबंधानें नव्हे तर पांच पांच सहा सहा अक्षरांचीं यमकें कवितेंत घालण्याची पद्धति त्याच्या काव्यांत प्रथमतः दृष्टीस पडूं लागली याबद्दल होय असें विधान शास्त्रीबोवांनीं केलें होतें त्याला उत्तरादाखल ओक ह्मणतातः—

"तुमचें लिहिणें स्पष्टार्थक नाहीं. 'हा यमकांचा प्रकार' हा पदसमूह द्व्यर्थक आहे.........तुमच्या लेखाचे केव्हां केव्हां परस्परभिन्न असे दोन दोन अर्थ होऊं शकतात. लेखामध्यें व्यर्थता अथवा संदिग्धार्थता असल्यामुळें निरर्थक गोंधळ होतो. तेव्हां ही गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, ज्या अभिप्रायाचें विधान करावयाचें आहे त्याव्यतिरिक्त अन्यार्थाची संभावना सुद्धां होऊं नये अशी वाक्यशब्दरचना असावी.........कोणत्याही लेखास द्यामुष्यायणाचा संपर्क सुद्धां होऊं नये...... ह्मणजे अर्थविरोध अथवा संदर्भविरोध उत्पन्न होऊन भ्रांति उद्भवत नाहीं.......खालच्या उताऱ्यांतील (मेकॉलेचा) अभिप्राय तुह्मांस सर्वस्वीं मान्य होईल असें वाटतें:—

"The first rule of all writing—that rule to which every other is subordinate, is that the word used by the writer shall be such as must fully and precisely convey his meaning to the great body of his readers. All considerations about purity and dignity of style ought to bend to this consideration."

......तुम्हांस तुमच्या लेखाचा अर्थ सांगण्याचा अधिकार आहे येवढ्यावरून तुम्ही सांगितलेला अर्थ स्वीकारावा हें ठीक दिसत नाहीं. वाक्याच्या ओघाकडे पाहिलें असतां तुमचा दुसरा अर्थ मनांत सहजवृत्त्या येत नाहीं, व तसा असेल असेंही ह्मणवत नाहीं." याचें कारण ओक असें सांगतात कीं या वाक्यापूर्वीच्या वाक्यांत शास्त्रीबोवा 'तिचा (मोरोपंताच्या कवितेचा) विशेष म्हटला ह्मणजे लांब लांब यमकें हा होय,' असें लिहितात. व हा अर्थ घेतला तर मोरोपंताच्या व वामनाच्या दोघांच्याहि कवितेंत लांब लांब यमकें आहेत असें होईल. मग तो मोरोपंताच्या कवितेचा 'एक मोठा विशेष' गुण कसा होईल? पुढें ओक म्हणतात,—'माझ्या म्हणण्याप्रमाणें मध्यम प्रकारची यमकरचना असा अर्थ घेतला आणि 'लांब लांब यमकें जुळण्याचा प्रघात' असा अर्थ न घेतला

(पुढें चालू.)

पणें पंचाईत तोडावी ह्मणजे झालें. कोणत्याही विषयाचा ऊहापोह होऊन लोकांस त्याचें

---

तर मात्र 'विशेष' शब्दाची सार्थकता ठरणार आहे.........केवळ यमकरचनेचा प्रचार पाहिला तर महाराष्ट्र-कवि-कुल-गुरु जे मुकुंदराज त्यांजपासून तों आजकाळपर्यंत महाराष्ट्रकविता ही गीतेच्या आर्याशिवायकरून सयमकच दृष्टीस पडते......ही 'नवनीता'ची थोडीबहुत ज्यास ओळख असेल त्यास सुद्धां कळण्याजोगी गोष्ट......सांगण्याची तुम्हीं उगीच खटपट केली......एकाक्षरात्मक यमकांची प्रवृत्ति एकंदर महाराष्ट्रकवितेंत आढळते. तेव्हां तशा प्रकारच्या यमकांचा विचार प्रस्तुत स्थळीं कर्तव्य नाहीं......"वरील कवींपैकीं (ह्मणजे अभंग व ओंवी या छंदांत काव्यरचना करणारांपैकीं) कोणी पंडित नसल्यामुळें वरील साध्या छंदांतही यमकरचना करण्याचा कोणीं यत्न केलेला दृष्टीस पडत नाहीं,".........जी गोष्ट तुम्ही स्वतः आपले लेखानें कबूल करितां तीच जर इतरानें सांगितली तर ती तुम्ही नापसंत ठरवितां यास काय म्हणावें ?.......चांगला चतुर कवि असला तर पाहिजे त्या छंदांत दीर्घयमकरचना करील, असें मी पूर्वी लिहिलें आहे तें तुम्हांस पसंत नाहीं.......केवळ यमकरचना असा अर्थ गृहीत केला तरीही असंग आहेच. कारण सर्व महाराष्ट्रकविता यमकबद्ध आहे. तेव्हां दण्डपूपिकान्यायानें यमकरचना करण्याचा यत्न कोणीं महाराष्ट्रकवीनें केला नाहीं असें म्हणण्यांत काय जीव आहे ?.........दीर्घयमकरचना असा अर्थ घेतल्यास पूर्वोक्त दोषाशिवाय दुसरा एक दोषही येणार. वरील कवींपैकीं कोणी पंडित असते आणि त्यांनीं साध्या छंदांतही दीर्घयमकरचना केली असती तर त्यांनीं 'या शब्दालंकाराची योजना केवळ शोभेकरितां करावयाची' या आपल्या महातत्वाकडे दुर्लक्ष केल्याचा आक्षेप त्यांजवर करितां येईल; तसेंच अशा कवींची कृति अप्रयोजक दिसणार आहे.........दीर्घयमकरचना अथवा केवळ यमकरचना असा अर्थ माझा नसून यांतील उभयमध्यवर्ती अर्थ घ्यावा असें मी ह्मणतों.........अमक्या कवीच्या ग्रंथांत यमकें आहेत असें मीं अनेक ठिकाणीं लिहिलें आहे त्याचा अर्थ नुसतें यमकबद्ध चरमाक्षर असा नव्हे. तर दोन, तीन, चार इत्यादि अक्षरांभर यमकें असा अर्थ आहे......तुमच्या उत्तरांत (अंक ६२ पृष्ठ ९३२. सं०") 'कोणा एकाद्याच्या ठायीं एकादा गुणविशेष असून त्याजवरून जर त्याच्या श्रेष्ठत्वाचें वर्णन केलें तर तो गुणविशेष तद्व्यतिरिक्त इतरांच्या ठायीं अवश्य मानावासच पाहिजे असें आम्हांस वाटत नाहीं" असें तुम्ही लिहितां......तर....मोरोपंतांचा विशेष (दीर्घयमकरचना) वामनाच्या कवितेंत आढळतो असें मानीत नाहीं. व असें न मानिलें तरच विशेष शब्दाची सार्थकता साध्य होणार आहे, पण तुमचें ह्मणणें तुमच्या साध्यसिद्धीचें संपादक नसून उलट तीस विघातक आहे.........एतावता तुमचा नवीन अर्थ व माझा ह्मणून तुम्हीं दिलेला अर्थ हे घेऊन चाललें तर अनेक विरोध उत्पन्न होतात. तेव्हां मीं दर्शविलेला अर्थ घेणें उक्त दिसतें.........विद्वान् लोक प्रसंगविशेषीं आपली बाजू घसरते आहे असें वाटलें म्हणजे स्वदोषनिरसनार्थ कशी हिकमत लढवितील आणि कशी वेळ मारून नेतील याचा नियम नाहीं. आपल्या लेखांतील अर्थविप्रतिपत्ति, विपर्यास, असंबद्धता दूर करण्याकरितां वादविवादाच्या भरांत प्रख्यात विद्वान् किती कळकळ बाळगतात व समयविशेषीं आपली उच्च पदवी सोडून कसें खालीं येऊं पाहतात हें प्रमेय अनेक उदाहरणांवरून कोणाच्याही प्रतीतीस येईल...........या मुद्द्यावर डॉक्टर् जॉन्सन्चें काय ह्मणणें आहे तें पाहा:—

"Of all mortals, none seem to have been more inflected with this species of vanity than the race of writers, whose reputation, arising solely from their understanding, gives them a very delicate sensibility of any violence attempted on their literary honor. It is unpleasing to remark

[ पुढें चालू. ]

स्वरूप स्पष्टपणें कळावें हाच आमचा मुख्य उद्देश आहे. वरील निर्णय आमच्या तर्फेचा

with what solicitude, men of acknowledged abilities, will endeavour to palliate absurdities, and reconcile contradictions to which all human performances must ever be exposed and from which they can never suffer, but when they teach the world by vain and ridiculous impatience, to think them of importance."—Rambler.

"पांच पांच सहा सहा अक्षरांचीं यमकें कवितेंत घालण्याची पद्धति त्याच्या (वामनाच्या) काव्यांत प्रथमतः दृष्टीस पडूं लागली" ह्मणून प्रथमत्वाचा मान वामनास दिला असें तुमचें उत्तर आहे......मोरोपंतांच्या कवितेचा एक मोठा विशेष लांब लांब यमकें जेव्हां झाला, त्याजवरून उलट असा सैमवदुक्तिक अर्थ निष्पन्न होतो कीं, लहान लहान यमकांची रचना अथवा लांब लांब यमकांचा अभाव हा गुण इतर कवींच्या कवितेंत बहुधा आढळावयाचा. दोन दोन तीन तीन चार चार पांच पांच अक्षरांचीं यमकें रामदास, मुक्तेश्वर, विठ्ठल इत्यादिकांच्या काव्यांत कमजास्त मानानें आढळतात. परंतु पांच पांच सहा सहा अक्षरांच्या यमकांना मात्र लांब लांब यमकें ह्मणावें आणि चार चार अक्षरांच्या यमकांना मात्र लांब लांब यमकें ह्मणूं नये......हा शास्त्रार्थ रास्त दिसतो काय?......दुपटी तिपटी चौपटीचा प्रकार मुकुंदराज किंवा ज्ञानेश्वर यांच्या काव्यांत तादृश नसल्यामुळें रामदास, मुक्तेश्वर, बीडवासी (खरें ह्मटलें तर गौरीपुरवासी) विठ्ठल यांजकडे धुसावें लागलें. पूर्व–कवींच्या यमकांपेक्षां चौपटीनें मोठीं किंबहुना वामनाच्या येवढीं यमकें, वामनापेक्षां प्राचीनतर कवींच्या ग्रंथांत असतांही त्यांस व इतरांस अंशतः गुणसंबंधानें व विशेषतः कालसंबंधानें प्रथमत्वाचा मान मिळूं नये परंतु त्यांच्यापेक्षां दीडपटीनें मोठीं किंवा सवाईनें मोठीं किंवा त्यांच्या येवढीं मोठीं रचणारास तो मान मिळावा हा न्याय चोख झाला काय?........हाताच्या मधल्या दोन बोटांत जें अंतर दिसतें तितकेंही न्यूनाधिक्याचें मान वामन व इतर कविजन यांच्यामध्यें प्रकृत गुणाच्या संबंधानें असेल असें सुद्धां वाटत नाहीं........कालाच्या संबंधानें अग्रपूजेचा मान कोणाचा याचा कांहीं विचार झाला पाहिजे. तुम्ही पांच पांच सहा सहा अक्षरांचीं यमकें रचणारास हा मान कां देतां आणि कालाच्या संबंधानें ज्यांचा हक्क त्या मानावर अगोदरचा असल्यामुळें अधिक मजकूर आहे, अशा कवींचीं चार चार व पांच पांच अक्षरांचीं यमकें असतांही त्यांची मानखण्डना कां करितां हें समजत नाहीं.......मुक्तेश्वर, रामदास, यांची कविता वामनाच्या आधीं प्रकट झाली व त्याच्या वेळीं वामनाची कवित्वाविषयीं सांगण्यासारखी आख्या मुळींच झाली नसावी. त्याच्या कवित्वकीर्तिप्रसाराचा आरंभकाळ सरासरी मुक्तेश्वराच्या उतारवयाच्या अलीकडे पलीकडे कदाचित असावा...कारण काव्याची प्रसिद्धि होण्यास तद्रसस्वादनाचा अनुभव लोकांस घडावा लागतो. पण ही गोष्ट अल्प काळांत व्हावयाजोगी नव्हे.

कविता वनिता गीतिः प्रायो नादौ रसप्रदाः ।
उद्गिरन्ति रसोद्रेकं प्राश्यमानाः पुरःपुरः ॥ हम्मीर महाकाव्य, १४, ३७.

कविता, वनिता व गीति ह्या प्रथमतः रसप्रद वाटत नाहींत. त्यांची गोडी अनुभवानें ज्यास्त लागणारी आहे......अल्प काळांत नांवलौकिक होणें हें सौभाग्य थोड्याच कवींच्या नशिबीं असेल.... रामदास, श्रीधर, महीपति व मोरोपंत यांनीं वामनाची जी स्तुति गाइली आहे तिचा मुख्य मुद्दा उत्तम श्लोकरचना व उत्तम यमकरचना...दुरून दिसायाला भपकेदार परंतु अर्थाच्या नांवानें जेथें ठणठणाट आहे अशा दीर्घ–यमकरचनेस उत्तम हें विशेषण कोण लावील?........'यमक्या

(पुढें चालू.)

झाला असतां आह्मांस आनंद होणार आहे हें तर उघड आहे, व तसा होण्याविषयीं आह्मी

---

वामन' यावरून वामनाच्या यमकरचनेचें सरसत्व मानणें असें सयुक्तिक व प्रशस्त दिसतें, तसें केवळ दीर्घत्व मानणें दिसत नाहीं......ध्वनीत-प्रथमक विद्वान् शास्त्र्यांच्या मतें वामनाच्या कवितेंत यमकचातुर्य आहे.......तेव्हां त्यांनीं वामनाच्या पूर्वी चार पांच अक्षरांच्या यमकांपर्यंत मजल मारिली त्यांच्या हक्काची विचारपूस न करितां त्या पुढें मजल मारणारांस सर्व यश देणें...... ...... अन्यायाचरण होय.......जॉन्सन्नें मिल्टन्विषयीं म्हटल्याप्रमाणें ('His work is not the greatest of heroic poems only because it is not the first.') यमककारांच्या मालिकेंत वामनास शिरोभागीं स्थान देणें हें यमकगुणांच्या संबंधानें कदाचित् नीट असेल अथवा नसेल; परंतु कालाच्या संबंधानें व यमकदीर्घत्वाच्या संबंधानें असें करणें उचित व यथान्याय ठरणार नाहीं... उत्तरांत तुम्ही 'दीर्घ यमकांचा प्रकार (वामनाच्या ग्रंथांवरून प्रवृत्त झाला असें म्हणण्यास मोठीशी हरकत दिसत नाहीं' असें म्हणतां.....हे शब्द निश्चयात्मक आहेत काय? माझाही कयास........ संशयात्मकतेचा दोष स्थापित करण्याचा आहे. तुमचें म्हणणें केवळ अयथार्थ आहे असें मीं कोठेंही साक्षात् अगर परंपरया विधान केलें नाहीं. 'महाराष्ट्र-कविता ही केवळ ओंवी व अभंग या छंदांतच असल्यामुळें यमकांच्या रचनेस अर्थांतच अवकाश नव्हता.' (अंक ५७, पृष्ठ ८७४, ओळी२–३ पाहा. 'सं॰') व 'ओंवी व अभंग हे छंद यमकरचनेस विशेष अनुकूल असल्याविषयीं वें आम्हीं लिहिलें (अंक६२, पृष्ठ९३१ ओळ ७ पाहा. सं॰') हे तुमचे दोन लेख समानार्थक आहेत काय?.....यावरून असें अनुमान होतें कीं माझ्या लेखावरून तुमच्या मूळच्या अभिप्रायांत चलबिचल झाली........'यमकांहीं सर्वहानि केली'...... (येथें) कोणाची सर्वहानि केली असा प्रश्न सामान्य बुद्धीच्या मनुष्यासही सुचणार आहे. बुद्धया आडगळांत शिरून एकसुरी कोशाच्या बळावर पदान्पद फाडून विलक्षण अर्थ काढण्याची किंवा पांडित्याचा तोरा मिरविण्याच्या मराठी यमककारांची अपवोक्क सरणी ठकण्याची खटपट केली आहे असें मला वाटत नाहीं........आनंदतनयासारख्या यमककार (पूर्व-) कवींची सर्वहानि केली असा अर्थही नीट बसेल. त्यांनीं एकसुरी यमकें साधिलीं किंवा तुमच्या म्हणण्याप्रमाणें ह्या यमकरचनेचा गुणविशेष ज्यांच्या ठिकाणीं मुळींच नव्हता त्यांची त्यानें सर्वहानि केली या म्हणण्यांत काय बोध आहे? आनंदतनयाच्या काव्यांत केवढालीं मोठीं यमकें आहेत (पाहा).

> पाया यमी देहुप वंश सारा। पा यां यमी हे द्रुपवंश सारा ॥
> न या वयामाजि मला वनां दे। न याव्या मा जिम लाज पांदे ॥१॥
> आठ्यावे विपदा शिवपूजी। अर्जुनी शिवपदा-शिवपूजी ॥
> आदरेंच परमा नियमार्ते। वो मनांत पर मावि समार्ते ॥ २ ॥ इत्यादि॰

—आर्याविद्यासुधाकर पृष्ठ २९.

......वामनानें मराठींत यमवृत्तें आणिलीं कीं मुक्तेश्वर, रामदास, विठ्ठल यांनीं आणिलीं? या मुद्यावरील आक्षेप बरोबर आहे असें तुम्हीं मान्य केलेंच आहे. 'आमच्या उल्लेखावर वस्तुतः पाहतां अनिश्चितता येणार हेंही उघड आहे' असें तुम्हीच कबूल करितां.....पण पुनः उलट एका पदाच्या आधारें (सुश्लोक वामनाचा) स्वपक्षमंडन करितां तें 'विद्धे करिपि किमफुटे विवाद: ?' या म्हणल्याचें निर्जीव व पोकळ आहे. 'सुश्लोक वामनाचा' ह्या पद्यांतील पदांवरून जर गणवृत्तांचें प्रवर्तकत्व वामनाकडे देणें असमंजस नव्हे तर 'मोरोपंडित समाप्य रावात्य' या आधारांवरून मोरोपंतास पंडितत्व देणें तुमच्या अभिप्रायाप्रमाणें असमंजस ठरणार नाहीं!......'सुश्लोक वामनाचा' यावरून तो श्लोक फार चांगले करणारा होता असा अर्थ घ्यावयाचा कीं तो गणवृत्तांचा

(पुढें चालू.)

पहिल्यापासून खबरदारी ठेवतों हेंही सहजच आहे, तरी अमकाच निर्णय झाला पाहिजे या विषयीं आमचा बिलकुल आग्रह नाहीं.

---

प्रवर्तक होता असा अर्थ घ्यावयाचा ?......कोणत्या पद्यकारानें कोणत्या छंदांत चांगली कविता केली हें सांगण्याचा त्या पद्यकाराचा उद्देश दिसतो. तुमच्या प्रतिपादनाप्रमाणें इतर पादांचा अर्थ घेतला । अभंगाचें प्रवर्तकत्व जर तुकारामास दिलें तर ज्ञानदेव, नामदेव, इत्यादिकांनीं तुकोबांचा उदय होण्यापूर्वी अनेक वर्षें शेंकडों हजारों अभंग करून ठेवले आहेत त्यांची वाट काय ?......महाराष्ट्र-कविता-कामिनीच्या अंगीं तिच्या विधात्यांनीं जो भक्तिशृंगारादिक रसांचा ओघ सोडून दिला आ[हे] त्याच्या योगानें तिच्या बाह्य स्वरूपांत एकाद्या चटकचांदणीचा नखरा, ठेंवरेव, हावभाव इत्यादि भपकीदार थाटमाट जरी दृष्टीस पडत नाहीं, तरी तिच्या अंगीं जादुगिराप्रमाणें जी अदृष्टमोहिनी भरून ठेविली आहे, तिच्या प्रभावानें व तिचा साधा पोषाख, सत्वस्थवृत्ति, मनाची प्रसन्नता चातुर्ययुक्त पदविलास, व अव्याजमनोहरता यांच्या समुच्चयानें व यमकरूप सुवर्णमय सांखळ्यांच्या मंजुळ झणत्कारानें तिच्या स्वरूपास लुब्ध होऊन तल्लीन झालेले लोक थोडे आहेत असें नाहीं. अनेक वार मुखचुंबनानें व तज्जन्य संघट्टनानें ज्यांचा रिघाव तिच्या हृदयकमळापर्यंत होऊन एकदां गेला आहे, त्यांस, कितीही वृद्ध झाले तरी तिचा नाद सोडतां सोडवत नाहीं. इतकेंच नव्हे तर वयाच्या मानानें अभिरुचि अधिकाधिक उत्तेजित होते व तद्हृदयवसतिस्थान अत्यंत प्रेमास्पद होतें अशी योग्यता ज्यांच्या परिकर्मकौशल्यानें तीस प्राप्त झाली आहे त्यांच्या कर्तृत्वाचा मुळींच विचार करावयाचा नाहीं काय ?"

यापुढें महाराष्ट्रकविता वामनापूर्वी केवळ ओंवी व अभंग या छंदांतच होती हा शास्त्रीबोवांचा सिद्धांत खोडून काढण्यासाठीं मानदेशांत धारूरगांवीं शके (कविचरित्राप्रमाणें) १२५० मध्यें राहणारा 'भक्तचरित्र', 'द्रौपदीचा धांवा', दिंडी वृत्तांतील 'शुकरंभा संवाद' व सवाई छंदांतील 'गीतार्थमंजरी वगैरेंचा कर्ता उद्धवचिद्धन या कवीस पुढें आणलें आहे. परंतु त्याचा काल आधुनिक शोधाप्रमाणें शके १६११हा ठरत असल्यानें हा मुद्दा ओकांना उपयुक्त ठरत नाहीं.तद्वतच आनंदतनयाचाही शक १६४५ असा ' भक्तमंजरी ' त आढळतो. तेव्हां हे दोघेही वामनपूर्वकालीन कवि ठरत नाहींत. व तितक्या प्रमाणांत ओकांची बाजू कमजोर ठरते हें उघड आहे.अधिकप्रख्यातीमुळें विठ्ठलादि कवींपेक्षां गणवृत्तांचें प्रवर्तकत्व वामनाकडे घावें या शास्त्रीबोवांच्या विधाना (पृष्ठ ९३४ पहिल्या आठ ओळी पाहा. 'सं'०) संबंधीं ओकांचें मत असें कीं कालिदास, दंडी, भवभूति, सुबंधु, बाणभट्ट, असा कालानुक्रम असूनहि गद्य-काव्यकारांमध्यें 'कादंबरी'वरून बाणभट्टाची प्रथम गणना होते;तरी गद्यकाव्यप्रवर्तकत्वाचें श्रेय त्याचें नसून दंडीचेंच होय. तद्वत् वामनाला गणवृत्तप्रवर्तकत्वश्रेय देतां येणार नाहीं.अपूर्वत्वामुळें नव्हे तर कौशल्या-मुळें व प्रसिद्धीमुळें न्यूटन्, पाणिनि वगैरेंसच गुरुत्वाकर्षणधर्मशोधक, व्याकरणशास्त्रप्रणेता ह्मणतात या शास्त्रीबोवांच्या सादृश्यदर्शक उदाहरणांसंबंधीं (पृष्ठ ९३४ पहिल्या आठ ओळी पाहा. 'सं'०) ओकांचें मत असें कीं, प्राचीन तत्त्वज्ञांची माहिती अल्प; ह्मणून त्यांस श्रेष्ठत्व देणें रास्त नाहीं. होमर्, कालिदास, शेक्सपीयर यांच्या ग्रंथांत अनेक शास्त्रविषयक उल्लेख आहेत येवढ्यावरून त्यांस त्या शास्त्रांची माहिती होती असें ह्मणतां येणार नाहीं हें खरें; तरी पण संस्कृत व्याकरणाचा इतिहास-कार पाणिनिपूर्व इन्द्रप्रभृति वैयाकरणांचा मुळींच उल्लेख न करतां पाणिनीसच सर्व मान देईल हें शक्य नाहीं. खुद्द पाणिनिहि अष्टाध्यायींत प्राचीन गालव, शाकल्य वगैरेंचा उल्लेख करतो. शेवटीं बरींच उदाहरणें देऊन वामन व मोरोपंत यांनींहि दीर्घयमकरचना बहुधा लहान वृत्तांतच पुष्कळ साधली असून मोठ्या छंदांत फारच क्वचित् स्थलीं साधली आहे असें सिद्ध करण्याचा प्रयत्न

( पुढें चालू. )

रा. ओक यांचीं इतर जीं कांहीं पत्रें§ आहेत त्यांवर आमच्या कांहीं मित्रांनीं परस्पर उत्तरें दिलींच आहेत. यास्तव त्यांवरही येथें पुनः चर्चा करण्याचें प्रयोजन दिसत नाहीं.

---

ओकांनीं केला आहे व Hume च्या Standard of Human Taste या निबंधांतील "One person may even perceive deformity where another is sensible of beauty; and every individual ought to acquiesce in his own sentiments, without pretending to regulate those of others. To seek the real beauty or real deformity is as fruitless an inquiry, as to pretend to ascertain the real sweet or real bitter. According to the dispositions of the organs, the same object may be both sweet and bitter." हा उतारा देऊन त्यांनीं 'शोभेसाठीं अमुक प्रकार योग्य आहे असें ह्मणणें कांहीं अंशीं भ्रममूलकच होय, कारण शोभेच्या कल्पना रुचिभेदपरत्वें फार पालटतात. शोभा अथवा सौंदर्य हा विषय सत्यासत्यविवेचनशक्तीचा ह्मणजे तार्किकत्वाचा नसून केवळ अभिरुचीचा आहे.' असा समारोप केला आहे. 'सम्पादक'

§ (अ) पासष्ठाव्या अंकांत कीर्तनाची प्रवृत्ति रामदासांनीं पाडली असें ह्मणतात तें कितपत खरें आहे सांगवत नाहीं अशा अर्थाच्या शास्त्रीबोवांच्या विधानावर टीकापर पत्र (२०–६–१८८० चें) आलें असून त्यांत सदर विधानाबद्दल गैरसमज करून घेऊन रामदास कीर्तन करीत असत कीं नाहीं याबद्दल शास्त्रीबोवा साशंक होते असें गृहीत धरून ते कीर्तन करीत असत असें महीपतीच्या संतविजयांतील उताऱ्यांवरून सिद्ध करण्याचा अनाठायीं प्रयत्न ओकांनीं केला आहे.

(आ) याच अंकांत त्यांचें १५–२–१८८० चें तुकाराम व शिवाजी यांच्या जन्ममरणशकांसंबंधीं पत्र आलें असून त्यांत मालेच्या विसाव्या अंकांतील पृष्ठ २७७ शेवटच्या तीन ओळी; पृष्ठ २७८ पहिल्या तीन ओळी; पृष्ठ २७८ टीप खालून ओळी ७–८; पृष्ठ २८३ ओळी १६–१७; पृष्ठ २८४ पहिल्या सहा ओळी; हे पांच व पंचेचाळिसाव्या अंकांतील पृष्ठ ७९७ ओळी १०–११ हा एक असे उतारे देऊन तुकाराम व शिवाजी राजे यांची गांठ पडण्याचा पर्वणीचा योग कधीं घडून आला होता कीं नाहीं याची शंका आहे असा आक्षेप घेतला आहे. त्यांच्या कालैक्याचा अगर राज्याभिषेकोत्तर दर्शनाचा संभवहि दिसत नाहीं या आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ छप्पन्नाव्या अंकांतील पृष्ठ ८६४ टीप १ हा उतारा देऊन ओकांनीं शास्त्रीबोवांच्या विधानांतील परस्परविरोध शाबीत करण्याचा प्रयत्न केला आहे.

याच पत्रांत तुकारामाच्या संस्कृत ज्ञानाच्या सिद्ध्यर्थ गीतेचें अभंगात्मक भाषांतर 'गीतार्थबोधिनी'त दिलेलें व भर्तृहरीच्या एका श्लोकाचें अभंगात्मक (? सं०) भाषांतर—

मणि पडिला दाढेसे मकरतोंडीं। सुखें हस्तोंचि काढवेल प्रौढीं ॥१॥
परि मूर्खांचें चित्त बोधवेना। दुधें कूर्मांच्या पाळवेल सेना ॥२॥
सकळ पृथ्वी हिंडतां कदाचित। ससी सिंगाची प्राप्त होय तेथें ॥३॥
अति प्रयत्नें गाळितां वाळुवेतें। दिव्य तेलाची प्राप्त होय तेथें ॥४॥
अति क्रोधें खवळला फणी पाहीं। धरूं येती मस्तकीं पुष्प प्रायी ॥५॥
पहा ब्रह्मानंदेंचि एकीहेळा। महा पातकी तो तुका मुक्त केला ॥६॥

( पुढें चालू. )

# निबंधमाला—वर्ष ४ थें.

अंक ४८—सामान्य आक्षेप—ज्ञानोदय—दीनबंधु—निबंधमाला.

दिनयामिन्यौ सायं प्रातः शिशिरवसंतौ पुनरायातः ।[1]

—मोहमुद्गर, शङ्कराचार्य.

सालमजकुरचा हा अखेरचा अंक आहे. याही वर्षांत मागल्याप्रमाणें आमच्या प्रति पक्ष्यांनीं आमच्या पुस्तकाविषयीं बरीच चर्चा केली, यास्तव त्यांच्या आक्षेपांवर आम काय ह्मणणें आहे तें त्यांस व इतर वाचकांस कळलें पाहिजे. तेव्हां सालाबादप्रमाणें सदरी अंकांत वरील मजकूर येईल.

हा आमचा प्रतिवार्षिक स्नानविधि पाहून आमचे कित्येक वाचक कदाचित् ह्मणती कीं, येवढ्या उठाठेवीवांचून काय अडलें आहे ! अगोदर वाद उकरून काढा, आणि म त्यावर चर्चा प्रतिचर्चा करीत बसा यांत शहाणपण तें कोणतें ! यापेक्षां कोणाशीं तंटाबखेड न करतां सर्वांशीं गुण्यागोविंदानें राहावें हें बरें नव्हे काय ! भाषा सुधारण्याचें व लोकां ज्ञानप्रसार करण्याचें काम जरी हातीं घेतलें, तरी तें सिद्धीस नेण्यास 'याची गचांडी ध

---

दिलें असून त्यास संस्कृत भाषेचा शास्त्रीबोवांच्या मताप्रमाणें गंधही नसता तर या गोष्टी कश शक्य झाल्या असल्या असा ओकांचा सवाल आहे.

अंक ६० मधील 'पुरा कस अवल्याखेरीज सोन्याचा सोनेंपणा ठरूं नये; तसेंच कोणी लौकि कानें मोठा येवढ्यावरच जाऊन त्याच्या वचनांचें जें प्रमाण मानायाचें त्यापेक्षां आपण स्वतः होई तितकी यथातथ्य परीक्षा करून नंतर कोणतेंही मत ग्राह्य कीं अग्राह्य तें ठरवावें; हें ठरविण्याच अधिकार लहानापासून मोठ्यापर्यंत सर्वांस सारखा आहे हेंही तत्त्व आमच्या पुस्तकावरून सर्वां कळण्यासारखें आहे' हा उतारा घेऊन तुकारामाच्या व शिवाजी महाराजांच्या भेटीसंबंधीं पूर्वनिर्दिष्ट अने उल्लेख 'नवनीता'दि ग्रंथांचें प्रामाण्य मानून केल्याबद्दल दोष देऊन 'सोन्याची परीक्षा अग्नितापा होते हें खरें पण ती करण्याची हेळसांड झाली तर तो दोष अग्नीचा कीं परीक्षकाचा ?' असा टो ओकांनीं दिला आहे.

जन्ममरणशक व शिव-तुकाराम भेट यांबद्दल लेल्यांचें उत्तर गुळमुळीत आहे. संस्कृत ज्ञाना संबंधीं मात्र त्यांचें मत विचारणीय आहे. गीतेचें भाषांतर करणाराची भाषा इतकी सोपी पडणा नाहीं; 'विद्या असती कांहीं तरी पडतों अपायीं', असें तो म्हणता ना; त्याचा काळच असा हो कीं यवनांच्या गांजणुकीमुळें ब्राह्मणांसहि संस्कृतज्ञान दुर्लभ झालें होतें मग शूद्रांची गोष्ट काय भर्तृहरीच्या श्लोकाचें भाषांतर अभंगात्मक नसून दिंडी वृत्तांत आहे व शेवटच्या ओळींत 'तुका मु केला' असे शब्द असले तरी तें तुकारामाचें नसावें; व असलेंच तरी वामनाच्या भाषांतरावरून के असावें; शिवाय भिन्नदेशीय व भिन्नकालीन लोकांचेहि विचार सारखे आढळत नाहींत असें नाहीं अ लेले म्हणतात.

'सम्पादक'

१. "दिवस व रात्र, सकाळ व संध्याकाळ, शिशिर व वसंत, हीं युग्में एकामागून एक निरंत चालत आहेत !"

त्याची गवांडी घर' याप्रमाणें वारंवार अर्धचंद्रप्रयोग करण्याचें कांहीं विशेष कारण दिसत नाहीं. दुसऱ्याचा मर्मभेद होई व त्यास संताप येई अशा रीतीनें लेखणी चालवणें हें खऱ्या विद्वत्तेचें लक्षण नव्हे. तर खरा विद्वान् व उत्तम ग्रंथकार तो होय, कीं ज्याचे लेख चंदनाप्रमाणें सर्वांच्या हृदयास शीतळवतात व आनंद देतात, व जो कोणाच्याही वाटेस न जातां व कोणासही तिळमात्रसुद्धां न दुखवतां लौकिक दुर्मतांचें खंडन करतो व आपल्या देशबंधूंस सत्याचा व ज्ञानाचा लाभ करून देतो !

वरील सदुपदेश आजपर्यंत आह्मांस अनेकांनीं केला, व ८, २४, ४४ वगैरे अंक तर वरील व्याख्यानें आह्मांस मिळण्यास विशेषच कारण झाले. एका विदर्भदेशीय बंधूनें आपल्या पत्रांत 'मेकॉलेचा नवीन अवतार' या सदराखालीं एके प्रसंगीं आह्मांस उद्देशून शांतिपाठ वाचायास आरंभ केला होता; पण तो एका लेखांतच आटपला. त्याचा उपक्रम व उपसंहार हे एकदांच झाले; मग काय झालें असेल तें असो ! तसेंच दुसरे एके प्रसंगीं एका पुण्यग्रामस्थ बंधूनें आमच्या कडक लेखणीवर टीका करून ग्रंथकर्तृत्वाचें परम तत्त्व आह्मांस असें सांगून दिलें होतें कीं, कोणास बिलकुल डंख न लावतां जें लिहिणें तें लिहावें. ही तऱ्हा शिकणें असल्यास 'स्पेक्टेटराचें' अध्ययन करावें व तिची थोरवी लक्षांत घेण्यास मेकॉलेचा ॲडिसन्‌वरील निबंध वाचावा !

आतां आमच्या प्रतिपक्ष्यांपैकीं बहुतेकांकडून वरच्यासारखे आक्षेप जे वरचेवर वाचण्यांत व ऐकण्यांत येतात त्यांवर उत्तर दर वर्षाच्या अखेरीस बहुधा आमच्याकडून देण्यांत आलेंच आहे. तेंच एकदां सरतेशेवटचें ह्मणून येथेंही दाखल करतों. आमच्या पूर्वजांच्या वचनांपैकीं एक वचन ख्रिस्ती मंडळीचें मोठें आवडतें झालें आहे. तें हें कीं, 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' ! तर हेंच वचन आमच्या साऱ्या प्रतिपक्ष्यांच्या अंगावर आह्मी टाकून देतों. त्यावरून त्यांनीं असें समजावें कीं, कोणत्याही विषयाचें वास्तव स्वरूप त्याची चांगली चर्चा झाल्याखेरीज कधींही प्रगट होत नाहीं; आमच्या कविश्रेष्ठानें ह्मटलें आहे:—

हेम्नः संलक्ष्यते ह्यग्नौ विशुद्धिः श्यामिकाऽपि वा । †

"अग्नीचे ठायीं सुवर्णाची परीक्षा होते,—कीं तें शुद्ध आहे कीं काळसर आहे." तर याच न्यायानें जें खरोखरच बावनकशी आहे त्या सोन्यास अत्यंत तीव्र अग्नीचाही जसा धाक बाळगायाला नको, त्याप्रमाणेंच जें खरें आहे त्यास कालत्रयींही कशाचें भय नाहीं ! युक्लिड्चे सिद्धांत आज दोन हजार वर्षांवर साऱ्या पृथ्वीभर नांदताहेत, पण इतक्या काळांत त्यांचें खंडन किंवा उपहास करणारा कोणी निर्माण झाला नाहीं. पण तीच टॉलेमीच्या ज्योतिषसिद्धांतांची दुर्दशा* पाहा ! आपल्या ग्रहमालेच्या अधिपतीचें तेज आज

---

† कविकुलगुरु कालिदासकृत रघुवंश, सर्ग पहिला, श्लोक दहावा, उत्तरार्ध. 'सम्पादक'

* पृथ्वी स्थिर आहे व तिजभोंवतीं आकाशस्थ तेजोगोल फिरतात असे सिद्धांत प्रचलित करणारा Claudius Ptolemæus, Ptolemy हा विख्यात ज्योतिर्विद अलेक्झांड्रिया येथें इ. स. १३० ते १६१ च्या दरम्यान होऊन गेला. 'सम्पादक'

अपरिमित वर्षे भुवनोदरांत फांकून राहिलें आहे,—त्यास वृद्धि नाहीं, क्षय नाहीं, अस्त नाहीं, ग्रहण नाहीं! पण तीच खद्योतविद्युदादि अल्पतेजांची किंबहुना चंद्रादिकांचीहि स्थिति पाहा! कोणी कसलाही वातरट असला, तरी वाघोबाच्या जबड्यापुढें उभें राहून विदूषकी प्रकार करण्याची कोणाची छाती होईल काय! पण तीच गर्दभाचार्यांची मूर्ति पुढें उभी असूं द्या; मग त्यांनीं प्रत्यक्ष सिंहाचें कातडें आपल्या उंच कानांवरूनही जरी अमर्द गुरगुरून घेतलें असलें, तरी त्यांच्या शब्दप्रमाणावरून त्यांच्या अंतर्गत रूपाची तेव्हांच मीमांसा करून कोणी पोरही आचार्य बोवांच्या पाठीवर खुणेची थाप मारील व बिनधोकपणें वर हस्त करील! तर खऱ्या महत्त्वाचें व खोट्याचें इतकें अंतर आहे. जें मूळचें खरें आहे तें मुहूर्तमात्र जरी कदाचित् लोपलें तरी कालांतरानें प्रगट होणारच; त्यास खंडनापासून अपाय नाहीं हें तर काय, पण खची केलेल्या झाडाप्रमाणें किंवा नांगरलेल्या जमिनीप्रमाणें वरील विपत्तीच त्याच्या अत्यंत उत्कर्षास कारण होते. मग हें जर खरें आहे, तर आमच्या प्रतिपक्ष्यांनीं वेड्यासारखी हाकाटी करावी हा केवढा चमत्कार आहे! या हाकाटीनें ते आपला दुर्बळपणा मात्र लोकांस जाहीर करतात असें होत नाहीं काय! आक्षेपावर यथार्थ उत्तर झटलें म्हणजे त्याचें खंडन होय; त्याबद्दल हाकाटी करणें किंवा कुरकूर करणें हें उत्तर नव्हे. खरा मर्द जसा कोणत्याही प्रसंगीं डगमगत नाहीं व घायांनीं विव्हळ होऊन आक्रोश करीत बसत नाहीं, त्याप्रमाणेंच आपला पक्ष खरा आहे अशी खात्री होऊन जो पुढें सरसावला तोही प्रतिपक्ष्यांच्या वाग्बाणांची क्षिति न बाळगतां उलट अधिकाधिक हर्ष व उत्साह मात्र पावतो!

आतां आमच्या आक्षेपकांचें दुसरें असें म्हणणें आहे कीं, अॅडिसन्नें कोणास बिलकुल डंख न लावतां लोकसुधारणा केली कीं नाहीं! हें म्हणणें आह्मांवर कितपत लागू पडेल याचा विचार केला असतां पुष्कळच आहे. मुळीं अगोदर अॅडिसन्ची उपमा आह्मी घेऊं इच्छीत नाहीं. आमच्या कित्येक देशबंधूंस आपल्या विशाळ बुद्धीची स्वतःची स्वतःला पक्की खात्री वाटून कोणी आपणास मिल्टन् म्हणवून घेतो, कोणी डिमॉस्थेनीसच्या, कोणी दुसऱ्याच्या पदवीला पोहोंचलेले आहेत; अशा प्रकारची मनोमय साक्ष आमचें मन आह्मांला कांहींच देत नाहीं. ज्या विख्यात ग्रंथकाराचें महत्त्व पोप, जॉन्सन्, मेकॉले अशांसारख्यांनीही भक्तिपुरःसर वर्णिलें आहे त्याची बरोबरी करूं जाणें यापरतें धाडस कोणतें! येवढेंच मात्र साम्य धरण्यास हरकत नाहीं, कीं स्वभाषेच्या अभ्युदयाची इच्छा मनांत धरून वरील ग्रंथकारानें तदर्थ जसा यत्न केला, तसाच आमचीही मनीषा असून आमचे यथाशक्ति प्रयत्न त्याच उद्देशानें सतत चालू आहेत. यापलीकडे कोणत्याही प्रकारचें सादृश्य आपणावर ओढून घेण्याचें धार्ष्ट्य आमच्यानें करवत नाहीं. दुसरी गोष्ट अशी कीं, अॅडिसन्च्या निबंधांचा अमुक अमुक प्रकार आहे म्हणून तोच मार्ग सर्वांनीं अनुसरला पाहिजे किंवा तो अनुसरणें सर्वांस शक्य आहे हें कसें म्हणवेल! ज्या त्या काळच्या स्थितिविशेषावर व त्यांतून ज्याच्या त्याच्या प्रकृतीवर कोणाच्याही लिहिण्याचें मान असतें. वरील ग्रंथकाराची प्रकृति जर जॉन्सन्च्या सारखी असती किंवा तो कालांतरीं निपजला असता, तर त्याच्या लेखणीचा मऊपणा

चालून तींत कडकपणा आला असता हें उघडच आहे. शिवाय ज्या काळीं इंग्लिश् लोकांनीं एका राजाचें* पारिपत्य करून दुसऱ्यास† देशांतून पळवून लावलें व आपलें स्वातंत्र्य पूर्णपणें स्थापून कोणत्याही तऱ्हेचा जुलूम आपणांवर होऊंच नये अशी तजवीज करून टाकली होती, ज्या काळीं त्यांचें आधिपत्य भूमीवर व समुद्रावरही स्थापित होऊन साऱ्या युरोपावर त्यांचा दरारा झाला होता, व हल्लीं जें त्या राष्ट्राचें वर्चस्व हरएक प्रकारें साऱ्या जगावर गाजत आहे त्यास जेव्हां सुरुवात झाली होती, तो काळ कोणीकडे; आणि सध्यां आमच्या देशाची जी स्थिति दृष्टीस पडते,—म्हणजे जी तुकतीच सुवर्णभूमि म्हणून साऱ्या जगभर गाजत होती तीच आतां दारिद्र्याचें वसतिस्थान होऊन दुर्भिक्षादि उत्पात तींत आपलें निरंतरचें बिऱ्हाड ठेवूं पाहत आहेत, जी सर्व प्रकारच्या वैभवानें मंडित भूमि होती तिचें आतां तें सारें वैभव नष्ट होऊन तिला आपल्या गत वैभवाची जणूं काय पूर्ण विस्मृतिच पडत चालली आहे व हल्लींचीच स्थिति आपली स्वाभाविक स्थिति असें तिला भासत आहे,—ही स्थिति कोणीकडे! बऱ्याच भरभराटीच्या काळांत अॅडिसन्नें आपल्या देशबंधूंच्या व विशेषतः देशभगिनींच्या मनोरंजनार्थ अनेक नाजुक विषयांवर आपलें नाजुक कलम चालवलें, व प्रसंगोपात्त विशेष महत्त्वाच्या विषयांवर लिहितांनाही आपली लेखणी कोणास न बोचे अशी तजवीज ठेवली. पण ती गोष्ट त्याची त्यास व त्या काळास शोभून गेली. इकडे तो प्रकार कसा चालेल? हल्लींच्या दुर्धर देशस्थितींत व आणीबाणीच्या प्रसंगीं शेंकडों अत्यंत महत्त्वाच्या विषयांवर अवश्य विचार कर्तव्य असतां, वरील ग्रंथकाराच्या पद्धतीस अनुसरून जर इकडील पत्रकार कांचोळीवर, चंद्रकळेवर, गालावरील हनवटीवरील गोंदण्यावर, तुऱ्याच्या टिकेवर वगैरे टीका करूं लागले व नवऱ्या बायकांचे प्रीतिकलह, पोषाकाच्या पेहेरावाच्या तऱ्हा इत्यादि विषयांवर विवेचन करूं लागले तर तें किती शोभेल बरें! वरील प्रकार म्हटला म्हणजे एका मराठी कादंबरींत एक वृद्ध राजा शत्रूंच्या पुढें पळत असतां आपल्या जिवलगेस आंब्यावर लटकणाऱ्या कैऱ्या दाखवून पानचट, अप्रयोजक व अप्रासंगिक शृंगार करीत आहे त्याप्रमाणें, किंवा आमच्या वीररसप्रधानकाव्यकारांचा नायक बहादर आपल्या 'गोड राणी'स बगलेंत मारून रानोमाळ पळत सुटला असतां तितक्या संघींतही तीस वनस्पतिशास्त्रावर एक व्याख्यान देत आहे त्याप्रमाणें, होणार आहे. तर जे आमचे आक्षेपक 'स्पेक्टेटर'च्या अध्ययनाची व अनुकरणाची आम्हांस सूचना देतात त्यांनीं वरील गोष्टीचें क्षणभर मनन करावें.

तिसरी गोष्ट मेकॉलेची तारीफ. मेकॉलेनें प्रकृत विषयाच्या संबंधानें अॅडिसन्ची प्रशंसा केली आहे हें खरें आहे, व ती यथार्थ होय हेंही खरें आहे. पण मेकॉलेच्या निबंधांचेंच जो कोणी एकादें पृष्ठ वाचील त्यास मुद्दां कळून येईल कीं, वरील साहेबांनीं आपल्या गुरूचाच किता केवळ वळवला आहे असें नाहीं. आपली लेखणी ते किती नम्रपणानें

---

* पहिला चार्लस्. १६००–१६४९ 'सम्पादक,

† दुसरा चार्लस्. १६३०–१६८५ 'सम्पादक'

चालवीत, व तिचें कूसही कोणास बोचूं नये, याविषयीं ते किती जपत असत, याविषयीं भरपूर प्रमाणें त्यांच्या निबंधांत, त्यांच्या इतिहासांत, व त्यांच्या भाषणांत लागतील तित आहेत. यांपैकीं बॉस्वेल्चेंच एक उदाहरण घेतलें, तर कडक लिहिण्याचा त्यांस किती त्र असे, व दुसऱ्याची टवाळी करणें हें त्यांस किती नको असे, याविषयीं कोणाचीही पु खात्री झाल्यावांचून राहणार नाहीं.[१] पण इतकी लांबची गोष्ट कशाला पाहिजे ? मेके बांच्या सभ्यपणाबद्दल व कनवाळूपणाबद्दल आमचा कोणीही बंगाली बंधु पूर्ण साक्ष देई 'वॉरन् हेस्टिंग्स्'च्या निबंधांत नंदकुमार यास पुढें करून बंगाली बाबूंवर वरील इंग्रेजी पं तानें कशी कोमळ पुष्पवृष्टि§ केली आहे, ती इकडेही सर्व इंग्रेजी जाणणारांस माहीत आहे

१. प्रस्तुत पुस्तकाचा ३७ अंक (पृष्ठें ७१५–७१८. 'सं०') पाहा.

§ मेकॉले साहेबांची बंगाली लोकांवरील उपरिनिर्दिष्ट सरबत्ती पुढीलप्रमाणें आहे:—

"......Of his (Nun[illegible]omar) moral character it is difficult to giv notion to those who are acquainted with human nature only as it appe in our island. What the Italian is to the Englishman, what the Hind is to the Italian, what the Bengalee is to other Hindoos, that was Nuncon to other Bengalees. The physical orgrnisation of the Bengalee is feel even to effeminacy. He lives in a constant vapour bath. His pursuits sendentary, his limbs delicate, his movements languid. During ma ages he has been trampled upon by men of bolder and more hardy bree Courage, independence, veracity are qualities to which his constituti and his situation are equally unfavourable. His mind bears a singu anology to his body. It is weak even to helplessness, for purposes manly resistance; but its suppleness and its tact move the children sterner climates to admiration not unmingled with contempt. All th arts which are the natural defence of the weak are more familiar to t subtle race than to the Ionian of the time of Juvenal, or to the Jew the dark ages. What the horns are to the buffalo, what the paw is to t tiger, what the sting is to the bee, what beauty, according to the Greek song, is to woman, deceit is to the Bengalee. Large promises, smoo excuses, elalorate tissues of circumstantial falsehood, chicanery, perju forgery, are the weapons, offensive and defensive, of the people of t lower Ganges. All those millions do not furnish one sepoy to the armies the company. But as usurers, as money-changers, ass harp legal practitione no class of human beings can bear a comparison with them. With all softness, the Bengalee is by no means placable in his enmities, or prone pity. The pertinacity with which he adheres to his purposes, yields on to the immediate pressure of fear. Nor does he lack a certain kind

पुढें चालू.

असो; तर स्वत: हातघाईच्या वेळेस आपला हात आटोपण्याचें सामर्थ्य ज्यास नसे, व फावेल त्या रीतीनें पाहिजे त्यावर प्रहार करायास जो चुकला नाहीं, त्यानें अॅडिसन्च्या कोमळ लेखणीचा महिमा कितीही गाइला तरी काय फळ आहे?

पण यावर आमच्या आक्षेपकांचें पुन: असें. ह्मणणें पडेल कीं, मेकॉले जरी स्वतः आपल्या उपदेशाप्रमाणें चालला नाहीं, तरी तो उपदेश स्वत: खोटा झाला काय? ही

---

courage which is often wanting in his masters. To inevitable evils he is sometimes found to oppose a passive fortitude, such as the the Stoics attributed to their ideal sage. An European warrior who rushes on a battery of cannon with a loud hurrah will shriek under the surgeon's knife, and fall into an agony of despair at the sentence of death. But the Bengalee who would see his country overrun, his house laid in ashes, his children murdered or dishonoured, without having the spirit to strike a blow, has yet been known to endure torture with the firmness of Mucius, and to mount the scaffold with the steady step and even pulse of Algernon Sydney."

याचा सारांश असा:—

बंगाली लोकांची शरीररचना स्त्रियांप्रमाणें नाजूक असून त्यांस शतकानुशतकें काटक लोकांनीं पादाक्रांत केलें आहे. धैर्य, स्वतंत्रता, व सच्चेपणा या गुणांस ते पारखे आहेत. नेभळट शरीराप्रमाणें त्यांचें मनाहि कमकुवत अतएव मर्दानी प्रतिकारास नालायक आहे. त्यांची बुद्धि इतकी लवचीक आणि युक्तिबाज असते कीं, तिजबद्दल तिरस्कारमिश्रित कां होईना पण आश्चर्यच वाटतें. अशक्त लोकांच्या आत्मसंरक्षणाच्या सर्व स्वाभाविक युक्त्यांत अयोनियन् किंवा ज्यू लोकांप्रमाणें किंबहुना अधिकच बंगाली लोकाहि प्रवीण आहेत. बैलाला जशीं शिंगें, वाघाला जसा पंजा, गांधिलमाशीला जशी नांगी अगर (एका जुन्या ग्रीक् गाण्यांत सांगितल्याप्रमाणें) स्त्रीला जसें सौंदर्य तद्वत् बंगाली लोकांस दगलबाजपणाचें हत्यार निसर्गानें दिलें आहे. भरमसाट वचनें, सफाईदार सबबी, युक्तिपूर्वक तयार केलेलीं असत्यजालें, डावपेंच, खोट्या शपथा देणें, खोट्या सह्या अगर खोटे लेख तयार करणें, हीं सर्व, बंगाली लोकांचीं तारक व मारक हत्यारें होत. बंगाली लोकांची संख्या लक्षावधि असूनहि कंपनीच्या सैन्यांत त्यांच्यांतून एकहि शिपाई दाखल झाला नाहीं. परंतु सावकार, वकील या नात्यांनीं कोणत्याहि राष्ट्राचा मनुष्य त्यांच्याशीं तुलनेला टिकणार नाहीं. शरीरानें इतके नाजूक असणारे बंगाली लोक अंत:करणानें क्षमाशील, दयाळु, शत्रुत्व लवकर विसरणारे व उदार असतील अशी कोणी कल्पना करील तर ती मात्र साफ चुकीची ठरेल. त्यांचा दुराग्रह भयाच्या दाबानेंच कमी झाला तर होतो. अपरिहार्य संकटें सोसण्याचें इंग्रजांत न आढळणारें एक विशिष्ट प्रकारचें धैर्यहि त्यांच्या ठिकाणीं भरपूर आहे. तोफांचे गोळे सुटत असतां धैर्यानें पुढें चाल करून जाणारा युरोपियन् योद्धा शस्त्रवैद्यानें शस्त्रक्रिया सुरू करतांच किंकाळ्या फोडतो अगर देहांतशिक्षेच्या वार्तेनें तो निराश व दु:खी होतो. पण युद्धपराङ्मुख बंगाली मनुष्य आपला देश परकीयांनीं पादाक्रांत केला, आपल्या घरादारावर गाढवाचे नांगर फिरले अगर त्याची जळून राखरांगोळी झाली, आपल्या मुलाबाळांचे खून पडले, आपल्या आयाबहिणींची, बायकामुलींची बेअब्रू झाली तरी प्रतिकार करण्याचें धैर्य नसल्यानें मुकाट्यानें बसतो, हालअपेष्टाहि म्यूसिअसच्या निधडेपणानें सोसतो आणि फांसावर लटकतांनाहि त्याची नाडी आल्जर्नॉन् सिडनेप्रमाणें शांत व निश्चल असते! 'सम्पादक'

कोटि वस्तुतः खरी आहे; कां कीं, मनुष्याच्या स्वाभाविक दौर्बल्यास्तव त्याचें आचरण स्वतःच्या उपदेशास नेहेमी अनुसरून असतेंच असें नाहीं. यास्तव उपदेष्ट्याचें प्रत्यक्ष आचरण कसें आहे हा विचार पुष्कळ वेळां निराळा ठेवून उपदेशाचीच स्वतंत्रपणें योग्यता कितपत आहे याचा विचार करून त्याचें ग्रहण करावें लागतें. पण असें करतांना विवक्षित उपदेश अगोदर कितपत यथार्थ आहे याचा निर्णय झाला पाहिजे. तो होऊन उपदेश सर्वथा ग्राह्य होय असें ठरलें असतां त्याचें अनुसरण उचित होय.

आतां दुसऱ्यांच्या मतांचें खंडन करणें हें वस्तुतः किती दूषणीय होय याचा जर विचार केला, तर हें कोणासही कळून येईल कीं, तें सामान्यतः पाहतां दूषणीय नाहीं येवढेंच नव्हे, तर सर्व प्रकारें उलटें हितावहच होय. ज्याप्रमाणें हवा किंवा पाणी हें कोंडून जागच्या जागीं राहिलें असतां तें दूषित होऊन अपायकारक होतें, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या मनाची स्थिति होय. हवा व पाणी यांस अटकाव नसून तीं मोकळीं खेळत राहिलीं असतां जशीं शुद्ध असतात, त्याप्रमाणेंच मनुष्याच्या बुद्धीसही निष्प्रतिबंधता असल्यानें तिची तीव्रता अबाधित राहते. हें महातत्त्व ओळखूनच इंग्लंडांतल्या व अमेरिकेंतल्या राज्यतंत्रधुरंधरांनीं बोलण्याची व लिहिण्याची स्वतंत्रता एकंदर लोकांस देऊन टाकलेली आहे; व असें केल्यानें कोणत्याही प्रकारचा अपाय आजपर्यंत झाला नाहीं येवढेंच नव्हे, तर वरील राज्यांस मुख्य बळकटी वरील स्वातंत्र्यानेंच आली आहे असें म्हटलें असतां चालेल.[१] आतां यावर कोणी कदाचित् अशी शंका काढतील कीं, अशी स्वातंत्र्याची दवंडी चोहोंकडे पिटल्यानें सारी बजबजपुरी माजणार नाहीं काय ? कोणास कोणी विचारीनासा होईल, व हवा तो हवें त्याविषयीं पाहिजे तसें लिहील. ही शंका निवळ अडाणीपणाची आहे. एक तर असें आहे कीं, विद्यामंदिरांत लहान व थोर ही लौकिक गणना मुळींच लागू पडत नाहीं. युक्लिड्नें एका राजास जसें उत्तर केलें, कीं भूमितींत प्रवेश होण्यास राजमार्ग नाहीं,[२] तशीच गोष्ट विद्यामंदिराच्या आंतल्या प्रदेशांतील होय. या पवित्र मंदिरास येण्यास राजांचा

---

१. वरील महत्त्वाच्या विषयावर मिल्लप्रभृति महान् महान् पंडितांनीं जगन्मान्य ग्रंथ करून ठेवले आहेत, तेव्हां त्याविषयीं येथें कांहीं विशेष लिहिणें नकोच. कदाचित् कोणाचा असा जर आक्षेप निघेल, कीं वरील स्वातंत्र्य हें परम न्याय्य आहे तर हिंदुस्थान सरकारानें तें आलीकडे काढून कां घेतलें ? तर यावर आमचें उत्तर हें आहे कीं चालू सालच्या ९ व्या * आक्टावरून प्रस्तुत विषयाच्या विरुद्ध कोणतेंही अनुमान बांधतां येत नाहीं. सदरील आक्टावरून येवढें मात्र सिद्ध होईल, कीं सुप्रीम कौन्सिलच्या मतें हल्लींच्या स्थितींत हें स्वातंत्र्य लोकांस हितावह होणार नाहीं. पण ज्याप्रमाणें तापकऱ्यास दुग्धादि पदार्थ अपथ्यत्वास्तव वर्ज्य असल्यावरून त्यांचे स्वभावसिद्ध धर्म नाहींसे होत नाहींत, त्याप्रमाणेंच आमच्या देशाच्या आधुनिक स्थितीवरूनही वरच्यासारखें अनुमान करणें अप्रयोजक होय !

* व्हर्नॅक्युलर् प्रेस् ॲक्ट्. पृष्ठ ५२९ *टीप पाहा. 'सम्पादक'

२. प्रख्यात भूमितिशास्त्रप्रवर्तक युक्लिड् यास एकदां कोणीं राजानें प्रश्न केला कीं, तुमच्या शास्त्राच्या उपपत्ति सुगम रीतीनें शिकण्याचा कांहीं मार्ग आहे कीं नाहीं ? या प्रसंगीं युक्लिड्नें वरील उत्तर दिलें.

एक मार्ग व रंकाचा एक मार्ग हा भेद जसा बिलकुल नाहीं, सर्वांस रस्ता एकच; त्याप्रमाणेंच मार्ग क्रमून आंत प्रवेश करतांच पूर्वीचे व्यावहारिक संबंधही सर्व गळून जातात. नव्या राज्यांत गेलें असतां तेथील कायदे जसे मानले पाहिजेत, त्याप्रमाणेंच विद्यादेवीच्या राज्यांत पाऊल ठेवल्याबरोबर पूर्वीचें तंत्र सारें विसरलें पाहिजे. तेथें रशियाचा बादशहा सारखा व अगदीं कंगाल मनुष्यही सारखा. तेव्हां ही स्थिति लक्षांत आणली असतां महाजनांच्या अपमानाबद्दची वरील शंका व्यर्थ होय हें उघड आहे. आतां बजबजपुरी माजण्याबद्दल जें म्हणणें आहे त्यांत कितपत अर्थ आहे याविषयींही थोडासा विचार केला असतां खात्री होणार आहे. बाजारांत क्रयविक्रयाची मोकळीक असल्यानें, म्हणजे ज्यास जो पाहिजे तो माल त्यास विकायास आणतां आल्यानें व ज्यास जो पाहिजे तो पटेल त्या किंमतीस घेतां आल्यानें, असा प्रकार आजपर्यंत कधीं घडण्यांत आला आहे काय कीं, हिरा गारेच्या किंमतीनें गेला व गार हिऱ्याच्या किंमतीनें गेली ? तर मग हीच गोष्ट ग्रंथांसही लागू पडणार आहे. बाजारांत ज्याप्रमाणें हजारों जिन्नस आले तरी तितक्यांचीही किंमत चोख रीतीनें होऊन जाते; त्याप्रमाणेंच लोकांतही सामान्यत: इतकी अभिरुचि नेहेमी आढळते, कीं कोणत्याही ग्रंथाची सरासरी परीक्षा तेव्हांच होते. त्यांतून विद्येचा प्रसार जसजसा सार्वलौकिक होत जाईल तसतसें वरील परीक्षण विशेष सुलभतेनें होत जाईल हें उघडच आहे. तेव्हां एकंदरींत पाहतां वरील स्वातंत्र्यापासून लोकांचें हितच आहे. जो चांगला ग्रंथ आहे त्यास खंडनाचें अगोदर भय नाहीं; त्यांतून खंडन करण्याचा कोणीं यत्न केलाच तर मोठ्या दाट धुक्यानेंही सूर्याचें तेज जसें लोपून जात नाहीं, तर लवकरच प्रखरतर प्रकाशानें तें विरून जाऊन सूर्य विशेष देदीप्यमान मात्र दिसतो, त्याप्रमाणेंच त्या ग्रंथासही प्रतिखंडनासरशीं अधिकाधिक शोभा मात्र येते, व पैलू पाडलेल्या हिऱ्याप्रमाणें त्याचें अंत:स्वरूप विशेष व्यक्त होतें. आतां दुसऱ्या पक्षीं ग्रंथ वाईट असला म्हणजे अयुक्तिक मतांचें त्यांत प्रतिपादन केलें असलें किंवा चित्तरंजनाचा प्रकार त्यांत बिलकुल नसला, तर असल्या ग्रंथाची योग्यताही प्रगट होण्यास फार उशीर लागतो असें नाहीं. त्यांतून यथाकथंचित् ग्रंथकाराच्या बड्या नांवानें किंवा तत्पक्षीय लोकांच्या जयजयकारानें वगैरे एकाद्या ग्रंथाची योग्यता वाढली, किंवा मुळींच नसून ती अज्ञान किंवा भोळ्या लोकांस भासूं लागली, तरी कालेंकरून त्याचें वास्तव स्वरूप लोकांच्या दृष्टीसमोर येईलच येईल. तेव्हां दोहींकडून वरील स्वातंत्र्यापासून नफाच आहे. इंग्लंडांतल्या ओक झाडाविषयीं जसें सांगतात कीं, त्यास उलथून टाकण्याविषयीं वाऱ्याचा जितका जितका अधिक प्रयत्न तितकीं तितकीं त्याचीं मुळें मात्र भुईंत खोल खोल जातात, तशीच गोष्ट सत्य सिद्धांताची होय. त्यांचें तेज सूर्यतेजाप्रमाणें नित्य होय, यास्तव तें मालिन होण्याची शंकाही नको. पण असत्य सिद्धांत हे खोट्या मोत्यांप्रमाणें होत. अमार्मिकांस त्यांचें पाणी दुरून मोठें शानदार दिसेल, वेळेनुसार 'नेपालेश्वरभालस्थमाचिखला'च्या न्यायानें त्यांस मूढ जनांच्या दृष्टीनें मोठें गौरवही प्राप्त होईल; पण त्यांस कोणाचा अंमळ धक्का लागला कीं पुरे, त्यांचें तेज मावळलें ! तर असलीं मोतीं जर मोतीचौकांत येऊन खऱ्या मोत्यांच्या बरोबरीनें विकूं लागलीं, तर त्यांचें भंजन करणारा कोणी निघाल्यास त्यांत लोकांचें हित आहे कीं अहित आहे ?

वरील विवेचनावरून वाचकांस सहज ध्यानांत येईल कीं, दुसऱ्याच्या लेखावर टीका करणें हें सभ्यपणास व सुजनतेस उचित नव्हे, व वरील मोकळीक सर्वांस दिल्यानें मोठा हाहाकार उडून जाणार आहे, या दोन्ही केवळ कोत्या समजुती होत. सदरील मोकळिके-पासून कोणत्याही तऱ्हेनें अनिष्ट होण्याचा संभव नसून उलटें तिजपासून लोकांचें अतिशयित हित आहे. तर मेकॉलेच्या वरील उपदेशाचा असा अर्थ जर कोणी समजत असतील तर तो अगदीं चुकीचा आहे असें त्यांनीं समजावें. त्याचा मुख्य ग्राह्य अंश वस्तुत: येवढाच आहे कीं, वादामध्यें एकमेकांच्या उखाळ्या पाखाळ्या काढणें, अप्रस्तुत विषयाचा उपन्यास करून कोणाच्या गृहच्छिद्राचा ग्राम्य शब्दांनीं उल्लेख करणें, रस्त्यांतल्या भांडणाप्रमाणें केवळ मोठ्यानें ओरडून आपला जय झालासा मानणें, इत्यादि प्रकार सभ्यत्वास व सुज्ञत्वास विरुद्ध होत. हे मात्र सर्वमान्य लोकांच्या वादविवादांत दृष्टीस पडत नाहींत. एरवीं प्रतिपक्ष्याच्या सिद्धांतांचें यथेच्छ खंडन करणें प्रसंगवशात् उपहासाचाही प्रयोग करणें, वगैरे प्रकार किती युक्त आहेत हें मोठमोठ्या सर्वमान्य ग्रंथकारांच्या पद्धतीवरून पाहिजे त्याला स्पष्ट दिसणार आहे.

तर वरच्यासारखे आक्षेप काढून जे आह्मांस सभ्यपणाचा व कनवाळूपणाचा उपदेश करतात त्यांस पुन: सरतेशेवटीं आह्मी आपला अभिप्राय एकंदरीनें कळवतों कीं सर्व मनुष्यांस आपापलें मत लोकांस स्पष्टपणें कळवण्याचा पूर्ण अधिकार आहे, व या अधिकारांतच आपल्या प्रतिपक्ष्यावर कोटिक्रम करण्याची मोकळीकही येते. हा कोटिक्रम शुद्ध न्यायपद्धती-प्रमाणें 'पर्वतो वह्निमान्'—'धूमत्वात्' असा केवळ प्रतिज्ञाहेतुघटितच असावा, त्यांत विनो-दादिकांचें मिश्रण झालें असतां तो तेव्हांच दूषित होतो, किंवा तीव्रतेनें त्याचा वेग मंद होतो, हें आह्मांस अद्याप कोठेंही आढळण्यांत आलें नाहीं. उलटा प्रकार मात्र असा पुष्कळ ठिकाणीं आढळला आहे कीं, मोठे वावदूक ह्मणून ज्यांची जगभर ख्याति आहे व वादप्रवीण होऊं पाहणारे ज्यांच्या ग्रंथांचें अध्ययन करतात, ते विनोदकलेंत पूर्ण असून वाद खेळ-ण्याचीं शस्त्रास्त्रेंही ते आपणांपाशीं नेहेमी लखलखीत ठेवीत असत. उघडच आहे कीं, सम-रांगणांत गांठ पडली असतां कोणत्याही सैन्याकडून दुसऱ्याविषयीं असें गाऱ्हाणें केलेलें कधीं ऐकण्यांत येतें काय, कीं हें काय बोवा, तुह्मी आमच्यावर केवढ्यानें घाव करतां ! असली प्राणघेणी लढाई कोठें बोलली आहे काय ? तिची खरी पद्धत ह्मटली ह्मणजे अशी कीं तींत दोन्ही पक्षांकडील एकही शिपाई जाया होऊं नये ! तसेंच शिध्या रीतीनें झुंझा-याचें टाकून ही कवाईत व हे कपटप्रयोग तुह्मी करतां, छापे घालतां, हें तरी तुमच्या माणुसकीला शोभतें काय ? वरच्यासारखें धर्मव्याख्यान कांहीं काळापूर्वी तुर्कांनीं रशियनांस किंवा रशियनांनीं तुर्कांस दिलें असतें तर जितकें अप्रयोजक झालें असतें, तितकेंच आमच्या प्रतिपक्ष्यांचे वरील उपदेशपर आक्षेपही होत. तर हें नीट ध्यानांत धरून आमच्या प्रति-पाक्षवर्गानें त्याप्रमाणें आपली वागणूक ठेवावी. आमच्या लेखणीपासून त्यांस उपद्रव पोचूं नये अशी जर त्यांची इच्छा असेल, तर आपल्या लेखण्या अगोदर पुसून साफ करून त्यांनीं दप्तरांत अडकवून टाकाव्या व जिव्हेचें संयमन करण्यासही अंमळ शिकावें. आजपर्यंत जसा भोळसरपणाचा व भाविकपणाचा काळ होता तसा यापुढें राहणें असंभाव्य होय. किताब-

वाल्यांनीं व मोठमोठ्या हुद्देदारांनीं कांहींही कोटिक्रम लढवला तरी ती आजपर्यंत झेलला जात असे. लोकांस वाटे कीं, इंग्रेजी विद्या पढून जे मोठमोठ्या अधिकारांवर अधिरूढ झाले, त्यांचीं मतें अर्थातच अत्यंत समंजसपणाचीं असलीं पाहिजेत, त्यांत चुकीचा म्हणून लेशही मिळायाचा नाहीं. त्याप्रमाणेंच जे आमच्या राज्यकर्त्यांचे शिष्य बनले त्यांच्या अंगीं त्यांच्या गुरूंचे सर्व गुणही सहजच उतरले असतील; म्हणजे ज्या बहाद्दरांनीं इंग्रेजी पाटलून, इंग्रेजी बूट, इंग्रेजी वासकूट, इंग्रेजी गळपट्टी वगैरे सुधारणेची सामुग्री आपलीशी करून टाकली, त्यांच्याच अंगीं आंतली सामुग्री जी इंग्रेजी व्यासंग, इंग्रेजी देशाभिमान, इंग्रेजी प्रामाणिकपणा, इंग्रेजी साहस वगैरे गुण तेही असतील; असाही लोकांचा समज असे. पण आलीकडच्या दहावीस वर्षांत झालेल्या उलाढालींवरून वरील भ्रम बरेच उडून गेले आहेत. त्यांवरून आलीकडे सर्वांस स्पष्ट दिसून आलें आहे कीं, समंजसत्वाचा व व्यासंगादि गुणांचा युनिव्हर्सिटीच्या पदव्यांशीं किंवा रावसाहेब, रावबहादुर या किताबांशीं नित्यसंबंध आहे असें नाहीं. सामान्यतः पाहतां वरील गुणांचा मनुष्याच्या उंचीशीं किंवा बळकटपणाशीं जितपत संबंध तितपतच बी. ए., एम्. ए., किंवा रा० सा०, रा० ब०, या अक्षरांशीं आहे. तर या स्थित्यंतराच्या मानानें आलीकडे लोकांच्या मनांत जी चलबिचल झाली आहे ती आमच्या प्रतिपक्षिवर्गानें लक्षांत आणावी. आजपर्यंत जीं मतें त्यांच्या बुद्धीनें सत्य व समंजस म्हणून गृहीत केलीं होतीं हीं आतां पुष्कळ लोकांस अन्यथा भासूं लागलीं आहेत. हें फळ आलीकडे झालेला अधिक विद्याप्रसार व विशेष अनुभव यांचें होय. हीं उत्तरोत्तर जसजशीं वाढत जातात तसतसें लोकांत मतांतर होत जातें हा लोकस्थितीचा नियमच होय. तेव्हां यास विरोध करूं जाणें म्हणजे इंग्लंड्चा एक राजा* समुद्राच्या कांठावर बसून भरतीच्या लाटांवर आपलें क्षुद्र प्रभुत्व चालवूं पाहत होता त्यासारखें अत्यंत असमंजस होय; सदहू राजश्रींनीं समुद्र ऐकत नाहींसें पाहून आपलें राजासन जसें मुकाट्यानें मागें घेतलें तसाच प्रकार आजपर्यंत सुखानें प्रभुत्व भोगलेल्या धुरंधरांनींही समयविशेषीं करणें अवश्य होय. आजपर्यंत आपली कारकीर्द जशी गाजत होती तशी आतांही कां गाजूं नये असें त्यांच्या मनांत येत असेल; व ज्या बंडवाल्यांनीं त्यांचा अंमल उठवण्याचा प्रयत्न चालवला आहे त्यांच्यावर त्यांचा मोठा रागही होत असेल; पण नुसत्या रागानें व खेदानें काय होणार? जें पूर्वापार चालत आलें तेंच पुढें चालवायाचें व स्वतःच्या विचारशक्तीचा म्हणून कधीं उपयोग करायाचा नाहीं, हेंच जर आमच्या देशाची उन्नति न होतां ती निकृष्ट दशेस येऊन पोंचण्याचें जबरदस्त कारण होय, तर दहावीस वर्षांमागच्या लोकांचींच मतें तेवढीं अनन्यभावेंकरून शिरसावंद्य मानावीं हें कोठलें! पाण्याचा एकदां बांधारा फोडला म्हणजे अमुकच ठिकाणापर्यंत त्यानें जाऊन थांबावें असा त्यास हुकूम करतां येईल काय? त्याच्या स्वभावसिद्ध नियमास अनुसरून तें जिकडे वाहील तिकडे वाहील! आणि असेंच तें निष्प्रतिबंधतेनें वाहिलें तरच अनादिसिद्ध जो सत्यरूप समुद्र त्याशीं सरतेशेवटीं त्याचा

---

* कॅन्यूट दि ग्रेट् (Conute the Great) इ. स. ९९५–१०३५. 'सम्पादक'

संगम होण्याचा संभव ! सारांश, आमच्या प्रतिपक्ष्यांस जर लोककल्याणाची खरी अपेक्षा असेल व सत्यमय ज्ञानाचा प्रसार व्हावा हेंही त्यांच्या मनांत वागत असेल, तर आत्मप्रतिष्ठा व आढ्यता हीं त्यांनीं अगोदर मुळीं सोडून दिलीं पाहिजेत. इसापनीतींतील सरड्याची गोष्ट नेहेमी ध्यानांत वागवून त्यांनीं असें समजलें पाहिजे कीं, आपल्या मतांविषयीं आपल्याला जसा अभिमान वाटत असतो व त्यांच्या सत्यत्वाविषयीं खात्री होऊन चुकलेली असते; तशीच दुसऱ्याचीही पण असते. यास्तव आमचें मत तेवढें खरें माना हा दुसऱ्यास आग्रह करणें हें मूर्खपण होय. मतांच्या सत्यासत्यत्वाची परीक्षा करण्याचा जो विवेचनरूप कस ईश्वरकृपेनें मनुष्यमात्रास अनुकूळ आहे तो वादसमयीं दोहों पक्षांनीं आणून मधें ठेवला पाहिजे, व त्याचा यथार्थ उपयोग करून जो निर्णय होईल तो प्रांजलपणें स्वीकारला पाहिजे. जें खरें उंची सोनें आहे त्यावर उक्त प्रयोग कितीही तीव्र केला तरी त्यास भय नाहीं येवढेंच नव्हे, तर तितका त्याचा उत्कर्ष मात्र होणार हें उघडच आहे !

याप्रमाणें आमच्या पुस्तकावर कडकपणाच्या संबंधानें जो कित्येकांचा आक्षेप सामान्यतः आढळतो, त्यावर आम्हीं आपला अभिप्राय एकवार सविस्तर देऊन आतां गेल्या वर्षांत झालेल्या चर्चेवर आमचे विचार दाखल करतों.

**ज्ञानोदय**—या आमच्या वयोवृद्ध बंधूची व आमची गांठ पडल्यास आज बराच काळ लोटून गेला. आमच्या पहिल्या मुलाखतीची आठवण आमच्या वाचकांपैकीं बहुतेकांस असेलच. प्रस्तुत पुस्तकाच्या आठव्या अंकांत आमची पारलौकिक चिंता वाहणारे व आमच्या कल्याणार्थ हजारों कोसांवरून येथें येऊन शुभवर्तमानाच्या प्रसारार्थ हजारों रुपये दरमहा खर्चणारे जे ख्रिस्ताचे प्रेषित त्यांच्याविषयीं व त्यांच्या एकंदर उद्योगाविषयीं आमचे विचार जेव्हां प्रथमच प्रगट झाले, तेव्हां त्यांच्या एकदम लक्षांत येऊन चुकलें का, वीस वर्षांपूर्वीं जी 'लहरी'† आपण मोठ्या प्रयत्नानें आटवून टाकली होती तीच पुनः दुसऱ्या रूपानें प्रगट होऊन आपल्या उद्योगास पूर्ववत् व्याघात होत जाणार. ही धास्ती वरील मंडळीस पहिल्यानें पडली खरी; पण तीस ही उमेद वाटली असावी कीं, या ल्हानग्या पुस्तकास चिरडून टाकण्यास किती उशीर ? हें फार तर लोकाश्रयाच्या जोरावर आपणाशीं भांडणार, पण असल्या दुर्बळ आश्रयावर टेकलेल्या कितीकांचा आपण आजपर्यंत समाचार घेतला आहे ! आपणांवर येवढी 'विचारलहरी' उठली होती; पण आम्हीं मनावर घेतांच तिच्या उगमाशीं बांधारा घालून टाकून तिचा प्रवाह तेव्हांच बंद करून टाकला, व तिचे तरंग जागच्या जागीं मुरून जात अशी तजवीज केली. 'लहरी' आटून गेल्यावर फार दिवसांनीं 'दंभहारक'* जन्मास आलें व आपला शिवरा स्वभाव प्रभूच्या सेवकांवर प्रगट करूं लागलें पण त्याचीही खोड जिरून शेवटीं र र करतां तेंही आमच्या प्रतापानें खपून गेलें. तर त्यांतलेंच हें तिसरें ! हें तरी आपल्यासमोर किती दिवस टिकणार ? याप्रमाणें विचार करून आमच्या वृद्ध बंधूनें आपलें व आपल्या शिष्यवर्गाचें आश्वासन केलें असावें. पण

† विचारलहरी मासिक, प्रारंभ शके १७७४. 'सम्पादक'

* दंभहारक (डिसेंबर् १८७१ ते एप्रिल् १८७४.) संपादक, रामचंद्र सदाशिव, मुंबई. 'सम्पादक'

गेल्या तीन वर्षांत वरील संकल्पाप्रमाणें कांहींच घडून आलें नाहीं. मधून मधून अनेक वेळां आमच्या वयोवृद्ध व ज्ञानवृद्ध बंधूस आह्मीं बऱ्याच इशारतीही दिल्या; पण कांहीं नाहीं! आपल्या थोर वयास शोभणारी जी गंभीर वृत्ति त्यानें एकदां धारण केली ती तो कांहीं केल्या सोडीना! शेवटीं आमच्या अत्याग्रहास मान देऊन त्यानें गेल्या जुलई व आगस्ट महिन्यांत पुन: आमची भेट घेतली.

या भेटीच्या समयीं आमच्या बंधूस प्रथमदर्शनींच दिसून आलें कीं, मधें जरी इतका काळ निघून गेला तरी आमच्या स्वरूपांत बालाग्रही अंतर पडलें नाहीं. या गोष्टीचें आमच्या वडील बंधूस आश्चर्य वाटत असेल व कदाचित् खेदही होत असेल; पण आह्मांस तर तिचा केवळ अभिमानच वाटतो. आरंभीं जी प्रतिज्ञा केली तिचेंच अनुसरण करीत असून आह्मी अद्याप मार्गभ्रष्ट झालों नाहीं. याविषयींची आमच्या बंधूची साक्ष आह्मांस आनंद देते. आतां आह्मांस मुळींच फरक न झालेला जसा त्याच्या लक्षांत आला तसें त्याच्या संबंधानें मात्र आह्मांस वाटत नाहीं. आमच्याविषयीं सदरील पत्रकर्त्याची आरंभीं जी समजूत होती ती कालेंकरून बरीच पालटली आहे असें दिसतें. तीन वर्षांपूर्वीच्या त्याच्या लेखांत जी वृत्ति स्पष्ट दिसते तिजपेक्षां सध्यांच्यांत ती फार निराळी दृष्टीस पडते. पहिल्या लेखांत जसें औद्धत्य व उत्संखळपण भरपूर होतें तसें या दुसऱ्यांत नसून सभ्यपणाची रीत या दुसऱ्या खेपेस आमच्या वृद्ध बंधूनें बरीच प्रगट केली आहे. याप्रमाणेंच उत्तरोत्तर आमच्या ख्रिस्ती बंधूंची वृत्ति सुधरत जाऊन इतर धर्मांच्या लोकांविषयीं सभ्यपणानें लिहिण्याची जर त्यांस अवश्यकता दिसूं लागेल, तर आमच्या असद्धर्मी पुस्तकाचीही सद्धर्मी लोकांवर कांहीं छाप पडूं लागली असें आह्मांस अभिमानपूर्वक व संतोषपूर्वक ह्मणतां येईल.

आतां आमच्या बंधूच्या आक्षेपांविषयीं विचार करूं. या आक्षेपांस कारण प्रस्तुत पुस्तकाचा चाळिसावा अंक होय. जॉन्सनूच्या चरित्राच्या पहिल्या पांच अंकांत त्याचें चरित्र खुद्द संपवून वरील अंकांत त्याच्या चरित्रापासून एतद्देशीयांनीं घेण्यासारखा बोध कोणता तो सविस्तर सांगितला आहे. या बोधाचें शेवटलें कलम धर्म हें होय. या कलमावर लिहितांना ख्रिस्ती व हिंदु धर्मांविषयीं जे कांहीं उल्लेख केलेले आहेत ते अर्थातच आमच्या बंधूस असंमत होऊन आमचें ख्रिस्ती धर्माविषयीं अज्ञान व येथील धर्मांविषयीं वृथाभिमान हीं दर्शविण्याचा त्यानें यत्न केला आहे. या मुख्य विवेचनाबरोबर कांहीं अवांतर गोष्टींविषयींही त्यानें चर्चा केली आहे.

आमच्या प्रतिपक्ष्याचे आक्षेप एकंदरींत पाहतां पुष्कळच आहेत. त्या सर्वांविषयीं विचार करण्यास येथें जागा नाहीं व त्याची तादृश अवश्यकताही नाहीं. यास्तव मुख्य मुख्य जे आहेत त्यांचा मात्र निर्देश करून त्यांवर आमचे अभिप्राय वाचकांस कळवतों.

'ज्ञानोदय' बोवांचा पहिला मोठा आक्षेप आमच्या भाषेच्या संबंधानें आहे. आह्मीं दुसऱ्यांस अपशब्दांबद्दल व अप्रयोगांबद्दल नांवें ठेवीत असून स्वत: हवी तशी भाषा दपटतों,

व 'महाराष्ट्रभाषेचे शंकराचार्य' होऊं पाहत आहों, असा आह्मांवर आरोप करून त्याच्या सिद्धयर्थ आमच्या बंधूनें कांहीं उदाहरणें दिलीं आहेत. आतां यावर आमचें ह्मणणें एक तर हें आहे कीं, शब्दांची व प्रयोगांची शुद्धाशुद्धता जी ठरवायाची ती 'ज्ञानोदय' बोवांच्या मर्जीवरून कीं, कोशकारांच्या वगैरे आधारांवरून?[1] दुसरें असें कीं आमच्या ख्रिस्ती बंधूस केवळ स्वमन:कल्पित दूषणें दुसऱ्यावर ठेवून द्यावयाची एकंदरींत भारी हौस! 'वादे वादे जायते तत्त्वबोधः' या वचनाचा येवढा महिमा गात असतां त्यांची तत्त्वविचारांविषयीं येवढी आस्था दृष्टीस पडते कीं, आमच्यासारख्या पुस्तकाचा अंक त्यांस जेव्हां कोणीं नेऊन दाखवावा तेव्हां ते तो वाचतात; एरवीं त्यांची पवित्र दृष्टि सैतानप्रेरित मजकुराकडे कोठून जावयाला? ती जर मेहेरबानीनें कधींमधीं आमच्या गरीब पुस्तकाकडे वळती, तर त्यांस तेव्हांच दिसून आलें असतें कीं, आमची पद्धत त्यांस वाटते तिजहून फार निराळी आहे. आमचा कोणावरही कोणत्या प्रकारचा जोरा नाहीं, व भाषेच्या किंवा विचारांच्या संबंधानें ख्रिस्ताचे प्रतिनिधि पोपमहाराज यांजप्रमाणें आह्मीं अद्याप शिक्का मोर्तबही कधीं अमलांत आणलें नाहीं. वरील दोहों संबंधांनीं हव्या त्यावर टीका करण्याचा अधिकार आह्मी स्वतः जसा चालवतों त्याप्रमाणेंच इतरांनींही तो आमच्यावर चालवला असतां आह्मी संतापत नाहीं येवढेंच नव्हे, तर दोषाविष्करणार्थ आक्षेपकांची वारंवार प्रार्थना करून खुद्द आमच्या पत्रांतही प्रतिपक्ष्यांच्या आक्षेपांस स्थळ मिळत गेलें आहे. तर वरच्यासारखे निराधार उल्लेख करण्यापूर्वी आमचे बंधु आपल्या प्रतिपक्ष्यांचें स्वरूप अगोदर नीट लक्षांत आणण्याचा जर प्रयत्न करतील तर बरें, अशी आह्मी त्यांस एक सामान्यतः सूचना करून ठेवतों. तिसरी गोष्ट अशी कीं, मराठी भाषेविषयीं नाक मुरडणें व तिची चवढव सांगणें या भानगडींत आमच्या ख्रिस्ती बंधूंनीं फारकरून पडूंच नये. ख्रिस्ती शास्त्रांतील प्रमेयांविषयीं त्यांनीं पांडित्य केलें, किंवा एखाद्या सर्वसाधारण विषयावर चर्चा केली, तर ती त्यांस शोभणार आहे; पण महाराष्ट्रभाषेचे प्रयोग ठरवण्याच्या ओंड पाण्यांत त्यांनीं शिरणें ह्मणजे पुष्कळ अंशीं 'हितोपदेशां'तील 'अव्यापारेषु व्यापार' करूं जाणाऱ्या वानरासारखीच अवस्था होय. पूर्वीचे भोळे दिवस आतां राहिले नाहींत; विद्याप्रसारजन्य जें यथार्थ ज्ञान त्याच्या योगानें

१. उदाहरणार्थ 'आजला' हा शब्द घ्या. आमच्या बंधूंच्या मतें हा आमच्या शंकराचार्यी शिक्याच्या शब्दांपैकीं होय असें दिसतें. पण मोलस्वर्थूचा कोश उलटला असतां त्यांत पुढील व्याख्यान सांपडेल:—"आजला—By to-day Ex. "मी मुंज झाल्यापासून पढतों तर आजला पंडित झालों असतों'."

शास्त्री मंडळीनें सन् १८२९ सालीं जो 'महाराष्ट्रभाषेचा कोश' प्रसिद्ध केला त्यांतही वरील प्रयोग व वरीलच उदाहरण दिलेलें आहे. तेव्हां आतां प्रामाण्य कोणाचें मानावें? एकीकडे पाहावें तर आमच्या पुण्यग्रामस्थ जुन्या शास्त्रिसमूहाची व त्यांच्या बरोबर मोलस्वर्थ साहेबांची मूर्खांत गणना करावी लागणार, किंवा दुसऱ्या पक्षीं आमचे ज्ञाननिधि परम पूज्य बंधू, ज्यांनीं आज चाळीस वर्षे महाराष्ट्रभाषेचीं सूत्रें हातांत बाळगलीं, त्यांची ज्ञानदृष्टि अद्याप ज्यांच्यापर्यंत पोंचली नाहीं असे कांहीं चुकार शब्द कोठें कोठें कोनाकोंपऱ्यांत दडून बसलेले आहेत असें तरी मानलें पाहिजे! तर या दोहोंमध्यें वाचकांस काय वाटेल तो त्यांनीं निर्णय करावा!

इतर शेंकडों गोष्टींच्या संबंधाचे भ्रम आजला जसे उडून गेले आहेत, त्याप्रमाणेंच पाद्री साहेबांस किंवा त्यांच्या छात्रशाखेस एतद्देशीय भाषांचें ज्ञान कितपत असतें हेंही सर्वांस केव्हांच पक्कें समजून गेलें आहे. तर जोंपर्यंत पुणें, सातारा वगैरे जुन्या मराठी शहरांचा महाराष्ट्रांत मागमूस राहील, व विद्यादेवी ब्राह्मणांवर रुष्ट होऊन तांबट, कासार, माळी वगैरेंच्या बरोबर पाणी भरूं लागली असें होणार नाहीं, तोंवर शरणपुरीच्या पंडितांनीं किंवा सोलापूर बाजारांतील महाराष्ट्रभाषाभिज्ञांनीं 'अळी मिळी गूप चिळी'चेंच व्रत पतकरावें हें आह्मांस बरें दिसतें! 'ज्ञानोदया'ची लेखणी आज सुमारें चाळीस वर्षें जरी चालली आहे, व ख्रिस्ताच्या एतद्देशीय भक्तमंडळापैकीं कोणाच्या हातून कोशरचनेचीं वगैरे कामें जरी पार पडलीं असलीं, तरी महाराष्ट्रभाषेचे प्रयोग शुद्ध कानीं पडण्याचा संभव वरील शहरांच्या रस्त्यांतही जितका आहे तितका आमच्या ख्रिस्ती मंडळींच्या मोठमोठ्या सभांतही नाहीं. ही गोष्ट वस्तुतः पाहतां अगदीं उघड आहे, व आमच्या जरठ बंधूस आमच्यासारख्या पूर्ववयस्कानें ती सांगावी असें नाहीं. पण काय करावें? आमच्या बंधूच्या दिव्य दृष्टीस सामान्य जनास स्पष्ट दिसणाऱ्या गोष्टीही अनेक वेळां बिलकुल दिसत नाहींत. तेव्हां वडीलपणाचें नातें अशा प्रसंगीं अंमळ एकीकडे ठेवून द्यावें लागतें![१]

याप्रमाणें आमच्या पुस्तकाच्या बाह्यांगाविषयीं ह्मणजे त्याच्या भाषासरणीविषयीं स्वतःच्या तर्फेनें जें लिहिणें योग्य वाटलें तें लिहिलें. 'ज्ञानोदया'च्या टीकेपैकीं भाषेच्या संबंधाचा

---

१ आमच्या वडील बंधूंचा आमच्या भाषेवर मोठाच कटाक्ष आहे असें दिसतें. नुकत्या ७ फेब्रुवारीच्या अंकांत पुढील मजकूर आढळतोः—

"निबंधमाला—या मासिकपुस्तकाविषयीं एक विद्वान् संस्कृतज्ञ एतद्देशीय गृहस्थ असें लिहितात कीं, निबंधमालेची भाषा कांहीं मासलेवाईक नाहीं. तिच्या भाषेची कोणी निःपक्षपातानें परीक्षा करूं लागल्यास तींत शोभिवंत व देखणाऊ शब्दांचा थाट मात्र दिसून येतो. पण त्या शब्दांत चांगला व विचारशील अर्थ कधीं नसतो. अशा भाषेच्या शैलीपासून दूर राहणें बरें"—ह्म० अशी भाषा लिहावयास कोणीं शिकूं नये."

हे विद्वान् संस्कृतज्ञ कोण असतील ते असोत! त्याप्रमाणेंच संस्कृतज्ञत्वाबद्दल सर्टिफिकिट देण्याचा अधिकार आमच्या ख्रिस्ती बंधूंनीं केव्हां घेतला, व 'विचारशील अर्था'चे मोक्ते आणि 'भाषेच्या शैलीपासून दूर राहणारे' वरील टीकाकार यांस मराठी भाषेचे चोखे कोणीं नेमले, हेंही आह्मांस कळत नाहीं! एकंदरींत वरील प्रकार पाहून 'परस्परं प्रशंसन्ति अहो रूपमहो ध्वनिः' या सुभाषिताची आह्मांस आठवण होते! वरील वचनाचा अर्थ* आमच्या गीर्वाण पंडितांस व त्यांच्या शिफारसकर्त्यांस (ज्ञानोदयकर्त्यांस. 'सं०') तर सांगायाला नकोच, पण आमच्या वाचकांपैकीं कोणास त्याविषयीं जिज्ञासा झाल्यास त्यांनीं अंक ४१ पाहावा.

* सदर सुभाषित व त्याचा अर्थ पुढीलप्रमाणें आहेः—

उष्ट्राणां च गृहे लग्नं खरा मङ्गलपाठकाः।
परस्परं प्रशंसन्ति अहो रूपमहो ध्वनिः॥

"उंटांच्या घरीं लग्न उभें राहिलें असतां मंगलाष्टक ह्मणण्यास गर्दभाचार्यांची योजना झाली; मग जांवईबोवा व उपाध्येबोवा एकमेकांची प्रशंसा करतात—काय हो हें मनोहर रूप? कंठ तरी पण किती गोड हा!"

'सम्पादक'

हा एक आरंभींचा लहानसा मुद्दा आहे. पुढें जे पुष्कळ आक्षेप आमच्या बंधूंनीं काढले आहेत तें त्यांच्या धर्मांच्या संबंधाचे आहेत. ह्मणजे जॉनूसनूचीं धर्मविषयक जीं मतें होतीं त्यांच्या संबंधानें आह्मीं आपले अभिप्राय जे प्रगट केले होते त्यांचें खंडन करून क्रिस्ती धर्मावरचे आमचे आक्षेप उडवण्याचा त्यांनीं यत्न केला आहे. या सर्व टीकेवर आह्मीं आपले विचार संपूर्ण दाखल केले होते, व सर्व मुद्द्यांवर आमच्या बंधूंच्या इच्छेनुरूप चांगला तपशीलवार मजकूर लिहिला होता. आमच्या बंधूंस अवघ्या पवित्र शास्त्रांत खोटा भूगोल, खोटें पदार्थ-ज्ञान, अप्रयोजक व बीभत्स कथा वगैरे प्रकार कोठेंच आढळले नाहींत; यास्तव प्रत्यक्ष प्रमाणानें ते दाखवण्याविषयीं आमच्या बंधूंनीं आह्मांस सूचना केली होती. तीस अनुसरून आह्मीं मराठी पवित्र शास्त्रांतून अध्यायवार, ओंवीवार उतारे उतरून घेतले होते. पण इतकें होऊन ऐन वेळेस तें सर्व व्यर्थ झालें. चालू सालचा नववा आक्ट* एकाएकीं आदळल्यानें सर्व हिंदुस्थान हदरून गेलें, हजारों लेखण्या एकाएकीं भयस्तब्ध झाल्यासारख्या होऊन एका क्षणांत बोथटून गेल्या ! तेव्हां अर्थातच निरुपायास्तव आमचें सर्व उत्तर जसेंचें तसें एकीकडे ठेवून द्यावें लागलें. ठशांवरून एक फर्मा उतरला असतां व दुसरा अर्धामुर्धा जुळला असतां सर्व काम सदरील आक्टामुळें रद्द झालें. असो; झाली ती गोष्ट बरीच झाली. तिज-विषयीं आतां बोलून कांहीं फळ नाहीं. पण आह्मांस येवढ्याच गोष्टीचा खेद वाटतो कीं, आमच्या वृद्ध क्रिस्ती बंधूंनीं येवढ्या आग्रहानें व येवढ्या खात्रीनें जीं प्रमाणें आह्मांस दाखल करण्याविषयीं सांगितलें होतें तीं आह्मीं येवढ्या श्रमानें गोळा करून त्यांस अर्पण करायास आणलीं असतां तीं शेवटीं काढून-न काढून सारखींच झालीं ! आतां निदानीची गोष्ट येवढीच आमच्या बंधूंस कळवतों कीं, शुभवर्तमानांत वरील प्रकार आहेत कीं नाहींत याविषयीं खात्री करून घ्यावयाची असल्यास त्यांनीं आह्मांस तसें कळवावें. ह्मणजे सदरील-प्रमाणें पुनः एकवार काढून तीं आमच्या प्रिय व सन्मान्य बंधूंस खाजगी रीतीनें पाठवून देऊं. मग तीं त्यांनीं आपल्या पत्रांतून प्रसिद्ध केल्यास त्यांस कोणत्याही तऱ्हेची आडकाठी नाहीं. तसें केलें असतां त्यांच्या सर्व बंधूंस व इतरांसही तीं कळवल्यासारखीं होतील. शिवाय त्यांच्या खंडनाचा कांहीं मजकूर त्यांस लिहिणें असेल तर तोही त्यांनीं लिहावा. तेणेंकरून लक्षावधि संशयित लोकांची संदेहनिवृत्ति होईल.

याप्रमाणें गेल्या सालांतील एका प्रतिपक्ष्याची वाट लागली. आतां याप्रमाणेंच दुसऱ्याच्या आक्षेपांवरही आक्टाचा तडाका संभाळून जितकें लिहायास सांपडेल तितकें लिहून सदरील अंक आटपतों.

**दीनबंधु**—हें एक लहानसें वर्तमानपत्र 'सुबोधपत्रिका', 'आर्यपत्रिका' वगैरेंच्या प्रमाणें आपल्या समाजाच्या तर्फेनें निघालेलें आहे. हा समाज गेल्या ४४ व्या अंकांत (पृ. ४५१-४५६ 'सं॰') सांगितलेला सत्यशोधक पंथ होय. या पंथाची एकंदर हकीगत वरील अंकावरून आमच्या सर्व वाचकांस थोडीबहुत कळलीच आहे. तेव्हां तिजवरून वरील पत्राची परीक्षा कोणासही सहज करतां येईल. असल्या पत्रांत आलेल्या आक्षेपांवर उत्तर देणें ह्मटलें ह्मणजे अक्षर-जननीस व्यर्थ शिणवणें होय. तरी ज्या अर्थीं वरील अंकांत आमच्या शूद्रबंधूंच्या भ्रमनिर-

* व्हर्नॅक्युलर् प्रेस ॲक्ट १८७७. "सम्पादक"

सनार्थ 'गुलामगिरी'सारख्या अत्यंत अप्रयोजक ग्रंथांतील मतांचेंही आह्मीं विवेचन केलें, त्या अर्थी त्याचसंबंधानें आणखीही कांहीं विचार येथें दाखल करणें आह्मांस आवश्यक दिसतें. जोतीबासारख्यांनीं ब्राह्मणांच्या व शूद्रांच्या परस्पर संबंधाविषयीं ज्या कल्पना कित्येकांच्या मनांत भरवून दिल्या आहेत त्या जर खऱ्या असत्या, व आमच्या मनांत वागत्या, तर वरील महाग्रंथाची आह्मीं चर्चाच केली नसती. आह्मांस पक्कें माहीत आहे, कीं, अप्रयोजक व गबाळ ग्रंथ हे चिरकाल राहण्याचा बिलकुल संभव नाहीं; व त्यांत कोणा व्यक्तीविषयीं, जातीविषयीं किंवा राष्ट्राविषयीं कितीही निंदापर व कडक मजकूर लिहिला असला तरी इसापनीतींतील किरडूं व कानस यांच्या गोष्टीप्रमाणें बिचारें मूर्ख किरडूं मात्र भग्नदंत होण्याचा संभव! पण हें सर्व जाणत असतां 'गुलामगिरी'चें येवढें सविस्तर निरूपण करण्याचें मुख्य कारण हेंच कीं, आमचे बिचारे शूद्रबंधु अद्याप केवळ अज्ञान व भोळे असल्यामुळें 'झुकानेवाला चाहिये' या न्यायानें कोणासही त्यांच्या मनांत हव्या त्या मूर्ख कल्पना भरवून देतां येणार आहेत. तर ही त्यांची प्रतारणा न व्हावी व त्यांच्या उत्कर्षाचा खरा मार्ग त्यांच्या ध्यानांत आणून द्यावा हें वरील विवेचनाचें मुख्य बीज होतें. याशिवाय दुसरे जे वरील लेखाचे उद्देश, कीं विक्षिप्तपणाचे अनेक हास्यास्पद प्रकार वाचकांस कळवून त्यांस घटकाभर कर्मणूक करावी; लोकप्रसिद्धि, सरकारी अधिकाऱ्यांची मेहरबानी, व सर्वमान्य पुस्तकांतून उल्लेख ही सर्व पैदा होण्यास किती थोड्या विद्वत्तेनें व योग्यतेनें प्रसंगविशेषीं काम होतें हा प्रकार कांहीं लक्षांत यावा; व भर्तृहरीच्या व पोपकवीच्या सर्वप्रसिद्ध वचनांची[१] उत्कृष्ट प्रचीति यावी; हे उद्देश केवळ गौण होते.

---

१. हीं वचनें ११ व्या अंकांत आलींच आहेत:—

ज्ञानलवदुर्विदग्धं ब्रह्माऽपि च तं नरं न रञ्जयति ॥* —भर्तृहरि.

(न जाणे न मेणे अशा पामराला
बुझावूं शकेना विधाता तयाला ॥$) —वामन.

A little learning is a dangerous thing.† —*Pope*.

* सदर सुभाषिताची पहिली ओळ,

"अज्ञः सुखमाराध्यः सुखतरमाराध्यते विशेषज्ञः"

अशी आहे. याचा अर्थ, "जो केवळ अज्ञान आहे त्याची समजूत लवकर करून देतां येते; जो ज्ञाता आहे त्याची तर त्याहिपेक्षां लवकर करतां येते. पण ज्ञानाचा अर्धामुर्धाच संस्कार ज्यास घडला आहे त्याचें साक्षात् ब्रह्मदेवाच्यानेंहि समाधान करवणार नाहीं." 'उथळ पाण्याला खळखळाट फार' ही समानार्थक मराठी म्हण होय. "सम्पादक"

$ याचा पूर्वार्ध असा:—

करूं ये समाधान जो मूर्ख त्याचें।
धरूं ये सुखें चित्त पैं जाण त्याचें॥

† सदर पूर्ण उतारा असा:—

"A little learning is a dangerous thing;
Drink deep, or taste not the Pierian spring;

(पुढें चालू.)

तर वरील मुख्य उद्देशास अनुसरून आमच्या दीन शूद्रबंधूनें आपल्या आचार्यांच्या तर्फेनें जो कांहीं मजकूर आह्मांस कळवला आहे त्यावर कांहीं विवेचन करणें अवश्य होय.

'दीनबंधू'नें आपल्या वेड्या वाकड्या भाषेनें जे आमच्या लेखावर कांहीं आक्षेप काढले आहेत त्यांपैकीं मुख्य तीन चार आहेत. ते येणेंप्रमाणें:—

"मालाकार यांनीं आजपर्यंत आपल्या पुस्तकांत अनेक विषय प्रसिद्ध केले. पण त्यांचा झोंक वरवरीत लिहिण्याकडे असतो, कीं जेणेंकरून दुसऱ्याचा पाणउतारा व्हावा अशी त्यांची ऐट असते. जेव्हां त्यांची हुक्की तारीफ करण्याकडे लागते तेव्हां ते त्या कलावर लिहितात."

"मि० फुले यांनीं आपले बुकांत पुराणें व स्मृत्या यांबद्दल पुष्कळ चांगलें विवेचन केलें आहे. त्यांची भाषा जरी कडक दिसते, व पूज्य मानलेलें पुराण आणि त्यांतील नामधारी देव यांविषयीं त्यांनीं अति निर्भर्त्सना केली आहे, तरी त्यांचा हेतु अज्ञानाचे आवरणापासून लोक मुक्त व्हावे येवढाच आहे.........दुसरें त्यांनीं चित्पावनांचे उत्पत्तीविषयीं लिहिलें आहे. तेव्हां आपले ज्ञातिसमुदायास दोष दिलेले त्यांस (मालाकारांस) सहन झाले नसतील.........असो; या विद्वान् मालाकारांनीं यापेक्षां असें करणें अवश्य होतें कीं, फुले यांनीं जें जें लिहिलें आहे तें तें स्मृतिपुराण यांचे प्रमाणांनीं असत्य असें व्यक्त करून दाखविलें असतें तर त्यांची तारीफ करतां आली असती."

"ईश्वरकृपेनें या देशावर इंग्रजी राज्य झालें ह्मणूनच आज पुढारी ज्ञातीशिवाय इतरांस कांहीं तरी ज्ञान प्राप्त होऊन आपले हक्क कळूं लागले आहेत. मालाकार आपले ज्ञातीच्या स्वभावाप्रमाणें दीर्घदर्शी व गुप्तद्वेषी मतलबीही आहेत. इतर ज्ञातींची सुधारणा त्यांस अगदी आवडत नाहीं."

"आतां मालाकार यांनीं धूर्तांनीं नाडलेले, दरिद्रानें पीडलेले, आणि अज्ञानांत गढलेले अशा गाईबापड्या गरीब शूद्रांवर हत्यार धरणें ह्मटलें ह्मणजे फारच विपरीत समजलें पाहिजे."

आतां यांपैकीं पहिल्या आक्षेपाविषयीं तर आह्मीं प्रस्तुत अंकाच्या आरंभीं बराच विचार केला आहे; तेव्हां त्याच्या संबंधानें आमच्या दीनबंधूस कांहीं विशेष सांगायाला नकोच. राव जोतींसारख्या महान् पंडितांच्या अंतेवासिजनास आमचे निबंध पसंत पडत नाहींत या गोष्टीचा आह्मांस मोठासा अचंबा वाटत नाहीं व तादृश खेदही होत नाहीं. ज्या दृष्टीस 'गुलामगिरी' हा ग्रंथ पर्वतप्राय पांडित्याचा वाटला त्याच दृष्टीस आमचे लेखही मोठे प्रचंड

---

There shallow draughts intoxicate the brain,
But drinking largely sobers us again."

—Pope, Essay on Criticism.

अर्थः—चुटपुटती विद्या ही फार भयंकर होय. विद्यारूप झऱ्याशीं तोंड लावून एक यथेच्छ प्राशन तरी कर, नाहींतर एक बिंदुहि घेऊं नको. कारण, त्याचा असा विचित्र गुण आहे कीं, थोडेच घोट घेतले असतां त्यांनीं माथें फिरून जातें; पण तेंच जों जों पुष्कळ प्यावें तों तों मद उतरत जातो! 'सम्पादक'

वाटले तर बरीक आम्हांस खेद होण्यास कारण खरें! पण तसें न होऊन 'दीनबंधु'सारख्यांस आमचे लेख तद्विपरीत वाटतात हेंच त्यांस लहानसान सर्टिफिकिट आहे असें नाहीं. मिल्टननें एके ठिकाणीं ह्मटलें आहे:—

'Of whom to be dispraised is no small praise.

"ज्यांच्या निंदेस पात्र होणें हीच लहानसान तारीफ नव्हे." तर या न्यायानें पाहिलें असतां आमच्या शूद्र बंधूचा एक एक शब्द आह्मांस पुष्पप्रक्षेपाप्रमाणें तोषप्रदच होय!

दुसरें ह्मणणें असें कीं, जोतीबांनीं श्रुतिस्मृतींतून जीं एकेक वज्रप्राय प्रमाणें काढून आपला परम भाविक शिष्यमणि धोंडीबा याच्या द्वारें आपल्या साऱ्या शिष्य मंडळास प्रणीत केलीं त्यांचें श्रुतिस्मृतींतल्या प्रमाणांनीं आह्मीं खंडन करायाला पाहिजे होतें. तसली बिलकुल खटपट न करतां आह्मीं केवळ थापट्यावारीच येवढ्या गुरुशिष्यांस जें जागच्या जागीं बसवलें तें नीट नव्हे! आमच्या वाचकांस या आक्षेपावरून आठवेलच, कीं पंडित दयानंदजींच्या छात्रमंडळानेंही आह्मांस पूर्वीं हाच दोष दिला होता. एकंदर गाऱ्हाणें हें कीं, श्रुतिस्मृतींतल्या प्रमाणांचें खंडन श्रुतिस्मृतींतल्या प्रमाणांनीं केलें पाहिजे! आतां या संबंधानें आमच्या परमहंसशिष्यांच्या ह्मणण्यांत कांहीं तरी अर्थ होता; कां कीं पंडितजींचें वेदमूर्तित्व व शास्त्रपारंगतत्व हीं जरी बेताबाताचींच आहेत, तरी जोतीबांच्या मानानें तुलना करूं जातां स्वामी केवळ अपरसूर्यच होत असें ह्मटलें पाहिजे! द्विजत्वास्तव व विद्वान् लोकांच्या परिचयास्तव त्यांजपाशीं कांहीं फुटकळ ऋचा व शास्त्रवचनें यांचा संग्रह झालेला आहे,व त्यांचा अर्थही समजण्याची त्यांस शक्ति आहे;यास्तव त्यांनीं अमुक अमुक वेदांत किंवा शास्त्रग्रंथांत अमुक अमुक आहे असें ह्मटलें असतां केवळ हास्यास्पदतेचा प्रकार होण्यासारखा नाहीं. पण आमच्या शूद्र धर्मस्थापकांची तर कशी मौज आहे! त्यांस पुरतें व्याकरणाचें व शुद्ध लिहिण्याचेंही ज्ञान नाहीं. आमच्या वाचकांस आठवतच असेल कीं, 'गुलामगिरी'ची इमारत पूर्ण तयार झाल्यावर तींतील व्याकरणसंबंधीं खांचाखोंचा भरून टाकून साफ गिलावा करण्याविषयीं त्यांनीं आपल्या शिष्यास आज्ञा केली. आमचे प्रतिपक्षी 'दीनबंधु' यांचीही व्याकरणाविषयीं आपल्या गुरूसारखीच निष्ठा आहे.[१] तर अशा स्थितींत आह्मी आपल्या शूद्रबंधूंस अशी सूचना करतों कीं, श्रुतिस्मृतींचा ऊहापोह करण्याची हौस त्यांनीं तूर्त एकीकडे ठेवावी; अगोदर लेखनशुद्धीच्या सूत्रांची संथा घ्यावी किंवा दादोक्त महाभाष्यांत पारंगत व्हावें; आणि यांतून पार पडून कर्ता कर्म क्रियापदांची थोडीबहुत

---

१ वरील आज्ञेचा उल्लेख अंक ४४ (पृष्ठ ४४२ ओळी ९–१०. 'सं'०) यांत आहे. 'दीनबंधू'नें तर विचाराने या सालाच्या आरंभींच्या अंकांत प्रांजलपणानें कबूल केलें आहे:—

"माफी करतील—आजपर्यंत आमचे पत्रांत व्याकर्णांच्या संबंधानें घडून आलेल्या चुकांविषयीं आमचे वाचक माफी करतील अशी आशा आहे. त्यांतून अव्वलपासून वाचीत आलेल्या वर्तमानपत्राच्या वाचकांस सांगणें नको."

वरील प्रायश्चित्तविधि तरी कितपत निर्दोष आहे हें व्याकरणवेत्त्यांस कळून येईलच!

ओळख पटली ह्मणजे मग गीर्वाण भाषेविषयीं व मनुवसिष्ठादिकांविषयीं सावकाश विचार करतां येईल !

तिसऱ्या कलमांत आमच्या बंधूंनीं आमच्या ज्ञातीवर नेहेमी करावयाचे आक्षेप केले आहेत, कीं, आह्मीं त्यांस कधीं वर डोकें काढूं दिलें नाहीं, त्यांच्यांत सुधारणा झालेली आह्मांस कधीं देखूं सकत नाहीं व इंग्रेजांचें राज्य झालें ह्मणूनच त्यांचा आज भाग्योदय झाला आहे ! आतां या आक्षेपांवर पूर्ण विवरण करून ब्राह्मणांची व शूद्रांची स्थिति वस्तुतः कशी होती व सध्यां कशी आहे ती यथास्थितपणें दाखवण्यास व हल्लींच्या राज्यांत त्यांचें स्थित्यंतर कसें झालें आहे हें दर्शवण्यास पुष्कळच स्थळ पाहिजे. सदरील विषयावर चांगला स्वतंत्र ग्रंथच होण्यासारखा आहे. तेव्हां तूर्त प्रसंगानुसार कांहीं विचार आमच्या शूद्र बंधूंस सादर करून पुढें चालतों.

आमच्या देशाची अत्यंत प्राचीन काळीं स्थिति कशी होती, पुढें जे अनेक लोकव्यवस्था करणारे निपजले त्यांनीं तींत काय काय फेरफार केले, जातिभेदाचें अपूर्व प्रकरण केव्हांपासून उपस्थित झालें व कसें झालें, चारी वर्णांचा परस्पर संबंध आरंभीं कसा होता व पुढें कसकसा होत गेला, वगैरे गोष्टींविषयीं प्रस्तुत काळीं आमच्या लोकांत उगीच कोठें चर्चा होऊं लागली आहे. वरील प्रश्नांचीं यथास्थित व समर्पक उत्तरें अद्याप कोणासही देतां येणार नाहींत. आमच्या जुन्या ग्रंथांची माहिती जेव्हां विद्वान् लोक दृढ परिश्रम करून मिळवतील तेव्हां वरील गोष्टींचा उलगडा कांहींसा होऊं लागेल. आतां हें खरें आहे कीं, हल्लींही मोठमोठ्या युरोपीय पंडितांपासून तों जोतीबांपर्यंत अनेकांचे अनेक तर्क वरील विषयाच्या संबंधानें बाहेर पडले आहेत; पण ते सर्व बहुतेक अज्ञानाचें व असमंजसपणाचें होत असें ह्मणायास हरकत नाहीं. युरोपियन् लोकांचें काय आहे कीं, त्यांस अगोदर इकडची माहिती तुटपुंजीची, आणि तसल्या माहितीवर मग त्यांचें तर्कट चालायाचें ! त्यांतून जातिभेदासारखा प्रकार त्यांच्या सुधारलेल्या मुलखांत मुळींच नाहीं; तेव्हां असल्या अपूर्व विषयावर त्यांचे विलक्षण तरंग उठलेले आपण एरवीं जसें पाहतों तसेच ते यावरही दृष्टीस पडतात. आमच्या जोतीबांच्या सारख्या बहादरांची तर गोष्ट बोलायासच नको. त्यांनीं बोलायाला किंवा लिहायाला आरंभ केला ह्मणजे मग अर्थसंगतीची गरज नाहीं, युक्तीचें नांव घ्यायाला नको, व सभ्यतादि गुणांची तर ओळखही मिळायाची नाहीं ! तर असल्यांनीं प्रस्तुतसारख्या अत्यंत महत्त्वाच्या विषयावर जीं मतें प्रगट केलीं असतील ती प्रमाण घेऊन चालणें हें फार असमंजस होय. त्यांतून पूर्वींच्या काळाच्या वृत्तांताचा प्रस्तुत काळाशीं मोठासा संबंध आहे असेंही नाहीं. सर्वांस माहीतच आहे कीं, हजारों वर्षांपूर्वीं या देशांत मन्वादिकांनीं ज्या व्यवस्था केल्या त्यांपैकीं सध्यांपर्यंत चालू असणाऱ्या फारच थोड्या सांपडतील. मधले दोन वर्ण तर अगोदर बहुधा नष्टच झाल्यासारखे होऊन राहिलेल्या दोहोंचेही आचार मूळ व्यवस्थेप्रमाणें कितपत राहिले आहेत हें कोणालाही सांगायाला पाहिजे असें नाहीं. मग अशी जेथें स्थिति आहे तेथें त्रेतायुगांतल्या गोष्टी काढून विनाकारण बखेडा माजवावा हें कोणाही सुज्ञ पुरुषास मान्य होणार नाहीं. ' गुलामगिरी '

च्या जनकानें ब्राह्मणांसारखे दुष्ट व लबाड लोक पृथ्वीच्या पाठीवर मिळायाचे नाहींत, व त्यांनीं सर्व सत्ता आपणांकडे ओढून घेऊन मूळच्या रहिवाशांस गुलाम करून टाकिलें. वगैरे पुष्कळ निवळ बडबड केली आहे. पण त्यानें अंमळ डोळे उघडून जर जगाच्या अनादिसिद्ध व्यवहाराकडे पाहिलें असतें, व अमेरिकेंतल्या, आफ्रिकेंतल्या वगैरे मूळ रहिवाशांची स्थिति क्षणभर मनांत आणली असती, तर आपलें भाग्य केवढें व ब्राह्मण हे खरोखरच 'भूदेव' होत अशी त्यांची खात्री झाली असती ! शिवाय 'गुलामगिरी' तला इराणी इतिहास जर अक्षरशः खरा मानला तर तेणेंकरून तर ब्राह्मणांचें विलक्षण गौरवच होतें ! कां कीं, इराणांतून येऊन येवढा हिंदुस्थान ज्यांनीं काबीज केला त्यांनींच जर पुढें राज्याधिकार क्षत्रियांस देऊन व वाणिज्य वैश्यांस देऊन स्वतः अरण्यवास पतकरला, तर मग त्यांच्याहून थोर व परोपकारी दुसरे कोण ? अमेरिकेंतल्या गुलामांस स्वतंत्र करण्याचाच नुसता विचार असतां जर भयंकर लढाई उत्पन्न झाल्याशिवाय राहत नाहीं, व खुद्द आमचें उदार सरकारही इतकीं वचनें आह्मांस वेळोवेळीं देऊन लहानसान अधिकार आह्मांस देतांनाही मागें पुढें करीत असतें, तर मग ज्यांनीं स्वतः कमावलेलें राज्य आपल्या अंकित दासांस परत देऊन आपण कंदमूलांचे अधिकारी झाले, त्या ब्राह्मणांची थोरवी कोठवर वर्णावी ! ! पण ही मागली गोष्ट राहूं द्या. गेल्या शतकांत झालेल्या गोष्टी तर सर्वांच्या दृष्टीसमोर आहेत कीं नाहींत ? मग त्यांवर वस्तुतः काय तर्क निघतात बरें ? दुराग्रहाचा चीक डोळ्यांत घालून बळेंच जो अंधळा बनला नसेल त्यानें पेशव्यांचा इतिहास ध्यानांत आणला असतां व शिंदे होळकरांच्या मूळपीठिकेकडे किंचित् लक्ष पुरवलें असतां 'दीनबंधू'च्या वरील अवतरणांतील आक्षेपांची योग्यता त्यास कळल्यावांचून राहणार नाहीं. पण असें असतां आमचे शूद्र प्रतिपक्षी चित्पावनांच्या उत्पत्तीविषयीं वाटाघाट करून सह्याद्रिखंड जोतीबाखंड असल्या महाग्रंथांचें निर्मंथन करून महापांडित्याचा आव घालतात, आणि अमुक ब्राह्मण वरच्या पायरीचे, अमुक खालच्या पायरीचे, या उलढाली करीत बसतात. मशकानें घार मोठी कीं गिधाड मोठें ही चर्चा मोठ्या पर्वताच्या शिखराग्रावर आरूढ होऊन कंठशोष होईपर्यंत केली तरी त्यास कांहीं लाभ आहे काय ? इसापनीतींतल्या बेड्या बेडकीप्रमाणें मात्र त्यास महत्त्वाकांक्षेचें फळ फार झालें तर मिळेल ! तर हा मूर्ख व्यापार सोडून देऊन आमच्या शूद्र प्रतिपक्ष्यांनीं नेहेमी लक्षांत ठेवावें कीं, चित्पावन हे चितेपासून जीवंत झालेले असोत किंवा इराणांतून आलेले असोत, त्यांचे नैसर्गिक गुण जे यापूर्वीं प्रगट झाले व अद्यापही होत आहेत ते छप्पन 'गुलामगिऱ्यां'नीं व शंभर 'जातिभेदसारां'नींही लवमात्रही कमी होणारे नव्हेत. चित्पावनांनीं गेल्या शतकांत सारा हिंदुस्थान दणाणून देऊन आपल्या क्षत्रकुलांतक क्षेत्रपतीप्रमाणें दिग्विजय केला, व अद्यापही त्यांचें बुद्धिवैभव जसेंचें तसेंच जागृत आहे, या गोष्टी सर्वजनविश्रुत आहेत. त्या ज्यास सहन होत नसतील त्यांनीं पाहिजे तर दिवाभीतांप्रमाणें गिरिकंदरांत आपलें तोंड लपवून राहावें; वरील पक्ष्याच्या पंखांनीं दिनमणि जसा झांकला जाणार नाहीं, त्याचप्रमाणें जोतीप्रभृतींनीं कितीही कोल्हेकुई केली तरी ती सर्व व्यर्थच होय ! तर एकंदरींत आह्मी आपल्या कनिष्ठ शूद्र

बंधूस असें निश्चयानें कळवतों कीं, जोती साहेबांनीं आपल्या महाग्रंथांत आमच्या ज्ञातीस दोष लावले यामुळें आह्मांस राग आला असावा असें जें त्यास वाटतें तें अगदीं चुकीचें आहे. मोहोरीचा दाणा जसा या पारड्यांत टाकला कीं त्या पारड्यांत टाकला तरी त्याच्या वजनानें तराजूचा कांटा केंसभरही ढळत नाहीं, त्याप्रमाणेंच मि॰ जोतींसारख्या महापंडिताच्या स्तुतींतही अर्थ तितकाच व निंदेंतही तितकाच ! तेव्हां आमचे ज्ञातिबांधव दोहोंचीही सारखीच पर्वा करतात हें त्यानें खास समजावें. त्याप्रमाणेंच आमची ज्ञाति गुसद्वेषी, मतलबी आहे वगैरे ज्या कल्पना आमच्या गरीब बिचाऱ्या बंधूनें आपल्या महागुरूच्या उपदेशावरून एकदां डोक्यांत भरून घेतल्या आहेत त्याही बहुतेक अंशीं निराधार होत हेंही त्यास शोधाअंतीं व विचाराअंतीं कळणार आहे.

आतां चवथा आक्षेप. तो असा कीं, गरीब बापड्या शूद्रांवर हत्यार धरण्यांत आह्मांस काय पुरुषार्थ वाटला नकळे ! हा आक्षेपही अगदीं भ्रममूलक होय. मि॰ फुले यांच्या मतांवर टीका केली किंवा 'गुलामगिरी'चा उपहास केला, ह्मणजे शूद्र मंडळींवर आह्मी हत्यार धरलेंसें जर होतें; तर दयानंदजींच्या संबंधानें मजकूर लिहिल्यानें साऱ्या ब्रह्मवृंदास आह्मीं दुखवलें असेंही पण ह्मणायाला पाहिजे; परंतु या दोन्हीही गोष्टी खोट्या आहेत हें कोणालाही सांगायाला पाहिजे असें नाहीं. लक्षावधि ब्राह्मण देवपूजेच्या संमळ्या झुगारून देऊन नित्य प्रातःकाळीं हवाशुद्ध्यर्थ होमहवन करूं लागले आहेत, शेंकडों ब्राह्मण राजांनीं आर्यसमाजाच्या पटांत आपलीं नांवें घालून दिलीं आहेत, व पंढरपुर, जगन्नाथ इत्यादि क्षेत्रांकडे आतां कोणीं ढुंकूनही पाहत नाहीं हा प्रकार अद्याप जसा कोठेंही आढळूं लागला नाहीं; त्याप्रमाणेंच शिंदे, होळकर, पवार वगैरे शूद्र अधिपति हे बडे बडे सत्यशोधक बनले आहेत, आळंदी, देहू, जेजुरी वगैरे ओस पडून तुकारामप्रभृति संतमंडळीचें महात्म्य पार नाहींसें झालें आहे, असलेही प्रकार कोठेंही दृष्टीस पडत नाहींत. तर हें क्षणभर ध्यानीत आणलें असतां आमच्या बंधूस तेव्हांच कळेल कीं, मि॰ जोती व 'गरीब बापडे' शूद्र यांचा कांहीं संबंध नाहीं. जोतीबांचें मत असें करतां पांच पन्नास शूद्रांस कदाचित् पसंत असेल नसेल; तर येवढ्यांत साऱ्या शूद्र प्रजेचा त्यांनीं अंतर्भाव करूं पाहणें हें समंजस नव्हे.

याप्रमाणें आमच्या शूद्रबंधूच्या आक्षेपांविषयीं विचार झाला. आतां सरतेशेवटीं आमच्या समाजाधिपतींस व त्यांच्या शिष्यवृंदास कांहीं सूचना करून त्यांचा शेवटचा निरोप घेतों. मि॰ फुले यांस सूचना अशी कीं, जर त्यांस आपल्या ज्ञातिबंधूंची सुधारणा कर्तव्य असेल तर ती 'गुलामगिरीच्या'सारखे ग्रंथ तयार केल्यानें व जे आपणांहून सर्व प्रकारें श्रेष्ठ त्यांस नुसत्या शिव्या दिल्यानें ती होणार आहे असें मुळींच नाहीं. ब्राह्मण कितीही लबाड असले व कितीही दुष्ट असले तरी एक गोष्ट निर्विवाद आहे:—कीं ज्ञानभांडाराच्या किल्ल्या त्यांच्या कंबरेला आहेत. त्यांच्या साह्याशिवाय इतर ज्ञातींस ज्ञानाचा लाभ होण्याचा बहुधा मुळींच मार्ग नाहीं. पाद्री साहेब हजारों रुपये खर्च करून बळीच्या राज्यांतून किंवा चंद्रलोकावरून इकडे येवोत, व शूद्रांस विद्या पढवण्याविषयीं पाहिजे तितकी खटपट करोत

पण भटांनीं कामांत पडल्यावांचून तें बिल्कुल सिद्धीस जावयाचें नाहीं. तर अशी जेथें स्थिति आहे तेथें रिकामें डोकें फोडीत बसण्यांत काय हंशील आहे! आपलें कार्य जर साधून घ्यावयाचें असेल तर त्या कार्यसाधकाशीं सलोख्यानें वागावें यांत शहाणपणा आहे कीं त्याशीं नेहेमी हमरीतुमरी करावी हा शहाणपणाचा मार्ग आहे? आपलें काम फत्ते झाल्यावर मग पाहिजे तर त्याच्या बोकांडी बसून कृतज्ञतापाशांतून आपणास मोकळें करून घ्यावें; पण तोंपर्यंत त्याचें मनोधारण करणें किंवा निदान त्यावर पुष्पवृष्टि न करणें हेंच न्याय्य होय. दुसरी गोष्ट अशी कीं, आलीकडच्या इंग्रेजी विद्येच्या प्रसारानें पूर्वीचे समज पुष्कळ पालटून गेल्यानें आधुनिक विद्वन्मंडळांत शूद्रांविषयीं पूर्वींप्रमाणें ग्रह राहिले नाहींत. हें तर काय, पण कांहीं दिवसांपूर्वीं शूद्रांचे आचार भिरवण्यांतही पुष्कळांस प्रतिष्ठा वाटूं लागली होती. भोजनादि कांहीं व्यवहारांखेरीज ब्राह्मणशूद्रत्वाचा संबंध आलीकडील मंडळींत तादृश ओळखीत नाहींत, व दिवसांदिवस असलाच प्रकार वृद्धिंगत होत जाईल असा देशस्थितीच्या मानाकरून सुमार दिसतो. मग अशी स्थिति जेथें आयतीच येऊं लागली आहे, तेथें मनःकल्पित दुःखांबद्दल वळेंच आक्रोश करून व मत्स्य कच्छ इराणांतून आले वगैरे निवळ गप्पा खऱ्या मानून विनाकारण बखेडा माजवणें हा किती मूर्खपणा आहे! तर आमच्या शूद्र देशहितेच्छूनें वरील गोष्टींकडे कांहीं लक्ष पुरवून आपल्या ज्ञातीच्या सुधारणेचा जर समंजसपणानें उद्योग केला तर त्यांत त्याचें, त्याच्या ज्ञातीचें व एकंदर देशाचेंही कल्याण होणार आहे. याप्रमाणेंच जोतीबांच्या शिष्यवर्गासही आमचें असें सांगणें आहे कीं, 'गुलामगिरी'सारख्या ग्रंथांवरून ब्राह्मणांविषयीं जे दुष्ट ग्रह कांहींकांच्या मनांत बिंबले असतील ते त्यांनीं सोडून द्यावे. त्यांनीं अमळ डोळे उघडून वास्तविक स्थिति कशी आहे ती जर पाहिली, तर ब्राह्मणांच्या मनांत त्यांच्याविषयीं अत्यंत वैर जळत आहे व त्यांचें जेवढें वाईट होईल तेवढें करण्याविषयीं ते निरंतर तत्पर असतात वगैरे कल्पना किती कुत्सित आहेत, हें त्यांच्या तेव्हांच लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं; आतां हें खरें आहे कीं, ब्राह्मण म्हणजे सर्वच अत्यंत सुजन आहेत व त्यांत दोष म्हणून सांपडावयाचाच नाहीं, किंवा शूद्रांचे दुःखक्लेश सर्व व्यर्थ असून त्यांच्या स्थितींत सुधारणा करण्याची बिल्कुल गरज नाहीं, असें आमचें मुळीं म्हणणें नाहीं. आमच्या ज्ञातीचे जे कांहीं वास्तविक दोष असतील ते सर्व आम्हांस कबूल आहेत; त्यांवर पांघरूण घालण्याची किंवा ते नाहींत असें म्हणण्याची आमची बिल्कुल इच्छा नाहीं. त्याप्रमाणेंच आमच्या शूद्र देशबंधूंवर जातिभेदाच्या संबंधानें वगैरे जीं दुःखें खरोखर येत असतील तीं हलकीं करणें किंवा होतील तितकीं नाहींशीं करणें हें प्रत्येक देशहितेच्छूचें कर्तव्य होय हेंही आम्हांस मान्य आहे; व आमची पक्की खात्री आहे कीं या कामास आमच्या ज्ञातिबांधवांची विमुखता दृष्टीस पडणार नाहीं इतकेंच नव्हे, तर पुष्कळ मोठ्या उत्साहानें त्यास साह्यही करतील. तर असे कांहीं सुविचार मनांत आणून आमचे सत्यसमाजवाले देशबंधु त्यांप्रमाणें जर चालतील, व या आर्यभूमीच आजपर्यंत साऱ्या जातांचीं जसा अभिमान बाळगला तसाच पुढेंही बाळगून आपसाआपसांत वितुष्ट वाढूं न देण्याविषयीं जर तजवीज ठेवतील, तर अजूनही

आमची स्थिति सुधरेल व इंग्लंडच्या राज्यापासून होणारे जे विद्यादिक अमूल्य लाभ ते सर्वांस होऊन सर्वांचें कल्याण होईल यांत संशय नाहीं.

निबंधमाला—येथें आमच्या चवथ्या वर्षाचा कारभार आटपला. आतां सालाबाद-प्रमाणें वर्षाची साधारण हकीकत लिहून अंक पुरा करतों.

या वर्षांत अनेक विघ्नें आलीं असतां त्या सर्वांतून आमचें पुस्तक निभावून तें अद्याप चालत आहे याबद्दल प्रथमत: जगन्नियंत्याचे उपकार आठवून आमच्या आश्रयदात्यांचेही आभार मानणें अवश्य होय. या विघ्नांचा उल्लेख पुढें होईलच. अगोदर गेल्या सालांत झालेल्या उलाढालींच्या संबंधानें दर वर्षाच्या वहिवाटीप्रमाणें कांहीं लिहितों.

आमच्या देशाच्या बाहेर गेल्या सालांत कोणती जबरदस्त उलाढाल झाली ती साऱ्या जगास मशहूर आहेच. रूमशामच्या कितीका काळापासून गाजलेल्या बादशाहीवर येतां येतां अखेरचा प्रसंग गतवर्षी येऊन रशियाचा फार दिवसांचा मनोरथ पूर्णपणें सिद्धीस गेला. गुतस्कांही तुर्क लोकांवर लढाईचा प्रसंग होताच; आणि त्यांतून पार पडून ते विसावा घेतात न घेतात तों मोठा घनघोर संग्राम* त्यांच्या पुढें वाढून ठेवल्यासारखा आला. पण बन्य

---

* रूसोटर्किश युद्ध १८७७-१८७८.

(Czar Liberator) झारच्या कारकिर्दींत हें युद्ध झालें. तुर्कस्तानच्या अंमलाखालील बोस्निया (Bosnia) व हर्झिगोव्हिना (Herzegovina) या प्रांतांतील स्लॅव्होनियन् (Slavonian) लोक १८७५ च्या उन्हाळ्यांत तुर्कांविरुद्ध उठले. त्यांचे उद्देश तुर्कस्तानच्या मुसलमानी प्रजेच्या बरोबरीनें हक्क मिळविणें, आणि आपला धर्म, आपलें स्वातंत्र्य, आपली इस्टेट व आपली अब्रू यांचेवर कोणालाहि घाला घालूं न देणें हे होते.

१८७६ च्या उन्हाळ्यांत सदर बंडांत तुर्कांविरुद्ध मॉंटिनीग्रो (Montenegro) व सर्व्हिया (Servia) हीं राष्ट्रेंहि सामील झालीं. रशियाचा बादशहा झार् दुसरा अलेक्झांडर् यानें तुर्की सुलतानाकडून १८७६ च्या ऑक्टोबर्‌मध्यें सर्व्हियाविरुद्ध हल्ले थांबविले व दोन महिन्यांचा तात्पुरता तह झाला. तथापि तुर्कांनीं बाल्कन् पेनिन्सुलामधील खिस्त्यांवर अत्याचार केलेच; असहाय बल्गेरियावर फार जुलूम झाला. तेव्हां २४ एप्रिल् १८७७ रोजीं रशिया युद्धांत सामील झाला. आशिया व युरोप दोन्ही खंडांत युद्धाच्या ज्वाला भडकल्या. रशियन् सेनापति मिचेल निकोलेविच् (Michael Nikolaivitch) व ग्रँडुमिरल् निकोलस् निकोलेविच् (Nicholas Nikolaivitch) यांनीं प्रथम बरेच विजय मिळविले. पण लवकरच गाडें उलटलें. झेव्हन्‌जवळील (Zeven) किल्ल्यावरचा २५ जूनचा हल्ला तुर्कांनीं परतविला व या पराजयामुळें रशियाला कार्सचाहि (Kars) वेढा उठवावा लागून आपल्या हद्दींत परत जावें लागलें. पण सर्वांत मोठा असा रशियाचा पराजय म्हणजे प्लेवना (Plevna) या छोट्या बल्गेरियन् शहरावर त्यांनीं २० जुलै रोजीं हल्ला केला तेव्हांचा होय. येथें तुर्कांनीं खूप तयारी केली होती. शहराभोंवतीं तटांचें नुसतें जाळें उभें करून शहर अजिंक्य करून टाकलें होतें. रशियाचे तीन हजार लोक मारून तुर्कांनीं त्यांस पिटाळून लावलें. ३० जुलै रोजीं रशियानें फिरून हल्ला केला पण तुर्कांनीं ७५०० लोकांचा बळी घेऊन रशियनांस पुनः एकवार पळवून लावलें. पुनः नवीन कुमक येऊन पोंचतांच तरुण सेनापति (Skobelev) स्कोबेलेव्ह् याच्या आधिपत्याखालीं तिसऱ्यांदा प्लेवनावर हल्ला चढविण्यांत आला व १२ सप्टेंबर

(पुढें चालू.)

त्यांची छाती ! येवढें काहूर त्यांच्या भोंवतालीं जमून आलें असतां व ऐन संकटसमयीं त्यांस त्राता किंवा साह्यकर्ता कोणी मिळेना हें तर काय, पण ज्याची त्याची बुद्धि उलटी अशी कीं ही खट एकदां युरोपांतून निघाली असतां बरी !—पण इतकें सर्व असतांही बिलकुल न डरतां ते रशियाशीं सामनाही करायाला उभे राहिले.ज्या संस्थानास सारें युरोप उपहासानें 'दुखणाईत मनुष्य' ह्मणत असे त्यानें डोक्यास लपटलेला रुमाल झुगारून देऊन जेव्हां का शिरस्त्राणाचें धारण केलें व फारा दिवसांनीं मैदानाची हवा पाहिली, तेव्हां साऱ्या जगाची तेव्हांच खात्री झाली कीं चारशें वर्षांपूर्वी तुर्क लोकांच्या अंगीं जो कस होता तो अद्याप जसाचा तसा आहे ! केवढें प्रचंड व प्रबळ रशियाचें संस्थान, कीं ज्यानें साठ वर्षांपूर्वी सारें युरोप जिंकलेल्या नेपोलियनास रसातळास मिळवलें, व वीस वर्षांपूर्वी इंग्लंड व फ्रान्स यांसही सहसा दाद दिली नाहीं ! तेव्हां त्यानें फार दिवस भक्ष्य न मिळालेल्या भुकेल्या अस्वलाप्रमाणें गुरगुरून व चवताळून जेव्हां गरीब बिचाऱ्या 'दुखणेकऱ्यावर' चाल केली, तेव्हां सर्वांस खास वाटलें कीं आतां याची धडगत नाहीं; हा दांडगा अस्वल यास एका क्षणांत फाडून टाकतो ! पण लवकरच सर्वांस तोंडांत बोट घालून चकित व स्तब्ध होऊन राहण्याची पाळी आली व सर्वांच्या डोळ्यांचें पारणें फिटलें ! दुखणेकऱ्यानें दरवेशाचें कसब पुरें दाखवून क्रूर व उन्मत्त अस्वलास असा सडकून मार दिला कीं, युरोपांत व एशियेंत दोहों ठिकाणींही त्यास चें चें करीत माघारीं पळावें लागलें ! प्लेवनाच्या वाघानें तर त्याशीं पांच महिने झुंजून त्याचीं अशीं बळकट हाडें मोडलीं कीं, आजन्मपर्यंत तीं तो न विसरे ! ! असो; एकंदरींत गेलें साल जरी तुर्कस्थानास पराकाष्ठेचें जड गेलें तरी त्यानें साऱ्या एशियाचें तोंड उजळ केलें व आपलें नांव जगांत चिरकाळ ठेवलें यांत संशय नाहीं !

आमच्या देशांत गेल्या सालच्या अगदीं आरंभीं घडलेली गोष्ट 'केसर इ हिंद' हा किताब आपल्या महाराणी साहेबांनीं घेतला ही होय. या उपपदधारणानें त्यांची राज्यसत्ता ह्मणजे दृढतर झाली असें जरी ह्मणतां येत नाहीं,—(कां कीं त्यांच्याविषयीं येथील प्रजेच्या मनांत अतिशय प्रीति व पूज्यबुद्धि पहिल्यापासूनच वसत असल्यामुळें त्यांची राजसत्त

रोजीं पुनः तीन हजारांचा बळी देऊन रशियनांस रणांगणास पाठ दाखवावी लागली; शिवाय दहा हजार लोक जखमी झाले ते वेगळेच. अखेर प्लेवनाचा नाद रशियनांनीं सोडून दिला व कार्सचा किल्ला आणि प्लेवनाभोंवतालचीं ठाणीं काबीज करून तुर्कांचा बाहेरचा संबंध तोडावा व त्यांचा कोंडमारा करावा असें त्यांनीं ठरविलें. ऑक्टोबरअखेर तुर्क पूर्णपणें वेढले गेले. सुमारें एक महिन्यांत जवळची सामुग्रीहि संपल्यानें तुर्कांचा रणशूर सेनापति, प्लेवनाचा वाघ उस्मान पाशा हा १० डिसेंबर रोजीं किल्ल्यांतून बाहेर पडला व रशियनांची फळीहि त्यानें फोडली; पण त्याच्या पायास जखम झाली व त्यास शरण जाणें भाग पडलें. प्लेवना पडल्यावर तुर्कांचें नशीब फिरलें व अनेक वेळां पराजय झाल्यावर ३ मार्च १८७८ रोजीं रशियानें दिलेल्या अटींवर कॉन्स्टॅंटिनोपलजवळ सैन् स्टेफॅनो (San Stefano) येथें तुर्कस्तानानें तहावर सही केली. पुढें या तहांत बरेच बदल होऊन बर्लिन् कॉंग्रेसमध्यें १८७८ मध्यें सर्व युरोपीय राष्ट्रांनीं त्यावर सह्या केल्या व तदनुसार ८ फेब्रुवारी १८७९ रोजीं कॉन्स्टॅंटिनोपल येथें रशिया व तुर्कस्तान यांमध्यें अखेरचा तह होऊन त्यावर उभय राष्ट्रांच्या सह्या झाल्या. 'सम्पादक'

प्रकृत उपपद धारण करण्यापूर्वीच शिखरास जाऊन पोंचली होती)—तरी भरतखंडवासी सर्व प्रजा एका स्वामिनीची अंकित होय, ही कल्पना विशेष दृढतर झाली यांत संशय नाहीं. तिच्या योगानें या अफाट देशांतील नाना वर्णांचे व नाना धर्मांचे लोक आपआपसांतले भिन्नभाव सोडून देऊन सर्वसाधारण बंधुत्वाचें नातें ओळखून एकमेकांशीं सलोख्यानें जर वागूं लागतील तर हा एक मोठाच लाभ झालासा म्हणतां येईल. हा परस्पर स्नेह आमच्या देशाची उत्तरोत्तर जी स्थिति होत चालली आहे तिजकडे क्षणभर लक्ष पुरवलें असतां किती आवश्यक होय हें सहज कळणारें आहे. आमच्या देशाचें सर्व प्रकारचें दारिद्र्य तर साऱ्या जगास विश्रुतच आहे; त्यांतून आलीकडे तर दुष्काळ व महामारी हे भयंकर उत्पात येथें निरंतरचें बिऱ्हाड करूं पाहत आहेतसें दिसतें. गेल्या सालांत या दोहोंचा व त्यांतून पहिल्याचा अंमल मुंबई व मद्रास इलाख्यांत जारीनें चालून त्याची अवई साऱ्या जगभर गेली हें सर्वांस ठाऊकच आहे. त्यांतून येवढें बरें झालें कीं, शेवटीं हस्त नक्षत्रानें आमच्या बिचाऱ्या देशास ऐन अखेरच्या घटकळीच्या वेळीं तरता हात दिला, नाहीं तर बहुधा प्रलयकालच येऊन ठेपला होता! साऱ्या पावसाळ्याभर डोळे वटारून पर्जन्यानें शेवटीं साऱ्या देशावर अविच्छिन्न कृपा केली त्यामुळें 'हस्तानें साऱ्यांचीं तोंडें हसतीं केलीं' असा प्रवाद सर्वतोमुख झाला. असो; वरील कहरांचें वर्णन करावें तितकें थोडें आहे. लक्षावधि लोकांचा अन्न वांचून व पाण्यावाचून प्राणनाश व्हावा, टापूचे टापू ओस पडावे, गुरेंढोरें जीं देशाचे जीवनास व संपत्तीस मूलभूत त्यांचा निःपात होऊन जावा, या गोष्टींची केवळ कल्पना मनांत आणली असतांही अंगावर थरथरून कांटा उभा राहतो; मग त्या प्रत्यक्ष डोळ्यांनीं ज्यांनीं पाहिल्या असतील त्यांची अवस्था तर काय झाली असेल! ती ध्यानांत आणून प्रत्येक देशहितेच्छूचें कर्तव्य येवढेंच होय, कीं जेणेंकरून आपआपसांतले तंटे मोडून साऱ्यांचा एक विचार होईल व आपल्या अंगचे अनेक दोष जाऊन त्या जागीं राष्ट्राभ्युदयास कारण जे अनेक सद्गुण ते येतील, असें आचरण ठेवावें.

आतां आमच्या पुस्तकाच्या संबंधानें पाहतां या खेपेस कांहीं विशेष लिहिण्यासारखें आहे असें नाहीं. आमच्या कृत्यास पूर्वीपासून आमच्या देशबंधूंचा जसा आश्रय आहे तसाच तो नहेमीप्रमाणें गेल्या सालांतही क्रमाक्रमानें वाढला. आमच्या पुस्तकाच्या अनियमितपणाबद्दल जरी पहिल्यापासून थोडाबहुत बोभाट आहेच आहे, व आलीकडे तर वरील तकारीचें कलम फारच वाढलें आहे, तरी आमच्या वर्गणीदारांनीं अत्यंत क्षमाशीलत्व प्रगट करून पुष्कळांनीं त्याबद्दल कधीं चकारशब्दही काढला नाहीं या गोष्टीबद्दल आम्ही त्यांचे फार आभार मानतों; व त्यांच्या मनोदयानुरूप आमच्याकडून कृति होत नाहीं याबद्दल जरी कांहीं विषाद वाटतो, तरी त्याबरोबर आम्हांस उमेदही पण येते. ती अर्थातच अशी कीं, आम्हांवर आमच्या आश्रयदात्यांचा गैरभरंवसा नाहीं हें वरील गोष्टीवरून व्यक्त होतें. आतां आलीकडे आमची नेहेमींची पद्धतही सुटून आमचें पुस्तक चालू आहे कीं बंद पडलें असा अंदेशा वाटण्याची जी तूर्त स्थिति आली आहे तिचीं कारणें आमच्या साऱ्या वाचकांस माहीत आहेतच. हीं कारणें एकामागून एक इतकीं लागोपाठ व इतकीं अवचित आलीं,

व उत्साहभंजक होतीं, कीं आमच्या पुस्तकाचा पाया आहे त्याहून जर अंमळ लेचापेचा असता व आमच्या वाचकांची व आमची या कृत्याविषयीं जर कमीशी हौस असती, तर हाच अंक अखेरचा करून एकंदर कारभार आटपण्याचीच पाळी आली होती ! पहिलें कारण स्थलांतर.† हें होण्याचें कारण तूर्त सांगतां येत नाहीं; पण आमच्या वाचकांपैकीं जे अंमळ

---

† शास्त्रीबोवांची पुण्याहून रत्नागिरीस बदली:

मागील 'एलिफास्' प्रकरणाचा हा परिपाक होय. पूना हायस्कूलच्या माजी हेड्मास्तरांचे बंधु मेजर् जेकब् यांनीं बाँबे गॅझिट पत्रांत 'एलिफास्' या सहीनें शास्त्रीबोवांच्या विरुद्ध एक पत्र प्रसिद्ध केलें होतें व एतद्देशीय विद्वानांच्या राजनिष्ठेचे मासले इलाखाधिपतींस दाखविण्याकरितां त्यांत निबंधमालेच्या तिसाव्या अंकांतील चार उताऱ्यांचें इंग्रेजी भाषांतर दिलें होतें सदर पत्रांतच निबंधमालेचे लेखक पुण्याच्या सरकारी हायस्कुलांतील एक बी. ए. मास्तर असून यांचेच वडील 'रिपोर्टर् ऑन् दि नेटिव्ह प्रेस्' या मोठया हुद्द्यावरचे अधिकारी असल्याचें सरकारच्या निदर्शनास आणण्यांत आलें होतें. सदर पत्रास उत्तरादाखल महाजनी यांनीं 'ब्राह्मण' या सहीनें ११ ऑक्टोबर् रोजीं एक पत्र 'टाइम्स् ऑफ् इंडियां'त पाठविलें होतें व त्यांनीं त्यांत 'एलिफास्'चे चांगलेच दांत पाडले होते. सदर पत्र १७ ऑक्टोबर्च्या अंकांत 'Natives and Europeans' या मथळ्याखालीं प्रसिद्ध झालें होतें. त्यांतील मुद्द्याचा भाग असा:—

"Must I remind him (Eliphas) that facts must be refuted by facts, and that they cannot be discredited by pooh-poohing them away, as he has done? Are not all the facts contained in the 'four gems' true? Did not the impoverished Sardars suffer in money when they went to Bombay to do honour to His Royal Highness the Prince of Wales though they could thus show their loyalty? Loyalty is good but poverty is a stern fact. Was not Mr. Shankar Pandurang dragged from a Railway Carriage by a guard? Has 'Eliphas' forgotten the Fuller Case? Does he not know that a native who preached Hindoo religion on the Esplanade was silenced by Mr. Connon because he committed a breach of the peace, while all the "out-caste preachers" who revile our religion, escape soot-free? Has not the Anglo Indian Press condemned the action of Government in Mr. Melvill's case? Are the facts in the history of Arabs to be blotted out, because they would not serve the purpose of the "Eliphas"? If the statement of facts were construed into treason, the Editor of the *Nibandhmala* must plead guilty."

सदर प्रकरण डायरेक्टर् चँट्फील्ड् यांच्या निदर्शनास आल्यावरून त्यांनीं शास्त्रीबोवांची बदली सारख्याच पगारावर रत्नागिरी हायस्कूलमध्यें केली. त्यांचा हेतु असा कीं चळवळीच्या केंद्रापासून दूर आडगांवीं बदली केल्यानें शास्त्रीबोवांचा हटवाद कमी होऊन ते ताळ्यावर यावे. पण शास्त्रीबोवांचें नाणें खणखणीत असल्यामुळें व सरकारी नोकरीकरतां स्वाभिमान, स्वमताभिमान, स्वदेशाभिमान वगैरे उच्च मनोवृत्तींचा संकोच करण्यास ते तयार नसल्यानें चँट्फील्ड् साहेबांचा हेतु सफल झाला नाहीं. शास्त्रीबोवा डिसेंबर् १८७७ अखेर रत्नागिरीस दाखल झाले. रत्नागिरी

[पुढें चालू.]

कल्पक असतील त्यांच्या तें तेव्हांच ध्यानांत येण्यासारखें आहे. याच्या योगानें आमचें पुस्तक चालणें मोठें दुरापास्त होईल असें आभास प्रथम वाटत होतें; पण पुढें पाहतां केवळ तसा प्रकार आढळून आला नाहीं. नव्या ठिकाणीं पूर्वस्थलाइतक्या जरी सोई नव्हत्या व एकंदर कामाच्या संबंधानें जरी कित्येक नव्या अडचणी उत्पन्न झाल्या, तरी पुस्तक चालण्यास म्हणण्यासारखी हरकत नव्हती. पण हें सर्व नीट होऊन पुनः सारी व्यवस्था नीट बसते न बसते तों चालू सालचा नवा आक्ट‡ एकदम पसार होऊन बाहेर पडला. हा आक्ट प्रस्तुतच्या देशस्थितीस कितपत अनुकूल आहे, व सामान्यतः पाहतां तो प्रजेस कितपत हितावह होण्याचा संभव असतो, वगैरे गोष्टींविषयीं येथें विचार कर्तव्य नाहीं. त्याच्या लहान-

---

हायस्कूल्चे हेड्मास्तर शास्त्रीबोवांचे पूर्वाश्रमींचे गुरु वामन आबाजी मोडक हे होते. शास्त्रीबोवांनीं २४ व्या अंकांत ज्यांच्या पत्रास उत्तर दिलें होतें ते रत्नागिरीचे 'निबंधमालाहितेच्छु' हेच मोडक होत. शिवाय त्यांचे स्नेही जनार्दन बाळाजी मोडक हे तेथें फर्स्ट् ॲसिस्टंट् होते. सदर हेड्मास्तरांचें वर्तन शास्त्रीबोवांस इतकें चांगलें भासलें कीं त्यांनीं आपल्या वडिलांस लिहिलेल्या पत्रांत "My present Head-Master, too, I find, as every subordinate of his finds, to be eminently gentlemanly and sociable, and every moment I have been with him, I *cannot help looking back on that hateful tyranny that I have escaped*." (Italics ours. '*Ed*'.) असा उल्लेख केला आहे. 'सम्पादक'

‡ The Vernacular Press Act, 1877. लॉर्ड् लिटन् यांच्या कारकिर्दीत हा कायदा पसार झाला व या कायद्यामुळें कोणत्याहि डिस्ट्रिक्ट् मॅजिस्ट्रेटला अगर (राजधानीच्या शहरांत) पोलीस कमिशनर्ला देशी भाषेंतील वाटेल त्या वर्तमानपत्राची मुस्कटदाबी करण्याचा अधिकार मिळाला; व देशी भाषेंतील वाटेल त्या वर्तमानपत्राकडून स्थानिक सरकारच्या लहरीप्रमाणें जामीन घेण्याचीहि सोय झाली. संशयास्पद पत्रांकडून (to print or publish in such newspaper any words, signs, or visible representations, likely to excite disaffection to the Government established by law in British India, or antipathy between any persons of different races, castes, religions, or sects in British India) इतक्या गोष्टी न करण्याबद्दल बाँड् लिहून मागतां येऊं लागला व या बाँड्प्रमाणें वर्तन न झाल्यास जामीन जप्त करण्याचाहि अधिकार सरकारला मिळाला.

ज्ञानप्रकाशानें सुद्धां या बिलाबद्दल असें मत प्रदर्शित केलें होतें:—

"The Indian Vernacular Press Bill is so vaguely and indistinctly worded, that anything may be made to mean anything, provided only the omnipotent Magistrate of any given district is disposed or bent upon finding sedition in the utterances of any Vernacular paper. Let the legislative writings and publications be so distinctly and clearly worded that it would not be possible for any Magistrate, however disposed, to stifle free discussion, and then we will give our unqualified support to any legislative measure that Government may think it advisable to put forward for the accomplishment of the avowed object......We regret we are unable to enter our support to the present bill......" 'सम्पादक'

मोठ्या इंग्रेजी व एतद्देशीय वर्तमानपत्रांतून व विलायतेंतल्या जगभर फैलावणाऱ्या मोठमोठ्या पत्रांतूनही त्याविषयीं चर्चा झालीच आहे. या आक्टानें कोणत्याही जातीच्या अगर धर्माच्या लोकांस विरुद्ध येईल असा मजकूर किंवा सरकारच्या राज्यपद्धतीच्या संबंधानें विरुद्ध विचार हीं दोन्ही मना केलीं आहेत. तेव्हां अर्थातच 'ज्ञानोदय'प्रभृति बंधूंचा व सर्व सामाजिकांचा आह्मांस शेवटचा निरोपच घेणें आलें; व मेकॉलेप्रभृति देशदूषकांचा जो आह्मी प्रसंगवशात् शक्त्यनुसार समाचार घेत होतों तोही आतां बेताबातानेंच घ्यावा लागेल. या बंधनांचा जेव्हां आह्मीं विचार केला, व छुळलेला अंक बहुतेक सारा रद्द करून तो नव्या रुळीस लागू पडे असा पुनः नव्यानें लिहिला पाहिजे हें जेव्हां मनांत आणलें, तेव्हां कांहीं वेळ आमचा असा कल झाला कीं, हें काम अजीच बंद करावें हें बरें. पावलोंपावलीं अंग चुकवण्याची कसरत करीत मार्गक्रमण करण्यापेक्षां मुळींच मुक्काम करणें काय वाईट! आमच्या भाषेच्या हितार्थ व देशाच्या कैवारानें चार वर्षेपर्यंत जेवढे आमचे परिश्रम झाले तेवढे बस झाले. याप्रमाणें कांहीं दिवसपर्यंत आमची बुद्धि होऊन नाउमेद झाली. पण पुनः असें वाटूं लागलें कीं इतके दिवस चांगल्या प्रकारें चालू झालेला उद्योग टाकून देणें हें नीट नव्हे. आक्टाचा अंमल जेथपर्यंत पोंचूं शकत नाहीं असे पुष्कळ विषय आहेत; तर तेच हातीं धरून पूर्ववत् क्रम चालवावा. त्याप्रमाणें चालू अंकाचें काम आह्मीं पुनः हातीं घेतलें. यांतच गुंतलों असतां अकालिक वज्रपातासारखा कोणता भयंकर प्रसंग§ एकाएकीं येऊन गुदरला तो सर्वांस विश्रुत झालाच आहे. याविषयीं लिहिण्यास आमची लेखणी चालत नाहीं!

---

§ वडिलांच्या मृत्यूचा: १८७८ च्या मे महिन्यांत शास्त्रीबोवा रत्नागिरीहून पुण्यास आले. वक्तृत्वसभेची धामधूम चालूच होती. या सालीं कृष्णशास्त्री चिपळूणकरांची प्रकृति बरी नसल्यानें ते रोज सभेस जात नसत, व समारंभाचें विसर्जन सालाबादप्रमाणें त्यांच्या हातून व्हावयाचें तें न होतां १० मे रोजीं कुंट्यांच्या हस्तें झालें. याच उत्तररात्रीं Angina Pectoris च्या व्यथेनें कृष्णशास्त्र्यांच्या छातींत रात्रभर कळ येत होती. दुसरे दिवशीं बरें वाटलें पण पुनः १४ व १७ ला रात्रीं कळ येऊन ते गुराप्रमाणें ओरडूं लागले. डॉ. विश्रामनीं मॉर्फिया इंजेक्शन दिलें; पण कळ राहीना. त्यांच्या कुटुंबानें त्यांस रामनामोच्चार करण्यास विनविलें. पण ते ह्मणाले, 'Vishram, you are my God; I know no Vishnu or Ram.' दुसरे दिवशीं कळ राहिल्यावर छातीवर ब्लिस्टर मारण्यांत आलें. पुनः १९ तारखेस रात्रीं कळ निघून २० मे रोजीं दुपारीं थोरल्या शास्त्रीबोवांचा अंत झाला. विष्णुशास्त्री एक महिना हक्काचीरजा घेऊन घरीं राहिले. भाऊबंदकीची वाचावाच विष्णुशास्त्री व त्यांचे दुराग्रही चुलते सीतारामपंत यांमध्यें चालूच होती. तथापि रजा संपल्यानें कांहीं निकाल न लागतांच शास्त्रीबोवांस रत्नागिरीची वाट धरावी लागली. येवढ्यावरच भागतें तरी हरकत नव्हती; पण 'संकटें कधींहि एकाकी येत नाहींत' या न्यायानें त्यांची दुसरी बहीण दुर्गा हिचा अल्पवयी नवरा सप्टेंबरांत वारला. या प्रसंगासंबंधीं एका खाजगी पत्रांत शास्त्रीबोवा लिहितात:—'......This surely was the most malignant stroke of misfortune that could have befallen us. We may now be said to have fully

[पुढें चालू.]

आतां सरतेशेवटीं आमच्या वाचकांस येवढेंच सांगणें आहे कीं, हल्लीं आमचें पुस्तक जरी सहा महिने मागें पडलें आहे तरी हा खळगा भरून टाकण्याचेंही आह्मांस केवळ दुरापास्त वाटत नाहीं. भविष्यकाळाच्या संबंधानें कोणतेंही विधान करणें मानवांस शोभत नाहीं, पण सामान्यत: आपल्या उमेदीच्या मानानें व कार्याच्या मानानें तसें करण्यास मनुष्य धजावतें व तें बरोबरही आहे. तर आजपर्यंत उरकलेल्या कामावरून पाहतां वरील कार्य केवळ दुर्घट होय असें आमचें मन घेत नाहीं. कालेंकरून येवढी तूटही भरून येईल अशी आह्मांस उमेद आहे. हिजप्रमाणें पुढें जर कांहींच झालें नाहीं व आमच्या वाचकांची कुरकूर जशीची तशीच राहिली, तर मग एक मार्ग सिद्धच आहे. घड्याळ फार मागें पडूं लागलेंसें दिसलें तर तें पुन: बरोबर करण्यास जशी बिलकुल पंच ईत नसते,—कांटा फिरवून पुन: बारांवर आणून ठेवला ह्मणजे झालें,—त्याप्रमाणेंच आह्मीं आपल्या पुस्तकाकडून मंडूकप्लुति† करवली ह्मणजे झालें ! या मार्गाचें अवलंबन आह्मांसच पहिल्यानें करावें लागणार आहे असें नाहीं, एतद्देशीय मासिक पुस्तकांचा व चोहोंकडच्यांचा असा प्रकार अनेक वेळां झालेला आढळतो. पण ही प्लुति न करवण्याचीं अनेक कारणें आहेत. एक तर आमचें पुस्तक मागसलें तें मजकुराच्या तुटीमुळें किंवा वर्गणीच्या तुटीमुळें मागसलें आहे असें नाहीं. केवळ अपरिहार्य कारणांनीं तशी गोष्ट झाली आहे. तर हा खंड जसा केवळ आगंतुक कारणांनीं पडला आहे तसा क्रमाक्रमानें तो पूर्णही होण्याचा संभव आहे. दुसरें असें कीं, नियमितपणा सर्वथा इष्ट तर खराच, पण तो जर तादृश साध्य नाहीं तर त्याच्या अभावानें मासिक पुस्तकांतील विषयांची रसहानि होते असें आह्मांस वाटत नाहीं. विलायतेंतील त्रैमासिकांप्रमाणें चालू घडामोडींत जर आह्मीं आपली लेखणी शिरकवली असती, तर मग आमच्यावर टपका बरोबर आला असता, कीं फ्रेंच् व प्रशियनांचें युद्ध बडोदें प्रकरणाच्या वेळीं व बडोदें प्रकरण

---

entered the storm-line of the voyage of life. Instead of being over-depressed, therefore, let us be up and rally as soon as we can. Like sturdy sailors we should be prepared to encounter every species of adverse weather......" पण २६ सप्टेंबरच्या या पत्रांत अंतीं उल्लेखिलेलें धैर्य व संकटें सोसण्याची तयारी कसाला लावून पाहण्याकरितांच कीं काय कोण जाणे या साळच्या (१८७८) आरंभीं शास्त्रीबोवांस झालेला अशक्त मुलगाहि ऑक्टोबर् महिन्यांत देवाघरीं जाण्याची अघटित विधिघटना त्यांच्या कपाळीं आली ! दिवाळीच्या सुटींत परत पुण्यास घरीं येतात तों मातोश्री व चुलते यांचा पूर्ण बेबनाव झालेला ! पण सुटी संपल्यामुळें तिकडे कानाडोळा करून ते सपत्नीक रत्नागिरीस गेले. अशा प्रकारें १८७८ सालीं शास्त्रीबोवांवर कौटुंबिक अडचणींचा चौफेर घाला पडल्यामुळें निबंधमाला फार रेंगाळूं लागली.                                                    'सम्पादक'

† बेडकाची उडी: मधला कांहीं भाग गाळून एकदम पुढच्यावर उडी मारणें. सिद्धांतकौमुदींत 'क्रियाग्रहणं मण्डूकप्लुत्या अनुवर्तते' असा उल्लेख आहे. याचा व्याकरणांतील अर्थ मधलीं कांहीं सूत्रें गाळून मागच्या एकाद्या सूत्रांतील उल्लेख करणें असा आहे. अखेर अशा तऱ्हेची मंडूकप्लुति–मासिक मागसल्यामुळें कांहीं महिने विश्रांति घेऊन, अर्थातच मासिक महिन्याच्या दृष्टीनें तरी नियमित चालण्याच्या दृष्टीनें इतके महिने खाऊन टाकून-शास्त्रीबोवांना १८८०सालच्या प्रारंभीं करावी लागली. १८७९ च्या जानेवारींत वास्तविकपणें निघावयाचा एकसष्ठावा अंक १८८० च्या जानेवारींत निघाला.
'सम्पादक'

ष्मशामच्या लढाईचे वेळीं आह्मीं आणलें! पण तसा प्रकार इकडे कोणता आहे? जोतीबांच्या 'गुलामगिरी'चें विवेचन आगष्ट महिन्यांत यावयाचें तें नोवेंबरांत आलें किंवा मोरोपंताच्या कवित्वाचा विचार अमुक अमुक महिन्यांत व्हावयाचा तो अमुक अमुक महिन्यांत झाला ह्मणून काय बिघडलें? एका ऋतूंतलीं फळें दुसऱ्या ऋतूंत सपक लागतात किंबहुना अपायकारक होतात, तसा कांहीं प्रकार मासिक पुस्तकांतील विषयांचा असतो काय? तर हा मुख्य मुद्दा आमच्या वाचकांनीं नेहेमी ध्यानांत ठेवावा. तिसरें व्यवहारदृष्ट्या जर पाहिलें, तर इकडूनही आमचें दोषविमोचन बरेंच होण्यासारखें आहे. अगोदर आमच्या पुस्तकाची वर्गणी अगदीं थोडी आहे. ती जर जबरी असती तर उशिराच्या संबंधानें आह्मीं विशेष दोषास पात्र झालों असतों. त्यांतून या थोड्या वसुलाबद्दलही आमची बिलकुल सक्ती नाहीं. अंक मागसले असून आगाऊ पैसा देण्याबद्दल जर आह्मांकडून तगादा होता, किंवा मोठमोठ्या ढोबळया अक्षरांनीं वर्गणीदारांस वसुलाबद्दल अनेक वेळां सूचना दिल्या असत्या, तर आमच्यावर सदरील "ठळ"चा शब्द राहण्यास जागा होती. तेव्हां ज्या अर्थी आमच्या पुरस्कर्त्यांवर आह्मी कोणत्याही तऱ्हेचा भार घालीत नाहीं, त्या अर्थी त्यांनींही उशिराची बाब फारशी मनांत आणूं नये. आतां हें तर खरेंच आहे कीं, अशी उशिराबद्दलची हाकाटी असणें हें सद्यःप्रसूत अर्भकाच्या प्राथमिक रुदिताप्रमाणें अत्यंत शुभावहच होय. कां कीं, कित्येक बऱ्या बऱ्या पुस्तकांचीही अशी स्थिति आढळते, कीं त्यांचे अंक टपालांतून जे यावे ते जसेच्या तसे मेजावर पडावे, व तेथें त्यांस वाचनाचा सोहळा तर दूरच पण नुसता चाकूचा संस्कारही पुरता होऊं नये, व लवकरच तेथून पुस्तकालयांत त्यांचें शेवटचें स्थलांतर व्हावें! तर या मानानें पाहतां वरील प्रकार केवढा श्रेयस्कर आहे!

याप्रमाणें हल्लींच्या स्थितीच्या संबंधानें जें कळवणें होतें तें वाचकांस कळवलें. याखेरीज प्रस्तुत पुस्तकाच्या अनियमितपणाबद्दलचीं जीं कारणें आहेत तीं मागील वर्षाच्या उपसंहारांत विस्तारेंकरून सांगितलींच आहेत. तींही आमचे वाचक लक्षांत आणतीलच.

आतां सरतेशेवटीं एका गोष्टीविषयीं मात्र लिहून आटपतों. गेल्या ३९ व्या अंकांत मोरोपंतकृत 'शिवार्या' छापण्यास आरंभ केला होता; पण पुढें त्या मुळींच आल्या नाहींत. याचें कारण असें झालें कीं, आमच्या दोघां रत्नागिरीकर मित्रांनीं पुढें लवकरच 'काव्येतिहाससंग्रह' नामक सध्यां चालू असणारें मासिक पुस्तक काढण्याचा विचार आह्मांस कळवला. त्यावरून पंतांचा वरील ग्रंथ त्यांजकडे सोंपवण्याचा आह्मीं निश्चय केला. तो त्यांच्या पुस्तकांत लवकरच समग्र प्रसिद्ध होणार आहे.

# वर्ष सहावें.

**अंक ७२-निबंधमाला**—येथें आमच्या पुस्तकाच्या सहाव्या वर्षाची समाप्ति झाली. यास्तव आजपर्यंतच्या क्रमाप्रमाणें येथें सदरील पुस्तकाच्या संबंधानें व कांहीं अवांतर गोष्टींच्या संबंधानें कांहीं लिहिण्यासारखें आहे तें लिहून एकंदर वर्षाचा कारभार आटपतों.

प्रथमतः प्रस्तुत पुस्तकाच्या संबंधानें. या संबंधानें पहिल्यापासून जी एक हाकाहाक आहे ती अद्याप मिटली नाहीं. ही अर्थातच अनियमितपणाबद्दल होय. हिच्या संबंधानें आम्ही यापूर्वी अनेक वेळां लिहिलेलेंच आहे, यास्तव पुनः तेंच तेंच वाचकांस कळवण्यांत कांहीं हंशील नाहीं. आमच्या पुस्तकाचे विशेष काय काय आहेत ते ध्यानांत आणले असतां कोणाच्याही सामान्यतः लक्षांत येईल कीं, तें अगदीं तारखेच्या तारखेला निघणें म्हणजे दुरापास्तच होय. या विशेषांचें आम्हीं आजपावेतों कोठेंही सविस्तर निरूपण केलें नाहीं; पण ज्या अर्थी आमच्या वाचकांची व प्रतिपक्ष्यांची एका अनियमितपणाच्या दोषाबद्दल आम्हांस वारंवार टोंचणी सोसावी लागते, त्या अर्थी वरील विशेषांचा या खेपेस स्पष्टपणें उल्लेख करणें अवश्य वाटतें. पुढील निरूपण कोणाकोणाच्या मतें आत्मश्लाघेच्या व परनिंदेच्या सदरांत सामील होईल, पण त्यास आमचा इलाज नाहीं. आम्हांवर दोषारोप करण्याची जी मुभा आम्हीं सर्वांस दिली आहे तीच आपल्या स्वतःच्या तरफदारीकरतां आम्हीं स्वतः घेतली असतां आमच्यावर कोणीही न्यायी मनुष्य टपका ठेवणार नाहीं. तर आतां वरील विशेषांचा निर्देश करतों.

आमच्या पुस्तकाचा पहिला मोठा विशेष हा आहे कीं त्यांतील सारा मजकूर आम्हांस स्वतःचा नवा बनवावा लागतो. 'वेदार्थयत्न', 'षड्दर्शनचिंतनिका', माजी झालेला 'कौमुदीमहोत्सव' हीं जशीं व्याख्यात्मक मासिक पुस्तकें आहेत; 'नाट्यकथार्णव'$ हें जसें प्रायः भाषांतररूप आहे; 'काव्येतिहाससंग्रह' हें तर केवळ प्रकाशनरूपच आहे, तसा प्रकार 'निबंधमाले'चा नाहीं. वर सांगितला हा मासिक पुस्तकांचा एक वर्ग झाला. आतां दुसरा पाहा; या दुसऱ्यांत सध्यां चालू असणारें 'विविधज्ञानविस्तार' व यापूर्वी बुडालेलीं 'ज्ञानप्रसारक'‡, 'ज्ञानसंग्रह'† वगैरे यांचा अंतर्भाव होतो. या पुस्तकांतून जरी विषयबाहुल्य आढळतें, तरी त्यांत व आमच्या पुस्तकांत वर सांगितलेला मोठा विशेष कोणाच्याही लक्षांत येण्यासारखा आहेच. तो अर्थात् हा कीं वरील पुस्तकांतील बरींच प्रकरणें भाषांतरद्वारा उपलब्ध झालेलीं होत. तर आमच्या पुस्तकाच्या तर्फेनें वरील विशेष अंमळ ध्यानांत आणला असतां आमचें घड्याळ अगदीं तोफेबरोबर् कधींच चाललें नाहीं याचें आश्चर्य वाटण्यास कोणासही जागा राहणार नाहीं.

---

$ नाट्यकथार्णव (मार्च् १८७९ ते ऑगस्ट् १८९४) संपादक, शंकर मोरो रानडे व नारायण व्यंकाजी खोत, मुंबई. 'सम्पादक'

‡ ज्ञानप्रसारक, १८५०. 'सम्पादक'

† ज्ञानसंग्रह पहिली मालिका—(जानेवारी १८७३-जानेवारी १८७६) संपादक, वामन बाळाजी ओझरकर, अकोला व पुणें. 'सम्पादक'

त्यांतून वरील पुस्तकांपैकीं कांहीं, कांहीं काळपर्यंत मुळींच बंद पडून पुन: चालू करावीं लागलीं अशीं आहेत, व बहुतेकांस तीन तीन चार चार किंवा अधिक महिन्यांचाही गोता वेळोवेळ बसलेला आहे, व अजूनही बसतुच आहे, हेंही शोध केला असतां कोणासही समजणार आहे.[1] तशीच हीही एक लहानशी गोष्ट आमच्या आक्षेपकांनीं मेहरबानी करून जरा ध्यानांत आणण्यासारखी आहे, कीं आमचा आजपर्यंतचा हा सारा उद्योग केवळ एकट्याचा आहे!

आमच्या पुस्तकाचा दुसरा मोठा विशेष हा होय कीं, त्यांत लौकिक विषयांवर कधींही विवरण असत नाहीं. जगांत घडणाऱ्या घडामोडींविषयीं किंवा सामान्यत: आढळणाऱ्या लोकस्थितीविषयीं निबंधरचना करणें झाल्यास तें काम सुलभतेचें आहे हें उघड आहे. का कीं झालेल्या गोष्टीची हकीकत लिहिणें किंवा लोकांत साधारणत: ज्या विषयावर सहस्रश: ऊहापोह झालेला ऐकण्यांत किंवा वाचण्यांत येतो त्यावर निरूपण करणें हें काम मोठ्याशा श्रमाचें आहे असें नाहीं. पण आमच्या पुस्तकांतील विषय व त्यांच्या निरूपणाचा प्रकार हीं दोन्हीं वेगळीं. आमचे विषय प्राय: सर्व ग्रांथिक असून त्यांचें निरूपणही ग्रंथकारांच्या पद्धतीस अनुसरूनच केलेलें असतें. ह्मणजे कोणताही विषय घेतला तरी त्याचें प्रथमत: स्वरूपवर्णन, नंतर त्याचे विभाग, मग एकेकावर क्रमश: निरूपण, शेवटीं उपसंहार, असा प्रकार असतो. शिवाय जागोजाग विषयाच्या विशदीकरणार्थ भरपूर टिपाही असतात. तेव्हां ही पद्धति अंमळ लक्षांत घेतली असतां इकडूनही आमची तरफदारी थोडी होणारी आहे असें नाहीं. जे अशी अपेक्षा करतात, कीं वर्तमानपत्र जसें सकाळचें असलें तर सकाळीं, संध्याकाळचें असलें तर संध्याकाळीं, असें अगदीं ज्या वेळच्या त्या वेळेवर निघत असतें, त्याप्रमाणेंच मासिक पुस्तकानेंही पहिली तारीख चुकूं देतां कामा नये, त्या बिचाऱ्यांस मासिक पुस्तकांची योग्यता व स्वरूप हीं दोन्ही कळत नाहींत असें ह्मटलें पाहिजे. 'निबंधमाला' व 'विविधज्ञानविस्तार' हीं मासिक पुस्तकें आणि 'प्रेक्षक' व 'विनोद' हीं वर्तमानपत्रें जो सारख्याच दरानें लेखील तो अंधेर नगरीचें राज्य करण्यासच योग्य ह्मटला पाहिजे! बिचारीं 'प्रेक्षकें' इतक्यांतच किती वेळे 'साखरावगुंठित' होऊन बसलीं असतील? त्याप्रमाणेंच 'इनोदा'चेही किती गठ्ठे आताराच्या कामीं पडून आपल्या प्रकाशकाची कीर्ति जगांत उधळतील हें कोण सांगेल? वर्तमानपत्रांचा आयुर्दाय ह्मटला ह्मणजे सरासरी तो दिवस, किंवा पराकाष्ठा ह्मटली ह्मणजे तो आठवडा; खुद्द 'टाइम्स'ही बाळंतिणीच्या खोलीच्या खिडकीला डकवलेला किंवा हिंगजिऱ्याशीं सामील झालेला कोणीं पाहिला नसेल? तर ज्या वर्तमानपत्रांचें असें क्षणिक आयुष्य तीं कोणीकडे, आणि कधीं काळीं 'स्वकपोलकल्पित' शब्दाची योजना केली तिच्याबद्दल आज पृष्ठांचीं पृष्ठें वाद माजावा इतकी ज्यांतील लेखांची लिहिणारावर जोखीम राहते, तीं मासिक पुस्तकें कोणीकडे? याप्रमाणेंच भाषापद्धतीचा

---

१. 'वेदार्थयत्ना'चा परवां डिसेंबरचा अंक निघाला, 'षड्दर्शनचिंतनिके'चा जानेवारीचा निघाला, 'नाट्यकथार्णवा'चा आश्विनमासचा निघाला, व 'विविधज्ञानविस्तारा'चा अद्याप नोवेंबरचा निघायाचा आहे.

वगैरेही विचार करण्यासारखा आहे. मासिक पुस्तकांतून लेख प्रसिद्ध करायाचा तर तो लवकरच गबाळांत दाखल होण्यासारखा नसल्यानें त्यांत शब्दांची मांडणी, वाक्यांची जुळणी, विषयाची ठाकठिकी, वगैरे गोष्टींकडे किती लक्ष पुरवणें अवश्य असतें हेंही कोणाही समंजस मनुष्याच्या लक्षांत तेव्हांच येऊन चुकणारें आहे. सारांश, प्रस्तुत प्रसंगाच्या संबंधानें 'इसापनीतीं'तील 'कोल्ही व सिंहीण' ही मार्मिक गोष्ट आमच्या वाचकांनीं लक्षांत आणावी.

आतां आमच्या आक्षेपकांपैकीं कोणी कदाचित् ह्मणतील कीं वरील मजकूर सर्व खरा आहे, पण विलायतेंतील मासिक पुस्तकें व त्रैमासिक पुस्तकें वेळच्या वेळेवर निघतात कीं नाहींत? मग त्याप्रमाणेंच एतद्देशीय पुस्तककारांनींही कां व्यवस्था ठेवूं नये? या प्रश्नाचें उत्तर थोडक्यांत आहे. तें हेंच कीं, आमचें हिंदुस्थान विलायत बनण्यास अद्याप बराच अवकाश आहे; तर तोंपर्यंत दम खाऊन मग वरील चुणचुणीत आक्षेप काढणारांनीं काढावे. जी इंग्रेजी भाषा आज कित्येक शतकें सहस्रावधि महान् महान् ग्रंथकारांनीं परिश्रम करून अतिशयित कमावून टाकली आहे, व जींत आतां हवा तो विचार, हवी ती कल्पना, हव्या तितक्या तऱ्हांनीं अनायासें व्यक्त करतां येते, त्या भाषेची गोष्ट कोणीकडे; आणि जी भाषा आजपर्यंत अडाणी लोकांची ह्मणून जुन्या व नव्या पंडितांच्या अवहेलनेस पात्र झाली होती व जी ग्रंथकारांच्या उपयोगीं पडूं लागून कोठें वीस पंचवीस वर्षें झालीं न झालीं ती कोणीकडे! त्यांतून आलीकडील विद्वज्जनांची स्वभाषेवर भक्ति किती आहे ह्मणाल, तर हींत मोठमोठे विचार व्यक्त करण्याचें मुळींच सामर्थ्य नाहीं, व ही गांवढळ लोकांच्याच उपयोगी, हेंच तिच्याविषयीं नुकतें नुकतें बहुमत ठरल्यासारखेंच होतें! तेव्हां नुसत्या भाषेच्याच संबंधानें विचार केला, तर सध्यांच्या इंग्रेजी व मराठी भाषेंत तफावत झटली ह्मणजे आगगाडीच्या लोखंडी सडकेंत व डोंगराळ प्रदेशांतील वेडाबेडा वाटेंत जितकी आढळेल तितकी होय. ग्रंथरचनेचें बाह्यस्वरूप जी भाषा तिची नुसती ही गोष्ट झाली. आतां अंतःस्वरूप जे विचार त्यांच्या संबंधानें पाहिलें असतां इकडूनही इंग्लंड् व हिंदुस्थान यांत थोडा फरक आहे असें नाहीं. तिकडे अगोदर पूर्वींचा जमलेला ग्रंथसंग्रह किती आहे याचा कोणीं कधीं विचार केला आहे काय? तसें इकडे अद्याप काय आहे? नुसतीं ग्रंथरचनेचीं साधनेंच तिकडे किती आहेत बरें? कितीक प्रकारचे कोश, कितीक तऱ्हेचीं माहितीचीं पुस्तकें, पुस्तकालयें किती, सभा किती, पुस्तकांची किंमत किती स्वल्प! वरील सर्व गोष्टींचें इकडे आजच्या घटकेला तर सर्व प्रकारें वैगुण्यच आहे. पण इतकें तरी दूर कशाला? नुसत्या छापखान्यांचीच व्यवस्था तिकडची व इकडची पाहा ह्मणजे झालें! आमच्या इकडे प्रिंटर्‌पासून तों बाइंडर्‌पावेतों किती विद्वान् मंडळी असते, आपापल्या कामांत त्यांची दक्षता किती वाखाणण्यासारखी असते, याविषयीं छापखान्यांचा थोडाबहुत ह्मणून ज्यास अनुभव असेल तो सुद्धां खासें सर्टिफिकिट देईल! ग्रंथकारानें विणून तयार केलेलें कोरें सणंग कंपॉजिटर्, करेक्टर्, प्रिंटर्, इतक्या खाशा मंडळींच्या हाताखालून जाऊन शेवटची स्वच्छ परीटघडी निपजेपर्यंत किती ह्मपटाधोपट करावी लागते, व किती साबण खराब करावा लागतो, याची

कल्पना तरी आयता कपडा अंगावर घेणारास होते काय? तर आमच्या वाचकांपैकीं ज्या ज्या मंडळीस आमच्या पुस्तकाच्या अनियमितपणामुळें उद्वेग प्राप्त होत असेल त्यांनीं वरील कांहीं गोष्टी मनांत आणाव्या, व मुदपाकांत तयार होणारा पदार्थ पात्रावर आला असतां तो चटकावून टाकण्यास जितका वेळ लागतो, त्यापेक्षां आंत सिद्ध होण्यास पुष्कळच वेळ लागत असतो या प्रत्यहींच्या अनुभवाकडे अंमळ लक्ष पुरवावें. त्यांतून वरील खाद्य चांमलें पक्कें तयार होऊन खासें खुसखुशीत उतरावें, अशी जर भोक्त्यांची इच्छा असेल तर त्यांनीं तीन आण्यांच्या खाणावळींतल्या भोजनभाऊंप्रमाणें घर डोक्यावर घेण्याचा उद्योग करूं नये. त्यांनीं पाहिजे तर येवढा शोध ठेवावा, कीं आपले सूपकार हे चुलीवर अक्षता टाकून महानसांत (स्वयंपाकगृहांत 'सं.')सुखेंकरून शयन करताहेत, कां वसंतसेनेच्या वाड्यांतील पांचव्या चौकांत बुभुक्षु विदूषकाच्या नजरेस जो प्रकार *पडला तसा चालू आहे! तसें केलें असतां पहिला प्रकार आढळण्यांत येईल असें नाहीं. जो अग्नि एकदां सिद्ध झाला तो अद्याप जसाचा तसाच चालू आहे, त्यास अगदीं खळ नाहीं, त्याच्या पोषणार्थ लांकडांचे भारे वरचेवर येऊन पडताहेत, मसाल्याचीं पाळीं गच्च भरलीं आहेत, वरचेवर फोडणींचा चरचरीत प्रयोग होतोच आहे, हीच हालहवाल वरील प्रेक्षकांच्या दृष्टीस पडेल अशी आमची खात्री आहे. आतां कित्येक सूपशास्त्रज्ञांनीं आह्मांस कित्येक वेळां अशी इशारत केलेली आहे खरी, कीं तुमच्याकडून नेहेमी जो उशीर होतो त्यापेक्षां तुह्मीं एकदम खंडी अर्धी खंडी लांकडें चुलाण्यांत कोंबून एकदम धडाड जाळ करून मागला वचपा एका सपाट्यासरसा काढून टाकाना? गेल्या वर्षी मंडूकप्लुति करून तुह्मीं जें लघुत्व पतकरलें, त्यापेक्षां चिंचवडी धबडगा करून

---

* सदर प्रकार असा:—

चेटीनें पांचव्या चौकांत नेतांच विदूषक ह्मणतो:—

"आश्चर्यं भोः। इहापि पञ्चमे प्रकोष्ठेऽयं दरिद्रजनलोभोत्पादनकर आहरत्युपचितो हिङ्गुतैलगन्धः। विविधसुरभिधूमोद्गारैर्नित्यसन्तप्यमानं निश्वसितीव महानसं द्वारमुखैः। अधिकमुत्सुकायते मां साध्यमानबहुविधभक्ष्यभोजनगन्धः। अयमपरः पटच्चरमिव हतपशूदरपेशिं धावतिरूपिदारकः। बहुविधाहारविकारमुपसाधयति सूपकारः। बध्यन्ते मोदकाः। पच्यन्ते चापूपकाः। अपीदानीमिह वर्धितं भुङ्क्ष्वेति पादोदकं लप्स्ये। इह गन्धर्वसुरगणैरिव विविधालङ्कारशोभितैर्गणिकाजनैर्बन्धुलैश्च यत्सत्यं स्वर्गायत इदं गेहम्। भोः के यूयं बन्धुला नाम।"

याचा सारांश असा:—

अहो, काय हें आश्चर्य? या पांचव्या चौकांत तर दरिद्री बुभुक्षित लोकांस मोह पाडणारा हिंग, तेल वगैरेंच्या फोडण्यांचा घमघमाट तुमता दरवळून राहिला आहे! नेहमीं रागावणारें (तापणारें) हें स्वयंपाकघर आज जणों काय गाढ झोंपीं गेलें असून दाररूपी तोंडांतून निघणारे नानाप्रकारच्या गोड व मनोहर सुवासांचे फवारे त्याच्या घोरण्याचीच जाणीव करून देत आहेत. लाडू, घारगे, वडे, अनारसे वगैरे नानाप्रकारच्या खाण्याच्या पदार्थांच्या (ते तयार होत असतांना) सुटलेल्या सुवासानें माझ्या जिभेला तर पाणी सुटलें आहे.................. 'सम्पादक'

एक दोन भले खासे बत्ते उतरून लोकांची कूरकूर मिटवावी कीं नाहीं ? वरील वक्रोक्ति आमच्या हिताच्या होत्या खऱ्या, पण आह्मीं त्यांच्याकडे का दुर्लक्ष केलें याचें कारण कोणाही मर्मज्ञाच्या तेव्हांच लक्षांत येण्यासारखें आहे. तें हें कीं, अग्निमहाराज हे पाक-निष्पादक खरे, पण त्यांच्या तरी तब्येतीनेंच घेतलें पाहिजे. कोणी त्यांच्यावर जबरदस्ती करूं ह्मणेल, किंवा त्रैराशिकाच्या मापानें त्यांच्यापासून काम घेईन ह्मणेल, तर बिलकुल चालायाचें नाहीं. ब्रह्मदेवानें पदार्थमात्राच्या संबंधानें जे नियम एकदां लावून दिले आहेत ते त्यांसही अलंघ्य होत ! तर पदार्थविशेष सिद्ध व्हावयास जो काळ अपेक्षित आहे त्याचा संक्षेप करूं पाहणें, हें अत्यंत असमंजसपणाचें लक्षण होय. त्यांतून भोक्त्या मंडळीस आपल्या शरीरप्रकृतींची जर काळजी असेल तर अंमळ उशीर झाल्यापासून जी पीडा होणार आहे तिजपेक्षां अपक्व अन्न विशेष जाचणारें आहे, हेंही त्यांनीं ध्यानांत ठेवलें पाहिजे. सारांश, मासिक पुस्तकांचें काम लोकांत यथार्थ ज्ञानाचा प्रसार करण्याचें व भाषाभिवृद्धि करण्याचें होय; तर या मुख्य उद्देशाकडे जो नजर देईल व आपलें कर्तव्य चोख रीतीनें बजावूं पाहील त्यानें सांगकाम्याप्रमाणें बारांची तोफ घडकल्याबरोबर हातांतली पाटी खालीं टाकून द्यावी, व 'दिवस बुडाला आणि मजूर उडाला' या ह्मणीप्रमाणें अलगरजीपणा दाखवावा हें आह्मांस तर अत्यंत लज्जास्पद वाटतें. काम चोख होऊन तें वेळच्या वेळेवरही होईल तर फारच उत्तम हें तर उघडच आहे; पण तें आपल्या मनाजोगतें न होतां नुसतें घड्याळाच्या ठोक्या-बरोबर मात्र होतें आहे तर तें कांहीं उपयोगाचें नाहीं, व तो कारागीरही कुचकामाचा, अशी आमची तर समजूत आहे !

तर याप्रमाणें प्रस्तुत पुस्तकाच्या अनियमितपणाच्या संबंधानें जें आमच्या वाचकांस कळवणें उचित होय तें कळवलें. वरील उल्लेख यापूर्वींही कित्येक वेळां केलेलाच होता, पण इतका स्पष्टपणें कधींही केला नव्हता. तो प्रस्तुत समयीं तसा प्रसंग प्राप्त झाल्यामुळें एकदां सरतेशेवटचा ह्मणून केला आहे. तर आमचे आक्षेपक तो ध्यानांत धरतील, व यासंबंधानें पुन: लिहिण्याची आह्मांस तसदी देणार नाहींत व आपणही घेणार नाहींत अशी आशा आहे.

तेव्हां प्रस्तुत प्रकरणीं आमचा एकंदर अभिप्राय असा आहे कीं, आमच्याकडून होईल तितकी जलदी आह्मी करीतच असतों, व पुस्तकाच्या नियमितपणापासून वाचकांस आणि विशेषत: पुस्तककारांस किती फायदा होण्यासारखा असतो हेंही आह्मी पूर्णपणें सम-जतों; पण नियमितपणा साधून जर विषयनिरूपण यथास्थितपणें होत नाहीं, किंवा एकादी टीप एकादें पुस्तक वेळेवर न मिळाल्यामुळें लिहायाची राहत आहे, तर आमच्या आक्षेप-कांनीं कितीही हाकाटी केली तरी तिजकडे आमचें बिलकुल लक्ष जाणार नाहीं. जे निय-मितपणाचे येवढे चाहते असतील, कीं पहिली तारीख उजाडली न उजाडली कीं नवा अंक बाहेर पडावा, आणि असें होईल तरच तें मासिक पुस्तक, त्यांचें समाधान आमच्याकडून होण्याचा विशेष संभव नाहीं; व हें आह्मांस पहिल्यापासूनच माहीत असून त्याविषयीं

पहिल्याच अंकाच्या वेष्टनावर आह्मीं सुचवूनही ठेवलें होतें. * आतां हें खरें आहे कीं, आमच्या पुस्तकाची सन १८७८ सालापासून तर फारच अव्यवस्था झाली; पण तिजबद्दल आह्मांवर रास्तपणें कितपतसा दोष येईल हें कोणीही सांगूं शकेल. खरोखर पाहतां त्या सालीं व पुढें हें पुस्तक मुळीं बंदच पडावें अशी त्या वेळची स्थिति होती; पण तसल्या कचाट्यांतूनही आह्मी पार पडून सदरील पुस्तकास पुनः पहिल्याप्रमाणें सुरळीत रस्ता लागला हीच अगोदर भाग्याची गोष्ट ह्मणायाची! आलीकडे विद्याखातें दिवसांदिवस किती शहाणें होत चाललें आहे, त्यांत शहाण्या लोकांची कितपत बूज राहत आहे, प्रतिवर्षी काय काय नवे नवे आकट पसार होत आहेत,¹ वगैरे गोष्टींचा जो क्षणभर विचार करील त्यास आमची

---

* 'सूचना' या सदराखालीं पहिल्या अंकाच्या अखेर व वेष्टनावर मालेचा उद्देश व स्वरूप यांचा खुलासा करण्यांत आला होता. त्यांतील महत्त्वाचा भाग पुढें देत आहों:—

"......तो (उद्देश) मुख्यतः भाषाशोधनाचा तर आहेच; पण त्याबरोबर त्यांस (वाचकांस) मनोरंजन व बोधही कांहीं होईल अशी आशा आहे........यांतील मजकूर कोणाच्या द्वेषबुद्धीनें आह्मी कधीं लिहिणार नाहीं. जर त्यांत कोणास कांहीं गैर दिसून आह्मांस कळवण्यांत येईल, तर आमच्या चुका आह्मी मोठ्या संतोषानें माघारीं घेऊं. तसेंच त्यांत जें कांहीं अहंकारोक्तीसारखें कोणास दिसेल त्यांत सत्यनिरूपणाखेरीज दुसरा उद्देश कधींही असणार नाहीं........

'निबंध-माला' नांवाच्या पुस्तकांत नाटकांचीं, काव्यांचीं भाषांतरें; कल्पित कथा; देशवर्णनें; इत्यादि विषय शोभणार नाहींत........यास्तव या मासिक पुस्तकाच्या नांवाप्रमाणें यांत निबंध मात्र छापले जातील. ते प्रायः मराठी भाषेच्या, देशस्थितीच्या, लोकाचाराच्या संबंधाचे असतील. अवकाशानुसार इतिहासादि शास्त्रीय विषयांवरही लिहिण्याचा आमचा उद्देश आहे.

........वाचकांस एकच एक लांबलचक विषयाचा त्रास येईल यास्तव पुस्तकाच्या शेवटीं दर खेपेस विशेषतः मनोरंजन होण्यासारखा कांहीं मजकूर घालण्याचा आमचा बेत आहे. हा मजकूर उत्कृष्ट ग्रंथकारांचे उतारे, सुभाषित, विनोदपर चुटके, महदाख्यायिका ह्मणजे थोर लोकांच्या गोष्टी, अशा तऱ्हेचा असेल.

पुस्तक महिन्यांत केव्हां तरी निघून त्याचीं पृष्ठें ४०-५० असतील. कधीं कदाचित् अधिकही होतील. (जाड अक्षरें आह्मीं घातलीं आहेत; मुळांतील नव्हत.'सं०') 'सम्पादक'

१. डायरेक्टर साहेब बहादुरांनीं नुकताच गुजरायेंत एक वटहुकूम कोणता सोडून दिला आहे तो आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांस श्रुत झाला असेलच. तो हा कीं, कोणी मास्तर खाजगी रीतीनें कोणास शिकवण्याचें पतकरील तर विद्याखात्याच्या कामास पडणार नाहीं. मास्तरांनीं आपलें तन मन धन आपल्या सरकारी शाळेंत अर्पण केलें पाहिजे, दुसऱ्या यजमानाची मजुरी त्यांनीं पतकरतां कामा नये. वरच्याप्रमाणें 'अव्यभिचारिणी भक्ति' ज्या मेहरबानांनीं आज्ञापत्रद्वारें प्रतिपादन केली त्यांच्या कर्णपथावर पुढील गर्जना अद्याप आलीच नसेल काय?

"But during the time, this was not the only work I had to do. I was engaged, for five hours a day, in administering a large school consisting of more than 500 young men. The administration of a large High School, and this in a town like Poona, is not an easy task. Again, I had already undertaken editing and annotating on the systems of Indian phi-

(पुढें चालू.)

त्या वेळची स्थिति लक्षांत आणण्यास फारसे आयास पडणार नाहींत. येथील छापखान्याची व्यवस्था किती उत्तम प्रकारची असते याविषयींही आह्मीं वर उल्लेख केलाच आहे; मग छापखाना एकीकडे, लिहिणारा एकीकडे, व्यवस्थापक एकीकडे, अशी त्रिस्थली झाल्यावर तर काम किती चोख उठणार आहे हेंही सांगायाला नकोच! पण सुदैवानें हल्लीं मागील अव्यवस्थेचीं कारणें सर्व नाहींशीं झालीं आहेत. आमचें इत:पर स्थानांतर करण्याचें सामर्थ्य कोणामध्येंही राहिलें नाहीं; आह्मांस या पुढें हेड्मास्तराची रिमार्क्, इन्स्पेक्टर् साहेबांचा रिपोर्ट्, किंवा मेहेरबान डायरेक्टर् साहेबांची ऑर्डर् यांपैकीं कशाचाही तिळमात्र सुद्धां धाक बाळगण्याचें कारण उरलें नाहीं. एलिफास्१ साहेबांनीं आतां कितीही टकरा मारण्याचा आव घातला तरी त्यांची मस्ती जिरवण्यास आह्मांपाशीं आलीकडे पुष्कळ साधन झालें आहे. त्यांस 'केसरी'चें दर्शन करवलें किंवा 'मराठ्या'चा भाला अंमळसा चमकावला ह्मणजे काम झालें! पूर्वीं शाळाखात्याच्या काबाडकष्टाखालीं व पंजाबी कानूखालीं आमचें ग्रंथवाचन हवें तसें होत नसे; दरवर्षीं पांचपांचशें रुपयांचीं बुकें आणून कपाटांची व कसरीची धन करायाची, पण वरील गंजींतली एकादी काडीही कोणीं चावली कीं पुरे, तो लागलीच निमकहराम ठरायाचा, या वेडगळ काचांतून आह्मी सुटलों. आतां इंग्रेज ग्रंथकार, संस्कृत ग्रंथकार, व मराठी ग्रंथकार आहेत आणि आह्मी आहों! तिसरा कांटा ह्मणून आतां कोणताही उरला नाहीं. याप्रमाणेंच आजपर्यंत आह्मांस भाड्याचा रथ$ आणून युद्धप्रसंग करण्याची जी पाळी येत असे, तीही स्थिति जाऊन आतां आमचा स्वत:चा खासा रथ† पूर्णपणें सज्ज होत आहे; व आजपर्यंत मार्गाची जी विषमता असे तीही आतां बहुतेक वर सांगितल्याप्रमाणें नाहींशी

---

losoyhy in my "Studies in Indian Philosophy," a monthly periodical. This engaged me from day to day at least for three hours. When these circumstances are examined, the reader will realize the difficulties of my position." —*M. M. Kunte's Vicissitudes*

पण स्विफ्ट् साहेबांचें एक सर्वप्रसिद्ध सुभाषित आहे; तेंच येथें समाधानार्थ घेतलें पाहिजे:—

"कायदे—कायदे हीं कोळ्यांचीं जाळीं होत, त्यांत माशांप्रमाणें साधे भोळे जे कोणी असतात ते मात्र बिचारे गुंततात. पण गांधीलमाशांप्रमाणें जे मस्सल पटाईत असतात, ते त्यांतून तेव्हांच निसटून जातात!" (मधुमक्षिका—पृष्ठ १७).

१. 'एलिफास्' या सहीचें एक अप्रयोजक पत्र बॉम्बे गॅझिटच्या ता० ३ ऑक्टोबर् १८७६ च्या अंकांत आलें होतें. वरील शब्दाचा अर्थ 'हत्ती' असा आहे. या आक्षेपकाचा कोटिक्रम किती दुर्बळ होता हें पाहणें असल्यास अंक ३६ (पृष्ठें ६४१-६४८ 'सं०') पाहावा. त्यांत त्याचें खंडन केलें आहे.

$ निबंधमालेचे पहिले बावन्न अंक बाबाजी कृष्ण गोखले यांच्या ज्ञानप्रकाश छापखान्यांतून निघाले. ५३-५६ असे चार अंक मुंबईच्या "निर्णयसागर" छापखान्यांतून आणि ५७-६५ असे नऊ अंक पुण्याच्या "श्री शिवाजी" छापखान्यांतून निघाले. याप्रमाणें पहिल्या पासष्ठ अंकांत तीन छापखाने झाले. 'सम्पादक'

† आर्यभूषण छापखाना. सहासष्ठाव्या अंकापासून अखेरपर्यंत निबंधमाला शास्त्रीबोवांच्या स्वत:च्या "आर्यभूषण" छापखान्यांत छापून निघत असे. 'सम्पादक'

झाल्यासारखीच आहे. तेव्हां यापुढील मार्गक्रमण सुखाचें होईल असा अजमास दिसत आहे. याउपर काय होईल तें पाहावें.

वर जें आह्मीं आपल्या वाचकांस आश्वासन दिलें आहे त्याच्या दृढीकरणार्थ कांहीं भ्रमांचा निरास करणेंही येथें अवश्य वाटतें. हे भ्रम दोन तीन प्रकारचे आहेत. एक हा कीं, आमच्या लेखणीनें आजपर्यंत साठ सत्तर मजली मारल्या, तेव्हां साठसत्तरीच्या उमरींत जसें मनुष्य थकतें त्याप्रमाणेंच आमच्या घड्याळाचाही कांटा आतां रेंगाळायाला लागला यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ही कल्पना वस्तुस्थितीशीं कितपत जमते आहे याविषयीं बहुधां आमच्या कोणच्याही समंजस वाचकास कांहीं सांगायास नको. नुसत्या दूरच्या दुरून ज्यांनीं कांहीं तरी कल्पना लढवाव्या त्यांचा हा वेडगळ तर्क दिसतो. अवघी सृष्टि व लोकव्यवहार हीं किती अपरंपार विषयांनीं भरलेलीं आहेत, इंग्रेजींत ज्ञानाचें केवढें थोरलें कोठार आहे, संस्कृतांतील व महाराष्ट्रभाषेंतील सामग्री तरी केवढी आहे, या सर्व गोष्टी जो मनांत आणील त्यास वरील कल्पना किती कोती व मूर्खपणाची आहे हें तेव्हांच कळून येणारें आहे, आमची एकट्याचीच काय, पण आमच्याप्रमाणें सहस्रशः लेखण्या जरी आणखी चालू झाल्या तरी शतकांचीं शतकें विषय खल्लास व्हावयाला नकोत असा अनंतपार सागर वर सांगितल्याप्रमाणें भरून राहिलेला आहे ! या भूमंडळाला वेढून राहिलेला जो रत्नाकर त्यांतून आज हजारों वर्षे रत्नें काढण्याचा सपाटा चालू असतांही त्याचें रत्नाकरत्व जसें अद्याप आविच्छिन्नच आहे, किंवा इंद्राचे असंख्य हत्ती जरी प्रतिवर्षी त्यास शोषून साऱ्या जगाचा संताप जलासारानें दूर करतात तरी त्याच्या जलधित्वास जसा धक्का नाहीं, त्याप्रमाणेंच आमच्या पूर्वजांचीं भांडारें आह्मीं कितीही लुटलीं, व इंग्रेजांचा अर्थसंचय आटवून इकडील टांकसाळा कितीही सुरू केल्या, तरी वरील निधींचा कधीं तळ दिसूं लागण्याची पाळी येणार आहे ही कालत्रयींही गोष्ट काढायाला नको ! त्यांतून महाराष्ट्रभाषा ही जींस कधीं नांगर शिवला नाहीं अशा नूतन भूमिकेप्रमाणें आहे. हिची नुकती कोठें मशागत व्हावयाला लागली असून, पूर्वोक्त दोन महानद्यांच्या संबंधानें ही कोठें नुकती अंतर्वेदी बनत चालली आहे. मग वरील महानद्यांच्या पाटावर आह्मीं उगीच एक ल्हानसा वाफा तयार करून त्यांतील फुलांची माळ आपल्या देशबंधूंस प्रतिमासीं अर्पण करीत असतां इतक्यांतच जेव्हां वरील जमीन सत्त्व सोडील कीं काय याविषयीं मंडळी साशंक व्हावयाला लागली तेव्हां तिची किती धन्य ह्मणावी !

आमच्या पुस्तकाच्या संबंधानें पुष्कळांचे ठायीं दुसरा असा भ्रम दिसतो कीं, आह्मी बहुधां महिनाभर सुस्त पडून उगीच कोठें चार दिवस लेखणीला श्रम देतों व एक अंक भरून टाकतों. वाग्देवीची आह्मांवर जर येवढी बहाल मर्जी असती तर मग आणखी काय पाहिजे होतें ? आमच्या देशांतील लोकांस अद्याप ग्रंथकर्तृत्वाचीं मर्में चांगलींशीं कळूं लागलीं नाहींत असें ह्मटलें पाहिजे. वाग्देवीची उपासना किती बिकट आहे, ती सन्मुख येऊन उभी ठाके तोंपर्यंत किती आढेवेढे घ्यावे लागतात, आपल्या मनाजोगती ती सजणें हें अनेक प्रसंगीं

किती दुरापास्त असतें, इत्यादि रहस्यांचें ज्ञान स्वानुभवाविना प्रायः अगम्यच होय.[1] तेव्हां प्रस्तुत भ्रमाच्या निरासार्थ इतकेंच सांगतों कीं, ज्या आळस्याची आमचे आक्षेपक आमच्या ठायीं खुशाल संभावना करतात त्यास खरोखर पाहतां किती थोडा थारा मिळण्यास अवकाश आहे, हें वस्तुस्थितिवरून कोणाच्याही लक्षांत येईल. एक अंक आटपून टाकल्यावर आम्हांस पंधरा वीस दिवस झोंप घ्यावयाला सांपडते अशा भ्रमांत जे असतील त्यांस खरी हकीकत कळवली तर केवढें आश्चर्य वाटेल! ही खरी हकीकत अशी आहे कीं, एक टप्पा संपला कीं लागलीच दुसऱ्या टप्प्याला आम्हांला घोडीं जोडावीं लागतात, आणि याप्रमाणें आज सहा सात वर्षे क्रम चालला असतांही कालाची मजल आमच्यापुढेंच आहे. नाहीं म्हणायाला कांहीं अपरिहार्य कारणांनीं काय व्यत्यय येतो तेवढा येतो; बाकी गेल्या दशकांत कागदाला टाक लागल्याव्यतिरिक्त आमचे फारच थोडे दिवस गेले असतील![2]

आमच्या आक्षेपकांचा आलीकडे तिसरा असाही मुद्दा निघत चालला आहे कीं, तुह्मी इतकीं कामें सोसासोसानें अंगावर घेतां, मग हीं इतकीं निभणार तरी कशीं! 'निबंधमाला' आहे, 'काव्येतिहाससंग्रह' आहे, 'चित्रशाला' आहे, 'किताबखाना' आहे, 'न्यू इंग्लिश्

---

१. प्रख्यात कवि कौपर् यानें काव्यरचनापरिश्रमाविषयीं येणेंप्रमाणें लिहिलें आहे:—

"There is a pleasure in poetic pains
Which only poets know. The shifts and turns,
Th' expedients and inventions, multiform,
To which the mind resorts, in chase of terms
Though apt, yet coy, and difficult to win—
T' arrest the fleeting images that fill
The mirror of the mind, and hold them fast,
And force them sit till he has pencil'd off
A faithful likeness of the forms he views;
Then to dispose his copies with such art,
That each may find its most propitious light,
And shine by situation, hardly less
Than by the labour and the skill it cost;
Are occupations of the poet's mind"

—*The Task* II 285–298 'Ed'.

२. वर 'दशक' म्हटलें आहे त्यांतील तात्पर्य असें आहे कीं, माजी 'शालापत्रक' शेवटलीं चार वर्षे आह्मीं चालवलें. प्रस्तुत स्वतंत्र पुस्तक काढण्याची कल्पनाही बरीच सरकारी पुस्तकावरूनच आमचे मनांत प्रथमतः आली. 'कविता' या सदराखालीं 'शालापत्रकां'त जो मजकूर आह्मीं लिहिला होता, त्यापैकींच 'कालिदास', 'भवभूति', 'बाणभट्ट', 'सुबंधु', व 'दंडी', हे निबंधपंचक आह्मीं पुढें निराळें छापून प्रसिद्ध केलें. शेवटीं महाराष्ट्रकवितेवर लिहिण्याचा आह्मीं उपक्रम केला होता, पण तो (?तो.सं०) आमच्या मेहेरबान डायरेक्टर् साहेबांच्या आणि माजी ट्रान्स्लेटर् व डेप्युटी एज्युकेशनल् इन्स्पेक्टर् यांच्या पसंतीस न पडल्यावरून सदरील निबंध तसाच टाकून द्यावा लागला. पुढें लवकरच मे० चॅटफील्ड् साहेबांच्या आज्ञापत्रावरून बिचाऱ्या 'शालापत्रका'ची इतिश्री झाली!

स्कूल्' आहे, 'केसरी' आहे, 'मराठा' आहे, 'छापखाना' आहे,—हें आहे तरी काय? इतकीं कामें कोठें बोलली आहेत! आमचे प्राच्य आर्य ह्मणजे कसले नाजूक; उगीच तास दोन तास शिकवलें किंवा एक दोन पत्रें खरडली न खरडली, की त्यांनी हाय हाय, हुश्श हुश्श करीत लागलींच पडावें! मग एकादें दुसरें कामच जड होऊन त्याखालीं बेजार होऊन जावें असा इकडचा देशाचार असतां तो आह्मी मोडूं पाहतों हें आह्मांस किती अनुचित आहे बरें! या आक्षेपावर काय उत्तर द्यावें, हें खरोखरच आह्मांस सुचत नाहीं. बहुकार्यव्यापृतत्व हा जर आमच्या देशबंधूंस येवढा अक्षम्य अपराध वाटत असला, तर मग आह्मीं आपल्या देशाची मोठीच आगळीक केली यांत संशय नाहीं. वरील महादोषाबद्दल प्रायश्चित्त करण्याचा आह्मांस एकच मार्ग दिसतो; तो हा कीं, तज्जन्य पातक अधिकाधिक जोडीत जावें, ह्मणजे पूर्वी सांचलेल्याचा ऱ्हास होत गेला तर कोण जाणे! इतउत्तर याप्रमाणेंच प्रायश्चित्तविधि करण्याचा आमचा संकल्प आहे.

असो; येथवर दर वर्षाच्या वहिवाटीप्रमाणें सदर्हू पुस्तकाच्या संबंधानें आमच्या आश्रयदात्यांस कांहीं गोष्टी कळवण्यासारख्या होत्या त्या कळवल्या. आतां आमच्या स्वतःच्या संबंधाच्या इतर कांहीं गोष्टींविषयीं थोडेंसें लिहून आटपतें घेतों.

गेल्या सालीं, ह्मणजे ६० व्या अंकाच्या सरतेशेवटीं, आह्मीं आपली व विद्याखात्याची जी फारकत करून घेतली, तिजविषयीं आमच्या देशबंधूंस कळवून पुढें आह्मी कोणता मार्ग पतकरणार याविषयींही सूचना करून ठेवली होती. तर आतां वरील स्थित्यंतराचा जातीचा अनुभवही त्यांस थोडाबहुत कळवणें अवश्य वाटतें. आमची पूर्वजभूमि जें परशुरामक्षेत्र तिकडे आमच्या मेहेरबान डायरेक्टर् साहेबांनीं मेहेरबानीनें आमची रवानगी केली असतो मातःप्रयान् आह्मी आपल्या पुण्यजनमंडळींत येऊन जे दाखल झालों, व रौप्यशतकाचा प्रतिमासीं जो वरील अधिकाऱ्यांच्या कृपेनें आह्मांस लाभ होत असे त्यास आह्मीं आपणास वेडेपणानें अंतरविलें असतां गेल्या सालीं आमचा योगक्षेम कसा काय चालला, राजसेवा सोडून लोकसेवा पतकरल्याचा आह्मांस कधीं अनुताप झाला कीं काय, वगैरे गोष्टींविषयीं आमच्या वाचकमंडळींपैकीं कित्येकांस तरी जिज्ञासा वाटण्याचा संभव आहे. तर वरील मनोवृत्तीच्या तृप्त्यर्थ कांहीं मजकूर लिहिणें जरूर आहे. शिवाय सरकारी अधिकारी दरसालीं आपल्या कामाची वरिष्ठांस जशी सुनावणी करतात, त्याप्रमाणेंच आर्यभूमीच्या परमवंद्य चरणीं आह्मीं आपली दरवर्षीची सेवा प्रेमपुरःसर अर्पण केली असतां इकडूनही आह्मांस कांहीं गैर दिसत नाही. तर सन १८८० सालीं आह्मीं आपल्या आर्यबंधूंची काय काय कामगिरी बजावली तिचा खर्डा पुढें सादर करतों:—

**न्यू इंग्लिश् स्कूल्**—गेल्या वर्षी जें आह्मीं लिहिलें होतें, कीं आह्मी व आमचे कांहीं विद्यालयबंधु असे मिळून एक इंग्रेजी शाळा काढणार आहों तो वरील होय. हींत हल्लीं सुमारें चारशें विद्यार्थी आहेत. अभ्यास अगदीं पहिल्या बुकापासून तों मॅट्रिक्युलेशन्‌पावेतों चालतो. सदरील परीक्षेंत गेल्या खेपेस बारांतून आठ उमेदवार आमच्या शाळेंतून पास झाले, व एकास जगन्नाथ शंकरशेटची पहिली स्कॉलरशिप् मिळाली. वरील दोन गोष्टी

वरून सदरील 'स्कूल्'ची स्थिति बरीच लक्षांत येण्यासारखी आहे. आमच्या लोकांच्या ज्या कित्येक वेडगळ कल्पना आहेत, कीं सरकारचा नेट असल्याखेरीज नेटिव लोकांच्या हातून ह्मणजे कोणतेंही काम उठणें नाहीं, खाजगी शाळांतील विद्यार्थ्यांस युनिव्हर्सिटी पास करीत नाहीं, सरकारी मदतीवांचून नुसत्या लोकाश्रयावर शाळा चालणें केवळ अशक्य होय, डायरेक्टर् साहेबांचें नियमन, इन्स्पेक्टर् साहेबांची तपासणी, वगैरे सूत्रांखेरीज शालारूप शकट चालणें ह्मणजे अगदीं दुरापास्त,—या सर्व भ्रमांचा निरास 'न्यू इंग्लिश् स्कूल्'च्या एका वर्षाच्या कारकिर्दीवरूनही पुरतेपणीं होण्यासारखा आहे. आमच्या शिक्षकमंडळांत एक एल्एल् बी., दोन एम्. ए., व एक बी. ए. असे चार उपपदधारी आहेत, ही एक विशेषत: ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे!

**आर्यभूषण**—गेल्या वर्षाच्या उपसंहारांत सांगितलेला जो छापखाना तो हा होय. यांत पूर्वोक्त विद्यालयीन मंडळीच भागीदार असून त्यांच्या परिश्रमांवर हेंही अवाढव्य काम सुरू झालें आहे. आजपर्यंत इतर सर्व व्यापारांप्रमाणें छापखान्याचा उद्योगही अविद्वान् व अडाणी लोकच प्राय: करीत आले आहेत. यामुळें अज्ञानध्वंसनाविषयीं केवळ वज्रच असें जें मुद्रणयंत्र त्याचा प्रभाव व्हावा तितका अद्याप प्रगट झाला नाहीं. तो झाला असतां आज उघड्या माथ्यांनीं जे आपलें उन्नतत्व निर्भयपणें खुशाल मिरवीत आहेत अशा बिचाऱ्या कितीक मैनाकांस समुद्राच्या तळीं जाऊन दडून बसावें लागेल!

**मराठा व केसरी**—हीं दोन वर्तमानपत्रेंही वरील मंडळीच्या श्रमांचेंच फळ होत. पहिलें पत्र निवळ इंग्रेजी असून तें 'ज्ञानप्रकाशा'च्या येवढें निघतें, व दुसरें निवळ मराठी असून तें 'सुबोधपत्रिके'च्या येवढें निघतें. पहिलें वाचलें असतां बहुतेक मोठमोठीं इंग्रेजी वर्तमानपत्रें व मासिक पुस्तकें वाचल्याचें श्रेय येण्यासारखें आहे, व त्यामुळें दूरदूरच्या गांवीं सरकारी कामामुळें ज्यांस राहणें पडतें व जगांत काय चाललें आहे हें समजण्याचा ज्यांस चांगलासा मार्ग नसतो त्यांस तें विशेष उपयोगाचें आहे. दुसऱ्याचा उपयोग विशेषत: सामान्य लोकांस, ह्मणजे ज्यांस इंग्रेजीचा संपर्क नाहीं, किंवा जे खेडेगांवांतून राहणारे, त्यांस होण्यासारखा आहे. त्याविषयींची जाहिरात ६६ व्या अंकाच्या मलपृष्ठावर आलीच आहे, तेव्हां त्याच्या संबंधानें ज्यास्त लिहिण्याचें प्रयोजन नाहीं.

**काव्येतिहाससंग्रह**—हें पुस्तक आमच्या बहुतेक वाचकांस ऐकून तरी माहीत असेलच. हेंही आमच्या दोन विद्यालयबंधूंच्या साह्यानें आह्मीं १८७८ सालापासून सुरू केलें. त्यांपैकीं एकाकडे ऐतिहासिक भागाचें ह्मणजे बखरींचें प्रकाशन आहे, दुसऱ्याकडे महाराष्ट्रकवितेचें आहे, व तिसऱ्याचें आमच्याकडे आहे. या तिसऱ्या भागाच्या संबंधानें आह्मी आपलें नांव प्रकाशकांत घालणार होतों; पण नुसत्या 'निबंधमाले'वरूनच अधिकारी मंडळीचा आमच्यावर घुस्सा होता; मग 'माला'कर्तृत्वांत 'संग्रह'कर्तृत्वाचीही आणखी भर पडली असती तर 'पौरजानपदशिक्षणाधिष्ठात्या' महाराजांची तब्येत आमच्यावर किती जात राहती कोण जाणे? आमचें वरील पुस्तकांत अंग आहे, हें साहेब बहादुरांस पुढें चारमुखें

श्रवण झालेंच असेल; कां कीं, आपल्या नियुक्त मेषपातृत्वाखेरीज कोणी कांहीं करतो कीं काय याविषयीं साहेबांचें परम जागरूकत्व आहे. 'रासेलस्'मधल्या आनंदगुहेंत † जो एकदां शिरला त्यास जसें सारें गणगोत तेव्हांपासून अंतरलेंच, त्याप्रमाणेंच मेहेरबानांच्या मेंढवाड्यांत शिरून ज्यानें डिपार्टमेंटाला एकदां आपला देह वाहिला त्यानें मग दुसरी तिसरी भानगड कांहीं करतां उपयोगीं नाहीं. कायद्याचा अभ्यास करणें, वर्तमानपत्रास मजकूर पाठवणें, मासिक पुस्तक चालवणें, लोकसमाजास जाणें, हे सारे निवळ बदमाषीचे प्रकार! वरील घोर अपराधांच्या संबंधानें साहेबांस कोणाच्या संबंधानें बातमी मिळाली पुरे, कीं लागलीच काळें पाणी!!

**चित्रशाळा**—आमच्या वाचकांपैकीं कित्येकांस माहीत असेलच कीं, 'काव्येतिहासा'च्या तिसऱ्या अंकांत नाना फडणविसाची लहानशी रंगीत तजवीर घातली होती. तो चित्रशाळेचा आरंभ होय. तेव्हांपासून सुधारणा होतां होतां हल्लीं रामपंचायतन, शिवपंचायतन येथपर्यंत मजल येऊन ठेपली आहे. या तजबिरींचें काम कोणत्या तऱ्हेचें झालें आहे हें आह्मीं स्वतः सांगण्याची आज गरजच उरली नाहीं. हजारों प्रती उडून दूरदूरच्या गांवांहूनही त्यांजविषयीं प्रतिदिवशीं मागण्या येत आहेत. असो; या उद्योगाच्या संबंधानें आमच्या वाचकांस विशेषेंकरून येवढीच एक गोष्ट कळवायाची आहे कीं, आमच्या इतिहासप्रसिद्ध पुरुषांच्या मूर्ति चिरकाळ राहाव्या येवढ्याकरतां मुळीं हा कारखाना आह्मीं काढला, व हल्लीं वरील तजबिरी जेवढ्या पैदा झाल्या तेवढ्यांचा आह्मीं संग्रहही करून ठेवला आहे; तर आमच्या शोधक मित्रांनीं आणखी कांहीं शोध लागल्यास आह्मांस वरदी (वर्दी ? सं०) द्यावी. वरील ऐतिहासिक मंडळी अवकाशानुसार हातीं घेण्याचा आमचा इरादा आहे.

---

† आफ्रिका खंडांतील हबशी देशाच्या एका मोठ्या प्रतापी बादशहाचा चौथा मुलगा. राजघराण्यांतील मुलांमुलींस त्यांची गादीवर बसण्याची पाळी येईपर्यंत प्रतिबंधांत असल्याप्रमाणें एकाद्या वाड्यांत एकीकडे ठेवण्याची चाल उष्ण देशांतील कित्येक मुलुखांत फार प्राचीन काळापासून असे. हबशी देशांत या हेतूनें आह्मारा राज्यांतील एक मोठी प्रशस्त गुहा योजिली होती. तिच्या भोंवतीं डोंगर असून एका डोंगरास असलेल्या विवरांतून आंत जाण्याची वाट होती. या विवराबाहेर मोठी किर्र झाडी असून तोंडाशीं फारच प्रचंड असा लोखंडी दरवाजा होता. तो इतका अवाढव्य होता कीं, यांत्रिक सहाय्यावांचून मनुष्यांस उघडतां झांकतां येत नसे. या गुहेचें नांव आनंदगुहा. हींत सृष्टिसौंदर्य खचून भरलेलें असे. सुखसोयींची व आनंददायक वस्तूंची रेलचेल असे. दुःखाची छायासुद्धां येथें दिसूं नये याबद्दल इतकी काळजी घेण्यांत येई कीं नवीन येणाऱ्या माणसाला अशी स्थिति नेहमीं लाभावी अशी इच्छा होई. बादशहा दरसाल एक वेळ आठ दिवस आंत येऊन राहत असे व येतांना खूप ऐषआरामाचे जिन्नस घेऊन येई. येथील राजपुत्रांस सौख्य व विश्रांति यांच्या कोमल वैचित्र्याचा नित्य अनुभव घडे. संसारांत इतरांच्या वांट्यांस येणाऱ्या दुःखांची व संकटांची त्यांस स्वप्नांतहि कल्पना नसे. शिक्षकहि त्यांस सांगत कीं या गुहेबाहेर सर्वत्र दुःखें भरलीं असून तेथील माणसें परस्परांशीं भांडून एकमेकांचे जीव घेतात. या योजनेमुळें बहुतेक सर्व राजपुत्र तेथेंच रमत व बाहेर जावें असें त्यांस वाटत नसे. पण रासेलसला मात्र या प्रकाराचा कंटाळा आला व पुढें इम्लाक नामक विद्वान् कवीची भेट होऊन त्याच्या सहाय्यानें त्या गुहेला एक विवर पाडून त्यांतून तो जगाचा अनुभव घेण्यासाठीं बाहेर निघून गेला. 'सम्पादक'

**किताबखाना**—या नांवाचें येथें बुधवार पेठेंत आमचें दुकान आहे. यांत चित्रशाळेंत तयार झालेलीं चित्रें, व इंग्रेजी, मराठी आणि संस्कृत या तिन्ही भाषांतील पुस्तकें विक्रीस ठेवलेलीं आहेत. सदरील पुस्तकांची यादी यापूर्वी एकदां एका अंकाबरोबर आमच्या वर्गणीदारांकडे आलेली होतीच. आतां लवकरच पूर्वीपेक्षां मोठी व सविस्तर याद आह्मी तयार करणार आहों. तिच्या आरंभीं सदरील दुकान स्थापण्याचा उद्देश वगैरे सर्व आमच्या देशबंधूंस आह्मी सविस्तर कळवणार आहोंच, यास्तव येथें कांहीं ज्यास्त लिहीत नाहीं.

तर याप्रमाणें ही उद्योगपरंपरा आह्मीं उपस्थित केली आहे. हिचें वरच्याइतकें दिग्दर्शन तूर्तच्या प्रसंगीं पुरें आहे; तिचा जसजसा विस्तार होईल तसतशी तिजविषयींची हकीकत आमच्या देशबंधूंस कळत जाईलच. यास्तव आतां सरतेशेवटीं एका गोष्टीविषयीं मात्र थोडासा उल्लेख करून वाचक मंडळीची रजा घेतों. ही गोष्ट येवढीच कीं, आह्मीं हा जो नवा पसारा घातला आहे, यापासून तूर्त जरी मोठासा फायदा दिसणार नाहीं, तरी आजही वरील बहुतेक उद्योग फलोन्मुख झाले आहेत, व लवकरच हे आमच्या पूर्वस्थितीचें आह्मांस स्मरणही होऊं देणार नाहींत, अशी आह्मांस पुरती उमेद आहे. निदान सध्यांची इतकी तरी स्थिति आहे, कीं आह्मीं मेहेरबानांच्या पायांस अंतरलों या गोष्टीचा आह्मांस अनुताप होण्यास यत्किंचितही कारण उरलें नाहीं. राजसेवारूप खडतर जमिनीला स्वातंत्र्यदाहाचा संस्कार लावून व स्वतःस हीनत्व आणणाऱ्या नानाविध श्रमांनीं तिची प्रसन्नता संपादण्याचा खटाटोप करूनही जें पळतें पीक आमच्या पदरीं कधींही पडलें नाहीं, तेंच आतां स्वातंत्र्याचा अपहार न होतां व पहिल्यासारखी हमालीची दगदगही न पडतां हंगामाच्या वेळीं खुशाल आमच्या घरीं आपल्या पायांनीं चालून येत आहे. तर परम लाभप्रद व उन्नतिप्रद अशी जी ही आर्यभूमीची सेवा तिजकडे दिवसांदिवस तिच्या बाळगोपाळांची मनःप्रवृत्ति होत जावो अशी 'सत्यसंकल्पदात्या' प्रभूपाशीं उत्कंठापूर्वक प्रार्थना करून याच भरतवाक्यानंतर जवनिकेंत अंतर्धान पावतों!

---

# लोकहितवादी.

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदान्धः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः।[1] —नीतिशतक (८, पूर्वार्ध,'सं०') भर्तृहरि.

अंक ६४.—(१) विषयोपन्यास. (२) लोकहितवादी. (३) त्यांच्या ग्रंथांचें सामान्य स्वरूप. (४) त्यांतील मतें. (५) ग्रंथरचनेचा उद्देश.

---

१. "जेव्हां मी अल्पज्ञ होतों तेव्हां हत्तीसारखा मदांध होतों, आणि मी सर्वज्ञ आहें असा माझ्या मनाला गर्व झाला होता!"

१. वरील नांवावर$ प्रसिद्ध झालेले पांचसात ग्रंथ आमच्याकडे आल्याला बरेच दिवसें

---

$ रावबहादुर सरदार गोपाळ हरि देशमुख, लोकहितवादी, अर्थात् (जन्म १८२३, मृत्यु १८९२). बाजीराव पेशव्यांनीं पेशवेपद सोडल्यावर त्यांचे वकील ह्मणून पुण्यास राहणाऱ्या हरिपंत देशमुखांचे द्वितीय कुटुंबाचे द्वितीय (मधले) चिरंजीव. बाराव्या वर्षी गोपाळरावांचे सावत्र बंधु वारले, व त्या दुःखांतच वडिलांचाहि अंत झाला. त्यांच्या पश्चात् तिघां मुलांस २०० रु. प्रत्येकीं व कुटुंबास ६०० रु. ची सालिना नेमणूक सरकारांतून मिळाली. पण एक दोन वर्षांत शिक्षण सोडून गोपाळरावांनीं पुण्याच्या न्यायाधीश कचेरींत उमेदवारी पत्करली. पण इंग्रजी शिक्षण नसल्यानें नडतें असें पाहून पुनः अठराव्या वर्षी उमेदवारी सोडून ते इंग्रजी शाळेंत जाऊं लागले. तीन वर्षांत स्कूलबोर्डाची शेवटची परीक्षा देऊन इंग्रजी व इतिहास या विषयांत त्यांनीं अप्रतिम प्रावीण्य मिळविलें. लगेच त्यांस ७७ रु. दरमहाची पुण्याच्या सरदारांच्या एजंटाचे कचेरींत नोकरीहि मिळाली. पुणें नेटिव्ह जनरल् लायब्ररी (स्था. १८४८), तसेंच १८४० सालीं विष्णुशास्त्री बापटांनीं पुनर्विवाहाचा चालू केलेला पुरस्क वगैरे तत्कालीन संस्था व चळवळी यांसंबंधीं, तसेंच हिंदु समाज व त्याच्या चालीरीती यांम वैगुण्यासंबंधीं यांची शंभरांवर पत्रें १८४८ सालीं 'प्रभाकर' साप्ताहिकांत प्रसिद्ध झालीं. ज्ञानप्र इंदुप्रकाश हीं पत्रें त्यांच्याच प्रेरणेनें निघालीं. गोपाळराव 'लोकहितवादी' या टोपण नांवानें त्यांची दृष्टि अंतर्मुख असे. राजकीय सुस्थिति येण्यास आपले सामाजिक दोष आधीं पाहिजेत या सुधारकी मताचे ते आद्य जनक होत. त्या वेळींहि बहिर्मुख दृष्टीचे, आधीं उन्नति झाल्याशिवाय सामाजिक सुधारणा अशक्य आहे अशा मताचे, एक 'यथार्थवादी' प्र त्यांस लाभले होते. याप्रमाणें 'आधीं सामाजिक कीं आधीं राजकीय?' या आजवर चालू वादाचीं मुळें गोपाळरावांपर्यंत पोंचतात. १८४६ सालीं गोपाळरावांनीं मुनसफीची परीक्षा दि[illegible]धानें मध्यें त्यांस वांईस मुनसफीची जागा मिळाली. पुढें 'इनाम कमिशन्'वर मुंबई सरकारनें असिस्टंट कमिशनर् ह्मणून दरमहा तीनशें रुपयांवर त्यांची नेमणूक केली. हें काम व गोपाळरावांची ही नोकरी १८६१ मार्चमध्यें संपली. मुंबई हायकोर्टानें सुरू केलेल्या हिंदु व मुसलमानी धर्मशास्त्रांच्या आचार मार्गांचा गोषवारा (Digest) तयार करण्याच्या कामीं गोपाळरावांनीं बरीच मदत केली. मुंबई सरकारनें सिव्हिल् सर्व्हिसमध्यें गोपाळरावांची नेमणूक करावी अशी शिफारस स्टेट् सेक्रेटरीकडे केली, पण गोऱ्या सिव्हिलियनांच्या गिल्ल्यामुळें स्टेट् सेक्रेटरीची मंजुरी मिळाली नाहीं. तरी पण १८६५ सालीं त्यांस मुंबईस स्मॉल्- कॉज कोर्टांत ॲक्टिंग् जज्ज नेमण्यांत आलें व १८६७ सालीं ते अहमदाबाद स्मॉल्कॉज कोर्टाचे कायमचे न्यायाधीश झाले. १८७६ सालीं त्यांची नाशिकास बदली झाली. तेथून ठाणें, अलीबाग, मुंबई वगैरे ठिकाणीं बदल्या झाल्यावर १८७८ सालीं त्यांनीं पेन्शन् घेतलें. पुढें ते अखेरपर्यंत पुण्यासच राहत असत. १८७६ सालीं ते रा. ब. झाले, १८७७ त जे. पी. झाले व १८७८ त मुंबई विद्यापीठाच्या सेनेटचे सभासद झाले.

अहमदाबादेस असतां त्यांनीं अनेक लोकोपयोगी संस्था स्थापल्या व चळवळी सुरू केल्या. १८४८ पासून सामाजिक विषयांवर कडक पत्रें लिहून ब्राह्मणांच्या चालीरीतींवर कोरडे ओढणाऱ्या गोपाळरावांवर १८६० सालीं संस्कृत पाठशाळा बंद झाल्यावर दक्षिणाफंडाच्या विनियोगाचे वेळीं संस्कृत विद्या निरुपयोगी असल्यानें शास्त्रीपुराणिकांना दक्षिणा देण्याऐवजीं मराठी भाषेंतून पुस्तकें लिहविण्याकडे तो पैसा खर्च करावा असा अर्ज देशमुखप्रभृति सात गृहस्थांनीं केल्यामुळें वेदनिंदेचा आरोप करून ग्रामण्याची चळवळ करण्यांत आली होती. तद्वतच अहमदाबाद येथें असतां १८६९ सालीं मुंबईस गवळी तलावाजवळ झालेल्या पुनर्विवाह प्रकरणांत अनुकूल पत्रकावर सही केल्या वेळीं

(पुढें चालू.)

पडतील, व सदहूप्रमाणेंच प्रस्तुत लोकहितवादींचीही स्थिति आहे. त्यांचे ठायीं या देशाचें कल्याण व्हावें ही इच्छा जरी पूर्णपणें वागत आहे, आजपर्यंत अनेक कार्यांत त्यांनी शक्त्यनुसार आपला वांटा जरी बराच उचलला, तरी अनेक प्रसंगीं मागील पिढीच्या मंडळीस जें अपयश आलें त्याचे हेही अंशभाक् झाले हें लोकविश्रुतच आहे. याशिवाय वरील अपयशाहूनही लांछनप्रद व लोकहितवादी या नांवाला न साजणारें असें आचरण यांच्या हातून अनेक प्रसंगीं घडलें आहे हेंही सर्वप्रसिद्धच आहे. या आचरणाची वाच्यता येथें करण्याचें प्रयोजन नाहीं. कां कीं लोकहितवादींच्या लौकिक वर्तनावर आम्हांस चर्चा करणें नाहीं, ग्रंथकर्तृत्वाच्या नात्यानेंच आम्ही त्यांजविषयीं मुख्यत: लिहिणार आहों. तरी लोकहितवादींचें पूर्ण स्वरूप लक्षांत येण्यास वरील दिग्दर्शन अवश्य होय. यास्तव तें करून आतां मुख्य विषयास लागतों.

३. लोकहितवादींनीं गेल्या चाळीस वर्षांत हजारों ठिकाणीं भाषणें केलीं आहेत, व शेंकडों लेख वर्तमानपत्रांत लिहिले आहेत. ग्रंथ हें नांव सर्वथा शोभण्यासारखी स्वतंत्र, ठाक-

---

लौकिकास, मानसिक स्वातंत्र्यास, स्वीकृत सत्पक्षाच्या अभिमानास, स्वपक्षानुयायिबंधुवर्गास, बारंबार खात्रीपूर्वक दिलेल्या अभिवचनांस आणि विशेषत: हृदयप्रेमाधिष्ठानरूप मूर्तीच्या अत्यंत नूतन वियोगास व स्मरणास अनुचित अशी पुन: संसारारंभ करण्याची तयारी केली, तेव्हां सर्व सुज्ञांस आणि विशेषत: तत्पक्षानुयायिजनांस फार वाईट वाटलें.........या समयीं दुसऱ्या एका अध्वर्यूनें फार दु:खाक्रोश केला व तो त्याच्या लौकिक धर्मांप्रमाणें सर्व सुधारलेल्या राष्ट्रांतील विद्वज्जनसमूहास श्रुत करवून त्यानें स्वपक्षाची दुर्बलता व दांभिकता जगजाहीर केली. त्यांतील पुढील विलापपर लेख किती करुणापर आणि हृदयभेदक आहे पाहा:—

'Oh, the utter degradation and rottenness into which India's sons are wallowing! It cannot admit of a question that Mr.—has given a severe blow to the cause of widow-marriage...........If grown up men, educated in the highest degree and occupying the position of leaders of their generation, blessed with uncommonly high qualities of the head and heart, cannot withstand, in cirtical times, the importunities and threats of their fathers and patiently undergo the consequent ill consequences, when those importunites and threats are subversive of the most serious public reforms, which they have deliberately and solemnly espoused before God and man, they and the people they are by their position to lead, must forever continue children and all their efforts end in worse than child's play.'

याप्रमाणें आमच्या पुढारी लोकांची दुर्दशा आहे. प्रसंगीं धीर धरून वागण्याचें सामर्थ्य त्यांस नाहीं......त्यांनीं आपल्या हृदयशून्य भाषणानें कंठशोष केला आणि गहिंवर काढून टपटप नेत्राश्रुमार्जन केलें, त्यांचा चार दिवस वर्तमानपत्रांतून गौरव झाला, जाडा वक्ता, जबरा लिहिणारा, काय बुद्धि, केवढें कोटिक्रमचातुर्य, अशी स्तुति होऊं लागली, तरी परीक्षणसमयीं त्यांचें ढोंगकावेबाजपण अथवा दांभिकपण प्रकट झाल्याविना राहावयाचें नाहीं." 'सम्पादक'

ठिकीची, सविस्तर रचना त्यांच्या हातून अद्याप झालेली नाहीं. जो मजकूर जसा बोलाव
तसाच तो लिहून छापायाला पाठवावा हाच त्यांचा क्रम आजपर्यंत चालत आला आहे
असे फुटकळ लेख एकत्र करून ते त्यांनीं 'निबंधसंग्रह'$ या नांवानें छापून प्रसिद्ध केले आहे
व ठाणें, मुंबई वगैरे ठिकाणीं दिलेलीं व्याख्यानेंही कांहीं छापवलीं आहेत. पंचवीस ती
वर्षांपूर्वी ही सुबोध व साधी निबंधरचनेची पद्धत लोकांस हितावह होती हें खरें; कार
एकंदर लोकसमुदायांत त्या वेळेस विद्येचा प्रसार नुकता कोठें होऊं लागला होता. सरका
रानें लोकशिक्षणाकडे चांगलें लक्ष देऊन लोकांत लिहिण्यावाचण्याचा प्रघात सुरू केला होता
व त्यामुळें ज्ञानाची अभिरुची त्यांचे ठायीं उत्पन्न होऊं लागली होती. अशा समयास 'नि
धसंग्रहां'तल्यासारखे लेख लोकांच्या नुकत्या जागृत झालेल्या विचारशक्तीस चांगलें खा
होतें. पण वरील निबंध सध्यांच्या स्थितीला झटलें म्हणजे ज्वानींत आलेल्या मनुष्यास ज
बोंडलीं भरभरून दूध पाजावें त्यासारखेच एकंदरीनें होत. ज्या वयांत भरभक्कम पेलेचे पे
उठायाचे, किंबहुना शक्त्यनुसार चरव्याच्या चरव्या तोंडाला लागायाच्या, त्या काळा
हे लुटुपुटीच्या खेळांतल्यासारखे छोटे छोटे लेख काय उपयोगी ? ज्यास अर्वाचीन विद्ये
बराच संस्कार झाला आहे, तो जर प्रस्तुत ग्रंथकाराच्या बड्या नांवास भुलून त्यानें निर्मा
केलेल्या ग्रंथरूप महासागराचा [२] प्रथमांश जो 'निबंधसंग्रह' या नांवानें प्रसिद्ध झाला आ

१. लोकहितवादींनीं आलीकडे कांहीं मोठाले ग्रंथ केले आहेत खरे; पण तेही प्रायः भाषांत
रूपच असून ग्रंथकर्त्याचाच त्यांतील भाग झटला ह्मणजे एका अंगची भली मोठी प्रस्तावना
दुसऱ्या अंगचीं लांबच लांब परिशिष्टें हा होय. तेव्हां एकंदरींत पाहतां वरील आक्षेप अजूनही ला
पडणाराच आहे.

$ 'वृत्तवैभवा'चे मालक खंडेराव बाळाजी फडके निबंधसंग्रहाच्या प्रस्तावनेंत लिहिता
"ह्यींचा हा ग्रंथ ( शिळाछापावरील अकराशें पृष्ठांचा निबंधसंग्रह 'सं०') त्या एकंदराचा (स
लेखांचा 'सं०') दशमांश झटला तरी शोभेल." आणि या ग्रंथाच्या प्रकाशनानंतर सुमारें दोन त
लोकहितवादी ह्यात असून त्यांचे वक्तृत्वलेखनादि व्यवसाय चालूच होते. लोकहितवादींचा ग्रंथ
विस्तार किती अफाट होता याची थोडीफार कल्पना यावरून येण्यास हरकत नाहीं. मूळच्या थो
पण कालगतीनें डबघाईस आलेल्या घराण्यांत जन्मास येऊन उद्योगपरतेच्या जोरावर महत्त्वा
चढलेल्या या उपकारशील उदार पुरुषानें जाहिरात लावून पुस्तकालयांस आणि ज्ञानसंपादनेच्छु
वाचनेच्छु बांधवांस आपले ग्रंथ स्वमतप्रसारार्थ मोफत वाटले." 'सम्पादक'

२. 'निबंधसंग्रहा'च्या आरंभीं ग्रंथप्रकाशकानें§ 'सूचना' या सदराखालीं पुढील मजकूर घातल
आहे—

"या विद्वान् ग्रंथकाराचे परोपरीच्या विषयांवरील शोध व विचार पाहून कोणासही नव
वाटल्यावांचून राहणार नाहीं. आलीकडे नेटिव विद्वान् बहुत असतील व यांहूनही अधिक विद्वा
असतील, पण त्यांनीं असे अनेक विषयावर स्वीय विचाराचे लेख लिहिलेले कोठें आढळत नाहींत
आणि या परोपकारी व लोकहितवादी गृहस्थानें जाति, धर्म, शास्त्र, आचार, राज्य, लोकव्यवहा
इत्यादि विषयांवर निर्भीडपणानें रास्त विचार दर्शवून एक महासागरायेवढा लेखांचा सांठा करू
ठेविला आहे व तो सर्व प्रसिद्धीस येण्यास हा प्रथमचा शुभशकुन आहे ह्मणून हा ग्रंथ सर्वांचे आद
रास अगत्य पात्र होईल असा भरंवसा आहे."

§ खं. बा. फडके. 'सम्पादक'

त्याचें अवगाहन करूं लागेल, तर त्यास या महासमुद्राचा उथळपणा पाहून आश्चर्य व खेद हीं वाटल्यावांचून राहणार नाहींत. चारुदत्ताच्या बऱ्या घरांत मोठ्या प्रयासानें प्रवेश करून बिचारा शर्विलक जसा निराश होत्साता माघारा जाण्यास निघाला, त्यासारखीच बहुधां बऱ्याच वाचकांची नाउमेद रावबहादुरांच्या लेखसमुदायाच्या योगानें होणारी आहे. आतां येवढें खरें आहे, कीं वरील समूहांतही माहितीच्या गोष्टी जागोजाग बऱ्याच सांपडतील, कांहीं ठिकाणीं मार्मिकपणाचें लिहिणें आढळेल, आणि शुद्ध मराठी भाषा व सुबोध भाषापद्धति यांचाही लाभ होईल. पण येवढ्या सागरांत डुंबल्याचें चीज एकंदरींत पाहतां फारच थोडें होईल यांत संशय नाहीं. ग्रंथाची योग्यता सामान्यतः पाहतां दोन प्रकारांनीं ठरते जाते. एक त्यांत नवा मजकूर असावा, किंवा जुनाच असला तर नव्या तऱ्हेनें तरी तो लिहिलेला असावा. पण 'निबंधसंग्रहा'दि ग्रंथांत दोन्ही प्रकार आढळत नाहींत. त्यांत दाखल केलेले अभिप्राय तीस चाळीस वर्षांपूर्वी काय नवे वाटले असतील ते असोत, पण हल्लींच्या काळांत तर ते आबालवृद्धांस श्रुत असल्यामुळें केवळ चर्वितचर्वणरूप झाले आहेत. शिवाय ते कांहीं नव्या पद्धतीनें सांगितले आहेत ह्मणावें तर तसेंही नाहीं. दयानंदजींच्या व्याख्यानांत जशा त्याच त्या कोट्या सतरा वेळां ऐकण्यांत येतात, किंवा पादींयां(?सं०)च्या ग्रंथांतून, भाषणांतून वगैरे तेंच तेंच पोकळ पांडित्य शंभर वेळां आढळतें त्याचप्रमाणें रावबहादुरांच्या व्याख्यानांतून व लेखांतून एकाच प्रकारचा घोष सदोदित आढळतो. ब्राह्मण लबाड, ब्राह्मण मूर्ख,†

† लोकहितवादी लिहितातः—

"हिंदुलोक हे आजकालपर्यंत गाढ निद्रेंत आहेत. तो जाण्यास बहुत ग्रंथ व बहुत ज्ञान पसरलें पाहिजे......त्यास मुख्य अडचण...सांप्रत काळचे द्रव्यवान् ब्राह्मण लोक हे यास आडवे येतात म्हणून हे लोक जाऊन नवी प्रजा होईल तोंपर्यंत हिंदु लोकांची सुधारणा होईल असें दिसत नाहीं......पूर्वीपासून त्यांची (ब्राह्मणांची 'सं०') समजुत अशी पडलेली आहे कीं, आम्ही पृथ्वीवर देव आहों व देवही आमचे हातीं आहेत, व आमच्या आशीर्वादानें व शापानें पाहिजे तसें होईल, व पृथ्वीवर लोक आमच्या इतके शाहाणे कोणी नाहींत, व आमच्या देशाशिवाय पृथ्वीवर कांहीं देश नाहींत, इंग्रज लोक हे समुद्रांतील बेटांतील माकडांसारखीं मनुष्यें इकडे आलीं आहेत. व रामासारखा विजयी अवतार होईल तेव्हां त्याचें सैन्य त्यांस घालवील, व कंपनी सरकार ही एक स्त्री आहे वगैरे वेडगळपणाच्या समजुती बहुतेक ब्राह्मणांच्या आहेत......बाजीराव पेशव्याचे शाळेंतील शिष्य बहुत जाहाले आहेत, त्यांस अतिशय गरीबी आल्याशिवाय आतां जाईल असें दिसत नाहीं............

"पूर्वी ब्राह्मण लोकांचा काय पवित्रपणा व धर्मनिष्ठपणा असेल तो असो. परंतु हल्लीं तर तो आम्हांस कांहीं दिसत नाहीं.........पुण्यांत कितीएक ठिकाणीं कसबिणींच्या घरांत देवळें स्थापलीं आहेत आणि तेथें ब्राह्मण जाऊन अभिषेक पूजा वगैरे करितात. ज्या घरांत पाऊल ठेविलें तर ब्राम्हण पतित व्हावयाचे त्या ठिकाणीं धर्माची शोभा आणि त्यास उत्तेजन आणणारीं देवालयें बांधलीं जातात, आणि तेथें ब्राम्हण जपानुष्ठानें करितात; तेव्हां हें कर्म कसें ?......तात्पर्य ब्राम्हणांनीं लोभ फार अंगिकारिला. आतां ब्राम्हणांचा संतोष किंमतीनें विकत घ्यावयाचा आहे. दुसरें कांहीं करावयास नको. जें म्हटलें तें कर्म ब्राम्हण करतील व आळसामध्यें आपलें पोषण व्हावें असा

( पुढें चालू. )

तजवीज काढतील. त्यांस जेवावयास व दक्षिणा मिळाली म्हणजे झालें. धर्म, अधर्म, अनुशासन, यांचा विचार ते करीत नाहींत......आतां कांहीं कुळंबी धर्मात्मे निघतील; परंतु ब्राम्हण निघणार नाहींत. सर्व जातींपेक्षां ते नीचपणास उतरले आहेत........

......"सरासरी लक्ष देण्याचा विचार शंकराचार्यापर्यंत चालला. परंतु आलीकडे सुमारें दोन हजार वर्षांत लोक अंधळे झाले व विचार करीत नाहींत. ब्राह्मण पूर्वी पोथीपुस्तक पाहाणारे आणि रानांत राहाणारे होते. ते जाऊन आतांचे ब्राह्मण मजूरदार आणि घरंदाज झाले व ते कोण श्रीमंत आहे, फुकट जेवावयास कोण घालील आणि दक्षिणा कोण वांटील अशी वाट पाहात असतात. त्यांची योग्यता पाहिली तर दोन ओळी पाठ म्हणतात इतकीच, परंतु अर्थाचे नांवानें शून्य. तेव्हां त्यांस विद्वान् म्हणावें कीं नाहीं याचा संशय येतो. कारण ज्यास अर्थपरिज्ञान नाहीं, नुसतीं अक्षरें वाचून पाठ म्हणतात, त्यांचे ते शब्द जशी बनावरांची ध्वनि तद्वत् आहेत........हे आपल्यास बुद्धि, विचार, ज्ञानशक्ति, मन, चित्त, इतकीं असून तीं बंद करून पोट भरण्याकरितां मात्र पाठ करतात तेव्हां त्यांस विद्वान् कोण म्हणेल ? त्यांचे चित्त जेवणावर व पैशावर असतें.

"जेव्हां लोक अनाडी (?अडाणी सं०) होते तेव्हां ब्राह्मणांनीं आपला शक पराकाष्ठेचा चालविला. इतर लोक ज्ञानी होतील आणि त्यांचा नफा व फुकट जेवण बुडेल याजकरितां त्यांणीं असा नेम केला कीं, दुसरे जातीनें कोणी शिकूं नये. जें काय वाचणें तें ब्राह्मणांचे तोंडून इतर लोकांनीं ऐकावें. एणें-करून पुराणिकांचे तांदूळ, मठांची दक्षिणा, श्राद्धाची खीर, व लग्नाच्या पोळ्या ब्राम्हणांनीं आपल्याकडे पुष्कळ पिकविल्या......ब्राम्हणासारिखा गर्विष्ठ पृथ्वीवर दुसरा कोणी नसेल. कारण त्यांनीं जरी आपला धर्म व कर्म सर्व सोडलें, कितीएक लबाड लुच्चे आहेत, कितीएक मूर्ख आहेत, कितीएक भडवेपणाचे रोजगार करितात, कितीएक रांडांच्या मागें तबले वाजवितात, असे असे निर्लज्ज झाले आहेत तरी त्यांस असें वाटतें कीं आम्हीं इतकें केलें तरी उत्तम कुळंब्यापेक्षां चांगले व श्रेष्ठ आहों. यास प्रमाण—

'दुःशीलोऽपि द्विजः पूज्यो न च शूद्रो जितेन्द्रियः ।
दुःशीलाऽपि दुहेद्गावो न खरीं शीलवर्तिनीम् ॥'

चांगल्या शीलाचा नसला तरी ब्राम्हण पूज्य, मोठा जितेंद्रिय झाला तरी शूद्र पूज्य नाहीं. यास उदाहरण, गाय लाथाळ असली तरी तीच दुधास योग्य. गाढवी गरीब असली तरी ती योग्य नव्हे. मला तर ब्राम्हणाचे व इतर जातीचे लोकांमध्यें भिन्नपणा कांहींच दिसत नाहीं. ब्राम्हण मरतात, जन्मतात व हातपाय त्यांस इतरांसारखेच असतात....त्यांचा मुख्य गुण काय ती विद्या व तिचें तर त्यांचेमध्यें शून्य पडून काळें झालें आहे............कोणी जेवावयास किंवा वसंतपूजेस बोलाविलें म्हणजे एका हातांत तंबाकु व दुसरे हातांत चुना आणि तोंडानें वेदपठण. हें तरी उत्तम आहे काय ? तेव्हां असे भ्रष्ट झाले ते ब्राम्हण म्हणावे किंवा त्यांस दुसरे कांहीं म्हणावें ?

ब्राम्हणांनीं विद्याभ्यास करावा हा धर्म सोडून ते गृहस्थ कसे झाले ? कारण, ब्राम्हण वर्ण पहिला थोडा होता तेव्हां लोकांस त्यांचें सहज पालन करतां येत होतें.......इतके ब्राम्हण अधिक झाले म्हणून कांहीं अंधळे, पांगळे, लंगडे, रोगी, वृद्ध, बाळ, हे कमी झाले नाहींत.........तेव्हां हे वास्तवीक गरीब लोक व शिवाय ब्राम्हण इतक्यांचें पोषण लोकांच्यानें होईना, याजमुळें ब्राम्हणांनीं इतर जातींचे रोजगार पत्करले........भट तर बहुधा भोजनभाऊ आहेत. आणि गृहस्थ चाकरी व व्यापार करून पोट भरितात. तेव्हां धर्मप्रवर्तक ब्राम्हण आतां कोठें नाहींत. तेव्हां इह्यांचे

(पुढें चालू.)

ह्मणजे मेंढरें, संस्कृत विद्या येथून येथून अप्रयोजक व वेडगळ, तिची हल्लींच्या काळांत कवडीचीही योग्यता नाहीं, धर्माची स्थिति फार खराब झाली आहे, नवा धर्म तयार केला पाहिजे, जुने शास्त्रीलोक व भटें हीं सर्व मेलीं पाहिजेत, त्यांस छदाम उचलून देणें ह्मणजे

---

ब्राम्हणांस इतर जातीचे लोकांपेक्षां अधीक मान देणें योग्य नाहीं......हे भट कशाचे ? असे इतर जातीचे सुतार, माळी, न्हावी, तसेच हे मूर्ख, राघूसारखे पढणारे, वेदाविक्रयेंकरून पोट भरणारे व निर्लज्जपणानें भीक मागून काम न करितां खाणारे आहेत......सांप्रत काळचे ब्राम्हण कोणी विद्वान् आहेत काय, असें पाहिलें तर सर्वांस दिसेल कीं हे भट विद्वान् नाहींत. शुद्ध टोणपे दिसतात. यांपेक्षां आचारी, पाणके बरे. व हे त्यांहून निंद्य. कारण हे हरामाचे खातात. आणि लोकांस यांपासून कांहीं उपयोग नाहीं......आतांचे ब्राम्हण असे आहेत कीं जेवायापुरती काळजी करितात. सकाळपासून पोट कोठें भरेल याचा शोध करून जेवायास मिळालें म्हणजे वताणे पडतात......कोणी म्हणतो कीं मी ५० लाडू खाल्ले. कोणी म्हणतो कीं मी शेरभर तूप प्यालों......हल्लींचे ब्राम्हणांत कांहीं विचार, नीती, किंवा पवित्रपणा नाहीं. शास्त्री व भट हे मजूरदार आहेत. असे हेलकऱ्यास चार पैसे दिले म्हणजे कोसभर जातो व आठ दिले म्हणजे दोन कोस, तद्वत पांच रुपये दिले म्हणजे प्रायाश्चित्त, व शालजोडी दिली म्हणजे दारू प्याली तरी चिंता नाहीं, ती निर्दोष, असा ब्राह्मणांचा रोजगार आहे. सांप्रत ब्राम्हण जे आहेत ते नांवाचे आहेत. व ब्राम्हणपणा फक्त कुळांत आला आहे. गुणांत नाहीं. सांप्रतचे ब्राम्हण विद्येविषयीं केवळ जनावरें आहेत......जे पाठ म्हणतात आणि अर्थ जाणत नाहींत त्यांसारखे मूर्ख व व्यर्थ आयुष्य घालविणारे पृथ्वींत थोडेच असतील. मागील युगांत असे वेडे ब्राम्हण नव्हते. ते सार्थ म्हणत असत. सार्थ म्हणण्याची पद्धती ज्या [illegible]तापासून बुडाली तोच दुर्भाग्याचा फेरा या लोकांस खचित आला......पूर्वी सर्व ब्राम्हण पोथीवरून म्हणत असत......पुढें ईर्षेनें म्हणतां म्हणतां पोथीशिवाय किरकोळ अनुष्ठानें करूं लागले. नंतर कोणी त्यांजवर चढ करून सर्व वेद पाठ म्हणूं लागले.........संस्कृत भाषेंत पाठ म्हणतात. नमस्कार करावा, विष्णुस्मरण करावे, तांब्यांत पाणी ओता हे देखील शब्द आतां मंत्रांत मोडतात. अर्थ म्हणजे शब्दामध्यें जसा जीव. तो जर नाहीं तर ते शब्द प्रेतवत आहेत. छत्तीस अक्षरांवर हजारों भाषा आणि हजारों शास्त्रें झालीं आहेत. म्हणून अक्षरांची मातब्बरी नाहीं. परंतु भट मंडळी हें मनांत आणीत नाहींत.

"गोड खाण्यास मिळालें ह्मणजे सर्व ब्राह्मण डोंगळ्यांप्रमाणें एकत्र जमतात. एकास लाथ मारली तर दुसरा कां ह्मणावयाचा नाहीं, इतके तर हे भित्रे, रांडये व निर्बळ आहेत. यांचेमध्यें साहस, धैर्य आणि खरेपणा हीं प्रायशः नाहींत.........जशा शेतांत पुष्कळ चिमण्या खावयास जमतात व त्यांस एक काठी उगारली ह्मणजे त्या भरकन उडून जातात तसे हे ब्राह्मण लोक आहेत........... पोटास घालावें आणि पायपोस मारावे त्यांस लज्जा वाटणार नाहीं. या लोकांस वाचणें ठाऊक नाहीं, पाठ करणें ठाऊक आहे............भट तर दशग्रंथ पाठ करतात. कित्येक मूर्ख जटापाठी आहेत; ह्मणजे मागें पुढें, उलटीं सुलटीं अक्षरें पाठ करतात. यांचा केवढा मान लोक करतात ? घनपाठी बुवांस शालजोडी द्या, रुपये द्या, आणि मूर्खपणा वाढवा. कित्येक जुन्या ठशाचे लोक शंख करतात कीं वेदविद्या बुडाली. पण ही विद्या हवी कोणाला ? पाठ करावयाची मजूरी कशास ? अर्थसहित दोन अध्याय कां ह्मणाना ? त्यांतील अर्थ समजून घ्या ह्मणजे दोन अध्याय अध्ययन घनपाठी टोणप्यापेक्षां बरें. पाठ करावयाची ही विद्या कोणत्याही देशांत नाहीं. एक एक अक्षर मागें पुढें,

[पुढें चालू.]

निवळ पाजीपणा, एतद्देशीय राजेरजवाडे सर्व पशु, भटभिक्षुक लायब्ररींत येऊन ज्ञानसंपादन करीत नाहींत, ग्रंथांस उत्तेजन देत नाहींत, पुनर्विवाह सुरू झाला पाहिजे, विलायतेची महायात्रा करून आलेल्यास सर्वांनीं अग्रासन दिलें पाहिजे, कर्मकांडाच्या खटपटींत बिलकुल अर्थ नाहीं$, सर्व गुणांचें परम निधान ह्मणजे काय ते इंग्रेज लोक*, इ० इ०—हें सर्व भारूड

---

उलटें सुलटें पाठ केलें ह्मणजे कांहीं दूध निघतें की काय? सार्थ वेद ह्मणावा मग तो किती कां होईना? दशग्रंथी ह्मणून मिरवतात कशाला? हे तर मला बैल असें वाटतात. लग्नामध्यें (फार सं०) चमत्कार दृष्टीस पडतात. उपाध्यां मूर्ख, तो हजार ठिकाणीं पूजा मांडतो. मडक्याची पूजा, घागरीची पूजा आणि तशांत हें सर्व संस्कृत भाषेनें करितात ह्मणून त्याचा अर्थ कोणास कळत नाहीं. परंतु आंत पाहिलें तर शुद्ध वेड आहे. मीं गर्माधानाचा विचार थोडासा वाचून पाहिला आहे. त्याजवरून मला वाटतें कीं त्यांतील प्रकरणीं मटासमोर निर्लज्जपणानें जीं कर्मे करावयास सांगितलीं आहेत तीं जर मराठी भाषेंत बोलतील तर यजमान उपाध्यास जोडे मारून हांकून देईल, व ह्मणेल कीं माझ्या बायकोची इतकी फजिती चौघांमध्यें करावयास मीं काय तुमचें केलें आहे? असें त्यांत आहे. नानाप्रकारचीं वचनें आणि येथें हात लावा तेथें हात लावा इत्यादि तें मला बोलण्यास लाज वाटती. या प्रकारचे संस्कार करणारे वेड होते यांत संशय नाहीं." इ० इ० 'सम्पादक'

$ "पुष्कळ अनुष्ठानें केलीं तरी त्यांत जीव नाहीं. ब्राह्मणाकडून मजूरी केली तरी सारखेंच. त्यापेक्षां मजुरांची मजूरी बरी. चार ब्राह्मण लावून अभिषेक करावा त्यापेक्षां चार मजूरदार लावून रस्ता नीट करावा हें चांगलें; कारण ती लोकहिताची मजूरी आहे. वास्तव स्नानसंध्या करण्यांत कांहीं पुण्य नाहीं. देवाचे जे प्राणी त्यांस उपद्रव केला आणि देवाचें नांव घेतलें व त्यावर खंडीभर पाणी घातला तर त्यांत पुण्य कशाचें? कितीएक हातांत माळ घेऊन रोज लाख वेळ राम राम ह्मणतात. परंतु तशी बडबड घशास कोरड पडेपर्यंत जरी केली तरी त्यापासून फळ कांहीं होणार नाहीं. जर लबाडी सोडली तर मात्र फळ होईल. मग देवाचें नांव घ्या किंवा नको. केवळ जे कर्मांचें भजन करतात ते ढोंगी आहेत. नीतिपर वर्तणूक असावी हें प्रथम कर्म होय. नंतर कर्मांची खटपट केली सारखी न केली सारखी. 'मन चंगा तो काथोटमें गंगा.' जो देवावर एकही फूल घालीत नाहीं परंतु वर्तणुकीनें पवित्र व नीतिमान आहे तो चांगला. जो लाख तुळशी रोज वाहातो, आणि आईबापांचा व भावांचा शत्रु, इंद्रियभ्रष्ट व लोकांचे उपयोगी किमपी पडावयाचा नाहीं तो चांगला नव्हे." अशी लोकहितवादींची विचारसरणी आहे. 'सम्पादक'

* लोकहितवादी ह्मणतातः—

"इंग्रज साधारणतः इकडील लोकांपेक्षां अधिक काम करणारे, मेहनती, शाहाणे, हुशार, खरे, व प्रामाणिक आहेत. इकडील लोक त्याप्रमाणें नाहींत. शंभर इंग्रजांत पांच लबाड असतात. परंतु शंभर हिंदु लोकांत पांच प्रामाणिक असतात. तेव्हां यांजकडे मोठे अधिकार दिले तर लोकांची स्थिति नीट राहाणार नाहीं. जे गुण राज्यकर्त्यांमध्यें असावे ते हिंदु लोकांमध्यें नाहींत. राज्याची पद्धति त्यांस ठाऊक नाहीं. आजपर्यंत ब्राह्मण लोकांनीं राज्य कधीं केलें नाहीं. हा येवढाच शंभर वर्षे पेशवाईत काय तो दिवा लागला. तद्वत् मराठे यांनीं कधीं राज्य केलें नाहीं. पूर्वीं क्षत्रिय लोक राज्य करीत होते. ते तर आतां नाहींत. तेव्हां राज्यकर्त्यांचीं शहाणपणें या लोकांत आल्याखेरीज कांहीं उपयोग नाहीं. मोठ्या जागा इकडील लोकांस आतां नाहींत असा अभिप्राय बहुत लोकांचा आहे. त्यास पाहा वरें इंग्रज लोक इकडे आले, त्यांचे देशचे हजारों लोक इकडे लढाईत मेले व इतके दुरून ते येथें आले त्यांस लाभ कोणता असावा? जर त्यांणीं आपले लोकांचें महत्त्व राखूं नये

लोकहितवादींच्या ध्यानीं मनीं आज चाळीस वर्षे वागतें आहे; व ग्रंथ असो, निबंध असो, भाषण असो, कोणताही विषय असो, वरील तत्त्वांचा त्यांत प्रवेश झाल्याखेरीज व्हावयाचेंच नाहीं! सारांश, ज्याप्रमाणें रासेलस् हा आपल्या जुन्या गुरूच्या तत्त्वज्ञानास कंटाळून‡ ह्मणाला कीं, याचा उपसर्ग माझ्यामागें अद्याप काय ह्मणून! यानें जें मला शिकवलें तें लहानपणीं मला आवडलें खरें, पण तें त्या वेळेस नवें होतें ह्मणून; पण आतां त्याच ज्ञानापासून मनास आनंद वाटणें ह्मणजे तें जेव्हां मात्स्यान् विसरून जावें तेव्हां!—अशीच प्राय: अर्वाचीन वाचकांची लोकहितवादींच्या मताविषयीं समजूत आहे, व ती अयथार्थक आहे असेंही बहुधां थोड्यांसच वाटेल.

४. आतां लोकहितवादींनीं आजपर्यंत आपल्या लेखांतून जीं शतावधि मतें प्रगट केलीं आहेत त्यां सर्वांवर यथास्थित विवरण करणें ह्मणजे 'निबंधसंग्रहा'सारखाच अवाढव्य ग्रंथ होणार. यास्तव तें तर विस्तारभयास्तव करतां येत नाहींच. शिवाय कित्येक मतांवर आज चर्चा करण्याचीही जरूर राहिलेली नाहीं, कारण त्यांचा शुष्कपणा कालगत्या ठरला जाऊन आजला त्यांच्या संबंधानें कोणीही भ्रमांत पडणार नाहीं. इंग्रजी विद्येचा नुकताच संस्कार झाल्यानें अवतरणभूत भर्तृहरिवचनाप्रमाणें किंवा पोपच्या सर्वप्रसिद्ध सुभाषिताप्रमाणें*

---

तर मग त्यांस लाभ काय? कोणी कांहीं काम करितो त्यांत लाभ पाहातो. दुनयेची रीती अशीच आहे. तर हिंदू लोक शाहाणे असून धैर्य करून परकी देशांत राज्य संपादन करिते तर असेच करिते किंवा याहून अधिक करिते याचा विचार करावा ह्मणजे इंग्रजांची वागणूक कशी आहे हें ध्यानांत येईल."
'सम्पादक'

‡ आनंदगुहेंतल्या ऐषआरामानें मन विटून जाऊन सव्विसाव्या वर्षापासून रासेलसाच्या वृत्तींत फरक पडूं लागला; त्याला एकांतवास प्रिय वाटूं लागला व तो रानावनांत जाऊन सृष्टिसौंदर्य पाहत बसूं लागला. तेव्हां त्याच्या या असमाधानाचें कारण शोधून काढण्याकरतां त्याचा एक गुरु त्याच्या मागोमाग जाऊन त्याचें आपल्याशींच चाललेलें भाषण चोरून ऐकल्यावर त्याला उपदेश करून ताळ्यावर आणण्याकरितां पुढें झाला. पण राजपुत्र रासेलस् याला त्या वृद्ध पंडिताची सर्व बुद्धि नाहींशी झाली असें वाटून त्याशीं संभाषण करण्यास तो खुषी नव्हता. तो आपल्याशीं ह्मणे कीं, "हा ह्मातारा असा माझ्या पिच्छास कां लागला आहे? ज्या गोष्टी मीं याच्यापासून पूर्वी ऐकिल्या त्यांचा विसर हा मला पडूं देत नाहीं काय? त्या गोष्टी नवीन असल्यामुळें त्या ऐकून मला पूर्वी आनंद होत असे खरा; पण आतां तसा पुन: होण्यास त्या विसरल्याशिवाय उपाय नाहीं."
'सम्पादक'

* "A little learning is a dangerous thing;
Drink deep or taste not the Pierian spring;
There shallow draughts intoxicate the brain,
But drinking largely sobers us again."
—Essay on Criticism.

एतत्संबंधीं पृष्ठ १०१९—२० टीप† पाहा. 'सम्पादक'

पाश्चात्य विद्यारूप वारुणीच्या पहिल्या झुरक्याबरोबर आमची विद्वान् मंडळी झिंगली जाऊन त्या अमलांत स्वदेशाविषयीं, स्वधर्माविषयीं, आपल्या रीतीभातींविषयीं वगैरे जें भयंकर पांडित्य त्यांच्या तोंडावाटें उचंबळत असे, त्यास आलीकडे पुष्कळच उतार पडला आहे. उतूं जाऊं लागणारें दूध जसें जलतुषारानें उपशम पावतें त्याप्रमाणें सुविचार व अनुभव यांच्या झटक्यासरशीं वरील पांडित्याच्या कहरानें पुष्कळच उलट खाल्ली आहे. ही कलती कळा दिसूं लागण्यापूर्वी आमची मंडळी किती बहकली होती याचा मासला पाहणें असल्यास प्रस्तुत ग्रंथकाराचे पहिले पहिले लेख, तसेंच 'पुण्याचें वर्णन', 'घाशीराम कोतवाल', जोतीबाकृत 'गुलामगिरी' वगैरे ग्रंथ पाहावे. या ग्रंथांतून मोठमोठ्या बलवत्तर म्हणून ज्या कोट्या दाखल केल्या आहेत त्यांच्यानें आतां एकादें पोरही फसणार नाहीं. असो; तर याप्रमाणें रावबहादुरांच्या जुन्या लेखांतील कित्येक मतांविषयीं येथें मुळींच विचार करावयाला नको. यास्तव हल्लींच्या काळींही जीं लोकांस भ्रमांत पाडण्यासारखीं आहेत त्यांविषयींच मुख्यत: विवेचन करूं.

'निबंधसंग्रहां'त एक विषय घेऊन त्यावर जें काय लिहावयाचें तें एके ठिकाणीं लिहिलेलें आहे असें नाहीं तर अनेक विषयांचा ऊहापोह अनेक ठिकाणीं केला आहे. सदरील लेख हे वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेले असल्यामुळें ज्या प्रसंगास जें मनांत आलें तें त्या वेळेस लिहून दिलें आहे. अशी अव्यवस्था असल्यामुळें ज्यास लोकहितवादींची एकाद्या विवक्षित विषयावर समग्र मतें हवीं असतील त्यास तीं एका सदराखालीं आढळतील असें नाहीं; तर 'त्रिस्थली यात्रा' या म्हणीप्रमाणें कांहीं भाग एका निबंधांत व कांहीं भाग विषयांतररूपानें दुसऱ्या निबंधांत असा प्रकार आढळेल. अशा प्रकारच्या व्यवस्थेमुळें पुढील विवेचनांत रावबहादुरांच्या लेखांचा निर्देश करतां येणें शक्य नाहीं. यास्तव वरील अवाढव्य रचनेवरून जीं त्यांचीं मतें आमच्या लक्षांत आलीं त्यांवर सामान्यत:च विवेचन करणें प्राप्त आहे.

५. प्रस्तुत ग्रंथकारानें 'लोकहितवादी' हें नांव धारण करून निबंधरचना करण्याचा येवढा उद्योग कां पतकरला याचें कारण उघडच आहे. आमच्या सरकारानें कांहीं अंशीं औदार्याच्या बुद्धीनें व कांहीं अंशीं आपमतलबानें इकडील लोकांस सज्ञान करण्याचा जेव्हां उद्योग सुरू केला, तेव्हां उपदेशाच्या अंतीं अर्जुनास जसें झालें, कीं

अथास्य तत्त्वेषु कृतेऽवभासे
समुन्मिमीलेव चिराय चक्षुः ॥

" तत्त्वांचा बोध होऊन त्यांचा प्रकाश त्याच्या अंतर्यामीं पडला असतां फार दिवसांनीं जशी दृष्टि यावी तसें त्यास होऊन गेलें, " तसा प्रकार आमच्या इकडील मंडळीचा झाला. आमच्या पूर्वजांच्या ध्यानीं मनींही नव्हत्या अशा शेंकडों गोष्टी त्यांस कळूं लागून इंग्रेजी विद्येचा अपरंपार सागर त्यांस दृष्टिगोचर झाला. या सागरांत जे अभिनिविष्ट होऊन त्याचें अवगाहन करूं लागतील ते परम धन्य होत यांत कांहीं संशय नाहीं, व आमच्या

देशाची जुलमी अंमलदाराच्या पायीं कितीही हानि झाली तरी ती वरील सागराच्या बळावर कालेंकरून तरी भरून येईल असा आह्मांस पूर्ण भरंवसा आहे. या भावि फलाचे सूचक अंकुर सध्यांही दृष्टीस पडूं लागले आहेत. ' असो; पण वरील मंडळीचें काय झालें, कीं वरील सागराच्या दर्शनानें त्याच्या अवगाहनाविषयीं उत्कट इच्छा व उत्कंठा जी त्यांचे ठायीं उत्पन्न व्हावयाची ती न होऊन बहुतेकजण कांठच्या चिखलांत व रेंदाळांत मात्र अडकून राहिले. वरील जलाशयांतील रत्नांचा लाभ अर्थातच गाढ अवगाहन करणारांस मात्र व्हावयाचा; तो वरील कांठच्या पोहणारांस कोठून होणार? यास्तव त्यांचे ठायीं अनेक दुर्मतांचें व दुराग्रहांचें जाल मात्र सांठलें. आपला देश ह्मणजे कवडीच्या मोलाचा, शौर्याची व सदाचरणाची आपले इकडे कधीं वार्ताही नाहीं; हिंदुधर्मासारखा अप्रयोजक व अनर्थकारक धर्म आजपर्यंत पृथ्वीच्या पाठीवर कोणताही झाला नसेल, आमच्या चाली ह्मणजे सरासरी रानटीपणाच्याच, खरी विद्या काय ती इंग्रेजींत, पूर्वींचे साडेतीन शहाणे एकीकडे व आलीकडचें पहिलें बूक शिकणारें पोर एकीकडे,—इत्यादि शेंकडों मतें वरील कर्दमपानाच्या दुष्ट संस्कारानें आमच्या अर्वाचीन पंडित मंडळीस चिकटून राहिलीं. ह्मटलें आहे.

अगाधजलसंचारी नो गर्वं याति रोहितः ।
अंङ्गुष्ठोदकमात्रेण शफरी फर्फरायते ॥

---

१. इंग्रेजी विद्येच्या प्रभावाचें वर्णन मेकॉलेनें आपल्या एका भाषणांत येणेंप्रमाणें केलें आहे:—

"And thus I am brought back to the point from which I started. I have been requested to invite you to fill your glasses to the Literature of Britain; to that literature, the brightest, the purest, the most durable of all the glories of our country; to that literature, so rich in precious truth and precious fiction; to that literature which boasts of the prince of all poets and of the prince of all philosophers; to that literature which has exercised an influence wider than that of our commerce, and mightier than that of our arms; to that literature which has taught France the principles of liberty, and has furnished Germany with models of art; to that li[illegible] which forms a tie closer than the tie of consanguinity between us and the common wealths of the valley of the Mississippi; to that literature before the light of which impious and cruel superstitions are fast taking flight on the banks of the Ganges; to that literature which will, in future ages, instruct and delight the unborn millions who will have turned the Australasian and Caffrarian$ deserts into cities and gardens. To the Literature of Britain, then! And wherever British literature spreads, may it be attended by British virtue and by British freedom!"

$ कॅफेरियांतील; कॅफेरिया (Kaffraria) हा दक्षिण आफ्रिकेमध्यें केप कॉलनींतील एक विस्तृत प्रांत असून त्याचें क्षेत्रफळ १८१० चौरस मैल व लोकसंख्या सात लाख आहे. 'सम्पादक'

" देवमासा हा समुद्राचा नेहेमी ठाव घेणारा, पण त्यास त्याबद्दल गर्व होत नाहीं; पण अंगठा बुडेल न बुडेल अशा लहानग्या डबक्यांत राहून बेडकी डौलानें शब्द करते !" तर रावबहादुरांनीं आपली लेखणी चालवण्यास जी सुरुवात केली ती वरील समयास होय; ह्मणजे नूतनलब्ध पाश्चात्य विद्येच्या अंजनशलाकेनें जेव्हां त्यांची दृष्टि साफ झाली व पूर्वीचें अज्ञानपटल एकदम दूर झालें, तेव्हा आपणांस ज्या नव्या गोष्टी समजल्या व जीं नवीं मतें आपले ठायीं बिंबलीं त्यांचा लाभ आपल्या देशबांधवांस करून द्यावा अशा हेतूनें त्यांनीं लोकहितवादित्वाची दीक्षा स्वयमेव धारण करून लोकाज्ञानध्वंसनाचें परम साधन जी लेखणी तिचा अंगीकार केला. प्रस्तुत ग्रंथकारानें आपला उद्देश एके ठिकाणीं स्पष्टपणें लिहिला आहे यास्तव त्याचा येथें उतारा घेतों:—

## "पत्र नंबर १००."

## शतपत्रांचा इत्यर्थ.

" विनंती विशेष. मी आपले श्रम या पत्रांत संपूर्ण करणार. यास्तव या लिखित पत्रशतकाविषयीं कांहीं सुचवितों. आज दोन वर्षे मी लोकांस त्यांची स्थितीरीती कशी आहे ती अगदीं भीड न धरितां उघड करून सुचविली. त्यांत एखादें अक्षर अधिक उणें, शुद्ध अशुद्ध, कोणास वाटलें तर त्यांणीं क्षमा करावी. माझे जिवाची पक्की खात्री आहे कीं, जो कोणी या पत्रांचें अवलोकन करील आणि विचार करून पाहील त्यास प्रत्येक शब्द खरा आहे असें वाटेल. लोकहितवादीनें कोणाची मजुरी पत्करली नाहीं. कशाची अपेक्षा, आशा किंवा इच्छा धरली नाहीं. कोणाचे सांगण्यावरून व शिकविल्यावरून कृत्रिम वर्णन केलं नाहीं. लाभावर किंवा द्रव्यावर नजर देऊन कीर्ती व्हावी या हेतूनें लिहिलें नाहीं. इतके श्रम जे केले ते फक्त लोकांस त्यांची वास्तविक स्थिती कशी आहे ती कळावी, त्यांणीं सुधारावें, त्यांस इहलोकीं सुखवृद्धि व्हावी, परलोकाचें साधन घडावें, व आपले बहुत काळापासून दृढ ग्रह झाले आहेत त्यांपैकीं कांहीं अविचारानें व कांहीं मूर्खपणानें जडलेले आहेत ते कमी व्हावे किंवा नाहींसे व्हावे इतक्याच हेतूनें मीं यथामतीनें व स्वइच्छेनें वेतनावांचून श्रम केले आहेत. व जितकें लिहिलें आहे तें अक्षरशः खरें खरें निवडून विचार करून काळजीनें लिहिलें आहे. हें सर्व लोकांस नजर आहे. हें लिखितशतक कोणी बाळबोध अथवा मोडी छापून मुलांस लिखती(खितां? सं०)सारखें वाचण्यास दिलें तर बहुत नफा होईल. यास्तव या ग्रंथावर लोकहितवादी आपली सत्ता ठेवीत नाहीं. पाहिजे त्यांणीं ही पत्रें छापून प्रगट करावीं. कितीएक प्राचीन काळचे लोकांस कितीएक लोकहितवादीचीं मतें विपरीत व हिंदुधर्मास विरुद्ध भासतील; परंतु हा त्यांचा मिथ्याभास आहे; कारण कीं, त्यांत हिंदुधर्मास कांहीं विपरीत नाहीं; फक्त मूर्खपणास मात्र विपरीत आहे. याविषयीं विचार केला तर खात्री होईल."

" माझें मागणें सर्व लोकांस आहे कीं, मीं जें लिहिलें आहे याचा विचार करून पाहा. तुमच्या चांगल्यावांचून त्या लिहिण्याचा हेतु नाहीं. तुमचें कल्याण व्हावें ह्मणून मी

सत्तों व तुमच्या चुक्या वगैरे उघड करून दाखविण्यांत तुह्मांस राग रोष येईल हें मीं मनांत आणलें नाहीं. कारण कीं माझी उत्कंठा तुमच्या सुधारण्याकडे फार आहे. माझें अंतःकरण सर्व तिकडे आहे. यास्तव मीं जें लिहिलें आहे त्याचा तुह्मीं विचार करावा. कारण कीं, ज्याणें तुमची सेवा एकनिष्ठेनें व निष्कपटपणानें केली त्याजवर तुमची इतराजी नसावी. किंबहुना तो काय बोलतो हें तरी मनन करावें. अस्तु. तुमची आमची गांठ आज दोन वर्षे सतत होती याचा मला मोठा आनंद सर्वकाळ वाटेल. सर्वांनीं कृपालोभ असो द्यावा हे विनंती."

प्रस्तुत विषयाच्या विवेचनास वरील उपोद्घात बस आहे असें आह्मांस वाटतें. त्यावरून प्रस्तुत ग्रंथकाराविषयीं कोणास कदाचित् माहिती नसल्यास ती थोडीबहुत होऊन त्याच्या ग्रंथरचनेचा उद्देश व तिचें सामान्य स्वरूप हीं दोन्ही कळून येतील. आतां येवढेंच सांगून पुरें करतों कीं, लोकहितवादींचा उद्देश जसा लोकांत यथाशक्ति ज्ञानप्रसार करण्याविषयींचा होता व अद्याप आहे, तशीच आमचीही गोष्ट आहे. शिवाय हें ज्ञान भासरूप किंवा मिथ्या नसतां तें यथार्थ व सत्य असावें असाच आमचाही संकल्प आहे. जाणूनबुजून खोटें मत प्रसिद्ध केल्याचें किंवा त्याचा अभिमान धरल्याचें आमचें आह्मांस तरी माहीत नाहीं, व कोणीं तसा आरोप केलेला आमच्या पाहण्यांत किंवा ऐकण्यांत आला असतां त्याचें यथामति आमच्याकडून निरसन होत जाऊन प्रसंगोपात्त प्रतिपक्ष्याची कोटिही आह्मीं घेतलेली आहे. आतां दोघांच्या नजरेस जी गोष्ट आपापल्या तऱ्हेनें खरी वाटते तींत भेद कां पडावा असें कोणास कदाचित् वाटेल, पण हा मतभेद मनुष्यस्वभासच लागला आहे असें समजावें. लोकांत जसें रुचिवैचित्र्य आढळतें तसेंच मतवैचित्र्य हेंही दृष्टीस पडायाचेंच. फार तर काय, पण आपापल्या ठिकाणींही समजुतींचा फेर किती होत असतो! याप्रमाणेंच पाहतां लोकहितवादींच्या व आमच्या काळांतील अंतर, त्या वेळची विद्यापद्धति, या वेळची विद्यापद्धति, तेव्हांची देशस्थिति, आमची देशस्थिति, इत्यादि गोष्टी क्षणभर ध्यानांत आणल्या असतां, ज्या गोष्टी रावबहादुरांस व तत्कालीन लोकांस युक्तिहृच्या सिद्धांतांसारख्या वाटत होत्या, त्या आतां आह्मांस फार निराळ्या तऱ्हेनें भासूं लागल्या आहेत यांत कांहीं आश्चर्य नाहीं; दर एक पिढींत शेंकडों विषयांवर याप्रमाणें मतांतर होत जाणें हा सृष्टिक्रमच आहे, व हें मतांतर कोणत्याही प्रकारें अनिष्ट नसून लोकांच्या विवेचनशक्तीचा प्रवाह अप्रतिबद्ध होत्साता चालू आहे याचें हें अत्यंत अभिनंदनीय निदर्शन होय! असो; तर रावबहादुरांनीं आमच्याकडे आपले ग्रंथ परीक्षणार्थ पाठवले, याबद्दल त्यांचे आभार मानून व एक दोन वेळां आमचा अभिप्राय प्रगट करण्याविषयीं त्यांनीं आह्मांस सूचनाही केल्या त्यांवरून प्रदर्शित होणाऱ्या त्यांच्या प्रांजल बुद्धीची तारीफ करून हा नमस्कृतिरूप अंक संपवतों.

---

कस्यात्यन्तं सुखमुपनतं दुःखमेकान्ततो वा
नीचैर्गच्छत्युपरि च दशा चक्रनेमिक्रमेण।[१]
—'मेघदूत',(उत्तरमेघ, ४६, उत्तरार्ध. 'सं०') कालिदास.

अंक ६५—(१) प्रस्तुत अंकाचा विषय. (२) देशाची निकृष्ट स्थिति. (३) अशा स्थितीचीं दोन स्वरूपें. (४) त्यांपैकीं दुसरें आपल्या देशास लागू. (५) वरील स्थिति प्राप्त होण्याचीं कारणें.

१. मागील अंकांत लोकहितवादींच्या ग्रंथांचें सामान्य स्वरूप कोणत्या प्रकारचें आहे तें सांगितलें. आतां त्यांत अनेक विषयांवर जीं मतें त्यांनीं प्रगट केलीं आहेत त्यांविषयीं विचार करायाचा. हीं मतें व्यवस्थेवार दाखल केलीं नसल्यामुळें अर्थातच त्यांचा निर्देश करतां येत नाहीं. तरी तीं त्यांच्या बहुतेक ग्रंथांतून आढळत असल्यामुळें व सामान्यतः सर्वांस माहीत असणाऱ्यांपैकींच असल्यामुळें त्यांचा निर्देश करणेंही तादृश आवश्यक नाहीं. यास्तव त्यांच्या यथार्थत्वाविषयीं येथें सामान्यतः विवेचन करतों.

२. लोकहितवादीप्रभृति जे आमच्या देशाचे आक्षेपक आहेत त्यांच्या लेखांतून व भाषणांतून आढळणारा पहिला मोठा मुद्दा पाहिला तर हा आढळेल कीं, आह्मी आपलें प्राचीन वैभव आपल्या मूर्खपणानें घालवून आतां व्यर्थ हांका मारीत बसलों आहों, व इतकी निकृष्ट स्थिति प्राप्त होऊन साऱ्या जगांत केवळ नादान ठरलों असतां व परकी लोकांच्या लाथा खात असतां निलाजऱ्यांसारखे अद्याप सुस्त होऊन पडलों आहों. मेकॉलेप्रभृति स्वदेशमहिमा गाणारे ग्रंथकार, सद्धर्मांच्या आवेशानें बरळणारे मिशनरी व बाटे(ट्ये? सं०)मंडळ, उसनी धर्मस्फूर्ति आणून नव्या धर्मांच्या खटपटीस लागलेली ब्रह्मसमाज, प्रार्थनासमाज, आर्यसमाज, सत्यशोधक समाज यांतील भक्तमंडळी, 'घाशीराम कोतवाल'कारप्रभृति चार दिवस घाशीरामी चालवून घेतलेले अर्वाच्य पंडित, या साऱ्या मंडळींची, आमच्या देशाच्या संबंधाची एक मोठी समजूत ही आहे कीं, आमचा देश केवळ आसन्नमरण झाला आहे, आमच्यांत कोणत्याच प्रकारचा कांहींच वकूब म्हणून राहिला आहीं, ही परम शोचनीय स्थिति आह्मी आपल्या मूर्खपणाच्या योगानें आपणांस आणली, आणि हींतून निघण्याचे उपाय ह्मटले ह्मणजे वरील तत्त्वज्ञमंडळी आमच्यावर मेहेरबानी करून आह्मांवर आपआपल्यापासच्या मात्रांचे प्रयोग काय करील तेवढेच काय ते! या प्रयोगांखेरीज सध्यां आमची बिलकुल घडगत नाहीं. आमचे रावबहादुर तर आज चाळीस वर्षें आमच्या कानीं कपाळीं ओरडताहेत कीं, तुमची ऋषींच्या कारकिर्दींत मात्र बरी स्थिति होती, तेव्हांपासून आज दोन हजार वर्षें ढुह्मी सारखे खालीं जात आहां. भर्तृहरीनें जसें ह्मटलें$ आहे कीं,

अधोधो गङ्गेयं पदमुपगता स्तोकमधुना
विवेकभ्रष्टानां भवति विनिपातः शतमुखः।

---

१. "सदोदित सुखी किंवा सदोदित दुःखी असा कोण आहे? चाकाच्या धांवेप्रमाणें मनुष्याची स्थिति ही वरचेवर वर खालीं होतच असते!"

$ वैराग्यशतक, ४४, उत्तरार्ध. 'सम्पादक'

" गंगा ही शंकराच्या मस्तकापासून जी भ्रष्ट झाली ती जातां जातां शेवटीं अगदीं भूमितलापर्यंत जाऊन पोंचली; तर याप्रमाणेंच ज्यांचा विवेक सुटला त्यांची शेंकडों प्रकारांनीं विटंबना होते." —त्याप्रमाणेंच दोन हजार वर्षांपूर्वीचे इंद्रवरुणादि देव, गवालंभ,‡ नियोग$ वगैरे आचार, गुरुगृहीं बारा बारा चोवीस चोवीस वर्षे वास, इत्यादि गोष्टी चट साऱ्या सुटून जाऊन पुराणांचा शिमगा जेव्हांपासून सुरू झाला व भटांच्या घृतकुल्या व मधुकुल्या देशांत प्रवृत्त झाल्या, तेव्हांपासून वरील कुल्यांच्या प्रचंड प्रवाहाच्या वाटे येथील संपत्ति, येथील पराक्रम, येथील विद्या, येथील कौशल्य, चट सारें पार वाहून गेलें ! भटांच्या पायीं या देशाची गेल्या दोन हजार वर्षांत अशी दशा होऊन गेली कीं, आह्मांस हवें त्यानें खुशाल तुडवावें, आमचें भरलें घर लुटावें, आह्मांस गुलाम करावें, तरी आपल्या नीच अवस्थेबद्दल आह्मांस कांहीं वाटूं नये. असें होतां होतां शेवटीं आमच्या डोळ्यांत दारिद्र्यांजन घालून आह्मांस शुद्धीवर आणण्याकरतां आकाशांतील प्रभूनें दयालु होऊन साऱ्या पृथ्वींतले शहाणे लोक आह्मांवर अंमल करण्याकरतां पाठवले ह्मणून बरें झालें; नाहीं पेक्षां आमची आजला काय अवस्था होऊन जाती कोण जाणे !

आतां सर्वांनीं गृहीत धरलेला हा जो पहिला मोठा मुद्दा हा कितपत खरा आहे, याविषयीं प्रथमतः विचार केला पाहिजे. हा विचार दोन प्रकारांनीं करायाचा. एक आमच्या देशाची खरोखरच अत्यंत निकृष्टतेची स्थिति आहे कीं काय ? आणि दुसरें, ती तशी असल्यास तीस आमचें मौर्ख्य कितपत कारणभूत आहे ?

३. आतां वरील दोन प्रश्नांपैकीं पहिल्याचें उत्तर तर सर्वांपाशीं सिद्धच आहे, कीं हा देश अगदीं खराबीला येऊन पोंचला आहे. लोकांस अठरा विश्वे दारिद्र्यानें गांठलें असून खाण्याची मुद्दां दिवसांदिवस भ्रांत होऊं लागली आहे; कोणत्या व्यापारांत ह्मणून तेजी राहिली नाहीं; घरीं दारीं विलायत भरली आहे. सरकारी देण्यानें तर लोकांस अगदीं टेंकीला आणून वरचेवर नव्या बाबी निघतच आहेत; लोकांतला वकूब पाहिला तर कोणाच्या अंगीं हिंमत नाहीं, जो तो आपल्यापुरतें पाहणारा, दुसऱ्याचें पागोटें माझ्या हातीं कसें येईल, वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे चुगली करून दुसऱ्यास पेंचांत कसा आणीन, पुढें पुढें शेंपूट हलवून व बुटाचे पवित्र प्रहार सोसून खुशामत कशी करीन, या विचारांत बहुतेक मंडळी मग्न; शिपाईगिरी लोकांत किती राहिली आहे ह्मणाल तर शस्त्रास्त्रांचीं चित्रें पुस्तका-

---

‡ गोमेध, गोयज्ञ. 'सम्पादक'

$ दिराकडून प्रजोत्पादनः—निपुत्रिक बालविधवेला पतीचा वंश बुडूं नये इतक्यापुरतीच दिराशीं अगर पतीच्या दुसऱ्या कोणा जवळच्या आप्तनातलगाशीं संयोग करण्याची प्राचीन काळीं परवानगी असे. अशा रीतीनें झालेल्या पुत्रास 'क्षेत्रज' ह्मणत.

व्यासापासून विचित्रवीर्याच्या विधवा स्त्रियांना अशा रीतीनेंच धृतराष्ट्र व पांडु हीं अपत्यें झालीं.

देवराद्वा सपिण्डाद्वा स्त्रिया सम्यङ्नियुक्तया ।
प्रजेप्सिताधिगन्तव्या सन्तानस्य परिक्षये ॥ 'सम्पादक'

सून पाहावीं व त्यांचे प्रयोग इतिहासांत वाचावे; नुसत्या शरीरसामर्थ्याकडे पाहावें, तर दर पिढीला आंत आंत पाय येत असून लवकरच हरभऱ्याच्या झाडाला शिडी लावण्याची पाळी येते की काय कोण जाणे असें वाटतें! जुन्या विद्या, जुन्या कला, या तर नाहींशा होत चालल्या आहेत; त्यांच्या जागीं नव्या येत चालल्या आहेत ह्मणावें तर तेंही नाहीं. याखेरीज दुष्काळ, महामारी वगैरे हळूंहळूं येथें निरंतरचें बिऱ्हाड करूं पाहत आहेत असेंही दिसतें! एकंदरीत हल्लींच्या काळाला या देशाची स्थिति मोठी भयंकर झाली आहे यांत बिलकुल संशय नाहीं.

तेव्हां वरील रीतीनें पाहतां आमच्या देशाच्या आक्षेपकांचें ह्मणणें सर्वथैव खरें आहे हें कोणीही कबूल करील. पण निकृष्ट स्थितीचीं दोन स्वरूपें असतात; एक शाश्वत अथवा नित्य व दुसरें आगंतुक अथवा नैमित्तिक. जसा झाडाच्या मुळाला अपाय झाला किंवा मनुष्यास क्षयाची भावना झाली ह्मणजे त्यांची वाढ खुंटून तीं दुसऱ्या पंथाला लागलीं असें समजायाचें, त्याप्रमाणेंच फार दिवस परकी अमलांत राहिल्यानें किंवा त्यांची स्वतःची व्यवस्था सुटल्यानें जें अगदीं निःसत्त्व होऊन गेलें त्या राष्ट्राची स्थिति होय. अशा अवस्थेस शाश्वत निकृष्टावस्था ह्मणतां येईल. अशा स्थितींत राष्ट्र फार दिवस राहणें ह्मणजे मुष्कीलच हें सांगणें नको. दुसरी आगंतुक अथवा नैमित्तिक निकृष्टावस्था ह्मणजे कांहीं अपूर्व अनर्थोपात होऊन त्यांच्या योगानें जेव्हां राष्ट्र क्षीण होऊन जातें, पण त्याच्या अंगचा जोम कायम असल्यामुळें कालेंकरून त्याची स्थिति पुनः सुधारते किंवा पहिल्याहून त्याची अधिक भरभराटही होते. या दोन्ही स्थितींचीं उदाहरणें अनेक आहेत. मिसर, इराण, वगैरे देशांचें वैभव नष्ट झाल्यास आज हजारों वर्षे होऊन गेलीं, व आजला तर त्यांचा फारसा मागमूसही उरला नाहीं ह्मटलें असतां चालेल. ग्रीस देश हा प्राचीनकाळीं अत्यंत उत्कर्षाच्या स्थितीस येऊन पोंचला असतां आणि सर्व विद्या व सर्व कला जशा काय तेथें अवतीर्ण होऊन राहिल्या असतां, हल्लीं त्या देशाची स्थिति पाहिली तर पन्नास वर्षांपूर्वीं तर तो मुसलमानांच्याच ताब्यांत होता, आणि हल्लीं जरी स्वतंत्र स्थितींत आहे तरी पूर्वीच्या वैभवाची आज तेथें छायाही दृष्टिगोचर होत नाहीं. यूरोपच्या संस्थानांतील अत्यंत निकृष्ट स्थितींतलें संस्थान ग्रीस हें होय. यासारखीच पुष्कळ अंशीं इटाली देशाचीही स्थिति होय. जे लोक पूर्वी साऱ्या जगास अजिंक्य होऊन राहिले होते, व ग्रीक् लोकांची विद्या ज्यांनीं संपादन करून वृद्धिंगत केली होती, त्या लोकांची आज प्रसिद्धि ह्मटली ह्मणजे मिजास, छानछूक, नीतिभ्रष्टता या गुणांनींच फारकरून आहे. शेजारच्या राष्ट्रांनीं त्यास यापूर्वी अनेक वेळां पादाक्रांत करून टाकलें आहे, व हल्लीं एकंदर युरोपियन् राष्ट्रांत सदरील देशाची गणना सामान्य प्रतींतच आहे. तेव्हां मिसर, इराण, ग्रीस, रोम, हीं उदाहरणें वर सांगितलेल्या पहिल्या स्थितीचीं होत. दुसऱ्या स्थितीचीं उदाहरणें ह्मटलीं ह्मणजे केनीच्या † लढाईनंतर रोमची जी अवस्था झाली, पानपतच्या दारुण संग्रामानंतर ब्राह्मण

† Battle of Cannae. खि. पू. २१६. दुसऱ्या प्यूनिक युद्धांतील एक लढाई. या लढाईंत

(पुढें चालू.)

बादशाहीचा जो अपकर्ष झाला, किंवा शिवाजीच्या मरणोत्तर त्याच्या विजवठ्या लेकानें जें लवकरच चोहोंकडे वाटोळें करून टाकलें, हीं सर्व होत. या सर्व महाप्रसंगीं वरील राष्ट्रांची स्थिति खग्रास झालेल्या चंद्राप्रमाणें झाली होती. पूर्णग्रस्त चंद्र जसा सर्वथा निष्प्रभ होत्साता दीन दिसूं लागतो, किंवा सूर्य तर पूर्णग्राससमयीं आकाशांतून अगदीं नाहींसा झाल्यासारखा होतो, त्याप्रमाणेंच केनीच्या लढाईनंतर कांही दिवस रोमची सत्ता त्या शहरच्या तटापर्यंतच काय ती होती; पानपतच्या रणमखांत जी पूर्णाहुति पडली, तिच्या योगानें खुद्द पेशव्याची तर कंबरच खचून तो मरणाच्या दारीं बसला; व एकंदर राज्यावरही अत्यंत ग्लानि आली; आणि तिसऱ्या उदाहरणांत तर मराठ्यांची राजधानी व राजकुल त्यांच्या चिरंतर वैऱ्याच्या कबजांत सांपडून संपूर्ण राज्यवृक्ष उपटून पडण्यासारखाच झाला होता! तरी असल्या भयंकर विपत्तींतही वरील तीन संस्थानें. डगमगलीं नाहींत; कारण त्यांचा बाह्यत: जरी अगदीं विध्वंस झाला, तरी त्यांचा आंतला जोम जसाचा तसा कायम होता. यास्तव,

> कीं तोडिला तरु फुटे अणखी भरानें
> तो क्षीणही विधु महोन्नति घे क्रमानें ।

या न्यायानें त्यांचें लवकरच पुनरुज्जीवन झालें. हें तर काय, पण जसें खच्ची केलेलें झाड पुनः विलक्षण जोरानें फोफावतें, त्याप्रमाणेंच वरील संस्थानांनीं पुन: आपला प्रभाव असा प्रगट केला कीं, त्यांच्यापुढें त्यांचे शत्रु अगदीं जेरीला आले. रोमन् लोकांनीं केनीच्या लढाईचा बदला झामाच्या * लढाईंत घेतला; थोरल्या माधवरावानें हिंदुस्थान पुनः सर करून यवनांचें पुन: शासन केलें, निजामाची खोड मोडून हैदरास तर वेळोवेळ चीत केलें, शिवाय नागपुरकर, कोल्हापुरकर वगैरेंचा बंदोबस्त करून घरचें काकांचें प्रचंड बंड मोडलें तें निराळेंच! त्याचप्रमाणेंच मराठे सरदारांपैकीं दोघां पठ्ठयांनीं § अवरंजेबाचा कसा पाठपुरावा केला, व शेवटीं त्यास जेमतेम करीत अहमदनगरांत कसें नेऊन घातलें, हेंही

---

हानिबलनें रोमन् लोकांचा पराभव केला. या लढाईंत रोमन् लोकांचें कमींत कमी ४०००० पायदळ व ३००० घोडेस्वार त्या एका दिवसांत बळी पडले. हानिबलचे सुमारें ६ ते ८ हजार लोक बळी पडले असावे असा अंदाज आहे. याहून ज्यास्त रक्तपात झालेली लढाई इतिहासांत आढळणें दुर्मिळच. रोमन् लोकांचा नुसता चुराडा उडून गेला. 'सम्पादक'

* Zama Regia च्या लढाईंत (खि. पू. २०२) रोमन् लोकांनीं केनीच्या लढाईचा वचपा काढला. सिपिओ (Scipio) यानें हानिबलचा पराजय केला व या लढाईनें दुसऱ्या प्यूनिक युद्धाचा शेवट झाला. या लढाईंत रोमन् लोकांचे सुमारें दोन हजार व कार्थेजिनिअनांचे वीस हजार लोक कामाला आले. जरी हानिबलचा पराजय झाला तरी त्याचा नक्षा पुरा उतरला नाहीं. पुनः युद्धाची तयारी करण्यासाठीं त्यानें तह करून पन्नास वर्षांत हप्त्यांनीं युद्धाच्या खर्चाबद्दल खंडणी म्हणून दहा हजार चांदीचीं टॅलेंट्स् नाणीं (आजच्या किंमतीप्रमाणें सुमारें चोवीस लक्ष पौंड) देण्याचें कबूल केलें. शिवाय कार्थेजिनिअन् लोकांनीं आफ्रिकेंत मुळींच युद्ध करूं नये व आफ्रिकेबाहेरहि रोमच्या संमतीविना युद्ध करूं नये अशाहि अटी या तहान्वयें ठरल्या. 'सम्पादक'

§ पाम नाईक व धनाजी जाधव. 'सम्पादक'

सर्व इतिहासज्ञांत विदित आहेच. तर हीं तीन उदाहरणें दुसऱ्या प्रकारच्या निकृष्ट स्थितीचीं होत.

४. आतां सध्यां हिंदुस्थानची जी निकृष्ट स्थिति आहे, ती वरच्यांपैकीं कोणती आहे याचा विचार करणें अवश्य आहे. या विषयावर एकंदरींत पाहतां कोणाचाही मत-भेद नाहींच ह्मटलें असतां चालेल. राजा राममोहनरायापासून तों जोतीबापर्यंत व एडन्-वासी दरवडेखोरापासुन तों परवां निवर्तलेल्या जोशीबुवांपर्यंत आज शेंकडों लोकांचे जे अनेक प्रकारांनीं उद्योग चालू झाले व पुढें चालू आहेत त्या सर्वांवरून अर्थात् हेंच अनुमान निघतें कीं, ही आर्यभूमि आज अनेक कारणांनीं जरी विपन्न स्थितीस येऊन पोंचली आहे तरी प्रयत्नांतीं तिचा उत्कर्ष होण्याचा अद्याप संभव आहे. आमचे राज्यकर्तेही आह्मांस कळूं लागल्यापासून आह्मांस हेंच सांगत आले आहेत कीं, "बाबांनों, तुमचा हा विस्तीर्ण देश आकाशांतील प्रभूच्या सत्तेनें आमच्या हातीं जो आला आहे तो उगीच नव्हे. आह्मांस देवानें तुमचे पालक नेमले आहेत. तर तुमची अज्ञानदशा सरून तुह्मी आपला कारभार स्वतः पाहूं लागण्याजोगे हुशार झालां ह्मणजे मग आमचें काम कांहीं उरलें नाहीं. आह्मी कृतकृत्य होत्साते तुह्मांस दिल्लीपदावर आरूढ करून आपल्या श्वेतद्वीपास पुनः परत जाणार !" या नाटकी आश्वासनांत कितीही तथ्य असो; तरी निदान येवढें खरें आहे, कीं आजपर्यंत आमच्या राज्यकर्त्यांनीं आह्मांस अज्ञानदशेंतून काढण्यास पुष्कळ प्रयत्न केले, व अद्यापही ते प्रयत्न चालूच आहेत; तसेंच वरील प्रयत्नांस यशही पुष्कळ आलें यांत संशय नाहीं. ही जी पाश्चात्यांच्या प्रयत्नांची येथें सफलता झाली हिजविषयींच नुसता विचार केला असतां आमच्या राष्ट्राची अंतर्गत स्थिति कशी आहे हें कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. जसा एकादा नदीप्रवाह लव्हाळ्यांनीं चहूंकडून आच्छादून टाकला असल्यामुळें दृष्टिगोचर होत नसतो व तो आटून गेला कीं काय असा भास होतो, किंवा एकादा जबरदस्त घाव घातल्यानें चांगला सशक्त मनुष्यही जसा कांहीं वेळ निश्चेष्ट होऊन पडतो, तशी वस्तुतः पाहतां आज आमच्या देशाची स्थिति झाली आहे. पूर्वीं कधींही पडली नव्हती अशी परकी अंमलाची जबरदस्त मगरमिठी त्यावर एकाएकीं येऊन पडल्यामुळें त्याची हालचाल अगदीं बंद झाल्यासारखी बाह्यतः दिसते खरी, व इतक्या दिवसांच्या निश्चेष्टतेनें त्याच्यावर पुष्कळ ग्लानि आली आहे हेंही खरें; तरी एकंदरींत पाहतां आंतल्या शरीरप्रकृतीस कांहीं धक्का पोंचला आहे असें आह्मांस वाटत नाहीं.

वरील मत पुष्कळांस विलक्षण वाटण्यासारखें आहे, व आजपर्यंत आमच्या देशाच्या संबंधानें जे जे ह्मणून विचार बाहेर पडले आहेत त्या सर्वांस तें विरुद्धच आहे ह्मटलें असतां चालेल. आमचा धर्म बिघडला आहे, आमची नीति सुटली आहे, आमचे मूळचे चांगले आचार जाऊन वेडगळ रीतिभाति आह्मांस लागल्या आहेत, इत्यादि विषयांचें प्रतिपादन कोणीं ऐकलें नाहीं ? लोकहितवादींच्या ग्रंथांतून तर प्रायः याच तत्त्वांचें विवेचन आढळतें. मग हीं सर्व मतें एकीकडे ठेवून या आमच्या देशाच्या प्रकृतीचें मान यथास्थित

आहे, व त्याच्या रक्तशुद्धीबद्दल विशेष आयास करण्याची जरूर नाहीं, हें मत किती धाष्टर्याचें वाटणारें आहे हें सांगणें नको! यास्तव त्यावर सविस्तर विवेचन करणें जरूर आहे.

एकाद्या मनुष्याची शरीरप्रकृति दुरुस्त किंवा नादुरुस्त आहे याची परीक्षा जशी त्याच्या नाडीवरून वगैरे करतां येते, त्याचप्रमाणें देशाची स्थिति ठाम करण्याचें अमुकच एक साधन आहे असें जरी नाहीं, तरी सामान्यतः कित्येक गोष्टींवरून वरील निर्णय होण्यासारखा असतो. या गोष्टी शिपाईगिरी, बुद्धिमत्त्व, कलाकौशल्य इत्यादि होत. आतां हे गुण आमच्या देशांत अद्याप कायम आहेत हें ह्मणणें पुष्कळांस केवळ हटवादीपणाचें वाटेल, पण जो वस्तुतः शोध करील त्यास वरील उल्लेख केवळ तसा वाटणार नाहीं. हल्लीं आमचा देश येथून तेथून सारा परद्वीपस्थ लोकांच्या ताब्यांत आला असून त्यांत जीं अनेक शूर राष्ट्रें आजपर्यंत स्वातंत्र्यानें वागत होतीं तीं आजला सर्व परतंत्र होऊन गेलीं आहेत. त्यांतील सध्यां एकासही स्वसत्तेनें अमुक गोष्ट करीन ह्मटलें तर सामर्थ्य उरलें नाही, वगैरे जे प्रकार येथें सर्वांस दृष्टीस पडतात त्यांवरून सामान्यतः कोणासही असें वाटण्याचा संभव आहे कीं, हिंदुस्थानांतील वीस कोट प्रजा ही केवळ नामर्द झालेली आहे, हींत कांहीं जीव उरला नाहीं. आमच्यांत तर कित्येक असे बहाद्दर गणिती आहेत कीं, वरील एकंदर लोकसंख्येचा व या देशांत असणाऱ्या युरोपियन् फौजेचा मेळ घालून देऊन दहा हजार काळे लोकांबरोबर एक गोरा शिपाई असें ते बेलाशक कोष्टक घालून देतात! लोकहितवादीप्रभृति देशकार्यधुरंधरांची समजूत तरी वरच्याहून भिन्न आहे असें नाहीं. आतां अंमळ विचार केला असतां वरील अभिप्राय कितपत यथार्थ ठरतो तो पाहूं.

जगाच्या कोणच्याही भागाचा इतिहास ज्यानें मननपूर्वक वाचला असेल त्याच्या एक गोष्ट सहज लक्षांत येणारी आहे कीं, दोन सैन्यांचें युद्ध झालें असतां त्यांत जय अप-जय जो होत असतो त्यावरून सैनिकांच्या शरीरसामर्थ्याचा व मर्दुमकीचा नेहेमी सुमार लागण्यासारखा असतो असें नाहीं. जयापजयांत यदृच्छेचा जो भाग असतो तो जरी काढून टाकला, तरी अवशिष्ट भागांत मुख्य अंश म्हटला ह्मणजे सेनानायकाचें युद्धकौशल्य हाच होय. काष्ठयुद्धांत ह्मणजे बुदबळांच्या डावांत सरशी होणें हें जसें खेळणाराच्या पटाईत-पणावर नेहेमी असतें, तसाच पुष्कळ अंशीं प्रकार खरोखरच्या युद्धांतील होय. त्यांतून आलीकडे तर दारूचा उपयोग लढाईंत होऊं लागल्यापासून वरील काष्ठयुद्धाचें साम्य युद्धास अधिकाधिकच येत चाललें आहे. पूर्वी लढाई जिंकण्यास अंगच्या जोराचें जसें काम पडत असे, तसें आतां फारकरून नाहींच ह्मटलें असतां चालेल. दूरच्या दूर राहून सेनानायक सांगेल त्या वेळेस गोळ्यांचा भडिमार करायाचा व तो हुकूम फिरवील त्याप्रमाणें भराभर रणभूमीवर हालचाल करायाची येवढेंच आलीकडे शिपायांचें काम झाल्यामुळें सेना हें केवळ एक चालतें बोलतें यंत्रच बनून राहिलें आहे. त्याला स्वतःची ह्मणून प्रेरणा मुळींच नसून वरून जी इशारत येईल ती अंमलांत आणावी येवढीच त्याची कामगिरी. हें स्थित्यंतर युद्धकलेंत आलीकडे झाल्यामुळें काय चमत्कार झाला आहे कीं, मोठा उंचापुरा जवान

सारखाच व वाऱ्यानें उडून जाण्यासारखें एकादें किचकट पोरही सारखेंच ! सैनापत्याच्या कामांतही बरच्यासारखाच फरक झालेला आहे. पूर्वीप्रमाणें आतां सेनापति मोठा धिप्पाड पुरुष व सर्व शस्त्रास्त्रांत कुशल असा असला पाहिजे असें नाहीं. त्याचें कसब त्यास माहीत असलें ह्मणजे बस होतें; त्याच्या अंगच्या सामर्थ्याचा त्याच्या युद्धकौशल्याशीं कांहीं संबंध नाहीं. येवढा नेपोलियन् बादशहा, कीं जो दहा बारा वर्षांत गोलंदाजीपासून बादशाहीपर्यंत चढला, व प्रत्यक्ष त्याचे शत्रु ज्याच्याविषयीं असें ह्मणत असत, कीं तो एकटा सैन्यांत असणें व अर्ध्या लाख फौजेची कुमक मिळणें बरोबर असे,—ती स्वारी स्वतः कशी होती ह्मणाल तर वामनमूर्ति, व लढाईत ह्मटलें तर सरासरी पेशव्यांच्या मूळ पुरुषाच्या तोडीचे ! ![१]

वर सांगितलेली गोष्ट अंमळ ध्यानांत धरली असतां आमच्या देशाच्या प्राच्य व पाश्चात्य आक्षेपकांनीं एतद्देशीय लोकांच्या शिपाईगिरीच्या संबंधानें केलेल्या पांडित्याचा प्रायः विध्वंस होऊन जाणारा आहे. तिजवरून एकादें पोर सुद्धां सांगूं शकेल कीं, एकाद्यानें उंच डोंगरावर जाऊन उभें राहून मी साऱ्या पृथ्वींतील माणसांहून उंच आहे असें ह्मणणें, किंवा आगगाडींत बसलेल्या मनुष्यानें पायीं धांवणाऱ्या मनुष्याहून मी अधिक वेगवान् ह्मणून फुशारकी मारणें, हीं कृत्यें जितकीं समंजस आहेत; तितकाच समंजसपणा नेपोलियन्च्या शिपायानें किंवा येथील पलटणींतील गोऱ्या मनुष्यानें आपल्या वीरश्रीची बढाई मारण्यांत आहे. शिवाय ही दुसरी गोष्टही कोणाच्या सुद्धां लक्षांत येईल, कीं दहा हजार नेटिव लोकांस जर एक युरोपियन् भारी, तर मग गेल्या शंभर वर्षांत कित्येक वेळां इंग्रज लोकांचे जे पराभव झालेले आहेत व कत्तली उडाल्या आहेत तो सर्व प्रकार खोटा ह्मटला पाहिजे !

तेव्हां एकंदरींत वरील मत, कीं एतद्देशीयांवर परकी लोकांचें वर्चस्व झालें आहे

---

१. मेकॉलेनें एके ठिकाणीं पुढील उल्लेख केला आहेः—

"Bonaparte loved to describe the astonishment with which the Mamelukes* looked at his diminutive figure. Mourad Bey, distinguished above all his fellows by his bodily strength and by the skill with which he managed his horse and his sabre, could not believe that a man who was scarcely five feet high and rode like a butcher, was the first soldier in Europe! —*Life and works of Addsion*

* मूळचे तेराव्या शतकांतील तुर्की व सर्केशियन् (सर्केशिया हा पूर्वी राशियन् कॉकेशिया प्रांताचा पश्चिमेकडील भाग होता.) गुलाम व ईजिप्तच्या सुलतानाचे शरीरसंरक्षक होते. पण हे पुढें इतके जबरदस्त झाले कीं, इ. स. १२५० मध्यें आपणापैकींच एकास त्यांनीं ईजिप्तच्या सिंहासनावर बसविलें. अशा रीतीनें ईजिप्तची गादी इ. स. १५१७ पर्यंत यांच्याकडेच होती. तदनंतर तुर्कांनीं ईजिप्त खालसा करून त्यांना बेस् (Beys) च्या नोकरींत समाविष्ट केलें. पण नेपोलियन्नें ईजिप्त जिंकल्यावर हे लोक पुढें आले व कांहीं काळ राज्याधिकारीहि झाले. परंतु इ. स. १८११ सालीं कैद करून केरोच्या किल्ल्यांत महंमद अलीच्या हुकुमावरून त्यांची कत्तल करण्यांत आली.

'सम्पादक

यास्तव ते पराक्रमहीन होत, हें अगदीं असमंजस होय. याशिवाय प्रत्यक्ष प्रमाण पाहिजे असल्यास या देशांतील काळी फौज हें एक आहेच. शिवाय हेंही कोणास सांगायास नकोच, कीं पूर्वीपासून शिपाईगिरीविषयीं प्रख्यात असे जे रजपूत, पुरभय्ये वगैरे लो* यांच्या अंगचें पाणी हल्लींच्या चिरकालिक स्वस्थतेनेंही कमी झालें आहे असें नाहीं; इतकेंच कीं तें प्रगट होण्यास हल्लीं बिलकुल जागाच नाहीं[1]!

१. 'राजा कालस्य कारणम्' या संस्कृत म्हणीप्रमाणें जें राष्ट्र कांहीं काळापूर्वी साऱ्या जगास भारी झालेलें असतें तेंच पुढें किती नादान होऊन जातें याची पुढील उताऱ्यावरून प्रतीति येईल:—

"The character of the Swedes has differed greatly in different ages; nor is it very uniform. At present their peasants seem to be a heavy plodding race of men, strong and hardy, but without any other ambition than that of subsisting themselves and their families as well as they can. It seems difficult to conceive that the modern Swedes are descendants of those, who, under Gustavus* Adolphus and Charles XII$ carried terror in their names through distant countries, and shook the foundations of the greatest empires. The intrigues of their senators drew them to take part in the Seven Years' War against Prussia; yet their behaviour was spiritless, and their courage contemptible." —*Geographical Grammar*.

"Who that has lived here (Berlin) will deny that the Prussians are energetic, patriotic, and teeming with youthful vigour; that they are not corrupted by sensual pleasures, but are manly, have eranest convictions, do not think it beneath them to reverence sincerely what is noble and lofty ? What a melancholy contrast does France offer in all this ? Having sneered at everything; she has lost the faculty of respecting anything. Virtue, family life, patriotism, honour, religion, are represented to a frivolous generation as fitting subjects of ridicule. The theatres have become schools of shamelessness and obscenity. Drop by drop poison is instilled into the very core of an ignorant and enervated society, which has neither the insight nor the energy left to amend its institutions, nor—which would be the most necessary step to take-become better informed or more

(पुढें चालू.)

* Gustavus, Vasa:—स्वीडन्‌चा राजा (१५२३-१५६०). यानें डेन्स् लोकांस आपल्या देशाबाहेर हांकून दिलें व आपल्या उत्तम राज्यपद्धतीनें स्वीडन् देशाला खूप भरभराटीची स्थिति आणली. 'सम्पादक'

$ स्वीडन्‌चा राजा बारावा चार्लस् (१६८२-१७१८). हा शूर पण लहरी आणि युद्धप्रिय होता. यानें निर्भयपणानें वारंवार युद्धें केलीं पण अविचारीपणामुळें पराजय होऊन कित्येकदां त्याचें जबरदस्त नुकसान झालें. पीटर् दि ग्रेट् यानें याचा पुलोना (Pullowna) येथें पराजय केला. नॉर्वेमधील फ्रेडरिकशॅलच्या वेढ्यांत याचा खून झाला. 'सम्पादक'

हें वर सांगितल्यांपैकीं एका गुणाविषयीं झालें. आतां दुसरा गुण बुद्धिमत्त्व. या गुणाविषयीं आमच्या देशाची पहिल्यापासून प्रख्याति आहे. युरोपांतील अत्यंत प्राचीन राष्ट्रें जेव्हां उदयालाही आलीं नव्हतीं, तेव्हांपासून या आर्यभूमींतील लोकांच्या बुद्धीचा जो विकास झालेला आहे तो हल्लींच्या अपकर्षाच्या स्थितीतिही ल्यास गेला आहे असें म्हणवत नाहीं. पंचनददेशांत जेव्हां आर्यांची प्रथमत: वसाहत झाली, तेव्हां जी त्यांच्या बुद्धीची प्रखरता होती, ती आज हजारों वर्षें लोटून गेलीं असतां अद्याप जशीची तशीच कायम आहे असें म्हणण्यास हरकत दिसत नाहीं. वरील गोष्टींचें प्रमाण पाहण्यास फार लांब जावयास नको. इंग्रेजी विद्येचें अध्ययन आमच्या लोकांनीं किती जलद केलें, व जो विषय हातीं घेतला त्यांत ते किती लवकर पारंगत होतात, हें कोणासही सांगायाला पाहिजे असें नाहीं. युनिव्हर्सिटीच्या परीक्षा सुरू झाल्यास नुकतीं कोठें वीस वर्षें झालीं न झालीं तों इतक्यांत किताबवाले पैसापासरी होऊन बसले; अकरा वर्षांपूर्वीं सिव्हिल् सर्व्हिसच्या परीक्षेस जाण्याची सरकारानें इकडील मंडळीस सोय करून दिली, तों पहिल्याच खेपेला असा प्रकार नजरेस आला कीं हें लवांड कोठून केलें असें सरकारास होऊन त्यास पुढच्याच वर्षीं हात आखडावा लागला ! तेव्हां कोणत्याही विषयाचें ग्रहण करण्याची जी शक्ति आमचे लोकांचे ठायीं आढळते तिजवरून त्यांच्या बुद्धिमत्त्वाचें मान कोणाच्याही लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं.

वरील गुणाचाच विकास आमच्या देशांतील कलाकौशल्यांत दृष्टीस पडतो. हें अंगही प्राचीन काळापासून या देशास अनुकुल असून इतर देशांतून अपरिमित संपत्तीचा लोट इकडे येण्यास तें कारणभूत झालें हें इतिहासज्ञांस विदित आहेच. त्याप्रमाणेंच इकडील नमुने नेऊन युरोपियन् लोकांनीं आपल्या देशांत कारखाने सुरू केले, व त्याच्या योगानें इकडील उद्योग बसला, वगैरे गोष्टीही आलीकडे सर्वांस माहीत झालेल्याच आहेत. तरी इतकें असतांही येथील कारागिरी अद्यापि कोणत्या तऱ्हेची आहे याचा मासला एतद्देशीय व परदेशीय प्रदर्शनांतून दृष्टीस पडतो. इकडील कला जसे पाश्चात्य शिकले त्याप्रमाणेंच तिकडील कलांचा अभ्यास करून त्यांचा इकडे प्रचार करणें ही गोष्ट अद्याप लोकांच्या मनांत भरलेली नाहीं; पण ती जेव्हां भरेल तेव्हां इकडील कारागीर तिकडच्यांशीं टक्कर मारायाला लवकरच तयार होतील यांत बिलकुल संशय नाहीं.

तेव्हां एकंदरींत पाहतां आमच्या बुद्धीचा असा पक्का निश्चय आहे कीं, आमचे

---

moral. One after the other the fine qualities of the nation are dying out. Where is the generosity, the loyalty, the charm of our *esprit*, and our former elevation of soul? If this goes on, the time will come when this noble race of France will be known only by its faults. And France has no idea that while she is sinking, more earnest nations are stealing a march upon her, are distancing her on the road to progress, and are preparing for her a secondary position in the world. —*Character*

पूर्वीचे सर्व गुण आमच्या ठिकाणीं अद्याप कायम आहेत. इतकेंच कीं, भस्माच्छादित अग्नीप्रमाणें किंवा गंजलेल्या तरवारीप्रमाणें त्यांची हल्ली स्थिति झाली आहे. त्यांस प्रगट होण्यास हल्लींच्या मन्वंतरांत जर कोठें अवकाश असता तर ते कधीं असे अगोचर राहते ना. आतां हें खरें कीं, आमच्या राजकर्त्यांकडून आह्मांस वेळोवेळ मोठीं गोड गोड आश्वासनें मिळत गेलीं आहेत,— कीं आमच्या हिताखेरीज त्यांचा येथें राज्य करण्यांत दुसरा बिलकुल उद्देश नाहीं; आह्मांस उच्च स्थितीस आणून पोंचवलें ह्मणजे त्यांचें येथें दुसरें काम कांहीं उरलें नाहीं, धर्माची, जातीची वगैरे तफावत बिलकुल मनांत न आणतां आह्मांस मोठमोठाल्या जागा खुशाल दिल्या जातील. इ० इ०. वरील उदारोक्ति पार्लमेंटांतील भाषणांतून. जाहीरनाम्यांतून, दरबारांतील नाटकी बोलण्यांतून वगैरे सहस्रशः प्रगट झालेल्या आहेत. पण हा सर्व प्रकार बहुतेक वाग्डंबराचाच आजपर्यंत ठरलेला आहे. पण पुढें कधीं काळीं आमचें बादशाही सरकार आपल्या वचनांतील कांहीं अक्षरें तरी मोकळीं करण्याचें जेव्हां मनांत आणील, किंवा आमच्या लोकांची हल्लींची सुस्ती झडून त्यांस कंबर बांधून देशहितार्थ उद्योग करण्याचें अगत्य भासूं लागेल, तेव्हां वर सांगितलेल्या गुणांची त्यांस प्रतीति घडेल.

येथवर वरील दोन प्रश्नांपैकीं एकाचा उलगडा झाला;—कीं आमच्या देशाची अवस्था निकृष्टतेची आहे कीं कसें, व तशी असल्यास ती कोणत्या प्रकारची आहे ? आतां दुसऱ्या प्रश्नाचा विचार करायाचा. तो हा कीं, आह्मी निकृष्ट स्थितीस पोंचलों यास आमचें मौर्ख्य कितपत कारणभूत आहे ?

५. या दुसऱ्या प्रश्नाचाही उलगडा मागील प्रश्नाप्रमाणेंच वस्तुतः पाहतां तेव्हांच होण्यासारखा आहे. कोणतीही हानि होण्यास मूर्खत्व हेंच कारण होय हें उघड आहे. जर मनुष्य सर्वज्ञ असेल व सदोदित जागरूक राहील तर त्याची कोणतीही हानि होण्याचा संभव नाहीं. वरील दोन गुण जितक्या प्रमाणानें कोणामध्यें अधिक असतात तितक्या मानानें तो निर्भय व सुरक्षित असतो हें अनुभवसिद्धच आहे. तर अशा अर्थानें जर पाहिलें तर व्यक्तिमात्राची किंवा एकंदर राष्ट्राची निकृष्ट स्थिति ही ज्याच्या त्याच्या मूर्खतेचेंच फळ होय यांत संशय नाहीं. आमचे बाजीराव साहेब जर शहाणे व दूरदृष्टि असते तर या प्रांताची आजला अशी स्थिति कां होती ? भाऊसाहेब जर पानपतास आपलाच आग्रह धरून न बसते तर पुढें ओढवलेलें महाअरिष्ट कां प्राप्त होतें ? नेपोलियन् जर गर्वानें चढून न जातां अंमळ अक्कल खर्च करता, तर त्याचें पांच लाख सैन्य रशियांत गारद कां होतें ? व स्वतः चोरट्यासारखा एकटा माघारीं पळून कां येता ? माजी कंपनी सरकारच्या फौजेचा तरी असाच अफगाणिस्थानांत जो मागें नाश झाला तोही सुविचाराअंतीं टळला नसता काय ? तेव्हां एकंदरींत जेथें तेथें मूर्खत्वजन्य अविचार हाच फळाला येतो हें उघडच आहे. आपल्या भाषेंतच ह्मण आहे कीं, 'आधीं अक्कल जाते आणि मग मांडवल जाते.' मारवी

याही असाच दहा हजार रुपये किंमतीचा एक श्लोक † सर्वप्रसिद्ध आहे:—

सहसा विदधीत न क्रिया-
मविवेक: परमापदां पदम् ।
वृणते हि विमृश्यकारिणं
गुणलुब्धा: स्वयमेव सम्पद:,[1] ॥

तेव्हां वरच्याप्रमाणें सामान्यत: विचार करतां आमची आज जी पडती कळा आहे तीस आमचें मौर्ख्य कारणभूत आहे हें निर्विवाद आहे.

पण हा केवळ तात्त्विकरीत्या विचार झाला. हा व्यवहाराला कांहीं उपयोगी नाहीं. सर्वज्ञता व निरंतर जागरूकता हे मानुष धर्म जर मुळींच नव्हेत, तर मग त्यांच्या संबंधानें विवेचन करून फळ काय? वरील गुणांनीं जो विशिष्ट असेल तो सदोदित उच्च स्थितींत राहील हें ह्मणणें व ज्यास पंख असतील त्यास भुईवर पडण्याचें भय नाहीं हें ह्मणणें, हीं दोन्ही सारखींच होत. यास्तव वरील मुद्द्याचा व्यवहारदृष्ट्या विचार करणें जरूर आहे.

हा विचार ह्मटला ह्मणजे असा आहे कीं, सामान्यत: जगाची राहटी जी दृष्टीस पडते तिजकडे लक्ष दिलें पाहिजे; व साधारणपणें इतर राष्ट्रांविषयीं जी आपणांस माहिती आहे तिजवरून पाहतां हिंदुस्थानांतील लोकांस त्यांच्या विपन्न स्थितीबद्दल कितपत नांव ठेवणें रास्त आहे हें पाहिलें पाहिजे. वरील विचार करून जर असें ठरलें, कीं इतर राष्ट्रांचे ठायीं जें सामर्थ्य व जी अक्कल बहुधां आढळते तितकें सामर्थ्य व तितकी अक्कल सुद्धां आमच्या देशाच्या वांट्याला आलीं नाहींत तर मग आमच्या माथीं येणारा दोषारोप अवश्य पतकरला पाहिजे.

आमच्या या आर्यभूमीच्या संबंधानें जो कोणी विचार करूं लागेल त्यानें प्रथमत: ही एक मोठी गोष्ट लक्षांत ठेवली पाहिजे कीं, हा देश मोठा अवाढव्य आहे. हिंदुस्थानाचा विस्तार रशिया देश काढून टाकला असतां बाकीच्या युरोपखंडायेवढा आहे हें सर्वांस माहीत असेलच. तर हिंदुस्थान ह्मणजे युरोपांतील एकुणीस राष्ट्रें असें समजलें पाहिजे. या एकुणीस राष्ट्रांत जसे शेंकडों धर्मपंथ आहेत, शेंकडों तऱ्हेचे आचारविचार आहेत, शेंकडों भाषाभेद आहेत, तशीच स्थिति हिंदुस्थानांतील आहे. हिंदुस्थान हें जरी या देशाचें नांव आहे, तरी यांतच एकीकडे फिरंगाण ह्मणजे फिरंग्यांचा मुलूख आहे, एकीकडे हपसाण ह्मणजे हपशांचा मुलूख आहे, एकीकडे रोहिलखंड ह्मणजे रोहिल्यांचा मुलूख आहे, एकीकडे गोंडवन ह्मणजे अगदीं रानटी स्थितींतले गोंड लोक यांचा टापू आहे, गुजराथेचा भाग मुसलमानांनीं हांकून दिलेल्या पारशांनीं व्यापला आहे, पंजाब शिखांनीं धरला आहे, या

† किरातार्जुनीय, २, ३०. 'सम्पादक'

१. "कोणतीही गोष्ट उतावळीनें करूं नये, कां कीं अविवेक हा आपत्तींचें मुख्य मूळ आहे. जो कोणतीही गोष्ट सुविचारानें करतो त्याच्या गुणास भुलून संपत्ति त्यास स्वयमेव वरतात!" या श्लोकाविषयीं एका सावकाराची सर्वप्रसिद्ध गोष्ट आहे.

प्रमाणें स्थिति आहे. आचारविचार व रीतिभाती यांच्या संबंधानेंही या देशांत वरच्यासारखेंच वैचित्र्य आहे. साप जरी चावला तरी त्यास युक्तीनें चिमट्यांत धरून दूर रानांत नेऊन सोडणारे जैनधर्मी श्रावक लोक येथें आहेत, व लग्नाचीं लग्नें बसवणारे फांसेपारधी अथवा ठगही आहेत[१]. पन्नास पन्नास शंभर शंभर बायका करणारे असे कुलीन ब्राह्मण एकीकडे आहेत, दुसरीकडे पतिबाहुल्यानें राहणाऱ्या कुर्ग लोकांच्या स्त्रिया आहेत; एकीकडे कन्याघाताची प्रवृत्ति आहे, दुसरीकडे स्त्रीराज्याची अलौकिक तऱ्हा आहे; ज्यांनीं बापजन्मीं कधीं शस्त्रस्पर्श केला नाहीं अशी एकीकडे गुजराथी व बंगाली मंडळी आहे, व तरवारीशीं सदोदित काम ठेवणारे व शस्त्रपूत मरणाविषयीं हौस बाळगणारे असे दुसरीकडे रजपूत व पुरभय्ये आहेत; एकीकडे मराठमोळ्याचा गोषा आहे, आणि दुसरीकडे स्कॉट्लंडच्या कांहीं भागांत आढळणाऱ्या प्रथम निवेदनाचा प्रकार चालू आहे![२] आतां वरील प्रकारावरून पाहतां या देशांतील लोकांचें सामान्यतः वर्णन करणें ह्मणजे वस्तुतः दुरापास्त असावें. कारण जेथें येवढें वैचित्र्य आढळतें तेथें कोणता गुण जमेस धरावा आणि कोणता नये धरूं! सरडा जर घटकेंत तांबडा आहे, घटकेंत हिरवा आहे, घटकेंत पांढराही आहे, तर त्याचा अमुकच रंग ह्मणून कोणता सांगावा? अर्थात् कोणताच सांगणें बरोबर नाहीं. पण ही गोष्ट येवढी उघड असतांही पुष्कळ इंग्रेज ग्रंथकारांस दिसली नाहींशी वाटते. त्यामुळें त्यांच्या ग्रंथांत पुष्कळ विलक्षण विरोध आढळतात. एके ठिकाणीं वाचावें, कीं हिंदु लोकांसारखे दुर्बळ व गरीब लोक कोठें नाहींत; दुसरीकडे उलटून पाहावें तों सत्तावन सालचा भयंकर वृत्तांत दृष्टीस पडतो; एकीकडे पाहावें तों असा उल्लेख आढळतो कीं हिंदु लोकांत स्वातंत्र्याचें वारें कसें तें माहीतच नाहीं, इतर राष्ट्रांनीं मानेवर ठेवलेलें जोकड मोठ्या आनंदानें वागवावें हाच त्यांस जन्माभ्यास. दुसरीकडे पाहावें तों गॉल् लोकांचा सेनानायक जसा शुष्क झालेल्या रोम शहरांत शिरला तसाच इकडे अल्लाउद्दिन चितूर शहरांत शिरत आहे, प्रतापगडावर नरसिंहावताराचा नमुना उतरला आहे, श्रीवर्धनकर कुळकरण्याचा पणतू शहाजहानच्या तक्तावर बसला आहे, वसई मुक्कामीं फिरंग्याची व वडगांव मुक्कामीं इंग्रेजांची तारंबळ उडाली आहे, कोणी कन्हाडी बाई मर्दानी पोषाक करून शत्रूच्या तोफखान्यावर भरधांव घोडा टाकीत आहे, इत्यादि प्रकार आढळतात. कोणी इंग्रेज बहादर आह्मांस सांगतात कीं, हिंदु लोकांस राज्य कसें चालवावें हें मुळींच कळत नाहीं; दुसरीकडे पाहावें तो गोवळकोंड्याचा कारभार हांकणारा मादण्णा,§ अकबरशहाचे दिवाणजी बिरबल, हैदराच्या राज्याचीं सूत्रें चालवणारा पूर्णय्या! मेकॉले साहेब 'वॉरन् हेस्टिंग्ज्'च्या

---

१. ठग लोक कोण हें सर्वांस माहीत असेलच. यांनीं कधीं कधीं एकादें लग्नचें लग्न गांठून साऱ्या मंडळीस एकेकानें गळफांस लावावा, असें ऐकण्यांत आहे. हिंदुस्थानचे इतिहासकार मेडोज् टेलर् यांचा 'ठगाची जबानी' या नांवाचा ग्रंथ प्रसिद्धच आहे.

२. स्कॉट्लंडच्या पश्चिमेकडील कांहीं बेटांत पूर्वी असा प्रघात होता कीं, कुळानें लग्न केलें असतां पहिल्या समागमाचा अनुभव त्याच्या यजमानानें ह्मणजे जमीनदारानें घ्यावा. हा प्रकार इकडे गुजराथेंत चालू आहे हें सर्वप्रसिद्धच आहे.

§ गोवळकोंड्याचा राजा अबू हसन कुतुब याचा दिवाण मादण्णापंत हा मोठा कर्तबगार पुरुष होता. १६८६ सालीं लोकांच्या दंग्यांत याचा खून झाला. 'सम्पादक'

निबंधांत लिहितात कीं, हिंदुस्थानासारखा भिकारडा $देश साऱ्या पृथ्वींत कोणताही नाहीं; तेंच 'लॉर्ड् क्लाइव'च्या निबंधाकडे उलटावें, कीं हिंदुस्थान ह्मणजे कुबेरनगरी* ! तेव्हां एकंदरींत काय कीं, आमचा देश अफाट पडल्यामुळें साऱ्या युरोपाच्या स्थितीच्या संबंधानें एकादा सामान्य सिद्धांत बसवणें हें जसें असमंजस होईल तसेंच तें येथेंही होणारें आहे.

आतां वरील विस्ताराविषयींच नुसता विचार केला तर ही गोष्ट कोणच्याही ध्यानांत येण्यासारखीच आहे, कीं हा विस्तारच या देशास लहानसहान रीतीनें बाधक आहे असें नाहीं. रोमन् बादशाहीच्या इतिहासाची ज्यांस माहिती असेल त्यांस पुढील गोष्ट अवगतच

---

$ मेकॉले साहेब लिहितात:—

......"The revenues of Bengal, under the administration established by Clive, did not yield such a surplus as had been anticipated by the Company; for, at that time the most absurd notions were entertained in England respecting the wealth of India. Palaces of porphyry, hung with the richest brocade, heaps of pearls and diamonds, vaults from which pagodas and gold mohurs were measured out by the bushel, filled the imagination even of men of business. No body seemed to be aware of what nevertheless was undoubtedly the truth, that India was a much poorer country than countries which in Europe are reckoned poor—than Ireland, for example, than Portugal, or than Sweden. It was confidently believed by Lords of the Treasury and Members for the City that Bengal would not only defray its own charges, but would afford an increased dividend to the proprietors of India stock, and large relief to the English finances. These absurd expectation were disappointed........." *'Editor'*

* पण तेच मेकॉले साहेब अन्यत्र लिहितात:—

"The empire which Baber and his Moguls reared in the sixteenth century was long one of the most extensive and splendid in the world. In no European kingdom was so large a population subject to a single prince, or so large a revenue poured into the treasury. The beauty and magnificence of the buildings erected by the sovereigns of Hindostan amazed even travellers who had seen St. Peter's. The innumerable retinues and gorgeous decorations which surrounded the throne of Delhi dazzled even eyes which were accustomed to the pomp of Versailles. Some of the great viceroys, who held their posts by virtue of commissions from the Mogul, ruled as many subjects and enjoyed as large an income as the king of France or the Emperor of Germany. Even the deputies of these duties might well rank, as to extent of Territory and amount of revenue, with the Grand Duke of Tuscany or the Elector of Saxony." *'Editor'*

असेल कीं, पहिला बादशाहा ऑगस्टस् यानें आपल्या वंशजांस असा उपदेश लिहून ठेवला होता कीं, सध्यां ज्या राज्याच्या सीमा आहेत त्या बेताच्या आहेत, या वाढवण्याच्या भानगडींत कोणीं पडूं नये, पडल्यास राज्यास अपाय घडेल. या उपदेशाप्रमाणेंच पुढें चाललें होतें; व कित्येक प्रसंगीं तर राज्यांतले प्रांतही वरील बादशाहांनीं आपोआप सोडून दिले. पुढें ज्यांस 'युनैटेड् स्टेट्स्' [ संयुक्त संस्थानें ] ह्मणूं लागले त्या अमेरिकेंतील प्रांतांविषयींही कित्येक इंग्रेज ग्रंथकार असें ह्मणतात कीं, ते इंग्रेजी राज्यांतून वेगळे झाले या योगानें इंग्लंड्चें हित झालें. अफ़गाणिस्थानचा कबजा पतकरण्याविषयीं आमचें सरकार नाखुष आहे, याचें कारण तरी तेंच. झर्सीज् राजानें ग्रीस देशावर आणलेल्या वीस लाख$ फौजेचा व मोठ्या आरमाराचा चुराडा झाला, व नऊ वेळां युरोपांत" धर्मयुद्धाबद्दल उचल होऊन ती सर्व वार्या गेली यांतील बीज तरी येवढेंच, कीं अवाढव्य कारखाना असला कीं तेथें बेबंदाई सुरू झालीच ! तर हिंदुस्थानच्या विस्तारावरून जो कित्येक कोटिक्रम रचतात, कीं इंग्लंड् तें काय येवढेंसें बेट व हिंदुस्थान केवढा अफाट देश, तरी येवढ्याशा मुलखांतील लोकांनीं येवढें विस्तीर्ण राज्य घेतलें, तेव्हां येथील लोकांत कांहीं शौर्य नाहीं,—या कोटींत फारसा अर्थ आहे असें नाहीं. एकट्या तुर्क लोकांनीं लक्षावधि युरोपियन् वीरांचा पराभव केला; य:कश्चित् अफ़गाणिस्थान, पण तें आमच्या केसरिहिंद्च्या रथींस महारथींस आजिंक्य होऊन बसलें आहे; येवढेंसें एका कोंपऱ्यांतील बेट* पण सारें युरोप जिंकणाऱ्या नेपोलियनच्या हातून तें घेणें झालें नाहीं; इत्यादि गोष्टींवरून जें अनुमान काढायाचें तेंच आमच्या देशाच्या संबंधानेंही निघणारें आहे. तें हें कीं, अतिविस्तार हा राज्यास अपायकारक आहे. आटपशीर राज्यांत जी बळकटी असते ती मोठ्यांत असत नाहीं. आमच्या हिंदुस्थानांत पाहा, छप्पन्न देश, छप्पन्न भाषा, शेंकडों जाती, शेंकडों धर्म, शेंकडों आचार ! मग इतक्यांचा एकोपा व्हावा कसा ? आजपर्यंत तर साऱ्या देशभर एकसत्ताही कधीं नव्हती. नांवाला जरी एक मुख्य अधिपति असला तरी मोंगलाईंत व पेशवाईंत जो प्रकार दृष्टीस पडत होता तसाच असायाचा. निजामउल्मुलुख दिल्लीच्या बादशाहापासून दक्षिण देशची सुभेदारी घेऊन जे बाहेर पडले ते पडले; शिंदे, होळकर जे उत्तरेस जाऊन बसले ते बसले ! सध्यां तरी आमच्या सरकारास येवढ्या अवाढव्य राज्याचा बंदोबस्त जो करतां येतो आहे, तो छापखाने, आगगाड्या, तारायंत्रें इत्यादि अपूर्व साधनें त्यांस आयत्या वेळेस प्राप्त झालीं ह्मणूनच ! सारें भरतखंड जर लोहशृंखलेनें बद्ध झालें नसतें, व तारायंत्रद्वारा सर्व राज्यसूत्रें जर श्वेतद्वीपनिवासी सभेस चार हजार कोसांवरून धरतां आलीं नसतीं, तर हल्लींप्रमाणें सर्व सुयंत्र चालण्यास किती पंचाईत पडती हें कोणासही सांगायास नको !

तर आमच्या देशांतील लोकांत एकी नाहीं, त्यांनीं धर्मांच्या, जातीच्या वगैरे अनेक कारणांनीं आपआपसांत हजारों तंटे उत्पन्न केले आहेत, इत्यादि प्रकारें जी आमची अर्वाचीन मंडळी हाकाटी करते, व त्याबद्दल आपल्या देशावर आक्षेप ठेवते, तें अगदीं बरोबर

$ पृष्ठ ६०९ टीप ¶ पाहा. *इंग्लंड्. 'सम्पादक'

नाहीं. इंग्लंड्सारख्या चिमुकल्या व शहाण्या म्हणवणाऱ्या देशांत जर धर्मांच्या संबंधानें शेंकडों मतभेद आहेत, व लक्षावधि मनुष्यांचे धर्मप्रकरणीं बळी पडले आहेत; लौकिक प्रकरणांत तर राजवधापर्यंत बारी येऊन परवांच्या सारखी मारामारी व माभळभटी[1] तेथें जर हरहंमेश चालू आहे, तर हिंदुस्थानासारख्या प्रचंड देशांत आज सहस्रावधि वर्षांच्या ज्या फळ्या व जे तट पडून राहिले आहेत ते कांहींच नाहींत असें म्हटलें पाहिजे. युरोपखंडाच्या सर्व देशांनीं निरंतर एकवट राहून परस्पर गुण्यागोविंदानें राहावें हीं इच्छा करणारास व तसें नसल्याबद्दल सर्वांस सरसकट बेवकुबीच्या सदरांत ओढणारास आपण किती शहाणा म्हणूं ? तसेंच तेथील शेंकडों धर्मांचा खल करून एक सोज्वळ धर्म बनवूं पाहणाऱ्या जबरदस्त रसायनज्ञास तरी आपण कोणत्या कोटींत ढकलून देऊं ? पण इतकें तरी लांब कशाला ? आमच्या देशावर नाहीं तो आक्षेप आणून आपलें सुज्ञत्व मिरवणाऱ्या मंडळीकडेच जर नजर दिली, व आम्हांस शहाणें करण्याच्या निमित्त ज्या शेंकडों तऱ्हेच्या त्यांनीं खटपटी केल्या त्यांत तरी एकीचा महिमा कितपत दृष्टिगोचर होत आहे हें जर पाहिलें, तर आमच्या मतें प्रस्तुत विषयाचा तेव्हांच निकाल पडणार आहे. गेल्या पंचवीस वर्षांत आमच्या देशांत किती सभा झाल्या, किती मंडळ्या निघाल्या, किती समाज झाले, याचा पत्ता तरी आहे काय ? तसेंच दर एक मंडळीची स्थिति कशी काय असते याचा जर वस्तुतः शोध केला, तर साडेतीन सभासदांत किती मतभेद, किती कुरबुरी, किती वैमनस्यें, किती लटपटी, याचा तरी कोणास थांग लागेल ? मग शहाण्यासुरत्या बऱ्या बऱ्या विद्वान् मंडळींत जर ही व्यवस्था, तर मूर्खांच्या खाणींत निपजलेल्या मागील अज्ञान लोकांचा पाड तो काय ? सारांश, मतभेद हा मनुष्यस्वभावासच खिळला आहे असें समजावें, व जों जों मनुष्यें सज्ञान होत जातात तों तों त्याचा ऱ्हास न होतां तो उलट वाढत मात्र जातो; तसेंच जितका जितका देश विस्तीर्ण तितका तितका तो आवरायासही कठिण. तर या दोन गोष्टी मनांत आणल्या असतां आमच्या देशाची सध्यां जी स्थिति आहे तिजविषयीं विशेष आश्चर्य कोणासही वाटणार नाहीं.

---

सा रम्या नगरी महान् स नृपतिः सामन्तचक्रं च तत्<br>
पार्श्वे तस्य च सा विदग्धपरिषत्ताश्चन्द्रबिम्बाननाः ।<br>
उन्मत्तः स च राजपुत्रनिवहस्ते बन्दिनस्ताः कथाः<br>
सर्वं यस्य वशादगात्स्मृतिपथं कालाय तस्मै नमः ॥[2]

—'वैराग्यशतक' ( ३७ 'सं०')—भर्तृहरि.

---

१. परवां लिबरल् पक्षाची जी सरशी झाली, त्या वेळेस माजी गवर्नर् टेंपल साहेब व 'बाँबे गॅझिट्'चे माजी एडिटर् मॅक्लिन साहेब यांचा त्यांच्या देशबंधूंनीं कसा खरपूस समाचार घेतला हें सर्वांस मशहूरच आहे !

२. "गेला तो नृप ते प्रधान अवघे ते पंडितांची सभा

(पुढें चालू.)

अंक ६६—(१) आपल्या देशाचें प्राचीनत्व. (२) त्याची सांप्रतची स्थिति व त्यासंबंधीं पाश्चात्य व तदनुयायी ग्रंथकारांचें मत. (३) लोकहितवादीचें मत व त्याचें निरसन.

१. आमच्या देशाच्या निकृष्ट स्थितीच्या संबंधानें जो विचार करील त्यानें मनात आणण्यासारखी दुसरी गोष्ट ही आहे कीं, तो अत्यंत प्राचीन होय. जगाच्या इतिहासातला असा कोणताही काळ नाहीं, कीं ज्या वेळेस हिंदु लोक नव्हते. हल्लींची युरोपियन् राष्ट्रें हीं रोमच्या बादशाहीखालीं असणाऱ्या प्रांतातील लोकांची संतति होय; रोमन् लोकांनीं ग्रीक् लोकांपासून विद्याप्राप्ति करून घेतली; ग्रीक् लोकांनीं मिसर देशाच्या लोकांपासून ज्ञान संपादन केलें;—ते मिसरी लोक कदाचित् आमच्या प्राचीन ऋषींचे समकालीन असतील;[१] तर आमची परंपरा इतकी प्राचीन आहे. यवनांच्या[२] वीरांनीं ट्रॉय् शहराला वेढा दिला होता, त्या सुमाराला इकडे शतयोजन समुद्रावर सेतु पडून लंकेवर अयोध्येच्या राजाचा मारा चालला होता; तिकडे ऑगस्टस् बादशाहा रोमकपत्तनीं सार्वभौमपदावर अधिष्ठित होऊन व्हर्जिल्प्रभृति कविवरांच्या वाग्रसांत तल्लीन होऊन जात होता, तोंच इकडे शकांचें निर्दालन करून विक्रमादित्य राजा उज्जयिनीस विराजमान होत्साता 'कविकुल-

---

गेली ते नगरी तशा शशिमुखी ज्या तप्तहेमप्रभा ।
गेला तो नृपपुत्र त्या शुभकथा ज्यां देखिलें सर्व जें
तें जेणें स्मरणास योग्य रचिलें कालासि त्या वंदिजे ॥" —वामन.

१ "Ere yet the Pyramids looked down upon the valley of the Nile—when Greece and Italy, those cradles of modern civilization housed only the tenants of the wilderness, India was the seat of wealth and grandeur. A busy population had covered the land with marks of its industry; rich crops of the most coveted productions of Nature annually rewarded the toil of the husbandman; skilful artizans converted the rude produce of the soil into fabrics of unrivalled delicacy and beauty; architects and sculptors joined in contributing works, the solidity of which has not in some instances been overcome by the revolution of thousands of years. The princes and nobles of India, unlike the wandering chieftains of the neighbouring countries, already dwelt in splendid palaces, and clothed in the gorgeous products of its looms, and glittering with gold and gems, indulged a corresponding luxury in every act and habit of their lives. Poets were not wanting to celebrate the exploits of their ancestors, nor philosophers to trade the mazes of metaphysical inquiry, and weave the net of ingenious speculation, with as much subtlety, and perhaps with not less success than has attended the researches of subsequent inquirers."

—*Thornton's History of India*.

२. यवन म्हणजे ग्रीक् लोक. हा शब्द Ionian या शब्दाचा अपभ्रंश होय असें कित्येकांचें मत आहे. 'महाभारतां'त यवनांचा उल्लेख अनेकशः आढळतो. आलीकडे 'यवन' शब्दाचा प्रयोग केवळ मुसल्मानांच्या संबंधानेंच होतो.

गुरू 'च्या सरस्वतीनिष्यंदांत वाहवत होता; तिकडे येशू ख्रिस्ताचे प्रेषित आपल्या धर्माच्या प्रसारार्थ झटत होते, तेव्हांच इकडे बुद्धाचे अनुयायी चीन, तिबेट वगैरे देशांत व लंका सुमात्रा वगैरे बेटांत आपल्या गुरूच्या मतांची स्थापना करीत होते; तिकडे इंग्रेज लोक आपल्या राजावर $ उठून आपल्या स्वातंत्र्याचा पाया घालीत होते, तोंच इकडे एका प्रचंड वीराच्या * हस्तें बहुत काळापूर्वी नष्ट झालेल्या एतद्देशीय वैभवाचें पुनरुज्जीवन होत होतें. सारांश, हा हिंदुस्थान देश कालआजचा आहे असें नाहीं; तर त्यानें मिसरी, इराणी, ग्रीक्, रोमन् इत्यादि अनेक राष्ट्रांचे अभ्युदय व लय पाहिले आहेत, व अर्वाचीन राष्ट्रांशींही टक्कर देऊन तो अद्याप कायम राहिला आहे.

२. वरील उघड गोष्टीकडे जो क्षणभर लक्ष पुरवील त्याच्या मुद्दा ध्यानांत सहज येणारें आहे कीं, जर हा देश इतका प्राचीन आहे तर आज तो कितीही निकृष्ट स्थितीला पोंचला असला तरी त्यांत आश्चर्य मानण्यासारखी गोष्ट मुळींच नाहीं, व तशा स्थितीबद्दल त्यास नांव ठेवणेंही बरोबर होणार नाहीं. एकंदर जगाची रहाटी आपण नित्य काय पाहतों! उत्पत्ति, स्थिति, लय हें अवस्थात्रय पदार्थमात्रास लागू नाहीं काय! बाल्य, यौवन, जरा, मृत्यु, या अवस्थांस व्यक्तिभूत मनुष्य जसा पात्र आहे, तसेंच एकंदर राष्ट्रही पात्र नाहीं काय! 'जमूका अजब् तडाखा' कोणाला सुटला आहे! जीं राष्ट्रें आज लक्ष्मीच्या मदानें धुंद होऊन पडलीं आहेत व वीर्योत्साहानें स्फुरण पावत आहेत तींच बिचारीं आणखी शेंदोनशें वर्षांनीं कोणत्या कोनाकोपऱ्यांत जाऊन पडतील याचा कांहीं नेम आहे काय! मिसर देशाच्या मनोऱ्यांची कथा सांगायाला आज कोण उरला आहे! सारें जग धुंडलें तरी जुना ग्रीक् पंडित किंवा रोमन् शिपाई कोठें तरी आढळणार आहे काय! एकंदर इतिहासाकडे नजर दिली असतां असें आढळतें कीं, कोणतेंही राष्ट्र भरभराटीस येऊं लागलें असतां ती त्याची उत्कर्षाची स्थिति पराकाष्ठा शेंदोनशें वर्षें टिकते. नेपोलियन्, बारावा चार्लस् राजा, तैमूरलंग वगैरेंच्या उल्कापातासारख्या होऊन गेलेल्या कारकिर्दी तर राहोतच; कां कीं, तुफानाच्या सोसाट्यांत भर वेगानें चालणाऱ्या जहाजाप्रमाणें किंवा भडकलेल्या रेल्वे एंजिनाप्रमाणें त्यांच्या प्रतापाची स्थिति होय; ती कितीही उज्वल झाला तरी त्यांत स्थैर्याचा अंश प्रायः नाहींच म्हटलें तरी चालेल. पण व्यवस्थितपणें चाललेल्या संस्थानांचा जरी विचार केला, तरी सामान्यतः असें आढळतें कीं, एका पराक्रमी पुरुषानें राष्ट्रास उन्नतीच्या दशेस आणावें तों दुसरा असा निपजतो कीं, त्यानें नवें मिळवलेलें व पूर्वीचें अशीं दोन्हीं घालवून टाकावीं. कोणी राज्यकर्ते असे निघतात, कीं,

$ पहिला चार्लस् १६००-१६४९. याचा १६४९ सालीं इंग्रजांनीं शिरच्छेद केला.

'सम्पादक'

* श्रीछत्रपति शिवाजी महाराज यांच्या हस्तें स्वराज्यस्थापनेचें कार्य चालू होतें. १६४३ सालीं तोरणागड काबीज करूनें महाराजांनीं स्वराज्याचें तोरण बांधलें हें इतिहासज्ञांस माहीत आहेच.

'सम्पादक'

ज्यांनीं आपल्या बाहुबलानें व बुद्धिबलानें पायाशुद्ध नवी इमारत खाशी उठवून द्यावी; दुसरे बहादर असे उत्पन्न होतात, कीं ज्यांच्या हातून पूर्वार्जिताची वृद्धि होणें तर एकीकडेच राहिलें, पण जें आहे तें राखण्याचाही त्यांच्या ठिकाणीं वकूब नसतो. मग ही जर चोहोंकडे आढळणारी स्थिति आहे, तर आमचें हजारों वर्षांमागचें वैभव आज दृष्टीस पडत नाहीं म्हणून इंग्रेज ग्रंथकारांनीं आह्मांस दूषण द्यावें हा केवढा मूर्खपणा आहे, व 'लोकहितवादी'सारख्या स्वदेशभक्त व सत्यप्रिय ह्मणवणारांनीं तेंच तुणतुणें निरंतर आमच्या कानांशीं वाजवावें, व आपणांस मूर्खांतले मूर्ख व पाजींतले पाजी ह्मणवून घ्यावें हें किती लज्जास्पद होय ? 'लोकहितवादी'चा जर हा सिद्धांत ठरला आहे, कीं प्राचीन ऋषींच्या कारकिर्दींत आमची काय सुधारणा झाली होती ती होती, तेव्हांपासून पुराणांनीं व भटांनीं जी या देशाची नासाडी करून टाकली ती सांगतां पुरवत नाहीं;—तर आज तीन हजार वर्षें लोटून गेलीं असतांही तीच पूर्वींची उत्कर्षाची स्थिति आज येथें दृष्टीस पडावी ही अपेक्षा करणें म्हणजे केवढा वेडगळपणा आहे ? ज्या आमच्या रावबहादुरांस या देशांत आज कोठेंही वसिष्ठवामदेव आढळत नाहींत किंवा रामअर्जुन आढळत नाहींत म्हणून खेद होतो, तेच जर आज अथेन्स शहरीं गेले व प्लेटोच्या पाठशाळेचा शोध करूं लागले तर ती त्यांस कोठें आढळेल ! रोम शहरीं जाऊन साऱ्या जगभर फडकलेल्या सीझरच्या गरुडांकित निशाणांचा जर ते तपास करूं लागले तर तीं त्यांस कोठें सांपडतील ! अथवा असें समजा कीं, इ० स० ४८८० सालीं अमृतसंजीवनीच्या योगानें कोणीं त्यांस उठवलें, व त्यांनीं इंग्लंडास सफर केली, तर पार्लमेंटांतील वक्तृत्वाच्या श्रवणाचा अथवा केसरीहिंदच्या कोहिनूरच्या दर्शनाचा त्यांस लाभ होण्याचा कितीसा संभव आहे ! या मुलखांत तरी वरील सालीं कोरेगांवचा जयस्तंभ ‡ व मुंबापुरींतली राजभक्तिप्रदर्शक टेंपल साहेबांची अश्वारूढ प्रतिमा हीं दोन्ही दृष्टीस पडतीलच हें कोणाच्यानें सांगवेल ? तर गेल्या तीन हजार वर्षांत आमची स्थिति कितीही पालटली असली, व रावबहादुरप्रभृति मंडळी जो मूर्खपणाचा शिक्का आमच्या कपाळावर ठोकूं पाहतात तो कितीही खरा असला, तरी त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. ऐशीं वर्षांच्या म्हाताऱ्यास जर आठ वर्षांचें पोर नांव ठेवूं लागलें, कीं, माझ्या अंगांत पाहा कशी चपळाई आहे, ती या जरठाचे अंगीं कांहीं नाहीं; माझें तोंड पाहा कसें सुकुमार आहे, व शरीर कसें गोजिरवाणें आहे; नाहीं तर याचें पाहा अंबाडी-

---

‡ ता. १ जानेवारी १८१८ रोजीं मुंबईचे नेटिव्ह इन्फंट्रींतील ५०० लोक, २५० बेशिस्त घोडेस्वार व दोन तोफा ( या मद्रासच्या चोवीस गोऱ्या गोलंदाजांच्या ताब्यांत होत्या ) येवढ्या अल्प सैन्याच्या जोरावर कॅप्टन् स्टॉंटन् ( Staunton ) यानें पेशव्यांच्या २०००० हून अधिक अशा प्रचंड सैन्याला तोंड देऊन कोरेगांवचें जें रक्षण केलें तें खरोखरच संस्मरणीय होय. या वेळीं इंग्रजांच्या बाजूचे फक्त २७६ लोक पडले. सुप्रसिद्ध इतिहासकार टॉड् या प्रसंगाचें 'हिंदी थर्मापिली' असें वर्णन करतो. सदर विजयाच्या स्मरणार्थ कोरेगांव येथें एक दगडी विजयस्तंभ उभारण्यांत आला आहे.

'सम्पादक'

सारखे केंस, अंगावर किती सुरकुत्या, शरीरास किती कंप! अशा मासल्याचें लडिवाळ-पणाचें पांडित्य करणाऱ्या टारग्या राजश्रींच्या नाजुक गालावर जर कोणीं दोन बोटें उठवलीं, व कर्णोत्पाटनपूर्वक त्यांची अशी कानउघाडी केली कीं, "बाबारे, तुझ्यासारखीं शंभर पोरें या झाताऱ्यानें आजपर्यंत खेळवलीं आहेत, तुझे आजोबा जेव्हां तुझ्यायेवढे होते तेव्हां ते याच्या मांडीवर लोळत होते, तुझ्या पंजीची भरज्वानी यांनीं पाहिली आहे,"–तर असें करणें अयोग्य होईल काय? तर असाच प्रकार आमच्या देशाच्या तर्फेनें मेकॉलेप्रभृति टारगे ग्रंथकार व त्यांचे एतद्देशीय अनुयायी यांच्या संबंधानेंही करणें अवश्य होय. तो यापूर्वी अनेक वेळां करण्यांत आलाच आहे; यास्तव पुन: चर्वितचर्वण नको!

तर आमच्या देशाचा अवाढव्य विस्तार व त्याचें अत्यंत प्राचीनत्व या दोन गोष्टीं-चाच विचार केला असतां कोणासही कळून येईल कीं, त्यास सध्यां जी स्थिति प्राप्त झाली आहे तिची उपपत्ति करण्यास केवळ आमच्या नैसर्गिक मूर्खत्वाकडेच गेलें पाहिजे असें नाहीं. मोठमोठीं शहाणींसुर्तीं राष्ट्रें यापूर्वी मोठ्या उत्कर्षाला चढून कालेंकरून पार लयाला गेलीं आहेत; व या घटकेपर्यंतही मोठ्या अट्टल शहाण्या राष्ट्रांचीही वेळोवेळ अक्कल गुंग होऊन फटफजिती उडालेली आहे. मोठ्या थाटानें एकादें अवडंबर रचावें आणि लवकरच सगळें ऑफस्स् होऊन जावें अशा प्रकारचीं उदाहरणें ज्ञानाच्या शिखरास जाऊन पोंचलेल्या अर्वा-चीन राष्ट्रांच्या इतिहासांतूनही आढळत नाहींतसें नाहीं. मग साऱ्या पृथ्वींतील राष्ट्रांस ज्या गोष्टी लागू, व जें अल्पदृष्टित्व मनुष्यधर्मासच खिळलेलें, त्या सर्वांबद्दल एकट्या हिंदु-स्थानावरच मूर्खत्वाचा आरोप करणें हें केवढें अज्ञान होय! आमच्या रावबहादुरांसारख्या मंडळींनीं आजपर्यंत देशोदेशींचे इतिहास वाचून व आपल्या हयातींत घडलेल्या हकिकती पाहून व ऐकून राष्ट्रांच्या उत्कर्षापकर्षाच्या संबंधानें काय सिद्धांत ठरवले असतील तें असोत; पण आमच्या अल्पमात्र ज्ञानावरून व अनुभवावरून आमच्या बुद्धीस असें वाटतें कीं, जशी व्यक्तिभूत मनुष्याची स्थिति, किंवा समुद्रावर चालणाऱ्या तारवाची स्थिति, तशीच राष्ट्राची किंवा राज्याची होय. व्यक्तिभूत मनुष्यास जसे शेंकडों अपाय घडण्याचा नेहेमी संभव असतो, व मी अमुक वर्षें जगेन अशाविषयीं त्यानें चंग बांधणें हा जसा त्याचा मूर्खपणा होईल; किंवा मोठें प्रचंड तारूं असलें तरी त्याच्या तांडेलानें आपणास सर्वथा निर्भय मानणें हें जसें असमंजस होईल; त्याप्रमाणेंच वैभवाच्या शिखरास चढलेल्या राष्ट्रानें किंवा मोठ्या अवाढव्य वाढलेल्या राज्यानें आपल्या दृढत्वाचा अभिमान वाहणें हाही वेडगळपणाच होय. नौकेचें नियमन हें नाविकाच्या सर्वथा स्वाधीन असतांही वातावरणांतल्या फेरफारांवर जशी त्याची बिलकुल सत्ता चालत नाहीं, व इतर धोकेही वेळेनुसार कोणते प्राप्त होतील याचा त्यास जसा नेम लागत नाहीं, त्याप्रमाणेंच राजकारणाचीही गोष्ट होय. कोणती मसलत कोणत्या वेळेस अंगावर येईल, व कोणता शत्रु कोठें उत्पन्न होईल, याचा काय नेम आहे! आमचे सूर्यवंशी व सोमवंशी प्राचीन हिंदु राजे कोणीकडे, आणि तार्तार देशांत भटकणारे मोंगल कोणीकडे? दिल्लीपदावर आरूढ झालेले बादशाहा कोणीकडे, आणि पुन-

वडी मुक्कामीं ठेवून दिलेला§ नावडत्या बायकोचा नावडता लेक कोणीकडे, व अळूची शाक आणि ताकभात झोडणारे श्रीवर्धनवाले भट कोणीकडे ! भगवा झेंडा व जरीपटका कोणीकडे आणि कुंपिणी बाईचें 'हडेल् हपू' कोणीकडे ? लॉर्ड् मेयो साहेब विलायतेहून निघाले असतील तेव्हां पोर्ट् ब्लेअरवासी कैद्याच्या हातून आपलें देहावसान होईल हें त्यांच्या किंवा कोणाच्या स्वप्नीं तरी आलें असेल काय? फ्रान्सच्या बादशाहाचे चिरंजीव, आणि त्यास झुलू लोकांच्या एका टोळीनें सोडग्याखालीं हाणून पाडावें ! काडतूस तें काय वोटभर, आणि आणि त्याचा प्रभाव पाहिला तर रक्ताच्या नद्या ! ! तेव्हां एकंदरींत काय, कीं कालाची गति अत्यंत विचित्र आहे; यास्तव ती न जाणतां हव्या तशा कल्पना करणें हें अप्रयोजकपणाचें लक्षण होय. त्यांतूनही पाश्चात्य ग्रंथकारांनीं वरील गर्वोक्ति प्रगट केल्या तर त्यांत मोठेंसें नवल नाहीं; कां कीं स्वदेशाच्या संबंधानें कोणीं खोटाही अभिमान वाहिला असता तो तादृश दूषणार्ह होणार नाहीं. पण आमच्या देशांतल्याच पंडितांनीं आपला एकंदर इतिहास गुंडाळून ठेवून, आपली स्वतःची कुळकथा विसरून जाऊन, व डोळ्यांसमक्ष घडलेल्या गोष्टींकडे दुर्लक्ष करून, आपल्या जन्मभूमीच्या संबंधानें सदोदित कृशानूचें* व्रत धारण करावें; व आह्मी मूर्ख, आह्मी नामर्द, आह्मी कोडगे अशी सतत हातांत जपमाळ घ्यावी, या बहादुरीस काय ह्मणावें हें बरीक आह्मांस समजत नाहीं ! !

६ येथवर आमच्या देशाच्या संबंधानें पाश्चात्य ग्रंथकारांनीं जें सामान्यतः पांडित्य केलेलें आढळतें, व त्यांचे लेख शिरसावंद्य करणारी व इंग्रेज ह्मणजे परब्रह्म मानणारी जी मंडळी यापूर्वी होऊन गेली त्यांच्या ठायीं या देशाच्या संबंधानें ज्या समजुती बहुधा दृष्टीस पडतात, त्यांविषयीं चर्चा झाली. आतां वरील समजुतींत व 'लोकहितवादी'च्या मतांत जरी प्रायः अंतर नाहींच, तरी एका मोठ्या गोष्टीच्या संबंधानें दोहोंत एक मोठाच फरक आहे. तो हा कीं, रावबहादुरांच्या मतें आमची निकृष्ट स्थिति आज तीन हजार वर्षे कायम आहे, येवढा सगळा काळ आमचा झोपेंतच गेला ! ही तीन हजार वर्षे केव्हांपासून धरायाचीं याचा निश्चय प्रस्तुत ग्रंथकारांनीं कोठेंही केलेला आह्मांस आठवत नाहीं, तरी एकंदरींत पाहतां 'ऋषींची कारकीर्द' असे शब्द त्यांच्या लेखांत व भाषणांत अनेक वेळां आढळतात त्यांवरून पाहतां वरील ऋषिमंडळ जेव्हांपासून अस्तंगत झालें तेव्हांपासून या हतभाग्य देशाच्या अज्ञाननिद्रेस आरंभ झाला असें समजायाचें असें वाटतें. वरील ऋषींपैकीं शेवटला ऋषि निजधामास गेला तेव्हांपासून अकलेची व आमची जी फारकत झाली $ ती आमच्या

§ श्रीशिवाजी महाराज. वस्तुतः शहाजी राजांचें आपल्या पत्नीवर व पुत्रावर प्रेम नव्हतें असें ह्मणण्यास पुरेसा पुरावाच नाहीं. मराठे सरदारांत अनेक बायका करण्याची चालच आहे. शिवबांच्या यवनद्वेषामुळें नाइलाजानें शहाजीराजांनीं त्यांस आईसह दूर ठेवलें असावें. 'सम्पादक'

* दोषैकदृष्टीचें व्रत. पृष्ठ ४६२ टीप १ पाहा. 'सम्पादक'

$ लो. हि. म्हणतात, "माझें ह्मणणें असें नाहीं कीं, केवळ इंग्रजी लिहितात आणि बोलतात ते विद्वान ... ...परंतु ज्यांनीं विद्येचें रहस्य जाणलें आहे व बहुश्रुत आहेत त्यांचा मात्र पक्ष आह्मी घेतों. आणि

(पुढें चालू.)

मागल्या पिढीपर्यंत ! वाग्देवीच्या वीणेचा झणत्कार वाल्मीकीच्या आश्रमांत जो गुप्त झाला

---

आह्मांस ठाऊक आहे कीं एक इंग्रजींतील विद्वान आणि शंभर संस्कृतांतील पंडित आणि एक लक्ष कारकून व दोन लक्ष भट हे सारखे कदाचित होणार नाहींत.........ज्यानें चार शास्त्रें अध्ययन केलीं आहेत त्याची देखील योग्यता इंग्रजींतील पंडिताशीं बरोबर नाहीं. कारण कीं मुळीं आधीं संस्कृत भाषेत ग्रंथ आहेत किती ? ग्रंथांचे संख्येवरून विद्येची तुलना होते हा नेम आहे......इंग्रजी-मध्यें तर कोट्यावधी ग्रंथ आहेत. त्यांत अनेक विद्या आहेत. तितक्या संस्कृतांत नाहींत. चौदा विद्या आणि चौसष्ट कळा इतकी संख्या जेव्हां हिंदु लोक फार शहाणे व पराक्रमी व विद्येवर लक्ष देणारे होते व जेव्हां व्यास वाल्मीक होते तेव्हां इतकी गणना झाली आहे. परंतु इंग्रजींत एक हजार विद्या आहेत. प्रत्येक विद्येवर हजारों ग्रंथ आहेत.......संस्कृतांतील विद्येचे चाहणारे ब्राह्मण होऊन गेल्यास दोन तीन हजार वर्षें झालीं. तेव्हांपासून ब्राह्मण मूर्ख झाले. विद्या ह्मणजे काय हें देखील विसरले. त्या शब्दाचा अर्थही त्यांस कळत नाहीं. आणि जसे हिंदू लोक व्यासाचे वेळेस विद्याप्रवीण होते तद्वत इंग्रज आतां आहेत. त्यांचें चित्त विद्येवर फार व ते ज्ञानी बहुत झाले. व त्यांचे ग्रंथ फार उपयोगी आहेत. हिंदू लोकांचे ग्रंथ जेवणावळीचे आहेत. तर इंग्रजी पंडित तो संस्कृतांतील पंडिताशीं सारखा कसा होईल ? अशी जेव्हां पंडितांची गति तेव्हां कारकून आणि भट हे काय पदार्थ ? हे तर कसपटें दिसतात. जो इंग्रजींतील पंडित आहे त्यास किती विद्येचें ज्ञान असतें ? त्याची समजूत केवढी विस्तीर्ण आणि त्याचा विद्वानपणा केवढा ? त्याची योग्यता लोक समजत नाहींत. त्यास दूषण लावितात. इंग्रजीं-तील विद्वानाची अशी योग्यता आहे कीं, त्यास कोणताही विषय सांगा त्याविशीं तो ग्रंथ लिहू शकेल. कोणत्याही विषयावर बोलू शकेल. जें जें या पृथ्वींत आणि आकाशांत आहे तें सर्व त्यास ठीक दिसतें आणि चंद्र फिरतो याचें त्यास आश्चर्य वाटत नाहीं. दगड वरती उडविला ह्मणजे खालीं पडतो याचें देखील कारण त्यांस माहीत आहे. तात्पर्य त्यांस कोणत्याही विषयीं आश्चर्य वाटत नाहीं. कारकून हे भटांचे पंक्तीचे आहेत. मूळ हिंदू लोकांमध्यें विद्येचें मान इतकें कमी आहे कीं, त्यांस विद्या ह्मणजे काय हें अश्रुत आहे. जर कोणाची विद्या वर्णन करणें झाल्यास ह्मणतात कीं अमका केवढा शहाणा ! सुंदर पत्र लिहितो. मजकूर जुळून लिहितो. अक्षर चांगलें सुंदर. आतां हें कांहीं विद्वानाचें वर्णन झालें नाहीं. विद्वान म्हणजे काय, ज्याची बुद्धि विशाळ, ज्यानें नवीन ग्रंथ ऋषींसारखे लिहावें ते विद्वान. हल्लीं गृहस्थांस यांतील कांहीं ज्ञान नाहीं.........इंग्रजी विद्वान पूर्वीं जर हिंदुस्थानांत एक असता तर राज्य न जातें. हे भट कारकून असे मूर्ख जमा झाले म्हणूनच हें राज्य बुडालें. जर विद्या पहिल्यासारखी असती तर हिंदु लोकाची अशी अवस्था न होती. परंतु हीं जनावरें पाहिजे तेथें दोरीनें बांधावीं अशीं गरीब म्हणून असें झालें. पुढें जरी हिंदू लोकांचें कल्याण झालें तर इंग्रजी पंडितांचे हातून होईल यांत संशय नाहीं. कारकून व भट हे क्षीण झाले म्हणजे व इंग्रजी विद्या वृद्धिंगत झाली म्हणजे हिंदू लोक पूर्वस्थितीवर येण्यास उशीर नाहीं......ते ( इंग्रजी विद्वान ) म्हणतील डावे हातानें गरिबास पैसा दिला तरी सारखाच. उजवे हातानें दिला तरी सारखाच. परंतु कारकुनास वाटतें कीं ज्या हल्लीं चाली आहेत तोच धर्म. चाली आणि रीति व धर्म यांचा भेद त्यांस कळत नाहीं......वास्तवीक पाहिलें तर इंग्रजी विद्वानांप्रमाणें मला धार्मिक कोणीच दिसत नाहीं. तो अनुभवेंकरून व ज्ञानेंकरून ईश्वराचें प्रतिपादन करितो. सर्वत्र तो आहे असें त्यास वाटतें. त्यास सर्वत्र ईश्वर दिसतो, तो त्याचे भजनांत तल्लीन असतात व जें कर्म करितात तें सर्व ईश्वरार्पण करितात, व त्याची स्तुती करून कायावाचामनेंकरून ईश्वरास भजतात. कारण कीं, इंग्रजींत ईश्वराविषयीं अनेक ग्रंथ आहेत. व इतर देशांतील जें ईश्वरी ज्ञान आहे तें सर्व इंग्रजींत आहे. व त्या ग्रंथांचे तर्जुमे त्या भाषेंत आहेत. याजमुळें शंभरपट जास्ती ज्ञान इंग्रजींत आहे.”

'सम्पादक'

तो तीन हजार वर्षांनीं करवीरपत्तनीं माळक्यान् प्रगट झाला. धर्मसंस्थापना करणारे प्राचीन मुनि जे एकाएकी कोणीकडे गडप झाले ते वरील दीर्घकाळानंतर पुनः आर्यसमाजस्थापकाच्या रूपानें एकवट होऊन अवतीर्ण झाले. प्राचीन सोमरस पिणारी जुनी ऋषिपरंपरा जी मागें पार नाहींशी झाली ती आज एकोणिसाव्या शतकांत अर्वाचीन सोमरसाचे चषक धारण करून देशाच्या भाग्यानें पुनः उदयास आली! बाकी येवढीं तीस शतकें जीं मधल्यामधें गेलीं तीं निवळ व्यर्थ गेलीं. त्यांत आह्मीं कांहीं लाभ करून घेतला नाहीं, कांहीं नवीन युक्त्या काढल्या नाहींत,—कांहीं केलें नाहीं! येवढें मात्र केलें, कीं आठ हात लांकूड आणि नऊ हात धलपी अशा मासल्याचीं 'पंधरा आणे बाष्कळपणानें भरलेलीं' अकटोविकट पुराणें रचून ठेवलीं; धर्माचें अतोनात बंड माजवून शेकडों व्यर्थ खटपटी उत्पन्न केल्या; भटांची घोकंपट्टी व शास्त्र्यांचे शुष्क वाद हे उभे केले; भिक्षुकीचा संप्रदाय हरएक प्रकारें चालू करून आळसाची वृद्धि केली; आणि सारा देश म्हणजे एक मेंढवाडा करून सोडला! विक्रम, भोज वगैरे कांहीं पराक्रमी राजे मध्यंतरीं होऊन गेले, पण त्या बेट्यांनीं काव्यनाटकादिकांस उत्तेजन देऊन शेवटल्या बाजीरावानें जशी चोहोंकडे बदफैली वाढवली तसा मात्र प्रकार करून ठेवला! तसेच आलीकडे शिवाजी, बाजीराव, नाना फडनवीस वगैरे कांहीं पुरुष निर्माण होऊन त्यांनीं 'एरण्डोऽपि द्रुमायते' या न्यायानें या मेंढवाड्यावर आपला अंमल कांहीं वेळ गाजवला, व या वेड्यांच्या इस्पितळांत आपल्या शहाणपणाचा टेंभा चार दिवस मिरवून घेतला; पण एकंदरींत पाहतां कांहीं जीव नाहीं. हल्लीं एकाद्या सहावी यत्ता उतरलेल्या पोरांत जी अक्कल सापडेल तीहि बिचाऱ्यांच्या वांट्याला आली नव्हती![1]

आतां हें जें आमच्या रावबहादुरांचें मत इतके दिवस दृढ होऊन बसलेलें आहे, कीं, प्राचीन ऋषींच्या कारकिर्दीत काय ती हिंदुस्थानांत सुधारणा होती, व तेव्हांपासून सारखा या देशाचा ऱ्हासकाळ लागला आहे,—हें त्यांनीं कोठून पैदा केलें असेल व त्याजबद्दल त्यांच्यापाशीं काय प्रमाणें असतील हें आह्मांस समजत नाहीं. अगोदर ऋषींचा काळ कोणता या गोष्टीचा पक्का निश्चय नाहीं हें वर सांगण्यांत आलेंच आहे; व शिवाय वरील काळाची येवढी माहिती तरी कोणाला आहे हेंही नीट समजत नाहीं. तसेंच सुधारणा ह्मणजे तरी काय या मुद्द्याचाही स्पष्टपणें निकाल झाला पाहिजे. हल्लीं जें सुधारणेचें मान मानलें जात आहे तें ऋषींच्या कारकिर्दीस लागू पडेल असें 'लोकहितवादीं'स वाटतें काय? वाटत नसेल तर मग गेलीं तीन हजार वर्षें तरी गैरसुधारणेचीं कशावरून ह्मणायाचीं? अर्वाचीन सुधारणेचीं मोठमोठीं तत्त्वें जीं मांसभक्षण, सुरापान, सबू गोलंकार, इत्यादिकांस वेदांत आधार मिळतो यावरून तर प्राचीन ऋषीस हल्लींच्या इंग्रेज, फ्रेंच् वगैरे लोकांच्या पायरीला नेऊन मिळवायाचे नसतील ना! असें असेल, तर मग ठीक आहे. एरवीं वैदिक काळास सुधारलेला व पौराणिक काळास गैरसुधारलेला ह्मणण्यास काय प्रमाण आहे हें

[1] सदर उल्लेख 'राजा शिवाजी' काव्याचे कर्ते कुंटे यासंबंधीं आहे.

'सम्पादक'

आह्मांस कळत नाहीं. इंद्रवरुणादिकांची उपासना केली कीं सुधारणेचें शिखर झालें, तेंव शिवविष्णूंच्या प्रतिमांकडे वळलें कीं सुधारणादेवतेचा क्षोभ झाला, अशी कांहीं भानगड तर नसेलना ! असें असेल तर 'लोकहितवादीं'नीं सुधारणुकेची एक कल्मवारी करून ठेवली असती तर बरें झालें असतें; ह्मणजे तिजवरून वरील वादाचा तेव्हांच निकाल पाडतां आला असता. वैदिक काळांत कवायत शिकलेलीं पाल्टणें, कोर्टमार्शलें, पार्लमेंट सभा, आर्यसमाज, पुस्तकालयें, वगैरे सुधारणेस अवश्य लागणाऱ्या जिनसा असल्याविषयीं रावबहादुरांपाशीं कांहीं दाखला नाहीं ना? तसेंच वरील काळांत कोणी नेपोलियन् होऊन गेला, कोणी फिडियस् होऊन गेला, अशाविषयींही आमच्या कानावर अद्याप वार्ता आली नाहीं; मग आमच्या प्रतिपक्षांच्या जवळ किंवा त्यांचे गुरुवर्य श्रीमत्परमहंस यांच्या जवळ, कांहीं जबरदस्त पुरावा असल्यास न कळे! एकंदरींत रावबहादुरांचें वरील मत आह्मांस केवळ निराधार वाटतें. दयानंदजींच्या व्याख्यानांतून अर्वाचीन व प्राचीन काळांच्या संबंधानें जी वेडगळ बडबड आढळते, व वेदांत आगगाड्या आहेत, तारायंत्रें आहेत, विमानें आहेत वगैरे निरर्गल-प्रलाप आढळतात, त्यांचीच कांहीं छाया त्यांच्या शिष्यमंडळींवरही पडली आहे कीं काय कोण जाणे ! !

आमच्या प्राचीन पूर्वजांविषयीं आमची पूज्यबुद्धि 'लोकहितवादीं'च्याहून कमी आहे असें नाहीं. ते परम तपोनिष्ठ व परमज्ञानी होते याविषयीं आमची खात्री आहे. त्यांनीं आपल्या बुद्धिप्रभावेंकरून तत्कालीन राष्ट्रांतही आपणांस धन्य ह्मणवून घेतलें ही गोष्ट इतिहासप्रसिद्ध आहे. पण ते शहाणे होते ह्मणून पुढील मंडळी मूर्ख निघाली, व ती मूर्खपरंपरा रावबहादुरांच्या आदल्या पिढीपर्यंत अविच्छिन्नत्वेंकरून चालत आली, व पुण्यांत इंग्रेजी अंमल होऊन मागें बुधवारच्या वाड्यांत इंग्रेजी शाळेची स्थापना झाली तेव्हां काय ती अक्कल पुनः या देशांत आली, हें जें महातत्त्व 'लोकहितवादी' आपल्या ग्रंथांवरून लोकांच्या मनांत ठसवूं पाहत आहेत, हें बरीक आह्मांस बिलकुल कबूल नाहीं. आमच्या रावबहादुरांनीं आपल्या स्वतःच्या बुद्धिमत्तेचें मान कितीसें ठरवलें आहे हें आह्मांस चांगलेंसें माहीत नाहीं; तरी आमची पक्की खात्री आहे कीं, जो काळ अत्यंत अज्ञानाचा गेला ह्मणून ते आजपर्यंत डांगोरा पिटीत आहेत त्याच काळांत त्यांच्याहून शतपट बुद्धिमान् असे शेंकडों हजारों लोक होऊन गेले आहेत. त्यांनीं जीं कृत्यें करून ठेवलीं आहेत त्यांजबद्दल सारें जग मान डोलवीत आहे, व ज्या काळीं रावबहादुरप्रभृति अर्वाचीन ऋषींचीं नांवें सुद्धां मागें उरणार नाहींत, व त्यांचे परमगुरु जे इंग्रेज लोक त्यांचें नांव हिंदुस्थानच्या इतिहासांत मात्र राहील, त्या काळीं सुद्धां त्यांचा लौकिक हल्लींप्रमाणेंच गाजत राहील. ही मंडळी कोण हें येथें सांगितलें पाहिजे असें नाहीं; कां कीं, गेल्या तीन हजार वर्षांत या देशांत मोठमोठे कवि, मोठमोठे शास्त्रकार, मोठमोठे राज्यस्थापक, मोठमोठे मुत्सद्दी वगैरे मंडळी कोणकोण होऊन गेली याविषयीं थोडीबहुत तरी माहिती नाहीं असा मायेचा पूत कोणीही सांपडेल असें आह्मांस वाटत नाहीं.

तेव्हां एकंदरींत पाहतां अर्वाचीन काळांत एतद्देशीय लोकांच्या बुद्धीचा ऱ्हास झाला हा जो महासिद्धांत 'लोकहितवादीं'नीं ठरवून ठेवला आहे तो आह्मांस केवळ चुकीचा वाटतो. आमचे रावबहादुर व त्यांच्या बरोबरीची मंडळी यांनी ज्या वेळेस इंग्रजी विद्येच्या अध्ययनास आरंभ केला तेव्हांची स्थिति अशी होती कीं, इंग्रजांचें या देशांत नुकतेंच सार्वभौमत्व होऊन युरोपांतही त्यांचा तसाच दरारा होता. शिवाय हल्लींच्या बादशाही अंमलांत जे विलक्षण प्रकार चोहोंकडे दृष्टीस पडत आहेत,—ह्मणजे नवे नवे कायदे, नवे कर, दरवर्षी दुष्काळाचें भय, चोरांचे घाले आले तर उलटा प्रजेसच दंड, इत्यादि—हेंही त्या वेळेस कांहींच नसून उलटी चोहोंकडे अबादानी, स्वस्थता, संतोषवृत्ति हीच दृष्टीस पडत असे. त्यांतून पाश्चात्य यांत्रिक विद्येचा प्रभाव जेव्हांपासून इकडे दृष्टीस पडूं लागला, तेव्हांपासून तर आमच्या परद्वीपीय राज्यकर्त्यांविषयीं लोकांच्या अशा समजुती होऊन बसल्या कीं, हे कोणी अमानुष सृष्टींतले प्राणी आहेत; पंचमहाभूतांवरही ज्यांचा अंमल चालूं लागला. त्यांची सत्ता माणसांवर चालेल यांत नवल काय ? तर याप्रमाणें वीसपंचवीस वर्षांमागली येथील स्थिति असल्यामुळें नवीन इंग्रजी शिकूं लागणारांच्या मनांवर कोणत्या तऱ्हेचे संस्कार होत असत याची कल्पना सहज करतां येते. हल्लींही इंग्रेजी विद्येपासून कोणतीं फळें सामान्यतः दृष्टीस पडतात हें जर लक्षांत आणलें, तर पूर्वींच्या ऐन अमदानीत हेच विकार किती दृढ होण्याचा संभव होता हें सहज ध्यानांत येईल. कोणत्याही गोष्टीची खरी योग्यता समजून येण्यास बराच काळ लोटावा लागत असतो हा सामान्य नियम आहे; त्याप्रमाणेंच इंग्रेज लोकांच्या विद्येचें, राज्याचें, सुधारणुकीचें वगैरे यथार्थ स्वरूप कांहीं काळापूर्वी समजणें अशक्य होतें असें ह्मणण्यास हरकत नाहीं. आमच्या रावबहादुरांसारखी परम राजनिष्ठ मंडळीही आतां इंग्रेजी राज्याचे पहिल्यासारखे पोवाडे गाईल असें आह्मांस वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच दहा वीस वर्षांपूर्वी विद्वान् व सुधारलेले ह्मणवणाऱ्या लोकांची जीं मतें ठरलेलीं असत, कीं इंग्रेजी राज्य ह्मणजे नीतीचें आगर, इंग्रजांचा धर्म, आचारविचार वगैरे सर्व उत्कृष्ट, काय ज्ञान तें इंग्रेजी भाषेंत, इंग्रजांचें हरएक गोष्टींत अनुकरण करण्यास बिलकुल हरकत नाहीं, कां कीं, साऱ्या जगांत शहाणे ह्मणून निवडलेले लोक जें करतात तें वाईट कसें असेल ?—इत्यादि परंपराही प्रस्तुत काळीं विच्छिन्न झाल्यासारखीच आहे. अलीकडे इंग्रेजी भाषेचा फैलावा या देशांत पुष्कळच झाल्यामुळें आमच्या राज्यकर्त्यांच्या शेंकडों गोष्टी ज्या आह्मांस पूर्वी नुसत्या ऐकूनही माहीत नव्हत्या त्या आतां चांगल्या स्पष्ट दिसूं लागल्या आहेत. या दृढतर परिचयाच्या योगानें काय झालें, कीं आमचे पूर्वींचे पुष्कळ भ्रम उडून गेले; व आह्मी आपणांस व दुसऱ्यांस अधिक यथार्थ बुद्धीनें लेखूं लागलों. तसेंच आजपर्यंत आह्मांस आपल्या स्वतःविषयीं बिलकुल माहिती नव्हती असें ह्मटल्यासही सत्याचा अपलाप केलासें होईल असें नाहीं. आपण कोण, आपली स्थिति काय आहे, आपला पूर्वीचा वृत्तांत काय, आपल्या धर्माचें व आचारविचारांचें यथातथ्य स्वरूप काय, आपल्या हजारों वर्षांच्या ग्रंथसंग्रहांत काय काय लिहिलें आहे, इत्यादि गोष्टींविषयीं जिज्ञासाही पूर्वी कोणास वाटत नसे. पाश्चात्य ग्रंथकारांनीं इकडील स्थितिरीतीचें तुटपुंजीचें

ज्ञान मिळवून त्यावर जें स्वकपोलकल्पित तर्कट रचावें, किंवा पाश्चात्य व प्राच्य ख्रिस्तभक्तांनीं पवित्र शास्त्राच्या भूषणार्थ जी लेखद्वारां व भाषणद्वारां बडबड करावी,, ती सर्व वेदवाक्यांप्रमाणें गृहीत करून चालायाचें, व त्यावर काय त्या उड्या मारायाच्या, अशी पंधरावीस वर्षांमागील येथील विद्वत्समूहाची स्थिति होती. वरील समूहाच्या स्वप्नींही कधीं अशा कल्पना येत नसत, कीं ज्या मेकॉलेच्या अभिप्रायांचें प्रामाण्य त्याचे देशबंधु तिकडील प्रकरणांतही बेताबातानेंच स्वीकारतात, त्याचींच वचनें इकडे मात्र वेदवाणप्रमाणें मानणें हा केवढा मूर्खपणा आहे ? जे मिशनरी बहादर एकाच पेनाच्या तडाक्यासरसें हिंदु धर्माचें, मुसलमानी धर्माचें, व पारशी धर्माचेंही खंडन करून टाकीत, व युनिव्हर्सिटीच्या परीक्षांत ज्यांच्याकडे एशिया खंडांतील साऱ्या भाषांच्या बद्दल जशी काय एकदां सुपारीच देऊन टाकली असे, त्या परमपूज्य डॉक्टर् विल्सन् साहेबांस त्यांच्या शिष्यवर्गानें पोपसाहेबांच्या प्रमादरहित आसनावर नेऊन बसवावें हा तरी केवढा शहाणपणा आहे ! माजी 'सत्यदीपिके'-च्या कर्त्यांनीं बिचाऱ्या शास्त्रीवैदिकांस आपल्या घरीं बोलावून आणून त्यांस आपल्या नूतनलब्ध-पवित्रशास्त्राच्या तेजानें दिपवून टाकून आपल्या मूर्तिपूजक जनित्यास पुत्रलीला दाखवून स्वतःची धन्यता वाटवावी, व नंतर वरील कुंठित झालेल्या मंडळीस दक्षिणा देऊन वाटेस लावावें, हा तरी केवढा चमत्कार आहे ? पवित्रशास्त्राच्या पवित्र ओंव्यांत येवढा अजब गुण आहे काय कीं जसें सैतानानें येशूस एका उंच डोंगराच्या शिखरावर नेऊन सारीं पृथ्वींतील राज्यें दाखवलीं (!), त्याप्रमाणेंच आदमाच्या व नोहाच्या पवित्र कथा वाचल्याबरोबर वाग्देवीचा सारा मुलुख एकदम नजरेच्या आटोक्यांत येतो ! ! असो; तर रावबहादुरप्रभृति जुन्या मंडळीच्या लेखांतून जीं विलक्षण मतें आढळतात त्यांचें मूळ पाहिलें तर हें होय कीं, त्यांच्या वेळीं स्वतःविषयीं अज्ञान व दुसऱ्यांविषयीं अयथार्थ ज्ञान हे दोन्ही प्रकार लोकांमध्यें होते. त्यामुळें चोहोंकडे एक मोठें ठोकळ मत जारीनें चालू झालें होतें, कीं या देशांत पूर्वींचें म्हणून जेवढें आहे तेवढें सर्व वेडगळ, व नवें जें जें दृष्टीस पडूं लागलें आहे तें तें सर्व शहाणपणाचें. व्यासकृत अठरा पुराणांचें सार जसें पुढील वचनांत काढलें आहे, कीं—

परोपकारः पुण्याय पापाय परपीडनम् ।

"परोपकार हेंच पुण्य व दुसऱ्यास पीडा करणें," हेंच पाप त्याप्रमाणेंच मागील मन्वंतरांतल्या तत्त्वज्ञानाचे दोन जबरदस्त सिद्धांत म्हटले म्हणजे हे होत कीं, हिंदु म्हणजे मूर्खांतले मूर्ख; व अकलेचे वांटेकरी म्हटले म्हणजे इंग्रेज लोक, मिशनरी, बाटे(ट्ये ? 'सं॰')मंडळी व इंग्रेजीचा संस्कार झालेले नवीन विद्वान् !

वरील स्थिति लक्षांत आणली असतां, प्रस्तुत ग्रंथकारानें जेथें तेथें इंग्रेजांचें माहात्म्य कां वर्णिलें आहे, नवीन विद्वत्तेची तेवढी शिफारस करून त्याखेरीज सर्व ज्ञान वायफळ असें कां दाखवलें आहे, व गेल्या शंभर पिढ्यांत या देशांत शहाणा मनुष्य म्हणून कोणी

१. अंक ३६ पृष्ठ ६५९ (टीप १ 'सं॰') पाहा.

निपजलाच नाहीं हें जें इतिहासविरुद्ध, अनुभवविरुद्ध, व वस्तुस्थितिविरुद्ध मत त्याचें त्यानें सर्वत्र प्रणयन कां केलें आहे, हें सहज समजण्याजोगें आहे. वरील मतें या काळापर्यंत राव-बहादुरांचीं जशींचीं तशींच कायम राहिलीं, ही गोष्ट बरीच आश्चर्य करण्यासारखी आहे. इतका दृढपणा त्यांच्या सध्यांच्या सहाध्यायी मंडळींतही आढळत नाहीं. मग या दृढतेची उपपत्ति

अङ्गीकृतं सुकृतिनः परिपालयन्ति ।

" महात्मे पुरुष एकदां ज्याचा अंगीकार केला त्याला कधीं अंतर देत नाहींत " या सर्वप्रसिद्ध वचनांवरून करायाची, किंवा ज्या माउलीच्या प्रसादानें त्यांस आजपर्यंत 'भाकरी मिळत गेली,'[1] व ते आज इतक्या योग्यतेला चढले, त्या राजनिष्ठेला वरील मत-परंपरा अत्यंत अनूकुल पडली ह्मणून तिची त्यांस दुस्त्यज्यता वाटते, किंवा त्यांच्या ह्मण-ण्याप्रमाणें आमच्या देशाची बुद्धिदेवता जशी गेल्या शंभर पिढ्या झोंपीं गेली होती तसाच थोडासा चुटका गेल्या पिढीभर 'लोकहितवादीं'च्या बुद्धीनेंही घेतला; काय असेल तें असो! वरच्यांपैकीं कोणतीही उपपत्ति स्वीकारली तरी काठिणच; पहिलीनें त्यांच्या समबुद्धीवर घाड पडते, दुसरीनें सत्यदेवतेचा क्षोभ होतो, आणि तिसरीनें त्यांच्या बुद्धीची जागरूकता नष्ट होते !

---

स्वजातीयविघाताय माहात्म्यं दृश्यते नृणाम् ।
श्येनो विहंगमानेव हिनस्ति न भुजंगमान् ॥[2] —'दृष्टान्तशतक'.

अंक ६७—(१) विषयोपक्षेप—ब्राह्मण. (२) प्रस्तुत लेखापासून होणारा गैरसमज. (३) ब्राह्मण मुत्सद्दी. (४) 'निबंधसंग्रहां'तील उतारा. (५) इंग्रेजी ग्रंथकारांचे अभिप्राय.

१ गेल्या अंकांत 'लोकहितवादीं'च्या ग्रंथांतील एका मोठ्या मुद्द्याच्या संबंधानें विचार झाला; ह्मणजे एकंदर देशाविषयीं जीं त्यांचीं मतें आहेत त्यांवर चर्चा झाली. आतां या देशाची बुडवणूक ज्यांच्या पायीं झाली-असा प्रस्तुत ग्रंथकाराचा ग्रह आहे त्या लोकां-विषयीं, ह्मणजे 'लोकहितवादीं'चे सजातीय जे ब्राह्मण त्यांच्याविषयीं विचार करूं. हा विचार तीन प्रकारांनीं करायाचा. एक, वरील लोक मुत्सद्दी होते या नात्यानें, दुसरें, तेच काय ते या देशांतील पंडित यासंबंधानें, आणि तिसरें, ते धर्माध्यक्ष ह्मणून. प्रस्तुत ग्रंथ-कारानें या तीन मुद्द्यांवरून आपल्या ब्रह्मबंधूंवर कोरडा उडवला आहे; यास्तव तिहीं संबं-धानीं प्रकृत विषयाचा विचार करणें अवश्य होय.

---

१. रावबहादुरांनीं दोन अडीच वर्षांपूर्वीं ठाण्यास एके प्रसंगीं काय भाषण केलें तें आमच्या वाचकांपैकीं बऱ्याच मंडळीस आठवत असेलच.

२. "मनुष्यांचा पराक्रम प्रायः स्वजातीयांचा घात करण्यांतच दृष्टीस पडतो; पाहा कीं ससाणा हा सर्पांस न मारतां पक्ष्यांवरच झडप घालतो ! "

२. सदरील विषयास लागण्यापूर्वी एका गोष्टीच्या संबंधानें येथें उल्लेख करणें अवश्य वाटतें. ती गोष्ट ही होय कीं, आह्मी जातीनें ब्राह्मण पडलों, तेव्हां आपल्या सजातीयांच्या कैवारानें आह्मी काय लिहिणें तें लिहूं, असा आमच्या वाचकांचा समज होण्याचा संभव आहे. विशेषत: ब्राह्मणेतर वाचकांचा आणि त्यांतून परधर्मी व परधर्मांत शिरलेल्या मंडळीचा तर वरील समज होईलच होईल. जगाची सामान्यत: प्रवृत्ति ह्मटली ह्मणजे आपणांवरून सर्व पाहायाचें ही असल्यामुळें ज्या पवित्र मंडळीनें अफगाणिस्थानांत आमच्या शिपायांस जय येवो ह्मणून आकाशांतील बापापाशीं गळ घेतली, व खुनी जॉर्ज नेर्न्स्[1] याच्या तर्फेनें प्रभु येशूपाशीं भीड खर्चली, त्यांस वरील नि:पक्षपातता केवळ दुर्घट वाटणार आहे हें खरें. पण या गोष्टीस आमचा उपाय नाहीं. आह्मी आपल्या तर्फे आमच्या साऱ्या वाचकांस प्रांजलपणें येवढेंच कळवतों कीं, आमच्या राष्ट्राचा, जातीचा, धर्माचा वगैरे आह्मी जरी पूर्ण अभिमान बाळगतों, व त्यांवर जो वृथा दूषण देईल त्याचें पारिपत्य केल्याखेरीज जरी आह्मी कधीं सोडणार नाहीं, तरी यथार्थ दूषणांचा कैवार आह्मी कधीं घेणार नाहीं. सदोषत्व हें इहलोकीं कोणासच सुटलें नाहीं, यास्तव त्याचा आमच्या देशाकडे जेवढा रास्त वांटा येईल तेवढा कोणाही नि:पक्षपात मनुष्यास पतकरलाच पाहिजे. तो न पतकरणें ह्मणजे हटवादीपणा होईल. पण आमच्या देशाची आलीकडे अशी कांहीं चमत्कारिक स्थिति झाली आहे आहे कीं, त्यास कोणी धनी ना गोसावी! हवें त्यानें त्याच्याविषयीं काय पाहिजे ती बडबड करावी. जो जो जितकी अधिक अधिक बडबड करील तितका तितका तो जाडा पंडित व जाडा देशसुधारणा करणारा! इतर देशांविषयीं कोणास कांहीं लिहिणें झाल्यास कांहीं तरी शोध करून लेखणी अंमळ जपून चालवावी लागते, पण आमचा हिंदुस्थान ह्मटला ह्मणजे पार्लमेंटच्या सभासदांनीं, इंग्रेज ग्रंथकारांनीं, मिशनरीं(च्यां ?'सं')नीं, एतद्देशीय ख्रिस्तभक्तांनीं, समाजवाल्या मंडळींनीं, चटोर पुस्तककारांनीं, त्याच्याविषयीं काय पाहिजे तें बोलावें व लिहावें. कांहीं शोध करायाला नको, कांहीं माहिती मिळवायाला नको, कांहीं धाक बाळगायाला नको—जें लिहावें तें सप्रमाण व जें बोलावें तें सत्यच! बरें, आमच्या येथल्या मंडळीला वरच्या बोलण्यापैकीं व लिहिण्यापैकीं कांहीं टोंचेल ह्मणावें तर त्याची वार्ताही नको! तुह्मी त्यांस किती पाहिजे तितक्या शिव्या द्या,

---

१. वरील नांवाच्या एका खलाशानें कलकत्त्यास एका पोलिसच्या शिपायाचा जीव घेतल्यावरून त्यांस फांशीं दिलें, हें कांहीं महिन्यापूर्वीचें वर्तमान आमच्या वाचकांपैकीं पुष्कळांच्या वाचण्यांत आलेंच असेल. बिचाऱ्या नेर्न्सचें पुढें त्याच्या धर्मबंधूंनीं व धर्मभगिनींनीं कसें और्ध्वदेहिक केलें तें मात्र सर्वांच्या समजण्यांत आलें नसेल. नेर्न्स् हा गतप्राण झाल्यावर त्याचें प्रेत वरील मंडळीनें मागून घेऊन त्याचा मोठ्या समारंभानें अंत्य संस्कार केला. पाद्री मंडळीनें त्याच्याबद्दल प्रभूपाशीं मोठ्या भक्तीनें प्रार्थना केली, व आपला बंधु आकाशांतील प्रभूच्या प्रेमळ मिठीचा अनुभव घेत आहे (Safe in the arms of Jesus) असें गीत गाइलें. तसेंच कित्येक मडमांनींही वरील महापुरुषाच्या शवास पुष्पगुच्छांनीं अलंकृत करून मोठा सोहळा केला! वा: ! धन्य नेर्न्स् साहेबांचें सौजन्य! धन्य त्यांच्या भगिनींची बंधुप्रीति!! आणि धन्य पाद्रीसाहेब व त्यांचा प्रभु!!!

व नाहीं नाहीं तीं नांवें ठेवा; तीं सर्व त्यांस कबूल ! वरील पुष्पवृष्टि जितकी जितकी अधिक होईल तितका तितका त्यांस विशेष संतोष ! ती न होईल तर मात्र त्यांस चैन पडावयाचें नाहीं. या देशाविषयीं कोणी चार ओळी मजकूर लिहिला, आणि त्यांत हिंदूंचें मूर्खत्व, भीरुत्व वगैरे सिद्ध केलेलें नसलें तर वरील तत्त्वज्ञ मंडळी नाक मुरडल्याखेरीज कधीं राहावयाची नाहीं. सारांश, आमच्या देशांत अशी बहादर व निगरगट्ट मंडळी झाली आहे कीं इतर देशांतील मनुष्यांस जशी आपली कोणी नालस्ती केलेली खपत नाहीं, तशी येथें स्वदेशाची प्रशंसा बिलकुल खपत नाहीं; व इतरांस जितपत आत्मस्तुति प्रिय तितपत इकडे आत्मनिंदा प्रिय !

तर अशा स्थितींत लोकांस आपणांविषयीं यथार्थ ज्ञान करून देणें हें अत्यंत महत्त्वाचें आहे. जे दुराग्रही व हटवादी असतील त्यांस वरील यथार्थ ज्ञानही विपरीत रीतीनें भासेल यांत संशय नाहीं; पण समंजस लोकांकडेसच दृष्टि देऊन वरील प्रयत्न करणें उचित होय. तर आमच्या सजातीयांच्या संबंधानें आह्मी जें यापुढें लिहिणार तें केवळ तिऱ्हाईतपणानें व निःपक्षपात बुद्धीनें लिहिणार आहों. त्यांत कोणास अन्यथा दिसल्यास प्रत्याक्षेप करण्यास आह्मी सर्वांना मोकळीक दिलेलीच आहे.

३. तेव्हां आतां प्रथमतः मुत्सद्दीपणाच्या संबंधानें ब्राह्मणांविषयीं विचार करावयाचा. गेल्या शतकांत पूर्वी कधींही न आलेलें ऐश्वर्य ब्राह्मणांस एकाएकीं प्राप्त झालें होतें; राजे ब्राह्मण, सरदार ब्राह्मण, दिवाण ब्राह्मण, वकील ब्राह्मण,—अशी कांहीं विलक्षण गर्दी एकदम होऊन गेली होती ! ज्या लोकांची प्राचीन वृत्ति म्हटली ह्मणजे तपस्वीपणाची, व आलीकडील वृत्ति पराकाष्ठा झाली तर कारकुनीपणाची, त्यांनीं गेल्या शतकांत प्राचीन आश्रमींचे दर्भ व अर्वाचीन आश्रमींची लेखणी हीं दोन्ही टाकून देऊन एकदम क्षात्रधर्माची नवीन दीक्षा धारण केली; व कोणीं राजवेत्राचा अंगीकार केला, कोणीं खड्गाचा आश्रय स्वीकारला, असें अपूर्व कृत्यंतर त्यांचे ठायीं एकदम दृष्टीस पडलें. परशुरामक्षेत्रांतल्या मंडळीनें आपल्या क्षेत्रपतींची दिग्विजयाची दीक्षा चोहोंकडे गाजवली. भारती युद्धापासून ब्राह्मणांचें नांव समरांगणांत जें लोपून गेलें होतें तें हजारों वर्षांनीं पुनः उदयास आलें; व ज्या महाक्षेत्रावर अर्जुनाचा वानरांकित ध्वज फडकला होता, त्यावरच युगांतरीं भाऊसाहेबांचा जरीपटका झळकला ! सारांश, ज्याप्रमाणें स्पेनच्या राजानें पंधराव्या शतकाच्या अखेरीस साऱ्या देशावरचा यवनी अंमल उठवून फारा दिवसांनीं मूळच्या राजसत्तेची व धर्माची पुनः स्थापना केली, त्याप्रमाणेंच पुढें दोन तीन शतकांनीं इकडेही महाराष्ट्रवीरांच्या हस्तें तोच प्रकार घडण्यांत आला.

वरच्यासारख्या हकिकती कोणी तिऱ्हाइतानेंही ऐकल्या असतां त्याच्या मनांत आवेशानें स्फुरण होण्यासारखें आहे; का कीं, ज्याच्या अंगीं पौरुष आहे त्यास प्रत्यक्ष शत्रूचा आपणांस बाधक होणारा पराक्रमही अभिनंदनीय होत असतो, मग तिऱ्हाइताचा होईल यांत नवल काय ! त्यांतून गेल्या तीन शतकांत आमच्या देशबंधूंनीं आपला प्रताप असा

गाजवला की, येवढा अफाट हा हिंदुस्थान, पण एका शतकाच्या अवधींत तो सर्व त्यांच्या डिंडिमाच्या नादानें दुमदुमून गेला! शिवाय हीही लक्षांत आणण्यासारखी दुसरी मोठी गोष्ट आहे की, मराठ्यांचा इतिहास हा इंग्लिश्, फ्रेंच्, किंवा स्पॅनियर्ड् लोकांच्या इतिहासासारखा नाहीं,—ह्मणजे इंग्लिशांनीं जशी येथें सत्ता बळकावली, नेपोलियननें जसा सारा युरोप विनाकारण तुडवून टाकला, किंवा स्पेनच्या ख्रिस्ती वीरांनीं अमेरिकेंत घुसून तेथें देशचे देश उद्ध्वस्त करून टाकून जसा आपल्या देशास व साऱ्या मनुष्यजातीस अक्षम्य कलंक लावला,—तसाही वरील इतिहासाचा प्रकार नाहीं. दुसऱ्यास बुचाडण्याच्या बुद्धीनें जें युद्ध आरंभलेलें असतें त्यांत वीरश्रीचा उत्कर्ष कितीही दृष्टीस पडला तरी सुविचारी व न्यायी मनुष्यास तो तादृश प्रशस्त होत नाहीं; कां कीं, वरच्यासारखें युद्ध ह्मणजे दिवसां ढवळ्या घातलेल्या दरवड्याचेंच मावंड होय! वास्तव सीजर् नेपोलियन्सारख्या सरदारांनीं कितीही अद्भुत पराक्रम केलेले असले, किंवा हेस्टिंग्स्, डलहौसीसारख्यांनीं दुसऱ्याचें पागोटें घेण्यांत कितीही शिताफी दाखवली असली, तरी प्रांजल इतिहासकारास त्यांच्या हकिकती लिहिण्यास कदापि संतोष वाटणार नाहीं. इतिहासदेवतेचीं परमप्रिय स्थानें झटलीं ह्मणजे थर्मापिलीचा पहाड, सिंहगड, साराटोगा, केनीचें रणांगण, बॅनॉकबर्नचा माळ, प्लेवनाचा मोर्चा हींच होत!

तर वरील अनेक कारणांस्तव महाराष्ट्र देशाचा इतिहास व ब्राह्मणांची शिपाईगिरी व राजकारण हीं परकी वाचणारांसही प्रिय होण्यासारखीं आहेत. मग एतद्देशीय वाचकांस तर त्यांपासून केवढा उत्साह प्राप्त होण्यासारखा आहे हें सांगणें नकोच. पण या सर्व गोष्टी आमच्या रावबहादुरप्रभृति मंडळीस काय होत! त्यांनीं इंग्रेजीभाषेच्या सव्वीस मातृकांचा परिचय झाल्या दिवसापासूनच बहुधा दोन महासिद्धांत बळकट धरून ठेवले आहेत कीं, अकलेंत पहिला नंबर झटला ह्मणजे आपले विद्यादाते व अन्नदाते जे इंग्रेज लोक त्यांचा; व दुसरा नंबर त्यांचे प्रिय छात्र व दासानुदास जे आपण त्यांचा; आणि पहिल्या मंडळीस स्वर्ग एक बोट उणा, व दुसरीस दोन बोटें! वर दाखल केल्याप्रमाणें अकलेची वांटणी होऊन गेल्यावर मग बाकीच्या मंडळींची वार्ता कशाला पाहिजे आणि त्यांतून आमच्या देशांत गेल्या तीन हजार वर्षांत जी अविच्छिन्न मूर्खपरंपरा होऊन गेली त्यांपैकीं कोणीं वरील अकलेस हक्क सांगणें ह्मणजे तर एकाद्या अतिशूद्रानें मोठमोठ्या वेदशास्त्रसंपन्न महाब्राह्मणांच्या पंक्तीच्या लाभाची आशा करणें यासारखेंच वेडगळ होय. इंग्लिश्भाषारूप महानसांत रांधला जाणारा जो अतिमोलाचा अक्कलरूप पदार्थ त्याचे पहिले भोक्ते झटले ह्मणजे मेकॉले, मॉरिस्, विल्सन्प्रभृति पाश्चात्य ऋषिवर्य हे होत; त्यांस समर्पण होऊन राहिलेलें जें पवित्र उच्छिष्ट तें पुढें 'लोकहितवादी', 'घाशीरामा'चे जनक, 'सत्यदीपिका'धारी यांनीं पुरोडाश ह्मणून मोठ्या भक्तीनें सेवन करायाचें; मग या दोन पवित्र पंक्तींतून निभावून येऊन वरील प्रभुभोजनांपैकीं एकादा शूलगवाचा तुकडा किंवा सोमरसाचा एकादा थेंबही आमच्या ब्राह्मण वीरांच्या किंवा मुत्सद्द्यांच्या बिचाऱ्यांच्या वांट्याला कोठून येणार? असो; आतां

आमच्या रावबहादुरांचे स्वज्ञातीविषयीं जे अमोल उल्लेख जागोजाग आहेत, कीं, ब्राह्मण हे राज्यबुडवे, त्यांस राज्य चालवण्याची अक्कल नाहीं, लढाई करण्याचें शहाणपण नाहीं, इ० इ०. त्यांविषयीं येथें सविस्तर लिहिण्याची मुळींच जरूर नाहीं. अज्ञानाचें किंवा दुराग्रहाचें पटल जो आपल्या डोळ्यांवरून अंमळ दूर सारील त्याच्या सुद्धां प्रस्तुत प्रकरणीं खरें काय तें लक्षांत येण्यास कांहीं अडचण पडणार नाही. यास्तव 'निबंधसंग्रहा'पैकीं एका मात्र लेखाचें येथें अवतरण करून प्रस्तुत प्रकरण आटपतों.

---

## "नंबर ४१."

### "नानाफडणिसाचें शाहाणपण." *

"विनंती विशेष—सांप्रत मराठे लोकांत अशी ह्मण आहे कीं, नानाफडणिसासारखा कोणी शाहाणा नाहीं. परंतु मला वाटतें कीं, आतां इंग्रज लोकांमध्यें सहस्रशः नानापेक्षां शाहाणे आहेत. नानाफडणिसाचें शाहाणपण वर्णन करण्याजोगें सर्वोत्कृष्ट नव्हतें. त्या लोकांमध्यें त्याची कीर्ती होण्याचें कारण इतकेंच कीं, मूर्खांचे सभेंत थोडासा कोणी शाहाणा असला ह्मणजे त्याची ख्याती होत्ये, आणि गांवढा जोशी गांवढ्यांत पंडीत असतो; कारण कीं, त्या गांवचे लोक जितके ज्ञानी असतात त्यांहून त्यास विद्वानपणा आधिक असतो. वास्तवीक पाहिलें तर नानाफडणीस कांहीं विद्वान नव्हता व त्यास दूरदृष्टी नव्हती. जन्मापासून त्याणें कारभार केला याजमुळें त्याची बुद्धी बरीच होती, व मराठे दरबारचा बंदोबस्त त्याला चांगला करतां येत होता; परंतु मेंढक्यास मेंढ्या वळतां आल्या ह्मणून तो कांहीं घोडेस्वार होत नाहीं. इंग्रज लोकांतील कारभारी यांची बुद्धी विशाळ, मसलत खोल, अनेक देशांचे वृत्तांत त्यांस माहीत, व त्यांचें आपसांत एकमत असे. नानाफडणिसाचे ठायीं हें नव्हतें. तो जुन्या चालीचा ब्राह्मण, त्याची माहिती कमी, व आपसांत दुष्टपणा फार होता. पाहा बरें, नानाफडणिसाचे हातीं सर्व राज्यकारभार होता. परंतु त्याणें कांहीं राज्यांत अधिकाऱ्यांची रचना व पदव्या हें ठरविलें नाहीं. इंग्रजांत एक मेला ह्मणजे दुसरा तयार असतो. हा क्रम मराठी राज्यांत नव्हता. कायदे कांहीं नव्हते. बरें त्यांचें समीप इंग्रज होते त्यांचा शोध तरी त्याणें कांहीं करावा, तेंही कांहीं नाहीं; इंग्रजांनीं मात्र सर्व लोकांच्या डोक्यावरचे केस मोजून ठेवले, परंतु मराठे लोकांस इंग्रजांविषयीं कांहीं माहित नाहीं.: त्यांचा देश व नांवगांव कांहीं एक ठाऊक नाहीं. नानाचे वेळचे पत्रांत कोठें इंग्रजांस चलवर, कोठें कलकत्तेकर असें ह्मटलें आहे. याजवरून त्याचें ज्ञान समजतें. टिपूशीं लढाई केली तेव्हां लार्ड कार्नवालीस तेथें गेले होते. व त्यांजबरोबर परशरामभाऊ वगैरे सरदार पेशव्यांकडून गेले होते. पण त्यांपैकीं एकजणासही ते कोण होते हें ठाऊक नाहीं व कोठून आले हें माहित नव्हतें. इंग्रजांचा वकील पुण्यांत होता, त्याची मात्र त्यांस ओळख होती. परंतु त्यांचा झेंडावुंधा किंवा हिंदु-

---

* प्रस्तुत लेख रा० ब० देशमुखांनीं 'प्रभाकरा'च्या ता० ३१ डिसेंबर १८४८ च्या अंकांत लिहिला होता. 'सम्पादक'

स्थानांत इंग्रज कोठें आहेत व फराशीस कोठें आहेत व फिरंगी कोठें आहेत, याचा कांहीं शोध लागत नाहीं. नानाफडणिसाची बातमी फार होती असें ह्मणतात, परंतु ही बातमी फुसक्या गोष्टींची होती. शिकांचें व नेपाळचें वगैरे संस्थानें दूरवर होतें, त्याचा त्यास ठिकाण नव्हता व राज्यांत टपाल वगैरे नव्हतें. नानाची बातमी इतकीच होती कीं, आपले ओळखीचे लोकांतील कोण कोठें गेला, कोण काय जेवला, ही मात्र बातमी तो वित्त देऊन काढीत असे. एवढ्यावरून मूर्ख लोकांस असें वाटे कीं, आह्मी काल अमूक करीत होतो तें नानास ठाऊक कसें झालें ? परंतु या बातमीचा उपयोग काय ? बातमी ह्मणजे संपूर्ण जगांत कोणतीं राष्ट्रें आहेत, कोणते मुलुख मोठे आहेत, हें समजावें. तळेगांवास इंग्रज लोक आले होते तेव्हां मराठे लोकांनीं एकावर हजार जाऊन त्यांचा पराभव केला या गोष्टीचें मराठे लोक मोठें वर्णन करतात. परंतु असली गोष्ट कांहीं मोठी नव्हे व त्यांत कांहीं शाहाणपण नाहीं. घोडें मनुष्यास मारील यांत काय आश्चर्य आहे ? परंतु त्यामुळें घोडा शाहाणा व मनुष्य वेडा असें ह्मणूं नये. ती गोष्ट एखादे वेळेस झाली ह्मणून वारंवार होणार नाहीं; नेहेमी मनुष्य घोड्यावर बसतात. तद्वत् इंग्रजांचा पराभव मराठे लोकांनीं केला, पण त्याजमुळें इंग्रज नाहींसे झाले नाहींत. आणि इंग्रज लोक शाहाणे; ते इकडे आल्यावर त्यांणी या लोकांच्या सर्व माहितगाऱ्या काढल्या आणि मग त्यांस जिंकण्यास उशीर लागला नाहीं. अशी मराठ्यांनी इंग्रजांची माहितगारी कां काढली नाहीं ? नानाफडणिसास ही गोष्ट करण्यास अनुकूल होतें, परंतु त्यांस हें कांहीं ठाऊकच नाहीं. त्याच्या समजुती अशा होत्या कीं, पृथ्वी काय ती एवढीच व सर्व जग तें इतकेंच आहे; याशिवाय कोठें कांहीं नाहीं. इंग्रज हे कोणच्या बेटांतून आले आणि प्रथम दाहावीस जण, नंतर शेदोनशे असे इतके दूर येऊन येवढें राज्य जमविलें. ही कृती विश्वकर्म्यासारखी नव्हे काय ? परभाषा, परमुलुख, परजात, परधर्म, तत्रापि वरिष्ठता पावले हें केवढें शाहाणपण बरें ? इंग्रज कोण हें वर्तमान ठाऊक नाहीं, हा केवढा मूर्खपणा आहे ! आपले लोक पेशवाईत मूर्ख होते यांत संशय नाहीं. त्यांस कांहींच कळत नव्हतें. बरें आणखी नानाफडणीस यास कांहीं आपले देशाचा अभिमान नव्हता व शौर्यही नव्हतें. तो स्वभावानें कुत्सित होता व हलके मनाचा होता. सर्व देशाचें कल्याण करण्याचें त्याचे मनांत क्षणभर देखील येत नव्हतें. परंतु त्याचीं आंतून बहुत सरदारांशीं वांकडीं मात्र होतीं. त्याणें सर्वांस एक कायदा लावून देऊन सर्वांस एकत्र जमविण्याचा प्रयत्न कधींच केला नाहीं. आपले घरापर्यंत व आपले राज्यापर्यंत मात्र नजर ठेविली. लोकांच्या सुधारणेचा प्रयत्न केला नाहीं. श्रीकाशीक्षेत्रास जाणें तरी बरोबर दोनशे लोक लागत. तेव्हां मनुष्यें माघारीं येत होतीं. नाहीं तर भिल्ल, रामोशी पेंढारी वगैरे चोरटे लोक लुटीत होते. त्यांचा बंदोबस्त त्याच्यानें झाला नाहीं. काशीही आपलेकडे इंग्रजांकडून घेववली नाहीं. व त्यास आपले राज्याबाहेर कोण अम्मल करितो याची खबर बिलकुल नव्हती. या लोकांचें कोणतेंही कल्याण त्याचे हातून झालें नाहीं. मग त्यास कोणत्या प्रकारानें लोक शाहाणा ह्मणतात हें कांहीं कळत

नाहीं. नीती, सुधारणा किंवा विद्येची वृद्धी त्यानें केली नाहीं; व कलाकौशल्येंही वाढविलीं नाहींत. नशिबानें राज्य चाललें, नाहीं तर असे लोकांच्या हातांत राज्य क्षणभर देखील असूं नये. परंतु काळाच्या योगानें इंग्रज त्या वेळेस इकडे फारसे आले नव्हते याजमुळें हें राज्य चाललें; नाहीं तर असे लुटारू, अडाणी लोकांचें बेकायदा राज्य निर्मूं नये; परंतु ईश्वरसत्तेनें तें झालें. तात्पर्य नाना फडणिसाविषयी जो अभिप्राय लोकांचा आहे तो खोटा आहे. आतां जर नानाफडणीस असता तर त्याजला लोक वेडा म्हणूं लागते: आणि तो पळूनही जाता यांत संशय नाहीं." लो० हि०

वरील लेखावर चर्चा करण्यापूर्वी त्याच्या जोडीला कांहीं इंग्रेजी लेख सामील करतों. त्यांचेंही वाचकांनीं मनन करावें:—

"The first of the events alluded to in point of time and importance was the death of Nana Furnuwees. His health had long been in a declining state; but he continued to transact business, almost to the last, with his accustomed order and punctuality. He died on the 13th March, "and with him," says Colonel Palmer, "has departed all the wisdom and moderation of the Mahratta government." Nana Furnuwees was certainly a great statesman. His principal defects originated in the want of personal courage, and in an ambition not always restrained by principle. In the latter unhappy years of his life, on the testimony of English as well as Mahratta authority, he is entitled to the high praise of having acted with the feelings and sincerity of a patriot. He honorably advised Bajee Rao to such measures as he believed advantageous, unmindful of any consequences. He was decidedly averse to the admission of a body of foreign troops in the manner proposed by the Marquis Wellesley, if the energies of the government could possibly be restored without their aid. He respected the English, admired their sincerity and the vigour of their government; but as political enemies, no one regarded them with more jealousy and alarm. The life of Nana may be said to have been entirely public; and its events have been so fully recorded as well as the motives for his conduct, that it is unnecessary to enlarge on his character. In private life he was a man of strict veracity, humane, frugal and charitable. His whole time was regulated with the strictest order, and the business personally transacted by him almost exceeds credibility."

("मागील भागाच्या शेवटीं निर्दिष्ट केलेल्या वृत्तांतापैकीं काळमानानें व महत्त्वाच्या मानानें पहिली मोठी घडलेली गोष्ट म्हटली म्हणजे नानाफडणवीस याचा मृत्यु ही होय. नानाच्या प्रकृतीस बरेच दिवस चैन नव्हतें, तरी शेवटपर्यंत त्यानें नेहेमीच्या टाकठिकीनें व टापटिपीनें कारभार चालवला. मार्च महिन्याच्या १३ व्या तारखेस त्याचा काळ झाला.

त्याच्या बरोबरच मराठी राज्यांतलि सारें शहाणपण व सर्व व्यवस्थितपणा निघून गेला, असें कर्नल् पामर् यानें लिहिलें आहे. नानाफडणवीस हा खरोखर मोठा मुत्सद्दी होऊन गेला. त्याचे मुख्य अवगुण म्हटले म्हणजे येवढेच होते कीं, जो जातीनें शूर नव्हता व त्याची महत्त्वाकांक्षा कांहींशी अनावर होती. त्याचीं शेवटलीं चार पांच वर्षे जीं विपत्तींत गेलीं त्यांत त्यानें स्वदेशभक्ति पूर्णपणें प्रगट केली; याविषयीं त्याच्या देशबंधूंचें व त्यावेळच्या इंग्रेजांचें ऐकमत्य आहे. बाजीराव गादीवर आल्यावर त्यानें त्यास निरपेक्षबुद्धीनें आपला उत्तम सल्ला देण्यांत कधीं कसूर केली नाहीं. मार्क्विस् वेलस्लीनें सांगितल्याप्रमाणें इंग्रेजी पलटणें चाकरीस ठेवण्याची मसलत त्यास बिलकुल पसंत नव्हती. जोंपर्यंत होईल तोंपर्यंत राज्यांतल्या राज्यांतच बंदोबस्त करावा हें उत्तम असें त्याचें मत होतें. तो इंग्रेजांस चाहत असे. त्यांची नेकी व राज्य चालवण्याची शहामत यांची तो तारीफ करी; पण राजकारणाच्या संबंधानें ते नेहेमी त्याच्या डोळ्यांत खुपत असत. नानाचें सर्व आयुष्य राज्यकारभारांतच गेलें असें म्हणण्यास हरकत नाहीं. या कारभारांत घडलेल्या सर्व गोष्टींची तपशीलवार हकीकत पूर्वी दाखल झालेलीच आहे, व नानाचे कोणकोणत्या कार्यांत काय काय हेतु होते तेही प्रदर्शित केलेलेच आहेत; यास्तव त्याच्या स्वभावाचें वर्णन येथें अधिक करण्याची जरूर नाहीं. खाजगी रीतीनें पाहतां नाना फडणवीस हा वचनाचा पक्का, दयाशील, मितव्ययी व धर्मात्मा असा होता. त्याचा सारा वेळ बांधलेला असे; व तेणेंकरून त्याच्या हातून इतकें काम उरकें कीं, तें कोणास सांगितल्यास खरें सुद्धां वाटणार नाहीं. ! ”)

"The fortunes of Nana Furnuwees were now, in the general opinion, and perhaps in his own, desperate; but on being forced to abandon half-measures, into which he was misled by a timid disposition, the vigour of his judgment, the fertility of his expedients, the extent of his influence, and the combination of instruments which he called into action, surprised all India, and from his European contemporaries, procured for him the name of "the Mahratta Machiavel."

( या वेळेस सर्वांस असें वाटून गेलें होतें कीं, आतां नानाची धडगत नाहीं; कदाचित् त्याचा त्यासही त्यावेळेस भरंवसा वाटत नसेल. पण पहिल्यापहिल्यानें भित्रेपणामुळें आरंभलेलें धरसोडीचें वर्तन सोडून देऊन जेव्हां त्यानें आपलें बुद्धिसर्वस्व प्रगट केलें, तेव्हां त्याची दूरवर पोंच, युक्तिप्रयुक्ति रचण्याचें चातुर्य, त्याचा चोहोंकडे असलेला दबदबा, व आपणावर उठलेल्या शत्रूंस मोडण्यास त्यानें जीं कारस्थानें उभीं केलीं तीं,—या सर्वांकडे पाहून सारें हिंदुस्थान तोंडांत बोट घालून राहिलें, व त्यावेळचे इंग्रेज त्यास ' मराठ्यांतला मॅकिवेल् '[1] असें म्हणूं लागले. )

---

१. मॅकिवेल् नामेंकरून एक विख्यात इटॅलियन् प्रधान सोळाव्या शतकाच्या आरंभीं उदयास आला. याला 'इटालींतला चाणक्य' म्हटलें असतां शोभणार आहे.

वरील दोन उतारे ग्रँट् डफ्च्या सर्वप्रसिद्ध इतिहासांतले आहेत. पुढील उतारा 'एशियाटिक् अॅन्युअल् रेजिस्टर् ' या वार्षिक पुस्तकांतील आहे:—

"Contemporary with Poorneah, and in no ways inferior to him, was Nana Furnavese, who for a quarter of a century administered the territory of the Peishwa, during the minority of Bajee Rao. To attempt a character of this great statesman, would be to detail a history of Mahratta politics for the last twenty-five years, during which he discharged the duties of Minister with abilities unequalled. During the long and important period of his administration, by the force and energy of his single mind he held together his vast empire—composed of members whose interests were as opposite as the most anomalous elements—and by the versatility of his genius, the wisdom and firmness, and modification of his government, he excited this mass of incongruities to one mutual and common effort. With that wise and farseeing policy—which, strong in its own resources, equally rejected the extremes of confidence and despair, he supplied from the fertility of unexhausted genius an expedient for every possible event."

( पूर्णयाच्याच वेळचा व त्याच्यासारखा बुद्धिमान् प्रधान नानाफडणीस हा होता; यानें बाजीरावाच्या अज्ञानदशेंत पेशव्यांचें राज्य पंचवीस वर्षे चालवलें. या नामांकित मुत्सद्द्याचें वर्णन करणें ह्मणजे गेल्या पंचवीस वर्षांत मराठ्यांच्या राज्यांत ज्या उलाढाली झाल्या त्यांची हकीकत देणें होय; वरील काळांत त्यानें विलक्षण चातुर्यानें प्रधानगिरीचें काम बजावलें. इतकीं वर्षे पावेतों त्यानें आपल्या एकट्या बुद्धीनें पेशवाई सारख्या प्रचंड राज्याचें नियमन केलें. त्या राज्यांत किती निरनिराळीं संस्थानें व त्यांच्यांत परस्पर किती बखेडे ! पण इतक्यांसही त्यानें एक तंत्रानें वागवलें; अशी त्याची राज्य वहिवाटण्याची कांहीं चमत्कारिक हातोटी होती ! त्याचें शहाणपणा व दूरदृष्टि ही अशा प्रकारची होतीं कीं, कोणतेंही कार्य करायाचें तर तें उतावळीनें न करतां किंवा त्याच्या विषयीं निराश होऊन न बसतां तें धिमेपणानें व धोरणाधोरणानें करायाचें. यामुळें कोणत्या वेळेस कसाही प्रसंग गुदरला तरी तो डगमगत नसे. )

प्रस्तुत विषय एकंदर ब्राह्मणांच्या मुत्सद्दीपणाचा आहे, यास्तव वरील पुस्तकांतूनच पुढीलही उतारा वाचकांस सादर करतों:—

"Every trait," said the British Resident of that day, "in the character of Poorneah marks him as an extraordinary man. * * * To a mind of singular vigour, he added an extensive acquaintance with the resources

१. वरील उल्लेखांत थोडीशी चूक आहे. बाजीरावाच्या जागीं सवाईमाधवरावाचें नांव पाहिजे होतें.

of the country and an intimate knowledge of characters. The revenue of Mysore has been raised to its present amount by the superior management of Poorneah; by the attention to the repair of tanks and water-courses; and the construction of roads and bridges; by the encouragement which he has given to strangers to resort to and settle in Mysore; and his general endeavours to improve the agriculture of the country, and the situation of the people under the government."

("त्या वेळचा इंग्रेजांचा रेसिडंट वरील प्रधानाविषयीं असें ह्मणतो कीं पूर्णया याच्या अंगचे सर्व गुण मोठे विलक्षण होते. त्याची बुद्धि अत्यंत तीव्र असून त्यास आपल्या देशाच्या संबधानें सर्व प्रकारची उत्तम माहिती होती, शिवाय कोण कसा आहे, कोण कसा अहे हें ज्ञानही त्यास सर्वोत्कृष्ट होतें. पूर्णयानें म्हैसूर प्रांताची जी उत्कृष्ट व्यवस्था ठेवली होती तिच्या योगानें त्याचें उत्पन्न आज इतकें वाढलें आहे. ही व्यवस्था अशी कीं, त्यानें तळ्यांची व नाल्यांची चांगली दुरुस्ती ठेवली, रस्ते व पूल बांधले, नवीन वसाहत करण्यास येणारांस चांगलें उत्तेजन दिलें, शेतकीची सुधारणा केली, आणि एकंदर रयतेस सुखी केलें.")

---

ऐश्वर्यादनपेतमीश्वरमयं लोकोऽर्थतः सेवते
तं गच्छन्त्यनु ये विपत्तिषु पुनस्ते तत्प्रतिष्ठाशया।
भर्तुर्ये प्रलयेऽपि पूर्वसुकृतासङ्गेन निःसङ्गया
भक्त्या कार्यधुरं वहन्ति कृतिनस्ते दुर्लभास्त्वादृशाः॥[1]

—'मुद्राराक्षस', (१, १४. विशाखदत्त 'सं'०)

अंक ६८—(१) दोन्ही अभिप्रायांची तुलना. (२) 'लोकहितवादीं'च्या अभिप्रायाचें खंडन. (३) प्रस्तुत विषयावर आमचें मत.

१. मागील अंकांत जे उतारे दिले आहेत त्यांतील मराठी उतारा एका पारड्यांत घातला व इंग्रेजी [१] उतारे दुसऱ्या पारड्यांत घातले तर तराजूचा कांटा कोणत्या बाजूला कलेल बरें? आमच्या रावबहादुरांनीं बिचाऱ्या नानास दिलेल्या सर्टिफिकिटांत व इंग्रेजांनीं दिलेल्या सर्टिफिकिटांत हें केवढें जमीनअस्मानचें अंतर! 'लोकहितवादी' महाराज तर त्यास शहाणपणाच्या उच्चपदावरून लाथेनें खालीं झुगारून देणार, आणि इकडे पाहावें तों इंग्रेज ग्रंथकार तर त्यास महामंत्रिमंडळांत नेऊन बसवणार; मग नानाची मधल्यामधें बिचा-

---

१. "जो प्रभु ऐश्वर्ययुक्त आहे त्याची लोक स्वार्थास्तव सेवा करीत असतात; त्याच्या विपत्तिकाळींही जे त्यास अनुसरतात ते तरी त्याची पुनः स्थापना होईल, या आशेवर त्याला भजतात; पण आपल्या स्वामीचा सर्वथा नाश होऊन गेला असतांही केवळ पूर्वीचा लागाबांधा स्मरून जे केवळ निरपेक्ष बुद्धीनें त्याच्या कार्यार्थ देह झिजवतात ते तुझ्यासारखे धन्य पुरुष या लोकीं दुर्लभ होत!"

त्याची वाट: काय ? प्राचीन काळच्या त्रिशंकूसारखी किंवा गेल्या शतकांतल्या द्रविड ब्राह्मणासारखीच पुनः पंचाईत येऊन पडली ! बरें, वरील दोन सर्टिफिकिटांची एकवाक्यता करूं ह्मटलें तर कोणत्याही बाजूनें ती होण्याचा संभव नाहीं. एक सर्टिफिकिट ह्मणतें, कीं नाना मूर्ख, अल्पदृष्टि, व आपस्वार्थी होता, त्यानें सर्वांस एका जुटीनें वागवण्याचा कधींच यत्न केला नाहीं. तेंच दुसऱ्या सर्टिफिकिटांत पाहावें, तों नाना ह्मणजे अटोकाट शहाणा, दूरदृष्टि, लोककल्याणकर्ता, व सर्वांवर आपली छाप ठेवून सर्वांस एका धोरणानें वर्तवणारा असा आढळतो.मग या ठिकाणीं तोड तरी काय काढावी ? वरील दोन अभिप्रायांपैकीं कोणता तरी एक अभिप्राय खोटा ठरला पाहिजे हें उघड आहे, पण खोटा ह्मणावा कोणता ? आमच्या रावबहादुरांचें सर्टिफिकिट एकदम रद्द करून टाकावें तर तें कठिणच; कां कीं, आज तीन हजार वर्षांत निपजलेल्या एकंदर लोकांस सरसकट महामूर्ख ठरवून त्या सर्वांच शहाणपण हिरावून घेऊन जे आज चाळीस वर्षें महाज्ञानी ह्मणून नाणवलेले आहेत त्यांचा अभिप्राय यच्चयावत् खोटा कसा ह्मणावा ? त्यांतलें एकादें अक्षर कदाचित् अन्यथा पडेल, किंवा फार झालें तर एकादें वाक्य नजरचुकीनें भलतें पडलेसें ह्मटलें तर शोभेल; पण सहस्रशः मनन केलेल्या विषयावरचा त्यांचा येवढा सविस्तर नमूद केलेला अभिप्राय सगळाचा सगळा निखालस चुकला असें ह्मणणें ह्मणजे केवढें धारिष्ट होणारें आहे! त्यांतून एतद्देशीय इतिहासाच्या संबंधानें तर रावबहादुरांचा हातखंडा आहे हें सर्वप्रसिद्धच आहे; त्यांस जुनी माहिती मिळवण्याचा पहिल्यापासून जितका हव्यास आहे तितका कोणासही नाहीं ह्मटलें असतां चालेल. मग इतकें असून त्यांनीं येवढ्या डौलानें दिलेलें स्वदस्तूरचें सर्टिफिकिट कवडीच्या मोलाचें ह्मणून बेलाशक झुगारून दिलें असतां शोभेल काय ? कधीं शोभणार नाहीं.

आतां दुसऱ्या पक्षाविषयीं विचार केला असतां तिकडूनही लहानसान पंचाईत आहे असें नाहीं. रावबहादुरांनीं अविचारानें कांहीं तरी अभिप्राय ठोकून दिला असें जर न ह्मटलें, तर नानास वरच्यासारखीं अघळपघळ सर्टिफिकिटें देणारे तरी अकलेचे खंदक होते असें ह्मणणें भाग आहे. जो खडा कवडीचा माल ह्मणून आह्मीं येथल्या येथें सर्वानुमतें ठरवतों त्यालाच जेव्हां पाश्चात्य रत्नपारखे अमोलिक ठरवतात, तेव्हां ते गाजरपारखे नव्हेत ! अर्थात् ते तसेच होत. पण हा सिद्धांत स्वीकारणें ह्मणजे 'लोकहितवादीं'च्या तत्त्वज्ञानाच्या संबंधानें 'मूलच्छेदी पांडित्यप्रकर्षः' असाच प्रकार होणार ! ज्यांच्या शहाणपणाचा प्रकाश अज्ञानांध हिंदूंच्या नेत्रांस विषयीभूत करण्याकरतां मुळीं आमच्या रावबहादुरांचा आज तीन तपें सारखा खटाटोप, त्यांच्याच डोक्यावर महामूर्खत्वाचा बोजा नेमका जाऊन आदळला तर मग काय राहिलें ? छे, छे ! हें तर त्यांच्या ब्रीदास सर्वथा विरुद्धच होय. एक वेळ आपणाकडे मूर्खत्व घेऊन आपल्या प्रभूकडे शहाणपणा द्यावा हा सेवकधर्म ह्मणतां येईल; पण आपल्या राज्यकर्त्यांकडे गाजरपारखेपणा देऊन आपण मात्र पहिल्या प्रतीचे परीक्षक होणें हा केवळ निमकहरामीपणा होणार आहे ! !

तेव्हां एकंदरींत पाहतां 'एकीकडे आड आणि एकीकडे विहीर' अशाच प्रकारची ही पंचाईत आहे. रावबहादुर, नाना व साहेब या त्रयीपैकीं मूर्खत्वाचा बोजा कोणीं तरी पत्करला पाहिजे; त्यावांचून गत्यंतर नाहीं. वरील त्रिवर्गांपैकीं पुढील दोन असामी तर गतच झालेले आहेत; तेव्हां त्यांच्या तरफदारीचा खटला उरकलाच. आतां राहिलेसाहिले रावबहादुर; तर ते किंवा त्यांचे कैवारी यांपैकीं कोणी जर वरील पंचाईत तोडतील तरच वरील द्वैध नाहींसें होणार आहे. एरवीं मार्गच उरला नाहीं !

वर जो आह्मीं हेतु प्रदर्शित केला आहे तो केव्हां सिद्ध होईल, किंबहुना मुळींच होईल कीं नाहीं, याविषयीं तूर्त कांहीं सांगतां येत नाहीं. यास्तव सध्यां रावबहादुरांच्या पूर्वोक्त लेखावर आह्मी आपला अभिप्राय आमच्या वाचकांस सादर करतों.

२. 'लोकहितवादीं'चा वादविषयक लेख हा अनेक प्रकारांनीं मोठा विचार करण्यासारखा आहे. त्याचा पहिला मोठा उपयोग हा आहे कीं, त्यावरून पाश्चात्य विद्येपासून आमच्या नवीन मंडळीच्या मनावर कोणते दुष्ट संस्कार झाले ते त्यांत स्पष्ट दिसत आहेत. पंचवीस वर्षें ब्राह्मण बादशाहीचा कारभार हांकलेला जुनापुराणा दिवाण नानाफडनवीस कोणीकडे, आणि आंग्लभौम भाषेचें केवळ मुखावलोकन होऊन नुकती ज्यांची लेखणी फुरफुरूं लागली असे आमचे कोंवळे रावबहादुर कोणीकडे ![1] पण कांहीं नाहीं; लहानग्या जॉर्ज वॉशिंग्टनानें आपणास बक्षीस आलेल्या लहानशा कुऱ्हाडीचा प्रयोग जसा आपल्या बापाच्या बागेंतील बिचाऱ्या झाडांवर करण्याचा लगेहात सपाटा चालवला, त्याप्रमाणेंच प्रस्तुत तरुण पंडितानेंही विद्याप्रविष्ट होतांच लोकहितवादाची दीक्षा धारण करून 'कुऱ्हाडीचा दांडा गोतास काळ' या म्हणीप्रमाणें जुने मुत्सद्दी, जुने पंडित, जुना धर्म, जुन्या चाली यांवर आपल्या नूतनलब्ध शस्त्रास्त्रांचा भडिमार लागलीच चालू केला. महामूर्खत्वाची एक भली जाडी सनद काढून ती त्यानें परमप्रीतीनें आपल्या पितृपितामहप्रपितामहादि शंभर पूर्वजांस एका सपाट्यासरशीं देऊन टाकली. ही अपूर्व पुष्पवृष्टि लोकांतरवासी देशमुखमंडळींस कितपत मानवली असेल कोण जाणे ! बरें, आतां हा जो सिद्धांत, कीं शहाणे काय ते आह्मी, आणि इंग्रेजीचा ज्यांस पवित्र संस्कार घडला नाहीं ती सर्व मंडळी मूर्ख, हा कशावरून खरा समजायाचा ? रावबहादुरांनीं त्याची सिद्धता कोठेंच केली नसून तो जेथें तेथें प्रत्यक्ष प्रमाणाप्रमाणें गृहीत धरलेलाच आढळतो. उदाहरणार्थ प्रस्तुत लेखच पाहा. त्यांत वरील सिद्धांताचें जागोजाग विधान मात्र केलेलें आहे. "आपले लोक पेशवाईत मूर्ख होते यांत संशय नाहीं. त्यांस कांहींच कळत नव्हतें;"—"आतां जर नाना फडणवीस असता तर त्याजला लोक वेडा ह्मणूं लागते, आणि तो पळूनही जाता यांत संशय नाहीं;"—"मूर्खांचे सभेंत थोडासा कोणी शाहाणा असला ह्मणजे त्याची ख्याती होते" इ० इ०. तर आतां अगोदर या महासिद्धांताची सत्यता कितपत आहे ती पाहूं.

इंग्रेजी भाषेचा गेल्या वीस पंचवीस वर्षांत इकडे प्रसार झाल्यापासून वरील तत्त्व

---

१. वादविषयक लेख रावबहादुरांनीं सन १८४८ त लिहिलेला आहे.

सामान्यतः सर्वांचे ठायीं व विशेषतः नवीन विद्वानांचे ठायीं बिंबलेलें आढळतें. जुना इंग्रेजी न शिकलेला तेवढा मूर्ख व इंग्रेजी पैदा केलेला तेवढा शहाणा अशी एक साधारणपणें समजूत पडून गेलेली आहे. ही समजूत वस्तुतः पाहतां अगदीं वेडगळपणाची होय. इंग्रेजी विद्वत्ता ह्मणजे येवढी काय अपूर्व चीज आहे याचा कोणीं कधीं विचार केला आहे काय ! इंग्रेजी विद्वत्ता ह्मणजे इंग्रेजी भाषेचें ज्ञान याच्या पलीकडे काय आहे ! मग केवळ भाषेचें ज्ञान झाल्यानें, ह्मणजे दहा पांच हजार शब्दांचें अर्थज्ञान झाल्यानें व सामान्यतः कोणत्याही इंग्रेजी ग्रंथांतील अभिप्राय समजण्याची शक्ति आल्यानें, येवढें शहाणपण तें कोठून आलें ! इंग्रेजी भाषेच्या वर्णांत किंवा शब्दांत असा कांहीं विजातीय प्रभाव आहे काय, कीं पहिले जिव्हाग्रावर बसले व दुसरे मनांत सांठवले ह्मणजे बुद्धीस आपली तीव्रता आलीच ! आतां कोणी ह्मणतील कीं, इंग्रेजींत हजारों मोठमोठे ग्रंथ लिहिलेले आहेत, त्या भाषेत पदार्थविज्ञानावर व सामान्यतः सर्व व्यवहारावर महान् महान् पंडितांनीं आपापले अत्यंत प्रौढ विचार प्रगट केलेले आहेत; तेव्हां त्यांच्या परिशीलनानें अर्थातच बुद्धीस परिपक्वता येणार आहे. खरें आहे; पण येवढ्या पल्ल्यावर आजपर्यंत कितीशी मंडळी पोंचलेली आढळेल ! आज आमच्या देशांत जेवढ्यांस इंग्रेजी भाषा येत आहे त्यांपैकीं शेकडा कितीजण बेकनचें किंवा मिल्लचें बुद्धिपुरःसर अध्ययन करणारे सांपडतील ! शिवाय केवळ ग्रंथज्ञान व व्यवहारज्ञान यांत किती तफावत असते हेंही कोणाला सांगायाला पाहिजे असें नाहीं. साऱ्या जगाचा इतिहास ज्यास मुखोद्गत येत आहे त्याच्या हातीं एकाद्या लहानशा संस्थानाचा कारभार दिला तर त्याच्यानें तो वहिवाटला जाईल काय ! सारा भूगोल ज्यास करतलामलकवत् आहे त्यास एकाद्या रानांत नेऊन सोडला किंवा त्याच्या हातीं जहाजाचें सुकाणूं दिलें तर काय मौज होईल बरें ! तेव्हां ग्रंथपठन व व्यवहारचातुर्य हीं केवळ भिन्न होत हें उघड आहे.

आमच्या रावबहादुरांनीं नाना फडणविसावर मोठा टपका हा आणला आहे कीं, तो 'कांहीं विद्वान् नव्हता.' या आक्षेपावरून आह्मांस गेल्या वर्षीच्या अशाच एका जबरदस्त आक्षेपाची आठवण होते. तो मोरोपंतास ईश्वरविषयक ज्ञान यथार्थ नव्हतें अशाविषयींचा होय. वरील आक्षेपाच्या निरसनार्थ आह्मी आमच्या महाराष्ट्रकवीच्या तर्फेनें[1] जे विचार प्रगट केले आहेत तेच प्रायः प्रस्तुतः प्रसंगीं वरील महाराष्ट्रीय मंत्र्याच्या तरफदारीसही उपयोगीं पडण्यासारखे आहेत. नाना फडणवीस विद्वान् नव्हता ह्मणजे काय ! रावबहादुरांच्या मनांत त्यानें अगोदर सहाव्या यत्तेचा दाखला मिळवून किंवा चॅन्सेलर् साहेबांच्या हातचें चर्मपत्र घेऊन मग फडणिशीवर रुजू व्हावयाचें होतें असें तर नाहींना ! तसें असल्यास आह्मी रावबहादुरांस असें विचारतों कीं, मराठी राज्याची मूळ स्थापना करणारे जे शिवाजी महाराज त्यांनीं कितीशीं सर्टिफिकिटें पैदा केलीं होतीं ! त्यांस नुसतें पांढऱ्यावर काळेंही करतां येत नव्हतें. दुसरें उदाहरण हैदरअलीचें घ्या. यानेंही आपल्या

---

१. अंक ५४ (पृष्ठे ८४३–८५०. सं० ) पाहा.

मनगटाच्या जोरावर राज्य कमावून त्याचा कारभार किती उत्तम रीतीनें चालवला होता याचा दाखला इंग्रजी इतिहासांतूनही सांपडतो. पण याचीही विद्वत्ता किती होती ह्मणाल तर बेरीज वजाबाकीचीही भ्रांत! तिसरें उदाहरण पाहिजे असल्यास शिकांचा राजा रणजितसिंग याचेंही आहे. पण हीं असलीं उदाहरणें आमच्या महाविद्वान् 'लोकहितवादी'स काय उपयोगी! "मेंढक्यास मेंढ्या वळतां आल्या ह्मणून तो कांहीं घोडेस्वार होत नाहीं;"—"मूर्खांच्या सभेंत थोडासा कोणी शाहाणा असला ह्मणजे त्याची ख्याती होते." खरें आहे. आह्मी सारे बिचारे मेषराशीवरच जन्मलेलों, तेव्हां आह्मांवर ताबा चालवण्यास जेवढी अक्कल ती कशाला पाहिजे! बरें तर, सिंहराशीवर जन्मलेल्या राष्ट्रांचीं उदाहरणें घेऊं. रावबहादुरांस मुसलमानांचा इतिहास अवगत आहेच, व मुसलमानांची गणना ते मेंढ्यांत करतील असेंही वाटत नाहीं; मग त्यांच्या थोरल्या पैगंबर महाराजांचा वृत्तांत जर मनांत आणला तर तेही प्लेटोच्या किंवा ॲरिस्टॉटलच्या पाठशाळेंत शिकून तरतरीत विद्वान् बनले होते असें दिसत नाहीं.[1] पण महंमदालाही कदाचित् आमचे पाश्चात्यैकपक्षपाती प्रतिपक्षी चांगलासा कबूल करणार नाहींत. त्यांचा असा आक्षेप निघेल कीं, महंमद झाला तरी तो एशियाटिक्; व एशियाटिक् झाला ह्मणजे युरोपाच्या मानानें नामर्दच! बरें तर महंमदालाही एका बाजूला गुंडाळून ठेवूं. रॉबर्ट् क्लैव व वॉरन् हेस्टिंग्स् हे तर युरोपचे अस्सल पठ्ठे कीं नाहीं! मग यांच्याविषयीं तरी काय! या दोघांस हिंदुस्थानची हवा जी पाहावी लागली ती आलीकडच्या 'सी. एस्. आय्.'वाल्या तीनशें रुपये तनखा सुरू झालेल्या खाशा मंडळीसारखी नाहीं. रॉबर्ट् यास निव्वळ ठोंब्या व उडाणटप्पू $ ह्मणून त्याच्या आई-

---

१. "With these powers of eloquence, Mahomed was an illiterate barbarian: his youth had never been instructed in the arts of reading or writing; the common ignorance exempted him from shame or reproach, but he was reduced to a narrow circle of existence, and deprived of those faithful mirrors, which reflect to our mind the minds of sages and heroes." —*Gibbon*.

$ मेकॉले साहेब आपल्या निबंधांत लिहितात:—

"He was sent from school to school, making very little progress in his learning, and gaining for himself everywhere the character of an exceedingly naughty boy. One of his masters, it is said, was sagacious enough to prophesy that the idle lad would make a great figure in the world. But the general opinion was that he was a dunce, if not a reprobate. His family expected nothing good from such slender parts and such a headstrong temper. It is not strange, therefore, that they gladly accepted for him, when he was in his eighteenth year, a writership in the service of the East India Company, and shipped him off to make a fortune or to die of fever at Madras." "सम्पादक"

बापांनीं दूरदेशीं पाठवून दिला, व वॅारनची रवानगी होण्याचें तरी बहुतेक तसेंच § कारण ? आमच्या रावबहादुरांनीं या आर्यभूमीच्या उन्नत्यर्थ आपल्या एका राजविद्याभूषित चिरंजीवांस भगवद्गीता व लोणचेंपापड बरोबर देऊन जसें मोठ्या समारंभानें आग्निनौकेवर आरूढ केलें, व " हा दिवस हिंदुस्थानच्या, व विशेषतः मुंबई इलाख्याच्या, इतिहासांत गणण्यासारखा झाला " ह्मणून आपले चित्ताचे ठायीं अत्यंत धन्यता मानली, अशा प्रकारचा कांहींच सोहळा वरील दोघां पोरांच्या संबंधानें झाला नाहीं. 'खायला काळ आणि धरणीला भार' या ह्मणीप्रमाणेंच केवळ नादान ह्मणून त्यांस पंधरा सोळा वर्षांच्या उमरींत त्यांच्या आप्तजनांनीं आपल्या दृष्टीवेगळे केले. त्यांची विद्या ह्मटली ह्मणजे काय ढ फ थोडेसें येत असेल तें, व पराकाष्ठा कांहीं जमाखर्चाची माहिती !

तेव्हां एकंदरींत पाहतां प्रस्तुत ग्रंथकाराचा जो मुख्य सिद्धांत, कीं राज्याचा बंदोबस्त ठेवतां येण्यास मूळ विद्वत्ता पाहिजे, त्यास कोठेंच थारा राहत नाहीं. तो रावबहादुरांच्या अनेक सिद्धांतांप्रमाणें केवळ स्वकपोलकल्पित व भ्रममूलक दिसतो !

रावबहादुर प्रस्तुत मुत्सद्द्याविषयीं आणखी असें ह्मणतात कीं, " त्याला मराठे दरबारचा बंदोबस्त चांगला करतां येत होता." मग नानानें काय करायाचें होतें तर ? फ्रान्स देशांत जाऊन सोळाव्या लुईच्या राज्यकारभारांत पडायाचें होतें काय ? किंवा तिसऱ्या जॉर्ज राजाच्या इंग्रेजी अकलेच्या मुत्सद्द्यांनीं अमेरिकेंत जी आपली फटफजीती करून घेतली तिचा वांटा घेण्याकरतां विलायतेस जाऊन बसायाचें होते ? 'लोकहितवादीं'-वर जर कोणीं असा टपका आणला कीं तुह्मीं भिकारड्या मराठी भाषेंत मोठी सुरस ग्रंथरचना करतां खरी, पण फ्रेंच् भाषेंत किंवा चिनी भाषेंत कोठें तुह्मीं ग्रंथ लिहिले आहेत ? तर ते वरील आक्षेपकास काय उत्तर देतील बरें ?

" नाना फडणिसाचें शहाणपण वर्णन करण्याजोगें सर्वोत्कृष्ट नव्हतें " असाही रावबहादुरांचा बिचाऱ्या नानावर एक लहानसा फटकारा आहे. हें वचनही आमच्या हृदयांत चांगलेंसें उतरत नाहीं. 'वर्णन करण्याजोगें' व 'सर्वोत्कृष्ट' शहाणपण कोणतें समजायाचें याचा रावबहादुरांनीं मेहेरबानी करून खुलासा केला असता तर बरें झालें असतें.

§ बालपणीं आई वारली व बाप पुनः विवाह करून सपत्नीक वेस्ट् इंडीज बेटांकडे धर्मोपदेशक ह्मणून निघून गेला; तेव्हां गरीब बिचाऱ्या वॅारनला त्याच्या गरीब व झाताऱ्या आज्यानें संभाळलें. चर्चिल् येथील शाळेंत त्याचें प्राथमिक शिक्षण झालें. आठव्या वर्षी त्याचा चुलता हॅावर्ड यानें त्यास लंडन् येथें नेऊन न्यूइंग्टनच्या शाळेंत घातलें. त्याच्या अभ्यासाची चांगली सोय झाली पण खाण्यापिण्याची आबाळ होऊन प्रकृति बिघडली ती कायमचीच ! या शाळेंतील अभ्यास संपतांच त्यास वेस्ट्मिन्स्टर् नामक मोठ्या विद्यालयांत घातलें. त्यानें चांगला अभ्यास करून बक्षीस मिळविलें. दोन वर्षांनंतर पुढील अभ्यासाकरतां एकाद्या पाठशाळेंत जाण्याचा बेत चालू असतांच चुलता वारला व त्याच्या मृत्युपत्राप्रमाणें दौलतीची व्यवस्था पाहणारा चेस्विक् यास वॅारनच्या शिक्षणाचें अगत्य मुळींच न वाटल्यामुळें त्यानें ईस्ट् इंडिया कंपनीच्या हिंदुस्तानांतील कारखान्यांत कारकुनीच्या लहानश्या जागेवर त्याला पाठवून देण्याची व्यवस्था केली. 'सम्पादक'

अक्कल जोखण्याचा एकादा अजब कांटा तर 'लोकहितवादी'नीं विलायतेहून आणला नाहीं ना? एरवीं "आतां इंग्रेज लोकांमध्यें सहस्रशः नानापेक्षां शाहाणे आहेत" हें त्यांस कसें उमगलें बरें? विलायती मुत्सद्द्यांची ते अशी तारीफ करतात कीं, 'त्यांची बुद्धि विशाल, मसलत खोल, अनेक देशींचे वृत्तांत त्यांस माहीत, व त्यांचें आपसांत एकमत असे." इतकी सर्व सामग्री असतांही अमेरिका हातची गेली, हिंदुस्थान जाण्याच्या बेतांत आलें होतें, आफगाणिस्थानांतून दोनदां पाय काढावा लागला, हां हां ह्मणतां तुर्कस्थानास रशियानें गिळलें, एकदम भलीमक्कम दहा कोट रुपयांची चूक लागली, लाखों मनुष्यें अन्नान्न करून मरतातच आहेत, इत्यादि भयंकर अनर्थापात कसे बरे होतात! लॉर्ड् नॉर्थ्, लॉर्ड् डलहौसी, लॉर्ड् ऑक्लंड्, लॉर्ड् लिटन्, लॉर्ड् बीकन्सफील्ड्, सर् जॉन् स्ट्राची, सर् विल्यम् टेंपल, असलीं जबरदस्त धेंडें राज्यकारभार हांकीत असतां गाडी खड्यांत कां जाऊन पडावी?

नाना फडणविसास भूगोल येत नव्हता ह्याही त्यावर एक जबरदस्त चार्ज आहे. 'तो जुन्या चालीचा ब्राह्मण, त्याची माहिती कमी;'—'त्याचे समीप इंग्रेज होते, त्यांचा शोध तरी त्यानें कांहीं करावा, तेंही कांहीं नाहीं;'—'नानाचे वेळचे पत्रांत कोठें इंग्रेजांस बलवर, कोठें कलकत्तेकर असें ह्मटलें आहे, याजवरून त्याचें ज्ञान समजतें;'—'शिकांचें व नेपाळचें वगैरे संस्थान दूरवर होतें, त्याचा त्यास ठिकाण नव्हता;'—'त्याच्या समजुती अशा होत्या कीं पृथ्वी काय ती एवढीच व सर्व जग इतकेंच आहे'—'त्यास आपले राज्याचे बाहेर कोण अम्मल करतो याची खबर बिलकुल नव्हती;'—या सर्व उल्लेखांवरून वरील चार्ज शाबीत करायाचा. आतां येवढें कोणासही कबूल करायाला पाहिजे कीं, हल्लीं जसें एकादें पोरही चारी खंडांचा भूगोल खडाखड ह्मणून दाखवील तशी माहिती बिचाऱ्या नानाला मुळींच नव्हती. त्याची माहिती ह्मणजे पराकाष्ठा साऱ्या हिंदुस्थानची; व इराणी, दुराणी, फराशिस, वलंदाजी, आंग्रेज, फिरंगी,[1] वगैरे बाहेरील राष्ट्रांची त्यास काय थोडीबहुत ऐकून माहिती असेल तेवढीच. पण येवढी माहिती त्या वेळच्या मुत्सद्द्याला बस होती असें आह्मांस वाटतें. राघोबादादासारख्या प्रचंड वीराशीं 'मनसुबीच्या तलवारी'नें लढतांना गिबन्च्या बड्या इतिहासाचा कांहीं उपयोग झाला असता असें आमच्या रावबहादुरांस वाटतें काय? 'इंग्रेजांस खडे चारून 'माघारीं चुरमुरे खात लावलें, त्या वेळेस युरोपखंडांतील भूशिरांचें ज्ञान त्यास कितपत कामास येतें कोण जाणे? खर्ड्यास 'मोगलास गोगलगाय' केला त्या वेळेस रावबहादुरांच्या पैगंबरचरित्राचें पठण कितीसें श्रेयस्कर होण्याचा संभव होता? तेव्हां एकंदरींत वरील चार्जांतही आह्मांस कांहीं अर्थ दिसत नाहीं.

---

१. 'वलंदाजी' हा शब्द हॉलंडर्स् (Hollanders) या शब्दावरून झाला असावासा दिसतो. 'आंग्रेज' हा शब्द 'आंग्लेज' (Anglaise) या फ्रेंच् उच्चारावरून इकडे आला असावा. 'फिरंगी' हा 'फ्रँक्' (Frank) या शब्दाचा अपभ्रंश होय. फिरंग्यांची व मुसलमानांची ओळख युरोपखंडापासून आहे. 'फ्रेंच्' हा शब्द व खड्गविशेषाची 'फिरंग' शब्द हे वरील शब्दावरूनच निघालेले आहेत हें उघड आहे.

पेशवाईचा कारभार वहिवाटण्यास रसायनशास्त्राच्या किंवा भूगर्भशास्त्राच्या ज्ञानाचा जितपत उपयोग झाला असता तितपतच बहुधा युरोपखंडाच्या इतिहासाचा व भूगोलाचाही झाला असता !

वर जें स्वदेशासंबंधाचें अज्ञान रावबहादुरांनी नानाच्या गळ्यांत बेलाशक अडकवून दिलें आहे, त्याबद्दलही त्यांजपाशीं कितपतसा पुरावा असेल हें आह्मांस समजत नाहीं. नानास आपल्या राज्याच्या बाहेरील बिलकुल माहिती नव्हती ह्मणजे काय ? 'आपलें राज्य' ह्मणजे कोणतें ? खुद्द पेशव्यांच्या अंमलाखालीं जो मुलूख होता त्याच्या बाहेर त्यास खबर नव्हती असें जर रावबहादुरांचें ह्मणणें असेल, तर तें निवळ खोटें आहे हें कोणीही सांगूं शकेल. नानास महादजी शिंदा काय करतो आहे, टिप्पूची काय मसलत आहे, निजामाची काय गडबड आहे, हें बिलकुल माहीत नसे काय ? वरील माहितीशिवायच त्यानें पंचवीस वर्षें कारभार हांकला काय ? महादजी, हैदर, टिप्पू, निजाम, इंग्रेज, राघोबादादा, सखारामबापू, परशुरामभाऊ, बाळोबा तात्या, इत्यादि शतशः शत्रूंस नाना जो एकटा पुरून उरला तो 'कोण काय जेवला' असल्या शिळोप्याच्या बातम्या काढूनच काय ? रावबहादुरांचा जन्म कारभाऱ्यांच्या घराण्यांतला आहे, व बडोद्यासारख्या संस्थानांतील कारस्थानांतही ते थोडेबहुत पडलेले असून ज्यास्त पडण्याची त्यांची इच्छा होती, तेव्हां त्यांस काय अनुभव असेल तो असो; पण आह्मांस तर केवळ अनुमानावरून असें वाटतें कीं, जो एकटा बरच्यासारख्या कचाट्यांत पंचवीस वर्षें राहिला व पाटीलबोवांसारख्यांच्याही अकला ज्याच्यापुढें रद्द झाल्या, तो केवळ 'जुन्या चालीचा ब्राह्मण', शाल्योदन झोडणारा भटभाईच केवळ नसेल ! शिकांच्या व नेपाळच्या संस्थानांचा नानास ठिकाण नव्हता असेंही 'लोकहितवादी' निश्चितपणें विधान करतात; पण हेंही आह्मांस अत्यंत असंभवनीय दिसतें. वरील संस्थानांचा मराठ्यांशीं बिलकुल संबंध नव्हता हें खरें; पण त्यांविषयींची साधारण माहिती इकडे कोणाही सामान्य मनुष्यास सुद्धां त्या वेळेस असावी असें हल्लींच्या स्थितीवरून वाटतें. ज्यास इंग्रेजीचा गंध नाहीं अशा जुन्या साधारण बहुश्रुत मनुष्यास नानकशाही पंथ व नेपाळची कस्तुरी यांविषयीं माहिती नाहीं असें हल्लीं सुद्धां आढळणार नाहीं. यशवंतराव होळकर शिकांच्या मुलखांत शेवटीं निघून गेला होता, व नागपुरचा अप्पासाहेब तर तिकडेच जाऊन दडून बसला होता, हें इतिहासज्ञांस विदित आहेच. मग नाना फडनविसासारख्या मुत्सद्द्यास वरील संस्थानांचा ठिकाणही नव्हता हें ह्मणणें कितपत धाष्टर्याचें आहे याचा वाचकांनीच विचार करावा ! इंग्रेजांस 'जलचर'[1] व 'कलकत्तेकर' ह्मटलेलें आढळतें येवढ्या-

१. नानाच्या पत्रांतून इंग्रेजांस जर खरोखरीच 'जलचर' ह्मटलेलें असेल, तर वरील शब्दाचा अर्थ 'समुद्रवासी', 'बेटांत राहणारे' इतकाच समजायाचा हें उघड आहे. 'ताम्रमुख,' 'टोपकर,' 'टोपीवाले' हे शब्द जसे अद्याप इंग्रेजांस निंदेनें लावतात; किंवा टिप्पू सुलतान त्यांस जसें 'चाणगट' ह्मणत असे किंवा नेपोलियन् 'Nation of Shopkeepers' (वेलारेट) ह्मणत असे त्यासारखाच वरील शब्द केवळ निंदाद्योतक होय. त्यावरून नाना फडणविसाच्या भूगोलज्ञानाचा तर्क करणें केवळ असमंजस होय.

वरून 'लोकहितवादीं'चा तर्क धांवतो कीं, हिंदुस्थान ह्मणजेच पृथ्वी अशी नानाची समज होती. आमचे रावबहादुर जर करसनदास मुळजींचा 'इंग्लंडचा प्रवास' वाचतील तर त्यांस एक मोठी गोष्ट आढळून येईल कीं, राघोबादादाकडून दोघे वकील विलायतेस गेले होते, व त्यांनीं तिकडून बर्कच्या हातचें पत्र इकडे आणून हजर केलें होतें.[१] मग हें जर खरें आहे, तर कलकत्ता हीच इंग्रेजांची विलायत, हिंदुस्थान देश हीच काय ती पृथ्वी, या कल्पना नानाच्या डोक्यांत जरी कदाचित् मूळच्या असल्या तरी सहज निघाव्या असें वाटतें. मग रावबहादुरांच्या ह्मणण्याप्रमाणें नाना फडनवीस हा बेटा अगदींच टोणपा असल्यास न कळे ! !

येथवर नाना फडनविसाच्या शहाणपणाची मीमांसा झाली. आतां टीकाविषयक लेखांत वरील मुत्सद्द्याविषयीं 'लोकहितवादीं'नीं त्याच्या संबंधानें आपले इतर अभिप्राय जे नमूद केले आहेत त्यांविषयीं विचार करूं.

'नानास दूरदृष्टी नव्हती'—या सूत्रावर 'लोकहितवादीं'चेंच भाष्य असतें तर बरें झालें असतें. ह्मणजे त्याची चांगली फोड तरी झाली असती. आह्मांस वरील वाक्याचें तात्पर्य येवढेंच दिसतें कीं, नानाच्या पश्चात् लवकरच पेशवाई बुडाली, तेव्हां हा परिणाम नानानें पूर्वी नीट कारभार केला नाहीं याचा होय. असाच जर रावबहादुरांचा अभिप्राय असेल तर तो अगदीं चुकीचा आहे असें ह्मटलें पाहिजे. ज्यानें नानाची कारकीर्द सगळी वाचली असेल, व तिजवर यत्किंचितही विचार केला असेल, त्याच्या सहज लक्षांत येणारें आहे कीं, थोरल्या माधवरावाच्या मागें व नारायणरावाच्या मृत्यूनंतर जी सारी बजबज झाली ती नानानें ह्मणून सांवरली, व सवाई माधवरावानें उडी घेतली त्या वेळेस पेशवाईची भरभराट पुनः पूर्वीप्रमाणें दिसूं लागण्याचाही रंग आला होता.[२] तेव्हां नानाचा कारभार

---

१. वरील पत्र वरील ग्रंथाच्या ३७ व्या पृष्ठांत दाखल केलें आहे. सदरील ग्रंथाचा उपोद्घात वाचला असतां त्यांत इतर मजकूरही बराच मिळणारा आहे कीं ज्यावरून रावबहादुरांच्या प्रस्तुतविषयक पांडित्यास बराच धक्का पोंचेल !

२. "Nana Furnuwees was now at the summit of prosperity; without the intervention of a foreign power he had obtained every object of his ambition. Doulut Rao Sindia was favourably disposed towards him and his ministers and officers were more intent on forwarding their own particular views in the Government of their young master, than in schemes for controlling the Poona court. Tookajee Holkar had become imbecile, both in mind and body, and his officers were subservient to Nana. Rughoojee Bhonslay was completely secured in interests, and the Brahmin jagheerdars were of his party. The Peishwa's government had thus every prospect of regaining the tone and vigour it had possessed under the great Mahdoo Rao; but Nana's fondness of power, and his anxiety to preserve it, brought on a catastrophe which speedily undermined his authority, overturned the labours of his life, and terminated his days in trouble and in misery. —*Grant Duff*.

हा पेशव्यांच्या राज्यास बिलकुल बाधक झाला नसून उलटा तो अत्यंत हितावह मात्र झाला हें उघड आहे. एकाद्यास मोठें बिकट दुखणें लागलें असतां त्यांतून त्यास एकाद्या चतुर वैद्यानें जसें पार पाडावें व पुनः आरोग्य द्यावें, तसाच वरील प्रकार घडला. आतां पुढें जो पेशवाईचा शेवट झाला त्याबद्दल नानास दोष ठेवणें ह्मणजे शिकंदराच्या मागें झालेल्या डोरिंग बाच्छाईबद्दल शिकंदरास मूर्ख ह्मणणें, महादजीच्या मागें, रणजितसिंगाच्या मागें, ऑलिव्हर् क्रॉमवेलच्या मागें, लवकरच जें वाटोळें झालें त्याबद्दल वरील महापुरुषांस अल्पदृष्टि ह्मणणें, यासारखेंच सर्वथा अप्रयोजक होय.

"नाना फडनवीस यास कांहीं आपले देशाचा अभिमान नव्हता व शौर्यही नव्हतें. तो स्वभावानें कुत्सित होता, व हलके मनाचा होता. सर्व देशाचें कल्याण करण्याचें त्याचे मनांत क्षणभर देखील येत नव्हतें. परंतु त्याची आंतून बहुत सरदारांशीं वांकडी मात्र होती. इ० इ०"—वरील आक्षेपांपैकीं नानाच्या अंगीं शौर्य नव्हतें येवढी मात्र गोष्ट बरोबर आहे; बाकी सर्व रावबहादुरांच्या अज्ञानाचा किंवा दुराग्रहाचा मात्र विकास आहे. "नानास आपल्या देशाचा अभिमान नव्हता"—राघोबादादासारख्या प्रबल वीराशीं व आनंदीबाई-सारख्या राक्षशिणीशीं नानानें जें चिरंतन वैर संपादिलें तें कशाकरतां बरें? बाजीरावा-सारख्या अधमाधमाचीही त्यानें शेवटीं सेवा जी पतकरली ती कशासाठीं? याखेरीज नानाच्या स्वदेशप्रीतीचीं आणखी कोणतीं उदाहरणें पाहिजेत? त्यांतून आमच्या रावबहा-दुरांनीं दुसऱ्यास देशाभिमानाच्या संबंधानें नांव ठेवावें या गोष्टीची तर आह्मांस मोठीच मौज वाटते! असो; "तो स्वभावानें कुत्सित होता व हलके मनाचा होता"—'कुत्सित स्वभाव' व 'हलकें मन' या शब्दांचा रावबहादुर काय अर्थ समजत असतील तो असोत; आह्मांस तर प्रस्तुत मुत्सद्याच्या संबंधानें वरील शब्दांचा कांहींच बोध होत नाहीं. नानाची कदर मोठी होती, तो मितभाषी असे व कधीं हंसत नसे, शिवाय त्यानें आपणावर कोणाची मात्रा कधीं चालूं दिली नाहीं, या गुणांस तर 'लोकहितवादी' कुत्सितपणा ह्मणत नसतील ना? तसेंच त्यानें वेलस्ली साहेबांनीं केलेल्या हितोपदेशास मान डोलावली नाहीं हा तर त्याच्या मनाचा हलकेपणा नसेल ना! काय असेल तें असो! 'सर्व देशाचें कल्याण कर-ण्याचें त्याच्या मनांत क्षणभर देखील येत नव्हतें.'—खरेंच,त्यानें भटांची व शास्त्र्यांची दक्षिणा कोठें बुडविली? कॅप्टन् कौप सारख्या लोककल्याणकर्त्या पुरुषाची एकनिष्ठपणें सेवा कधीं केली? आपल्या पुत्रपौत्रांची आपल्या राज्यकर्त्यांकडून पाठ कोठें थोपटून घेतली? कौंसलांत जागा पटकावून होस हो मिळवून देण्याचा स्तुत्य क्रम कधीं पतकरला? 'निबंधसंग्रहा'सारखीं लोकमौर्ख्यनिरसनार्थ पुस्तकें छापून कधीं प्रसिद्ध केलीं? 'त्याची आंतून बहुत सरदारांशीं वांकडी मात्र होती'—वाः!—केवढा जबरदस्त हा नानाचा गुन्हा! सर्वांशीं सरळपणें व मित्रभावानें वागण्याचें सोडून त्यानें मनांत तिढाभाव धरला आं! महादजी शिंद्यासारखा सिधा व प्रेमळ मनुष्य पेशव्यांच्या गादीशीं येवढा इमानानें वागत असतां त्यास नानानें पुण्यास येतांच क्षेमालिंगन देऊं नये काय? अरेरे! त्या वेळेस एकादें ख्रिस्ती मिशन पुण्यास

येऊन उतरलें असतें, अगर एकादा प्रार्थनासमाज किंवा आर्यसमाज तरी स्थापला गेला असता, तर किती बरें झालें असतें ! !

आतां 'लोकहितवादी'च्या निबंधांतील एका कलमाविषयीं मात्र लिहिणें आहे. तें कलम लोकसुधारणा होय. नानानें आपल्या राज्यांत इंग्रजांप्रमाणें 'अधिकाऱ्यांची रचना व पदव्या' हें ठरवलें नाहीं, कायदे कानू केले नाहींत, टपाल ठेवलें नाहीं, काशी इंग्रजांकडून आपल्या ताब्यांत घेतली नाहीं, भिक्षांचा व पेंढाऱ्यांचा बंदोबस्त केला नाहीं, विद्याखातें काढलें नाहीं, कलाकौशल्य वाढवलें नाहीं.' वगैरे गोष्टींवरून आमचे शहाण्यांतले शहाणे व लोककल्याणार्थ देह झिजवणारे रावबहादुर पुढील महासिद्धांताचें निबंधन करतात.—कीं "'नानाचें हातून लोकांचें कोणतेंही कल्याण झालें नाहीं. मग त्यास कोणत्या प्रकारानें लोक शहाणा ह्मणतात हें कांहीं कळत नाहीं." वाः ! एकूण नानाचें सारें शहाणपण व साऱ्या जन्माची दगदग टपालावांचून व पानलूकोडावांचून व्यर्थ गेली ना ! पण कां नये जाऊं ? एका कार्टमार्शलाविना सारें पानपतचें युद्ध जसें फुकट गेलें, तशीच आगगाडीवांचून व तारायंत्रावांचून सारी पेशवाई बेवकूफ कां ठरूं नये ! !'

---

१. विविधज्ञानविस्तार' पु. १० अं. ५, ६, ७ यांत 'लोकहितवादी'च्या 'पाणिपतची लढाई' या पुस्तकावर* अभिप्राय आहे तो वाचकांनीं पाहावा.

* सुजा उद्दवल्याचा कारभारी काशीराज पंडित यानें पाणिपतच्या लढाईची इत्थंभूत हकीकत फारसींत लिहिली असून तिच्या इंग्रजी भाषांतराचें मराठी भाषांतर हरि रघुनाथ गाडगीळ यांचे मदतीनें 'लोकहितवादी'नीं केलें. तत्पूर्वी विविध ज्ञानविस्तारांतहि या फारसी ग्रंथाचें भाषांतर येऊन गेलें होतें. प्रस्तावना तेहतीस पृष्ठांची असून तींत पाणिपतच्या लढाईची विस्तृत कारणमीमांसा केली आहे. शेवटीं सदाशिवरावभाऊंच्या हातून झालेल्या सतरा चुकांचें टिपण दिलें असून पेशवे, शिंदे, होळकर, निजाम वगैरे मंडळींचे वंशवृक्ष व मराठी इतिहासांतील ठळक गोष्टी 'प्राचीन इतिहास' नांवाच्या छोट्या प्रकरणांत दिल्या आहेत.

मुख्य ग्रंथासंबंधीं विस्तारकर्ते ह्मणतात कीं या ग्रंथांत विषयाच्या स्वतंत्रतेचा प्रकार बिलकुल नसल्यानें भाषांतरकर्त्यांकडे मजकुराच्या सत्यासत्यतेची जबाबदारी राहत नाहीं. फक्त भाषापद्धतीवर त्याचें महत्त्व अवलंबून राहतें. प्रस्तुत ग्रंथाची भाषासरणी सुबोध व सरळ आहे. निःपक्षपातता, कथानकाची मनोरम रचना, प्रौढ, सभ्य आणि गंभीर भाषापद्धति, गहनार्थवत्ता, विवेचनशक्ति, भरपूर माहिती, अपूर्व रचनाचातुर्य वगैरे उत्कृष्ट इतिहासकाराचे गुण लोकहितवादींचे अंगीं वसत असल्याची जरी कीर्ति आहे तरी प्रस्तुत ग्रंथांत मात्र ते चांगलेसे उतरले नाहींत.

प्रस्तावनेबाबत विस्तारकार लिहितातः—

'कारणें संक्षेपतः दर्शविलीं असतीं ह्मणजे ठीकच झालें असतें; परंतु तसें न करितां अनेक अवांतर प्रकरणें कार्यकारणसंबंध नसतांहि ठरीव मंडळीची जातां जातां विटंबना करण्याकरितां घुसडून दिलीं आहेत असें मार्मिक वाचकांच्या लक्षांत येईल. शिवाय आपल्या अनेक प्रकारच्या माहितीचें थोडेंही पुढें केलें आहे असेंही कित्येकांस वाटेल. इतिहासादि यथार्थज्ञानाचा शोध न करणारे बेहावलेले ब्राह्मण, बडोद्यांतील खटपटी लोक, सर्व कामांमध्यें प्रस्तुत सरकारची तारीफ, इंग्रजांचें केवळ अकलेच्या जोरावर राज्य कमें करणें, इत्यादि अनेक गोष्टी ग्रंथांत घुसडून दिल्या

(पुढें चालू.)

आतां 'लोकहितवादीं'चा शेवटचा गोड उपसंहार तेवढा ऐका, ह्मणजे पुरे करूं. "नशिबानें राज्य चाललें, नाहीं तर अशा लोकांच्या हातांत राज्य क्षणभर देखील असूं नये; परंतु काळाच्या योगानें इंग्रेज त्या वेळेस इकडे फारसे आले नव्हते. याजमुळें हें राज्य चाललें, नाहीं तर असें लुटारू अडाणी लोकांचें बेकायदा राज्य निभूं नये. परंतु ईश्वरसत्तेनें तें झालें."—आमेन् !

---

आहेत त्यांजवरून ग्रंथकर्त्याच्या ज्ञानाचें जसें प्रकाशन होतें तसेंच मार्मिकतेचें आणि सत्यप्रेमाचेंही होतें यांत संशय नाहीं. ग्रंथकारानें अनेक प्रकारची माहिती कशी तरी लादून दिली आहे असें कोणासही वाटल्यावांचून राहणार नाहीं. गारुड्याच्या पोतडीचा जसा ठावठिकाण लागत नाहीं त्याप्रमाणें या प्रस्तावनेंत काय आहे आणि काय नाहीं हें प्रत्यक्ष वाचून पाहिल्याशिवाय वाचकांस कळणार नाहीं.........'बडोधास भाऊ शिंदे, रावजी केशव सामारे ऊर्फ रावजी मास्तर, गोविंदजी नाईक वगैरेंचे विश्वासघातानें विषप्रयोगादिकांनीं खून केले' असें प्रस्तुत ग्रंथकार ह्मणतात............ वरील व्यक्तींच्या मरणाविषयीं लोकांमध्यें दोन प्रकारचे अभिप्राय पडतात............ज्या गोष्टीं-विषयीं लोकांमध्यें द्विधा भाव आढळून येतो ती गोष्ट तशा रीतीनें दर्शविणें हें इतिहासकाराचें परम-पूज्य कर्तव्य होय............प्रस्तुत ग्रंथकाराची स्वदेशाच्या संबंधानें कोणत्या प्रकारची वृत्ति आहे याचा प्रत्यय आज तीस पस्तीस वर्षांच्या लेखावरून आमच्या वाचकांतील कित्येकांस आलाच असेल.........'अकलेचे जोरानें त्यांनीं (इंग्लिशांनीं) चोहोंकडील दंगे मोडले व बहुतेक मुलूख जबरदस्तीनें न घेता देणगीतच घेत चालले' असें ग्रंथकार ह्मणतात. हा ग्रंथकाराचा अभिप्राय वाद-विषयक आहे.........के, मेल्, मुलेस्हन्, डिकन्सन्, बेकर् प्रभृति ग्रंथकारांचे लेख वाचिले असतां बहुतेक मुलूख जबरदस्तीनें, कपटानें किंवा देणगीनें घेतला या ह्मणण्याचें यथार्थत्व दिसून येईल. हिंदुस्थानचे राजेरजवाडे व संस्थानिक याजपाशीं इंग्रज सरकारनें केलेले तह, करारनामे आणि सनदा यांचें एक पुस्तक एचिसन् साहेबांनीं छापून प्रसिद्ध केलें आहे तें चाळून पाहिलें असतां हिंदुस्थानांतील बहुतेक मुलूख इंग्लिशांस जबरदस्तीनें अथवा देणगीनें मिळाला या गोष्टीचा उलगडा होतो......... तहनाम्याप्रमाणें इंग्लिशांचें वर्तन न झाल्यामुळें त्यांच्या कीर्तीस डाग लागला ही गोष्ट सत्याभिमानी इंग्लिश ग्रंथकार सुद्धां प्रांजळपणें कबूल करितात. इंग्लंडामध्यें जे थोर पुरुष होऊन गेले त्यांस हा प्रकार बिलकुल आवडला नाहीं असे त्यांचे लेख आहेत. असें असतां 'लोकहितवादी' आपला अभिप्राय याच्या उलट देतात यावरून त्यांचा शोधकपणा, सत्याभिमान, देशाभिमान आणि राज-निष्ठा यांतून कोणत्या गुणाची अधिक तारीफ करावी हें आमचें आह्मांस नीट समजत नाहीं.

• भाऊंच्या हातून पकंदर १७ चुक्या झाल्या असें ग्रंथकार लिहितात. या दोषांचें निरूपण करतांना ग्रंथकारानें युद्धकर्मांत आपली कारागारी दर्शविण्याचा यत्न केला आहे. "तसें (ग्रंथकाराच्या ह्मणण्याप्रमाणें) भाऊंनीं केलें असतें तर कचितच जय होऊन वाईट परिणाम टळून जगांत त्यांची कीर्ति झाली असती." असें ग्रंथकार ह्मणतात. कीर्ति होणें अथवा न होणें या गोष्टी कोणाच्या हातच्या नाहींत. त्या ईश्वराधीन आहेत.........परंतु अमुक अमुक युक्ति योजिली असती तर खचित जय झाला असता असें युक्तिचातुर्य सांगणाराची कीर्ति अपरंपार व्हावी हें रास्त आहे. ग्रंथ-कारानें भाऊसाहेबांचे जे दोष दर्शविले आहेत ते वास्तविक होते असें जरी गृहीत केलें तरी ते टाळ-ण्याच्या ज्या युक्त्या सांगितल्या आहेत त्या त्या काळीं कितपत उपयुक्त झाल्या असत्या याचा निवाडा वाचकांनींच करावा............'तोफा अशा बेतानें टाकावयाच्या होत्या कीं, त्यांचे मार-

(पुढें चालू.)

याप्रमाणें नाना फडनविसाचें शहाणपण बाहेर काढतांना आमच्या रावबहादुरांनीं आपलें जें प्रगट केलें आहे त्यावर आह्मीं आपला अभिप्राय वाचकांस सादर केला. आतां हा अंक आटपण्यापूर्वी प्रस्तुत प्रकरणीं आमचे काय विचार आहेत ते वाचकांस कळवतों.

३. राज्य चालवणें ही व्यवहारांतल्या इतर कलांसारखीच एक कला आहे. दर्यावर्दीस जशी जहाजाची व समुद्राची माहिती पाहिजे, किंवा वैद्यास जशी शरीराची व औषधांची माहिती पाहिजे, त्याप्रमाणेंच मुत्सद्द्यांसही आपल्या स्वतःच्या राज्याची व्यवस्था कशी आहे, व ज्यांचा त्याशीं संबंध त्यांची कशी आहे, याविषयींची माहिती असणें जरूर आहे. आतां या नियमाप्रमाणें पाहतां नाना फडनविसासारखे जे आमचे जुने मुत्सद्दी होऊन गेले त्यांस आपल्या कामांतली वाकबगारी कितपत होती याचा जर विचार केला, तर वरील दुहेरी ज्ञान त्यांस कमी होतें असें नाहीं हें कोणाच्याही लक्षांत येईल. आतां आमचे 'लोकहितवादी' किंवा त्यांच्या मतांचे अभिमानी कोणी असल्यास ते आह्मांस विचारतील कीं, नानास इंग्रेजांच्या देशाची काय माहिती होती ? हल्लींच्या विद्वानांस जशी इंग्रेजी भाषा फडाफड बोलतां येते, इंग्रेजांचा रीतरिवाज, इंग्रेजी विद्या, इंग्रजी शास्त्रे, इंग्रेजांचे शोध, या सर्वांविषयीं जशी त्यांस माहिती आहे तशी नाना फडनविसास कोठें होती ? खरें आहे; वरील सर्व माहिती त्यास मुळींच नव्हती ह्मटलें असतांही चालेल. पण आह्मी असा प्रतिप्रश्न करतों कीं, वेलेस्ली साहेब किंवा जनरल् स्मिथ् यांस आमच्या इकडील कितपत माहिती असेल ? वेलेस्ली साहेब मोक्षमुल्लरांप्रमाणें गीर्वाण भाषेंत पारंगत होते काय ? जन-

मारामुळें शत्रूस आपल्यावर चालून येण्यास मोठी हरकत पडतां' अशी युक्ति लोकहितवादी सुचवितात. 'भाऊंशीं दगाबाजी केली होती त्यांजवर स्वदेशाशीं दगाबाजी केल्याचा चार्ज घालून इंग्रज लोकांचे रीतीप्रमाणें कोर्टमार्शल् ह्मणजे लष्करी पंचाईत केली असती आणि तो गुन्हा त्यांजवर शाबीत झाल्यावर त्यांस तोफेचे तोंडीं उडवून देण्याची सजा केली असती तर........लोक अशी दगाबाजी पुन्हां करण्यास धजले नसते'............या सूचनेची फार तारीफ केली असतां साजेल; कारण भाऊसाहेबासारिख्या मनुष्यास जर कोर्टमार्शल् मरविलें नाहीं ह्मणून दोष ठेवणें आहे तर श्रीधर, मुक्तेश्वर, मोरोपंत, वामन, रामजोशी इत्यादिकांनीं आपले ग्रंथ छापून प्रसिद्ध केले नाहींत ह्मणून त्यांस दोष देण्यास हरकत कोणती ? भाऊसाहेबांच्या वेळीं युद्धकलेची या देशांत चढती कळा नसल्यामुळें त्या काळावर जितका दोष येतो तितका भाऊंवर येणार नाहीं. कारण समानकालीन लोकांमध्यें शहाणपणानें, विद्येनें, बहुश्रुतपणानें आणि समजुतीनें कोणी अधिक संपन्न नसल्या तर त्यास त्याजबद्दल दोष देणें हें अगदीं अयोग्य होय. म्हणून भाऊसाहेबांवर विशेष दोष येत नाहीं. त्या काळीं जेवढया गोष्टी करण्याजोग्या होत्या व ज्यांचा प्रचार जारी होता त्या भाऊसाहेबांच्या हातून न झाल्याबद्दल त्यांस दोष देणें रास्त आहे. परंतु कोर्टमार्शल् केलें नाहीं किंवा युरोपांतील राजांशीं दोस्ती पाहून मदतीकरितां सैन्य मागविलें नाहीं किंवा तार करून पुण्याहून आगगाडीचे मार्गानें गारपिरावरील रेजिमेंटें आणविलीं नाहींत किंवा अशीच दुसरी एखादी अपूर्व युक्ति लढविली नाहीं म्हणून त्यांस नांव ठेवणें हें अगदीं गैरशिस्त होय. भाऊचा जय झाला असता तर विश्वासरावाचे मरणाबद्दल त्यास कोणी सुज्ञ मनुष्यानें दूषण दिलें नसतें असें ग्रंथकार ह्मणतात. कोणतीही गोष्ट वाईट किंवा चांगली हें तिच्या परिणामावरून ठरविणें सयुक्तिक नव्हे. न्यायांतही परिणामापेक्षां उद्देशाकडे विशेष रोख असतो. विश्वासरावांच्या मरणास जर भाऊसाहेब कारणीभूत होते तर त्याचा जयाशीं अथवा अपजयाशीं काय संबंध आहे ? विश्वासरावाच्या मरणाबद्दल लोक भाऊसाहेबांस दूषण देतात असें ग्रंथकारानें ध्वनित केलें आहे तें कोणीही सुज्ञ मनुष्य मानणार नाहीं." 'सम्पादक'

रल् स्मिथ् साहेबांपुढें मोरोपंताची आर्या टाकली असती तर ती त्यांस कितपत उलगडली असती? पण इतकें दूर कशाला? हल्लीं जी आमची राजपरंपरा आहे, म्हणजे कलेक्टरपासून तों तहत पार्लमेंटाच्या सभासदांपर्यंत, त्यांपैकीं असे किती लाल सांपडतील, कीं ज्यांस इकडची सर्व माहिती यच्चयावत् पुसून घ्यावी? इकडे वर्षांचीं वर्षें राहिलेल्या विलायती कामगारांस इकडची अगदीं सामान्य माहिती सुद्धां नसते हें कोणास माहीत नाहीं? मग असें जर आहे, तर एतद्देशीय जुन्या मुत्सद्द्यांवरच येवढा भडिमार कां? अप्पासाहेबानें वसई घेतली व फिरंग्याचीं ठाणीं कोंकणांतून उठवलीं तीं पोर्च्युगाल देशाच्या भूगोलाचें ज्ञान संपादन करून काय? हैदरअल्ली इंग्रेजांस ठोकीत ठोकीत खुद्द मद्रासेवर जाऊन आदळत असे तो इंग्रेजी भाषेच्या जोरावर काय? तेव्हां वरील सर्व उदाहरणांवरून ही गोष्ट अगदीं स्पष्ट आहे कीं, ज्याला जेवढी माहिती पाहिजे तेवढी त्याला असली म्हणजे बस आहे. सेनापतीला शत्रूच्या सैन्याची व मुलखाची माहिती असली म्हणजे बस आहे. मुत्सद्द्याला तशीच शत्रूच्या राज्यव्यवस्थेची माहिती असली म्हणजे बस आहे. ही माहिती नानाला होती कीं नाहीं याविषयीं मराठ्यांच्या इतिहासकाराचेंच खुद्द वर दाखल केलेलें सर्टिफिकिट आहे.[1]

---

१. वर जी आम्हीं बिचाऱ्या नानाच्या संबंधानें तरफदारी केली आहे ती बहुधा बस होईल. पण ती न होऊन जर भूगोलज्ञानावांचून व इतिहासज्ञानाशिवाय नानाची मुत्सद्दगिरी सारी पाण्यांतच जात असली, तर त्यास आमच्या रावबहादुरांनीं मागील काळाचा तरी थोडाबहुत फायदा देण्याविषयीं आम्हीं शिफारस करतों. अशाच एका प्रकरणीं मेकॉले साहेबांचा अभिप्राय काय आहे तो पाहा:—

"This gentleman can never want matter for pride, if he finds it so easily. He may boast of an indisputable superiority to all the greatest men of all past ages. He can read and write: Homer probably did not know a letter. He has been taught that the earth goes round the sun: Archimedes held that the sun went round the earth. He is aware that there is a place called New Holland: Columbus and Gama went to their graves in ignorance of the fact. He had heard of the Georgium Sidus: Newton was ignorant of the existence of such a planet. He is acquainted with the use of gunpowder: Hannibal and Cæsar won their victories with sword and spear. We submit, however, that this is not the way in which men are to be estimated. We submit that a wooden spoon of our day would not be justified in calling Gallileo and Napier blockheads, because they never heard of the differential calculus. We submit that Caxton's press in Westminister Abbey, rude as it is, ought to be looked at with just as much respect as the best constructed machinery that ever, in our time, impressed the clearest type on finest paper. Sydenham's

(पुढें चालू.)

सरतेशेवटीं हीही एक गोष्ट आमच्या वाचकांनीं लक्षांत ठेवण्यासारखी आहे कीं, नाना फडनविसासारख्या मुत्सद्याविषयीं जर निखालसपणें अभिप्राय प्रगट करायाचा, तर तो ज्यानीं राज्याचें सुकाणूं कधीं स्वप्नींही हातीं धरलें नाहीं त्यांनीं देणें शोभतें कीं जे राज्यकारस्थानांत व राज्यकारभारांत जातीनें पडलेले त्यांनीं देणें शोभतें? ज्या आमच्या रावबहादुरांच्या व्यवस्थेखालीं 'ग्रंथोत्तेजक मंडळी'च्या सारखें लहानसान काम निभेना त्यांनीं साऱ्या देशाच्या उलाढाली करून हा मूर्ख होता, याला अक्कल नव्हती, ही मीमांसा करणें व त्यांच्या संबंधानें भराभर शिक्कमोर्तबानिशीं सर्टीफिकिटें प्रसिद्ध करणें हें किती विलक्षण आहे! ज्यांस पुनर्विवाहासारख्या जबरदस्त कामांत पडण्याची व लोकांत प्रसिद्धि करून घेण्याची मात्र हौस, पण अंमल कचाट्यांत सांपडले कीं ज्यांस घटकाभरही धीर निघायाचा नाहीं, त्यांनीं 'पानपतच्या मोहऱ्या'स तो 'जवानमर्द शिपाई होता असें नाहीं' याप्रमाणें सर्टिफिकिट देणें हा केवढा चमत्कार आहे! ज्यांनीं पुरती बंदूकही कधीं हातांत धरली नसेल त्यांनीं मोठ्या कमांडर्-इन्-चीफ्च्या थाटानें पानपतच्या लढाईवर टीका करावी हें हास्यास्पद नाहीं काय? पण हास्यास्पद कसलें? आंग्लभौमभाषामाउलीचा वरप्रसादच हा, कीं तींत प्रविष्टमात्र होतांच सर्व जग तुच्छ दिसायाला लागायाचें, व 'सर्वज्ञोऽस्मि' ही स्फूर्ति व्हावयाला लागायाची!!

---

first discovery was that the cool regimen succeeded best in cases of small-pox. By this discovery he saved the lives of hundreds of thousands; and we venerate his momory for it, though he never heard of inoculation. Lady Mary Montague brought inoculation into use; and we respect her for it, though she never heard of vaccination. Jenner introduced vaccination; we admire him for it, and we shall continue to admire him for it, although some still safer and more agreeable preservative should be discovered. It is thus that we ought to judge of the events and the men of other times. They were behind us. It could not be otherwise. But the question with respect to them is, not where they were, but which way they were going. Were their faces set in the right or in the wrong direction? Were they in the front or in the rear of their generation? Did they exert themselves to help onward the great movement of the human race, or to stop it? This is not charity, but simple justice and common sense. It is the fundamental law of the world in which we live that truth shall grow, first the blade, then the ear, after that the full corn in the ear. A person who complains of the men of 1681 for not having been men of 1835 might just as well complain of a projectile for describing a parabola, or of quicksilver for being heavier than water."

—*Sir James Mackintosh.*

वेदव्यासः स भवद्दश यो वेद वेदाक्षराणि
श्लोकं स्वकं परिपठति यः स स्वयं जीव एव ।[1] 'विश्वगुणादर्श',('सं'०) व्यङ्कटाध्वरी

अंक ६९—(१) 'लोकहितवादीं'चा जुन्या पंडितांविषयीं अभिप्राय. (२) तो वाचून सकृद्दर्शनी मनांत येणारे विचार. (३) शास्त्रविद्येवर 'लोकहितवादीं'चा आक्षेप-त्याचें निरसन.

१. मागील अंकांत रावबहादुरांचीं आमच्या जुन्या मुत्सद्द्यांच्या संबंधानें काय मतें आहेत तीं दाखल करून त्यांवर चर्चा केली. आतां एतद्देशीय जुन्या पंडितांविषयीं व प्राचीन विद्येविषयीं त्यांचे काय अभिप्राय आहेत ते पाहूं.

वरील अभिप्राय 'लोकहितवादीं'नीं आपल्या ग्रंथांतून जागोजाग प्रगट केले आहेत. व भाषणद्वारांही शेंकडों वेळां लोकांच्या कानांवर घातले आहेत. त्यांचा समुच्चय पुढील लेखांत* बराच दृष्टीस पडतो; यास्तव त्याचें येथें समग्र अवतरण करतों:—

" सांप्रतचे पंडितांचें ज्ञान "

"सांप्रत काळचे पंडितांचें ज्ञान असें असतें कीं त्याचा जिवास, शरिरास, प्रपंचास कांहींच उपयोग पडत नाहीं. केवळ वादविवाद करण्यास व लोकांस तमाषा दाखविण्यास मात्र उपयोगी आहे. यास्तव मला हे पंडित बहुरूपी, सोंगाडी, व चित्रकथी यांहून बरे दिसत नाहींत. बारापंधरा वर्षेपर्यंत व्याकरण किंवा न्याय यांचें अध्ययन करितात, म्हणजे त्यांस पंडितपणा प्राप्त होतो. परंतु त्यांची विद्या अशी असते कीं, एकानें म्हणावें, या शब्दाचे अंतीं "च" असावा; दुसऱ्यानें म्हणावें "चा" असावा. याजविषयीं वाद शेंकडों प्रमाणें दाखऊन सर्व दिवसभर करतात. शेवटीं निश्चय एकाचाही होत नाहीं. तसेंच नय्याईक[2] हेही भांडतात. एक म्हणतो ईश्वर आणि जीव एक आहे; दुसरा म्हणतो, दोन्ही विभक्त आहेत. तिसरा म्हणतो ईश्वर गुणी आहे. चवथा म्हणतो निराकार आहे. याप्रमाणें रिकामा वाद चालविण्यांत जन्म घालवितात. आणि त्यांस त्या वादांतील सत्य काय आहे हें समजण्याची इच्छा नसते. परंतु परस्परांपेक्षां श्रेष्ठ कोण होतो हें पाहण्याकरितां भांडतात. आणि मग त्या वादांत सत्यानेंच भाषण करतात असें नाहीं, मनास येईल तशी कल्पना, कपट, युक्ती, मूर्खपणा, इत्यादि योजून सरासरी फार बोललेंसें करतात. त्यांस कोणी म्हणतात असे निर्फळ वाद चालण्याच्या ज्या ज्या विद्या हे शास्त्री शिकतात त्यापासून इहलोकीं व परलोकीं हित नाहीं. आपले जिवाचेंही कल्याण नाहीं. व दुसऱ्याचे जिवाचेंही नाहीं. एक व्याकरण म्हणावयास बाराचवदा वर्षे लागतात त्याचें कारण हेंच आहे कीं, त्या प्रकरणीं वाद करण्यास शिकतात; ग्रंथ पाठ करतात; व प्रतिष्ठेकरितां वाद करितात. हे सर्व शास्त्री, पंडित

---

१. "ज्याला वेदाचीं नक दहा अक्षरें येतात तो वेदव्यास होय, व ज्याला एक श्लोक सबंध पाठ येतो तो प्रत्यक्ष बृहस्पति होय!"

* शतपत्रांपैकीं नं. ८६ चें पत्र. 'सम्पादक'

२. वरील शब्द मूळच्याप्रमाणेंच ठेवला आहे. कदाचित् तो लेखकप्रमादही असेल; तरी रावबहादुरांच्या संस्कृत ज्ञानावरून पाहतां वरील उपपत्तिच केवळ करावयाला पाहिजे असें नाहीं, असें आम्हांस वाटतें.

-च्या प्रकारचे आहेत. त्यांस व्यवहारीक ज्ञान नाहीं. त्यांस मोडीचें लिहितां देखील येत नाहीं, व कोणतेंही काम करावयाचे हे उपयोगी नाहींत. बरें इतकें असून यांची वर्तणूक पाहिली तर फारच वाईट. सामान्यत: हे गोंधळी, भाट यांप्रमाणें व्याजस्तुति करून गृहस्थास भुलऊन पैका काढणार लोक आहेत. प्रात:काळीं उठले ह्मणजे यांचा प्रथम उद्योग हाच आहे कीं, गृहस्थांचे घरीं जाऊन त्यांची स्तुति करावी; त्यामध्यें त्यांचें जसें वर्णन पाहिजे तसें करून दोन पैसे मिघाले ह्मणजे त्यांचें कार्य झालें. पैशाकरितां महापातकी असला तरी त्यास शुद्ध ह्मणतील, महान नीच असला तरी त्यास सन्मान देतील. पापानें द्रव्य मिळविलें तरी त्यांस दिलें ह्मणजे तो सद्व्यय झाला अशी समजूत करून आणखी तसेंच मिळीव ह्मणून सांगतील. याचे उदाहरणास फार लांब जावयास नको. बाजीराव पेशव्यानें पुण्यांत ब्राह्मणांचे मनोरथाप्रमाणें दानें केलीं, व बहुत शास्त्री, पंडित जवळ बाळगिले. परंतु त्यांणीं त्यास सत्कर्मास किंवा आपले राज्यरक्षणास किंवा नीतीनें चालण्यास समजूत दिली नाहीं. जें त्याणें केलें त्याजविषयीं त्याची स्तुतीच करीत गेले, व महाराज सर्वत्र विजयी होतील असे आशीर्वाद देत गेले. आपण ब्राह्मण प्रभु, आपलें तेज सर्वांहून अधिक, आपलेकडून एक शिपाई गेला तर सर्वांचा पराजय होईल याप्रमाणें बोलून त्याजकडून राज्यकारभार सोडून देववून त्यास पंडिताचे आर्जव करणारा असा मूर्ख केला व शेवटीं आपण आणि तो असे दोघेही भीक मागत गेले. यास्तव हे पंडीत जरी पुष्कळ पढलेले असले तरी ते मूर्ख समजावे. कारण कीं, लोकहितकारक ज्ञान त्यांस नाहीं. त्यांचें ज्ञान भाटांचे व तमासगिरांचे बोलण्याप्रमाणें आहे. त्यापासून मोक्ष व्हावयाचा नाहीं व इहलोकीं सुखोत्पत्तीही व्हावयाची नाहीं. सारांश हल्लींचे पंडीत हे महामूर्ख असें मी ह्मणतों. हें नाना प्रकारचे अर्थ फिरवितात. नाना प्रकारचे असत्य सिद्धांत करितात. आणि क्षणांत मुक्तीचा मार्ग, क्षणांत नर्कांत जाण्याचा मार्ग दाखवितात. त्यांस मुख्य ज्या गोष्टी त्यांचें ज्ञान नसतें. मनुष्य जन्मला कशाकरितां ? त्याचें सार्थक काय ? व आपलें कर्तव्य काय ? याचा विचार त्यांचे मनांत क्षणभरही वसत नाहीं. द्रव्याचा व मानाचा लोभ धरून हे असतात. यांचा आश्रय जो कोणी करील त्यास वेड लागेल यांत संशय नाहीं. व त्यांची बुद्धि स्थीर नाहीं. अमूक सत्य अमूक असत्य हेंही त्यांस भासत नाहीं. सत्याचा व असत्याचा भाव यांस समजत नाहीं. धर्माचा व अधर्माचा भेद यांस ठाऊक नाहीं. जो पाहिजे तो शास्त्रार्थ काढून देतील, जें पाहिजे तें प्रायश्चित्त देतील. फक्त पैसा मिळाला ह्मणजे झालें. अशा पंडितांचा संग्रह करून कोणास काय फायदा होणार आहे ? राजास होणार नाहीं व प्रजेसही होणार नाहीं; व ज्या प्रजेचे पुढारी असले लोक विनाकारण आपल्यास विद्वान ह्मणवितात त्या प्रजेचा सर्वस्वी नाशच होईल. याप्रमाणें हिंदु लोकांची अवस्था झाली आहे या लोकांस शास्त्रीपंडितांखेरीज जेव्हां दुसरे कोणी पुढारी मिळतील तेव्हां लोकांमध्यें व्यवस्था चांगली होईल. व शास्त्रीपंडित पुष्कळ असावे अशी जे इच्छा धरितात ते महामूर्ख समजावे. या लोकांपासून या देशाचें किमपी हित होणार नाहीं. अधिक मूर्खपणा मात्र वाढेल व भ्रांती वृद्धिंगत होईल; आणि ती ज्याचे मनांत शिरेल त्याचा प्राण गेल्यावांचून निघणार नाहीं. यास्तव हे शास्त्री,पंडित अगदीं निरुप-

योगी आहेत हा सिद्धांत होतो; ही विद्या कांहीं उपयोगी नाहीं. जर असें नसेल तर मला कोणी उत्तर द्यावें कीं, व्याकरणाचें पंधरा वर्षें अध्ययन केलें, त्यापासून अमुक उपयोग होतो असें मला दाखऊन द्यावें ह्मणजे मी वास्तविक ह्मणेन; परंतु मीं शोध केला आहे त्याजवरून मला तर वाटतें कीं मनुष्यास लाकडें तोडावयाचें कसब शिकविलें तर बरें, परंतु हें व्याकरण नको. यांत कांहींच अर्थ नाहीं. केवळ मूर्ख होण्याची विद्या आहे. आणि इतकेंही असून ज्याचा त्यास गर्व असतो कीं, मी केवढा विद्वान, माझ्यासारख्या विद्वान त्रैलोक्यांत नाहीं. पाहिला तर तो सर्वांहून मूर्ख असतो. याप्रमाणेंच न्याय, मीमांसा, अलंकार या शास्त्रांची व्यवस्था आहे. केवळ असत्य सिद्धांतांचें प्रतिपादन करून विलक्षण कुतर्क करून भलतेंच अविचार लोकांत स्थापन करितात; आणि वास्तविक पाहिलें तर ब्राह्मणांमध्यें चार रोजगार आहेत. सराफ, भट, पंडीत, हरदास. या सर्वांपेक्षां पंडीत हे महामूर्ख होत. सराफ, भट, हरदास हे बरे, हे यत्किंचित पढलेले असतात. याजमुळें हे दुराग्रही नसतांत व यांस अभिमान नसतो; सांगितली गोष्ट ऐकतात, व यांचें लक्ष व्यवहारिक मार्गावर फार असतें. याजकरितां कांहीं सुधारण्याचा रस्ता यांत आहे; परंतु हे विनिज (!) आहेत ह्मणून पंडीत यांची समजूत फार दृढ होती कीं, आमचें मत खरें आहे; व इतर सर्व मूर्ख आहेत. याजकरितां यांचा दुराग्रह फार होतो तो हे सोडीत नाहींत, अतिशय आग्रह धरितात. याजमुळें हे लोक अगदींच उपयोगी नाहींत. हिंदु लोक यांचें महान दुर्भाग्य ह्मणून हे पंडीत व शास्त्री या लोकांचे पुढारी झाले, व यांस लोक समजतात कीं, हे धर्मरक्षक आहेत, परंतु हे अधर्मवृद्धी करणारे होत; व हे सोनार, परभु, ब्राह्मण वगैरे यांचा यत्किंचित निमित्तानें वाद लावून दोहोंकडून पैसा खाणार व खोटीं मतें आणि नानाप्रकारची खोटीं कर्में प्रसिद्ध करून भोळ्या लोकांस ठकविणार, यास्तव त्यांस आवडतही नाहीं कीं आपलीं शास्त्रें बहुत लोकांस ठाऊक व्हावीं. कारण तेणेंकरून आपली उघडीक होते, व दगाबाजी व लबाड्या बाहेर पडतात हें त्यांस फार भय आहे. जोंपर्यंत आच्छादित आहे तोंपर्यंत यांच्या प्रतिष्ठेचें आयुष्य आहे; मग किरकोळ लोक यांस पुसतील कीं, तुह्मी आह्मांस सांगतां परंतु ही सर्व लबाडी आहे. तुह्मी लबाडीवरच पोट भरतां तस्मात् आह्मी तुमचा त्याग करितों. अशी अवस्था होईल यांत संशय नाहीं. हा मूर्खपणा बहुत काळपर्यंत निभला, कारण कीं गौप्य होतें. आजपर्यंत महाप्रयत्नानें झांकून झांकून चालविलें परंतु आतां चालणार नाहीं. अडाणी लोकांकडे एखादी पंचाईत न्या, तर ते लागलाच न्याय सांगतील. बरें तीच पंचाईत चार पंडितांकडे न्या, ह्मणजे ते अतोनात वाद करतील, आणि नाना प्रकारच्या मसलती काढून असत्य प्रतिपादन करतील, अशी त्यांची अवस्था आहे. त्यांचीं मनें बिघडून जातात आणि भ्रांति उत्पन्न होऊन त्यांस विवेचन करतां येत नाहीं खोट्यास स्थापन करण्याकरितां प्रमाणें दाखवितील, आणि त्याचा पक्ष धरून भांडत बसतील. याचा अनुभव कोणींही विचार करून त्यांची वर्तणूक पाहिली तर दृष्टांत येईल. जेथें बहुत पंडित तेथें मूर्खपणा वाढून भ्रष्टाकार होतो; अधर्मप्रवृत्ती होते, व इतर लोकांवर दया करणें हें त्यांजपासून घडत नाहीं. त्यांची समजूत अशी आहे कीं, सर्वांनीं

दुःख भोगिलें तर चिंता नाहीं, परंतु आह्मीं मात्र सुखी असावें. तदनुसार उदाहरण पाहा. शास्त्री यांचे मतानें ज्या ज्या गृहस्थांनीं अन्नछत्रें घातलीं तेथें शूद्र गेला तर त्यास अन्न मिळत नाहीं. आणि ब्राह्मण श्रीमंत झाला तरी जेवावयास बोलावितात असा चमत्कार आहे. अस्तु, सर्व लोकांस ज्ञानप्राप्ति होईल तेव्हां हे सर्व पंडितांचे गुण बाहेर पडतील."

लो० हि०

२. वरील लेखावर चर्चा करण्यापूर्वी तो वाचून सामान्यतः कोणाच्याही मनांत एक मोठा विचार येण्यासारखा आहे, तो येथें दाखल केला पाहिजे. हा विचार हाच कीं, आमच्या रावबहादुरांनीं वरील निबंधांत जुन्या पंडितांस 'महामूर्ख' हा जो ठळठळीत किताब दिला, व न्याय, व्याकरण, मीमांसा, अलंकार या सर्व शास्त्रांचें परम रहस्य काढून तें आपल्या प्रिय वाचकांस समर्पण केलें, तें करण्यापूर्वी त्यांनीं येवढी जबर शास्त्रव्युत्पत्ति कोणत्या पाठशाळेंत पैदा केली बरें? वरील गोष्टीचा बोभाटा अद्याप तर आमच्या कानांवर आला नाहीं; मग प्रत्यक्ष वाग्देवीनें त्यांस समग्र वाङ्मयाचा ठेवा आयताच गुपचुप आणून दिला, किंवा त्यांचे महागुरु दयानंदजी यांनीं त्यांजवर एकाएकीं कांहीं वरप्रसाद केला, कीं काय नकळे! आमच्या अल्पबुद्धीस तर असें वाटतें कीं, एकाद्या विषयावर जर ठाम अभिप्राय ठोकून द्यावयाचा, तर त्याची कांहीं तरी माहिती करून घेणें अवश्य आहे; केवळ रावबहादुरीवर जाऊन किंवा भाविक श्रोते मान डोलवितात येवढ्यावरच जाऊन झोटिंग-पाच्छाई करणें हें फार अश्लाघ्य कृत्य होय. जो सत्याची यत्किंचित् तरी पर्वा करतो, व कागदाला टांक लावणें ह्मणजे केवढें जबाबदारीचें काम आहे हें ज्याचे ठायीं तिळमात्रही वागतें आणि सत्यज्ञानाचाच प्रसार लोकहितावह होय, याविषयीं ज्याची पक्की खात्री आहे, तो आमच्या रावबहादुरांप्रमाणें आपल्या लेखणीचें व जिव्हाग्राचें चापल्य कधींही प्रगट करणार नाहीं. एकादी गोष्ट कागदावर नमूद करण्यापूर्वी व ती छापून काढण्यापूर्वी तिजविषयीं अनेक वेळां शोध केल्याखेरीज तो कधीं राहायाचा नाहीं. आतां येवढें खरें आहे कीं, ज्या काळीं वरच्यासारखे शतशः अभिप्राय रावबहादुरांनीं बेलाशक झोकून दिले त्या काळाचा महिमाच असा होता कीं, लेखणीला त्या वेळेस कोठें आडकाठीच नव्हती. ज्याला ज्या विषयांत ओ का ठो सुद्धां कळूं नये त्यावर त्यानें खुशाल व्याख्यान द्यावें व ग्रंथरचना करावी. वुइल्सन् साहेबांनीं एका लेखणीच्या टांकांत हिंदु, मुसलमानी व पारशी या तिन्ही धर्मांचा फडशा पाडून निःक्षत्री पृथ्वी करावी, जोतीबांनीं धोंडीबाबरोबर मनूविषयीं व भागवताविषयीं वादविवाद करावा,[१] एका कासारज्ञातीय महापंडितानें संपूर्ण शास्त्र्यांचा पराभव करून 'पवित्र शास्त्रा'चें माहात्म्य स्थापित करावें,[२] मोरोबांनीं आपलें अगाध ज्ञान एका कादंबरींत ओतून गव्हर्नर् साहेबांच्या चरणीं चषकसमर्पण करावें, 'एका साहेबा'नें महाराष्ट्रभाषेंत विलायती कवितेचा अपूर्व मासला उतरून देऊन दुसऱ्या महारसिक साहेबानें तो चुटका क्रमिक पुस्तकांत सामील करावा,—अशी कांहीं त्या वेळेस चमत्कारिक पर्वणी

---

१. अंक ४४, पृष्ठ ४५२ पाहा.

२. अंक ३६, पृष्ठ ३५९, टीप १ पाहा.

घेऊन गेली ! पण तो पर्वकाळ आतां संपला व राहुसाहेबांचा अंमल बहुतेक आटपून चंद्राचा चंद्रिकेशीं पुनः पूर्ववत् पूर्ण योग होण्याचा समय आला आहे. मेकॉले साहेबांनीं संस्कृताचें किंवा फारसीचें एक अक्षरही माहीत नसतां चाळीस वर्षांपूर्वी प्राच्य व पाश्चात्य विद्यांची जशी बेलाशक तुलना करून दोहोंतलें तारतम्य काढलें;[1] किंवा मिलनें आमच्या रावबहादुरांच्या सारखाच निरर्गल प्रलाप करून जुनी हिंदुविद्या कवडीच्या मोलाची ठरवून हिंदुस्थानटी लोकांत काढलें, तसली बडबड या काळीं जर कोणी करूं म्हणेल तर त्यास कोणी बाहेर तोंडही काढूं देणार नाहीं. शाळेंतलीं पोरें सुद्धां वरच्यासारख्या प्रचंड पंडितास सांगतील कीं "साहेब महाराज, आपली एरवीं केवढीही विद्वत्ता असली तरी या विषयावर लेखणी चालवण्यास आपणांस बिलकुल अखत्यार नाहीं. आपणांस इकडील लोकांवर, इकडील विद्यांवर, इकडील कलांवर वगैरे यथेच्छ पांडित्य करून आपली शेखी मिरवण्याची हौस असेल खरी, पण जोंपर्यंत आपण इकडील भाषांचें ज्ञान करून घेण्याची खटपट केली नाहीं, इकडील ग्रंथांवर परिश्रम केले नाहींत, इकडील लोकव्यवहार पाहिला नाहीं, तोंपर्यंत आपण आपलें पेन दौतींतच बुडवून ठेवावें हें बरें. त्यांतच आपला बोज आहे." नाहीं तर "युरोपांतील पुस्तकांची एक फळी एकीकडे आणि हिंदुस्थानांतील व अरबस्थानांतील सगळी विद्या एकीकडे;" "हिंदुस्थानांतील लेणीं कदाचित् भुईंतून वर निघालीं असतील, किंवा ढगांतून खालीं कोसळलीं असतील;" असले जाडे जाडे सिद्धांत बाहेर पडायाचे[2] !

---

१. "I have no knowledge of either Sanskrit or Arabic. But I have done what I could to form a correct estimate of their value. I have read translations of the most celebrated Arabic and Sanskrit works. I have conversed both here and at home with men distinguished by their proficiency in the eastern tongue. I am quite ready to take the oriental learning at the valuation of the Orientalists themselves. I have never found one among them who could deny that a single shelf of a good European library was worth the whole native literature of India and Arabia. The intrinsic superirority of the Western literature is indeed fully admitted by those members of the Committee who support the oriental plan of education. It will hardly be disputed, I suppose, that the department of literature in which the Eastern writers stand highest is poetry. And I certainly never met with any Orientalist who ventured to maintain that the Arabic and Sankrit poetry could be compared to that of the great European nations." —*Minute on Education.*

२. "This labourious description of the architecture of the Hindus affords some curious specimens of the inveteracy of the author's prejudices. In his zeal to undervalue the cavern-temples of the Hindus he even

(पुढें चालू.)

तेव्हां एकंदरींत पाहतां ही गोष्ट उघड आहे कीं, प्रस्तुत ग्रंथकार हे आपणास कितीही विद्वान् समजत असले, किंवा केवढ्याही मोठ्या सरकारी अधिकारावर चढले असले, तरी एतद्देशीय प्राचीन विद्येविषयीं त्यांनीं कोणत्याही तऱ्हेचा अभिप्राय देणें हें केवळ धाष्टर्य होय. येथील गटारयंत्रावरील एकाद्या भटजींनीं भांग्या मारुतीचें वरप्रदान घेऊन इंग्रजी विद्येविषयीं व्याख्यानें देण्याचा सपाटा चालवून रसायनशास्त्र, भूगर्भशास्त्र, दर्शनानुशासन यांवर जर गर्दी उडवली, तर तें जितपत हास्यास्पद होईल तितपतच रावबहादुरांचें प्रस्तुत प्रकरणीं वरील पांडित्य होय.

आतां आमचे प्रतिपक्षी, किंवा त्यांच्या तर्फेची कोणी मंडळी असल्यास ती, कदाचित् असा कोटिक्रम रचतील कीं, येथील जुन्या विद्येविषयीं स्वतः जरी कोणास माहिती नसली तरी ऐकीव गोष्टींवरून किंवा साधारण अनुमानानें तिजविषयीं अभिप्राय दिल्यास काय हरकत आहे ? सर्वच गोष्टी आपण जातीनें माहीत करून मग त्यांवर मत द्यावें असा नियम केला असतां कसें चालेल ? कोणाचेंही ज्ञान झालें तरी त्याचा कांहीं अंश साक्षात् प्राप्त झालेला व कांहीं परंपरेनें मिळालेला असें असायचेंच. खरें आहे, पण हा प्रकार तरी 'लोकहितवादीं'च्या ग्रंथांतून आढळतो काय ? आह्मांस कबूल आहे, कीं त्यांनीं स्वतः जरी 'रामः रामौ' किंवा 'घटः घटः' न केलें तरी कांहीं चिंता नाहीं; पण हें तरी अवश्य आहे कीं नाहीं, कीं ज्यांस वरील विद्या अवगत आहे त्यांच्यापासून त्यांनीं प्रस्तुत प्रकरणीं कांहीं तरी माहिती करून घ्यावी ? अथवा 'महामूर्ख' शास्त्र्यांकडून ज्ञानप्राप्ति करून घेण्यांत मानहानि वाटत होती, तर निदान इंग्रजी ग्रंथकार तर कोठें गेले नव्हते ? सर् वुइल्यम् जोन्स्, कोलब्रुक्, वुइल्सन्, मोक्षमुल्लर वगैरे मंडळी तर आमच्या रावबहादुरांस पसंत होण्यासारखी होती कां नाहीं ? आमची पक्की खात्री आहे कीं, वरील पाश्चात्य पंडितांच्या ग्रंथांपैकीं एकादें पान जरी त्यांनीं कधीं वाचलें असतें, तरी तेवढ्यावरूनही आपले संस्कृत विद्येविषयींचे अभिप्राय किती अज्ञानाचे व किती दांडगाईचे आहेत हें त्यांस कळून आलें असतें. पण ही 'घटपटादि खटपट' करण्याची आमच्या 'लोकहितवादीं'स काय जरूर ? आपलें ज्ञानाचें कोठार अमक्या अमक्या ठिकाणीं रितें आहे असें जेव्हां त्यांस भासेल, तेव्हां तो रिता ठाव भरून काढण्याची पंचाईत कीं नाहीं ! स्वतः ज्या त्या विषयाची खडानूखडा माहिती बिनचूक असल्यावर मग दुसऱ्याच्या तोंडाकडे बघायाची काय जरूर ? डॉन् क्विझोटची स्वारी पुरती मालेराईची दीक्षा ही न घेतां जगांतील अन्यायांस दंड करण्यास आपल्या श्यामकर्ण

insinuates that they are not artificial. "It is difficult to say, how much of the wonderful in these excavations, may be the work of nature." He seemed inclined, with Bryant, to think that it was not impossible that the pyramids had dropped from the clouds, or sprung out of the soil."(1)

—*Mill's British India (Wilson's Note)*.

१. 'नारद्' होण्याच्यापूर्वी मोठा विधि असे. तो करण्यास वरील स्पॅनिश् सरदार विसरला

(पुढें चालू.)

बारूवर आरूढ होऊन बाहेर पडली, त्याप्रमाणेंच इंग्रेजी विद्येचा संस्कार झाला न झाला तों लोककल्याणास ज्यांनीं वाहून घेतलें, व लोकांस शहाणे करण्याकरितां हातांत लेखणी धरली, ते कसली बिचाऱ्या कोलब्रुकची किंवा मोक्षमुल्लराची गरज बाळगताहेत!

असो; आतां प्राचीन पांडित्यावर वर जें अर्वाच्य पांडित्य प्रगट झालें आहे त्यांत वस्तुतः कितपत तथ्य आहे तें पाहूं.

१. वादविषयक लेखाचा दोन प्रकारांनीं विचार करण्यासारखा आहे. एक, प्राचीन पांडित्यावरील आक्षेप; व दुसरें, तें पांडित्य संपादन केलेल्या मंडळींवर ह्मणजे पंडितांवर आक्षेप. आतां प्रथमतः पहिल्या मुद्दयाविषयीं विचार करूं.

एतद्देशीय शास्त्रविद्येवर 'लोकहितवादी'चा मोठा आक्षेप हा आहे कीं, तिचा 'जिवास, शरिरास, प्रपंचास कांहींच उपयोग पडत नाहीं;' तस्मात् 'लांकडें तोडायाचें करूब शिकविलें तर बरें, परंतु हें व्याकरण नको.' वाः! केवढें अमोलिक तत्त्व हें आमच्या रावबहादुरांनीं शोधून काढून आपल्या महामूर्ख देशबंधूंस अर्पण केलें! भट्टोजी दीक्षितानें आपल्या ठिकाणीं आपली मोठी धन्यता मानली असेल कीं, येवढा व्याकरणोदधि, पण त्या सगळ्याचें मंथन करून मीं 'सिद्धांतकौमुदी' बाहेर काढली; पण त्या बिचाऱ्यालाही वरील प्रबंध सिद्धांताची प्रतीति कधीं घडली नसेल! वरील कौमुदीस आपल्या देशांतल्या देशांतच राहु उत्पन्न होतील हें त्याच्या स्वप्नींही आलें असेल काय? एकूण पाणिनि, पतंजलि, नागोजी-भट्ट वगैरे मंडळींनीं आज हजारों वर्षें ज्या विषयावर व्यासंग केला तो सारा तमाशा ह्मणून आज उमगला ना! पण हा काय बरें चमत्कार आहे, कीं ज्यांच्या ज्ञानांजनानें 'लोकहित-वादी'ची दृष्टि साफ होऊन त्यांस वरील महातत्त्व ओळखतां आलें तेही बेटे वरील तमास-गिरांतच नाचूं उडूं लागले आहेत! बोथलिंगाचार्य 'शार्मण्यदेशे रेनाख्यनदीतीरे बोण्णनाम्नि नगरे' असा संकल्प करून मुनित्रयाच्या पुरश्चरणास लागले हें नवल नव्हे काय! दुसऱ्यानें उक्षतरण नगरीं अधिष्ठान करून 'गोल्डस्टकर्स् पाणिनि' ह्मणून एक मोठा थोरला 'चित्रपट' तयार केला याला तरी काय ह्मणावें? त्याप्रमाणेंच आमच्या देशांतही भट्टकीलहॉर्न् पतं-जलीच्या नादीं लागून त्याला सजवताहेत, दुसऱ्या एका पंडितांनीं 'लेक्चर्स् ऑन् पाणिनि' ह्मणून कांहीं सोंगें उभीं केलीं, हें तरी काय? आमच्या रावबहादुरांनीं तीस वर्षांपूर्वीं मोठी बहादुरी करून जें 'पुरंदराचें बंड' मोडून टाकलें होतें तेंच पुनः इतक्यांत कसें बरें

---

होता. पांच वर्षांपूर्वीं बडोद्याच्या प्रकरणांत सरकारची कामगिरी इमानें इतबारें बजावल्याबद्दल मुंबईच्या प्रख्यात सौटर् साहेबांस खुद्द युवराजांनीं 'नाईट्' बनविलें ही गोष्ट आमच्या वाचकांस आठवत असेलच. वरील विधि झालेल्या पुरुषांस 'सर्' ही किताबत मिळत असते. तेव्हां कित्येक हिंदुही 'नाईट्' झाले आहेत हें सांगायास नकोच.

१. "कांहीं दिवसांनीं हें जुने लोक गेले ह्मणजे पंडित उताणे पडतील. परंतु या गोष्टीस वीस-बीस वर्षें आणखी पाहिजेत.' ह्मणजे आह्मीच या पंडितांचा तमाशा पाहूं. तथापि प्रथम पाठशाळेचा विध्वंस झाला पाहिजे, ह्मणजे एक पुरंदराचें बंड मोडलें. हे विनंती.

'पंडितांची योग्यता' [पत्र नं. १०३ 'सं०] (पृष्ठ ४९५).

उठलें? कणाद, जैमिनी, यास्क, पिंगल, भरत वगैरे शेंकडों बंडवाले जे त्यांनीं उघकून लावले होते त्या सर्वांनीं द्वीपांचीं द्वीपें उडून जाऊन दूरदूर देशीं आपले झेंडे नेऊन लावले आहेत, व साऱ्या युरोपभर व अमेरिकाभर त्यांचा दंगा दिवसोंदिवस ज्यास्त वाढतोच आहे, हें भयंकर वर्तमान आमच्या नेटिव सौटर साहेबांस अद्याप कोणीं विदित केलें नाहीं काय? काय असेल तें असो. कदाचित् व्याख्यानांच्या तडाक्यांत त्यांस आलीकडील वर्तमान ऐकण्यास अवकाश सांपडला नसेल. भूगोलांत तीन प्रकारचीं सरोवरें सांगितलीं आहेत. कांहींस नद्या मिळतात, पण त्यांतून निघत नाहींत; कांहींस मिळत नाहींत, पण त्यांतून निघतात मात्र; आणि कांहींस मिळतात, व त्यांतून निघतातही. प्रस्तुत ग्रंथकाराचा प्रकार या तिहींपैकीं दुसऱ्यासारखा असावा असा सुमार दिसतो!

'लोकहितवादी' हे आपणास विद्वानांत लेखीत असतील याविषयीं संशयच नाहीं; कां कीं 'विद्वान् कोणास ह्मणावें?' वगैरे अनेक निबंधांतील प्रमेयांवरून व 'मूर्ख.' 'टोणपे,' 'पशु.' इत्यादि विशेषणांच्या जागोजागच्या वृष्टीवरून वरील गोष्ट उघडच दिसते. पण आह्मांस खास वाटतें कीं, जर विद्यादेवी साक्षात् प्रगट झाली व तिनें दरबार भरवला, तर आमच्या रावबहादुरांस त्यांत वरील प्रतीच्या मानकऱ्याची जागा मिळणें मुष्कील पडेल. ज्या विद्येचा 'जिवास, शरीरास, प्रपंचास कांहींच उपयोग पडत नाहीं' ती काय कामाची, येवढीच ज्याची तिच्याविषयींची भावना तो कसला तिचा भक्त? तो खरोखरच लांकडें तोडण्याच्या व तीं वाहण्याच्याच उपयोगी! असला भारवाही व मजूरदार वाग्देवीच्या नंदनवनांत काय कामाचा? 'आरबी गोष्टीं' तील यक्षानें लावण्यवतीच्या पलंगावर चढूं पाहणाऱ्या कुबड्याची जशी अश्वशाळेंत योजना केली व शृंगारवंचन झाल्याबद्दल त्याच्याकडे जेवणाचें ताट पाठवून दिलें, तितपतच योग्यता वरील विद्योपासकाची होय. ज्याची येवढी मंद बुद्धि व क्षुद्र दृष्टि, कीं विद्येच्या योगानें शरीरास समाधान झालें तर ती विद्या, तो कसचा विद्वान्! त्या हतभाग्यास तिचें स्वरूप मुळींच बुद्धिगोचर झालें नाहीं, व तिच्यापासून होणाऱ्या आनंदाचा लवलेशही मिळाला नाहीं, असें ह्मटलें पाहिजे. 'इसापनीती' तील कोंबड्यानें जसा सिद्धांत केला, कीं हें रत्न कुचकामाचें, याची कवडीचीही योग्यता मी समजत नाहीं, याच्यापेक्षां एक जोंधळ्याचा दाणा हजार वांटेनें बरा, तशाच प्रकारचा वरील उदरंभरि पंडिताचा सिद्धांत होय. सारांश, विद्येचें सर्वोत्कृष्ट फल ह्मटलें ह्मणजे उदरपोषण किंवा इंद्रियजन्य सुख होय असें मानणारा मनुष्य अत्यंत जडबुद्धि समजला पाहिजे. त्यास उपमा ह्मटली तर रत्नाविषयीं पाषाणबुद्धि धरणारा वरील कुक्कुट, पशुमात्राविषयीं केवळ मांसबुद्धि बाळगणारा शौनिक किंवा युवतिमाताविषयीं केवळ मानुषीबुद्धि बाळगणारा क्लीब, यांचाच यथार्थ होय. कोहिनूर हिरा व गार हीं जशीं कोंबड्याच्या दृष्टीनें सारखा, शिकंदर बादशहाचा नामांकित घोडा[1] व भाडेकऱ्याचें तट्टू हीं जशीं खाटिकास सारखीं, षंढास जसें

---

१. बुसेफेलस् नामेंकरून शिकंदर बादशहाचा मोठा उमदा घोडा होता. हा त्याच्या बापाकडे

(पुढें चालू.)

मनुष्याचें व स्त्रीचें आलिंगन सारखें, त्याप्रमाणेंच सरस्वतीच्या अवकृपेंतल्या मंडळीस लाकूडतोड्या व वैयाकरण सारखा!

'लोकहितवादींचा व्यवहारोपयुक्ततेचा सिद्धांत अंगीकारला तर आज विद्यादेवीचे किती मुलूख ओसाड पडणार आहेत! मोठमोठ्या दुर्बिणींवर आरूढ होऊन अंतराळांतील दूरदूरच्या प्रदेशांत डोकावून येणारे ज्योतिषी, पृथ्वीच्या पोटांत शिरून कोसकोस खोल जाणारे भूगर्भवेत्ते, नीलनदीचा उगम हुडकून काढणारे, ध्रुवप्रदेशांतील गोठलेल्या समुद्रांत जाणारे, आफ्रिकेच्या मध्यभागांत घुसणारे, मुंग्यांच्या व मधमाश्यांच्या प्रजासत्तात्मक राज्याविषयी शोध करणारे, हजारों वर्षांपूर्वीचे सांगाडे गोळा करून महादेवाच्या अव्वल कारकिर्दीतील प्रजेची स्थिति कशी होती याचा तलास लावणारे वगैरे शेकडों वेडयापिरांची काय अवस्था होईल? त्यांतून हीही लहान चमत्काराची गोष्ट नव्हे, कीं आमच्या रावबहादुरांच्या मताप्रमाणें शहाण्यांतले शहाणें जें इंग्रज सरकार तेंही वरील खुळास सर्वथा अनुकूल आहे. लाखों रुपयांचा खर्च ठेवून वरील खुळें विलायत सरकारनें उराशीं बाळगलीं आहेत; व येथेंही वरील प्रकार दृष्टीस पडत नाहींसा नाहीं. तशीच दुसरी हीही मोठी गोष्ट लक्षांत आणण्यासारखी आहे कीं, जगाच्या आरंभापासून प्रस्तुत ग्रंथकाराच्या महातत्त्वाचीच जर प्रवृत्ति असती तर आजला चोहोंकडे काय स्थिति दृष्टीस पडली असती बरें! जगानें वेडे ठरविलेल्या मंडळीनें विद्यादेवतेची केवळ निरपेक्ष व निष्काम बुद्धीनें जर हजारों वर्षें उपासना चालविली नसती, तर आजपर्यंत जगांत कितीसें ज्ञान सांठलें असतें! सरकारानें आपला खर्च देऊन श्वेतद्वीपींची महायात्रा करवण्याचा कपिलाषष्ठीचा योगी आणला असतां आपलें जन्मभर केलेलें पांडित्य चटदिशी गुंडाळून ठेवून रावबहादुरांनीं मुकाट्यानें माघारी पाय घेतला या कृतीत*

---

प्रथमतः आणला तेव्हां तो असा उच्छृंखळ होता का त्याच्यावर चढण्याची कोणाची छाती होईना. शेवटीं शिकंदरानें त्याच्यावर स्वारी केली. त्याच्या साऱ्या युद्धांत हा घोडाच त्यास उपयोगीं पडला. त्याच्यावर चढण्याकरतां शिकंदरानें रिकिबींत पाय ठेवला कीं सैनिकांनीं शत्रूवर घाला करायाची, असा नेहमीचा संकेत असे. शेवटीं पंजाबांतल्या लढाईंत वरील घोडा जायां होऊन मरून पडला. ते समयीं शिकंदरानें त्याचा प्रेतसमारंभ करून त्या ठिकाणीं त्याच्या नांवानें एक शहर वसवलें.

१. 'विविधज्ञानविस्तार' पु. ११, अंक १०, पृष्ठें २३५—६ पाहा. *

* सदर मजकूर पुढीलप्रमाणें आहे:—

'विपत्कालीं धैर्य' आणि 'समरी शौर्य' हे दोन गुण 'लोकहितवादीं'च्या अंगीं बहुतेक नाहींत असें जें लोकांचें म्हणणें तें खरें आहे असेंच म्हटलें पाहिजे. कोणताही गुण मनुष्याच्या अंगीं आहे कीं नाहीं हें प्रसंगावांचून समजत नाहीं.........'लोकहितवादीं'स सुदैवानें असे दोन तीन प्रसंग आले होते. त्यांचा त्यांनीं कसा सन्मान केला पाहूं.

कांहीं वर्षांपूर्वी हिंदुस्थानच्या राज्याच्या जमाखर्चाची चौकशी विलायतेंत "फिनॅन्स कमिटी" पुढें चालली होती. त्या समयीं एतद्देशीय लोकांस साक्ष देण्याकरितां सरकारनें आपल्या खर्चानें पाठवावें अशी त्या सभेची सूचना होती..........स्वदेशजननी, स्वदेशबांधव यांच्या कल्याणाविषयीं औत्सुक्य, स्वदेशाभिमान, मनाचा थोरपणा, औदार्य,

(पुढें चालू.)

आणि वर्षानुवर्षे मनांत सांठवलेला संकल्प सिद्ध होण्याचा समय आला असतां तीन डाकलग जहाजांनिशीं कोलंबसानें पृथ्वीसीमाभूत मानलेल्या महासागरावर धाड घातली या कृतींत किती जमीन अस्मानची तफावत! तर विद्येचा खरा भक्त म्हटला म्हणजे तिजपासून आपणास कांहीं लाभ होईल कीं नाहीं, ही कल्पनाही त्याच्या मनांत येत नसते; केवळ

---

स्वदेश दुःखमुक्त करण्याची इच्छा. उपचिकीर्षा, इत्यादि हृदयगुण आणि चातुर्य, साक्षी देण्यास उपयोगीं पडणाऱ्या साधनांची जुळणी करण्याची बुद्धि, कमिटीच्या मनांत भरेल अशा रीतीनें अव्वलपासून अखेरपर्यंत माहिती पुरवून देण्याचें व स्वदेशदुःखपरिहारास्तव तीस अधिकोत्तेजन आणण्याचें कौशल्य इत्यादि मनोगुण आणि विशेषतः स्वतःचें कांहीं नुकसान होण्याचा संभव असल्यास तें स्वदेशजनांकरितां बिकट कहरणींत सोसण्याचें खरें धैर्य, हे गुण दृष्टीस पडण्याचा हाच संधि होता..........वॉशिंग्टनच्या चरित्राचें दोन तपें पारायण करून ज्यांचा हृदयमहाब्धि स्वदेशाभिमानाच्या लहरांनीं क्षुब्ध झाला होता असें सुप्रसिद्ध होतें. तें आतां पटापट धांवून येतील आणि आपल्या जननीच्या आणि बांधवांच्या धन्यवादास पात्र होतील अशी सर्वांची अपेक्षा होती. आमच्या पौरजनांपैकीं सन्मान्य आणि भूषणीय दोघां सज्जनांनीं यथाशक्ति कामगिरी बजावून जशी पूर्वी शाबासकी मिळविली तशी स्तुत्य कृति करून कोणी तरी दाखवील असा मोठा विश्वास होता. पण जाण्यालायक लोकांचा शोध होतां होतां निदानचा तळीं राहणारा कोणीच नाहीं असा मजेचा परिणाम झाला! योग्य मनुष्याची निवड न झाली तर जाणाऱ्या साक्षीदारांपासून कांहीं उपयोग होणार नाहीं म्हणून सरकारी अधिकाऱ्यांनीं कित्येक थोर प्रतिष्ठ कामगारांची निवड केली. त्यांत आमच्या प्रस्तुत विषयनायकास (लो० हि०) आमंत्रण होतें. त्या वेळेस 'लोकहितवादी' नें आमंत्रणाचा अव्हेर करून जातीच्या भयास्तव विलायतेस जातां येत नाहीं असें सरकारास पत्रद्वारें कळविलें. तें पत्र त्या वेळच्या वर्तमानपत्रांतून प्रसिद्ध झालेलें पुष्कळांनीं पाहिलें असेल. जातिभ्रष्टतेचें जर एवढें मोठें भय होतें तर यापूर्वी त्यांणीं आपले चिरंजीव यांस ब्राह्मण आचारी बरोबर देऊन व इतर सामग्रीची तयारी करून विलायतेस पाठवून दिलें त्या समयीं "हा दिवस हिंदुस्थानच्या, विशेषतः मुंबई इलाख्याच्या इतिहासांत गणण्यासारखा व स्मरण ठेवण्याजोगा झाला असें म्हणण्यास चिंता नाहीं. आतां रावबहादुर यांनीं व त्यांचे चिरंजीव........यांनीं जी ही मोठी हिंमतीची व इतर लोकांस उदाहरण दाखविण्याची गोष्ट केली, ती स्तुत्य व त्या उभयतांच्या विद्वत्तेस व मोठेपणास भूषणाई आहे" असे कैवारी पत्रांतून स्तुतिपाठ चालले होते........चिरंजीवांस विलायतेस पाठवून दिलें, त्या वेळेस जातिभ्रष्टतेचें भय कोठें गेलें होतें? त्या वेळच्या 'इंदुप्रकाशां'त त्यांच चिरंजीव यांचीं मातोश्रीस आलेलीं पत्रें पुष्कळांनीं वाचलीं असतील. त्यांत आपण नेहमीं स्नानसंध्या करितों, जेवणाच्या वेळेस सोवळें नेसतों, नित्याचा भगवद्गीतेचा आणि गुरुचरित्राचा पाठ वाचतों, वगैरे मजकूर असे. त्याजवरून जातिसंरक्षणाची मजबूत व भक्कम सामग्री होती असें सिद्ध होतें; तेव्हां इतकी सामग्री सिद्ध असल्यावर जातिभ्रष्ट होण्याची भीति काढून असणार? शिवाय 'फिनॅन्स कमिटी' पुढें साक्ष देण्यास जाण्याच्या सुमारास रा० रा० 'गणेश सीतारामशास्त्री गोळवलकर' सरसुभे हे विलायतेस जाऊन परत येऊन त्यांच्याशीं अन्नादि व्यवहार न करण्याचा कित्येकांचा दुराग्रह होता त्याचीही निवृत्ति झाली होती. 'होळकर सरकारनें' प्रतिष्ठित ब्राह्मण लोकांस सरकारवाड्यांत मेजवानीस

(पुढें चालू.)

ज्ञानजन्य जें सुख त्याचीच तो पर्वा करीत असतो. प्रणयी पुरुषाचें मन प्रेमविषयक भावर

---

बोलवून हा तट मोडून टाकला होता. स्वामींनींही शास्त्री मजकूर यांस पावन केलें होतें व श्रींची संमतिपत्रिका 'इंदुप्रकाशांत प्रसिद्ध झाली होती. याच्यापूर्वी बरीच वर्षें श्री० 'राघोबादादांनीं' विलायतसरकारशीं बोलणें लावण्याकरितां 'आबा काळे' या नांवाचे गृहस्थास विलायतेस पाठविलें होतें ते परत आल्यावर ब्राह्मणांचें राज्य आणि हिंदुधर्माची ऐन तरतरी असतांही त्यांस प्रायश्चित्त दिल्यावांचून ज्ञातींत घेतलें ही गोष्ट इतिहासज्ञ 'लोकहितवादींस' ठाऊक असेलच. सदरहू 'काळे' विलायतेहून आल्यावर यांशीं बिनहरकत सर्व ब्राह्मण अन्नव्यवहार करीत, व प्रख्यात 'बाळाजीपंत नातू' यांनीं 'काळे' यांचे मुलीशीं आपले मुलाचा विवाह करून शरीरसंबंध जोडला होता हेंही माहीत असेलच. इतकीं उदाहरणें असतां 'लोकहितवादीनें' विलायतेस न जाण्याचा गवगवा करून काय मिळविलें असेल तें असो..........प्रसंगीं स्वदेशाचें कल्याण करण्याचा आणि स्वदेशबांधवांच्या गुरुस्थानीं प्रतिष्ठित होण्याचा व खरें धैर्य प्रत्यक्ष दाखविण्याचा समय आला असतां तो खरीं वाईट कारणें सांगून टाळावा ह्यांत काय भूषण असेल तें असो. 'लूथर' आणि 'तुकाराम' यांचीं आमचे पुढारी मंडळीस सोंगें आणतां येतात खरीं, परंतु त्यांसारखी बतावणी करतां येत नाहीं ह्मणून त्यांचा वारंवार उपहासच होतो. कित्येकांच्या डोक्यांत असें वेड शिरलें आहे कीं, आपण 'रामदास', 'लूथर', 'तुकाराम' इत्यादिकांचे अवतारच आहों. परंतु तशी कृति करण्यास जेव्हां ते प्रवृत्त होतात तेव्हां 'रासेलस्' नामक कादंबरींतील पंख लावून उडणाऱ्या यंत्रशास्त्र्याप्रमाणें त्यांची दशा होते. सुखवस्तु बोलण्यानें आणि सुधारणेची टिमकी वर्तमानपत्रांतून वाजविल्यानें जर सुधारणा होती तर आतां आमचे देशांत सुधारणा अगदीं कळसास जाऊन पोंचली असती.................आणि देशकल्याणाचे पर्वतचे पर्वत पडले असते..........आपलें नकाराचें पत्र छापून प्रसिद्ध करण्याचा उपद्व्याप लोकहित-वादीनें कोणत्या अर्थानें केला असेल तो असो. या योगानें लोकहितवादींचें मानसिक दौर्बल्य मात्र प्रकट झालें, सुधारक-मंडळाच्या पटांत नांव येण्यास मुळींच सहाय्य झालें नाहीं. त्या वेळच्या वर्तमानपत्रांत सदहू पत्रावर बरीच खरमरीत चर्चा झाली. त्यांत "नेटिव्ह आपिनियन्" नामक पत्राचा अभिप्राय पाहिला असतां 'सुधारक'पद प्राप्त करून घेण्यास अद्याप लोकहितवादीनें किती काम केलें पाहिजे हें समजेल. सदहू अभिप्राय रास्त आहे.

["We regard Mr. Gopalrao's publishing his manifesto as merely making of so much political capital. The word *Reformer* has become very cheap amongest us; but after a very careful examination into the documents, we cannot hold that this officer has yet proved his title to be a reformer. We hope he may become one, as years roll on; but it will require a life-long self-sacrifice and untiring labour and perseverance on his part before we can admit him into the roll of our Luthers or Tukarams." —Native Opinion.]

(पुढें चालू.)

लुब्ध होऊन पडलेलें असतें तें जसें तिच्या वस्त्राभरणाविषयीं किंवा तिजकडून घडणाऱ्या

---

.........त्यांस ज्ञातीचें भय वाटलें असेल खरें, परंतु त्यांच्यासारख्या घरसोडी वर्तनानें ब्राह्मणत्व येत नसतें हें त्यांच्या लक्षांत कसें आलें नाहीं? शुचिकर्मानें ब्राह्मणत्व येतें असें 'महाभारतां'त प्रतिपादन केलें आहे. पण भारताची गणना पुराणांत, आणि पुराणें तर "शिमगा"; तेव्हां या आधाराची मातब्बरी काय?.........

आतां दुसऱ्या प्रसंगाकडे वळतों. या समयींही 'लोकहितवादीनें' आपल्या अनेक लेखांस आणि अभिवचनांस आणि आश्वासनांस हरताळ लाविला. आयते वक्तीं थोर थोर आणि निःसीम स्वपक्षनायक सुद्धां मागें पाय काढण्यास शरमणार नाहींत असें जाणून एका दूरदर्शी मुरुडकर मोडक उपनांवाच्या गृहस्थानें १००० रुपयांचा करारनामा लिहून मागितला होता. पुनर्विवाहोत्तेजक पक्षाच्या मंडळीस सत्कृत्य समजून मदत करणें हा आपला धर्म, परमपवित्र कर्तव्यकर्म होय व अशा समजुतीनें अंतःकरणपूर्वक मदत करण्याचें वचन देऊन, तसेंच पुनर्विवाहित दंपत्यास उत्तेजन आणि स्वाश्रयाश्वासन अनेकवार देऊन, प्रसंगीं पळ काढणें यांत पुरुषार्थ तो कोणता? मारत्याचे मागें आणि पळत्याचे पुढें पळणारे झुंझारराव असले ह्मणजे काम हटकून झालेंच समजावयाचें! आपल्या अंगीं जर पाणी नाहीं तर त्या गोष्टीची खवखव कशास बाळगावी? प्रथमतः अनेक बंधनांनीं आपणच होऊन बांधून घ्यावयाचें आणि मग तीं बंधनें तट्कन् तोडून टाकावयाचीं आणि लोकापवादास पात्र व्हावयाचें हा मार्ग सुधारणेच्छु वीरांस भूषणीय आहे काय? यांत एक खुबी दिसते. प्रथम पुनर्विवाहास मिळालें ह्मणजे विद्वत्ता, मनाचा मोठेपणा, सत्पक्षाचा अभिमान, अबलाजनांची कळकळ इत्यादि गुणांचे स्तुतिपाठ सुरू होतात; मूळचा "देवापुढला देव" असला तरीही ह्या पक्षास नुसता सहीनें आश्रय दिला तर त्यास सुज्ञत्व आणि थोरपणा हीं एकदम प्राप्त होतात;.........कदाचित् सही देण्यापेक्षां ज्यास्त पुढें पाऊल पडलें असलें तर, किंवा प्रत्यक्ष नवरदेव बनलें तर विद्वान्, थोर, कुलीन नामांकित घराण्यांतील, सभ्य, शिष्टाचारसंपन्न, चांगल्या चालीचे, इतकीं अमोलिक भूषणें मिळतात. आतां दुसऱ्या पक्षीं, आपलें अंग काढून घेतलें तर "अनिवार्य गृहसंकटामुळें सुज्ञजन फारसा दोष लावणार नाहींत अशी खात्री" असते.........'लोकहितवादी' हे अनेक वर्षांपासून देशसुधारणेप्रीत्यर्थ लेखानें आणि भाषणानें झटणारे आहेत अशी त्यांची कीर्ति असून व "सप्तर्षी"त त्यांची गणना असून त्यांनीं आपलें ब्रीद कसें संभाळिलें नाहीं? देशमुख जे देशरीतीभाती सुधारण्यास्तव यत्न करणारे असे आज दोन तपें कागदोपत्रीं गाजत आले आहेत व चिपळूणकर जे त्यांसारखेंच अशा कामीं स्वातंत्र्य व धारिष्ट यांचे केवळ पुतळेच, त्या उभयतांनीं लोकप्रचारास भिऊन कांहीं कारणानिमित्त प्रायश्चित्तें घेऊन, त्या कामास खोटेपणा आणल्यासारखें केलें, परमेश्वराची लीला तरी किती अगाध! कोणाची तो कसोटी पाहूं लागला ह्मणजे अगदीं समाप्त करून टाकितो........... "......प्रतिपक्षांनीं ज्वाला गगनास लागतील असा जरी भयंकर अग्नि पेटविला तरी त्यांतून पार जाण्यास मी कचरणार नाहीं. मला परमेश्वराचा आधार आहे........ह्मणून मला कशाचेंही भय वाटत नाहीं" याप्रमाणें 'लूथरानें' उत्तर दिलें व पुढें बादशहाच्या मोठ्या धमकीनें न घाबरतां सभेपुढें हजर होऊन आपल्या मताचें प्रतिपादन केलें. आतां लूथराचें वर्तन कोणीकडे आणि आमच्या सुधारकांचें कोणीकडे?......दंभासाठीं करी उपदेश लोकां। ऐसा भाव देखा

(पुढें चालू.)

सेवेविषयीं निरपेक्ष असून केवळ तिच्या समागमाविषयींच आतुर असतें तशीच खऱ्या विद्या-

---

कलियुगीं ॥ असें ब्रह्मज्ञानी साधु नामदेव यानें अर्वाचीन. सुधारकंमन्य विद्वानांच्या वर्तनाचें अगोदरच वर्णन करून ठेविलें आहे.! 'लोकहितवादी'चें वर्तन बरेंच नामर्दपणाचें आणि अश्लाघ्य जरी नव्हे तरी दूषणीय होय;.........त्यांच्या कैवारी वर्तमान पत्रांतही त्यांस हींच दूषणें दिलीं आहेत:—

["It was sufficiently well known already by his unmanly conduct in with-drawing from among his friends of the widow-marriage party of which he was the most leading champion from the time that he entered into public life, and in his throwing overboard the couple that had already married on his assurances and encouragement as a declared champion of the cause." —Induprakash.]

.........प्रसंगीं कामीं पडणारा मनुष्य फार विरळा.........संकटसमयीं भेदरून जाणारेच पुष्कळ.......मनुष्य जसा दिसतो तसाच केवळ अंतर्यामीं असतो असें नाहीं.......पितळ सुद्धां सुवर्णासारखी दिसते. कित्येक पुरुष दिसायाला उग्र व रागीट असें मुखचर्येवरून वाटतें, परंतु त्यांचें अंतःकरण कोमल असतें.......आमच्या 'लोकहितवाद्यां'नीं आपलीं दोन्ही स्वरूपें जगास दाखवून, जुन्या आणि नव्या मंडळीच्या उपहासास आणि अनुकंपेस पात्र करून घेतलें......"विपत्कालीं धैर्य" आणि "समरीं शौर्य" दाखविण्याची आणि "बोले तैसा चाले त्याचीं वंदावीं पाउलें" ह्या तीव्र कसोटीस उतरण्याची, सुदैवानें सोन्या-सारखी संधि आपोआप घरीं चालून आली असतां—जी संधि शतशः नवस करूनही येणारी नव्हे—ती आपल्या हातें घालवून दिली असें ह्मणतात. हें जर खरें असेल तर...... त्यांच्या अभिवचनांवर व आश्वासनांवर विश्वास ठेवून वागणाऱ्या व त्यांची कांस धरून, सुधारणानदींतून जाणाऱ्या मंडळीस नावाड्यानें मध्येंच डोकें टेंकिलें तेव्हां, आधार सुटून खांचा खळग्यांत पडून, दगडांवर हापटून, आकंठ पाणी होऊन, घडपडत धडपडत बुचकळी मारण्याची पाळी आली आणि घड ऐलतीर ना पैलतीर अशी स्थिति झाली असें ह्मणण्यास हरकत नाहीं.........याप्रमाणें हे सुधारणारूप समरभूमीवरील भीष्माचार्य हतशौर्य होऊन पडले तेव्हां.........इतर छोटेखानी वीरांची त्रेधा उडाली.........जो तो सैरावैरा द्रोणा-चार्यांचा शोध करूं लागला. तों सुधारणासमरवेश सोडून देऊन, अपरिचितविधुरावस्थेनें खिन्न होत्साता, पूर्वप्रेमाधिष्ठानाचें वियोगदुःख अगदीं ताजें आहे तोंच, मंगलमंडपांत भटभिक्षुक 'शुभमंगल सावधान' हा मंत्रघोष करून अक्षता टाकीत आहेत, मंगलवाद्यांची गर्दी उडाली आहे, करवल्या, विहिणी, व्याही ह्यांची तारंबळ उडाली आहे, अशा अपूर्व थाटानें द्रोणाचार्यांची स्वारी नवी नवरी वरण्याच्या घाईनें बोहल्यावर विराजमान आहे असें समजलें. तेव्हां तर सर्वांचे हातपाय गळाले व सर्वांच्या तोंडचें पाणी पळालें. 'जी गोष्ट चांगली असून, व जी करावी ह्मणून आपण रात्रंदिवस गात असून एकाद्या कारणामुळें आपणाच्यानें ती करवत नसेल, तर तिच्या उलट तरी आचरण करूं नये, ह्मणजे तवढ्यानेंच ह्या देश आपला बहुत उपकारी होईल.........पहिल्या प्रतीचे अनुभविक, विद्वान्, विचारसंपन्न व पोक्तवयाचे असे मनुष्य नावाडी पाहिले असून तेही आणीबाणीच्या प्रसंगीं योग्य धैर्य व दृढनिश्चय राखून संकटसागरांतून आपणास पार नेऊन पोंचवीत नाहींत, तर आतां भरंवसा तरी कोणत्या प्रकारच्या नावाड्यावर ठेवावा' असा

(पुढें चालू.)

विलासी पुरुषांची गोष्ट होय !'

---

बुभुक्षितैर्व्याकरणं न भुज्यते
पिपासितैः काव्यरसो न पीयते ।'

अंक ७०—(१) 'लोकहितवादीं'च्या शास्त्रविद्येवर दुसरा आक्षेप—त्याचें निरसन. (२) संस्कृत विद्येची उपयुक्तता. (३) तिची व अर्वाचीन पाश्चात्य विद्येची तुलना. (४) उपसंहार.

१. 'लोकहितवादी' ह्मणतात कीं, "ही विद्या कांहीं उपयोगी नाहीं. जर असें नसेल तर मला कोणीं उत्तर द्यावें, कीं व्याकरणाचें पंधरा वर्षें अध्ययन केलें त्यापासून अमुक उपयोग होतो असें मला दाखवून द्यावें, ह्मणजे मी वास्तविक म्हणेन." आह्मी रावबहादुरांस असें परत विचारतों कीं, जर संस्कृत व्याकरण निरुपयोगी, तर मराठी व इंग्रेजीही तसेंच

---

एका आचार्यानें [इंदुप्रकाश ता. २२–१२–१८७२] काकळूत वाणीनें ईश्वराचा धांवा आरंभिला. हा धांवा ऐकून "अशीं मोठमोठीं कामें शेवटास जाण्यास जें धैर्य लागतें त्याचा पुरवठा परमेश्वराकडूनच होतो" तो झाला किंवा नाहीं याचा निर्णय त्या पक्षाची विद्यमान स्थिति मनांत आणिली असतां वाचकांस सहज करितां येईल. असो. तर आमच्या लोकहितवादीचीं कृत्यें जशीं सुधारणेस साहाय्यभूत आहेत असें दिसतें तशीं तीं केव्हां केव्हां लाभाहून अधिक नुकसान करणारीं व सुधारणेचा पाया खचविणारींही असतात असें वाचकांस कळून येईल." 'सम्पादक'

१. "What is the *use* of logic?—I answer that knowledge itself is a use, and that all legitimate inquiry rewards itself with its own pleasures. The appetite for finding out laws from facts, causes from effects, necessary truth from fleeting occurrences of the day, puts in its claim to gratification, which is as legitimate, if less imperious, as that of the animal nature for food and sleep. The studies which enwrapt the soul of Joseph Scaliger during the massacre of Saint Bartholomews, must have been a source of pleasure pure and high, from which they had a right to draw. If the question, what "fruit" does it bring?—which the Baconian philosophy puts so often—be understood, as it certainly ought not, to refer only to the *material* wants and comforts of humanity, it is a base, sordid, and stupid question against which every better mind indignantly protests. Science was never brought to its present height by hopes of wealth, plenty, and comfort alone, but chiefly by those *mirabiles amores* with which she can inspire her followers. He who loves to see the processes of his mind reduced to their laws and causes, to him are logical studies a pleasure—to him they bring fruit."

२. "ज्यास भूक लागली आहे त्याचें व्याकरणानें पोट भरत नाहीं; कोणास तहान लागली असतां काव्यरस उपयोगीं पडत नाहीं."

असलें पाहिजे. मग ती शिकवण्याविषयीं आमचें सरकार इतका अट्टाहास का करतें ! इंग्रेजी भाषेचीं आजपर्यंत छप्पन जणांनीं छप्पन व्याकरणें केलीं आहेत, व अजूनही तीं होत असून पुढेंही होतील यांत संशय नाहीं. आमच्या सरकारचे आमच्या देशावर जे मोठाले उपकार झाले आहेत त्यांतलाच एक हा होय, कीं आमच्या भाषा आजपर्यंत ज्या सैरावैरा धांवत होत्या त्यांचें त्याच्या आश्रयाच्या योगानें नियमन होऊन त्या व्याकरणाच्या आळ्यांत आल्या. मग जे परिश्रम मराठी व इंग्रेजी भाषांच्या संबंधानें स्तुत्य, तेच संस्कृत भाषा आली कीं निंद्य झाले काय ? आतां यावर आमच्या प्रतिपक्ष्याचें कदाचित् ह्मणणें पडेल कीं, व्याकरण शिकण्यास हरकत नाहीं, पण नुसत्या एका विषयाचा व्यासंग पंधरा वर्षें करीत बसणें, आणि त्यांत व्याकरणासारख्या रुक्ष विषयाचा, यांत काय अर्थ आहे ! इंग्रेजी किंवा मराठी व्याकरण जसें भाषाज्ञानास साह्यभूत ह्मणून शिकतात, त्याप्रमाणेंच संस्कृत व्याकरणही तितक्या बेताचें शिकावें. उगीच पोकळ शब्दवाद वाढवण्यांत काय तात्पर्य ? या कोटिक्रमांत पुष्कळच गोष्टी विचार करण्यासारख्या आहेत. एक मोठी गोष्ट तर ही कीं, सदरील विषय अमुकपर्यंतच शिकावा व अमुकपर्यंत शिकूं नये ही मर्यादा करण्यांत काय अर्थ आहे ? ज्यास जितकें अपेक्षित असेल किंवा जेथपर्यंत त्याचा बुद्धिप्रवेश होईल तेथपर्यंत तो शिकेल. कोणास समग्र विषयाची माहिती करून घ्यावयाची असली तर त्यास आडकाठी करणारे रावबहादुर कोण ? नुसत्या अर्वाचीन इंग्रेजी भाषेचें व्याकरण शिकूनच न राहतां जे अँग्लोसॅक्सन् वगैरे भाषा शिकतात व शब्दव्युत्पत्तीचा थांग लावीत लावीत अगदीं मुळाशीं जाऊन थडकतात किंवा तितक्यानेंही तृप्त न होतां इंग्रेजी शब्दांचीं दुसऱ्या छप्पन भाषांशीं जे नातीं जुळवीत बसतात, त्यांस आमचे नवीन कौंसलदार एकदम वेड्यांच्या इस्पितळांत नेऊन टाकतील काय ? येथील कॉलेजांतील माजी संस्कृत गुरु डॉक्टर् हो किंवा सध्यांचे उक्षतरणवासी मोक्षमुल्लर यांस जर 'लोकहितवादी' विचारूं लागले कीं, "काय हो, इतकीं वर्षांचीं वर्षें तुह्मी नुसते शब्द कुटीत बसतां, व या भाषेंत अमकें रूप होतें, या भाषेंत अमकें चालू आहे, भाषेची उत्पत्ति अमक्या अमक्या तऱ्हेनें झाली असावी, तींत कालगत्या असे असे फेरफार होत जातात, वगैरे पांडित्य करण्यांत तुह्मी कालक्षेप करतां, हें काय खूळ तुह्मीं माजवलें आहे ? तुमच्यापेक्षां रोटीवाल्याचा उद्योग मी फार चाहतों."—तर वरील शार्मण्यदेशीय पंडितांकडून त्यांस काय उत्तर मिळेल बरें ? दुसरें असें कीं, व्याकरणविषय आमच्या रावबहादुरांस जरी रुक्षत्वास्तव अप्रिय असला तरी तेवढ्यावरून तो सर्वांस नापसंत झालाच पाहिजे असें आहे काय ? व्याकरण, गणित, न्याय (तर्कशास्त्र), धर्मशास्त्र (कायदे), वगैरे विषय पुष्कळांस रुचिपरत्वेंकरून कंटाळवाणे वाटतात, ह्मणून तेवढ्यावरूनच ते त्याज्य झाले ? आपणास जें आवडेल तेंच इतरांस आवडलें पाहिजे असा आग्रह धरणें हें किती असमंजस होय[1] ! आतां बारा बारा पंधरा पंधरा वर्षें एकच विषय धरून बसणें हें चांगलें कीं वाईट

१. मनुष्यांच्या बुद्धीबुद्धींत फरक असतो; कोणाची रुक्ष असते व कोणाची सरस असते.

(पुढें चालू.)

याचा जर विचार केला, तर इकडूनही आमचे जुने शास्त्री केवळ मूर्खच ठरतील असें आह्मांस वाटत नाहीं. एकच कां विषय होईना पण तो पुरतेपणीं येणें हें चांगलें; कीं

---

व्याकरणगणितादि विषय रुक्ष बुद्धीच्या मनुष्यांस प्रिय होतात, व काव्येतिहासादि इतरांस आवडतात. संस्कृतांत रुक्षत्वाच्या संबंधानें व्याकरणाची व न्यायाची ज्यांत निंदा केली आहे असे अनेक श्लोक आहेत. उदाहरणार्थ पुढील घ्याः—

पठन्तु कतिचिद्धठात्खफछठेति वर्णच्छटान्
घटः पट इतीतरे पटु रटन्तु वाक्पाटवात् ।
वयं बकुलमञ्जरीगलदनल्पमाध्वीझरी-
धुरीणगणरीतिभिर्भणातिभिः प्रमोदामहे ॥

मेकॉले साहेबांस गणिताचा पराकाष्ठेचा कंटाळा असे. त्यांच्या 'चरित्रां'त पुढील गमतीचें पत्र आढळलें:—

"My dear mother,—King, I am absolutely certain, would take no more pupils on any account. And, even if he has numerous applicants with prior claims, he has already six, who occupy him six hours in the day, and he is likewise lecturer to the college. It would, however, be very easy to obtain an excellent tutor. Lefevre and Malkin are men of first-rate mathematical abilities, and both of our college. I can scarcely bear to write on Mathematics or Mathematicians. Oh for words to express my abomination of that science, if a name sacred to the useful and embellishing arts may be applied to the perception and recollection of certain properties in numbers and figures! Oh that I had to learn astrology, or demonology, or school divinity! Oh that I were to pore over Thomas Aquinas, and to adjust the relation of Entity with the two Predicaments, so that I were exempted from this miserable study! "Discipline" of the mind! Say rather starvation, confinement, torture, annihilation! But it must be. I feel myself becoming a personification of Algebra, a living trigonometrical canon, a walking table of Logarithms. All my perceptions of elegance and beauty, gone, or at least going. By the end of the term my brain will be "as dry as a remainder biscuit after a voyage." Oh to change Cam for Isis! But such is my destiny; and since it is so, be the pursuit contemptible below contempt, or disgusting beyond abhorrence, I shall aim at no second place. But three years! I cannot endure the thought. I cannot bear to contemplate what I must have to undergo. Farewell then Homer and Sophocles and Cicero.

Farewell happy fields.
Where joy for ever reigns! Hail, horrors, hail,
Infernal world!

(पुढें चालू.)

अनेक विषय अर्धेमुर्धे येणें हें चांगलें; याविषयीं विचार केला असतां कोणाच्याही लक्षांत येईल. कीं सर्वांनीं गुडघाभर पाण्यांत पोहण्यापेक्षां एकेका विद्येंत एकेकजण पारंगत असणें हें फार चांगलें. सर्व विद्या देशांत सामग्र्यानें जागृत राहण्यास वरीलच साधन उत्कृष्ट होय हें उघड आहे. अर्थशास्त्रांत श्रमविभागाचा जो सिद्धांत आहे तोच इकडे व सर्वत्र लागू पडण्यासारखा आहे. त्यांतून परमेश्वराच्या कृपेनें आमच्या देशांत धारणाशक्तीचा असा दुष्काळही नाहीं, कीं एकेक शास्त्रच झेपतां झेपतां पुरेसें होऊन इतरांकडे अवलोकन होणेंही दुरापास्त व्हावें. चार चार शास्त्रांचें किंबहुना सहांचेंही आकलन केलेल्या बुद्धि यीं देशांत निपजलेल्या आहेत. तसेंच हेंही आमच्या बहुश्रुत ह्मणवणाऱ्या 'लोकहितवादीं'स माहीत असायाला पाहिजे होतें, कीं केवळ व्युत्पत्तीपुरतें व्याकरणज्ञान होण्यास पंधरा वर्षे अध्ययन करण्याची जरूर आहे असें नाहीं. इंग्रेजी व्याकरण शिकण्यास जसें भाषाशास्त्राचें अध्ययन अवश्य आहे असें नाहीं, तसेंच संस्कृत भाषेच्या व्याकरणाचें ज्ञान होण्यासही भाषाब्धींतच उडी घातली पाहिजे असें नाहीं ![1]

२. प्रस्तुत लेखांत आमच्या रावबहादुरांनीं एकंदर शास्त्रविद्येवर जो भडिमार केला आहे त्याचें सार पुढील वाक्यांत आहे—" ही विद्या कांही उपयोगी नाहीं." हें व्हानसें वाक्य नमूद करतांना प्रस्तुत ग्रंथकारानें कितीसा विचार केला असेल बरें ! 'उपयोगी'

---

How does it proceed ? Milton's descriptions have been driven out of my head by such elegant expressions as the following—

$$\text{Cos } x = 1 - \frac{x^2}{1.2} + \frac{x^4}{1.2.3.4.} - \frac{x^6}{1.2.3.4.5.6.}$$

$$\text{Tan } \overline{a+b} = \frac{\text{Tan } a + \text{Tan } b}{1 - \text{Tan } a \text{ Tan } b}$$

My classics must be Woodhouse, and my amusements summing an infinite series. Farewell, and tell Selina and Jane to be thankful that it is not a necessary part of female education to get a headache daily without acquiring one practical truth or beautiful image in return. Again, and with affectionate love to my Father, farewell wishes your most miserable and mathematical son T. B. MACAULAY.

—*Life & Letters*,—pp. 90-1.

१. संस्कृत व्याकरणाच्या अध्ययनास फार काळ कां लागतो यावद्दल 'लोकहितवादीं'नीं येणेंप्रमाणें आपला अभिप्राय प्रगट केला आहे:—

"एक व्याकरण ह्मणायास बारा चवदा वर्षे लागतात. त्याचें कारण हेंच आहे कीं, त्या प्रकरणीं वाद करण्यास शिकतात; ग्रंथ पाठ करतात; व प्रतिष्ठेकरितां वाद करितात !" आमचे रावबहादुर किती काळांत भाष्यान्त व्याकरण ह्मणण्याचा मक्ता घेतील ?

ह्मणजे काय? उपयोगित्वाची काय व्याख्या करायाची? 'जिवास, शरीरास, प्रपंचास' जें अवश्य लागेल तें उपयोगी हा जर सिद्धांत स्वीकारला, तर साऱ्या जगांत दोन विद्या मोठ्या उपयोगाच्या दिसतात. एक नांगऱ्याची, व दुसरी रोटीवाल्याची. अन्नावांचून जीव जगत नाहीं यास्तव धान्य जमिनींतून उत्पन्न केलें पाहिजे, व कच्चें धान्य मनुष्यास पचत नाहीं ह्मणून त्यास अग्निसंस्कार करून तें भक्षणीय केलें पाहिजे. याव्यतिरिक्त इतर ज्या हजारों विद्या व कला सर्व सुधारलेल्या देशांतून चालू आहेत त्या सर्व निरुपयोगीच ह्मटल्या पाहिजेत. उदाहरणार्थ बागाईत व गायनकला घ्या. 'लोकहितवादीं'च्या शिष्यास मोठ्या नंदनवनांत नेलें तरी तो भोंवतालचा सर्व देखावा पाहून ह्मणणार, "काय हो, काय हा धनाचा अपव्यय! हीं शेंकडों तऱ्हेचीं तुह्मीं फुलझाडें लावलीं आहेत त्यांच्यापासून उपयोग तो कोणता? या संगमरवरी दगडांच्या वाटा तुह्मीं केल्या आहेत व चंदनाचे मंडप उभे केले आहेत हा तुमचा कोण मूर्खपणा! या बागेचा धनी महामूर्ख आहे असें मी समजतों. या फुलांपासून, फळांपासून व कुंजांपासून अमुक अमुक उपयोग आहे असें मला कोणीं दाखवून द्यावें ह्मणजे मी खरें ह्मणेन. माझी येथें सत्ता असती तर मी तर या साऱ्या बगीच्यावर गाढवाचा नांगर फिरवला असता, व एक खासा भटारखाना येथें उठवून दिला असता!" गायनकलेच्या संबंधानेंही वरील राजश्रींच्या तोंडून वरच्यासारखेंच पांडित्य निघायाचें. मोठ्या तानसेनाच्या आवाजदारीपेक्षां जात्याचा घर्घर शब्द त्यांच्या कानास अधिक गोड लागेल; कां कीं, पहिला स्वर केवळ निष्फळ असून दुसरा मात्र चपातीच्या रूपानें फलद्रूप होणार आहे. तर 'जीव, शरीर व प्रपंच' यांचा जर अगदीं मूळचा अर्थ घेतला, तर चपातीवाल्याची पायरी तानसेनाच्या वरची होणार हें उघड आहे. 'जीव' व 'शरीर' शब्दांत जर इंद्रियगणाचाही अंतर्भाव केला तर वरील बगीचा व गायन हीं केवळ निरुपयोगी ठरणार नाहींत; कां तर, पहिल्यानें चक्षुरिंद्रियाची व दुसऱ्याच्या योगानें श्रोत्रेंद्रियाची तृप्ति आहे. पण ही मीमांसा एकदां सुरू झाली ह्मणजे ती कोठपर्यंत जाऊन थडकेल याचा नियम नाहीं. शरीरनिर्वाहापासून इंद्रियतृप्तीपर्यंत एकदां मजल येऊन पोंचली, कीं लागलीच पुढें 'उपयोगी' या विशेषणाच्या अर्थांत शिवडमरूंतून प्रगट झालेलीं चवदा सूत्रें, 'अवच्छेदकावच्छिन्ना'ची गर्दी, 'घटपटाची लटपट', व एकंदर 'पुरंदरचें बंड' हीं येऊन घुसलींच समजायाचीं! कारण मनुष्य हा चिदंश व जडांश या दोहोंचा संयोग होय; चिदंश ह्मणजे मन व जडांश ह्मणजे शरीर. मग एका अंशाला जेणेंकरून सुख होतें तो पदार्थ जर उपयोगी समजावयाचा, तर निदान तितक्याच मानानें दुसरा अंश जें मन त्यास आनंद देणाऱ्या वस्तुही उपयोगीच मानल्या पाहिजेत हें उघड आहे.[१] चपातीनें

१. केवळ प्रपंचनिर्वाहाच्या सुखाहून विद्याजन्य मानसिक सुखाची थोरवी किती आहे हें पुढील उताऱ्यावरून लक्षांत येईल:—

"Such are the charms to barren states assign'd:
Their wants but few, their wishes all confined;

(पुढें चालू.)

भूक निवते म्हणून ती जर उपयोगी, व गाण्यानें कर्णेंद्रियाचें समाधान होतें म्हणून तेंही जर उपयोगी तर बिचारें पाणिनीयच कशानें निरुपयोगी झालें ! पाणिनीयाचें अध्ययन करणारास त्यापासूनही आल्हाद होतो. आमच्या रावबहादुरांसारख्या महापंडितांस "अंतीं 'च' असला काय, आणि 'चा' असला काय" याची कांहींच क्षिति नाहीं हें उघड आहे; पण त्यांच्या अभिप्रायावरून जर मुनित्रयाची किंमत करायाची, तर एकाद्या नांगऱ्याच्या हातून तानसेनाला सर्टिफिकिट पोंचवलें पाहिजे !

३. वरील महासिद्धांताचें प्रणयन करण्यापूर्वीं 'लोकहितवादीं'नीं दुसरीही एक मोठी गोष्ट लक्षांत आणायाची होती ती ही कीं, व्याकरण, न्याय, मीमांसा, अलंकार यांचा 'जिवास, शरीरास व प्रपंचा'स जितपत उपयोग नाहीं, तितपतच हल्लीं मराठी शाळांतून, हायस्कुलांतून, व कॉलेजांतून जे विषय, पांचपांचशे हजार हजार रुपयांचे मास्तर व प्रोफेसर शिकवतात, त्यांचाही नाहीं. वरील सर्व विषय जसे संस्कृतांत आहेत, तसेच इंग्रजींत व एकंदर युरोपांतील साऱ्या नव्या जुन्या भाषांतूनही आहेतच आहेत. 'न्याया'च्या जागीं 'लॉजिक्' झटलें, 'अलंकारा'च्या ऐवजीं 'ऱ्हेटरिक्' शब्दाचा प्रयोग झाला, कीं वरील विद्यांचा अनुपयुक्ततेचा दोष चटदिशीं उडून त्या लागलींच उपयुक्त बनल्या काय ! रावबहादुरांच्या चिरंजिवांपैकीं कोणी वैयाकरण, नैयायिक किंवा मीमांसक बनला असता तर त्या गोष्टीची त्यांस अत्यंत लज्जा वाटली असती हें उघड आहे; वरील कल पाहतांच बहुधा त्यांनीं फ्रेडरिक् दि ग्रेट् याच्या तीर्थरूपांचें अनुकरण केलें असतें.[१] पण इंग्रजी व्याकरण,

Yet let them only share the praises due,
If few their wants their pleasures are but few;
For every want that stimulates the breast,
Becomes a source of pleasure when redrest.
Whence from such lands each pleasing science flies,
That first excites desire, and then supplies;
Unknown to them, when sensual pleasures cloy,
To fill the languid pause with finer joy;
Unknown those powers that raise the soul to flame,
Catch every nerve, and vibrate through the frame."

—*The Traveller* (*The Swiss*).

[ *ll 209–220 'Ed'* ]

१. "The Latin was positively interdicted. "My son," His Majesty wrote, "shall not learn Latin; and more than that, I will not suffer any body even to mention such a thing to me." One of the preceptors ventured to read the Golden Bull in the original with the Prince Royal. Frederic William entered the room, and broke out in his usual kingly style.—

"Rascal, what are you at there?"

(पुढें चालू.)

इंग्रेजी न्याय, इंग्रेजी अलंकार शिकून 'ग्रॅजुएट' पदाला पोंचणें हें वरीक अत्यंत भूषणास्पद होय नव्हे! शालजोडी व गाउन् यांमध्यें वस्तुत: इतकें अंतर आहे काय! आह्मांस तर दोहोंत येवढा मोठा फेर कोणता आहे तो समजत नाहीं. पंधरा वर्षें अध्ययन केलेला जुना पंडित बाजारांत उभा केला असतां तो जितक्या किंमतीला जाईल त्याहून बारा वर्षें डोके-फोड करून एम्. ए. बनलेला अर्वाचीन विद्वान् अधिक मोलानें विकेल असें 'लोकहितवादीं'स वाटतें काय? वरील गोष्ट हल्लींच्या काळीं तर सर्वांच्या चांगली प्रत्ययालाही येत चालली आहे हें सुप्रसिद्धच आहे. भूगोलच्या भूगोल तोंडपाठ करा, साऱ्या इतिहासांतल्या कर्मकट-कटींची संथा घ्या, व्याकरण घोटघोटून त्याच्या आवृत्ति करा, शून्यलब्धीपर्यंत माराकूट करून मजल मारा; आणि शेवटीं फळ पाहिलें तर काय,—शून्यलब्धिच! रावबहादुर मोठ्या डौलानें हा प्रश्न प्राचीन पंडितांपुढें टाकतात, कीं पंधरा वर्षें व्याकरण झटल्यापासून अमुक अमुक उपयोग आहे असें मला कोणीं सांगावें; आह्मीही त्यांस प्रतिपृच्छा करतों कीं, चारी खंडांचा भूगोल वगैरे घडघड ह्मणतां आल्यापासून तरी काय फायदा आहे! साऱ्या पृथ्वींतील नद्या तोंडांत बसल्या, तरी त्यांतील एकही तहानेच्या वेळीं उपयोगीं पडेल काय? शिकंदर बादशाहाचा किंवा नेपोलियनचा पराक्रम वर्णिला तर दोघांच्यापासूनही एका छदामाची तरी प्राप्ति होणारी आहे काय? अवघ्या देशांतील उत्पन्नाच्या यादी मुखोद्गत झाल्या, ह्मणून अजरावाच्या खजिन्यांत चौदा कोटि मोहोरांची रास जशी रात्रींच्या रात्रीं अचानक येऊन पडली, तसें आमच्या कोठारांत होईल काय? माजी गव्हर्नर् साहेबांनीं मोठें दयाळू होऊन बी. ए. ची परीक्षा झालेल्या नवीन विद्वानांची मामलेदार कचेरींत योजना केली; तेथें त्यांस वर्षानुवर्षे घोकलेल्या विषयांपैकीं एकाचा तरी उपयोग होतो काय? कधीं जन्मांत बोरूच्या पेराचा संस्कार नाहीं, व लेखणी कशी करावी हें माहीत नाहीं; मग शंकुच्छेदाचा एकादा सिद्धांत तर तेथें लावायाचा नसेलना? तेव्हां एकंदरींत पाहतां शास्त्रविद्येच्या अनुपयुक्ततेच्या संबंधानें जें 'लोकहितवादीं'नीं प्रतिपादन केलें आहे, तेंच सारें अर्वाचीन शिक्षणपद्धतीसही तंतोतंत लागणारें आहे. मग एकीच्याच नांवानें तेवढी सदोदित हाकाटी करीत बसावी हा केवढा अन्याय आहे!

मेकॉले साहेबांनीं इ० स० १८३४ सालीं प्राच्यदेशीय विद्येची पाश्चात्य विद्येशीं तुलना करून पहिली केवळ निरर्थक ह्मणून जो साहेबी पेनाच्या सफाईत शेरा झोंकून दिला, त्यांत त्यांनीं मोठी जबरदस्त ह्मणून ही कोटि सरकारच्या नजरेस आणली कीं, संस्कृत किंवा फारसी ग्रंथ पढून त्यांपासून पढणारासही कांहीं उपयोग पुढें घडत नाहीं, व लोकांचाही

---

"Please your Majesty," answered the preceptor, "I was explaining the Golden Bull to his Royal Highness."

"I'll Golden Bull you, you rascal!" roared the Majesty of Prussia. Up went the King's cane; away ran the terrified instructor; and Frederic's classical studies ended for ever.'' —*Macauly's Essays*.

कांहीं फायदा होत नाहीं. ही कोटि किती शुष्क आहे हें वरील विवेचनावरून सहज लक्षांत येईल. हल्लींच्या सरकारानें जसें विद्याखातें उत्पन्न करून त्यांत इंग्रेजी भाषेच्या द्वारें लोकशिक्षणाची पद्धति सुरू केली आहे, त्याप्रमाणेंच संस्कृताच्या व फारसीच्या द्वारेंही लोकांस ज्ञानप्राप्तीचें साधन करून देतां आलें नसतें काय? हल्लीं जसे इंग्रेजी प्रोफेसर्, गणिताचे प्रोफेसर, तर्कशास्त्राचे प्रोफेसर् यांच्या नेमणुका झाल्या आहेत, त्याप्रमाणेंच व्याकरणन्यायादिशास्त्रांचें अध्यापन करण्यास पंडित व मुनशी यांची योजना करण्यास कांहीं मोठी पंचाईत पडती असें कांहीं नाहीं. आतां येवढी गोष्ट अवश्य कबूल केली पाहिजे, कीं आलीकडे पदार्थविज्ञानाच्या संबंधानें पुष्कळ अधिक शोध झाला आहे, व इतिहासाचें अंग संस्कृत विद्येस मुळींच कमी आहे; पण शेक्स्पीयरच्या जागीं कालिदास, टॉड्हंटर्च्या जागीं भास्कराचार्य, मिल्ल्च्या जागीं गदाधरभट्ट, मिल्टन्च्या जागीं फर्दोशी असा कांहीं मोबदला होता, तर कांहींच उपयोग न होता हें म्हणणें निवळ दांडगाईचें आहे! त्यांतून वरील लॉर्ड् साहेबांची फर्डेशाई चालली असतां त्यांच्या हातचें कलम हिसकावून घेऊन त्यांस कोणीं असें कसें विचारलें नाहीं कोण जाणे?-कीं, "पंडित महाराज, आपण संस्कृत, फारसी, आरबी भाषेंतील ग्रंथांचें हार्द पुरतेपणीं काढून आपली तारतम्यशक्ति पूर्णपणें प्रगट केली खरी, व वरील भाषांतील ग्रंथ कवडीच्या मोलाचेही नाहींत, त्यांतील पदार्थविज्ञान, ज्योतिष, भूगोल, वैद्यक वगैरे सर्व चुकलेलें आहे, हें आपलें पांडित्य सर्व खरें आहे; पण आपण आह्मांस येवढें सांगा पाहूं, कीं पाश्चात्यांच्या सुधारणेस मूलस्तंभभूत जे ग्रीक् व लॅटिन् भाषेंतील ग्रंथ त्यांत कितपतसा भूगोल आहे, कितपतसें ज्योतिष आहे, कितपतसें पदार्थविज्ञान आहे? न्यूटन्चे ज्योतिषांतील व दर्शनानुशासनांतील सिद्धांत, फ्रँक्लिन्चे विद्युत्प्रयोग, छापखाना, होकायंत्र, आगगाडी, तारायंत्र, प्रकाशालेख्य, वगैरे सर्व जर सुधारणेचीं आवश्यक अंगें होत, तर जुने ग्रीक् व रोमन् यांस रानटी लोकांतच सामिल केलें पाहिजे. मग हा काय बरें चमत्कार आहे, कीं वरील लोकांचे ग्रंथ अद्याप विलायतेंतील व सर्व युरोपांतील विद्यालयांतून शिकवण्याचा तडाका चालूच आहे! कांहीं शतकांपूर्वी पाश्चात्य राष्ट्रें अज्ञान व रानटी होतीं तेव्हां प्लेटो, ॲरिस्टॉटल्, लिव्ही, सिसरो वगैरे मंडळीचें माहात्म्य होतें तें ठीकच होतें; पण आज एकोणिसाव्या शतकांत सुधारणुकेचा प्रकाश साऱ्या युरोपखंडांत आणि त्यांतून श्वेतद्वीपांत येवढा कोंदला असतां अजूनही वरील रानटी ग्रंथकारांची पहिल्यासारखीच चहा राहावी हें केवढें आश्चर्य आहे!" त्यांतून खुद्द साहेबांसच ग्रीक् व रोमन् ग्रंथकारांनीं कितीं वेडावून टाकलें असे हें कोणास सांगितलें तर खरें तरी वाटेल काय? त्यांच्या भाच्यानें जें त्यांचें चरित्र लिहिलें आहे तें वाचलें असतां होमर्, प्लेटो, थुसिडिडीज् इत्यादिकांच्या कृतींचीं पारायणें त्यांनीं कितीदां केलीं याचा ठिकाण लागत नाहीं![1] मग नाहीं नाहींत ते वेडगळ आक्षेप प्राच्य ग्रंथांवरच आणून इकडील विद्या

---

१. ग्रीक् लोकांच्या विद्येविषयीं वरील ग्रंथकाराचें किती विलक्षण प्रेम होतें हें त्यानेंच स्वतः एके ठिकाणीं बोलून दाखवलें आहे:—

(पुढें चालू.)

तेवढ्या सफाई बुडवल्याचें श्रेय जें साहेब बहादुरांनीं घेतलें, व नेटिव बहादुरांच्या अप्रयोजक लेखांस आपला अज्ञानमूलक व दुराग्रहप्रचुर लेख कारणीभूत केला, ही प्राच्य राष्ट्रांची त्यांनीं केवढी थोर आगळीक केली बरें ! साऱ्या पाश्चात्य राष्ट्रांतून जर ग्रीक् व लॅटिन्

---

"Of the indifference which Mr. Mitford shows on this subject I will not speak; for I cannot speak with fairness. It is a subject on which I love to forget the accuracy of a judge, in the veneration of a worshipper and the gratitude of a child. If we consider merely the subtlety of disquistion, the force of imagination, the perfect energy and elegance of expression which characterise the great works of Athenian genius, we must pronounce them intrinsically most valuable; but what shall we say when we reflect that from hence have sprung directly or indirectly, all the noblest creations of the human intellect; that from hence were the vast accomplishments and the brilliant fancy of Cicero; the withering fire of Juvenal; the plastic imagination of Dante; the humour of Cervantes; the comprehension of Bacon; the wit of Butler; the supreme and universal excellence of Shakspeare? All the triumphs of truth and genius over prejudice and power, in every country and in every age, have been the triumphs of Athens. Wherever a few great minds have made a stand against violence and fraud, in the cause of liberty and reason, there has been her spirit in the midst of them; inspiring, encouraging, consoling;—by the lonely lamp of Erasmus;* by the restless bed of Pascal;† in the tribune of Mirabeau;‡ in the cell of Galileo;¶ on the

(पुढें चालू.)

* Erasmus, Desiderius (१४६६–१५३६) विख्यात डच् तत्त्वज्ञानी व विद्वान्. त्याच्याबद्दल विनोदानें असें ह्मणण्यांत येई कीं त्यानें घातलेलें अंडें ल्यूथर्नें पुढें उबविलें. तो अत्यंत वादकुशल असून तत्कालीन प्रागतिक लोकमतावर त्याचें चांगलेंच वजन होतें असें ह्मणतात.

'सम्पादक'

† *Pascal, Braise* (१६२३–१६६२) विख्यात फ्रेंच् तत्त्वज्ञानी. 'Provincial letters' मध्यें त्याची बुद्धिमत्ता चांगलीच दिसून येते या ग्रंथाचे सर्व यूरोपीय भाषांत भाषांतर झालें आहे. हा विख्यात गणिती असून हायड्रोस्टॅटिक्स् (जलस्थितिशास्त्र)चे व वायुविद्येचे (Pneumatics) अनेक प्रयोग यानें केल्याची आख्यायिका आहे. 'सम्पादक'

‡ Mirabeau, Gabriel, Comtede (१७४९–१७९१) फ्रेंच् राज्यक्रांतींतील एक पुढारी व विख्यात वक्ता. त्याला थोडें अधिक आयुष्य लाभतें तर फ्रेंच् राज्यक्रांतीचे अखेर अखेर झालेले अत्याचार व अनाचार त्यानें होऊं दिले नसते इतकें त्याचें वजन होतें. 'सम्पादक'

¶ Galileo (१५६४–१६४२) विख्यात इटॅलियन् खगोलशास्त्रज्ञ. पिसा येथें जन्मला. यानेंच प्रथम दुर्बीण तयार करून ज्योतिःशास्त्राचें तद्द्वारां चांगलेंच अध्ययन केलें. पिसाच्या कॅथेड्रल्च्या शिखरावरून लोंबत सोडलेला दिवा बालपणीं पाहतांच लंबकाच्या आंदोलनाच्या सिद्धांताचा यानें शोध लावला. 'सम्पादक'

विद्यांच्या अध्ययनाचीं विद्यालयें आहेत व शाळाही आहेत[१], व त्यांच्या प्रीत्यर्थ लाखों रुपयांचा खर्च प्रतिवर्षी चालू आहे, तर येथील एक पाठशाळा तेवढी आमच्या सरकारास जड व्हावी हा केवढा चमत्कार आहे ? वेदांची आवृत्ति इंग्लंडांत निघावी, व पाणिनीचा जीर्णोद्धार जर्मनींत व्हावा, आणि आमच्या इकडच्या महापंडितांनीं पाठशाळा मोडल्याचें श्रेय घेऊन हें 'एक पुरंदरचें बंड मोडलें' ह्मणून नाचूं लागावें हें या आर्यभूमीच्या पुत्रांस केवढें भूषण होय[२] ! !

---

scaffold of Sidney.$ But who shall estimate her influence on private happiness ? Who shall say how many thousands have been made wiser, happier and better, by those pursuits in which she has taught mankind to engage: to how many the studies which took their rise from her have been wealth in poverty,—liberty in bondage,—health in sickness,—society in solitude ? Her power is indeed manifested at the bar, in the senate, in the field of battle, in the schools of philosophy. But these are not her glory. Wherever literature consoles sorrow, or assuages pain,—wherever it brings gladness to eyes which fail with wakefulness and tears, and ache for the dark house and the long sleep,—there is exhibited, in its noblest form, the immortal influence of Athens."

—*Mitford's History of Greece.*

$ Sidney or Sydney, Algernon (१६२२-१६८३) लीस्टरच्या दुसऱ्या अर्लचा मुलगा सिव्हिल् वॉर् मध्यें क्रॉम्वेलच्या हाताखालीं असतां यानें अनेक पराक्रम गाजविले. प्रोटेक्टरेट नापसंत असल्यामुळें कॉम्वेलच्या राज्यकारभारांत त्यानें भाग घेतला नाहीं; रेस्टोरेशन्‌नंतर कित्येक वर्षे तो परदेशांत राहिला. १६७७ सालीं सर्व अपराधांची क्षमा मिळून त्याला इंग्लंडांत येण्याची परवानगी मिळाली. पण १६८३ सालीं राय हाऊस प्लॉटशीं संबंध असल्याचा आरोप त्याच्यावर ठेवण्यांत येऊन त्याच्याविरुद्ध पुरावा मुळींहि नसतां (Jeffreys) जेफ्रेनें त्याला शिरच्छेदाची शिक्षा सुनावली व त्याप्रमाणें १६८३ सालीं त्याचा शिरच्छेद झाला. 'सम्पादक'

१. युरोपखंडांत आज जो येवढा विद्येचा उत्कर्ष झाला आहे त्यास कारण ग्रीक् व लॅटिन् भाषेंतील ग्रंथ होत. इ० स० १४५३ सालीं तुर्क लोकांनीं कस्तुंतुनिया शहर हस्तगत करून रूम शामची गादी घेतली तेव्हां हजारों जुने पंडित आपापले ग्रंथ खांदाडीस मारून दूरदूर देशीं पळाले. पुढें त्यांच्या अध्यापनामुळें वरील प्राचीन विद्येचा संस्कार साऱ्या युरोपखंडास घडला. तेव्हांपासून हळू हळू इंग्लिश्, फ्रेंच्, इटॅलियन् वगैरे अर्वाचीन भाषा सुधारत चालल्या, व त्यांत ग्रंथसंग्रही होऊं लागला. सोळाव्या शतकांत जी धर्मक्रांति झाली तीस कारण वरील विद्याप्रसारच होय.

२. युरोपीय पंडितांची संस्कृत विद्येवर जी भक्ति आहे तिचा शतांशही इकडे आढळत नाहीं. उदाहरणार्थ पुढील उद्गार पाहा:—

"So much in answer to objections which have repeatedly been made against Indian Logic. I should like to see the Brahmans themselves take up the gauntlet and defend their Logic against the attacks of European

(पुढें चालू.)

४. शास्त्रविद्या कांहीं उपयोगाची नाहीं हा निर्णय 'लोकहितवादीं'नीं कदाचित् आपल्या मंडळीची स्थिति व शास्त्रीमंडळीची स्थिति यांची परस्पर तुलना करूनही केला असेल. त्यांस वाटत असेल कीं सुधारलेली इंग्रेजी विद्या शिकल्याचें फळ पाहा, आणि वेडगळ शास्त्रांचें मूर्खपणानें अध्ययन केल्याचें तरी फळ पाहा! पंडितांनीं शास्त्रांची कुटाकूट करून दहा दहा वीस वीस वर्षें घालवावीं, आणि शेवटीं फळ काय, तर शालजोडी खांद्यावर टाकून सभेला जावें, आणि हातावर पावली पडली तर मोठें भाग्य मानावें! तीच आमच्या नवीन इंग्रेजी विद्वानांची बडेजाव पाहा, राजविद्याभूषित झाले कीं, खुद्द गव्हर्नर् साहेबांच्या हातून त्यांच्या स्वदस्तुरचें चर्मपत्र मिळायाचें, चोहोकडे विद्वत्तेचा जयजयकार व्हावयाचा, तिसऱ्या प्रतीच्या सरदारांत नांव पडायाचें आणि कोणी मामलेदार, कोणी डेप्युटी कलेक्टर्, कोणी हेड्मास्तर, कोणी सदरअमीन, अशा अधिकारांवर आरूढ होऊन घरोंदारीं पैशाचा पाऊस पडायाचा! मेकॉले साहेबांच्या पूर्वनिर्दिष्ट लेखांत असाच कोटिक्रम केलेला आहे. आतां यांत कितपत अर्थ आहे हें कोणी सामान्य अकलेचा मनुष्य सुद्धां सांगूं शकेल. आमच्या सरकारच्या मनांत पाश्चात्य विद्येस होईल तेवढें उत्तेजन द्यावयाचें होतें ह्मणूनच वरील प्रकार आजपर्यंत दृष्टीस पडला हें उघड आहे. बडोद्याचे राजे माजी खंडेराव गायकवाड यांनीं मनांत आणलें असतें, कीं आपल्या राज्यांत जो जो कामगार नेमायाचा तो उत्तम कुस्तेगीर असला तरच नेमायाचा तर चाललें नसतें काय? युनिव्ह-

---

critics....................Indian philosophy therefore should not be attacked at random. Thales† or Empedocles* can be criticised in the schools with impunity, but Kanâda and Goutama may still find champions in India, if not in Europe." —*Max Muller*.

† *Thales* थेल्स् हा आयोनिक् तत्त्वज्ञानी होय. सात द्रष्टयांपैकीं (Seven sages) एक अशी त्याची कीर्ति होती. हा मिलेटस् (Miletus) येथें ख्रि. पू. ६३६ च्या सुमारास जन्मला व ख्रि. पू. ५४६ च्या सुमारास मेला. लिडियन् राजा (Alyattes) ॲलिॲटस् याच्या कारकिर्दीतील सूर्यग्रहण त्यानें आगाऊ वर्तविलें होतें असें ह्मणतात. क्रोसस् (Croeses) च्या कारकिर्दींत (Halys) हॅलिस् नदीच्या प्रवाहाची दिशा यानें बदलली अशीहि आख्यायिका आहे. तत्त्वज्ञान व गणित यांच्या अभ्यासाची ग्रीसमध्यें यानेंच सुरुवात केली. जल हें वस्तुमात्रांतील आदितत्त्व आहे (पाण्यापासून वस्तुमात्राची उत्पत्ति, व त्यांतच सर्वांचा लय होणार) असें त्याचें मत होतें. थेल्सनें ग्रंथ वगैरे मुळींच लिहून ठेवलेले नाहींत. 'सम्पादक'

* Empidocles हा सिसिलींतील ॲग्रिजेंटम् (Agrijentum) शहरचा तत्त्वज्ञानी. हा ख्रि. पू. ४४४ च्या सुमारास होऊन गेला. हा वक्तृत्वकुशलहि होता व रोग बरे करण्याच्या कामीं याच्या हातास यश येत असल्यामुळें लोक त्याला मांत्रिक (Magician) मानीत. त्याच्या मरणाची कथाहि त्याच्या चरित्राइतकीच विलक्षण आहे. एट्ना नामक ज्वालामुखी पर्वताच्या आगीच्या वर्षावांत यानें उडी टाकल्याची आख्यायिका आहे. याचे सर्व ग्रंथ कविताबद्ध असून त्यांचे कांहीं अवशेष आज उपलब्ध आहेत. ल्यूक्रेटियस् (Lucretius) नें एंपिडॉक्लस् हा आपणापुढें आदर्श ह्मणून ठेवला होता. प्रो. बर्नेट्नें त्याच्या कांहीं काव्यांचें इंग्रजींत भाषांतर केलें आहे.

'सम्पादक'

सिटींच्या परीक्षा चालतात तसाच वर्षांतून एकदां तालीमबाजांचा मोठा आखाडा पाडला असता ह्मणजे झालें असतें. आतां येवढें खरें आहे, कीं सेनाखासखेल साहेबांनीं वरील पद्धति सुरू केली असती तर सर्वांनीं हाकाटी केली असती, व मराठी दरबारच्या मूर्खपणाचा ज्यानें त्यानें यथेच्छ उपहास केला असता; आणि त्यांतून प्रस्तुत ग्रंथकारानें तर असली अमोलिक संधि कधींच फुकट दवडली नसती. हल्लीं ते आपल्या ग्रंथांतून जागोजाग जशी मल्हारराव महाराजांची कीर्ति गाऊन आपल्या राजनिष्ठेस वारंवार उज्ज्वल करतात, त्या-प्रमाणेंच खंडेराव महाराजांवरही त्यांनीं यथेच्छ भंडार उधळला असता! पण वस्तुत: पाहतां आमची तर मनोदेवता अशी वाहते कीं, कान धरून मल्लखांबावर उडी मारशील तर तुला मामलत देऊं किंवा अमुक अमुक पकड करशील तर तुला सरसुभा करूं, या ह्मणण्यांत जितपत शहाणपण आहे, तितपतच ग्रहणांच्या उपपत्ति शिकून ये तेव्हां तुला बारनिशीवर घालूं, किंवा शंकुच्छेद सगळा करून ये तेव्हां तुला अव्वल कारकून करूं, या ठरावांतही आहे! पण हें बोलून उपयोग काय? 'लोकहितवादीं'च्या तत्त्वज्ञानाचे दोन† महासिद्धांत कोणते ते मागें सांगण्यांत आलेच आहेत. तेव्हां त्यांस अनुसरून ह्मटलें ह्मणजे वरील प्रकार ठीकच आहेत.

---

विशेषतः सर्वविदां समाजे विभूषणं मौनमपण्डितानाम्॥ १

'नीतिशतक',(७ उत्तरार्ध, 'सं०')—भर्तृहरि

अंक ७१—(१) विषयोपन्यास. (२) जुन्या पंडितांवर आक्षेप—वितंडवाद. (३) व्यवहार-शून्यत्व. (४) इतर दूषणें.

---

१. "विशेषेंकरून सर्वशास्त्रनिपुण पंडितांच्या समाजांत अपंडितास परम भूषण ह्मटलें ह्मणजे मौन हेंच होय!'

† (१) आह्मीं आपलें प्राचीन वैभव आपल्या मूर्खपणानें घालवून आतां व्यर्थ हांका मारीत बसलों आहों व इतकी निकृष्ट स्थिति प्राप्त होऊन साऱ्या जगांत केवळ नादान ठरलों असतां व परकी लोकांच्या लाथा खात असतां निलाजऱ्यांसारखे अद्याप सुस्त होऊन पडलों आहों.

(२) प्राचीन ऋषिपरंपरेपैकीं शेवटला ऋषि निजधामास गेला तेव्हांपासून तीन हजार वर्षें अकलेची व आमची जी फारकत झाली ती आमच्या मागल्या पिढीपर्यंत व पुण्यांत इंग्रजी अंमल होऊन माजी बुधवारच्या वाड्यांत इंग्रजी शाळेची स्थापना झाली तेव्हां काय ती अक्कल पुन: या देशांत आली.

लोकहितवादींचे हे दोन महासिद्धांत थोडक्यांत सांगावयाचे झाल्यास असे सांगतां येतील:—

(१) हिंदु ह्मणजे मूर्खांतले मूर्ख,

आणि (२) अकलेचे वांटेकरी ह्मटले ह्मणजे इंग्रज लोक, मिशनरी, बाटगेमंडळी, व इंग्रेजीचा संस्कार झालेले नवीन विद्वान्. 'सम्पादक'

१. मागील अंकांत 'लोकहितवादीं'चे या देशांतील प्राचीन विद्येवर काय काय अभिप्राय आहेत ते दाखल करून त्यांवर चर्चा केली. आतां वादविषयक लेखांत जुन्या पंडितांच्या संबंधानें त्यांनीं जे अनेक उल्लेख केले आहेत त्यांच्या संबंधानें विचार करूं.

२. प्रस्तुत ग्रंथकाराचा जुन्या शास्त्रीमंडळीवर पहिला आक्षेप हा आहे कीं, ते वितंडवादी असतात. त्यांस सत्याची बिलकुल पर्वा नसते, तर कोणत्या तरी युक्तीनें प्रतिपक्ष्याचा पराजय करून आपण प्रतिष्ठा मिळवावी येवढाच त्यांचा हेतु असतो. या आक्षेपाच्या संबंधानें आह्मी रावबहादुरांस असें विचारतों कीं, सर्वच शास्त्री असे हटवादी त्यांस आढळले काय? तसेंच, शास्त्राध्ययन व हटवादित्व या दोहोंत नित्य कार्यकारणभाव आहे असेंही त्यांच्यानें सिद्ध करून देववेल काय? शिवाय तिसरी गोष्ट ही कीं वरील वितंडवादाचा प्रकार शास्त्रीमंडळीखेरीज इतर ठिकाणीं त्यांच्या कोठेंच नजरेस आला नाहीं काय? आरोपीवर वरील चार्ज शाबीत होण्यास वरील तिन्ही प्रश्नांचा उलगडा झाला पाहिजे; तो आमचे रावबहादुर कोणत्या तऱ्हेनें करतील हें आज कांहींच सांगवत नाहीं. यास्तव त्यांच्या संबंधानें आमचें काय ह्मणणें आहे तें वाचकांस कळवतों.

वर जो दुराग्रहाचा प्रकार 'लोकहितवादीं'नीं बिचाऱ्या शास्त्रीमंडळीच्याच तेवढा माथीं मारून टाकला आहे तो वस्तुतः पाहतां जेथें जेथें विद्वत्तेचा प्रकार आहे तेथें तेथें आढळायाचाच. मनुष्यांत प्रायः अहंबुद्धीचें अतिशयित प्राधान्य असल्यामुळें अगदीं अडाणी लोकांत सुद्धां हटवादीपणाचा प्रकार आढळत नाहींसें नाहीं. आमच्या रावबहादुरांनीं 'इसापनीती'तील सरड्याची गोष्ट जर कधीं वाचली असेल, व तिचें तात्पर्य काय आहे हें लक्षांत आणलें असेल, तर 'महामूर्ख' शास्त्र्यांच्या ठायीं वरील प्रकार आढळतो याविषयीं त्यांस आश्चर्य वाटण्यास कांहीं कारण उरणार नाहीं. अमुक अमुक गोष्ट अशी आहे आणि अमुक अमुक गोष्ट अशी नाहीं, येवढ्यावरूनच वादास प्रवृत्त झाल्याचा किंबहुना मारामारीवर आल्याचा, प्रकार प्रस्तुत ग्रंथकाराच्या कधीं नजरेस आला नसेल काय? मग मनुष्यस्वभावासच जो गुण खिळलेला तो कांहीं मनुष्यांत आढळतो येवढ्यावरून त्यांसच त्या दोषाचे भागीदार करणें ही किती अन्यायाची गोष्ट आहे! जुने पंडित तर 'महामूर्ख'च, त्यांची गोष्ट राहूं द्या; पण रावबहादुरांच्या नव्या पद्धतीचे कोरे करकरीत दोन चार विद्वान् घेतले समजा, तर त्यांचीं सर्वांचीं मतें तरी सारीं एकसारखीं असें आढळेल काय? तसेंच, आपल्या विद्वत्तेच्याच सदोदित घमेंडींत असावें, याला काय समजतें, त्याला काय येतें, अशा वल्गना कराव्या, सभेंत नेहेमी आपली शेखी मिरवण्याचा यत्न करावा, इत्यादि प्रकार 'लोकहितवादीं'स जसे शास्त्रीमंडळींत आढळले असतील तसेच आलीकडील मंडळींत आढळले नसतील काय? जॉन्सन् वाद करतांना कधीं हार घेत नसे, आपला पक्ष खोटा आहे असें जरी त्यास माहीत असलें तरी तो खरा करून दाखवण्यास तो झटत असे, ही गोष्ट रावबहादुरांच्या कानावर कधीं आली नाहीं काय? विलायतेंतील मासिक त्रैमासिक पुस्तकांची व वर्तमानपत्रांची नेहेमी झटापट चालत असते हेंही त्यांनीं कधीं पाहिलें नाहीं

काय ? तर विद्येचा जेथें ह्मणून प्रचार आहे, तेथें वितंडवाद, लब्धप्रतिष्ठा वगैरे प्रकार कोणाकोणामध्यें आढळायाचेच. ह्मटलें आहे:—

विद्या विवादाय धनं मदाय । शक्तिः परेषां परिपीडनाय
खलस्य साधोर्विपरीतमेतत् । ज्ञानाय दानाय च रक्षणाय ॥[१]

तर विद्या प्राप्त झाली असतां ज्याशीं त्याशीं वाद करण्याची हौस, आपलें पांडित्य लोकांपुढें मिरवण्याची सदोदित इच्छा, 'मी केवढा विद्वान् माझ्यासारखा विद्वान् त्रैलोक्यांत नाहीं' असा गर्व, यच्चयावत् सृष्टि मूर्खांनीं भरलेली दिसणें, हे प्रकार स्वभावपरत्वें व बुद्धिपरत्वें पुष्कळांमध्यें आढळायाचेच. वरील गोष्टींचा प्रत्यय पाहण्यास आमच्या रावबहादुरांस इतकें दूर कशाकरतां जावें लागलें कोण जाणे ! पण सुबंधूनें 'वासवदत्ते'च्या प्रस्तावनेंत ह्मटलें आहे:—

गुणिनामपि निजरूपप्रतिपत्तः परत एव सम्भवति ।
स्वमहिमदर्शनमक्ष्णोर्मुकुरतले जायते यस्मात् ॥[१]

पण हे पुरंदरचे रामोशी आह्मी आनरेबल साहेबापुढें आणून काय वेड्यासारखे उभे करतों ! !

'लोकहितवादी' शास्त्रविद्येचा उपहास करून ह्मणतात—"त्यांची विद्या अशी असते कीं, एकानें ह्मणावें, या शब्दाचे अंतीं 'च' असावा; दुसऱ्यानें ह्मणावें, 'चा' असावा. याविषयीं वाद शेंकडों प्रमाणें दाखवून सर्व दिवसभर करतात. शेवटीं निश्चय एकाचाही होत नाहीं. तसेंच नैयायिक हेही भांडतात. एक ह्मणतो, ईश्वर आणि जीव एक आहे, दुसरा ह्मणतो, दोन्ही विभक्त आहेत. तिसरा ह्मणतो, ईश्वर गुणी आहे, चवथा ह्मणतो, निराकार आहे. याप्रमाणें रिकामा वाद चालविण्यांत जन्म घालवितात आणि त्यांस या वादांतील सत्य काय आहे हें समजण्याची इच्छा नसते." वरील वाक्यांत आमच्या रावबहादुरांनीं आपलें शास्त्रज्ञान दाखवण्याचा यत्न केला आहे. हें शास्त्रज्ञान 'ज्ञानोदया'सारख्या पत्रांत किंवा माजी 'सत्यदीपिके'सारख्या मासिक पुस्तकांत आलें असतें, तर शोभलें असतें; पण प्रस्तुत ग्रंथकारासारख्या बहुश्रुत व विद्वान् ह्मणवणाऱ्या गृहस्थानें असा निरर्गल प्रलाप करावा हें खरोखर अत्यंत खेदास्पद होय. एकूण च मध्यें आणि चा मध्यें कांहीं अंतर नाहीं ना ? हें अंतर नाहीं तर सर्व वैयाकरण महामूर्खच समजले पाहिजेत. प्रस्तुत ग्रंथकाराचा निर्देश कर्तव्य असतां 'तो', 'ती', किंवा 'तें', या तिहींपैकीं कोणत्याही अक्ष-

---

१. "विद्या आली कीं वादास प्रवृत्त व्हावयाचें, धनप्राप्ति झाली कीं मदोन्मत्त व्हावयाचें, शरीरसामर्थ्याचा उपयोग दुसऱ्यास पीडा देण्यामध्यें करायाचा; हीं लक्षणें दुष्टाचीं होत. सज्जनाचा प्रकार वेगळा. तो विद्येपासून ज्ञान जोडतो, धनाचा विनियोग दानाकडे करतो आणि शक्तीचा उपयोग दुसऱ्याचा बचाव करण्याकडे करतो."

१. "गुणिजनांसही आपल्या गुणाचें ज्ञान दुसऱ्यापासूनच व्हावयाचें; पाहा कीं, डोळ्यांस आपलें स्वरूप समजायाला आरसाच पाहिजे !"

राचा उच्चार केला असतां आमच्या रावबहादुरांस चालेना ! एकूण बिचाऱ्या दादोबानें आपल्या थोरल्या व्याकरणाच्या आरंभीं व्याकरणशास्त्राच्या उपयुक्ततेच्या संबंधानें येवढें पांडित्य जें केलें आहे तें सारें फुकटच ! तसेंच हेंही आम्हीं आज नवेंच ऐकलें कीं पाणिनि, पतंजलि, वगैरे मंडळीनें जें येवढें भारूड करून ठेवलें आहे त्यांत निश्चयात्मकता म्हणून कांहीं नाहीं. भाग्य बिचाऱ्या शास्त्रकारांचें ! त्यांनीं संस्कृत भाषा सारी धुंडाळून काढून तिचा पक्का छडा काढला, तरी शेवटीं खापर फुटायाचें तें फुटलेंच[1] ! इतर शास्त्रांचेंही मंथन करून लोकहितवादींनीं केवढा जाडा सिद्धांत काढला आहे पाहा ! "याप्रमाणेंच न्याय, मीमांसा, अलंकार या शास्त्राची व्यवस्था आहे केवळ असत्य सिद्धांतांचें प्रतिपादन करून विलक्षण कुतर्क करून भलतेच अविचार लोकांत स्थापन करतात !"[2] वरील लेख रावबहा-

---

१. आमच्या रावबहादुरांसारख्या राजनिष्ठ मंडळीस अल्फिन्स्टन साहेबांचें प्रमाण किती ग्राह्य होणारें आहे हें सांगायाला नकोच. यास्तव त्यांच्या सर्वप्रसिद्ध इतिहासांतला एक लहानसा उतारा पुरंदरच्या बंडाच्या तर्फेनें येथें दाखल करतों:—

"Panini, the earliest extant writer on its Grammar, is so ancient as to be mixed up with the fatnous ages. His works and those of his successors have established a system of grammar, 'the most complete that ever was employed in arranging the elements of human speech.

—*History of India*—Book III, Chap. 5.

२. संस्कृत विद्येचा फलितार्थ म्हणून वर जो आमच्या प्राच्य महापंडितांनीं काढला आहे त्याचा मेळ पुढील पाश्चात्य पंडितांच्या उल्लेखाशीं कितीसा बसतो हें आमच्या वाचकांनीं लक्षांत आणावें. मिल्ल् साहेबांनीं आपलें पांडित्य समग्र केल्यावर त्यावर हुइल्सन् साहेब आपला अभिप्राय दाखल करतात:—

"This question of the civilization of the Hindus, although discussed with disproportionate prolixity, irrelevancy of illustraticn, and tediousness of recitation, both in these concluding remarks, and in a variety of previous notes and observations, can scarcely be considered as satisfactorily determined. It may be admitted, that the Hindus were not a civilized people according to Mr. Mill's standard; but what that standard is, he has not fully defined. Civilization is used by him, however, as a relative term, and in this sense, we may readily grant that the Hindus never attained the advance made by modern Europe. It is not just to institute such a comparison; for, to say nothing of the advantages we possess in a pure system of religious belief, we cannot leave out of consideration the agency of time. The Hindus, by the character of their institutions, and by the depressing influence of foreign subjugation, are apparently what they were at least three centruries before the Christian

(पुढें चालू.)

दुरांनीं जर अक्कलहुशारीनें लिहिला असेल, तर आम्ही त्यांस अशी सूचना करतों की, कणाद, जैमिनि, गदाधरभट्ट, मम्मटभट्ट, इत्यादि मूर्खपरंपरेनें आजपर्यंत या देशांतील वेड्या-बागड्या लोकांस खूळ लावून आलीकडे तर तिनें आपलें वेड पाश्चात्यांच्या ठायांही पिक-वण्याचा सपाटा चालवला आहे; तर त्यांनीं प्रतिपादन केलेल्या 'असत्य सिद्धांतां'चें व 'विलक्षण कुतर्कां'चे बंड मोडल्याचें श्रेय जर रावबहादुर घेतील, तर त्यांची कीर्ति बेकन् किंवा जॉन्सन् यांच्याप्रमाणें भूमंडळावर अजरामर राहणारी होईल !

---

era. Two thousand years have done nothing for them, everything for us. We must, therefore, in fairness, compare them with their contemporaries, with the people of antiquity; and we shall then have reason to believe, that they occupied a very foremost station amongst the nations. They had a religion less disgraced by idolatrous worship, than most of those which prevailed in early times. They had a government, which, although despotic, was equally restricted by law, by institution, and religion; they had a code of laws, in many respects wise and rational, and adapted to a great variety of relations which could not have existed, except in an advanced condition of social organization. They had a copious and cultivated language, and an extensive and diversified literature They had made great progress in the mathematical sciences; they speculated profoundly on the mysteries of man and nature, and they had acquired remarkable proficiency in many of the ornamental and useful arts of life. Whatever defects may be justly imputed to their religion, their Government, their laws, their literature, their sciences, their arts, as contrasted with the same proofs of civilization in modern Europe, it will not be disputed by any impartial and candid critic, that as far as we have the means of instituting a comparison, the Hindus were in all these respects quite as civilized as the most civilized nation of ancient world, and in as early times as any of which records or traditions remain.—W.

१. युरोपामध्यें प्लेटो, ॲरिस्टॉटल् वगैरे मंडळींनीं जो शेंकडों वर्षांपासून तत्त्वज्ञानाचा प्रघात पाडला होता तो शेवटीं बेकन्नें फिरवला. याजविषयीं इंग्रजींत मेकॉलेच्या 'लॉर्ड् बेकन्' या निबंधांत तर सविस्तर उपपादन§ आहेच; व मराठींतही रा० काणे यांनीं केलेल्या बरीक नांवाच्याच

(पुढें चालू.)

§ To make men prefect was no part of Bacon's plan. His humble aim was to make imperfect men comfortable The beneficence of his philosophy resembled the beneficence of the common father, whose sun rises

(पुढें चालू.)

"मनुष्य जन्मला कशाकरतां? त्याचें सार्थक काय? व आपलें कर्तव्य काय? याचा

ग्रंथांत याचें कांहीं दिग्दर्शन सांपडेल. जॉनूसनूनेंही 'मेटॅफिजिकल् पोएट्स्' म्हणून एक कोटिबाज

[पुढें चालू]

on the evil and the good, whose rain descends for the just and the unjust. In Plato's opinion man was made for philocophy; in Bacon's opinion philosophy was made for man; it was a means to an end; and that end was to increase the pleasures and to mitigate the pains of millions who are not and cannot be philosophers..................Plato, considering the moral improvement of the people as the end of legislation, justly inferred that a law which commanded and threatened, but which neither convinced the reason, nor touched the heart, must be a most imperfect law. He was not content with deterring from theft a man, who still continued to be a thief at heart, with restraining a son who hated his mother from beating his mother. The only obedience on which he set much value was the obedience which an enlightened understanding yields to reason, and which a virtuous disposition yields to precepts of virtue............Bacon entertained no such romantic hopes; and he well knew the practical inconveniences of the course which Pleato recommended............The aim of the platonic philosophy was to exalt a man into a god. The aim of the Baconian philosophy was to provide man with what he requires while he continues to be a man. The aim of the Platonic philosophy was to raise us far above vulgar wants. The aim of the Baconian philosophy was to supply our vulgar wants. The former aim was noble; but the latter was attainable. Plato drew a good bow; but, like Acestes in Virgil, he aimed at the stars; and therefore, though there was no want of strength or skill, the shot was thrown away. His arrow was indeed followed by a track of dazzling radiance, but it struck nothing......Bacon fixed his eye on a mark, which was placed on the earth, and within bow—shot, and hit it in the white. The philosophy of Plato began in words, noble words indeed, words such as were to be expected from the finest of human intellect exercising boundless dominion over the finest of human languages. The philosophy of Bacon began in observations and ended in arts.........

His (Bacon's) love of the vulgar useful, his strong sympathy with the popular notions of good and evil, and the openness with which he avowed that sympatty, are the secret of his influence. There was in his system no cant, no illusion. He had no anointing for broken bones, no

(पुढें चालू)

विचार त्यांचे मनांत क्षणभरही वसत नाहीं."—"ज्या ज्या विद्या हे शास्त्री शिकतात

कविपरंपरा इंग्लंडांत निघाला होती तिचें बंड 'कौले' या प्रसिद्ध निबंधांत† मोडून टाकलें आहे.

fine theories *de finibus*, no arguments to persuade men out of their senses. He knew that men, and philosophers as well as other men, do actually love life, health, comfort, honour, security, the society of friends, and do actually dislike death, sickness, pain, poverty, disgrace, danger, seperation from those to whom they are attached, He knew that religion, though it often regulates and moderates these feelings, seldom eradicates them; nor did he think it desirable for mankind that they should be eradicated.........He did not understand what wisdom there could be in changing names where it was impossible to change things; in denying that blindness, hunger, the gout, the rack, were evils,.........in refusing to acknowledge that health, safety, plenty were good things.........

We have sometimes thought that an amusing fiction might be written, in which a disciple of Epictetus and a disciple of Bacon should be introduced as fellow—travallers. They come to a village where the small-pox has just begun to rage, and find houses shut up, intercourse suspended, the sick abandoned, mothers weeping over their children. The Stoic assures the dismayed population that there is nothing bad in the small-pox, and that to a wise man disease, deformity, death, the loss of friends, are not evils. The Baconian takes out a lancet and begins to vaccinate. They find a body of miners in great dismay. An explosion of noisome vapours has just killed many of those who were at work; and the survivors are afraid to venture into the cavern. The Stoic assures them that such an accident is nothing but a mere............The Baconian, who has no such fine word at his command, contents himself with devising a safety lamp. They find a ship-wrecked merchant wringing his hands on the shore. His vessel with an inestimable cargo has just gone down, and he is reduced in a moment from oppulence to beggary. The Stoic exhorts him not to seek happiness in things which lie without himself, and repeats the whole chapter of Epictetus......The Baconian constructs a diving-bell, goes down in it, and returns with the most precious effects from the wreck. It would be easy to multiply illus trations of the difference between the philosophy of thorns and the philosophy of fruit, the philosophy of words and the philosophy of works. "*Editor*".

†About the begining of the seventeenth century appeared a race of

(पुढें चालू.)

त्यांपासून इहलोकीं व परलोकीं हित नाहीं."—"धर्माचा अधर्माचा भेद यांस ठाऊक नाहीं."—इत्यादि आरोपही 'लोकहितवादीं'नी जुन्या पंडितांवर आणले आहेत. हे सर्व

---

writers that may be termed the metaphysical poets; of ..............The metaphysical poets were men of learning, and to show their leraning was their whole endeavour; but unluckily resolving to show it in rhyme, instead of writing poetry, they only wrote verses, and very often such verses as stood the trial of the finger better than that of the ear; for the modulation was so imperfect, that they were only found to be verses by counting the syllables.

If the father of criticism has rightly denominated poetry an imitative art, these writers will, without great wrong, lose their right to the name of poets; for they cannot be said to have imitated anything; they neither copied nature nor life; neither painted the forms of matter, nor represented the operations of intellect.

Those, however, who deny them to be poets, allow them to be wits. Dryden confesses of himself and his contemporaries, that they fall below Donne in wit, but maintains that they surpass him in poetry.

If Wit be well described by Pope, as being 'that wh'ch has been often thought, but was never before so well expressed,' they certainly never attained, nor ever sought it. For they endeavoured to be singular—in their thoughts and were careless of their diction. But Pope's account of wit is undoubtedly erroneous; he depresses it below its natural dignity, and reduces it from strength of thought to happiness of language.

If by more noble and more adequate conception that he considered as Wit, which is at once natural and new, that which, though not obvious, is, upon its first production, acknowledged to be just; if it be that, which he that never found it, wonders how he missed; to wit of this kind the metaphysical poets have seldom risen. Their thoughts are often new, but seldom natural; they are not obvious, but neither are they just; and the reader, far from wondering that he missed them, wonders more frequently by what perverseness of industry they were ever found.

But Wit, abstracted from its effects upon the heart may be more rigorously and philosohpically considered as a kind of *discordia concors;* a combination of dissimilar imagas, or discovery of occult resemblances in things apparently unlike. Of wit, thus defined, they have more than

(पुढें चालू.)

यथार्थ आहेत असें जरी घटकाभर कबूल केलें, तरी हें उघड आहे कीं, वरील गोष्टींविषयीं आमच्या जुन्या पंडितांचे ठायीं जितपत ज्ञान आढळेल तितपतच बहुधां नवीन विद्वज्जनां·

---

enough. The most heterogeneous ideas are yoked by violence together. Nature and art are ransacked for illustrations, comparisons and allusions; their learning instructs; and their subtlety surprises; but the reader commonly thinks his improvement dearly bought, and, though he sometimes admires, is seldom pleased.........They were not successful in representing or moving the affections. As they were wholly employed on something unexpected and surprising, they had no regard to that uniformity of sentiment which enables us to conceive and to excite the pains and the pleasure of other minds; they never enquired what, on any occasion, they should have said or done; but wrote rather as beholders than partakers of human nature; as Beings looking upon good and evil, impassive and at leisure.........Their courtship was void of fondness, and their lamentation of sorrow. Their wish was only to say what they hoped had been never said before.

Nor was the sublime more in their reach than the pathetick; fo they never attempted that comprehension and expanse of thought which at once fills the whole mind, and of which the first effect is sudden astonishment and the second rational admiration. Sublimity is produced by aggregation, and littleness by dispersion. Great thoughts are always general, and consist in positions not limited by exceptions, and in descriptions not descending to minuteness. It is with great propriety that subtlety, which in its original import means exility of particles, is taken in ts metaphorical meaning for nicety of distinction. Those writers who lay on the watch for novelty could have little hope of greatness; for great things cannot have escaped former observation. Their attempts were always analytick; they broke every image into fragments: and could no more represent, by their slender conceits and laboured particularities, the prospects of nature, or the scenes of life, than he, who dissects a sunbeam with a prism, can exhibit the wide effulgence of a summer noon.

What they wanted however of the sublime, they endeavoured tc supply by hyperbole; their amplification had no limits; they left not only reason but fancy behind them; and produced combinations of confused magnificence, that not only could not be credited, but could not be imagined.

(पुढें चालू.)

तहीं आढळेल! 'मनुष्य जन्मला कशाकरतां?'[१]—हा प्रश्न दोघांही पंडितांपुढें टाकला तरी फळ सारखेंच होणार आहे असें आह्मांस वाटतें. धर्म काय आणि अधर्म काय? या दोहों प्रश्नांचीं उत्तरेंही आमचे रावबहादुर देतील काय? त्यांच्या वरील वाक्यांवरून असा घाट

---

Yet great labour, directed by great abilities, is never wholly lost; if they frequently threw away their wit upon false conceits, they likewise sometimes struck out unexpected truth: if their conceits were far-fetched, they were often worth the carriage. To write on their plan, it was at least necessary to read and think. No man could be born a metaphysical poet, nor assume the dignity of a writer, by descriptions copied from descriptions, by imitations borrowed from imitations, by traditional imagery, and hereditary similes, by readiness of rhyme and vollubility of syllables.

In perusing the works of this race of authors, the mind is exercised either by recollection or inquiry; either something already learned is to be retrieved, or something new is to be examined. If their greatness seldom elevates, their acuteness often surprises; if the imagination is not always gratified, at least the powers of reflection and comparison are employed; and in the mass of materials which ingeneous absurdity has thrown together, genuine wit and useful knowledge may be sometimes found, buried perhaps in grossness of expression, but useful to those who know their value; and such as, when they are, expanded to perspicuity, and polished to elegance, may give lustre to works which have more propriety though less copiousness of sentiment.

This kind of writing, which was, I believe, borrowed from Marini and his followers, had been recommended by the example of Donne, a man of very extensive and various knowledge; and by Jonson whose manner resembled that of Donne, more in the ruggedness of his lines than in the cast of his sentiments.

When their reputation was high, they had undoubtedly more imitators than time has left behind. Their immediate successors, of whom any remembrance can be said to remain, were Suckling, Waller, Denham, Cowley, Cleiveland, and Milton. Denham and Waller sought another way to fame, by improving the harmony of our numbers. Milton tried the metaphysick style on'y in his lines upon Hobson the Carrier. Cowley adopted it, and excelled his predecessors, having as much sentiment, and more musick. Suckling neither improved versification, nor abounded in

(पुढें चालू.)

दिसतो कीं, वरील सर्व गोष्टींचा उलगडा त्यांनीं आपणाशीं करून ठेवला आहे. पण हा काय असेल हें निश्चयानें कांहीं सांगवत नाहीं. आमच्या जुन्या मंडळीस ज्यांची वार्ता सुद्धां नव्हती व हल्लीं नाहीं असे कांहीं नवीन शोध तर प्रकृत प्रकरणीं 'लोकहितवादीं'नीं करून ठेवले नसतील ना ! असें असेल तर साऱ्या जगाच्या तर्फेनें आह्मी त्यांस अशी विनंति करतों, कीं ते त्यांनीं सर्वांस सादर केले असतां हजारों मोठमोठे तत्त्ववेत्ते जे विचार करून थकले, व 'धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां'[१] असें ह्मणून त्यांनीं हात टेंकले, त्या सर्वांचा आज एकोणिसाव्या शतकाच्या शेवटीं शेवटीं तरी खाड्दिशीं निकाल होऊन जाणारा आहे ! सीनिया पर्वतावर प्रगट होऊन ईश्वरानें जसें मोझ्याच्या स्वाधीन आज्ञादशक केलें त्याप्रमाणेंच आमच्या रावबहादुरांवर तर कांहीं अनुग्रह झाला नाहीं ना ! अथवा आमची ब्रह्मी मंडळी जशी आठआठ दिवस गिरिकंदरांत जाऊन बसते व पवित्र आत्म्याचा आणि त्यांचा संवाद होऊन नवीं पारमार्थिक तत्त्वें उदयास येतात,[२] तसाही कांहीं प्रकार आर्यसमाजाके

---

conceits. The fashionable style remained chiefly with Cowley; Suckling could not reach it, and Milton disdained it..............As the authors of this race were perhaps more desirous of being admired than understood, they sometimes drew their conceits from recesses of learning not very much frequented by common readers of poetry.........Their expressions sometimes raise horror, when they intend perhaps to be pathetick........ They were not alway strictly curious, whether the opinions from which they drew their illustrations were true; it was enough that they were popular. Bacon remarks, that some falsehoods are continued by tradition, because they supply commodious allusions. . . . . . . . In forming descriptions, they looked out not for images, but for conceits. Nigh has been a common subject, which poets have contended to adorn. . . . . t ......If they are upon common subjects often unnecessarily and unpoetically subtle; yet where scholastick speculation can be properly admitted, their copiousness and acuteness may justly be admired.................. .....Whatever is improper or vicious, is produced by a voluntary deviation from nature in pursuit of something new and strange; and that the writers fail to give delight, by their desire of exciting admiration.

*"Editor"*

१. वरील चरण हा 'महाभारतां'तील प्रसिद्ध यक्षप्रश्नांपैकीं आहे. सगळा श्लोक येणेंप्रमाणेः—

श्रुतिर्विभिन्ना स्मृतयश्च भिन्नाः । नैको मुनिर्यस्य वचः प्रमाणम् ।
धर्मस्य तत्त्वं निहितं गुहायां । महाजनो येन गतः स पन्थाः ॥

२. बंगाल्यांतील ब्राह्ममंडळींत अलीकडे एक नवीनच टूम निघाली आहे. बाबू केशवचंद्र

(पुढें चालू.)

धुरंधर जे प्रस्तुत ग्रंथकार त्यांचा झाला नसेल ना! काय असेल तें असो. बरें आमच्या जुन्या पंडितांच्या स्वप्नींही वरील विचार आले नाहींत असें समजा; पण नवीन मंडळींत तरी या संबंधानें कोणता फरक आहे! आपण कशाकरतां जन्मलों, आपल्या जन्माचें सार्थक काय? इत्यादि गहन विचारांत गढलेली नवीन मंडळी आमच्या रावबहादुरांस आजपर्यंत कितीशी आढळली असेल! पण इतकें लांब कशाला? खुद्द आमच्या रावबहादुरांनींच जर आपला आजपर्यंतचा वृत्तांत सर्व प्रसिद्ध केला तर त्यांत स्वजन्माच्या सार्थकाचा प्रकार कितीसा आढळेल कोण जाणे!

५. 'लोकहितवादीं'नीं व्यवहारदृष्ट्याही जुन्या पंडितांवर कांहीं आक्षेप केले आहेत. ते असे. "त्यांस व्यवहारीक ज्ञान नाहीं. त्यांस मोडीचें लिहितां देखील येत नाहीं व व कोणतेंही काम करायाचे हे उपयोगी नाहींत." या महान् आक्षेपाचें निरसन करूं पाहण्यासही आह्मांस संकोच वाटतो. कां कीं, तो स्वभावतःच इतका दुर्बल आहे कीं त्याचा उल्लेख करणें हेंच त्याचें निरसन होय. मोडी लिहितां न आल्यानें जर पाणिनीयाचें अध्ययन व्यर्थ होणार व बारनिशीवाल्याची योग्यता पंडितांवर होणार तर घिसाडी, सुतार, सोनार, चांभार वगैरे किती धंद्याची मंडळी आपापला असाच हक्क सांगायास तयार होईल याचा

---

सेन, प्रतापचंद्र मुजुमदार वगैरे मंडळीस नव्या देवाच्या नांवानें डोळे मिटण्याचा व आपल्या देशबंधूंच्या मूर्तिपूजाजन्य पातकाचें आपल्या वक्तृत्वरसानें परिक्षालन करण्याचा कंटाळा आला, कीं एके दिवशीं उठून ते मुकाट्यानें कोठें तरी गिरिकंदरांत जाऊन बसतात, व तेथें पवित्र आत्म्याचीं व त्यांची मनोमय भेट होते, मग आठां पंधरा दिवसांनीं वरील प्रेषित मंडळी पुनः बाहेर पडलीं, कीं कांहीं तरी अमोलिक तत्त्व प्रगट होतें. कुचबिहारच्या राजाला आपली कन्या समर्पण करावी कीं नाहीं हा प्रश्न मनांत धरून केशवचंद्र सेनाची स्वारी एकोणिसाव्या शतकांतील सुधारलेल्या देवाकडे कौल मागण्याकरतां जेव्हां गेली, तेव्हां चटदिशीं महंमदाप्रमाणें किंवा येशूख्रिस्ताप्रमाणें देवसाक्षात्कार होऊन त्यांस आज्ञा झाली कीं "कांहीं फिकीर नाहीं, तुझी कन्या जरी मूर्तिपूजकाच्या पदरीं पडणार तरी या वेळेपुरती डोळेझांक करून माझें चिरंतन जें मूर्तिपूजावैर तें मी घटकाभर विसरून जाईन. भक्ताचा योगक्षेम यथास्थित चालण्याकरतां आपली प्रतिज्ञा गुंडाळून ठेवण्यास मला कांहीं मोठीशी पंचाईत नाहीं!" बाबू मजकुरांनीं कुचबिहारवाल्यांशीं सोयरीक केल्यापासून त्यांच्या शिष्यपरिवाराची मात्र त्यांच्यावरची भक्ति अगदीं उडाली. त्यांनीं त्यांस अध्यक्षस्थानापासून पदच्युत केलें, व कित्येक वेळां ब्राह्ममंदिरांत मारामारीपर्यंतही मजल येऊन पोंचली! तेहतीस कोटि देवांवर स्वारी करून त्यांस जे धर्मवीर जिंकणार त्यांच्या गोटांत इतक्यांतच कां फंदफितूर व्हावा! आमच्या इकडेही वरच्यासारख्या गमती कांहीं कमी आहेत असें नाहीं. दयानंदजींचे शिष्य पॅसिफिक् महासागर ओलांडून मुंबापुरींत येऊन दाखल होतांच त्यांनीं आपल्या पूर्वीच्या अध्यक्षांची काय शोभा केली ती पुष्कळांस माहीत असेलच. त्याचप्रमाणें येथील प्रार्थनमंदिरांतही एका प्रमुख वीरानें आपली व समाजाची एकदम फारकत करून टाकून आजपर्यंत मीं येथें व इतर ठिकाणीं जें जें पांडित्य केलें तें 'सब् झूट' ह्मणून सर्वांस खडखडीत सांगून दिलें ही मौजही ऐकण्यासारखीच आहे! अशी शूरां करणारी मंडळी वर्षानुवर्षे तोंडांत वागवलेला दोरा एकदम आयत्या वेळेस निःशंकपणें बाहेर काढूं लागली, ह्मणजे मग देशोन्नति व धर्मोन्नति खाशी होणार!!

विचार रावबहादुरांनीं केला काय? मोडी लिहितां न आल्यानें जर प्राचीन पंडित कुच-कामाचे ठरले तर सामता किंवा आरी धरतां येत नसल्यानें आमचे अर्वाचीन पंडितही कवडीचा माल ह्मणून ठरणार नाहींत काय? मग आलीकडील एम्. ए.च्या पेक्षां पिन्या चांभाराची योग्यता ज्यास्त ही जबरदस्त कोटि 'लोकहितवादीं'च्या गळ्यांत येऊं पाहणारी आहे. ही जर ते मेकाले साहेबांप्रमाणें मान्य करीत असले,[1] तर मग बरीक आमचें कांहीं बोलणें नाहीं!

"पंडितांस व्यवहारीक ज्ञान नाहीं, व ते कोणतेंही काम करावयाचे उपयोगी नाहींत."—हाही पाणिनीच्या व कणादाच्या शिष्यशाखेवर मोठाच कुठारप्रहार आहे. 'लोकहितवादीं'च्या आज तीस चाळीस वर्षे प्रणीत केलेल्या तत्त्वज्ञानांतील वरील वचन हें केवळ महाकाव्य होय असें ह्मटलें असतां चालेल. त्यावर अनेक ठिकाणीं त्यांनीं विवरण केलेलें आढळतें. "संस्कृताचा इतकाच उपयोग आहे कीं लोकांमध्यें भ्रांति उत्पन्न व्हावी, व जों जों मनुष्य त्यांत प्रवीण होतो तों तों अज्ञानसमुद्रांत खोलखोल जात असतो;"—"मुळीं एकदां संस्कृताच्या झऱ्याचें पाणी जो प्याला त्याची भ्रांति जावयास नव्वद वर्षे शिकविलें तरी उपयोग नाहीं हें निश्चित आहे"—"संस्कृतांत चांगली विद्या नाहीं व उपयुक्त ज्ञान नाहीं हें सर्व विद्वानांनी ठरविलें आहे,"—इ० इ० वरील महासिद्धांत पाहून आह्मांस पुढें लेखणी चालवण्याची मोठी दहशत वाटते. कोण जाणे कीं आजपर्यंत अनेक विषयांवर आमचीं मतें जीं रावबहादुरांच्याहून अगदीं विपरीत होऊन बसलीं आहेत, व मोठमोठ्या विद्वानांनीं निर्विवाद ह्मणून मानलेले सिद्धांतही आह्मांस पुष्कळ जे वादग्रस्त वाटूं लागले आहेत, हा सर्व प्रभाव 'संस्कृताच्या झऱ्याचें पाणी' चाखल्याचा तर नसेल ना! वरील पाण्याचाच जर बेंड्याचा असा गुण असला कीं त्याच्या योगानें डोकें आपलें गढूळ होऊन जावेंच, तर आजपर्यंत जें आह्मीं कालिदासादिकांच्या सरस्वतीचें अखोदकाचें प्राशन केलें, व तोच प्रवाह प्राकृत भाषेच्या रूपानेंही मयूरप्रभृति मंडळींच्या वाणीच्या द्वारें आह्मीं सेवन केला, तो आह्मांस बाधला असेल यांत संशय नाहीं! असें असेल तर आमचे रावबहादुरप्रभृति पंडित मोठे सावध खरे, की असल्या दुष्ट उदकाच्या ते वाऱ्यालाही कधीं उभे न राहतां आजपर्यंत त्याचा अनुभव जो त्यांनीं घेतला तो पंचतंत्रांतील (काय करावें!

१. "We shall next be told," exclaims, Seneca, "that the first shoemaker was a philosopher." For our own part, if we are forced to make our choice between the first shoemakor and the author of the three books on anger, we pronounce for the shoemaker. It may be worse to be angry than to be wet. But shoes have kept millions from being wet; and we doubt whether Seneca ever kept any body from being angry."

—*Lord Bacon.*

आह्मांस दाखला सुद्धां संस्कृतांतल्या भ्रांतिमय ग्रंथांखेरीज सुचतच नाहीं ! ) शहाण्या वानराप्रमाणेंच केवळ घेतला. त्या गुलामानें जसें ब्रह्मराक्षसाच्या तळ्यांतील पाणी झाडावरून नलिकायंत्राचा प्रयोग करून मोठ्या शिताफीनें शोषून घेतलें व आपली तहान भागवली, त्याप्रमाणेंच 'लोकहितवादी', जोतीबा वगैरे अर्वाचीन महापंडितांनीं व्यास, कालिदास, पाणिनि इत्यादिकांशीं जातीनें गांठ न घेतां मेकॉले झाले, वुइल्सन् बोवा झाले, अशा अशा महासमर्थ गुरुमुखांपासूनच संस्कृत विद्येची माहिती करून घेतली. तरीच त्यांचें डोकें आमच्याप्रमाणें बिघडून न जातां आजपर्यंत अगदीं साफ राहिलें ! असो; आतां होऊन गेलेल्या गोष्टीस काय उपाय आहे ? आमच्या वेड्या सरकारनें पाठशाळेंतील 'पुरंदर'चें बंड मोडून त्यासच पुन: युनिव्हर्सिटींत जो थारा दिला तसें जर केलें नसतें तर वरील खूळ आमच्या डोक्यांत कां शिरतें ? तरी येवढी एक गोष्ट बरीच समाधान मानण्यासारखी आहे, कीं आमच्या आलीकडील मंडळीपैकीं पुष्कळांवर जरी वरील दुष्ट संस्कार घडला असेल, तरी आमच्या रावबहादुरांच्या अमदानींतली बहुतेक मंडळी तरी त्यापासून अगदीं अलिप्त राहिली आहे. तेव्हां वरील लहरींत जरी आह्मी किती बहकलों तरी आह्मांस सांवरण्यास, किंबहुना वरील दुर्विकाराचें निरसनही करण्यास वरील सावध राहिलेली मंडळी चांगली उपयोगीं पडण्यासारखी आहे !

गीर्वाणाच्या अध्ययनानें मनुष्य व्यवहारशून्य व कुचकामाचा कां होऊन जावा याविषयीं आह्मांस तर कांहींच तर्क होत नाहीं. पाणिनि हातीं घेतला कीं माणसाला खूळ लागतें, आणि दादोबाला घेतला तर लागत नाहीं; भास्कराचार्यांचें बीजगणित व रेखागणित शिकवलें कीं विद्यार्थी वेड्याच्या इस्पितळास योग्य होतो, आणि कोलेंजो किंवा टॉड्हंटर् यांचें अंतेवासित्व पतकरलें कीं कांहीं विकार होत नाहीं; 'गदाधरी' ह्मटली कीं बहकला, तेंच मिल्लचें अध्ययन केलें कीं बुद्धि साफ; शंकराचार्यांच्या मुखेंकरून वेदान्तश्रवण झालें कीं मनुष्य बिघडला, तीच बर्क्लेच्या तोंडानें जगाची मिथ्यात्वोपपत्ति ऐकली कीं डोकें शाबूत; वाग्भट हातीं घेतला कीं मूर्खत्वाचा छाप बसलाच, इंग्रेजी वैद्यक शिकलें कीं झाला पक्का शहाणा; शेक्स्पीयरला हातांत वागवणें हा शहाणपणा, तोच बेटा कालिदास आला कीं तोच वाचक बेवकूब ठरला.—हें काय गौडबंगाल असेल तें असो ! आमच्या रावबहादुरांनीं आपल्या बृहत्संहितेंत 'संस्कृत विद्या,' 'पंडितांची योग्यता', 'पंडितांचें ज्ञान', 'पुराणांतील माहिती' अशा शेंकडों सदरांखालीं आपणाकडून शास्त्री, पंडित, पुराणें, सप्तसमुद्र, मेरुपर्वत, सप्तपदार्थ, इत्यादिकांचा पार धुव्वा उडवून देऊन चोहोंकडे शेणसडा करून दिला आहे. तो इतका कीं, प्राच्य विद्येचे परम शत्रु[१] जे मेकाले साहेब त्यांस जर कोणी विलायतेंत वरील

१. मेकॉले, मिशनरी, 'लोकहितवादी,' वगैरे मंडळी जशी पाणिनि, कणाद, कालिदास इत्यादिकांचे वैरी होत त्याप्रमाणेंच होमर, प्लेटो, सिसरो वगैरे ग्रंथकारांसही तीन चार शतकांपूर्वी युरोपांत राहु उत्पन्न झाले होते. त्यांच्या मनांत वरील असद्धर्मी ग्रंथकारांचें प्राबल्य युरोपांत पुन: होऊं नये

(पुढें चालू.)

संहिता नेऊन दाखवली असती तर 'जीतेराव!' 'भलेबहाद्दर!' असा आपल्या पट्टशिष्या-विषयीं धन्यवाद त्यांच्या तोंडून निघाला असता! येथें तरी राव जोती, बाबा पदमजी वगैरे वीर जे अस्तन्या मागें सारून शास्त्र्यांवर व भटांवर तुटून पडले तो प्रभाव आमच्या रावबहादुराच्याच लेखणीचा असावा असें आह्मांस वाटतें; कां कीं, विद्वान मंडळींत व देशसुधारणा करणाऱ्यांत अग्रगण्य मानलेल्या नवीन पंडितांच्या तोंडून जेव्हां वरील बाणलें निघत तेव्हां अर्थातच त्यांचें महत्त्व सर्वांनीं मानणें अवश्य होतें. त्यांतून बिचाऱ्या आरोपीच्या तर्फेनें तर बिलकुल पुरावा घेण्यास मार्ग नव्हता. जुने शास्त्रकार तर मेलेलेच, केवळ कीर्तिरूप देहानेंच त्यांचें आज हजारों वर्षें येथें वास्तव्य झालेलें. त्यांच्या यशाचे रक्षक जे शास्त्री व पंडित ते आपापल्या नित्यव्यवसायांत निमग्न; त्यांच्यापर्यंत आमच्या रावबहादुरांचें अकटोविकट पांडित्य अगोदर जातें आहे कशाला? त्यांतून गेलेंच, तर नवीन फाकड्या विद्वानांपुढें त्यांचें काय चालणार? बारा वर्षें घोकंपट्टी करून एक नुसतें व्याकरण पैदा करणारी मंदबुद्धि मंडळी कोणीकडे आणि पुरती रूपावळीही न येतां साही शास्त्रांचा, अठरा पुराणांचा, चार वेदांचा एका सपाट्यासारखा निकाल लावून पार मोकळे होऊन जाणारे पाश्चात्य व प्राच्य पंडित कोणीकडे! आरोपीच्या तर्फे एकीकडून मात्र भरभक्कम पुरावा मिळण्यासारखा होता खरा, पण तो येथपर्यंत येऊन पोंचतो कसचा! रेणानदीच्या कांठीं, उक्षतरण नगरीं वगैरे आपल्या प्राचीन ऋषींचे अंतेवासी थोडे होते असें नाहीं, त्याप्रमाणेंच वुइल्सन् साहेब (रेव्हरेंड्बोवा नव्हेत!), कोलब्रुक् साहेब, हो साहेब वगैरेंच्या हातचीं थोकडीं सर्टीफिकिटेंही येथल्या येथें उपयोगीं पडण्यासारखीं होतीं. पण ही कुमक 'पुरंदरच्या बंडा'ला येऊन पोंचावी कशी? नवीन विद्वन् मंडळींनीं जेव्हां वरील खटपट करावी तेव्हां. पण ती मंडळी तर आपल्या नूतनसंपादित इंग्रजी विद्येच्या घमेंडींत! पहिलें बुक झालें, 'सेरीज् ऑफ् लेसन्स्' झालें, किंवा 'कोर्स ऑफ् रीडिंग्' झालें की जो तो आपणास 'न भूतो न भविष्यति' अशा तऱ्हेचा पंडित समजणार. सरासरी स्टेशनमास्तरचें किंवा रिप्लरचें काम चालवण्यापुरतें बुटणेरी इंग्रजी का येईना, तेवढ्याच्याच बळावर तो आपल्या शंभर-पूर्वजांस मूर्खांत निवडून काढणार, आपल्या आईबापांस भूगोलावर व इतिहासावर व्याख्यानें देऊन त्यांचें अज्ञान त्यांच्या पदरीं घालणार, 'हीं भटें मेलीं पाहिजेत', 'हें पुरंदरचें बंड मोडलें पाहिजे ह्मणजे आह्मीच या पंडितांचा तमाशा पाहूं', या सुधारणेच्या महत्तत्त्वांचा निरंतर जप करणार, मग तो कशाला शास्त्र्यांची व पंडितांची तरफ उचलील? असो; तर अशी आजपर्यंतची स्थिति असल्यामुळें 'लोकहितवादी' प्रभृति मंडळींनें या देशांतील जुन्या विद्येविषयीं काय पाहिजेत ते सिद्धांत करून ठेवले. पण हल्लीं जो ज्ञानाचा

---

असें होतें. पण वरील खंडाचें किंबहुना साऱ्या पृथ्वीचें भाग्य सबळ तेव्हां वरील अरसिक शिरोमणींचें कांहीं न चालून ग्रीक् व रोमन् लोकांचा बुद्धिप्रभाव पुनः सर्व देशांत प्रगट झाला वरील मंडळीस त्यांनें प्रतिपक्षी उपहासानें 'ट्रोजन्' ह्मणत असत! ट्रोजन् (ट्राय शहरचे लोक) हे ग्रीक् लोकांचे शत्रु होते हें सर्वप्रसिद्धच आहे.

प्रकाश दिवसेंदिवस चोंहोंकडे फांकत आहे त्यांत ते पुष्कळ फिके पडत चालले आहेत हें पाहून आह्मांस फार वाईट वाटतें !

'लोकहितवादीं'नीं आमच्या जुन्या पंडितांस केवळ व्यवहारशून्य ठरवतांना थोडकासा हाही विचार करून पाहायाचा होता कीं, इंग्रेजी विद्येंत निपुण झाल्यानें तरी कितीसें व्यवहारचातुर्य येत असतें ? मोडी लिहिण्याच्या संबंधानें तर बहुधां येथें लिहायास नकोच; कां कीं, विद्यालयांत शास्त्रज्ञांनीं मंडित होऊन तीन तीन चार चार लढाया मारून आलेल्या महावीरांची मामलेदार कचेरींत काय फजिती उडते हें आज कोणाला सांगायाला पाहिजे असें नाहीं. जन्मभर गदायुद्धाचा अभ्यास केलेल्या भीमाच्या हातीं जसा विराटाच्या घरीं पळा व झारा आला, किंवा 'किरातरूपी प्रभू'शीं झगडलेल्या भारती महारथ्याच्या हातांत शंखवलयें येऊन पडलीं; त्याप्रमाणेंच मिल्‌, बेकन्‌, ग्रोट एके खिशांत व विद्यारण्य, कालिदास, मम्मटभट दुसऱ्यामध्यें असे घालून आमचे अर्वाचीन पंडित जेव्हां आपल्या नवीन अधिकारावर रुजू होतात, व विशीं पंचविशीच्या अंमलांत पुनः पुस्तीवर बसून श्री–श्री–श्री–ग–ग–ग करण्याचा प्रसंग येतो, तेव्हां बिचारी 'श्री' तर सरस्वतीच्या मत्सरानें निघून गेलीच. पण 'ग' चाही तिजबरोबरच मधल्यामध्यें परिहार झाला हें मनांत येऊन आमच्या खाशा मंडळीला किती संतोष होत असेल बरें ! ही एका मोडी लिहिण्याची गोष्ट झाली. याखेरीज इतर जीं शेंकडों व्यवहाराचीं मोठमोठीं अंगें आहेत त्यांत तरी इंग्रेजी शिकल्यानें मनुष्य पुरा वाकबगार बनतो असा आमचे रावबहादुर अभिप्राय देतील काय ? प्रस्तुत ग्रंथकारास सादर करण्यास एक खासें आलीकडचें उदाहरण आमच्यापाशीं आहे. गेल्या दशकांत देशी व्यापाराच्या संबंधानें पुष्कळ भवति न भवति व गडबड होऊन मुंबई व पुणें या दोन ठिकाणीं स्वदेशीय मालाच्या खपास उत्तेजन देण्याकरतां दोन खाशा मंडळ्या स्थापन झाल्या. त्यांनीं दहादहा वीसवीस हजारांचें भांडवल उभारून विलायतेबरोबर टक्कर मारण्यास आरंभ केला. या दोन्ही उद्योगांत जुन्या महामूर्ख मंडळीपैकीं कोणीही असेलसें वाटत नाहीं; सारी मंडळी केवळ अर्वाचीन संस्काराची,—ह्मणजे साऱ्या जगांत काय उलाढाल चालली आहे, कोणत्या देशचा काय वृत्तांत, कोणती सामुद्रधुनी कोठें हें ज्यांस बिनचूक माहीत अशा प्रकारची. पण इतका लख्ख भूगोल वागत असतां व साऱ्या जगाचा इतिहास करतलामलकवत्‌ स्पष्ट दिसत असतां वरील व्यवहारनिष्णात मंडळीच्या दोन्ही दुकानांचें काम किती उत्कृष्ट वहिवाटलें गेलें ह्मणाल तर बोलण्याची मुळींच सोय नाहीं ! आह्मांस पक्कें माहीत आहे कीं, इतकें भांडवल एखाद्या कुळंब्यामाळ्याच्या स्वाधीन केलें असतें, तर तो सुद्धां पुष्कळपट अधिक किफायत करून दाखवता. पण इतकें तरी दूर कशाला ? आमच्या रावबहादुरांच्याच खुद्द आधिपत्याखालीं असणाऱ्या ग्रंथोत्तेजक मंडळाची तर काय दशा होऊन गेली आहे, हें आज कोणाला नव्यानें सांगायाला पाहिजे असें नाहीं. तेव्हां एकंदरींत पाहतां हाही व्यवहारशून्यत्वाचा कोटिक्रम मागच्याप्रमाणेंच ढांसळणारा आहे हें उघड आहे.

६. आतां यांखेरीज इतर जे अनेक आक्षेप प्रस्तुत ग्रंथकारानें अद्वातद्वा रीतीनें जुन्या पंडितांवर ठेवून दिले आहेत त्यांविषयीं वरच्याप्रमाणें सविस्तर लिहूं गेलें असतां फारच पाल्हाळ होणार आहे, यास्तव त्यांच्या संबंधानें येथें कांहीं लिहीत नाहीं. शास्त्री हांजी हांजी करणारे असतात; ते धर्मसंरक्षक नसून उलटे अधर्मवृद्धि करणारे आहेत, ते अन्नछत्रांत शूद्रांस जेवूं देत नाहीत, त्यांनीं बाजीरावाला हरबऱ्याच्या झाडावर चढवावें, व तसें केल्यानें 'शेवटीं दोघेही भीक मागत गेले' वगैरे असंबद्ध प्रलाप प्रस्तुत निबंधांत पुष्कळच आहेत. त्यांचा प्रकृत विषयाशीं फारच थोडा संबंध असून शिवाय त्यांत यथार्थत्वही तितपतच आहे. आमच्या रावबहादुरांचें ज्ञाननेत्र जर विकाररहित असते तर त्यांस फार निराळ्या तऱ्हेचीं दर्शनें झालीं असतीं. असो; आतां सांप्रत लेखांतील एका वाक्यावर मात्र कांहीं विचार प्रगट करून हें प्रकरण आटपतों.

वरील वाक्य हें होय—"लोकांस शास्त्रीपंडितांखेरीज जेव्हां दुसरे कोणी पुढारी मिळतील, तेव्हां या लोकांमध्यें व्यवस्था चांगली होईल." या वाक्याचा रोख काय आहे हें बहुतां कोणासही सांगावयास नको. जुनी मंडळी पार नाहींशी होऊन जाऊन आपण जेव्हां पुढें सरसावूं तेव्हां साऱ्या देशभर सुधारणाच सुधारणा करून सोडूं अशी 'लोकहितवादीं'स मोठी उमेद वाटत होती, हें वरील लेखावरून स्पष्ट दिसतें. अशी उमेद बाळगणें हें कांहीं गैर नव्हे; उलटें तें भूषणास्पदच होय. पण खेद करण्यासारखी गोष्ट येवढीच कीं, गेल्या वीस तीस वर्षांत रावबहादुरप्रभृति मंडळींनीं ज्या कित्येक टलाटाली केल्या त्यांपासून 'चांगली व्यवस्था' होणें तर दूरच राहिलें, पण अधिक बखेडा मात्र झाला. पूर्वीचे शंकडों मतभेद होते ते मोडण्याच्या उद्देशानें त्यांनीं नवे मात्र उत्पन्न केले; पूर्वीच्या अधर्मप्रवृत्ति नाहींशा करण्याच्या मिषानें अपायकारक नवीन प्रवृत्ति मात्र पाडल्या; संस्कृत भाषा नाहींशी करून प्राकृत होती ती मात्र धड राहूं दिली नाहीं; विधवांच्या साह्यार्थ कंबर बांधून त्यांस सधवा तर केल्या पण 'इदं च नास्ति परं च न लभ्यते' अशा कचाट्यांत मात्र त्यांस नेऊन घातलें; स्वदेशीय व्यापार तर सुधारला नाहीं, पण रिकामी हाकाटी केल्याच्या योगानें विलायती व्यापाऱ्यांचे बंध मात्र मोकळे केले; लोकांची सत्ता तर कांहीं वाढली नाहीं, पण एतद्देशीय संस्थानें मात्र सरकारच्या पंजाखालीं उतरवलीं; असा एकंदरींत पाहतां 'इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः' येवढा मात्र देशास लाभ झाला. इंग्रेज सरकारची निरंतर तुतारी वाजतां वाजतां आजला अशी स्थिति येऊन पोंचली आहे कीं, हा हिंदुस्थान आह्मांला नको, याच्या पायीं आह्मांला भुर्दंड मात्र भरावा लागतो व वारंवार संकटें प्राप्त होतात, असें आमचे राज्यकर्तेच म्हणूं लागले आहेत! तुह्मी मूर्ख, तुह्मी पापी, अशी आज तीस वर्षे सतत पुष्पवृष्टि करून लोकांचा तेजोभंग केल्यानें ते असे निःसत्त्व होऊन गेले आहेत कीं, आमच्या हातून कांहीं होणें नाहीं, आह्मी जन्माचे रखेल, या कल्पना त्यांचीं उराशीं बाळगल्या आहेत; सरकारच मेहेरबानी करून जर आमचें कांहीं बरें करील तर होईल, एरव्हीं आह्मी त्याच्या पंथाला लागणारच आहों, हें महत्तत्त्व सर्वांनीं गृहीत केल्यासारखें दिसत आहे.

नाहीं म्हणायाला यथेच्छ मुखपांडित्य तेवढें करावें पण क्रियाद्वारा त्यापैकीं एकही गोष्ट घडली नाही तरी चिंता नाहीं येवढा मात्र उपदेश 'लोकहितवादी'प्रभृतींच्या आचरणावरून पुष्कळांनीं उचललेला दिसतो. आपल्या महामूर्ख पूर्वजांनीं अटकेची अटक इतके दिवस घालून ठेवली, नाहीं तर आम्ही केव्हांच सुधारणेच्या शिखरास जाऊन पोंचलों असतों हाही विचार आमच्या रावबहादुरांच्या मनांत वर्षानुवर्षे घोळत होता; शेवटीं सुमारें बारा वर्षांपूर्वी त्यांनीं आपल्या एका राजविद्याभूषित चिरंजीवांकडून समुद्रयान करवून हजारों रुपये वरील महायात्रेच्या निमित्त उधळले. पण त्या सर्वांचा किंवा त्यांचा विनियोग काय काय झाला असेल याची कल्पना आमचे वाचक सहज करतीलच. आमच्या रावबहादुरांनीं आपल्याकडून हिंदुधर्मसंरक्षणार्थ बरोबर पापडांची पार्सलें श्वेतद्वीपास रवाना केलीं खरीं; पण पापडांचा कोट ऐन विलायती सुधारणेच्या तडाक्यासमोर कितीसा टिकणार ! वरील महाप्रस्थानसमयीं पत्रोपत्रीं केवढा जयघोष झाला व देशसुधारणेच्या संबंधानें केवढाले मंगलाशीर्वाद झाले आणि त्यांतून 'लोकहितवादी'स तर केवढी धन्यता वाटली, हें त्या वेळचीं वर्तमानपत्रें काढलीं असतां समजणार आहे. पण याही प्रचंड उद्योगास शेवटीं काय फळ आलें तें सर्वांस मशहूर आहेच. हद्द 'लोकहितवादी'च आतां व्याख्यानांत सांगूं लागले आहेत कीं, इकडील तरुण मंडळी तिकडे पाठवण्यांत कांहीं हंशील नाहीं ! तेव्हां एकंदरींत पाहतां जुन्या महामूर्ख शास्त्र्यांचें धुरंधरत्व नाहींसें होऊन तें नव्या महाविद्वान् इंग्रजी पंडितांकडे आलें असतांही तीस चाळीस वर्षांच्या कारभारांत एकंदर काय झालें तर आमचे शूद्र कवि म्हणतातः—

बोलणें फोल झालें । डोलणें वायां गेलें ॥

---

प्रातः क्षालितलोचनाः करतले धृत्वा पवित्राङ्कुरा-
स्तत्तत्स्थाननिवेदितोध्र्वतिलकाश्चैलान्तबद्धाक्षताः ।
को जातश्च मृतोऽथवा मृततिथिः कस्यालये वर्तते
चेत्थं ह्यन्तरतर्युताः प्रतिदिनं धावन्त्यहो भिक्षुकाः ॥[1]

अंक ७३—(१) विषयोपक्षेप. (२) हिंदुधर्म. (३) निबंधग्रहांतील उतारा. (४) भटांच्या अर्थशून्य अध्ययनाच्या संबंधानें विचार.

१. येथपर्यंत ब्राह्मणांच्या संबंधानें दोन प्रकरणांविषयीं विवेचन झालें; एक, ते

---

१. "सकाळच्या प्रहरीं चोळभट्टी करून पवित्र बळव हातांत घेतलेले, व वस्त्राच्या एका गांठीस तीळ बांधून दुसरींत अक्षता घेतलेले, असे भिक्षुक आज कोण जन्मला, कोण मेला, कोणाच्या घरीं आज श्राद्ध आहे, वगैरे विचक्षणा करीत दररोज मोठ्या गर्दीनें फिरून तिकडे धांवत असतात !"

मुत्सद्दी या संबंधानें. व दुसरें, ते पंडित या संबंधानें. आतां तिसऱ्या प्रकरणास लागूं, हें तिसरें प्रकरण ब्राह्मणांचें धर्माधिकृतत्व हें होय. तर या संबंधानें प्रस्तुत ग्रंथकारानें जीं मतें प्रगट केलीं आहेत त्यांत कितीशी यथार्थता आहे याविषयीं आतां विचार करायाचा.

२ हिंदुधर्म हा जगांतील सर्व धर्मांहून प्राचीन होय असें ह्मटलें असतां चालेल; निदान याच्याहून प्राचीन असा तरी कोणताही धर्म नाहीं हें खास आहे. या धर्माचा सर्व अधिकार पहिल्यापासून ब्राह्मणांकडे चालत आला आहे. सर्व देशांत धर्मांचे रक्षक ह्मणून जसे कांणी नियुक्त असतात त्याप्रमाणेंच या देशांतलि सर्व धर्माधिकार वरील प्रमुख ज्ञातीकडेच अगदीं पूर्वापार चालत आले आहेत. सर्व राज्याधिकार जसा क्षत्रियांकडे, सारें वाणिज्य जसें वैश्यांकडे, त्याप्रमाणेंच धर्मप्रकरण ह्मणून जेवढें तेवढें सर्व पहिल्यापासून ब्राह्मणांच्याकडे सोंपवून दिलेलें आढळतें. आतां कालगत्या या मूळच्या स्थितींत पुष्कळच फेरफार होऊन गेले आहेत हें खरें आहे; वेदांच्या काळीं काय स्थिति असेल ती पुराणांत आढळत नाहीं, व पुराणांतून आढळते तिला व आजच्या स्थितीलाही पुष्कळ ठिकाणीं जमीन अस्मानची तफावत! तथापि ब्राह्मणांचें प्रमुखत्व व पूज्यत्व हें अजून चाललें आहे असें ह्मणण्यास हरकत नाहीं.

हें ब्राह्मणांचें वर्चस्व फार प्राचीन काळापासून जगाच्या सामान्य प्रवृत्तीप्रमाणें सर्वांस मोठें दुःसह होऊन राहिलेलें आहे. विश्वामित्राची वशिष्ठाशीं सदोदित स्पर्धा असे, नाहीं नाहीं ते कष्ट करून त्यानें ब्राह्मणत्व संपादन केलें, व आपल्या रुत्वशील प्रतिस्पर्ध्याचा त्यानें नाहीं नाहीं तो छळ केला; परशुरामाचें तर अवघ्या क्षत्रियकुलाशीं दारुण वैर पेटून राहिलें होतें, व त्या वैराग्नीचा उपशम फार भयंकर रीतीनें झाला; बुद्ध तरी जात्या क्षात्रियच, तेव्हां त्याच्या मतांचा प्रथमतः जो प्रसार झाला असेल तो प्रायः ब्राह्मणेतर मंडळींतच झाला असेल; पुढें जेव्हां त्याचा पंथ बळावत चालला तेव्हां बौद्धांची व ब्राह्मणांची कित्येक शतकें झटापट चालली होती; शेवटीं श्रीमच्छंकराचार्यांनीं वाग्युद्धांत आपल्या प्रतिपक्ष्यांचा पराभव करून सारें भरतखंड निर्बौद्ध करून टाकून पुनः वेदमार्ग स्थापित केला.[1] ही येथवर प्राचीन काळची हकीकत झाली. यापुढें तर फारच चमत्कारिक स्थिति झाली. ब्राह्मणांचे बौद्धांशीं व जैनांशीं जो वाद संपताहेत न संपताहेत, तों द्वीपांतरींचे निराळेच वादी त्यांशीं वाक्कलह करण्यास उभे ठाकले 'ला इला इल्लिल्ला महमद रसूलिल्ला' (ईश्वर एकच आहे आण त्याचा प्रेषित महंमद आहे) या महामंत्राची जपमाळ घेतलेले व 'अल्लाहो अकबर' (परमेश्वरकी जय!) असा जयघोष करीत ज्यांनीं थोड्याच कालांत अनेक देश व्यापून टाकले असे अरबी वीर वायव्य दिशेकडून वावटळीप्रमाणें या देशांत घुसले. यांची व आमची भवति न भवति होऊन तोडजोड जों पडते न पडते,[2] तों त्यांच्याही

---

१. बाणभट्टावरील निबंध पृष्ठ ६–७ पाहा.

२. हिंदुधर्म व मुसलमानी धर्म यांचा अनेक रीतींनीं मिलाफ होत चालला ही गोष्ट मोठी!

(पुढें चालू)

पलीकडच्या मंडळीच्या या देशावर धाडीवर धाडी येऊन पडल्या. त्यांत पहिल्या प्रथम जो येशूचा कळप आला त्यानें तर काय चोंहोंकडे धुमाळीच उडवून दिली; ब्राह्मणांच्या महावीरांचें जें समुद्रार्जित क्षेत्र तें त्यांनीं 'फिरंगाण' करून सोडलें! शेवटीं वरीलच पण सुधारलेल्या धर्माची जी संभावित मंडळी पुढें आली तिनें सेंट् झेवियर्च्या[1] शिष्यमंडळीप्रमाणें एतद्देशीय अधर्मी लोकांस पावांनीं पावन करण्याची दीक्षा तर उचलली नाहीं, पण त्यांच्या तरणोपायाकरतां निराळ्या तजविजी काढल्या. प्रत्यक्ष दंडाचाच अवलंब न करतां त्यांचीं गरीब भावंडें जीं साम, दान, व भेद त्यांचा त्यांनीं आश्रय केला. हा प्रकार अद्याप चालूच आहे.

याप्रमाणें ब्राह्मणांचें वर्चस्व सहन न होऊन त्यांस विरोध करणारी प्रतिपक्षी मंडळी आजपर्यंत इतकी निर्माण झाली. इतक्यांसही दाद न देतां आजपर्यंत ब्राह्मण हे या देशांत प्रमुखचे प्रमुख राहिलेच आहेत. स्वदेशीय व परदेशीय शत्रूंवर अद्याप त्यांचीच छाप पडून राहिलेली आहे. येवढा बुद्धाचा धर्म कीं अवघ्या मानव जातीच्या एका अर्धावर ज्याचा आज अंमल आहे, तो या भरतखंडावर प्रथम पसर पसर पसरला, पण शेवटीं नद्यांच्या वर्षांकालीन पुराप्रमाणें पार सारा ओसरून गेला. येवढा अरबस्थानच्या पैगंबर साहेबांचा धर्म, कीं ज्यानें एका अर्ध्या शतकांत एकीकडे फ्रान्स व स्पेन आणि दुसरीकडे इराण व हिंदुस्थान पाहिलें, पण या देशांत कित्येक शतकें बादशाही अंमलानें चालूनही त्याच्यापासून हिंदुधर्मास पाहिलें तर काडीइतकाही धक्का पोंचला नाहीं; अवरंगजेबासारखे, टिप्पूसारखे एक एक मी मी म्हणणारे कडे इमाम होऊन गेले, पण त्या सर्वांचें बारसें व बारावा

---

ध्यानांत ठेवण्यासारखी आहे. हिंदु मुसलमानांत अर्धेमुर्धे शिरून शीक बनले; मुसलमान हिंदूंत शिरून कबीरपंथी व शेखमहंमदी बनले. आमचें योगशास्त्र मुसलमानांत शिरून सुफी नांवाचे त्यांच्यांत अवलिया बनले. त्यांचें रमल आमच्या शकुनशास्त्रांत सामील होऊन बसलें. शेंकडों हिंदु देवस्थानांचे मुसलमानांकडून खर्च चालले आहेत, व त्याप्रमाणेंच शेंकडों तक्यांचा इतमाम हिंदु राजेरजवाड्यांकडून चालला आहे. खिस्ती धर्माची वरच्याप्रमाणें आमच्याशीं अद्याप लगट जमली नाहीं. ब्रह्मसमाज, आर्यसमाज, सत्यशोधकसमाज, यांचा वरील ईश्वरप्रोक्त धर्मांशीं बराच बिंबप्रतिबिंबभाव आढळतो खरा; तरी वरील रोपडें हें या आर्यभूमींत अजून मुळींच रुजलं नसल्यामुळें त्याचा एतद्देशीय धर्मांत अंतर्भाव करतां येत नाहीं.

१. सेंट् झेवियर्† नामेंकरून एक मोठा विख्यात कॅथलिक् मिशनरी सोळाव्या शतकांत हिंदुस्थानांत आला होता. त्यानें पोर्च्युगीज् लोकांच्या मुलखांत कित्येक वर्षें उपदेशकाचें काम केलें, व हजारों लोकांस बाप्तिस्मा देऊन भावी नरकयातनेंतून मुक्त केलें. वरील शतकांत फिरंगी लोकांनीं कोंकणपट्टींत काय कहर उसळून दिला तो सर्वांस विदित आहेच. वरील खिस्ती साधूचें प्रेत गोंवें मुक्कामीं पुरलेलें आहे; व दर वीस वर्षांनीं तें भाविक कॅथलिक् मंडळींच्या दर्शनार्थ बाहेर काढीत असतात. तीन चार वर्षांपूर्वी नुकता वरील दर्शनविधि होऊन गेला हें पुष्कळांस आठवत असेलच.

† St. Francis Xavier (१५०६–१५५२) इग्नेशियस् डी लॉयलो याचा अनुयायी. पौर्वात्य देशांत (हिंदुस्तान) मिशनरी कामास यानें आयुष्य वाहिलें, व खिस्ती धर्माचा खूप प्रसार केला. १६२२ सालापासून याला लोक संत मानूं लागले. 'सम्पादक'

हीं दोन्ही वैदिक धर्माच्या लोकांनीं पाहिलीं! पिता, पुत्र व पवित्र आत्मा या त्रिकूटानेंही आजपर्यंत येथें जंग जंग पछाडले, पण कांहींएक झालें नाहीं; व इतःपर तर पाद्रीसाहेबांचा उद्योग दिवसांदिवस अरण्यरुदितवतत्व होऊं पाहत आहे. खुद्द खासा स्वारी किंवा त्यांचे कोणी हस्तक येशूच्या मेंढवाड्यांत शिरण्याविषयीं लोकांची मनोदेवता प्रसन्न करण्यास एकाद्या चवाठ्यावर उभे राहिले असतां गोमयस्नानेंकरून शुद्ध झाल्याविना बाहेर पडले तर भाग्याचें अशी आजच स्थिति दृष्टीस पडत आहे.

३. तर ज्या कोटावर आमच्या रावबहादुरांनीं आपल्या 'शतपत्रां'चा भडिमार चालू केला तो अशा तऱ्हेचा भक्कम आहे. आतां 'लोकहितवादी'च्या सरबत्तीचा थोडासा मासला वाचकांनीं पहावा:—

## " नंबर ६१. "

### भट्टांनीं लावून दिलेलें वेड.

" विनंती विशेष. हिंदू लोक हल्लीं आहेत त्यापेक्षां चांगले होण्यास त्यांनीं बहुतेक आपलीं मूर्ख मतें सोडलीं पाहिजेत. प्रथम हीं मूर्ख मतें उत्पन्न कशीं झालीं ह्मणाल तर याचें कारण लिहितों. प्राचीन काळीं हिंदू लोकांनीं विद्या बहुत केल्या. पुढें असें झालें कीं ब्राह्मण लोकांनीं नवीन विद्या अधिक अधिक शोधावयाच्या सोडून ते काव्यें करूं लागले, आणि वेद पाठ करूं लागले. अर्थ सोडून दिला आणि धर्मशास्त्रांत असें आहे कीं, आपला कुळाचार रक्षावा त्याप्रमाणें जें मागें बापानें केलें तेंच मुलानें करावें अशी समजूत पडली. आणि जों जों हे मूर्ख होत चालले तों तों मागले लोक त्यांस देवासारखे दिसूं लागले. निरक्षर भट ह्मणूं लागले कीं व्यास अवतारी होता. व ज्यांनीं गणिताचे ग्रंथ केले ते देव होते असें ह्मणून मागले ग्रंथ मात्र वाचावे, पुढें कांहीं करूं नये, असें झालें. तेव्हां अज्ञान फार वाढलें. व त्यास साधन मुख्य पुराणें आणि माहात्में लिहावयाचीं हाच कांहीं दिवसपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हां त्यांनीं मनास येईल तें लिहिलें. कोणीं कावेरीमहात्म, कोणीं करवीरमहात्म, कोणीं शालिवाहनचरित्र, कोणीं नाशिकमहात्म, कोणीं अग्निपुराण, कोणीं गणपतिपुराण अशीं लिहिलीं. प्रत्येकांत त्यांचा हेतु इतकाच होता कीं एकाद्या देवाचें किंवा एकाद्या नदीचें वर्णन करून ईश्वर त्यांत आणून ठेवून ब्राह्मणांस पैसा मिळण्याची तजवीज पाहावी. तशींच व्रतें महात्में. कोणी ह्मणाला सोमवारीं उपवास करावा, कोणी ह्मणाला मंगळवारीं. कोणी शनवारीं. दरएकाची कथा व त्याची देवता आणि त्याचप्रमाणें अमक्यानें केलें, आणि त्याचें अमुक कार्य झालें, व तसें जो करील त्याचें तसेंच होईल ह्मणून लिहिलें. पण हें सर्व कवींचें लाघव, आणि ब्राह्मणांचें कार्य करावयाची तजवीज आहे असें उघड दिसतें व याचा खोटेपणा उघड दिसतो. व वर्षांत तीनशेंसाठ दिवस व त्यांहून अधिक व्रतें आहेत. तसेंच दरएक पुराणांत दरएक देवाचें वर्णन, त्याचें नांव, अमके दैत्य त्यानें मारले, तो ईश्वर, त्यास भजावें, इतरांस भजलें तर नरकाचें साधन, याप्रमाणें लागलाच शेरा, असें दरएकांत आहे दरएकांत सृष्टीची उत्पत्ती, देवाचें चरित्र व

भविष्यें याप्रमाणें सर्व तयारी केली आहे. तेव्हां कोणते देवास भजावें, कोणतीं व्रतें करावीं, किंवा तीनशेंसाठही दिवस व्रतें करावीं ? धर्मशास्त्र पाहिलें तर ती पर्याय कांहीं वेगळाच आहे. वेद पाहिला तर त्यांत कांहीं वेगळेंच आहे. वेदांत अवतार आणि नाना प्रकारच्या देवता आणि व्रतें हें कांहीं नाहीं. फक्त होमाशीं कारण आहे. याचा मेध, त्याचा मेध हें सर्व त्यांत आहे. तेव्हा वेद, शास्त्र व पुराणें यांचा धर्म पाहिला तर अगदीं वेगवेगळा दिसतो. पुराणांत नित्यकर्म पाहिलें तर सगळा एक दिवस करावयास पुरणार नाहीं इतके धर्म त्यांत आहेत. पण त्यांत कांहीं नीति आहे असेंही नाहीं. कांसोटा असा घालावा, गंध असें लावावें, शौच्यास अमुक कोस जावें, तोंड असें धुवावें, हेंच फार आहे. याप्रमाणें नेम करणारांस काय वाटलें असेल तें त्यांचें त्यांसच ठाऊक ! बरें असो. याचा आजपर्यंत कोणींच विचार केला नाहीं. आलीकडे भट वगैरे झाले यांनीं कांहीं ग्रंथ केले आहेत. पण ते त्याहून अधिक. गोपिनाथ भटजींनीं अमुक भट्टी केली, गणेश भटांनीं अमुक भट्टी केली, अशा शेंकडों भट्या केल्या आहेत; परंतु त्यांत आहे काय ? संस्कृताचा अर्थ फार लोकांस कळत नाहीं. परंतु जर त्याचा अर्थ कळावयाजोगा असता तर मला वाटतें कीं लोक मागेंच ते ग्रंथ समुद्रांत नेऊन टाकते. परंतु ते भ्रमांत आहेत. बरें, भरली मूठ सव्वा लक्षाची आहे तेंच बरें. श्राद्ध करावयाची कल्पना लिहावयास पन्नास पत्रें लागलीं आहेत. तसेंच हरएक संस्काराच्या रीती फार मूर्खपणाच्या आहेत. लग्नाच्या, उष्टवणाच्या, देवपूजेच्या पद्धती, आणि कोणतें कर्म असें नाहीं कीं त्याविषयीं ग्रंथ नाहीं. शौच्यविधीवर देखील एक ग्रंथ आहे. त्यांत मनुष्यानें शौच्य कसा करावा हेंच लिहिलें आहे. वास्तवीक पाहा बरें याचा कांहीं तरी उपयोग आहे काय ? कशाला भट या संस्काराच्या कंठाळभर पोथ्या बाळगतात ? यांत काय आहे ? यांचा काय उपयोग ? लोकांचें सुख व ज्ञान वाढावयाची त्यांत एक देखील गोष्ट नाहीं, मूर्खपणा वाढावयाच्या गोष्टी आहेत. त्या ग्रंथांनीं वेड लावलें येवढें मात्र झालें. अज्ञान्या(ना? सं०)स अजरामर करण्याकरितां या पोथ्या लिहिल्या आहेत असें मला वाटतें, व त्यांची फजीती होऊं नये ह्मणून त्या गुप्त ठेवतात. कोणीं सोडूं नये, व कोणीं भलत्यानेंच वाचूं नये ह्मणतात याचें कारण हेंच. जर त्यांत खरें ज्ञान असतें तर कोणींही वाचलें तर चिंता काय ? ग्रंथ लिहिणारांची खात्री होती कीं, हें गुप्त ठेवलें तर यांचें महात्म राहील. हे भुसाचे लाडू आहेत हें त्यांस माहित होतें. याप्रमाणें हे भट वेडे झाले आहेत. मनुष्य कांहीं उद्योग करील किंवा विचार करील तर त्यास या भटांचे संगतीनें वेळ सांपडावयाचा नाहीं. हल्लीं कर्नाटकांतील एक सरदार याज-कडे पाहिलें ह्मणजे समजतें कीं त्याचा वेळ हातपाय धुण्यांत जातो. दिवसांतून दोनशें वेळ पाय धुतो. पांचशें वेळ चूळ भरतो. यास हें काय वेड किंवा शहाणपण आहे ! तसेंच बाजीरावाकडे पाहा. हा पुरुष मराठ्यांचे राज्यास बुडविण्यास कारण झाला. असें कां झालें याविषयीं विचार केला तर इतकेंच दिसतें कीं त्यास जन्मा-पासून नाना फडणिसानें कोपरगांवीं भटांचे शाळेंत ठेवला होता, ह्मणून मोठेपणीं केवळ भटच निपजला. याचे राजकार्य गुणांचे अंकूर जळून गेले. याप्रमाणें पूर्वीचे पेशवे भटांचे

शाळेंत नव्हते. कोणी असें ह्मणतात कीं, राज्यास अयोग्य व्हावा ह्मणून मायबापविसानें त्यास घुग्या भट केला. परंतु तोच राज्यावर आला हें देखावें प्रारब्ध. अस्तु. त्यास वेड लागलें. त्यानें राज्य केव्हां करावें, कारभार केव्हां करावा, आणि हें नित्य कर्म केव्हां करावें हें जाणलें नाहीं, आणि या कर्मांचा फायदा काय ! जोंपर्यंत निर्मळ वाटे तोंपर्यंत कोणीही हात धुतोच आहे. त्यास अमुक वेळ हात धु ह्मणून सांगावयास कशास पाहिजे ? परंतु इतक्या मूर्खपणाच्या गोष्टीस ब्राह्मण मात्र मान देतात. आणि कोणी उपास, कोणी व्रतें कोणी जप, कोणी अनुष्ठान असे सगळा दिवसभर करतात. ज्याजवळ पैसा आहे त्यास भट घेरतात आणि हा उपदेश करतात. आणि पुराणिक बायांस घेरतात व वेड लावतात. कोणी सांगतो आवळीचे झाडाखालीं जावें, पूजा करावी. कापुसाच्या वाती लाटाव्या. त्याप्रमाणें अज्ञान बायका करतात. हें वेड त्यास भट लावतात. हें सर्व त्यांनी सोडून दिल्याखेरीज यांची बरी गत मला दिसत नाहीं. मग ईश्वराची इच्छा. हे विनंती. "लो० हि०"

वरील लेख हा केवळ मासल्याकरतां दाखल केला आहे. त्यांत 'लोकहितवादी'चे भटां-विरुद्ध जे जे आक्षेप आहेत ते सर्व आले आहेत असें नाहीं. इतर पत्रांतून 'मूर्ख', 'टोणपे', 'पशू', 'भडवे', वगैरे अतिशय नाजूक शब्दांची जी पुष्पवृष्टि रावबहादुरांनीं ठिकाणो-ठिकाणीं केलेली आढळते तिची झांक सदरील पत्रांत ह्मणण्यासारखी नाहीं. असो; तर या भटविषयक लेखाचा वाक्यशः किंवा शब्दशः विचार न करतां एकंदर 'शतपत्रांत'व त्यांच्या ज्या अनेक कोट्या आढळतात त्या कितपत युक्तीस धरून आहेत हें पाहूं ह्मणजे झालें.

४. भट 'टोणपे' होत हा आरोप त्यांच्यावर शाबीत करण्याचें पहिलें एक मोठें कारण हें होय कीं, अर्थावाचून ग्रंथांचें पठन करितात. हा जबरदस्त वाऊं बिचाऱ्या भटांवर आज इकडे इंग्रेजी सुरू झाल्यापासून जो तो फाकडा विद्वान् बेलाशक झोंकून देत आहे. "काय हो, हे वेडे बेळ, एका अक्षराचाही अर्थ समजून घेण्याची खटपट न करतां जन्मभर घोकंपट्टी करीत बसतात; बारा बारा वर्षे चोवीस चोवीस वर्षे दररोज टळून काय केलें, तर भाराभर ग्रंथ येथून तेथून घोकून त्यांचा पिष्ठा पाडला, येवढीच काय ती त्यांची कुशारकी ! आणि आमचे लोक तरी कसले महामूर्ख, कीं या आळशी पोपटपंची करणाऱ्या भटांस उपाशी मारायाचें टाकून त्यांच्या सभा करतात, त्यास दक्षिणा देतात, त्यांचे आशी-र्वाद घेतात;—तेव्हां एकंदरींत आमच्या लोकांच्या बेवकुबीची काहीं शिकस्त आहे !" याप्रमाणें आजपर्यंत लक्ष वेळां आमच्या देशांतील नव्या इंग्रेजी पंडितांचे उद्गार बाहेर पडले असतील ! आमच्या 'लोकहितवादी'नींच वरील कोटिक्रम लेखद्वारा व भाषणद्वारा आज-पर्यंत कितीदां लढवला असेल कोण जाणे ! आतां हा कितपत रयुक्तिक आहे याविषयीं जर कोणी अंमळ विचार करील, तर तो किती शुष्क आहे, व बिचारे भट प्रस्तुत प्रकरणीं किती निरपराध आहेत हें कोणाच्याही लक्षांत येईल. आमच्या देशांतील भट आज पिढ्यान्पिढ्या जे वेदाची घोकणी करीत आले आहेत हा त्यांचाच अपराध काय ? उद्यां जर आमच्या सरकारची व रशियाच्या बादशहाची चकमक उडून दुसऱ्या पक्षाचा जय झाला;

आणि रशियन् लोकांची सत्ता येथें सर्वत्र स्थापित होऊन घरीं दारीं रशियन् भाषा चालू झाली, तर आजपर्यंत आंग्लभौम भाषेत पारंगत झालेल्या आमच्या अर्वाचीन महापंडितांची काय दुर्दशा घडेल बरें! मग अशा वेळीं जर झार साहेबांनी चोहोंकडे दवंडी पिटली, कीं ज्याला आमची भाषा अवगत असेल त्यालाच आम्ही चाकरीस ठेवूं इंग्रेजीची घोकंपट्टी करून तींत ज्यांनीं आपल्या आयुष्याचा अपव्यय केला त्यांस आम्ही आपल्या दाराशीं उभें सुद्धां राहूं देणार नाहीं, ते उपाशी मेले तरी बेहेत्तर आहे,—तर आमचे 'लोकहितवादी' प्रभृति इंग्रेजी विद्वान् किती हाकाटी करतील बरें! मग हीच गोष्ट जुनीं किवारीं जीं 'भटें' त्यांसही बरोबर लागू पडत नाहीं काय? हल्लीं जसा इंग्रेजी भाषेच्या ज्ञानानें चोहोंकडे निर्वाह होण्याचें साधन झालें आहे, तसाच प्रकार पेशवाईंत वेदविद्येचा नव्हता काय? मग आमचे रावबहादुर इंग्रेजी झाल्यावर जन्मले, व रामभट किंवा शामभट हा इंग्रेजांच्या पूर्वी जन्मला, येवढ्यावरून एक शहाणे व दुसरा टोणपा हा निर्णय करणें म्हणजे केवढा शहाणपणा आहे बरें!

भट हे वेदांचा अर्थ समजून घेण्याची खटपट करीत नाहींत, व वरील गोष्ट त्यांच्या कधीं स्वप्नींही येत नाहीं, याबद्दल त्यांस दोष ठेवणें हें तरी किती वेडेपणाचें काम आहे! वेदांचें पठण मुळीं लोक कशाकरतां करतात याचा आमचे अर्वाचीन पंडित अगोदर विचार करतात काय! आमचे एतद्देशीय भट ज्या हेतूनें संहिता हातीं धरतात, व रेमार्तीरस्थ भट ज्या उद्देशानें ऋग्वेदाचें अध्ययन करतात, ते परस्पर अगदीं भिन्न होत हें कोणीही अंमळ विचार केला असतां त्यास सहज कळून येण्यासारखें आहे. येथें रामभटजी आपल्या बटूच्या शेंडीला हिसके मार मारून 'शिरिखा पुरुखा' म्हणून जो दररोज आटाट करीत असतात ते मक्षमोक्षमुलरच्यापुढें बरवरीत परीक्षा देऊन पी. एच्. डी. हें वर्णत्रय त्यास पटकावतां यावें म्हणून नव्हे. त्यांचा उद्देश वरच्याहून अगदींच भिन्न असतो. तो अर्थात् हाच कीं, वेदाध्ययन हा ब्राह्मणांचा मुख्य धर्म आहे, छंदोमयी सरस्वतीचा पवित्र संस्कार द्विजांच्या जिव्हेस घडणें अवश्य होय, संहितेचें पठन केलें असतां त्यांत आपणास निःश्रेयसप्राप्ति असून आपल्या पूर्वजांच्या उद्धाराचाही तोच मार्ग आहे, वृत्रासुराचा बाप एक स्वर चुकला तों त्यासरसें भलतेंच भलतेंच होऊन येते,[1] इत्यादि कल्पना या देशांत आज हजारों वर्षे लोकांच्या मनांत ज्या दृढतर होऊन बसलेल्या आहेत त्यांचें वरील अध्ययन हें फळ होय. मग असें जर आहे, तर वैदिकांस तुम्ही अर्थज्ञान कां करून घेत नाहीं हें म्हणणें म्हणजे

---

१. वेदांत वृत्रासुराचें व इंद्राचें युद्ध वर्णिलेलें आहे. वृत्र हा रावणाप्रमाणें ऋषिपुत्र होता. याच्या बापाची अशी कथा आहे कीं, त्यानें पुत्रेष्टि करून मला इंद्रशत्रु असा पुत्र व्हावा म्हणून देवांपाशीं प्रार्थना केली, व त्याप्रमाणें त्याची मनःकामना सिद्ध झाली. पण दुर्भाग्यवशात् झालें काय, कीं वरील प्रार्थनेंत त्यानें 'इंद्रशत्रु' या सामासिक शब्दाच्या उत्तरपदावर जो स्वर यावयाचा तो न देतां पूर्वपदावर दिला; तेणेंकरून षष्ठीतत्पुरुषाच्या जागीं बहुव्रीहीचा प्रयोग होऊन 'इंद्र आहे शत्रु [नाशक] ज्याचा' असा त्यास पुत्र झाला!!—तेव्हां वेदांत स्वरांचें माहात्म्य इतकें आहे!

याज्ञिकांस तुह्मी शारीरिक शास्त्राचा अभ्यास कां करीत नाहीं, किंवा यात्रेकरूंस तुह्मी भूगोलविद्या कां पढत नाहीं हें ह्मणण्यासारखेंच केवळ अप्रयोजक होय हें उघड आहे. यज्ञाचा उद्देश जसा शारीरिक शिकवणें हा नाहीं, व यात्रांचा उद्देश नद्यांचे उगम धुंडणें किंवा पर्वतांच्या उंच्या काढणें हा नाहीं, त्याप्रमाणें आज हजारों वर्षें वेदपठनाची जी प्रवृत्ति पडली आहे तिचें तात्पर्य अर्थज्ञान हें नसून वेदराशीचें रक्षण हेंच मुख्यतः होय.

आतां वेदांतल्या वेदांतच 'ब्राह्मणेन षडंगो वेदो निष्कारणोऽध्येयो ज्ञेयश्च' (ब्राह्मणानें निरिच्छतेनें षडंगांसहित वेदाचें अध्ययन करावें व त्याचा अर्थ समजून घ्यावा) अशीं वचनें आढळतात खरीं; पण वरच्याप्रमाणें श्रुतीच्या कितीहि आज्ञा असल्या, तरी प्रस्तुत काळाच्या संबंधानें त्यांजविषयीं विचार केला पाहिजे हें उघड आहे. ज्या काळीं वेदवाणीचा साक्षात् प्रचार होता, किंवा निदान संस्कृत भाषेची तरी पुष्कळ प्रवृत्ति होती, त्या काळीं सांगोपांग वेदाचें अध्ययन व त्याचें ज्ञान हीं दोन्ही किती सुलभ होतीं हें कोणासही सांगायाला नकोच.[१] पण हल्लीं ख्रिस्तीशकाच्या एकोणिसाव्या शतकांत त्या प्राचीन स्थितीपैकीं कितीशी कायम राहिली आहे ? पूर्वींसारखा अरण्यवासी जटावल्कलधारी यजनयाजननियुक्त ऋषि आतां कोठें राहिला आहे ? पैगंबर, महंमद व येशूख्रिस्त हीं नांवें तरी वसिष्ठविश्वामित्रांच्या कर्णपटावरून कधीं गेलीं होतीं काय ? आपले वंशज शिपाई बनून पंचनद देशापर्यंत आपले झेंडे उडवीत नेतील, व कोणी अग्निनौकेवर आरोहण करून श्वेतद्वीपाची यात्रा करतील हें आमच्या सप्तर्षींच्या कधीं स्वप्नीं तरी आलें असेल काय ? मग जेथें वरच्याप्रमाणें हजारों वर्षांत सगळीच उलटापालट होऊन गेली, तेथें मूळच्या स्थितींतल्या प्रवृत्ति कशा चालू राहाव्या ? जो वेद प्राचीन होतां होतां आलीकडे आह्मांस इतका दुरावला आहे कीं त्याचा अर्थच होत नाहीं, तो करूं जाणें ह्मणजे पातक होय, अशा आमच्या समजुती होऊन बसल्या, तो अगोदर समग्र मुखोद्गत करणें ह्मणजेच केवढें अरिष्ट काम आहे ! मग त्याचें सार्थ पठन करणें हें तर किती दुर्घट होणार ! ! तर आमच्या रावबहादुरप्रभृति अर्वाच्य पंडितांनीं आज इतकीं वर्षें बिचाऱ्या भटांवर जो सारखा भडिमार चालवला आहे, तो सुरू करण्यापूर्वीं वरच्यांसारख्या कांहीं गोष्टी थोड्याशा मनांत आणल्या असत्या तर बरें होतें असें आह्मांस वाटतें.

भटांच्या प्रतिपक्ष्यांनीं दुसरी होही एक गोष्ट ध्यानांत धरण्यासारखी आहे की, वरील

---

१. 'शिक्षे'त पाठकांच्या गुणावगुणांविषयीं पुढील वचनें आढळतात:—

गीती शीघ्री शिरःकंपी तथा लिखितपाठकः ।
अनर्थज्ञोऽल्पकंठश्च षडेते पाठकाधमाः ॥
माधुर्यमक्षरव्यक्तिः पदच्छेदस्तु सुस्वरः ।
धैर्यं लयसमर्थं च षडेते पाठका गुणाः ॥

याप्रमाणेंच 'निरुक्तां'तही:—

स्थाणुरयं भारहारः किलाभूदधीत्य वेदं न विजानाति योऽर्थम् ।
योऽर्थज्ञ इत्सकलं भद्रमश्नुते नाकमेति ज्ञानविधूतपाप्मा ॥

भारवाहकांनीं जर 'षडंग वेदा' चें ओझें आज हजारों वर्षें आपल्या जिव्हाग्रीं वागवलें नसतें, तर आजला तोच 'षडंग वेद', कीं जो आमच्या धर्माचें मूळ आहे, तो कोणीकडे गेला असता बरें? ज्या मुळापासून क्रमाक्रमानें आर्यांच्या सुधारणेचा वृक्ष पुढें बल्यावत गेला तेंच जर अगोदर विच्छिन्न होतें तर आमच्या राष्ट्राची काय स्थिति होऊन जाती कोण जाणे! आह्मांस तर असें वाटतें कीं, बौद्ध, मुसलमान, ख्रिस्ती वगैरे लोकांच्या तडाक्यांतून आह्मी अद्याप जे वांचलों आहों, व वरील धर्मांपासून आह्मांस बिलकुल धक्का जो पोंचला नाहीं, हा सर्व प्रभाव वरील जबरदस्त कोटाचा आहे. मग या कोटावर आज हजारों वर्षें पहारा करून ज्या संन्यांनीं तो आजमित्तीपर्यंत एक दगडही ढासळूं न देतां जसाचा तसा कायम राखला त्यांस 'टोणपे' ही बक्षिशी देणें हें आमच्या रावबहादुरप्रभृति महापंडितांसच शोभतें असें ह्मटलें पाहिजे! ज्या कोणाचें डोकें मिशनरीं(च्यां? सं०) च्या बडबडीनें फिरून गेले नसेल, व ज्यास आपल्या पूर्वजांचा अभिमान लवमात्रही वाटत असेल, त्याच्या मनाची स्थिति वेदघोष कानीं पडला असतां फार निराळ्या तऱ्हेची होईल असें आह्मांस वाटतें; व प्रस्तुत ग्रंथकारांस 'भटें' हीं जशीं अत्यंत तिरस्कारास पात्र होऊन केवळ केरकचरा वाटलीं आहेत त्यापेक्षां त्यांजविषयीं त्याची बुद्धिही बहुधां पुष्कळ निराळ्या तऱ्हेची होईल![1]

प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आणखी असाही एक विचार सहज मनांत येण्यासारखा आहे कीं, जेव्हां कोणत्याही राष्ट्राचा जम बसून त्याची सर्व प्रकारची व्यवस्था लागते, तेव्हां चोहोंकडे श्रमविभाग ह्मणून जो अर्थशास्त्रांत सांगितला आहे तो सुरू होतो. कोणत्याही देशांत पाहिलें असतां गृहस्थ व भिक्षुक हे दोन वर्ग अगदीं निरनिराळे झालेले आढ-

---

१. आमच्या लोककल्याणकर्त्या रावबहादुरांनीं आर्यक्षेत्रीं ज्या वेळेस भटसत्राच्या स्वाहाकारास आरंभ केला होता, त्याच वेळेस इंग्लंडांत एका शार्मण्य भट्टाचार्यानें कोणत्या अनुष्ठानास सुरवात केली होती हें मनांत आणलें असतां लज्जा व खेद या वृत्तींनीं अंतःकरण परिप्लुत होतें! 'लोकहितवादीं'नीं इकडे जों शंखासुराचें व्रत चालू केलें होतें, तों श्वेतद्वीपांत मोक्षमुल्लर यांनीं मत्स्यावताराची दीक्षा घेऊन जे ग्रंथ आह्मांस इकडे कस्पटासमान वाटत होते, किंबहुना अद्यापही वाटतात, त्यांचा तिकडे जीर्णोद्धार करून 'निगमभूपतीचा नगारा' ते येणेंप्रमाणें पिटीत होते:—

The Veda has a two-fold interest: it belongs to the history of the world and to the history of India. In the history of the world the Veda fills a gap which no literary work in any other language could fill. It carries us back to times of which we have no records anywhere, and gives us the very words of a generation of men, of whom otherwise we could form but the vaguest estimate by means of conjectures and inferences. As long as man continues to take an interest in the history of his race, and as long as we collect in libraries and museums the relics of former ages, the first place in that long row of books which contains the records of the Aryan branch of mankind, will belong for ever to the *Rig-veda*. —*Ancient Sanskrit Literature*.

ळतात; पहिल्याकडे सारा ऐहिक व्यवहार सोंपवलेला असतो, व दुसऱ्याकडे त्याच्या पारमार्थिक प्रकरणाचा ह्मणजे धर्मखात्याचा हवाला दिलेला असतो. वरील श्रमविभाग एकदां ठरून गेला ह्मणजे मग त्याच्या मर्यादा अगदीं नियमित होऊन जातात. तर याप्रमाणें पाहतां आमच्या देशांतील भटांकडे अखिल वेदराशीचें पठनद्वारा रक्षण, यज्ञयागादिक अनुष्ठानें, नित्यनैमित्तिक विधि लोकांकडून करवणें, हीं कामें आज हजारों वर्षें सोंपवून दिलेलीं आहेत. मग हा सोंपवून दिलेला कार्यभाग जर त्यांनीं आजपर्यंत चांगल्या रीतीनें सांभाळलेला आहे तर त्याव्यतिरिक्त इतर गोष्टींचें ज्ञान त्यांस नाहीं ह्मणून त्यांच्यावर प्रहार करणें हा केवढा अन्याय होय! येथील सरकारी तिजोरीवर संगिनीची बंदूक खांद्यावर टाकून पहारा करणाऱ्या एकाद्या हैलंडर बाळाला जर आमच्यापैकीं एकादे फांकडे विद्वान् ह्मणूं लागले कीं, "कायरे, तूं नुसता घाण्याच्या बैलासारखा आपली रेखलेली मर्यादा न सोडतां नुसता इकडून तिकडे हिंडतोस; व तुझें कसब ह्मटलें तर काय, संगिनीनें भोसकायाचें किंवा बंदुकीचा चाप दाबून कोणावर गोळी घालायाची, येवढेंच; तुला या खजिन्यांत किती पैसा आहे, त्याची कशी काय व्यवस्था करतात, वगैरे कांहीं माहीत आहे काय? सराफाचा कांटा, कारकुनाची लेखणी हीं तुझ्या हातांत देऊन कांहीं फळ आहे? तूं बेट्या नुसता टोणगा, तुझ्या बळाचा दुसऱ्यांनीं उपयोग करून घ्यावा तेवढाच; तुझा तुला कांहीं नाहीं!"—इत्यादि पांडित्य जर एगादे कागदी जवान वरील श्वेतद्वीपस्थापुढें करायाला लागले, तर त्यानें काय उत्तर करावें बरें? त्यानें वरील कोटिक्रमास एका शब्दानेंही उत्तर न करतां जातां जातां वरील राजश्रींच्या कानशिलावर बंदुकीचा दस्ता चांगला पाहून दिला तर त्याला देवाच्या घरचा बोल आहे काय? तर वरच्यासारखेंच जबरदस्त उत्तर आजपर्यंत जी टारगी मंडळी भटांस 'बैल' ह्मणणारी निघाली आहे त्यांसही खरोखर पाहतां पाहिजे. पण हें व्हावें कसें? बिचारे बुधवारी पंचा लावणारे व भांग्या मारुतीच्या आश्रयानें राहणारे आमचे भिक्षुक कोणीकडे, आणि बूट स्टॉकिंग चढवलेले आधुनिक रावसाहेब, रावबहादुर, नामदार ही राजदरबारी मंडळी कोणीकडे! आमची तिसऱ्या बुकांतील ह्मण सर्वांच्या तोंडीं आहेच, कीं "कोठें इंद्राचा ऐरावत आणि कोठें शामभटाची तट्टाणी!" तेव्हां अशा स्थितींत आजपर्यंत आमच्या देशांतील सर्व वेदमूर्ति 'लोकहितवादी' प्रभृति अर्वाचीन पंडितमंडळीच्या हातून होणारी पुष्पवृष्टि सतत सेवींत मुकाट्यानें राहिले यांत कांहीं आश्चर्य नाहीं!

याचको याचकं दृष्ट्वा श्वानवत् गुर्गुरायते।[१]

अंक ७४—(१) भटांवर दुसरा आक्षेप. (२) भट आळशी. (३) पांगे. (४) दानधर्माच्या संबंधानें आक्षेप. (५) पाश्चात्य राष्ट्रांत भटांचें माहात्म्य.

१. भटांवर 'लोकहितवादी' प्रभृति मंडळींचा दुसरा एक जबरदस्त चार्ज असा

१. "एका याचकाच्या दृष्टीस दुसरा याचक पडला पुरे कीं लागलेच दोघे एकमेकांवर कुत्र्याप्रमाणें गुरगुरायाला लागतात!"

आहे कीं, हे निवळ पोशे होत; इतरांनीं श्रम करून जोडावें आणि या आळशी भटांनीं पाटांवर चोहोंचा आंकडा ठोकून देऊन यथास्थितपणें हात मारून घ्यावा येवढेंच यांचें काम! ही जबरदस्त कोटिही आज तीस चाळीस वर्षे बिचाऱ्या भिक्षुकांवर अप्रतिहत चालू झाली आहे. भटांनीं खाण्याखालीं सारा देश फस्त करून टाकला, जिलब्यांच्या व साखरभाताच्या ताटांनीं पेशवाई ठार बुडवली, भिक्षुकांनीं सारा देश व्यापून चोहोंकडे आळसाची वृद्धि केली, गरीबगुरिबांस नाडून हे त्यांचें डोकें कधीं वर होऊं देत नाहींत, व यामुळें दुष्काळांत लोक अन्नान्न करून मरतात, आंधळे, पांगळे वगैरे अनाथ लोकांस दान-धर्म करायाचा टाकून आमचे मूर्ख लोक रिकामटवळ्या भटांची मात्र सर्व प्रकारें भर करतात, कारखाने, विद्यालयें, ग्रंथकारांस उत्तेजन वगैरे गोष्टी सुरू करायाच्या सोडून देऊन आमचे लोक कोठें सहस्रभोजनें घालतील, देवळें बांधतील, सदावर्तें सुरू करतील, याप्रमाणें आह्मी आर्ताकडे अगदीं गाढव होत चाललों आहों,-इत्यादि पांडित्यप्रकार आज चाळीस वर्षे जो जो आपणास शहाण्या व सुधारलेल्या लोकांत लेखीत आला, त्याच्या तोंडावाटें हरहमेश बाहेर पडला आहे. त्यांतून आमच्या देशाच्या हात धुवून पाठीस लागलेलें जें मिशनरी व बाटे(ग्ये? सं०)मंडळ त्यांनीं तर 'आळशी व पोशे'भटांचा जो कांहीं पाटपुरावा केला आहे तो कांहीं पुसूं नये. ' Priesthood ' ' ( भटभाई ),' ' Priestcraft ' (भटांचा कावा), ' Priest-ridden land ' ( भटांनीं ग्रासून टाकलेला देश ), ' Sleek & Pampered priests ' (पराम्पुष्ट व सुखावलेलीं भटें ),—इत्यादि शब्दपरंपरेची पाश्चात्य भटमंडळीच्या भाषणांतून व लेखांतून अगदीं रेलचेल उडालेली नेहमीं आढळते. पण कां नये उडूं? सारा देश मेंढवाडा करून सोडला असतांही आमच्या परमोदार व दयाळू सरकारच्या डोळ्यांत जर आमच्या राजेराजवाड्यांचे चार शेंदाड शिपाई सलतात, हिंदुस्थानची संपत्ति आज शंभर वर्षे सारखी लुटीत असतांही मँचेस्टरवाल्यांची जर अजूनही इच्छा तृप्त होईना, तर आमच्या घरीं क्षणास बसणारीं भटें व नदीवर क्रिया चालवणारे कारटे यांच्या पदरीं पडणारा प्रतिग्रह पाहून वेदशास्त्रसंपन्न खिस्तलोकवासी डॉक्टर विल्सन् साहेब अशा सारख्यांचा आत्मा कां बरें तळमळूं नये!

असो; तर आतां वरील जबरदस्त कोटिक्रमांत खरेपणा कितपतसा आहे या गोष्टीच्या विचारास लागूं.

२. 'भट आळशी आहेत' हे शब्द आह्मी आज कितीक वर्षे ऐकत आलों आहों; पण आह्मांस तर वरील शब्दांचा उमज अद्याप चांगलासा पडत नाहीं हें आह्मांस प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. भट,—आणि आळशी! ही विशेष्य-विशेषणांची संगति कोण कशी जुळवील तो जुळवो! भटांच्या संबंधानें 'उपद्व्यापी,' 'लटपटे'(ट्ये? सं०)वगैरे निंदाव्यंजक विशेषणांचा प्रयोग केला असतां त्यांचा अर्थ मनांत भरण्यास मोठीशी पंचाईत पडणार नाहीं; पण 'आळसा' चें विधान त्यांच्याशीं कसें करायाचें कोण जाणे? जुन्या चालीचा जर भट घेतला तर त्याची दिनचर्या ह्मटली ह्मणजे दररोज तीन चार वाजतां पहाटेस उठा-

याचें, सूर्योदयापूर्वी आपले नित्यविधि सर्व आटपायाचे, मग साऱ्या दिवसभर आपला भिक्षुकीचा रोजगार पाहायाचा,—अमक्याच्या घरीं अमुक अनुष्ठान आहे, अमकी अमुक व्रतवैकल्यें करते आहे, गोमाजी वसंतपूजा करताहेत, सोमाजीच्या घरीं मंत्रजागर आहे, इ० इ० इ०—मग या साऱ्या उलाढाली करून राहिलेल्या वेळांत वैदिक ग्रंथांची स्वत: आवृत्ति करायाची, विद्यार्थी पढवायाचे, ग्रंथ लिहावयाचे, मोठमोठ्या दृष्टींपासून तों बारक्या-सारक्यांपर्यंत साऱ्यांची समजूत करून घ्यावयाची, वगैरे;—मग इतक्या खटाटोपींत ज्यांचा जन्म जावयाचा ते पुन: 'आळशी'च ? या महाराष्ट्र देशांत नवे प्रभु झाल्यापासून आमच्या जन्मभाषेंतील शब्दांनीं अगदीं ताळच टाकून दिला असल्यास नकळे ! एरवीं वरील शब्दांचा भटांच्या संबंधानें येवढा विपरीत अर्थ कसा व्हावा हें आह्मांस कळत नाहीं.

आतां आमचे प्रतिपक्षी कदाचित् ह्मणतील कीं, केवळ अक्षरश: जरी वरील विशेषण भटमंडळास लागू न पडलें तरी मंडूकवत् निरंतर निरर्थक आक्रोश करीत बसणारी व वेड्यासारखे कांहीं तरी चाळे करण्यांत जन्म घालवणारी जी महामूर्ख मंडळी तीस 'आळशी' ह्मणण्यास काय फिकीर आहे ? 'उद्योग' ह्मणजे 'सदुद्योग' असा अर्थ घ्यावयाचा हें उघड आहे, मग निरर्थक उद्योग करणारास 'उद्योगी' कोण ह्मणेल ?—कोटि खरी आहे, पण तींत इतकाच विचार अगोदर करायाचा कीं, आमच्या रावबहादुरां-सारख्यांनीं वेदविद्या व ब्राह्मणधर्मांतील सर्व अनुष्ठानें निरर्थक ठरवलीं ह्मणजे तीं तशीं लागलींच झालीं कीं काय याचा मात्र अंमळ विचार करणें जरूर आहे. 'लोकहितवादीं'नीं नाना फडनविसास बेवकूब ठरवला, व न्यायमीमांसादि शास्त्रांत निष्णात असणाऱ्या साऱ्या मंडळीस एका तडाक्यासरसे महामूर्खांत निवडून काढले, या जबरदस्त कोट्या त्यांच्या कितपतशा अंगावर आल्या हें मागें* वाचकांस कळलेंच आहे; मग आरोपी नंबर तीन जीं भटें तीं तरी आमच्या नामदारांच्या पिंजऱ्यांतून सुटणार नाहींत हा कोणीं भरंवसा धरावा ? मागील दोन प्रकरणीं जर रावबहादुरांचा फैसला अगदीं रद्द करून टाकून आरोपींची क्षमा मागून त्यांची संभावनापूर्वक बोळवणी करावी लागली, तर हल्लीं कोर्टासमोर असणाऱ्या वेदमूर्तींच्या विरुद्ध तरी भरपूर पुरावा असेल याबद्दल कोणी खातरजमा करावी ? तर चारी वेद व सहा वेदांगें हीं सर्व निवळ केरकचरा होत, मोक्षमुल्लरप्रभृति पाश्चात्य वैदिक हे 'शहाण्याचे सुडके आणि गाढवाचे चुलते' होत, आमचे नेहेमींचे स्नानसंध्यादिक सर्व विधि निवळ पोरखेळ असून ते ज्यांनीं आह्मांस आज हजारों वर्षें लावून दिले ते वरील 'चुलत्यां'चेच सख्खे बंधु होत, इत्यादि अनेक सिद्धांतांवर आमचे नामदारसाहेब आपलीं मिनिटें जगजाहीर करीत तोंपर्यंत बिचाऱ्या आरोपींस गटारयंत्राचा रस्ता खुला करून दिला असतां त्यांत कांहीं गैरशिस्त प्रकार होणार आहे असें आह्मांस वाटत नाहीं !

आलीकडे इकडे अर्थशास्त्राचीं मूलतत्त्वें लोकांस कांहीं समजूं लागल्यापासून 'आळशी' या शब्दाची एक नवी मीमांसा निघाली आहे. 'आळशी' कोणास ह्मणावें ?—तर ज्याचा श्रम अनुत्पादक होय, त्यास. मनुष्याच्या निर्वाहाला उपयोगी ज्या वस्तु—ह्मणजे अन्नवस्त्र-

* पृष्ठे १०९०-११०९ व १११६-११२८ पाहा. 'सम्पादक'

गृहादि—त्या ज्यांच्या हातून निर्माण होतात त्या लोकांचे श्रम उत्पादक होत; बाकी इतर धंद्यांचे सर्व लोक ही कोटि अनुत्पादक श्रमवाल्यांची.[1] तेव्हां या अनुत्पादक कोटींतले

---

१. 'उत्पादक' [produotive] व 'अनुत्पादक' [unproductive] श्रम ह्मणजे काय याची कांहीं कल्पना आमच्या वाचकांस वरील प्रसंगोपात्त विवेचनावरून होईलच; पण प्रस्तुत विषयावर पूर्ण विवेचन ज्यास पाहिजे असेल त्यानें आमच्या वडिलांचा 'अर्थशास्त्रपरिभाषा' हा ग्रंथ पाहावा. सदरील ग्रंथाच्या तिसऱ्या भागांत वरील विषयाचें निरूपण केलेलें आहे. वरील हवाला देणे हा पुष्कळ अंशीं थट्टेचाच प्रकार होणार आहे हें आह्मी समजतों; पण जर कोणी जुन्या पुस्तकांचे संग्राहक असले तर त्यांस वरील माहितीचा उपयोग घेण्याचा कदाचित् संभव आहे! येथें प्रसंगवशात् आमच्या शहाण्या विद्याखात्यास व मोडकळीस आलेल्या ग्रंथोत्तेजक मंडळीस एक सूचना करावीशी वाटते. ती येवढीच कीं, रा० सा० सीताराम विश्वनाथ पटवर्धन बी० ए० कृत 'उजळणीचें पुस्तक' किंवा 'सार्थ आश्वलायनसूत्र' अशासारख्या विचित्र पुस्तकांचा जो पुरस्कार त्यांनी आरंभला आहे, त्यापेक्षां यापूर्वीं अनेक चांगले चांगले ग्रंथ होऊन गेले असून ते जे राम ह्मणण्याच्या बेतांत आले आहेत त्यांजवर थोडासा संजीवनीचा प्रयोग झाला असतां देशाचें फार कल्याण होणार आहे. मेहेरबान चैट्फील्ड् साहेब यांस 'उजळणीचें पुस्तक' हा मोठा अमोलिक ग्रंथ वाटत असेल तर त्यांनी तो रचणाऱ्या विद्वन्मण्यांची खासगी रीतीनें पाहिजे असल्यास हवी तेवढी संभावना करावी; पण देशाचा पैसा ह्मणून जो त्यांच्या हवालीं विश्वासानें केलेला असतो त्याची अशी झोटिंगपाच्छाई करण्यास त्यांस अधिकार आहे असें आह्मांस वाटत नाहीं. त्याप्रमाणेंच नामदार देशमुख साहेब यांनींही 'आश्वलायन सूत्रा'वर ग्रंथोत्तेजक मंडळीच्या पसंतीची छाप बेलाशक ठोकून देण्यापूर्वी वाचक मंडळीच्या अभिरुचीविषयीं कांहीं तरी कींव मनांत बाळगावी हें आह्मांस रास्त दिसतें. आठ वर्षांच्या पोरीला पैंशीं वर्षांचा कोंवळा वर पाहून दिला असतां तिला जितपत आनंद होण्याचा संभव आहे, तितपतच आमच्या देशांतील कोंवळ्या वाचकांच्या हातीं रावबहादुरांनी सजवलेल्या आश्वलायन बोवांची दाढी लागली असतां होणार आहे हें उघड आहे! तर सदरील मंडळीच्या अधिपतींनीं आपली जरठ अभिरुचि एकीकडे ठेवून वर्गणीदारांच्या पैशाच्या मोबदला अमळसा कोंवळा माल त्यांस पोंचता होण्याची तजवीज केली असतां बरें असें आह्मांस वाटतें!

सदर निरूपण असें आहे:—

"धनोत्पत्तीस श्रम आवश्यक आहे. त्यावांचून धन उत्पन्न होत नाहीं......परंतु श्रमापासून सर्वदा धनरूपच कार्य होतें असें नाहीं; ह्मणून अर्थशास्त्रज्ञांनीं उत्पादक आणि अनुत्पादक, असे श्रमाचे दोन भाग केले आहेत............

कोणी ग्रंथकार, श्रमापासून विनिमयार्ह असा कांहीं, इंद्रियगोचर, ह्मणजे डोळे, त्वचा, इत्यादि इंद्रियांनीं प्रत्यक्ष व्हावयाजोगा पदार्थ उत्पन्न झाल्यावांचून, त्या श्रमास उत्पादक ह्मणणें नीट नाहीं, असें ह्मणतात. आतां कितीएक दुसरे ग्रंथकार अनुत्पादक हा शब्द "व्यर्थ" ह्या अर्थाचा समजून, ते असा पक्ष धरतात, कीं ज्या ज्या श्रमापासून आनंद किंवा दुःख निवारण, इत्यादि इष्ट उद्देश सिद्ध होतो, त्या सर्व श्रमास उत्पादक श्रम असेंच ह्मणावें.............वास्तविक......या दोन शब्दांचा अर्थ दोहों पक्षांच्या ग्रंथकारांनीं निरनिराळा घेऊन व एकमेकांचा अर्थ न समजून, ते भांडत आहेत असें वाटतें. पहिल्या पक्षाचे वादी, वैद्य, न्यायाधीश, शिपाई, चाकर, इत्यादिकांच्या श्रमास अनुत्पादक ह्मणतात. त्यांचा अभिप्राय, ह्या लोकांचा श्रम, अनुत्पादक ह्मणजे व्यर्थ, असा नाहीं; तर

(पुढें चालू.)

अगदीं अग्रगण्य झटले झणजे आमचे भिक्षुक होत. मग ते 'आळशी' कसे नव्हेत !— ठीक आहे; हीही कोटि दयानंदजींच्या परिभाषेप्रमाणें 'ठीकसे ठीक' जुळते ! आतां तींत 'जुक्ती' कितपतशी दृष्टीस पडते तेवढी मात्र पाहूं.

---

त्या श्रमापासून धन उत्पन्न होत नाहीं, असा त्यांचा भाव आहे. ज्यापासून धन साक्षात् किंवा परंपरेनें निष्पन्न होत नाहीं, तो श्रम व्यर्थ असें कोणी विचारी पुरुष झणणार नाहींत. कां कीं, ह्या जगांत धनच एक मनुष्यास संपादनीय आहे, असें नाहीं......आरोग्य, न्याय रक्षण, इत्यादि गोष्टी धनाप्रमाणेंच, किंबहुना त्याच्यापेक्षांही अधिक महत्त्वाच्या आहेत. तेव्हां तसल्या गोष्टी ज्यांच्या श्रमानें सिद्ध होतात, असे जे वैद्य, न्यायाधीश प्रभृति, ह्यांच्या श्रमास व्यर्थ कोण झणेल ?.........

उत्पादक शब्देंकरून, "मूर्त द्रव्यांची उत्पत्ति करणारा" असा अर्थ धरला, तथापि वास्तविक पाहतां, मूर्त द्रव्याची, अपूर्व सत्तारूप मुख्य उत्पत्ति, कोणत्याही मानवी श्रमानें होत नाहीं; तर त्या द्रव्याचे ठायीं 'इष्ट धर्मांची उत्पत्ति' असा जो उत्पत्ति शब्दाचा गौण अर्थ आहे, तोच येथें घेतला पाहिजे......वस्त्रें उत्पन्न करणाऱ्या साळ्याच्या श्रमानें वस्त्ररूप मूर्त द्रव्यांची अपूर्व सत्ता उत्पन्न होत नाहीं; तर सिद्ध जीं सुतें, ह्यांचे ठायीं, त्यांच्या श्रमानें इष्ट रचनारूप धर्म उत्पन्न होतो......... मनुष्यें वस्तूंचा उपभोग करून नाश करतात; येथेंही वस्तूंचा असत्तारूप नाश समजावयाचा नाहीं; तर त्या वस्तूंवरच्या इष्ट धर्मांचा नाश समजावयाचा. आपण वस्त्रें, अन्न, वगैरे वस्तूंचा उपभोग करून नाश करतों, तो त्या द्रव्यांचा करीत नाहीं; तर त्यांवरच्या इष्ट, झणजे उपयुक्त, धर्मांचा नाश करून, तीं उपयोगीं नाहींत असें करतों, असें आहे; झणून, वैद्य, न्यायाधीश, वगैरे ह्यांच्या श्रमास उत्पादक झणणारे असें विचारतात कीं, "इष्टधर्मोत्पादक" असा जर उत्पादक शब्दाचा अर्थ आहे, तर तो शब्द, दगडावर आकारविशेष उत्पन्न करणाऱ्या पाथरवटांच्या श्रमास कां लावावा ? आणि आरोग्य, विद्या, हे धर्म उत्पन्न करणारे वैद्य, शिक्षक, ह्यांच्या श्रमास तो शब्द कां लावू नये ? आतां ह्या, वर सांगितलेल्या, लोकांचा श्रम उपयोगी आहे खरा; परंतु उत्पादक श्रम ह्या शब्दापासून लोक, "इष्ट धर्मांचा उत्पादक श्रम", इतकाच अर्थ समजत नाहींत; तर वर लिहिल्याप्रमाणें "धनाचा उत्पादक श्रम" असें समजतात; झणजे श्रमानें उत्पन्न केलेला जो इष्ट धर्म, तेणेंकरून युक्त जी वस्तु, ती, धनशब्दवाच्य असावी. तेव्हां आतां विचारणीय अंश हाच झाला, कीं, धन कोणत्या वस्तूस झणावें, व कोणतीस झणूं नये.........

आतां या विचारांत गोंधळ होऊं नये, झणून आपण येथें मनुष्याच्या श्रमानें उत्पन्न होणाऱ्या इष्ट धर्मांचे तीन प्रकार कल्पूं—

पहिला प्रकार. श्रमानें मूर्त पदार्थांवर इष्ट धर्म उत्पन्न होतात. ते धर्म लोहार, सुतार, शिंपी, साळी, शेतकरी, वगैरे लोकांच्या श्रमाचीं कार्यें होत.

दुसरा प्रकार, श्रमानें मनुष्यादिक प्राण्यांच्या ठायीं, जे धर्म उत्पन्न होतात, ते; असें विद्या; कलाकौशल्यादिकांचें ज्ञान; हात वगैरे अवयव विवक्षित रीतीनें वळण्याची संवय; चांगल्या रीतीनें चालविण्याची प्रीति; व उद्योग करण्याची संवय.

तिसरा प्रकार. ह्या प्रकारच्या श्रमानें उत्पन्न झालेलीं कार्यें अचेतन पदार्थांवर किंवा सचेतन पदार्थांवर, उत्पन्न होतात; परंतु तीं मागल्या प्रकारच्या कार्यांप्रमाणें स्थायी नसतात; तर तीं क्षणमात्र राहून तत्काल नाश पावतात. गवई, नाचणाऱ्या कलावंतिणी, तमासगीर, चाकर, शिपाई, इत्यादिकांच्या श्रमांचीं कार्यें ह्या तिसऱ्या प्रकारांत येतात. ह्या लोकांच्या श्रमानें आनंद वगैरे कार्यें

(पुढें चालू.)

आतां प्रथमतः ही गोष्ट तर कोणासही कबूल करणें भाग आहे, कीं 'उत्पादक' या शब्दाचा मुख्यार्थच जर घेतला, तर आमचा दशग्रंथी भिक्षुक निवळ अनुत्पादक कोटींतलाच खरा. कां कीं, मोठा घनान्त वेद ह्मटला ह्मणजे कांहीं गिरणींतल्यासारखें कापडाचे

---

उत्पन्न होतात. परंतु साळी, शिक्षक, इत्यादिकांच्या श्रमानें आनंद करणारे किंवा दुःख निवारण करणारे, किंवा सोईस अगर निर्वाहास उपयोगी, असे, पदार्थगत स्थायीधर्म, जसे उत्पन्न होतात, तसे गवयी वगैरे यांच्या श्रमानें उत्पन्न होत नाहींत. पाहा, शिंप्यानें केलेला अंगरखा, किंवा साळ्यानें केलेलें वस्त्र, हीं बरा वेळ टिकतात. पण गवयाचें गाणें तसें नाहीं; त्याच्या श्रमानें साक्षात् आनंद उत्पन्न होतो. परंतु तो तत्काळ नाहींसा होतो. अशींच सैन्याच्या श्रमाचीं कार्येंही समजावीं. त्याच्या श्रमानें सुख देणारा, किंवा दुःख निवारण करणारा, पदार्थ उत्पन्न होत नाहीं; तेणेंकरून दुःखाचें किंवा दुःखकारक भयाचें, मात्र निवारण होतें. ह्याप्रमाणेंच न्यायाधीश, वैद्य, ह्यांविषयीं जाणावें. आतां पदार्थ एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणीं नेणारे जे गाडीवाले, बैलवाले, गलबतवाले, व्यापारी, उदमी, ह्यांच्या श्रमाचीं कार्येंही तिसऱ्या प्रकारांतच घालावीं; कां कीं, त्यांच्या श्रमापासून पदार्थांचे ठायीं नवा धर्म उत्पन्न होत नाहीं, असें कोणी ह्मणेल; परंतु हें त्यांचें ह्मणणें बरोबर नाहीं. कां कीं, ह्या लोकांच्या श्रमानें "विवक्षित स्थळीं असणें," हा गुण पदार्थावर उत्पन्न होतो........ व हा गुण उत्पन्न झाल्यामुळें पदार्थास विशेष किंमत येते; तस्मात् त्या लोकांचा श्रम, तिसऱ्या प्रकारचीं कार्यें उत्पन्न करणारा नव्हे, पहिल्या प्रकारचीं कार्यें उत्पन्न करणारा होय.

......तिसऱ्या प्रकारचीं श्रमकार्यें जीं आनंदरूप किंवा सेवारूप असतात, त्या कार्यांस कोणीही धन शब्द कदापि लावीत नाहीं. लोकांत ज्या ज्या पदार्थांस धन शब्द लागतो, तो तो पदार्थ सांठवून ठेवण्याजोगा असावा लागतो. ज्या ज्या वस्तु उत्पन्न झाल्याबरोबर नाश पावतात, व ज्या भावी उपयोगाकरतां राखून ठेवतां येत नाहींत, अशा वस्तूंस धन शब्द कोणी लावीत नाहींत, असें वाटतें. आतां दुसऱ्या प्रकारचा जो श्रम आहे त्यापासून मनुष्याच्या ठायीं ज्ञान, कौशल्य, सद्गुण वगैरे धर्म उत्पन्न होतात, त्या गुणांस धन शब्द लावावा हें सयुक्तिक आहे. यद्यपि लौकिकांत त्यांस धन ह्मणत नाहींत, तथापि हत्यारें, यंत्रें, ह्यांस जसा धन शब्द लागतो, तसा त्या हत्यारांसारखेंच धनोत्पत्तीस आवश्यक जे कलाकौशल्यादि गुण, त्यांस धन शब्द लावावा हें योग्य आहे. कां कीं ह्या प्रकारचे गुण, स्थायी, व संचित होण्यास योग्य आहेत. परंतु......येथें मनुष्याच्या कलाकौशल्यादि गुणांस जें धन ह्मटलें तें कलाकौशल्यादि स्वतः चांगलीं व इष्ट आहेत, ह्मणून ह्मटलें नाहीं; तर त्यांपासून मूर्तपदार्थरूप धन उत्पन्न होतें, ह्मणून ह्मटलें आहे. सारांश......धन शब्द हा, मनुष्यास इष्ट व श्रमसाध्य, असे जे जे मूर्त द्रव्याचे पदार्थ त्यांस व त्या पदार्थांच्या उत्पत्तीस आवश्यक जे जे मनुष्याचे गुण, त्यांस लावला आहे. ज्या ज्या श्रमानें वर सांगितलेल्या लक्षणांचें धन, साक्षात्, किंवा परंपरेनें उत्पन्न होतें, त्या सर्व श्रमास उत्पादक श्रम ह्मटलें आहे; व असें फल, ज्या श्रमापासून साक्षात्, किंवा परंपरेनें उत्पन्न होत नाहीं, (मग त्या श्रमापासून केवढाही मोठा दुसरा उपयोग होवो) त्यास अर्थशास्त्रांत अनुत्पादक ह्मटलें आहे. पाहा, संकटकाळीं मित्राचा जीव वांचविणें, हें फार मोठें काम आहे खरें; तरी या कामास जो श्रम लागला, त्या श्रमास, त्या वांचलेल्या मित्राच्या हातून पुढें कांहीं धन न उत्पन्न झाल्यास, अर्थशास्त्राच्या अनुरोधानें उत्पादक शब्द लागणार नाहीं........गवयाची संपत्ति अनुत्पादकही श्रमानें वाढली. परंतु त्यास जें धन मिळतें तेवढें देणाराचें कमी होतें. त्याच्या श्रमापासून शेतकरी वगैरे ह्यांच्या श्रमाच्या सारखें नवें धन उत्पन्न होत नाहीं......एका ठिकाणची

(पुढें चालू.)

गहू तयार होऊन पडत नाहीत, किंवा भटारखान्यांतल्याप्रमाणें खाद्यसमृद्धि निष्पन्न होत नाही. उलटें वरील श्रम हे कंठशोषफलक मात्र होत. तेव्हां या रीतीनें पाहतां भटांवर 'आळशी'पणाचा छाप ठळठळीत बसतो खरा! पण ही मीमांसा होतां होतां केवढी व्यापक होणारी आहे याचा मात्र आमच्या प्रतिपक्ष्यांनी विचार केला पाहिजे. एकदां कां

---

मंगांचे दुसरे ठिकाणी जातें; व धन उत्पन्न करणारे जे मजूर वगैरे, हे जितक्या धनाचा व्यय करतात, तितकें धन जगांतून नाहींसें झालें असें समजलें पाहिजे.

......या श्रमकर्त्यांच्या श्रमापासून कांहीं आनंदादिक उपभोग झाला, तर त्यांनी नष्ट केलेलें धन कामास लागलें, आणि........न झाल्यास, तें व्यर्थ गेलें, असें समजावें.

......कांहीं धननाश धनोत्पत्तीस प्रयोजक आहे, कांहीं धननाश तीस प्रयोजक नाहीं. मजूर वगैरे उत्पादक लोक, अन्न, वस्त्र, द्रव्य, हत्यारें वगैरे धनाचा नाश करतात खरा; परंतु तो नाश नव्या धनाच्या उत्पत्तीस कारण आहे. आणि गवई, तमासगीर, उगीच बसून खाणारे व ऐषआराम करणारे जे श्रीमंत लोक, ते खाऊन पिऊन धनाचा जो नाश करतात, तो नाश अनुत्पादक होय......उत्पादक श्रम करणारे व अनुत्पादक श्रम करणारे, या भेदांत सर्वांचा संग्रह होत नाहीं; परंतु उत्पादकत्वें-करून धननाश करणारे, व अनुत्पादकत्वेंकरून धननाश करणारे, असा लोकांचा विभाग केला असतां, त्या विभागांत सर्वांचा समावेश होतो......उत्पादक मनुष्यांनी केलेला धननाशही नियमानें उत्पादक असतो, असें समजूं नये; तर उत्पादक मनुष्य आपल्या अंगीं आरोग्य, व श्रम करण्याचें सामर्थ्य, हीं राहण्याकरतां, किंवा तीं नवीं आणण्याकरतां, धनाचा जो नाश करतात, तो सोडून, ते सुखोपभोगार्थ व ऐषआरामांत जो धनाचा व्यय करतात, तो व्यय उत्पादक नव्हे; तर अनुत्पादकच होय. कां कीं, त्या व्ययानें नवें धन उत्पन्न होत नाहीं. सारांश धनाचा जो व्यय केल्यावांचून नवें धन उत्पन्न व्हावयाचें नाहीं, तेवढा व्यय मात्र उत्पादक होय; मग तो देशांतील जमीन चांगली सुपीक करण्याकरतां असो, किंवा द्रव्यें, हत्यारें, रस्ते, वगैरे. व वाहतुकीचीं साधनें नवीं करण्याकरतां किंवा जुनीं नीट राखण्याकरतां असो, किंवा उत्पादक जे मजूर वगैरे त्यांच्या ठायीं कौशल्य, ज्ञान, कसब, शरीरबल, आरोग्य, इत्यादिक उत्पादक गुण येण्याकरतां असो. पुष्कळ जिनसांचा नाश उत्पादकत्वेंकरून होतच नाहीं. चहा, पैठण्या, पागोटीं, शेले, पितांबर, शालजोडया वगैरे वस्त्रें; पेढे, बर्फी वगैरे मिठाई, इत्यादिकांचा व्यय सर्वकाळ अनुत्पादकत्वेंकरूनच होतो. कां कीं, या जिनसांच्या उपभोगेंकरून, त्यांच्यापेक्षां कमी खर्चांत होणाऱ्या मालाच्या उपभोगेंकरून मजुरांस जितकें बलादि येतें, त्यापेक्षां अधिक येत नाहीं. याकरतां या पदार्थांच्या उत्पत्तीस जो श्रम लागतो, तो अनुत्पादक श्रम मानावा, असें कोणी म्हटल्यास एका अंशीं तें म्हणणें संभवेल; व याप्रमाणें ज्या ज्या पदार्थांचा उपभोग अनुत्पादक लोक करतात, ते ते पदार्थ उत्पन्न करण्याचा श्रम अनुत्पादक श्रम म्हटल्यास एका अर्थी चालेल. भटांस खाण्यास अन्न उत्पन्न करणाऱ्या शेतकऱ्याचा श्रम व गाणाऱ्याचा श्रम, हे दोन्ही, अर्थशास्त्राच्या दृष्टीनें, सारखेच. त्यांच्यामध्यें भेद इतकाच, कीं पहिल्या श्रमानें तदुत्पन्न फल जोंपर्यंत आहे, तोंपर्यंत जग विशेष सधन होतें व त्या फळाचा (धान्याचा) उत्पादकत्वें-करून व्यय केल्यास, तो पहिला श्रम उत्पादक होण्याचा संभव असतो; आणि दुसरा श्रम उत्पादक होण्याचा मुळींच संभव असत नाहीं.

या वरील विचारावरून, उत्पादकत्वेंकरून ज्या धनाचा नाश होतो, तें धन उत्पन्न करणाऱ्यांचा श्रम, व उत्पादकत्वेंकरून ज्या धनाचा नाश होत नाहीं, तें धन उत्पन्न करणाऱ्याचा श्रम असे श्रमाचे

(पुढें चालू.)

भट हे वरील विशेषणाच्या रूपांत आले, ह्मणजे मग आमचे नामदारसाहेब, त्यांचे धर्मगुरु दयानंदजी, त्यांचे नेकनामदार खाविंद गवर्नर साहेब व सारें कौंसल, हिंदुस्थानांतील दोन लाख फौज, सारे छोटे बडे ऑफिसर वगैरे किती मंडळी एका दावणींत गोंवली जाणार आहे याचा कांहीं सुमार नाहीं! नाहीं ह्मणायाला वरील कोटींतून शेतकरी, कोष्टी, खाटिक, पाणके(क्ये? सं.),पण्यस्त्रिया, वगैरे कांहीं निवडक मंडळी मात्र काय सुटेल तेवढी सुटेल. बाकी झाडून सारी मंडळी 'आळशी व पोशे' मंडळींत सामील होणार. मग हें जर आमच्या रावबहादुरांस पतकरत असलें, तर आमच्याकडून कांहीं एक हरकत नाहीं. आज चाळीस वर्षे देशोन्नतीच्या कामाला कायावाचामनेंकरून झटलेले 'लोकहितवादी', व दररोज सकाळीं दुधाची चरवी रिचवून धर्मोन्नत्यर्थ अस्खलित वाक्प्रवाह चालवणारे दयानंद स्वामी वगैरे खाशी मंडळी जर आमच्या भटांस सोबतीला मिळाली तर मग आणखी काय पाहिजे?

तेव्हां वरच्यांपैकीं कोणत्याही तऱ्हेनें पाहतां भटांवर 'आळशी'पणाचा आरोप यथास्थितपणें स्थापित होत नाहीं. आतां वरील मंडळी ही देशाच्या बुडणुकीस कितपत कारणीभूत होय याच्याविषयीं विचार करूं.

३. कोणाही व्यक्तीवर किंवा वर्गावर वरील आरोप लागू पडण्यास मुख्यतः ही गोष्ट सिद्ध झाली पाहिजे कीं, विवक्षित व्यक्ति किंवा वर्ग यांच्याकडून कोणतीही कामगिरी होत नसून कुटुंबावर किंवा राष्ट्रावर त्यांच्या पोषणाचा व्यर्थ बोजा मात्र पडतो. 'पोशे'-पणाचें हेंच लक्षण होय हे उघड आहे. आतां आमच्या देशांत जो भिक्षुकवर्ग आहे त्याच्याविषयीं जर विचार केला, तर कोणाच्यानें असें सिद्ध करून देववेल काय, कीं, ते मुळींच काम करीत नाहींत, किंवा निदान अगदी थोडें काम करून देशांतील संपत्तीचा वांटा मात्र ते मोठा उपटतात! वरील दोन्हीं विधानें भटांच्या संबंधानें करणें ह्मटलें ह्मणजे अंमळ जडच जाईल असें वाटतें. पहिलें विधान तर किती शुष्क आहे याविषयीं नुकतें वर लिहिण्यांत

---

दोन विभाग होतात.......कोणताही देश घेतला असतां. त्यांतील एकंदर उत्पन्नाच्या कांहीं भागाचा सर्वकाळ उत्पादकत्वेंकरूनच व्यय होत असतो, व बाकी राहिलेल्या उत्पन्नाच्या व्ययेंकरून, उत्पादक लोक अनुत्पादकत्वेंकरून ज्या धनाचा व्यय करतात तें धन उत्पन्न होत असतें व अनुत्पादक लोकांचा निर्वाह व ऐषआराम चालत असतात.........अनुत्पादकत्वेंकरून ज्या धनाचा व्यय होतो, तें धन उत्पन्न करणारे आपला धंदा सोडून वर्षभर जर उगीच बसले, आणि ज्या धनाचा उत्पादकत्वेंकरून व्यय होतो तें धन उत्पन्न करणाऱ्यांनीं आपल्या श्रमानें सर्वांच्या निर्वाहाचे पदार्थ नेहमींच्याप्रमाणें उत्पन्न केले, तर,......ऐषआरामी करावयास कोणास सांपडावयाचें नाहीं; परंतु अनुत्पादक लोक खेरीज करून सर्व लोकांस खाण्यापिण्यास मिळेल; व त्या देशांतील स्थायी संपत्ति उत्पन्न करण्याची सामग्री पूर्ववत् यथास्थित राहील तिचा क्षय अगदीं व्हावयाचा नाहीं. पण......उत्पादकत्वेंकरून नाश पावणाऱ्या धनाचे कर्ते वर्षभर उगीच रिकामे बसले, आणि अनुत्पादकत्वेंकरून नाश पावणाऱ्या संपत्तीच्या कर्त्यांनीं आपले धंदे केले, तर वर्षाच्या अंतीं ऐषआरामीचे आणि निर्वाहाचे सर्व जिन्नस एकदम नाहींसे होऊन तो देश अगदीं भिकारी होईल."

'सत्पाधक'

आलेंच आहे, यास्तव त्याजवर आणखी लिहिण्याची जरूर नाहीं. तर आतां दुसरें विधान कितपत यथार्थ होणार आहे तेवढें पाहूं ह्मणजे झालें.

आमच्या देशांतील भटांकडे आज अनादिसिद्ध कोणती कामगिरी चालत आली आहे, व ती ते आजपर्यंत कोणत्या रीतीनें बजावीत आहेत याविषयीं यापूर्वी आह्मीं उल्लेख केलेच आहेत. ते लक्षांत आणले असतां, व भिक्षुकांस सामान्यतः प्राप्ति कितपत होत असते याचा विचार केला असतां, रावबहादुरप्रभृति मंडळीचें आज इतकीं वर्षें जें त्यांच्यावर पांडित्य चालू आहे त्यांत कितपत यथार्थता आहे हें कोणाही समंजस व न्यायी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. मोठा उत्कृष्ट वैदिक घेतला, तर तो आपल्या विद्येंत पुरा होण्यास त्यास किती काळ लागत असेल, व किती श्रम पडत असतील, या लहानशा गोष्टीचा आमच्या नामदार साहेबांनीं कधीं विचार केला आहे काय? जर केला असेल, तर वरील श्रम एका पारड्यांत घातले आणि रुमेची दक्षिणा, स्वधाकाराची प्राप्ति, निरनिराळ्या याज्ञिकांतली किफायत,[1] अनेक व्रतांत निष्पन्न होणारे अपूपराशि, इत्यादि अनेक कलमें दुसऱ्या पारड्यांत दाखल केलीं, तर कोणत्या बाजूला दांडी झुकेल बरें? फार दूर कशाला, आह्मी 'लोकहितवादीं'सच खुद्द असें विचारण्याची परवानगी घेतों कीं त्यांनीं ए. बी. सी. ला आरंभ केल्यापासून आजपर्यंत जो अभ्यास केला व आजतागाईत त्यांस जो द्रव्यलाभ झाला यांचें परस्पर प्रमाण घातलें असतां तें कितीकां वैदिकांच्या संबंधानें लागू पडेल? प्रस्तुत ग्रंथकर्त्यास इंग्रेजी भाषेचें व इंग्रेजी स्मृतींचें अध्ययन करण्यास जो अटाट करावा लागला असेल त्यापेक्षां भटांस कमी श्रम पडतात असें कोणाच्यानें ह्मणवेल काय? मग आजपर्यंत असा कोणता दशग्रंथी भिक्षुक आढळला आहे, कीं ज्याचा इतमाम आमच्या ऑनरेबल् साहेबांच्या शतांशाला तरी उतरेल? आमच्या रावबहादुरांनीं ब्राह्मणांच्या 'भिक्षेच्या सनदे'ची जागोजाग टवाळी केली आहे, व त्यांच्या 'शक्कर और पूरी'वाल्या सद्गुरूंनीं शेंकडों वेळां "सब टका बनानेकी बात है" ह्मणून एतद्देशीय भिक्षुकवर्गाचा उपहास केला आहे, त्याप्रमाणेंच पाद्री व बाटे(ल्ये? सं.) मंडळीही भटांची टर उडवून 'आकाशांतील बापा'स संतुष्ट करण्याची संधि कधीं फुकट जाऊं देत नाहीं; पण चारगटपणा सोडून देऊन खऱ्या निःपक्षपात बुद्धीनें जो प्रस्तुत प्रकरणाचा विचार करील, तो खरे 'पोशे' कोण याचा चोख निकाल तेव्हांच करील याविषयीं आह्मांस बिलकुल संदेह वाटत नाहीं.

....

---

१. दयानंदजींच्या व्याख्यानांत पुढील गंमतीचा श्लोक आढळतोः—

"ब्रह्मोवाचः—

टका धर्मष्टका कर्म टका हि परमं पदम् ।
यस्य गृहे टका नास्ति हाटकाटकटक(का ? सं०)यते [?] ॥"

वरील स्मृतिवचन आमच्या परमहंसांनीं कोठून चोंचींत धरून आणलें असेल तें असो! आह्मांस तर असा संशय येतो कीं, हें त्यांच्याच स्वतःच्या 'गडबडाध्यायां'तील नसेल ना!!

पण या ठिकाणीं आमच्या प्रतिपक्ष्यांचा असा कोटिक्रम निघण्याचा संभव आहे कीं जरी वेदपठनाचे श्रम व 'कनिंघमकृत सटीक पुराव्याचा आक्ट' किंवा 'पोलिसचिंतामणि' वगैरे ग्रंथ घोकण्याचे श्रम हे परस्पर तुल्य होत असें घटकाभर कबूल केलें, तरी पहिल्यांत व दुसऱ्यांत व्यवहारदृष्ट्या किती फरक आहे हें लक्षांत आणायाला नको काय? नुसत्या श्रमाचाच विचार करून काय फळ आहे? श्रमाबरोबर त्याच्या उपयुक्ततेचाही पण विचार करणें जरूर आहे. रस्तोरस्तीं पुष्कळ वेडे रात्रंदिवस फिरत असतात, म्हणून त्यांची व 'पोलिसचिंतामणि' खिशांत घालून गस्त करणाऱ्या पोलिसांची बरोबरी करतां येईल काय? पोलिसास सरकार पगार देतें म्हणून वरील फिरत्या वेड्यांसही दिला असतां चालेल काय? —ठीक आहे. येथवर वरील कोटि आम्हांस मान्य करणें भाग आहे. पण तींत एकदोन मोठ्या गोष्टींच्या संबंधानें अगोदर थोडासा विचार होणें जरूर आहे. एक गोष्ट तर ही कीं, आमचा वेदराशि व कनिंघम यांची जी वर सांगड घालून दिली आहे ती सर्व प्रकारें बरोबर नाहीं. कनिंघम आपल्या अध्येत्यास या लोकीं फळणारा आहे, म्हणजे वरील 'आक्ट' पाठ केला असतां त्याचा तावडतोब उपयोग होण्यासारखा असून तो उपयोग दृष्टही आहे. वेदराशीची तशी गोष्ट नाहीं. त्याच्या पठनाचें फळ येथें कोर्टांत किंवा बाजारांत दृष्टीस पडणारें आहे असें नाहीं. तें आहे अदृष्ट, म्हणजे परलोकीं मात्र तें गोचर होणार![1] मग असें जर आहे, तर वरील दोन ग्रंथांची उपयुक्ततेच्या संबंधानें परस्पर तुलना होणार कशी? दुसरी गोष्ट अशी कीं, अलीकडे सोशियालिस्ट् व निहिलिस्ट् या मंडळ्यांनीं ईश्वर, येशू ख्रिस्त, बैबल वगैरे सब् झूट म्हणून सारेंच जसें एका रुपाय्यासरसें झुगारून दिलें आहे, तसाच प्रकार जरी आमच्या रावबहादुरप्रभृति अर्वाचीन ऋषींनीं साऱ्या प्राचीन ग्रंथांच्या व आचारविचारांच्या संबंधानें केला असें समजलें, तरी जोंपर्यंत वरील शून्याकार आमच्या देशांत साक्षात् झाला नाहीं, तोंपर्यंत भटांचें वेदपठन व गर्दभांचें गांधर्व हीं दोन्ही सारखीं होत असें म्हणण्यास कोणासही अधिकार नाहीं. जोंपर्यंत आमच्या नामदार साहेबांनीं कुस्तुंतुनिया शहरचा स्थापक कॉन्स्टंटाइन बादशाहा याच्याप्रमाणें सद्धर्मप्रतिपादनार्थ एकादा पवित्र ॲक्ट सरकारी कौंसलांतून पसार करून साऱ्या देशभर फडकवून दिला नाहीं, आणि शंखासुर व सुलतान महंमद या दोघांचा अवतार घेऊन दशग्रंथांचें व तेहेतीस कोटि देवांचें कांडात काढलें नाहीं, तोंपर्यंत त्यांनीं आपलीं खाजगी मतें आपलीं आपल्यापाशींच गुंडाळून ठेवावीं हें बरें. सदरील मतें जेव्हां लोक स्मृतींच्या जागीं मानूं लागतील तेव्हां अर्थातच भटांच्या वेदपठनास कोणी विचारणार नाहीं, व वरील कामगिरीबद्दल देशांतील पैसा त्यांजकडे गेला असतां अन्याय होईल. पण वरील मन्वंतर पूर्णपणें अमलांत येईपर्यंत आजपर्यंत चालत आलेल्या प्रवृत्तीप्रमाणेंच सर्व गोष्टींचा विचार करणें जरूर आहे.

तेव्हां ब्राह्मणांचा तिसरा वर्ग जो भटांचा त्यांच्या तर्फेनें एकंदरींत आम्ही असें

---

१. वेदपठनाचें साफल्य पुढच्यासारख्या वचनांवरून व्यक्त होतः—

कुक्षौ तिष्ठति यस्यान्नं वेदाभ्यासेन जीर्यते।
कुलं तारयते तेषां दश पूर्वान् दशापरान्॥

ह्मणतों कीं, त्यांच्यावर आजपर्यंत अर्वाचीन विद्वन्मंडळानें जो आळसाचा व पोशेपणाचा आरोप बिनदिक्कत ठेवून दिला आहे तो अगदीं शुष्क आहे. वरील दोन्ही विशेषणें त्यांजवर बिलकुल लागू होत नाहींत. तीं त्यांजवर उगीच जर ठोकून द्यावयाचीं असतील तर तीं त्यांच्या प्रतिपक्ष्यांस मात्र विशेष यथार्थत्वानें लागू होणार आहेत. घनान्त वेद झटला असूनही जर भट आळशीचा आळशीच राहणार, तर मग आमच्या युनिव्हर्सिटींतला एम्. ए. ही कां आळशी होणार नाहीं? सकम वेदवाणी वश झाली असतांही एतद्देशीय भिक्षुकांची 'भिक्षेची सनद' जर आमच्या फाकड्या विद्वानांच्या डोळ्यांत खुपते, तर आमच्या चिरंजीवांस ॲसिस्टंट् कलेक्टर् करा, आह्मांला एकाद्या बड्या नेटिव संस्थानांत कारभारी करा, हे हक्क सांगणें तरी कितीं अप्रयोजक होणार आहे बरें? वरील भिक्षुकी 'सनदे'वर आमचे कितीसे वेदमूर्ति आजपर्यंत गब्बर होऊन बसले आहेत? 'सब् टक्का बनानेकी बात' ह्मणून देशहितार्थ हळहळणारे जे दयानंदजी ते कधीं असा विचार करतात काय, कीं संध्याकाळच्या शिळोप्याच्या वेळीं चार घटका बडबड केल्यानें जर दररोज दोन रुपये लंबे करण्यास हक्क पोंचतो, तर दहा दहा बारा बारा वर्षांच्या घोकंपट्टीस क्षणाचें आमंत्रण व पावलीभर दक्षिणा ह्मणजे मोठी लयलूट झाली नव्हे! पण अशासारख्या कोट्या किती उघड असल्या तरी त्या वरील जगद्गुरूंच्या 'जुक्ती'स सर्वथा अगम्यच होत. निःसार जल तेवढें टाकून देऊन तन्मिश्रित दुग्धाचा स्निग्ध अंश तेवढा ग्रहण न केला, तर मग 'परमहंस'त्व तें काय!!

'लोकहितवादी'नीं आजपर्यंत आमच्या लोकांचा मूर्खपणा जो अनेक प्रकारें वर्णिला आहे त्यांत शेंकडों वेळां असा कोटिक्रम आणला आहे कीं, आमच्या जुन्या लोकांस पैशाचा व्यय कसा करावा हें बिलकुल कळत नाहीं, व त्यामुळें आज आमचा देश इतक्या खराबीस येऊन पोंचला आहे. शहाणपणाचा व्यय झटला ह्मणजे कारखाने काढावे, दवाखाने घालावे, शाळा स्थापाव्या, पुस्तकालयें सुरू करावीं, नवीन ग्रंथकारांस उत्तेजन द्यावें, पण आमचे जुने टोणपे (प्ये! 'सं॰') वरच्यांपैकीं एकाही गोष्टीकडे एक छदामही खर्चणार नाहींत; तर करतील काय? जिकडून तिकडून ब्राह्मणाची भर करतील. सहस्रभोजनें, देवालयें, यात्रा, सदावर्तें इत्यादि अनेक मूर्खपणाच्या वाटांनीं पैसे उधळून टाकतील! आतां हा जो जुन्या गृहस्थ व भिक्षुक मंडळीवर नामदार साहेबांचा भडिमार सतत उडत असतो, तो वस्तुतः पाहतां एका अंशीं खरा आहे हें कोणासही कबूल करणें भाग आहे. आमच्या लोकांत दातृत्वाविषयींच्या कल्पना फार विलक्षण आहेत, आणि पात्रापात्रत्वाचा विचार व मितव्यय या दोन्ही गोष्टींत त्यांची समजूत जशी असावी तशी नाहीं. पण ज्या प्रवृत्ति आज हजारों वर्षे सारख्या चालू आहेत त्या रावबहादुरप्रभृति मंडळीस आज आवडेनाशा झाल्या, ह्मणून लागलींच लोकांनीं एका क्षणांत सोडून द्याव्या ना! मोठमोठ्या सुधारलेल्या राष्ट्रांतही लोकांचा एकेक ग्रह नाहींसा व्हायला किती काळ लोटत असतो हें रावबहादुरांस माहीत नाहीं काय? गुलामांचा व्यापार या विषयावर इंग्लंडांत किती वर्षे चर्चा चालली होती बरें? आणि त्यांतून अजूनही वरील राक्षसी व्यापार ह्मणजे बाईटच

अशाविषयीं तरी सर्वांची खात्री होऊन चुकली आहे काय ? अमेरिकेंतलें परवाचें भयंकर युद्ध कोणास आठवत नाहीं ? तर सहस्रभोजनांत शेंकडों रुपये एकदम फन्ना करून टाकण्याचें सोडून तेच रुपये ग्रंथोत्तेजक मंडळीला देणगीच्या रूपानें दिले असतां त्यांत किती अधिक श्रेय आहे ही कल्पना आमच्या जुन्या मंडळीच्या डोक्यांत एकदम न शिरली तर त्यांत नवल कसचें ? व याबद्दल भटांच्या नांवानें खडे फोडण्यांत काय हंशील आहे ? त्यांतून आमच्या नव्या मंडळीनें तरी जुन्या खोडांस सुधारलेल्या समजुतीच्या संबंधानें जर कांहीं उदाहरणें घालून दाखवलीं असतीं तर इकडून तरी बोलायास कांहीं जागा झाली असती. पण असा तरी प्रकार आजपर्यंत कोणता दृष्टीस पडला आहे ? नाहीं ह्मणायाला येवढें मात्र झालें आहे कीं, सहस्रभोजनांत जो पैसा खर्चीं पडायाचा तो विलायती कलालांच्या उत्तेजनार्थ गेला आहे; देवालयांत जो मुरून जावयाचा तो प्रार्थनामंदिरांत किंवा दयानंदजींच्या धीशक्करेंत चूर झाला आहे; आणि विष्णुपदांत जो ठार बुडून जावयाचा तो लंडनांतल्या हॉटेलांत म्लेंच्छरमणींच्या सर्व अनंगोत्सव भोगण्यांत खल्लास झाला आहे !

येथवर एतद्देशीय भिक्षुकवर्गाच्या तर्फेनें आह्मीं केलेली तरफदारी ही केवळ येथल्या येथेंच जी स्थिति आढळते तिच्याच संबंधानें केली. आतां आपला देश सोडून जर आपण अंमळ बाहेर नजर केली, तर इकडून प्रस्तुत प्रकरणीं कितपत पुरावा मिळण्यासारखा आहे व तो कोणत्या तऱ्हेचा आहे याविषयीं थोडासा विचार करूं.

४. कोणत्याही देशांतली स्थिति आपण लक्षांत आणली किंवा कोणत्याही धर्मांतील मतांचा विचार केला तर आपणास असें आढळेल कीं, दातृत्वाचें माहात्म्य कोणत्याही राष्ट्रांत वर्णिलेलें नाहीं किंवा त्याविषयीं कोणत्याही धर्मांत आज्ञा नाहींत असें नाहीं. अगदीं अज्ञान राष्ट्रांत सुद्धां अतिथींचा सत्कार,[१] विपन्नांवर दया करणें, धर्मनिष्ठ लोकांच्या द्वारें ईश्वराराधन, वगैरे प्रकार चालू असल्याविषयीं आढळतें. मनुष्य स्वभावत: स्वार्थैकपर असल्यामुळें त्याची बुद्धि आपलें जें आहे तें आपल्यापाशीं ठेवावें, किंबहुना संधि सांपडल्यास दुसऱ्याचेंही लुबाडावें, अशा प्रकारची असते. ही बुद्धि अत्यंत निंद्य व अनर्थकारक होय हें उघड आहे. तेव्हां सर्व धर्मप्रवर्तकांनीं आपापल्या राष्ट्रांतून वरील कुत्सित मनोवृत्तीचा जितका संकोच होईल व तद्विरुद्ध जी औदार्यबुद्धि तिचा जितका विकास होईल तितका होण्याची तजवीज केलेली आढळते. आमच्या देशांत प्रतिग्रहाचे मालक जसे भट हे होत, त्याप्रमाणेंच मुसलमानांत फकीर आहेत, व ख्रिस्ती धर्मांत पाद्री आहेत. त्यांतून सदरील अंकावरील अवतरणांस अनुसरून जें मिशनरी मंडळ आमच्या भटांवर नेहेमी प्रहार करीत

१. अतिथीच्या सत्काराविषयीं आमच्या धर्मांत कशा आज्ञा आहेत हें बहुधा येथें सांगायाला नकोच. वैश्वदेवानंतर चवाठ्यावर घटकाभर उभें राहून आगंतुक (एकाएकीं येणाऱ्या) अतिथीची मार्गप्रतीक्षा करावी आणि नंतर अन्नग्रहण करावें हा गार्हस्थ्याचा धर्म होय हें सर्वप्रसिद्धच आहे. अगदीं अडाणी राष्ट्रांतील पद्धति पाहणें असल्यास प्रसिद्ध काव्य 'लेडी ऑफ् दि लेक्' याचा पांचवा सर्ग पाहावा. स्कॉटूलंडच्या वेषधारी राजास त्याच्या शत्रूकडून कोणत्या तऱ्हेचा पाहुणचार मिळाला तो त्यावरून लक्षांत येईल.

असतें, त्याचा स्वतःचा चरितार्थ कसा चालत असतो याबद्दल तें कधींच क्षणभरही विचार करीत नाहीं हा थोडा चमत्कार आहे असें नाहीं. पण इसापनीतींतील 'पक्षपाती न्यायाधीशा'-प्रमाणें आपल्या पदरांत माप घ्यावयाचें तें एका पारड्यानें व दुसऱ्याच्या पदरांत घालायाचें तें दुसऱ्या पारड्यानें ही सामान्यतः जगांतली रीत आहेच; मग येशूच्या मेंढवाड्यांतलीं लाडकीं कोंकरें तरी वरील नियमास अपवाद कां आणतील !

५. त्यांतून इंग्रेज लोकांचे एकनिष्ठ भक्त जे आमचे रावबहादुर त्यांनीं खुद्द इंग्लंडांतच भिक्षुकीचा प्रकार कोणत्या तऱ्हेचा आढळतो याविषयीं कधीं लवमात्रही विचार केला नाहीं हें मोठें आश्चर्य आहे. वरील विचार जर ते करते तर त्यांची लेखणी येथील भटांवर इतकी चरचरीत चालती ना ! कां कीं, साऱ्या सुधारणेंत पूर्ण झालें म्हणजे युरोपखंड, आणि त्यांत सुधारणेचा ऐन अस्सल गाभा म्हटला म्हणजे इंग्लंड देश; पण या गाभ्याच्या आंत जों डोकावून पाहावें तों कांहीं चमत्कारिकच स्थिति आढळते. नामदार साहेबांच्या तत्त्वज्ञानाचा महासिद्धांत जो भटांच्या संबंधानें अदत्तपणा व भटांचा द्वेष या दोहोंपैकीं एकही गोष्ट वरील ठिकाणीं निदर्शनास येत नाहीं. एकादा 'लोकहितवादीं'चा शिष्य 'निबंधसंग्रह' खाकोटीस मारून महापुण्यभूमि जें श्वेतद्वीपक्षेत्र तेथें जर गेला, तर तेथल्या तीरावर पाऊल ठेवल्याबरोबर त्याच्या चित्ताला मोठा संतोष होईल कीं, "आतां वरील पराभास सोकवलेलीं जीं द्वाड भटें त्यांच्यापासून मी अगदीं मुक्त झालों, ज्या अत्यंत धन्य देशास आज माझे पाय लागले तेथील लोक असे बहादर आहेत कीं, ते भटांच्या काव्याला कधीं भुलणारे नव्हेत; ज्यांनीं खुद्द आपल्या राजांचाही मुलाजा ठेवला नाहीं ते दुबळ्या भटभिक्षुकांस मीठ घालतील कीं काय ? ही गोष्ट कधींही घडायाची नाहीं !" याप्रमाणें मोठी उमेद बाळगून वरील महापंडित इंग्लिस्तानांत प्रवेश करील; पण त्यास लवकरच आढळेल कीं, दुर्वासाच्या मागें लागलेल्या सुदर्शनाप्रमाणें भटांचा पाठपुरावा हा आपला जेथें तेथें आहेच ! 'आगींतून निघालें आणि फुफाट्यांत पडलें' या म्हणीचा अनुभव वरील भटत्रस्त गृहस्थास येईल; अथवा खरें म्हटलें तर फुफाट्यांतून निघून भर आगींत जाऊन पडलों असेंही त्यास वाटेल ! विलायतेच्या संबंधानें वरील म्हण उलटी लागू करण्याचें कारण पुष्कळांस माहीत असेलच कीं, भिक्षुकमंडळीचा उपद्रव इंग्लंडास मुळींच नाहीं, किंवा धर्मभोळ्या हिंदुस्थानाहून कमी आहे, असा प्रकार अगदीं नाहीं. तर उलटें असें मात्र आहे कीं, तिकडे जें भटांचें बंड आहे त्याच्या पासंगालाही इकडचें पुरायाचें नाहीं. तिकडच्या अगदीं कनिष्ठ प्रतीच्या भटास जी प्राप्ति असते ती इकडे मोठ्या पदीच्या भिक्षुकासही होत नाहीं. पाहा कीं, इकडे साऱ्या दिवसभर उपद्व्याप करून वर्षाच्या काठीं शेंदोनशें रुपये मिळाले म्हणजे डोक्यावरून पाणी गेलें अशीं इकडचीं बिचारीं 'भटें' कोणीकडे; आणि दशमांशभुक्[1] विलायती गोरे भट कोणीकडे ! तसेंच दररोज प्रहरभर कंठशोष

१. आमच्या प्राचीन धर्मशास्त्राप्रमाणें राजा हा षष्ठांशभुक् होय म्हणजे त्यानें जमिनीच्या

(पुढें चालू.)

करावा तेव्हां शेर दोनशेर तांदुळांचे धनी होणारे आमचे पुराणिक कोणीकडे आणि लॉर्ड होऊन वरच्या पार्लमेंटांत बसणारे विलायतेंतील सरदारी भिक्षुक कोणीकडे! आमच्या साध्याभोळ्या देशास पाश्चात्य तत्त्वज्ञानी 'priestridden' (भटांनीं खोगीर ठेवलेला) असें पुष्कळ वेळां विशेषण जोडतात; पण आह्मांस खास वाटतें कीं, विलायती भट आमच्या नेटिव भटांस हजार वाट्यांनीं बरें ह्मणवतील. इकडे हिंदुस्थानांत कोणीं आजपर्यंत धर्माचें एक स्वतंत्र खातेंच ह्मणून कधीं ऐकलें आहे काय? पण आमच्या राज्यकर्त्यांच्या सुधारणाप्रमुख देशांत आज अनादिसिद्ध कालापासून 'चर्च' (धर्मखातें) आणि 'स्टेट' (राज्यखातें) हीं दोन्ही खातीं अगदीं बरोबरीनें चालली आहेत. गृहस्थांमध्यें जशा छोट्या अधिकारांपासून तों अमीरउमरावीच्या पदव्यापर्यंत क्रमाक्रमानें पायऱ्या आहेत, त्याप्रमाणेंच भटभिक्षुकांतही छोटेखानी उपदेशकापासून तों बिशप्, आर्चबिशप यांच्यापर्यंत तारखी अधिकारपरंपरा आहे. मुलकी व लष्करी खात्यांत जसे प्रतिवर्षी लोक परीक्षा देऊन शिरतात, त्याप्रमाणेंच धर्मविषयांत परीक्षा देऊन दरवर्षी नवीन मंडळी धर्मखात्यांत शिरते. आतां या धर्मखात्याच्या मंडळीस देशाची येवढी कामगिरी तरी काय बजवावी लागते ह्मणाल, तर नूतन अर्भकांचें उपनयन, वधूवरांचें ग्रंथिबंधन आणि प्रेतांचें भूमीकरण! ज्यास बाप्तिस्मा ह्मणतात तो विधि झाल्यानें मनुष्य येशूच्या कळपांत येतो व भावी नरकाग्नीचा उपशम पाद्रीकृत पवित्र प्रोक्षणानें होतो, यास्तव मूल जन्मल्यावर थोड्याच दिवसांनीं वरील उपनयनविधि व्हावा लागतो तो करणें; वधू व वर यांनीं देवळांत पाद्री(ग्रां! सं०)कडे जाऊन तेथें आणा शपथा कराव्या लागतात व लग्न नोंदून ठेवावें लागतें तो प्रकार; आणि शेवटल्या सार्वजनिक पुनरुत्थानापर्यंत मेलेल्या ख्रिस्ती मनुष्यांस लांकडाच्या पेटींत पडून राहावें लागतें, तर हा भूमीकरणसंस्कार,—हीं तीन पाद्री(ग्रां! सं०)चीं मुख्य कामें होत. याखेरीज आपापल्या टापूंतलें लिहिणें ठेवणें, शाळांवर देखरेख ठेवणें, व दर आठां दिवसांनीं देवळांत उपासना चालवून एक धर्मव्याख्यान देणें, वगैरे कांहीं अल्पस्वल्प कामेंही त्यांच्याकडे असतात. आतां या सर्व कामांकरतां एक स्वतंत्र अगडबंब खातें ठेवणें हें किती जरूरीचें आहे, व

---

उत्पन्नाचा दहावा भाग घ्यावा. विलायतेंतील पाद्री आपल्या खात्याकडे काळीच्या वसुलाचा दहावा हिस्सा ओढतात. यास इंग्रेजींत 'टैथ्' (tithe) ह्मणतात. सदरील प्रकरणासंबंधीं कांहीं माहिती थोडक्यांत हवी असल्यास ती मराठी क्रमिक पुस्तकांत 'इंग्लंड्वर्णन, प्रकरण आठवें, धर्म व धर्मखातें' या धड्यावरून मिळण्यासारखी आहे. त्यांतील पुढील मजकूर प्रस्तुत विषयास विशेष उपयोगाचा आहे:—

"धर्माध्यक्षांच्या निर्वाहासाठीं भूमीच्या उत्पन्नाचा दहावा हिस्सा योजिला आहे, आणि बहुतकरून प्रत्येक विभागांत देवळाजवळ राहण्यास घर व कांहीं जमीन धर्माध्यक्षास मिळते."

१. इंग्लंड्नें राज्यखात्याच्या संबंधानें जसे इकडच्या तालुक्यासारखे बावन्न परगने केले आहेत, तसे धर्मखात्याच्या संबंधानेंही पुष्कळ विभाग केलेले आहेत. या विभागांस 'पॅरिश्' ह्मणतात. दर एक पॅरिशमध्यें जन्ममरण व विवाह यांचा नोंदणीपट ठेवलेला असतो. त्याप्रमाणेंच लोकांच्या उपासनेकरतां देऊळ, शिक्षणाकरतां गांवठी शाळा व जे अगदीं विपन्न होतील त्यांच्या निर्वाहाकरतां 'वर्कहौस' (कारखाना) वाही सोयी वरील विभागांत असतात.

असें खातें ज्या लोकांनीं आज शेंकडों वर्षें चालवलें आहे त्या लोकांनीं इतर राष्ट्रांच्या धर्मभोळेपणाविषयीं निरंतर वाटाघाट करीत असावी हें किती शहाणपणाचें काम आहे, याचा आमच्या वाचकांनींच विचार करावा !

सदरहू प्रकरणाच्या संबंधानें लिहूं गेलें असतां आणखी पुष्कळ विस्तार होण्याजोगा आहे. पण त्याची विशेष अवश्यकता नाहीं, यास्तव पुढील दिग्दर्शन मात्र करतों. आमच्या राज्यकर्त्यांनीं भटांच्या पायीं केवळ आपला स्वतःचाच देश नागवून ठेवला आहे असें नाहीं, तर आपल्या पाद्रीं(द्र्यां? सं०)चें नवाळें त्यांनीं इतर देशांवरही 'तुका ह्मणे माझें आहे संतांवरी ओझें'[1] या न्यायास अनुसरून खुशाल ठेवून दिलें आहे. बिचारा ऐर्लंड् देश, कीं ज्यानें आजपर्यंत आत्ममुक्त्यर्थ शेंकडों वेळां व्यर्थ प्रयत्न केले आणि या घटकेपर्यंत ज्याची सारखी आबळा[2] चालली आहे त्यावर इंग्लिश सरकारानें तीनशांहून अधिक वर्षें आपल्या सुधारलेल्या (आवाळ? सं०) भटमंडळींचा उदरनिर्वाह खुशाल चालवला होता. ऐरिश् लोक रोमन् कॅथलिक् त्यांस सरकारी बिशप् आर्चबिशप प्रभृति सद्धर्मोपदेशकांची बिलकुल जरूर नाहीं, तरी वरील अगडबंब धर्मखात्याचा बोजा त्यांच्यावर बिनदिक्कत ठेवून दिलेला होता ! दुसरें उदाहरण आमच्या देशाचें. येथें अद्याप येवढी मेहेरबानी झाली आहे, कीं 'ऐरिश् चर्च्'प्रमाणें येथें एक 'इंडियन् चर्च्' स्थापित केलें नाहीं; ह्मणजे इतर शेंकडों संबंधानें गोऱ्या मंडळीस असें येथें

---

१ "विनोद व महदाख्यायिका" हें सदर पाहा.*

* सदर आख्यायिका याच ७४ व्या अंकांत आली आहे. ती अशी:—

तुका ह्मणे माझें आहे संतांवरी ओझें ।

पंढरपुरच्या वाटेनें वारकऱ्यांचा मेळा चालला असतां एक सद्गृहस्थ त्यांच्याबरोबर चालले होते. त्यांनीं विचार केला कीं, ही आपली पडशी येवढ्या सगळ्या वाटभर खांद्यावर वागवण्याचा कोणीं त्रास करावा ? तर कांहीं तरी हिकमत योजली पाहिजे. असें मनांत आणून बोवांनीं केलें काय, कीं एका भोळ्या वारकऱ्याजवळ जाऊन मुकाट्यानें आपली पडशी त्याच्या खांद्यावर ठेवून दिली. वारकरी विचारतो, 'कां हो दादा, असं कां, तुह्मीं आपली पडशी माझ्या खांद्यावर कां टाकली ?' दादा उत्तर करतात, 'अरे तूं पंढरीचा वारकरी ह्मणवतोस, तुकारामबोवांचा गाथा तुह्मी नित्य पढतां, आणि त्यांचें वचन कसें तुला माहीत नाहीं ?' बिचारा वारकरी गांगावून विचारतो, 'काय दादा, कोणता महाराजांचा अभंग ? त्यांचें वचन आह्मीं कोणतें मोडलें ?' गृहस्थानें वरील अभंगाचा चरण ह्मणून दाखविला. तो ऐकल्याबरोबर भाविक संतानें मान डोलवली, आणि ह्मणाला, 'आहे खरें बोवा, महाराजांची आज्ञा आह्मांला मान्य आहे ! असें ह्मणून तो मुकाट्यानें चालूं लागला. इकडे वरील सर्व संवाद दुसऱ्या एका गृहस्थानें ऐकला; आणि त्यानें विचार केला कीं, या लुच्च्यानें आपलें कार्य तर साधलें, पण हें उपयोगी नाहीं; याच्यावर कांहीं तरी युक्ति लढवली पाहिजे. असें मनांत आणून त्यानें एक भला दांडगेश्वर कुणबी पाहिला आणि त्याला सांगितलें कीं त्या लुच्च्याच्या एक चांगली थोबाडींत भडकाव, आणि पायां पडून 'क्षमा करा देवराया, भक्त तुका लागे पायां ।' असा अभंग ह्मण. चेल्यानें गुरूचा मंत्रोपदेश तावडतोब अंमलांत आणला, तेव्हां वरील सद्गृहस्थांनीं आपला अभंग व पडशी हीं दोन्ही बरोबरच माघारीं घेतलीं !" 'सम्पादक'

२. ऐर्लंडच्या संबंधानें ही मोठी चमत्कारिक व ध्यानांत ठेवण्यासारखी गोष्ट आहे कीं, तें अद्यापि आपला मूळचा कॅथलिक् धर्म राखून राहिलेलें आहे.

यथेच्छ चरायाला सांपडतें त्याप्रमाणेंच तिकडची भिक्षुक मंडळींची झुंडही इकडे सोडून देतां येती. तरी येथेंही आर्चबिशप बिशप्, चॅप्लन् वगैरे शेंकडों मंडळींचा तनखा चालू आहेच; नाहींसा नाहीं. कित्येक चॅप्लनांस तर मुळीं कामही नाहीं तरी त्यांचा पुरवठा आपला चालू आहेच !

वरील सरकारी धर्मखात्याखेरीज खाजगी धर्मखातींही विलायतेस थोडीं आहेत असें नाहीं. आमच्या अज्ञानांधकारमग्न देशाच्या धर्मोन्नत्यर्थच कितीं मिशनें चालू आहेत पाहा. हीं इतकीं विलायती भटांचीं अन्नसत्रच ह्मणायाचीं ! येथूनच्या प्रेषितांनीं वरील लक्षावधि रुपयांचे गळच या आर्यजनसमुद्रांत टाकून दिलेले आहेत, पण त्यांच्या प्रबळ आमिषास भुलूनही कधींकाळीं एकाद्या महापर्वणीस लेले किंवा काणे यांच्यासारखा अंमळ जाडगेला असा मासा त्यांस घा(गा ? सं०)वतो ! बाकी दर वर्षींच्या रिपोर्टांची खोगीरभरती व्हावयाला पुष्कळ महाआरि किंवा मातंग ह्या मंडळींच मारून मुटकून सामील करावी लागते !

असो; तेव्हां एकंदरींत पाहतां वरील विवेचनावरून कोणाही निःपक्षपात बुद्धीच्या मनुष्याची खात्री होईल, कीं, 'लोकहितवादी'प्रभृतींनी भटांच्या नांवानें जी हाकाटी आज कित्येक वर्षें उठवलेली आहे, कीं ते देशास केवळ भारभूत होत, ती अगदीं असमंजस होय. ज्या काळीं भटांचा साऱ्या देशांतून निःपात होईल, व धर्माची मनुष्यजातीस मुळींच जरूर राहणार नाहीं, त्या काळीं आह्मीही आपल्या भिक्षुकमंडळीस एकदम शेवटची सुपारी देऊन रजा देऊं; पण मोठमोठ्या शहाण्या ह्मणवणाऱ्या देशांतून आजमितीपर्यंत जर भटांचें खूळ आहेच आहे, तर आह्मीच काय ते साऱ्या जगांत महामूर्ख व धर्मभोळे ह्मणून जे चोहोंकडे टिमकी पिटतात, त्यांच्या शहाणपणाची, शोधाची, व निःपक्षपात बुद्धीची जेवढी तारीफ करावी तेवढी थोडी असें आह्मांस वाटतें !

---

कवणाला न प्रिय तें गुणमणिमय केलिमंदिर श्रुतिचें ? ।
—'आदिपर्व' (९, १६ उत्तरार्ध सं०), आर्याभारत, मोरोपंत.

अंक ७५—(१) ब्राह्मणांचें प्रस्थ. (२) ह्या मत्सरभाव उत्पन्न होण्याचीं कारणें. (३) ब्राह्मणांची व इतर राष्ट्रांची तुलना. (४) वस्तुस्थिति. (५) हल्लींच्या उच्च जातीच्या वर्तनांत व ब्राह्मणांच्या वर्तनांत अंतर. (६) शेवटले दोन मुद्दे.

१. 'लोकहितवादीं'चा भिक्षुकवर्गावर, किंबहुना एकंदर ब्राह्मणज्ञातीवर हाही एक मोठा रोंख आहे कीं, त्यांचें प्रस्थ या देशांत प्राचीन काळापासून फार माजलेलें आहे. मनुष्यजाति ही वस्तुतः सारखी असून तींत जन्मतःच लहान थोर कोणी नाहीं असें असतां ब्राह्मणांनीं इतर वर्णांच्या लोकांस फसवून आपलें स्तोम इतकें माजवून ठेवलें आहे कीं, आज हजारों वर्षें गेलीं असतांही 'वर्णानां ब्राह्मणो गुरुः,' 'सागरे सर्वतीर्थानि पदे विप्रस्य दक्षिणे' वगैरे बंडाळी या घटकेपर्यंत कायम आहे ! आतां हें ढोंग इतकीं सहस्रावधि वर्षें

निभलें कसें याविषयीं कोणाच्या मनांत शंका येईल, तर तिच्या समाधानार्थ रावबहादुरांनीं अशी एक अपूर्व कोटि काढली आहे कीं, या आपमतलबी ब्राह्मणांनीं आपली सारी विद्या अगदीं गूढ ठेवली, तेणेंकरून तींत काय आहे कोण जाणे या भ्रमांतच सारे इतर लोक गढून राहिले; व त्यामुळें 'झांकली मूठ सव्वा लाखाची' या म्हणीप्रमाणें ब्राह्मणांचा व त्यांच्या विद्येचा भोपळा आजपावेतों न फुटतां तसाच राहिला ! पण आतां सरतेशेवटीं आकाशांतील प्रभूस ब्राह्मणेतर वर्णांची कींव येऊन त्यानें या भरतखंडाचें राज्य आपल्या लाडक्या लोकांस बहाल केल्यामुळें त्यांच्या प्रसादानें 'लोकहितवादी', 'गुलामगिरी'कार, 'सत्यदीपिका'धारी असे आज नव ब्रह्मनिष्ठ उदयास येऊन त्यांनीं हें कितीका काळाचें ब्राह्मणांचें बंड मोडून तें 'पुरंदरच्या बंडा'च्या भेटीला पाठवण्याचा स्तुत्य उद्योग सुरू केला आहे !

२. आतां ब्राह्मणांच्या महत्त्वाच्या संबंधानें हा जो प्रस्तुत ग्रंथकारास मत्सरभाव उत्पन्न झाला आहे, किंवा निदान जो त्याच्या ग्रंथांतून व भाषणांतून नेहेमी व्यक्त होतो, तो ज्याचा त्यास निःपक्षपाततेच्या रूपानें मोठा भूषणप्रद वाटून तत्समानकालीन लोकांसही नवीन विद्वत्तेचें परमसार म्हणून वाटला असेल यांत संशय नाहीं, पण आम्हांस तर तो बऱ्याच अंशीं निराळ्या रूपानें भासतो हें आम्हांस प्रांजलपणें कबूल करणें भाग आहे. निःपक्षपातपणाचें स्वरूप आम्ही येवढेंच समजतों कीं:—

शत्रोरपि गुणा वाच्या दोषा वाच्या गुरोरपि ।

"शत्रूचेही गुण असले तरी ते बोलून दाखवावे, व प्रत्यक्ष आपल्या गुरूचे दोष असले तरी तेही पण उघड बोलावे !" पण आमच्या नामदार साहेबांच्या व तद्वर्गीय लोकांच्या ठिकाणीं वरील पक्षपाताभाव कांहीं चमत्कारिक तऱ्हेचा नजरेस येतो. त्यांस वरील श्लोकार्धांत 'अपि' [ही] या शब्दाचें स्वारस्य मुळींच भासत नाहींसें वाटतें. त्यांचें वचन कांहीं निराळ्याच प्रकारचें; तें हें:—

शत्रोर्गुणा एव वाच्या दोषा एवगुरोरपि ।

"शत्रूचे गुण असतील तेवढेच काढावे, व गुरूचे जेवढे म्हणून दोष आढळतील तेवढे काढावे" हा प्रकार गेल्या वीस पंचवीस वर्षांत झालेल्या. पुष्कळ ग्रंथांतून आढणारा आहे; हें सर्वांस मशहूर आहेच.

आम्हांस ही गोष्ट कबूल आहे कीं, आपल्या देशांतली एकादी गोष्ट असली म्हणजे तेवढ्यावरून तिची तारीफ करावी, किंवा तिचा वास्तविक दोष असेल तो छपवण्याचा प्रयत्न करावा, हे दोन्ही प्रकार अश्लाघ्य होत; जो आपणास न्यायी व निःपक्षपात म्हणवतो त्यास वरील दोन्ही गोष्टी खपायाच्या नाहींत हें उघड आहे. पण आपले जेवढे म्हणून दोष असतील तेवढे बाहेर काढून जगजाहीर करणें, आपणांवर बळेंच खोटे दोषारोप करून घेणें, किंबहुना आपल्या गुणांवरही दोषत्व स्थापित करणें, आणि या सर्व कृत्यांबद्दल बिलकुल संकोच न मानतां उलटी आपली आपण मोठी फुशारकी मारणें, व हें मोठें लोकहिताचें कार्य आहे म्हणून समजणें, हें सर्व निःपक्षपातत्वाचे कोणत्या मुलखांतले प्रकार असतील ते असोत ! आम्हांस तर वरील गोष्टीचा बिलकुल उमज पडत नाहीं. वरील पक्ष-

पाताभावास आह्मी तर अज्ञानातिशय, मेंदू बिघडल्याचा प्रकार, किंवा अतिनिंद्य मनोधारणाचा प्रकार, अशीं नांवें देतों. ज्या बेटबा परद्वीपस्थ लोकांस इकडची उगीच उडत उडत माहिती सुद्धां पुरती मिळत नाहीं, व स्वाभिमानास अगर धर्माभिमानास पेटून जे निरर्गल प्रलाप करतात, त्यांची एक गोष्ट असो; किंवा जे येथल्या येथें मोट हाकायाची सोडून किंवा भांडीं ठोकायाचीं सोडून बारा पिढ्यांत न घडलेल्या साक्षरत्वसंस्कारास पात्र झाल्यानें पोप कवीनें वर्णिल्याप्रमाणें ज्यांच्या ठायीं विद्यारूप वारुणीच्या पहिल्या झुरक्याचा पूर्ण अंमल ‡ नजरेस पडतो, त्यांचीही गोष्ट एक वेळ राहूं द्या; पण वाग्देवीचें माहेरघर म्हणून आज सहस्रावधि वर्षें गाणावलेल्या अत्युच्च वर्णांत जन्म झाला असून व बुद्धीस परम वैशद्य आणणारी जी पाश्चात्य विद्या तिचाही पुष्कळ संस्कार घडला असून ज्यांस आपल्या देशांत निंद्यतेचाच प्रकार जिकडे तिकडे दृष्टीस पडतो, जें जें पाहावें तें तें मूर्ख, वेडगळ, कुत्सित अशाच रूपानें ज्यांच्या मनांत भरतें, व अखिल दोषमय अशा या भारतवर्षांत आह्मी कोठचे हतभाग्य जन्मास आलों, ही समजूत ज्यांनीं स्वत: निरंतर उराशीं बाळगून ती आपल्या देशबंधूंच्या गळ्यांत घालण्याचाही ज्यांचा चाळीस वर्षें अस्खलित प्रयत्न चालू आहे, त्यांची शहामत केवढी ह्मणावी! 'इसापनीती'तील खेचरास आपल्या अवलादीविषयीं खोटा अभिमान वाटत होता, कीं मी मोठ्या उमद्या घोड्याचा बच्चा आहें, तर मीही वेळ पडल्यास आपल्या अंगचा पराक्रम धन्यास दाखवीन,—हा प्रकारही आह्मांस तितका अप्रशस्त वाटत नाहीं; पण प्रत्यक्ष उच्चै:श्रव्यापर्यंत जरी आपली परंपरा लागत असली व उत्कृष्ट शालिहोत्रज्ञांनीं जरी आपल्या अश्वत्वाविषयीं अनेक सर्टिफिकिटें दिलीं, व आपली धमक आपली आपल्याला जरी दिसत असली, तरी तें सर्व एकीकडे ठेवून निरपेक्ष बुद्धीनें जन्मभर अंगमेहनत करणारे जे कुंभकर्णाचे बंधु परम वैराग्यशील व पूर्णसमाधानी श्रीमत्सदानंदस्वामी[1] हेच आमचे महापूर्वज ह्मणून सतत हटाग्रह घेऊन बसणें या सत्यनिष्ठेस कार्य ह्मणावें हें बरीक आह्मांस समजत नाहीं! एका अंशीं खोटा अभिमानही श्लाघ्य ह्मणतां येईल; कां कीं, त्यावरून थोर पदवीस चढण्याची उत्कट इच्छा तरी प्रगट होते. पण आपली वास्तविक योग्यताही लोपवण्याचा प्रयत्न करून मुद्दाम कान लांब करून गाढवांच्या पंक्तीला बसणें यांत कोणास काय पुरुषार्थ वाटत असेल तो असो!

तेव्हां आह्मी आपल्या ज्ञातिबांधवांविषयीं ज्या भावना मनांत बाळगतों त्या 'लोकहितवादीं'च्या पेक्षां फार निराळ्या आहेत. प्रस्तुत विषयाच्या संबंधानें आमचाही केवळ नि:पक्षपात बुद्धीनेंच लिहिण्याचा संकल्प आहे; पण ही नि:पक्षपातता वरील मासल्याची मात्र नाहीं. 'लोकहितवादीं'चा प्रयत्न जसा जेथें तेथें आपल्या देशबंधूंवर नक्षा करून व आपल्या ज्ञातिबांधवांवर प्रहार करून आपलें ज्ञानविशिष्टत्व मिरवण्याचा असतो, तसा

---

१. वरील स्वामी कोण (वे० रा० रा० गर्दभाचार्य सं०) हें आमच्या पुणेंकर वाचकांस बहुधां सांगायाला नकोच. इतरांस संशय पडल्यास त्यांनीं अंक २३ ( पृष्ठ २१४ टीप १ पाहा सं० ) व २८ (पृष्ठ ३५१ ओळी १२–२१ पाहा सं०) हे पाहावें.

‡ Intoxication of the brain, पृष्ठ १०५६ टीप * पाहा 'सम्पादक'

आमचा बिलकुल नाहीं. गरीब बिचारी जी जुनी 'भटें' किंवा जुन्या चालीचे गृहस्थ यांच्यावर आह्मीं आपल्या इंग्रेजी ज्ञानाची मोठी फुशारकी मारली ह्मणजे त्यांत आमचा पुरुषार्थ तो काय झाला! आह्मांला पाहा भूगोलाचें कसें ज्ञान आहे कीं, आफ्रिका खंड, अमेरिका खंड, अटलांटिक् महासागर; पॅसिफिक् महासागर, असें आह्मी ह्मणतों; नाहीं तर तुह्मी कोठलें जंबुद्वीप, क्रौंचद्वीप, दह्याचा समुद्र, मधाचा समुद्र वगैरे काढून इतके दिवस त्यांत गचकळ्या खात बसलां होतां; कसले तुह्मी गाढव लोक; इत्यादि वल्गना आजपर्यंत सहस्रावधि एतद्देशीय पंडितांनीं करून आपल्या बुद्धिमत्तेचें श्रेष्ठत्व मिरवलेलें आहे; पण आह्मांस तर हा निवळ पोरकटपणा वाटतो! त्यांतून 'लोकहितवादी'प्रभृतींनीं कुक्, मॅजेलन् यांच्याप्रमाणें जर एकादी मोठी सफर तरी केली असती, किंवा पॅसिफिक् महासागर माहीत असल्याचें कांहीं चीज करून दाखवलें असतें, तर वरील घमेंडींत कांहीं अर्थ तरी होता; पण तसें कांहींच नसल्यानें दुग्धसमुद्राच्या जागीं भूमध्यसमुद्र आल्यानें येवढा कोणता फरक झाला तो आह्मांस समजत नाहीं! दुसऱ्याच्या उसन्या ज्ञानावर आपणच मधल्यामध्यें फुगून जावें हें कोणाही समंजस मनुष्यास पसंत पडणार नाहीं. असो; तर या देशांत जी ब्राह्मणांची व भटांची स्थिति आढळते तिजविषयीं पुढें जें आह्मी लिहिणार तें परद्वीपस्थांचें ज्ञाननेत्र उसने घेऊन त्यावरून लिहिणार असें नाहीं. तर एकंदर जगाविषयीं विचार केला असतां कोणाही मनुष्याच्या ज्या गोष्टी सहजपणानें समजुती होण्यासारख्या आहेत त्या येथें दाखल करूं.

३. अलीकडे भाषाशास्त्रांतील प्रमेयांवरून व कांहीं अवांतर प्रमाणांवरून पाश्चात्य पंडितांनीं असा सिद्धांत ठरवला आहे कीं, हें भरतखंड मूळचें आमचें नव्हे; तर कॉकेजस् पर्वताच्या आसपास जीं आर्यराष्ट्रें राहत असत त्यांपैकीं पुढें कित्येक पूर्वेकडे गेलीं व कित्येक पश्चिमेकडे गेलीं, त्यांपैकीं प्राच्य आर्य झाले ह्मणजे आह्मी व पारसीक हे आहों. पारसीकांनीं इराणची वाट धरली, व आह्मीं पंचनद ( पंजाब ) देशांतून या हिंदुस्थानांत शिरलों. ही उपपत्ति जर स्वीकारली, तर आह्मी मुसलमान, फिरंगी, इंग्रेज, यांच्यासारखेच परस्थ आहों असें झालें. आतां या ठिकाणीं येवढाच विचार कर्तव्य आहे कीं, आह्मी आपापसांत व आमच्या अंकित लोकांशीं कोणच्या तऱ्हेनें वागलों?

वैदिक काळांतल्या स्थितीविषयीं अलीकडे असा सिद्धांत ठरला आहे कीं, त्यांत जातिभेदाचा प्रकार मुळींच नव्हता.[१] तेव्हां या काळांत ब्राह्मणांचें बंड मुळींच नव्हतें हें उघड आहे, यास्तव या आद्य युगाविषयीं तर विचार करायाला नकोच. पुढलें पौराणिक युग; या दुष्ट काळांत ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र अशी वर्णव्यवस्था होऊन या आर्यभूमींत अवदशेनें प्रवेश केला. आतां या युगांत तरी हे चारी वर्ण एकदम कसे बांधले गेले हा एक

---

१. पुरुषसूक्तांतील चातुर्वर्ण्योपपादक ऋचा* सर्वप्रसिद्धच आहे. पण वरील सूक्त हें प्रक्षिप्त होय असें अर्वाचीन पंडितांचें ह्मणणें पडतें. मग खरा प्रकार काय असेल तो असो!

* ब्राह्मणोऽस्य मुखमासीद्बाहू राजन्यः कृतः ॥
ऊरू तदस्य यद्वैश्यःपद्भ्यां शूद्रो अजायत ॥ १२ ॥ 'सम्पादक'

दुर्घटच विचार आहे; पण ते कसेही झाले असले तरी हें उघड आहे कीं जे जे ज्या ज्या वर्णाला योग्य त्यांत त्यांत त्यांचा अंतर्भाव झाला असेल, ह्मणजे जे ज्ञानी व तपोनिष्ठ ह्मणून निवडले गेले असतील त्यांवर ब्राह्मणत्वाचा शिक्का बसला असेल, ज्यांच्यांत क्षात्र तेज चमकत असेल ते दुसऱ्या वर्गात सामील झाले असतील, ज्यांचा वाणिज्याकडे व नौका-गमनाकडे कल ते वैश्य बनले असतील, आणि वरील तिन्ही गाळण्यांतून निसटलेलीं जं गाळीव रत्नें तीं व कदाचित् मूळचे रहिवाशी अनाडी लोक यांचा चौथा वर्ण झाला असेल. हें वर्गीकरण होतांच ब्राह्मणांनीं आपला आश्रम पतकरला असेल, क्षत्रियांनीं राजवेत्राचा स्वीकार केला असेल, वैश्यांनीं नौकेचा सुकाणू धरला असेल व शूद्रांनीं बळीराजाच्या माने-वर जोखड ठेवून खांद्यावर आसूड टाकून कृषिकर्मास सुरवात केली असेल! ही आपाप-सांतली व्यवस्था झाली. आतां या आमच्या आर्यांनीं आपण जिंकलेल्या लोकांस कसें वाग-वलें हें जर पाहिलें तर शूद्रांस किंवा भिल्लप्रभृति लोकांस त्यांनीं शिकारी कुत्र्यांकडून फाड-वलें किंवा त्यांचा समूळ निःपात करून टाकला अशाविषयीं तर कोठें दाखला मिळत नाहीं. येवढे शूद्रांचे कैवारी रा० जोतीराव, व येवढी त्यांची बृहत्संहिता 'गुलामगिरी'; पण आकाशांतील बापाच्या पवित्र लेंकरांनीं जेथें तेथें जो कंठस्नानाचा पवित्र विधि आचर-लेला आढळतो तसा कांहीं प्रकार 'उद्धट व दांडग्या'[1] भटांनीं कोठेंच केलेला नजरेस येत नाहीं!!

तर वरील दोन्ही प्रकार पाहतां ब्राह्मणांस दूषण ठेवण्यास जागा राहत नाहीं हें कोणाही विचारी मनुष्याच्या लक्षांत आल्यावांचून राहणार नाहीं. पहिल्यानें उच्चनीच भाव मुळींच नसतां ब्राह्मणांची जर त्यांच्या गुणांवरून ज्ञाति बांधली असेल, तर त्यांनीं आपलें प्रस्थ माजवलें असें ह्मणण्यास जागा कोठें राहिली? 'आपलें' या शब्दाचा प्रयोगच मुळीं प्रस्तुत स्थलीं केवळ व्यर्थ होय! हें एक झालें. दुसरें असें कीं, हे जे लबाड ब्राह्मण आपण होऊन उंच पायरीवर बसले त्यांनीं आपल्या श्रेष्ठत्वाचा उपयोग काय करून घेतला ह्मणाल तर वनवास व तपश्चर्या! कंदमुळें खावीं, पर्णकुटींत राहावें, विषयत्याग करावा, पंचाग्नि-साधनादि खडतर तपें आचरावीं, वेदाध्ययन व शास्त्रविचार यांत मग्न असावें, हीं खुळें त्यांनीं माजवलीं![2] नाहीं तर आमच्या पवित्र धर्मांतली तरी मौज पाहा. विलायतेंतले

१. पृष्ठें ३९५-३९६. (अंक ३१ पाहा.)

२. आमच्या पूर्वजांविषयीं ग्रीक् व रोमन् लोकांच्या ग्रंथांतून पुष्कळ उल्लेख सांपडतात. ब्राह्मणांची तपश्चर्या, स्त्रियांचा अग्निप्रवेश, इत्यादि अपूर्व प्रकार पाहून व ऐकून वरील लोकांस किती विस्मय वाटत असे तें त्यांच्या ग्रंथांवरून व्यक्त होतें. शिकंदर बादशाहानें हिंदुस्थानावर स्वारी केली त्या वेळची चमत्कारिक हकीकत मोक्षमुल्लर् साहेबांनीं येणेंप्रमाणें दिली आहेः—

"No people certainly made a more favourable impression upon the Greeks than the Indians. And when we read the account of their moral and intellectual condition at the time of Alexander, we are obliged to

(पुढें चालू.)

बिशप् व आर्चबिशप् किंवा रोमननगरींतले ख्रिस्ताचे प्रतिनिधि यांचा: थाट काय!—राहायाला टोलेजंग राजवाडे, जेवायाला चांगलें चमचमीत, प्यायाला अर्वाचीन सोमरस, इ० इ०! तीन शतकांपूर्वी तर पोप साहेबांची काय बडेजाव असे, केवढें ऐश्वर्य असे, व काय विलास असत ते तर सांगायाला नकोतच! तिसरी गोष्ट अशी कीं, आपले आज्ञांकित जे लोक त्यांवर ब्राह्मणांचा सोटाही इतर देवप्रिय लोकांप्रमाणें फिरल्याचें कोठें आढळत नाहीं. महंमदाचे अनुयायी आमच्या देशांत व इतर अनेक देशांत शिरले, आणि त्यांनीं केलें काय? धरा, मारा, झोडा, लुटा, सुंता करा, हें एकंदर चरित्र! प्रभु येशूचे पवित्र लोक या आर्य-भूमींत शिरले व अमेरिकेंत प्रविष्ट झाले. केलें काय!—सारी अमेरिका आपल्या प्रभूच्या नांवें व पोपसाहेबांच्या हुकुमान्वयें[1] ओस करून टाकली, व मूळचे बिचारे इंडियन् लोक हे सूर्यादि देवतांचे उपासक होते, यास्तव त्यांचा पार सप्पा उडवून देऊन सारी भूमि पवित्र

---

admit that if some of their good qualities are no longer to be met with among the Indians of later times, that is owing, not entirely to an original defect of character, but to that continual system of oppression exercised upon them by foreign conquerors, to whose physical power they submitted, while they could not help despising their masters as barbarians. Of the demoralising influence of a foreign occupation we have an instance in the time of Alexander, in the story of Kalanas (Kalyana), who yielded to the flattering offers of the European conqueror, and left his sacred home to follow his royal master as a piece of curiosity. But Megasthenes was afterwards informed that the behaviour of Kalanas was strongly disapproved of by his friends, as ambitious and servile; while Mandanis was praised for his manly answer to Alexander's messengers, not only by his countrymen, but by Alexander himself. It was not long before Kalanas repented his unworthy ambition, for he burnt himself soon after a Pasargada, in the same manner as the only other Brahman who reached Europe in ancient times, burned himself at Athens, to the astonishment of the Greeks, who erected a tomb to him, with the inscription, "Here lies the Indian Sarman Cheya (Sarman Acharya?), from Barygaza, who sought immortality after the old custom of the Indians. —*Ancient Sanscrit Literture*.

१. कोलंबसानें अमेरिकेचा शोध लावल्यावर स्पेनच्या लोकांनीं मेक्सिको व पेरू या समृद्ध देशांवर लवकरच गर्दी करून सोडली, व तेथें मूळच्या लोकांचीं जीं मोठालीं राज्यें होतीं तीं मोडून टाकलीं. हीं भूमि बळकावण्याबद्दल स्पेनच्या राजास पोप महाराजांकडून आज्ञापत्र मिळालें होतें. पोप हे ख्रिस्ती धर्माचे मुख्य आचार्य असल्यामुळें ज्या त्या महत्कृत्याला त्यांची आज्ञा घ्यावी लागत असे. वरील देशच्याच राजानें जेव्हां आपलें 'अजिंक्य आरमार' इंग्लंडावर पाठवलें, तेव्हां त्यावरही वरील आचार्यांच्या हातच्या आशीर्वादाक्षता पडल्या होत्या. पण दैवयोग विचित्र; कीं त्या अक्षता व आरमार या दोघांनींही शार्मण्यसागराच्या तळीं बरोबरच ठाव घेतला!!

करून सोडली ! आमच्या देशांत तरी प्रथमतः याचकवृत्तीनें येऊन वरील लोकांनीं फावलें त्यांपर्यंत पुष्कळ धुंडाई केली, पण पुढें तिजबद्दल त्यांस बरेंच खरपूस प्रायश्चित्त मिळालें. आफ्रिकाखंडांतील नीग्रो लोकांवर तर ख्रिस्तभक्तांची केवढी कृपा होत असे. हें साऱ्या जगास महशूर आहेच. तर या सर्व प्रकारांपैकीं एकही प्रकार आमच्या वसिष्ठविश्वामित्रादि पूर्वजांच्या आचरणांत दृष्टीस पडला नाहीं ही लहानसान गोष्ट नव्हे !

४. तर ब्राह्मण लबाड, ब्राह्मण मतलबी, ब्राह्मण लोभी $ वगैरे आरोपांपासून आमचे

---

$ लोकहितवादी ह्मणतातः—

"धर्म करण्याची बुद्धि जी मनुष्यांचे ठायीं आहे तिला दोन महान शत्रु आहेत. एक लौकिकेच्छा आणि दुसरें ढोंग. कितिएक लोक वास्तविक धर्माचा रस्ता सोडून लोकांचे स्तुतीकरितां अथवा आपलें नांव प्रसिद्ध व्हावें ह्मणून उलट्या रस्त्यास जातात. आणि आर्जवी लोकांस द्रव्य देतात...... जेथें कांहीं आशा आहे तेथें हे लोक ( आर्जवी सं० ) मुंगळ्याप्रमाणें शिरतात. आणि थोरास भुलऊन त्यांचे हातून सद्व्यय ज्या द्रव्याचा व्हावा तें द्रव्य आपलेकडे ओढून घेतात. लग्नमुहूर्त लोक डौलानें करितात आणि हजारो रुपये बुडावितात. परंतु ते धर्माकडे गेले असें होत नाहीं. उलटें तितक्या द्रव्याची हानि होऊन तें द्रव्य उपजलेंच नाहीं असें होतें. आतां दुसरा शत्रु ढोंग ह्मणजे परमार्थाचें मिष दाखवून द्रव्य हरण करणारे लोक असतात. हे याच देशांत आहेत असें नाहीं. सर्व देशांत आहेत. त्यांचा उद्योग असा असतो कीं, भोळे भाविक लोकांस फसवून जें द्रव्य गरीबांचे वांटणीस जावयाचें तें ते आपलेकडे आणतात. या प्रकारचे लोक कोण ह्मणाल तर भट, भिक्षुक, गोसावी, बैरागी इत्यादि होत. आतां जे विद्यावृद्धीकरितां झटतील त्यांस द्रव्य मिळालें तर तो धर्मच आहे......परंतु याखेरीज मोठा जमाव जो फुकट खाणाऱ्यांचा आहे त्यांस मात्र ढोंग ह्मटलें पाहिजे. आणि त्या ढोंगाची पुष्टि होण्याकरितां बहुत ग्रंथ लिहून काढलों आहेत.

बहुतकरून ब्राह्मणांचे धर्मपुस्तकांत पाहिलें असतां ब्राह्मणांस खावें याची प्रशंसा फार आहे. प्रत्येक ग्रंथाचा बहुतकरून तीनचतुर्थांश भाग जेवणाचे वर्णनानें भरलेला असतो....ब्राह्मणांकरितां सर्व द्रव्य गेलें तरी पुण्य आहे अशा गोष्टी लोकांस वाचून दाखवून हे लोक त्यांस भुरळ घालतात..... मार्गावर अन्नछत्रें ब्राह्मणांकरितां घालावीं....दुसरे जातींचे लोकांत दीन, अंध, रोगी, असले तरी त्यांची व्यवस्था कांहीं केली नाहीं.......मनुष्य जन्मल्यापासून त्यास येणारे प्रसंग हे सर्व पाहून जितकें आढळलें तितकें ब्राह्मणांनीं आपलेकडे धर्म घेण्यास प्रयोजन केलें. पण हें सर्व ब्राह्मणांचें ढोंग आहे.......जितके हल्लीं ब्राह्मण आहेत तितके जर पंतोजी ह्मणजे विद्यागुरु असते तर संपूर्ण प्रजा लिहिणारी वाचणारी झाली असती व त्यांस वेतनें देण्यास कोणी नाक मुरडिता ना.......कोणी हजार फकीर जेवावयास घालतो, कोणी हजार ब्राह्मणच घालतो. परंतु जे लोक काम करण्यासारखे व धष्टपुष्ट आहेत त्यांनीं फुकट कां खावें ? याचा विचार कोणी करीत नाहीं. डौलीं लौकिकावर जातात. आणि भोळे ढोंगास भुलतात.......सांप्रत काळीं कोणी ब्राह्मण असा आढळत नाहीं कीं तो फुकट शिकवून मुलें तयार करितो, आणि पोटास धर्म मागतो. "

तथापि लोकहितवादी दुसरीकडे असेंहि ह्मणतात कीं. "सामान्यतः पाहिलें तर इतर लोकांपेक्षां बुद्धीनें ब्राह्मण वरिष्ठ आहेत. त्यांत माध्यांदिन हे बहुतकरून अज्ञानानें व अमंगळपणानें बहुधा कुणब्याचे जवळजवळ आहेत, त्यांपेक्षां देशस्थ बरे व सर्वांहून बुद्धिमान् कोकणस्थ आहेत....इतर लोकांशीं किती जरी कपाळकूट केली तरी त्यांचें 'याकर्न' हें बदलून 'व्याकरण' हा उच्चार

(पुढें चालू.)

पूर्वज वरील कोटिक्रमावरून बहुधां मुक्त होतील असें वाटतें. आता त्यांनीं सर्वांचें पायां पडून घेतलें, आपण भूदेव अशी आपणांकडे थोरवी घेतली, आपल्या चरणतीर्थाचे ठायीं पावनत्व स्थापित केलें, अध्यापन, याजन व प्रतिग्रह हे हक्क आपणांकडेच ठेवले, ब्राह्मणानें कोणताही अपराध केला तरी त्यास मृत्यूच्या शिक्षेची माफी असें ठरवलें, इत्यादि अनेक कलमांची याद आमचे प्रतिपक्षी आमच्यापुढें टाकतील. वरील कलमें खरीं आहेत, हें कोणासही कबूल करणें भाग आहे. पण वरील गोष्टींबद्दल ब्राह्मणांवर व भटांवर कडाका उडवण्यापूर्वीं आमचे प्रतिपक्षी जरासा शांतपणें जर विचार करतील, किंवा एकंदर राष्ट्रांत आढळणाऱ्या स्थितीकडे अंमळ लक्ष पुरवतील, तर त्यांचे प्रलाप पुष्कळ कमी होतील असें आम्हांस खास वाटतें. ब्राह्मणांचे ठिकाणीं इतर वर्णांहून जर विद्वत्त्व, पावित्र्य वगैरे गुण अधिक आहेत, व सर्व पूज्यतेचें अधिष्ठान जो धर्म त्याचा अधिकार जर त्यांच्याकडे आहे, तर त्यांच्याकडे विशेष पूज्यत्व असायाला कोणता प्रत्यवाय आहे? अज्ञानी मनुष्यानें ज्ञानवंतास श्रेष्ठ मानणें हा अन्याय आहे काय? धर्माचरणांत कालक्षेप करणाऱ्या पवित्र पुरुषास इतरांनीं मान दिला असतां त्यांत गैर काय आहे? त्यांतून आमच्या अर्वाचीन पंडितांस कधीं असें आढळलें आहे काय, कीं शिंदा उठला आणि साऱ्या पाणक्यांच्या पायां पडत सुटला; किंवा दाभाड्याचें व पेशव्याचें युद्ध लागलें तेव्हां मला ब्रह्महत्या घडेल अशी दाभाड्यास मोठी धास्ती पडली! कांहीं नाहीं; धर्मांतील मतें निराळीं व व्यवहार निराळा. जगांत प्राधान्य म्हटलें तर व्यवहाराचें आहे; या व्यवहारावर धर्मसंबंधीं मतांचें पुष्कळ कार्य घडतें खरें, तरी एकंदरींत पाहतां व्यवहारच धर्माला आपणाकडे ओढीत असतो. यास उदाहरण ब्राह्मणांचेंच पाहा. ब्राह्मणांचा मुख्य धर्म म्हटला म्हणजे अग्नीची उपासना व वेदाध्ययन. या दोहोंतलें हल्लीं कितीसें शिलक उरलें आहे बरें? पाणिनी, यास्क वगैरे मंडळीच्या वेळीं हजारों पशूंची आहुति पडून इंद्रवरुणादि देव तृप्त होत असत; तेंच पुढें कालिदास, भवभूति, यांच्या वेळीं पाहावें तों त्यांच्या काव्यांत इंद्रवरुण कोणीकडे लोपून जाऊन दुसऱ्याच देवांचें प्राधान्य आढळतें; त्यांतूनही अलीकडे यावें तों आमचे नामदेव, तुकाराम हे एका तिसऱ्याच देवापुढें प्रेमभरांत नाचताहेत असें आढळतें. आमच्या जोशीबोवांनीं एका लावणींत याज्ञिकांवर भडिमार उठवून यज्ञकर्मांचा जो विचका करून दाखवला आहे तो त्यांच्या गोत्रपतीला कितपतसा रुचला असता बरें? किंवा रामेश्वरभट्ट हा सर्वांगाचा दाह झाला असतां स्वकृत शूद्रगुरुच्या पायां पडतांना जर आमच्या मुख्य स्मृतिकारानें

---

शिकविण्यास मोठें संकट पडतें. वास्तव महार, मांग इत्यादि लोकांस शिकविण्याची त्यांणीं उमेद धरली होती त्यांतून बहुत लोक थकले आहेत. कारण ब्राह्मणांप्रमाणें त्यांचे जिन्हेस संस्कार होण्यास कांहीं पिढ्या गेल्या पाहिजेत व कितीही यत्न केला तरी महार ब्राह्मणाबरोबर येऊं सकत नाहीं.... पूर्वींचे क्षेत्रस्थ ब्राह्मण,जे होते त्यांनीं आमचें म्हणजे लोकांचें कांहीं फुकट खाल्लें नाहीं.त्यांनीं वैद्यकावर, ज्योतिषावर, गणितावर, मोठमोठाले सिद्धांत रचून ठेवून लोकांवर उपकार केले आहेत......या क्षेत्रस्थ ब्राह्मणांनीं विद्या वाढविण्याचा प्रयत्न व्यासाचे कारकिर्दीपासून अलीकडे कांहीं केला नसावा. इ. इ."

'सम्पादक'

पाहिला असता तर त्याची काय शांति झाली असती! त्यांतून आलीकडे म्लेंच्छसार्वभौमत्वा-पासून आमच्या आचारविचारांत जे पुष्कळच बदल झाले आहेत ते तर प्राचीन स्थितीस किती प्रकारें विरुद्ध आहेत, हें सांगायाला नकोच! तेव्हां एकंदरींत पाहतां धर्मपुस्तकांत लिहून ठेवलेल्या गोष्टी व प्रत्यक्ष घडणारा व्यवहार या दोहोंत पुष्कळच अंतर असतें, व वरील झटापटींत कोणता पक्ष बहुधा प्रबल होत असतो, हें कोणच्याही सहज लक्षांत येणारें आहे. मग असें असतां वस्तुत: घडणारा प्रकार काय आहे, इकडे बिलकुल लक्ष न पुरवतां केवळ ग्रांथिक वचनांचा आधार घेऊन त्यांवरून वेडगळ कुतर्क करीत बसायाचें व यथेच्छ जल्पना करायाची हा केवढा शहाणपणाचा मार्ग आहे बरें![1]

५. त्यांतून आमच्या नामदार साहेबांसारख्या अर्वाचीन तत्त्वज्ञान्यांस ज्यांच्या-पासून प्रकाश प्राप्त झाला असे जे इंग्रेज ग्रंथकार व विशेषत: मिशनरी लोक ते दुसऱ्यांच्या संबंधानें येवढें प्रचंड पांडित्य जें प्रगट करतात ते स्वत: त्यांतला एकादा शिंतोडा तरी आपल्या अंगावर कधीं घेऊन पाहतात काय? तो जर ते घेतील तर किती चमत्कारिक

---

१. केवळ ग्रांथिक वचनांचाच जर विचार केला तर हिंदुधर्मांतील वचनें जितकीं व्यवहाराला विरोध करणारीं आडवतील तितकीं अन्य धर्मांत आढळणार नाहींत असें नाहीं. पाहा कीं ख्रिस्ती धर्मांत आदितवारीं काम करणें हें घोर पातक मानलें आहे; पण त्या वचनामुळें 'वॉटर्लू'ची प्रचंड लढाई राहिली काय? ख्रिस्तानें आपल्या शिष्यांस आज्ञा केली आहे कीं बाबांनो, तुमच्या एका थोबाडींत कोणीं दिली तर त्याच्यापुढें दुसरा गाल करीत जा. पण याच सच्छिष्यांची कृति साऱ्या जगभर काय आहे ती पाहा! ज्या प्रभूनें सुळावर चढतांना आपल्या शत्रूंच्याबद्दल प्रार्थना केली तो कोणीकडे, आणि साऱ्या जगाला ज्यांचा सुळसुळाट पुरून उरला आहे अशीं आकाशांतील बापाचीं गरीब कोंकरें कोणीकडे! योहान्नाचें शुभवर्तमान अध्याय १४ ओवी १२ हींत प्रभु येशूचें आपल्या अनुयायिवर्गांस असें भरपूर आश्वासन आहे:—"मी तुह्मांस सांगतों, मी जीं कामें करतों तीं मजवर विश्वास ठेवणाराही करील, आणि त्यापेक्षां मोठींही करील, कारण कीं, मी बापाकडे जातों." या वचनावरून स्पष्ट आहे कीं येशूनें निजधामाला जातांना आपल्या कामाचा हवाला ख्रिस्ती लोकांस देऊन टाकला आहे. मग आह्मी जर आमचे बंधु 'ज्ञानोदय' कर्ते यांस ह्मणूं लागलों कीं, काय हो तुह्मी आज चाळीस वर्षें ख्रिस्ती धर्माची दीक्षा धारण करून बसलां आहां, मग वरील पवित्र शास्त्रोक्तीस अनुसरून आपण आह्मांस थोडेबहुत चमत्कार करून दाखवाल काय? येशू समुद्रावरून चालत गेला; तुह्मी एका खेपेला आगबोटीची गरज न ठेवतां मुंबईच्या समुद्रावर जो पाय ठेवा ते थेट लंडनच्या धक्क्यापर्यंत तडक चालत जा! वाटेनें वादळें वगैरे लागतील ह्मणाल, तर तें साधनही तुमच्यापाशीं आहेच, कां कीं, येशूनें हूं ह्मटल्याबरोबर वादळ शांत झालें, त्याप्रमाणें तुह्मीही आपला अंमल गाजवा ह्मणजे झालें! ख्रिस्त महाराजांनीं पांच पाव व दोन मासे येवढ्या सामग्रीवर पांच हजार माणसें जेवूं घातलीं; मग ज्ञानोदय कचेरींत गेल्या दुष्काळांत अशीं सहस्र-भोजनें कां बरें झालीं नाहींत? लाखों माणसांनीं अन्न अन्न करून प्राण सोडला हें तुमच्यानें खुशालपणें कसें बरें पाहवलें? आपल्या नेहेमीच्या पुडक्यांतून पांच पाव व दोन मासेही कोणाच्यानें वगळवले नाहींत काय?—या सर्व प्रश्नांस आमचे सधर्मी बंधु काय उत्तर देतील बरें? तेव्हां एकंदरींत ही गोष्ट उघड आहे, कीं कोणत्याही राष्ट्राच्या धर्मांवरून त्याचा व्यवहार पाहणें किंवा व्यवहारावरून धर्मांची परीक्षा करणें या दोन्ही गोष्टी पुष्कळ अंशीं असमंजसपणाच्या होत!

गोष्टी बाहेर पडतील बरें ? ब्राह्मणांचें इतर वर्णांशीं जें वर्तन दृष्टीस पडतें त्याची आणि आमच्या पाश्चात्य प्रभुजनांची एतद्देशीय लोकांशीं जी वागणूक नजरेस येते तिची अशी परस्पर जर तुलना केली तर काय निष्पन्न होईल ? ब्राह्मण हे परम दुर्जन व इंग्रेज लोक अत्यंत सज्जन असें ठरेल काय ? आमच्या देशांतील मोठा वेदशास्त्रसंपन्न पवित्र ब्राह्मण भागीरथीचें स्नान करून धौतवस्त्रांनिशीं रस्त्यानें चालत असून समोरून जर अंत्यज आला तर फार झालें तर तो त्यास दूर व्हावयाला सांगेल, किंवा आपणावर सावली न पाडण्याविषयीं सांगेल; पण झाडचे तुटून आलेल्या कित्येक गौरकाय अंमलदारांचा आपलें महत्त्व गाजवण्याचा काय प्रकार असतो तो पुष्कळांस माहीत असेलच. साहेब बहादुरांस देखल्याबरोबर साऱ्या काळ्या रयतेनें त्यांस सलाम केला पाहिजे. नाहीं तर खाडदिशीं चाबूक ! आमच्या एका विद्वान् रावबहादुरांचें अपवित्र दर्शन एका पाश्चात्य स्त्रियेस दुःसह होऊन आगगाडीच्या डब्यांतून त्यांचें बलात्कारेंकरून निष्कासन केलें ही गोष्ट सर्वांस श्रुत आहेच. फार दूर कशाला, बादशाही अंमल सुरू झाल्यापासून बूटमाहात्म्य किती वाढलें आहे हें सर्वांस माहीत नाहीं काय ? हायस्कुलांतून सुद्धां बादशाही कदर; कीं खबरदार साहेबांपुढें नेटिव जोडे घालून उभे राहाल तर; या नव्या बादशाही देवतांपुढें गरीब दीं नेटिवें त्यांनीं अनवाणी पायांनिशीं पुढें उभें राहून आपण किती दीनवाणी झालों आहों, हें पूर्णपणें दाखवलें पाहिजे. असें तीं न करतील तर त्यांस राजद्रोही म्हणून समजण्यांत येईल ! आम्हीच कांहीं दिवसांपूर्वी माजी बादशाहीच्या रीतरिवाजांस हंसत होतों, व दिल्लीच्या दरबारीं किंवा हैदराबादच्या कचेरींत ज्ञानवंतांत अग्रगण्य जी पाश्चात्य मंडळी तीस सात दरवा-

---

१. सन १८७७ च्या वर्षप्रतिपदेच्या सुमुहूर्तावर जो बादशाही अंमल आमच्या देशांत सुरू झाला तो विद्याखात्यासारख्या धर्मखात्यांत तरी विशेष सक्तीनें सुरू होणार नाहीं असें वाटलें होतें. कां कीं, एक तर विद्यार्थी पढवायाच्या जागा म्हणजे कांहीं सरकारी दरबारें नव्हेत; तेव्हां 'खडी ताजीम', 'नजर रक्खो', वगैरे प्रकार तेथें पुष्कळ अंशीं हास्यास्पदच होत ! देवळांत धर्मोपदेशक यावयाचा आहे; तर तुतान्या वाजवाहेत बँडवाजा झडतो आहे, अशा थाटानें त्यानें प्रवेश करून व्यासपीठावर चढावें हें जितपत शोभेल, तितपतच वरील प्रकार शोभणारे आहेत. शिवाय, ज्या विद्यार्थ्यांकडून दररोज इंग्लंडच्या इतिहासाची संथा घेववायाची त्यांसच मोगलाई कुरनिसा करण्याचीही लहानपणापासून संवय लावायाची ही तऱ्हाही आम्हांस फार विलक्षण दिसते ! इंग्रेजी विद्येचा प्रभाव स्वाभिमान, थोर बुद्धि, अशा रूपानें दृष्टीस पडावा असा जर तिच्या पुरस्कर्त्यांचा उद्देश असेल, तर त्याची व वरील मोगलाई बंदेशाईची कशी सांगड जुळणार कोण जाणे ! आमच्या सरकारास सर्व इंग्रेजी विद्यार्थी बादशाही अमलास पुरतेपणीं योग्य व्हावे असें जर वाटत असेल, तर इंग्लंडच्या इतिहासाच्या ऐवजीं मोगलाईचा किंवा तुर्कस्थानचा इतिहास चालला असतां ठीक पडेल; कां कीं मग हँपुडन्, वॉशिंग्टन् वगैरे दुर्वृत्त मनुष्यांचीं नांवें विद्यार्थ्यांच्या कानावर पडण्याचा संभव राहणार नाहीं; व जो जो नवा आक्ट पसार होत जाईल त्याला 'आमेन्' म्हणण्यास सर्व शिकतील ! शिवाय सध्यांचे विद्याविनयसंपन्न डायरेक्टर् साहेब यांच्या बंगल्याच्या पायऱ्यांखालीं प्रॉजेक्ट् मंडळीची जी वारंवार योग्य संभावना होत असते तिजपासूनही कोणास खेद वाटण्याचें विशेष कारण राहणार नाहीं ! !

यांच्या आंत बूट काढावा लागे, व हुजुरांत उभें राहायाचें तें बंदिवानाप्रमाणें हात बांधून उभें राहावें लागे, इत्यादि प्रकार नुकतेच आह्मांस हास्यास्पद वाटत असत; पण तें वाटणें निवळ मूर्खपणाचें होतें असें आतां आह्मांस कळतें! कुरनिसा, मुजरे, कदम, मुलाजा, खामोष, वगैरे सोंगें मागील काळांतल्या अर्धवट रानटी बादशाहीला लागू होतीं असा आमचा व प्रायः सर्वांचा समज होता! पण माजी बीकन्स्फील्ड् साहेब यांनीं आपलें जाति-स्मरत्व प्रगट करून आमच्या महाराणी साहेबांस केसर्-इ-हिंद् ही फारसी किताबत घेऊन दुष्काळाच्या ऐन भरांत कण्हत पडलेल्या आमच्या हिंदुस्थानास तर 'जनरल् ऑफ् दि एंपायर'पासून तों 'रावबहादुर'पर्यंत बेगडी किताबांनीं जेव्हां अगदीं मढवून काढलें तेव्हां आमच्या डोळ्यांत एकदम अंजन पडलें, व आह्मांस साफ दिसूं लागलें कीं आमच्या पाश्चात्य प्रभूंनीं येथें साठ वर्षें जी बादशाही भोगली ती अगदीं आळणीपणानें भोगली! प्रजेकडून तिच्या धन्यांचा मानमरातब जर नाटकी थाटामाटानें यथास्थितपणें उठला नाहीं, तर मग सार्वभौमत्व तें काय?

६. आतां बरच्यांपैकीं एक दोन मुद्द्यांविषयीं मात्र लिहून हें एकंदर ब्राह्मणप्रकरण आटपतों. एक हा कीं, मनूनें ब्राह्मणांस देहान्तशासनाची जी माफी† दिली आहे ती होय. ही माफी पाहून आमचे पाश्चात्य बंधु व विशेषतः ख्रिस्ताचे प्रेषित हे फार हळहळतात; कां

---

१. माजी गव्हर्नर् जनरल् लॉर्ड् बेंटिंक् यांचा कलकत्त्यास जो पुतळा आहे, त्याच्या खालीं मेकॉले साहेबांनीं रचून दिलेला लेख खोदला आहे; त्यांत पुढील चमत्कारिक वाक्य आहेः—"Who infused into Oriental despotism the spirit of British Freedom;" (ज्यानें प्राच्यदेशीय साम्राज्यांत इंग्लंडाच्या स्वातंत्र्याची मूस ओतली!) बिचारे बेंटिक् व मेकॉले! चाळीस वर्षांनंतर त्यांच्या जागीं बीकन्स्फील्ड् व लिटन् या बादशाही मूर्ति अवतीर्ण होऊन 'ब्रिटिश् स्वातंत्र्य', 'छापण्याची मोकळीक', 'जातिभेदाभाव', वगैरेंची किती धूळधाण होऊन जाणार आहे हें त्यांच्या स्वप्नींही आलें असेल काय?

† मनुस्मृति अध्याय ८ मध्यें खालील श्लोक आहेतः—

सहस्रं ब्राह्मणो दण्ड्यो गुप्तां विप्रां बलाद् व्रजन् ॥
शतानि पञ्च दण्ड्यः स्यादिच्छन्त्या सह सङ्गतः ॥ ३७८ ॥
मौण्ड्यं प्राणान्तिको दण्डो ब्राह्मणस्य विधीयते ॥
इतरेषां तु वर्णानां दण्डः प्राणान्तिको भवेत् ॥ ३७९ ॥
न जातु ब्राह्मणं हन्यात् सर्वपापेष्वपि स्थितम् ॥
राष्ट्रादेनं बहिःकुर्यात्समग्रधनमक्षतम् ॥ ३८० ॥
न ब्राह्मणवधाद्भूयानधर्मो विद्यते भुवि ॥
तस्मादस्य वधं राजा मनसाऽपि न चिन्तयेत् ॥ ३८१ ॥

यांचा सारांश असाः—पतिरक्षित विवाहित ब्राह्मणस्त्रीशीं तिच्या संमतीनें व्यभिचार करणाऱ्या ब्राह्मणास पांचशें दण्ड करावा; व जबरीसंभोग करणाऱ्या ब्राह्मणास एक हजार करावा. ब्राह्मणाचें मुंडन करणें हें देहान्त शासनाबरोबर आहे. इतर वर्णाच्या गुन्हेगारांस देहान्त शिक्षा देण्यास

(पुढें चालू.)

कीं, एकाच ज्ञातीस तेवढें कायद्यांतून वेगळें करणें हा केवढा घोर पक्षपात आहे![1] कां कीं, सर्व मनुष्यें ह्मणजे आकाशांतील बापाचीं लेकरें होत, आणि कायद्याच्या दृष्टीनेंही सारीं मनुष्यें सारखींच; मग वरील भिन्नभाव हा किती अन्यायाचा आहे बरें! खरें आहे; आमच्या पाश्चात्य तत्त्वज्ञांनीं हें मोठें अमोलिक तत्त्व शोधून काढलें खरें; पण लिहिण्यास खेद ह्मणून येवढाच वाटतो कीं, तें फार करून त्यांच्या बुकांतल्या बुकांतच काय तें आढळतें. त्यांचा उपयोग झाटला ह्मणजे प्रायः इतकाच, कीं आह्मी पाहा किती न्यायी आहों, हें आह्मांस, परराष्ट्रांस, आणि यापुढें होणाऱ्या राष्ट्रांस समजावें! बाकी एकाच अपराधाबद्दल काळा व गोरा हे दोघे सोबतीनें यमराजाच्या नगरास दाखल झाले असा प्रकार फारच क्वचित् आढ-

---

हरकत नाहीं. पण ब्राह्मण सर्व पापें आचरणारा असला तरी त्यास देहान्तशिक्षा देऊं नये. सर्व पैसा अडका बरोबर देऊन, आणि त्याच्या शरीरास किंचिन्मात्रहि इजा न करतां त्याला फक्त हद्दपार करावें. ब्राह्मणवधाहून मोठें पाप या पृथ्वीवर दुसरें नाहीं; ह्मणून ब्राह्मणवधाच्या विचारासहि राजानें मनांत थारा देऊं नये. 'सम्पादक'

१ कंपनीची नवी सनद होते वेळीं १८३३ सालीं मेकॉलेनें जें पार्लमेंटांत भाषण केलें त्यांत पुढील उद्गार निघाले होते:—

"The danger is that the new-comers, belonging to the ruling nation resembling in colour, in language, in manners, those who hold supreme military and political power, and differing in all these respects from the great mass of the population, may consider themselves as a superior class, and may trample on the indigenous race...........Unless, therefore, we leave the natives exposed to the tyranny and insolence of every profligate adventurer who may visit the East, we must place the European under the same power which legislates for the Hindoo. No man loves political freedom more than I. But a privilege enjoyed by a few individuals, in the midst of a vast population who do not enjoy it, ought not to be called freedom. It is tyranny. In the West Indies I have not the least doubt that the existence of the Trial by Jury and of Legislative Assemblies has tended to make the condition of the slaves worse than it would otherwise have been. Or, to go to India itself for an instance, though I fully believe that a mild penal code is better than a severe penal code, the worst of all systems was surely that of having a mild code for the Brahmins, who sprang from the head of the creator, while there was a severe code for the Sudras, who sprang from his feet. India has suffered enough already from the distinction of castes, and from the deeply-rooted prejudices which that distinction has engendered. God forbid that we should inflict on her the curse of a new caste, that we should send her a new breed of Brahmins, authorised to treat all the native population as Parias!"

ळतो. काळ्या मनुष्याच्या प्राणाची किंमत फार करून अल्पस्वल्प दंड, कैद, स्थलांतर, इतक्याच रूपानें घेतली जाते. ही गोष्ट तर आबालवृद्धांस श्रुत आहेच. शिवाय युरोपियन् अपराध्याची चौकशी करायाची झाली तर न्यायाधीश युरोपियन् असला पाहिजे, पंच गोरे पाहिजेत, वगैरे निःपक्षपातपणाचीं आणखी कलमें आहेत तीं निराळींच. तर या सर्व गोष्टींचा विचार केला असतां आमच्या जुन्या स्मृतिकारांत व अर्वाचीन कोडकर्त्यांत फरक कोणता होतो तो आह्मांस चांगलासा समजत नाहीं. अन्याय जर करायाचाच, तर तो सर्वांस सांगून उघडपणें केलेला एक वेळ इतका वाईट वाटणार नाहीं. पण आव मात्र सगळा बाहेरून निवळ सोवळेपणाचा आणि समदृष्टीचा, आणि कृति अगदीं भिन्न, हें मात्र कोणाच्या न्यायानुवर्ती मनास भावत असेल तें असो ![1]

७. दुसरा मुद्दा हा कीं, ब्राह्मणांनीं आपली विद्या लपवून ठेवली, व तसें केल्यानें त्यांचा आजपर्यंत बोज राहिला. ह्या दोन्ही गोष्टी प्रस्तुत ग्रंथकाराच्या दृढतर दुराग्रहाच्या मात्र दर्शक होत. वेदांसुद्धां सर्व विद्या शिकण्याचा अधिकार सर्व द्विजांस ह्मणजे पहिल्या तिन्ही वर्णांस आहे हें 'लोकहितवादीं'नीं कसें लक्षांत आणलें नाहीं कोण जाणे ? चवथा जो मंदबुद्धि शूद्रवर्ण त्यासही पुढें पुराणद्वारा सर्व ज्ञान करून घेण्यास खुला मार्ग झाला हीही गोष्ट सर्वप्रसिद्धच आहे. पण हें सर्व कोण विचार (करून 'सं०') पाहतो ? आपण ब्राह्मण असतां आपल्या ज्ञातीवर बेधडक भडिमार करतों हा धीटपणा मिरवायाला मग कसा सांपडेल ? व खालच्या पायरीच्या लोकांबद्दल येवढी कळकळ दाखवली असतां नव्या विद्वत्तेचें चीज केल्याबद्दल जो सरकारापर्यंत गवगवा होणार व ख्रिस्ती वर्तमानपत्रांतून वगैरे जो निःपक्षपाताबद्दल जयजयकार व्हावयाचा तोही एरवीं कसा व्हावा ? त्यांतून प्रस्तुत ग्रंथकर्त्यांचें जर पहिल्यापासून हें ठरीव मत आहे, कीं ब्राह्मणांची सर्व विद्या ह्मणजे येथून तेथून मुळीं *अप्रयोजक,

---

१. वरील लेखाच्या संबंधानें मलिका माआझमा महाराणी साहेबांनीं १८५८ सालीं प्रसिद्ध केलेल्या जाहिरनाम्यांतील कांहीं कलमें लक्षांत आणण्यासारखीं आहेत. तीं येणेंप्रमाणें:—

"धर्मसंबंधीं विचाराच्या, किंवा आचरणाच्या सबबीनें कोणाची तरफदारी होऊं नये, व कोणास इजा होऊं नये; व कोणास दुःख होऊं नये; तसेंच कायद्यांचा आश्रय सर्वांस समान रीतीनें व निःपक्षपातानें लोकांची जात किंवा धर्म मनांत न आणतां द्यावा.

"ईश्वरकृपेनें जेव्हां हिंदुस्तानांत स्वस्थता होईल तेव्हां त्या देशांतील व्यापारधंद्यास उत्तेजन द्यावें, लोककल्याणाच्या कृत्यांची वृद्धि करावी, व आमच्या सर्व रयतेचें हित होईल, अशा रीतीनें राज्यकारभार चालवावा, अशी आमची मनापासून इच्छा आहे. आमच्या रयतेची आबादानी तेंच आमचें सामर्थ्य, त्यांचा संतोष तीच आमच्या राज्याची मजबुती, व त्यांची कृतज्ञता तेंच आह्मांस उत्तम फळ असें आह्मी समजतों."

वरच्यापैकीं आज तेवीस वर्षांत किती अक्षरें खरीं झालीं आहेत बरें !!

* लोकहितवादी ह्मणतात:—

"ब्राह्मण लोक सर्व हिंदुस्थानांत पूर्वी विद्यादिकेंकरून प्रमुख असतां हल्लीं ते पुढें न सरकावतां मागें कां पडले आहेत याविषयीं विचार करतां असें दिसतें कीं, त्यांस प्रतिबंध करणारे बहुत आहेत.

(पुढें चालू.)

तर ती इतर वर्णांच्या लोकांस शिकवून तरी फायदा कोणता होणार होता व सध्यां होणार आहे? सगळे संस्कृत ग्रंथ ह्मणजे जर 'भूसके लड्डू'‡ तर ब्राह्मणांनीच तेवढे त्यांचें हजारो

---

व त्यांतील मुख्य हें एक आहे कीं त्यांस लोक भिक्षा देतात. याजमुळें त्या भिक्षेवर निर्वाह करून बहुत लोक आळशी राहतात. ब्राह्मणांचा मोठा भाग भिक्षा मागून निर्वाह करणारा आहे. कोण्त्याही स्थळीं पाहिलें तर ब्राह्मण भिकारी नाहींत, असें नाहीं.......कोणी द्रव्य मागतात, कोणी माधुकरी मागतात, कोणी क्षेत्रस्थ ह्मणून, कोणी अग्निहोत्री ह्मणून, इत्यादि अनेक ढोंगांनी हे लोक भिक्षा मागतात. याजकरितां जोंपर्यंत या लोकांस अशी भीक मिळते तोंपर्यंत त्यांस दुसरा उद्योग सुचेल असें दिसत नाहीं.......जरूर पडल्यावांचून मोठा सायास कोणी करीत नाही व गुणसंपादनही होत नाहीं.......इंग्लंडांत लोक मुलांस प्रथम कांहीं तरी धंदा शिकवितात आणि तो १०।१२ वर्षांचा झाला ह्मणजे सामर्थ्यवान् आहेत ते खर्च सोसून त्यास मोठी विद्या शिकवितात व गरीब आहेत ते पोटावारी चाकरीस ठेवितात. ती चाकरी अशी कीं, कांहीं धंदा यावा व पोटही भरावें.... ब्राह्मणांमध्यें पाहिलें तर संभावित आहेत, त्यांचीं मुलें घरांत राहून वेडीं होतात. त्यांस त्यांचे आईबाप मुळींच विद्या शिकवीत नाहींत.......गरीब लोक आहेत ते मुलांस कारकून करितात ह्मणजे फक्त लिहितां व वाचतां येणें. कितीएक भीक मागण्याचीच विद्या शिकवितात, ह्मणजे प्रथम त्यांस दहावीसपासून हजार पांचशें रुपयेपर्यंत खर्च करून भीक मागण्याची विद्या बाप मुंजींत शिकवितो. हा त्याच्या भिकेचा ' श्रीगणेशाय नमः ' होतो. नंतर भिक्षुकी कसब ह्मणजे चार मंत्रतंत्र व संकल्प शिकवितात. आणि अमावास्या, व्यतिपात हे पंचांगांत पाहून भीक मागावी इत्यादि प्रकार आहे. परंतु सांप्रत काळचा झोंक पाहतां कारकुनी व भिक्षुकी हीं दोन्ही करूवें आतां नकोत, महागाईमुळें हीं दोन्ही व्यर्थ गेलीं.......पाणी आणणारे ब्राह्मण, स्वयंपाक करणारे ब्राह्मण, यांचें वेतन कारकुनापेक्षां जास्त असूनही ते वेळेस मिळत नाहींत. व भिक्षुक आणि कारकून हे घरोघर जोडे फाडितात तरी त्यांस पोटास मिळत नाहीं.......अधिक कारकून व अधिक भिक्षुक तयार करण्याकरितां जे धर्म करितात ते स्वजातीस हलकेपणा आणितात....ब्राह्मणभोजनें, दक्षणा, दानें इत्यादि प्रकारचे धर्म कामास न पडतां उलटे लोकांस उपद्रवकारक होतात. तर जो मुलगा धंदा शिकेल व उपयुक्त ज्ञान मिळवील त्याचें संरक्षण करणें हा धर्म आहे.......जे कांहीं उपयोगी विद्या शिकणार नाहींत व जे भांग गांजा ओढून रिकामा वेळ घालवितात,...त्यांस लोकांनीं पोसावें हें योग्य नाहीं.......ब्राह्मणांनीं अब्रूनें कां असूं नये? आगंतुक ब्राह्मण, माधुकरी ब्राह्मण, कोंडीत ब्राह्मण, कचेरींत उमेदवार ब्राह्मण, असे दीनवाणे हे लोक फिरतात; यांची लज्जा स्वजातीस असूं नये काय? व भिक्षा घालण्यापासून जन्मपर्यंत कोणाची बेगमी होईल काय?......प्रसंगानुरूप भिक्षा ही गोष्ट ठीक आहे. पण भिक्षेचा धंदा फार वाईट आहे.......भिक्षुकांचे ढिगांचे ढीग जे पडले आहेत त्यांस आपला निर्वाह या नीच वृत्तींत होणार नाहीं व उद्योग करूं तरच आपणांस लोक पोसतील असें वाटल्यावांचून त्यांनीं तरी ती वृत्ति कां टाकावी?

‡ लोकहितवादी ह्मणतातः—

"...प्राचीन काळीं हिंदू लोकांनीं विद्या बहुत केल्या. पुढें...ब्राह्मण लोकांनी नवीन विद्या अधिक अधिक शोधायाच्या सोडून ते काव्यें करूं लागले......धर्मशास्त्रांत असें आहे कीं आपला कुलाचार रक्षावा, त्याप्रमाणें जें मागें बापानें केलें तेंच मुलानें करावें अशी समजूत पडली आणि जों जों हे मूर्ख होत चालले तों तों मागले लोक त्यांस देवासारखे दिसूं लागले. निरक्षर भट ह्मणूं लागले कीं व्यास अवतारी होता व ज्यांनीं गणिताचे ग्रंथ केले ते देव होते. असें ह्मणून मागले ग्रंथ—मात्र

(पुढें चालू.)

यथें वर्वितचर्वण केलें हें बरें नव्हे काय ? 'संस्कृताच्या ग्रन्थाचें पाणी' जर इतकें दुष्ट आहे

वाचावें, पुढें कांहीं करूं नये असें झालें. तेव्हां अज्ञान फार वाढलें. व त्यास साधन मुख्य पुराणें आणि महात्म्यें लिहावयाचीं हाच कांहीं दिवसपर्यंत पंडितांचा रोजगार होता. तेव्हां त्यांनीं मनास येईल तें लिहिलें. कोणीं कावेरी माहात्म, कोणीं करवीरमहात्म, कोणीं शालिवाहनचरित्र, कोणीं नाशिकमहात्म, कोणीं अग्निपुराण, कोणीं गणपतिपुराण अशीं लिहिलीं. प्रत्येकांत त्यांचा हेतू इतकाच होता कीं-एकाद्या देशाचें किंवा नदीचें वर्णन करून ईश्वर त्यांत आणून ठेवून ब्राह्मणांस पैसा मिळण्याची तजवीज पाहावी. तशींच व्रतमहात्म्यें; कोणीं ह्मणाला सोमवारीं उपवास करावा, कोणीं ह्मणाला मंगळवारीं, कोणीं शनवारीं. दरएकाची कथा व त्याची देवता आणि त्याचप्रमाणें अमक्यानें अमुक केलें आणि त्याचें अमुक कार्य झालें. व तसें जो करील त्याचें तसेंच होईल ह्मणून लिहिलें. पण सर्व कवींचें लाघव, आणि ब्राह्मणांचें कार्य करायाची तजवीज आहे असें उघड दिसतें......वर्षांत तीनशें साठ दिवस व त्यांहून अधिक व्रतें आहेत.....धर्मशास्त्र पाहिलें तर तो धर्मच कांहीं वेगळाच आहे. वेदांत अवतार आणि नाना प्रकारच्या देवता आणि व्रतें कांहीं नाहीं. फक्त होमाशीं कारण आहे. याचा मेध, त्याचा मेध हें सर्व त्यांत आहे. तेव्हां वेदशास्त्र व पुराणें यांचा धर्म पाहिला तर अगदीं वेगवेगळा दिसतो. पुराणांत नित्य कर्म पाहिलें तर सगळा एक दिवस करावयास पुरणार नाहीं इतके धर्म त्यांत आहेत. पण त्यांत कांहीं नीति आहे असेंही नाहीं. कांसोटा असा घालावा, गंध असें लावावें, शौच्यास अमुक कोस जावें, तोंड असें धुवावें, हेंच फार आहे......अलीकडे भट वगैरे झाले. यांनीं कांहीं ग्रंथ केले आहेत. पण ते त्यांहून अधिक. गोपिनाथ भटजीनें अमुक भट्टी केली, गणेश भटांनीं अमुक भट्टी केली, अशा शेंकडों भट्ट्या केल्या आहेत. परंतु त्यांत आहे काय ? संस्कृताचा अर्थ फार लोकांस कळत नाहीं. परंतु जर त्यांचा अर्थ कळावयाजोगा असता तर मला वाटतें कीं लोक मागेंच ते ग्रंथ समुद्रांत नेऊन टाकते. परंतु ते भ्रमांत आहेत. भरलीं मूठ सवा लक्षाची आहे तेंच बरें......शौचविधीवर देखील एक ग्रंथ आहे. त्यांत मनुष्यानें शौच कसा करावा हेंच लिहिलें आहे. वास्तवीक पाहा बरें याचा कांहीं तरी उपयोग आहे काय? कशाला भट या संस्काराच्या कंठाळभर पोथ्या बाळगतात ? यांत काय आहे ? यांचा काय उपयोग ? लोकांचें सुख व ज्ञान वाढवायाची त्यांत एक देखील गोष्ट नाहीं. मूर्खपणा वाढायाच्या गोष्टी आहेत. त्या ग्रंथांनीं वेड लावलें एवढें मात्र झालें. अज्ञानास अजरामर करण्याकारितां या पोथ्या लिहिल्या आहेत असें मला वाटतें. व त्यांची फजीती होऊं नये ह्मणून त्या गुप्त ठेवितात. कोणीं सोडूं नये, व कोणीं भलत्यानेंच वाचूं नये ह्मणतात, याचें कारण हेंच. जर त्यांत खरें ज्ञान असतें तर कोणींही वाचलें तर चिंता काय? परंतु ग्रंथ लिहिणारांची खात्री होती कीं, हें गुप्त ठेविलें तर यांचें महात्म्य राहील. हे भुसाचे लाडू आहेत हें त्यास माहीत होतें. याप्रमाणें हे भट वेडे झाले आहेत......हल्लीं कर्नाटकांतील एक सरदार याजकडे पाहिलें ह्मणजे समजतें कीं त्याचा वेळ हातपाय धुण्यांत जातो. दिवसांतून दोनशें वेळ पाय धुतो, पांचशें वेळ चूळ भरतो. यास हें काय वेड किंवा शहाणपण आहे ? तसेंच बाजीरावाकडे पाहा. हा पुरुष मराठ्यांचे राज्यास बुडाविण्यास कारण झाला. असें कां झालें याविषयीं विचार केला तर इतकेंच दिसतें कीं यास जन्मापासून नाना फडणिसानें कोपरगांवीं भटाचे शाळेंत ठेविला होता, ह्मणून केवळ भटच निपजला. याचे राजकीय गुणाचे अंकुर जळून गेले. याप्रमाणें पूर्वींचे पेशवे भटांचे शाळेंत नव्हते. कोणी असें ह्मणतात कीं राज्यास अयोग्य व्हावा ह्मणून फडणिसानें त्यास बुध्या भट केला. परंतु तोच राज्यावर आला हें देशाचें प्रारब्ध. अस्तु. त्यास वेड लागलें. त्यानें राज्य केव्हां करावें, कारभार केव्हां करावा, आणि हें नित्य कर्म केव्हां करावें हें जाणलें नाहीं. आणि या कर्मांचा फायदा काय ? जोंपर्यंत निर्मळ

( पुढें चालू.)

कीं, त्याचा विकार† 'निबंधसंग्रहा'चें 'नव्वद वर्षें' अध्ययन केल्यानेंही मोडला जाणारा नव्हे, तर क्षत्रिय, वैश्य व शूद्र या मंडळीस ब्राह्मणांनीं त्या ज्ञान्याजवळ येऊंच दिलें नाहीं हें बाईट

---

वाटे तोंपर्यंत कोणीही हात धुतोच आहे. त्यास अमुक वेळ हात धू ह्मणून सांगावयास कशास पाहिजे? परंतु इतक्या मूर्खपणाच्या गोष्टींस ब्राह्मण मात्र मान देतात. आणि कोणी उपास, कोणी व्रतें, कोणी जप, कोणी अनुष्ठान असें सगळा दिवसभर करतात. ज्याजवळ पैसा आहे त्यास भट घेरतात आणि हा उपदेश करतात. आणि पुराणिक बायांस घेरतात व वेड लावतात. 'सम्पादक'

† लोकहितवादी ह्मणतात:—

"......या संस्कृत विद्येचें तात्पर्य पाहिलें तर त्यांत व्यवहारीक उपयोग कांहींच नाहीं. संस्कृत भाषा फार प्राचीन आहे. आणि देव ह्मणजे जुने हिंदु त्यांची ती भाषा आहे. व तिजला बहुतांनीं शोधून संस्कार देऊन सुधारली आहे, ह्मणून तीस संस्कृत ह्मणतात हें खरें; परंतु तिजमध्यें जें ज्ञान वाढलें तें कोणाचेंही उपयोगी नसोन तिचा विद्यार्थी केवळ भट होईल किंवा विलक्षण तऱ्हेचा मनुष्य होईल.. याचें कारण त्यांतील ग्रंथांत फारसें ज्ञान मुळींच नाहीं. जें आहे तें केवळ जुन्या, काळचें, त्याचा आतां कांहीं उपयोग नाहीं.......कोणतेही भागांत जरी पाहिलें तरी संस्कृत विद्या निरुपयोगी व नाना प्रकारचे कुतर्क उत्पन्न करणारी, संसारावरील चित्त उडवून आळशी करणारी व निरुपयोगी कर्में करविणारी आहे. सांप्रत काळीं जें ज्ञान पाहिजे तें त्यांत मुळींच नाहीं. सांप्रत काळचे देश, तेथील राज्यें, फौजा व व्यापार इत्यादिकांची माहिती, यंत्राची उत्पत्ती, कायदेकानू कसे असावे, गैरचाली कोणत्या आहेत, टाकाव्या कोणत्या, ठेवाव्या कोणत्या, हें त्यांस माहित नसतें. दोन चार हजार वर्षामागें पिकलेलें वेड वगैरे समजुती व वांकडे तर्क हेच आतां काढून त्यांची घाटाघाट करीत आयुष्य घालवितात.......आतां ज्या तऱ्हेचें ज्ञान या देशांत शिरलें, त्याचे पुरानें हें जुनें ज्ञान वाहून गेलें. त्याची तुच्छता अगदीं स्पष्ट झाली..........

संस्कृताचा इतकाच उपयोग आहे कीं लोकांमध्यें भ्रांती उत्पन्न व्हावी व जों जों मनुष्य त्यांत प्रवीण होतो तों तों अज्ञानसमुद्रांत खोल खोल जात असतो.......प्रथम संस्कृतांत इतिहास नाहीं. मागाहून राज्यें कशीं झालीं तीं बुडालीं कोणत्या कारणानें? राज्यें किती होतीं? मुसलमान आले कधीं? त्यांचे पूर्वीं राज्यें कोणीं केलीं? याविषयीं पंडितांचें ज्ञान व नांगरहांक्याचें सारखें आहे. कलियुगास पांच हजार वर्षें सरासरी होत आलीं. त्याचा इतिहास आहे कोठें?......दुसरें संस्कृतांत भुगोल नाहीं. पंडितास पुसा कीं रूम कोठें आहे? व अरबस्थान कोठें आहे? व हिंदुस्थानची हद्द कशी व लोक किती? व लांबी रुंदी किती? तर तो हातच जोडील आणि ठाऊक नाहीं ह्मणेल. पंडिताचें ज्ञान इतकेंच कीं मेरू भूमीच्या मध्यें आहे. लक्ष योजनें उंच आहे. सिद्धपूर आहे. स्वर्गाची वाट हिमालयावर आहे. गंगा ही देवता जीवंत आहे. तशीच यमुना आहे हें त्यांचें भुगोलसंबंधीं ज्ञान. तिसरें, संस्कृतांत यंत्रज्ञान नाहीं......कोणीं पंडितानें यंत्र कधीं कांहीं केलें आहे? यंत्राची सुधारणा केली आहे? जें जातें व्यासाचे वेळेस होतें तेंच आतां आहे. जो नांगर पांडवांचे राज्यांत होता तोच आज आहे. पंडितांनीं कोणता ग्रंथ यंत्रावर विचार करून लिहिला आहे? पंडितांनीं कधीं ग्रंथ छापले आहेत? कागद करितात त्यापेक्षां चांगले करण्याची युक्ति लोकांस दाखविली आहे? कर्नाटकांत ताडपत्रावर रामराजापासून लिहीत आले तसेंच आजपर्यंत लिहितात. कोणत्या दशग्रंथी ब्राह्मणानें व कोणत्या षड्शास्त्री पंडितानें यंत्राविषयीं

[ पुढे चालू ]

केलें, कां चांगलें ? पण हा विरोध तरी 'लोकहितवादीं'च्या कोठून लक्षांत यावयाला ? त्यांस एकंदर एक गोष्ट माहीत, कीं, जिकडून आपल्या देशबांधवांचा पाडाव होईल तिकडून करायाचा. मग खरें खोटें, समंजस असमंजस, सुसंगत विसंगत, जसे ह्मणून आक्षेप आढळतील तसे ते आपल्या ब्रह्मबंधूंच्या डोक्यावर आदळून द्यावयाचे. हें देशोन्नतीचें परमश्लाघ्य कृत्य करीत असतांना आमच्या भावी नामदारसाहेबांनीं ही मोठी गोष्ट ध्यानांत आणली नाहीं, कीं आपल्या लेखांची योग्यता सदोदित सारखी राहावी असें जर मनांत असेल, तर सत्यदेवतेची होईल तेवढी जागरूक उपासना करणें अवश्य आहे. ती तशी न करतां जर प्रमत्ततेनें तिचा वारंवार उपमर्द केला, तर त्याचें भयंकर प्रायश्चित्त कधींना कधीं तरी भोगणें पडेल.

८. असो; येथवर ब्राह्मणांच्या संबंधानें तीन प्रकारांनीं विवेचन झालें. यांत 'ब्राह्मण' हें सदर जरी विषयाच्या अनुगमाकरतां धरलें आहे, तरी वरील तीन प्रकरणांत एतद्देशीय

---

विचार केला आहे ? फार झालें तर शिल्पाविषयीं एक जुनें पुस्तक काढतील आणि ह्मणतील हें पाहा आमचें यंत्रज्ञान! आंत पाहिलें तर दुसरें कांहीं नसतें, परंतु मंगळवारीं घर बांधूं नये, बुधवारीं मोरी उकरूं नये, त्रिकोण आला तर जागा टाकावी, जेथें समभाग येईल तेथें घर बांधावें, रोहिणी नक्षत्रावर लांकडें तोडावीं, हेंच ज्ञान त्यांत सांपडेल. त्या ज्ञानाप्रमाणें त्यांणीं लोकांस वेड लावून दिलें आहे. व जो तो मुहूर्त पाहतां पाहतां दमतो. मुलास बायको कशी कां असेना परंतु मुहूर्त चांगला पाहिजे. हें अज्ञान लोकांत पंडितांनीं पसरून दिलें आहे. चवथें, राज्यप्रकणीं ज्ञान पाहिलें तर मनास येईल तसें राज्य करावें या नियमावांचून कोणता नियम त्यांस ठाऊक आहे ?......देशाचें हित व देशांत द्रव्य कसें येईल याविषयीं तर यांस धुळाक्षर शिकाविलें पाहिजे. कोणत्या पंडितानें राज्याविषयीं ग्रंथ लिहिला आहे ? व राज्य करण्याची युक्ति अमुक चांगली असें दाखविलें आहे ? फक्त पंडितांनीं इतकेंच केलें आहे कीं जे जे राजे झाले त्यांची खुशामत करून त्यांस आकाशांत नेलें आहे...... पांचवी गोष्ट, परदेशांत प्रवास करून तेथील खबर लोकांत प्रसिद्ध केली पाहिजे. तर लोकांचें ज्ञान वाढतें. याविषयीं लक्षावधी ग्रंथ इंग्रजींत आहेत. येखादा तरी त्यासारखा संस्कृतांत आहे कीं काय ?......सहावें, पदार्थज्ञानही संस्कृतांत नाहीं, भलत्याचा गुण भलताच व भलतीच उत्पत्ति सांगितली आहे. सोनें जंबुनद आहे ह्मणून सांगितलें; तें कोठें आहे ? पंडितांनीं त्याची आंगठी कधीं केली आहे काय ? तसेंच सिंह, शार्दूल, शरभ या जनावरांचीं वर्णनें मनास येईल तशीं केलीं आहेत, परंतु तीं पंडितांस खरीं वाटून खरा शोध करण्यास देखील ते प्रतिकूळ आहेत. याप्रमाणें ज्योतिष, वैद्यक, रसायन, या सर्व ज्ञानचीं व्यवस्था आहे. फक्त संस्कृतांत शब्दशास्त्र मात्र आहे. ह्मणजे व्याकर्ण, अलंकार, न्याय, इत्यादि. परंतु जें इंग्रजी भाषेंत ज्ञान व विद्या आहे त्यांतला यांत एक गुंज देखील अंश नाहीं. आणि या शब्दज्ञानाचा उपयोग कोणता कीं पंडित सभेंत जमून बडबड करतात. त्यापासून लोकांस उपयोग नाहीं. धर्म नाहीं. अर्थ नाहीं. हा वितंडवाद, पण पंडितांस हीच मोठी विद्या वाटते. व तिजवर ते मिरवितात, परंतु त्यांस असें वाटत नाहीं, कीं आमचें ज्ञान निरुपयुक्त व पोकळ आहे. व याजवर लोकांस आतां फसवूं नये. लोकांस आपले कल्याणाकरितां उपयुक्त ज्ञान मिळवूं द्यावें असें वाटत नाहीं. बुडत्याबरोबर कांठावरच्यानें

[ पुढें चालू. ]

इतिहास, एतद्देशीय शास्त्रविद्या, व एतद्देशीय धर्म या तीन प्रकरणांवर आह्मीं आपले विचार नमूद केले आहेत, हें मार्मिक वाचकांच्या लक्षांत आलें असेलच. तेव्हां एकंदरीनें पाहतां 'लोकहितवादीं'नीं आपल्या देशाच्या संबंधानें जीं अनेक मतें प्रगट केलीं आहेत त्यांतील बहुतेकांच्या संबंधानें आह्मीं आपले विचार वाचकांस कळवले. हे सर्वांस प्रगट करणें आमच्या मनांत फार दिवस होतें, यास्तव तसा प्रसंग आणल्याबद्दल आह्मांस राव-बहादुरांचे उपकार मानणें भाग आहे. आमच्या वाचकांसही वरील विषय महत्त्वाचे वाटतील याविषयीं आह्मांस संदेह नाहीं; यास्तव तेही प्रस्तुत ग्रंथकाराचे आभारी होतील असें आह्मांस वाटतें. सदरील विषयांवर पुष्कळांचे निवळ प्रलाप मात्र ऐकूं येतात; पण त्यांवरील आपलीं मतें कागदावर दाखल केलीं अशीं प्रस्तुत ग्रंथकारानेंच. आतां त्यांवर त्यांचे एका तऱ्हेचे अभिप्राय पडले आहेत, व आमचे एका तऱ्हेचे पडले आहेत, ही गोष्ट निराळी; तथापि आपलीं मतें स्पष्टपणें प्रसिद्ध केल्याचें श्रेय रावबहादुरांस अवश्य दिलें पाहिजे. नुसते आडून गोळ्या मारणारे शेंदाड शिपाई पुष्कळ असतात; पण समरांगणावर निशाण फडकावून युद्धास तयार झालेला वीर थोडका! तर ज्याप्रमाणें 'लोकहितवादीं'नीं तीस वर्षांपूर्वी आपल्या देशबंधूंस आपलें 'शतपत्र' अर्पण करतांना ग्रंथकारांच्या नेहेमीच्या चालीप्रमाणें त्यांची प्रार्थना केली, त्याप्रमाणेंच आह्मीही वरील ग्रंथकाराचा निरोप घेण्याच्या तयारीस लागून हें 'शतपत्र नव्हे शतपत्राची पांकळी' त्यांस प्रांजलभावानें अर्पण करतों!

---

प्रौढं विक्रान्तमासीद्वन इव भवता शूरशून्ये रणेऽस्मिन्।[2]
—वेणीसंहार (५, ३७, द्वितीय पाद. 'सं०') भट्टनारायण.

अंक ७६—(१) उपसंहार. (२) मागील विवेचनाचें तीव्रत्व. (३) त्यांतील हेतु. (४) इतर येणारे आक्षेप. (५) 'निबंधसंग्रहां'तला उतारा.

१. या अंकांत प्रस्तुत ग्रंथकाराचा आह्मी निरोप घेणार. येथवर आमच्या देशाच्या व विशेषत: ज्ञातीच्या संबंधानें जे त्यांनी आज चाळीस वर्षे विचार प्रगट केले, त्यांच्या संबंधानें जें आह्मांस वाटलें तें त्यांस व सर्वांस आह्मीं सादर केलें. आतां हा विषय सोडतांना त्याच गोष्टींच्या संबंधानें जें कांहीं लिहिण्यासारखें आहे तें येथें नमूद करून नंतर पुढील मार्गास लागूं.

---

आंत पडावें असा त्यांचा बेत आहे......पंडितांनीं या हिंदु लोकांचें आजपर्यंत इतकें खाऊन त्यांचें कल्याण काय केलें? राहू चंद्रास खातो, ब्राह्मणांस दिलें ह्मणजे पुण्य, ब्राह्मण हेच देव असें त्यांस सांगून आपल्यासारखें मूर्ख केलें." 'सम्पादक'

१. अंक ६४,( पृष्ठे १०५९–१०६० 'सं०') पाहा.

२, "या शूरशून्य रणमंडळावर आपण खूप तरवार गाजवून घेतली!"

२. आजवर एक सबंध वर्षभर जें आह्मीं 'लोकहितवादीं'च्या मतांच्या संबंधानें विवेचन केलें तें पाहून प्रायः कोणाच्याही मनांत एक मोठी गोष्ट ही भेण्यासारखी आहे कीं, आह्मी त्यांच्याविषयीं फार कडक रीतीनें लिहिलें. हा कडकपणा पुष्कळांस आवडत नाहीं हें आह्मांस माहीत आहे; पण हें त्यांचें मृदुत्व आह्मांस बिलकूल पसंत नाहीं. अस्थानीं मृदुत्व हें गुणांत मोडत नाहीं हें तर काय, पण तें उलटें अत्यंत तीव्रत्वाहूनही अतिशयित अनर्थकारक होय अशी आमची पक्की खात्री आहे. वाग्यंत वाढलेल्या राजयक्ष्म्याचा किंवा कावकुयरीचा मुलाजा करण्यांत कांहीं हंशील आहे काय ! कोणास जर रोग झाला तर वेळेनुसार तीव्र शस्त्रक्रियाही करणें यास कोणी आततायित्व ह्मणेल काय ! तर हाच न्याय प्रस्तुत प्रकरणींही वाचकांनीं लागू करावा. मासिक पुस्तकें ही कुलस्त्रिया व कुलपुरुष यांनीं पलंगावर लोळत पडून वाचण्याचे दिवस आतां गेले. वर्तमानपत्रांनींही अमुक अमुक रावसाहेब इकडून आले, आणि तमुक तमुक रावबहादुर तिकडे गेले, व अमक्या अमक्या गांवीं एक दोन तोंडाचें पोरहूं निपजलें, असल्या वाढवा बातम्या लोकांस देण्याचें सोडून आपणाकडे येणाऱ्या वर्गणीचें कांहीं अधिक चीज करून दाखवण्याची उमेद बाळगणें दिवसांदिवस जरूर आहे. कां कीं, मासिक पुस्तक किंवा वर्तमानपत्र वाचणें ह्मणजे चहाकॉफी पिण्यासारखीच एक नवी निघालेली टूम आहे, असें मानणें या काळाच्या संबंधानें पाहतां रास्त नव्हे. सध्यां आमची व एकंदर जगाची जी स्थिति आहे ती अशी कांहीं चमत्कारिक आहे कीं, साऱ्या राष्ट्रांची जशी काय शर्यत लागली आहे. या जंगी शर्यतींत जो तो आपलें घोडें पुढें दामटण्याला पाहत आहे. नुकतीं नुकतीं आमच्या देखत दोन घोडीं पुढें होतीं तीं मागें पडलीं, व दुसरीं दोन पुढें सरसावलीं; व एक उमदा घोडा तर मधल्यामध्येंच खचला[1] ! तर असली कडाकडीची शर्यत सध्यां जर जारीनें चालू आहे तर तिच्या ऐन धर्दीत जर आह्मी चहापाण्याचे झुरके एखाद्या खुशालचंदाप्रमाणें घेत बसलों तर आह्मी किती शहाणे ह्मणवावे ! त्यांतून सध्यां आह्मी तर इतके दुबळे झालों आहों कीं, आह्मांला वरील शर्यतींत मिळवायला स्वतःचा घोडाही पण नाहीं. त्याच्या ऐवजीं काठीचा घोडा करून आपल्या कुल्यावर शिपटया मारून घेण्याची आह्मांस पाळी आहे ! तर वरील स्थिति लक्षांत आणून आमच्या पत्रकर्त्यांनीं व पुस्तककारांनीं आपल्या देशास आलेल्या दैन्याचा परिहार करण्याचे उपाय योजले पाहिजेत. या उपायांतला सर्वांत मोठा उपाय ह्मटला ह्मणजे देशस्थितीच्या वास्तविक स्वरूपाचें निरूपण होय. रोगाची यथार्थ परीक्षा हा चिकित्सेचा जसा मूळ पाया होय, व तीच जर झाली नाहीं तर मोठ्या धन्वंतऱ्याचेही उपचार जसे केवळ व्यर्थ होत, किंबहुना उलटे अनर्थकारक होत; त्याप्रमाणेंच आमचें हें येवढें पुरातन अवाढव्य राष्ट्र आज जें इतक्या निकृष्ट स्थितींत येऊन पोंचलें

१. वरील उल्लेख इंग्लंड, फ्रान्स, जर्मनी रशिया व टर्की यांच्या संबंधानें अनुक्रमेंकरून केलेला आहे हें इतिहासज्ञांस सांगावयास नकोच !

आहे तें कशामुळें हें समजलें म्हणजे अगोदर एक मोठें काम झालें. पण हें होण्यास हल्लींचा बादशाही तोंडपुजेपणा उपयोगी नाहीं. जें काय असेल तें खडखडीत सांगण्याचे हे दिवस आहेत. अगदीं गळ्यापर्यंत येऊन ठेपल्यावरही जर 'खावंद,' 'खुदावंत,' 'जी हां' हेच प्रकार रोग्यास रुचूं लागले, तर मग खुदाची मुलाखत होण्याची वेळ जवळच आली असें समजावें !

३. तर 'लोकहितवादीं'च्या मतांवर आह्मीं जी इतकी चरचरीत टीका केली, ती येवढ्याकरतां कीं त्यांच्या या देशाच्या संबंधानें ज्या समजुती आज चाळीस वर्षे होऊन बसल्या आहेत, व ज्यांचा आज इतके दिवस लेखद्वारा व वाग्द्वारा ते प्रसार करीत आहेत, त्या अगदीं चुकीच्या व अनर्थकारक आहेत; त्यांच्यापासून आजतागाईत देखील थोडा अनर्थ झाला आहे असें नाहीं. मनांतील विचार सर्व क्रियांचें मूळ होत; मग तेच जर बिघडलेले असले तर हातून घडणारा उद्योग तरी कोठून धड होणार ! लहानपणापासून पोरांस जर दोन महातत्त्वें शिकवून ठेवलीं, कीं तुमच्या वाडवडिलांनीं आजपर्यंत जें जें म्हणून करून ठेवलें आहे तें तें सारें निवळ गाढवपणाचें आहे, देवबापानें हल्लीं जे धनी आपणांला पाठवून दिले आहेत ते साऱ्या दुनियेंतले शहाणे आहेत, यास्तव आपल्या आचारविचारांचा जितका तिटकारा करावा तितका थोडा, व इंग्रेजांचें जितकें अनुकरण करावें तितकें श्रेयस्कर; तर मग तेच अंकुर बळावून पुढें जो विचित्र शाखाविस्तार दृष्टीस पडतो तो कां नये पडूं ? कोणी बापाची ओळख विसरतात, कोणास बापाची लाज वाटूं लागते, कोणी आईशीं विनोद करतात, कोणी सोमरसाचें सेवन करून गटारोदकानें अवभृथस्नान करतात, इ० इ० शतशः प्रकारांनीं आमच्या अर्वाच्य पंडितांची बुद्धि जी आज फांकलेली दृष्टीस पडते, ती कशामुळें बरें ? तीस वरील दोन महासिद्धांत हेच कारणीभूत नव्हेत काय ? 'आपले लोक पेशवाईत अगदीं मूर्ख होते यांत संशय नाहीं', हें महातत्त्व ज्यांच्या हृदयांत एकदां बाणलें त्यांच्या ठायीं स्वदेशाचा इतिहास वाचण्याविषयीं कितीशी उत्कंठा उत्पन्न होईल बरें ? असे लोक 'बापूगोखल्याचें चरित्र', 'पानपतची लढाई', 'महादजी शिंद्याचें चरित्र', 'ऐतिहासिक गोष्टी', हीं पुस्तकें मोठ्या प्रेमानें वाचतील काय ? त्यांस अर्थातच असें वाटणार आहे कीं, या बेवकूफ लोकांचीं चरित्रें वाचल्यापासून काय फायदा होणार आहे ? त्यापेक्षां क्लैव साहेबांचें चरित्र, किंवा हॅवलाक् साहेबांचें चरित्र, अथवा 'युनैटेड् स्टेट्स'चा इतिहास वाचलेला बरा नव्हे काय ? गेल्या तीन हजार वर्षांत आमच्या देशांत शहाणा म्हणून कोणी निपजलाच नाहीं हें जर खरें आहे, तर या तीस शतकांचा इतिहास म्हणजे मूर्खत्वाचा इतिहास नव्हे काय ? तर आमच्या देशांत स्वतः-विषयींचें जें लज्जास्पद अज्ञान आढळतें, व स्वदेशाच्या इतिहासाविषयीं अरुचि व अनास्था जी चोहोंकडे दृष्टीस पडते, हीं सर्व फळें 'लोकहितवादी'प्रभृति अर्वाचीन तत्त्ववेत्त्यांच्या पांडित्याचींच होत हें उघड आहे. युरोपांत व अमेरिकेंत इतिहासप्रसिद्ध थोरथोर पुरुषांचीं नांवें निघालीं असतां लोकांचीं अंतःकरणें थरारून जातात. मद्यप्राशनाच्या वेळीं त्यांच्या

नांवानें जयजयकार होतो.[1] त्यांच्या नांवानें शतवार्षिक उत्सव होतात,[2] त्यांच्या संबंधाच्या सामान्य वस्तु सुद्धां लोक मोठ्या प्रेमानें जतन करून ठेवतात.[3] त्यांचीं चरित्रें कितीक वेळां लिहिलीं जातात. शिवाय त्यांचे पुतळे, तजबिरा वगैरे तयार होतात; आणि तोच इकडचा प्रकार पाहा! कोण आपासाहेब आणि कोण दादासाहेब; होते कधीं काळचे कोणी; सारेच लोक एकंदर मूर्ख होते, त्यांत 'एरंडोऽपि द्रुमायते' या न्यायानें यांनीं चार दिवस दुढ्ढाचार्यपणा मिरवला, इतकेंच काय तें! हल्लींच्या शहाणपणाला हें जुनें अर्धेबोबडें शहाणपण तोलेल कीं काय? छे, गोष्टही बोलायला नको! 'आतां जर नाना फडनवीस असता तर त्यास पळून जावें लागतें' हा नामदार साहेबांनीं सिद्धान्त करूनच ठेवला आहे!—हें इतिहासप्रकरण झालें. याप्रमाणेंच इतर प्रकरणांविषयींही 'लोकहितवादीं'चे अभिप्राय किती

---

१, युरोपांत मद्यप्राशनाला जेव्हां मंडळी बसते तेव्हां 'टोस्ट्' देत असतात. टोस्ट् ह्मणजे अमक्याच्या नांवानें दारू पिणें. हा 'टोस्ट्' पुरुष, स्त्रिया किंवा एकादी गोष्ट यांच्या संबंधानें असतो. तेव्हां एकादा मोठा मनुष्य मंडळींत असला, किंवा एकाद्यानें कांहीं मोठा पराक्रम केला तर त्यांच्या नांवानें सारी मंडळी तोंडाला ग्लास लावते. एके प्रसंगीं मेकॉलेनें Literature of Britain (ब्रिटन् देशांतला ग्रंथसंग्रह) हा विषय काढून तत्प्रीत्यर्थं मद्यप्राशन केलें. हा प्रसंग एडिन्बर्ग् येथें १८४६ सालीं घडला, त्या वेळीं मेकॉलेनें येणेंप्रमाणें उपक्रम केला:—

"The Directors of our Institution have requested me to propose to you as a toast the Literature of Britain. They could not have assigned to me a more agreeable duty. The chief object of this Institution is, I conceive, to impart knowledge through the medium of own language......"

या भाषणाचा उपसंहार पूर्वीं एके प्रसंगीं+ आलाच आहे. (अंक ६४.).

२. हल्लीं अमेरिकेंत 'संयुक्त संस्थानांचा' शंभरावा वाढदिवस मोठ्या थाटानें गाजविण्याची तयारी चालू आहे. नुकतेंच एक मोठें पुस्तक अमेरिकेंत प्रसिद्ध झालें आहे; त्याचें नांव Our First Century (आमचें पहिलें शतक) हें आहे. सन १८५७ सालींही ज्युबिली करण्याचा घाट इंग्लंडांत कांहीं मंडळीनें घातला होता; पण त्याला कोणी विशेष झटेनात. हिंदुस्थान ह्मणजे रानवट मुलूख तेव्हां तो जिंकल्यांत येवढी प्रतिष्ठा कशाची, व शतवार्षिक उत्सव तरी कशाचा, अशा बुद्धीनें वरील समारंभाची हेळसांड चालली होती, पण प्रभूस करणें!—तेव्हां वरील जयंती एकाएकीं अशा कडाक्यानें गाजली कीं तिच्या नादानें सारें भूमंडळ दुमदुमून राहिलें!!

३. युरोपांतील पदार्थसंग्रहालयांतून अशा अनेक चिजा जतन करून ठेवतात. उदाहरणार्थ आमच्या महाराष्ट्रसिंहाचीं शत्रूच्या हृदयास विदारण करणारीं वाघनखें 'ब्रिटिश् म्यूझियम्'मध्यें ठेवलीं आहेत. अशा इकडच्या चिजा तिकडे शेंकडों नेऊन ठेवलेल्या आहेत. एका अर्थीं या गोष्टीचें आह्मांस बिलकुल दुःख वाटत नाहीं. आमच्यांत इकडे असली दिवटी मंडळी निघालेली आहे कीं, आपल्यापासचा एकादा जिन्नस कुजूं देतील, किंवा वाण्याच्या दुकानीं त्याची वासलात करतील, पण कोणाला ह्मणून दाखवणार नाहींत! दोन तीन वर्षांपूर्वीं येथील मोडक्या बाजारांत श्री० सवाई माधवराव व यशोदाबाई यांच्या जुन्या तसबिरा विकायाला मांडल्या होत्या, त्यांस कोणी गिऱ्हाईक विचारीना; त्यांच्या चौकटी चांगल्या नक्षीच्या होत्या, यास्तव त्या काढून देण्याविषयीं मात्र कित्येक बोलत. हल्लीं त्या तसबिरा आमच्या चित्रशाळेंत आहेत!!

+ पृष्ठ १०५८ टीप १ पाहा.

'सम्पादक'

समंजस आहेत, हें यापूर्वी दर्शवण्यांत आलेंच आहे. कालिदासादि कवींची ख्याति साऱ्या भूगोलावर पसरून युरोपांतील व अमेरिकेंतील मोठमोठे पंडित त्यांच्या कृति पाहून तन्मय होतात; इकडे आमच्या रावबहादुरांनीं पहिल्यापासून एक मत* बळकट धरून ठेवलें आहे कीं वरील कवि हे देशाच्या अपकर्षास कारणभूत होत. त्यांनीं लोकांत शृंगारोद्दीपन करून

---

* लोकहितवादी ह्मणतातः—

"...या एक हजार वर्षांपूर्वी या देशांत हिंदवी राज्यें कशीं होतीं त्याचा कांहीं पत्ता लागत नाहीं. राम, कृष्ण, बौद्ध, यांच्या थोड्या थोड्या गोष्टी आहेत. परंतु इतर राजांचा ठिकाण नाहीं. तेव्हां असें इतिहासाचें शून्य असण्याचें कारण काय हा प्रश्न साहजिक उद्भवतो. अस्तु. आमचे समजुतीप्रमाणें आह्मांस कांहीं कारणें दिसतात तीं अशीं:—प्रथम तर असें दिसतें कीं, इतिहासापासून उपयोग आहे व खरा इतिहास लिहावा ही गोष्ट हिंदू लोकांस कळलीच नाहीं व हिंदू लोकांचें शहाणपण इतक्या स्थितीवर आलें नाहीं. आणि मुसलमान इतिहासकर्ते यांच्याविषयीं असेंच लिहितात कीं हे लोक अगदीं अज्ञानी होते. यांस जिंकण्यास आह्मांस उशीर लागला नाहीं......दुसरें कारण असें कीं, या देशांत अनेक भाषा चालत, यामुळें लोकांची फारशी मिसळ होत नव्हती. कोंकणांतील लोक कोंकणांत व बंगाल्यांतील बंगाल्यांत, असें हजारों वर्षेपर्यंत वेगळेपणानें लोक राहिले. तेव्हां एकमेकांचा इतिहास लिहिण्याची त्यांस गरज पडली नाहीं. तिसरें कारण असें आहे कीं, हिंदू लोक निवृत्तिमार्गांत लक्ष ठेवणारे फार आहेत. त्यांस कांहीं ग्रंथ लिहिणें झालें तर त्यांत परमार्थ दिसला पाहिजे. त्यांनीं या जगाची स्थिति वर्णन करण्यांत तादृश लाभ नाहीं असें मानून धर्मसंबंधीं कर्मकांडाचे ग्रंथ मात्र लिहिले. परंतु ऐहिक स्थितीवर मात्र लक्ष दिलें नाहीं. पुढें आलीकडे प्राकृत कवी तुकाराम, मोरोपंत, अच्युतराव मोडक, वगैरे जे झाले त्यांनीं तरी धर्मसंबंधीं, ईश्वराचे स्तुतिप्रकरणीं, व ज्या कथा पवित्र मानल्या होत्या त्या प्रकरणीं मात्र ग्रंथ लिहून काढण्यांत जन्म घालविला. तसेंच रंगनाथ, रामदास, जयराम, वगैरे बहुत ग्रंथकर्ते शिवाजीचे वेळेस होते. परंतु त्यांनींही मराठी राज्याचा इतिहास लिहिला नाहीं. पेशव्यांचें राज्य कमकसर शंभर वर्षे चाललें. परंतु पेशव्यांची किंवा त्यांचे पदरचे सरदार शिंदे, होळकर, पटवर्धन, विंचूरकर, राजेबहादर यांची बखर कोणीं लिहिली नाहीं. पुरुषप्रधान ग्रंथ लिहिणें हें हलकें काम असें लोकांस वाटत होतें. यास्तव जो तो कांहीं तरी देवाचे ग्रंथ करी. याजमुळें मनुष्यांचे इतिहास लिहिले गेले नाहींत. मोरोपंतांनीं तर १०८ रामायणें केलीं परंतु पेशव्यांच राज्यावर कांहीं कविता केली नाहीं. याचें कारण ती मेहनत व्यर्थ जाते असें त्यांस वाटत होतें........नववें कारण असें आहे कीं संस्कृत भाषा बुडाली. नंतर ग्रंथ करण्याचें काम थकलें आणि जुने ग्रंथ होते त्यावरून नकला व भाषांतरें करण्याचें काम चालू राहिलें. नवीन ग्रंथ करावा असें कोणास सामर्थ्यही राहिलें नाहीं व पूर्वी आपले वडील भारतासारखे ग्रंथकर्ते झाले त्यांचे वंशांतील सामर्थ्यहीन आपण ग्रंथ कशाचे करावे? असें त्यांस वाटून त्यांनीं ग्रंथ करण्याचें काम बंद पाडिलें. कालिदास वगैरे यांणीं मौजेचे ग्रंथ ह्मणजे काव्यें, नाटकें वगैरे रचिलीं तीं पण जुन्या ग्रंथांच्याच धोरणानें केलीं आहेत. नवीन ग्रंथ कोणीं केला नाहीं. कमलाकर वगैरे यांनीं ग्रंथ केले ते तरी धर्मशास्त्राचे जुने ग्रंथ पाहून त्यांजवरून जुळवाजुळव केलेले आहेत. त्यांत नवीन कांहीं नाहीं. प्राकृत ग्रंथ झाले तरी सर्व याच प्रकारचे..........."

'सम्पादक'

हिंदी लोकांस हतवीर्य करून टाकलें. मोरोपंतावर एके ठिकाणीं प्रस्तुत ग्रंथकारानें असा आक्षेप आणला आहे कीं तो भर पेशवाईंत हयात असतां त्यानें पेशव्यांवर एकादें वीररस-प्रधान काव्य करावयाचें टाकून जुन्या पौराणिक कथांत तो कुंठित बसला! कोण विलक्षण कल्पना या! लोकांचे पुढारी ह्मणवणाऱ्या महाजनांचे असे बुद्धितरंग प्रगट होऊं लागले ह्मणजे मग राष्ट्रांत किती सुधारणा होत जाणार व किती यथार्थ ज्ञान प्रसृत होणार हें सांगायाला नकोच!

---

१. रावबहादुरांचें सरस्वतीचें सारसर्वस्व जें काव्य त्याविषयीं पहिल्यापासून अत्यंत अप्रेम दिसतें. ही त्यांच्या अरसिकपणाची मोठी निशाणी ह्मणून आह्मी समजतों. अवघ्या प्राचीन व अर्वाचीन सुधारलेल्या राष्ट्रांतून कवींची लोकप्रियता कितपत आढळते ही गोष्ट त्यांनीं कधींही मनांत आणली नाहीं असें दिसतें. सॉफोक्लीज् व युरिपेडीस्, सिसरो व व्हर्जिल‡, बेकन् व शेक्सपीयर, मिल्ट व टेनिसन्, इत्यादि जोडप्यांविषयीं जर ते क्षणभर विचार करतील, तर वाग्देवीचीं मृदु व कठोर हीं दोन्ही रूपें नित्य साहचर्यानें सहज प्रगट करतां येतात हें त्यांस कळून येईल. तसेंच कवींचा वाक्प्रहार हा देशास हानिप्रद नसून उलट नदीप्रवाहाप्रमाणें अत्यंत भूषणप्रद व संतोषप्रद होय हेंही कित्येक उदाहरणांवरून सहज लक्षांत येण्यासारखें आहे. असें असतां 'लोकहितवादीं'चे पुढील विलक्षण उद्गार पाहा!!:—

"हिंदू लोक हल्लीं आहेत त्यापेक्षां चांगले होण्यास त्यांनीं बहुतेक आपलीं मूर्ख मतें सोडलीं पाहिजेत. प्रथम हीं मूर्ख मतें उत्पन्न झालीं कशीं ह्मणाल तर त्याचें कारण लिहितों. प्राचीन काळीं हिंदू लोकांनीं नवीन क्रिया बहुत केल्या. पुढें असें झालें कीं ब्राह्मण लोकांनीं नवीन क्रिया अधिक शोधावयाच्या सोडून ते काव्यें करूं लागले." 'निबंधसंग्रह'—नंबर ६१.

"भागवतासारखे शृंगारिक ग्रंथ, नवरस, अष्टनायकांचें वर्णन आणि गीतगोविंदासारखीं काव्यें, हीं लोकांस प्रिय होत चाललीं! चंपू व काव्यांचा काल ह्मणजे जसा बाजीरावाचे वेळेस होनाजी बाळांचा काळ आला आणि मराठी भाषेंत निरुपयोगी काव्यांचा भरणा झाला, तसाच होय.

'स्वाध्याय'—पृष्ठ ९१.

तसेंच 'आश्वलायन गृह्यसूत्र'—प्रस्तावना पृष्ठें ६६—६७ पाहा.

‡ Euripides. (ख्रि. पू. ४८०—४०६) सॅलेमिस् (Salamis) चा विख्यात ग्रीक् कवि. याचे आईबाप झर्सीज्च्या स्वारीचे वेळीं अथेन्सहून पळून गेले होते. ज्या दिवशीं ग्रीकांनीं या स्वारींत पर्शियनांस पिटाळून लावलें त्याच दिवशीं युरिपेडीस्चा जन्म झाला. याला लहानपणीं तालमीचा पुष्कळ शोक असून तद्विषयक अनेक बक्षिसेंहि यानें मिळविलीं होतीं. पण पुढें हा नाद सोडून त्यानें ॲनॅक्झॅगोरस् (Anaxagorus) पाशीं तत्त्वज्ञानाचें अध्ययन केलें, आणि प्रॉडिकस् (Prodicus) पाशीं अलंकारशास्त्राचें अध्ययन केलें. सॉक्रेटिस्शीं याचा दाट परिचय होता. ख्रि. पू. ४४१ मध्यें त्यानें पहिलें बक्षिस मिळविलें. आपलीं नाटकें तो ख्रि. पू. ४०८ पर्यंत बक्षिसाकरितां पाठवीं. या सालीं अथेन्स् सोडून तो मॅसिडोनियांत गेला व तेथें वारला. त्याला राजाच्या कुत्र्यांनीं फाडलें असें ह्मणतात. याच्या नाटकांत तत्त्वज्ञानविषयक ह्मणींचा फाजील उपयोग केला आहे. पात्रांचा स्वभावपरिपोष करतांना सांपडलेला कोमल भाव व करुण रस हा याचा गुणविशेष होय. आज याचीं १८ नाटकें उपलब्ध आहेत.

"संपादक."

तर आजपर्यंत आमच्या लोकांत स्वत:विषयीं पराकाष्ठेचें अज्ञान राहून कोणत्याच लौकिक कृत्याविषयीं त्यांच्या ठिकाणीं उत्साह दृष्टीस पडत नाहीं; आमच्या देशबंधूंनीं गेल्या व चालू शतकांत येवढाले पराक्रम केले असतां व तद्वर्णनपर जुने वृत्तान्त असतां त्यांचा संग्रह करून ठेवण्याविषयीं कोणासही आजपर्यंत इच्छा झाली नाहीं व अद्यापही होत नाहीं. आमच्या जुन्या विद्या व कला ऱ्हास पावत जाऊन सांप्रत तर बहुधां क्षयाच्याच पंथाला पोंचल्या आहेत, आमच्या राष्ट्रांतील जुने सद्गुण एक एक नाहींसे होत जाऊन त्यांच्या जागीं परवशताजन्य दुर्गुण आह्मांस जडत चालले आहेत, अतिनिंद्य परकी आचारांची आह्मांस लाज न वाटतां तें मोठ्या प्रतिष्ठेनें आह्मी हळू हळू अंगीकारीत चाललों आहों,—इत्यादि सर्व परिणाम आजपर्यंत माजलेलें जें तत्त्वज्ञान त्याजपासूनच साक्षात् उद्भवलेले आहेत असें आह्मी समजतों. मग वरील सर्व प्रकार जर अत्यंत अनिष्ट आहेत तर त्यांच्या मुळावर कुऱ्हाड घालून त्यांचा उच्छेद करण्याचा प्रयत्न करणें हें कृत्य अश्लाघ्यतेचें आहे काय ? हिंदुधर्म हा अत्यंत अनर्थकारक होय ह्मणून त्यावर मिशनरी, बाटे(ख्रि'सं॰')व समाजवाले यांनीं धोपाट्यावर धोपाटे घालावे यांत जर कोणास कांहीं गैर दिसत नाहीं;आमच्या जुन्या समजुती अगदीं वेडगळपणाच्या आहेत ह्मणून 'लोकहितवादी'प्रभृतींनी चाळीस वर्षें सतत पांडित्य करावें हाही प्रकार जर रास्त आहे, तर आमच्या बुद्धीनें आह्मांस जीं मतें अत्यंत असमंजस व अनर्थावह वाटतात तीं नाहींशीं करून टाकून लोकांच्या समजुती बरोबर करण्याचा आह्मींही कां उद्योग करूं नये ?

४. आतां आमच्या कित्येक कोमळ व सभ्य देशबंधूंचा आह्मांवर असा आक्षेप येईल कीं, तुह्मांस कोणाचीं मतें अग्राह्य वाटलीं तर तीं खोटीं ह्मणून तुह्मी सिद्ध करा, त्याविषयीं तुह्मांस पूर्ण अधिकार आहे; पण वरील निरसन जें करायाचें तें सौम्य व सुकुमार शब्दांनीं करायाचें टाकून तुह्मी आपल्या प्रतिपक्ष्यावर तीव्र शब्दप्रयोग करतां हें काय? या आक्षेपावर यापूर्वीं आह्मीं अनेक वेळां उत्तर दिलेलेंच आहे, यास्तव प्रस्तुत प्रसंगीं इतकें सांगतों ह्मणजे बस आहे, कीं नामदार साहेबांच्या लेखणीच्या चरचरीतपणाशीं आमच्या कलमाचा तिखटपणा जो कोणी लावून पाहील त्यास आह्मांस नांव ठेवण्यास मोठीशी जागा राहील असें आह्मांस वाटत नाहीं. शिवाय तीव्र व सौम्य लेखांविषयीं आमचें तर असें मत आहे कीं, वरील प्रयोग प्रतिपक्ष्याचा लेख ज्या मानाचा असेल त्याप्रमाणें करणें वाजवी आहे. जो सभ्य वादी आहे त्यावर जर प्रतिपक्षी तुटून पडेल व तीक्ष्ण वाक्प्रहार करील तर तें शोभणार नाहीं; पण जो मुळींच कोणाची मुरवत न धरतां तुह्मी 'पशु' आहां येथून पांडित्यास आरंभ करील त्याचा अंमळ खरपूसला समाचार घेतला असतां कोणी दोषी होईल असें आह्मांस वाटत नाहीं. इंग्लंड येवढें सुधारणेंत व सभ्यतेंत अग्रगण्य होऊन बसलें आहे, पण उद्यां जर कोणी तेथें भरसभेंत विल्यम् पिट्ट यास टोणपा ह्मणूं लागला, किंवा बेकनची महामूर्खांत गणना करूं लागला, अगर शेक्सपीयरला नांवे ठेवूं लागला, तर कोणी मुकाट्यानें ऐकून घेईल काय ? आह्मांस खास वाटतें कीं वरच्यासारख्या महापंडितास परवां

टेंपल व मॅक्लीन् यांची जशी विलायतेस पूजा झाली त्याप्रमाणेंच जाडें बक्षीस मिळाल्या-वांचून कधीं राहणार नाहीं. आतां हें खरें आहे कीं, आमच्या इकडे मंडळी अशी खमंग होऊन बसली आहे कीं, त्यांस किंवा त्यांच्या पूर्वजांस तुह्मी कांहीं ह्मणा, त्यांस ह्मणून कोणत्याही गोष्टीचा राग नाहीं. कशाला असेल? प्रत्यक्ष स्वतःची कितीही वेळां मानहानि झाली तरी जे निरंतर खाविंदचरणारविंदीं लोळणारे, त्या बापड्यांचें नाना फडनविसास कोणीं गाढव ह्मटलें ह्मणून काय गेलें? नाना फडनवीस कोण हें अगोदर पुरतें माहीत असेल तर मग त्याच्याविषयीं राग किंवा लोभ!

तर 'लोकहितवादीं'च्या लेखांवर गेल्या वर्षभर जी आह्मीं शिस्त धरली त्यांत गैर-शिस्तपणाचा प्रकार बिलकुल नाहीं अशी आमची पक्की खात्री आहे. आतां ते वयानें येवढे पोक्त झालेले आहेत, व आजपर्यंत मोठमोठे सरकारीं हुद्दे वहिवाटून हल्लीं खुद्द गव्हनर् साहेबांच्या खुर्चीशीं खुर्ची लावून बसण्यापर्यंत त्यांचा बडेजाव वाढला आहे, तसेंच लोक-कल्याणाच्या कामींही त्यांनीं आजपर्यंत पुष्कळ मेहनत केली असून हल्लींही ती खळली नाहीं; ह्या सर्व गोष्टी खऱ्या आहेत; पण ह्यांपैकीं एकही प्रस्तुत प्रकरणास बिलकुल लागू नाहीं. वाग्देवीच्या मुलखांतला कायदा असा आहे कीं, त्यांत पाऊल ठेवतांच सर्वांचीं वयें सारखीं होऊन जातात, साऱ्यांचे हुद्दे एक होतात, व उच्चनीच भावाला तेथें कोणताच थारा राहत नाहीं. हौद्यांत उडी टाकल्याबरोबर दोघे मल्ल जसे समवयस्क होतात, समरांगणावर मोठ रूमशामचे बादशाहा सारखे व सात रुपयांचा हडेलहपी शिपाई जसा सारखा, किंवा रतिनायक हा जसा ज्ञातिभेदास न ओळखतां 'पंडितराजराजितिलका'सारख्या* महाब्राह्मणासही 'यवनी नवनीतकोमलाङ्गी' हा ध्यास लावायाला चुकत नाहीं, त्याप्रमाणेंच सरस्वतीच्या साम्राज्यांतील हालहवाल आहे! रोमन् लोकांत अशी चाल असे कीं, फौजे-वर ज्याची हुकमत चालते आहे, व जो लढाया मारून विजयी होऊन आला आहे, अशा सरदारासही पुनः जर 'कॉन्सल्' हा हुद्दा पाहिजे असेल, तर त्यानें इतर उमेदवारांप्रमाणें साधा पांढरा पोषाक करून लोकसमाजांत येऊन हजर व्हावें, आणि मग त्याच्याकडे जर बहुमत पडलें तर तो हुद्दा त्यास मिळायाचा: तर विद्वत्समाजांतीलही हीच व्यवस्था आहे. तेथें रावबहादुरीला कोणी विचारीत नाहीं; व नामदारीचीही कोणी किंमत समजत नाहीं; आपला ग्रंथ आणून लोकांपुढें टाकावा, मग त्यांतील मजकुराच्या योग्यतेवरून त्याचा काय दर लागेल तो लागेल! ग्रंथकारावरून कोणी ग्रंथाची परीक्षा करीत नाहींत, तर ग्रंथावरून ग्रंथकाराची करीत असतात!

आतां कित्येक कदाचित् असेंही ह्मणतील कीं, जर 'लोकहितवादीं'नीं आपण होऊन तुह्मांकडे आपले ग्रंथ पाठवले होते तर त्यांवर इतका कडाका उडवणें हें सुजनतेस उचित नव्हे. असें जर कोणाचें मत असेल, तर त्यास सुजनता ह्मणजे काय, व ग्रंथावर टीका ह्मणजे काय, या दोहोंचाही चांगलासा उमज पडलेला नाहीं असें ह्मणणे भाग आहे. राव-

---

* जगन्नाथपंडितासंबंधीं हा उल्लेख आहे. 'सम्पादक'

बहादुरांनीं जेव्हां आपल्या कृति आमच्याकडे पाठवल्या, तेव्हां त्या तिळगुळादाखल पाठवल्या असतील असें आमच्यें मून घेत नाहीं. आमचीं मतें त्यांच्या मतांच्या किती विरुद्ध आहेत हें जरी कदाचित् त्यांस पुरतेपणीं माहीत नसलें, तरी केवळ गुणदोषविवेचनाच्या बुद्धीनेंच वरील नजर त्यांनीं आह्मांस केली याविषयीं आह्मांस बिलकुल संशय नाहीं. त्यांचा आमच्या पुस्तकास पुष्कळ दिवसांपासून आश्रय आहे, व आमचे लेख जरी त्यांनीं कदाचित् सगळेच वाचले नसतील तरी आमची विवेचनपद्धति लक्षांत येण्यापुरतें तरी त्यांनीं त्यांचें प्रसंगोपात्त अवलोकन केलें असेल याविषयीं आमची खात्री आहे. तेव्हां वर्तमानपत्रांतून वगैरे गुळमुळीत अभिप्राय जसे प्रगट होत असतात त्यासारखाच प्रस्तुत पुस्तकांतही दृष्टीस पडेल अशा आशेनें वरील ग्रंथसमर्पण झालेलें नाहीं हें उघड आहे. तर ज्याप्रमाणें आपण बाजारांत गेलों असतां आपला दुकानदाराशीं भेद आहे हें तेथें काढून उपयोग नाहीं, किंवा न्यायसभेंत अगर रणभूमीवर प्रेमालिंगनाची अपेक्षा करणें हें अत्यंत असमंजस होय, त्याप्रमाणेंच पुस्तककारांकडे आपण ग्रंथाची भेट पाठवली असतां आपणास आवडेल असाच अभिप्राय मिळेल अशी अपेक्षा करणें हेंही वेडेपणाचेंच काम आहे. प्रस्तुत विषयाचें आह्मी पूर्वीच एका अंकांत सविस्तर विवेचन केलें आहे; यास्तव तें कोणास पाहावयाचें असल्यास पाहावें, ह्मणजे प्रस्तुत प्रकरणीं चांगली समजूत पडेल असें वाटतें.[1]

५. असो; आतां सरतेशेवटीं 'लोकहितवादीं'च्या 'निबंधसंग्रहा'तला एक दुसरा उतारा वाचकांस सादर करतों. त्यावरून प्रस्तुत ग्रंथकाराच्या गुणांचें वर्णन जें आह्मी आरंभींच्या उपोद्घातांत केलें आहे त्याची प्रतीति वाचकांस आल्यावांचून राहणार नाहीं.

## "फड व पेशवाईतील माहिती."

"मराठी राज्यांत फड ह्मणून एक मोठी कचेरी होती. ती पुण्यांत पेशव्यांचे शनवारचे वाड्यांत बसत होती. त्या कचेरीचे मुख्य अधिकारी बहुत वर्षेपर्यंत बाळाजी जनार्दन भानू ऊर्फ नाना हे होते. ह्मणून त्यांस नाना फडनवीस असें नांव पडलें. या पुरुषास ज्याप्रमाणें काम करण्याची शक्ति होती त्याप्रमाणें मराठी राज्यांत दुसरे कोणासही नव्हती. सकाळपासून मध्यरात्रीपर्यंत एक क्षण व्यर्थ न जाऊं देतां सर्व काळ ते सरकारी काम करीत. त्यांत हिशेब किती लिहीत, जाबसाली† पत्रें व बातमीचीं पत्रें किती लिहीत, खलबतें आणि मसलती किती करीत, त्याचा सुमार नव्हता; व इतकें काम होण्याकरितां त्यांची वेळेची व्यवस्था फार चांगली असे. बडबड किंवा वायकळ* अगर पोकळ गोष्ट ते कधीं बोलले नाहींत, व त्यांनीं कधीं ऐकिली नाहीं; व त्यांचे घरांत फार मंडळी नसे, व स्वारीचा डौल नसे, एकांताची त्यांस फार प्रीति होती, कामावांचून त्यांचे घरीं कोणी जात नव्हतें

---

१. अंक १५ (विशेषतः पृष्ठें ३६३-३७२ 'सं०') पाहा.

† प्रश्नोत्तरयुक्त. 'सम्पादक'

* क्षुद्र, निर्बंधरहित, वायफळ. 'सम्पादक'

। कामावांचून कोणाची भेट होत नव्हती. त्यांचे हाताखालीं फडावर ७०० कारकून होते । तेथें जाबसाली, राजकीय, हिशेबी व चिटणिशी लिहिणें पुष्कळ असे. मराठी राज्याची :वना अशी होती कीं, सरकारची आप्तमंडळी व पदरची मंडळीही सरकारांत खासगत ाड्यांत राहात असे. शिवाय सरकारसंबंधाचीं माणसें दोन प्रकारचीं, मुत्सद्दी व सरदार. त्येक सरदाराजवळ मुत्सद्दी होते. त्यांचीं नांवें, फडणीस, पोतनीस, मुजुमदार, दिवाण, दसबनीस*, दप्तरदार वगैरे. याप्रमाणें लोक प्रत्येक सुभ्याचे निसबतीस असत. व त्यांस दरकदार असें म्हणत. सातारचे हुजूरचे दरकदार यांनीं पुण्याचे दरकदार नेमावे, व पुण्याचे दरकदार यांनीं प्रांतांत व महालांत दरकदार नेमावे असा दस्तुर होता. सरदारांत पटवर्धन, रास्ते, पवार, घुरप, आंगरे, विंचुरकर वगैरे सरंजामी सरदार असत. शिवाय पागे, पथकी, किल्लेदार, शिलेदार वगैरे सरदार होते. प्रत्येकास गांव व कुरणें तोडून दिलीं होतीं. दरएक सरदाराकडे दरकदार असत त्यांनीं जमाखर्ची व जाबसाली लिहिणें लिहावें; आणि अधिक उणें हुजुरास कळवावें. पुण्यापासून ५० कोशांचे आंत मोठाले गवताचे व पाण्याचे गांव पाहून त्या ठिकाणीं पागा असत. भिंवरथडी, इंद्रायणीतीर, गंगथडी इत्यादि ठिकाणीं घोडीं व स्वार राहिल्यानें खर्च थोडा पुरे, व स्वारांस आणि जनावरांस आराम असे. काम लागेल तेव्हां बोलावून घेत. तसेंच जेथें किल्ले आहेत तेथें त्यांजवर गडकरी लोक शेतसनदी शिपाई ठेवीत. शिवाय सबनीस, हवालदार, सरनोबत, किल्लेदार वगैरे अंमलदार असत. त्याचप्रमाणें पागांत व पथकांत डंके, निशाणें, बिनी व ढाल याप्रमाणें नेमणूक असे. मोठे सरदारांस नौबती, चौघडे, असत. व आणखी बक्षी, हजीरनीस, तबीब, जिनसीवाले यांची नेमणूक असे. होळकर हे माळव्याचे सुभेदार. त्याचप्रमाणें गुजराथचे सरसुभे, वसई व साष्टी हे कोंकणचे सरसुभे, कर्नाटकचे सरसुभे, असे विभाग होते. दर सुभ्याखालीं कितिएक मामलती व कमाविशी व किल्ले असत. सुभा हा लष्करी अंमलदार, तो स्वार, तोफा वगैरे बाळगून महालांत स्वस्थता राखी. त्याचे दरकदार व जमीनदार मिळून मुलकी काम करीत. दरकदाराची बहाली अगर बरतर्फी सुभ्याकडून होत नव्हती; हुजूराहून होत होती. पेशवे हे सातारचे मुख्य प्रधान म्हणून राज्यकारभार करीत. वास्तव दर पिढीस साताऱ्यास जाऊन वस्त्रें घेत, व पुण्यास फडणीस, मुजुमदार होते ते साताऱ्याहून नेमलेले असत व पुण्याचे दरकदारांनीं हरएक सुभ्याजवळ व सरदाराजवळ दरकदार नेमावे. या जागा बहुतकरून वंशपरंपरा होत्या, व त्यांस उत्पन्नाकरितां महालचे जमाबंदीवर शेकडे बांधून दिले होते तेंच वेतन. याप्रमाणें असल्यामुळें या जागा मोठ्या प्रतीच्या असत. व याजमुळें नानाफडणिसाकडे फडणिशीच्या जागा भरण्याचें काम असे. जितके फडणीस तितके सर्व नानाकडून नेमले जात. मोठे घराण्यांत एक सरदार असे. त्याचा भाऊ विंचुरकराकडील फडणीस असे. तिसरा गुजराथेंत दरकदार असे. चौथा जिल्ह्याचा सबनीस असे. याप्रमाणें एकएकाच्या घरांत दहा दहा रोजगार असत. रास्ते, पटवर्धन वगैरे जीं मोठालीं घराणीं, त्यांत तर कोणीच रिकामा

* किल्ल्यावरील शिबंदी फौजेची हजेरी वगैरे ठेवणारा. 'सम्पादक'

असे. नानाचें वेतन दाहा हजार रुपये दरसाल होतें, परंतु कारकुनी, दरक मिळून दा लाख रुपये मिळत. या नेमणुका सरकारमहशूर होत्या, सबब लांच नव्हत. शिवायसार सरदार आपले मुलखाचे हिशेब पेशव्यास देत व फडणिसाची मखलासी त्याजवर होण्य अगत्य असे, तेव्हां त्यांचे जमाबंदीवर हुजुरचे दरकदाराची प्राप्ती पन्नास हजार, सा हजार येई. त्यांतील कांहीं फडणीस घेत, कांहीं मुजुमदार घेत; याप्रमाणें वांटणी हं असे. पेशव्यांच्या स्वाऱ्या, मोहिमा व मुलुखगिऱ्या दरसाल होत. त्यांतून कांहीं खुद्द कांहीं सरदारमार्फत होत; तेव्हां त्या वेळेस जे शिपाई प्रसिद्धीस येत त्यांस सरदाऱ्या मिळ पानशे, पटवर्धन वगैरे नामांकित सरदार यांचे घरचे दाहा दाहा वीस वीस पुरुष सरक कामावर मेले होते, याजमुळें त्यांवर सरकारची फार कृपा असे. याखेरीज विदेशी लं चाकरीस असत; त्यांजवरील आरबांचे सरदार, शिद्दी सरदार, पठाणांचे सरदार, गार्दी स दार, गोमांतकी फिरंगी सरदार वगैरे हे निराळेच असत. नानाफडणिसाचे कारकिर्दीस सरदार पागा, किल्ले, आठरा कारखाने, इत्यादि फार तयारीत असत. एक वेळ बाजिराव असें मनांत आणिलें कीं, पानशे यांचा सरंजाम जप्त करावा; तेव्हां गणपतरावभाऊंनीं श्री तांस मेजवानी केली, आणि आंचवावयास जाण्याचे वाटेवर १८ विधवांचीं पानें मांड पुढें जेव्हां श्रीमंत आंचवावयास जाऊं लागले तेव्हां गणपतरावभाऊंनीं विनंति केली या स्त्रिया पाहाव्या; या इतक्यांचे भ्रतार सरकारची दौलत राखण्याकरितां मेले आहेत असें असतां सरकारांतून जप्तीचा विचार झाला हें काय ? तेव्हां बाजिरावास आश्चर्य वा त्यानें अभय दिलें.

तसेंच पूर्वी दादासाहेब राक्षसभुवनचे लढाईस गेले होते; तेव्हां तळेगांवीं जा ढमढेरे यांजकडून कोण लढाईस येणार म्हणून त्यांनीं विचारलें.तेव्हां ढमढेरे यांचे कुळांत बाई व एक १५ वर्षांचा मुलगा मात्र राहिला होता.तेव्हां त्या बाईनें दादासाहेबांस सांगि कीं आमचा कोणी पुरुष तुमचेबरोबर नसल्यास आमचे कुळाचें नांव जाईल, याजकरि एवढा मुलगा आहे हा बरोबर अगत्य न्यावा. बरं त्यास वडिलांची शरम असेल तर कांहीं सरकारांत काम करून भूषणास येईल. तेव्हां तो मुलगाही हौसेनें लष्कराबरो गेला. आणि राक्षसभुवनावर दादासाहेबांचे समक्ष ठार झाला. पुढें स्वारी परत आली तेव दादासाहेब त्या बाईकडे भेटीस गेले आणि त्यांनीं तिला सांगितलें कीं मुलगा तर मेला परंतु आतां मी तुमचा मुलगा आहें असें समजून समाधान माना. आणखी एक वेळ झालें कीं झुंझारराव घोरपडे व बाजी घोरपडे यांचा मलवडी व बुध या परगण्यांचे देशमुख विषयीं वाद लागला आणि थोरले माधवरावसाहेब यांजकडे उभयतां आले; त्या प्रस रामशास्त्री यांणीं दोन चार वेळ गोष्ट काढिली परंतु श्रीमंतांनीं कांहीं उत्तर दिलें ना म्हणून तो वाद तसाच राहिला. पुढें धारवाड घेण्याकरितां स्वारी निघाली, तेव्हां व प्रतिवादी यांस भाऊचंदमुद्धां बोलविलें, आणि लढाईंत किल्ल्यावर शिड्या लावून हल्ला क वयाचें ठरलें तेव्हां उभयतां पक्षकारांस श्रीमंतांनीं सांगितलें कीं, आतां बुरजांवर जो निश चढवील तो देशमुख खरा, असें ऐकतांच उभय पक्षांनींही मोठ्या निकरानें युद्ध केलें. त्य

ाजीचे पन्नास पुरुष ठार मेले व झुंझारराव यांणीं किल्ला सर केला; तेव्हां निर्विवाद होऊन शमुखीच्या सनदा झाल्या. याचप्रमाणें मोतीतलावाचे लढाईत पटवर्धनांचें १७ पुरुष एकम मेले त्याचें कारण असें झालें कीं, त्रिंबकरावमामा पेठे हैदर नायकावर गेले. इतक्यांत गोविंद हरी वारले. तेव्हां मामांनीं पुण्यास पत्र लिहिलें कीं, गोविंदपंत वारले, मागें पोरेंबाळें रलीं आहेत, तेव्हां त्यांच्या हातून काम कसें होईल? हें वर्तमान गोविंद हरीचे चौघां लांस व पांच भावांस कळलें; तेव्हां त्यांणीं मामांस सांगितलें कीं, उद्यांची लढाई आह्मांकडे ावी, आणि आपण उगीच पाहात असावें. आणि त्याप्रमाणें त्या दिवशीं सर्व पटवर्धन डळीनें विडे उचलले कीं, आज नांव जातें याजकरितां मामांची खात्री केली पाहिजे. मग ्याकाळचे सुमारास हैदर नायकाचा पराभव होऊन पटवर्धन मंडळी बहुत पडली आणि ाहिली ती विजयी होऊन मामांकडे आली आणि त्यांस नमस्कार केले. तेव्हां त्यांणीं हा तांत पाहून लागलीच पुण्यास लिहून सरंजामाच्या सनदा आणून दिल्या. पण चमत्कार सा झाला कीं, मामांचे पहिले दिवसाचें पत्र व हें अशीं दोन श्रीमंतांचे हातीं एकदम ालीं; तेव्हां तीं वाचून श्रीमंतांचे डोळ्यांतून अश्रु पडले. अशी सरदारांची तपासणी लढावर होत होती, आणि मुत्सद्दी यांची तपासणी फडावर होत होती. कोणी शिलेदार उमेदार असला ह्मणजे तो आरंभीं फडावर राही. तेथें त्याची हुशारी, शाहाणपणा, विश्वास व रकारचे ठायीं एकनिष्ठपणा यांची पारख झाली ह्मणजे तो अर्थातच नानापर्यंत मशहूर ोई. नंतर त्यास दरकदारी मिळे. त्यास रवाना करते वेळेस माहितगारीचा अजमास ह्मणून क कागद असे तो व तैनात, जाबता व मशाल, अबदागीर, पालखी यांतून जशी ज्याची ोग्यता असेल तसें सामान त्यास देऊन त्याचे स्वाधीन चिटणिशीकडील पत्रें श्रीमंतांचे शिक्कामुद्रां देऊन रवाना करीत. प्रत्येक सरदार व सुभा याजकडील वकील हुजूर पुण्यास हमीं राहात, व ते सरकाराशीं कामकाज पडेल तें करीत. याप्रमाणें शिंदे, होळकर, गायकवाड, पटवर्धन या सर्वांचे वकील पुण्यांत असत. सरकारची आज्ञा जी होणें ती वकिलाचे ार्फत होई आणि वकील आपले धन्यास लिहीत. शिवाय वकिलाजवळ जासूद, सांडणीस्वार, हरकारे वगैरे कागद पोंचविण्यास असत. खेरीज बातमीचीं पत्रें येत जात. व सावकारी डाकाही शिवाय होत्या. तसेंच परदरबारीं श्रीमंतांचे वकील होते. दिल्लीस नाशिककर हिंगणे, हैदर नाईकाकडे सातारकर जोशी, निजामाकडे बारामतीकर काळे व पिंगळे व नागपुरास वांईकर वैद्य असे होते. हीं कामें मोठ्या पदवीचीं होतीं. शिवाय सरकारांत फारसनवीस, इंग्रजीनवीस वगैरे होते. याप्रमाणें जे काय मराठी राज्यांत मोठे नामांकित मुत्सद्दी झाले, त्यांचा उगम फडावर झाला आहे. मोठा नामांकित हुद्दा मिळणें तो फडावर मिळे. उमेदवारांस आपली योग्यता दाखविण्यास स्थळ तेंच होतें. त्यांचे गुणाची परीक्षा तेथें होई. जाबसाली पत्रें, हिशेबी कागद, तहनामे, झडत्या, तरजुमे, एकबेरजी दुबेरजी लिहिण्याच्या तऱ्हा, उत्तम वळणाचीं अक्षरें, चिटणिशी वळण, जनोबाभटी, बिवलकरी हीं तेथेंच निर्माण झालीं. (भट व बिवलकर हे फडावरचे कारकून होते.) रोजकिर्दी, दफाती, आठरा कारखान्यांचे हिशेब, शिवाय आरमार इत्यादींचा विचार फडावर होई. बांकनीस,

खासगीवाले, हे खासगीकडील कारभारी, पण त्यांसही फडावर हिशेब द्यावा लागे. मोटमोठे सावकार यांजकडे महालाचा निश्या, रसदी भरणें वगैरे काम असे; याजमुळें त्यांची सरकारांत मोठी वजनदारी असे. दरकदारांस किताब नव्हते. त्यांचे दरकाचीं नांवें फडणीस, मुजुमदार अशीं होतीं, तींच चालत. सरदार लोकांस किताब बहुत होते. विश्वासराव हा किताब सुपेकर पवारास होता. झुंझारराव, सरजेराव, घोरपडे, नामजाद हा किताब कानवेलकर व माणकर यांनीं कोंकण प्रांत सर केला त्यांस आहे. शिवाय रणनवरे, फाकडे, सरखेल, तरवारबहादुर इत्यादि शेंकडों किताब होते. व त्या किताबांचे लवाजिमे होते. आतां सरदारांपैकीं बहुत प्रसिद्ध आहेत. तसेंच मुत्सद्यांपैकीं, रामशास्त्री न्यायाधीश, नारो बाबजी नगरचे सरसुभे, नारो आपाजी पुण्याचे सुभेदार, विसाजीपंत लेले वसईचे सुभेदार, रामाजी महादेव साष्टीचे सुभेदार, इत्यादिकांची कीर्ति अद्याप चालत आहे. अहिल्याबाईनें स्वतां ४० वर्षें राज्य केलें व तिच्या शब्दास श्रीमंत पेशवे, शिंदे, भोंसले, सर्व मानीत; व भिल्ल, कोळी, देखील तिला आई समजत. याजवरून त्या काळीं लोक अगदीं वाईट होते अशी कितिएकांची समजूत आहे ती अशुद्ध आहे असें समजावें. पेशवाईचे अखेरीस मात्र बाजिरावाचा अंमल झाला त्यांत वीस वर्षेपर्यंत सतत दंगे, बंडें, काळ अवर्षणें पडून मुलुख उजाड झाला, व गांवचे गांव बेचिराक झाले. वीस वर्षेपर्यंत सरकार नाहींसें झालें. दफतर, फड वगैरे सर्व कचेऱ्या बंद पडल्या. आणि भट व बायका यांचा मोंधळ माजला. ही गोष्ट खेरीज; परंतु या दुष्टत्वाचे पूर्वीं मराठी राज्य फार आबादान होतें; व दक्षिणेंत द्रव्य फार होतें. अस्तु. देशांत प्रसिद्धपणा पावण्याचीं स्थलें असलीं पाहिजेत. विलायतेंत पार्लिमेंट आहे तें तसेंच स्थल आहे. सांप्रत या देशीं असें स्थल नाहीं ही मोठी कमताई आहे. आतां कोणी ह्मणतील कीं फडाप्रमाणें हल्लींचीं कोडतें आहेत, त्यांत वकिली करून प्रसिद्ध व्हावें. वैद्यशाळा आहेत त्यांत विद्या करून डाक्टर व्हावें. इंजनियर शाळा आहेत त्यांत शिकून सरवेयर व्हावें. व व्यापार वाढला आहे त्यांत द्रव्य मिळवून प्रसिद्ध व्हावें. कायदेकौंसल आहे त्यांत भाषणें करून प्रसिद्ध व्हावें, तसेंच धारे कमी झाल्यामुळें व माहागाईमुळें कुळांस मिराशी जहागिरीप्रमाणें झाल्या आहेत त्यांत त्यांनीं स्वस्थ असावें. त्यास हें सर्व खरें आहे, यास आह्मी वाईट ह्मणत नाहीं, व हीं सर्व ठिकाणें फार योग्य आहेत; परंतु त्यांत समावेश व प्रतिष्ठा फार होते असें आह्मांस वाटत नाहीं. याजकरितां मोठी प्रतिष्ठा वाढेल व बहुतांचा गुण दिसोन येईल असें साधन कांहीं तरी अवश्य पाहिजे. त्याशिवाय उमेदवारांची तृप्ती होत नाहीं. लक्षावधी लोक आहेत हे हल्लीं मुकाट्यानें उगीच चोरासारखे बसले आहेत, यांणीं कोठें व कोणत्या कामांत प्रसिद्ध व्हावें ?"

वरील उतारा वाचून कोणास खेद वाटणार नाहीं कीं प्रस्तुत ग्रंथकारानें शास्त्रें व पुराणें याविषयीं विवेचन करण्याच्या भानगडींत न पडतां आपल्या देशबंधूंस आपल्या बहुश्रुतपणाचा फायदा करून देण्याचें जर मनावर घेतलें असतें तर किती बरें होतें ! तर या गोष्टीविषयीं आमच्या देशबंधूंच्या तर्फेनें नामदार साहेबांस विनंति करून त्यांची रजा घेतों.

xM501
E7.2
252309